श्री सद्गुरु गुळवणी महाराज यांना कुंडलिनी जागृती विद्या देणारे श्रीगुरुदेव

# स्वामी श्रीलोकनाथतीर्थ चरित्र



अखण्डानंद रूपाय चिदानंदात्मरूपिणे

चिन्मयानंद रूपाय लोकनाथाय नमोनमः



श्रीसद्‌गुरु, योगीराज,

## श्रीगुळवणीमहाराज

यांचे

## कुंडलिनी जागृती विद्येचे श्रीगुरुदेव

# स्वामी श्रीलोकनाथ चरित्र

चरित्र लेखक : अच्युत सिद्धनाथ पोटभरे
एम्. ए.

प्रकाशक

विद्यावाचस्पती, श्री. द. धुं. कवीश्वर शास्त्री
प्रधान विश्वस्त, प. प. श्रीवासुदेवानंद
सरस्वती स्वामी महाराज व प. प.
श्रीलोकनाथतीर्थ स्वामी महाराज स्मारक
ट्रस्ट, पुणे ४११ ००४.

☆

प्रकाशन

**प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी
महाराज व प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामी
महाराज स्मारक ट्रस्ट प्रकाशन**
श्रीवासुदेव निवास, ४२/१७ कर्वेपथ
एरंडवणे, पुणे–४११००४.

☆

80/-

**मूल्य [redacted] रुपये**

☆

© सर्व हक्क प्रकाशकाधीन

☆

प्रथमावृत्ति प्रती २०००
वर्षप्रतिपदा, शके १८९८
बुधवार–३१ मार्च १९७६

☆

चरित्र लेखक निवास
**अ. सि. पोटभरे**
'श्रीसिद्धनाथ निवास,'
२१६, सहकार नगर क्र. २,
पुणे ४११००९.

मुद्रक
**श्री. शं. द. घाटपांडे,**
जय भारत प्रिंटिंग प्रेस
छत्रपती शिवाजी पथ, ठाणे-४०० ६०२

छायाचित्र ठसे व छपा
**श्री. रत्नाकर गोविंद जोशी**
के. जोशी अँड कं., ब्लॉकमेकर्स अँ
आर्ट प्रिंटर्स, पुणे–४११ ०३०.

कागद पुरवठा
**संपत ब्रदर्स, डिस्ट्रिब्युटर्स,**
मुंबई ४०० ००२.

ऑफसेट प्रिंटिंग
**बॉम्बे फाईन आर्टस्, मुंबई.**

पुस्तक बांधणी
**जी. माधव बाईंडर्स,**
नारायण पेठ, पुणे ४११ ०३०.

प्लास्टिक कव्हर
**प्लास्टिक राफ्ट,**
'विनय', स्टेट बँक कॉलनी, पुणे.

रंगीत चित्र
**आर्टिस्ट दीक्षित, पुणे ४११ ०३०.**

# तीर्थ जीवन प्रवाह तरंग

– तीर्थ जीवन प्रवाह प्रारंभी –


* प. प. स्वामी श्रीनारायणतीर्थ महाराज, काशी आशीर्वाद
* प. प. स्वामी श्रीशिवोम्‌तीर्थ महाराज, हृषिकेश आशीर्वाद
* प्रास्ताविक निवेदन विद्यावाचस्पती श्रीदत्तात्रेय शास्त्री कवीश्वर महाराज, पुणे.
* शक्तिपात योगसाधना प्रणाली और साधक स्वामी श्रीशिवोम्‌तीर्थ महाराज, हृषिकेश
* चरित्रापूर्वी चरित्रासंबंधी चरित्र लेखकाची मनोगते
* श्रीगुरुपीठ परंपरा
* पूज्य स्वामींचे भारत भ्रमण–४१ चातुर्मास–स्वामींची कुंडली व सादृश कुंडल्या.

तरंग १ ला * श्रीलोकनाथतीर्थ स्वामी चरित्र प्रारंभ * जन्म * बालपण शिक्षण * सद्‌गुरुप्राप्ती * संन्यास * चिन्मयानंद सरस्वती * टेहरीच्या जंगलात साधना.

तरंग २ रा * "दक्षिण चलो" * होशंगाबादेस * विश्वसूत्रधाराच्या पडद्यामागील हालचाली * शक्तिपात साधनेची कल्पनातीत अनुभूती * श्रीगुरुमहाराजांचा दीक्षा प्रसंग.

तरंग ३ रा * बार्शीत स्वामी महाराजांना दीक्षा गुरुत्व * दण्डग्रहण–स्वामी लोकनाथतीर्थ झाले * महाराष्ट्राच्या अंतरंगात संचार.

तरंग ४ था * पुन्हा एकदा टेहरीकडे * सिद्धयोगाश्रम काशी आणि स्वामी,

तरंग ५ वा * पश्चिम भारत भ्रमण * निस्तुला गुरुकृपा * स्वामी सान्निध्य व साधन तीव्रता * स्वामीजी आणि समर्थ - जीवन गंगोत्रीचे प्रयागराज.

तरंग ६ वा * महद्‌भक्त मार्कण्ड * जांबवंतसिंह * सहस्रारात शक्ति * काशीकथा * मला आश्रमाची गरज नाही.

तरंग ७ वा * गुळवणी आमचे प्रपौत्र शिष्य आहेत * दक्षिण यात्रा * काशीत आश्रम * समाधी म्हणजे पोरखेळ आहे काय ? * रात्रभर समाधी * विनोदी प्रसंग.

तरंग ८ वा * काही साधकांच्या आठवणी * आश्रम विकला.

तरंग ९ वा * स्वामीसेवा फार कठीण * काळाची चाहूल १९५४ अखेरचे वर्ष * जांबवंत तुला काही सांगावयाचे आहे * जाण्यापूर्वीची निरवानिरव * स्वामी लोकनाथतीर्थ चिन्मयानंदात विलीन झाले * प्रचीतीची दिव्य ज्योती.

परिशिष्टें * काही पत्रे * पदे * आरत्या * स्तोत्रे * अवतरणिका इ. इ.

## श्रीगुरुमहाराज

॥ असा दिव्य शिष्य भेटला–गुरूस आदर दाटावा ॥



विचार शुद्ध–आचार शुद्ध । क्रिया शुद्ध–वर्तन शुद्ध ।
आतबाहेर शुद्धच शुद्ध । स्फटिक कर्पुरा लाज वाटे ॥

छाया चित्र–श्री. भास्करराव भागवत, काशी मुक्कामी १९७२



'योगश्रीपीठ' मुनिकीरेती,
हृषिकेश ( उ. प्र. )
तथा
'नारायणकुटी', संन्यास आश्रम
देवास ( म. प्र. )
इन दो शक्तिपातयोगपीठोंके
पीठाधीश्वर



भूतपूर्व पीठाधीश्वर
**प. प. श्रीस्वामी विष्णुतीर्थ महाराज**

वर्तमान पीठाधीश्वर
**प. प. श्रीस्वामी शिवोम्‌तीर्थ महाराज**

## सहृदय आशीर्वाद

"श्रीनारायणउपदेशामृत" तथा श्री स्वामी शंकर पुरुषोत्तमतीर्थ महाराज की जीवनीमें लिख चुका था कि १९६६ में पूना आने का अवसर प्राप्त हुआ। श्री गुलवणी महाराज से पर्याप्त लम्बी चर्चा हुई और मैंने उन्हें स्वामी लोकनाथतीर्थ महाराज की जीवनी लिखवाने का आग्रह किया जिसे उन्होंने सहर्ष स्वीकार कर लिया और "मैं लिखवाऊंगा" ऐसा कहा।

श्री गुलवणी महाराजने श्री. अच्युत सिद्धनाथ पोटभरे को यह कार्य सौंपा और मुझे यह कहने में प्रसन्नता होती है कि उन्होंने उसे दत्तचित्त हो कर के किया। सहस्रों पत्रों को पढना, क्रम मिलाना, और उस पर से जीवनी लिखना कोई सरल कार्य नहीं है परन्तु उन्होंने यह सब किया और आज श्री स्वामी लोकनाथतीर्थ महाराज की यह जीवनी हमारे आभे-मुख प्रस्तुत है। अच्छा तो यही था कि ग्रन्थ प्रकाशन का यह काम श्री गुलवनी महाराज के सामने ही हो जाता तो उन्हें कितनी प्रसन्नता होती।

मेरा, ग्रंथ लेखक तथा "श्री वासुदेवानंदसरस्वती ग्रन्थ प्रकाशन मण्डल" को सहृदय आशीर्वाद है तथा आप सब लोगोंसे नम्र निवेदन है कि ग्रन्थ से अधिकाधिक लाभ उठावें।

स्वामी शिवोम्‌तीर्थ

13535 फारमरज ब्रांच
टैक्सस 75234 यू. एस. ए.
29-12-75

श्रीगणेशदत्तगुरुभ्योनमः

## श्रीसद्‌गुरुस्वरूप श्रीदत्तमहाराज कवीश्वर शास्त्री

# प्रास्ताविक निवेदन

श्रीभगवदिच्छेनुसार श्री प. प. **श्रीलोकनाथतीर्थ स्वामि महाराजांचे** चरित्र प्रकाशित करण्याचा योग आला ही समाधानाची गोष्ट आहे. श्रीगुरुभक्तप्रवर श्रीमान् **पोटभरे यांनी** हे चरित्र लिहिण्याबद्दल व मुद्रित करण्याबद्दल आजपर्यंत घेतलेल्या परिश्रमांचे आज चीज होत आहे, इतकेच नव्हे तर त्यांच्या विशुद्ध गुरुसेवारूप तपाचे हे फल आहे असे म्हटले तर अतिशयोक्ति होणार नाही. 'निमित्तमात्रं भव सव्यसाचिन्' ही जाणीव ठेवून त्यांनी हे कार्य केले असल्यामुळे याच्यामध्ये सत्त्व-गुणाचा प्रकर्ष असल्याचे दिसून येईल. प. प. **श्रीगुळवणी महाराजांनी** हे चरित्र श्री. पोटभरे यांचेकडून संपूर्ण ऐकून व विशिष्ट ती सुधारणा सुचवून आशीर्वादही दिला. तोच आज या प्रकाशन रूपाने फलित होत आहे ही भावना लेखकांचीही आहे.

चित्तस्थैर्याचे जे विविध उपाय, योगसूत्रकार श्री. पतंजलिमहर्षींनी सुचविले आहेत त्यामध्ये 'वीतरागविषयं वा चित्तम्' हा एक महत्त्वाचा उपाय आहे. याचे दोन अर्थ केले जातात. ज्या चित्ताला विषयवीतराग सिद्ध पुरुष होतो ते चित्त स्थिर होते हा पहिला अर्थ. म्हणजे सिद्धमहात्म्यांच्या चरित्राचे चिंतनाने चित्त स्थिर होते असा सूत्रकारांचा अभिप्राय आहे, तो योग्यच आहे. वीतराग-गुणातीत झालेल्या महात्म्यांचे चरित्र हे अलौकिक असते. सामान्य जीवांना अविद्या, काम, कर्म या बंधनात अडकून पडावे लागते. महात्म्यांना या बंधनाची भीति नाही, म्हणून त्यांची सर्वही कार्यें ईश्वरादेशानुसार विश्वकल्याणार्थ चालू असतात. त्यात स्वार्थाचा लवलेशही नसतो. यामुळे यांचे चरित्र ईश्वरशक्तीचे निदर्शक असल्याने जिज्ञासू, सश्रद्ध जीवांना, ते यथार्थ मार्गदर्शन करण्यास समर्थ ठरते यात संशय नाही.

दंभ हा दोष असुरी संपत्तीमध्ये पहिल्या क्रमांकात भगवंतांनी घातला आहे. 'स्वधर्मप्रकटीकरणं दंभः' अशी याची व्याख्या, भगवान् श्रीशंकराचार्यांनी केली आहे. आपल्या सत्कर्माची आपल्या मुखाने जाहिरात करणे म्हणजे दंभ, असा याचा अर्थ आहे. हा प्रायः जीवांचा नैसर्गिक दोष आहे. याला कारण, 'मी नेहमी योग्यच

वागतो. कधीही चुकत नाही, 'सर्वः कांतमात्मीय पश्यति,' असा अभिमानच आहे. अलौकिक कार्ये घडली असताही त्याबद्दल अभिमान व त्याचा अविष्कार महात्म्यांचेकडून कधीही झालेला दिसत नाही. हे पाहिले म्हणजे आपला अभिमान लगेच गळून पडतो व आपल्या गुणांची फुशारकी मारणेही बंद होते आणि आपले चित्त स्थिर, समाधानी राहू शकते. असा फायदा संतचरित्र चिंतनाचा आहे.

'वीतरागविषयं वा चित्तम्' या सूत्राचा दुसरा अर्थ, वीतराग पुरुषांना जे चित्त विषय होते म्हणजे महात्म्यांच्या चित्तात ज्याचेबद्दल अनुग्रहबुद्धि निर्माण होते, त्याचे चित्त आपोआप स्थिर होऊ लागते. यालाच शक्तिपातयोग किंवा सिद्धयोग असे म्हणता येईल. अर्जुनाला विश्वरूप दाखविल्यावर श्रीभगवान् म्हणतात—'मया प्रसन्नेन तवार्जुनेदं रूपं परं दर्शितमात्मयोगात्' – 'प्रसादो अनुग्रह–बुद्धिः' – असा प्रसाद शब्दाचा अर्थ भगवान् श्रीशंकराचार्य करतात. शिष्याचे कल्याण व्हावे असा सद्गुरूंचा संकल्प झाल्याबरोबर शिष्याचे चित्त स्थिर होऊ लागून तो कल्याण मार्गाने जाऊ लागतो. या दृष्टीने या सूत्रात श्रीपतंजलिमहर्षींनी शक्तिपातयोगही सूचित केला आहे असे म्हणण्यास हरकत नाही. या योगाचे प्रात्यक्षिकच या चरित्राच्या रूपाने सर्वांचे अनुभवास येणार असल्याने हेही एक सर्वसंग्राहक कार्य या चरित्र प्रकाशनाने घडून येईल असा विश्वास वाटतो.

या योगसंप्रदायाचे प्रवर्तक व पीठाधीश्वर प. प. **श्रीनारायणतीर्थस्वामिमहाराज,** 'सिद्धयोगाश्रम', छोटीगैबी, श्रीक्षेत्र काशी यांचा व प. प. **श्रीशिवोम्तीर्थस्वामिमहाराज,** 'योगश्रीपीठ', हृषिकेश यांचा या ग्रंथास मंगल आशीर्वाद लाभला आहे. तसेच स्वामी श्रीशिवोम्तीर्थमहाराजांच्या अधिकारवाणीतून आलेला 'शक्तिपात योगसाधना प्रणाली' हा महत्त्वपूर्ण लेख या चरित्रात प्रारंभी आलेला आहे. या योगसंप्रदायाचे महान् चिंतक अधिकारी प्रा. **अ. न. जानी,** डायरेक्टर, ओरिएण्टल इन्स्टिट्यूट, बडोदा, या महाभागांचाही लेख या ग्रंथात समाविष्ट केला गेला आहे.

ईश्वरसेवाबुद्धीने व अत्यंत त्वरीत गतीने या चरित्राचे सुबक मुद्रण, जय-भारत प्रिंटिंग प्रेस, ठाणे, यांचेकडून करून देणारे श्रीमान् सौजन्यमूर्ति, गुरुभक्त श्री. **भगवंतराव पटवर्धन** तसेच श्री. **शं. द. घाटपांडे** यांनी आपल्या सहकारी सज्जनांसह हे कार्य आत्मीय बुद्धीने केले आहे. तसेच सत्कर्मयोगी श्रीमान् **गोविंदसेठ साबळे** यांनी आरंभापासूनच, 'संपत ब्रदर्स', मुंबई यांचेकडून

चरित्र ग्रंथाचे प्रकाशक !



'विद्या–विनय–अनन्यता' या गुणसरितेचा त्रिवेणी संगम
प्रधानविश्वस्त, विद्यावाचस्पती, श्रीदत्तमहाराज कवीश्वरशास्त्री
शक्तिपात योगपीठ–श्रीवासुदेव निवासाचे–उत्तराधिकारी,

# चरित्र ग्रंथाचे प्रेरणास्थान



योगश्रीपीठ' मुनीकी रेती, ऋषिकेश (उ. प्र.) आणि 'नारायणकुटी' संन्यासाश्रम
देवास (म. प्र.) या दोन्ही शक्तिपात योग पीठाचेपीठाधीश्वर
१००८ श्री स्वामी शिवोम् तीर्थ महाराज

सर्व व उत्कृष्ट कागद मिळवून देणे, पूज्य स्वामींच्या रंगीत चित्राची ऑफसेट रंगीत छपाई, बॉम्बे फाईन आर्टस् कडून करवून घेणे, अशा महत्वपूर्ण कामात अत्यंत आत्मीयतेने मदत करून संस्थेस मोठे सहाय्य केले आहे. यासाठी श्रीमान् गोविंद-सेठजी व त्यांचे सर्व सहाय्यक सज्जन धन्यवादास पात्र आहेत.

पू. स्वामींच्या रंगीत चित्राची कलाकृति ख्यातनाम आर्टिस्ट श्री. **दीक्षित** यांची आहे. ग्रंथातील अनेक चित्रांचे छायाचित्रकार श्री. **भास्करराव भागवत**, दौंड, हे श्रीगुरुमहाराजांचे विद्यार्थी व शिष्यच आहेत. काशीच्या घाटांची छायाचित्रे लेखकांचे स्नेही **श्री. सु. शं. आगाशे** यांनी घेतलेली आहेत. तर स्वतः चरित्र लेखकांनी होशंगाबादेस जाऊन तेथील महत्त्वाच्या स्थानांची छायाचित्रे घेतलेली आहेत. या सर्व चित्रांचे उत्कृष्ट ठसे व त्यांची छपाई अत्यंत तत्परतेने व आत्मीयतेने **के. जोशी ॲण्ड कंपनी**, पुणे यांच्या सहाय्याने झाली आहे. स्वामी श्रीलोकनाथतीर्थ महाराजांचा अनुग्रह लाभलेले, सेवाव्रती श्री. **नारायणराव ढेकणे**, इंजिनिअर व श्री. **बाळासाहेब वाकडे** यांनी या कार्यात लेखकांस व तद्द्वारा आम्हांस मोठे सहाय्य केले आहे.

श्रीगुरुमहाराजांच्या प्रथमवार्षिक पुण्यतिथी महोत्सवप्रसंगी स्वामी श्रीशिवोम्-तीर्थमहाराजांची जी उद्‌बोधक प्रवचने झाली, ती श्री. **बाळासाहेब कुळकर्णी**, पुणे विद्यापीठ यांनी ध्वनिमुद्रित करून घेतली होती. त्यावरून लेखकांचे परमस्नेही **श्री. मधुकर सीताराम अत्रे** यांनी ती लिहून काढली व त्यावरून स्वामींचा लेख लेखकांनी तयार केला. तसेच चरित्राच्या बहिरंगाची सौष्ठवता, लेखकांचे स्नेही श्री. **विजय हरी वाडेकर** यांच्या अनुभवी मार्गदर्शनाने प्राप्त झाली आहे. याप्रमाणे या चरित्राच्या ग्रंथ गोवर्धनास उपरोक्त गुरुभक्तांचा हातभार लागला आहे. याशिवायही अनेकांनी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सहाय्य केलेले आहे. हे सर्व सज्जन धन्यवादास पात्र आहेत.

चरित्राचे लेखक श्री. पोटभरे यांनी निःस्वार्थ बुद्धीने या चरित्राच्या 'श्रीगणेशा' पासून अखेरपर्यंतची सर्व कामे जातीने केलेली आहेत. मुखपृष्ठाची औचित्यपूर्ण कल्पना त्यांचीच आहे. चरित्रावरील 'अवतरणिका' तर त्यांच्यावरील गुरुकृपेची पावती आहे. या सर्वपेक्षा त्यांनी ही चरित्ररूपी श्रीगुरुसेवा श्रीगुरुंना सर्वार्थाने अर्पण केलेली आहे. त्यांचे हे लिखाण या संस्थेतर्फे प्रकाशित करून त्याचा

प्रसार करणेची अनुमती विश्वस्तांना निरपेक्ष वृत्तीने दिलेली आहे. त्यांच्या अशा वृत्तीमुळे विश्वस्त मंडळ त्यांचे व या ग्रंथाला सहाय्य करणाऱ्या सर्वांचे अत्यंत ऋणी आहे.

या कार्याकरता बरेच द्रव्य खर्च झाले असले तरी हे बरेच दिवसांचे राहिलेले कर्तव्य श्रीमहाराजांचे कृपेने पार पडल्याचे सात्त्विक समाधान विश्वस्तांना लाभत आहे. या श्रीस्वामीचरित्राचा संग्रह सर्वही जिज्ञासू, संतप्रेमी, सज्जनांनी करून स्वत च्या चित्ताचे समाधान व श्रीमहाराजांच्या संस्थेस सहाय्य केल्याचे समाधान, असे दुहेरी समाधान मिळवावे. यायोगे विश्वस्त मंडळ त्यांचेबद्दल कृतज्ञ राहील. श्रीमहाराजांच्या कृपेने पुढीलही उद्दिष्ट कार्ये निर्विघ्नपणे व्यवस्थित पार पडतील असा विश्वास आहे.

या ग्रंथाचे प्रकाशन प. पू. श्रीस्वामिशिवोमतीर्थमहाराजांचे हस्ते होत आहे ही सौभाग्याची साक्ष आहे.

श्रीगुरुमहाराजांचे दीक्षानुग्रहीत व इतरही सर्व जिज्ञासू सज्जनवर्ग यांचेकडून या चरित्राचे चिंतन नित्य घडत राहून त्यांना खऱ्या समाधानाचा लाभ होवो व स्वकर्तव्यसेवेचे समाधान — श्रीवासुदेव निवासातील विश्वस्तांना लाभो हीच श्रीगुरुदेवचरणी प्रार्थना.

वर्षप्रतिपदा, शके १८९८ — एक सेवक

३१ मार्च १९७६ — दत्तात्रेय धुंडिराज कवीश्वर

# शक्तिपातयोग साधनाप्रणाली और साधक

**स्वामी श्रीशिवोम्तीर्थमहाराज**
शक्तिपातयोग पीठाधीश्वर, 'योगश्रीपीठ', ऋषिकेश.

अपनी जो योगप्रणाली, अपनी जो साधनाप्रणाली है उसके बारेमें जैसा मैंने अपने गुरुओंसे सुना और उनमेंसे मैं जितना अपने पास रख पाया, और उसमेंसे भी जितना मुझे स्मरण रहा वह मैं जितना संभव हो सकता उतना उसको आप लोगोंको बाँटनेका प्रयत्न करता हूँ। हो सकता है कि उसमें कई बातें आपके रुचिकर न भी हुअी हो। कुछ ऐसे सिद्धान्त, कुछ ऐसे एक विषयको समझनेका जो दृष्टीकोन है वह कुछ लोगोंको माळूम न पडा हो, किंतु मैंने जैसे समझा था वैसा आप लोगोंके सामने रखा। वह Angle वैसे शास्त्र भरे पडे हैं, बहुत विस्तार है, विषयका ! हमारे परंपरामें हुअे महात्माओंने भी इस विषयपर अपनी कलम चलायी है। बहुत कुछ हमको दिया है। अभी भी इस विषयपर कई दृष्टीकोनोंसे विचार करना और इसका साहित्य निर्माण करना शेष है।

प्रथम, मैं एक प्रश्न के आधारपर, अपनी प्रणालीका स्वरूप स्पष्ट करता हूँ। हमारे साधकोंके मनमें एक शंका आती है कि जब हम साधनमें बैठते हैं तो हमें यह माळूम पडता है कि कौन आया है, कौन गया है, किसने क्या उठाकर रखा, किसने क्या बात की है, किसको क्या क्रिया हो रही है-यह तो साधना का कोई लाभ हुआ नहीं। वह जो एक unconscious स्थिती होती है कि हमको बाह्य ज्ञान लुप्त हो जाय। यह तो उसमें आता ही नहीं। हमारे जो बाह्यिक ज्ञान है वह तो वैसा कि वैसा ही बना रहता है। तो इसका अर्थ यह हुआ कि इस साधनप्रणाली का क्या लाभ है ? हमारी समझमें नहीं आया ? इस प्रकारकी कई शंकायें होना स्वाभाविक है। योगके बारेमें लोगोंकी धारणा यह होती है कि, समाधी की ओर यह साधन हमको ले जायेगा। वो समाधीका अर्थ यह है कि बाहरका हमको कुछ पताही नहीं। और जब हम

साधनमें बैठे हुवे– बाहर क्या कुछ हो रहा है उसको हम अनुभव कर रहे हैं। हमारा बाह्यज्ञान बना हुआ है और आज भी बना हुआ और एक वर्ष के बादभी बना हुआ है। दो वर्ष के बादभी बना हुआ है। तो इसका अर्थ यह हो रहा है कि हमारा साधन क्या है? आपको सब जानकारी है। फिर मैं आपको याद करवाता हूँ।

आत्मा ज्ञान स्वरूप है। Consciousness आत्माका स्वभाव है। शास्त्रीय भाषामें कहेंगे– आत्मा 'ज्ञ' स्वरूप है। आत्मा द्रष्टा है। हमारी आँखें हैं, तो हमको दिखाई देगा ही इसी प्रकारके जो आत्मा 'ज्ञ' स्वरूप है तो, जो कुछ दृश्य उसके सामने आयेगा वह दृश्य उसको दिखायी देगा। यदि आत्मा कभी द्रष्टा है, कभी नहीं द्रष्टा है तो आत्मामें परिवर्तन आता है। जब कि आत्मा परिवर्तनसे अतीत है। वह तो नित्य है। उसमें कोई परिवर्तन होता नहीं। ऐसी आप सबकी मान्यता है। और शास्त्रभी कहते हैं। किंतु यदि हम यह माने कि जब व्युत्थान दशामें होते हैं तब तो आत्मा देखता हैं, और जब उत्थान दशामें, समाधीमें जाता है तब आत्मा को दिखाई नहीं देता है। तो इसका अर्थ यह हुआ कि आत्मा परिवर्तनशील है। तब तो बहुत गडबड हो गयी। यदि इस प्रकारसे, हमने मान लिया कि, कभी तो आत्मा देखता है, कभी नहीं देखता है। तब तो आपका सारा सिद्धान्त और आपकी सारी साधना जो है, वह बिलकूल अशास्त्रीय हो जायेगी और सिद्धान्त विरुद्ध होकर के कोई उसको स्वीकार नहीं करेगा। किंतु ऐसा है नहीं। आत्मा 'ज्ञ' स्वरूप है। आत्मा जब चित्तके तादात्म्य में आता है तब वह 'ज्ञ' में ज्ञप्ति पैदा होती है। अर्थात जो द्रष्टा है वह तो आत्माही है।

किंतु आत्मा बुद्धीसे तादात्म्य में आनेके पश्चात् दृश्य को देखता है। उसको देखनेका एक यंत्र चाहिये। उसके पास एक Instrument of Knowledge है। और उस Instrument of Knowledge से संयुक्त होनेपर जो कुछ भी दृश्य उसके सामने आता है, उसको देखता है। तो तीन फैक्टर हो जाते हैं। एक तो द्रष्टा है, एक बुद्धी Instrument of Knowledge और एक Object दृश्य। ये तीनों जब एक लाईन में आते हैं, तब द्रष्टा दृश्य को देखता है। अब यदि वो जो द्रष्टा है और जो ज्ञानका यंत्र है ये दोनोंका तादात्म्य नहीं रहे तो दृश्य दिखाई नहीं देगा अथवा दृश्य नहीं रहे तो दृश्य दिखाई नहीं देगा।

दोही बातें हो सकती थी, या तो दृश्य हो नहीं। अभी यह घडी मेरे सामने है, तो घडी है इसका मुझको ज्ञान अनुभव हो रहा है कि यह घडी है। अभी इस हाथमें घडी नहीं है और आप पुछेंगें कि "आपके पास घडी है"? मैं कहुँगा कि 'नहीं'। मेरे पास तो घडी नहीं है। मैं टाइम देखने के लिये हाथकी ओरं देखुंगा कि मैंने घडी भूल आये है। हाथके उपर घडी नहीं है। इसका अर्थ यह हुवा कि घडी का होना, 'ज्ञान' का एक स्वरूप है। Positive Knowledge। और घडी नहीं है, यह ही 'ज्ञान' है। जो द्रष्टा है उसके जो देखनेका यंत्र है अथवा जो द्रष्टापन है उसमें तो कोई अंतर नहीं आया। यदि उसको घडी नहीं दिखाई दे, तो इसका अर्थ यह है कि, दृश्य नहीं है, द्रष्टा तो देख रहा है। किंतु यह जो मैंने दृष्टांत दिया है, इस दृष्टांतमें दृश्य सामनेसे हट गया। इस दृष्टांतमें दृश्य सामनेसे हट जानेके कारण द्रष्टाको कोई दृश्य दिखाई नहीं दे रहा है। किंतु द्रष्टाका द्रष्टाभाव तो बना हुआ है। वह जो द्रष्टा है उसीके द्रष्टापनमें अंतर नहीं आया।

इसका और दूसरा उदाहरण देता हूँ। आप सो जाते हैं तो, सामान्य व्यक्ति यहीं कहता है, कि जब हम निद्रामें होते हैं तब जगत् विलिन हो जाता है। तो जब जगत् हमको दिखाई नहीं देता तो निद्रा और समाधीमें क्या अंतर है? तो जगत् का सामने होना, दृश्य का सामने उपस्थित होना, और उसका ज्ञान प्राप्त होना, यह तो एक स्थिती हुअी। Positive Knowledge जिसको हमने कहा। दूसरी स्थिती यह है कि वह नहीं है किंतु उसका नहीं होना हमको दिखाई देता है। जैसा कि अभी हमने कहा। यह सारा जगत् जब हम दृश्यरूपमें स्वीकार करते हैं और यह हमको दिखाई देता है। इसको कहा जाता है जागृत–जागृत अवस्था। और जब यह सारा जगत् हमारे सामनेसे हमारे आगेसे, विलीन हो जाता है, तो बाकी क्या रहेगा? बाकी अभाव रहेगा। किंतु जो आत्मा–द्रष्टा–जो बुद्धि के साथ तादात्म्य किये हुवे है, उस अभाव को देखेगा। जब वह उस अभावको देखेगा तब उस अभावका, उस Nothingness का ज्ञान प्राप्त होगा। तो जब सारा जगत् सामने विलीन होकरके और अभावका ज्ञान प्राप्त होता है, अभावके उपर दृष्टी टिक जाती है, तब उस स्थितीको निद्रा कहा जाता है। जागृतमें जगत् दिखाई देता है। सुषुप्तिमें जगत् नहीं दिखाई देकर अभाव दिखाई देता है। आत्मा और प्रज्ञा-बुद्धी या चित्त उनके तादात्म्यमें अंतर

नहीं आया। वह तादात्म्य वैसेही रह गया। वह जो द्रष्टा हैं और वह जो Instrument of Knowledge है इनका जो Contact है वह वैसाका वैसाही होता है। किंतु दृश्य आगेका नहीं होनेका कारण उस अभावका ज्ञान होता है। और उस अभावके ज्ञानको क्या कहा जाता है? "निद्रा"

अब तीसरी स्थिती वह है कि जिसमें आत्मा-द्रष्टा और प्रज्ञा-बुद्धीका Contact टूट जाता है। द्रष्टा जिस यंत्रके माध्यमके यंत्रसे दृश्यको देखता है वह उस यंत्रका और द्रष्टा का जो Contact है, उसका जो तादात्म्य है वह Disconnect हो जाता है। तब दृश्य सामने हो अथवा नहीं हो, चाहे भाव हो चाहे अभाव हो, द्रष्टा को द्रष्टाके सामने उसको किसी प्रकारका ज्ञान नहीं प्राप्त होता। वह दोनों प्रकारका, होना और नहीं होना, दोनों विलीन हो जाते हैं। तो देखनेका जो यंत्र है वह बीचमेंसे हट जाता है। **जब द्रष्टाके सामनेसे दृश्यको देखनेका यंत्र हट जाता है तब द्रष्टा अपने स्वरूपमें अवस्थित हो जाता है। और उसको समाधीकी स्थिती कहा जाता है।**

अब यह जो सिद्धान्त हमने लिया, इस सिद्धान्त को अपनी साधनप्रणाली के साथ अपने को fit कर देना। और बातको समाप्त कर देना। इतनीसी बात है। कोई कठीन विषय नहीं है। उसपर विचार किया जाय तो बहुत सरल है। और आप लोगोंके लिये तो और भी अधिक सरल है। क्यों कि बहुत बडी गुरुशक्ति आपको प्राप्त है। इतना बडा आशीर्वाद अपने पास है कि, आपके सामने कोई भी कार्य कठीन नहीं है। तो अभितक जो बात, एक बात, एक सिद्धान्त समझा, अभी उसको अपने साधनप्रणाली के साथ इसका सामंजस्य स्थापित करके कि यह साधन प्रणाली और सिद्धान्त जो है ये कैसे मेल खाते हैं! इसको Coinside करके और अपनी बातें समाप्त कर देंगे।

योग क्या है? "योगश्चित्तवृत्ती निरोधः"। चित्तकी वृत्तिओंका निरोध हो जाय तब योग सिद्ध होता है। योग सिद्ध कब होता है जब चित्त की वृत्तीओंका निरोध हो जाय। जब चित्त की वृत्तिओंका सकल निरोध होता है तब चित्तकी निरोध अवस्था आती है। चित्तकी निरोध अवस्था जब होती है, तो पुरुषका और चित्तका जो तादात्म्य था, वह टूट जाता है। दृश्यके और द्रष्टा के बीच में जो देखनेका यंत्र था वह बीचमेंसे हट जाता है। और वह द्रष्टा सदा द्रश्युस्वरूपी

अवस्था में आता है। तब द्रष्टा अपने स्वरूपमें अवस्थित हो जाता है। यह सिद्धांत योगका है। जिसके उपर हमने अभी थोडासा विचार किया।

अब वृत्ती निरोधका जो मार्ग है। इसके उपर अब विचार करके देखें। जब शक्ति जागृत होकरके साधक के अंतरमें क्रियायें आरंभ करती है। तो चैतन्य - चित्त और चेतना ये शक्तिके तीन स्तर है। चेतना वह है जिसमें इंद्रियाँ,, मन, बुद्धी, अहंकार, संस्कारोंका संचय होना, उदय होना, वासनाका उदय होना – आदि ये सब कार्य जिस शक्तिसे संपादित होते हैं, ये जो शक्ति है, शक्तिके यह जो स्तर है इसको चेतना कहा गया है। यह चेतना जगदानुमुखी कार्यरत होनेके कारण, जगत्का ही अंग मानी जाती है। क्यों कि इंद्रियाँ जो हैं – वो – जगदानुमुखी कार्यरत है। इंद्रियोंमें जो शक्ति है वह जगत्काही कार्य कर रही है। इसलिये चेतना को जगतकेही अंतर्गत मान लिया गया है।

चेतनाको जगतकाही अंग मानलिया क्यों कि यहाँपर शक्ति जगदाभिमुखी कार्यरत है। कुंडलिनी जागृत होनेका अर्थ यह है कि वह चेतना अंतर्मुखी हो करके और चैतन्यकी ओर, चैतन्य की स्थिती को, प्राप्त करने और प्रतिप्रसव क्रमसे वह कार्यशील हो जाती है। कुंडलिनी कभी सोती नहीं - कभी जागती नहीं। शक्ति ! शक्ति is always active. तो कभी शक्ति active और कभी inactive होती है, यह इसका अर्थ नहीं है। कुंडलिनी सोयी हुई इसका अर्थ यह है कि, कुंडलिनी जगत् की ओर कार्यरत है। कुंडलिनी जागृत हो गयी है। इसका अर्थ यह है कि वह अपने कारण आत्मा की ओर अग्रेसर हो गयी है। अभी उधर active हो गयी है। तो जब अपनी कारण की ओर उदासीन होती है, तब उसको सोयी हुई सुषुप्त अवस्था उसका कहा जाता है। और जब वह कारण की ओर कार्यरत होती तब उसकी जागृत अवस्था कहा जाता है।

जब कुंडलिनी जागृत होती है और चैतन्य की ओर बढती है तो बीचमें क्या आता है ! – "चित्त – "। तो उपरसे जैसे चैतन्य, चित्त और चेतना, तो चैतन्य, चित्तके बीचमेंसे होकरके, चेतना हो जाता है। हमारे प्रत्येक कार्य जो कि हम आसक्तियुक्त, मोहाभिमानयुक्त होकरके और कर्तृत्वाभिमानयुक्त होकरके करते हैं, तो हमारा प्रत्येक कर्म हमारे चित्तके उपर संस्कार अंकित करता है। इसका अर्थ यह है कि वह चैतन्य चित्तके अंदर आकरके एक coil, एक कुण्डल, एक उसका

घुमाव, हो जाता है। इस तरहसे प्रत्येक कर्म जो हम करते हैं, शुभ अथवा अशुभ, दोनों प्रकारके कर्म हमारे चित्त के अंदर एक घुमाव देते हैं। और इस तरहसे वह चैतन्य चित्त के अंदर घुमता हुआ, और इंद्रिओंके माध्यमसे कार्यरत होता है। जब चेतना अंतर्मुखी होकरके प्रति प्रसव क्रमसे कार्यरत होती है, उसका अर्थ यह हुआ कि कुंडलिनी जागृत हो जाती है।

यहाँपर मैं यह कहुँगा कि 'प्रज्ञानं ब्रह्म' जो महा वाक्य है वह यहीं है। 'प्रज्ञानं ब्रह्म' क्या है? प्रज्ञाके ब्रह्म – प्रज्ञानं ब्रह्म। यह जो ऐसी बात बहुत होती है – प्रज्ञानं ब्रह्मका अनुभव हो – उसके बाद – "सोऽहं" जप लोग करते हैं। वह है, वो तो "मैं हूँ"। वो है कहाँ? जो वह है सो मैं हूँ। "सोऽहम्"। ठीक है। फिर वह कहाँ है? तो जब कुंडलिनी जागृत होकरके, अर्थात 'प्रज्ञानं ब्रह्म' की अनुभूती होती है, कि यह प्रज्ञान है, तब। फिर वह 'सोऽहम्' की स्थिती आती है। अर्थात् यह जो है, वही मै हूँ। तो सबसे पहले तो कुंडलिनीकी जागृती होकरके 'प्रज्ञानं ब्रह्म' अनुभव में आये, अर्थात वह प्रज्ञान जो इंद्रिओंसे, हमारे शरीरसे, एकरस होकरके, हमारे देह के बीचमें बैठा है। वो भिन्न हो जाय। अर्थात् अनुभव पाके शाक्तोपायमें आगये तो इसका अर्थ यह हुआ कि कुंडलिनी शक्ति जागृत हो करके जब चेतनासे चैतन्य होनेके लिये उपर चढती है तो उसके सामने उसको चित्तमेंसे होकर ही वापिस जाना है।

जब चित्तमेंसे होकरही वापिस जाना है तो वहाँपर कई कुंडल **खाँके** बैठी है। क्योंकि प्रत्येक भिन्न कर्म जो उसने किया है, और प्रत्येक कर्मका संस्कार उसके चित्तमें अंकित हुआ बैठा है, वो प्रत्येक, उसने, उतने घुमाव दिया है। तो जब वो चेतना चैतन्य होनेके लिये, चित्तमेंसे होकरही निकलने लगती है, तो उसको कई बार घूमना पडता है। किंतु पहले ऐसा था कि, जब चैतन्य, चेतना होनेके लिये, चित्तमें निकला था, तब कर्मोंके संस्कारोंके साथ साथ, उसमें घूमाव पडते गये थे। यह चैतन्य अभी **उसके अंदर** घूमाव पडते गये हैं। प्रत्येक संस्कारने उसके अंदर, चित्त के अंदर, घूमाव दे दिया है। और भी वो चेतना जगदाभिमुखी, इंद्रिओंके मनके, बुद्धीके माध्यमसे कार्य कर रही है। जगदाभिमुखी। जब यह प्रतिप्रसव क्रमसे चलती है तब वह जो कुंडल उसने डाले थे, वह जो संस्कारोंके उसमें घुमाव आये थे, अब इस तरह चलता था–अब यह–उल्टा चलने लगता है।

यह कुंडलिनीके क्रियाओंका चित्त के उपर असर पडता है। इस तरह वह कुंडलिनी-वो कहते हैं कि Purification of mind ! Purification of mind कैसे होगा? जब चेतना चित्तमेंसे वापिस होती जाती है तो उस समय वह सारे कुण्डल खोलती हुअी चलती है, अर्थात् वह सब संस्कारोंको छोडती हुअी, इनको क्रियाओंका रूप देती हुअी, उनको बाहर फेंकती हुअी, और सारे कुंडलोंको खोलती हुअी, वह जो क्रिया है, वह जो शक्ति है, वह-चैतन्य होनेके लिये-उपरकी ओर अपने आत्मा अपने कारण की ओर अग्रेसर होती है।

जितने उसके कुंडल अधिक खुलेंगे उतनी वह अपने चैतन्य की स्थिती की ओर अधिक बढेगी। और जितना आपने संचय अधिक करके रखा है, जन्मजन्मान्तरसे, न जाने आपके चित्तके अंदर भरके रखा है। और आप अभी कहते हैं कि, महाराज छः साल हो गये, अभीतक कुछ हुआ नहीं। लाखों जन्मोंके संस्कार कि जो पता नहीं, असंख्य कुंडल उसके अंदर डालके रखे हैं। और अभी भी डालते चले जा रहे हैं। जब उसके खोलनेका समय आया तो कहते हैं कि पंधरा साल हो गये। किंतु १५ साल हो गये। किंतु आपने उसको कितने घुमाव दिये हैं, यह तो देखो। उसको कितना ट्राव्हल करना पडेगा। ठीक है। वह तो चित्त के अंदरही उल्टे चक्कर लगाने हैं उसको। किंतु कितने चक्कर लगावे हैं उसको। लाखों, करडों। असंख्य चक्कर उसको वापिस लगाने हैं। और फिर चैतन्य की ओर जाना है।

## आंतरिक साधनासे चित्तशुद्धी

हमारी साधना जो है, वो चित्तकी शुद्धि करके और फिर चित्तकी एकाग्रताकी स्थिती लानेका मार्ग है। अभ्यासका मार्ग नहीं है। अपने मार्गको अभ्यासवाला मार्ग नहीं कहते। **अपने मार्गको साधनका मार्ग कहते हैं।** ये साधन है। अभ्यासमें तो आप साइकल चलाना सीखते–कुछ अभ्यास के बाद आप साइकल चलाना सीख जाते हैं। किंतु यहाँ (अपने मार्ग में) अभ्यास नहीं है। यहाँ तो चित्त शुद्ध करना है। और क्रियाओंके मार्गसे विभिन्न प्रकारके क्रियाएँ जो है, वो, क्या करती है? चित्तकी अंदर संचित संस्कारोंको क्रियाओंमें परिणत करके उनको, क्रियाओंके रूप देकरके, उनको बाहर फेंक देती है। और इस तरहसे परिणामतः स्वरूप चित्त शुद्ध हो चला जाता है।

तो जैसे जैसे चित्त शुद्ध हो जाता है, वैसे वैसे ये विचारोंका आना बंद होता चला जायेगा। किंतु एक बात इसके साथ साथ मैं और भी कहुंगा। ये जो क्रियाएँ है, वो चित्तको शुद्ध करती है। ये संस्कारोंकी शुद्धी करती है। किंतु यदि जितनी संस्कारोंकी शुद्धी आपने साधनमें एक घंटा बैठ करके की है उसके कई अधिक बाकीके तेईस घंटोंमें आप चित्तके अंदर संस्कार संचित करते रहे, तो चित्त कैसे शुद्ध होगा? जबतक चित्तके अंदर संस्कारोंका संचयका क्रम बंद नहीं होता तबतक उन संस्कारोंको शुद्ध करनेका जो क्रम है वो अधूरा रह जायेगा। तो साधना करनेका अर्थ यह है कि एक ओर तो आपको चित्तके अंदर संचित संस्कारोंको बाहर निकलना है और दूसरी ओर नये संस्कारोंको संचित करनेसे रोकना है।

तो संचित संस्कारोंको बाहर निकालना, चित्तको शुद्ध करना, ये है आंतरिक साधना। और आगेसे चित्तका नये संस्कारोंसे रोकना ये है बाह्य साधना। अंतर साधना तो वो है, जिसको आप साधना कहते हैं, जप है, पूजा है, भजन है, श्रवण है, कीर्तन है, पूजा पाठ है, ध्यान है, या किसी भी प्रकारके मार्ग है ये संस्कारोंको अंदर से बाहर निकालने का प्रयत्न है। ये है आंतरिक साधना। जब शक्ति अंतरमें जागृत होकर क्रियायें करती है। तब साधक अनुभव करता कि कोई ऐसी शक्ति है, मेरे अंतरमें, मेरेसे भिन्न, मेरी इच्छा के स्वतंत्र-कार्य कर रही है, और मैं द्रष्टा हूँ। अर्थात जब तक वो साधन में होता है, तब तक उसका कर्तृत्वाभिमान जो है वो दब जाता है, और द्रष्टाभाव उदय हो जाता है। द्रष्टाभाव केवल उसका विचारका विषय नहीं होता, केवल सत्संग और पठन पाठन का विषय नहीं रहता है। कर्तृत्वाभिमान का लुप्त होना और द्रष्टा भाव का अनुभव होना यह प्रत्यक्ष होता है। वो देखता है कि जो काम मैं नहीं कर सकता वो साधनके समयमें बहुत सरलतासे पता नहीं कैसे— स्वयमेव होते चले जाते हैं। ऐसे साधक भी देखे हैं जिन्होंने कभी गायन सीखा नहीं, किंतु साधनमें बैठते हुवे शास्त्रीय पद्धतीसे इतना पूर्ण वो गाते हैं, जिन्होंने कभी कोई कविता की नहीं, जिन्होंने कोई विशेष भाषा पढी नही, वो उस भाषामें बोलते हैं, जिन्होंने कोई हठयोगके आसन सीखे नहीं, इनका अभ्यास किया नहीं किंतु वो बडी सरलतापूर्वक स्वयमेव उनका शरीर जैसा रबरका बन जाता है। इसी प्रकारसे विभिन्न प्रकारके क्रियायें जिनको कि हम बाहर आकर कर नहीं सकते, स्वयंही दुबार नहीं कर सकते। हम अनुभव करते कि इस शरीर के माध्यमसे

इस मन, बुद्धी, शरीरको खिलौना बना करके। यंत्रवत! और फिर इस यंत्र के द्वारा कोई अन्य शक्ति करवाती चली जा रही है। और मैं द्रष्टा हूँ। तब उसका कर्तृत्वाभिमान गलित होने लगता है।

तो जब तक शक्ति चित्त के अंदर कुंडलोंको खोलनेका कार्य करती रहती है, तबतक तो शाक्तोपायकी स्थिती रहती है। तबतक शक्ति को वह अपनेसे भिन्न अनुभव करता है। और जब एक ऐसा समय आयेगा कि सब कुंडल खोल जायेंगे। जब सब कुंडल खोल जायेंगे तो शक्ति जो है, वह चित्तकी स्थितीके उपर उठकर और चैतन्यकी स्थितीमें प्रवेश कर जायेगी। तब शाम्भवोपाय आयेगा। तब साधक ये अनुभव करेगा कि अरे! जिस शक्तिसे मैंनेसे भिन्न अनुभव किया था वह तो मेरीही शक्ति है। तब उसका प्रवेश शाक्तोपायसे शांभवोपायमें आता है। वह शक्तिका अनुभव करता है। अभी क्रियायें उसकी लोप जायेगी। बंद होगी। क्रियाए बंद नहीं हुअी। क्रियाओंकी आवश्यकता नहीं रही। जबतक क्रियायें थी उसके सामने, जबतक उसके सामने क्रियायें करनेके लिये काम था तब तक वो उसकी क्रिया थी। किंतु जब उसके सामने कोई कार्य शेष रहा नहीं। आप आपका कमरा साफ करते है न? झाडू लगाते हैं न? जबतक कचरा रहता है, तबतक झाडू लगाते हैं। तबतक झाडू लगानेकी क्रिया रहती है। जब सब घर स्वच्छ हो जाता है, अभी उसका कचरा नहीं रहता है, फिर आप क्या करते हैं? झाडू रख देते हैं। झाडू की क्रिया बंद हो जाती है। इसी प्रकारके क्रियाशक्तिको हमारे अंदर झाडू लगाने पडता है। हमारे अंदर शुद्धीकरण करना पडता है। उसके जो folds हैं, उनको unfold करते हैं। वो कुंडल खुल जाते हैं। इसका अर्थ यह हो जाता है कि शक्ति चेतनासे चित्तमेंसे होती हुअी, संस्कारोंका क्षय करती हुअी और चित्तको शुद्ध करती हुअी, चैतन्य की स्थितिमें प्रवेश कर जाती है। तब साधक जो है वो शाम्भवोपायका साधक हो जाता है। यह तो सैद्धान्तिक बात हुअी। अब बिलकूल थोडीसी सरल भाषामें बात करेंगे।

आप जो लोग ध्यानका अभ्यास करते हैं वो कोई भी ध्येय Object सामने रखते हैं। पहले वो कोई स्थूल पदार्थ, ध्येय पदार्थकें रूपमें, रखते हैं। फिर जब उसके उपर उनकी एकाग्रता जब पट जाती है तब जब स्थूल पदार्थपर उनकी एकाग्रता दृढ हो जाती है, तब किसी विचारको अपना ध्येय बनाते हैं। जब

विचारके उपर उनकी एकाग्रता दृढ हो जाती है, तब तो उस एकाग्रता के, उसको जो आनंदकी अनुभूती होती है, उस आनंदको अपना ध्येय बनाते हैं। और जब उस आनंदके उपर उनकी एकाग्रता दृढ हो जाती है तो अपनी अस्मिता, अपना अहम्, उसीको अपना ध्येय बनाते हैं। तो सामान्य स्थितीमें जबतक, मनुष्य साधक होता है, जबतक साधक की स्थिती होती है, तब तक वो अहम को द्रष्टा बनाके चलता हैं। जब वास्तविक द्रष्टा, आत्मा है, वो तो पिछे रह जाता है। वास्तविक द्रष्टा वही हैं। और उसीके तादात्म्य में आनेपर अहम् द्रष्टा होता है। क्यों कि वह चैतन्यका जो Force है, शक्ति है कार्य करने की वह तो वहींसे प्राप्त होती है। अब इसका विश्लेषण करीये, जबतक स्थूल पदार्थ ध्येय होता है उसको कहते हैं निसर्गानुगत संप्रज्ञात। जब विचार उसका ध्येय होता है तो कहते हैं विचारानुगत संप्रज्ञात। तो विचार और कोई भी स्थूल पदार्थ ये दृश्यके अंतर्गत है। उसके पश्चात् जो आनंद है, जो आनंद है वह Instrument of Knowledge का विषय हो जाता है। अर्थात् बुद्धिका और चित्तका विषय हो जाता है। इसका अर्थ यह हुवा कि द्रष्टा दृश्य दर्शनमेंसे, पहले वो दृश्यमें अपना ध्येय बनाता है, और फिर उसके उपर अपनी एकाग्रता दृढ होनेपर, वो दर्शनको अर्थात आनंदको अपना ध्येय बनाता है। वो अंदर आ जाता है। और जब दर्शन आनंद के उपर उसकी एकाग्रता दृढ हो जाती है तब वो और अपनी वृत्ति को अंदर ले आता है और अहं द्रष्टा उसीको अपना ध्येय पदार्थ बनाता है। और जब उसको ध्येय पदार्थ बनाकर उसके उपर वृत्ती टिक जाती तो उसे संप्रज्ञात की उच्चतम अवस्था सास्मिता संप्रज्ञात। अस्मितानुगत संप्रज्ञात। इसीको आत्मदर्शन कहा जाता है। आत्मस्थिती नहीं कहा जाता। आत्मदर्शन कहा जाता है, क्यों कि इस स्थितिमें शुद्ध अहम् चित्तमें प्रतिबिंबित, शुद्ध चैतन्य को, वो भी आत्माकाही प्रतिबिंब है, और शुद्ध अहम् भी, आत्माकाही प्रतिबिंब है। उस स्थितीमें आत्मा आत्माका दर्शन करता है। अहम् जो कि शुद्ध चैतन्य है वो शुद्ध चैतन्यही अपने दृश्यके रूपमें देखता है। अर्थात् आत्मा आत्माका दर्शन करता है। इसीको आत्म-दर्शन, आत्मरमण, आत्मरती आदि शब्दोंसे हमारे शास्त्रोंने वर्णित किया है।

तो इसमें आप ये देखो कि ये जो अभ्यास का क्रम है, अभ्यास के क्रममें, आपको सामने ध्येय पदार्थ निश्चित करना होता है। और फिर उसी ध्येय पदार्थ को स्थूलसे सूक्ष्म करते करते और अस्मिता तक लाना होता है। आपको ये अभ्यास

क्रम क्रमसे, स्थूलसे सूक्ष्म, और सूक्ष्मसे आनंद, और आनंद से अस्मिता, दृश्य से दर्शन, और दर्शन से द्रष्टा इस तरह बाहरसे, स्थूलसे सूक्ष्म होकर अस्मिता तक, अपनी संप्रज्ञात समाधी को अस्मिता तक, लाना पडता है। ये सामान्य अभ्यास का मार्ग है। किंतु शक्ति जागृत होकर क्रियाएँ करती है तो अपनेको कोई करना नहीं है। आपको अपनेमें शक्तिसे भिन्न अनुभव करना है। उसकी क्रियाओंको देखना है। उसका अनुभव करना है। तब आपके सामने जो क्रियायें होती है वो क्रियाही आपका ध्येय है। जब आप द्रष्टा है तो काहेका द्रष्टा है? आपका ध्येय क्या है? क्रिया शक्ति की क्रियाही आपका ध्येय है। आपको द्रष्टाभाव में देखते रहना है। क्रियायें बदलती रहती है, आपके संस्कारोंके अनुसार अभ्यास के क्रममें जो एक बडा भारी अंतर है कि अभ्यास का क्रम जो आपने लिया था, पहले जो मैंने आपको बताया था, उसमें संस्कारोंका शुद्धिकरण के लिये आपको उसके साथ कोई और साधन करना पडता है। ध्यानका अभ्यास भी करना और संस्कारोंको दग्ध करनेके लिये-उसके लिये-सत्संग है, पठन पाठन है, पूजापाठ है, सेवा है आदि ये जो साधन है ये तो-चित्त शुद्धिके लिये सहाय्यक अंग होते हैं। इसमें सहाय्यक अंग तो है किंतु संस्कारोंका वास्तविक शुद्धिकरणका जो कार्य है वो उसके साथही हो रहा है। वो आपके संस्कार ही विभिन्न रूप धारण करके ही आपके सामनेसे निकलते चले जा रहे हैं। जैसे आप सिनेमा देखते हैं और फिल्म जो वो रील चली जा रही। कभी गाना है, कभी नृत्य है, कभी झगडा है, कभी जाना है, कभी पहाड है-आदि विभिन्न प्रकारके दृश्य आपकी आखोंके सामने से-सिनेमा हॉलमें बैठकर निकलते चले जाते हैं। इसी प्रकार आपके संस्कारोंका जो 'टेप' है, आपके संस्कारोंका जो क्रम है वो क्रियाओंका रूप लेकरके क्रियाओंमें परिवर्तित होता हुआ और सिनिमाकी फिल्मकी तरह आपकी आखोंके सामनेसे होकरके निकलता चला जाता है।

आपने देखा होगा कि जब आप पिक्चर देखते हैं तो आप उस पर्दे के उपर देखते रहते हैं। जब वह दृश्य बदलता है तो दृश्य बदलने के साथ आपको अपना ध्येय, पदार्थ परिवर्तित करना नहीं पडता। आप तो द्रष्टा भावमें बैठे हुवे हैं और दृश्य स्वयं परिवर्तित होता चला जाता है। इसी प्रकारके क्रियाशक्ति जब जागृत हो करके आपके संस्कारोंको क्रियामें परिवर्तित करके निकलती चली जाती है वो आपको द्रष्टा बनाकरके क्रियाओंको अपना ध्येय बनाकरके देखते रहना है। बस्स!

वो जो आपको स्थूल से सूक्ष्म और सूक्ष्मसे आनंद, दृश्य से दर्शन और दर्शन से द्रष्टा आदि क्रम जो क्रम, जो अभ्यास के द्वारा आपको करना था, इसमें वो स्वतः सिद्ध होता चला जा रहा है। वो जो क्रियाएँ है, वो स्थूलसे सूक्ष्म, सूक्ष्मसे और सूक्ष्म – अती सूक्ष्म – इस तरह क्रियाओंको बाहर निकालती भी चली जा रही है। चित्तका शुद्धिकरण भी होता चला जा रहा है। और उसके साथ साथ आपका जो ध्येय – ध्येय पदार्थ है – वह भी स्थूलसे सूक्ष्म होता चला जा रहा है। एक ऐसी स्थिती आ जायेगी जब क्रिया शक्तिके पास कोई कार्य रहेगा नही अभी वो क्या करे? उसके पास कोई कार्य करने का रहा नहीं। उसने सब कुंडल खोल दिये।

ये इतने जल्दि नहीं हो जायेगा। मैंने तो बडे जल्दिसे कर दिया। इसमें समय लगता है। आप कितना साधन करते – आपका कितना समर्मण है? वो कुंडलोंको खोलनेके साथ साथ और कुंडल तो नहीं डालते चले जा रहे हैं? कई बातें हैं उसमें। फिर कितना कार्य आपने उनसे करने दिया है? उसमें दस कुंडल हैं, कि हजार कुंडल हैं? कि लाख कुंडल हैं? तो उसमें समय का अंतर पडेगा। फिर वो क्रियाशक्ति किस गतीसे चल रही है जैसे आपको मकान बनाना है और ईटें लाना है। एक लाख इटें लाना है। एक लाख ईट आप कैसे ला रहे हैं? आदमी उठाके ला रहे है तो उसकी एक गती है। दूसरे गधे उठाके ला रहे हैं, बैलगाडी उठाके ला रहे हैं, ट्रक भरके उठाके ला रहे हैं – उसका अर्थ यह हुआ कि मटेरियल जो है वो किस गतीसे उठासे ला रहे हैं? और फिर कितनी इटें आपको लाना है १० हजार या एक लाख या १० लाख? इसका अर्थ यह हुआ कि कितना संस्कार शुद्ध करने का कार्य आपने चित्तमें संचय कर रखा है। यह तो एक फैक्टर हुआ और दूसरा यह है कि आप अुसको किस गतीसे शुद्ध कर रहे हैं, इसके अुपरसे आपकी अुन्नति के स्तर बन गये। एक स्तर तो है तीव्र, तीव्रतर, तीव्रतम, मध्यम, मध्यम मध्यम, मंद मध्यम, मंद, मंदतर, मंदतम, ये जो नौ स्तर है, अुसकी अुन्नति के गतिके वो किस गतीसे आपके चित्तका शुद्धिकरण करता हुआ, आपके संस्कारोंका क्षय करती हुअी वो किस गतीसे, चेतना जो है वह चित्तमेंसे हो करके, चैतन्यकी ओर बढ रही है। तो कितना अपने कचरा जमा कर रखा है? एक तो यह फैक्टर हो गया। और इस कचरेको आप कितनी शीघ्रतासे शुद्ध करते हैं यह दूसरा फैक्टर हो गया और फिर अुस कचरेकी सफाई के साथ साथ आप और कचरा जमा कर रहे हैं या नहीं कर रहे हैं, यह तीसरा फैक्टर हो गया

है। ये क्या हो गया? आपकी उन्नतिका क्रम कैसे चल रहा है? इसके उपर आधारित है कि आप कितनी शीघ्रतासे लक्ष्य की ओर बढ रहे हैं, इसलिये धैर्य रखना पडेगा।

जब साधक ये निश्चित करने लगता है कि इतने समयमें मुझे इतना फल मिलना चाहिये, अथवा इतना समय हो गया है, मुझे साधना करते हुवे, अभीतक अमुक परिणाम मुझे प्राप्त नहीं हुआ। यह समर्पण के भावनाके विपरीत है। अपनी प्रणाली यह **समर्पण प्रधान प्रणाली है।** इसमें आपको साधना करना चाहिये। परिणाम तो स्वयं, अपने आप, यथा समय, यथा योग्य, उपस्थित होते रहते हैं। जब हम परिणाम के उपर लक्ष रखते हैं तो साधना गौण हो जाती है। जब साधकके लिये साधना मुख्य होती है, और परिणाम गौण हो जाता है।

सभी शास्त्र हमको बार बार इसकी ओर इंगित कर देती हैं कि साधकको साधनामें धैर्य और उत्साह की आवश्यकता है। धैर्य और उत्साह देखनेमें ये दोनों शब्द परस्पर विरोधी है। यदि धैर्य है तो उत्साह नहीं होगा, और उत्साह है तो धैर्य नहीं होगा। किंतु यदि विचार किया जाय तो यह मालूम पडता है कि उत्साह कहाँ है? साधन करनेमें उत्साह! और धैर्य? साधनके फलके प्राप्तीमें धैर्य। ये साधनाका सर्वमान्य सिद्धान्त है। किसी प्रकारकी साधन प्रणाली हो, क्योंकि आप साधन कर सकते हैं। जिस प्रकार आपको कर्म करनेका अधिकार है, कर्मके फलमें आपको हस्तक्षेप करनेका अधिकार नहीं है। आप कर्म कर सकते हैं। कर्म कुशलता पूर्वक कर सकते हैं। किंतु किसी विशेष कर्मका अमुक फल निकलेगा इसकी कोई गॅरंटी नहीं है। इसी प्रकारसे जो साधन है, उसमें आप साधना कर सकते हैं। जितनी आपको साधना करनी है, उतनी आप कर सकते हैं। जितना आपको समय लगाना चाहिये, उतना आप लगाते है, जैसा आपको भाव रखना चाहिये वैसा आप भाव रखते हैं, किंतु फिरभी उस साधनाका, उस भावनाका परिणाम कब, कितना, निकलेगा इसकी कोई गॅरंटी देना असंभव है। इसलिये साधकके मनमें धैर्य होना चाहिये।

मैंने तो यह बडी जल्दि सारा क्रम समझा दिया और सारी स्थितियाँ बतला दी। और आपको उस स्थितीतक लाकर छोड दिया किंतु जिसको करना है, आपको करना है, मुझे भी करना है-उसको समय लगेगा। उसके लिये धैर्य चाहिये,

उसके लिये परिश्रम चाहिये, समर्पण चाहिये, भावना चाहिये- ये सब साथमें होगा और ये जो आपकी उन्नति है वो कम शीघ्र या अति शीघ्र जैसा भी, आपका, जैसी करनी वैसी भरनी - उस तरहसे - वो चलेगा। तो मेरे कहनेका ये भाव था कि एक ऐसी स्थिती आ जायेगी जिस स्थितिके उपर आकरके क्रिया शक्तिके पास कुछ करने का शेष नहीं रहेगा - तब - क्रिया - शक्ति अपने कारण में विलिन हो जायेगी। आत्मा अपने स्वरूपमें अवस्थित हो जायेगा। समाधी की स्थिती प्राप्त हो जायेगी। इसके बीच बीच आपकी समाधी की स्थिती आती रहेगी। इसका अर्थ ये नहीं है कि अंतमें समाधी आयेगी। और या तो बिलकूल समाधी नहीं आयेगी ऐसा नहीं। बीच बीच में समाधी की स्थिती आती रहेगी। कभी संप्रज्ञात कभी असंप्रज्ञात कभी सवितर्क किसी प्रकारकी कभी किसी प्रकारकी। तो क्रियाशक्ति आपके कल्याण करके ही जायेगी, उसमें आपका किसी प्रकारका, अमंगल, अनिष्ट होनेवाला नहीं है।

**अच्युतं केशवं राम नारायणं। कृष्ण दामोदरं वासुदेवं हरिं।**
**श्रीधरं माधवं गोपिकावल्लभं, जानकीनायकं रामचंद्रं भजे॥**

**श्रीगुरुमहाराज की जय !!**

# चरित्रापूर्वी चरित्रासंबंधी चरित्रलेखकाची मनोगते

प्रभू! तुम्ही महेशाच्चिया मूर्ति।
आणि मी दुबळा आर्चितसे भक्ति।
म्हणोनि बोलु जऱ्ही गंगावती।
तऱ्ही स्वीकाराल॥

# समर्पित भाव-भेट

माझे माझ्यात काही नाही
जे आहे ते तुझेच सारे
तुझे तुलाच देण्यात
माझे काय जाते रे ... १

दिल्या सहज साधनेवरून
कधी न होता च्युत
प्रभो तव चरणांच्या नखाग्रावरती
हा राहो अच्युत ... २

'श्री 'चरणांना करून वंदन
समर्पित ही भाव भेट
परम कृपेच्या यानामधून
नेऊन ठेवा मजला थेट ... ३


श्रीगुरुदेव दत्त

प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामीमहाराज व प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामी महाराज, खाजगी स्मारक ट्रस्ट या श्रीगुरुमहाराजांनी स्थापन केलेल्या ट्रस्टला या ग्रंथाचे सर्वाधिकार दिलेले आहेत.

चरित्रलेखक :— अच्युत सिद्धनाथ पोटभरे

# मानसपूजा

ही आहे मानसपूजा! माझ्या सद्‌गुरुंच्या श्रीगुरूंची
सद्‌गुरुनाथ, सिद्धनाथ, स्वामी श्री लोकनाथांची ॥
शुध्दबुद्धीने, भावभक्तिने, स्मृती ठेवून श्रीचरणांची
प्रार्थना करून तव कृपेची, पूजा केली चैतन्याची ॥ १ ॥

हवी होती जशी ती, यथासांग नाही घडली
प्रभू! मी काय करू? मर्यादित माझी शक्ति पडली ॥
आपण माझे मोल केले, पायापाशी ठेवून घेतले
माझे जवळ काही नसता, भाव माझे बघितले ॥ २ ॥

मला नाही काही कळत, हे काय चालले आहे
तुम्ही मात्र सोडत नाही, करून घेता जे हवे आहे ॥
तेव्हाच तर हे अशक्य असे सहज सारे घडले
स्वामींचे दिव्य जीवन, सर्वांच्या पुढे आले ॥ ३ ॥

श्रीकृष्ण सारथी असता, अर्जुन होता रथावर
प्रशंसा त्याच्या शौर्याची पसरली सर्व जगभर ॥
युद्ध संपले, रथ थांबला, कृष्ण म्हणाला उतर खाली
रथाखाली उतरलेल्या अर्जुनाची शक्ति गेली ॥ ४ ॥

तसेच आहे साऱ्यांचे, कधी वर कधी खाली
नियंत्याच्या हातात आहे, विश्वचक्राची किल्ली ॥
एवढे जरी समजले तरी फार बरे झाले
बरे वाईट काही झाले तरी आपले काय बिघडले? ॥ ५ ॥

या एका मानसपूजेत सहज दोन पूजा झाल्या
आनंदाच्या आवेगात फक्त मंजिऱ्याच वाहिल्या ॥
प्रभू! तुला जसे वाटते, तसेच ते घडत असते
(निमित्ताला 'मी' सांपडलो याहून भाग्य कोणते)

# श्रीगुरुदेव प्रार्थना

**ॐ कार तत्त्वरूपाय दिव्य ज्ञानात्मने नमः**
**तमोतीत महाधाम्न ऐंश्वर्या ओजसे नमः ॥**

हे भगवन् श्रीगुरुदेवा ! निराकार स्वरुप असलेले आपण, ॐ कार रुपाने नटले आहात. ॐ काराच्या तीन मात्रांचे तीन गुण घेऊन आपणच त्रिगुणात्मक असे श्रीगुरुदेव दत्तात्रेय रूप घेतले. आपण 'स्मतृगामी' असल्याने, आपलेच स्मरण सर्वश्रेष्ठ आहे. आपण इतके दयाळू आहात की, केवळ आपल्या स्मरणानेच, आपण संतुष्ट होता, ही आपली परमकृपा आहे. हे श्रीगुरुदेवा ! आपण अज्ञान-तिमिरध्वंसक, ज्ञानज्योतिप्रकाशक आणि आत्मशक्तिचालक आहात. आपण 'दीक्षाकर्ता जगद्गुरु' असल्याने सर्व देवांचेही गुरु आहात. आपणास पुनः पुनः साष्टांग नमस्कार आहेत.

हे भगवन् ! अनंतकोटी ब्रह्माण्डाला, आपण आपल्या उदरात साठविले, म्हणून आपण "श्रीवासुदेव" रूपात व्यक्त होता, आणि आपणच त्या अनंतकोटी ब्रह्माण्डाचे नायक असता म्हणून "श्रीलोकनाथ" या पदवीने झळकता ! हे श्रीगुरुदेवा ! ! बळीराजाप्रमाणे आपल्या चरणावर अनन्य भक्तीने सर्वस्व समर्पण करणाऱ्यावर, चरण वा हस्ताचा स्पर्श करून अनुग्रह करणारे, 'श्रीवामन', हे नाव तरी आपल्याशिवाय अन्य कोणाचे आहे ? आपणच आत्मविस्मृत मानवाचे अज्ञान दूर करून त्याला स्व-रुप-स्मृति देणारे आहात म्हणूनच तर आपणास मी शरण आलो आहे.

हे श्रीगुरुदेवा ! आपण आपल्या भक्ताला सर्व काही दिले म्हणून आपण 'श्रीदत्त' झालात. पापांचे क्षालन करता म्हणून अवधूतशिरोमणी आहात. हेच आपले व आपण दिलेल्या दीक्षेचे स्वरुप आहे.

आपले स्वरूप परमश्रेष्ठ असले तरी दुष्प्राप्य आहे, जीवाच्या अज्ञानरुपी अहंकाराच्या प्रचंड मेघांनी आपले स्वरूप झाकले गेले आहे. या अहंकाराचे सहा जबरदस्त भागीदार आहेत. हे सर्व भागीदार मिळून जीवाला हसवीत, रडवीत, भुलवीत असतात. यांच्या जाळ्यात सापडलेला जीव अनंत दुःखांचा वाटेकरी

होत असतो. अशा लुटारू, दरोडेखोर शत्रूंच्या तावडीतून सुटणे जीवाच्या सामर्थ्या-पलिकडचे आहे. परंतु हे भगवन् ! आपल्या हातातील आयुधांच्याकडे पाहिले की भोळ्या जीवाला आधार वाटतो. आपल्या सहा हातातील सहा आयुधे, या सहा शत्रूंसाठीच आहेत, अशी आमची खात्री होते. आपल्याखेरीज या असामान्य शत्रूंना धूळ कोण चारू शकेल ?

हे, श्रीगुरुदेव दत्तात्रया ! आपल्या हातात माला, कमण्डलु, डमरू, त्रिशूल, शंख आणि चक्र ही सहा आयुधे आहेत. तसेच मत्सर, लोभ, मोह, क्रोध, मद आणि काम असे हे जीवाच्या पाठीमागे लागलेले सहा शत्रू आहेत. या शत्रूंवर आपल्या आयुधाचा कसा परिणाम होतो पहा–

मत्सराने सर्वत्र शत्रुत्व निर्माण होते. त्याचा नाश करण्याचा एकमेव उपाय "नाम-जप" आहे. या नामजपातून सूक्ष्मभक्ति निर्माण होते आणि मत्सर नाहीसा होतो. हे आपल्या हातातील माळेने सूचित केले आहे. माला ही जपाची 'स्मरणिका' आहे. ती आपण हातात घेऊन मात्सर्याची नरडीच पकडली आहे.

दुसरा शत्रू 'लोभ' हा आहे. लोभ हा सदैव तृषेने व्याकूळ असतो. लोभाची तृषा शांत करण्यासाठी आपण आपल्या हातात कमंडलु घेतले आहे. आपल्या कमंडलूची जादू मोठी अजब आहे ! त्यातील जल कधी संपतच नाही. त्या लोभाचे उपशमन, आपल्या कमंडलूतील जलाशिवाय अशक्य आहे. लोभावर पाणी सोडल्याने तो शांत होतो, हेच आपण बजावीत आहात.

तिसरा शत्रू मोह ! जीवाला केंव्हां आणि काय मोह होईल याचा काही भरवसा नाही. सारखी भुरळ घालणे हेच मोहाचे काम. पण प्रभू ! आपला डमरू, मोहालाच आपल्या ध्वनीने भुरळ घालून मोहून टाकतो. ध्वनीइतके मोहून टाकणारे प्रभावी शस्त्र दुसरे नाही. आपल्या डमरूच्या ध्वनीने मोह आपल्यावरच मोहित झाला आहे.

चौथा शत्रू क्रोध ! आपल्या त्रिशूळाने क्रोधावरच आपला राग काढला आहे. क्रोध जितका दूर टाकता येईल तितके चांगले, म्हणून त्रिशूळासारख्या आयुधाची योजना दिसते. क्रोधाच्या पोटात भीतीचा गोळा उभा करून तो शांत करण्याचे काम त्रिशूळाने होते. त्रिशूळाची भयंकर फेक जेव्हा क्रोधावर तुटून पडते तेव्हा क्रोधाला

शरण येण्याशिवाय गत्यंतर राहात नाही. क्रोधावर दुरूनच दृष्टी ठेवून सावधपणे राहिले तरच तो दूर राहणार! म्हणून आपल्या हातातील त्रिशूळ पाहून क्रोधाने आपला मोहराच बदलून टाकला आहे.

पाचवा शत्रू मद! या शत्रूचा उन्माद, मदोन्मत्त हत्तीपेक्षा जास्त असतो. मदाचा दर्प क्षणोक्षणी वाढत जातो. आपला 'शंख' या 'मदा' चा मद क्षणार्धात् नाहीसा करण्यास समर्थ आहे. आपल्यापेक्षा कुणी वरचढ आहे असे मदाला समजले की तो 'बापुडा' होतो. आपली ॐ कार स्वरूप शंख ध्वनीची आकाश विद्रावी गर्जना ऐकताच मद गर्भगळीत होऊन नष्ट होतो. असे आपल्या शंखाचे सामर्थ्य आहे.

सहावा शत्रू काम! वास्तविक हा अति बलाढ्य शत्र आहे. याला एकटे गाठून ठार करण्यासाठी आपणही त्याचा क्रम शेवटी ठेवलेला दिसतो. बाकीचे शत्रू शरण आले किंवा आपणास भिऊन पळून गेले तरी आपण सहन करता. परंतु या 'काम' नावाच्या शत्रूला ठार मारण्याच्या प्रतिज्ञेने आपण हातात चक्र घेतलेले दिसते. आपले 'चक्र' हे आयुधच या 'काम' शत्रूचा बलिष्ठपणा सिद्ध करते. आपले आणि या शत्रूचे क्षणभर सुद्धा पटत नाही म्हणून तर आपल्याला "कामारि" म्हणतात. दिवस व रात्र एकाच वेळी एका ठिकाणी नांदू शकत नाहीत त्याप्रमाणे 'काम' व 'राम' एकत्र राहू शकत नाही. अशा या भयंकर शत्रूसाठी आपले चक्र सदैव सज्ज असते.

अशी एकूण आपल्या आयुधांची योजना आहे.

आपली ज्ञानमुद्रा आम्हास अंतर्मुख करते तर आपली कृपादृष्टी आमच्या अन्त:करणात आनंदाचे कल्लोळ निर्माण करते. आपल्या स्वरूपाचे वर्णन करणे अशक्य आहे. 'यतो वाचो निवर्तन्ते' या शब्दातच आपले वर्णन योग्य होईल.

आपल्या त्या 'अनिर्वचनीय' स्वरूपाला 'परा'वाणीने वंदन करून— 'यथा नियुक्तोस्मि तथा करोमि....'

**दुर्लभो विषयत्यागो दुर्लभं तत्त्वदर्शनम् ।**
**दुर्लभा सहजावस्था सद्‌गुरोः करुणं विना ॥**
**"जयाचे केलिया स्मरण। होय सकल विद्यांचे अधिकरण**
**ते वंदू श्रीचरण। सद्‌गुरुंचे" ॥**

* * *

# "आज्ञापि वो माते"।

जय जय गुरुमहाराज गुरु । जय जय परब्रह्म सद्‌गुरु ॥

योऽन्तः प्रविश्य मम वाचमीमां प्रसुप्तान्
संजीवयत्यऽखिल शक्तिधर स्वधाम्ना ।
अन्यांश्च हस्त श्रवण त्वगादिन्-
प्राणान् नमो भगवते पुरुषाय तुभ्यम् ॥

परि आता आमुते गोडा करावे । ऐसे तांदुळी काइसेया
विनवावे । साईखेडेनि काई प्रार्थावे । सूत्रधाराते ॥
तो काइ बाउलेयांचा काजा नाचवी । किं आपुलिये जाण-
वेचि कळा वाढवी । म्हणौनि आम्हा येयां ठेवाठेवी ।
काइ काज ॥

आपुलिया बळे नाही मी बोलत । सखा कृपावंत वाचा त्याची ॥
साळुंकी मंजुळ बोलतसे वाणी । शिकविता धणी वेगळाची ॥
काय म्यां पामरे बोलावी उत्तरे । परि त्या विश्वंभरे बोलाविले ॥
तुका म्हणे त्याची कोण जाणे कळा । वागवी पांगळा पायांवीण ॥

श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीलोकनाथतीर्थस्वामी महाराजांचे चरित्र लिहिण्याची माझी पात्रता नाही. मजसारख्या अपात्र, साधारण व्यक्तीने या अलौकिक दिव्य विभूतीचे चरित्र लेखनासाठी लेखणी हातात धरावी ही ईश्वरी लीला आहे. मी लेखकही नाही किंवा लेखन करण्याची हौसही मला नाही. यासंबंधी एवढेच म्हणता येईल की, श्रीनृसिंह सरस्वती स्वामीमहाराजांनी एका पतिताकडून सप्तरेखा ओलांडवून ब्रह्मज्ञान वदविले. तशातलाच हा चमत्कार श्रीगुरुमहाराज आपण घडवीत आहात.

वास्तविक जिथे आपल्याच स्व-रूपाची ओळख होणे कठीण, तिथे आपल्या गुरुदेवांना ओळखून त्यांचे चरित्र लिहिणे हे अजाणत्याचे धाडस आहे. केवळ आपली योजना म्हणून काही जमले तरच शक्य आहे. "यथा नियुक्तोस्मि तथा करोमि" या उक्तीप्रमाणे जसे होईल तसे लेखन करण्याची स्वीकृती आपण मान्य केली आहे.

आपलीच इच्छा आहे तेव्हां आपणास हवे तसे घडणार आहे. हीच आपली परमकृपा व या देहाचे परम भाग्य आहे.

आपल्या चरणी प्रार्थना आहे की हे सर्व कार्य आपणास हवे तसे पूर्ण करवून घ्यावे.

**"सेवा बरवी घ्या हातून!"**

**"म्हणोनी अंबे श्रीमंते! निजजन कल्पलते।**
**आज्ञापि वो माते। ग्रंथ निरूपण॥"**

* * *

# स्वामी चरित्र निर्मितीचे सूत्र आणि सूत्रधार !

**एकं सौभाग्यजनकं तारकं लोकनायकम् ।**
**विशोकं त्रातभजकं नमस्ये कामपूरकम् ॥**

भारतीय मनोभूमि प्रसिद्धिपराङ्मुख आहे. विशेषतः भारतीय साधू, संत, महात्मे, सिद्ध, ज्ञानी इत्यादि सारे महापुरुष आपला परिचय म्हणजे, देहरूपी घटाचा परिचय, तुच्छ समजत आले आहेत. म्हणून त्यांनी देहापेक्षा 'देही' चा परिचय करून देण्याचा प्रयत्न, आपल्या साहित्यातून, आपल्या कृतीतून आणि आपल्या जीवन जगण्याच्या पद्धतीतून आजन्म केलेला आढळतो. या सर्व महापुरुषांनी लोकेषणा टाळण्यासाठी स्वतःला झाकून घेण्याचा आटोकाट प्रयत्न केलेला दिसतो. त्यात स्थानांतर, नामांतर, वेषांतर इ. जे शक्य झाले ते त्यांनी केले आणि आपले जीवन चरित्र अज्ञात ठेवले. ही या महात्म्यांची मनोभूमिका त्यांच्याच शब्दातून अशी स्पष्ट होते—

**जाति न पूछो साधुकी, पूछ लीजिए ज्ञान ।**
**मोल करो तलवारका, पडा रहन दो म्यान ॥**

साधूकडून 'ज्ञान' होते का ते पहा. त्याच्या कुळाची, जातीची उठाठेव करून काय उपयोग? तलवार पोलादी, धार असलेली, उत्तम आहे की नाही ते पहा. त्या तलवारीचे म्यान मखमलीचे, जरतारी आहे की नाही याची तलवारीच्या दृष्टीने काय किंमत आहे? "काय मुललासी वरलिया रंगा । ऊस डोंगा पर रस नोहे डोंगा ॥"

असे असल्यामुळे आत्मानुसंधी जीव अंतर्मुख झालेला असतो. त्याला स्वतःमध्येच आनंदाचा झरा आढळतो. म्हणून तो बहिर्मुखी होऊ इच्छित नाही. हे खरे असले तरी यामुळे भारतीय महापुरुषांच्या जीवनचरित्राचे संकलन हा विषय मोठा कठीण होऊन बसला आहे. अशाही स्थितीत आजपर्यंत संकलित झालेल्या हजारो भारतीय संत, सत्पुरुष, महात्म्यांच्या चरित्रांचा संभार पाहिला तर कोणाही भारतीयाची मान ताठ व्हावी आणि जगातील कोणाही मानवाला आश्चर्य वाटावे, अशीच ही संत चरित्रे अद्भुत आहेत.

या संत, सत्पुरुषांचे अखिल मानवजातीवर अनंत उपकार झाले आहेत. या उपकाराच्या ऋणातून मानव मुक्त होऊ शकत नाही, असे हे ऋण आहे. या ऋणाच्या जाणीवेने कृतज्ञता बुद्धी जागृत होते व या उपकार-

कल्यांचे स्मरण घडावे, त्यांची जीवनदृष्टी व जीवनपंथ स्पष्ट व्हावा, म्हणून ही 'संत चरित्रे' लिहिली जातात. पण येथेही चरित्राला मर्यादा पडतात. मुख्य म्हणजे त्यांचे मूळ चरित्र उपलब्ध नसते. मिळालेल्या घटना-प्रसंगावरून लेखक ते सजवितो. म्हणजे लेखकाच्या कमी अधिक कुवतीप्रमाणे ते चरित्रही कमी अधिक होते. यातूनही महापुरुषांच्या जीवन चरित्राने समाज प्रभावित होतच असतो. गुण दोष लेखकाचे असतात तर दिव्य, उदात्त व भव्य जीवन महापुरुषांचे असते. लेखक व वाचक संत स्मरणाने धन्य होतात. तृप्त होतात. हीच दृष्टी ठेवून हा एक प्रयत्न केलेला आहे.

आपले चरित्रनायक परमहंस परिव्राजकाचार्य श्रीलोकनाथ तीर्थ स्वामी महाराज तर प्रसिद्धीपराङ्मुख परंपरेचे शिरोमणी म्हणण्याइतके दृढव्रती होते. स्वतःसंबंधी ते कधीही बोलत नसत. त्यांनी आपल्या नातेवाईकांचा उल्लेख कोणाही जवळ केल्याचे आढळत नाही. स्वामींचे जन्मनांव श्रीयोगेशचंद्र चक्रवर्ती. नैष्ठिक ब्रह्मचर्याची दीक्षा घेतल्यावर श्रीयोगेशचंद्र प्रकाश ब्रह्मचारी, प्रथम दंडविरहित संन्यास घेतला तेव्हाचे नांव श्री चिन्मयानंद सरस्वती स्वामी आणि दंडग्रहणानंतरचे नांव श्रीलोकनाथतीर्थ स्वामी अशा नामान्तरांनी त्यांचा जीवन प्रवाह गती घेत गेलेला. तसेच त्यांच्या स्थानांतराचे वैशिष्ट्य ! जन्म ढाक्क्याला, २० व्या वर्षी गृहत्याग, मदारीपूर, विनोटिया इ. अनेक ठिकाणी बंगालमध्ये भ्रमण. पुढे काशी, हिमालय, हुशंगाबाद, महाराष्ट्र, काशी, भारतभ्रमण यामध्ये सर्व आयुष्य घालविले. इ. स. १९१४-१५ मध्ये त्यांनी बंगाल सोडला व ते काशीकडे आले, तर पुन्हा उभ्या आयुष्यात एकदाही बंगालमध्ये गेले नाहीत.

अगदी अलिकडे म्हणजे इ. स. १९७१ मध्ये पुण्यातील एका साधकाने स्वामी काशीस असताना त्याना पत्र पाठवून त्यांची व त्यांच्या नातेवाईकांची माहिती अत्यंत सरळ बुद्धीने विचारली. तेव्हा स्वामींनी जे उत्तर पाठविले ते त्यांची वृत्ति स्पष्ट करणारे व थोडासा परिचयही देणारे आहे. ते पत्र मूळ हिंदी भाषेत जसे आहे तसेच वाचण्यासारखे आहे,

नारायण श्रीक्षेत्रकाशी

....नारायणस्मरणपूर्वक सप्रेम

शुभाशीर्वाद । आपका पत्र मिला । समाचार ज्ञात हुआ । आपकी इच्छाके अनुसार परिचय देता हूँ ।

* * *

# श्री श्रीगुरुपीठ का परिचय -

बंगालमें श्रीमत् नारायणतीर्थ स्वामी मेरे पूर्वाश्रम के परमगुरु थे। उनके शिष्य श्रीमदात्म प्रकाश ब्रह्मचारी महाराजसे ब्रह्मचर्य - दीक्षा लेकर महाराज के साथ ही मैं उनके गुरु के आश्रम में आया तथा परमगुरु महाराजकी सेवामें रहा। कई वर्ष के अनंतर गुरुजी की आज्ञा के अनुसार स्वतंत्र रहकर साधन, भजन तथा देश-भ्रमण करते हुए मैं कालातिक्रम करता था। कुछ काल के अनन्तर जब मेरे गुरुजी श्रीमदात्मप्रकाश ब्रह्मचारीजी ने जगन्नाथपुरी स्थित गोवर्धन पीठाधीश श्री श्रीशंकराचार्य श्रीमद्भारतीकृष्णतीर्थ महाराज से संन्यास ग्रहण किया, तब उनका नाम श्रीमत् शंकरपुरुषोत्तम तीर्थ हुआ। इन महाराजसे मैंने संन्यासदीक्षा ग्रहण की। यह मेरे श्री श्रीगुरुपीठका परिचय है।

मैं संन्यासी हूँ। अतः संन्यास धर्म के अनुसार पूर्वाश्रम का परिचय देता नहीं।

इतिशिवम्

आशीर्वादक
**स्वामी लोकनाथतीर्थ**

स्वामींच्या या पत्राने आपल्यावर खूप उपकार केले आहेत. वास्तविक परिचय टाळूनही जी गुरुपीठ परंपरा त्यांनी स्पष्ट केली ती फार मोलाची आहे. परमगुरुदेव श्रीनारायणतीर्थदेवांचेकडे प्रारंभीच्या शिष्यात स्वामी होते व तेथे वास्तव्य करून त्यांची त्यांनी सेवा केली. ही गोष्ट या पत्रामुळे स्पष्ट व निश्चित झाली.

स्वामींच्या पूर्वाश्रमासंबंधी चौकशी करण्याची इच्छा त्यांच्या समाधीकालानंतर झाली. तेव्हा इ. स. १९५५ मध्ये सद्गुरु श्रीगुळवणी महाराज यांना त्यांनी पत्रव्यवहार केला. हृषिकेशाचे श्रीयोगानंदजी महाराज ( योगेंद्र विज्ञानी ) हे स्वामी महाराजांच्या दीर्घकाळ परिचयाचे होते. ते याच गुरुपरंपरेमधील असल्याने परस्परांचा संबंधही दृढ होता. त्यांना पत्र पाठविले होते. त्यांचे जे उत्तर आले त्यात ते लिहितात—

नारायण ऋषिकेश

"....इ. सन १९१९ मध्ये मी श्रीक्षेत्र काशी येथे होतो. त्यावेळी श्रीलोकनाथतीर्थ स्वामींची व माझी प्रथम भेट झाली. आमचा त्या काळात दोन महिने सतत सहवास होता. त्यानंतर १९२० मध्ये ते हृषिकेश येथील स्वर्गाश्रमातील आमच्या आश्रमात येऊन राहिले होते. त्या काळापासून मधूनमधून अनेकवेळा त्यांची माझी भेट होत होती.

.... परंतु त्यांच्या पूर्वाश्रमीची मला काही सुद्धा माहिती नाही.

आपला शुभचिंतक
योगेन्द्र विज्ञानी.

वरील पत्राप्रमाणेच त्यांचे सहवासातील समकालीन सज्जन व सत्पुरुषांच्या भेटीतूनही हीच गोष्ट ऐकण्यास मिळाली. त्यापैकी ब्रह्मीभूत प. प. १००८ श्रीविष्णुतीर्थ स्वामीमहाराज, देवास, यांनी स्वामींच्या पूर्वाश्रमीची माहिती नसल्याचे सांगितले. यापेक्षाही विशेष गोष्ट ही की सद्गुरु श्रीगुळवणीमहाराज यांचा आणि स्वामींचा सहवास इ. स. १९२२ पासून पुढे ३२ वर्षे पू. स्वामींशी अत्यंत निकटचा होता. त्यांच्या इतका प्रगाढ संबंध कोणाचाही आला नाही. परंतु त्यांनाही स्वामींच्या पूर्वाश्रमीची काही एक माहिती नाही. खरोखर स्वामींच्या दृढनिश्चयाची आणि काटेकोरपणाची ही कमाल आहे.

या संदर्भात श्रीगुरुमहाराजांशी बोलताना त्यांनी असे सांगितले की " स्वामी माझे गुरु असले तरी वयाने ते माझ्यापेक्षा सहा वर्षांनी लहान होते. तेव्हा त्यांची माहिती लिहिण्याचा प्रसंग आपल्यावर येईल ही शंकाच कधी मनाला शिवली नाही. स्वामींना त्यासंबंधी कोणी प्रश्न केला तर ते उत्तर देत नसत. उलट नापसंती व्यक्त करीत. एकदा असा प्रश्न केला तेव्हा त्यांनी आद्यशंकराचार्यांची सर्व माहिती सांगितली व स्वतःची पूर्णपणे टाळली. परमेश्वराची इच्छा."

अशा स्थितीत, स्वामींचे जीवन विसाव्या शतकाच्या मध्यावर असले तरी कसे प्रकाशात आणणार ? त्यांतून पूर्वबंगाल, ढाका, मदारीपूर, विनिटिया ही चरित्राशी संबंधित ठिकाणे पाकिस्तानात गेल्याने त्या ठिकाणी जाऊन माहिती आणणेही अवघड ! यामुळे पूर्वाश्रमाचे वृत्त तर स्वल्प प्रमाणात द्यावे लागणार आहे.

वर लिहिलेल्या अडचणी खऱ्या असल्या आणि चरित्राचे संकलन कठीण असले तरी ईशेच्छा म्हणून काही असतेच. ती असली म्हणजे मुका बोलका होतो. आणि पांगळा गिर्यारोहक बनतो.

जीवांचे कल्याण व्हावे ही दयाघन परमेश्वराची इच्छा आहे. म्हणून त्याच्या इच्छेप्रमाणे स्वामींच्या चरित्राचा जेवढा भाग उपलब्ध झाला, त्यातून तो जसा ग्रहण झाला आणि शेवटी तो जसा कागदावर आला तेच स्वामींचे चरित्र समाजापुढे यावे ही प्रभू इच्छा ! श्रीगुरुमहाराजांनी निमित्ताला हाताशी धरून ज्यांच्याकडून या कार्याची छोटीमोठी कामे करून घेतली ते सारे भाग्यवान आहेत. ज्यांच्यासाठी हे चरित्रलेखन केले त्या वाचकांचे भाग्यही उजळले आहे. त्यांची इच्छा या निमित्ताने पूर्ण होत आहे.

चरित्र संकलनाचे काम इ. स. १९६८ पासून चालू झाले. श्रीस्वामींच्या संबंधितांचे पत्ते मिळवून त्यांना पत्र पाठविणे, एक प्रश्नावली तयार केली होती ती पाठविणे, प्रत्यक्ष भेटीगाठी घेणे, स्वामींशी पत्रव्यवहार झालेल्या व्यक्तींकडून स्वामींच्या हस्ताक्षरातील पत्र गोळा करणे, त्या पत्रांच्या नकला करून घेणे, मिळालेली पत्रे व माहिती कालक्रमानुसार लावणे, अशी अनेक कामे त्यानंतर चालू होती. काम या दृष्टीने बरेच होते. एक हाती होते आणि तितकेच संथ चालले होते. एक हाती व्हावे असा श्री गुरुमहाराजांचा हेतू असल्याने हा संथपणा त्यांना कधी खटकला नाही. आम्हालाच सारखे वाटे की चरित्र लवकर पूर्ण होऊन प्रसिद्ध व्हावे.

स्वामींच्या पत्रांचा फार मोठा साठा श्रीगुरुमहाराजांच्या संग्रही होता. पण १९६१ च्या पानशेत पुराचा तडाखा महाराजांच्या ग्रंथांना आणि पत्रांना बसला. त्यावेळचे ते ग्रंथांचे आणि पत्राचे स्वरूप पाहून सर्व भक्तांना फार वाईट वाटले. सर्व काही पाण्याने भिजून निरुपयोगी झालेले आणि त्यातून गाळाच्या मातीने बरबटून वाया गेलेले ग्रंथाचे ते स्वरूप हृदय हेलावून टाकीत होते. परंतु अनेक श्रद्धाळू भक्तांनी तळहातावरच्या फोडाप्रमाणे मोठ्या हळुवारपणे प्रत्येक ग्रंथाचे पान न पान स्वच्छ केले. प्रत्येक पत्र न पत्र साफ केले. पत्रांची शाई पाण्याने धुवून गेल्याने अक्षरे पुसट झाली. दिसेनाशी झाली. त्यातून स्वामींची पत्रे शक्य तेवढी हुडकून काढली. क्रमवार लावली. ही पत्रे सुमारे ५०० आहेत. ती इ. स. १९२३ पासून १९५५ पर्यंतची आहेत. या व्यतिरिक्त १००-१५० पत्रे अन्य ठिकाणाहून गोळा

करण्यात आली आहेत. अशा प्रकारे प्रत्यक्ष स्वामीजींच्या हस्ताक्षरातील पत्रे हा त्यांचा जीवन चरित्राचा मूळ आधार तयार झाला.

त्यानंतर ही सर्व क्रमवार लावलेली पत्रे सवडी सवडीने श्रीगुरुमहाराजाना वाचून दाखविली. ती वाचताना त्या त्या संदर्भातील माहिती व घटना, जे जे काही त्यांना आठवे ते ते श्रीगुरुमहाराज सांगत असत. त्याची टिपणे आमच्याकडून होत असत. मधून मधून ज्या शंका येत त्यांचा खुलासाही ते करीत. हे मार्गदर्शन सर्वात अधिक मोलाचे झाले.

श्रीभुजंगराव ऊर्फ नाना भालेराव या श्रीगुरुसेवाव्रतधारी महान भगवत् भक्ताला स्वामीजींचा सहवास श्रीगुरुमहाराजांप्रमाणे भरपूर लाभला. श्रीनानांच्याकडून स्वामींच्या जीवन चरित्रातील घटनांची सुसंगतपणे जुळवणी करून मिळाली. त्यांच्या कुटुंबातील सर्व जणांना स्वामींचा सहवास लाभल्याने त्यांच्याही सहकार्याचा मोठा उपयोग झाला.

स्वामींच्या चरित्राची माहिती गोळा करताना २–३ ठिकाणांहून स्वामींची जन्मपत्रिका मिळाली. गुजराथ राज्यातील अहमदाबाद जवळच्या भिलोडा गावचे श्रीगुरुमहाराजांचे अनुग्रहीत श्रीभगवंतराव उपाध्ये यांचेकडून प्रथम जन्मपत्रिका आली. त्यानंतर त्या पत्रिकेवर बरीच चर्चा झाली. श्रीगुमहाराजांनी त्यातील माहीत असलेले ग्रह बरोबर असल्याचे सांगितले. जन्मसालाची खात्री दिली. बाकी ज्योतिष-शास्त्राची फले आणि स्वामींच्या जन्मपत्रिकेशी जुळणाऱ्या श्रीमदाद्यशंकराचार्य आणि श्रीसमर्थरामदास स्वामींच्या पत्रिका पाहून सर्वांच्या मताने मिळालेली जन्म पत्रिका बरोबर असल्याचे वाटू लागले. पुढे काही काळ लोटला. एके दिवशी सोलापूरचे श्री पराडकर वैद्य यांचेकडील स्वामींच्या पत्राचे छोटे बाड आले. त्यात एका जीर्ण कागदावर स्वामींची जन्मपत्रिका होती. स्वामींची प्रकृती वारंवार का बिघडत असे हे ज्योतिष-शास्त्रदृष्टया पाहाण्यासाठी वैद्यराजांनी ती पत्रिका स्वामींच्याकडून मुद्दाम मागवून घेतली होती. ती पत्रिका आणि प्रथम आलेली पत्रिका एकच आहे हे पाहिल्यावर मात्र खात्री पटली. त्यामुळे शक्य तेवढे पडताळे पाहाण्यासाठी व जन्मादिकाल निश्चित करण्यासाठी जन्मपत्रिकेचा साहाय्यक म्हणून उपयोग करून घेता आला.

या चरित्रलेखनाला चालना मिळणारी आणखी एक उल्लेखनीय घटना घडली.

श्रीगुरुमहाराजांच्या एप्रिल १९६७ मध्ये झालेला सहस्रचंद्रदर्शनशांती समारोहाच्या अध्यक्षस्थानी शक्तिपात संप्रदायाचे महान आचार्य, हृषिकेशनिवासी ब्रह्मीभूत प. प. श्रीविष्णुतीर्थ स्वामीमहाराज विराजित झाले होते. त्यावेळी त्यांचे उत्तराधिकारी प. प. श्रीशिवोमतीर्थ हेही पुण्यास त्यांचे समवेत होते. त्यांनी प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामीमहाराजांच्या चरित्राची अपेक्षा बोलून दाखविली. खूप आग्रहपूर्वक श्रीगुरुमहाराजांना विनंती केली. आपल्या तर्फेच हे काम होणार आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. "आम्हाला त्यांची आपल्या इतकी माहिती नाही, आमचे जवळ असेल ती माहिती आपणाकडे देऊ व हिंदीमध्ये लिहिले तर प्रकाशित करू" असे खूप सांगितले. याप्रमाणे सर्वांच्या मनात असलेल्या विषयाला चालना मिळाली. त्यानंतर वरील दिशेने प्रत्यक्ष कार्य सुरू झाले. हृषिकेशहून प्रकाशित होणाऱ्या "दिव्यानंद" त्रैमासिकातून स्वामींच्या चरित्रावरील लेख छापूनही येऊ लागले. प. प. श्रीस्वामी शिवोमतीर्थ महाराज यांच्या विधायक साहाय्याने चरित्राची कार्यवाही खूप प्रमाणात करू शकलो असल्याने आपण कृतज्ञतेने त्यांचे ऋण स्मरले पाहिजे.

या चरित्रलेखनातील माझे स्थान कळसूत्रीच्या बाहुलीचे आहे. बाहुलीचा सूत्रधार पडद्याआड असतो. तो कधीच प्रकट होत नसतो. प्रकट होतात त्या बाहुल्या नि त्यांचा नाच. लोक खूष होतात ते चित्राच्या व कागदाच्या निर्जीव बाहुल्यांच्या नाचावर ! पण जाणकार समजतात ही सारी कळा व हे सारे कौशल्य त्या सूत्रधाराचे आहे. तो सारे भाव, साऱ्या छटा व सारी करामत बाहुल्यांच्या माध्यमातून समर्थपणे व्यक्त करीत असतो. अशी स्थिती आहे म्हणून हे सूत्रधार ज्यांना स्पर्श करतील त्यांचे सोने करू शकतात. माझ्या श्रीगुरुदेवांच्या संदर्भात मी यापेक्षा जास्त लिहू शकत नाही.

इ. स. १९७० च्या आक्टोबरमध्ये, हृषिकेशहून निघणाऱ्या 'दिव्यानंद' त्रैमासिकातून, श्रीस्वामींच्या चरित्राचा प्रारंभ हिंदी भाषेतून झाला. सुरवातीला निम्मे चरित्र हिंदीमधून लिहिले गेले. ते क्रमशः 'दिव्यानंदा' मधून येऊ लागले. श्रीगुरुमहाराजांना तिकडे हस्तलिखित पाठविण्यापूर्वी वाचून दाखविले जाई. त्यांनी दिलेल्या सूचनांप्रमाणे आवश्यक तर फेरबदल केला जाई. त्यांच्या संमतीने चरित्राचा भाग दिव्यानंदाकडे पाठविला जात असे. अशक्य असलेले स्वामींचे चरित्र हळू हळू आकार घेऊ लागले. वाचकांना संतोष होऊ लागला. पण मराठी वाचकांचे समाधान

हिंदी भाषेने होईना. त्यांनी 'मराठी' मध्ये चरित्र निघाले पाहिजे म्हणून आग्रह धरला. हा आग्रह श्रीगुरुमहाराजांपर्यंत गेला. त्यांनी मला सांगितले. "मराठी चरित्र लिहून ठेवले तर लोकांना हवे आहे. पहा जमले तर!"

इ. स. १९७१ च्या १ जूनला, श्रीगुरुमहाराजांची रौद्रीशांती झाली. त्या निमित्ताने अनेक कार्यक्रम झाले. तेव्हांपासून "पंथराज" हे मराठी त्रैमासिक सुरू झाले. या "पंथराजातून" स्वामी चरित्र क्रमशः येऊ लागले. मराठीतील चरित्र वाचून वाचकांची मने तृप्त होऊ लागली. स्वामींचे चरित्र वाचण्यास लवकर मिळावे म्हणून ते अधीर होऊन पत्रे पाठवीत. याप्रमाणे 'पंथराज'च्या काही अंकामधून स्वामी चरित्र क्रमशः येऊ लागले. पंथराज त्रैमासिकाचे संपादक माननीय श्री. केशवराव रामचंद्र जोशी, एम्. ए. यांचे लेखकावर मोठे उपकार आहेत. 'पंथराज' मध्ये चरित्राचा काही भाग छापून आल्याने वाचकांना चरित्राची कल्पना आली. चरित्र लेखनातील शुद्धलेखनादिचे दोष लेखकाचे नजरेस आणल्याने लेखनात सावधपणा येऊ लागला. श्री. केशवराव यांचे हे मार्गदर्शन उल्लेखनीय आहे. त्यांच्या कार्याच्या व्यापामुळें त्यांना या चरित्राच्या कोणत्याही कार्यात लक्ष घालता आले नाही. त्यांना तशी सवड सापडली असती तर या चरित्र ग्रंथाला अधिक शोभा आली असती. पण तसा योग नव्हता. तशी प्रभू योजनाच नव्हती.

या उल्लेखाचे कारण, चरित्र लेखनाला जो विलंब लागला याचे कारण एकाच वेळी चरित्र दोन भाषेत होऊ लागले होते. व्यवसाय, नोकरी, प्रकृती, लहर या सर्व गोष्टींची भर, विलंब अधिक होण्यासाठी पडत होतीच. जातिवंत लेखकाचा पिंड नसल्याने सहज घडेल तसे घडत होते.

होता होता १९७३ च्या मार्चमध्ये श्रीगुरुमहाराजांनी "चरित्र पुरे झाले का?" "किती झाले?" "किती राहिले?" "किती पाने होतील?" या स्वरुपाच्या प्रश्नांनी मला प्रचंड गती दिली. एप्रिल व मे या दोन महिन्यात तर त्यांनी मला श्रीवासुदेव निवास आश्रमात ठेवून घेऊन चरित्र पुरे करून घेतले. रोज दिवसभर लिहावे आणि सायंकाळी वाचून दाखवावे असा नित्यक्रम सुरू झाला. त्यांच्या खोलीत हे चरित्र ऐकण्यासाठी अनेक गुरुबंधू येऊन बसत. तो या चरित्राचा अपूर्व सोहळा होता. सर्वजण संतुष्ट होत असत. सर्व ग्रंथ मराठीत प्रथम लिहून झाला. श्रीगुरुमहाराजांना संपूर्णपणे वाचून दाखविला. त्यांच्या सूचनांप्रमाणे त्यामध्ये

हवा तो बदल केला. असा पूर्ण लिहून व वाचून झालेला ग्रंथ श्रीगुरुमहाराजांच्या पवित्र करकमलामध्ये समर्पण केला व त्यांच्या चरणांवर कृतार्थतेच्या गहिवराने मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार केला. "प्रभु ! आपली वस्तू आपणांस समर्पित आहे. आपण फक्त आपली परम कृपा करून या जीवाचे कल्याण करावे" ही प्रार्थना केली. त्यावेळी श्रीगुरुमहाराजांनी अत्यंत प्रेमाने आणि आनंदाने पाठ थोपटली. म्हणाले "केवढे मोठे काम पार पाडलेत हे ! हा तुम्ही लिहिलेला ग्रंथ तुमचा आहे. मी कुठे ठेवू हा ? मला वाचून दाखविलेत, माझे समाधान झाले. तुम्हीच संभाळा हा." असे म्हणून हा चरित्रग्रंथ श्रीगुरुमहाराजांनी माझ्या हाती दिला. त्यांची त्यावेळची अत्यंत प्रसन्न अन्तःकरणाची अमृत वर्षाव करणारी दृष्टी मला या जन्मात तरी विसरणे अशक्य आहे.

श्रीगुरुमहाराजांना ग्रंथ वाचून दाखविल्यावर सर्वात शेवटी 'मानसपूजा' व 'समर्पण' या कविता वाचून दाखविल्या. त्या ऐकून तर श्रीगुरुमहाराज बेहद्द खूष झाले. त्यांचा तो आनंद पाहिला म्हणजे आपले जीवन कृतार्थ झाले असे वाटते.

विश्वसूत्रधाराच्या इच्छेने ज्या महापुरुषांचे जीवन महान बनलेले असते अशांचे जीवन चरित्र मनुष्यमात्राच्या मर्यादित व संकुचित परिघामध्ये वावरणाऱ्या बुद्धीने व्यक्त करणे अशक्य आहे. तरीसुद्धा हा प्रयत्न म्हणजे या निमित्ताने केलेली त्या महापुरुषाची मानसपूजाच होय. श्रीगुरुदेवांच्या गुरूंची केलेली ही मानसपूजा त्यांनी गोड मानून घ्यावी व सदैव सर्वांवर कृपादृष्टी असू द्यावी ही प्रार्थना.



शक्तिपात योग - गुरूपीठ परंपरा - दर्शन
श्रीः
स्वामी श्रीगंगाधरतीर्थ महाराज, जगन्नाथपुरी (ओरिसा)
स्वामी श्रीनारायणतीर्थ देव महाराज, मदारीपूर (पूर्वबंगाल) -१९३५
योगाचार्य श्रीयोगानंदजी महाराज, ऋषिकेश १९५९
स्वामी श्रीशंकर पुरुषोत्तमतीर्थ महाराज, वाराणसी. (१८८० ते १९५८)
योगाचार्य श्री अश्विनीकुमार भट्टाचार्य महाराज, धनबाद (बिहार) १९६०
शक्तिपात
संन्यास
स्वामी श्रीविष्णुतीर्थ महाराज (ऋषिकेश व देवास)
स्वामी श्रीनारायणतीर्थ महाराज, वाराणशी
स्वामी श्रीलोकनाथतीर्थ महाराज, वाराणशी १८९२-१९५५
शक्तिपात
संन्यास
स्वामी श्रीशिवोम् तीर्थ महाराज (ऋषिकेश व देवास)
यो. श्रीगुळवणी महाराज पुणे, १८८६-१९७४
यो. श्रीदत्तात्रेय कवीश्वर महाराज, पुणे

# मूळ पीठ शंकरू

विश्वातील कार्याचे स्वरूप त्रिविध आहे. प्रारंभ-मध्य आणि अंत या तीन टप्प्यात कार्य घडत असते. हे सतत चालू असते म्हणून त्यालाच गती आहे. हीच ती विश्वाची गती असते. या तीन कार्याच्या, तीन शक्ति, नियंत्रण करतात, प्रारंभ म्हणजे उत्पत्ती हे कार्य 'ब्रह्मा'च्या शक्तीचे आहे. त्यानंतर हे निर्मित कार्य, विश्वगतीच्या नियमांच्या बंधनात टिकवून ठेवणारी शक्ति 'विष्णू'ची मानली आहे. यानंतर ते कार्य परत मूळ स्थितीत विलीन करणारी 'शिवशक्ति' असते. विविध रूपात असलेली कार्याची स्थिती पुनरपि स्वरूपात लय करण्याचे कार्य श्रीशिवाचे आहे.

लय म्हणजे कार्याचा शेवट. प्राप्त झालेले रूप पुन्हा स्वरूपात मिसळणे म्हणजे लय होणे. ही 'लय' सापडून जीवस्वरूपात लीन होणे ही मनुष्य जीवाची सफलता आहे. प्रत्येक कार्याचे यशापयश परिणामावरून ठरते. जीवाचे हे मूल्यमापन लयीवरून ठरते. लयीमध्ये तन्मयता, एकरूपता, आनंद आणि सर्वव्यापकता असते. जीवाची ही अवस्था म्हणजे परमोच्च स्थिती आहे. म्हणून लयाचे महत्त्व विश्वाच्या त्रिविध कार्यात सर्वात श्रेष्ठ आहे. 'शेवट गोड' होणे हा विचार या अर्थाचा आहे. "अन्ते मतिः सा गति" हे वाक्य हीच दृष्टी देणारे आहे.

जीवाला ही स्थिती गाठण्यासाठी महेशाच्या स्वरूपाचा ध्यास घेण्याशिवाय गत्यंतर नाही. या शिवस्वरूपाचे वर्णन आचार्यांच्या शब्दात असे आहे—

**अहं निर्विकल्पो निराकाररूपो ।**
**विभुर्व्याप्य सर्वत्र सर्वेन्द्रियाणि ॥**
**सदा मे समत्वं न मुक्ति र्न बंधः ।**
**चिदानंदरूपः शिवोऽहं शिवोऽहम् ॥**

ही शिवस्वरूप कैवल्यस्थिती ज्ञानरूपाने समजून घेण्यासाठी गुरुशिवाय आधार नसतो. म्हणून अध्यात्म मार्गातील पथिकांना गुरुपरंपरेचे महत्त्व सर्वाधिक असते. आदिनाथ महेशाच्या शिवस्वरूपात लीन होण्याचे ध्येय गाठण्यासाठी गुरुपरंपरेनेच जावे लागते. या मार्गाने पोहचावयाचे स्थान 'शिव' आहे, म्हणून

मोक्षमार्गीयांचे आदिनाथ, महेश हेच आद्य पीठ आहे. या महेशाला नामान्तराने संबोधले तरी स्थिती मात्र एकच आहे. तेव्हा "मूळ पीठ शंकरू" म्हणजे जीवाच्या चैतन्य शक्तीच्या परंपरेचे अंतीम गंतव्य स्थान! आणि शिवाच्या चैतन्यशक्तीचा उद्गम! हा चैतन्याचा स्फुल्लिंग म्हणजेच शक्तिपातयोगाचा निधी!

* * *

# "दीक्षा कर्ता जगद्गुरु"

श्रीगुरुपरंपरेतील हे स्थान पहिल्याइतकेच श्रेष्ठ आहे. जीवाचे अज्ञान दूर करून ज्ञान देण्याचे कार्य ज्या ईशशक्तीकडून होत असते तिलाच 'गुरुत्त्वशक्ति' म्हणतात. गुरुत्वाखेरीज ज्ञानप्राप्ती असंभाव्य असते. ज्ञानाशिवाय स्व-रूपाची ओळख पटणे अशक्य आहे. विश्वचक्राच्या यंत्रणेतील या ज्ञानदायिनी कार्याचे नियंत्रण श्रीगुरुदेवदत्तात्रेयांचे आहे. ही गुरुत्त्वाची शक्तीदेवता विविध रुपातून सर्वत्र संचार करून स्मरणाने संतुष्ट राहून ज्ञानदान करीत असते. याचा प्रत्यय श्रीगुरुचरित्रातून येतो. अज्ञान नाहिसे करणे हाच या ईशशक्तीचा उद्देश असल्याने ती दिक्कालाच्या बंधनापलिकडची आहे हे सिद्ध आहे. सूर्य आणि तेज हे जसे वेगळे होऊ शकत नाही तसे शिव व दत्त हेही वेगळे होऊ शकत नाहीत. तेजाने वस्तुजाताला स्पष्टता आणून गुणांची परीक्षा होईल. व त्या वस्तुजातामध्ये स्थित्यंतर घडवता येईल. हे कार्य प्रकाशाने म्हणजेच तेजाने संभवते. हेच कार्य श्रीगुरुदेवदत्तांचे आहे. यासाठी त्यांना दीक्षाकर्ता जगद्गुरु म्हटले आहे. जीवाची अंधःकारमय अज्ञान अवस्था दूर करून प्रकाशस्वरुप ज्ञानावस्था प्राप्त करून देण्याइतपत श्रेष्ठ गुरुत्वस्थान श्रीदत्तात्रेयांच्याशिवाय अन्यत्र जाऊ शकत नाही म्हणून तेच 'दीक्षाकर्ता जगद्गुरु' असे या परंपरेतील अनन्यश्रेष्ठ आहेत.

* * *

# प. प. १००८ श्रीगंगाधरतीर्थस्वामीमहाराज

भारताचे आगळेपण येथील सिद्ध पुरुषांच्या दिव्य नि अलौकिक जीवन-गाथेमध्ये आहे. सिद्धपुरुषांचे जीवन म्हणजे 'विचार आणि आचार' यांच्या एकरूपतेचे प्रतीक. 'तत्त्व' आणि 'कृती' यांचा सुसंवादी संगम. विश्वमंचकावर प्रसिद्ध पुरुष अगणित असतील परंतु सिद्ध पुरुष मात्र अल्प प्रमाणात, व मर्यादित संख्येतच आढळतात. प्रसिद्धीसाठी केवळ 'कृती' किंवा केवळ 'तत्त्वज्ञान' पुरेसे असते. परस्परांचा मेळ तेथे नको असतो. अशा प्रसिद्ध पुरुषांचे जीवनही नेत्रदीपकच असते. पण त्याचे पर्यवसान अंधःकारामध्ये होत असते. सिद्ध पुरुष प्रसिद्ध न राहाण्याचा आग्रही असतो. त्याच्या विचारात देहाची प्रसिद्धी क्षुद्र असते. प्रसिद्ध पुरुष मात्र सदैव 'सिद्ध' असल्याचा भास निर्माण करतात. पण तत्त्व आणि कृती याच्या विसंगतीमुळे त्याच्या जीवन कार्याला मर्यादा पडतात.

भारताचे अमरत्व या रहस्यामध्ये आहे. या दिव्यभूमीची–देवभूमीची ही सिद्ध महापुरुषांची परंपरा, भागिरथीप्रमाणे अखंड चालू आहे. भारताची ही अस्मिता, सिद्ध पुरुषांच्या 'सिद्ध' अवस्थेतून, प्रकर्षाने प्रकट होत आलेली आहे, अशा सिद्धांची लक्षणे श्रीसमर्थांच्या शब्दातून वाचण्यासारखी आहेत.

**ऐका सिद्धांचे लक्षण ।**
**मुख्य निस्संदेहपण । सिद्ध म्हणजे स्वरूप जाण ।**
**तेथे पाहता वेगळेपण । मुळीच नाही ।**
**स्वरूप होऊनि राहिजे । तया नाव सिद्ध बोलिजे ।**
**सिद्ध स्वरूपीच साजे । सिद्धपण ॥**
**वेदशास्त्री जे प्रसिद्ध । स्वस्वरूप स्वतःसिद्ध ।**
**तयासीच बोलिजे सिद्ध । अन्यथा न घडे काही ॥**
**बाह्य साधकाचे परी । आणि स्वरूपाकार अंतरी ।**
**सिद्ध लक्षण ते चतुरी । जाणीजे ऐसे ॥**
**संदेह रहित साधन । तेचि सिद्धाचे लक्षण ।**
**अंतर्बाह्य समाधान । चळेना ऐसे ॥**
**देह संबंधाचेनि गुणे । लक्षणासी काय उणे ।**
**देहातीताची लक्षणे । काय म्हणोनि सांगावी ॥**
**जे लक्षवेना चक्षुंसी । त्याची लक्षणे सांगावी कैसी ।**
**निर्मळवस्तू सिद्ध त्यासी । लक्षणे कैसी ॥**

अशा सर्व सिद्धांची आंतरिक अवस्था एकच असते. ही स्थिती साधनमार्गाच्या अभ्यासातून प्राप्त झालेली असते. विविध साधनांचे संप्रदाय विविध पंथांनी ओळखले जातात. या विविध साधन संप्रदाय–समुदायाचे लक्ष्य 'उर्ध्वगती' प्राप्त होणे आहे. तरी सुद्धा सर्व साधनामध्ये श्रेष्ठ साधन तेच असू शकते की ज्या साधनामध्ये–गतीमानता, निर्दोषता, सहजता व स्वयंसिद्धता या गुणांचा अचूक समावेश झालेला आहे.

या दृष्टीने पाहता 'शक्तिपात' साधन श्रेष्ठतम साधन आहे. हा मार्ग साधन पंथांचा 'पंथराज' आहे. या साधनमार्गाचा आरंभ प्रत्यक्ष शिवापासून झाला असून भगवान् श्रीदत्तात्रेय या मार्गाचे नियंत्रक आहेत 'दीक्षागुरू' आहेत. या मार्गाला "ज्ञानसाधन मार्ग" 'महायोग सिद्धसाधन'–शक्तिपात साधन आदि नांवाने ओळखले जाते. हे साधन स्वतः पूर्ण असून सर्व प्रकारचे मालिन्य दूर करून पूर्णत्वास नेणारे आहे. त्याची परंपरा अखंड चालू असली तरी ईशप्रेरणेनुसार प्रकट अप्रकटपणे चालू आहे. त्यांची लक्षणे मात्र पूर्णांशाने एकच आहेत.

वर्तमानकाळात या दिव्यसाधनेची परंपरा प्रकट स्वरूपात दिसू लागते ती प. प. १००८ श्रीगंगाधरतीर्थस्वामीमहाराजांपासून. आपण त्यांच्या लौकिक जीवनगाथेचे श्रद्धेने आणि कृतज्ञतेने अवगाहन करू.

**प. प. १००८ श्रीगंगाधरतीर्थ स्वामीमहाराज—**

श्रीस्वामी गंगाधरतीर्थ महाराज म्हणजे शक्तिपात योगपरंपरेचा अगदी अलीकडचा अत्यंत दैदिप्यमान नंदादीप. या नंदादीपाने एकच ज्योत पेटवली नि दिव्य परंपरा प्रकर्षाने प्रकाशित होण्याचा समर्थ आशीर्वाद दिला. निवृत्तीनाथांनी एकच ज्ञानदीप पेटविला आणि सारे विश्व उजळून दिले. तीच भूमिका व तेच कार्य स्वामी श्रीगंगाधरतीर्थांचे आहे.

स्वामींचे सारेच जीवन नंदादीपासारखे होते. अखंड प्रकाश देणारे, शांतता देणारे व प्रसन्नता देणारे होते. त्यांच्या जीवनात कुठेही धावपळ नाही. ये जा नाही. तीर्थयात्रा नाही. उग्र तपःसाधनेचा खळखळाट नाही. जीवनाला प्रसिद्धीचा वारासुद्धा लागला नाही. अहंकाराच्या वाऱ्याची झुळूकही स्पर्श न झालेले स्वामींचे जीवन होते. हे सर्व खरे असले तरी एक गोष्ट चांगलीच खटकते ती ही की इतक्या

उदात्त जीवनाचा काहीच पत्ता लागू शकत नाही. एवढ्या उत्तुंग जीवनाचे अल्पसे दर्शनही लौकिक अर्थाने घडू शकत नाही.

असे झाले तरी शिष्याला काही कृतज्ञतेचे कर्तव्य राहातच असते. भले भगवंतानी स्वतःला अदृश्य ठेवले, झाकून घेतले, म्हणून भक्ताला आपली वाणी बंद ठेवता येत नाही. कृतज्ञतेची जाणीव व्यक्त केल्याशिवाय त्याला समाधान होतच नाही. भगवंताच्या जेवढ्या स्वरूपाचे त्याला आकलन झाले असेल त्या स्वरूपाची पूजा करणे अनिवार्य आहे, अटल आहे. कदाचित ती पूजा पूर्ण स्वरूपाची असू शकणार नाही. षोडश उपचारांची असू शकणार नाही. पण भावपूर्ण असल्याशिवाय राहाणार नाही. त्याच भावपूर्ण मनाने आपण श्री गंगाधरतीर्थ स्वामीमहाराजांच्या जीवनाचे मनन करू या.

स्वामी महाराजांचे पूर्वाश्रमीचे नांव आणि जीवन बिलकुल उपलब्ध नाही. जीवनकाल म्हणाल तर साधारणपणे इ. स. १८४० ते १९०५ हा आहे. इतक्या अलीकडच्या काळात–विज्ञान युगात–व्यक्ती स्वतःला पूर्णपणे झाकून घेऊ शकते आणि समाज त्यांना ओळखू शकत नाही हे आश्चर्य आहे. प्राचीन काळी तर असंख्य महापुरुष अज्ञात राहिले असतील यात नवल कसले ! स्वामींचे मूळचे घराणे वाजपेयी ब्राह्मण शाखेचे होते. प्रभु रामचंद्रांच्या पुण्यपावन अयोध्या नगरीचे ते निवासी होते. गुरुदेव श्री वसिष्ठ मुनींनी रामचंद्राला शक्तिपातपूर्वक दीक्षा दिली त्याच परिसरात–त्याच मातीत स्वामींचे बालपण गेले. गंगातुल्य शरयू नदीस्नानाने पुनीत झाले. स्वामींचे पूर्वाश्रमीय जीवन पूर्णपणे अज्ञात आहे. ते विवाहबद्ध झाले किंवा नाही ? व्यवसाय केला असेल तर कोणता ? नसेल केला तर काय केले असेल ? कौटुंबिक स्थिती कशी असेल ? ज्या कुलात या महापुरुषाचा जन्म झाला त्या कुलाची परंपरा, त्या कुलाचे दैवत–उपासना–कोणती असेल ? यातील कोणत्याही प्रश्नाचे उत्तर केवळ मौनानेच देणे शक्य आहे.

एवढे मात्र खरे की स्वामीजींनी तरुणपणामध्ये घर सोडले, संसार सोडला आणि हिमालयाचा आश्रय घेतला. संन्यास घेण्यापूर्वीच हे घडले होते. विरक्त जीवनाची ओढ त्यांना संसारात ठेवू शकली नाही. यामध्ये व्यावहारिक संघर्ष काय झाले असतील ते न जाणे पण स्वामींच्या निश्चयी आणि शांत मनात मात्र संघर्ष झाला नसावा. हे असे करावयाचे हा सहज ठरविलेला निर्धार होता. आणि तो सुद्धा एकट्या स्वतःच्या मनाशीच.

विरक्त वृत्ती इतकी पराकोटीची होती की त्यांना इच्छा अशी कसलीच नव्हती. साधन संपन्न राहाण्याने सतत स्वरुपानुसंधान सुलभ साधते म्हणून साधन. हिमालयाची सिद्धभूमी त्यांच्या विरक्त अन्तःकरणाला आकर्षून घेत होती. कुटुंबियांचे माया ममतेचे पाश स्वामींना रोखून धरू शकत नव्हते. विचलितही करू शकत नव्हते.

हिमालयात गंगाधरतीर्थांचा काही काळ गेला तेथे त्यांना दिव्यविभूती संन्यासी वेषात, भेटली. त्या विभूतीने दिव्यविद्या गंगाधरतीर्थांना देऊन कृतार्थ केले. योग्य मार्गदर्शन करून ती विभूती अदृश्य झाली.

ही घटना अलौकिक होती पण याचा उल्लेख यापेक्षा अधिक त्यांनी कधी केला नाही. आपला हिमालयातील उद्देश सफल झालेला पाहून गंगाधरतीर्थांनी परत फिरण्याचा बेत केला. ते परत घराकडे अयोध्येला न जाता जगन्नाथपुरीस गेले. संन्यास घेण्यासाठी ते गोवर्धन पीठात गेले. त्या ठिकाणी काही काळ मुक्काम करून त्यांनी विधिवत् संन्यास ग्रहण केला.

प. प. श्री गंगाधरतीर्थ स्वामीमहाराज हे नाव या आश्रमाचा स्वीकार केल्यानंतर प्राप्त झालेले आहे. या एकाच नावाचा परिचय आपणास झाला आहे. स्वामीमहाराज मितभाषी होते. गप्पागोष्टी, बोलणे, शास्त्रचर्चा, इ. त्यांना पसंत नसत. ते अत्यंत एकांतप्रिय होते. त्यांनी आपल्या भोवती शिष्यपरिवार वाढविला नाही. गोवर्धनपीठाच्या आश्रमातील गर्दी सुद्धा त्यांना नकोशी वाटे. आणि त्यासाठीच त्यांनी जगन्नाथपुरीमध्ये चंदन तलावाच्या काठावर एक छोटीशी झोपडी बांधून तेथे त्यांनी आपले वास्तव्य केले. ते आपल्या झोपडीच्या बाहेर फारसे पडत नसत. भिक्षेसाठी स्वतः जात नसत. त्यांचेजवळ १।२ ब्रह्मचारी शिष्य होते. ते भिक्षा मागून आणीत आणि स्वामींची भिक्षा त्यातून होत असे. ते सतत साधनात रमलेले असत. त्यांनी आपला व्यक्तिगत परिचय कोणालाही करून दिला नाही व आपल्या अध्यात्मसंपन्न जीवनाची जाणीव कोणालाही होऊ दिली नाही. लोक त्यांना अत्यंत साधा साधू म्हणून समजत. त्यामुळे त्यांचेकडे लौकिक अपेक्षेने कोणी गेलेच नाही.

प. प. श्री गंगाधरतीर्थ स्वामीमहाराज म्हणजे परमशांतीचे नि सदाचार संपन्नतेचे मूर्तिमंत प्रतिक होते. त्याग, ज्ञान आणि साधना यांनी त्यांच्या शरीराचा आश्रय घेतला होता तर प्रासिद्धीने आपले चंबूगबाळे त्यांच्यापासून दूर ठेवले होते. बिचारी

कीर्ती आयुष्यभर त्यांना वरण्यासाठी हातात माला घेऊन त्यांच्या झोपडीच्या फाटकाशी रात्रंदिवस तिष्ठत होती. परंतु स्वामी कधी आपल्या कुटीच्या बाहेर पडलेच नाहीत. कीर्ती अगदी कोमेजून गेली. जाणाऱ्या येणाऱ्यांच्या मार्फत काही जमेल या आशेने बिचाऱ्या कीर्तीने काही बेत रचले पण त्यालाही यश येईना. कारण त्या झोपडींत ये-जा अशी कोणाचीच नव्हती. एकदा मात्र तिने ठरविले आणि जो कोणी बाहेर येईल त्याच्याशी संधान बांधण्याचा निश्चय केला. त्यावेळी श्री गंगाधरतीर्थ स्वामी-महाराजांचे एकमेव शिष्य श्रीनारायणतीर्थ स्वामी महाराज त्या झोपडीतून कृतार्थ होऊन बाहेर पडत होते. कीर्ती त्यांचे मागे निघून गेली आणि श्री गंगाधरतीर्थ स्वामीमहाराज आपल्या एकमेव शिष्यामुळे थोडेसे प्रकाशात आले.

त्याचे असे झाले. विश्वसूत्रकाराच्या अतर्क्य रचनेमुळे कालीकिशोर-गंगोपाध्याय नावाचा एक साधक गुरु शोधत शोधत या ठिकाणी येऊन पोहोचला. ज्याच्या दर्शनाने चित्ताची अस्वस्थता नाहीशी होईल, चंचल चित्त स्थिर होईल व आतून आकर्षण वाटेल ते दर्शन गुरूचे अशा विचारात कालीकिशोर स्वामीजींच्या झोपडीत प्रवेश करता झाला. समोर आसनावर बसलेली धीरगंभीर, प्रसन्न, कौपीनधारी, शांतमूर्ती पाहून कालीकिशोर मंत्रमुग्ध झाला. त्याचे विचारचक्र थांबले. काही कारण नसताना डोळे पाणावले. श्वासोच्छ्वास दीर्घ होऊ लागले. आपण मुक्कामावर येऊन पोहोचलो, आता भटकणे संपले, असे आतून आपोआप वाटू लागले. क्षणभर तो अवाक् राहिला पण किंचित् स्वतःला सावरून त्याने स्वामींना साष्टांग नमस्कार केला. स्वामींनी हातानी बसण्याची खूण केली. कालीकिशोर स्वामींच्या जवळ बसला. कोणी कोणास काहीच विचारीत नव्हते. केवळ जवळ बसण्यास मिळाले तरी कालीकिशोरच्या तप्त चित्ताला चंदनसान्निध्याची शीतलता येऊ लागली. मनात प्रश्न उत्पन्नच होत नव्हता नुसते शांत शांत वाटत होते. धावपळीच्या कष्टाचे इतके विस्मरण झाले की जणू झोपेतील स्वप्नामधील ते कष्ट जागे होताच नाहीसे व्हावेत. त्या दिवशी काहीच बोलणे झाले नाही. स्वामीजींनी फक्त एवढेच विचारले,

"मुक्काम आहे ना ?"

या प्रश्नाला "हो आहे" या शिवाय दुसरे उत्तर संभवले नाही. जणू परस्परांचा पूर्वजन्मीचा संबंध आतून स्फुरला होता.

सत्संगतीने विसंगत विचारकणांची धूळ पार उडून गेली. स्वच्छतेची,

शुद्धतेची जाणीव तीव्रतेने होऊ लागली. प्रवासाचा सारा शीण नाहीसा झाला. कालीकिशोर टवटवीत गुलाबपुष्पाप्रमाणे दुसऱ्या दिवशी स्वामींना वंदन करण्यास आला.

स्वामीजी एकान्तामध्ये होते. कालीकिशोरने साष्टांग नमस्कार केला. त्याने स्वामींना हठयोग प्रक्रियेबद्दल प्रश्न केला. स्वामींनी हठयोगाची असारता स्पष्टपणे विशद केली. त्याचबरोबर राजयोगासंबंधी विस्तारपूर्वक माहिती दिली. स्वामीजींच्या नित्य सहवासाने कालीकिशोरच्या मनावर अधिकच प्रभाव पडत होता.

एके दिवशी कालीकिशोरने स्वामींना प्रार्थना केली, "महाराज मला काही सांगावे." त्यावर स्वामीजींनी मंत्रजपाबद्दल खूप माहिती दिली. मंत्रजपाने सर्व काही प्राप्त होते म्हणून सांगितले. कालीकिशोरला यापेक्षा आणखी विशेष स्वामीजींनी सांगावे असे वाटत होते. कालीकिशोरने खूप जपानुष्ठान केले होते. परंतु प्रत्यक्ष लाभ काही होत नाही असेच त्यांचे मत झाले होते. तेव्हा स्वामीजींनी श्रीमद्भगवद्गीतेची छोटी प्रत दिली व एक श्लोक वाचून दाखविला हे मननपूर्वक वाचीत जा म्हणून सांगितले.

एक महिना होऊन गेला. कालीकिशोर स्वामींचे नित्य दर्शन घेई. गीतेचे वाचन मननपूर्वक करी. जवळजवळ सर्व गीता मुखोद्गत झाली. आपल्याला स्वामीजींनी नेमके काही सांगावे म्हणून पुन्हा एकदा कालीकिशोरने प्रार्थना केली. राजयोग–ब्रह्मविद्येसंबंधी मार्गदर्शन करावे म्हणून सांगितले. परंतु काही एक उत्तर मिळाले नाही.

कालीकिशोरचा नित्यक्रम अत्यंत श्रद्धेने आणि निष्ठेने चालू होता. अजून वेळ आली नव्हती पण जे काही मिळायचे ते येथूनच मिळण्यासारखे आहे अशी मनाची पक्की खात्री झाली होती. पुन्हा काही दिवस लोटले. कालीकिशोरने सद्गदित अन्तःकरणाने प्रार्थना केली. "स्वामीजी मला नेमके काय असेल ते द्यावे."

त्यादिवशी अनंतजन्माचे पुण्य एकवटले. स्वामीजींच्या अन्तःकरणातून दयेचा स्रोत मुखरित झाला. "काय पाहिजे रे तुला? थांब मी तुला माझ्यासारखे करीन मग तर झाले ना? मी जे देईन ते म्हणजे साधन सर्वस्व आहे. ज्याप्रमाणे गीतेमध्ये ज्ञान-कर्म-भक्ती-योग या सर्वांचा अंतर्भाव झालेला आहे त्याप्रमाणे मी जे साधन देणार आहे त्यामध्ये सर्व साधनमार्गांचा अंतर्भाव आहे. अरे तो पंथराज आहे.

इ. स. १८८६—अक्षय्यतृतीयेचा पर्वकाल दीक्षेसाठी ठरविला. त्या दिवशी क्षौर स्नानादि करण्यास कालीकिशोरला सांगितले. काही फुले घेऊन ये म्हणून सांगितले. ती फुले हीच गुरुदक्षिणा. "पत्रं पुष्पं फलं तोयं" ने संतुष्ट होणारा भगवंत आणि गुरुदेव स्वामीमहाराज यांच्यात फरक कसा आढळणार? गुरु साक्षात् परब्रह्म आहे. दीक्षेच्या वेळी स्वामीमहाराजांनी कालीकिशोरच्या हातून फुलांचा स्वीकार केला. समोरच्या आसनावर बसण्यास सांगितले. कालीकिशोरने गुरुदेव स्वामीमहाराजांना साष्टांग नमस्कार केला. त्यांचे पाय घट्ट धरले. गदगदित हृदयाचे भाव अनावर झाले. मस्तक स्वामींच्या पायावर ठेवले आणि भावोत्कट आनंदाश्रूंनी पाद्यपूजा केली. स्वामींनी कालीकिशोरची पाठ थोपटून शांत केले. आसनावर बसताना स्वामी म्हणाले—

"मी आज तुला मंत्रसहित योगदीक्षा देत आहे. आपण साक्षी आहोत. जे होते ते पाहाणे एवढेच आपले काम. हे भाव आज जागृत झाले आहेत. ते जेव्हा परिपक्व होतील तेव्हा ज्ञानाची पराकाष्ठा झाली असे समज. हे ज्ञानाचे लक्षण आहे."

गुरुदेव स्वामीमहाराजांचे बोलणे संपते न संपते तोच कालीकिशोरच्या अन्तःकरणातून आपोआप जप स्फुरू लागला. स्वामीजींच्या कृपादृष्टीने, हस्तस्पर्शाने उपदेशामृतवाणीने आणि संकल्पाने कालीकिशोरमध्ये ज्ञानशक्तीचा संचार झाला. त्याची प्रत्यक्ष अनुभूती त्याला येऊ लागली. अनिर्वचनीय आनंदाचे कल्लोळ आतून उफाळू लागले. शरीरात दिव्यबल निर्माण होत असल्याचे जाणवू लागले. सर्वत्र आनंदच भरून राहिला आहे याची प्रचीती आली. आतून काही समजू लागल्याचे लक्षात आले. ज्ञानोदय आतून होत आहे या अनुभवाने सारी बुद्धी तरारली, ज्ञातेपणाची जाणीव होऊ लागली. काही समजू लागल्याचे प्रत्ययास येऊ लागले. आनंदाला दडपून टाकणे अशक्य झाले. नकळत आनंदाचे हास्य मुखारविंदावर विलसू लागले. औदासीन्य व चिंता आपोआप नष्ट झाली. कालीकिशोरचे साधन बराच-वेळपर्यंत चालू होते. नंतर गुरुदेव श्रीस्वामीजींनी डोळे उघडण्यास सांगितले.— "जो मंत्र मिळाला त्याचा जप अर्थाचे मनन करीत चालू दे. तुला सर्व अभिष्टसिद्धी प्राप्त होईल." असा उपदेश व आशीर्वाद दिला.

यापुढे काही काळ कालीकिशोर श्रीगुरुदेव स्वामीमहाराजांची सेवा आणि साधन यामध्ये पूर्ण रमून गेला त्याला इतर कशाचेही स्मरण राहिले नाही. या दिव्य

वातावरणाने चित्तवृत्तीमध्ये सद्वासनांचा जोर होऊ लागला. एके दिवशी कालीकिशोरने संन्यास आश्रम घेण्याची इच्छा प्रकट केली. ओघानेच गुरुदेवांनी घरी कोणकोण आहेत याची चौकशी केली. सद् झाली तरी ती वासनाच ! त्या वासनेच्या प्रभावाच्या ओघात कालीकिशोर बोलून गेला 'मला कोणी नाही' गुरुदेव स्तब्ध झाले. सारा संवाद तिथेच थांबला जणू या प्रश्नाला गंभीर बाजू असते याची जाणीव व्हावी अशी इच्छा असावी.

दुसऱ्या दिवशी गुरुदेवांनी एकट्या कालीकिशोरला बोलावले आणि त्याला उपदेश करू लागले.

"हे पहा कालीकिशोर तू माझ्याशी खोटे बोललास ! तू म्हणालास तुला कोणी नाही पण–ते खोटे सांगितलेस ! तुला आई आहे–वडील आहेत. बहीण भाऊ आहेत फार काय तुला पत्नी पण आहे. तुझ्या दृढ आग्रहास्तव मी तुला ब्रह्मज्ञान प्राप्तीची दीक्षा दिली परंतु आता तू येथे राहू नकोस. आपल्या घरी जा. ज्ञानसंचय कर. स्वाध्याय आणि साधना कर.

प्रथम तुला तुझे प्रारब्ध भोगले पाहिजे. तुझ्या कुटुंबियांची जबाबदारी तुला पार पाडली पाहिजे. नंतर तुला मी जे साधन दिले आहे ते साधनच तुला योग्य ठिकाणी घेऊन जाईल. जेव्हा तुझ्यात अधिकार निर्माण होईल तेव्हा आपोआप तुला संन्यास प्राप्त होईल"

"घरी जा" या आज्ञेने कालीकिशोर अवाक् झाला. एका क्षणात आकाश-पृथ्वीने स्थानांतर केले. पायाखालची जमीन निसटून चालल्याचा भास होऊ लागला. कल्पित मनोभावांवर वज्राघाताचा प्रहार झाला. वास्तविक ज्या दिव्य जीवनाचा संकल्प कालीकिशोर रचित होता त्याच्या प्रखरतेची जाणीव आणि स्वतःची अनुकूलता याचा अंदाज नीट बांधता आला नसावा. पण यात चुकले काहीच नव्हते. अपयशाच्या भीतीने क्षुद्र ध्येय गाठणाऱ्यास कोणीच असामान्य म्हणणार नाही.

त्याला नेमके काय करावे हे सुचेना. संन्यासी जीवनामध्ये प्रवेश करण्याची ओढ असताना पुन्हा संसारात पडायचे ? पुन्हा भोगाकांक्षेत जीवन व्यतीत करायचे ? कालीकिशोरने श्रीगुरुदेवांच्या चरणावर लोटांगण घातले. क्षमा मागितली आणि आपल्या चरणाजवळ ठेवून सेवा घ्यावी व साधन पूर्ण करून घ्यावे अशी प्रार्थना केली.

यावर गुरुदेव स्वामी महाराजांनी केलेला उपदेश मननीय आहे—

"हे पहा कालीकिशोर, तुला माहीत नाहीत असे अनेक भोग भोगले पाहिजेत. तुझे ते भोग मला माहीत आहेत. मला ते दिसतात. जोपर्यंत भोग-वासना संपत नाहीत तोपर्यंत संन्यास होऊ शकत नाही. संन्यासी जीवनाची काषाय वस्त्रे मनात अभिमान निर्माण करतील तर त्या उदात्त जीवनापासून पतित होण्याचीच भीती जास्त. ती वस्त्रे, रुद्राक्षाच्या माळा, हे बाह्य अवडंबर आहे. त्याचे आकर्षण अभिमान-अहंकार-दंभादि दोष निर्माण करतात. जोपर्यंत मनातील वासना नष्ट होत नाहीत तोपर्यंत मनुष्य संसारीच असतो.

आम्हाला वासना नाहीत म्हणून आम्ही संन्यासी झालो. तू मात्र संन्याशाच्या बाह्य अवडंबरावर भुलला आहेस. हा खरा संन्यास नव्हे. परमेश्वराची कृपा आणि गुरूंचा आशीर्वाद प्राप्त झाल्यावर साधन-भजन करीत करीत ज्ञानाची परिपक्व स्थिती येते. ती वेळ संन्यास ग्रहणाची आहे. याशिवाय सारे संन्याशी-उदरपूर्तीचे दासानुदासच म्हटले पाहिजेत.

मी तुला ढोंगी संन्याशी बनण्यासाठी दीक्षित शिष्य केले नाही. समर्पण बुद्धीने, प्रारब्धकर्म भोगत भोगत, श्रद्धेने आणि विश्वासाने साधनेचा अभ्यास केला पाहिजे. मी तुला जे दिले आहे तेच तुला संन्यास धर्माच्या मानसिक स्थितीला घेऊन जाईल आणि खरा संन्याशी बनवील. माझा आशीर्वाद तुझ्या पाठीशी आहे.

तू माझ्याजवळ राहिलास तर मोठ्या निष्ठेने आणि श्रद्धेने सेवा करशील याची मला जाणीव आहे. तुझ्यासारख्या श्रद्धाळू, सेवातत्पर, आणि परमार्थी शिष्याला कोणता गुरू सोडू इच्छील? तुला जवळ ठेवावे असे मलाही खूप वाटते. तुझ्यापासून मलाही खूप समाधान मिळेल. पण!

—पण ते अशक्य आहे. त्या बाबतीत माझा इलाज चालत नाही. तुझे प्रारब्ध, भोगवासनांची आंतरिक स्थिती पाहता तुला जवळ ठेवणे हे गुरु म्हणून उचित होणार नाही. आमची जबाबदारी आहे की शिष्याचे कल्याणच व्हावे. आज ज्या गोष्टीचा तुला अंदाज नाही त्या मी प्रत्यक्ष पाहू शकतो. आणि म्हणूनच कर्तव्य-कठोर व्हावे लागत आहे. पण तू चिंता करू नकोस. यात तुझे कल्याणच आहे.

हे पहा कालीकिशोर, तुला आई-वडील आहेत. त्यांची तू उपेक्षा केली आहेस. हे धर्मशास्त्राला धरून आहे कां? त्यांची चिंताच तुझी मनस्थिती अस्वस्थ करून टाकील. आपले कर्तव्य बजावणाराचे समाधान काही वेगळेच असते. परिणाम काहीही झाला तरी त्यावेळी मन कसे निश्चिंत असते. कर्तव्यपूर्तीच्या समाधानाने तुष्ट असते. तुझे तसे नाही. आणि यामुळे तुझ्या साधनेत आंतरिक अडथळे येतात. विक्षेप येतात. तुझा स्वभावधर्म पूर्णत: बदलून जाईल त्यावेळी तुला सर्वजण स्वत:हून सोडतील. तोपर्यंत तुला कोणीही सोडणार नाही. म्हणून तू घरी जा. प्रारब्धकर्म भोगलेच पाहिजे ही दृष्टी ठेवून अनासक्त वृत्तीने सर्व काही भोग भोगत साधना करीत राहा.

....आणि असे लक्षात ठेव की संपत्ती आणि स्त्री सर्वनाशाचे मूळ कारण आहे. मनामध्ये यासंबंधीच्या वासना जोपर्यंत आहेत तोपर्यंत उद्धार होऊ शकत नाही. तुला पत्नी आहे. तिच्यासाठी पती म्हणून तुझे काही कर्तव्य आहे. आज तुझी कामवासना दिसत नसली तरी ती सुप्त आहे. कोणत्याही वेळी ती जागृत होऊन प्रकट झाल्याशिवाय राहाणार नाही. आज तुझे अंत:करण या दृष्टीने शुद्ध आहे परंतु पूर्वसंचिताच्या संस्काराने लपलेल्या वासना केव्हा उफाळून येतील सांगता येत नाही. मोठमोठ्या ऋषिमुनींना, हठयोग्यांना आणि ज्ञानी पुरुषांना या वासनेने पथभ्रष्ट केलेले तू पाहिले नाहीस का? सुप्त संस्काराचा आवेग संभाळणे अत्यंत कठीण असते. साधकाची दुर्बलता येथेच असते. अशा पथभ्रष्ट पतित स्थिती-तून पुन्हा स्वत:ला संभाळून व सावरून घेऊन मार्गस्थ होणे अत्यंत दुष्कर असते. अवघड असते. आणि म्हणून शास्त्राज्ञेप्रमाणे पत्नीशी संसार कर. यामुळे तुला दोष लागणार नाहीत. प्रत्यवाय लागणार नाहीत. या वयात तू तुझी धर्मपत्नी सोडलीस तर दुसऱ्या स्त्रीच्या मोहात पडशील. अशा रीतीने तुझे पतन पाहाण्याची पाळी मला कशी रुचेल? म्हणून तुला तुझ्या घरी पाठवीत आहे.

कर्माचा त्याग तू करावयाचा नाही. कर्मांनी तुझा त्याग केला पाहिजे. पण ही गोष्ट परिपक्व अवस्थेशिवाय कदापि घडू शकत नाही. असा सहज त्याग घडेल तो दिवस संन्यास ग्रहणास योग्य.

तुला घरी पाठविण्यात — सांसारिक जीवनात परत पाठविण्यात माझा आणखीही एक हेतू आहे —

भूलोकावर धर्माची उन्नती करण्याची जबाबदारी तुझ्यावरही थोड्याफार प्रमाणात आहे. ही ब्रह्मज्ञानप्राप्तीची दीक्षा असाधारण दीक्षा असून मी तुला ती दिलेली आहे. तुझ्या हातात दिलेला तो एक दिव्य स्फुल्लिंग आहे. त्या स्फुल्लिंगाचा दिव्य प्रकाश तुझ्याकडून भारतभर पसरविला जाणार आहे. पण योग्य वेळी हे कार्य घडून येणार आहे. त्यासाठी तुला तुझ्याकडे धार्मिक नेतृत्त्व अथवा साधन गुरुत्व घेण्याची अभिलाषा ठेवण्याचे कारण नाही. हे घडणारं आहे. तुला त्याचा अनुभव येणार आहे. एवढे लक्षात ठेवून अनुसंधानपूर्वक साधनरत राहा म्हणजे झाले. तुझ्याकडूनच हे होणार आहे. पण तू निमित्तमात्र आहेस हे विसरू नकोस. गुरु होण्याच्या इच्छेने केलेले साधन अहंकाराची वृद्धी करणारे ठरते. आणि अहंकार सर्व प्रकारच्या अधःपाताचे मूळ असते. कर्तव्यबुद्धीने, ज्ञानेच्छु बनण्याने, गुरुतत्त्वाच्या ठिकाणी लीनत्व घेण्याने तुला फार मोठा लाभ होणार आहे.

कालीकिशोर ! तुला आणखी एक सूचना देतो. त्याचाही विचार कर. निष्कंण्टक राज्य प्राप्त झाल्याशिवाय स्वतःला राजा म्हणवून घेणे आणि राजवस्त्रे परिधान करणे फार धोक्याचे असते. केवळ वाक्‌चातुर्य आणि बाह्यवेष यामुळे ते सामर्थ्य प्राप्त होत नसते. ते सामर्थ्य आल्यानंतर वेष आणि वाक्‌चातुर्याचीसुद्धा गरज नसते. रस्त्यावरच्या भिकाऱ्याने स्वतःला राजा म्हणवून घेतले तर लोक त्याची टर उडवतील. त्याला हसतील. परंतु मी तुला जे अस्त्रकौशल्य दिले आहे, जो अभय आशीर्वाद दिला आहे त्यामुळे तू अवश्यमेव राजसिंहासनाधिष्ठित होशील. मला हेही प्रत्यक्ष दिसत आहे की लोक तुला राजा मानतील-राजा म्हणतील ! हे राजऐश्वर्य ऐहिक राजैश्वर्याच्या अनंतपटीने मोठे असेल आणि चिरंतन काल राहील. तू सर्वतंत्रस्वतंत्र असशील आणि "मीच आहे" "मीच आहे" या मंत्रघोषाच्या दुंदुभीने सारी पृथ्वी दुमदुमत राहील. तुला तूच सर्व व्यापून टाकले आहेस अशी अनुभूती येईल. तुझे सारे जीवन शांततेने व्यतीत होईल. निश्चित रहा. कल्याण असो."

गुरुदेवांच्या अमृतवाणीने कालीकिशोरचे चित्त शांत झाले. आणि तत्क्षणी त्याने स्वस्थ मनाने घरी जाण्याचा निर्णय घेतला. श्रीगुरुदेवांना साष्टांग नमस्कार करून कालीकिशोर आपल्या घरी निघून गेला. हा कालीकिशोर म्हणजे भविष्यकाळातील प. प. १००८ श्रीनारायणतीर्थदेवस्वामीमहाराज होत. त्यांचा चरित्रभाग पुढे पाहू.

श्रीगुरुदेव श्रीगंगाधर तीर्थ स्वामी महाराजांचे एकमेव शिष्य श्री नारायणतीर्थ स्वामी होते. त्यांचा अनुग्रह झाल्यानंतर काही काळ ते स्वामीजींच्या सान्निध्यात राहिले. ते आपल्या घरी निघून गेल्यानंतर स्वामीजी पुनः तेच एकांत, शांत, प्रसिद्धिपराङ्मुख जीवन व्यतीत करू लागले. महापुरुषाची महानता सामान्य राहाण्यातही असू शकते याचा हा सबळ पुरावाच म्हटला पाहिजे. महापुरुषांचे चरित्रही अत्यंत थोडे असते. देहासक्ति नाही–लोकेषणा नाही. स्वामीजी म्हणजे वैराग्याची चालती बोलती मूर्ती. ती मूर्ती अशीच न कळत-आपल्या जाण्याची चाहूल कोणालाही न देता आपल्या मूळ स्वरुपात विलीन झाली.

पुढे शिष्याला जेव्हा जाग आली तेव्हा त्याने पत्राने चौकशी केली. परंतु तत्पूर्वींच श्रीगुरुदेवांचे लौकिक अस्तित्त्व चैतन्यात मिसळले होते. अनंतात विलीन झाले होते. हा काळ इ. स. १९०५ च्या सुमाराचा होता.

आदिनाथ, परात्पर श्रीगुरुदेव, श्रीमत् परमहंस परिव्राजिकाचार्य १००८ श्रीगंगाधर तीर्थ स्वामी महाराजांचे चरणी अनंत कोटी साष्टांग प्रणिपात।

* * *

# प. प. श्री. नारायणतीर्थदेव स्वामीमहाराज

प. प. श्रीनारायणतीर्थदेव स्वामीमहाराज म्हणजे शक्तिपात योगाचे प्रवर्तक. त्यांच्या द्वारा हा मार्ग समाजाला सहज उपलब्ध झाला. श्रीमद्‌भगवद्‌गीता ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून सर्वसाधारण जनतेपर्यंत पोहचविली तसाच हा शक्तिपातयोगमार्ग सर्वांना सुलभ झाला. याचे श्रेय श्रीनारायणतीर्थदेवांना आहे.

श्रीनारायणतीर्थदेव यांचे पूर्वाश्रमीचे घराणे गंगोपाध्याय आडनावाचे होते. तारिणीचरण हे त्यांचे वडील, अत्यंत धर्मनिष्ठ परंतु शांत वृत्तीचे होते. त्यांची आई नवदुर्गादेवी यासुद्धा धार्मिक वृत्तीच्या आणि सात्विक गुणांच्या होत्या. हे गंगोपाध्याय कुटुंब पूर्व बंगालमध्ये फरीदपूर जिल्ह्यात मांडूसार गावी रहात होते.

या कुटुंबाचा 'शील' हा एकमेव अलंकार होता. बाकी फुटका मणीसुद्धा घरात नव्हता. आतिथ्य व्रताचे कटाक्षाने पालन करणारे मातापिता रोजच्या अन्नाला महाग असत. पण साधू संन्याशी या घरासमोरून कधी विन्मुख जात नसत. अशा या नित्याच्या अग्निदिव्याने तीर्थरूप तारिणीचरण आणि मातृदेवता दुर्गादेवी यांच्या तपश्चर्येला तेज चढत होते.

या वाढत्या तेजाने साकार व्हावयाचे ठरविले. एका संन्याशाच्या मुखातून तशी अमृतवाणी पण बाहेर आली. एकदा असे झाले की दुपारच्या वेळी एक संन्याशी दाराशी आला. त्याला झोळीत भिक्षा न घालता येथेच भिक्षा घ्यावी म्हणून आईने प्रार्थना केली. संन्याशाने प्रसन्नमुद्रेने होकार दिला आणि त्याने उंबऱ्यात पाऊल टाकले.

समोर देवघर होते त्यामध्ये एक मध्यमवयीन व्यक्ती देवपूजा संपवून पोथी वाचीत होती. घरात जिकडे तिकडे स्वच्छता होती. वस्तूंची गर्दी नव्हती. या दोन व्यक्तींशिवाय घरात आणखी कुणी नव्हते. घरातील कण न कण शुद्ध पावित्र्याने भरलेला होता. शांततेने स्थिरावला होता. संन्याशीस्वामी निश्चल होऊन पाहात होते. मनाने अधिकाधिक प्रसन्न होत होते.

इतक्यात नवदुर्गादेवीने पाणी आणून दिले. आसन घातले आणि लगबगीने ती भोजनाच्या तयारीसाठी आत गेली.

तारिणीचरण पण तत्परतेने पूजा उरकून आले. यतीला साष्टांग नमस्कार केला. थोडे औपचारिक बोलणे सुरू केले.

यतींची भिक्षा झाली. फार संतोष झाला. यती निघाले. दोघांनी नमस्कार केला. मुखातून आशीर्वाद बाहेर पडला.

"लवकरच तेजस्वी पुत्र होईल."

संन्याशाच्या पाठमोऱ्या आकृतीकडे दोघेजण स्तब्धतेने पाहात राहिले.

संन्याशाचा आशीर्वाद खरा झाला. कोजागिरीपौर्णिमेच्या दिवशी इ. स. १८७० मध्ये तारिणीचरण पिताजी झाले. नवदुर्गादेवी माता झाली. तेजस्वी पुत्राचा जन्म झाला.

बारशाला बालकाचे नाव विप्रदेवशर्मा ठेवले. पण कालीकिशोर हे लाडके नाव पुढे रूढ झाले. हा कालीकिशोर म्हणजेच आपले परात्परगुरु श्रीनारायणतीर्थदेव स्वामीमहाराज होत.

घरची गरिबी असल्याने कोडकौतुक बेतानेच होई. सर्व उणीव भावनेच्या श्रीमंतीने भरून निघे. चांगल्या गुणांचा कस गरिबीमध्ये लागतो. श्रीमंतभावनेच्या ओलाव्याने गुणांना बाळसे चढते. कशाची अपेक्षा नसते. आहे त्यात संतोष असतो. वासनांचा पाय मोडून मोडून त्या पांगुळल्या होतात. येईल ती स्थिती सहन करण्याच्या सवयीने सहनशीलता येते. भोवताली सतत अडीअडचणी असल्यामुळे आधाराला देवच घ्यावा लागतो. हे सगळं गरिबीमुळे घडते. गरिबीचे देणे फार मोठे असते पण घेईल त्याला ! सर्वांना ती नकोशी असते !

कालीकिशोरच्या शैशव अवस्थेतील एक प्रसंग आहे. अजून तो पूर्ण वर्षाचा पण झाला नव्हता. असेल जेमतेम नऊ महिन्याचा. मोठा अवखळ होता. भोवतालची मुले बाहेर निघाली. याला वाटले आपणपण जावे. रांगत रांगत बाहेर निघाला. गोड नि गोंडस मुले सर्वांना हवी हवीशी वाटतात. एका मुलाने याला पाहिले आणि आईला सांगून त्याला कडेवर घेऊन मुलांच्या घोळक्यात आला.

सर्व मुले तळयाजवळ जमली. भोवताली सुंदर झाडी होती. त्या रम्य वातावरणात त्यांनी शिवाशिवीचा खेळ मांडला. कालीकिशोरला एका झाडापाशी

## शक्तिपातयोगाचार्य



शक्तिपातयोग परंपरा प्रकाशात आणणारे महाप्रभू १००८ श्री नारायणतीर्थ देव यांच्यापासूनच परंपरेच्या धारा बहुगुणी झाल्या.

१००८ श्री प. प. श्रीनारायणतीर्थ देव यांचे बंगाली भाषेतील एकमेव दुर्मिळ पत्र

Swamipur, Dacca.
Bengal.
20. 6. 24.

কল্যাণীয়েষু আশীর্ব্বাদ চিরজীব,

প্রিয় চিন্ময়,

তোমার পত্র পাইয়া সুখী হইলাম। যখন তোমাকে দেখিতে পাব না সে সময় পত্র দ্বারা জানাইয়া সুখী ও নিশ্চিন্ত করিও। এখানে মঙ্গলমতেই আছি। তোমাদের মঙ্গল লিখিয়া সুখী করিও।

ইতি

আঃ শ্রী নারায়ণস্বামী।

পুঃ

যে মন্ত্র উপদেশ করিব হইয়াছে ভগবান তোমার মনোবাসনা পূর্ণ করিবে।

हे पत्र म्हणजे स्वमी श्रीलोकनाथतीर्थांना परमगुरुंचा कृपाशीर्वाद

ठेवले. सर्वजण खेळात रमले. त्या रम्य वातावरणाने कालीकिशोरला मोठा आनंद झाला होता. आपल्या मनाशी खेळत खेळत लहानगा कालीकिशोर तळ्यापाशी गेला. जिज्ञासू वृत्तीने आत डोकावले आणि........

अंदाज येण्याच्या आतच तो पाण्यात पडला. कालीकिशोर पडला हे कुणी पाहिले सुद्धा नाही. जो तो आपल्या नादात होता. पण दैवी सूत्रे बलवत्तर असतात. दुरून एका मनुष्याने पाहिले आणि धावतच येऊन पाण्यात उडी घातली. खरं म्हणजे दुरून येऊन, पाण्यात उडी टाकून कालीकिशोरला काढण्यास खूप वेळ लागला होता. त्या लहानग्या जीवाला पाण्यातून वर काढले आणि काठावर ठेऊन त्याचे अंग पुसले. शांत झोप लागावी तशी त्याची मुखचर्या होती.

आता सर्व बालगोपाळ गोळा झाले होते. सर्वांचा आनंद पार मावळला होता. सर्व मुले गंभीर मुद्रेने एकमेकांकडे टक लाऊन पाहात होती. हळूहळू पुटपुटत होती. ज्या मुलाने कालीकिशोरला कडेवरून आणले होते त्याचा चेहरा गोरामोरा झाला होता. तो अगदी रडण्याच्या बेतात होता. तेवढ्यात जवळच्या मनुष्याने सांगितले— "मुलाने डोळे उघडले. त्याला घरी घेऊन जा" मुलांना उत्साह आला. सर्वजण घोळक्याने कालीकिशोरला घेऊन त्याच्या घरी आले.

श्रीकृष्णाच्या खोड्या यशोदामातेला सांगाव्यात त्याप्रमाणे मुलांनी घडलेली हकीगत त्याच्या आईला सांगितली. 'काली' 'काली' म्हणत आईने मुलाला पोटाशी घट्ट धरले. त्याला खूप कुरवाळले. काली आपला आनंदात होता. सर्व काही पहात होता. जणू काही घडलेच नाही अशा निर्विकार मनाने पाहात होता.

खरोखरच मुलाचे तेज काही वेगळे होते. पण परिस्थिती वारंवार त्याला झाकून टाकत होती. इतक्या चुणचुणीत कुशाग्र बुद्धीच्या मुलाला गरिबीमुळे शिक्षण घेता आले नाही. जेमतेम इयत्ता सहावी पर्यंत शिक्षणाची मर्यादा गाठली. त्या लौकिक शिक्षणाला रामराम ठोकून नोकरीचा मार्ग धरावा लागला.

कालीकिशोरची विरक्त प्रवृत्ती होती. तो स्वतः शालेय शिक्षणात विशेष रस घेत नसे. अक्षर ओळख होऊन वाचता येऊ लागल्यापासून धार्मिक ग्रंथांचे वाचन तो मनापासून करी. याहीपेक्षा भगवद्‌भजनात तो लवकर तल्लीन होत असे. त्याला साधे राहणे आवडत असे. कपड्यांची हौस नव्हती. आहार लहानपणापासून छोटा होता.

धार्मिक ग्रंथांच्या वाचनाने बौद्धिक क्षेत्रात ज्ञानसाधनेच्या दृष्टीनें त्याची खूपच तयारी या लहान वयात झाली. वयाच्या ८ व्या वर्षी मुंज झाली आणि गायत्रीच्या उपासनेचा अधिकार प्राप्त झाला. या अधिकाराचा कालीकिशोरने पुरेपूर वापर केला. अत्यंत निष्ठेने आणि श्रद्धेने गायत्रीची खूप उपासना केली. मूळचे तेज या उपासनेने अधिक तेजाळले.

त्या काळात लग्न लवकर करण्याची पद्धत होती. आईवडील कालीकिशोरच्या लग्नासंबंधी विचारविनिमय करू लागले. ही कुणकुण कानावर पडताच त्याच्या मनात विरुद्ध विचारांचे बंड सुरू झाले. याचा परिणाम होऊन कालीकिशोर एके दिवशी अचानकपणे बाहेर पडला. घराबाहेर पडताना जवळ फक्त साडेसात आण्याची रक्कम होती. पण केवळ परमेश्वरावर भार टाकून– त्याच्याच प्राप्तीसाठी रिकामे रहावे– संन्यास घ्यावा– म्हणून घर सोडले.

घर सोडणे सोपे असते पण नंतरच्या यातनांना तोंड देऊन टिकून राहाणे फार कठीण असते. या काळात कालीकिशोरने फार पायपीट केली. उपाशीपोटी वणवण करीत भटकत राहिला. पूर्वबंगालमधील बारेसालपासून बरद्वानपर्यंत शेकडो मैल पायी प्रवास केला. वय विचाराल तर अवघे १२।१३ वर्षांचे ! हेतू पाहाल तर महान तपस्व्याचा ! अशा स्थितीत देवाचे भजन करावे आणि सारा शिणवटा घालवून टाकावा. भिक्षेवर उदरनिर्वाह झाला तर भिक्षा मागावी. नाही जमले तर प्रसंगी जमेल ती नोकरी करावी. सद्गुरुप्राप्तीसाठी खूप जिद्द धरली. पण तशी वेळ आली नव्हती.

पुरी तीन वर्षे अशा स्थितीत गेली. ना गुरूची भेट झाली, ना देवाचे दर्शन झाले. चित्ताला स्वस्थताच येईना. विचार करून करून कालीकिशोर थकला. शारीरिक कष्टांची तर मर्यादा ओलांडली. प्रतिकूल काळात स्वस्थ राहाणे उत्तम अशी मनाची समजूत घालून घरी परतण्याचा विचारी विचार कालीकिशोरच्या मनात आला. त्याने तीन वर्षांनी परत घरात पाऊल टाकले.

इकडे आईवडील संसार यातना सहन करीतच होते. दारिद्र्याशी झगडत होते. थोरला मुलगा घरातून निघून गेला तर धाकट्या मुलाला आणि मुलीला आपल्या घासातला घास देत होते. ते कुणालाच दोष देऊ शकत नव्हते. प्रारब्धाला आपणच जबाबदार असतो. त्यालासुद्धा दोष देता येत नाही. अशा उदास वातावरणात कालीकिशोर–थोरला मुलगा घरी परत आला.

सर्वांना हायसे वाटले. आनंद वाटला. सुखाचे वाटेकरी सर्वच होतात. दुःखाचा वाटा कुणीही घेत नाही. पण कालीकिशोर आला तो सर्वांचा दुःखाचा वाटा घेण्यासाठी. त्याच्या दुःखाचा वाटा कोणीही उचलू शकणार नव्हते. छोट्या बहीणभावंडांना 'दादा' आला म्हणून आनंद झाला. आईवडीलांना थोरला-कर्ता मुलगा आला म्हणून संतोष झाला. पण नाईलाजाने घरी आलेल्या कालीकिशोरला मात्र फार वाईट वाटत होते.

पुन्हा कालीकिशोरच्या लग्नाचा विषय सुरू झाला. तारिणीचरणांनी चंग बांधला. नवदुर्गादेवीने तर लग्न केलेच पाहिजे म्हणून हट्ट धरला. परिस्थितीने कालीकिशोरवर मात केली. इच्छा नसताना वयाच्या अठराव्या वर्षी कालीकिशोर विवाह-बद्ध झाला. सरोजिनी देवींचा पत्नी म्हणून स्वीकार केला. पारमार्थिक मार्गामध्ये संसाराच्या जबाबदारीची भर पडली.

कालीकिशोर संसारचक्रात सापडला. याला प्रारब्धाचा जोर म्हणतात. प्रारब्ध अटळ आहे. ते प्रभुरामचंद्राला टाळता आले नाही. ते नळराजाला टाळता आले नाही. ते युधिष्ठिराला टाळता आले नाही. प्रतिकारानेसुद्धा टळत नाही. प्रारब्धावर मात होते ती अप्रतिकाराने, त्याच्या उपेक्षेने, ते जसे असेल तसे सहन करण्याने! हीच ती तितिक्षा! या तितिक्षेच्या शस्त्राने ते पराभूत होते-निष्प्रभ होते.

मनाचा सारा कोंडमारा कालीकिशोर सहन करीत होता. असह्य वेदना सहन करीत होता. यातूनच तो घडत होता. योग्य आकार घेत होता. मन मारून एक एक विजयाचा टप्पा ओलांडीत होता. परमार्थाला संसार हे बंधन न मानता त्याच्या अनुभवाची-ज्ञान पक्के करण्याची प्रयोगशाळा मानली तर वाटचाल चांगली होते. अशीच वाटचाल कालीकिशोरची चालू होती. आता पुन्हा नोकरीची शोधाशोध सुरू केली.

एकदाची एका जमीनदाराकडे नोकरी लागली. पण थोड्या दिवसातच सुटली. नंतर चहाच्या मळ्यात नोकरी लागली. ती काही दिवस टिकली. कायम स्वरूपाची नोकरी मिळेना. तात्पुरत्या नोकरीची लटकती तरवार सदैव डोक्यावर टांगलेली.

पुढे तो नोकरीसाठी शेजारच्या गावी जाऊ लागला. करता करता त्याला

रेल्वेच्या ठेकेदाराकडे चांगली नोकरी लागली. पण प्रकृती बिघडली. आजारपणामुळे नोकरी सोडून गावी परतावे लागले. प्रकृती ठीक झाली. आता नोकरीसाठी कलकत्त्याला जावे असे वाटू लागले. त्याप्रमाणे वडिलांची संमती पण घेतली.

नोकरीच्या शोधात कालीकिशोर कलकत्त्यास आला. एका छापखान्यात नोकरी मिळाली. जप, जाप्य, पूजा, अनुष्ठान सतत चालू झाले. अध्यात्मिक पुस्तकांचे वाचन मनन तर चालूहोते. मन योगमार्गाकडे विशेष रुची घेऊ लागले. कर्ममार्गाचा संस्कार रोजच्या दिनक्रमात महत्त्वाचे स्थान घेऊन राहिला होता. संत–साधू–महात्मे यांची संगती जेथे जेथे मिळण्याची शक्यता होती तिकडे कालीकिशोरचे पाय चालू लागले. चार ठिकाणी गेल्याखेरीज चांगले वाईट ठरणार नव्हते. ब्राह्मसमाजाच्या सभेमध्येसुद्धा कालीकिशोर जाऊ लागले. या सर्व अनुभवातून एक गोष्ट जाणवू लागली की विलासपूर्ण जीवनातून ब्रह्मज्ञानाची प्राप्ती अशक्य आहे. ब्राह्मसमाजाकडे पाठ फिरवून ते सायंकाळी काली-घाटावर जाऊ लागले. तेथे साधूंची संगती मिळू लागली. प्रश्नोत्तरे होऊ लागली.

अशाच एका प्रसंगी कालीकिशोर योगसाधनेबद्दच चर्चा करीत होते. उत्तर देणारी व्यक्ती योगाभ्यासी होती. त्या व्यक्तीने सांगितले– "योगसाधना वाटते तेवढी सरळ–सोपी साधना नाही, त्यालासुद्धा त्यागाची आवश्यकता आहे. विषयांचा त्याग केल्याखेरीज का कोणाला योगी होता येईल ? योग-सिद्धीशिवाय ज्ञानप्राप्ती अशक्य आहे."

या उत्तराने कालीकिशोरच्या मनाला पुन्हा उपरती झाली. आपल्याला पुढे जायचे असेल तर त्याग केला पाहिजे. हे पाश तोडले पाहिजेत. पुन्हा विचार चक्राला गती मिळाली. विचारांना निश्चयाचे बळ आले आणि एके दिवशी काली-किशोरने नोकरी सोडली.

त्याने कलकत्त्याहून रेल्वेने वैद्यनाथधाम गाठले. योगसाधनेसाठी समर्थ गुरूची आवश्यकता वाटू लागली. गुरुशिवाय परमार्थ खोटा असतो हे पटले. वैद्यनाथधाममध्ये शक्य त्या सर्व साधूंच्या भेटी घेतल्या. चार दोन दिवस त्यांच्यामध्ये राहून शंका-समाधान होते का पाहिले. पण कुठेही समाधान झाले नाही. कोणी वेशभूषेने लोकांना प्रभावित करीत होते तर कोणी आपल्या वाक्चातुर्याने समाजाला भुलवीत होते.

यापेक्षा अधिक काही त्यांच्यात आढळले नाही. त्यामुळे कालीकिशोर त्यांच्यात रमू शकला नाही. आंतरिक ओढ खऱ्या, निर्मळ अध्यात्माकडे होती. तेव्हा अशा ढोंगी साधूच्या जाळ्यात तो अडकला नाही. त्याने तेथून आपला पाय काढता घेतला. आणि पुरुषोत्तम क्षेत्र गाठले. पुरुषोत्तम क्षेत्र म्हणजे जगन्नाथपुरी. जगन्नाथ-पुरीचा प्रवास पायीच केला. तीन दिवस चालून जगन्नाथपुरी गाठली. सद्गुरूप्राप्तीची तीव्र ओढ त्याला स्वस्थ बसवू शकत नव्हती. उपाशी पोटी पायी प्रवासाने कालीकिशोर थकून गेला होता. पुरीमध्ये पोहचला तेव्हा सायंकाळ झाली होती. जगन्नाथाच्या मंदिरातील आरतीची वाद्ये वाजू लागली होती. त्या वाद्यांच्या आवाजाने आणि सायंआरतीच्या वातावरणाने कालीकिशोरचे थकलेले शरीर टवटवले. कुठल्याशा आंतरिक चैतन्याने साथ दिली. देवदर्शन करून त्याने आरती-मध्ये स्वतःला सामील करून घेतले. ती रात्र त्याने त्या मंदिराच्या कुशीत काढली.

दुसऱ्या दिवसापासून कालीकिशोर सद्गुरुच्या शोधासाठी निघाला. जगन्नाथपुरीमध्ये साधूंचा तोटा कसला ?

जिकडे पाहाल तिकडे साधूच साधू. पण हे सगळे स्वतःचा हेतू साधणारे ! अशा पोटार्थी साधूंना कालीकिशोर कंटाळला होता. उबगला होता. आतामात्र घोर निराशेने कालीकिशोर खिन्न झाला होता तरी सद्गुरूप्राप्तीची उत्कंठा शिगेला पोहचलेली होती.

जगन्नाथपुरीमध्ये अनेकांच्या भेटीगाठीत कराली ब्रह्मचारी या तरुणाची गाठ पडली होती. त्याने कालीकिशोरची तळमळ पाहिली आणि एका झोपडीचा पत्ता दिला. कालीकिशोरने आग्रह धरला आणि कराली ब्रह्मचारी बरोबरच झोपडीकडे तो निघाला.

चंदन तलावाच्या काठाकाठाने ते चालले होते. गर्दी मागे पडत होती. पायवाट फुटली तेथून तर निवांत वातावरण सुरू झाले. शांत निसर्गरम्य वातावरणाने भगभगलेले डोके शांत होत होते. अस्वस्थ चित्ताला हूरूप येत होता. होता होता एका साध्या पर्णकुटीजवळ दोघे येऊन पोहचले. सारे वातावरण साधे, निर्मल व पवित्र होते. कुणाची ये जा नाही–गडबड नाही. अवडंबर नाही की झगझगाट नाही.

त्या प्रगाढ शांत वातावरणानेच कालीकिशोर शांत झाला. मनाला आतून ओढ लागली. झोपडीच्या दारात प्रवेश करताच समोर आसनस्थ मूर्ती दिसली. कालीकिशोर तेथेच थबकला. भगवी वस्त्रे परिधान केलेली शांत, गंभीर, प्रसन्न मूर्ती पाहून तो मंत्रमुग्ध झाला. आजपर्यंत चित्ताची जी अस्वस्थता होती ती, घड्याळाचे काटे थांबावेत तशी, एकदम नाहीशी झाली. त्यांनी सद्गुरुबद्दल एक कयास बांधला होता की ज्याच्या दर्शनाने चित्ताला शांतता येईल आणि ज्याच्याबद्दल मनातून आकर्षण वाटेल तो खरा सद्गुरु. त्याची आज प्रचीती आली.

एकाएकी अष्टसात्त्विक भाव जागृत झाले. आपण मुक्कामावर आलो याची तीव्र जाणीव होऊ लागली. आपण काय करीत आहोत हे कळण्याचे आत कालीकिशोरने चार दोन पावले झपाझप आत टाकली. साष्टांग नमस्कार श्रीगुरुदेवांच्या समोर घातला. श्रीगुरुदेवांनी बसण्यास हातानी खूण करून सांगितले. त्याप्रमाणे कालीकिशोर जवळच एका बाजूला बसला.

हे श्रीगुरुमहाराज म्हणजे प. प. श्रीगंगाधरतीर्थ स्वामीमहाराज होत. त्यांच्या केवळ दर्शनाने त्याच्या चित्ताला शांतता दिली. सत्पुरुषांचे दर्शन शीतलता देते. सत्पुरुषांचा सहवास स्वर्गसुखाचा अनुभव देतो त्यांचा परिसर तीर्थक्षेत्राचे स्थान होते. त्यांच्या वास्तव्याने ती भूमी सिद्धभूमी होते. तिथले पाणी चैतन्याला जीवन देते. तिथला वारा शक्तीला ऊर्ध्वगामिनी करतो. संतांचा सहवास दिव्य असतो. संतांचे दर्शन भव्य असते. संतांची वाणी अमृताचा वर्षाव असतो. अनंत जन्माचे कष्ट आणि क्लेश संतांच्या निमिषमात्र नेत्रकटाक्षाने शांत होतात. श्रीगुरुदेवांचे घर म्हणजे साधकाचे, शिष्याचे, भक्ताचे माहेर घर असते.

कालीकिशोरचे मन या विचारांनी भारावले गेले. मनात कुठलाही प्रश्न निर्माणच होत नव्हता. सारे कसे शांत शांत वाटत होते.

थोड्या वेळाने श्रीगुरुदेवांनी प्रश्न केला "मुक्काम आहे ना ?"

जणू बरेच दिवसांनी परगावाहून आलेल्या मुलाला वडिलांनी प्रश्न केला होता. आणि आपल्याच घरी आलेल्या मुलाने उत्तर दिले होते.

"हो आहे"

हाच ऋणानुबंध असतो. पहिल्याभेटीतच जन्मजन्मांतरीच्या खूणगाठी पटतात.

कालीकिशोरचा मुक्काम झाला. मनावरील मळभ नाहीसे झाले. वरवरच्या गोष्टींनी शिष्य संतुष्ट होतो का ? हे गुरुदेवांनी तपासून पाहिले. "तदेकं वद निश्चित्य" च्या श्रद्धेने कालीकिशोरने ठाण मांडले होते. एक महिना झाला तरी नेमकी वस्तू मिळेना. ती वस्तू येथूनच मिळणार ही खात्री, पण वेळ काही येईना.

एके दिवशी अचानक सारे काही जमून आले. कालीकिशोरने दीक्षेची प्रार्थना करण्यास आणि श्रीगुरुदेवांना ती पूर्ण करण्याची इच्छा होण्यास एकच गाठ पडली.

श्रीगुरुदेव म्हणाले "थांब तुला मी असे देतो की माझ्यासारखा होऊन जाशील."

इ. स. १८८६ अक्षय्यतृतीयेच्या पर्वकाली दीक्षा झाली. मंत्रसहीत दीक्षा झाली. साष्टांग नमस्कार करून डोळे मिटून कालीकिशोर श्रीगुरुदेवांचे समोर बसला तोच आतून जपाचे जोरात स्फुरण झाले. ज्ञानशक्तीचे संक्रमण झाल्याची प्रचीती येऊ लागली. आनंदाचे कल्लोळ उफाळू लागले. बराच काळ ही साधना चालू राहिली. श्रीगुरुदेवांनी डोळे उघडण्यास सांगितले. "चालू दे सर्व काही ! तुला ही जागृत शक्ती योग्य ठिकाणी नेईल"

कालीकिशोरची साधना श्रीगुरुदेवांच्या सन्निध सुरू झाली. प्रतिदिन साधनेचा वेग वाढत होता. साऱ्या जगाचे विस्मरण कालीकिशोरला झाले होते. मधून मधून गुरुशिष्य संवाद होत असे. त्यात एकदा कालीकिशोरने सांगून टाकले होते की "मला कोणी नाही. मी एकटा आहे" गुरुदेवांनी ऐकून घेतले, त्यावेळी ते काहीच बोलले नाहीत.

एक महिना होऊन गेला. हळूहळू साधन स्थिरावले. सूक्ष्म प्रक्रिया सुरू झाल्या. स्थूल अनुभव थांबले. तेव्हा गुरुदेव कालीकिशोरला म्हणाले.

"कालीकिशोर, तू आता घरी जा. तुला घर आहे. आई आहे. वडील आहेत. बायको पण आहे. पण तू माझ्यापासून हे सर्व लपवून ठेवलेस. मला खोटे सांगितलेस. असे खोटे बोलू नये. तो मोठा अपराध असतो. पण मी तुझा शुद्ध

हेतू पाहून क्षमा केली आहे. चिंता करू नकोस, घरी जा, संसार कर, आईवडिलांची सेवा कर. आपले कर्तव्य म्हणून संसाराची जबाबदारी सांभाळ. साधन चालू ठेव. सुप्त वासना त्रास देतात. साधनेत विक्षेप आणतात. साधन होऊ देत नाहीत. म्हणून संसार कर. वासनांचा क्षय त्या दाबून होत नाही. शास्त्राच्या आज्ञेप्रमाणे संयम ठेऊन त्यांचा उपभोग घेत घेत साधनेच्या सातत्याने त्या स्वतः नष्ट होतील. असे खूप समजावून सांगितले.

कालीकिशोरला घरी जाणे जिवावर आले. पण आता तेथे राहणे शक्य नव्हते. कारण प्रत्यक्ष गुरुदेवांनीच घरी जाण्यास सांगितले.

त्यांच्या सांगण्यात राग नव्हता. शिष्याच्या कल्याणाची इच्छा होती. कालीकिशोरनं मनाची समजूत घातली. मनाला मुरड घातली. गुरु आज्ञेचे पालन सर्वश्रेष्ठ मानले आणि एके दिवशी गुरुदेवांना साष्टांग नमस्कार करून त्यानें आश्रम सोडला.

जगन्नाथपुरीहून कटकच्या दिशेने कालीकिशोर निघाला. मध्यंतरी 'कण्ठेलू' नावाचे एक सुंदर गांव लागले. त्या गावाजवळून महानदी जात होती. नदीच्या किनाऱ्यावरचे छोटे, शांत, निसर्गरम्य गाव पाहून कालीकिशोरची चित्तवृत्ती पुन्हा अंतर्मुख झाली. शक्तीसंचाराची तीव्र अनुभूति होऊ लागली. त्या गावातून बाहेर पाय निघेना. नदीकाठी एका शिवालयाजवळ सुंदर गुहा होती तेथे मुक्काम केला. ती गुहा अत्यंत मोठी होती. तेथे एकांत होता. ती साफसूफ केली आणि तिन्ही त्रिकाळ साधना सुरू केली.

त्या ठिकाणी कल्पनातीत अद्भुत अनुभव कालीकिशोरला येऊ लागले. त्या अनुभवामुळे त्याची गुरुदेवावरची श्रद्धा अढळ झाली. आपल्याला श्रीगुरुमहाराजांनी अलौकिक दिव्य शक्ती दिली आहे, आपल्यावर फार मोठी कृपा केली आहे असा पूर्ण विश्वास बसला. साधनेमुळे त्याच्यामध्ये तेज निर्माण झाले. त्यांच्याकडे पाहाताच लोकांच्या मनात आदर निर्माण होऊ लागला. अपेक्षा नसताना लोक त्यांचेकडे येऊ लागले. होता होता 'कण्ठेलू' गावात कीर्तीचा सुगंध दरवळू लागला.

इकडे आठ नऊ महिने होऊन गेले तरी मुलाचा काहीच पत्ता नाही म्हणून आई – नवदुर्गादेवी काळजीत पडल्या. अनेक शंकाकुशंकांनी त्यांचे मन दुःखित

झाले. त्यांनी देवाची प्रार्थना केली. करुणा भाकली. म्हातारपणी पुत्रशोकाचे दुःख नको म्हणून विनवणी केली. आणि आश्चर्य असे की आईला एक स्वप्न पडले.

स्वप्नात कालीकिशोर 'कण्ठेल्ल' गावी आहे हे समजले. सकाळी आई पोस्ट-मास्तरांकडे गेली. कण्ठेल्ल गावाची माहिती विचारली आणि तेथील पोस्टमास्तरांना पत्र लिहिले. पत्रात मुलाचे वर्णन केले. स्वप्नात दिसलेल्या दृश्याचे वर्णन केले असा मुलगा आढळला तर त्याला त्याच्या आईचा निरोप सांगा– 'तुझी आई तुझ्या भेटीसाठी आतुर झाली आहे."

या पत्राप्रमाणे कण्ठेलुच्या पोस्टमास्तरांना कालीकिशोरांचा पत्ता लागला. त्यावेळी लोक त्यांना 'श्रीनारायणदेव' म्हणत होते. त्यांचेकडे कोणीही आले की ते 'नारायण' हा आशीर्वाद देत असत. सतत नारायण, 'नारायण' हा नामोच्चार करीत असत. स्वतःचे नाव गाव सांगत नसत. म्हणून लोक त्यांना 'श्रीनारायणदेव' म्हणू लागले. पोस्टमास्तरांनी त्यांना पत्राची हकीगत सांगितली. आईचा निरोप सांगितला. विश्वसूत्रकाराच्या हालचालींची जादू पाहून आश्चर्य वाटले. श्रीगुरुदेवांनी घरी जाण्यास सांगितले. आईचा निरोप आला. आता या ठिकाणी थांबणे योग्य नाही. असा विचार करून श्रीनारायणदेव घरी जाण्यास निघाले.

'कण्ठेल्ल' गावी एक महिना मुक्काम झाला. गावातील सर्वांचे ते एक श्रद्धास्थान होऊ लागले. पण विश्वनियंत्याची योजना वेगळी होती. एका दुकान-दाराने प्रवास खर्चासाठी दहा रुपये दिले. त्याकाळी दहा रुपये म्हणजे महादक्षिणा असे. गुरुकृपा अशी ठिकठिकाणी उभी राहते. अडचण कशी ती भासू देत नाही.

श्री नारायणतीर्थदेव घरी आले. आईचे दर्शन घेतले. पायावर डोके ठेवले. आईने डोक्यावरून पाठीवरून हात फिरवला. तिला धन्य धन्य वाटले. तिने सारी पुण्याई त्याला देऊन टाकली. कल्याण होईल म्हणून आशीर्वाद दिला. कुठे होतास इतके दिवस! मी किती वाट पाहात होते! तुला देवानेच घरी पाठविले म्हणून तू आलास हे खरे ना? श्रीनारायणदेव म्हणाले 'होय आई! तू म्हणतेस ते खरे आहे. मला देवानेच घरी पाठविले. संसार कर, आईवडिलांची सेवा कर, तुझे कल्याण होईल म्हणून आशीर्वाद पण दिला.' हे ऐकून आईचे डोळे आनंदाने पाणावले.

जवळच वृद्ध वडील बसले होते. आई-मुलाचा संवाद ते ऐकत होते. त्यांच्या

डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले. आपल्या पाठीशी देव आहे या विश्वासाने त्यांचे हृदय भरून आले. तेवढ्यातच मुलाने वडिलांच्या पायावर डोके ठेवले. सद्गदित कंठाने तारिणीचरणांनी सुद्धा मुलाला आशीर्वाद दिला "बेटा, कल्याण होईल."

बिचारी पत्नी हे दृश्य पाहून अवाकच झाली. हे घरी येतील असे तिला वाटतच नव्हते. यांची संसारांत बिलकूल ओढ नाही हे ती चांगली जाणून होती. म्हणून त्यांना पाहून तिचा आपल्या डोळ्यावर विश्वासच बसेना. आज ती आपल्या पतिदेवांना आठ नऊ महिन्यांनी भेटत होती. तिलाही आनंद झाला. आईजवळ मुलाने जे सांगितले ते तिने ऐकले होते. "संसार कर" ही गुरूची आज्ञा झाली तेव्हा हे घरी आले हे तिने ताडले. सरोजिनीदेवींना फार बरे वाटले, हायसे झाले.

श्रीनारायणदेवांचे बाह्यतः सांसारिक जीवन सुरू झाले. नोकरी मिळण्यास फार कालावधी लागला नाही. गुरुकृपेमुळे सर्वत्र सुलभता येऊ लागली. एका जमीन-दाराकडे नोकरी मिळाली. रुपये आठ दरमहाचा पगार ठरला. दिवस स्वस्ताईचे होते हे खरे, पण फक्त आठ रुपयात अन्नवस्त्राची जेमतेम सोय भागणार होती. यापेक्षा अधिक समाधान स्वास्थ्य मात्र त्यातून मिळणे शक्य नव्हते. या पद्धतीमध्ये बसेल असा संसार सुरू झाला.

आंतरिक संसार मात्र फारच सुरळीत सुरू झाला. प्रतिदिन साधनेतून अध्यात्माचे धडे घेतले जात होते आणि नित्याच्या संसारात ते उतरविण्याचे प्रयत्न सुरू झाले होते. सात्त्विक गुणसंपदा कणाकणाने समृद्ध होत चालली होती. सर्व कसे मुक्या मनाने पण ठाम निश्चयाने चालले होते. गुरुकृपेने त्याला सहजता आली होती. साधनेत जे कळत होते ते संसारात वळत होते. खरे अध्यात्म घडत होते. बाह्यतः प्रवृत्ती दिसत होती पण अंतर्यामी पूर्ण निवृत्ती बाणत होती. अनेक दिव्य दर्शने साधनेतून होत होती.

होता होता इ. स. १८९७ मध्ये एक मोठी आपत्ती त्यांच्यावर आली. त्यांचे वडील श्रीतारिणीचरण गंगोपाध्याय यांची जीवनमर्यादा संपली. कुटुंबाचा सारा भार श्रीनारायणदेव यांचे एकट्यावर येऊन पडला. अशा अवस्थेत येथे राहाण्यापेक्षा ग्रामान्तर करावे व चांगली नोकरी मिळवावी म्हणून ते फरीदपूर जिल्ह्यात गुसाईघाट तालुक्यातील विनटिया गावी आले. तेथे एका जमीनदाराकडे त्यांनी नोकरी पत्करली.

याप्रमाणे ग्रामान्तर केले. बरोबर आई, बहीण, छोटा भाऊ असा परिवार घेतला आणि विटनिया गावी येऊन स्थायिक झाले.

श्री. कालीकिशोर यांच्यावर पितृवियोगाची आपत्ती वयाच्या २७ व्या वर्षी कोसळली. कालीकिशोर थोरले म्हणून संसाराची जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडली ज्यांचे मन संसारात कधीच रमले नाही त्यांना ही एक मोठी शिक्षाच होती.

संसारात दुःखांना कधी तोटाच नसतो. पावलोपावली दुःखाचे काटे पसरलेले असतात. संसारपथातून कुठेही आणि कसेही पाऊल टाका काटा हा टोचणाराच हा अनुभव सर्व जगाचा आहे आणि प्रत्येक जीवाचा पण आहे. तरीसुद्धा सुखाच्या मागे लागलेला बिचारा जीव भोळ्या आशेने, त्या संसारामध्येच सुखाचा ठाव घेण्यासाठी आपला पाय खोल रोवत असतो. लोण्यासारख्या मऊ चिखलात पाय खाली जाताना पायाला गुदगुल्या होतात. पण तोच पाय वर काढताना मृत्यूचे दुःख होते. असे असले तरी जीवाला क्षणिक सुखाचा मोह होतो आणि त्याला भुरळ पडते नि पाय खोल रोवण्याचा लोभ सुटतो.

महापुरुषांचे मात्र यापेक्षा वेगळे असते. ते नाईलाज म्हणून कमीत कमी पाऊल चिखलात रोवतात. मायेचा ओलावा कमी करून टणक जागेचा आधार घेतात आणि चिखलात राहूनही त्यापासून स्वतःला अलिप्त ठेवतात. म्हणून महापुरुष संसार करताना दिसले तरी त्यात रमताना दिसणार नाहीत. त्याना संसार नको असतो. संसारच त्यांच्या मागे लागलेला असतो. असा हा मागे लागलेला संसार करूनही ते महापुरुष आपली महानता प्रतीक्षणी सिद्ध करीत असतात. आपली संसारामधील अलिप्तता स्पष्टपणे दाखवून देत असतात. म्हणून ते महान असतात. वेगळे असतात.

कालीकिशोरांना संसार नको होता. अगदी मनापासून नको होता. म्हणूनच त्यांनी संसार सोडून जाण्याचा दोनदा प्रयत्न केला होता. पण संसार सोडून सुटत नसतो. तो स्वतःच सुटावा लागतो. आपल्या मागे संसार न लागण्याची स्थिती म्हणजे संसारातून सुटका. पण हेच तर प्रारब्ध आहे. आपण टाळून ते टळत नसते. कालीकिशोरांना लग्न करणे भाग पडलेच पण पितृवियोगाची एक मोठी आपत्ती अकाली येऊन पडली. एवढ्याने त्यांच्यावरील संकटपरंपरा थांबली नाही. त्यांची कसोटी

संसारातील दुःखाच्या मालिकेत दारिद्र्य हा मेरुमणी आहे. दारिद्र्याचे दुःख मरणप्राय असते. याचना करण्याची दुर्धर पाळी दारिद्र्यामुळे येते. अनन्वित यातना देण्याचे दारिद्र्य हे उगमस्थान असते. असे हे महाभयंकर दुःख कालीकिशोरांच्या प्रारब्धाच्या झोळीत पडले होते.

पण (ते बिचारे दारिद्र्य) त्यांच्या झोळीत पडले म्हणून दीन झाले होते. कारण प्रारब्धाची झोळी काखेत दाबूनच कालीकिशोर विनिटिया गावी आले होते. तेथे त्यांना एका जमीनदाराकडे नोकरी लागली.

विनिटिया हे गाव पूर्वबंगालमध्ये ढाका जिल्ह्यात आहे. हे एक शांत, निवान्त खेडे होते. तेथे व्यापार किंवा अन्य उलाढालींची गडबड नव्हती. निसर्गही रम्य होता. कालीकिशोरांच्या शांत प्रवृत्तीला हे रम्य ठिकाण पसंत पडले. साधनेला अनुकूल व पोषक स्थान पाहून त्यांनी आपला संसार तेथे मांडला. नोकरी सुरू झाली. साधनाही सुरू झाली. संसार दुःखावर मात करणारी महाशक्ती प्रतिदिन वाढू लागली. मागे लागलेल्या संसारातही ते उदासपणे रस घेऊ लागले.

कालीकिशोरांनीं कालीमातेची सुंदर तसबीर मिळविली. आपल्या छोट्या घरातील साधन स्थानामध्ये तिची स्थापना केली. नित्याच्या साधनेप्रमाणे गृहदेवतांचे पूजनाबरोबर कालीच्या तसबिरीचेही पूजन होऊ लागले. जपजाप्य सुरू झाले. भजन-पठण चालू झाले. या अनुष्ठानामध्यें वृत्ती आत जाऊ लागल्या की डोळे आपोआप मिटले जात नि दिव्य साधन सुरू होई. मग बाह्यतः सुरू केलेले जप-जाप्य कमीअधीक होई तर कधी बंदही पडे. गुरुमंत्राचा जोर वाढू लागला की शारीरिक क्रियांना जोर चढे. कधी शांत बसून राहात. डोळे उघडले की सुरू केलेली पूजा जिथे थांबली असेल तेथून पुढे चालू होई. पुन्हा आत्मरंगात मन शिरले की सुरू केलेली पूजा तिथेच थांबे. काही वेळ साधन होई. काही वेळ पूजा होई. अशा क्रमाने तासन् तास या कार्यक्रमात जाऊ लागले. साधनेच्या अनुभवाने ते आनंदून जात तर भजनाने सारे घर आनंदून जात असे.

त्यांचा दिनक्रम फार छोटा होता. सोपा होता. साधन—नोकरी आणि साधन हाच दिनक्रम. विनिटियामध्ये कालीकिशोर अकरा वर्षे राहिले. जवळजवळ तपाच्या या काळात त्यांचे खूपच तपानुष्ठान झाले. श्रीमत्‌भगवत् गीतेचे असंख्य पाठ झाले.

इष्ट मंत्राचा कित्येक लाख जप झाला. उपनिषदांचे वाचन झाले. गीतेवरील भाष्ये, योगशास्त्रावरील ग्रंथ, योगवासिष्ठ इत्यादि अनेक श्रेष्ठ धार्मिक ग्रंथांचे अध्ययन मननपूर्वक झाले. स्नान, संध्या, पूजादि नित्य धार्मिक कर्म अव्याहतपणे श्रद्धेने घडत गेले. श्रीगुरुदेवांची मानसपूजा मोठ्या भक्तीने निरंतर होत आली. त्यांना आपल्या गुरुदेवांचे–प. प. श्रीगंगाधरतीर्थ स्वामी महाराजांचे–चित्र (फोटो) उपलब्ध झाले नाही म्हणून शक्तिस्वरूप श्रीगुरुदेव आणि कालीमाता एकच या श्रद्धेने त्यांनी कालीची तसबीर घेतली होती. तिचा नित्य पूजेत अंतर्भाव केला होता.

असा हा सारा अनुष्ठानसंपन्न काल होता. त्यांनी या अनुष्ठानाची वाच्यता कधीही कुणाजवळ केली नाही. कालीकिशोर आपल्या उजव्या हाताने केलेले पुण्य डाव्या हातालाही कळू देत नसत. यामुळे पुण्याईला तेज चढत होते. उपासनेचे सामर्थ्य वाढत होते. ही खरी अध्यात्मसंपन्नता होती. प्रथम आचार हेच खऱ्या अध्यात्माचे मुख्य लक्षण असते.

कालीकिशोरांच्या या संयमी वृत्तीमुळे त्यांना समाजात लोक फारसे ओळखत नसत. एक धार्मिक वृत्तीचा सरळ माणूस, एवढाच त्यांचा परिचय समाजाला होता. धार्मिक वृत्तीच्या माणसांना मात्र मनातून त्यांच्याबद्दल आदर असे. विशेषत: कालीकिशोर ज्या जमीन मालकाकडे नोकरीस होते त्याला त्यांच्याबद्दल फार आदर होता. कारण तो जमीनमालक धार्मिक वृत्तीचा, सात्त्विक व सज्जन मनुष्य होता. त्याने कालीकिशोरांना शक्य तेवढे साहाय्य केले व सवलत दिली. यासाठी या ठिकाणाहून स्थलांतर करण्याचा विचार कालीकिशोरांच्या मनात आला नाही.

जमीनमालकाचा गैरफायदा कालीकिशोरांनी कधीही घेतला नाही. ते स्वत: अत्यंत नियमित व शिस्तशीर पद्धतीने वागणारे होते. या बाबतीत ते कडकही होत असत. या दोन गुणांच्या जोरावर त्यांनी या अकरा वर्षांत नोकरी संभाळून अनेक अनुष्ठाने यथासांग पूर्ण केली.

कालीकिशोरांच्या या पद्धतीच्या दिनक्रमात यशस्वी होण्यात खरे साहाय्य झाले ते त्यांच्या धर्मपत्नीचे. सौभाग्यवती सरोजिनीदेवी या स्वत: धार्मिक वृत्तीच्या, विनयसंपन्न व पतिप्रवृत्तींना अनुकूल स्वभावाच्या होत्या. पतिदेवांच्या अनुष्ठानामध्ये त्यांनी आपली जबाबदारी स्वत: संभाळली. बाजारहाट करण्यापासून सर्व व्यवहार

कुशलतेने संभाळले. कालीकिशोरांना तिकडे लक्ष घालण्यास सवडच नसे. सरोजिनीदेवी केवळ संसार संभाळून पतिसेवा उत्तम प्रकारे करून थांबल्या नाहीत तर त्यांनीही आपणास शक्य ती व्रते, जप, नियम पतिदेवांच्या संमतीने पार पाडली. खरोखर त्या सहधर्मचारिणी होत्या. त्यांचा आचार व सेवाव्रतधारिणी जीवन भारतीय संस्कृतीचे लेणेच ठरले आहे.

अशा प्रकारच्या जीवनाचा परिपाक उभयतांच्या धार्मिक वृत्ती पूर्णपणे विकसित होण्यात झाला. श्रद्धा आणि भक्ती शिगेला पोहचली. संसारिक अडीअडणींची विस्मृती होऊ लागली. थोडक्या थोडक्यात संसाराच्या गरजा भागू लागल्या. परमार्थाचा आनंद वाढत वाढत चालला. संसारही सुखाचा वाटू लागला. आपल्या तपश्चर्येला परमेश्वराच्या भेटीचे व अनुभूतीचे फळ अजून लागले नाही म्हणून हुरहूर सुरू झाली. या हुरहुरीमधून भक्ती व श्रद्धेला अधीरता आली. प्रेमाला देवदर्शनाची ओढ लागली. नित्यक्रमाला भक्तीरसाने न्हाऊन टाकले. उपासनेची दृढता वाढली.

**सिद्ध साधनेची परिणती :-**

कालीकिशोर यांना इ. स. १८८६ च्या वैशाख मासातील अक्षय्यतृतीयेला-शुक्रवारी श्रीगुरुकृपेचा अनुग्रह झाला. श्रीगुरुदेव प. प. श्रीगंगाधरतीर्थस्वामीमहाराज यांनी शक्तिपात दीक्षा दिली. त्या क्षणापासून जागृत झालेल्या भगवती कुंडलिनी शक्तिमातेचे कार्य सुरू झाले.

तिचे कार्य केवळ 'स्वसंवेद्य' आहे. ज्याचा अनुभव त्याला. इतरांना त्या अनुभवांचा तसा उपयोग नाही. परंतु शक्तिमातेचे कार्य स्वतःला जाणवत असल्याने जीवाला त्याची गोडी लागू लागते. शक्तीच्या क्रिया मनाला व शरीरालाही सुख व आनंद देत असतात. मग जीवाची प्रवृत्ती तिकडे अधिकाधिक वळू लागते. साधन वाढते. अनुसंधानही वाढते. मनावर या अंतर्गत क्रियांचा प्रभाव पडतो. मनाला गोडी लागली म्हणजे मनाचा तिथे लय होऊ लागतो.

पण चंचल व आसक्त मन हा मार्ग अखंडपणे पसंत करीत नाही. पूर्व-प्रारब्धानुसार त्याच्या वासना त्याला निरनिराळ्या बाह्य संसारिक गोष्टींकडे खेचून नेत असतात. शक्तिपात दीक्षा घेतलेले साधक प्रारंभी दृढनिश्चयी असतीलच अशी खात्री नाही. हठयोगी साधकांचा निश्चय येथे नसतो. यांची इच्छा आणि पूर्वपुण्याई

यामुळे हे साधन त्यांना प्राप्त होते. म्हणून वासनांवर नियंत्रण ठेवून साधना करणारे फारसे नसतात. जे असतात त्यांची साधना तीव्र असते. इतरांची साधन-तीव्रता व यमनियमादि नियंत्रण जसजसे वाढेल, तसतशी वाढत जाते. ही उत्तम स्थिती आणण्यासाठी जागृत झालेली शक्ती सतत कार्यरत असते. आवश्यक ते धक्के, आवश्यक ती परिस्थिती आणि परिवर्तन घडवून आणते. मन पूर्ण अंतर्मुख करण्याचा तिचा अखंड प्रयत्न असतो. जीवाच्या पूर्वस्थितीप्रमाणे कमी जास्त वेळ लागेल एवढा भाग शिल्लक राहातो.

असे आहे म्हणून सिद्ध हे साधन आहे. सर्वोत्तम व सर्वश्रेष्ठ साधन आहे. सर्व साधनपंथांचा राजा आहे. पंथराज आहे, मोक्षश्रीच्या सिंहासनावर निश्चितपणे व बिनधोकपणे नेऊन ठेवणारे हे साधन श्रीगुरुदेवांच्या कृपेने अर्थात समर्थ सद्‌गुरूंच्या कृपेनेच सुरक्षित होते. राखीव जागेप्रमाणे निश्चित होते. असे हे साधन घेऊन कालीकिशोर धन्य झाले होते.

लौकिकदृष्ट्या त्यांचे जीवन धकाधकीचे, अस्थिरतेचे दिसत असले व आर्थिक ओढाताण पाहाणाऱ्यांना जाणवत असली तरी अध्यात्माच्या अंतरंगातून पाहाता मात्र योग्य तेच घडत होते. त्याला अनुकूलच होत होते. सध्याची स्थिती या कालावधीचा परिपाक होता.

तो कोजागिरी पौर्णिमेचा दिवस होता. कलेकलेने वाढत आलेल्या चंद्राचा तो दिवस होता. आपल्या जागृत भक्ताला सर्वस्व देऊन कृतार्थ करणाऱ्या आदिमाता भगवतीच्या कृपेचा दिवस होता. कालीकिशोरांना कालीमातेने आज साक्षात् दर्शन देऊन समाधीसुखाचा प्रत्यक्ष अनुभव दिला. आज ते कृतकृत्य झाले !

त्या दिवशी असे झाले की तसे पूर्वी कधी झालेच नव्हते. नित्याप्रमाणे सायंसंध्या, पूजा इत्यादि झाले. आरती होऊन मंत्रपुष्पांजली सुरू झाल्याबरोबर कालीकिशोर यांचा शक्तिसंचार अनिवार सुरू झाला. साऱ्या शरीराला अतिशय जोराचा कंप सुरू झाला. थोड्याच वेळात बाह्य जाणीव नष्ट झाली आणि ते जमिनीवर धाडकन् कोस-ळले. अन्तःशुद्धी असल्याने अत्यंतिक सुखाचा अनुभव त्यांना होत होता. चेहऱ्यावरील प्रसन्न हास्य व तेजस्वीपणा यावरून हे स्पष्ट होत होते. परंतु त्यांच्या निश्चेष्टपणामुळे त्यांची बहीण फार घाबरली. तिला भलतीच शंका वाटू लागली. तिच्या अंगाला

कापरे सुटले. आपला भाऊ आपल्याला सोडून गेला या भीतीने तिने त्याचा हात हातात घेतला. तो अचेतन, मलूल व नाडी चालू नसलेला असा जाणवला. नाकापाशी हात नेऊन पाहिले तो तेथेही काही हालचाल व श्वासोच्छ्वास जाणवेना. अक्षरशः ती आवाक् झाली. पण थोड्याच वेळात कालीकिशोरांनी शांतपणे डोळे उघडले. शरीर शुद्धीवर आले पण ग्लानी मात्र गेली नव्हती. आपण आपल्या बहिणीच्या मांडीवर पडलो आहोत हे त्यांच्या लक्षात आले.

कालीकिशोरांची ही स्थिती पाहून बहिणीला हायसे वाटले. पण हे काय झाले हे तिला समजले नाही. थोड्या वेळाने तिने यासंबंधी आपल्या भावाला विचारले. त्यांनी सांगितले शास्त्रोक्त प्राणायामाचा परिणाम असेल. खरी स्थिती अनिर्वचनीय आणि अनाकलनीय होती. त्यांची भावावस्था पूर्णपणे उतरलेली नव्हती. त्यांच्या मुखातून "आई!" "आई!!" हे शब्द वारंवार येत होते. आवरता न येणारे हुंदके व अश्रू उसळून उसळून बाहेर पडत होते.

तो संपूर्ण दिवस व ती रात्र अशा भावावेशात चालली होती. तऱ्हेतऱ्हेच्या क्रिया होत होत्या. सारे काही समजत होते पण आवरता येत नव्हते. त्या स्थितीत ते म्हणत होते "आई! मला रस्ता दाखव! आई! मला रस्ता दाखव!! मी कोण आहे? मी कुठे आहे? आई मला काही कळत नाही! समजत नाही!! माझे कल्याण कशात आहे? हे तू सांग आई! आई!!"

अशा करुण प्रार्थनेनंतर कालीकिशोर ओक्साबोक्शी रडू लागले. त्यांचे ते रडणे पाहून घरातील सगळ्या मंडळींना काही सुचेनासे झाले. सर्वजण त्यांच्या-बरोबर मोठमोठ्यांदा रडू लागले. सर्वांना कारुण्यभावाने भारावून टाकले. या अश्रुजलांनी सर्वांची चित्तशुद्धी होत होती. विक्षेपादि मलाचे आवरण स्वच्छ धुतले जात होते. प्रतिक्षणी ते आत्मस्वरुपाच्या जवळ जवळ जात होते. भाव शुद्ध झाला म्हणजे देव दूर नसतो. तसे होत चालले होते.

रडता रडता कालीकिशोर एकदम स्तब्ध झाले. त्यांची पुन्हा तंद्री लागली आणि दिव्य ज्योतीच्या स्वरूपात भगवती शक्तीमातेचे स्पष्ट दर्शन झाले. त्या दर्शनाने परम संतोष नि प्रगाढ गांभीर्य त्यांच्या मुखमंडलावर चमकू लागले. भगवती शक्ती-मातेने आश्वासन दिले, "मनात कुठलीही भीति किंवा शंका ठेऊ नकोस. तुझे

कल्याणच होणार आहे." या अनुभवाने कालीकिशोर निःशंक व निश्चित झाले. त्यांचा आत्मविश्वास दृढ झाला. ते क्रियांच्या बाबतीत निर्भय झाले. त्यांचा उत्साह शतगुणीत झाला.

याच वेळी त्यांना आपल्या गुरुदेवांची अति तीव्र आठवण झाली. त्यांची कृपा होऊन आज १९ वर्षे ६ महिने आणि १३ दिवस पूर्ण झाले. वयाच्या अवघ्या १९ व्या वर्षी गुरुदेवांनी आपल्यावर अनंत कृपेचा वर्षाव केला. "ही जागृत शक्ती तुला योग्य ठिकाणी नेईल." हे गुरुदेवांचे वाक्य पुन्हा पुन्हा स्मरू लागले. आज आपला ३८ वा वर्धापन दिन गुरुकृपेने मंगल केला. श्रीगुरुदेवांच्या तीव्र स्मरणाने ते पुन्हा अस्वस्थ झाले आणि त्यांनी गुरुदेवांना पत्र लिहिले. "विश्वसूत्रधारक श्रीगुरुदेवांना अनंत साष्टांग नमस्कार. आपल्या कृपेने सर्व काही उत्तम आहे. आपल्या आशीर्वादाचा रोज अनुभव घेत आहे. आज तर ज्योतीस्वरूपात भगवती शक्ति-मातेने दर्शन दिले. आपण दिलेला आशीर्वाद आईने स्वमुखाने दिला. आजच्या दिव्य अनुभवाने मला आपल्या दर्शनाची फार फार ओढ लागली आहे. कृपा करून दर्शनाची आज्ञा व्हावी म्हणजे लगेच निघून येतो.

ही नम्र प्रार्थना.

आपला कृपाश्रित
कालीकिशोर

१९०८ मधील ही घटना. कालीकिशोर ज्या उत्तराची वाट पहात होते त्या अपेक्षेचे पत्र आले नाही. अन्य व्यक्तीकडून आलेल्या पत्रोत्तरात श्रीगुरुदेवांच्या निर्वाणाची बातमी फक्त आली होती. यापेक्षा अधिक मजकूर त्यात नव्हता. कालीकिशोरांना काय वाटले असेल हे सांगणे शब्दमर्यादेच्या बाहेरचे आहे.

त्या दिवसाच्या अनुभवाने कालीकिशोरांच्या चित्तवृत्तीमध्ये आमूलाग्र बदल झाला. ते मनाने आनंदीत झाले होते. शोक, मोह, भय, शंका इत्यादींचा पूर्ण लोप झाला होता.

या सप्ताहात तर त्यांना दिव्य दिव्य अनुभव येऊ लागले. एकदा प्रत्यक्ष श्रीगुरुदेव – श्रीगंगाधरतीर्थ स्वामी महाराज – सूक्ष्म स्वरूपात त्यांचे पुढे आले आणि ईशान्य कोपऱ्याकडे बोट करून तिकडे पहा म्हणून सुचविले (ईशान्य दिशा ही शिवस्थानाची दिशा मानली जाते.) कालीकिशोरने ईशान्य दिशेकडे दृष्टी वळविली

तोंच त्यांना ज्योतिर्मयी देवीचे दर्शन झाले. देवीला पहाताच आई! आई!! असे ओरडत ते देवीकडे गेले आणि देवी मातेचे स्तनपान करू लागले. या अनुभवापासून त्यांचे कालभय नाहीसे झाले. आपल्या अमरत्वाची जाणीव पक्की झाली.

असा आणखी एक अनुभव याच काळात कालीकिशोरांना आला. अलिकडे त्यांची साधनअवस्था दिवसरात्र टिकून राहात असे. एका मध्यरात्रीचे वेळी त्यांना कालीमातेच्या मूर्तीची पूजा करण्याची इच्छा झाली. त्याप्रमाणे ते पूजा करू लागले. ती मूर्ती घेऊन तिला स्नान घालू लागले तोंच त्या मूर्तीमध्ये तेज येऊ लागले. ती मूर्ती तेजाने चमकू लागली. विद्युत्शलाकांनी मागची प्रभावळही चमकू लागली. हे दृश्य इतरांनीही पाहिले.

या अनुभवाने हे सिद्ध केले की कालीकिशोरांच्यामध्ये शक्ती संक्रमण करण्याची व दीक्षा देण्याची स्थिती उत्पन्न झाली आहे. अनुभव आला म्हणून त्यांनी कोणाला दीक्षा देण्याची घाई केली नाही. त्यांना गुरु होण्याची लालसा नव्हती. पण गुरुदेवांच्या आशीर्वादाची प्रचीती मात्र क्रमाक्रमाने येत होती.

एकापेक्षा एक दिव्य व श्रेष्ठ अनुभवांमुळे कालीकिशोरांना आपल्या श्रीगुरुदेवांच्या महान सामर्थ्याची जाणीव होऊ लागली. वरवर लौकिक जीवनाच्या वेष्टनामध्ये सामान्य दिसणारे, पण खरे पाहता अलौकिक जीवन, आपल्या गुरुदेवांचे होते. या आठवणीने त्यांच्या भक्तिप्रेमाची गंगा, दुथडी भरून वाहू लागे. त्यांनी दिलेला मोलाचा उपदेश त्यांच्या समोर येऊ लागे. कानामध्ये गुरुदेवांचे शब्द पुन्हा ऐकू येऊ लागत.

"कालीकिशोर! तुला घरी पाठविण्यात माझा आणखी एक हेतू आहे. भूलोकावर धर्माची उन्नती करण्याची जबाबदारी तुझ्यावरही थोड्याफार प्रमाणात आहे. ही ब्रह्मज्ञानप्राप्तीची दीक्षा, असाधारण दीक्षा असून, मी तुला ती दिलेली आहे. तुझ्या हातात दिलेला तो एक दिव्य स्फुलिंग आहे. त्या दिव्य स्फुलिंगाचा प्रकाश तुझ्याकडून भारतभर पसरविला जाणार आहे. पण योग्य वेळी हे कार्य घडून येणार आहे. त्यासाठी तुला तुझ्याकडे धार्मिक नेतृत्व किंवा साधनगुरुत्व घेण्याची अभिलाषा ठेवण्याचे कारण नाही. हे घडणार आहे. तुला त्याचा अनुभव येणार आहे. एवढे लक्षात ठेवून अनुसंधानपूर्वक साधनरत राहा म्हणजे झाले...........

गुरुतत्त्वाच्या ठिकाणी लीनत्त्व घेण्याने तुला फार मोठा लाभ होणार आहे." कालीकिशोरने हेच शब्द पूर्वी ऐकले होते. पण त्या शब्दाच्या प्रचिती-नंतरचे शब्द पुन्हा ऐकताना शरीर रोमांचित होत होते. मन पुलकित होत होते. श्रद्धा अचल होत होती. गुरुदेवांचे शब्द सार्थ करण्याची प्रेरणा कालीकिशोरला होऊ लागली. आपण निमित्तमात्र आहोत. आपलेकडून गुरुदेवच सर्व करून घेणार आहेत. आपले कर्तव्य आपण केले पाहिजे. तीच गुरुसेवा आहे. तीच गुरूची आज्ञा आहे. असे त्यांना मनापासून वाटू लागले.

यानंतर लगेच एक शुभ दिवस त्यांनी पाहून ठेवला. आपल्या पत्नीला, बहिणीला आणि छोट्या भावाला सर्वकाही समजावून सांगितले. त्यांना स्नानादि करण्यास सांगितले. कालीमातेची पूजा करून पुष्पमाला अर्पण करण्यास सांगितले. श्रीफल दक्षिणा म्हणून समर्पण केले. प्रत्येकाला आपापल्या आसनावर बसण्यास सांगितले. प्रत्येकाने जाणीव ठेवून मोठया श्रद्धेने कालीकिशोरांना साष्टांग नमस्कार केला. आजपासून सर्वांचे सद्‌गुरु ते होणार होते. पहिल्या नात्यापेक्षा फार मोठे जन्म-जन्माचे नाते आज निर्माण होणार होते. "प्रपंचाच्या चक्रामधून पार करणारे आपले पती किंवा भाऊ आता आपल्याला भवसागरातून पण पार करणारे गुरुमहाराज होणार आहेत," या सश्रद्ध विचारात ते आपापल्या आसनावर बसले.

"डोळे बंद करा." हे वाक्य कालीकिशोरांच्या तोंडातून केव्हा बाहेर पडले हे कळेपर्यंत डोळे मिटले गेले होते. कालीकिशोरांच्या श्वासोछ्वासाच्या क्रियांचा वेग वाढला. प्रत्येकाच्या मस्तकावर उछ्वासाच्या मंगल धारा कोसळत होत्या. त्याबरोबर दिव्य आनंदाचे कल्लोळ उसळत होते. सारे घर शक्तीसंचारित होऊन सिद्धस्थान झाले. याप्रमाणे गुरुदेवांच्या कार्याचा श्रीगणेशा इ. स. १९१० मध्ये झाला.

यानंतर दोन वर्षात त्यांचे काही शिष्य व भक्त वाढत चाललेले पाहून त्यांना एक प्रेरणा होऊ लागली. आपण आपल्या आईचे मंदिर तिच्या स्मशानभूमीत करावे असे त्यांना सारखे वाटू लागले. तसा त्यांनी संकल्प केला आणि मंदिर उभारण्याचे काम आपल्या हातांनी सुरू केले. आपल्या गुरुदेवांच्या हातांचा स्पर्श या कार्याला लागलेला पाहाताच अनेक भक्तांनी सक्रीय साहाय्य सुरू केले. पाहाता पाहाता अनेकांच्या करकमलातून मातेचे एक सुंदर मंदिर निर्माण झाले. मंदिरावर

छत उभारले गेले. कालीमातेच्या मूर्तीची स्थापना पण झाली. भंडारा झाला. अन्नदान झाले.

या मंदिरात कालीकिशोर स्वतः एकटे राहू लागले. या काळात त्यांच्या शरीरावर कमीत कमी कपडा असे. ते बहुतेक उघड्या शरीरानेच राहात. क्वचित् दिसलाच तर फाटकातुटका असावयाचा. वैराग्याचा अग्नी आतून प्रज्वलित होत होता. स्मशानप्रिय व भस्मधारी शिवाच्या स्वरुपाची स्थिती ते अनुभवीत होते. "चिदानंदरूप शिवः केवलोऽहम्" या मस्तीचा आनंद ते लुटीत होते. त्यांची भव्यकाय प्रकृती सर्वांना मोहवीत होती पण तीच त्यांची दासी झाली होती.

या मंदिरात असतानाच त्यांना एकदा अशी इच्छा झाली की आपले जानवे आणि शेंडी कालीमातेच्या चरणावर अर्पण करून भगवी वस्त्रे धारण करावीत. त्यांनी ताबडतोब तसे केले आणि नंतर विधीवत् संन्यास ग्रहण करून ते श्रीमत् स्वामीनारायणतीर्थ देव झाले. याप्रमाणे गुरुदेव श्रीमत्स्वामी गंगाधरतीर्थ महाराजांच्या आशीर्वादाप्रमाणे संन्यास होण्यापर्यंत स्थिती आली.

या मंदिराबरोबरच श्रीमत् स्वामी नारायणतीर्थ देव महाराजांचा परिचय आसपासच्या गावांना होऊ लागला. अध्यात्मप्रेमी लोकांचे येणे सुरू झाले. धर्माच्या नावाखाली प्रपंच्याच्या मागण्या पुरवून घेणाऱ्या दांभिकांना सुरवातीलाच बंधन पडू लागले. तरीसुद्धा दिवसेंदिवस गर्दी वाढतच चालली. इ. स. १९१३ मध्ये स्वामींनी या मंदिराला "ज्ञान साधन मठ" हे नाव दिले. असे नाव देण्यात हेतू होता. स्वामींना गुरुदेवांकडून मिळालेले साधन ब्रह्मतत्त्वाचे ज्ञान करून देणारे होते. साधनच प्रत्यक्ष ज्ञानस्वरूप होते. ज्ञान म्हणजेच मोक्ष. मोक्षाला नेणारे हे साधन आहे. असा सर्वकाही विचार करून मोठे सार्थ नाव देण्यात आले. शक्तिपातदीक्षेचे वर्तमान काळातील हे पहिले केंद्र.

सर्वसाधारणपणे अध्यात्म केंद्र म्हटले की शास्त्रचर्चा, प्रवचन, उपदेश, ग्रंथवाचन इ. कार्यक्रमांचे स्थान डोळ्यापुढे उभे रहाते. परंतु या केंद्रस्थानाचे स्वरूप अगदी वेगळेच होते. प्रत्यक्ष अनुभूती देणे व घेणे या केंद्रातून होत असे. या संपूर्ण दृश्य विश्वाचे नियंत्रण अदृश्य शक्ती करते. ती चित्‌शक्ती सर्वव्यापी आहे. तिचा अनुभव देण्याचे सामर्थ्य या केंद्रात होते.

सर्व पंथांचे, सर्व मतांचे व सर्व धर्मांचे लोक निस्संकोचपणे ज्ञानसाधन मठात येत. श्रीगुरुदेवांचे दर्शन घेत. मनात आले तर प्रश्न विचारीत; नाही तर थोडा वेळ त्यांच्या सन्निध बसत. चित्ताला शांत नि प्रसन्न करून घेत व तेथून जात असत. तेथे वारंवार येऊन संस्कार झाल्याने सेवा करण्याची इच्छा जागृत झालेले भाग्यशाली जीव न बोलता मठ झाडून काढीत. इतरजण दिसतील व सुचतील ती कामे सेवाबुद्धीने करीत व आपली वेळ झाल्यावर गुरुदेवांचे दर्शन करून निघून जात असत. येथे येण्याने सर्वांच्या चित्तवृत्ती शांत होत असत. येथे त्यांना समाधान वाटत असे.

श्रीगुरुदेवांच्या या मठात या काळात डाक्का जिल्ह्यातील विक्रमपूरहून एक अठरा वर्षांचा युवक येऊन पोहचला होता. त्या युवकाच्या पूर्वपुण्याईचा परिपाक झालेला होता. आणि म्हणूनच या छोट्या वयात, अध्यात्म जीवनाच्या उत्तुंग अवस्थेत असलेल्या, सद्गुरुप्रत येऊ शकला होता. हा येथे आला नि फारच अल्पकाळांत श्रीगुरुदेवांच्या चरणी लीन होऊन सेवातत्पर झाला. गुरुदेवांना परम संतोष झाला आणि त्यांनी त्याला तात्काळ अनुग्रह देऊन कृतार्थ केले. हा युवक म्हणजे 'योगवाणी' ग्रंथाचे लेखक; सिद्धयोगाश्रम, छोटी गैबी, वाराणसी येथील आश्रमाचे संस्थापक आणि आपल्या गुरुमहाराजांचे गुरुदेव श्रीलोकनाथतीर्थ स्वामीमहाराज यांचे गुरुदेव प. प. श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थ स्वामीमहाराज होत. यांचा चरित्रभाग आपण पुढे पाहाणार आहोत. परंतु प. प. श्रीशंकरपुरुषोत्तम तीर्थस्वामीमहाराज लहान वयातच गृहत्याग करून या दिव्य परंपरेत समाविष्ट झाले होते.

शक्तिपात दीक्षा देण्यापूर्वी गुरुदेवांनी शिष्याला आजन्म ब्रह्मचारी राहण्यासाठी नैष्ठिक ब्रह्मचर्याची दीक्षा देवविली होती. त्यावेळी त्यांना "श्रीमत् आत्मानंद प्रकाश ब्रह्मचारी" हे नाव दिले होते. हे श्रीमदात्मानंद प्रकाश ब्रह्मचारी म्हणजे संन्यासोत्तर झालेले प. प. श्रीशंकरपुरुषोत्तम तीर्थ स्वामी महाराजच होत.

गृहत्याग करून आलेल्या शिष्याला दीक्षा देऊन कृतार्थ केले आणि आपल्या घरी जाऊन तेथे काही काळ राहून सर्वांचे समाधान करून परवानगी घेऊन येत जा म्हणून सांगून निरोप दिला. ते गुरुदेवांच्या आज्ञेप्रमाणे आपल्या गावीं म्हणजे चीतलकोटला परत गेले.

योगायोग म्हणजेच विश्वसूत्रचालकाच्या विशेष हालचाली. येथे तर्काचा

आधार चालत नाही. परंतु घटना प्रत्यक्ष घडत असल्याने त्या नाकारता येत नाहीत. अशी ही जबरदस्त ईशअनुभूती आहे. तर्कवादी लोकांचा तर्क चालत नाही म्हणून तो यालाच म्हणतो योगायोग ! व्यवहारवादी म्हणतो "संधी" ! आधुनिकमतवाले म्हणतात "चान्स" ! प्रत्येकाची स्वतंत्र दृष्टी आहे एवढाच याचा अर्थ ! वस्तुस्थितीमध्ये त्यामुळे काही एक बदल नाही. हे सांगण्याचे कारण असे की श्रीमदात्मानंद प्रकाश ब्रह्मचारी चीतलकोटला गेले त्यावेळी असाच एक अपूर्व योगायोग घडला ! !

डाक्क्याहून योगेशचंद्र चक्रवर्ती हा युवक अध्यात्मामधील मार्गदर्शक कुठे मिळेल हे पाहण्यासाठी घराबाहेर पडला होता. त्याला चीतलकोटला जाण्याची इच्छा झाली. कां ? उत्तर नाही. पण इच्छा झाली. त्याप्रमाणे योगेश चीतलकोटला आला. एका घरात डोकावले. एक तरुण आपल्या घराच्या आंगणात हिंडताना दिसला. त्याने भस्म धारण केले होते. अंगावर पांढरी शुभ्र बंगाली लुंगी आणि खांद्यावर शालीवजा धोतर परिधान केले होते. तेजःपुंज व प्रसन्न चेहरा असलेला तो तरुण पाहून, या तरुणाला वाटले आपण याला विचारू तर ! असा विचार करीतच योगेशने घरात प्रवेश केला.

हा योगेशचंद्र म्हणजेच आपले परात्पर गुरुदेव प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामीमहाराज. त्यांची वरीलप्रमाणे भेट झाली. पहिल्या भेटीतच परस्परांमध्ये प्रगाढ स्नेह निर्माण झाला. पुढे तेथून कांही दिवसानंतर दोघेजण विनिटिया गावी ज्ञानसाधनमठामध्ये प. प. श्रीगुरुदेवनारायणतीर्थ स्वामीमहाराजांकडे आले.

दिवसेंदिवस ज्ञानसाधनमठाची जागा शिष्यवृंदांनी आणि भक्तगणांनी आपल्या वाढत्या संख्येने अपुरी करून टाकली. मग त्यांनीच जवळ एक आणखी जागा घेतली. पुन्हा मंदिर बांधले. स्वामींना समर्पण केले. शिवरात्रीच्या शुभ दिनी स्वामी तेथे वास्तव्याला गेले. पहिले मंदिर पत्नी व भावंडाच्या हवाली केले. कालीमातेची पूजा करण्यास सांगितली. याप्रमाणे ज्ञानसाधनमठाचा विस्तार वाढू लागला. नवनव्या वास्तू ज्ञानसाधनेसाठी निर्माण होऊ लागल्या.

विनिटियाच्या या आश्रमात श्रीयोगेशचंद्र प्रकाश ब्रह्मचारी हा आणखी एक युवक येऊन दाखल झाला. या नवीन युवकालासुद्धा नैष्ठिक ब्रह्मचर्याची दीक्षा स्वतः

श्रीमदात्मानंदांनी दिली होती. यामुळे योगेशचंद्राचे गुरुत्व त्यांच्याकडे आले होते. आणि योगेश श्रीमदात्मानंदांचा शिष्य झाला होता. हेच नाते शक्तीपातदीक्षेमध्ये आणि संन्यासदीक्षेमध्ये राहिले. या नवीन आणलेल्या युवकाचा परिचय श्रीमदात्मानंदांनी श्रीनारायणतीर्थ देव स्वामींना करून दिला. "योगेशचंद्र प्रकाश ब्रह्मचारी" हे नूतन नाव दिलेले सांगितले.

पुढे येथेच प. प. श्रीनारायणतीर्थ देव स्वामी महाराजांचे समोर परंतु श्रीमदात्मानंदांकडून योगेशचंद्रांना शक्तीपात दीक्षा झाली. उत्तमोत्तम अनुभव येत गेले. आपल्या गुरुसह थोरल्या गुरुदेवांची सेवा करण्यासाठी ते येथे राहिले. ६।७ वर्षे या आश्रमात ही गुरुशिष्याची जोडी श्रीगुरुदेवांची सेवा करण्यासाठी राहिली. परमभाग्यवान होते ते! श्रीगुरुदेवांचा सहवास खूप घडला. सर्वसाधन त्यांचेसमोर झाले.

इ. स. १९१३ ते १९२० पर्यंतच्या काळात स्वामींचा शिष्यवर्ग बराच वाढला. लांबलांबचे भक्त येऊ लागले. पुन्हा आश्रमाची जागा अपुरी पडू लागली. प्रचाराच्या सोयीच्या स्थानाची गरज वाटू लागली. हा साधनमार्ग असाधारण आहे. त्याचा प्रचार वाढविण्याची जबाबदारी आपल्या गुरुदेवांनी आपल्यावर सोपविली आहे. हा पंथराज आहे. याला आता पायवाटेचा संकोच सहन होणार नाही. म्हणून स्वामींनीसुद्धा शिष्यांना संमती दिली.

शिष्यमंडळींनी सर्व विचार केला. एक उत्तम गाव पाहिले. वाहनांच्या सोयीचा विचार केला. नदीतीर पाहिले. भरपूर जागा पाहिली. आणि मदारीपूर येथे "ज्ञान साधन मठा"चे स्थानांतर केले.

मदारीपूरचा "ज्ञान साधन मठ" निसर्गरम्य स्थानांत विराजमान झाला होता. मेघा नदीच्या एका प्रवाह शाखेच्या किनाऱ्यावर तो होता. या गंगानदीच्या सन्निधी व गंगाभिमुख असलेल्या मठातून पापविनाशिनी प्रवाह पाहणाऱ्याला प्रसन्न करीत होता. पवित्र करीत होता. आसपास, भोवताली विशाल तुलसी वन होते. मठाच्या परिसरात विशाल वटवृक्ष आपल्या प्राचीनतम कालाची जाणीव देत होता. त्या वटवृक्षाचा विस्तार फार मोठा होता. अनेक पारंब्या जमिनीत घुसून पक्क्या स्थिरावल्या होत्या. डेरेदार वृक्षछायेने सारे वातावरण शांत नि शीतल केले

होते. प्राचीन ऋषिमुनींचे ते ज्ञानसाधनेचे स्थान असावे असे खात्रीने वाटत होते. वृक्षाची अनेक खोडे जमिनीला टेकली होती. ठिकाठिकाणी पार बांधले होते. वृक्षछायेखाली बसण्यास भरपूर जागा होती. हजारोजण बसू शकतील एवढा विशाल पसारा त्या वटवृक्षाचा होता.

त्या वटवृक्षाखाली श्रीगुरुदेव स्वामी नारायणतीर्थ देव महाराजांनी एक मंदिर बांधले. त्या मंदिरामध्ये शिवलिंगाची स्थापना केली. मूळ पीठ शंकराची गंगाधराची स्थापना केली. आसपास सुंदर बाग निर्माण केली. साधन व पूजनाच्या वातावरणाने सारा परिसर पवित्र, मंगलशक्ती संचारित सिद्धस्थान झाला. या ठिकाणी महाराजांसारखे महापुरुष वास्तव्य करून होते. हे एक तीर्थक्षेत्र बनले. स्वामीमहाराजांची कीर्ती सुगंधित वायुलहरीप्रमाणे गाजावाजा न करता हळूहळू सर्वत्र पसरू लागली.

शक्तिपातदीक्षाप्रणाली प्राचीन असली तरी मध्यंतरीच्या काळात तिच्या गुप्त स्वरूपाच्या कार्यपद्धतीमुळे ती अस्तित्वात असूनही लुप्त झाल्याप्रमाणे वाटत होती. ती पुन्हा पूर्वस्थितीच्या स्वरूपात प्रकटपणे कार्यान्वित होण्याची स्थिती ईशेच्छेने निर्माण झाली.

असे पहा की, गुरुकृपेने तात्काळ शक्तिसंचार झाल्याचा अनुभव प्राचीन ग्रंथातून वाचणे भारतीय मनाला सवयीचे आहे. पण तो अनुभव प्रत्यक्ष स्वतः घेणे किती भाग्याचे आहे ! मार्ग जुना असून नवा भासणारा आहे. पण अनुभव आहे म्हणून लोकांची गर्दी पण वाढत आहे. गर्दी वाढते आहे म्हणून स्वामींनी दीक्षा सुलभ ठेवली नव्हती. स्वामीजी दीक्षा देताना गरीब-श्रीमंत, सुशिक्षित-अशिक्षित, या जातीचा—त्या जातीचा, या धर्माचा-त्या धर्माचा असा विचार कधीही करीत नसत. ते मुख्यतः हे पाहात की साधकाला परमार्थाची व अध्यात्माची खरी ओढ आहे का ? या मार्गाने उद्धार करून घ्यावयाचा आहे याची खरी तळमळ आहे का ? या मार्गाची मनोमन इच्छा व त्याप्रमाणे आचरण करण्याची तयारी हा मुख्य दंडक असे. स्वामींच्या तीक्ष्ण नजरेतून खोटे उघडे पडल्याशिवाय राहात नसे. दीक्षा तर लांबच राहिली पण व्यक्ती जवळ उभी करणे किंवा दूर ठेवणेसुद्धा नजरेतून घडत असे. मोठा म्हणून कधीही डाळ शिजली नाही.

एकदा एक ब्राह्मण स्वामींच्याकडे आला. मोठा मिठ्ठास बोलणारा. पांडित्याने छाप पाडणारा व हावभावाने विनयसंपन्नता दाखवणारा ब्राह्मण पाहून मठातले सारेजण प्रभावित झाले. स्वामीजी ऐकून घेत होते. शेवटी त्याने अनुग्रहाची प्रार्थना केली. स्वामी म्हणाले, "अब नही। फिर देखा जायेगा।" बिचारा ब्राह्मण तर खट्टू झालाच पण इतरांनाही मोठे आश्चर्य वाटले. अर्थात् असे का केले असा प्रश्न मात्र कोणी केला नाही. ज्यांना हे समजण्याची समज आली होती ते समजले.

त्याच कालावधीत एक दोन दिवसांच्या अंतराने एक मुसलमान स्वामींच्याकडे आला होता. कपडे मळके, दाढी वाढलेली, स्नानाचा पत्ता नाही. जातीने मुसलमान, भाषा रांगडी, धड बोलता पण येईना. त्याने प्रार्थना केली "खुदा की इस गरीबपर मर्जी होवे।" स्वामींनी तात्काळ त्याला दिवस ठरवून दीक्षा दिली.

यावेळी एका शिष्याला राहवले नाही. त्याने स्वामींना विचारले हे असे का? आणि ते तसे का? यावर स्वामीजी म्हणाले– "ज्याच्या घरात इलेक्ट्रिक फिटिंग झालेले आहे आणि लागणारे बल्ब लावून ठेवलेले आहेत अशा घरातील विजेच्या तारांचा संबंध विद्युत् पुरवठा केंद्राशी येण्याचा अवकाश की घरातील सारे दिवे प्रकाशित होणार. पण ही पूर्वतयारी नसेल तर विद्युत् पुरवठा केंद्र काय करणार? मग तो ब्राह्मण असो वा शूद्र असो वा मुसलमान असो."

स्वामींचे आपल्या शिष्यावर कडक नियंत्रण असे. केवळ दीक्षा देण्यापुरते हे नियंत्रण मर्यादित नसे. आपल्या शिष्याचे वर्तन कसे आहे, वृत्ती कोणत्या दिशेने जात आहेत, गप्पा गोष्टीत तर साधक वेळ घालवीत नाही ना, शुद्ध आणि चांगले आचरण ठेवण्याचा कटाक्ष आहे किंवा नाही, सात्त्विक भोजनाची सवय लावली की नाही, अशा एक ना अनेक गोष्टींकडे त्यांचे लक्ष बारकाईने असे. आश्रमात येऊन राहणाऱ्यांना तर शास्त्राचार कटाक्षाने पाळावे लागत. प्रत्येक क्षण सत्कारणी लागला पाहिजे असा त्यांचा आग्रह असे. दररोज सायंकाळी आश्रमात उपनिषदादि ग्रंथांचे वाचन होत असे. त्यावर व अन्य अध्यात्मविषयावर प्रवचन होत असे. त्यानंतर सामुदायिक साधन (बैठक) होत असे. अशा नित्यक्रमाने आश्रम स्वर्गरूप झाला होता. या नित्यक्रमात कुठे गडबडगोंधळ घोटाळा झाला तर स्वामी लहान मोठा पाहात नसत–निःसंकोचपणे त्याची हजेरी घेत असत. ते आईसारखे देत होते पण वडिलांसारखे बोलत होते.

येणाऱ्याला आश्रमात भोजन मिळत असे. बहुतेक आश्रमाचा स्वैपाक खमंग व गोडधोड पद्धतीचा असे. परंतु स्वामींचे भोजन मात्र ठरलेले, साधे व थोडे असे. त्यांच्या आहारात तांबडा भोपळा आणि भात बहुतेक असे. आश्रमाचे बांधकाम कच्च्या मातीचे होते. सर्वांना आसने चटयांची असत. स्वामी, भेटींचा स्वीकार करीत नसत. आश्रमासाठी सर्वजण खूप कष्ट घेत असत. आश्रमात राहणाऱ्यांच्या दिवस रात्री साधनमय होऊन जात असत.

१९२० नंतर श्रीमदात्मानंद ब्रह्मचारी यांनी काशी क्षेत्री आपल्या गुरुदेवांना मुद्दाम आणले होते. काही काळ काशी क्षेत्रात श्रीगुरुदेवांचा सहवास अनेक शिष्यांनी घेतला. त्यामध्ये श्रीचिन्मयानंद सरस्वती आणि श्रीयोगानंद हे शिष्य होते. त्या काळात सद्‌गुरु समवेत सर्व गंगास्नान करीत व मोठ्या आनंदात दिवस घालवीत.

त्यानंतर मात्र स्वामी महाराज जे मदारीपूरच्या ज्ञान साधन मठात वास्तव्यास गेले ते अखेरपर्यंत तेथेच होते. त्या काळातही बाहेर प्रचारार्थ पडलेली शिष्यमंडळी मधून मधून आश्रमामध्ये जात. स्वामींचे दर्शन घेत. स्वकार्याचे निवेदन करीत. आशीर्वाद घेत नि परत प्रचारासाठी स्वस्थानी जात.

प. प. श्रीनारायणतीर्थ देव स्वामी महाराज हे एक समर्थ गुरु होते. तसेच ते अत्यंत दयाळू होते. अनेक शिष्यांचे प्रारब्धभोग त्यांनी स्वतः भोगले व त्या शिष्यांचा उद्धार केला. काही रोगी-शिष्य दीक्षा देऊन बरे केले. व त्यांचे रोग स्वामींनी स्वतः भोगले.

श्रीगुरुदेवांनी आता आपला प्रारब्धक्षय होत आला हे जाणले. हा पवित्र देह सोडण्यापूर्वी त्यांनी एक दीक्षा दिली. तो शिष्य आंत्रव्रण-रोगाने दीर्घ काळ आजारी होता. दीक्षा घेतल्यानंतर लवकरच त्या शिष्याचा आंत्रव्रण-रोग, जो असाध्य होता तो बरा झाला पण –

स्वामीमहाराज त्याच रोगाने, आंत्रव्रणाने आजारी झाले. दुखण्याने आपले स्वरूप तीव्र केले. पण स्वामीजी अखेरपर्यंत शांत, सौम्य नि प्रसन्नच होते. जाता जाता एकाचे दुःख कमी झाले याचा आनंद त्यांना वाटत होता. स्वामींना सर्व परिस्थितीची कल्पना स्पष्ट होती. देहपातासंबंधी आपले भावपूर्ण विचार एका

बंगाली पदात स्वामींनी मांडले ते पद स्वतःच्या हाताने लिहून त्यांनी उशाखाली ठेवून दिले.

त्या मूळ पदाचा अर्थ असा आहे ---

आजपर्यंत मी ज्या दिवसाची वाट पहात आहे तोच शुभ दिवस आज आला आहे. पंचमहाभूतांचा देह निर्माण करून मी त्यात वास्तव्य करून राहिलो नाही तर विनाकारण सुखाच्या शोधार्थ मी त्या देहाला शिणवले. विषयसुख हे दुःखाचेच वेगळे नाव आहे. शहाणा मनुष्य अशाचा आदर कधीच करणार नाही. वेडे मात्र रात्रंदिवस विषयसुखात बुडून दुःखच दुःख मिळवीत राहतील.

आज मी अशा या देहाचे विसर्जन करून नित्य आनंद असलेल्या स्थानी जात आहे. तेथून कदापिही या संसारचक्रात येण्याची पाळी येत नाही.

म्हणून मला आज फार फार आनंद होत आहे. लोक ज्याला मृत्यु म्हणतात नि मन ज्या अवस्थेला भिते तो मृत्यु नाही ते अमृत आहे, ते अमरत्व आहे.

दिवसेंदिवस आजार बळावत चालला. स्वामींची प्रकृती दिवसेंदिवस ढासळत चालली. स्वामींच्या प्रकृतीची बातमी वाऱ्यासारखी आसपास पसरली. सारे शिष्य नि भक्त मोठ्या संख्येने उपस्थित राहू लागले. सर्वांची अंतःकरणे कंपित झाली. आपल्यावर कोणता दिवस पाहण्याचा प्रसंग ओढवला या विचाराने सर्वजण गंभीर झाले. मौन झाले. पण दबलेले मन डोळ्यावाटे बाहेर पडू लागले. दुःख आवरणे कठीण होऊन गेले.

पण यमयातना होत असतानाही स्वामींचे हृदय आनंदाने प्रफुल्लित झाले होते. त्या स्थितीत शिष्यांचे दुःख पाहून गुरुदेव दयार्द्र झाले आणि त्यांनी शिष्यांना उपदेश केला.

" आमच्या देहत्यागामुळे मनात दुःख किंवा भीति आणू नका. देहत्याग प्रत्येकाला केव्हा न केव्हा हा करावाच लागतो. तो अटळ आहे. मग टाळता न येणाऱ्या विषयाचे दुःख का वाटावे ? भीति का वाटावी ?

खात्री असू द्या की मी सुंदर विदेही अवस्थेमधून अनिर्बंध शक्तीने स्वेच्छेने, गतीमान देह धारण करून, माझ्या सर्व शिष्यांचे नि भक्तांचे जास्तीतजास्त कल्याण

करू शकेन. विदेही स्थिती ही परमोच्च स्थिती आहे. आनंदमय सत्ता आहे. त्यासाठी विषाद नको. दुःख नको. वास्तविक आनंद वाटणे योग्य. त्या विदेही स्थितीमुळे आपले परस्परांचे संबंध अधिक जवळचे येणार आहेत. म्हणून आपण सर्वांनी मला ती तद्रुप अवस्था व सरूपता प्राप्त होण्यासाठी प्रार्थना केली पाहिजे. मीसुद्धा तुम्हाला असा आशीर्वाद देतो की ती तद्रुप स्थिती, सरूपता, आपल्यापैकी प्रत्येकाला प्राप्त होवो."

याप्रमाणे समर्पक शब्दात सर्वांचे सांत्वन केले. नंतर काही वेळ शांत–स्थिर आसन लावून बसले. थोड्या वेळाने "सर्वं खल्विदं ब्रह्म" "सर्वं खल्विदं ब्रह्म" या महावाक्याचा चार वेळा उच्चार केला. नंतर शेवटचा उच्छ्वास "ॐ" असा प्रणवाच्या उच्चाराने सोडला आणि परमपद गाठले.

सर्व शिष्यांच्या समोर बसून, याप्रमाणे स्वामींनी सर्वांचा कायमचा निरोप घेतला. इ. स. १९३५ मध्ये ही घटना घडली. ज्ञान साधन मठाच्या पवित्र भूमीवर पार्थीव शरीराचा त्याग करून स्वामी ब्रह्मलीन झाले.

त्यानंतर एक महिन्याच्या अंतराने श्रीमती सरोजिनीदेवींनी आपलाही नश्वर देह पराशक्तीमध्ये विलीन केला. त्यांनीही देवीच्या नामस्मरणामध्ये आपला अन्तिम श्वास सोडला.

आश्रमाच्या परिसरात ज्या ठिकाणी स्वामींची समाधी निर्माण केली होती त्यासमोरच श्रीमती सरोजिनीदेवींच्या पार्थीव देहाला अग्नी देण्यात आला. उभयतांच्या समाध्या त्यावर बांधण्यात आल्या. त्यांचे नित्य पूजन आश्रमवासियांकडून होऊ लागले. स्वामींची कन्या श्रीमती शैलबाला आणि जामात श्री. विश्वेश्वर हे आश्रमात राहू लागले. सारी व्यवस्था ते पाहू लागले. पुढे इ. स. १९६० मध्ये त्या आश्रमाची शोभा असलेला तो प्रचंड प्राचीन वटवृक्ष वादळाच्या तडाख्याचे निमित्त होऊन उन्मळून पडला. त्यामुळे शिवमंदिरालाही तडे गेले. पण मंदिराची दुरुस्ती करण्यात आली.

आज मात्र हे स्थान भारताच्या सीमेत नसल्याने आपल्याला पारखे झाले आहे. सध्या त्या स्थानाचे दर्शन आपल्याला आपल्याच एकाद्या आश्रमस्थानाचे दर्शन घेऊन समाधान मानण्याने होणार आहे.

स्वामी महाराजांनी शक्तिपातदीक्षा दिलेल्या व त्यानुसार अधिकार प्राप्त होऊन शक्तिपातदीक्षा देणाऱ्या सर्वच शिष्यांची, शक्तिपातदीक्षा केंद्राची माहिती पूर्णांशाने आज उपलब्ध नसली तरी भरपूर माहिती हातात आल्याने या पंथराजाची वाटचाल प्रशस्त होत चालली असल्याची प्रचीती येत आहे.

स्वामी महाराजांच्या शिष्यांपैकी श्रीयोगानंदजी महाराज हेही उत्तम शिष्य-वर्गापैकी असून त्यांनी "महायोग विज्ञान" हा शक्तिपात मार्गावरील अपूर्व व विस्तृत ग्रंथ हिंदीमधून लिहिलेला आहे. यांचा आश्रम हृषीकेश येथे आहे. बुलंदरशहरी माण्डू आश्रमात त्यांनी बराच काल निवास केला. नंतर ते हृषी-केषला गेले.

श्रीगुरुमहाराजांच्या कृपाशीर्वादाने यथाशक्ती, यथामती लिहिले गेलेले श्रीगुरुदेव प. प. श्रीनारायणतीर्थ देवस्वामी महाराज यांचे चरित्र सर्व वाचकांची आस्तिक बुद्धी वाढीस लावून, श्रीगुरुचरणी श्रद्धाभक्ती निर्माण करून, निजमार्ग सोपा करण्यास समर्थ होवो ही प्रार्थना. श्रीगुरुमहाराजांचे चरणी ही बिल्वमंजरी समर्पण असो.

# प. प. १००८ श्रीशंकर पुरुषोत्तम तीर्थ स्वामी महाराज

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात पूर्व बंगाल राज्यात, ढाक्का जिल्ह्यातील विक्रमपूर परगण्यात चितलकोट येथे प्रसन्नकुमार चटोपाध्याय नावाचे जमीनदार रहात होते. त्यांच्या पत्नीचे नाव दुर्गासुन्दरी होते. हे दोघेही मोठे भगवद्भक्त होते. साधुसंतांचा मोठा आदर सत्कार यांचे घरी नेहमी होत असे. यांच्या घराण्यात कालीची तंत्रोक्त पूजापद्धती परंपरेने चालत आली होती.

या धर्मपरायण दम्पतीला दोन मुली व तीन मुलगे झाले. यामध्ये मधला रोहिणीकुमार म्हणजे आत्मानंद प्रकाश ब्रह्मचारी. आणि आत्मानंद प्रकाश ब्रह्मचारी म्हणजेच प. प. श्रीशंकर पुरुषोत्तम तीर्थ स्वामी महाराज होत. रोहिणीकुमार यांचा जन्म वैशाख शु।। ६ इ. स. १८९०, सोमवारी झाला. वयाच्या पाचव्या वर्षी त्यांच्यावर मातृवियोगाची पाळी आली. त्या वेळेपासून रोहिणीकुमार, कालीदेवी हीच आपली आई असे अनुभवू लागला. कालीची मूर्ती हालचाल करते, बोलते, असे रोहिणीकुमार नेहमी सांगत असत.

इतक्या लहानपणापासून रोहिणीकुमार वडिलांचे सहवासात त्यांच्यासमोर ध्यानाला बसत असे. एकदा कालीच्या मूर्तीसमोर रोहिणीकुमार ध्यानाला बसले. त्यांचे ध्यान संपून तेथेच समाधी लागली. त्यावेळी डासांनी चावून चावून त्यांचे शरीर लाल केले तरी त्यांच्या शरीराची हालचाल होईना. तेव्हा घरातील मंडळी घाबरली आणि त्यांनी त्यांना हलवून जागे केले. अशा तयारीची चुणुक लहानपणीच दिसून येत असे.

रोहिणीकुमार हायस्कूलात शिकण्यास दाखल झाले. पण त्यांचे मन त्या शिक्षणात रमत नसे. अभ्यास संपवून ते बराच वेळ अध्यात्म चर्चेसाठी साधु-संतांच्या संगतीमध्ये जाऊन बसत. त्यांनी दहावीमध्ये शाळा सोडली आणि ध्यान-धारणा, प्राणायाम यात रमले. एकदा ध्यानाचा अभ्यास चालू असता त्यांना गुरु पाहिजे याची ओढ लागली. स्वप्नांत गुरूंनी दर्शन दिले. ते भव्य शरीराचे दाढी वाढविलेले गुरुचे रूप शोधून काढण्याचा रोहिणीकुमारांनी वणवण हिंडून खूप प्रयत्न केला.

त्यांना एकाने सांगितले की तुम्ही रामकृष्णपरमहंसांचे ध्यान करीत जा. ते तुमचे काम करून देतील, आणि तसेच झाले. रामकृष्णपरमहंसांची तसबीर पुढे ठेवून ध्यान-अभ्यास सुरू केला आणि थोड्याच दिवसांनी ध्यानात मग्न झालेल्या रोहिणीकुमारांच्या समोर रामकृष्णपरमहंस आले व म्हणाले– "तुझे गुरु सापडत नाहीत काय? नारायणतीर्थ हे त्यांचे नाव आहे." असे सांगून पुन्हा त्यांचे दाढीधारी रूप दाखविले. या दृष्टांताप्रमाणे परत रोहिणीकुमारांनी गुरूची शोधाशोध सुरू केली. शेवटी विनिटिया येथे 'ज्ञानसाधन मठात' ते आले. स्वप्न व दृष्टांत यामध्ये पाहिलेले दाढीधारी रुप श्रीनारायण तीर्थ देवांचे पाहून परम आनंद झाला. हे इ.स. १९१० साल होते. रोहिणीकुमार फक्त वीस वर्षांचे होते. आता सद्गुरुंची भेट झाल्यामुळे त्यांचे सारे जीवन उजाळून निघण्याची पर्वणी आलेली होती.

श्रीनारायणतीर्थ देवांनी "गुरु करणार का?" हा प्रश्न रोहिणीकुमारांना विचारला. प्रश्न ऐकताच 'होकार' देऊन रोहिणीकुमार पुढच्या आज्ञेची वाट पाहू लागला. मग श्रीनारायणतीर्थ देव यांनी रोहिणीकुमार यास नैष्ठिक ब्रह्मचर्याची दीक्षा व शक्तिपात दीक्षाही दिली. "आत्मानंद प्रकाश ब्रह्मचारी" हे नूतन नामकरण झाले. आता श्रीआत्मानंद ब्रह्मचारीजी ज्ञानसाधन मठात राहून श्रीगुरुसेवा करू लागले. रोज गुरुसान्निध्यात साधना तीव्र वेगाने होऊ लागली. सेवा आणि साधना पाहून गुरुंचा संतोष वाढू लागला. गुरुंच्या संतोषाने अनुभूती येऊ लागली. आत्मानंदांनी ज्ञानसाधन मठात पडेल ते काम केले. होईल तेवढी साधना केली.

आत्मानंदांना साधनेत इतके अनुभव आले की सर्वांचा उल्लेख अशक्य आहे. कम्प होता. दिव्य नाद ऐकू येत होते. शरीर प्रेतवत् निश्चेष्ट होत होते. श्वासोच्छ्वास आतले आत चालत असत. कालीभाव जागृत होऊन जिव्हा लपलप करू लागत असे. भस्त्रिका, रडणे, हसणे, नाचणे, गाणे इ. होत असे. रात्र रात्र समाधि लागलेली उतरत नसे. असे होता होता त्यांना एकदा असा अनुभव आला की "मी स्वतः आदिअन्तविहीन आकाशाप्रमाणे अनंत आहे." नंतर असा अनुभव आला की, "मी सूर्याप्रमाणे अखंड तेजःपुंज असून माझ्यातून अनंत तेजकिरणे बाहेर फेकली जात आहेत." श्रीनारायणतीर्थ देवांनी आत्मानंदांची पूर्वपुण्याई पाहून गुरुत्वाचे अधिकार लगेचच दिले होते. या कार्याच्या प्रचारासाठी काशीकडे जाण्याची आज्ञाही दिली.

श्रीआत्मानंद प्रकाश ब्रह्मचारीजी गुरुआज्ञेप्रमाणे काशीस आले. हरिद्वार, हृषिकेश, उत्तरकाशी इ. ठिकाणी जाऊन आले. उत्तर काशीला आपला आश्रम असावा असा मनात संकल्प झाला आणि त्याच दिवशी एका वृद्ध गृहस्थाने आपले घर व जमीन दान म्हणून यांना दिले. उत्तर काशीचा मठ "शंकर मठ" नावाने स्थापन झाला. इ. स. १९३२ मध्ये समारंभही झाला.

मध्यंतरी १९२६ मध्ये श्रीनारायणतीर्थ देवांच्या इच्छेने श्रीआत्मानंदांना संन्यास दीक्षा झाली. ही दण्डसहित संन्यास दीक्षा जगन्नाथपुरीच्या आचार्य पीठाचे श्रीमत् शंकराचार्य १००८ श्री प. प. श्रीभारतीकृष्णतीर्थ स्वामीमहाराज यांचेकडून झाली. यानंतर श्रीआत्मानंद हे प. प. श्रीशंकर पुरुषोत्तमतीर्थस्वामीमहाराज झाले. नंतर उत्तर काशीच्या शंकर मठाची स्थापना झाली. त्यानंतर इ. स. १९३४ मध्ये काशी क्षेत्रात छोटी गैबीमध्ये "सिद्धयोगाश्रम" हा दुसरा मठ स्थापन झाला. जिज्ञासू, तत्पर, श्रद्धाळू व्यक्ती पाहून दीक्षा होत होत्या. कार्याचा व्याप वाढत होता. इ. स. १९३५ मध्ये श्रीनारायणतीर्थदेव "ज्ञानसाधन मठ" मदारीपूर येथे समाधीस्थ झाले. तत्पूर्वी वाढलेल्या कार्याचे स्वरूप त्यांना समजलेले होते.

प. प. श्रीशंकर पुरुषोत्तमतीर्थस्वामीमहाराज दरवर्षी बंगालमध्ये जाऊन येत असत. काशीच्या आसपास व उत्तर काशीस त्यांचे जाणे होत असे. शक्तिपातयोग मार्गाची कल्पना जिज्ञासूंना व साधकांना असावी म्हणून त्यांनी "योगवाणी" हा अभ्यासपूर्ण ग्रंथ इ. स. १९२८ मध्ये लिहिला. आश्रमात साधन, सत्संग, शास्त्रचर्चा सतत चालू असे. शिष्यपरिवारही वाढत चालला होता.

इ. स. १९३१ मध्ये स्वामी श्रीशंकरपुरुषोत्तम तीर्थ महाराजांकडे श्रीकालीपद आचार्य नावाचे जिज्ञासू, शिष्यत्त्व पत्करण्यास आले होते. स्वामींनी प्रसन्न होऊन त्यांना शक्तिपातसहित ब्रह्मचर्याची दीक्षा दिली. तेव्हा त्यांचे नाव 'वासुदेव-प्रकाश' असे ठेवले. पुढे या श्रीवासुदेव प्रकाश ब्रह्मचारीजींनी स्वामींची सेवा सावलीप्रमाणे सान्निध्य टेवून केली. शिष्याची ही अनन्यता पाहून स्वामी श्रीशंकरपुरुषोत्तम तीर्थ महाराजांनी इ. स. स. १९५० मध्ये स्वतः "वासुदेव-प्रकाश" यास संन्यास दीक्षा दिली. त्यानंतर श्रीवासुदेव-प्रकाश-ब्रह्मचारीजी हे प. प. श्रीनारायण तीर्थ स्वामी महाराज झाले. पुढे १९५७ च्या २४ नोव्हेंबरला यांना स्वामींनी

शक्तिपातयोगपथ प्रदर्श



**१००८ श्री श्री. शंकर पुरुषोत्तम तीर्थ स्वमी महाराज**
शंकर मठ–उत्तरकाशी व सिद्धयोगाश्रम, छोटी गैबी, काशी या दोनही योगपीठांचे संस्थापक 'योगवाणी' ग्रंथाचे लेखक आणि चरित्रनायकाचे गुरुदेव

## स्वामींच्या गुरुदेवांचे बंगाली हस्ताक्षर !



प.प. श्रीशंकर पुरुषोत्तम तीर्थ स्वामींचे पूर्वाश्रमीचे नाव आत्मानंद आणि प. प. श्रीलोकनाथांचे दण्डग्रहणापूर्वीचे नाव चिन्मयानंद तेव्हांही उभयतांचे नाते गुरु शिष्याचेच होते. त्या काळातील गुरुदेव आत्मानंदाचे शिष्य चिन्मयानंदास पत्र.

– गुरु शिष्य संबंध –

आपल्या गादीचे उत्तराधिकारी केले. सध्या हेच छोटी गैबीतील सिद्धयोगाश्रमाचे उत्तराधिकारी आहेत.

इ. स. १९५८ मध्ये भाद्रपद शु॥ ११ स दि. २८ सप्टेंबर १९५८ रोजी सायंकाळी ६ वाजून १० मिनिटांनी "सोऽहं" "सोऽहं" "सोऽहं" या प्रणवोच्चारांनी स्वामी श्रीशंकरपुरुषोत्तम तीर्थ ब्रह्मलीन झाले.

## पूज्य स्वामीजींचे भारतभ्रमण

| वर्ष | स्थान |
|---|---|
| इ स. १८९२ ते १९१० | ढाका ( जन्मस्थान ) |
| १९११ | चितलकोट, त्रिनिटिया |
| १९१२,१३ | विनिटिया, ( ज्ञानसाधन मठ ) |
| १९१४ | ढाका ( संन्यासग्रहण ) |
| १९१५ ते १७ | विनिटिया व बंगाल भ्रमण |
| १९१८ | काशी, हिमालय यात्रा |
| १९१९ | काशी, ,, |
| १९२० | हृषिकेश ,, |
| १९२१ | हथरस |
| १९२२,२३,२४ | हुशंगाबाद ( अपूर्व भेटी ) |
| १९२४ | बार्शी, उज्जैन, पुष्कर, काशी, गया, हुशंगाबाद |
| १९२५ | हुशंगाबाद, आजेगांव, यवतमाळ, बार्शी, सागर, हुशंगाबाद, |
| १९२६ | हुशंगाबाद |
| १९२७ | काशी, दमोह, सागर. |
| १९२८ | पुणे, बार्शी, हुशंगाबाद. |
| १९२९ | दौंड, बार्शी, भेरिया, हुशंगाबाद, हरिद्वार, हृषीकेश. |
| १९३० | पुणे, चांदोद, कर्नाळी, व्यासक्षेत्र, मुंबई, पुणे, व्यासक्षेत्र, पुणे. |
| १९३१ | पुणे, हुशंगाबाद, साग, दौंड, कुर्डुवाडी, कुडुच्चि, काशी. |
| १९३२ | काशी, उत्तरकाशी, ( शंकरमठ स्थापना ) दंडीबारा, दियाप्रस, टिहरी, गढवाल, हरिद्वार. |

| वर्ष | स्थान |
|---|---|
| १९३३ | ह्रषिकेश, थानेसर, अनूपशहर. |
| १९३४ | शुकदेवजी, मुखेररी, अनूपशहर, मिरांपूर, लखनौ. |
| १९३५ | भेरिया, बुलंदशहर, बिहारघाट, व्यासक्षेत्र, काशी, बडोदा, डाकोर, पेटलाद, वढवाण, प्रभासपाटण. |
| १९३६ | वेरावळ, जुनागढ, प्रभास पाटण, वढवाण, गंगाश्रम झूसी. |
| १९३७ | बडोदा, भालोद, बडोदा, इंदोर, थुरावास. |
| १९३८ | अहमदाबाद, काशी, नागपूर, मुंबई, पुणे, बडोदा, काशी. |
| १९३९ | काशी, कटनी, पुणे, काशी. |
| १९४० | काशी, लख्खा, सतना, कटनी, पुणे, भंडारा, सतना, काशी, पुणे, नासिक, पुणे. |
| १९४१ | पुणे, भंडारा, काशी, नासिक, डोंबिवली (गोग्रासवाडी ) पुणे, काशी. |
| १९४२ | पुणे, काशी, सतना, पुणे, काशी. |
| १९४३ | काशी, लख्खा, पुणे, काशी, गोकर्णमहाबळेश्वर, पुणे, काशी, |
| १९४४ | काशी, भंडारा, पुणे, काशी. |
| १९४५ | मद्रास, रामेश्वर, मदुरा, श्रीरंगम. |
| १९४६ | पुणे, श्रीशैल्य, हंपी ( विरुपाक्ष ) विजयनगर, शृंगेरी, पुणे. |
| १९४७ | पुणे, बद्रीनारायण, पुणे, काशी, पुणे. |
| १९४८ | पुणे, काशी, काठमांडू ( नेपाळ ) काशी |
| १९४९ | काशी, पुणे, आळंदी, भिलोदा, मुंबई |
| १९५० | मुंबई, पुणे, काशी, जबलपूर, कटनी, पुणे |
| १९५१ | पुणे, नागपूर |

१९५२ ते १० फेब्रु. १९५५ **श्रीक्षेत्रकाशी**

## प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामीमहाराजांचे संन्यासी जीवन ४१ वर्षांचे होते त्या काळात त्यांनी केलेले

## ४१ चातुर्मास

| | साल | स्थान |
|---|---|---|
| १ | १९१४ | संन्यासग्रहण, ढाक्का, बंगाल. |
| २ | १९१५ | 'ज्ञानसाधनमठमें' विनिटिया बंगाल. |
| ३ | १९१६ | ,, ,, ,, |
| ४ | १९१७ | बंगाल-संचार |
| ५ | १९१८ | हिमालय यात्रा |
| ६ | १९१९ | श्रीक्षेत्र काशी |
| ७ | १९२० | श्रीक्षेत्र हृषिकेश |
| ८ | १९२१ | उत्तर काशी (टेहरी) |
| ९ | १९२२ | हथसर (उ. प्र.) |
| १० | १९२३ | हुशंगाबाद (म. प्र.) |
| ११ | १९२४ | उज्जयिनी ( ,, ) |
| १२ | १९२५ | बार्शी (महाराष्ट्र) |
| १३ | १९२६ | हुशंगाबाद (म. प्र.) |
| १४ | १९२७ | श्रीक्षेत्र काशी |
| १५ | १९२८ | हुशंगाबाद (म. प्र.) |
| १६ | १९२९ | हरिद्वार (उ. प्र.) |
| १७ | १९३० | व्यासक्षेत्र (गुजराथ) |
| १८ | १९३१ | श्रीक्षेत्र काशी |
| १९ | १९३२ | उत्तर काशी (हिमालय) |
| २० | १९३३ | रनौली, अनूपशहर |
| २१ | १९३४ | शुकदेवजी |
| २२ | १९३५ | व्यासक्षेत्र (गुजराथ) |
| २३ | १९३६ | वढवाण (गुजराथ) |
| २४ | १९३७ | बडोदा |

| | साल | स्थान |
|---|---|---|
| २५ | १९३८ | श्रीक्षेत्र काशी |
| २६ | १९३९ | श्रीक्षेत्र काशी |
| २७ | १९४० | श्रीक्षेत्र काशी |
| २८ | १९४१ | श्रीक्षेत्र काशी |
| २९ | १९४२ | सतना |
| ३० | १९४३ | श्रीक्षेत्र काशी |
| ३१ | १९४४ | पुणे |
| ३२ | १९४५ | श्रीक्षेत्र काशी |
| ३३ | १९४६ | श्रीक्षेत्र काशी |
| ३४ | १९४७ | श्रीक्षेत्र काशी |
| ३५ | १९४८ | श्रीक्षेत्र काशी |
| ३६ | १९४९ | पुणे |
| ३७ | १९५० | श्रीक्षेत्र काशी |
| ३८ | १९५१ | नागपूर |
| ३९ | १९५२ | श्रीक्षेत्र काशी |
| ४० | १९५३ | श्रीक्षेत्र काशी |
| ४१ | १९५४ | श्रीक्षेत्र काशी |

# स्वामींची कुंडली व सादृश कुडल्या




प. प. श्रीलोकनाथतीर्थस्वामी




प. प. श्रीमदाद्यशंकराचार्य




श्रीसमर्थरामदास

श्रीस्वामींचा जन्मकाल व स्थान — वैशाख शु. १२, शके १८१४, संवत १९४८. रविवार दि. ८ मे इ. स. १८९२ ढाक्का, ( बंगाल ).

## चैतन्य चक्रवर्ती अर्थात श्रीमत् परमहंस, परिव्राजकाचार्य

# श्रीलोकनाथतीर्थ स्वामीमहाराजांचे जीवन चरित्र

ॐ नमो जी आद्या। वेदप्रतिपाद्या।
जय जय स्व संवेद्या। आत्मरूपा॥

विघ्नेशाचे रूप धरी जो, निवसे ह्या माझे शरिरी॥ मूलधारी चतुष्पत्री वासांतीं त्या वंदू॥१॥ षट्‌दलचक्री लिंगस्थानी देही वादि कलांतवर्णी॥ चतुरास्याचे रूप घेऊनी निवसे जो त्या वंदू॥२॥ डाद्य फांती दशदल चक्री नाभिस्थानी ह्या मणिपूरी॥ श्रीविष्णूच्या रूपे शरिरी निवसे जो त्या वंदू॥३॥ हृदयस्थानी द्वादश कोणी माझ्या कादिकंठात वर्णी॥ गौरीशंकर रूप धरोनी निवसे जो त्या वंदू॥४॥ विशुद्धचक्री षोडशपत्रीं कंठी सस्वरी माझे गात्री॥ श्रीगुरुरूपा सेवुनी हरी निवसे जो त्या वंदू॥५॥ आज्ञाचक्री भ्रुकुटिस्थानी हक्षवर्णान्वित द्विकोणी॥ वासुदेवस्वरूप होऊनी निवसे जो त्या वंदू॥६॥ सहस्त्रपत्रीं जो ह्या विवरी सुसक्ष्म होऊनी निवास करी॥ दत्त सत्त्वस्वरूप हरी सुखकर जो त्या वंदू॥७॥

अखंडानंद स्वरूपाय चिदानंदात्मरूपिणे।
चिन्मयानंदस्वरूपाय श्रीलोकनाथाय नमो नमः॥

नमोस्तुते महादेवी शिवे कल्याणी शांभवी
प्रसीद वेद विनुते जगदंब नमोस्तुते॥
जगतामादिभूता त्वं जगत्त्वं जगदाश्रया
एकाप्यनेकरूपासि जगदंब नमोस्तुते॥

परी एथ असे एक आधारू। तेणेचि बोले मी सधरू।
जे सानुकूल श्रीगुरू। ज्ञानदेव म्हणे॥

## श्रीढाकेश्वरीचा प्रसाद

श्रीकालीमाता ढाकेश्वरीच्या मंदिरामध्ये इ. स. १८९२ मध्ये चैत्र मासातील नवरात्र महोत्सव सुरू होता. भगवतीचे भक्त भक्तीमध्ये लीन झाले होते. कोणी पूजा करीत होते, कोणी पाठ वाचीत होते, कोणी होमहवन करीत होते, कोणी प्रदक्षिणा घालीत होते तर कोणी यातील काहीच न करता, चाललेल्या या उत्सवातील, विविध कार्यक्रम श्रद्धेने न्याहळत होते. सारेजण आपापल्या उपासनेचे बल वाढवीत होते. श्रीढाकेश्वरीच्या विशाल मंदिराच्या कानाकोपऱ्यातून बसलेले उपासक, सप्तशती, दुर्गामाहात्म्य, देवीभागवत, अर्गलास्तोत्र, सौंदर्यलहरी इत्यादींचे पाठ करीत होते. भगवती श्रीढाकेश्वरीच्या समोर, भव्य मंडपाच्या मध्यभागी असलेल्या उत्कृष्ट यज्ञकुंडात, सहस्रचंडीचे हवन चालले होते. सारा सभामंडप ब्रह्मवृंदांनी भरून गेला होता. मंत्रघोषांनी गुंजारित झाला होता. यज्ञकुंडातील आहुतींनी यज्ञहोमाचा सुगंधित धूर सारा परिसर यज्ञभूमीची साक्ष देत होता. जवळच पशुबलीचे नैवेद्य देवीला समर्पित करणाऱ्या भक्तांची गर्दी उसळली होती. देवीच्या दर्शनासाठी येणारे भक्त मंदिरातील या विविध प्रसंगांचे दर्शन घेत घेत पुढे जात होते. यज्ञदेवीला वंदन करून प्रदक्षिणा घालीत होते देवीच्या गाभाऱ्यात प्रवेश करताना "जोय ढाकेश्वरीमाता", "जोय कालीमाता" म्हणून गगनभेदी गर्जना करून साष्टांग नमस्कार घालीत होते.

भक्तगण भावभक्तीने गद्‌गदीत झालेल्या अंतःकरणाने देवीचे रूप न्याहळत उभे राहात. श्रीढाकेश्वरी म्हणजे कालीमाताच ! महाकालीचे ध्यानाप्रमाणेच येथील मूर्ती आहे.

**शवारूढां, महाभीमां, घोरदंष्ट्रां, हसन्मुखीम् ।**
**चतुर्भुजां, खड्‌गमुण्डवरां, भयंकरां, शिवाम्**
**मुण्डमालाधरां, देवीं ललजिव्हां दिगम्बराम् ।**
**एवं संचिंतयेत् कालीं स्मशानालय निवासिनीम् ॥ १ ॥**

संपूर्ण भारतात शिव - शक्ति, किंवा ब्रह्ममाया, नारायण - नारायणी वा विष्णु-लक्ष्मी, रामसीता, विठ्ठलरखुमाई, राधाकृष्ण यांची उपासना विशेष दिसते. परंतु बंगालमध्ये मात्र कालीमाता, दुर्गादेवी अशी शक्तिउपासना मोठ्या प्रमाणात होताना दिसते. वास्तविक ही आदिशक्तीच अनेक रूपातून व्यक्त होते. ती जगत्‌निर्माती



मंदीराचे भव्य प्रवेशद्वार



ढाकेश्वरी मंदीर



कालीमाता ढाकेश्वरी – चक्रवर्ती कुल सर्वेश्वरी



ढाक्का ढाकेश्वरी मंदिरासमोरून वहाणारी 'बुऱ्हीगंगा'

आहे. ही प्रथमाशक्ती जगाचा आधार आहे. हीच पराशक्ती, शिवशक्ती असून ती शिवाहून वेगळी नाही.

**त्वं पराप्रकृतिः साक्षात् ब्रह्मणः परमात्मनः ।**
**तत्त्वो जातं जगत्सर्वं त्वं जगज्जननी शिवे ॥**

अशी ही आदिशक्ती परब्रह्माची पराशक्ती असून तिनेच हे विश्व निर्माण केले असल्याने ती विश्वाची माता आहे.

या शक्तीमातेची उपासना सर्व देव करीत असतात. या चित्शक्तीचा विलास म्हणजे विश्व आहे. या आदिशक्तीला शरण गेल्याशिवाय शिवस्वरूपाचे आकलन होत नाही.

इ. स. १८९२ च्या चैत्राच्या नवरात्रातील ही घटना आहे. ढाकेश्वरीच्या मंदिरात संध्याकाळची आरती चालू होती. आरतीला भक्तांची गर्दी लोटली होती. सारे भक्त भावमग्न झाले होते. बाबूचक्रवर्ती मंदिराचे मुख्य पुजारी, देवीला पंचारती ओवाळीत होते. भक्तगण घंटा, झांजा, टाळ, टाळ्या वाजवीत आरती म्हणत होते. उदबत्त्या, धूपाच्या सुगंधाने वातावरणाला प्रसन्नता आली होती.

इतक्यात चक्रवर्तीबाबूंच्या पत्नींच्या शरीरात शक्तीसंचार झाला. त्यांचे भान हरपले. त्या बेहोश होऊन भराभर पुढे आल्या व ढाकेश्वरीसमोर येऊन उभ्या राहिल्या. त्यांचे डोळे विस्फारलेले होते. त्या विस्फारलेल्या डोळ्यांनी देवीकडे एकटक पाहात होत्या. बराच वेळ झाला तरी त्यांची ती निश्चल स्तब्धता मोडली नाही. सर्व भक्तांच्या नजरा या शक्तिसंचारित मातेकडे आल्या. मंदिराच्या मुख्य पुजारीणबाई म्हणून सर्वजण त्यांना ओळखत होते. त्यांना असा संचार झालेला फारसे कोणाच्या पाहाण्यात नव्हते. नंतर बऱ्याच वेळाने पुजारीणमातेने डोळे बंद केले. त्या मटकन खाली बसल्या. आता त्यांच्या श्वासोच्छ्वासाची गती एकदम वाढली. भात्याप्रमाणे छाती जोरजोरात खालीवर होऊ लागली. त्यांची भस्त्रिका होऊ लागली. शरीराला कंप सुटला. दोन्ही हात एकमेकात घट्ट धरून देवीला नमस्कारावर नमस्कार सुरू झाले. नमस्कारांची गती प्रचंड वाढली. शरीराला घूर्णा सुरू होऊन ते चक्राकार फिरू लागले. मस्तकाचा केशसंभार मोकळा झाला. शरीराच्या हालचालीने ते सारे केस अस्ताव्यस्त होऊन विस्फारले गेले. जणू आता

त्यांच्या शरीराने कालीमातेच्या रूपाशी एकरूप होण्याचे ठरविले असावे. त्यांच्या मुखावर कालीमातेचे तेज आले. स्मित हास्य आले आणि ती उग्रताही आली.

अजूनही ढाकेश्वरीकालीमातेची आरती चालू होती. वाद्ये वाजत होती. आरती म्हणणाऱ्या भक्तांचा आवाज चढला होता. मातेचा संचारही चालूच होता. या संचाराने आरतीला चैतन्य आले. मंदिराचा सारा परिसर संचारित झाला. वातावरणाला गांभीर्याचा प्रौढपणा आला. भक्तांचे भाव उत्कट झाले, शरीरे रोमांचित झाली. प्रत्येकाला रोजच्यापेक्षा आजच्या आरतीची अनुभूती अपूर्व वाटत होती. आंतरिक संवेदनेच्या जाणीवेने प्रत्येकाला कृतार्थतेची धन्यता वाटत होती. होता होता आरती संपली. वाद्ये थांबली. संचाराचा वेग थांबला होता तरी आईसाहेबांच्या पद्मासनाची पकड पक्की होती. पाठीचा कणा ताठ होता. अत्यंत स्थिर स्थितींत त्या ताठ बसल्या होत्या. त्यांच्या तेज:पुंज मुखमंडलावर प्रसन्नतेची लाली विलसू लागली. पंचारती खाली ठेवून मंत्र पुष्पांजली झाल्यावर चक्रवर्तीबाबूंनी आपल्या पत्नीकडे पाहिले. त्यांना सुखद जाणीवेची खूण पटली. प्रसाद वाटला गेला. दर्शन घेऊन भक्तलोक निघून गेले. मग चक्रवर्तीबाबू पत्नीजवळ आले. "काय पाहिजे ?" असा प्रश्न केला. तेव्हा डोळे उघडून आईसाहेब म्हणाल्या "काही नको. असेच सारखे, कालीमाँच्या सहवासात राहावेसे वाटते".

तेवढ्यात जमलेल्या सुवासिनींपैकी एक पुढे झाली. तिने आईसाहेबांना कुंकू लावले. नमस्कार केला. तेव्हा आईसाहेब उठल्या. त्यांनी प्रथम पतीदेवांना नमस्कार केला. मग देवीजवळ जाऊन नमस्कार केला. देवीच्या सेवेचे फळ प्राप्त होण्याची वेळ जवळ येत होती. भावी घटनांचे अनुभव संचारित होऊन येत होते. शुभ भविष्याचे हे भाकित होते.

श्रीभगवती कालीमाता ढाकेश्वरीच्या मंदिराभोवती वसलेले शहर म्हणजे ढाका. पूर्व बंगालमधील डाका शहर ते हेच होय. तेथे ढाकेश्वरीचे मंदिर प्राचीन असून भव्य आहे. ढाका शहराजवळून जाणाऱ्या गंगाप्रवाहास "बुऱ्हीगंगा" म्हणतात. ढाका जिल्ह्यात सुद्धा "पद्मा" आणि "मेघना" या दोन नावांनी ओळखल्या जाणाऱ्या नद्या गंगेचेच दोन प्रवाह आहेत. "बुऱ्ही" हा "पद्मा" चा उपप्रवाह आहे.

या जलप्रवाहांच्या जाळ्यामुळे सारा ढाक्का जिल्हा सुपीक बनला आहे. या जिल्ह्यातील सुंदर वनप्रदेश 'मधुपूर' नावाने प्रसिद्ध आहे. अशा निसर्गसुंदर जिल्ह्यातील मुख्य ठिकाणी ढाकेश्वरीचे मंदिर सुंदर अलंकारातील मेरुमण्याप्रमाणे विराजत होते.

ढाक्का शहराच्या वायव्येकडे हे मंदिर आहे. शहरात 'शिवबारी' 'कालीबारी' 'लक्ष्मीनारायण' इ. मंदिरे आहेत. या सर्वांत ढाकेश्वरीचे मंदिर प्राचीन असून भव्य आहे. ते सर्व दृष्टींनी सुंदरही आहे.

प्राचीन काळी बल्लाळसेनराजाचा या मंदिराला राजाश्रय होता असा इतिहासात उल्लेख आढळतो. त्या राजाच्या खजिन्यातून मंदिराची सारी व्यवस्था उत्तम रीतीने संभाळली जात असे. बल्लाळसेनाने मंदिराच्या व्यवस्थेसाठी कायमची सोय म्हणून भरपूर इनामी उत्पन्नही देऊन ठेवले होते. मंदिराच्या पूजेची व्यवस्था पाहाणारे पुजारी वंशपरंपरागत होते. पुजाऱ्यांनीच पूजेबरोबर इनामी उत्पन्नाची व्यवस्था, मंदिराची व्यवस्था, इ. गोष्टी पाहाव्यात अशी कायमची सोय करून ठेवली होती.

ढाकेश्वरी म्हणजे ढाक्क्याची ग्रामदेवता. तेथे वर्षातून चार वेळा नवरात्र उत्सव साजरे होत असत. चैत्र व आश्विन महिन्यातील उत्सव मोठ्या प्रमाणात साजरे होत असत. तर आषाढ आणि माघ मासातील उत्सव त्या मानाने कमी प्रमाणात साजरे होत असत. देवीचे स्थान जागृत होते. सप्तशतीचे पाठ, होमहवन, इ. धार्मिक कार्यक्रम सतत चालू असत.

भगवती कालीमाता ढाकेश्वरीचे स्वरूप महाभयंकर असे आहे. तिचे विक्राळ दात दिसत असूनही ती हसतमुख आहे. ती शवावर नाचत आहे. मुंडमाला घातली आहे. केस मोकळे सोडले असून कपाळ कुंकू व सेंदूर यांनी माखलेले आहे. मुखातून लालभडक नि लांब सडक जीभ बाहेर आलेली आहे. चतुर्भुजा असून एका हातात तिने नुकतेच कापलेल्या शिराचे केस धरले असून त्या शिरमुंडातून रक्ताच्या धारा गळत आहेत. एका हातात खड्ग घेतले आहे तर एका हाताने अभय सूचक आशीर्वाद देत आहे. याच ध्यानाची मूर्ती त्या मंदिरात आहे.

ही अनेकरूपा आदिशक्ती आहे. जगत् निर्माण करणारी आहे. ही प्रथमाशक्ती जगाचे आश्रयस्थान आहे. हिला ब्रह्माची माया म्हटले आहे. नारायणाची नारायणी

किंवा लक्ष्मी म्हटले आहे. शिवाची शक्ती म्हटले आहे. ही पराशक्ती शिवापासून वेगळी नाही. ही जगत्जननी आहे. सर्व देव हिची उपासना करतात. या चित्शक्तीचा विलास म्हणजे विश्व आहे. या आदिशक्तीला शरण गेल्याशिवाय शिवस्वरूपाचे आकलन होत नाही.

अशा या जागृत, संपन्न आणि महान मंदिराच्या वंशपरंपरागत पूजेचा मान चक्रवर्ती घराण्याकडे चालत आला. चक्रवर्ती हे शुक्ल यजुर्वेदी माध्यंदिन शाखेचे काश्यप गोत्राचे ब्राह्मण होत. त्यांच्या अनेक पिढ्यांनी देवीची सेवा केली. भक्ती केली. प्रत्येक पिढीने पुण्याईचा घडा पुढच्या पिढीच्या हवाली केला. कर्माला फळ असतेच. या साऱ्या पुण्याईने साकार होण्याचे ठरविले. पुण्याईने घाई केली तरी प्रारब्धाने वेळ गाठली पाहिजे. पण आता तीही वेळ गाठली होती.

चक्रवर्तीबाबूजींच्या पत्नी सरळ वृत्तीच्या, भोळ्या स्वभावाच्या होत्या. धर्मानुकूल होत्या. धर्मानुष्ठानी पतीच्या प्रत्येक कार्यात त्यांचे संपूर्ण सहकार्य असे. विशाल मंदिराच्या व्यवस्थेत त्यांचा फार मोठा वाटा होता. सारी झाडलोट, सडासंमार्जन, देवीची उपकरणी घासणे, पूजेची तयारी करणे, मंदिराच्या गोशाळेकडे वैरणपाण्यापासून धारा काढण्यापर्यंत सर्व काही करणे, स्वैपाक-नैवेद्य-सण समारंभ अतिथी या गोष्टींकडे लक्ष पुरविणे अशा अनेक कामात आईसाहेबांचा वाटा मोठा होता. कर्तृत्व आणि सेवावृत्ती यांचा मधुर सुसंवाद त्यांच्या ठिकाणी झाला होता. या सर्व कामात कौशल्य होते, टापटीप होती, उरकशक्ती पण होती. याखेरीज त्यांची व्रतवैकल्ये, पूजापाठ, तुळशीच्या प्रदक्षिणा, कालीमातेची उपासना नित्याची असे ती वेगळीच !

अशा सात्त्विक मातेला सुपुत्राचे डोहाळे न होतील तरच नवल ! त्या समाधी लागावी इतक्या शांत बसून राहात. सिद्धासन, पद्मासन सहज घातले जाई. शरीरात कंप सुरू होत असे. चित्तवृत्ती शांत होऊन आनंद होई. या आनंदात कालीमातेची भजने मधुर स्वरात गात असत. आत्मरत स्थितीत काळ जाई. या सर्व गोष्टींच्याकडे चक्रवर्तीबाबूंचे बारकाईने लक्ष असे. त्यांची अध्यात्माची बैठक उत्तम होती. पत्नीच्या या क्रियांचा अर्थ ते समजू शकत होते. कोण्या महान योगीपुरुषाच्या आगमनाच्या या खुणा आहेत अशी त्यांची खात्री झाली. या स्थितीत त्यांनी होईल

तेवढे सहकार्य करून पत्नीच्या वृत्ती सांभाळल्या. त्यांना जीवनाच्या कृतार्थतेची जाणीव होऊ लागली.

**कृतार्थौ पितरौ तेन धन्यो देशः कुलं च तत् ।**
**जायते योगवान् यत्र दत्तमक्षयतां व्रजेत् ॥**

या सुभाषिताचे त्यांना वारंवार स्मरण होई. ज्याच्या कुळात योगीपुरुष जन्माला येतो ते कुळ, ते मातापिता धन्यवान तर होतच पण तो देशही धन्य असतो. बाबूजींना आपल्या कुळातील देवीची उपासना दिसू लागली. पूर्वजांच्या पिढ्यांची त्यांना आठवण होऊ लागली. अनेक पिढ्यांनी या मंदिरात वास्तव्य करून भगवती ढाकेश्वरीची सेवा केलेली होती. त्या सेवेच्या पुण्याईने कालीमातेवरील श्रद्धा आणि भक्ती दृढ होऊन राहिली होती. कुळातील साऱ्या पूर्वजांच्या पुण्याईचा 'प्रसाद' प्राप्त होणार असा विश्वास त्यांना वाटू लागला. त्यांच्या वृत्ती या आंतरिक ज्ञानाने अधिकच संवेदनाक्षम झाल्या. देवीचे स्मरण अखंड राहू लागले. त्यांच्याही व्यवहारात उदासीनता येऊ लागली. त्यांच्या मुखातून देवीची विविध स्तोत्रे बाहेर पडू लागली.

**या देवी सर्वभूतेषु शक्तिरूपेण संस्थिता ।**
**नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः ॥**
**या देवी सर्वभूतेषु मातृरूपेण संस्थिता**
**नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः ॥**

'हे आई ! साऱ्या कुळाचा उद्धार करणारा तुझा पुजारी आम्हाला प्राप्त होऊ दे,' अशी मनोमन प्रार्थना ते करीत असत. नित्याचे व्यवहार यंत्रवत् चालू होते· परंतु भावजगत् मात्र अलौकिक दिव्य आनंदाने भारावले जात होते.

असे होता होता वैशाख महिना सुरू झाला. वसंताचे साम्राज्य सुरू झाले. आम्रफलांनी आम्रवृक्ष डोलू लागले. कोकिळांनी हर्षगान सुरू केले. अशा रम्य ऋतूंत, अत्यंत शुभ मुहूर्तावर चक्रवर्तीबाबूंना कुलदीपक सुपुत्र झाला. संवत् १९४८, शके १८१४, वैशाख शु. १२ रविवार, हस्त नक्षत्री, कन्या राशीमध्ये चंद्र असताना सकाळी १०॥ वाजता हा मुलगा झाला. तो अमृतसिद्धीचा दिवस होता. सकाळच्या वेळी पूजा करीत होते. पूजा समाप्त झाली. आता नैवेद्य समर्पण करून आरती करणार एवढ्यात एक दिव्य ज्योती मूर्तीमध्ये चमकून गेलेली त्यांनी पाहिली. उजव्या

बाजूचे एक पुष्पही खाली पडले. या शुभ संकताने ते हरखले. याच वेळी घरातून कोणाकडून तरी बातमी आली.

'बाबूजी, मुलगा झाला!'

चक्रवर्तीबाबूंनी देवीला नमस्कार केला. साऱ्या वातावरणात आनंदाचे साम्राज्य पसरले. वेळ पाहिली. जन्म टिपण तयार केले. ज्योतिषाकडून जन्मपत्रिका तयार करविली. जन्मपत्रिका पाहून जाणकार मंत्रमुग्ध झाले. अनन्यसाधारण ग्रहयोग पाहून ही साक्षात् योगशक्तीच पुत्ररूपाने साकार झाली असे त्यांना जाणवले. श्रीमत् आद्य शंकराचार्यांच्या दिव्य जीवनाप्रमाणे विरक्त जीवन हा पुत्र घालवणार हे भविष्य त्यांनी स्वतःच सांगितले.

बारशाचे दिवशी अनेक धार्मिक कृत्ये करण्यात आली. अन्नदान मोठ्या प्रमाणात करण्यात आले. सायंकाळी समारंभपूर्वक नामकरणविधी झाला. सुपुत्राचे नाव योगेश्वरचंद्र ठेवले. साखर, पेढे वाटले. दानधर्म केला.

**शिवस्याभ्यन्तरे शक्तिः शक्तेरभ्यन्तरे शिवः।**
**अन्तरं नैव पश्यामि चंद्र चंद्रिकायोरिव ॥**

शिवामध्ये शक्ति आहे आणि शक्तीमध्ये शिव आहे. शिव आणि शक्ती भिन्न नाही ढाकेश्वरी मातेने आपली योगशक्ती शिवस्वरूपी पुत्रद्वारे चक्रवर्ती कुलाला प्रदान केली. धन्य ते मातापिता! धन्य ते कुळ! आणि धन्य तो देश!! जिथे असे "योगेशचंद्र" जन्म पावतात.

## योगेशचंद्राचे बालपण आणि शिक्षण!

योगेश अतिशय सुंदर होता. त्याचा श्यामल, आरक्त गव्हाळी रंग, सर्वांचे चित्त मोहवून टाकीत होता. नाक सरळ तरतरीत होते. कुरळ्या केसाचे जावळ चेहऱ्याच्या सौंदर्यात भर टाकीत होते. डोळे मोठमोठे असून कमळाच्या रेखीव पाकळ्यांसारखे होते. जणू सारे सौंदर्य डोळ्यात एकवटले होते. गोबरे गोबरे गाल सुहास्य वदनाची शोभा द्विगुणीत करीत होते. अशा या बाल श्रीकृष्णासारख्या मोहक मुलाला कोण खाली ठेवणार? जो पाही तो त्याला उचलून घेई. त्याचे पटापट मुके घेई. पण योगेशला ती लगट आवडत नसे. तो लगेच रडून रडून घेणाऱ्याच्या

तावडीतून सुटण्यासाठी जबरदस्त धडपड करी. सौंदर्य हा दृष्टीचा विषय आहे. कवटाळण्या चुरगळण्याचा नाही हे ध्यानात येऊन घेणारा बिचारा योगेशला मोकळा सोडी. अहाहा ! मोकळा झालेला योगेश आनंदाने बेहोष होई. आनंदाच्या बेहोषीतील त्याच्या साऱ्या हालचाली व बाकुल्या पाहाणाऱ्यालाही बेहोष करून टाकीत. खरेच, कविश्रेष्ठ कालीदासाच्या वर्णनाची आठवण होते. भरतासारखा राजबिंडा अवखळ मुलगा ज्या मातापित्यांचे पोटी जन्माला आला ते पितर धन्य होत. तसे योगेशाचे होते.

ढाकेश्वरीचे विशाल मंदिर योगेशाच्या हिंडण्याला, फिरण्याला, व खेळण्याला पुरेसे होई. तो खरा रमून जाई, ढाकेश्वरीच्या समोरच्या सभामंडपात ! कितीही रडत असू दे, मंदिरात नेऊ लागले की तो शांत होई आणि त्याला ढाकेश्वरीसमोर नेले तर हसू खेळू लागे. वडील पूजा किंवा आरती करीत असले की योगेशला तेथे सोडले म्हणजे झाले. तेथून कोठेही तो जाणार नाही, की रडणार नाही वा कंटाळणार पण नाही. सारी पूजा, आरती पाहात बसणार. मनाशी तसे करीत बसणार. सर्व पुण्याई घेऊन ढाकेश्वरीचा कृपाप्रसाद म्हणूनच तो आला होता. याशिवाय तो दुसरे काही करीत बसला असता तरच नवल !

योगेश तैलबुद्धीचा होता. त्याची ग्रहणशक्ती असाधारण होती. पाहून किंवा ऐकून तो जास्त लवकर शिके. पाहून पाहून लहानपणीच त्याने पूजेचे तंत्र बिनचूक उचलले. ऐकून ऐकून किती तरी श्लोक योगेशने अगदी लहानपणीच मुखोद्गत केले होते. त्याच्या सर्व हालचाली, खेळ स्वतःच्या तंत्राने स्वतंत्रपणे असत. अलीकडे वाढत्या वयाबरोबर खोड्याही वाढत चालल्या होत्या. त्याचा मिष्किलपणा चांगलाच वाढला होता. याबरोबरच लहर लागली की मंदिराच्या आवारातच रिकाम्या खोलीत जाऊन, स्वारी डोळे मिटून, बसूनही राहात असे. जेवण्याच्या वेळी आई जेव्हा मोठ्याने हाक मारी तेव्हा कुठे योगेश 'आलो' 'आलो' करून बाहेर येई. एकदा तर त्याला आईची हाक ऐकूच आली नाही. इकडे आई हाक मारमारून योगेश 'ओ' देईना तेव्हा चांगलीच घाबरली. तिने मुकाट्याने हातातले काम सोडले. आणि लागली देऊळभर योगेशला शोधायला. तो त्या कोपऱ्यातील खोलीत बसला असेल ही कल्पना नव्हती. शेवटी निराश होऊन त्या खोलीत आई गेली. तर काय ? योगेश नावाप्रमाणे समाधी लावून बसलेला ! आईने त्याला चांगले

हलविले, हाक मारली तेव्हा तो ताळ्यावर आला. असा प्रकार मधून मधून होत असे.

कधी कधी योगेशची चारचौघात मिसळण्याची प्रवृत्ती पण वाढत असे. अशा वेळी योगेशची विनोदी वृत्ती विशेष आढळून येत असे. योगेश तसा गंभीर प्रवृत्तीचा नव्हता. मूळ प्रवृत्ती खेळकरच होती. त्याच्या सर्व खोड्या विनोदी प्रवृत्तीमधूनच निर्माण होत होत्या. यामुळे शेजारपाजारचे एखादे गाऱ्हाणे येत असे पण त्याचा निकाल विनोदातच लागत असे.

योगेशची मनाची ठेवण मात्र निःस्पृह होती. संग्रह करण्याची त्याला बिलकूल आवड नव्हती. यामुळे लहानपणापासून शब्दाला स्पष्टता आली होती. अन्याय सहन होण्याची गोष्ट तर दूरच पण तीव्र प्रतिकार केल्याशिवाय योगेशला स्वस्थता येत नसे. न्याय अन्यायाचा निर्णय झटकन करता येत असे. ज्याची चूक त्याच्या गळ्यात बांधण्यास योगेश नेहमीच पुढे. हा त्याचा मूळ स्वभाव. यातच मातापित्यांच्या संस्कारांची भर. यामुळे योगेशच्या या वृत्ती पुष्ट नि समर्थ बनल्या.

## गोसेवेचे बाळकडू

ढाकेश्वरीच्या मंदिरात गोशाळा होती. मंदिराला सरकारी इनामी उत्पन्न असल्याने चार जनावरांच्या खर्चाची सोय त्यात होती. वैरणकाडी घरची. जागा मुबलक. धार्मिक प्रवृत्ती. चक्रवर्ती घराण्याला गोसेवेची, व्रतासारखी आवड. म्हणून तर मंदिरातील गोठा गायीवासरांनी भरलेला असावयाचा. घरात दूध भरपूर तर बाहेर सडासंमार्जन भरपूर ! आत व बाहेर मांगल्य ओसंडून भरलेले ! अशा घरात योगेशला गोसेवेचे बाळकडू आईच्या पोटातूनच मिळालेले होते. योगेश खरा रमून जायचा तो गायींच्या खिलाऱ्यात ! कालवडींशी आणि खोंडांशी अवखळपणे मस्ती करण्यात योगेश दंग होत असे.

तो गायीच्या गोठ्यात दिवसातून ४।५ वेळा तरी फेरफटका मारून येत असे. तो मधूनच वासरांचे खुंट्याचे दावे सोडून देई. मुक्त झालेली वासरे मोकाट उधळू लागत. योगेश त्यांच्या चौखुर उड्या मारण्याबरोबर स्वतः नाचे, उड्या मारी. तो स्वतः चांगला दमला म्हणजे मग वासरांना बांधी. गायींच्या जवळ जाई. त्यांची मान व पोवळे खाजवून, कुरवाळून पाठ थोपटी. कधी लाडात आला तर आईच्या गळ्याला

जशी मिठी मारी तशीच गायीच्या गळ्याला मारी. कधी लुसलुशीत गवताचे घास गायी वासरांच्या तोंडी देई. स्वारीच्या मनात आले की गायीच्या पाठीवर थाप मारून एकदम तिच्या सडाला हात घालून दूध येते का पाही. अशी दुधाची आचमने तो बरीच घेत असे. गोठ्यात गेल्यावर अशा हजारो गोष्टी त्याच्या चालत असत. गुरांना पाणी पाजणे, वैरण घालणे, त्यांच्या पुढचे गबाळ काढणे, शेण काढून घेणे, या कामाची त्याला हौस असे. वडील धार काढण्यासाठी निघाले की योगेश पळत पुढे जाऊन वासराला सोडी. त्यावेळी त्या गाईचे वात्सल्याने हंबरणे आणि वासराचे अनावर धावपळ करीत शेपटी वर करून, मातेकडे धावत सुटणे पाहून योगेशचे डोळे आनंदाने भरून येत असत. मातृत्वाचे आणि वात्सल्याचे इतके विलोभनीय दृश्य दुसरे सापडणे कठीण आहे. योगेशची खरी तारांबळ उडे ती पिणाऱ्या वासराला गायीपासून ओढताना ! यावेळी वासराची आणि योगेशची रस्सी-खेच सुरू व्हायची. या खेचाखेचीत कधी योगेश फरफटत जाई तर कधी वासरू ! पण अशा वेळी आईवडिलांची मदत मिळून योगेश विजयी होई. गोपालकृष्णांची आठवण योगेशच्या या प्रसंगातून न झाली तरच नवल !

## व्रतबंध आणि वर्तन

बाबूचक्रवर्तींच्या कुटुंबात बरेच वर्षांनी हा मुलगा झाल्याने त्याचे सारेजण कोडकौतुक करीत असत. नवसाचा, कालीप्रसादाचा योगेश, सर्वांचा लाडका होता. योगेश ढाकेश्वरीचा प्रसादपुत्र होता.

योगेशचे हे शैशव संपून बालकाल सुरू झाला. प्राथमिक शिक्षणाचा प्रारंभ संपून नवा टप्पा सुरू झाला. पहिल्यापासूनच त्याला पुस्तकी अभ्यासात लक्ष घालायचा कंटाळा होता. गाडीभर अभ्यास असू द्या योगेश तो चुटकीसरशी संपवून टाकी. बुद्धीची कुशाग्रता त्याला मंदगती देऊच शकत नव्हती. तो अभ्यासात मागे नव्हता तसा अक्षरलेखनातही मागे नव्हता. अक्षर इतके वळणदार होते की त्याचे शिक्षक अभिमानाने याच्या सुंदर अक्षराचा उल्लेख, सर्वांपुढे सप्रमाण करीत असत. काहींचे वळणदार अक्षर घोटून घोटून होते पण काहींचे मूळचेच वळणदार अक्षर असते. योगेशची स्थिती दुसऱ्या प्रकारातली होती.

योगेशचा व्रतबंध आठव्या वर्षी झाला. देवीच्या मंदिरात देवीसमोर व्रतबंध

लागून योगेश गायत्रीच्या महामंत्राचा अधिकारी झाला. जपजाप्य, अनुष्ठान, पूजा यासारख्या धार्मिक विधीचा अधिकार प्राप्त झाल्याने देवीच्या पूजेची सुवर्ण संधी त्याला मिळू लागली, नित्यकर्म यथासांग करण्याकडे त्याचा विशेष कल होता. यामुळे संध्येपासून यथासांग पूजेपर्यंत आणि ब्रह्मकर्मापासून वैश्वदेवादिपूजांसह यज्ञोपवीत धारणेपर्यंतची कर्मे योगेश वडीलांकडून फार अल्पावधीत शिकला. याशिवाय मंदिरात मोठमोठी धार्मिक अनुष्ठाने, यज्ञ, याग होत असल्याने योगेशच्या धार्मिक संस्कारांचे कोष सतत भरत चालले. गायत्रीच्या जपानुष्ठानाने आणि सप्तशतीच्या नित्य पाठाने योगेशाची हृदयस्थ महाशक्ती अतीव प्रसन्न राहू लागली.

विविध कर्मांच्या मुळाशी शास्त्रनिष्ठा असली तरी योगेशाचा स्थायीभाव भक्तिप्रेमाचाच होता. यां सर्व कर्मातून ठिकठिकाणच्या देवदेवतांच्या स्तुतीने योगेश रोमांचित होई. आनंदाश्रूंनी डोळे भरून येत आणि अतीव भक्तिप्रेमाने कंठ दाटून येई. देवदेवतांच्या मंत्रामंत्रातून स्तुतीची भावमधुर कारंजी उसळताना पाहून त्याच्या हृदयवीणेच्या तारा संवेदनानी स्पंदित होत असत.

देवीची नित्य सायं आरती म्हणजे रोजचा छोटासा समारंभच असायचा. अनेक शहरवासीय भक्तमंडळी या आरतीला नित्यनेमाने उपस्थित असत. योगेश या आरतीमध्ये आपल्या गोड व भावपूर्ण स्वराने सारे वातावरण विद्युत्लहरींच्या संचाराप्रमाणे भारावून टाकी. ढाकेश्वरी मातेचे हे स्थान जागृत असल्याचा अनुभव सर्वांना येई. योगेश यावेळी बाह्यजगत् विसरून जाई. तन्मयतेमुळे त्याच्या स्वरात, चर्येत आणि दृष्टीत दिव्य अनुभूती झळकू लागे.

ढाकेश्वरीच्या मंदिरात भक्तांची ये जा सतत चालू असे. प्रवचन, भजन, कीर्तन इत्यादि कार्यक्रमही मधून मधून होत असत. भजनामध्ये योगेश रंगून जाई. या भजनामधून अनेक पदे, दोहे, श्लोक व चौपाये त्याला ऐकायला मिळत असत व सहज पाठ होत असत. तो स्वत: कधी लहर लागली की एकटाच भजन करू लागे. त्याचे भजन सुरू झाले की येणारा जाणारा थांबून राही. योगेश गाण्यातील भावपूर्ण पंक्ती पुन्हा पुन्हा आळवू लागला म्हणजे त्याच्या आवाजाला धार चढे. गीतामध्ये जसजसा रसपरिपोष होई तसतसा योगेशचा कंठ भरून येई. या अवस्थेतील स्वरपंक्तींनी मंदिरातील सारे वातावरण चैतन्याने भरून जाई. गोठ्यात बांधलेल्या गायी अधीरतेने उठून उभ्या राहात. कान टवकारून ऐकू लागत. वासरे तर जवळपास येऊन योगेशचे

गाणे शांतपणे ऐकत उभी राहात. आई, वडील, बहिण, भाऊ या गाण्याने आनंदून जात. पुढे गेले तर त्याला संकोच वाटेल म्हणून दुरून, आडून ते त्याचे गाणे ऐकत उभे राहात. मातापित्याचे हृदय उचंबळून डोळ्यावाटे वाहू लागे.

**कुलसुपूत जान्यो परौ । देखी सुभलछन गात ॥**
**होनहार बिरवानके । होत चिकने पात ॥**

मुलाचे पाय पाळण्यात दिसतात याची प्रचीती यामधून सतत येत होती.

## पशुबलीचे प्रारब्धकर्म

बंगालमध्ये जशी काली उपासना विशेष आढळते त्याप्रमाणे पशुबली पद्धतीही बंगालमध्ये विशेष आढळते. ढाकेश्वरी देवीला पशुबली अर्पण करणारे भक्त काही कमी नव्हते. ही पशुबली पद्धती यज्ञातून आलेली असून कामनिक हेतूने केली जाते. यज्ञशास्त्रदृष्ट्या ही पद्धती निर्दोष असली तरी निष्काम पूजेला तितकी मंजूर नाही. सर्वसाधारण जनतेला आपापल्या कामना पूर्ण करून घेण्यासाठी या उपासनेची इच्छा झाली तर त्यांच्या श्रद्धेला धक्का न देता, व्यक्तीच्या भावनेची व परमेश्वराच्या सर्व व्यापकत्वाची बुद्धी ठेवून त्यावर मौन उचित ठरेल.

ढाकेश्वरीपुढे हे बली अर्पण करण्याचे काम आजपर्यंत स्वतः बाबूजी, योगेशाचे वडील करीत आले होते. त्यामुळे त्या दृश्याची सवय योगेशला लहानपणापासून झाली होती. प्रथम देवीची नेहमीप्रमाणे पूजा होते. गंध, हळद, कुंकू, पुष्प, माला अर्पण होते. आणि नैवेद्य समर्पणाचे वेळी सर्वसाधारणपणे जसे नारळ फोडले जातात तसा बळी अर्पण केला जातो. यावेळी आधी त्या पशूची पूजा, हार वगैरे घालून होते. बळी देण्याची जागा मंदिरात, देवीसमोर होती. सभामंडपाचे बाहेरील आवारात हा ओटा होता. हीच ती बलीवेदी असे. या वेदीवर पशूला बांधण्यासाठी खुंटी रोवलेली, साखळी बांधलेली व पशूला कापण्यासाठी लाकडी ओंडका ठेवलेली ठरलेली जागा असते. पशू कापण्याचे हत्यारही मंदिरातच असे. या सर्व साधनांना हळदकुंकू, फूल अर्पण केले जाते. ही सर्व तयारी झाली व देवीची पूजा झाली म्हणजे यजमान मंडळीसह पुजारी पूजेचे साहित्य घेऊन या वेदीपाशी येतात. त्या पशूला उत्तम खाद्य पदार्थांचा नैवेद्य अर्पण होऊन पुजारी शस्त्रपूजा करून पुढे होतात. तोंपर्यंत माहितगार मंडळी; मग ती यजमानांचेपैकी असोत किंवा मंदिराचे परिसरातील असोत,

त्या पशूला बांधून आडवे पाडतात. त्याची मान त्या लाकडी ओंडक्यावर घट्ट दाबून धरतात. पशूने मोठा आवाज वा कानाची फडफड करू नये म्हणून तोंड व कान धरून ठेवतात. मग विधिवत् ते शस्त्र पशूच्या मानेवर फिरते. ढगातून चमकून जाणाऱ्या विद्युल्लतेप्रमाणे ती चमचमणारी सुरी अदृश्य होते आणि रक्ताच्या चिळकांड्या धो धो वाहू लागतात. हे दृश्य योगेशने जेव्हा प्रथम पाहिले तेव्हा तो कावराबावरा झाला. त्याने आपले डोळे घट्ट मिटून घेतले. पण त्यानंतर मात्र नित्य परिचित दृश्याने डोळे निर्ढावले. मग या दृश्याबद्दल मन घट्ट झाले. आता या प्रकाराकडे तो निरखून शांतपणे टक लावून पाहू लागला.

योगेशच्या वाढत्या वयाबरोबरच वडिलांचे हे काम मधून मधून त्याचेकडे येऊ लागले. त्याला पहिल्या दिवशी बळी कापताना शहारले होते–पण पुढे मात्र तसे कधीच झाले नाही. कापलेल्या बळीचे मुंडके देवीपुढे अर्पण करावयाचे व उरलेले धड प्रसाद म्हणून यजमानाला देऊन टाकावयाचे. यामध्ये हात रक्ताने भरत असत. योगेश हे कर्म प्रारब्धाने प्राप्त झालेले समजून करीत असे. "यथा नियुक्तोस्मि तथा करोमि" या न्यायाने करीत असे.

यासारखेच आणखी एक प्रारब्धकर्म योगेशच्या जीवनात येऊन गेले. बंगाली माणसांच्या आहारात माशांचा सर्रास वापर होत असतो. हा आहार बंगाली ब्राह्मणांचाही असतो. मासे त्यांना निषिद्ध वाटत नाहीत. किमान बंगाली ब्राह्मण तरी मानीत नाहीत. योगेशच्या बाल जीवनात, गुरूची दीक्षा मिळेपर्यंतच्या जीवनात ही गोष्ट घडत आली. अज्ञानाने, परंपरेने, चालत आलेले कुलाचे दोष योगेश आपल्याही पदरी बांधीत होता. याच्या निषिद्धत्वाची जाणीव होती तरी प्रखरतेचा अभाव आणि परंपरेचा प्रभाव या निषिद्ध कर्मांना रोखून धरू शकत नव्हता. याची खटकणारी जाणीव पुढील जीवनात स्वामींनी अनेक वेळा प्रकट केली असली तरी बालजीवनात मात्र ही प्रखरता नव्हती, ही तीव्र कल्पना नव्हती. तो अत्यंत सरळ प्रवृत्तीचा असल्याने चालत आलेले, आपल्यापुढे दत्त म्हणून उभे राहिलेले काम नि:संशय मनाने करीत असे. हा सरळपणा देवापाशी लवकर रुजू होतो. कर्माचे गुणदोष त्यातील भावनेमुळे बदलत असतात. यजमान कामनापूर्तीसाठी बळी देतील पण योगेश मात्र निष्काम कर्माचा पाठ गिरवीत होता. कसेही असले तरी या गोष्टी योगेशच्या बालजीवनात घडल्या हे मात्र खरे.

# शालेय जीवनातील चमक

योगेशचे शालेय जीवन सुरू होऊन ५-६ वर्षे झाली असतील. त्या काळातील एक घटना आहे. अभ्यासात योगेशचा नेहमी उत्तम क्रमांक असे. उत्तम बुद्धी, उत्तम धारणा, उत्तम ग्रहणशक्ती आणि याचबरोबर उत्तम हस्ताक्षर या चतुर्विध पुरुषार्थांच्या जोरावर योगेश सदैव उत्तम गुण मिळवून उत्तीर्ण होत असे. यासाठी त्याला अभ्यासाशी झगडावे लागत नसे. अभ्यासाचे सर्व विषय त्याच्या डोक्यात तक्रार न करता गुण्यागोविंदाने येऊन राहात असत. यानेच त्या विषयांपैकी एखाद्या विषयाकडे पाठ फिरविली तर बिचाऱ्या विषयाला हिरमुसल्या चेहऱ्याने तेथेच बसून रहावे लागे. पण एखाद्या प्रसंगी जर कोणत्याही विषयाला आवाहन केले तर त्या विषयाची योगेशपुढे उभे राहाण्याची कोण धांदल उडत असे.

त्याचे एकदा असे झाले की इतिहासाचा गृहपाठ करून आणण्यास शिक्षकांनी योगेशच्या वर्गाला बजावले. इतिहासाचे शिक्षक कडक शिस्तीचे होते. त्यांचा गृहपाठ विद्यार्थी न विसरता करून येत. दुसऱ्या दिवशी योगेशने गृहपाठ काही करून नेला नाही. इतिहासाचा तास सुरू झाला. शिक्षक आले, न बोलता गृहपाठ पाहाण्यास त्यांनी सुरुवात केली. एकेकाची वही पाहात ते पुढे चालले होते. होता होता ते योगेशपाशी आले. योगेश उभा राहिला. गृहपाठ आणला नाही हे वाक्य त्याने नम्रपणे, आदरपूर्वक पण निर्भयपणे उच्चारले, शिक्षक जरा स्तंभित झाले. त्या गोंडस विद्यार्थ्याला पाहून म्हणाले “ काय चक्रवर्ती ? आज जे लिहून आणावयास सांगितले तो धडा घरी वाचला होतास का ?”

योगेशने मानेनेच होकार दिला. “काय सांगितले आहे त्या पाठात ? सांग पाहू.” आज आपली सुटका सहजासहजी दिसत नाही हे योगेशाला कळून चुकले. त्याने स्वतःला सावरले. झुकलेली मान ताठ केली. मौनवाणीला मोकळे केले. आणि वाचलेले धडे धडाधड म्हणून दाखवले. हे सोपे नाही. पण योगेशने ते म्हणून दाखवले. दबलेली स्फूर्ती उफाळून वर आली. स्टेशनातून बाहेर पडणाऱ्या गाडीचा वेग मंद असतो. तशा मंद वेगने योगेशने सुरवातीची ५-६ वाक्ये उच्चारली आणि ! त्यापुढे वाक्यावाक्याला जो वेग येत गेला तो पाहून वर्गातील मुले चकित झाली. ४ थी मधल्या छोट्या विद्यार्थ्याचे ओघवते भाषण ऐकून शिक्षक अवाक झाले. शब्दाशब्दामधले चढउतार, मानेचे इशारे आणि हातवारे या अभि-

नयामुळे योगेशचे सौंदर्य खुलले होते. भावनांच्या छटा डोळ्यामधून आणि चेहऱ्यावरील हावभावावरून स्पष्ट होत होत्या. त्या दोन पाठातील सारे प्रसंग योगेशने बिनचूक म्हणून दाखविले. राहिलेल्या विद्यार्थ्यांचे गृहपाठ पाहाण्यास शिक्षक न गेल्याने त्यांना हायसे वाटले. पण त्यापेक्षा विशेष हे की वर्गाचे सारे वातावरण बदलून गेले. शिक्षकांच्या मनावर योगेशच्या भाषणाचा प्रभाव पडला. त्या भाषणाच्या प्रवाहात ते स्वतःला पूर्ण विसरून गेले. तास संपला तरी भाषण संपले नव्हते. सर्वजण एकाग्रतेने ऐकत होते. भाषणाचा वेग, भाषेवरील प्रभुत्त्व, भावनेचा जोर, अभिमानाची जोड शेवटच्या वाक्यापर्यंत तशीच टिकून राहिलेली होती. आपल्या वर्गात असा वक्तृत्त्व गुणसंपन्न हुशार विद्यार्थी आहे हे पाहून शिक्षकांना धन्यता वाटू लागली..

आपले भाषण संपवून योगेश खाली बसला. क्षणभर भाषणाच्या प्रवाहाने भारलेला वर्ग शांत राहिला. पण दुसऱ्याच क्षणी जो टाळ्यांचा कडकडाट झाला त्याने सर्व शाळेला ही घटना नंतर विदित झाली. इतिहासाचे शिक्षक योगेशजवळ गेले आणि मोठ्या आनंदाने त्यांनी शाब्बास, शाब्बास म्हणत त्याची पाठही प्रेमाने थोपटली. ते वर्गातून बाहेर पडले. साऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्या वर्गबंधूचे कौतुक आपल्या इच्छेनुसार त्याला कडकडून भेटून, हस्तांदोलन करून पाठ थोपटून केले. सर्वांचा गराडा त्याच्याभोवती पडला होता. तो केवळ सुहास्य वदनाने सर्वांना प्रत्युत्तर देत होता. त्या दिवसापासून योगेश शाळेत प्रसिद्ध झाला. शिक्षक त्याचा आदर करू लागले. या छोट्याशा पण बालजीवनात होत असलेल्या कीर्तीचा, योगेशवर काहीच परिणाम झाला नाही. प्रसिद्धीची यत्किंचित् अपेक्षा त्याच्या ध्यानीमनी नव्हती.

'रम्य ते बालपण' असे वाटण्यासारखा हा काळ होता. आईवडिलांचे छत्र डोक्यावर होते. खेळण्या बागडण्याचा काळ मजेत चालला होता समाजात धर्माला व मंदिराला प्रतिष्ठेचे स्थान होते. देवस्थानच्या इनामी शेतीचे उत्पन्न येत होते. योगेशचा लहान भाऊ आठ वर्षांचा झाला होता. मंदिरात पुन्हा एक मंगल कार्य या काळात झाले. छोट्या भावाची मुंज झाली. आता मंगल कार्य बरेच दिवसांनी होणार असल्याने मोठ्या थाटामाटाने मुंज झाली. चार आठ दिवस समारंभाच्या वातावरणात निघून गेले. पुन्हा नित्याचे शांत वातावरण सुरू झाले. पण भाग्यचक्राची गती बदलती असते. मग तो राजा असो नाहीतर चक्रवर्ती असो.

## प्रतिकूल प्रारब्ध हीच संधी !

योगेश आता बारा वर्षांचा झाला होता. बाबूजींच्या मार्गदर्शनाखाली त्याची तयारी होत होती. बाबूजी काही कामानिमित्त परगावी गेले तर योगेश घरची सारी जबाबदारी संभाळीत असे. मंदिर व्यवस्थेत तर काही उणीव पडत नसे. परंतु इतर जबाबदाऱ्यांमध्ये सुद्धा योगेशाचे कर्तृत्व थिटे पडत नसे. मंदिराची इनामी जमीन होती. जमिनीत भाताचे आणि तागाचे उत्पन्न होत असे. यावर देखरेख ठेवून त्यातील सर्व व्यवहार योगेश वडिलांच्या पावलावर पाऊल टाकून संभाळीत असे. छोटा भाऊसुद्धा हाताशी येऊ लागला होता. मंदिर व गायी, घर व बाजारहाट इत्यादि क्षेत्रातील सांगितलेली कामे तो चांगली पार पाडू लागला. धाकटी बहीण आईच्या हाताखाली तयार होत होती. कोणाचीही सहज दृष्ट लागावी असा हा सोन्यासारखा संसार होता.

इतर कोणाचीही दृष्ट लागण्यापूर्वीच गतीमान काळाची मात्र दृष्ट या सोन्याच्या संसाराला लागली. बाबूजींची प्रकृती एकाएकी बिघडली. सुरवातीसुरवातीला या कर्त्या पुरुषाने आपल्या प्रकृतीकडे दुर्लक्ष केले. अंगात ताप असूनही नित्याचे आन्हिक चुकत नसे. ४।२ दिवसांनी का होईना पण शेतावरची चक्कर चुकत नसे. बाबुजींना हे कष्ट फार महाग पडले. त्याला त्यांचाही इलाज नव्हता. सर्व जबाबदारी एकट्यावर पडलेली होती. स्वभाव कष्टाळू आणि प्रारब्धकर्महो बलवत्तर होते.

एकदा बाबूजी शेतावर गेले होते. अंगात ताप होता. पोटात अन्न नव्हते. भाता तागाची शेते म्हणजे पाण्याचिखलाचे आगरच. त्या दलदलीतून जाणे येणे प्रकृतीला परवडले नाही. घरी कसेतरी येऊन पोहचले आणि दारातच चक्कर येऊन कोसळले. वेळ संध्याकाळची होती. आई व योगेश कोण पडले म्हणून पाहाण्यासाठी धावत गेले. जाता जाता कण्हण्याचा आवाज कानावर पडला. तो बाबूजींचा आवाज ऐकून दोघे चरकले. जवळ जाऊन त्यांनी त्यांची शक्य ती सेवा केली. आधार देत देत घरात आणले. अंथरुण टाकून त्यावर त्यांना निजविले. त्या क्षणापासून घराचे वातावरण बदलून गेले. घरातील आनंद मावळला. ती जागा गांभीर्याने घेतली.

बाबुजींचा ताप कमी जास्त होई. पण खालच्या नैसर्गिक पातळीवर फार

वेळा येत नसे. त्यातच इतरही व्याधींनी उचल खाल्ली. क्षीण झालेल्या प्रकृतीला रोगाचा प्रतिकार होईना. त्यांच्या अंथरुणाजवळ योगेश नाहीतर आई सतत बसून असत. जे जे शक्य होते ते ते उपाय चालू होते. सप्तशतीचे पाठ सुरू झाले. योगेशाचा धाकटा भाऊ व धाकटी बहीण भांबावलेल्या नजरेने अनेक वेळा वडिलांच्या अंथरुणाजवळ येऊन थांबून राहात असत. त्यांना कुठेतरी नादी लावण्यासाठी काही तरी काम सांगितले जाई व ते बिचारे तेथून निघून जात असत. तिकडे त्यांचे मन लागत नसे म्हणून ती मुले पुन्हा परत येऊन उभी राहात असत.

योगेशाची प्रकृती मात्र एकाएकी प्रौढ आणि गंभीर झाली. त्याच्या अंतर्मनाला कठोर भविष्य कालाची मूक जाणीव होऊ लागली. आईच्या तर तोंडचे पाणीच पळाले. या भयंकर परिस्थितीच्या जाणीवेने योगेश मनाने कठोर झाला तर आई कोमल झाली. आईची ही स्थिती ध्यानात घेऊन योगेश तिची समजूत घाली. तिला धीराचा उपदेश करी. आपल्या घरात आजोबांचे असेच झाले होते हे पूर्वी त्याने वडिलांकडून ऐकलेले होते. अशा वेळी आईला सांगून तिच्या मनाची तयारी कशी होईल हे तो पाहू लागला. योगेशचे आजोबा म्हणजे बाबूजींचे वडील वयाच्या ३२–३३ व्या वर्षी अल्पशा आजाराने अल्पायुषी झाले होते. बाबूजींच्या आजोबांचे आयुष्य सुद्धा ३२–३३ वर्षांचेच होते. ही अल्पायुषी परंपरा होती.

प्रारब्धापुढे मानवी प्रयत्नांचा इलाज चालत नाही. हे ऐकताना आईच्या काळजाचे पाणी पाणी होई. तिला हे दुःख आवरणे अशक्य होऊन जाई. आपल्या छोट्या मुलीकडे पाहून तर ती कासाविस होई.

पण हे सारे दुःख गिळून तिने शक्य ती सर्व सेवा अविरत चालविली होती. पुन्हा आयुष्यात ही सेवा मिळणार नाही या बुद्धीने तिने रात्री झोप घेतली नाही की दिवसभर कशाची चिंता केली नाही. शेवटी व्हायचे तेच झाले. याच आजारात बाबूजींनी सर्वांचा निरोप घेतला. वयाच्या अवघ्या ३२–३३ व्या वर्षी बाबूजी देवाघरी निघून गेले.

चक्रवर्ती कुटुंबावरचे छत्र एकाएकी नाहीसे झाले. अर्धा संसार टाकून ते निघून गेले. योगेश मनाने कठोर झाला होता तरी अंतःकरणाने मात्र यावेळी

त्याला बेचैन करून टाकले. ही अंतःकरणाची अस्वस्थता बाहेर टाकल्याशिवाय गत्यंतर नव्हते. आईच्या गळ्यात पडून त्याने आपला गळा मोकळा केला. ती लहान भावंडे सुद्धा आईच्या अंगावर पडून ओक्साबोक्शी रडली. जसजसा एकएक दिवस उजाडत गेला तसतसे दुःखाचे कढ शांत होऊ लागले. प्रारब्ध अटळ आहे. ते भोगणे हाच एकमेव उपाय त्यावर आहे. या विचाराने ही शांतता आली. हे कटुसत्य अनुभवाने सर्वांनी मान्य केले.

या दुःखी संसारात योगेशाच्या चित्तवृत्ती करपून जात होत्या. वासनेचे बीज होरपळून जात होते. तो याच सूत्रामधून सर्वांशी बोलू लागला. या नित्य विचाराने त्याने आपली मूळ स्थिती लवकर गाठली. या दुःखावर तो आरूढ झाला. सुख दुःखाचे आवेग असतात. या चित्ताच्या सागरावरील त्या लाटा असतात. त्या विचाराने आवराव्या लागतात. या विचाराने योगेश शांत झाला.

ही प्रचंड आपत्ती जेव्हा कोसळली त्याचवेळी दुसऱ्या आपत्तीने त्यात भर घातली. योगेशला शिक्षणाकडे पाठ फिरविण्याची पाळी आली तरी त्याने अशा कठीण परिस्थितीमध्ये एकाएकी शाळा सोडली नाही. नियमित अनियमित करीत एक एक वर्ष पदरात पाडीत होता. त्याच्यावर तो थोरला म्हणून सर्व जबाबदारी येऊनच पडली. अशा काळात एकेक संकट एकामागून एक येत होते. मधेच दुष्काळ पडला. शेतीचे उत्पन्न मिळाले नाही. या मुलाला दाद न देणारे शेतकरी निघाले. आर्थिक परिस्थितीने तोंड फिरवले. मंदिरात देवीपुढे येणाऱ्या उत्पन्नावर भागणे हे अशक्य झाले. आणि योगेशला नोकरीचा विचार करावा लागला. हायस्कूलमध्ये शिक्षण चालू होते. इंग्रजीचे ज्ञान होऊ लागले होते. त्यावेळच्या ५ व्या इयत्तेत योगेश होता. ( सध्याची ९ वी इयत्ता ) त्याची बुद्धिमत्ता चांगली होती, शिकण्याची पण खूप इच्छा होती. वडील असते तर काहीच अडचण आली नसती. खूप खूप शिक्षण झाले असते पण मग प्रारब्धाला अर्थ राहिला नसता.

आर्थिक टंचाई दूर करण्यासाठी योगेशने एका तागाच्या गिरणीत कारकुनाची नोकरी पत्करली. विदेशी ज्यूट फॅक्टरी मध्ये योगेश जाऊ लागला. आता त्याच्या स्वतंत्र वृत्तीला अनेक बंधनांनी जखडून टाकले. दिवसभरात मान वर करायला योगेशला फुरसत मिळेनाशी झाली. जेव्हा मान वर करता येत नाही तेव्हा मन फार हालचाल करते. कधी ते दारूण निराशेने पार खाली जाते तर कधी महत्त्वाकांक्षेने अतिशय उंच जाते.

योगेश आशावादी होता. महत्त्वाकांक्षी होता. संकटाच्या पर्वतांना पाहून डगमगणारा तो नव्हता. उलट संकटे म्हणजे त्याच्या कर्तृत्वाची कसोटी होती. त्याच्या मनाची आंदोलने खवळलेल्या सागराच्या प्रचंड लाटांप्रमाणे आकाशाला गवसणी घालू लागली. तो जीवनमुक्तीचा विचार करू लागला. अशा दु:खमय संसारात सुखाचा लवलेश सांपडणे अशक्य आहे हे त्याच्या मनाने पक्के घेतले. संसार सुखाचा असतो, हा भ्रम आहे याची त्याला खात्री पटली. कडू कारले कितीही साखरेत घोळले तरी ते कडूच असते, याबद्दल तो नि:संशय होता. तरीही तुपाची फोडणी आणि विविध मसाले घालून ते कडू कारले मिटक्या मारीत खाणारे असतात. थोडे नाही, फार असतात. योगेश त्यांच्यापैकी नव्हता. त्याच्या बुद्धीत गोड ते गोड होते व कडू ते कडू होते. खरे आणि खोटे यांच्यातील स्पष्ट फरक तो पाहात होता. तो इतका स्पष्ट होता म्हणून सर्वांवर मात करू शकत होता.

या काळात त्याची ढाकेश्वरीची पूजा तंत्रापेक्षा मंत्राने चाले. मंत्रापेक्षा मनानेच चाले. तो आपल्या शुद्ध हृदयकुंडातले निर्मल जल नयनपात्रातून भरून आणी. आपल्या कष्टाचे चंदन उगाळी. उत्तमोत्तम भावसुमनांच्या ओंजळी अर्पण करी. श्वासोच्छ्वासाचा जप करी. पुलकित झालेल्या रोमरोमांच्या अक्षदा अर्पण करून मनाला अमन करणे हाच साष्टांग नमस्कार घाली. अशा पूजेला कधी खूप वेळ लागायचा तर कधी क्षणार्धांत पूजा संपायची. तर कधी तो भावाकडे पूजा सोपवून देई. त्याचेवर ढाकेश्वरीमातेची पूर्ण कृपा होती. तिच्या भक्तिप्रेमात तो आतून धुंद असे. त्याचे सारे वागणे आतील प्रेरणेने नियंत्रित होते. त्यामुळे वागताना व बोलताना योगेश निश्चित असे आणि निश्चिंतही असे.

बाह्यत: योगेशचे जीवन व्यवहाराला धरून चालू होते तरी आतील विचार मात्र या व्यवहाराविरुद्ध बंड करून उठले होते. प्रपंचातील अल्प अनुभवांनी आणि बंधनांनी त्याला विवाह न करण्याची इच्छा होऊ लागली. जन्मजात विरक्तीच्या वेलीचा यावेळपर्यंत खूप विस्तार वाढला होता. यामुळे वित्तेषणा, दारेषणा आणि लोकेषणा यांचा मागमूसही उरला नव्हता. योगेशची ही विरक्ती संपूर्ण आयुष्यभर तर टिकलीच परंतु जीवनाच्या शेवटच्या क्षणापर्यंत प्रखरपणे तेजस्वी राहिली.

त्याच्या हृदयात एकमेव ध्यास लागला होता तो भगवतीच्या दर्शनाचा. जिच्या

शक्तीने साऱ्या विश्वाची जडण घडण होते, त्या शक्तीची ओळख व्हावी म्हणून तो शोध घेत होता. दुष्प्राप्य अशा या एकमेव मूळ तत्त्वाची प्राप्ती त्याला हवी होती. हा एकच ध्यास लागला होता. त्या अनुसंधानाने तो अंतर्मनाच्या विश्वकुंजात वावरत होता. वडिलांचा मृत्यू, प्रपंचाची जबाबदारी, नोकरीचे बंधन यामुळे प्रौढपणा आणि गांभीर्य योगेशमध्ये आले होते. त्यामध्ये मानसिक स्थितीने त्याला मूक केले.

या अंतर्मुखतेने तो फार कमी बोलू लागला. त्याची अंतःस्थिती एका टोकाला जात होती तर बलवान प्रारब्धाचा ताण दुसऱ्या टोकाला पोचला होता. यामुळे अंतःकरणाची व्याकूळता वाढत होती. तो ही व्यथा देवीसमोर मोठ्या काकुळतीने प्रकट करी. कोणी आसपास नाही असे पाहून अश्रुपूर्ण डोळ्यांनी प्रार्थना करी. "आई मला रस्ता दाखव! पुढे घेऊन जाणाऱ्यांची भेट करून दे! मला या सर्वांतून मुक्त कर. आई! तुझ्याशिवाय मला कुणाचाही आधार नाही. कुणाचाही भरोसा नाही! आई! आई!!"

योगेशच्या या मनस्थितीचा अंदाज त्याच्या आईला चांगलाच आला होता. लहानपणापासूनच हा अलिप्त प्रवृत्तीचा आहे. त्याला कोणाचीही लगट आवडत नसे. तो या प्रपंचाच्या जंजाळामध्ये पडणार नाही. तो एक दिवस घर सोडून हिमालयात जाणार. याची तिला जाणीव होती. म्हणून ती त्याचेवर फार फार प्रेम करी. आपल्या प्रेमापोटी कदाचित् त्याच्या विचारात बदल झाला तर होईल, अशी तिची भाबडी समजूत होती. तिने त्याला कधी विरोध केला नाही. जाणीव ठेवून त्याला आपल्या प्रेमाच्या पांघरुणात झाकून घेण्याचा नेहमी प्रयत्न केला.

तरीसुद्धा तिच्या आंतरिक वेदना तिला मधून मधून अस्वस्थ करीत असत. या विचार तंद्रीमध्ये ती तासन् तास बसून राही. योगेशचे वडील असते तर हे सहन करणे तिला शक्य होते. पण ते तर स्वर्गवासी झालेले. योगेश थोरला मुलगा. सारा संसार मध्यामध्ये तुटलेला. यापुढे तिचे विचारचक्र बंद होई आणि शून्य दृष्टीने कुठेतरी एक टक लावून ती पाहात बसे. आद्यशंकराचार्यांची आई जशी व्याकूळ होत असेल, तशीच ही आई व्याकूळ होत होती. त्यानंतर अशी घटना येथेच घडत होती.

आपल्या आईची ही स्थिती जेव्हा योगेशच्या नजरेस पडे तेव्हा तो आईला

खूप समजावून सांगे. तुला दुःख देण्यासाठी मी हे करीत नाही. एकट्या माझ्याच नव्हे तर सर्वांच्या, अगदी बाबुजींच्यासुद्धा सर्वांच्या सुखासाठी, परम कल्याणासाठी मी असे करण्याचे ठरवीत आहे. मला संसार करण्याची इच्छाच होत नाही. असे पाहा स्वेच्छेने जरी संसार केला तरी किती तापदायक आहे. मग अनिच्छेने केला तर केवढा अनर्थ ओढवेल याची मला चांगलीच जाणीव होते. तू ही विचार कर. असा संवाद मधून मधून चालत असे. आई आपली असाह्यता प्रकट करी. पण योगेशचा निग्रह ढळत नसे.

याच काळात वंगभंगाची चळवळ सुरू झाली. संपूर्ण देशभर या चळवळीचे लोण पोहचले होते. बंगालमध्ये तर या चळवळीचे स्वरूप उग्र होते. महत्वाकांक्षी, क्रांतीकारी तरूण या चळवळीमध्ये हिरीरीने सामील होत होते. चळवळ टिकून राहाण्यासाठी कार्यकर्त्यांनी भूमिगत कार्यकर्त्यांची यंत्रणा आखली होती. इंग्रजांची दडपशाही शिगेला पोहचली होती. इंग्रज अधिकारी रस्त्यावर गोळ्या घालून बंगाली तरुणांमध्ये दहशत निर्माण करीत होते. लाठीमार व धरपकड तर सर्वत्र चालू होती. बंगाली क्रांतिकारकसुद्धा इंग्रजी हुकुमशाहीला पुरून उरले होते. त्यांनी शाळा, कॉलेजे, तालमी, आखाडे, पूजा-प्रार्थना मंदिरे यामधून संघटित प्रतिकार निर्माण केला. तरुणांना आवाहन केले आणि इंग्रजांना आव्हान दिले.

या संग्रामात भाग घेण्याची इच्छा योगेशच्या मनात आली. तरुण रक्त तेजाकडे लवकर खेचले जाते. सळसळत्या रक्ताला चळवळीची ओढ जबरदस्त असते. त्यातून ध्येयवादी, महत्वाकांक्षी तरुणांमध्ये तर ही प्रखरता विशेष आढळते. योगेश मित्रांच्या क्रांतिधारेत सामील झाला. त्याने नोकरीचा राजीनामा दिला. भूमिगत कार्यकर्त्यांमध्ये राहून चळवळीची सूत्रे हलवू लागला. त्यातही खूप अनुभव घेतले. धकाधकीच्या अस्थिरतेच्या व लाठीकाठीच्या या जीवनात तो रमला नाही. सर्वसाधारण जीवनापेक्षा हे जीवन उच्च असले तरी याहीपेक्षां उच्चतम जीवन असू शकते याची येथे खात्री झाली. मोठ्या ध्येयामध्ये लहान ध्येयांचा समावेश होत असतो. या उलट लहान ध्येयामध्ये मोठे ध्येय सामावू शकत नाही. याची प्रचीती या धावपळीच्या अनुभवात योगेशला आली. त्याने आपले अंग अलगदपणे चळवळीतून काढून घेतले. पुन्हा आपल्या नित्यजीवनाला प्रारंभ केला.

या अग्निदिव्याची झळ त्याच्याही जीवनाला चाटून गेली. असलेली नोकरी

तो गमावून बसला. संकटपरंपरेने कमाल मर्यादा गाठली. जणू परिस्थितीने त्याला संसाराचे आणि प्रपंचाचे दरवाजे बंद केले. प्रतिकूल प्रारब्धाने त्याच्यापुढे एकमेव रस्ता मोकळा ठेवला. तोही त्याच रस्त्याची वाट पहात होता. योगेशने एक दिवस मनाशी ठरविला. तोपर्यंत सर्व तयारी केली. नियतीचे खेळ जितक्या गुप्तपणे चालतात तितक्या गुप्तपणे तयारी केली. आधी सुगावा लागला तर विरोध होईल म्हणून नाही, तर विनाकारण सर्वांना आधीच दुःखी कष्टी करण्याचे कारण होईल म्हणून त्याने आपल्या मनाशिवाय कोणालाही सांगितले नाही.

या काळात तो देवीपुढे एकांतात जाऊन बसे. आपली प्रार्थना तिच्यापुढे ठेवी. "आई! आजपर्यंत जे जग दाखविलेस ते खरे नाही. खोटे आहे. मला तुझ्या ऐश्वर्याचे खरे अंतर्जगत् दाखव. ते फक्त विवेक–जागृती आणि सत्संगतीनेच दिसू शकते. तुझ्या कृपेने माझ्यात विवेक-जागृती झाली आहे. पण सत्संगती-शिवाय हे व्यर्थ आहे. सत्संगतीशिवाय हा रस्ता चालून जाणे अवघड आहे आणि अशक्यही आहे. मला मार्गदर्शक गुरु दाखव. आई! तूच गुरु दाखवितेस आणि त्या गुरुकडूनच तुझे स्वरूप स्पष्ट करतेस म्हणून माझी ही प्रार्थना पुरी कर."

एके रात्री त्याला देवीने दृष्टांत दिला. मार्ग दाखवला. गावाच्या, घराच्या खुणा दाखवल्या आणि एका व्यक्तीचे दर्शनही दिले आणि तेथेच स्वप्न संपले. योगेश पुढे झोपला नाही. तसाच उठला आणि देवीला साष्टांग नमस्कार केला. आई-भावंडांकडे निर्विकार मनाने पाहिले व हळूच दार उघडून बाहेर पडला.

## सद्गुरुप्राप्ती आणि शक्तिपातदीक्षा

इ. स. १९१२ चा काळ होता. योगेशाचे वय वीस वर्षांचे झाले होते. परमेश्वरप्राप्तीसाठी त्याने घरदार सोडले आणि नवीन जीवनाचा रस्ता धरला. हा तरूण कोणाच्याही जाळ्यात सापडला नाही किंवा भलत्याच्या नादी लागला नाही. आपल्या मनोदेवतेला प्रमाण मानून तो योग्य मार्गदर्शकाचा शोध घेत होता. यासाठी तो कुठेही थांबला नाही. परमेश्वरकृपेने आणि त्याच्या परम भाग्याने त्याची इ. स. १९१२ मध्येच श्रीमदात्मानंद ब्रह्मचारींशी भेट झाली. त्यांच्याकडे योगेश कसा येऊन पोहचला हे समजण्याला काही आधार हाती लागत नाही. पण एवढे मात्र समजते की योगेशने घर सोडले आणि दुसऱ्या कोणत्याही साधू सत्पुरुषाच्या सहवासात येण्यापूर्वीच तो श्रीमदात्मानंदांकडे आला.

हे श्रीमदात्मानंद ब्रह्मचारीजी म्हणजे प. प. श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थस्वामी-महाराज होत. यांचे वय यावेळी बावीस वर्षांचे होते. यांची यापूर्वीच प. प. श्रीनारायणतीर्थदेव महाराजांशी भेट झाली होती. "विनौटिया" या पूर्व बंगालमधील गावी श्रीनारायणीर्थ राहात असत. तेथे श्रीमदात्मानंदजी एक वर्षभर राहिले होते. त्यांनी श्रीनारायणतीर्थ स्वामींकडून मंत्रासहित दीक्षा घेतली. गुरुसान्निध्याचा भरपूर फायदा घेऊन आपल्या साधनेला गती दिली. पुढे श्रीगुरुदेव श्रीनारायणतीर्थ-देव यांच्याच सांगण्यावरून चितलकोट या आपल्या गावी श्रीमदात्मानंदजी परत आले. त्यांच्या साधनेचीं उन्नत स्थिती आणि पात्रता लक्षात घेऊन श्रीनारायणतीर्थ-देवांनी आत्मानंदाना आशीर्वाद दिला. "तुझी इच्छा झाली तर दीक्षा देण्यास हरकत नाही." अशा तयारीचे श्रीमदात्मानंद नेहमी आपल्या साधनामध्ये धुंद असत.

योगेश अशा ठिकाणी येऊन पोहचला. योगेशच्या परमभाग्याचा हा संकेत होता. योगेशसारख्या तरुणाला पाहून श्रीमदात्मानंदांना मोठा आनंद झाला. जणू एक आंतरिक संवेदना त्यांना सुखावून गेली. त्यांनी योगेशची सर्व विचारपूस केली. त्यांनी त्याला आपल्याकडे ठेवून घेतले. ते स्वतः विचार करू लागले की सद्गुरु प्राप्तीसाठी आपल्याला किती कष्ट पडले. किती हिंडावे लागले. पण याचे भाग्य एवढे थोर आहे की याची आपली भेट सहजासहजी झाली. ही खरी प्रभू योजना. "जा सहज साहब मिला सहज कहावै सोय।"

योगेशसुद्धा आपल्या पथप्रदर्शकांना बारकाईने न्याहाळत होता. श्रीआत्मा-नंदांच्या आत्मविश्वासपूर्ण अचूक विधानांनी तो संतुष्ट होत होता. दृष्टीच्या एकेक कटाक्षांनी तो शांतचित्त होत होता. क्षणाक्षणाच्या सहवासाने निश्चित होत होता. योगविभूतीकडूनच आपले काम होणार असा विश्वास योगेशच्या मनात निर्माण झाला. आता अन्यत्र कोठेही जाण्याची गरज नाही हा निर्धारही त्याने आपल्या मनाशी केला. योगेशने आधी आपली शिष्याची भूमिका स्वीकारली. त्याने श्रीआत्मानंदांना गुरु मानले. जसजसा सहवास वाढत चालला तसतशी श्रद्धा वं भक्ती वाढत गेली. योगेशने आपल्या श्रीगुरुदेवांची अविश्रांत सेवा सुरू केली. वास्तविक त्याला दीक्षा मिळाली नव्हती किंवा अनुग्रह झाला नव्हता. एका योग्यतम व अधिकारसंपन्न सत्पुरुषाची गाठ पडली होती. त्यांच्या ठिकाणी चित्त

रमविण्यासाठी व त्यातून जीवित कृतार्थ करण्यासाठी योगेशने हे सेवाव्रत धारण केले होते. हे व्रत तो परिप्रश्नेन व सेवया पालन करीत होता. चित्ताच्या अशा लीनतेने तो श्रीगुरुदेवआत्मानंदांच्या हृदयात प्रवेश करीत होता.

श्रीमदात्मानंदांचे अंतःकरण योगेशची सेवा पाहून द्रवत होते. त्याची विरक्ती व उपरती पाहून त्यांना संतोष होत होता. परस्परांच्या नित्य सहवासातून पितापुत्रांप्रमाणे वात्सल्य नि आदर ही भावना वाढीस लागली. जन्मजन्माच्या ऋणानुबंधाची ही खूण उभयतांना जाणवत होती.

होता होता योगेशला 'शक्तिपात योग' आणि 'कुंडलीनी जागृती' या विषयांची बरीच माहिती मिळाली. त्याने आपल्या गुरुदेवांना दीक्षेसबंधी एकदा प्रार्थना केली होती. पण ही दीक्षा इतकी सरळ व सोपी नव्हती. श्रीआत्मानंद म्हणाले, "आजन्म नैष्ठिक ब्रह्मचारी राहाण्याची तयारी असेल तर दीक्षेचा विचार करता येईल. या विषयात ज्यांना काही प्रयत्न करण्याची इच्छा असते त्यांना दीक्षा दिली जाते. केवळ मजा पाहण्यासाठी दीक्षा दिली जात नाही." योगेशने क्षणाचाही विलंब न लावता आपली तयारी असल्याचे सांगितले. तेव्हा एक शुभ दिवस पाहून आत्मानंदांनी योगेशला नैष्ठिक ब्रह्मचर्याची विधीपूर्वक दीक्षा दिली. या दीक्षेपासून योगेशचे नाव 'ब्रह्मचारी योगेशचंद्र प्रकाश' असे ठेविले. या दीक्षेनंतर अल्पावधीत त्यांना शक्तिपात दीक्षा झाली. आणि हे दोघेजण, गुरुशिष्य, 'विनौटिया' गावी आले. 'विनौटिया' या गावी प. प. श्रीनारायणतीर्थदेव राहात होते. त्यांनी तेथे सर्व साधकांसाठी "ज्ञान साधन मठ" स्थापन केला होता. त्या ठिकाणी श्रीमदात्मानंद प्रकाश ब्रह्मचारीजी आणि श्रीमत् योगेशचंद्र प्रकाश ब्रह्मचारी हे दोघे आले. श्रीगुरुदेव या नवीन शिष्याला घेऊन आपल्या गुरूंच्या घरी आले.

श्रीमदात्मानंदांनी श्रीयोगेशचंद्रांचा परिचय प. प. श्रीनारायणतीर्थदेवांना करून दिला. श्रीयोगेशचंद्राची सर्व हकीगत सांगितली. एकूण माहिती ऐकून आणि श्रीयोगेशचंद्राला प्रत्यक्ष पाहून त्यांना मोठा संतोष झाला. त्यांनीही आपल्या अनुपम दिव्य दृष्टीने श्रीयोगेशचंद्राला कृतार्थ केले. त्याला परम कल्याणकारी मंगल आशीर्वाद दिला.

ज्ञानसाधन मठाचे स्वर्गीय वातावरण पाहून श्रीयोगेशचंद्रांना आपल्या सद्-भाग्याची जाणीव झाली. त्याचवेळी शक्तिपातयोगसाधन आणि ज्ञानसाधन एकच

असल्याचे त्याला स्पष्ट झाले. एकाच वेळी त्यांना आपले गुरु आणि परमगुरु यांचा मंगल सहवास मिळाला. मठाचे नियम, शांत आणि साधनोत्कट वातावरण योगेशला अध्यात्माची अलौकिक धुंदी चढवीत होते. श्रीनारायणतीर्थदेवांचे नंदा-दीपासारखे शांत नि दिव्य प्रकाशित जीवन पाहून श्रीयोगेशचंद्रांना जगाची विस्मृती झाली. योगेशचंद्रांसारखा उत्तम शिष्य मिळाला म्हणून गुरु आणि परमगुरु अतिशय संतुष्ट झाले. त्यांनी त्यांना आपल्या ज्ञानसाधन मठात ठेवून घेतले. योगेशचंद्राच्या आनंदाला आकाश ठेंगणे झाले. **महत्सेवां द्वार माहुर्विमुक्तेः ।** महापुरुषांची सेवा म्हणजे मोक्षाचा दरवाजाच आहे. विवेकी आणि भक्तियुक्त अंतःकरणाच्या योगेशचंद्रांना या स्वर्गीय जीवनाचे महत्त्व समजत होते. ते आपल्या मनाला पुन्हा पुन्हा बजावीत होते.

**यह तन विषकी बेलरी । गुरु अमृत की खान**
**सीस दिये जो गुरु मिलै । तो भी सस्ता जान ॥**

या अमोल सत्संगतीचा दुर्लभ लाभ मिळालेल्या योगेशचंद्रप्रकाशने तन, मन व धनाने त्यांच्या सेवेस स्वतःला वाहून घेतले.

मनुष्यत्वं, मुमुक्षत्वं, महापुरुष संश्रयः या दुर्लभ त्रयीची जाणीव ठेवून योगेशचंद्र क्षणा क्षणाचा उपयोग करून घेत होते.

अशा प्रकारे ‘ या ’ रत्नाला कोंदण मिळाले. रत्नाला कोंदण मिळाले म्हणजे रत्नात अनेक प्रकारची अपूर्वाई येते. एक तर रत्नाचे तेज वाढते. दुसरे म्हणजे त्या रत्नाला संरक्षण मिळते. तिसरी गोष्ट म्हणजे कोंदणामुळे मूळ रत्नाची किंमतही अनेक पटीने वाढते. तसेच श्री योगेशचंद्रांचे झाले. “ योगेश ” हेच मूळचे मौल्यवान रत्न ! तशातच अपूर्व सद्गुरुंच्या कोंदणाची प्राप्ती त्यांना झालेली ! रत्नाचे तेज कोंदणाच्या आधाराने तेजाळून उसळत दशदिशांमध्ये कोंदून भरले. तो “ आत्मानंद ” श्रीयोगेशचंद्रांना नित्य जाणवू लागला.

**“ आनंदाचे कोटी । साठविल्या आम्हा पोटी । ”**
**“ आनंदाचे डोही । आनंद तरंग ।**
**आनंदचि अंग । आनंदाचे ॥ ”**

## परमगुरुंचा "ज्ञानसाधन मठ"– साधना आणि संन्यास ! !

प. प. परमगुरुदेव श्रीनारायणतीर्थदेवांच्या धवल कीर्तीचा मधुर सुगंध हळूहळू पसरू लागला होता. प. प. श्रीगंगाधरतीर्थांच्या महानिर्याणाला उणीपुरी सहा वर्षे झाली होती. नारायणतीर्थदेवांना दीक्षागुरुत्वाचा अधिकार प्राप्त होऊनही सुमारे सहा सात वर्षेच लोटली होती. परंतु हळूहळू ज्ञानसाधन मठामध्ये साधकांची आणि श्रद्धाळू जिज्ञासूंची ये जा भरपूर प्रमाणात वाढू लागली. अनेक साधक व जिज्ञासू दूरदूरच्या ठिकाणांहून येत होते. ते आपल्या साधनमार्गातील अडीअडचणी गुरुदेवांपुढे ठेवीत. त्यांच्या दृष्टीपुढे आपले साधन कसे चालते हे प्रत्यक्ष दाखवून गती वाढण्यासाठी आशीर्वाद घेत. आवश्यकतेप्रमाणे श्रीगुरुदेवांच्या संमतीने ४।२ दिवसांचा मुक्कामही करीत असत. अशा मंडळींच्या जेवणाखाण्याची व्यवस्था प. प. श्रीनारायणतीर्थदेवांनी श्रीमदात्मानंदप्रकाश यांच्यावर सोपविली होती. आपल्या गुरुदेवांच्या या व्यवस्थेमध्ये योगेशचंद्रप्रकाशचा मोठा वाटा होता.

तो इ. स. १९११।१२ चा काळ होता. ज्ञानसाधन मठाला प्राप्ती अशी नव्हतीच, जेमतेम सात आठ रुपये महिन्याकाठी जमत असत. त्यातून मठात राहाणारी नित्याची ७।८ साधक मंडळी आणि सतत जाणारे येणारे पाहुणे ! या सर्वांची भोजन व्यवस्था त्यातून चाले. मधून मधून छोटा मोठा भोजनभंडाराही होत असे. एवढ्या अल्प मिळकतीमध्ये हे सारे भागणे शक्यच नव्हते. म्हणून मठातील ही ७।८ साधक मंडळी भोवतालच्या पंचक्रोशीतून भिक्षा गोळा करून आणीत. ही भिक्षा कोरडी असे. विशेषतः तांदूळ, डाळ, भाजीपाला या स्वरूपात मिळे. ती आणून मग भोजन व्यवस्थेचा कारभार सुरू होई. पुष्कळ वेळा भिक्षा मिळत नसे किंवा फारच कमी मिळे. अशा वेळी मठातील भोजनाचा बेत वेगळाच असे. बंगाल-मध्ये पूर्वी 'अरबी' (कोचू किंवा मान कोचू) ह्या जातीची कंदमुळे भरपूर प्रमाणात होत असत. अन्नाला पुरवठा म्हणून या कंदमुळांचा भरपूर उपयोग होत असे. भोवतालच्या जंगलात, पडीक जमिनीत ही कंदमुळे उगवत. ती गोळा करून आणण्याचे काम मठातील साधक करीत असत. भोजनाची ही उस्तवार रोजची असे. आपली प्रातःकालीन आन्हिके उरकल्यावर स्वैपाक सुरू करण्यापूर्वी सर्वजण मिळून भिक्षेला जाऊन येत. रोजच्या जेवणाचा बेत मिळालेल्या भिक्षेवर अवलंबून असे. स्वैपाकासाठी मठाला आचारी नव्हता. हीच साधक मंडळी स्वयंपाक करीत

असत. या कामात योगेशचंद्रप्रकाश आघाडीवर असे. कोंड्याचा मांडा करण्याची कला त्याला अवगत होती. त्याच्य हाताला अशी काही गोडी होती की योगेशचंद्र-प्रकाशांनी बनविलेले पदार्थ सारेजण मोठ्या आवडीने खात असत. त्यांची ते तशी प्रशंसाही करीत असत. मठाचा असा नियम होता की पहिली पंगत पाहुण्यांची होत असे आणि शेवटी ही ७/८ साधक मंडळी भोजन करीत असत. या शेवटच्या पंगतीत श्रीआत्मानंदप्रकाश व योगेशचंद्र असत. उरलेल्या अन्नात भोजन करण्याचा प्रसंग या मंडळीवर वारंवार येत असे.

एकूण व्यवस्थेची जबाबदारी श्रीमदात्मानंदप्रकाशांच्यावर सोपविली असल्याने त्यांना या कठीण परिस्थितीला तोंड देण्यासाठी सदैव तयार रहावे लागे. बंगालमध्ये पावसाळ्यात जिकडे तिकडे पाणीच पाणी होते. गाळ नि दलदल तुडविल्याशिवाय चार पावले धड टाकता येत नाहीत अशी स्थिती असते. अशा या वर्षाऋतूच्या वातावरणात भिक्षेला जाऊन येणे म्हणजे सत्त्वपरीक्षाच असायची. कधी कोठे जाता येता एखादी होडी मिळाली तर तेवढेच कष्ट कमी, नाही तर कधी पाण्यातून चालत जाऊन तर कोठे पोहून तर कोठे दलदल तुडवून भिक्षेची फेरी पूर्ण करावी लागे. बरोबर जमलेले भिक्षेचे धान्य व सामान लहान मोठ्या गाठोड्यात बांधून ते ओझे डोक्यावर घेऊन हिंडतांना भरपूर कष्ट पडत. पण म्हणून कधी त्या साधकांनी कामात तिळमात्र उणेपणा ठेवला नाही. आधीच असलेल्या निष्ठेला असे वळण लावून ती अधिकाधिक दृढ होत चालली होती. पावसाळ्यातील दिवसात भिक्षेहून परतताना कित्येक वेळा शरीराला अनेक ठिकाणी जळवा चिकटल्याचे आढळून येई.

भोजनसामग्री गोळा करण्याचा एवढा खटाटोप झाला. पण स्वयंपाकाच्या जळणाची जुळवाजुळव तर यापेक्षा तापदायक असायची. हे जळण गोळा करण्यासाठी श्रीमदात्मानंदप्रकाशजी आणि योगेशचंद्रप्रकाश कधी जवळच्या तर कधी दूरच्या जंगलात जात. लाकडे गोळा करीत. त्यांच्या मोळ्या बांधून डोक्यावर घेत आणि मठात येत. पावसाळ्यात हे काम फार अवघड होत असे म्हणून उन्हाळ्याच्या शेवटी जादा मेहनत करून जादा लाकूडफाटा मठात नेऊन साठवीत असत. एकदा मठाच्या जवळचा भला मोठा वटवृक्ष कोसळून पडला. त्या वृक्षाच्या मालकाने तो वटवृक्ष मठाला देऊन टाकला. त्या प्रांतातील रूढीप्रमाणे फक्त ब्राह्मणांनाच वडाचे

लाकूड जाळण्याची मुभा होती. एवढा प्रचंड वृक्ष मठाला मिळाला तेवढ्याच प्रचंड मेहनतीची जबाबदारी मठसाधकांवर येऊन पडली. रस्त्यात पडलेला तो वृक्ष कापून, त्याचे ओंडके करून मठात आणून टाकणे हे पहिले नि महत्त्वाच काम होते. ही अवघड कामगिरी स्वतः श्रीनारायणतीर्थदेव, श्रीमदात्मानंदप्रकाश ब्रह्मचारी व योगेशचंद्र यांनी पार पाडली. रोज ठराविक वेळ खर्च करून कुऱ्हाडीने फांद्या तोडल्या. ओंडके केले आणि दोर बांधून ओढत ते मठात आणून टाकले. एकदा कुऱ्हाड मारता मारता पायावर पडून श्रीनारायणतीर्थदेवांना मोठी जखम झाली. हे दुखणे दोन महिन्यांचे होऊन बसले. यावेळी आत्मानंदांनी आणि योगेशचंद्रांनी गुरुदेवांची अविश्रांत व अष्टौप्रहर सेवा केली.

असे मठातील जीवन म्हणजे प्राचीन ऋषीमुनींच्या आश्रमीय वातावरणाचे चालते बोलते प्रत्यक्ष उदाहरण होते. श्रीगुरुदेव सांदिपनींच्या आश्रमात श्रीकृष्ण आणि सुदामा यांनी जी गुरुसेवा केली तशीच ज्ञानसाधन मठात श्रीगुरुदेव नारायणतीर्थ देवांची सेवा श्रीमदात्मानंदप्रकाश ब्रह्मचारी व योगेशचंद्रप्रकाश ब्रह्मचारी यांनी केली. मठातील प्रत्येक काम म्हणजे श्रीगुरुसेवा हे त्यांचे समीकरण होते. शब्दातीत कठीण परिस्थितीत त्यांनी भगीरथ प्रयत्नांनी अत्यंत निष्ठेने आपल्या श्रीगुरुदेवांची आणि मठाची सेवा केली. मठाच्या कामाला गुरुसेवेहून वेगळे मानले नाही तर श्रीगुरुसेवा हेच साधनरूप आहे अशी श्रद्धा ठेवून ते वागले. इतकेच नव्हे तर श्रीगुरुसेवा हे असे साधन आहे की ज्यामुळे शीघ्रातिशीघ्र चित्तशुद्ध होऊन गुरुकृपा होते.

ज्ञानसाधन मठात सर्वांची ज्ञानसाधना ब्राह्ममुहूर्तामध्ये नित्य होत असे. त्यानंतर मठाच्या व्यवस्थेचा कारभार सुरू होई. दुपारी भोजनोत्तर थोडी विश्रांती झाली की लगेच धार्मिक ग्रंथांचे वाचन होत असे. सायंकाळी उपनिषद् ग्रंथावर स्वतः श्रीनारायणतीर्थदेवांचे प्रवचन होत असे. प्रसंगोपात् चर्चाही होत असे. यानंतर पुन्हा सामुदायिक साधना होत असे. मठाची शिस्त काटेकोर असे. कुठल्याही प्रकारची गडबड वा गोंधळ गुरुदेवांना खपत नसे.

प. प. श्रीनारायणतीर्थदेव यांचा साधेपणावर विशेष भर असे. मठातील नित्यक्रम साधा पण ठरलेला असे. किमान दोन वेळची साधना प्रत्येकाकडून व्हावी असा त्यांचा आग्रह असे. अवडंबर तर त्यांना बिलकूल खपत नसे. ते मृदु आणि

दयाळू अंत:करणाचे असले तरी व्यवहारामध्ये कडक असत. त्यांचा हा कडकपणा मठातील साधकमंडळींना निर्दोष जीवनाचे मार्गदर्शन करीत असे. कोणाचीही चूक लहान असो नाहीतर मोठी असो ती त्या साधकाला जाणीवपूर्वक सांगितल्याशिवाय ते राहात नसत. अशी दिलेली जाणीव साधक आयुष्यभर विसरू शकत नसे. मोठेपणाची आसक्ती फार वाईट आहे यावर टीकाप्रहार करताना ते सांगत :

**मुंड मुंडाये तीन गुन छुटत नाही खाज।**
**लड्डुआ खानेको मिले लोग कहे महाराज॥**

बाह्यशरीराला खूप नटविले, भस्म, गंध, माळा, कपडे घालून साधूसंन्याशां-वर ताण केली, पण मनातील आसक्ती सुटली नाही तर या वेशभूषेचा काय उपयोग? उत्तम पक्वान्ने खाण्यास मिळाली तर लोक 'महाराज' 'महाराज' म्हणत राहतील. त्याने का आपल्याला ईशप्राप्ती होणार आहे?

आपण सर्व अशा पंथाचे पथिक आहोत की आपली सारी वाटचाल आतून चालली आहे. मनातून चालली आहे. आपण मनाने योगी आहोत. शरीराने नाही. शरीराचे योगी वेगळे! मनाचे योगी वेगळे!!

**हम तो जोगी मनहिके, तनके है ते और।**
**मनका जोग लगावते, दसा भई कुछ और॥**

मनाच्या योग्यांची अवस्था व पातळी काही वेगळी असते! जाणत्यांनी हे जाणले पाहिजे. परमगुरुदेवांचे लक्ष असे काटेकोर असे.

योगेशचंद्राच्या तरुण मनावर हे संस्कार होत होते. त्याच्या हृदयात हे विचार कोरले जात होते. तो प्रतिदिन घडत होता. जडत होता. सद्‌गुरुंच्या आणि परात्पर सद्‌गुरुंच्या परम पावन अतिमंगल सहवासातून त्याच्या वैराग्याचा अग्नी फुलत होता. वैराग्याची दाहक शलाका त्याची जीवनज्योत प्रज्वलित करीत होती. साधन (बैठक) त्याच गतीने होत होते. परब्रह्मरुप गुरुदेव, साधक योगेश-चंद्र आणि साधन (बैठक) यांचा सुंदर मिलाफ येथे झाला होता. साध्य, साधक व साधन येथे एक झाले होते. अशा या स्वर्गीय वातावरणात, ज्ञानसाधन मठात अगदी प्रारंभीच्या काळात, योगेशचंद्रप्रकाश ब्रह्मचारी आपल्या श्रीगुरुदेवांच्यासह परमगुरु प. प. श्रीनारायणतीर्थदेवांच्या सेवेत सर्वस्व अर्पण करून राहिले होते.

योगेशचंद्रजी अत्यंत भाऊक साधक होते. त्यांच्या सरळ स्वभावाला या भाऊकतेने निष्पाप भोळेपणा दिला होता. यामुळे तर्ककुतर्काला त्यांच्या हृदयात स्थान नसे. साधनेला ही वृत्ती फार पोषक असते. शक्तिपात योगसाधनेला काहीही करावयाचे नसते. जे होईल ते पाहाणे आणि होईल ते होऊ देणे, एवढेच त्याचे काम. योगेशचंद्रांना आंतून क्रियांचे प्रबल वेग येऊ लागले. मुखातून प्रणवाचे उच्चार होऊ लागले. कधी भजनाच्या तंद्रीने स्वरचित पदे तयार होऊ लागली. पदांचे गायन गोड स्वरात होऊ लागे. गाता गाता अंगविक्षेप व हावभाव होत. भावप्रबलतेत मधून मधून साधनेत नृत्यही होत असे. पण या क्रियांचा काळ फार अल्प होता. अंतर्मुखतेने शरीराला स्थिर केले. शरीर स्थिरावले तर मनोव्यापारांची गती वाढली. अनंत विचार नि अनंत प्रश्न मनात निर्माण होत आणि त्याच मनात विलीन होत. एक मन प्रश्न निर्माण करी तर दुसरे मन निःसंधिग्धपणे बिनचूक उत्तर देई. या प्रश्नोत्तरातून मनाची निःशंक स्थिती होत असे. ही निःशंक अवस्था फार वेळ टिकली की त्या काळात विचार वा प्रश्न उत्पन्न होत नसे. अशा निर्विचार स्थितीत मनाचा मूळ स्थितीशी लय लागे. ही आनंदाची स्थिती अनुभवताना सारे शरीर पुलकित व रोमांचित होत असे. या आनंदात अजब बेहोशी होती.

या निर्विचार, निष्क्रिय व सानंदयुक्त संवेदना होऊ लागल्या की श्वास मंद होत असे. आपला श्वासोच्छ्वास जणू थांबलाच आहे असे वाटण्याइतका तो मंद होत असे. शरीरातील सारी प्राणशक्ती मस्तकात खेचून घेतली जात होती. यामुळे मुखमंडल तेजःपुंज होत होते. डोळे आरक्त होत होते. या काळात त्यांना देवदेवतांची दर्शने झाली. कालीमातेचे दर्शन झाले. या धुंद अवस्थेची मस्ती स्थूल शरीरातूनही व्यक्त होऊ लागली.

साधनाच्या या नशेत साऱ्या जगाचा विसर पडे. मठातील सारी कामे, साऱ्या हालचाली या आनंदाविभोर अवस्थेतून चालत असत, सर्व व्यवहार मौनाने करण्याची त्यांना इच्छा होत असे बाह्य जगताचे व्यवहार आणि अंतःप्रवाहाच्या संवेदना यातील फरक त्याना स्पष्ट स्पष्ट जाणवत होत्या. याच आतल्या बाहेरच्या जाणीवेमध्ये त्यांचे दिवस दिवस निघून जात होते.

**जिही आत्मबोधाची आवडी ।**
**केली स्वर्ग संसाराची कुरोंडी ।**

**ते वाचून एर्थींची गोडी।**
**नेणती आणिक ॥**

होता होता चित्ताचा लय वाढत गेला. शांत झालेले चित्त विवेकाच्या आधाराने विश्वाच्या एक एक सूत्राची उकल करू लागले. सत्य काय आहे? वस्तू का चैतन्य? आकार का तत्त्व? कला का सौंदर्य? यांची उत्तरेही चित्तातून येऊ लागली. 'वस्तू' नव्हे 'चैतन्य' सत्य आहे! 'आकार' नव्हे 'तत्त्व' सत्य आहे! 'कला' नव्हे 'सौंदर्य' सत्य आहे!

सत्य कशाला म्हणतात? "जे सतत असते ते सत्य!" जे सतत नसते ते असत्य, खोटे, मिथ्या! ही सत् चित् आनंदाची ज्ञानात्मक अनुभूती आली आणि चित्ताचे तरंग संपले. प्रश्न संपले. उत्तरे संपली. मन मौन झाले. सत् चित् आनंदमय एकमेव तत्त्व आहे. बाकी सर्व त्यावरील पसारा आहे. जो विश्वाचा तोच देहाचाही पसारा आहे. आतून शब्द ऐकू आले.

"चिदानन्दरुपः शिवोऽहम् शिवोऽहम्" अशी ही योगेशचंद्राची साधना आणि सेवा या लयीत चाले. इ. स. १९१४ पर्यंतचा, दोन वर्षाचा काळ त्यांनी ज्ञानसाधन मठात ज्ञानसाधनेत घालविला.

## ढाक्क्याला परत!

श्रीयोगेशचंद्रांना ज्ञानसाधन मठात आपल्या गुरुदेवांकडे आणून सोडल्यानंतर थोड्याच दिवसांनी श्रीमदात्मानंदप्रकाश ब्रह्मचारी महाराज पुनः आपल्या घरी गेले होते. ज्या प्रकारचे जीवन त्यांनी व्यतित करण्याचे ठरविले होते त्यासाठी आई वडिलांची संमती व आशीर्वाद आवश्यक होता. यासाठी प. प. श्रीनारायणतीर्थदेव सद्गुरूंनी त्यांना पुनः घरी पाठविले होते. श्रीमदात्मानंद घरी गेले आणि त्यांनी आई-वडिलांना आपल्या विचारांची स्पष्ट कल्पना दिली. धार्मिक वृत्तीच्या वडिलांनी सारे काही शांतपणे ऐकून घेतले. आपल्या मुलाची वृत्ती व दिनक्रम पाहून खात्री झाल्यावर आनंदाने संमती दिली. श्रीमदात्मानंदांना अन्तःकरणपूर्वक शुभाशीर्वाद दिले.

श्रीमदात्मानंद निर्भेळ आत्मानंदात तेथून परतले. ज्ञानसाधन मठात येता येता वाटेत मैमनसिंग गांवी थांबले. तेथे त्यांचे थोरले बंधू राहात होते. झालेली हकीकत

त्यांनी त्यांच्या कानावर घातली. त्यांचीही अनुमती घेऊन पुढे ते विनौटियास आले. श्रीगुरुदेवांना साष्टांग नमस्कार करून त्यांनी सर्व वृत्त सादर केले. या काळात योगेशचंद्रांनी श्रीनारायणतीर्थदेवांची अपूर्व गुरुसेवा केली. श्रीएकनाथांनी सद्‌गुरु जनार्दनस्वामींचा लढाईचा पोषाख घालून, घोडा, तलवार घेऊन जसे युद्ध करून विजयी होऊन आले त्याप्रमाणे योगेशचंद्रांनी श्रीमदात्मानंदांची थोडीसुद्धा उणीव भासू दिली नाही. श्रीनारायणतीर्थदेवांची अपूर्व सेवा योगेशचंद्रांनी श्रीमदात्मानंदांप्रमाणे केली. बलवत्तर पूर्वपुण्याईने सेवेची संधी मिळत होती आणि सेवेच्या बळावर भविष्याला भाग्याचा मोहोर लागत होता.

योगेशचंद्रांचे गुरुदेव श्रीमदात्मानंद घरची सर्व निरवानिरव करून आले. आईवडिलांची संमती व आशीर्वाद घेऊन ते परतले. ही बातमी ऐकल्यापासून योगेशचंद्रांच्या मनात घरच्या विचारांनी प्रवेश केला. आपल्या जीवनाच्या नाटकातील हा एक नाट्यमय प्रवेश आपणालाही करावा लागणार याची खात्री वाटू लागली. श्रीमत् आद्य शंकराचार्यांना तर या बाबतीत केवढा नाट्यमय प्रसंग निर्माण करावा लागला ! त्यांना संन्यास घेण्यासाठी आईची संमती मिळेना तेव्हा काय चमत्कार घडला ! एका पर्वकाली त्यांनी नदीस्नानासाठी आपल्या वृद्ध आईला नेले. तिचे स्नान होऊन ती नदीकाठी पूजाअर्चा करीत होती एवढ्यात आचार्यांचा पाय एका मगरीने धरला. त्या मगरीला वाचा फुटली. "संन्यास घेशील तर सोडीन नाहीतर खाईन," हे त्या मगरीचे शब्द आईच्याही कानावर पडले. आचार्य तर आईची प्रार्थना करून म्हणाले. "आई ! संन्यास घेतला तर जीवदान मिळते ! मग घेऊ का संन्यास ?" जिवापेक्षा संन्यास घेतला तर काय वाईट असा विचार करून आईने संमती दिली.

अशा प्रसंगाचे स्मरण योगेशचंद्रांना होऊ लागले. "मातृदेवो" म्हणायचे आणि तिच्या आज्ञेशिवाय वाटेल ते करावयाचे याला चांगले कसे म्हणता येईल ? आपले धर्मशास्त्र प्रमाण आहे. शास्त्रातली आज्ञा प्रमाण धरली तर विकास नि उत्कर्ष !

"आपण आपले संपूर्ण आयुष्य साधुसंन्याशाच्या विरक्त वृत्तीने घालविणार याची कल्पना किमान आपल्या आईला तरी दिली पाहिजे नाहीतर आपल्या मार्गात ही कल्पनाच अनंत विक्षेप आणील. आपण आईला विचारले नाही व सांगितले नाही तर त्यामुळे तिला होणाऱ्या दुःखाला आपण जबाबदार आहोत, ही टोचणी अंतर्मनाला

सारखी कुरतडत राहील. साधनेतील एकाग्रतेला हा अडथळा ठरेल. ज्या प्रशस्त जीवनाचा मार्ग आपण स्वीकारणार आहोत त्याची स्पष्ट कल्पना देण्यात भीति कसली? कोणाची? आपण ढाक्क्याला जाऊन आले पाहिजे. एकदा घरी गेले पाहिजे, आईला हे सारे सांगितले पाहिजे. तिची परवानगी व आशीर्वाद घेतला पाहिजे." या विचारांनी योगेशचंद्र मधून मधून गंभीर होई.

ज्ञानसाधन मठात असतानाच एकदा श्रीमदात्मानंदजींना प. प. श्रीगुरुदेव श्रीनारायणतीर्थ देव म्हणाले होते की योगेशचंद्राचे साधन तीव्र गतीने चालू आहे. त्याला एकांत व स्वतंत्रपणा मिळाला की थोड्याच काळात तो फार पुढे जाईल. चांगला साधक आहे. योगायोगाने थोड्याच दिवसात श्रीमदात्मानंदजी बंगालमध्ये विविध ठिकाणांना भेटी देण्यास योगेशचंद्रासह बाहेर पडले. बरोबर विशेष सामान-सुमान नव्हते किंवा शिष्यादींचा परिवार पण नव्हता. यामुळे बाहेर पडलेल्या या गुरुशिष्याच्या जोडीला भरपूर मोकळेपणा मिळाला. ते दोघे हिंडत हिंडत ढाक्क्याला येऊन पोहचले. श्रीमदात्मानंदांनी योगेशचंद्रांना आपल्या घरी राहण्यास पाठविले आणि स्वतः एका मठात उतरले. अचानकपणे निघून गेलेला योगेशचंद्रबाबू परत आलेला पाहून ढाकेश्वरीच्या मंदिरातील सर्वांनाच मोठा आनंद झाला.

श्रीगुरुमहाराज ज्या मठात उतरले तो मठ म्हणजे ढाक्क्याची प्रतिष्ठा होती. स्वामी त्रिपुरलिंग सरस्वतींचा मठ होता तो. मठ मोठा प्रशस्त होता. मठाचा शिष्य-परिवार मोठा होता. मठाची शेतीवाडी, बागबगीचे, इमारती सारे काही प्रशस्त होते. मठाची मिळकत ही एखाद्या संस्थानिकाला शोभेल अशी होती. वृद्ध यती स्वामी श्रीत्रिपुरलिंग सरस्वती हे मठपती होते. मोठमोठे विद्वान पंडित या मठपतींना मानीत होते. मठाला दिव्य परंपरा होती. धर्मकार्यार्थ हिंडणाऱ्या अतिथींची तिथे सदैव सोय होत होती.

अशा ठिकाणी श्रीगुरुमहाराज श्रीमदात्मानंदांनी आपला मुक्काम ठेवला. मठाने त्यांना स्वतंत्र जागा दिली. नित्य भिक्षेसाठी मठात सोय असते म्हणून भोजनाची व्यवस्था केली. सर्व वातावरण अनुकूल होते. येथे राहून त्यांना योगेश-चंद्राचा पुढील मार्ग मोकळा करावयाचा होता. आपल्या दिव्य साधनमार्गाची माहिती द्यावयाची होती. हे सर्व लक्षात घेऊन त्यांनी येथे मुक्काम ठेवला होता. या सरस्वतीमठात ८।१० महिने त्यांचे वास्तव्य होते. आपली दिव्य साधना आणि

भव्य नित्यक्रम त्यांनी शांतपणे सुरू केला. मठातील सर्व जणांना या नवागत सत्पुरुषाच्या दिनक्रमाचे कुतुहल वाटू लागले.

श्रीमदात्मानंदाचा नित्यक्रम पाहून भोवतालची मंडळी प्रभावित होऊ लागली. एक तेजस्वी तरुण या कार्यात रमलेला पाहून प्रौढांना आश्चर्य वाटले. तरुणांना आपल्यातला एक पाहून हायसे वाटले. एकेक जण या ना त्या निमित्ताने या नवागत सत्पुरुषाचा सहवास घेण्याची संधी पाहू लागला. तशी संधी मिळून सहवासात आलेला अधिक आकर्षित होऊ लागला. सारे वातावरण अधिकच अनुकूल होत चालले. हळू हळू बाहेरची पत्रे या नवागत महापुरुषाला म्हणजे श्रीमदात्मानंदांना येऊ लागली. शिष्य साधकही मधून मधून येऊ लागले. योगेशचंद्रांचा घरून येण्याचा नित्यनेम सुरू झाला. या सर्व गोष्टी पाहून यांच्या पाठीमागे परंपरा दिसते, असे इतरांच्या लक्षात आले. पत्रे येऊ लागली. पत्रांची उत्तरे जाऊ लागली. येणाऱ्यांच्या शंकांचे निरसन होऊ लागले. तृप्ती देणारी अध्यात्मचर्चा सुरू झाली. यामुळे मठातही आपापसात बोलणे सुरू झाले. हे सर्व शांत एकांत जीवनाच्या दृष्टिकोनातून होत होते. याला प्रचारी थाट नव्हता व प्रचारी वास नव्हता. या साऱ्या गोष्टी मठाधिपती स्वामींच्या नजरेत चांगल्याच भरल्या. स्वामी श्रीत्रिपुरलिंग सरस्वती महाराज श्रीमदात्मानंदांच्या तेजस्वितेनें प्रभावित झाले. काही आश्रमीयसुद्धा या तेजस्वी तरूण महापुरुषाकडे येऊन बसू लागले.

इकडे योगेशचंद्रांनी आपल्या घरीच मुक्काम ठेवला होता. अलीकडे घर सोडल्यापासून योगेशचंद्रांच्या जीवनाला नवे वळण लागले होते. विशेष ध्येयवादाने आणि श्रीगुरुकृपेने जीवनाच्या नित्यक्रमाला निश्चयाची धार आली होती. घरी राहून श्रीगुरुसेवेची त्यांनी कधी संधी सोडली नाही. आपले साधन आणि श्रीगुरुसेवा यांना प्राधान्य देऊन आपला नित्यक्रम योगेशचंद्रांनी आखला. ते दररोज साधन झाल्यावर गाईच्या धारा काढीत. त्यातून शेर दीडशेर दूध घेऊन सरस्वती मठात जात. आपल्या गुरुदेव आत्मानंदांना ते दूध देत. त्यांच्या सहवासात दुपारपर्यंत राहात. पडेल ती सेवा करीत. त्यांची खोली साफ करून ठेवीत. वस्त्रे व भांडी स्वच्छ करून ठेवीत. पत्रे आणणे, पोस्टात टाकणे, इ. बाहेरची कामे करीत. येणाऱ्या - जाणाऱ्यांची व्यवस्था करीत. दुपारी जेवणाची वेळ झाली की घरी येत. भोजन करून घरी थोडा वेळ थांबत आणि पुन्हा परत श्रीगुरुदेवांकडे येत.

संध्याकाळपर्यंत सत्संगतीचा लाभ घेऊन रात्री घरी परत येत असत. श्रीयोगेशचंद्रांचा असा क्रम नित्यनेमाने न चुकता चालू राहिला.

योगेशचंद्रांच्या या नित्यक्रमाचा आई विचार करू लागली. मधून मधून चौकशी करू लागली. सर्वांच्या मनांत त्यांच्या कार्यक्रमाने व विचारसरणीने आदर वाढू लागला. निश्चयी वृत्तीच्या प्रखरतेने त्याला विरोध करण्याचे सामर्थ्य कोणातही उत्पन्न झाले नाही. आपला योगेशचंद्र मोठ्या सत्पुरुषाच्या संगतीत आहे याची जाणीव आईला होऊ लागली. त्यामुळे आईला समाधान वाटू लागले. पूर्वीसुद्धा तो कधी संसारात व प्रपंचात रमला नाही. आता तर दुर्लभ सत्संगतीमध्ये त्याच्या या वृत्तीने अधिकच जोर धरला. अशा स्थितीत तो या संसाराच्या मायाजालात सापडणे शक्य नाही अशी आईची खात्री झाली. योगेश जे साधुजीवन जगू इच्छित होता त्याला संमती देण्यास ती तयार झाली. प्रपंचातील अडीअडचणी कशा सोडविता येतील याची सल्लामसलत करून योगेशचंद्राने आईला मार्गदर्शन करून ठेवले. आपल्या धाकट्या भावाने नोकरी धरावी. नंतर बहिणीचे लग्न करावे. व नंतर भावाचे लग्न करावे. सध्या दुसरी कोणतीही गडबड करू नये. अशा प्रकारे मार्गदर्शन केले.

इकडे स्वामी त्रिपुरलिंग सरस्वतींनी श्रीमदात्मानंदांना मठाधिपती होण्यासंबंधी बोलणे सुरू केले. आपले वृद्धत्व झाले आहे. मठाचा व्याप मोठा आहे. आपल्या शिष्य परिवारात कोणीही पात्र शिष्य नाही. इत्यादि वृत्त कथन केले आणि उत्तराधिकारी होण्याचा आग्रह धरला. ही घटना मोठी विलोभनीय होती. पण श्रीमदात्मानंद तयार झाले नाहीत. त्यांची ही विरक्ती पाहून सर्वांना मोठे आश्चर्य वाटले.

योगेशचंद्रांना पूर्ण मोकळे करून घेण्यासाठी ही संधी चांगली आहे असा विचार करून श्रीमदात्मानंदांनी योगेशचंद्रांना येथे संन्यास ग्रहण करण्यास सांगितले.

## योगेशचंद्र स्वामी चिन्मयानंद सरस्वती झाले

यावेळी योगेशचंद्रांचे वय अवघे तेवीस वर्षांचे होते. इ. स. १९१४ हा काळ होता. या काळांत गुरुशिष्य ढाक्क्यात येऊन राहिले होते. श्रीत्रिपुरलिंग सरस्वती स्वामींच्या मठात या गुरुशिष्याच्या जोडीला चांगले आदराचे स्थान होते. श्रीमदात्मानंदांनी योगेशचंद्राला संन्यास घेण्याचे सुचविले. त्याप्रमाणे योगेशचंद्रांनी-

सुद्धा त्याला तात्काळ होकार दिला. आमच्या गुरुमहाराजांची जी काही इच्छा असेल ती तंतोतंत पाळणे हीच खरी गुरुसेवा अशी योगेशचंद्रांची धारणा होती. आपण सारे आयुष्य अशा श्रेष्ठतम धर्मकार्यात घालावे हे आधीपासून ठरले होते. आता तर अशी संधी चालून आली की या मार्गातील श्रेष्ठतम भूमिका घेऊन जीवन घालवावयाचे. केवढे परम भाग्य वाटचाल करून योगेशचंद्रांकडे येत होते.

स्वामी श्रीत्रिपुरलिंग सरस्वती महाराज जसे श्रीमदात्मानंदांच्यावर संतुष्ट होते तसेच ते योगेशचंद्रांवर पण संतुष्ट होते. योगेशचंद्रांचे तेज, निष्ठा व श्रद्धा पाहून ते चांगलेच प्रभावित झाले होते. दोघांची वये सारखी असून एक गुरु तर एक शिष्य आहे हे पाहाताना मोठे कुतुहल वाटत असे. स्वामी त्रिपुरलिंग आता वृद्ध झाले होते. मठाची व्यवस्था व जबाबदारी कोणातरी योग्य व्यक्तीच्या हाती सोपविण्याची त्यांना काळजी लागून राहिली होती. मठात शिष्यसंख्या कमी नव्हती. पण हा व्याप व ही जबाबदारी कुशलतेने, यथाशास्त्र व निष्कलंकितपणे संभाळू शकेल असा कोणी दिसत नव्हता. मठातील स्वामींचे शिष्य निष्ठावान, श्रद्धाळू व त्यागी होते. परंतु गुरुत्वाची भूमिका त्या पात्रतेने सांभाळणारे कोणी नव्हते या चिंतेने स्वामी या दोन युवकांकडे मोठ्या आशेने पाहात होते. त्यापैकी एकाने नकार दिला होता.

योगेशचंद्रांच्या एकूण परिस्थितीचा विचार करून श्रीमदात्मानंदांनी आपल्या शिष्याने संन्यास ग्रहण करण्याची इच्छा प्रकट केली. योगेशचंद्रांनी त्याला आपली संमती दिली. स्वामी त्रिपुरलिंग सरस्वतींना तशी प्रार्थना केली. योगेशचंद्रांनी आईची परवानगी घेतली. श्रीमदात्मानंद या संदर्भात अनेक वेळा त्यांच्या घरी जाऊन आले. योगेशचंद्रांच्या आईशी बोलणे केले. शेवटी एक सुमुहूर्त पाहून त्रिपुरलिंग सरस्वती स्वामी महाराजांनी योगेशचंद्रांना विधिपूर्वक संन्यास दीक्षा दिली. इ. स. १९१४ मध्ये वयाच्या २२ व्या वर्षी योगेशचंद्र संन्यासी झाले. हे वर्ष विशेष लक्षात घेण्या-सारखे आहे. या वर्षी प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज समाधिस्थ झाले आणि याच वर्षी संन्याशाच्या 'सरस्वती' कुलांत योगेशचंद्रांनी प्रवेश केला. जणू आपल्या एका पट्टशिष्यासाठी श्रीवासुदेवानंदांनी योगेशचंद्रांमध्ये प्रवेश करून ईशेच्छेची अगम्य लीलाच केली. बाह्यतः दिसणाऱ्या या दोन गुरूंची एकरुपता येथे स्पष्ट केली. विधिवत योगेशचंद्रांचे नांव 'चिन्मयानंद" असे ठेवण्यांत आले.

ब्रह्मचारी श्रीयोगेशचंद्रप्रकाश आता भगवी वस्त्रे धारण करणारे संन्यासी

झाले. गृहस्थाश्रम ओलांडून ते संन्यासी झाले. अगदी आद्य श्रीशंकराचार्यांप्रमाणे संन्यासी झाले. त्यांनी आपले कुटुंबीय सोडले. नातेवाईक सोडले. जीवनातला विलास सोडला. सारे उपभोग सोडले. साऱ्या आशाआकांक्षा सोडल्या. सारे संकल्प विकल्प सोडले. सर्व ईषणा सोडल्या आणि संन्यासी झाले. समर्थांच्या उक्तीप्रमाणे "देवाच्या सख्यत्वासाठी, पडाव्या जीवलगांच्या तुटी" असे त्यांनी केले. असे हे दिव्य संन्यासी जीवन ऐन तारुण्याच्या उंबरठ्यावर योगेशचंद्रांनी स्वीकारले.

विश्वसम्राटसुद्धा ज्याच्या चरणांवर नतमस्तक होतो असा हा संन्यासाश्रम ! संन्यासी ज्याला कोणापुढेही मान लववावी लागत नाही असा हा संन्यासाश्रम ! संन्यासी म्हणजे प्रत्यक्ष देव. असे हे योगेशचंद्रांचे दिव्य जीवन संन्यासाश्रमाच्या कोंदणात बसले. अमोलपणाला दुर्मिळत्व आले. आचार्य म्हणतात "कौपीनवन्तः खलु भाग्यवन्तः" असे भाग्यशाली जीवन योगेशचंद्रांनी स्वीकारले.

**चाह गई, चिंता मिटी मनुजा बेपरवाह ॥**
**जिनको कछू न चाहिये सोई साहंसाह ॥**

अनपेक्ष, निरपेक्ष व विरक्त संन्यासी बादशहाचे बादशहा असतात. त्यांची भगवी वस्त्रे त्यांच्या अंतर्स्थितीची प्रतीक असतात. संन्यासी म्हणजे महावाक्याचे अधिकारी, श्रीमत् शंकराचार्यांच्या नंतर लहानपणीच संन्यास घेणारे फारच थोडे ! त्यामध्ये श्रीचिन्मयानंदांची गणना होते.

तेजस्वी तरुणाच्या ओजस्वी शरीरावर अग्नितुल्य काषायवस्त्रे झळकू लागली. ती नूतन संन्याशी मूर्ती पाहून वृद्ध स्वामी श्रीत्रिपुरलिंग सरस्वतींना त्या मूर्तीचे पुत्रवत् आकर्षण वाटू लागले. आपण या मठाचे उत्तराधिकारी चिन्मयानंदांनाच करावे अशी उत्कट इच्छा त्यांना निर्माण झाली. यापूर्वी त्यांनी यासंबंधी श्रीमदात्मानंदांना विचारून पाहिले पण त्यांचा नकार आला. त्यांना या दुसऱ्या तरुणाबद्दलही आकर्षण वाटत असले तरी त्यांनी तो विषय कधी काढला नव्हता. आता मात्र त्यांना राहवले नाही. त्यांनी आपल्या मनांतील हेतू चिन्मयानंदांचे जवळ एकदाच काढला.

वास्तविक हा मठ मोठा. शिष्यपरिवार भरपूर ! सर्व सुखसोईंनी सुसज्ज. अशी मठाची व्यवस्था. अशा समृद्ध मठात नैसर्गिक वातावरणही रमणीय होते. मोह

होण्यासाठी या गोष्टी काही कमी नव्हत्या. पण ज्याला मोह होतो तो संन्यासी कसला? साऱ्या अनित्य वस्तूंचा त्याग करणारे हे महात्मे मोहाच्या जाळ्यात कसे अडकणार! नूतन स्वामी चिन्मयायानंद सरस्वती आपली भूमिका चांगली जाणून होते. त्यांनी वृद्ध यतीदेवांना अत्यंत विनम्रपणें परंतु मार्मिक उत्तर दिले. त्यांचे उत्तर म्हणजे 'निःस्पृहस्य तृणं जगत्'ची रोकडी प्रचीती होती! स्वामी चिन्मयानंद म्हणाले, "आचार्य! ज्या हेतूने सर्व सोडले ते टिकवून धरण्यासाठी मठाची जबाबदारी बंधनकारक होईल!" हे उत्तर ऐकून वृद्ध स्वामी त्रिपुरलिंग सरस्वती अधिकच चिंतेत पडले. हे सर्व काही श्रीमदात्मानंदांच्या समोर घडत होते. आपला शिष्य आपल्यासारखा प्रखर वृत्तीचा आहे व जे व्रत तो स्वीकारीत आहे त्याला तो पूर्ण पात्र आहे अशा विचारांनी त्यांना संतोष होत होता. जे घडावे असे वाटत होते तसे घडत होते. योगेशचंद्रांना संसारपाशापासून मोकळे करण्याची ही अखेरची लौकिक घटना होती. शिष्याला त्याच्या अधिकाराप्रमाणे भराभर मोकळे करीत जाणे हे गुरूचे कर्तव्य श्रीमदात्मानंद पार पाडीत होते. शिष्यानेही त्याला पूर्ण अनुकूलता दिलेली होती. त्यामुळे जीवनातील घटनांना अपूर्व वेग आला होता. योगेशचंद्रांच्या जीवनांतील हा एक महत्त्वाचा अंक ढाक्क्याला घडला. जन्मभूमीचा व कुळाचा संबंध येथेच संपला. हेच जन्मभूमीचे अंतीम दर्शन होते. हेच भगवती कालीमातेचे ढाकेश्वरीचे अंतीम दर्शन होते. आपल्या प्रिय मातेचेही हेच अंतीम दर्शन होते. दिव्य पुरुषांचे दिव्यत्व यातूनच दिसत असते. त्यांच्या दिव्यत्वाची प्रखरता अशा प्रसंगातून अनुभवास येते.

आईला आणि ढाकेश्वरीला वंदन करून स्वामी चिन्मयानंद सरस्वतींनी जन्मभूमी ढाक्का सोडली. गुरु आपल्या शिष्याला घेऊन पुढील मार्गक्रमणासाठी निघाले.

श्रीमदात्मानंदप्रकाश ब्रह्मचारी आणि त्यांचे शिष्य श्रीचिन्मयानंद सरस्वती स्वामी यांनी ढाक्का सोडला.

## स्वामी आता काशीकडे

गुरुशिष्य बंगालमध्येच आणखी काही ठिकाणी जाऊन आले. त्यांनी जाता जाता सिल्चर, विनौती, कमलासागर आदी गावातून थोडा थोडा मुक्काम केला व ते

परत गुरुगृही ज्ञानसाधन मठात आले. तेथेही अल्पकाळ राहिले. घडलेले वृत्त श्रीगुरुदेव श्रीनारायणतीर्थ देवांना निवेदन केले व पुढील मार्गदर्शनाची प्रार्थना केली.

परमगुरुदेव श्रीनारायणतीर्थ स्वामीमहाराजांनी थोडक्यात रूपरेषा दिली. जे जे घडेल ती ईशेच्छा समजून आपले कार्य सतत चालू राहाणार आहे असा विश्वास परत एकदा त्यांनी स्पष्ट केला. चिन्मयानंदांचे साधन फार तीव्र गतीने चालू आहे. त्याला जितका एकान्त व स्वातंत्र्य मिळेल तितका आवश्यक आहे या विचाराची पुनरुक्ती स्वामींनी केली. जे चालले आहे ते उत्तम आहे असा संतोष प्रकट केला. आपले साधन स्वयंसिद्ध असल्याने साधनेचे नियंत्रण व मार्गदर्शन साधनेतून होत असते असा निर्वाळा दिला. हे साधन, ' साध्य ' प्राप्त होईपर्यंत चालू राहाणार आहे अशी ग्वाही दिली. लौकिक व्यवहार म्हणून परस्परांचे संबंध ठेवावेत असे सांगितले. सर्व जबाबदारी साधनेच्या शिरावर ठेवून त्यांना त्याप्रमाणे करण्यास सांगितले.

दोघांनी गुरुदेवांचे मनोगत ध्यानात घेतले. त्यांची इच्छा हीच त्यांची आज्ञा मानली. परस्परांनी एकांतात विचारविनिमय केला. श्रीमदात्मानंदांनी चिन्मयानंदाला जवळच्या एका गावी जाऊन राहाण्यास सांगितले. जमल्यास मठही स्थापन करण्यास हरकत नाही अशी इच्छाही व्यक्त केली.

स्वामी चिन्मयानंद सांगितल्या गावी निघून गेले. तेथे एक शिवालय पाहून मुक्काम केला. शिवालय गावापासून दूर होते. जवळून नदी वहात होती. एकांत-वासाला मंदिर चांगले होते. ते दुपारी एक वेळ भिक्षेसाठी गावात जाऊन येत व बाकी सर्व वेळ मंदिर व आसपासचा परिसर यामध्ये घालवीत. आपले साधन बरे व आपला दिनक्रम बरा असे त्यांना वाटे. त्यांच्या मनाची ओढही बाहेर नव्हतीच. असा महिना दीडमहिना लोटला. कोणाशी संबंध नाही की कुणाशी भाषण नाही. पण एके दिवशी अचानकपणे त्या गावात मोठी गडबड माजली. गावातील गुंड हातात लाठ्याकाठ्या घेऊन, मोठमोठ्याने ओरडत त्या शिवालयाकडे येऊ लागले. हां हां म्हणता खूप मोठा जमाव जमला. गावातल्या मुलांनी आरडाओरडीत भाग घेऊन गोंधळात भर घातली. तो सारा जमाव हळू हळू शिवालयाजवळ आला.

स्वामी आपल्या साधनेत होते. बराच वेळपर्यंत गडबड कानावर पडून त्यांच्यावर परिणामच होत नव्हता. ते अगदी शांत होते. परंतु जमावाच्या

ओरडण्यांतील काही वाक्ये कानावर पडल्यावर जरा शंकेने ते शिवालयाबाहेर आले. त्यांना कल्पनाही नसलेले दृश्य दिसले. सारा जमाव त्यांच्यावर हल्ला करण्यासाठी येताना दिसला. अनेकांच्या हातात लाठ्या काठ्या होत्या. मोठ्या संतापाने ते येत होते. आपला काहीच संबंध नसताना आपल्यावर असला प्रसंग यावा याचे स्वामींना आश्चर्य वाटले. हे का व कसे झाले याचा विचार करण्यासही वेळ नव्हता. स्वामींच्या मनात एकच विचार आला की ही वेळ निष्क्रिय बसण्याची नाही. या नाटकात आपलाही एक वाटा आहे आणि तो आपण उचलला पाहिजे. बस्स, स्वामी झटकन मंदिरात शिरले व एक भलीभक्कम लाठी घेऊन बाहेर आले. आपली छाटी आवरली. रस्त्यावर येऊन लाठी तोलत तोलत, तावातावाने, बंगाली मधून त्या जमावाला उद्देशून बोलू लागले. त्यांचे रौद्र रूप प्रकट होऊ लागले. एखाद्या कुशल खेळाडूप्रमाणे त्यांनी लाठी फिरवण्यास सुरवात केली. आता जणू रुद्राचे तांडव नृत्य सुरू झाले. स्वामींचे डोळे आणि चेहरा लालबुंद झाला. लाठी फिरवत ते म्हणत होते "या लढायला! हिंमत असेल तर या! करा धाडस! मला 'पलायन अपि मिथ्या' चांगले ठाऊक आहे. संन्याशी आणि लढाईची भीति मला घालू नका. खरे शूर असाल तर पुढे याल," असे म्हणत म्हणत ते हाताने लाठी गरगर फिरवू लागले. समोरच्या अरुंद रस्त्याच्या गल्लीच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत एकमेव शूराचे तांडव नृत्य चालू होते. स्वामींच्या लाठीचा तो प्रचंड वेग पाहून लोकांचे डोळे दिपले. त्यांच्या पुढे यायला एकाचीही छाती झाली नाही. जो तो आपापसात विचारू लागला. अरे या स्वामींशी भांडण काढायला कारण काय झाले? प्रत्येक जण कानावर हात ठेवून म्हणू लागला की– "आपल्याला माहीत नाही बुवा" आणि मागे सरू लागला. होता होता सर्वजण चुपचाप मागे जाऊ लागले. कोणालाही कारण समजले नाही. हा गेला म्हणून तो गेला. जसे सगळे गोळा झाले होते तसे ते निघून गेले. गावातील कुणातरी चार गुंडांची ही गुंडगिरी होती. गावात असे विनोद मधून मधून होत असत म्हणून गावकऱ्यांना त्याचे विशेष नवल वाटले नाही.

पण स्वामींना हा प्रसंग बिलकुल रुचला नाही. त्यांचे मन त्या गावातून उडाले. त्यांनी दुसरे दिवशी आपला मुक्काम हलविला आणि ते आपल्या गुरुदेवांकडे परतले.

गुरुदेव श्रीमदात्मानंदप्रकाश ब्रह्मचारीजी ज्ञानसाधन मठात होते. ते नुकतेच श्रीक्षेत्र काशी येथे गेले होते. त्या अवधीत स्वामीचिन्मयानंदजी विनौटियाच्या ज्ञानसाधन मठात पोहचले. आपल्या परमगुरूंना साष्टांग नमस्कार केला. परमगुरुदेव श्रीनारायणतीर्थांनी दीक्षित पौत्राला आशीर्वाद दिला. "आपल्यासारख्या श्रद्धावान शिष्यावरच यापुढील गुरुत्वाची जबाबदारी आहे. परमेश्वर आपणाकडून निःसंशय ही गोष्ट पूर्ण करून घेईल. निश्चिंत रहा. आपल्या गुरुपरंपरेचे ऋण स्मरणपूर्वक जपले पाहिजे. आणि त्यात आपली भर घालून पुढील पिढीच्या हवाली केले पाहिजे," असे ते म्हणाले.

श्रीमदात्मानंद आपल्या काही शिष्यांना घेऊन काशीकडे आधीच रवाना झाले होते. स्वामी चिन्मयानंदही त्यांच्या पाठोपाठ काशीकडे रवाना झाले. एका महान परंपरेचे दोन प्रबल अंकूर श्रीक्षेत्र काशीकडे निघाले.

## शक्तिपात विद्या काशी - हृषीकेशकडे आली !

श्रीमदात्मानंद आपल्या शिष्यवृंदासह काशीत येऊन पोहोचले. काशीत पांडेहौली मोहल्यात त्यांना एक घर भाड्याने मिळाले. तेथे सर्वांची व्यवस्था करवून घेऊन त्यांनी या नव्या घरात मुक्काम केला. स्वामी चिन्मयानंद पुढे काही दिवसांनी काशीत आले. परंतु त्यांना पांडेहौलीचा पत्ता माहीत नव्हता. काशी-सारख्या दाट वस्तीच्या क्षेत्रात श्रीमदात्मानंदांची भेट कशी व्हावी मोठा प्रश्न स्वामींपुढे उभा राहिला. स्वामींनी घर न घर पाहायला सुरवात केली. काही दिवस या खटपटीला यश आले नाही. 'कृपाळूपणे अल्प धारिष्ट पाहे' याचा अनुभव येऊन एक दिवस अचानकपणे स्वामी एका घरात शिरले. तोच पुढे श्रीगुरुमहाराज 'दत्त' म्हणून उभे. स्वामींनी त्यांना साष्टांग नमस्कार केला. भेटीमुळे उभयतांना खूप आनंद झाला. पुढे कांही दिवस स्वामींनी श्रीगुरुसहवासात तेथेच घालविले.

आपल्यापैकी काही शिष्यांना काशीत ठेवून श्रीमदात्मानंद हिमालयाकडे तीर्थयात्रेस निघाले. यावेळी बरोबर चिन्मयानंदांना घेतले होते.

या तीर्थयात्रेत चिन्मयानंदांनी आपल्या गुरुंची खूप सेवा केली. हिमालयाच्या अवघड यात्रेतून सर्व सामान डोक्यावर घेण्याचे काम चिन्मयानंदांचे असे. याशिवाय यात्रेतील अनेक सोई करून देण्यासाठी हिंडणे, चौकशी करणे, स्वैपाकाची तयारी

करणे, कपडे धुणे असली अनेक कामे ते पुढे होऊन करीत. हरिद्वार, हृषिकेश, उत्तरकाशी, देवप्रयाग, रुद्रप्रयाग इ. स्थानांना या यात्रेत ते जाऊन आले. हिमालयाच्या या पहिल्याच भेटीत या गुरुशिष्यांच्या जोडीला उत्तरकाशीबद्दल फार मोठे आकर्षण निर्माण झाले. त्यांनी बराच काळ या निवांत व पवित्र गंगामातेच्या कुशीत घालविला. या अवधीत हिमालयाचा परिसर परिचयाचा झाला. ही तीर्थयात्रा संपवून मंडळी परत श्रीक्षेत्र काशीस आपल्या मुक्कामी आली.

हा इ. स. १९१९ चा मार्च महिना होता. १९१४ मध्ये स्वामी चिन्मयानंदांनी ढाक्का सोडला. पुढे वर्ष दीडवर्ष ते बंगालमध्येच राहिले. नंतर काशीत आले. हिमालयाची तीर्थयात्रा केली आणि परत काशीत आले. असा चार पांच वर्षाचा काळ परिव्राजक स्थितीत गेला. या सुमारास म्हणजे १९१९ सालच्या मार्च एप्रिल महिन्यात परमगुरुदेव श्रीमदात्मानंदांनी श्रीनारायणतीर्थदेवांना मुद्दाम श्रीकाशीक्षेत्री आणले. पांडेहौलीतील घरात त्यांचा बरेच दिवस मुक्काम होता. परमगुरुदेव, श्रीगुरुदेवमहाराज आणि श्रीस्वामीचिन्मयानंदसरस्वती यांचा 'न भूतो न भविष्यति' असा त्रिवेणी संगम श्रीक्षेत्र काशी येथे झाला. या तीर्थराजाच्या कुंभमेळ्यात अनेक लहान मोठ्या देवदेवता सामील झाल्या होत्या. अनेक मोठमोठे साधक येथे उपस्थित होते. महायोग विज्ञान ग्रंथाचे लेखक, शक्तिपात परंपरेचे प्रवर्तक, श्रीयोगानंदमहाराज, या काळात या कुंभमेळ्यांत, गुरुगंगेत स्नान करून, जीवनानंद लुटीत होते. या वेळेपासूनच श्रीयोगानंदांचा व स्वामी चिन्मयानंदांचा परिचय झाला. परपस्परात स्नेहभाव वाढला. स्वामींच्या निर्मळ, निग्रही व श्रद्धाळू वृत्तीची छाप योगानंदांवर चांगलीच पडली. स्वामींच्या कडकडीत वैराग्याने आणि तपस्येने ते प्रभावित झाले.

श्रीकाशीक्षेत्रात या सर्व सिद्ध–साधक मंडळींनी गंगास्नान करावे, सद्गुरुसेवा करावी. गंगाप्रवाहाने आणि गुरुवाक्य श्रवणाने पुनीत व्हावे आणि भावी जीवनाच्या शिदोऱ्या भरून घ्याव्यात असे चालले होते. अशी दुर्मिळ संधि जीवनाच्या प्रारंभीच स्वामी चिन्मयानंदांना मिळाली होती. सर्वांचा तेथील मुक्काम ८।१० महिने होता. १९२० च्या प्रारंभीच परमगुरु श्रीनारायणतीर्थदेव आपल्या ज्ञानसाधन मठात विनौटियाला परतले. त्यांना पोहोचविण्यासाठी श्रीमदात्मानंद त्यांचेबरोबर गेले. श्रीयोगानंद हृषिकेशला आपल्या स्वर्गाश्रमाकडे वळले. जाताना त्यांनी चिन्मयानंदांना

तिकडे येण्याचा आग्रह केला. स्वामींनी नंतर येतो म्हणून आश्वासन दिले. याप्रमाणे सर्वजण आपापल्या ठिकाणी निघून गेले. स्वामींनी आपलाही कार्यक्रम आखला. त्यांनी हिमालयात जाण्याचे ठरविले. एकांतात भरपूर साधन करावे व काही मिळवावे ही तीव्रता वाढली. त्याप्रमाणे ते एकटे बाहेर पडले. प्रथम प्रयागराज व हरिद्वार येथे मुक्काम करून नंतर ते हृषिकेशला आले.

स्वामींनी हृषिकेशला स्वर्गाश्रमात श्रीयोगानंदांकडे मुक्काम केला. येथे स्वामींचा मुक्काम दोन महिने होता. या काळातील स्वामींचा दिनक्रम पाहून व विचार ऐकून योगानंदांना स्वामींच्याबद्दल फार आदर वाटू लागला. बोलण्याचालण्यात वेळ घालविणे स्वामींना आवडत नसे. जीवनाचा दृष्टिकोन आणि या महान साधन मार्गावरील श्रद्धा यासंबंधी मधून मधून चर्चा होत असे. स्वामींच्या आदर्श नि शुद्ध विचारसरणीची छाप योगानंदांवर पडली. स्वामींचे त्या वेळचे वागणे, त्यांची साधना व त्यांचा प्रसन्न चेहरा योगानंदांच्या अन्तःकरणात कायमचा कोरला गेला. तो ठसा शेवटपर्यंत तसाच टिकला होता.

अखंड साधनेने स्वामींच्या सर्व वृत्ती अंतर्मुखी झाल्या होत्या. त्यांना हिमालयाच्या अंतरंगातील पूर्ण शांतता हवीशी वाटू लागली. हृषिकेशच्याही ते पुढे गेले. उत्तर–काशीच्या दिशेने टेहरी गढवाल विभागात गेले. कुणाशी एक नाही कुणाशी दोन नाही. एकमेव अद्वितीय व पूर्ण परब्रह्माच्या अनुभूतीसाठी एकटेच पुढे गेले. याची कल्पना त्यांनी योगानंदांनाही दिली नाही. याप्रमाणे स्वामी टेहरीच्या जंगलात साधनेसाठी निघून गेले.

## टेहरीच्या जंगलांतील स्वामींची अज्ञात साधना ! !

हिमालयाची सारी पर्वतराजी शिवाचे सदन म्हणून चिरप्रसिद्ध पावन भूमि आहे. परंतु त्या पावन भूमीतही गंगाभागीरथीचा परिसर अधिकच मोलामहत्वाचा आहे. गंगामातेचा हिमालयातील प्रवाहाचा अवखळपणा पाहिला की भगीरथाच्या भगीरथ प्रयत्नांचे आश्चर्य वाटते. हा परिसर देवप्रयागपासून थेट गंगोत्रीपर्यंत पसरलेला आहे. याला टेहरी गढवाल विभाग ( राज्य ) म्हणतात. इंग्रजी राज्यशासनात केदार व नारायण मंदिरांचा प्रदेशसुद्धा टेहरी गढवाल राज्यात मोडत असे. परंतु भारतीय शासनाने केदारनारायणाची मंदिरे व त्याच्या सभोवतालचा प्रदेश

उत्तर प्रदेशामध्ये सामील केला आहे. त्यामुळे सध्या टेहरीचे राज्य गंगेच्या परिसरापुरते मर्यादित झाले आहे. उत्तरकाशी ही टेहरी गढवालची राजधानी पूर्वीपासून आहे.

स्वामी चिन्मयानंद पूर्वी उत्तरकाशीला येऊन राहिले होते. त्यावेळी त्यांना येथील वनविथींनी आपलेसे केले होते. स्वर्गाश्रम सोडल्यानंतर ते देवप्रयागच्या दिशेने निघाले. देवप्रयाग हे महत्त्वाचे उल्लेखनीय तीर्थक्षेत्र आहे. प्रयागस्थाने ही नद्यांची संगमस्थाने असतात. हिमालयात पाच प्रमुख प्रयागस्थाने आहेत. विष्णुप्रयाग, नंदप्रयाग, कर्णप्रयाग, रुद्रप्रयाग आणि देवप्रयाग. या सर्वांत देवप्रयाग विशेष महत्त्वाचे मानतात. मन्दाकिनीसहित अनेक नद्यांना आपल्यामध्ये सामावून घेऊन अलकनंदा केवढ्या धावपळीने धावत येते आणि भागीरथीगंगेला कडकडून भेटते. भागीरथीसुद्धा जाताजाता तिला आपल्या पोटात घेते व असंख्य जीवांच्या उद्धारासाठी विजेच्या गतीने पुढे झेपावत जाते. येथून पुढे ज्या नदीला भागीरथी, जान्हवी, पापविनाशिनी इत्यादि नावांनी संबोधिले जात होते, तिला 'गंगामाता' म्हणू लागतात. गंगेला मिळणारी कोणतीही नदी गंगेशी एकरूप होते व पुढे गंगास्वरूप होऊन जाते. अनेक लहान मोठ्या नद्या गंगेला मिळाल्या, गंगेत विलीन झाल्या, परंतु गंगामात्र शेवट-पर्यंत गंगाच राहिली.

स्वामींनी देवप्रयागला काही दिवस मुक्काम केला व ते भागीरथीच्या काठा-काठाने उत्तरकाशीकडे निघाले. हे भागीरथीचे खोरे फार सुंदर आहे. या खोऱ्यात भागीरथी तीरावर जन्हू आश्रम, जमदग्नी आश्रम, रेणुकामातेचे पाणी भरण्याचे ठिकाण, उत्तरकाशी, गंगोत्री इ. अनेक उत्तमोत्तम ठिकाणे आहेत. भगीरथाची हीच तपोभूमि आहे. सगरराजाच्या साठहजार पुत्रांचा येथेच भागीरथी गंगेने उद्धार केला. या भूमीला पांडवांची भूमि सुद्धा म्हणतात. प्राचीनकाळी येथे 'हवी' देण्यासाठी मोठमोठे यज्ञमंडप उभारले जात होते. वेदमंत्रांच्या घनगंभीर सुस्वर मंत्रघोषाने सारा परिसर निनादून जात होता. येथेच ऋषीमुनींना वेदश्रवणाची अनुभूती येत होती. असा टेहरीचा प्रदेश परम मंगल आहे या प्रदेशातून मजल दर मजल करीत स्वामी पुढे पुढे जात होते.

स्वामींनी हे पावन स्थान आधीच निवडून ठेवले होते. योगी, तपस्वी, साधू सिद्धभूमीकडे आपोआप खेचले जातात, तसे स्वामींचे झाले होते. भागीरथीच्या तपोभूमीने स्वामींना खेचून आणले होते.

स्वामींनी आपले जीवनसुवर्ण प्रदीप्त संन्यासाश्रमाग्नीत समर्पित करून तेजःपुंज केले होते. हे दिव्य तेज पचवून टाकण्यासाठी, ते उत्तराखंडाच्या अती शीतल तपोभूमीमध्ये, निःस्पंद शीतल वायू सेवन करण्यासाठी आले होते.

सद्गुरुकृपेने प्राप्त झालेल्या, नसानसातून शक्तीचा संचार करणाऱ्या महाशक्तीला, कणाकणातून स्थिरावण्यासाठी, स्वामी इकडे आले होते. शक्तिसंचाराची परम अनुभूती आपल्या अभ्यासातून मिळविण्यासाठी, गंगामातेच्या कुशीत आणि नगाधिराज हिमाळयाच्या छायेत ते आले होते.

चोवीस वर्षाचा एक अवखळ तरुण 'संन्यास' घेऊन आला होता. तारुण्याला प्रौढता आली होती. अवखळपणाला गांभीर्य आले होते. मनुष्याच्या दुर्लभ जीवनाचे अंतीम ध्येय गाठण्यासाठी या महान् तपोभूमीत स्वामी आले होते.

ज्यांनी जग आणि जगराहाटीतील मायावी संसाराला निश्चयाच्या एका फुंकरीने कापसाप्रमाणे उडवून दिले, विवेकाच्या नेत्रकटाक्षाने छेदून टाकले, श्रद्धेच्या ठोकरीने ठोकरून दिले, असे महान जीवन जगणाऱ्याच्या हृदयातील अथांग महाशक्तीचा थांग कसा लागणार? अशी ही स्वामींची स्थिती अनाकलनीय असली तरी विचारात घेण्यासारखी आहे.

हा टेहरीचा पवित्रतम प्रदेश स्वामींच्या साधनेची साधनभूमि बनला होता. वृक्षलतांनी भरलेल्या पर्वतांच्या रांगा, वरून नाचत बागडत उड्या घेणाऱ्या, पांढऱ्याशुभ्र जलधारांनी भरलेल्या दऱ्याखोऱ्या व बर्फांनी आच्छादलेली उंच उंच पर्वतांची शिखरे, भागीरथीच्या सान्निध्याने, पावन झाली होती. येथील निसर्गाचे सौंदर्य काश्मीरच्या सौंदर्याहून काही आगळे वेगळे आहे. काश्मीरचा निसर्ग शृंगार-उद्दीपक आहे, नेत्राल्हादायक आहे तर हिमालयातील टेहरीचा निसर्ग शांत व चित्ताल्हादायक आहे. काश्मीरचा निसर्ग बहिर्मुखी बनवितो तर इकडचा निसर्ग अंतर्मुखी करतो.

अशा निवान्त, प्रशांत, मनोहर व पवित्रतम सिद्धस्थानामध्ये स्वामी चिन्मयानंद साधनेत लीन झाले. या भागात कुठे वास्तव्य केले? आहार कोणता घेतला? शीत निवारण कसे केले? हे फक्त स्वामींनाच ठाऊक. येथे जवळ जवळ १॥–२ वर्षे स्वामींनी काढली. त्यांची हिमालयाशी टक्कर घेणारी निर्भयता आणि गंगेशी

स्पर्धा करणारी तितिक्षा बुद्धि जाणत्यांना स्तब्ध करून टाकते. या काळातील स्वामींचे साधन अपूर्व झाले. त्यांनी स्वत:ला कायावाचामनाने साधनेला अर्पण करून टाकले होते. त्यांनी देहाची पर्वा केली नाही की साधनेची उपेक्षा केली नाही. निश्चयाचे महामेरु असे असतात हे स्वामींच्या येथील जीवनाकडे पाहून वाटते. स्वामींची ही साधन तपस्या किती खडतर अवस्थेत झाली असेल हे कल्पनेने समजून घ्यावे लागेल.

आता साधनेचे मार्गदर्शन अंत:प्रेरणेने होऊ लागले. ही प्रेरणा कितीही सूक्ष्म असली तरी प्रेरणेचा क्षीण ध्वनि नित्य अनुसंधानाने स्पष्ट प्रतीत होऊ लागला. साधनेने स्वामींच्या बाह्य जीवनाचे नियंत्रणही आपल्या ताब्यात घेतले. आता स्वामींनी काय करावयाचे किंवा काय करावयाचे नाही हे 'साधना' सांगू लागली. स्वामींना आतून आदेश मिळू लागले. यामुळे स्वामींना कुतूहल नि आश्चर्य वाटले. साधनेचा हा विशेष ध्यानात घेऊन स्वामी टेहरीच्या जंगलात साधना करीत राहिले.

असे साधन चालू असताना स्वामींना कानात स्पष्ट शब्द ऐकू आले. "दक्षिणेकडे चल." एक दिवस झाला. स्वामींनी दुर्लक्ष केले. दुसरे दिवशी तोच आवाज आणि तेच शब्द परत ऐकू आले. स्वामींना आश्चर्य वाटले आणि दिवसभर ते त्याचा विचार करू लागले. पण काही बोध होईना म्हणून काहीच केले नाही. तिसरे दिवशीच्या साधनेत तेच शब्द अधिक स्पष्ट व निश्चयी आवाजात त्यांनी ऐकले, मग मात्र त्यांनी टेहरी जंगल सोडले. परत उत्तरकाशी, देवप्रयाग, हृषिकेश व हरिद्वार वरून हथरसला येऊन थांबले. तेथे मुक्काम केला. याप्रमाणे शक्तीच्या आदेशाने स्वामींची टेहरी सुटली.

# "दक्षिण चलो" आदेश

विक्रम संवत् १९७८ चा तो चातुर्मास होता. बंगाली बालस्वामी म्हणजेच श्रीचिन्मयानंदसरस्वती हथरसमध्ये येऊन राहिले होते. हथरस हे रेल्वेचे मोठे स्टेशन आहे. आग्र्याच्या उत्तरेस, मथुरा वृंदावनाच्या पूर्वेस व बुलंद शहराच्या दक्षिणेस हे ठिकाण आहे. गावापासून जवळच एक मंदिर पाहिले. एकांत ठिकाण म्हणून ते पसंत केले. पण हिमालयाची शांतता येथे कुठली असणार? म्हणून स्वामींनी स्वत:पुरती छोटीशी गुहा मंदिराच्या मागे स्वत:च तयार करून बांधली व तेथे राहू लागले. दोन्ही वेळा मस्त साधन करावे. साधनेच्या धुंद मस्तीत दिवस काढावा. दुपारी गावात जाऊन भिक्षा आणावी, सायंकाळी निसर्गातून फेरफटका करावा, बाकी काळ आपल्या स्वनिर्मित साधनगृहात काढावा, असा त्यांचा सुटसुटीत दिनक्रम सुरू झाला.

चातुर्मास संपत आला. आता स्थानांतर केले पाहिजे हा विचार सुरू झाला. पण कुठे जावे हे कळेना. भगवतीची इच्छा काय आहे तेही नीट ध्यानात येईना, या स्थितीत भाद्रपद पौर्णिमेचा दिवस उद्यावर येऊन ठेपला. नित्याप्रमाणे स्वामीजी भल्या पहाटे उठले. प्रातर्विधि उरकले आणि साधनेला बसले. ब्राह्ममुहूर्ताचा तो समय होता. पंच पंच उष:कालाची ती शुभवेळ होती. निरामय, निर्मळ व निवांत वातावरण होते. स्वामी साधनेत केव्हाच एकाकार झाले. आता ते साधक थोडेच राहिले होते? साधन त्यांच्या हातात होते आणि ते साधनेच्या ताब्यात होते. आपल्या अन्त:प्रेरणेकडे चुकूनही दुर्लक्ष त्यांचेकडून होत नव्हते. त्यांची अन्त:प्रेरणा सुद्धा प्रत्येक क्षणी त्यांना मार्गदर्शन केल्याशिवाय राहात नसे. यामुळेच स्वामी निर्भय झाले होते व नि:शंक बनले होते. काय होत आहे ते होऊ देणे एवढेच त्यांचे काम राहिले होते. लहान बालक ज्याप्रमाणे आईच्या हातात आपला हात देऊन चालते

त्याप्रमाणे स्वामींनी आपला हात साधनेच्या, महाशक्ती भगवतीच्या हातात दिला होता आणि ते निर्धास्त झाले होते.

आज साधनेला बसेपर्यंत कुठे जायचे हे ठरले नव्हते. परंतु आजच निर्णय मिळाला. भगवतीची आज्ञा आज झाली. दर्शनही झाले. स्पष्ट शब्दात शक्तिदेवतेने सांगितले "अजून दक्षिणेकडे जा. दक्षिण दिशा तुझी कर्मभूमि आहे. तुझ्याकडून माझा प्रचार दक्षिणेकडे होणार आहे. तुझे पूर्वाश्रमीचे परमगुरु श्रीनारायणतीर्थांना मी आशीर्वाद दिला आहे. तुझ्या हातात हा स्फुल्लिंग बांधला आहे. याचा प्रचार सर्वत्र होणार आहे. तुला तेच कार्य करावयाचे आहे. चल! अजून दक्षिणेकडे चल! येथे थांबू नकोस."

हा स्पष्ट व विस्तारपूर्वक आदेश मिळताच स्वामींना फार आनंद झाला. त्यांचा उजवा हात स्फुरू लागला. डोळे उघडले गेले. त्या कमलासारख्या नेत्रातून दिव्यानंद ओसंडू लागला. ते प्रसन्न नेत्र पुन्हा एकदा मिटले. त्यांनी भगवान् शंकराचे स्मरण केले. भगवती उमेचे स्मरण केले. त्या पार्वती-परमेश्वराला मनोमन नमस्कार केला आणि स्वामी आसनावर उठून उभे राहिले. हातात त्यांचा तो डौलदार कमंडलू घेतला व गुहेच्या बाहेर आले.

नुकताच सूर्योदय होत होता. बालरवीची सोनेरी किरणे स्वामींच्या भगव्या छाटीवर पडली. प्रसन्न व तेजस्वी मुखमंडलावर ती सोनेरी किरणे पडली. अहाहा! किती विलोभनीय दृष्य होते ते! जणू अग्नीची दिव्य व तेजस्वी शलाका ती होती. त्या शलाकेमधून मोहक मुखकमल उमलले होते. जणू प्रत्यक्ष रवीच आरक्त उषेसह आज तेथे खाली उतरून आला आहे, एवढेच नव्हे तर जणू जगताला प्रकाशित करण्यासाठी स्वामी चिन्मयानंद पूर्वक्षितिजावर जाऊन उभे राहिले आहेत, असे वाटत होते.

स्वामींची शरीरयष्टि सडसडीत होती. ती पुष्टही नव्हती किंवा कृशही नव्हती. जणू एक विद्युत् रेखाच! स्वामींची उंची अवघी ५। फूट होती. त्यांच्या चरणस्पर्शाने पुनीत झालेल्या खडावा धन्यतेने चमकत होत्या. मुखकमलाची शोभा अवर्णनीय होती. गोल, श्यामल व आरक्त वर्णाचे मुख बालश्रीकृष्णाची आठवण करून देत होते. गोबरे गाल तर बालपणाच्या बाळशाचा जणू ठेवा होता. तरतरीत नासिका, गोबऱ्यागालांची गोलाई आणि विशाल भालप्रदेश हे कमळाच्या पाकळ्यां-

प्रमाणे मोहक दिसणाऱ्या तेजस्वी डोळ्यांचे कोंदण होते. डोळ्यातील तेज असे विलक्षण होते की जणू सारी पृथ्वी यांच्या नेत्रकटाक्षाप्रमाणे नाचत होती. स्वामींचे सारे सौंदर्य, सारे तेज व सारी भव्यता एकमेवपणे एकवटली होती ती केवळ त्यांच्या दोन डोळ्यात.

भगवान् अत्रीमुनींच्या आश्रमामध्ये, नित्य प्रातःकाली, श्रीदत्तात्रेयांच्या दर्शनार्थ भक्तांची दाटी उसळत असे, त्याप्रमाणे येथ स्वामींच्या गुहेबाहेर सारी मूक सृष्टी त्यांच्या दर्शनासाठी आतुरतेने वाट पहात असे. शांतचित्त व प्रसन्नमुख स्वामी गुहेबाहेर आले की सारा वनप्रदेश आनंदाने हरखून जाई. मंडनमिश्रांच्या दरवाज्यावरील पिंजऱ्यातील शुकसारिकांचे वंशज कालौघात खूप गोष्टी विसरले. परंतु या चातुर्मासात झालेल्या स्वामींच्या दर्शनाने त्यांना आपल्या मालकाच्या गुरूंची आठवण झाली. आचार्यांची एक काव्यपंक्ति या वनातील शुकसारिकेच्या मुखातून बाहेर पडली.

" **तस्मै श्रीगुरुमूर्तये नम इदं श्रीदक्षिणामूर्तये।** " साऱ्या सृष्टीने स्वामींना वंदन केले. स्वामींनी साऱ्यांना मौनाने आशीर्वाद दिला. 'न मे भक्तः प्रणश्यति'! सर्वत्र अपूर्व दिव्य वातावरण निर्माण झाले. चैतन्याचा चिन्मयानंद प्रत्येकाच्या हृदयवीणेतून स्पंदन करू लागला. सर्व चराचर आपापल्या नित्यक्रमाला लागले. स्वामीजीमात्र भगवतीच्या आदेशाप्रमाणे दक्षिण दिशेकडे जाण्याच्या तयारीस लागले. स्नानादि नित्य आन्हिक उरकले आणि शिवाचे दर्शन करून स्वामी दक्षिणेकडे निघाले.

हथरस रेल्वे स्टेशनवर ते गेले. त्यांनी वेळापत्रक पाहिले. दक्षिणेकडे जाणाऱ्या गाड्या पाहिल्या. तिकिट काढण्यासाठी खिडकीपाशी आले. परंतु खिसाच नाही तर खिशात पैसे कुठले? स्वामींच्या जवळ पैसाही नव्हता. इतक्यात एका धनिक यात्रेकरूला सहज बुद्धि झाली आणि या संन्याशाला विचारले-" कुठे जायचंय महाराज?"

स्वामी म्हणाले " दक्षिणेकडे "!

यात्रेकरूला काय वाटले कुणास ठाऊक! त्याने स्वामींना होशंगाबादचे तिकिट काढून दिले आणि सांगितले " होशंगाबादला जा. " गाडी रात्रीची आहे. त्या धनिक



होशंगाबाद

-दक्षिणेचे प्रवेशद्वार -

नर्मदामातेचे विस्तृतपात्र व विशाल घाट
स्वामी व महाराज यांच्या अतर्क्य भेटीचे अपूर्व स्थान.
- इ. स. १९२२ -





होशंगाबाद–मंगळवार घाट–या पिंपळासमोर शिवमंदिर व मागे पिशाच्च कोठी होती.
यथे स्वामी येऊन राहिले होते.



होशंगाबाद–मंगळवार घाट ते खर्रा घाट, सारी रमणीय पायवाट !
१॥ मैल अंतर वनश्रीचा ऐश्वर्य थाट !!

यात्रेकरूने स्वामींना भिक्षेसाठी फळे दिली. हा चमत्कार नव्हता. ही ईशेच्छा होती. स्वामी आत्मानंदात खूष होते. भगवतीच्या लीलेचा अनुभव घेण्यासाठी दक्षिणेकडे निघाले होते. मोठ्या त्वरेने निघाले होते. त्यांनी आपल्या 'मातेचा' हात धरला होता. आई त्यांना सुखरूप नेत होती. स्वामीजी आईच्याही पुढे धावत होते. स्वामींची चित्तवृत्ती भोळ्या बालकाप्रमाणे होती. अगदी सरळ होती. सरळ स्वभावाचा बालक आईला जसे प्रश्न विचारतो तसे स्वामीजी पण प्रश्न विचारत होते.

"आई ! आपण कुठे चाललो आहोत ?"

आई म्हणत होती 'गप्प ! बोलू नकोस, विचारू नकोस ! मुकाट्याने माझ्याबरोबर चल !'

बिचारा बालक क्षणभर गप्प बसे, पण दुसऱ्या क्षणीं आईला विचारी--

"पण आई ! मला दक्षिणेकडची भाषा येत नाही. रीतिरिवाज ठाऊक नाहीत. कुणाची ओळख नाही. कधी तो मुलख काळा की गोरा ते सुद्धा पाहिले नाही. म्हणे दक्षिणेकडे चल ! कोणाकडे जाऊ? कोणाला भेटू? काय सांगू? काय करू? हे तू काहीच सांगत नाहीस ! कशी अजब आहेस ग तू ! आणि मी सुद्धा कसा वेडा आहे. तू चल म्हटलेस आणि मी निघालो. ठीक आहे. तुझा हात सोडत नाही म्हणजे झाले. मग हवे तेथे घेऊन जा ! पाहिजे ते करून घे ! मग तर झाले ना ?"

**माझे माझ्यात काही नाही । जे आहे ते तुझेच सारे ।**
**तुझे तुलाच देण्यात । माझे काय जाते रे ॥**

या ओळी गुणगुणत स्वामी निघाले होते. अशा भोळ्या व श्रद्धाळू बालकावर आईचे प्रेमही प्रगाढ असते. ती जेव्हा त्या बाळावर प्रेमाचा वर्षाव करते तेव्हा ते बालक आनंदाने वेडे होऊन जाते. नाचू व बागडू लागते. गाऊ लागते. हसू खेळू लागते. केवळ आईच्या प्रेमाच्या जोरावर त्याला जग ठेंगणे वाटते. केवढे परमभाग्य आहे त्या बालकाचे ! हेच सूत्र विश्वसूत्रधाराला आपलेसे करण्याचे आहे. स्वामींच्या हातात हे सूत्र होते. या अज्ञात पण प्रभावी सूत्राच्या जोरावर स्वामींना दक्षिणेकडे जाण्याची आज्ञा झाली. प्रेरणा झाली. आदेश झाला.

## स्वामी होशंगाबादेस आले

अनंताची पराशक्ति इंद्रियांचे द्वारे आकलन करून घेता येणारी नाही. ती केवळ स्वसंवेदनेने जाणून घेता येते. या पराशक्तीची जाणीव म्हणजे कल्पनेचे खेळ नव्हेत. ती जाणीव म्हणजे प्रत्यक्ष प्रचीति! साक्षात् अनुभव! कल्पने-पलीकडील वस्तूला कल्पनेच्या तरंगांनी कसे जाणता येईल? हे समजले तर आनंदच आनंद आहे. आनंदसागरातील लाट आनंदाची असते आणि बिंदूही आनंदमय असतो. या विचारतंद्रीत स्वामी होशंगाबादेस येऊन पोहचले.

त्यांना रेल्वेतूनच नर्मदामातेचे दर्शन झाले. संन्याशाला नदीची ओढ फार! नदीकाठी वास्तव्य म्हणजे त्यांच्या दृष्टीने स्वर्गात वास्तव्य! गावात कुणाचीही ओळख पाळख नाही मग नदीशिवाय कोणाचा आसरा त्यांना? नदी जीवन देते, शीतलता देते, आसरा देते, तृप्ति देते.

स्वामी स्टेशनामधून बाहेर पडले ते सरळ नर्मदा मातेकडे निघाले. "रेवा तीरे तपःकुर्यात्" हे त्यांना आठवले. नर्मदातीर म्हणजे रेवातीर! रेवातीर म्हणजे जपी, तपी व संन्याशांचे माहेरघर! आज आपण आपल्या माहेरी आलोत या विचाराने स्वामींना अत्यानंद झाला. त्या आनंदात ते नर्मदेच्या काठाकाठाने मंगळवार घाटावर आले. त्यांनी नर्मदेचे पवित्र जल डोळ्यांना लावले. आचमन करून मस्तकावर सिंचन केले. वंदन करून ते जलप्रवाहात शिरले. मनसोक्त स्नान केले. 'चिन्मय' शरीराला पुनरपि चैतन्यानें न्हाऊ घातले. प्रवासाचा थकवा नाहीसा झाला. तप्त शरीर शीतल झाले. मनाला शांतता आली. अन्तःकरण तृप्त झाले. मग स्वामीजी काठावर आले. संध्यादि आन्हिक उरकले भरपूर जल प्राशन केले. विश्रांती घेण्याच्या इच्छेने घाटाच्या पायऱ्या चढून वर आले.

## दृश्य–अदृश्य पिशाच्च्यांची संगत !

स्वामीजी स्नानादि आन्हिक उरकून घाट चढून वर आले. तेथे बऱ्याच, धर्मशाळा होत्या. त्या पहात पहात कुठे उतरावे हा विचार ते करीत होते. तेथे अनेक साधू बैरागी होते. वटवृक्षावर अनेक वटवाघुळानी गर्दी करून चित्रचिवाट करावा तशी त्या साधूंची गर्दी मंगळवार घाटावर झाली होती. लंगोटी लटकाविलेले दाढी जटा वाढविलेले, मुंडन चकोटी केलेले, फकिरी कफनी घातलेले, राख गेरू

फासलेले, चंदन, भस्माचे पट्टे ओढलेले, तुलसी, रुद्राक्षाच्या माळा घातलेले, गंध, टिळा लावलेले, झोळ्या, चिमटे, कटोरे, काठ्या व कुबड्या घेतलेले अनेक वैचित्र्यपूर्ण साधू बैराग्यांचे ते जणू संमेलनच भरले होते. त्यामध्ये धष्टपुष्ट होते. रोडके होते. काळे होते. गोरे होते. उंच होते. ठेंगणे होते. जणू सर्वांचे प्रतिनिधि तेथे गोळा झाले होते.

होशंगाबादेतील सज्जन गृहस्थाश्रमी त्यांना ओली कोरडी भिक्षा घालीत आणि नर्मदामाता त्यांना भरपूर पाणी देत असे. साऱ्यांच्या पोटापाण्याचा प्रश्न विनासायास सुटे! त्यांचा उरला सुरला सर्व काळ रिकामपणच्या उद्योगासाठी मोकळा असे. एकदा ठरलेली वेषभूषा सजवली की झाले त्यांचे धर्मानुष्ठान! मग काय? भांग, घोटा, गांजा, मिळविण्यात व मळण्यात तासन् तास खर्च होत असत. एकदा का त्या पदार्थांची 'तार' चढली म्हणजे प्रत्येकाचे सामर्थ्य आणि चमत्कार यांची चढाओढ चाले! यातूनच मुरलेल्यांना गुरुत्व पदवी प्राप्त होई आणि नवागतांना शिष्यत्व पत्करावे लागे!

या साधू बैराग्यांनी मंगळवार घाटावर अशा पद्धतीने तपेच्या तपे घालविल्याने त्यांना जपीतपीच्या वहिवाटीचे हक्क प्राप्त झाले होते. बाह्यतः सारे साधू बैरागी दिसत पण एकदा का दमडीकवडीवरून भांडण जुंपले तर प्राणाशी खेळायला ते मागे पुढे पहात नसत! यांच्या वाटेला कोण जाणार? यांच्या भानगडीत कोण पडणार? यांच्या कुलशीलाची कोण चौकशी करणार? वासनांनी बरबटलेले हे जणू जिवंत खैस! अशा साधूंच्या नजरा येणाऱ्या स्वामींकडे टकमका पहात होत्या! स्वामींनीसुद्धा एका नेत्रकटाक्षात साऱ्यांना पाहिले होते!

त्या साधूंनी या बालसंन्याशाला पाहिले आणि कुचेष्टेने ते हसले. त्यांच्यामध्ये या बालसंन्याशाबद्दल तर्क कुतर्क सुरू झाले. एक म्हणाला "अरे हा शाळेला भ्याला म्हणून या मार्गाला लागला." दुसरा म्हणाला "कोणाच्या तरी नादाने हा फसला असावा." तिसरा म्हणाला "दाखवा त्याला चमत्कार! म्हणजे येईल आपल्यात!" चौथ्याने सांगितले, "याला मुताच्या धर्मशाळेत आजची रात्र झोपू द्या! म्हणजे होईल त्याची खात्री!!" वास्तविक स्वामींनी त्यांचा कोणता गुन्हा केला होता? पण असुरी प्रवृत्तीच अशी भयानक असते. दुसऱ्याचे वाईट करण्यात त्यांना आनंद होतो. परपीडेत संतोष वाटतो. परदुःखात आनंद होतो. हेच लोक पापाचे पक्के वाटेकरी असतात.

**"न्हाये धोये क्या भया जो मन मैल न जाय।**
**मीन सदा जलमें रहे धोये बास न जाय।"**

स्वामी जवळ येताच सर्वांनी प्रश्नांची सरबत्ती सुरू केली. पण स्वामींकडून एकाचेही उत्तर न आल्याने सर्व शांत झाले. स्वामींनी त्यांना विचारले, "मोकळी धर्मशाळा कोणती आहे?" सर्वांनी मनात ठरविलेली भुताटकीची धर्मशाळा दुरूनच बोटाने दाखविली. भगवदिच्छा म्हणून शांतपणे त्या जागेकडे ते निघाले. सारे जग या गुंड साधूंना भीत होते. पण हे वीर साधू त्या भुताटकीच्या धर्मशाळेचे नाव ऐकताच थरथरत असत. त्यांचे पाय लटपटत असत. चेहरा सुकत असे. शरीराला दरदरून घाम सुटत असे, दिवसाढवळ्या सुद्धा कोणीही तिकडे ढुंकून देखील पाहात नसत. त्या धर्मशाळेत पाच दहा साधूंचे हा हा म्हणता बळी पडले होते. ती धर्मशाळा ब्रह्मसमंधाची म्हणून प्रत्येकाला ठाऊक होती. चुकून कोणी यात्रेकरू त्या धर्मशाळेत रात्रीच्या मुक्कामास राहिला की एका रात्रीत, आरडून, ओरडून, किंचाळून प्राणास मुकत असे. आणि सकाळच्या आत त्याचे प्रेत कुणीतरी बाहेर भिरकावून देत असे. कधी कधी त्या ओरडण्यातून 'भूत' 'भूत' शब्द ऐकू येत असत. 'धावा' 'वाचवा' शब्द ऐकू येत असत. पण हे साधू वीर आपापल्या अंथरुणात घामाच्या थारोळ्यात गुपचूप पडलेले असत. बाहेर येण्याची एकाची हिंमत नसे. अशा धर्मशाळेकडे त्यांनी स्वामींना पाठविले होते. स्वामी तितक्याच निर्धास्तपणे तिकडे निघाले. कदाचित् त्यांना हे समजलेही असेल. पण त्यांचा निर्धार काही वेगळा होता. त्यांची खात्री होती की—

**जाको राखै साईया मारि न सकै कोय।**
**बाल न बाका करी सकै जो जग बैरी होय॥**

ते समर्थ गुरूंचे समर्थ शिष्य होते. "समर्थाचिया सेवका वक्र पाहे। असा सर्व भू-मंडळी कोण आहे" या आत्मविश्वासाने स्वामी त्या धर्मशाळेत सायंकाळी अंधुक प्रकाश असताना शिरले. एका कोपऱ्यात कमंडलू ठेवला. छोटी वळकटी ठेवली. छाटीने झोपण्यापुरती जागा झटकून साफ केली. त्यावर वळकटी पसरली. आणि थकलेभागलेले शरीर आडवे केले. दुसऱ्या क्षणी ते गाढ झोपले.

मध्यरात्रीचा सुमार असेल. स्वामींचे पाय कुणीतरी दाबत असल्याचे त्यांना जाणवले. त्यांची झोप उडाली. पडल्या पडल्याच त्यांनी विचारले, "कोण पायाला

हात लावतो ?" प्रश्नाला उत्तर कोणीच दिले नाही. उलट चमत्कारिक भूतचेष्टा सुरू झाल्या. दिवे इकडून तिकडे हिंडू लागले. लांब लांब जिभेने ते मोठे होऊ लागले. लांब केसाळ हात खोलीभर फिरू लागले. मोठमोठ्या दातांच्या जबड्यांची हालचाल क्षणात इकडच्या छतावर तर क्षणात समोरच्या भिंतीवर दिसू लागली. चित्रविचित्र हसण्याचे, किंचाळण्याचे आवाज येऊ लागले. स्वामी शांतपणे उठून आसनावर बसून राहिले. एकूण प्रकार साधा नाही हे पाहून त्यांनी काही तोडगा केला. त्या सर्व पिशाच्च्यांना बंधन घातले. त्यांना त्यांच्या जागेवर खिळवून टाकले. त्या पिशाच्च्यांमध्ये एक ब्रह्मसमंध होता. तो तर या बंधन प्रयोगाने एखाद्या पाय आवळून बांधलेल्या पशूप्रमाणे स्वामींच्या पुढे येऊन पडला. त्याला कुठेही बांधलेले दिसत नव्हते पण तो हालचाल मात्र करू शकत नव्हता. स्वामींनी त्याची खूप हजेरी घेतली. तो गयावया करू लागला. इतर भुते तर ते दृष्य पाहून हबकूनच गेली. सर्व भुते शरण आली. स्वामींनी त्या ब्रह्मसमंधाला विचारले "काय इच्छा आहे ?"

त्यानेच स्वामींच्या पायांना स्पर्श केला होता. त्यांचे चरण चेपले होते. नकळत त्याचे हातून संत सेवा झाली होती. केवळ त्या दिव्यस्पर्शाने त्याची सद्‌बुद्धि जागृत झाली. पूर्वजन्मींच्या पुण्याईने आधार दिला. संतसंगतीने मनोमालिन्य नष्ट झाले आणि त्याने प्रार्थना केली "महाराज! आपण फार मोठे अधिकारी आहात असे दिसते. आपले सामर्थ्य पाहून मी आपणांस शरण आलो आहे. आपण कृपा करून आम्हाला या पिशाच्च योनीतून मुक्त करावे ही एकमेव प्रार्थना आहे."

उदारचरित स्वामींना ते ऐकून परम संतोष झाला. त्यांनी त्यांचेकडे आपादमस्तक पाहिले. "आत्ताच्या आत्ता सर्वांनी नर्मदेमध्ये देह सपर्पण करा" म्हणजे या योनीतून मुक्त व्हाल अशी आज्ञा दिली. सर्व भुते त्या ब्रह्मसमंधाच्या मागे गेली. सर्वांनी नर्मदेमध्ये देह समर्पण केले. त्यांचे कल्याण झाले. शेकडो वर्षे ज्या योनीतून सुटका होत नाही ती भूतयोनी स्वामींच्या कृपेने सुटली.

**सत्संगत्वे निःसंगत्वं, निःसंगत्वे निर्मोहत्वं ।**
**निर्मोहत्वे निश्चल तत्त्वं, निश्चल तत्त्वे जीवन मुक्तिः ॥**

पहाट झाली. स्वामींचे प्रातःकालीन आन्हिक झाले. कमंडलू घेऊन ते घाटाच्या पायऱ्या चढून वर आले व शांतपणे आपल्या निवासात शिरले. रात्रभर झोप न आलेल्या गुंड साधूंनी स्वामींना पाहिले. त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला.

असे कधी झाले नव्हते. एका रात्रीत सर्वांना स्वामींची जरब बसली. पुन्हा कोणी त्यांच्या वाटेला त्रास देण्यास गेले नाही. ते 'साधू' असले तरी त्यांचा मार्ग वेगळा होता, त्यांचा दिनक्रम वेगळा होता. स्वामींचा मार्ग निराळा होता. दिनक्रम निराळा होता. स्वामींचा दिनक्रम त्या निवांत निवासात मुक्तपणे सुरू झाला.

## विश्वसूत्रधाराच्या पडद्यामागील हालचाली ! !

चैतन्य चक्रवर्ती श्रीचिन्मयानंद सरस्वती स्वामी महाराज, नगाधिराज हिमालयाच्या कुशीत बागडणाऱ्या भागीरथीच्या परिसरातून निघून नर्मदामातेच्या अंकावरील हुशंगाबादेस, कसकसे आले, हे आपण पाहिले. विश्वसूत्रधाराच्या नाट्यमय हालचालींचा एक भाग इथे संपला असून इथूनच त्याच्या दुसऱ्या नाट्यमय हालचालींना प्रारंभ होत आहे.

या अगम्य हालचाली म्हणजे ईश्वरी संकेत! यांचा उलगडा कालांतराने होतो. घटना घडताना ती सामान्य भासते. काही असामान्य हेतू या घटनेमागे असतील असे त्यावेळी जाणवतसुद्धा नाही. अपरिहार्य परिस्थिती निर्माण होते आणि अनपेक्षित घटना घडून येते. यात मानवी प्रयत्नापेक्षा बलवत्तर ईशेच्छा कारण असते. या नाटकात भाग्यवान् जीवात्मे भगवंताचे 'निमित्तमात्र' होत असतात. अशा घटनांच्या परिणामावरून त्यांचे मोल जाणवते. स्वामींच्या जीवनात याचा प्रत्यय पदोपदी आला. असेच अनुभव व अकल्पित प्रसंग सद्‌गुरु, संत योगीराज श्रीगुळवणी महाराज यांचे जीवनात घडून आलेले दिसतात. प. पू. श्रीचिन्मयानंद सरस्वती स्वामी महाराज व सद्‌गुरु श्रीगुळवणी महाराज यांची भेट नाट्यपूर्ण रीतीने घडून आलेली आहे. तो प्रसंग पाहण्यापूर्वी आपण श्रीगुरुमहाराजांची या पार्श्वभूमीवर आवश्यक तेवढी, थोडी माहिती पाहू.

प. प. श्रीमद्वासुदेवानंद सरस्वती टेंबेस्वामीमहाराज, हे श्रीगुळवणीमहाराजांचे पहिले गुरु. इ. स. १९०७ ते इ. स. १९१४ हा या उभयतांच्या सहवासाचा काळ होता. या काळात प. प. श्रीमद्वासुदेवानंदसरस्वती स्वामीमहाराजांनी श्रीगुरुमहाराजांना दत्तोपासना दिली. गीता, उपनिषदे व ब्रह्मसूत्रे यांचे स्वमुखाने पाठ दिले. श्रीदत्तमाला मंत्रासारख्या दुर्मिळ मंत्राची साधना दिली. काही योगासनांचेही मार्गदर्शन केले. याप्रमाणे त्यांनी आपल्या लाडक्या शिष्याच्या भावी भव्य अध्यात्म मंदिराचा पाया प्रशस्त, भक्कम व चतुरस्त्र करून दिला.

पुढे इ. स. १९१४ मध्ये गुजराथमध्ये नर्मदेकाठी, गरुडेश्वरी प. प. श्रीमद्-वासुदेवानंदसरस्वती स्वामीमहाराज समाधिस्थ झाले. तोपर्यंत व त्यापुढे ७/८ वर्षे श्रीटेंबेस्वामीमहाराजांकडून मिळालेल्या साधनेवर सर्व भर देऊन श्रीगुरुमहाराजांची या मार्गातील वाटचाल चालू होती. ते अत्यंत निग्रही असल्याने मिळालेल्या साधनांची अनुष्ठाने तीव्र तळमळीने त्यांनी सुरू केली. यासाठी अनुकूल अशी व्यावहारिक जीवनाची बैठकही त्यांनी आखली.

इ. स. १९१४ ते १९१७ पर्यंत लौकिक इंग्रजी शिक्षण पूर्ण केले. चित्रकलेची अभिजात आवड आवडीने वाढविली. मुंबईच्या स्कूल ऑफ आर्टस्‌मधून ते चित्रकलेची 'थर्ड ग्रेड' परीक्षा उत्तीर्ण झाले. फोटोग्राफीमध्ये प्रावीण्य मिळविले आणि बार्शीच्या हायस्कुलात चित्रकला शिक्षक म्हणून नोकरी धरली. या काळात श्रीगुरुमहाराजांना अमेरिकेस जाण्याची संधि चालून आली होती. त्यांचा एक वर्गमित्र त्या काळात अमेरिकेत गेला. तो तेथे राहिला व आता स्थिरही झाला आहे. महाराजांचेही तसेच झाले असते. पण ईशेच्छा वेगळी होती म्हणून ही बुद्धि झाली नाही. सहस्रावधि जीवांचे कल्याण व्हावयाचे होते. अधर्माच्या शिरावर पाय ठेवून भारतामध्ये धर्माचे पुनरुज्जीवन व्हावयाचे होते. अध्यात्म विद्येचा सप्रमाण सुकाळ व्हावयाचा होता. म्हणून महाराज अमेरिकेत गेले नाहीत.

गुरुमहाराज बार्शीला असताना मंत्रजपादि अनुष्ठानाबरोबर आसन, प्राणायामास चांगलीच गति मिळाली. आसनांचे वर्ग श्रीगुरुमहाराजांनी सुरू केले. त्या काळात श्रीक्षेत्रकाशीहून श्रीयोगानंद ब्रह्मचारी बार्शीस आले होते. त्यांची बार्शीच्या भगवंताच्या मंदिरात सात दिवस प्रवचने झाली. लोक प्रभावित झाले. आसने व प्राणायाम यांचे मार्गदर्शन करा म्हणून सर्वांनी योगानंदांचे जवळ आग्रह धरला. योगानंदांनी श्रीगुरुमहाराजांचा आसन वर्ग पाहिला होता. महाराजांची तयारी पाहिली होती. योगानंद संतुष्ट झाले आणि प्रवचनामध्ये श्रीगुरुमहाराजांच्या नावाचा उल्लेख करून त्यांच्या आसनवर्गाची माहिती सांगितली. "मार्गदर्शन करण्यास गुळवणी मास्तर योग्य असून ते श्रेष्ठ योगीच आहेत" असे ठासून सांगितले.

प. प. श्रीमद्वासुदेवानंदांनी दिलेल्या शिदोरीचा उपयोग आजपर्यंत उत्तम रीतीने होत आला. परंतु एवढ्यावर महाराजांना संतोष होईना. "संतोषः श्रियं हन्ति" संतोषाने श्रेयाची प्राप्ति होत नाही. तसेच 'श्रेय' प्राप्त झाल्यावर

असंतोष राहूच शकत नाही. या काळात महाराज षट्क्रियांपासून मत्स्येंद्रपीठासना-पर्यंत सर्व आसने, त्राटक, खेचरी इत्यादि योगक्रियांमध्ये परिपूर्ण झाले होते. ग्रंथांच्या अनुरोधाने प्राणायामाची तयारी चालू होती. स्वसामर्थ्य पणाला लावून मोठ्या चिकाटीने योगमार्गात तीव्र गतीने प्रगती चालविली होती. ते कुठे होते हे त्यांनाच ठाऊक. इतरांनी कल्पना करणे उचित नाही. योगमार्गाचा पथिक हा पौरुष प्रवृत्तीचा असावा लागतो. तसे ते होते.

बार्शीचा हा नित्यक्रम चालू असताना एके दिवशी एका मारवाडी सद्गृह-स्थांचेकडे श्रीगुरुमहाराजांच्या श्रीब्रह्मानंदजी स्वामी लिखित "योगरसायन" नावाचे पुस्तक हाताशी लागले. ते पुस्तक वाचून त्यांनी पुष्करतीर्थवासी श्रीब्रह्मानंदांशी पत्रव्यवहार केला. केवळ पत्र पाहून श्रीब्रह्मानंदांनी श्रीगुरुमहाराजांना पुष्करला येण्यास सांगितले. महाराज पुष्करला गेले. प्राणायामाचा पुढील अभ्यास व त्यातून कुंडलिनी जागृत करण्याचा हेतू ठेवून महाराज गेले होते. तेथे काही दिवस मुक्काम झाला. परंतु एकाएकी प्रकृती फार बिघडली. अतिसाराचा त्रास सुरू झाला. तेथे राहणे महाराजांना अशक्य झाले व तेथून परत आले. आता पुढे काय करावे या काळजीत ते होते. तेवढ्यात त्यांना त्यांचे गुरुबंधु श्रीगोविंदमहाराज पंडितांची आठवण झाली. श्री गोविंदमहाराज पंडित सिप्रीचे रहिवासी होते. ते प. प. श्रीमद् वासुदेवानंदसरस्वती स्वामी महाराजांचे शिष्य असून मोठे योगाभ्यासी होते. ते हुशंगाबादेस दत्तमंदिरात येऊन राहिले होते. त्यांचा महाराजांशी संबंध पवनीच्या चातुर्मासात आला. नंतर गरुडेश्वरी दोघांची भेट झाली. पुढे एकदा कोल्हापुरातही त्यांची आणि महाराजांची भेट झाली. त्यांचा योगाभ्यास व प्राणायामाचा अभ्यास उत्तम असल्याने अनेक जिज्ञासू त्यांना भेटण्यास येत असत.

श्रीसद्गुरुमहाराजांना हे सारे ठाऊक असल्याने त्यांचेकडे जाण्याची त्यांना इच्छा होऊ लागली. त्याप्रमाणे पत्रव्यवहार सुरू केला. पत्रोत्तर देताना श्रीगोविंद-स्वामींनी स्पष्ट कळविले की—"प्राणायामाच्या अभ्यासाने मी तुमची कुंडलिनी शक्ती अवश्यमेव जागृत करू शकेन. त्यासाठी काही काल तुम्हाला हुशंगाबादला आमच्याजवळ येऊन राहावे लागेल" पत्रोत्तर पाहून महाराजांना समाधान वाटले. ते हुशंगाबादेस जाण्याची तयारी करूं लागले.

याच सुमारास म्हणजे इ. स. १९२१ मध्ये नियती आणखी एक हालचाल

या विषयाला पूरक म्हणून करीत होती. नागपूरचे रावबहाद्दूर श्री. सदाशिवराव माधवराव परांडे यांची उपन्यायाधीश म्हणून हुशंगाबादेस बदली झाली. पुढे श्री. परांडे जिल्हान्यायाधीशही झाले. असे हे आंग्लविद्याविभूषित, प्रतिष्ठित, सद्गृहस्थ होते. ते अत्यंत बुद्धिवान व चिकित्सक होते. इतके असूनही श्री. दादासाहेब परांडे अत्यंत सात्त्विक वृत्तीचे, सदाचारसंपन्न, शास्त्रनिष्ठ आणि योगाभ्यासप्रेमी होते. साधू, संन्याशांचे आतिथ्य करण्याची त्यांना आवड होती. 'साधू संत येती घरा । तोचि दिवाळी दसरा' हे लक्षात घेऊन, दादासाहेब गावात, धर्मशाळेत किंवा घाटावर जाऊन साधू संन्याशांना घेऊन जात असत. त्यांची सारी बडदास्त ठेवीत. आदराने आतिथ्य करीत व त्यांना खाऊपिऊ घालीत असत. त्यांचेशी धर्मशास्त्र किंवा अध्यात्म यासंबंधी चर्चा करीत.

रावबहाद्दूर श्री. दादासाहेब परांडे यांना धर्म आणि अध्यात्म मार्गातील पुस्तके वाचण्याचा छंद मोठा होता. त्यांनी तंत्रमार्गावरील ग्रंथांचे बरेच वाचन केले होते. त्या ग्रंथांपैकी 'कुलार्णव' तंत्राच्या पुस्तकामध्ये त्यांना एक विशेष माहिती आढळली. वेधदीक्षेने कुंडलिनी तात्काल जागृत होते. अशी दीक्षा देणारे गुरु मात्र प्राप्त व्हावे लागतात. ही माहिती वाचून त्यांचे मनांत कुतूहल निर्माण झाले. त्यांनी तो ग्रंथ समग्र वाचून वेधदीक्षेच्या विधीची व इतर अनुभवांची माहिती आपल्या संग्रही ठेवली. या ग्रंथाच्या वाचनानंतर ते अशा प्रकारे दीक्षा देणारा कोणी अधिकारी पुरुष भेटेल का या शोधात राहू लागले. विशेषतः अशी ही गूढ विद्या बंगाली साधू-संन्याशाकडे असावी असा तर्क त्यांच्या मनाने बांधला होता. या संदर्भात त्यांनी हा विषय चटर्जी नावाच्या बंगाली वकिलाजवळ सहजपणे काढला होता. कोणी बंगाली साधू-संन्याशी आढळला तर माझ्या कानावर घालावे. पुढे मी योग्य-तऱ्हेने चौकशी करून पाहीन. सबजज्जसाहेबांचे काम म्हणून वकीलसाहेब या शोधात राहू लागले.

इकडे श्रीगुरुमहाराजांची हुशंगाबादला येण्याची तयारी झाल्यावर ते बार्शीहून निघाले. याप्रमाणे सूत्रधाराच्या पडद्यामागील हालचाली होत होत्या.

## हुशंगाबादेत श्रीगुरुमहाराज

शके १८४४ (इ. स. १९२२) चे हे वर्ष होते. वर्षाऋतूचे दिवस होते. भाद्रपद मासातील श्रीगणेश चतुर्थीचा शुभदिवस होता. अवधूतचिंतन श्रीपाद

श्रीवल्लभांची जयंती होती. अशा अतीव मंगल दिवशी सद्गुरुमहाराज हुशंगाबादेस येऊन पोहोचले. बरोबर परमवंदनीय मातुश्री भगवती उमादेवी होत्या. विघ्नांतक श्रीगणेश आणि अवधूतकुलशिरोमणि श्रीदत्तात्रेयांना मनोभावे वंदन करून महाराजांनी हुशंगाबादेत प्रवेश केला.

श्रीगुरुमहाराज सरळ खर्रा घाटावर आले. श्रीदत्तमंदिरात जाऊन धूळभेट घेतली. श्रीदत्तात्रेयांना साष्टांग नमस्कार केला. सामान एका बाजूला ठेवले आणि नर्मदामातेच्या दर्शनास निघाले. नर्मदामातेचे स्मरण झाले की महाराजांना तात्काळ गरुडेश्वर डोळ्यापुढे येई. अनेक आठवणी स्मृतिरूपाने पुढे उभ्या रहात. आज तर ते प्रत्यक्ष नर्मदामातेच्या दर्शनास आले होते. ७–८ वर्षांपूर्वीच्या स्मृतींनी वाणीला अवाक् केले. विचारचक्राची गती शून्य केली. इ. स. १९१४ मध्ये याच नर्मदेच्या अंकावर परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराज ब्रह्मलीन झाले होते. त्यांचे शेवटचे दर्शन इ. स. १९१३ मध्ये झाले. त्यानंतर स्थूलरूपाने कधीच दर्शन झाले नाही. या आठवणीने त्यांचे अंतःकरण जड झाले. त्यांनी मनोमन प्रार्थना केली. "ज्या उद्देशाने येथे आलो तो उद्देश आपणच पूर्ण करणारे आहात. देहभिन्नत्वाने व नामान्तराने आपणच मला कडेला लावणारे चिन्मयस्वरूप सद्गुरु आहात. पण आता केवळ शब्दज्ञानाने चित्त शांत होत नाही. अनुभवासाठी चित्त आतुर झाले आहे. हे गुरुदेव ! "त्वां विना मम का गतिः" या चिंतनात घाट उतरून ते जलप्रवाहाजवळ आले.

श्रीनर्मदामातेला नमस्कार केला. आचमन करून जलाने मार्जन केले. "जय जय शिवकन्ये नर्मदे शर्मदे त्वम्" म्हणून स्तोत्र म्हटले. यथेच्छ जलपानाचा प्रसाद घेऊन परत मंदिरात आले. श्रीगोविंद महाराज पंडितांची भेट घेतली. पत्राप्रमाणे आलो आहे. योग्य ते सर्व मार्गदर्शन व्हावे म्हणून प्रार्थना केली. त्यांनीही ठीक आहे, निश्चिंत रहा म्हणून आश्वासन दिले.

श्रीगुरुमहाराजांनी आपण अशासाठी हुशंगाबादेस जात आहोत याची कल्पना आपल्या काही स्नेहीमंडळींना पत्राने दिली होती. त्यानुसार हिंगोलीहून श्री. शंकरकाका आजेगावकर व श्री बाबा महाजन येऊन दाखल झाले. हे दोघेही प. प. श्रीमद्वासुदेवानंदसरस्वती महाराजांचे परम भक्त होते. त्यांना त्यांचा सहवास चांगलाच लाभला होता. यांचे हातून स्वामीमहाराजांची सेवाही भरपूर झाली होती.

हे दोघेही श्रीगोविंदमहाराज पंडितांकडे प्राणायामाच्या अभ्यासाने कुंडलिनी जागृत करण्यासाठी आले होते. बार्शीहून श्रीगुरुमहाराजांचे हितैषी, अध्यात्मातील 'आप्त' श्री वैद्यमास्तर प्रथम पुष्करला श्रीब्रह्मानंदांकडे गेले व तेथून परस्पर हुशंगाबादेस आले.

हे सर्व मुमुक्षू परमार्थी, खर्रा घाटावर साधकांसाठी बांधलेल्या बंगल्यापैकी ग्वाल्हेरच्या श्री हणमंतराव फाळके यांच्या बंगल्यामध्ये उतरले. सर्वांनी ठरल्याप्रमाणे श्रीगोविंदमहाराज पंडित यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे प्राणायामाच्या अभ्यासास प्रारंभ केला. प्रात:काली हा अभ्यास करावा नंतर आपापल्या नित्यानुष्ठानास लागावे. दुपारी यासंबंधी वाचन, चर्चा करावी. सायंकाळी पुन्हा अभ्यास, नित्य आन्हिक करावे. असा दिनक्रम सुरू झाला.

श्रीसद्‌गुरुमहाराज या अभ्यासात खूप पुढे होते. त्यांचे जीवन नैष्ठिक ब्रह्मचर्यव्रताने घालविलेले होते. सदैव परमार्थ चिंतनात रमलेले होते. शास्त्रावरील प्रगाढ निष्ठा, गंगौघाप्रमाणे विशुद्ध आचरण आणि तासन् तास चाललेली नित्य-उपासना यामुळे सारे जीवन बावनकशी सुवर्णाप्रमाणे चोख होते. सारे व्यवहार आणि विचार अध्यात्माला अनुकूल असत. सातत्य आणि निश्चय या गुणांनी यांचे ठिकाणी आपल्या गुणाप्रमाणे निवास केला. म्हणून तर या काळात प्राणायामाच्या अभ्यासात तीन तीन मिनिटेपर्यंत केवळ कुंभक ते करू शकत असत. त्या प्रमाणात पूरक व रेचक यांचा काळ असे.

श्रीगुरुमहाराजांची प्राणायामातील योग्यता व अधिकार श्रीगोविंदमहाराज पंडित यांच्या लक्षात आला होता. त्यामुळे ते त्यांच्यावर प्रसन्न होते. त्यांनी श्रीगुरुमहा-राजांना प्राणायामातील पुढील अभ्यासाचे धडे दिले. त्यानुसार तितिक्षापूर्वक अभ्यास सुरू झाला. हठयोगात कुंडलिनी चालनासाठी जे प्रयोग व प्रक्रिया सांगितल्या आहेत तो उच्च अभ्यास दिला होता. सर्वकाही कष्टप्रद होते. क्लेशकारक होते. अव्यक्ताला व्यक्त करण्याचा हा दुर्गम मार्ग होता. श्रीगुरुमहाराज पुरुषार्थ प्रयत्नाने ही वाटचाल करीत होते.

अत्यंतिक मुमुक्षत्व, तीव्र जिज्ञासा आणि प्रखर तपस्या या त्रिविध आधारावर महाराजांची साधना उभी होती. प्रत्यक्ष अनुभूतीसाठी ती अखंड चालू होती. अनुभूती हे एकमेव ध्येय होते. अनुभूती हा एकमेव उद्देश होता. अनुभूती कशाची

तर शक्ती जागृतीची ! कुंडलिनी जागृतीची ! ! याच जागृत झालेल्या शक्तिमातेचा हात धरून पुढे जाऊन महावाक्यांचा अनुभव घ्यायचा ! अनुभूती हेच ज्ञान ! ज्ञान हाच मोक्ष ! हेच जीवनाचे सर्वोच्च प्राप्तव्य आहे. त्यासाठी ही धडपड चालू होती.

**" अज्ञानग्रंथी नाशो मोक्ष इति स्मृतः "**

या विचारांनी श्रीगुरुमहाराजांच्या वृत्ती सूक्ष्म व अंतर्मुखी झाल्या होत्या. या सूक्ष्म व अंतर्मुखी झालेल्या वृत्ती संवेदनाक्षम बनून स्मर्तृगामीन श्रीगुरुदेवांची प्रार्थना करू लागल्या.

**त्वद्भक्तस्त्वदधीनोऽहमास्मि तुभ्यं समर्पितम्**
**तनुं मनो धनं चापि कृपां कुरु ममोपरि ॥**
**प्रतिज्ञा ते न भक्ता मे नश्यंति इति सुनिश्चितम् ।**
**श्री दत्त चित्त आनीय जीवनं धारयाम्यहम् ॥**

भक्ताच्या या आर्त प्रार्थनेने भक्तानुकंपी विश्वसूत्रधारकाची हृदयवीणा झंकृत झाली. दयाघन प्रभूला दयेचा पाझर फुटला. कृपाळूपणे अल्प धारिष्ट पाहून विश्वसूत्राच्या यासंबंधीच्या हालचालींना अधिक गती मिळाली.

## मी स्वतःच वेददीक्षा देऊ शकतो !

" ॐ भवति भिक्षान्देहि " शब्द कानावर पडताच चॅटर्जी वकीलसाहेबांनी खिडकींतून डोकावून पाहिले. दारासमोर उभा असलेला तेजस्वी बाल संन्यासी पाहून ते चकितच झाले. ते तसेच लगबगीने बाहेर आले. थोड्या चौकशीतच ध्यानात आले की स्वामी बंगाली असून मंगळवार घाटावर उतरले आहेत. इतक्यात पत्नीने भिक्षा वाढली. स्वामी निघून गेले. स्वामींच्या त्या पाठमोऱ्या आकृतीकडे चॅटर्जी वकील मंत्रमुग्ध होऊन पहात राहिले. घरातून जेवणाची हाक आली तसे ते आत आले.

रोजच्याप्रमाणे वकीलसाहेबांचे जेवण वगैरे झाले आणि ते कोर्टात गेले. दुपारच्या सुट्टीत संधी काढून वकीलसाहेबांनी सत्रजज्ज परांडे यांची भेट घेतली. त्यांनी सांगितले, "आपण काही दिवसांपूर्वी एक काम सांगितले होते. त्याप्रमाणे एक बंगाली स्वामी मी आज पाहिले. माझ्याकडे भिक्षेस आले होते. अगदी तरुण

आहेत. तेजस्वी आहेत. मंगळवार घाटावर उतरलेत असे समजले. भेटायचे असेल तर पहा." एवढा निरोप देऊन चॅटर्जी वकीलसाहेब निघून गेले.

निरोप मिळाला आणि दादासाहेब परांडे यांचे विचारचक्र फिरू लागले. स्वामींचे वर्णन ऐकून वाटले या कोवळ्या तरुणाला काय "वेधदीक्षा" माहीत असणार? आताकुठे तो संन्याशी झाला असेल! समजा, नसेल त्याला ठाऊक पण चार दोन नावे, पत्ते तर सांगू शकेल! बस्स झाले! संध्याकाळी तिकडेच फिरायला जाऊ आणि भेटून येऊ!

कोर्ट संपले. दादासाहेब घरी आले. थोडी विश्रांती घेतली. फराळपाणी केले आणि फिरायला म्हणून बाहेर पडले. रोज आणखी कोणी बरोबर असत पण आज मात्र ते एकटेच होते. मंगळवार घाटावर पोहोचले. सांगितल्या खाणाखुणा आठवीत पाहात चालले. एका धर्मशाळेच्या ओसरीवर तरुण संन्यासी बसलेले दिसले. खुणा पटल्या. चॅटर्जी वकिलांनी सांगितलेले संन्यासी हेच दिसतात अशी खात्री झाली आणि दादासाहेब धर्मशाळेत शिरले. स्वामींना नमस्कार केला.

स्वामींनी चौकशी केली. आपण कोण? कुठे असता? काय करता? दादासाहेबांनी सर्व प्रश्नांची उत्तरे आदबीने दिली. प्रश्नातून उपप्रश्न निघाले. थोडा वेळ परस्परांचे बोलणे झाले. एकमेकांना चांगली व्यक्ति भेटली म्हणून समाधान झाले. हा भेटीचा पहिला प्रसंग होता म्हणून कोणी खोल पाण्यात शिरले नाही. तेथून निघताना दादासाहेबांनी स्वामींना प्रार्थना केली.

"स्वामीजी! उद्या भिक्षेला येण्याची कृपा होईल का?"

स्वामींना नकार देण्याची इच्छा झाली नाही. त्यांनी होकार देऊन वेळ व पत्ता विचारून घेतला.

पुन्हा नमस्कार करून दादासाहेब आनंदाने घरी गेले.

दुसऱ्या दिवशी ठरल्या वेळी स्वामीजी हजर झाले. ठरल्या वेळेवर स्वामीजी आलेले पाहाताच शिस्तप्रिय दादासाहेबांना सौम्य धक्काच बसला. स्वामी सुद्धा वेळेबाबत काटेकोर दिसतात. या विचारात दादासाहेब पुढे झाले. वंदन करून स्वागत केले. 'या' 'या' म्हणत घरात घेतले. संन्यासाश्रमाच्या नियमांची कल्पना

दादासाहेबांना चांगलीच होती. कोठेही उणे दिसत नव्हते. पण दादासाहेबांचे लक्ष शास्त्रचर्चेमध्ये अधिक होते. त्यामधून त्यांना हवी ती माहिती मिळणार होती. परस्परांचे बोलणे चालू होते. स्वामीजी दादासाहेबांच्या प्रश्नावर खुश होते. चांगला जाणकार चांगले प्रश्न करू शकतो. त्या प्रश्नांची खोली जाणकार ओळखू शकतो. तसे त्यांचे होत होते. दादासाहेब स्वामीजींचा उत्तरावर खुश होत होते. स्वामीजींचा एक एक शब्द ते वेदान्ताच्या कसोटीवर घाशीत होते. कारण दादासाहेब धर्म-तत्त्वांचे मर्मज्ञ व रसज्ञ होते. स्वामींच्या सरळ, सोप्या आणि स्पष्ट उत्तराने दादासाहेब तृप्त होत होते. हे निखळ सोने दिसते. स्वामीजी मोठे सत्पुरुष दिसतात. चांगल्या तयारीचे वेदान्ती दिसतात. अशी दादासाहेबांची धारणा झाली.

स्वामीजींची भिक्षा होत होती. वातावरण प्रसन्न होते. आता आपल्या मनातील मुख्य प्रश्न विचारण्यास ही संधि चांगली आहे असे दादासाहेबांना वाटले आणि बोलण्याच्या ओघात सहज प्रश्न केला.

"स्वामीजी आपण खूप प्रवास, तीर्थयात्रा केल्या असतील. अनेक साधू-सत्पुरुष पाहिले असतील. या प्रवासात आपणांस कुठे अशी अधिकारी व्यक्ति आढळली का की जी वेधदीक्षा देऊ शकेल? स्वामीजी प्रश्न ऐकून एकाएकी गंभीर झाले. प्रश्न विचारणारा चांगला जाणकार दिसतो याबद्दल स्वामींची खात्री झाली. विचारल्याशिवाय बोलू नये हे खरे आहे. तसेच विचारल्यावर गप्पही बसणे बरे नाही.

स्वामींनी मोठ्या आत्मविश्वासाने मान हलविली व म्हणाले, "हं! पाहिला आहे."

स्वामींचे उत्तर ऐकताच दादासाहेब स्तंभित झाले. त्यांनी तितक्याच तत्परतेने प्रश्न केला. "मला त्यांचा पत्ता मिळू शकेल का! आपली कृपा असेल तर...."

स्वामीजी म्हणाले—"मी संन्यासी आहे. मला खोटे बोलता येणार नाही. इतकेच नव्हे तर आपली जिज्ञासा व भावना विचारात घेता मला गप्पही बसता येणार नाही. आपण विचारल्याप्रमाणे—

"मी स्वतःच वेधदीक्षा देऊ शकतो!"

दादासाहेबांचा आपल्या कानांवर व डोळ्यांवर विश्वासच बसेना! आंधळा

मागतो एक डोळा देव देतो दोन डोळे. तसे दादासाहेबांचे झाले. त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला! ते अक्षरशः अवाक् झाले! स्वामींची भिक्षा झाली. परिवारातील सर्वांनी नमस्कार केला. स्वामीजी मंगळवार घाटावरील आपल्या निवासात निघून गेले. दादासाहेब भोजन उरकून कोर्टात गेले.

त्यांचे डोके स्वामींच्या त्या वाक्याने धुंद होऊन गेले होते. स्वामींचे ते वाक्य त्यांच्या कानावर ध्वनिलहरीप्रमाणे सारखेच आदळत होते—

"मी स्वतःच वेधदीक्षा देऊ शकतो." ते रस्ता चालत होते. वाक्य मात्र कानात शिरत होते.

"मी स्वतःच वेधदीक्षा देऊ शकतो."

## हुशंगाबादेतील दीक्षा आणि शक्तिपाताची रोकडी प्रचीति

स्वामीजी स्वतः दीक्षा देतात हे समजल्यापासून दादासाहेबांच्या विचार-चक्राला पुन्हा जोराची चालना मिळाली. स्वामी सांगतात ते खरे की खोटे? हे कसे ठरवणार? अशी दीक्षा दिली म्हणजे कुंडलिनी जागृत होते. अनेक अनुभव येतात. शरीर, मन, बुद्धि यामध्ये फरक पडतो हे ग्रंथात वाचले तेव्हाच चमत्कार वाटला. आता तर अशा समर्थ महापुरुषाची प्रत्यक्ष भेटगाठ पडली. आता चमत्कारालाच आश्चर्याने गाठले! आता या खऱ्या खोट्याचा पडताळा कसा पाहावयाचा? रावबहाद्दुरांची जिद्द वाढली.

हिरासुद्धा पारखून घ्यायचा असतो. ऐरणीवर ठेवून घणाच्या घणाघाताने फुटला नाही तर तो खरा हिरा! तेव्हां त्याची किंमत! ती रत्नपारखीच जाणणार!!

कृत्रिम हिरा एका घावात चक्काचूर होणार! तीच त्याची किंमत. अशी हिऱ्याप्रमाणे साधूंची परीक्षा असते. आपत्तीच्या घणाघाताने तो डगमगत नाही. त्रिविध तापांच्या अग्नीने तो होरपळत नाही. उलट सत्त्वाच्या चैतन्यमयी तेजाने तो तळपतो. सत्त्वाच्या आधाराने तो टिकतो. शब्दप्रामाण्याचे तो प्रमाण असतो!

सदाशिवराव परांडे या विचारात निमग्न असतानाच त्यांना एक कल्पना सुचली. त्या कल्पनेने आकार धारण केला. स्वामी दीक्षा देतात, त्याचा काय

अनुभव येतो, हे पाहण्यासाठी एक व्यक्ति तयार करून, स्वामींच्याकडे पाठवावी आणि पडताळा पाहावा. असा विचार करून रावसाहेब परांडे त्या दिशेने उद्योगास लागले.

श्री. नारायणप्रसाद दुबे हे हुशंगाबादेतील एक प्रतिष्ठित वकील होते. त्या काळात ते एम्. ए., एल्एल्. बी. झाले होते. न्यायाधीश आणि वकील यांचे संबंध हमखास येणारे असतात त्यातूनही नारायणप्रसाद आणि रावसाहेब दोघेही सात्त्विक, सज्जन ! समानशील म्हणून तर अधिकच सख्य ! प्रारब्धवशात नारायण-प्रसादांना चर्मरोगाची पीडा सुरू झाली होती. त्यामुळे सारे शरीर फुलले होते. त्यांनी खूप उपचार केले. पण रोगाने पाठलाग सोडला नाही. ही परिस्थिती लक्षांत घेऊन रावसाहेबांनी त्यांचेजवळ स्वामींचा विषय काढला.

"नारायणप्रसाद ! तुमच्या रोगनिवारणासाठी मी काही सुचविले तर कराल का ?" रावसाहेबांनी आत्मीयतेने प्रश्न केला.

"रावसाहेब ! आपण काही तरी सांगावे म्हणून किती तरी वेळा आपल्याला सांगितले आहे. पण आज आपल्या तोंडून विषय निघतो. मी आपल्या शब्दाबाहेर का जाणार आहे. !" तितक्याच विश्वासाने नारायणप्रसादांनी उत्तर दिले.

"हे पहा प्रसादजी, उपाय दैवी आहे. मंगळवार घाटावर एक तरुण बंगाली संन्यासी आलेले आहेत. माझ्याकडे ते २–३ दिवसापूर्वी भिक्षेला आले होते. आम्ही खूप बोललो. चांगले अधिकारी असावेत असे वाटते. त्यांची कृपा झाली तर तुमचेच कल्याण ! रोग जाईल. पीडा जातील. शांतता लाभेल." असे थोडक्यात सारे सांगितले.

"स्वामींना काय सांगू ? कसे सांगू ?" ही शंका नारायणप्रसादांनी विचारली.

"सांगा खरं आहे ते ! ताकालाच जायचे तर भांडे का लपवा ?"

"ठीक आहे रावसाहेब. उद्या सकाळी जातो मंगळवार घाटावर."

रावसाहेब संतोषाने घरी गेले. प्रसादजी आतुरतेने सकाळची वाट पाहू लागले. त्यांना रात्रभर शांत अशी झोप नव्हती. मनात अनेक विचार येऊन जात

## स्वामी श्री चिन्मयानंद सरस्वती



“ स्वामींनी निःसंकोच उच्चार केला । मीच देतो वेध दीक्षेला ।
जागृत करतो कुंडलिनीला । घ्या केव्हांही अनुभव । ”

हे स्वामींचे पहिले छायाचित्र इ. स. १९२४ मध्ये श्री गुरुमहाराजांनी स्वत:
बार्शीस घेतलेले एक अत्यंत रेखीव छायाचित्र !



श्रीसीताराम महाराज ● **एकमुखी श्रीदत्तमूर्ती** ● श्रीवासुदेवानंद सरस्वतीस्वामी
होशंगाबाद–खर्रा घाटावरील दत्तमंदिराची आतील बाजू



खर्रा घाटावरील दत्तमंदिरासमोरचा प्राचीन प्रचंड औदुंबर
व त्या भोवतीचा पार,–सुरम्य स्थान !

होते. आजपर्यंत किती पैसा खर्च झाला. कोण कोण डॉक्टर पाहिले. काय काय तीव्र उपाय झाले. वैद्य हकीमांचे काढे, भस्म घेतले. फकीर मांत्रिकांचे अंगारे धुपारे झाले. शेवटी शेवटी तर जो जे सांगेल तो तो उपाय केला. पण एकाचा गुण नाही. आज रावसाहेबांनी उपाय सुचविल्यापासून पुन्हा एकदा प्रसादजींच्या निराशेला आशेची पालवी फुटली. इतके उपाय झाले आणखी एक केला म्हणून काय बिघडले? कदाचित् प्रारब्धाची वेळ भरलेली असेल. अशा विचारात सारी रात्र गेली.

ठरल्याप्रमाणे नारायणप्रसादजी स्वामींच्याकडे गेले. त्यांच्या त्या प्रसिद्ध भूत बंगला निवासात प्रवेश केला. स्वामीजी आसनावर आसनस्थ होऊन ध्यानस्थ झाले होते. प्रसन्न मुद्रा होती. एका अलौकिक तेजोवलयाची प्रभा मुद्रेवर तळपत होती.

कुणी आल्याची चाहूल लागताच स्वामींनी डोळे उघडले. त्याचवेळी समोर उभ्या असलेल्या प्रसादजींनी उभ्या उभ्या हात जोडून नमस्कार केला.

“बसा. आपण कोठून आलात? कशासाठी येणे केलेत?” या चौकशीने प्रसादजी संतुष्ट झाले. ते स्वामींच्या जवळच बसले! आपल्या आजारपणाची हकीकत सांगितली. रावसाहेब परांडे यांच्या नावाचा उल्लेख करून त्यांनी आपल्याबद्दल बरेच सांगितले म्हणून मुद्दाम आलो आहे. आपली कृपा व्हावी एवढी प्रार्थना आहे. इत्यादि सारे मुद्देसूद प्रभावीपणे आणि थोडक्यात सांगितले.

स्वामींनी नारायणप्रसादांचे बोलणे चालू असतानाच निर्णय घेतला होता. त्यांचे बोलणे संपताच स्वामीजी म्हणाले “अनुभवच पाहिजे असेल तर उद्या सकाळी स्नान करून या.”

स्वामींचा निरोप घेऊन नारायणप्रसाद निघाले. दुपारी त्यांनी सर्व हकीकत रावसाहेबांना सांगितली. त्यांनी रिकाम्या हाताने जाऊ नका. कमीत कमी नारळ घेऊन जा. याचा खूप मोठा विधि असतो. एकूण माहिती ऐकून प्रसादजींच्या मनात कुतूहल आणि धागधुग निर्माण झाली. यापासून झाला तर फायदाच आहे तोटा तर नाही या विचाराने मनाचा निर्धार झाला होता.

दुसरे दिवशी सकाळी स्नान करून, नारळ घेऊन नारायणप्रसाद मंगळवार

घाटावर स्वामींच्याकडे गेले. नारळ पुढे ठेवला. हात जोडले. तोंडाने "नमस्कार" म्हटले, इतक्यात स्वामी कोपऱ्यातल्या जागेकडे बोट दाखवून म्हणाले–

"हे पहा नारायणप्रसाद ! शर्ट टोपी काढून ठेवा, हातपाय धुवून या आणि त्या आसनावर बसा." तसे करून नारायणप्रसाद आसनावर बसले. स्वामींनी पुन्हा काही सूचना दिल्या. "डोळे मिटा. सहज बसतो तसे बसा. मुद्दाम कोठेही शरीराला ताण देऊ नका. ताठ, पण मोकळे बसा. मग आतून जे होईल ते होऊ द्या. काहीही झाले तरी घाबरू नका. परमेश्वराच्या कृपेने तुमचे काम होईल. काही काळजी करू नका. आपोआप डोळे उघडतील. तेव्हा आसनावरून उठा व कपडे घाला."

स्वामींच्या सांगण्याप्रमाणे नारायणप्रसाद आसनावर बसले. डोळे मिटले. सुरवातीला छाती जोरजोरात धडधडू लागली. काय होईल या शंकेने मनावर चांगलेच ओझे आले होते. स्वामीजी काय करतात हें पाहाण्यासाठी डोळे उघडण्याची इच्छा झाली परंतु डोळे मिटण्यास सांगितल्यामुळें इलाज नव्हता. या संभ्रम स्थितीमध्यें एक दोन मिनिटे झाली असतील नसतील तेवढ्यातच काही विशेष जाणवू लागले.

मांडी आवळली जाऊन आसन पक्के होऊ लागले. पाठीचा कणा ताठ होऊ लागला. छातीचे धडधडणे थांबले. पाठीच्या कण्यातून सुखद संवेदना सुरू झाली. चेहरा शांत व प्रसन्न झाला. शरीराला डोल सुरू झाला. आतून उत्साह येऊ लागला. डोळे ओढले जाऊन घट्ट मिटले व उघडण्याची इच्छा नाहीशी झाली. जवळ जवळ पाऊण तासांनी प्रसादजींने डोळे उघडले. सर्वत्र प्रसन्नता पसरलेली दिसू लागली. समोर स्वामीजी आसनावर डोळे मिटून शांत बसले होते. त्याच क्षणी त्यांनी डोळे उघडले. दोघांची दृष्टादृष्ट झाली. प्रसन्नपणे परस्परांनी एकमेकांकडे पाहिले.

स्वामींनी विचारले "प्रसादजी काही अनुभव आला का ?"

"स्वामीजी ! अनुभव आला पण सांगता येत नाही" कृतज्ञतेने नारायण-प्रसादजींने उत्तर दिले.

"फार उत्तम झाले, ज्याचे वर्णन करता येत नाही पण अनुभव येतो हे फार चांगले झाले."

"आता ७/८ दिवस माझ्यासमोर बसण्यास येत जा. खूप फायदा होईल. आता खूप वेळ झाला आहे. उद्या या" स्वामींनी निरोप दिला. स्वामींच्या या स्नेहपूर्ण शब्दांनी प्रसादजींना भरून आले. एक अलौकिक गुंगी आली. ते ताडकन उठले. आणि त्यांनी स्वामींना साष्टांग नमस्कार केला. त्यांचे चरणावर मस्तक ठेवले. अश्रूंच्या भावजलाने अभिषेक घडला. शब्द स्पष्ट उमटला नव्हता. नारायणप्रसादजींची ती श्रद्धा पाहून स्वामी संतुष्ट झाले. प्रसादजींच्या पाठीवरून हात फिरवीत म्हणाले.

"उठा, नारायणप्रसादजी ! परमेश्वराची कृपा झाली आहे."

नारायणप्रसादजीने डोळे पुसले. नाक साफ केले, पुनःपुनः नमस्कार करीत त्या कोठीतून ते बाहेर पडले. नव्या अनुभूतीच्या संवेदना अद्याप जाणवत होत्या. त्या दिव्य अनुभूतीच्या नशेत ते घराकडे निघाले. आज त्यांनी नव्या जगात प्रवेश केला होता. भोवतालचे सारे जग तेच होते पण आज नव्या अनुभूतीच्या दृष्टीने नवे वाटत होते. भोजनादि उरकून नारायणप्रसादजी कोर्टात गेले. रावसाहेबांना भेटून सारी हकीकत त्यांना सांगण्यास ते अधीर झाले होते.

## रावबहाद्दूर परांडे आणि महाराज

हुशंगाबादेत खर्रा घाटावरील दत्तमंदिरामील गोविंद महाराज पंडितांच्याकडे रावबहाद्दूर परांडे यांचे जाणे येणे होते. पंडित योगाभ्यासी होते तर रावबहाद्दूर योगाभ्यास प्रेमी होते. रावबहाद्दुरांचें योगासारख्या विषयांचे ग्रांथिक ज्ञान चांगले होते. त्यामुळे मधून मधून चर्चेला रंग चढत असे. पुढे त्यांच्याकडे श्रीगुरुमहाराज, श्री शंकरकाका आजेगांवकर, श्री बाबा महाजन आणि श्री वैद्य मास्तर ही महाराष्ट्रीय मंडळी योगाभ्यासासाठी मुद्दाम येऊन राहिली. सगळेच जाणकार, रसज्ञ व मर्मज्ञ असल्याने रावबहाद्दुरांचा आणि या मंडळींचा परिचय वाढत गेला.

परिचयाच्या सहवासातून सायंकाळचे फिरणे सुरू झाले. स्नेह वाढत गेला. गप्पा गोष्टी होऊ लागल्या. आजपर्यंत एक गोष्ट रावबहाद्दुरांनी श्रीगुरुमहाराज प्रभृतींच्या कानावर घातली नव्हती. ती सांगण्याची इच्छा रावबहाद्दुरांना झाली. आता ग्रांथिक प्रमाणापेक्षा प्रत्यक्ष प्रमाण हातात तयार होते. त्यातून आजच सकाळी नारायणप्रसादांना दीक्षा झाली होती. त्यामुळे हा सारा प्रकार श्रीगुरु-

महाराजांच्या कानावर घालण्याची तीव्र इच्छा रावसाहेबांना झाली होती. ते सांगू लागले. इतर सर्वजण ऐकू लागले.

"आज एक विशेष बातमी सांगणार आहे. शक्तिपात संप्रदायाचे एक तरुण संन्यासी हुशंगाबादेस ३।४ दिवसापूर्वी आलेले आहेत. मंगळवार घाटावर एका धर्मशाळेत त्यांचा मुक्काम आहे. हा शक्तिपात संप्रदाय म्हणजे कुंडलिनी शक्ति जागृत करण्याचा विशेष मार्ग आहे. मी या मार्गाची माहिती 'कुलार्णव' तंत्रामध्ये वाचली आहे. याला 'वेध दीक्षा' किंवा 'शक्तिपात दीक्षा' म्हणतात. हा मार्ग अत्यंत सरळ, सोपा व समर्थ मार्ग आहे. या मार्गात साधकाला काही करावे लागत नाही. त्यांचे साधनच साधकाकडून योग्य व आवश्यक ते सर्व काही करून घेत असते.

या मार्गातील समर्थ अधिकारी महापुरुष केवळ संकल्पाने शक्तिसंचाराची अनुभूती तत्काल करून देऊ शकतो. मी अशा अवलियाची गाठभेट घेण्याच्या प्रयत्नात होतो. चटर्जी वकीलांकडून बंगाली संन्यासी येथे आल्याचे समजले. मी त्या स्वामींची भेट घेतली. घरी भिक्षेला बोलाविले. आमचे खूप बोलणे झाले. स्वामींनी मी शक्तिपात दीक्षा देतो म्हणून सांगितले. खरेखोटे पाहाण्यासाठी नारायणप्रसाद वकीलांना दीक्षा घेण्यास पाठविले. आज सकाळी त्यांना दीक्षा झाली. दुपारी कोर्टात मला ते वकील येऊन भेटले. झालेली हकीगत त्यांनी मला सांगितली. ते अत्यंत आनंदी दिसले. पहिल्याच दिवशी त्यांना जाणवणारे अनुभव आल्याचे समजले. मला यात बराच अर्थ आहे असे वाटते. तेव्हा वामनरावजी आपण त्या बंगाली स्वामींकडे आज जाऊन येऊ या. मी थोडे पाहिले. तुम्ही आणखी खात्री करून पाहा. एखादी चांगली विद्या असेल तर आपण त्या विद्येचा आदर केला पाहिजे. महाराष्ट्रात या विद्येची कोणालाही कल्पना नाही. हे बंगाली स्वामी अगदी तरुण आहेत, तेजस्वी आहेत. त्यांचे विचार प्रौढ, गंभीर व स्पष्ट आहेत. त्यांचे नाव स्वामी चिन्मयानंद-सरस्वती आहे. त्यांनी याशिवाय स्वतःची काहीच माहिती दिली नाही."

दादासाहेबांचे बोलणे सर्वांनी कान देऊन ऐकले. कुंडलिनी जागृतीसाठी पातंजल योगशास्त्रानुसार सर्वांचे प्रयत्न चालू होते. सर्वांनी एक शंका घेतली. कुंडलिनी शक्तीच्या जागृतीसाठी मोठमोठे हठयोगीसुद्धा थकले. घोर तपस्या करूनही जी गोष्ट साध्य होण्यास दुष्कर ती गोष्ट इतक्या सहजासहजी घडून येते, हे कुठे

ऐकले नाही. वाचले नाही. हीच एक शंका. हाच एक कूट प्रश्न प्रत्येकाच्या मनात उभा राहिला. दादासाहेबांनी कुलार्णव तंत्र ग्रंथ दाखविला. या माहितीचे वर्णन वाचून दाखविले तरी प्रत्यक्ष काय असते याच्या प्रत्ययाचे कोणी नव्हते. एकमेव उदाहरण दादासाहेब सांगतात त्या नारायणप्रसाद वकीलसाहेबांचे! तेही २।४ दिवसातले! सर्वांनी ती समस्या मनात ठेवली आणि विचार केला की स्वामी संन्यासी आहेत. तेव्हा त्यांना भेटण्यास काही हरकत नाही. निदान दर्शन होईल. संन्यासी म्हणजे पृथ्वीवरचे प्रत्यक्ष देवच! भेट घेण्याबाबत सर्वांचे एकमत झाले. दुसरे दिवशी सायंकाळी ही सर्व ५।६ मंडळी स्वामींच्या दर्शनास गेली.

## श्रीगुरुमहाराजांना बंगाली स्वामींचे प्रथम दर्शन

ती संध्याकाळची वेळ होती. भाद्रपद महिन्याचा वद्य पक्ष होता. दिवस पावसाचे होते. पण या मंगल भेटीसाठी वरुणाने आज आपल्या दूतांना सुट्टी दिली होती. वातावरण प्रसन्न होते. धरणीमातेने हिरवा शालू परिधान करून सर्वांना सामोरे जाऊन दर्शन दिले. ती जलभाराने भारावली होती. निघालेल्या कार्यात सुयश असल्याचे शुभलक्षण, निसर्गदेवतेने, मूक मनाने व्यक्त केले बोलत चालत ही सारी मंडळी खर्रा घाटावरून निघून मंगळवार घाटावर येऊन पोहोचली. राव-बहाद्दूर परांडे पुढे झाले. त्यांच्या मागून श्रीगुरुमहाराज व अन्य सहाध्यायी स्वामींच्या धर्मशाळेत शिरले.

स्वामी रोज सायंकाळी फिरावयास जात असत. आज मात्र गेले नव्हते. त्यांनाही आतून सूचना आली असावी. स्वामीजी आसनावर बसलेले होते. ती बालमूर्ती पाहून सर्वांना आश्चर्य वाटले. नुकतेच कुठे पोरवय संपलेले आणि तारु-ण्यात प्रवेश केलेले ते वय दिसत होते. स्वामींच्या मुखावरील प्रसन्नता अंतःकरण खेचून घेत होती तर तेजस्वी डोळ्यातील गांभीर्य लोकांना दोन हात दूर ठेवीत होते. पहिल्याच दर्शनातील हा प्रभाव सर्वांना चिरस्मरणीय ठरला. या सर्व लोकांनी आजपर्यंत अनेक वृद्ध यती व संन्यासी पाहिले होते. काही तरुण संन्यासीही पाहिले होते. सर्वांना दीक्षित स्वामींची आठवण येऊन गेली. पण इतके लहान संन्यासी आज प्रथमच ते पाहात होते. आद्य शंकराचार्य, योगेश्वर, ज्ञानेश्वर यांची नावे माहीत होती पण बाल संन्यासी मात्र पाहाण्यात नव्हते. वैराग्याची प्रखरता साधेपणातून झळकत होती. सारे दर्शन घेणारे जाणकार होते. त्यांनी क्षणात सारे

जाणले. कुठेही काहीच खटकले नाही. सर्वांचे सद्भाव एकाएकी जागृत झाले. सर्वांनी स्वामींना साष्टांग नमस्कार केला व स्वामींच्या इच्छेनुसार त्यांच्या भोवती आदबीने बसले.

रावबहाद्दुरांनी एकेकाचा परिचय करून दिला. स्वामींनी तो शांतपणे ऐकून घेतला. ती पहिली भेट होती. कोणी बोलले नाही किंवा प्रश्नही केला नाही. सारे वातावरण शांत व चित्ताला प्रसन्न ठेवणारे होते. सत्संगती आणि सूक्ष्म अदृश्य चैतन्य शक्तीचा तो प्रभाव होता. खूप बोलावे असे प्रत्येकाला वाटत होते पण प्रश्नच निर्माण होत नव्हता.

खोलीतील एका कोपऱ्यात कोणी एक व्यक्ति आसनावर स्थिर बसलेली होती. मधून मधून त्या व्यक्तीचा श्वासोच्छ्वास जोरात चाले. ती व्यक्ति चक्राकार मान हालवीत होती. तिकडे सर्वांच्या नजरा वळल्या. रावबहाद्दुरांनी ती व्यक्ति नारायणप्रसाद आहे हे ओळखले. ते संध्याकाळीही येत होते. त्यांना २।४ दिवसात साधनेची गोडी व ओढ लागली होती. ती व्यक्ति हे मुद्दाम करते की हे सारे आपोआप होते हे त्यावेळी नीटसे लक्षात आले नाही. प्रत्येकाच्या मनात तरंग उठत होते. पण वातावरणाची शांतता आणि प्रसन्नता ढळत नव्हती. थोड्या वेळाने नारायणप्रसादजींनी डोळे उघडले. ते आसनावरून उठले. स्वामींना साष्टांग नमस्कार केला आणि ते एका बाजूला जाऊन बसले. नुकत्याच उमललेल्या आरक्त कमलाप्रमाणे त्यांचा चेहरा प्रफुल्लित दिसत होता. डोळे टवटवीत व आनंदित दिसत होते. सर्वांना नारायणप्रसादजींच्या प्रसन्नतेने संतोष होत होता. स्वामींनी प्रसादजींना विचारले "काय नारायणप्रसाद ! कसे काय आहे?" नम्रतेने प्रसादजी उत्तरले, "स्वामीजी आपल्या कृपेने ठीक आहे. चर्मरोगामध्ये खूप सुधारणा झाली आहे. कातडी नितळ व स्वच्छ होऊ लागली आहे"

स्वामीजी– परमेश्वराची कृपा आहे.

मध्येच दादासाहेबांनी विचारले, "स्वामीजी या दीक्षेने कोणकोणते अनुभव येतात?"

स्वामीजी– अनेक प्रकारचे अनुभव येतात. विविध आसने, मुद्रा, ध्वनी, क्रिया, दर्शन, बंध, प्राणायाम, भजने, हसणे, रडणे इत्यादि अनेक प्रकारे अनुभव येतात, ग्रंथांतून तर ही संख्या सव्वा लाखावर सांगितली आहे.

दादासाहेब– अशा विविध अनुभवामुळे मनस्थितीवर काय परिणाम होतो ?

स्वामीजी– नारायणप्रसादांना विचारा. प्रसादजी ! सांगा काय वाटते ते.

नारायणप्रसाद– काय सांगू ? मला दीक्षा घेऊन ४।५ दिवसच झाले आहेत. एवढ्या थोड्या काळात माझ्या मनाचा उत्साह, आनंद व स्फूर्ति फारच वाढली आहे. सारे शरीर हलके हलके वाटते. विशेषत: मेंदूची तरतरी आणि डोक्यातील सुखद संवेदना तर शब्दातीत आहेत.

या अनुभवावरून कुंडलिनी जागृत झाली हे कसे ठरवता येईल ? ही शंका श्रीगुरुमहाराजांचे मनात येत होती ती त्यांनी यावेळी स्वामींना विचारली.

स्वामीजींनी त्यांनाही थोडक्यांत उत्तर दिले. " शास्त्राप्रमाणे कुंडलिनीचे स्थान निश्चित आहे. तिचे स्वरूप चैतन्यमयी आहे. ती अतीव शक्तिशालिनी आणि आनंदवर्धिनी आहे. या तिच्या गुणांची प्रचीति या दीक्षेनंतर येणाऱ्या अनुभवातून येते. मूलाधारामध्ये प्रथम हालचाल सुरू होते. पुढे पुढे आसन पक्के होण्याचा अनुभव येतो. ती चैतन्यमयी आहे म्हणून उत्साह व स्फूर्ति वाढू लागते. ती आनंदवर्धिनी आहे म्हणून प्रसन्नता येत असते.

स्वामींचे एकेक वाक्य सूत्ररूप, साधे, सरळ, सोपे पण अर्थपूर्ण होते. श्रीगुरुमहाराजांना या उत्तराने समाधान वाटले. ग्रंथाचे अवडंबर न मांडता अनुभवाचे बोल फार सुटसुटीत असतात याची ही प्रचीति होती.

सायंसंध्येची वेळ झाली. सर्वजण उठले. स्वामींना नमस्कार केला. तेथून ते आपल्या मुक्कामाकडे परतले. रस्त्याने या नवीन विषयावर चर्चा करीत वाटचाल संपली.

जाता जाता दादासाहेब परांड्यांनी आपले हृद्गत श्रीगुरुमहाराजांच्याजवळ मोकळे केले.

"वामनराव, ही अत्यंत उज्ज्वल विद्या आहे. ही आपल्याकडे यावी असे मला फार वाटते. महाराष्ट्रात या विद्येचा प्रसार झाला पाहिजे."

श्रीगुरुमहाराज म्हणाले " काय देवाची इच्छा असेल ते होईल. पण आपल्यामुळे आज स्वामींचे दर्शन मात्र झाले."

# शक्तिपात साधनेची कल्पनातीत अनुभूति

पारब्रह्म के तेज का कैसा है उन्मान।
कहीबेकी सोभा नहीं, देखेही परमान ॥
—"संत कबीर"

परमार्थात अनुभव सर्वश्रेष्ठ असतो, तेथे शब्दाचे काम नाही आणि फायदाही नाही. ही गोष्ट साधार दाखविण्यासाठी स्वामी चिन्मयानंद सरस्वती केवळ ईशेच्छेने हुशंगाबादेस आले. अगदी कल्पना नसताना नियोजित ठिकाणी आले. हा चमत्कार म्हणता येत नाही. हे अज्ञात शक्तीचे नियोजन आहे. म्हणून तर श्रीगुरुमहाराज सुद्धा हुशंगाबादेस याच काळात या विषयाच्या जिज्ञासेने येऊन राहिले होते. स्वामी येथे आले आणि लगेच त्यांचे कार्यही सुरू झाले. अवघ्या १०।१५ दिवसात नारायणप्रसादानंतर गोविंदप्रसाद, किशोरीलाल आणि लक्ष्मीनारायण या सज्जनांना दीक्षा झाल्या.

ही दीक्षित मंडळी जेव्हा परस्परांना भेटत तेव्हा या जिव्हाळ्याच्या विषयाला मोठा रंग चढत असे. एकमेकांचे अनुभव ऐकताना परस्परांना आनंद होत असे. स्वामींचा विषय निघाला तर श्रद्धेने जो तो भारावून जाई. या दीक्षित मंडळींच्या साधनेचा जोर पाहून या मार्गाची काही वैशिष्ट्ये पाहाणाऱ्याला जाणवत असत. असा जाणवणारा प्रसंग श्रीगुरुमहाराज व दादासाहेब इत्यादींच्यावर येत असे. त्याचबरोबर स्वामींची निस्पृहता आणि प्रखरता जाणवत असे. स्वामी इतके निरपेक्ष असत की दीक्षेच्या वेळी ठेवलेल्या गुरुदक्षिणेच्या पैशालाही शिवत नसत. ती ज्याची त्याला घेण्यास सांगत. ठेवलेली फळे किंवा श्रीफल प्रसाद म्हणून देत असत. या गोष्टी त्यांच्या निस्पृह गुणांची साक्ष देत असत. बोलणेही बेताचे असे. दिवसाचा बराच काळ ते आपल्या आसनावर स्थिर बसलेले असत. आपल्या साधनेच्या धुंदीत असत. चुकून जवळपासच्या कोणी साधूबैराग्याने आत डोकावून पाहिलेच तर त्याला वाटे की स्वामी डुलक्या घेत बसले आहेत. त्यांना यापेक्षा काय वेगळे वाटणार ? जो तो स्वतःवरून दुसऱ्याची परीक्षा करणार. हंस आणि बगळा दोघेही शुभ्र पांढरे पक्षी असले तरी एक मोती खाणार तर दुसरा मासे खाणार !

असे होता होता पूर्णानन्द नावाच्या एका आर्यसमाजी व्यक्तीला स्वामींनी दीक्षा दिली त्यांचे अनुभव तर इतके विलक्षण होते की कोणालाही आश्चर्य तर

वाटेलच पण बुद्धि सुद्धा कुंठित होईल. हे पूर्णानन्द हुशंगाबादचे रहिवासी होते. ते कुटुंबवत्सल होते. घरात बायको, मुले असा संसार होता. आर्यसमाजाच्या तत्त्वांचा प्रभाव पडून त्यांनी तो पंथ स्वीकारला होता. योग्याभ्यासाची त्यांना आवड होती. योगाभ्यासातील मार्गदर्शनासाठी त्यांनी पंडितजी सातवळेकरांकडे धाव घेतली. दोघेही आर्यसमाजी म्हणून परस्परांचा परिचय होता. पंडितजींनी पत्रोत्तर देऊन पूर्णानन्दांना कळविले की "तुम्ही हुशंगाबादेत आहात. तिथे श्री गोविंदमहाराज पंडित म्हणून चांगले योगाभ्यासी आहेत. त्यांचेकडून समक्ष मार्गदर्शन घ्यावे." त्याप्रमाणे पूर्णानन्द गोविंदमहाराजांकडे येऊ लागले. त्यांना तेथे स्वामींची माहिती मिळाली. पूर्णानन्द स्वामींच्याकडे आले. त्यांनी स्वामीजींना वंदन करून 'कृपे' ची प्रार्थना केली. स्वामींनी आढेवेढे न घेता 'उद्या सकाळी या' म्हणून सांगितले. दुसरे दिवशी सकाळी पूर्णानन्दांना स्वामींच्या समोर दीक्षा झाली. दीक्षा होते न होते तोंच स्वामींना एकाएकी पोटात कळ येऊन शौचास जावे लागले. त्याचवेळी पूर्णानन्दांना आसनावर असतानाच भडभडून ओकारी झाली. स्वामी शौचाहून आले तर इकडे हा प्रकार पाहिला. त्यांनी त्यांना ते आवरून पुन्हा बसण्यास सांगितले. इतक्यात स्वामींच्या पोटात पुन्हा जोराची कळ येऊन शौचास जावे लागले. याप्रमाणे त्या गडबडींत स्वामींना ३।४ वेळा खळखळून जुलाब झाले. स्वामींना सुद्धा आश्चर्य वाटले. आजच्या साधकाच्या पूर्वजीवनात काही विशेष घडले असले पाहिजे. त्याशिवाय हा प्रकार घडला नाही. हा विचार करीत हातपाय धुवून स्वामी पूर्णानन्दांचे जवळ आले आणि त्यांना विचारले—

"पूर्वी कधी तुमच्यावर विषप्रयोग झाला होता का?" पूर्वपरिचय काहीही नसताना स्वामींनी केलेला प्रश्न ऐकून तर पूर्णानन्द अवाक् झाले. पण आता इतके झाल्यावर लपवून कसे ठेवता येणार?

ते म्हणाले "होय स्वामीजी, माझ्यावर तीन वेळा विषप्रयोग होऊन मी वाचलो आहे" यासंबंधीची माहिती देऊन त्यांनी स्वामींची क्षमा मागितली. यावर स्वामीजी म्हणाले,

"हे शास्त्र फार नाजुक आहे. येथे एकही गोष्ट लपून राहात नाही. एकही दोष शिल्लक राहात नाही. जे काही असेल ते आतून उफाळून बाहेर येईल. ही 'दीक्षा' आहे. ही दिव्यत्व देते आणि पाप क्षालन करते म्हणून तर साधक शुद्ध

होत जातो. साधन करताना काळजी करण्याचे कारण राहात नाही. असे धोक्याचे प्रसंग साधन करताना क्वचित प्रसगी उद्‌भवतात. त्याचा त्रास जसा साधकांना होतो तसा दीक्षा देणाऱ्या गुरूलाही भोगावा लागतो. परंतु दयाघन कुंडलिनी जगदंबा मातोश्रीच्या कृपेने हे सर्व दूर होते आणि ती आपले परम कल्याण करीत असते."

स्वामींचे विचार ऐकून पूर्णानन्दांना संतोष झाला. आणखी थोडा वेळ साधन करून स्वामींना नमस्कार करून ते घरी गेले. त्यांचा आजचा हा अनुभव फार बोलका होता.

अलीकडे दररोज सायंकाळी श्रीगुरुमहाराज, श्रीशंकरकाका आजेगावकर, श्रीबाबामहाराज, श्रीवैद्यमास्तर, रावबहाद्दूर परांडे प्रभृति मंडळी मंगळवार घाटावर श्रीस्वामींच्या निवासाकडे फिरावयास येऊ लागली होती. दिवसेंदिवस स्वामींच्याबद्दल सर्वांच्या मनात आदर, प्रेम व श्रद्धा वाढीस लागली होती. रोज नवनवीन दीक्षेचे अनुभव ऐकण्यास मिळू लागले होते. हळूहळू नित्यसहवासाने स्वामींच्याबद्दल आकर्षण वाटू लागले होते. स्वामींची प्रवृत्ति गंभीर असली तरी प्रकृति मात्र विनोदी होती. त्यांच्या सहवासात तासन्‌तास खर्च झाले तरी कोणालाही कंटाळा वाटत नसे. ही सर्व मंडळी तेथे आली म्हणजे स्वामीसुद्धा या सर्वांच्या बरोबर नर्मदामातेच्या परिसरात फिरावयास जात असत. सारे रसिक होते. निसर्ग-सौंदर्याचा आनंद लुटण्यास सर्वांना आनंद होत असे.

पूर्णानंदांच्या दीक्षेचा प्रसंग. विशेष घडल्याची कुणकुण आज दुपारीच ओझरती, श्रीगुरुमहाराजांच्या कानावर आली होती. त्यांचे या दृष्टीने बारीक लक्ष व सूक्ष्म निरीक्षण चालू होते. आज संध्याकाळी तर स्वतः स्वामींनी दीक्षेचा अनुभव इत्थंभूत वर्णन करून सांगितला. या अनुभवासंबंधी बोलताना स्वामी म्हणाले—

"शक्तिपात संप्रदाय हा एक महान संप्रदाय आहे. सर्व साधनमार्गापेक्षा हा साधनमार्ग प्रशस्त, प्रखर, गतिमान आणि बिनधोक आहे. अन्य सारे साधनमार्ग कल्पनांतर्गत आहेत तर शक्तिपात साधनमार्ग कल्पनातीत आहे. ब्रह्मवस्तू हीच कल्पनातील वस्तू आहे. म्हणून तिच्या प्राप्तीचा साधनमार्गही कल्पनातीत असला पाहिजे. तसा हा मार्ग आहे."

घरी परतताना आज बरोबर नवदीक्षित पूर्णानंद होते. त्यांनी या साधनेपेक्षा गुरूचे महत्त्व फार सांगितले. ही साधना श्रेष्ठ आहे यात तर शंकाच नाही. परंतु ती साधना देणारा गुरु अधिकारी पाहिजे. नाहीतर या साधनेला आधारच राहाणार नाही. ही साधनरूपी वेली गुरुरूपी वृक्षाच्या आधाराने राहात असते. गुरूच्या तेजाने साधनेचे तेज स्पष्ट होते.

**सद्‌गुरुसाचा सूरमा, नखशिख मारापूर ।**
**बाहर घाव न दीखई, भीतर चकनाचूर ॥**

अशी गुरूची स्थिती असते. खरा शूर सद्‌गुरु आहे. या प्रचंड शक्तीचा तो मालक आहे. तोच साधकाला आतून नखशिखांत झोडपून काढतो. बाहेरून या झोडपण्याचे काहीच चिन्ह दिसत नाही. आतून मात्र साधकाचा चक्काचूर होत असतो. कुंभार मातीचा घडा तयार करताना बाहेरून चापट मारतो तर आतून स्नेहाचा हात फिरवतो. असे जबरदस्त कार्य त्याचे चालू असते. हेच खरे की–

**सद्‌गुरुसारिखा असता पाठीराखा । इतरांचा लेखा कोण करी ॥**

या चिंतनाने सर्वांनी परस्परांचा निरोप घेतला व आपापल्या स्थानी निघून गेले.

पुढेपुढे पूर्णानंदांचा आणि स्वामींचा सहवास खूप वाढला. पूर्णानंदांचा साधनेमध्येही बराच वेळ जाऊ लागला. त्यामुळे पूर्णानंदांची बायको स्वामींच्यावर चिडून असे. माझ्या नवऱ्याला या संन्याशाने पार बिघडवून टाकले आहे. स्वामींना-सुद्धा पूर्णानंदांच्या बायकोचा राग पुष्कळ वेळा ऐकावा लागला. कधी त्याची माहिती स्वामी, गुरुमहाराजांना सांगत तेव्हा पूर्णानंदांची बायको जो दोहा म्हणून दाखवी तो सांगत असत –

**नारी मरे, गृहसंपद नासी । मुंड मुंडाये, भये संन्यासी ॥**

त्या बाईच्या या कवित्व शक्तीचे स्वामींना कौतुक वाटे. अशा गप्पागोष्टींना मोठी मजा येई. स्वामी त्या बाईची नक्कल करून हा दोहा म्हणून दाखवीत व मोठ्याने हसत असत.

## दीक्षा महाजनांना! निश्चय महाराजांचा!!

"हें शब्देंवीण संवादिजे । इंद्रियां नेणतां भोगिजे ।
बोला आदि झोंबिजे । प्रमेयासी ॥"

— श्रीज्ञानेश्वर

मुक्ति नगरीतील एक जवाहिऱ्या गेले दोन तीन आठवडे, नर्मदा किनारी, हुशंगाबादेतील मंगळवार घाटावर मुक्तामण्यांची रास मांडून बसला होता. घाटावरून जाणारे येणारे बघे लोक ते काचमणि समजून उपहासाने बघत बघत निघून जात होते. कोणी त्या कफल्लक फकिरी जवाहिऱ्याकडे पाहून याच्याजवळ खरे मोती कुठले असणार या संशयाने त्याच्याकडे दुर्लक्ष करीत होते. कोणी त्या जवाहिऱ्याकडे अर्थशून्य दृष्टीने पाहात जात तर कोणी दांभिक आश्चर्याने पाहात होते. पण खरे कारण असे होते की या बघ्यांच्या खिशात मोती खरेदी करण्याइतपत राहू द्या परंतु जवाहिऱ्याला विचारण्याचे धाडस करण्याइतपतही पै पावआणा नव्हता!

तरीसुद्धा त्या जवाहिऱ्याने जवळपास एखादा खरा रत्नपारखी आहे का याचा अंदाज घेण्यासाठी चार दोन सज्जनांना मोती वाटले. विकत नाही, फुकट वाटले.

ज्यांना हे मोती प्राप्त झाले होते त्यांना कळत न कळत आंतून आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. रोज एकांतात ते सज्जन, मोत्यांची परीक्षा करीत होते. कालच्यापेक्षा आज आणि आजच्यापेक्षा उद्या त्यांना मोत्याचे 'पाणी' पाहून आनंद व खात्री वाटत होती. तो आनंद आणि ती खात्री ते दाबून ठेवू शकत नव्हते. या अनमोल मोत्यांच्या प्राप्तीने हे सज्जन प्रसन्न राहू लागले. श्रीस्वामीमहाराजरूपी मुक्ति नगरीतील जवाहिऱ्याने शक्तिपातयोगदीक्षारूपी मोती हुशंगाबादेतील काही सज्जनांना केवळ कृपेने वाटले होते. ही परमभाग्यवान दीक्षित मंडळी जेव्हा आपापसात भेटत असत तेव्हा आपापल्या अनुभवासंबंधी बोलत बसत त्यावेळी ती अगदी रंगून जात. त्या मिळालेल्या मोत्यांचे पाणी, तेज, रंग व चमक या चर्चेत ते दंग होऊन जात.

श्रीगुरुमहाराजांच्या बरोबर सर्वश्री शंकरकाका, बाबा महाजन आणि वैद्यमास्तर ही मंडळी होती. हे सर्वजण स्वामींच्या दर्शनास सायंकाळी जात. दीक्षा

घेतलेल्या मंडळींची माहिती घेत. परंतु आपल्याला दीक्षा मिळावी असे मात्र अद्याप कोणीही व्यक्त केले नव्हते. रावबहाद्दूर परांडे यांनीही दीक्षा अद्याप मागितलेली नव्हती. ही मंडळी एकूण या अपरिचित प्रकाराचे सूक्ष्म परीक्षण करीत होती. धर्म, वेदांत आणि अध्यात्म यासंबंधी त्यांच्या निश्चित, नेमक्या आणि स्पष्ट जाणीवा होत्या. ते पक्क्या गुरूचे पक्के शिष्य होते. खऱ्याखोट्याचा उलगडा झाल्याशिवाय कुणाच्या जाळ्यात सापडणारे भोळेभाबडे शिष्य ते नव्हते. गुरूला तत्त्वरूप मानणारे असल्याने 'तस्मात् शास्त्रं प्रमाणं' या मार्गाचे ते पथिक होते. गुरुतत्त्व ज्या गुण-राशींनी ओळखले जाते, त्या गुणांची अनुभूति जेथे जेथे, ज्या ज्या व्यक्तीमध्ये प्रखर प्रकर्षाने व समुच्चयपूर्वक आढळते तेथे तेथे गुरुत्त्व आहे अशी त्यांची खात्री होती. "जो जो जयाचा घेतला गुण। तयासी मी गुरु केला जाण। गुरूसी आले अपारपण। जग संपूर्ण गुरु दिसे ॥" या विचारांनी श्रीगुरुमहाराजांचे मन निःसंदिग्धपणे स्वच्छ होते. प्रत्यक्ष गुरुदेव दत्तात्रेयांनी चोवीस गुरु केल्याचे जग-जाहीर होते. त्यामुळे गुरु एकच असावा हा संकेत अशा अवस्थेच्या भूमिकेत बदलू शकतो. श्रीमत् आद्यशंकराचार्य यांनीही एका नारळ काढणाऱ्या कोळ्याला गुरु करून त्याला गुरुपदाचा योग्य मान दिला होता. असे सर्व काही असल्याने स्वामींना गुरु करण्याचा प्रश्न श्रीगुरुमहाराज आदि कोणाच्याही मनाला कोड्यात टाकीत नव्हता. पण प्रश्न होता तो खऱ्या गुरुत्वाचा ! "गुणाः पूजास्थानं" म्हणून हे गुणवेत्ते गुणांची परीक्षा करीत होते. हे रत्नपारखी मोत्यांची आणि जवाहिऱ्याची परीक्षा करीत होते.

श्रीस्वामींच्या नित्यसहवासाने श्रीगुरुमहाराज प्रभृतींची मने निःशंक होत चालली होती. स्वामींच्या निर्मळ व उज्ज्वल चारित्र्याने प्रभावित आणि आकर्षित होत होती. हे स्वामी असामान्य असल्याची जाणीव सर्वांच्या अंतर्मनाला होत होती. स्वामींच्याबद्दल विनम्रतेची, आदराची आणि श्रद्धेची भावना सर्वांची होत चालली होती. इतक्यात श्रीकाशीनाथपंत ऊर्फ बाबा महाजनांना त्यांच्या घरून "ताबडतोब निघून यावे" म्हणून पत्र आले. पत्रातील मजकुरावरून त्यांना जाणे अपरिहार्य झाले होते. स्वामींच्या सहवासात राहून त्यांचा काहीच लाभ न घेता जाणे बाबा महाजनांना जड वाटू लागले. पण इच्छा असूनही त्यांना तेथे राहाणे कठीण झाले.

हे बाबा महाजन मोठे योगाभ्यासी होते. त्यांचा आसनांचा अभ्यास जबरदस्त

होता. इतर आसनांचे राहू द्या, पण आसनांचा राजा ‘ मत्स्येंद्र पीठासन ’ यासारखे कठीण आसन लावून बाबा सहज तासन् तास बसत असत. प्राणायामातही त्यांची गति अशीच जबरदस्त असे. त्यांना घरचे पत्र आल्यापासून त्यांच्या मनाला मोठी चुटपुट लागून राहिली. आपल्याला स्वामींच्याकडून दीक्षा न घेता परत जावे लागणार या विचाराने ते बेचैन झाले. पत्र आज आले आणि उद्या निघालेच पाहिजे. एवढाच काळ स्वामींचा सहवास घडणार ! बाबा महाजनांनी आपली ही मनोव्यथा श्रीगुरुमहाराजांना बोलून दाखविली. श्रीगुरुमहाराजांनी त्याच तत्परतेने ही गोष्ट रावबहाद्दूर परांडे यांच्या कानावर घातली. नित्याप्रमाणे सायंकाळी ही मंडळी मंगळवार घाटावर स्वामींच्या दर्शनास आली.

सर्वांनी स्वामींचे दर्शन घेतले, बाबांनी आपली इच्छा स्वामींच्या चरणी योग्य शब्दात समर्पण केली. रावबहाद्दुरांनी त्याला दुजोरा देऊन बाबांच्या संबंधी चार शब्द सांगितले. पत्राचा उल्लेख केला. बाबा महाजन हात जोडून भावभक्तीने बसले होते. स्वामींनी गंभीर होऊन उत्तर दिले.

“ काशीनाथ ! मी तुला अवश्य दीक्षा देईन, पण आता इतक्या घाईत नको. तुम्ही पाहाताच आहात की गेले ५।६ दिवस माझी प्रकृती तितकीशी ठीक नाही. खोकल्याचा त्रास फार जाणवतो. मी तुझ्या गावी येऊन तुला दीक्षा देईन. काळजी करू नकोस. ” स्वामींनी खूप समजावून सौम्य शब्दात सांगितले. बाबांचे भाव जाणून सांगितले. पण बाबांचे समाधान झाले नाही. मनातली रुखरुख थांबली नाही, ते फार निराश झाले. आपले प्रारब्ध बदलण्याची वेळ अजून आली नाही, या विचाराने ते स्तब्ध राहिले. एखादा तहानेने व्याकूळ मनुष्य मोठ्या कष्टाने गंगेच्या काठी यावा आणि पाण्याचा थेंब तोंडात न घालताच त्याला तेथून परतण्याची पाळी यावी अशी बाबांची मनस्थिती झाली. निराशेच्या घोर अंधाराने आसमंत झाकाळून गेले. त्यांचे डोळे पाण्याने भरून आले. पण— **तुका म्हणे नाही चालत तातडी। प्राप्त काल घडी आल्याबिण ॥** हेच खरे, असा विचार करून सर्वजण उठले. स्वामींना वंदन केले. आणि आपल्या निवासाकडे निघाले.

दुसरे दिवशी बाबा महाजनांना आपल्या गावी जायचे होते. दुपारची गाडी होती. प्रातःकाली नित्याचे आन्हीक उरकले. आणि जाण्यापूर्वी स्वामींचे दर्शन घेऊन जावे म्हणून सकाळीच ते मंगळवार घाटाकडे निघाले. जाताना वाटेत एक श्रीफल

व पुष्पमाला खरेदी केली. घाटावर आले. श्रीनर्मदामातेला वंदन करून हातपाय धुतले. मार्जन करून वर स्वामींच्या निवासात आले.

स्वामीजी प्रसन्न मुद्रेने आसनावर बसलेले होते. स्वामींची ती काषाय वस्त्रे धारण केलेली, तेजःपुंज प्रसन्न मूर्ति पाहिली मात्र नि बाबा महाजनांनी साष्टांग नमस्कार घातला. पुष्पमाला अर्पण केली. तुलसीपत्र अर्पण केले. श्रीफल व दक्षिणा पुढे ठेवून पुनः एकदा नमस्कार केला. आणि म्हणाले, "स्वामीजी, आज दुपारच्या गाडीने मी आजेगावी जात आहे. माझ्यावर कृपादृष्टी असावी एवढी प्रार्थना आहे." तेवढ्यात काय झाले कुणास ठाऊक, पण स्वामी बाबांना म्हणाले, "काशीनाथ, तुला आत्ताच दीक्षा होईल. बैस त्या आसनावर" 'पुरुषस्य भाग्यं देवो न जानाति' याची प्रचीतीच बाबांना आली. ते क्षणभर गोंधळून गेले. हर्षनिर्भर बाबांनी झटपट कपडे काढले. स्वामींना अत्यानंदाने भरलेल्या नयनांनी पुन्हा नमस्कार केला आणि आसनावर बसले.

स्वामींनी त्यांना डोळे मिटण्यास सांगितले. त्यांना स्पर्शदीक्षा दिली. क्षणार्धात बाबांच्या शरीरात शक्तिसंचार झाला. क्रिया सुरू होऊन त्या क्रियांचा वेग वाढू लागला. आसन पक्के होऊन कमरेच्या वरील शरीर जोरजोरात पिंगा घातल्या-प्रमाणे चक्राकार गतीने फिरू लागले. भस्त्रिकादि प्राणायामाचे प्रकार होऊ लागले. या शारीरिक हालचालीने शरीर घामाने डबडबून निघाले. आनंद तर इतका वाटू लागला की तो मुखातील हास्यावाटे ओसंडू लागला. आतून येणारा हा आनंद नेहमीपेक्षा वेगळा पण आगळा होता. बाबांची आधीच खूप तयारी झालेली होती त्यामुळे क्रियांचे आणि प्राणायामाचे खूप अनुभव प्रारंभीच आले होते. एक तासभर वादळी वेगाने क्रियांचा जोर चालू होता. एक तासाने त्यांचे घट्ट मिटले गेलेले डोळे आपोआप उघडले गेले. बैठक संपली. बाबा आसनावरून उठले. स्वामींना नमस्कार केला. स्वामी म्हणाले, काशीनाथ, तुला दीक्षा झाली चांगली जोरात बैठक झाली. हे साधन नियमीत चालू ठेव! कोणाला काही सांगू नको. प्रसाद म्हणून स्वामींनी दिलेला नारळ घेतला. स्वामींचा निरोप घेऊन बाबा आपल्या निवासाकडे निघाले. रस्त्याने जाताना त्यांना आपले शरीर इतके हलके वाटत होते की जणू आपण हवेतून चालत आहोत असा भास होत होता. सकाळचा दहाचा सुमार होता. मोठ्या खुशीत बाबा महाजन आपल्या निवासस्थानी पोहोचले.

श्रीगुरुमहाराज आणि शंकरकाका आजेगावकर आपल्या नित्यानुष्ठानात मग्न होते. बाबा तेथे पोहोचताच त्यांनी त्या दोघांना सांगितले "वामनराव, माझे काम झाले. मला दीक्षा झाली" हे ऐकून श्रीगुरुमहाराजांना आश्चर्यच वाटले. पण बाबांची प्रसन्न मुद्रा पाहून ते त्यांना म्हणाले "बाबा, काम झाले, दीक्षा झाली, म्हणजे काय झाले?"

बाबा :— स्वामी म्हणाले कोणाला काही सांगू नकोस.

श्रीगुरुमहाराज :— ते खरे आहे. पण आपल्या माणसाला सांगायला काही हरकत नाही. तुम्हाला जो अनुभव आला तो सांगितल्याखेरीज आम्ही काय समजणार?

बाबा :— मला तसे सांगता येणार नाही. पण काय झाले ते दाखवता आले तर पाहातो. मग तुम्हाला काय पाहायचय ते पाहा. समजायचे ते तुम्ही समजून घ्या.

बाबा महाजनांच्या त्या अनुभवाच्या आनंदाच्या उर्मि, अद्यापपर्यंत उसळतच होत्या. त्याच आनंदात आणि त्याच उत्साहात, त्यांनी कपडे काढले व डोळे मिटून त्यांच्या समोर बैठक ठोकली. बाबा बसले मात्र की लगेच पुन्हा क्रिया सुरू झाल्या· क्रियांचा जोर आणि गति पहिल्याप्रमाणे वाढली. शरीराने पिंगा घालून धिंगाणा सुरू केला. शरीर वेताप्रमाणे भराभर लवत होते. आसन स्थिर होते तरी वरील शरीर गोलाकार फिरत होते. मानेची गती तर घुसळणाऱ्या रवीसारखी भरभर होत होती. भस्त्रिका सुरू झाली. श्वासोच्छ्वासाचा जोर लोहाराच्या भात्याप्रमाणे वाढला. या सर्व क्रिया आपोआप होत असल्याचे पाहाणाऱ्यांनाच जाणवत होते. शरीर घामाने तिथळले होते. उत्स्फूर्त अन्त:प्रेरणेचे हे कार्य पाहून श्रीगुरुमहाराज गंभीर झाले होते. त्यांची सूक्ष्म, चिकित्सक व जाणती दृष्टी या सर्व हालचाली बारकाईने टिपत होती. साऱ्या क्रिया शास्त्रशुद्ध होत होत्या. आसन, बंध, मुद्रा, प्राणायाम इत्यादि सारे, जे जसे व्हावेत, तसे होत होते. हे सारे विशेष कष्ट व सायास न होता, सहज होत होते.

आपल्यापैकी एका स्नेह्याची ही शक्तिसंचाराची स्थिती श्रीगुरुमहाराज अगदी जवळून पहात होते. हे दृश्य पाहून त्यांचे मन या मार्गाबद्दल नि:शंक झाले. या मार्गाच्या मार्गदर्शकाबद्दल मनात नितांत श्रद्धा व आकर्षण उत्पन्न झाले त्याच वेळी

त्यांच्या मनाने एक निश्चयही केला. बाबांची बैठक झाली. तृप्त नेत्र उघडले गेले. आनंदाचे कल्लोळ प्रसन्न मुखावर उसळत होते. गुरुकृपेने ब्रह्मानंदाचे निधान लाभले म्हणजेच असे होऊ शकते हा विचार बाबांनी ज्ञानेश्वरांच्या शब्दात सांगितला.

**"मोटके गुरूमुखिं उदैजत दीसे । आणि हृदयीं स्वयंभचि असे जैसे ।
प्रत्यक्ष फावो लागे तैसें । आपसेया ॥"**

असे हे चैतन्य ! असा हा त्याचा संचार ! शब्दाने काय सांगणार ? बाबांचा आत्मविश्वास दुणावला होता. तोच विश्वास श्रीगुरुमहाराजांना पाहावयाचा होता. तो आत्ता पाहण्यास मिळाला. हा घरातला अनुभव पाहून ते विचार करू लागले. आपल्याला या ठिकाणी आणण्यात व त्याच वेळी स्वामींना येथे पाठविण्यात परमेश्वराचा काही हेतु दिसतो. पाहू या परमेश्वराची काय इच्छा आहे ते.

दुपार झाली. सर्वांची भोजने झाली. खूप गप्पा गोष्टी झाल्या आणि दुपारच्या ठरल्या गाडीनें बाबा महाजन मोठ्या आनंदाने आजेगावकडे रवाना झाले.

## महाराजांच्या घरी स्वामीजी

गेल्या ७/८ दिवसांपासून स्वामीजींची प्रकृति ठीक नव्हती. आर्यसमाजी पूर्णानंदांना दीक्षा दिल्यापासून जी बिघडली ती अद्याप सुधारली नव्हती. अलीकडे तर त्यात खोकल्याचीही भर पडली होती. अशा स्थितीत भिक्षेसाठी माधुकरी मागून आणावी लागत होती. स्वामीजी स्वतंत्र प्रकृतीचे असल्याने, त्यांना आपले ओझे दुसऱ्या कोणावर टाकणे, प्रशस्त वाटत नसे. स्वीकारलेल्या आश्रमाच्या दृष्टीने सुख-दुःख किंवा अडीअडचणी नगण्य होत्या म्हणूनच प्रकृति ठीक नसतानाही भिक्षे-साठी गावात जाऊन येणे व नदीकाठच्या धर्मशाळेत मुक्काम ठेवणे, यामध्ये त्यांनी बदल केला नाही.

आजारपणातही स्वामींनी आपले नित्याचे कार्यक्रम तसेच पूर्ववत चालू ठेवले हे त्यांचे दृष्टीने योग्यच होते. पण, श्रीगुरुमहाराजांच्या कुशल नजरेतून या गोष्टी सुटल्या नव्हत्या. त्यांना वाटत होते कुणीतरी स्थानिक शिष्य ही सोय करतील. आपण कोणाला सांगावे हे त्यांना पसंत नव्हते. स्वतःचा निर्णय अद्याप झालेला नव्हता. जणू घरी नेण्याची वेळ अजून आली नव्हती. ही स्वामींची सूक्ष्म व

कठोर परीक्षाच झाली. पण बाबा महाजन यांच्या दीक्षेच्या अनुभवाची स्थिती श्रीगुरुमहाराजांनी जवळून पाहिली होती. त्याच वेळी त्यांनी मनाशी हा निर्धार केला की स्वामींना आजच आपल्या घरी घेऊन यायचे. त्यांनी आईची संमती विचारली. संन्यासी स्वामी घरी येणार या एकाच कल्पनेने तिला आनंद झाला. स्वामींच्याबद्दल रोज जी चर्चा घरात चाले, ती ऐकून तर स्वामींना घरी आणण्याची इच्छा आईंना आधीच झाली होती. आज ती मुलाने बोलून दाखविली. सज्जन, सत्पुरुष, संत, संन्यासी आणि महात्मे यांच्या सेवेत जिने आयुष्य वेचले त्या उमामातेला स्वामींना घरी आणण्याचा आनंद किती झाला असेल हे शब्दाने सांगणे कठीण.

संध्याकाळ झाली. श्रीगुरुमहाराज शंकरकाकांना घेऊन स्वामींच्याकडे नित्यापेक्षा जरा आधीच गेले. आज स्वामी पडून होते. मंडळी आलेली पाहाताच उठून बसले. दोघे नमस्कार करून जवळ बसले. स्वामींच्या प्रकृतीची चौकशी केली. "आता बरी आहे" म्हणून स्वामींनी सांगितले. थोडा वेळ शांततेत गेल्यावर श्रीगुरुमहाराज म्हणाले, "स्वामीजी! आजपासून आमच्याकडे राहावयास चलावे अशी आईची पण इच्छा आहे."

स्वामी थोडे थांबून म्हणाले, "ठीक आहे. येतो. आमच्याही आईची इच्छा आहे. चला. शुभस्य शीघ्रम्"

हुशंगाबादेच्या नर्मदातीरावरील मंगळवार घाटावर आलेला मुक्तिनगरचा जवाहिऱ्या म्हणजे स्वामी श्रीचिन्मयानंदसरस्वतीमहाराज! त्यांनीच खऱ्या रत्न-पारख्याचा अंदाज घेण्यासाठी चारदोन सज्जनांना दीक्षारुपी मोती वाटले होते. असा हा कैवल्यपदाचा दाता खऱ्या रत्नपारख्याची वाट पहात होता. स्वामींना आज खरा रत्नपारखी भेटला. त्याने मोती खरीदण्याची भाषाच केली नाही. भाषा केली ती मुक्तिनगरच्या जवाहिऱ्यालाच घेऊन जाण्याची! हा रत्नपारखी भल्या-भल्यांच्या तालमीत तयार झाला होता. मागणी घालताना त्याने तुकोबांच्या शब्दात सांगितले—

**"नलगे मुक्ती, धन, संपदा। संत संग देई सदा॥"**

स्वामींनी "चला" म्हणताच श्रीगुरुमहाराज उठले. स्वामींचे सामान ते

काय? एक छोटी वळकटी आणि कमण्डलू. बस्, एवढाच संन्याशाचा संसार! वळकटी श्रीगुरुमहाराजांनी घेतली आणि कमण्डलू स्वामींनी घेतला. "नारायण" म्हणून छाटी झटकून स्वामी निघाले. वेळ तिन्हीसांजेची होती. यावेळी "लक्ष्मी" घरी येते म्हणून घराघरातून दिवे लावले जात होते. अशा शुभवेळी स्वामीजी श्रीगुरुमहाराजांकडे निघाले. प्रत्यक्ष 'शक्तिदेवी' श्रीगुरुमहाराजांच्या घरी निघाली. उज्ज्वल भविष्याचे शुभ चिन्ह होते हे! विधात्याच्या अघटित घटनांचा पार मानवी अनुमानाला कितीसा लागणार? त्याने फक्त आश्चर्याने मंत्रमुग्ध होत राहाणेच ठीक!

संन्यासी म्हणजे श्रीगुरुमहाराजांच्या अपार भक्तीचा आणि प्रगाढ श्रद्धेचा विषय! त्यांच्या परिवाराचा तो विशेष आहे. पिढ्यान पिढ्या संन्याशांची सेवा या गुळवणी कुलाने केली आहे. स्वामींच्याबरोबर चालतांना या साऱ्या आठवणी श्रीगुरुमहाजांना स्मरत होत्या. बोलता बोलता खर्रा घाट लागला. इकडे मातोश्री उमादेवी मोठ्या उत्कंठेने स्वामींची वाट पाहात होत्या. इतक्यात करकरीत तिन्ही सांजेच्या वेळी, घाटावर सायंसंध्या उरकून स्वामीजी घरात पोहचले. मातोश्रींनी स्वामींना नमस्कार केला. त्यांना आसन मांडून दिले. बसण्याची विनंती केली. प्रकृति ठीक नसल्याने स्वामींनी दिवसभराचा उपवास केला होता. रात्री एक पेलाभर गरम दूध, सुंठ टाकून दिले. विश्रांतीसाठी स्वामींनीही लवकरच पलंगावर अंग आडवे केले.

दोन महापुरुषांची ही दुर्लभ भेट आणि अपूर्व सहवास घडून येण्याची ही महापर्वणी होती. "**सतां सद्भिः संगः कथमपि हि पुण्येन भवति**"

## अपूर्व समसमा योग!

**"तैसे प्रयाग होत सामरस्याचे। वरी वोसाण तरत सात्त्विकाचे।**
**ते संवाद चतुष्पथीचे। गणेश जाहले"**

— ज्ञानेश्वरी १० : १२४

इुरंगाबादेत एका विशिष्ट हेतूने श्रीगुरुमहाराज आपल्या मातेसह व इतर काही गुरुबंधूसमवेत येऊन राहिले होते. २७ ऑगस्ट १९२२ ला ते येथे आले. आता त्याला महिना होऊन गेला होता. या कालावधीत कालाच्या गतीपेक्षा घटनां-

चीच गति अधिक वाढली होती. श्रीगोविंदमहाराज पंडित यांच्या देखरेखीखाली श्रीगुरुमहाराजांचा प्राणायामाचा विशेष अभ्यास चालू होता. भाद्रपद शुद्ध ५ म्हणजे ऋषिपंचमीपासून आश्विनाच्या प्रारंभापर्यंत नित्य अभ्यास चालू होता. आश्विनातील देवीचे नवरात्र सुरू झाले होते. श्रीगुरुमहाराजांना स्वामींचे प्रथम दर्शन मंगळवार घाटावर सोमवारी आश्विन शु॥ ५ स ललितापंचमीचे दिवशी झाले, त्यापुढे जेमतेम १५।२० दिवस स्वामी मंगळवार घाटावर 'त्या' कोठीमध्ये राहिले.

स्वामींचे महाराष्ट्रात जे आगमन झाले ते आदिशक्ति जगन्मातेच्या नवरात्रोत्सवात! कोजागिरी पौर्णिमेचा तो काल. आदिमाता 'को जागर्ति' च्या फेऱ्याने आली आणि एक "जागृत भक्त" तिला भेटला. आता कोण कोणाला सोडणार? स्वामींचा आणि श्रीगुरुमहारजांचा संबंध दिवसेदिवस 'शुक्लेंदुवत्' वाढत गेला. ऐन दसरा दिवाळीमध्ये ही गाठभेट झाली. या भेटीमुळे दसरा दिवाळीसुद्धा आनंदून गेली. मोहरून गेली. हरकून गेली. श्रीगुरुमहाराजांच्या जीवनातील हेच ते सुप्रसिद्ध अविस्मरणीय वर्ष की ज्या दिवाळीत ते गुरुद्वादशीस वाडीला गेले नाहीत. स्वामी चिन्मयानंद सरस्वतींच्या स्वरूपात श्रीमत्वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांचे हे दर्शन नर्मदेकाठी होत होते. सुमारे चौदा वर्षांपूर्वीच्या गुरुद्वादशीस कृष्णेकाठी वाडीला स्वामीमहाराजांचे प्रथम दर्शन श्रीगुरुमहाराजांना घडले. त्यानंतर या वर्षीच्या गुरुद्वादशीस नर्मदेकाठी पुन्हा स्वामीमहाराजांचे दर्शन नव्या रूपात घडत होते. म्हणून वाडीला जाणे झाले नाही.

तो शरद ऋतूचा रम्य व समृद्ध काल होता. श्रीगुरुमहाराजांच्या घरी आल्यापासून स्वामींना विश्रांति चांगली मिळाली. शरीरधर्माला पथ्यपाणी लाभले. मनाला समाधान देणारा सहवास मिळाला. त्यामुळे स्वामींची प्रकृति सुधारली. संध्याकाळचे फिरणे सुरू झाले. श्रीगुरुमहाराज, शंकरकाका, गावातील कोणी येतील ते, अशी मंडळी स्वामींच्या बरोबर फिरावयास जाऊ लागली. बऱ्याच वेळा त्यांचे फिरणे निःशब्द होत असे. पुष्कळ वेळा कोणाच्या मनात प्रश्नच उत्पन्न होत नसे म्हणून कोणी काही विचारीत नसे. कोणाला कधी काही विचारावेसे वाटले तर प्रश्न विचारणाऱ्याच्या मनात येई "सर्वज्ञाला काय विचारावे?" उत्तर देणाराच्या मनात येई. "विचारलेच नाही तर काय सांगावे?" मधून मधून इकडच्या तिकडच्या गोष्टींना रंगतही चढत असे.

रम्य निसर्ग, शरद ऋतूची समृद्धता, नर्मदा मातेचा संथ वाहणारा प्रवाह. आपल्याच लयीत गतीचे गीत गात, पण ठरलेल्या मार्गाने नर्मदा जात होती. केवळ तिच्या सान्निध्याने तिचे तटनिवासी संतुष्टपणे विकसत होते. चैतन्याने भरले होते. त्याचप्रमाणे स्वामींचा जीवनप्रवाह सुद्धा मौन, चैतन्यमय आणि आनंदपूर्ण असल्याने त्यांचे जीवनसाथी सुद्धा संतुष्ट होत होत विकसत होते. स्वामींची प्रकृति मौन व श्रीगुरुमहाराजांची प्रकृती सुद्धा मौन ! कधी कलरव झालाच तर तो निसर्गाच्या निरागस आनंदाचा !

दररोज प्रातःकाली नित्यानुष्ठानप्रेमी श्रीगुरुमहाराज प्रथम स्नान, संध्या, पोथी व जप यामध्ये रत होत असत. नंतर गोविंदस्वामी पंडितांनी सांगितलेला प्राणायामाचा अभ्यास चालत असे. स्वामीजींचे श्रीगुरुमहाराजांकडे लक्ष असे पण आपल्या आत्मानुसंधानात राहून ! स्वामीजी दिवसभर आपल्या साधनेच्या धुंदीत असत. त्यांना वेळ कसा घालवावा असा प्रश्नच पडत नसे. साधनेच्या प्रसन्नतेत वेळ जात असे, या साधनेला स्वस्थता लागते ती येथे श्रीगुरुमहाराजांच्या घरी पूर्णपणे मिळाली होती. मातोश्री उमाबाईंच्या हातचा स्वयंपाक म्हणजे अमृताचे पदार्थ! ज्यांना ज्यांना त्यांच्या हातचे अन्न खाण्यास मिळाले ते खरे भाग्यवान ! त्या अन्नपदार्थांपेक्षा उमाबाईंच्या हाताला चव होती. अशी अन्नपूर्णामाता स्वयंपाक करणार आणि पक्के चोखंदळ स्वामी भोजन करणार ! पण उमाबाई कधी हार गेल्या नाहीत. स्वामीजी एक एक पदार्थ खुलवून खुलवून सांगत नि तो तस्सा त्यांच्या पानात येई. अशा मोकळ्या, घरगुती व आनंददायक वातावरणाने स्वामींची प्रकृति झटपट सुधारली. मधून मधून दादासाहेब परांडे स्वामींना दूध, तूप खाण्याविषयी सुचवीत व गुरुमहाराज तेवढे ऐकून त्याची योग्य तऱ्हेने अंमलबजावणी करीत. खरोखर धन्य तो गृहस्थाश्रम ! पण इथे मजा ही, की हा ब्रह्मचर्याचा गृहस्थाश्रम आणि संन्यासी अतिथी !

श्रीगुरुमहाराजांच्या अष्टपैलू गुणांचे कोंदणही तसेच मोलाचे होते. स्वामींना फार फार समाधान वाटले. खरे म्हणजे या सर्वांमुळे स्वामींचे आंतरिक प्रेमच श्रीगुरुमहाराजांच्यावर बसले. स्वामींची प्रसन्नता पाहून श्रीगुरुमहाराजांनाही धन्यता वाटली. या संधीचा फायदा घेऊन एकदा ते स्वामींना म्हणाले "स्वामी! मला दीक्षा होईल का?" स्वामींनी लगेच उत्तर दिले नाही, ते शांतच राहिले.

आत्तापर्यंत गुरु कसोटी देत होते. आता शिष्याच्या कसोटीची पाळी आली. गुरूची कसोटी गुरुत्व! तर शिष्याची कसोटी लघुत्व! दोघेही आपापल्या गुणात कमी नव्हते. स्वामी विचार करू लागले की शास्त्रनिष्ठ निश्चयी शिष्याला उत्तर द्यावयाचे आहे. त्यांचीही शास्त्रनिष्ठा तशीच जबरदस्त होती. आपल्या धर्मात अनेक संप्रदाय आहेत. अनेक परंपरा आहेत. त्या त्या संप्रदायांच्या व परंपरेच्या मर्यादा धर्मशास्त्र सांभाळीत आले आहे. कारण "श्रद्धा" हा धर्माचा पाया आहे आणि कळसही आहे. जे घडते ते श्रद्धेने घडते. जे घडवावयाचे आहे ते सुद्धा श्रद्धेनेच घडवावयाचे असते. त्या अमोल श्रद्धागुणाला सांभाळण्यासाठी परंपरेला सांभाळावे लागते. श्रद्धा ज्ञानाचा आधार आहे म्हणून ती जपली पाहिजे, जोपासली पाहिजे. तेव्हा शास्त्रनिष्ठ श्रीगुरुमहाराजांना, शास्त्रप्रमाण स्वामीजी, मर्यादेचे उल्लंघन करण्यास कसे सांगणार? स्वामी म्हणाले, "हे पहा वामन! सध्या तुझा प्राणायामाचा अभ्यास चालू आहे. त्या अभ्यासाने सुद्धा कुंडलिनी जागृत होते. तेव्हा आहे ते चालू ठेव. दुसऱ्याच्या कार्यात हस्तक्षेप करणे बरे नाही. वेळ आल्यावर आपली दीक्षा जरूर होईल."

"दुसऱ्याच्या कार्यात हस्तक्षेप करणे बरे नाही." या तर्कावर श्रीगुरुमहाराजांच्या जवळ उत्तर नव्हते. दीक्षेला अजून वेळ आहे हे ऐकून श्रीगुरुमहाराजांना जरा खटकले. पण विचारांनी मनाला समजाविले. देणारा उतावीळ नव्हता तर घेणाराही अधीर नव्हता. "होईल" शब्दात खात्री होती म्हणून श्रीगुरुमहाराजांच्या मनाला शांतता आली.

## "प्रसाद चिन्हानि पुरः फलानि"

श्रीगुरुमहाराजांचा प्राणायामाचा नियोजित अभ्यास तितिक्षापूर्वक चालला होता. पूर्वी पुष्करला स्वामी ब्रह्मानंदांच्याकडे असाच नेट त्यांनी लावला होता. पण तेथे शारीरिक विक्षेप आल्याने, तो अभ्यास तसाच अर्धवट सोडावा लागला होता. डुशंगाबादेस मात्र प्रभुकृपेने विक्षेप आला नाही. जवळ जवळ दीड महिना प्राणायामाचा नित्यक्रम चालू होता. अभ्यासाची तीव्रता खूप वाढली होती. त्यामुळे श्रीगुरुमहाराजांचे शरीर अत्यंत हलके व नाजुक झाले होते. ज्या उद्देशाने हे कार्य चालू होते तो उद्देश आता स्वामींच्या कृपेने शीघ्र साध्य होणार, हे निश्चित झाल्यासारखे होते. पण स्वामींनी आहे ते चालू ठेवण्यास सांगितले, म्हणून ते चालू होते.

स्वामींच्या कृपेचा सूर्य कधी उगवणार, हे मात्र अनिश्चित होते. 'त्या' सूर्योदया-पूर्वीची ही पहाट होती.

स्वामीजी मंगळवार घाटावरून श्रीगुरुमहाराजांकडे येऊन १०।१५ दिवस झाले होते. आषाढी कार्तिकीची नित्य पंढरीची वारी करणारे श्री. वैद्यमास्तर कार्तिकीसाठी पंढरपूरला निघून गेले. श्री. बाबा महाजन तर दीक्षा घेऊन पूर्वीच आपल्या गावी निघून गेले होते. राहिले फक्त शंकरकाका, श्रीगुरुमहाराज आणि उमाबाई. सध्या स्वामींच्या मंगल सहवासाने सर्वांचे चित्त प्रसन्न होत होते. विविध गप्पागोष्टींनी ज्ञान आणि मनोरंजन होत होते. सायंकाळचे फिरायला जाणे, बरोबर भोजन करणे, विश्रांति घेणे इत्यादि कार्यक्रम नित्याचेच झाले होते.

दीक्षेसंबंधी परत प्रश्न विचारण्याचा प्रश्न नव्हता. जे काही होणार ते स्वामींच्या इच्छेने होणार असल्यामुळे श्रीगुरुमहाराजांना शांत राहाण्याशिवाय उपाय नव्हता. दीक्षा कधी का होईना पण स्वामींचा मंगल सहवास मात्र मिळत होता. थोडी फार सेवा होत असल्याने 'तो' येणारा दिवस जवळ जवळ येत होता. दीक्षेची मागणी आधीच करून ठेवली होती. आता ते परमेश्वराच्या इच्छेची वाट पाहात होते. एवढ्यात कार्तिक कृष्ण पक्षामध्ये एकादशीस पहाटेच्या वेळी श्रीगुरु-महाराजांना एक स्वप्न पडले.

होशंगाबादेच्या निवासस्थानात, श्रीगुरुमहाराज खाली सतरंजीवर बसलेले आहेत. स्वामीजी नेहमीप्रमाणे पलंगावर बसलेले आहेत. ते एकदम उभे राहिले. त्यांनी खांद्यावरची छाटी एका फटकाऱ्यात सारखी केली आणि ते गुरुमहाराजांच्या रोखाने हळूहळू येऊ लागले. आज स्वामी आपल्याकडे असे का येत आहेत हे त्यांच्या लक्षात आले नाही. पण आज स्वामींची दृष्टि आणि मुद्रा अतीव प्रसन्न व अत्यंत तेजस्वी दिसत होती. मुखावरील ओज झळकत होते. भस्मांकित भाल-प्रदेशाची भव्यता आणि भगव्या वस्त्रांची अग्नितुल्य कान्ति आसमंतात स्वर्गीय दिव्यत्व निर्माण करीत होती. हे सारे दृश्य काही विशेष कार्याचे सुचिन्ह वाटावे असेच होते. काय होत आहे ते पाहाण्याशिवाय अन्य काही संभवत नव्हते.

तेवढ्यात स्वामी श्रीगुरुमहाराजांच्या जवळ येऊन उभे राहिले. एकटक रोखून श्रीगुरुमहाराजांच्याकडे पाहात म्हणाले, "वामन! बैठो!! आजही तुम्हे दीक्षा

होगी! अब देखो तुम्हारी कुंडलिनी शक्ति जागृत होती है या नहीं।" स्वामींची ही दोन वाक्ये कानावर पडतात न पडतात तोंच श्रीगुरुमहाराजांचे भान हरपले. तेवढ्यात स्वामींचे आणखी एक वाक्य कानावर पडले. "आखे बंद करो!" हे म्हणता म्हणताच स्वामींनी श्रीगुरुमहाराजांच्या मस्तकावर हात ठेवला. मेरुदंडा-वरून-खालून वरच्या दिशेने हात फिरवला. शास्त्रीय परिभाषेत सांगावयाचे झाले तर मूलाधारापासून सहस्त्रारापर्यंतचा मार्ग मोकळा केला. तत्काळ श्रीगुरुमहाराजांच्या क्रिया सुरू झाल्या. क्रियांचा वेग क्षणाक्षणाने इतका वाढत चालला की, त्या वाढत्या क्रियांच्या आवेगातच त्यांची झोप संपली आणि त्यांनी डोळे उघडले.

स्वामी कुठे आहेत म्हणून श्रीगुरुमहाराजांनी समोर पलंगाकडे पाहिले. स्वामीजी पलंगावरच सिद्धासन घालून, छाटी पांघरून, ध्यानमग्न अवस्थेत बसलेले दिसले. तेव्हा श्रीगुरुमहाराजांच्या लक्षात आले की, एकूण हे स्वप्न आहे! त्यांनी घड्याळात पाहिले. उत्तररात्रीचा उत्तरार्ध होता तो. साडेतीन झाले होते. स्वप्नाची वेळ उत्तम होती. स्वप्नही उत्तम होते. यानंतर श्रीगुरुमहाराजांना झोप आली नाही. स्वप्नाच्या विचारतंद्रीत खूप विचारमंथन झाले. 'जे मनी ते स्वप्नी' या सूत्रावर विचार-तरंग तरंगले. सारेच स्वप्न आहे, तर मग स्वप्नाला खरे धरून बसणे कितपत योग्य आहे? समजा हे स्वप्न घडणाऱ्या कृतीचे सूचक असेल तर प्रचीति येईल. आपणहून या स्वप्नाचा कोणाही जवळ विचार कराच कशाला? या विचार-प्रपंचा-मुळे श्रीगुरुमहाराजांनी स्वप्नात पहाटे स्वामींच्याकडून दीक्षा झाली हे सत्य, स्वप्न समजून, दडवून ठेवले, तरी त्यांच्या मनातून तो प्रसंग क्षणभरही दडला जात नव्हता. इतर सर्व व्यवहार नित्याच्या सवयीने होत होते. पण आज पहाटेचे अपूर्व स्वप्न प्रत्येक क्षणी अपूर्व आनंद देत होते.

पहाटे चार साडेचारला श्रीगुरुमहाराज उठले. नित्याच्या क्रमाला लागले. स्वामी साधनेच्या समाधीत होते.

दयाळू परमेश्वराने आपल्या मायेच्याद्वारे आपल्या भक्ताला भविष्यत् शुभ-समाचार शुभस्वप्नाने सूचित केलेला होता.

"प्रसाद चिह्नानि पुरः फलानि"

"श्रीगुरुमहाराजांचे दीक्षास्थान"–होशंगाबाद



खर्रा घाटावरील–दत्तमंदिराजवळचे हणमंतराव फाळके यांचे घरातील महाराजांचे निवासस्थान



श्रीगुरुमहाराजांचे दीक्षास्थान–होशंगाबाद (दुरुन दृश्य)
( नर्मदेच्या महापुराने भग्न )

## नागपूरच्या आरोग्य मंदिराला स्वामींचा आशीर्वाद



॥ श्री हरिः शरणम् ॥

श्री गोविन्द गंगाधर पराण्डे आयुर्वेदाचार्य स्थापित आरोग्य मन्दिर मैं [illegible] निरीक्षण किया. यह आरोग्य मन्दिर स्त्री पुरुष बालक के स्वास्थ्य रक्षण के अनुकूल स्थान है. सब प्रकार पुरुषार्थ संपादन के मुख्य साधन शरीर है, स्वास्थ्य रक्षण [illegible] संभव है. श्री पराण्डे के आरोग्य मन्दिर में [illegible] आयुर्वेदीय साधन [illegible] तथा योगशास्त्र के आसन मुद्रा तथा षट्कर्म के अभ्यास द्वारा [illegible] स्वास्थ्य रक्षण का प्रयत्न चल रहा है. इन सब उपायों से रोगियों के रोग निवृत्ति तथा स्वस्थों का स्वास्थ्य रक्षण उत्तम रूपसे होता है. वर्तमान समय प्रायशः मनुष्य [illegible] मनोदौर्बल्य भी अधिक हो रहा है. इस सब कारणों से मनुष्य समाज के [illegible] अवनति हो रही है. [illegible] जनताको [illegible] के समय पराण्डे के स्थापित आरोग्य मन्दिर जैसी संस्थाका विशेष प्रयोजन है. इसलिये [illegible] जनता के स्वास्थ्य रक्षण के लिये प्रयत्न नहीं किया जायेगा तो राष्ट्र तथा समाज की हानि अवश्य भावनीय है. सब प्रकार [illegible] साध्य है. इस नीति के अनुसार आरोग्य मन्दिर के कार्य निर्वाह के लिये [illegible] हो रहा है. अतः इस राष्ट्र हित कार्य के लिये लक्ष्मी के [illegible] तथा सरकार [illegible] से साहाय्य करके महान पुण्य तथा यश को बढ़ाने [illegible] आशा है. परमेश्वर इस संस्था के तथा संस्था के स्थापक के सर्वप्रकार हित संपादन करके संरक्षण करे ऐसा मैं आशीर्वाद देता हूं. इति शिवम्.

स्वामी लोकनाथ तीर्थ



होशंगाबाद–दत्तमंदिरासमोरच्या औदुंबराचा पार, स्वामी व महाराज येथे रमले!

# श्रीगुरुमहाराजांचा दीक्षा प्रसंग

**" हें असो दिठी जयावरी झळके। की हा पद्मकरू माथा पारुखे। तो जीवचि परि तुके। महेशासी ॥ "**

—ज्ञानेश्वरी १० : ३१

**" ऐसा मियां आखिला होसी। तेथ माझियाचि स्वरूपा पावसी। हे अन्तःकरणीचे तुजपासी। बोलजित असे ॥ "**

—ज्ञानेश्वरी ९ : ५१९.

इ. स. १९२२ हे वर्ष श्रीगुरुमहाराजांच्या जीवनातील प्रचंड उलाढालींचे वर्ष होऊन गेले. साऱ्या आयुष्यात कधीही घडल्या नाहीत अशा विशेष गोष्टी या वर्षात घडल्या. पैकी पहिली गोष्ट अशी की, श्रीगुरुमहाराज इ. स. १९०७ सालापासून दरवर्षीच्या गुरुद्वादशीस श्रीक्षेत्र श्रीनृसिंहवाडीस जात असत. ही गुरुद्वादशीची वाडी-वारी आयुष्यभरात कधीही श्रीगुरुमहाराजांनी चुकविली नाही. स्वीकारलेल्या व्रताचे कटाक्षाने पालन करण्याचा पक्का कटाक्ष त्यांचा होता. इ. स. १९४० मध्ये श्रीगुरुमहाराज या गुरुद्वादशीच्या सुमारास श्रीक्षेत्र काशीस स्वामींच्याजवळ होते. पण श्रीगुरुद्वादशीसाठी ते काशीहून वाडीस आले व उत्सव झाल्यावर परत काशीला गेले. पण वाडी सोडली नाही. असे प्रसंग सांभाळले म्हणून तर त्यांच्या निश्चयाला महामेरुपण आले आहे. इतके असले तरी त्यांची इ. स. १९२२ ची गुरुद्वादशी वाडीस झाली नाही. ते हुशंगाबादेसच राहिले.

हुशंगाबादेस प्रत्यक्ष दत्तस्वरूपात गुरुदेवांची, स्वामी चिन्मयानंदांची भेट झाली होती. ही दुर्लभ भेट सहजसुलभ झाली. स्वामींचा मंगल आणि शीतल सहवास चैतन्याचा सतत अनुभव देत होता. श्रीगुरुमहाराजांची अंतःप्रेरणा स्वामींना सोडून जाण्याची आज्ञा देत नव्हती. या अपूर्व भेटीचे महत्त्व इ. स. १९२२ मध्ये इतके जाणवले नसेल पण त्यानंतर पन्नास वर्षांनी त्या घटनांचे अपूर्व महत्त्व आज स्पष्टपणे जाणवल्याशिवाय राहात नाही. बीजाचा प्रचंड वृक्ष झाल्यावर बीजारोपणाचे महत्त्व समजते.

श्रीस्वामीजी आणि श्रीगुरुमहाराज यांच्या भेटीला ' मणिकांचन योग ' किंवा ' समसमा योग ' एवढी मर्यादा पुरणार नाही. व्यष्टीपेक्षा समष्टीच्या उद्धाराचा हेतु

या अलौकिक भेटीत, विश्वनियंत्याचा असावा असे दिसते. शक्तिपातयोग विद्येच्या परंपरेतील योगाचार्य १००८ श्री प. प. श्रीगंगाधरतीर्थस्वामी महाराजांच्याकडून १००८ श्री प. प. श्रीनारायणतीर्थदेव स्वामीमहाराजांना मिळालेला आशीर्वाद मोठा सूचक आणि पूरक आहे.

"तुझ्यामार्फत भारताच्या कानाकोपऱ्यात या दिव्य विद्येचा प्रसार होईल. त्यासाठी तुझ्या हातात या दिव्य विद्यादानाचे अग्निकंकण बांधले आहे." हा परंपरेचा प्रवाह स्वामी श्रीचिन्मयानंदसरस्वती महाराजांच्या मार्फत श्रीगुरुमहाराजांच्यापर्यंत येऊन पोहोचला आहे. उज्ज्वल विद्या आणि उज्ज्वल गुरुत्व एकत्र आले म्हणजे कोंदण व रत्न या दोघांचे खरे मोल होते, खरे चीज होते. असे झाले तरच अद्भुत कार्य घडून येते. अशी ही अपूर्व भेट आहे.

पहाटे पडलेल्या स्वप्नाचा उल्लेख न करता श्रीगुरुमहाराजांचा नित्यक्रम सुरू झाला. स्वामी साक्षीभावाने सर्व काही पाहात होते. श्रीगुरुमहाराजांचे सकाळचे आन्हिक झाले. दुपारी भोजन झाले. थोडी विश्रांति इत्यादि झाले. नेहमीप्रमाणे संध्याकाळ झाल्यावर स्वामींच्याबरोबर ते फिरावयास निघाले. बरोबर श्री. शंकरकाका होते. गावातूनही चारदोन नित्याची मंडळी आली होती. सर्वजण स्वामींच्या अनुरोधाने चालू लागले. ते नर्मदेच्या तीराने हळूहळू चालले होते. रोज खूप फेरफटका करणारे स्वामीजी आज मध्येच अचानकपणे म्हणाले, "आज घूमना बस्स हुआ। अब घर जायेंगे।" सर्वांना वाटले आज स्वामींची प्रकृति ठीक दिसत नाही. स्वामींच्या इच्छेप्रमाणे सर्वजण परत फिरले. गावातील मंडळी आपला रस्ता आल्यावर स्वामींना वंदन करून निघून गेली. श्री शंकरकाका आणि श्रीगुरुमहाराज स्वामींच्यासह आपल्या निवासात आले. आज स्वामी लवकर आल्याचे उमामातोश्रींनाही जाणवले

स्वामी पलंगावर बसले. श्रीगुरुमहाराज आणि शंकरकाका स्वामींच्या समोर खाली टाकलेल्या सतरंजीवर बसले. श्रीगुरुमहाराजांनी नित्याच्या सवयीप्रमाणे सायंकाळी फिरून आल्यावर आईला, देवाला व स्वामींना नमस्कार केला. आज लवकर फिरून परतल्यामुळे सायंसंध्यादि आह्निकाला अवकाश होता. उमामातोश्री, देवापाशी दिवा, उदबत्ती लावून, जप करीत एका बाजूला बसल्या होत्या. आज रोजच्यापेक्षा स्तब्धताच अधिक होती. विशेष बोलणे चालणे होत नव्हते. आज स्वामींनी श्रीगुरुमहाराजांची विचारपूस सुरू केली.

स्वामीजी— वामन ! प्राणायामके अभ्याससे क्या लाभ होता है ?

श्रीगुरुमहाराज— शरीर हलके वाटते. यापेक्षा विशेष नाही.

स्वामीजी— जिस उद्देशसे यह प्राणायामका अभ्यास शुरू किया क्या उससे शक्ति कुंडलिनी जागृत हुई या नहीं ?

श्रीगुरुमहाराज— अजून नाही.

स्वामीजी— कितने कष्ट उठाते हो इसीलिये ? बहुत सहनशील हो तुम। मुझे तुम्हारी दया आती है। कितने दिन ये करते रहोगे ?

श्रीगुरुमहाराज— आपल्या कृपेवर अवलंबून आहे. मला येईल का तो अनुभव ?

स्वामीजी— अनुभव क्यों नहीं होगा ! जरूर होगा। सूरज देखनेके लिये दियेकी क्या जरूरत ? अभी अनुभव लो। आँखे बंद करो !

स्वामींचे वाक्य संपण्याच्या आतच श्रीगुरुमहाराजांना शक्तिसंचाराने बेभान करून टाकले होते. ठिणगीला वाऱ्याचे साहाय्य मिळताच क्षणात साऱ्या वनप्रदेशात वणव्याचे लोळ उठावेत त्याप्रमाणे झाले. चालू असलेल्या या कठीण तपश्चर्येच्या फळाला फक्त श्रीगुरुकृपारूपी शीतल वायुलहरीची गरज होती. ती मिळताक्षणीच श्रीगुरुमहाराजांच्या शरीरात शक्तिसंचाराने एकच कल्लोळ उडवून दिला. विक्राळ गर्जना करणाऱ्या मेघमालांना क्षणार्धात चिरून टाकणाऱ्या तळपत्या विद्युल्लतेने जणू आकाशच फाडून टाकावे असा प्रचंड शक्तिसंचार झाला. मुसळधार पर्जन्यवृष्टीच्या ओघवत्या वर्षावाने सारी पृथ्वी जलमय करून टाकावी, तसे झाले. पर्वतप्राय उसळणाऱ्या सागरी लाटांनी आकाश–पाताळ एक करून टाकले. साऱ्या ब्रह्मांडाला घुसळून टाकणारी महान् शक्ति, आज स्वामीकृपेने, श्रीगुरुमहाराजांची, जागृत झाली होती. हे गुरुकृपेचे देणे असते. येथे इमारत फळाला येते. जागृत झालेली ही शक्ति दाबून दबणारी नव्हती.

वास्तविक अलीकडे सुरू केलेल्या प्राणायामाच्या अभ्यासाने श्रीगुरुमहाराजांची प्रकृति फार नाजूक झाली होती. शरीर फुलासारखे कोमल झाले होते. इतकी मोठी हालचाल करण्याची कुवत त्यांच्या शरीराची नव्हती. अशा स्थितीत सारे शरीर

इकडून तिकडे घुसळले जात होते. चक्राकार गतीने गरगर फिरत होते. पद्मासनांत पक्क्या झालेल्या आसनासहित सारे शरीर जागच्या जागी प्रचंड उसळी घेऊन पडत होते व आपटत होते. अक्षरशः जमिनीपासून १॥–१॥ फुटाची उसळी सारे शरीर घेत होते. श्वासोच्छ्वासाची गति लोहाराच्याही भात्याला मागे सारण्याइतकी तीव्र झाली होती. श्रीगुरुमहाराज यां साऱ्या क्रिया स्वयंवेद्य अनुभूतीच्या डोळ्यांनी पाहात होते. या साऱ्या क्रिया अनायास व आतून आपोआप स्वाभाविक होत होत्या. भस्त्रिकेचा जोर व लय नागाच्या फूत्काराप्रमाणे होता. घूर्णा व मानेची हालचाल चक्रीवादळाप्रमाणे होती. शरीराची आदळआपट भूकंपाची आठवण देणारी होती. शक्तिसंचाराचे हे स्वरूप संत कबीरांच्या दोह्यात फारच समर्पक असे आलेले आहे.

**गगन गरजी, बरसै अमी, बादल गहीर गभीर ।**
**बहु दिसी दमकै दामिनी भीजै दास कबीर ॥**

"आकाशात प्रचंड ढग गरजले. अमृताचा वर्षाव झाला. विजांच्या लख-लखाटांनी दशदिशा प्रकाशल्या आणि दास कबीर हे घामाने डबडबून ओलेचिंब झालेले आहेत."

श्रीगुरुमहाराजांच्या क्रिया याच तीव्रतेच्या होत्या. अशा स्वरूपाची ही पहिली बैठक, एक तासभर, अत्यंत जोरात झाली. ज्या शक्तिजागृतीसाठी एवढी धडपड आणि धावपळ केली, ती केवळ एका निमिषार्धाच्या कृपाकटाक्षाने, जागृत होऊ शकते हा अभूतपूर्व, असामान्य अनुभव आज श्रीगुरुमहाराज प्रत्यक्ष अनुभवीत होते. सद्गुरु-कृपेचे सामर्थ्य अगाध नि अतर्क्य आहे हेच खरे.

**प्रणव वाचक श्वासोच्छ्वास तोचि तारक उपदेश ।**
**परि हे गुरुकृपेचे देणे विरळा भाग्यवंत जाणे ॥**

श्रीगुरुमहाराजांना आज काय मिळाले याची पूर्ण जाणीव होती. श्रीगुरुमहाराजांची दीक्षा मातोश्री उमाबाईंच्या साक्षित्वाने झाली. प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांनी भाद्रपद शु। १४, अनंत चतुर्दशीच्या शुभदिनी, पवनीच्या चातुर्मासात याच मातेच्या साक्षीने, तिच्या या पुत्राला मंत्रोपदेश दिला होता. गुरु आणि शक्ति मातृस्वरूपी असते, त्याची ही साक्ष आहे. तसेच श्रीनर्मदामातेचे तीर हीच साक्ष देत आहे. ज्या नर्मदामातेने प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी-

महाराजांना गरुडेश्वरी आपल्यामध्ये सामावून घेतले त्याच नर्मदामातेने थोड्याशा प्रवाहकालानंतर प. प. श्रीचिन्मयानंद सरस्वती स्वामी महाराजांना होशंगाबादेवरील आपल्या तटावर आणून, तेथे गुरुमहाराजांना पाठवून, परस्परांची अपूर्व भेट घडवून, गुरुशिष्यांचा झालेला वियोग पुनरपि जोडून दिला. भक्तपुत्राला तृप्त केले. कृतकृत्य केले. असा हा अपूर्व आणि अद्‌भुत प्रसंग होता.

श्रीगुरुमहाराजांचा आनंद शब्दातीत होता. त्यांचा तो आनंद योग्य शब्दात आणून दाखविण्याचे ठरविले तर प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांनी लिहिलेल्या अभंगवाणीतून सांगणे औचित्यपूर्ण होईल :—

**आजि आनंद आनंद मनीं भरला पूर्णानंद ॥१॥**
**वाचे बोलता तो न ये बुद्धिबोध स्तब्ध राहे ॥२॥**
**चिन्मयानन्द सद्‌गुरुरूपा पाहता हरल्या जन्मखेपा ॥३॥**
**तया माझा नमस्कार जेणे हरलो आपपर ॥४॥**
**ते हे वासुदेवचरण हृदयी धेता झालो धन्य ॥५॥**

श्रीगुरुमहाराजांची ही साधनेची पहिली बैठक पूर्ण तासाची झाली. श्री शंकरकाका जवळच बसले होते. ते ही तीव्र संवेदनांची बैठक पाहून अवाक् झाले. मातोश्री उमाबाईंनाही आश्चर्याचा धक्काच बसला. श्रीगुरुमहाराजांनी डोळे उघडले. समोर पलंगावर श्रीस्वामीजी बसलेले होते. त्यांनी तेथूनच विचारले, "क्यों वामन? हुआी कुंडलिनी जागृत? बस! धन्य हो! तुम्हारा काम हो गया! बहुत अच्छा साधन हुवा।"

स्वामींच्या शब्दांनी श्रीगुरुमहाराज अधिकच संतुष्ट झाले. सद्‌गुरूकडून दीक्षा होताना हार नाही, नारळ नाही याची जाणीव त्यांना झाली. पण तेथे त्यावेळी कशाचीच सोय नव्हती. ते जागेवरून उठले आणि स्वामींच्या चरणावर मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार केला. कृतज्ञतेने भारावलेल्या हृदयातून शब्द बाहेर येत नव्हता. पण घट्ट धरलेल्या श्रीचरणांवर बराच काळ ठेवलेले मस्तक हृदयाचे सर्व भाव सांगत होते. स्वामींनी श्रीगुरुमहाराजांची पाठ थोपटली, मस्तक कुरवाळले आणि म्हणाले, "उठो वामन! तुम्हारा कल्याण हो गया!" आज श्रीगुरुमहाराज अशा दिव्य धुंदीत होते की ते शब्दही बोलू शकत नव्हते. स्वामीसुद्धा अशा दिव्य आनंदात होते की, त्यांच्या जवळच्या रत्नांची पारख नि मोल करणारा अपूर्व

रत्नपारखी मिळाला होता. आता या विद्येचे खरे चीज होणार याची जाणीव होत होती. स्वामींना आज कर्तव्यसंपन्न पुत्रप्राप्तीचा आनंद होत होता. म्हणून तेही स्तब्ध होते. सर्व आनंद शांत वातावरणात शांतपणे वावरत होता.

ती रात्र ओलांडली. दुसऱ्या दिवशी पहाटे चारला स्वामींच्याबरोबर श्रीगुरु-महाराजही उठले. प्रातर्विधि व अजपासंकल्प केल्यावर मातोश्रींना नमस्कार केला. स्वामींनाही नमस्कार केला आणि श्रीगुरुमहाराज स्वामींच्यासमोर साधनेस बसले. आदल्या दिवशी सायंकाळी ज्या उत्कटतेने आणि तीव्रतेने साधनेची बैठक झाली तशीच उत्तम बैठक पहाटेही झाली. स्वामींना साधनेची ही तीव्रता पाहून ज्ञानसाधन मठात, परमगुरुदेव श्रीनारायणतीर्थदेवस्वामींच्या सान्निध्यात स्वतः स्वामी व त्यांचे गुरु प. प. श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थस्वामी महाराजांच्या तीव्र साधनेच्या बैठकी आठवल्या.

याप्रमाणे ८।१० दिवस रोज सकाळ संध्याकाळ स्वामींच्या सान्निध्यात साधनेचा अभ्यास श्रीगुरुमहाराज करीत होते.

अशा अपूर्वतेचे वर्ष इ. स. १९२२ हे होते.

# गुरुशिष्यांची छोटी तीर्थयात्रा

श्रीगुरुमहाराजांना दीक्षा दिल्यावर स्वामीजी संतुष्ट झाले होते. तर कुंडलिनी जागृतीच्या अनुभूतीने श्रीगुरुमहाराजांना अत्यानंद झाला होता. ज्या ईशप्रेरणेने स्वामींना ज्यासाठी हुशंगाबादेस पाठविले होते, ते कार्य झाले होते. श्रीगुरुमहाराजांना जे मिळवावयाचे होते तेही येथे हुशंगाबादेत मिळाले होते. यानंतर एक आठवडा सर्वांचा मुक्काम येथेच होता. आता परत बार्शीला जाताना जवळपासच्या तीर्थक्षेत्रांचे दर्शन घेत घेत जावे असे श्रीगुरुमहाराजांनी योजिले स्वामींना सुद्धा या तीर्थक्षेत्रास चलण्याची विनंती केली.

स्वामीजी काय होत आहे याची वाटच पाहात होते. परमेश्वराच्या इच्छे-शिवाय झाडाचे पानही हालत नाही अशी त्यांची दृढ धारणा होती. या धारणेने त्यांच्या आयुष्यातील प्रत्येक क्षण खर्ची पडत होता असे होते म्हणून त्यांनी श्रीगुरुमहाराजांच्या बरोबर जवळपासच्या तीर्थयात्रेला जाण्यास नकार दिला नाही. स्वामीजी आपल्या बरोबर येतात हे समजताच त्यांना समाधान वाटले. या प्रवासात स्वामीजी, शंकरकाका, श्रीगुरुमहाराज व त्यांच्या आईसाहेब एवढी मंडळी होती. प्रथम हे सर्वजण औरंगाबादेस गेले. तेथून बैलगाडीने दौलताबादेस गेले. महाराष्ट्रीय संत श्रीएकनाथांचे गुरु जनार्दनस्वामी यांच्या स्थानाचे दर्शन व त्यांच्या संबंधीची माहिती स्वामींना प्रथम समजली. नंतर वेरूळ, अजिंठा या कलाप्रसिद्ध स्थानांकडे ही मंडळी गेली. तेथील शिल्प व चित्रकला पाहून स्वामींना आनंद झाला. स्वामींच्यामध्येही मार्मिक रसिकता असल्याचे पाहून श्रीगुरुमहाराजांनी आपल्या चित्रकलेची माहिती थोड्या संकोचाने दिली. वेरूळवरून ही मंडळी स्वामींना घेऊन घृष्णेश्वर या ज्योतिर्लिंगाला गेली. ही सिद्धभूमि असल्याने स्वामी या ठिकाणी रमले. येथे सर्वांच्या साधनेचे अनुभव तीव्रतम झाले. स्वामींच्या इच्छेप्रमाणे

घृष्णेश्वरच्या प्रशांत वातावरणात २।३ दिवस मुक्काम केला. येथून स्वामी, शंकरकाका आजेगावकर यांच्या हिंगोली गावी आले.

सर्वांनी हिंगोलीला दोन दिवस मुक्काम करून चांगली विश्रांति घेतली. शंकर-काकांनी मोठ्या श्रद्धाभक्तीने स्वामींचे आदरातिथ्य केले. नंतर पुन्हा हे चौघेजण बैलगाडीने औंढ्यानागनाथास जाऊन शिवाचे दर्शन घेऊन परत हिंगोलीस आले. बैलगाडी शंकरकाकांच्या घरची होती. हिंगोलीला श्रीदत्तात्रेयांचे नवीन मंदिर नुकतेच झालेले होते. मार्गशीर्ष महिना होता. शंकरकाका व श्रीगुरुमहाराज हे दत्तभक्त असल्याने श्रीगुरुचरित्र सप्ताह व श्रीदत्तजयंती स्वामींच्या सान्निध्यात व्हावी म्हणून येथे १०।१५ दिवसांचा मुक्काम सर्वांनी केला. श्रीदत्तजयंतीचा उत्सव मोठ्या समारंभाने साजरा झाला. ज्यांच्यावर आपण अनुग्रह केला ती ही मंडळी मोठी श्रद्धावान, आचारसंपन्न आणि शास्त्रनिष्ठ आहेत हे प्रत्यक्ष पाहून स्वामींना फार संतोष झाला. स्वामींच्या उपस्थितीने सारे वातावरण चैतन्यमय झाले होते. श्रीदत्तजयंतीचे पारणे अन्नसंतर्पणाने झाले.

या उत्सवानंतर श्रीगुरुमहाराज आईंना घेऊन बार्शीला गेले. जाता जाता त्यांनी पूर्णा, पिंपळी, गंगाखेड, परळीवैजनाथ आणि अंबेजोगाई या ठिकाणांना धावती भेट दिली. स्वामीजी मात्र काही दिवस हिंगोलीला राहिले. हिंगोलीला असताना शंकरकाकांचे बंधू दत्तोपंत यांनी स्वामींच्या सहवासाचा खूप लाभ घेतला. त्यांची भरपूर सेवा केली. दत्तोपंतांच्या सेवेवर संतुष्ट होऊन स्वामींनी त्यांना दीक्षा दिली स्वामींना हुशंगाबादेस जाण्याची इच्छा झाली. त्यांच्याबरोबर दत्तोपंत गेले. स्वामींच्या सेवेसाठी दत्तोपंत आजेगावकर २।४ महिने हुशंगाबादेस राहिले होते. इ. स. १९२३ मधील शिवरात्र व होळी पौर्णिमा येथे झाली. साधकांची ये-जा चालू होती. विशेष हे की, ज्यांच्यामुळे स्वामींचा परिचय श्रीगुरुमहाराज आदि सर्वांना झाला, त्यांना दीक्षाही झाल्या, परंतु दादासाहेब परांडे यांना मात्र अद्याप दीक्षा झालेली नव्हती. त्यांनी मागणी केली नव्हती व तशी इच्छाही व्यक्त केली नव्हती. त्यांना शास्त्रचर्चेची आवड मात्र मोठी होती. ते मधून मधून स्वामींच्या दर्शनास येत होते. स्वामीजीसुद्धा शास्त्र-चर्चेत मनसोक्त भाग घेत असत. स्वामीजींच्या प्रकृतीला एकांत व शांतता फार प्रिय असे. ते तासन् तास बसून राहात असत. शेवटी याच काळात दादासाहेबांनाही दीक्षा झाली.

आता स्वामींच्या खाण्यापिण्याची, राहाण्या झोपण्याची सारी व्यवस्था रावबहाद्दूर परांडे पाहू लागले. स्वामींना ते काहीही कमी पडू देत नसत. पथ्यपाण्याचा व आवडीनिवडीचा बारीक सारीक विचार करून सोय करीत असत. शक्तिपात साधन करणाऱ्यांच्या आहारामध्ये दूध–तूप अधिक प्रमाणात असावे हे दादासाहेबांनी ग्रंथातून वाचले होते. त्यानुसार ते सोय करीत असत. या काळात दादासाहेबांनी स्वामींची सेवा भरपूर केली. दादासाहेबांच्या बरोबर स्वामीजी अनेक ठिकाणी गेले. महिना महिना राहिले. रावबहाद्दुरांच्या कुटुंबातील सर्वांचा जवळून परिचय झाला. त्यांचे धाकटे बंधू श्री. गोविंदराव आणि वासुदेवराव यांनी पण स्वामींची सेवा केली. त्यांनाही पुढे दीक्षा झाली. पुढे लवकरच रावबहाद्दुरांची बदली अमरावतीस झाली. तेथे स्वामींना त्यांनी महिना दीड महिना नेले होते.

अमरावतीस स्वामी असताना एके दिवशी रावबहाद्दूर म्हणाले, “स्वामीजी! आपण आजपर्यंत जितक्या दीक्षा दिल्या आहेत त्या सर्वांमध्ये वामनरावजींच्यावर जेवढा विशेष सुपरिणाम दिसतो तेवढा कोणावरही दिसत नाही हे खरे आहे का? असे का?”

स्वामींनी उत्तर दिले. “होय, ते खरे आहे. कारण पूर्वसंस्कार बलवत्तर असल्याने आचरण अत्यंत शुद्ध राहाते. आणि शुद्धाचरण असल्याने शुद्ध शरीर व स्वच्छ मन शक्तिसंचारास फार अनुकूल असते. त्यामुळे विशेष अनुभव आलेले दिसतात.” रावबहाद्दुरांनी स्वामींचे हे म्हणणे श्रीगुरुमहाराजांना कळविले. त्याचबरोबर स्वामींची प्रकृति साधारण आहे. त्यांची पचनशक्ति खूप मंदावली आहे. हल्ली उपवास फार करतात. बार्शीहून श्रीगुरुमहाराजांनी स्वामींना पत्र पाठवून प्रकृतीची काळजी वाटते तरी दररोज विपरीत करणीचा अभ्यास होता होईल तेवढा करीत गेल्यास पचनशक्ति सुधारेल व प्रकृति ठीक राहील असे कळविले. त्याप्रमाणे स्वामी रोज १।१ तास विपरीतकरणी (शीर्षासन) करू लागले. स्वामींचा स्वभाव सरळ होता त्यांना कोणी काही सांगितले आणि त्यांना ते पटले म्हणजे लहान मुलासारखे सरळ ऐकत असत. हे आपल्या शिष्याने सांगितले असे त्यांना वाटत नसे.

एखाद्या गोष्टीच्या मागे लागल्यावर ते अगदी तुटून पडत. पाहिल्या दिवसापासून शीर्षासन एक एक तास करू लागले. शरीर आणि मन त्याच मार्गातले असल्यामुळे जमण्याची अडचण नसे. पण विशेष हे की २।४ दिवसातच प्रकृतीत

फरक पडू लागला. त्यांची पचनक्रिया सुधारली. भूक वाढली. गेल्या १५।२० दिवसात केलेली उपोषणे कमी झाली. दादासाहेबांनाही बरे वाटले आणि स्वामी शुक्रवार दिनांक १६ नोव्हेंबर १९२३ ला हुशंगाबादेस परत आले.

पुढे रावबहाद्दुरांचे स्नेही श्री. काशीनाथ विनायक फडके हुशंगाबादेस स्वामींच्याकडे गेले. त्यांचा मुक्काम महिना दीड महिना होता. त्यांनी मोठ्या श्रद्धेने स्वामींची सेवा केली. त्यांचेवर कृपा करून स्वामींनी काशीनाथपंतांना दीक्षा दिली. याच सुमारास पत्राने रावबद्दुरांच्या धाकट्या बंधूंना संकल्प दीक्षा दिली. ही दीक्षा दूरच्या व्यक्तीला संकल्प करून पत्रानेही देता येते हे या प्रसंगाने दिसून आले.

दक्षिणेकडे या कार्याची वाटचाल चालू होऊन वर्ष होत आले होते. स्वामींनी सुमारे १५।२० मंडळींना हा मार्ग दिला होता. या साधक मंडळींचे अनुभव व प्रगति त्यांच्या आसपासच्या मंडळींवर प्रभाव टाकीत होती.

श्रीगुरुमहाराज स्वामीजींचा आशीर्वाद घेऊन हिंगोलीहून निघाले. ते वाटेतील तीर्थक्षेत्रांना जाऊन बार्शीला आले होते. त्यांची शाळेची नोकरी पूर्ववत् सुरू झाली. पूर्वीप्रमाणे नित्य ठरलेले अनुष्ठान सुरू झाले. परंतु नवीन मिळालेल्या साधनेला अग्रहक्क देऊन नित्यक्रम सुरू झाला. भल्या पहाटे उठून प्रथम नव्या साधनेची बैठक होऊ लागली. साधनेची तीव्रता विलक्षण असे. या नित्यसाधनेने त्यांचा संपूर्ण दिवस अपूर्व आनंदात जाऊ लागला. विविध अनुभवाने रोजचे साधन नव्या उत्साहाने चाले. यामुळे स्वामींची आठवण प्रत्येक क्षणी होत असे. गुरुमहाराजांचे शरीर बार्शीत असे. पण मन मात्र स्वामींच्या ठिकाणी असे. अशीच स्थिति हुशंगाबादेस स्वामींची होत असे. अनेकांना दीक्षा दिली. आपले शिष्य केले. परंतु अंतःकरणाची ओढ श्रीगुरुमहाराजांचेकडे विशेषत्वाने असे. परस्परांचे ऋणानुबंध तसेच होते.

## स्वामींचे बार्शीत आगमन

स्वामीजी ठरवल्याप्रमाणे एक वर्ष हुशंगाबादेत राहिले. महाराजांनीसुद्धा ठरवून १ जानेवारी १९२४ ला स्वामींना पत्र पाठविले.

"आपल्या म्हणण्याप्रमाणे एक वर्ष पूर्ण झाले आहे. आता आपण जरूर बार्शीस यावे ही आग्रहाची प्रार्थना आहे." स्वामींनी उलट टपाली ३ जानेवारीला त्यांना उत्तर दिले.

" ———— सध्याचे बार्शीचे हवापाणी मला अनुकूल आहे असे आपणांस वाटत असेल तर आपल्या सोयीने मला भाडेखर्चासाठी पैसे पाठवावेत. मनमाडवरून बार्शीची गाडी केव्हा आहे ते मला कळवावे. तुमची तीव्र इच्छा आणि पांडुरंगाच्या दर्शनाची मला लागलेली ओढ यामुळे मी बार्शीला येण्याचे ठरवीत आहे."

स्वामींचे पत्र श्रीमहाराजांच्या हातात पडले. पत्र वाचून त्यांना फारच आनंद झाला. स्वामींच्या आणण्याच्या सोयीला ते लागले. मनमाडवरून ते एकदम बार्शीला आले तर प्रवासाचा ताण त्यांना पडेल. भोजनाभावी बराच मोठा काळ काढावा लागेल. स्नान संध्यादि आह्निकामध्ये अंतर पडेल. गाडी सुद्धा मनमाड–बार्शी अशी सलग नाही. दौंडला गाडी बदलावी लागेल. तेथे आपला भास्कर भागवत विद्यार्थी आहे. धार्मिक वृत्तीचा आहे. आपल्या सहवासातला आहे. त्याचेकडे स्वामींची सोय सहज होईल. संन्यासाश्रमाचे नियम त्याला माहीत आहेत. असा विचार महाराजांच्या मनात आला आणि त्यांनी भास्करराव भागवतांना पत्र लिहिले. त्यात स्वामींचे वर्णन लिहिले. ते दण्डीस्वामी नाहीत पण त्यांचा कमंडलु मात्र विशेष डौलदार आहे हे लिहून कमंडलूचे चित्रही पत्रात काढून दाखविले होते. स्वामी तरुण तेजस्वी आहेत, मनमाड गाडीने येणार आहेत. त्यांना दौंडला उतरवून घ्यावे. घरी न्यावे. स्नान, भिक्षा व विश्रांतीची व्यवस्था करावी. आणि त्यांना घेऊन बार्शीला यावे.

इकडे स्वामींनाही सविस्तर पत्र पाठविले. गाडीची वेळ कळविली. दौंडला उतरावे. स्नान, भिक्षा व विश्रांतीची व्यवस्था भास्कर भागवत हे माझे विद्यार्थी करतील. त्यांना तसे कळविले आहे. ते दौंड स्टेशनवर आपणांस उतरवून घेण्यास येतील. सोबत भाडेखर्चासाठी म. ऑ. केलेली आहे. सध्या येथील हवापाणी आपणांस अनुकूल असे उत्तम आहे. इत्यादि सारे काही श्रीगुरुमहाराजांनी स्वामींना कळविले आणि स्वामींच्या येण्याचे क्षण मोजू लागले.

ठरल्याप्रमाणे स्वामींनी शुक्रवार दि. ११-१-२४ ला हुशंगाबाद सोडले. तसे बार्शीला पत्र टाकले. दौंड स्टेशनवर दुपारी गाडी आली. स्वामी उतरले. कोणी आले का हे पाहणार तोंच एक तरुण पुढे उभा राहिला. त्या तरुणाला पाहताच स्वामी म्हणाले, "कौन? भाष्कर भागवत?" भास्कररावांनी दुरून स्वामींना पाहिले व ते त्यांचेकडे आले. चित्राप्रमाणे कमंडलु दिसला. खात्री

झाली म्हणून भास्करराव पुढे येऊन उभे राहिले. नमस्कार केला. त्यांची वळकटी आपल्या हातात घेतली व स्वामींना घेऊन भास्करराव घराकडे निघाले. स्वामी बंगाली म्हणून 'भाष्कर' उच्चार करीत होते. पण ते शब्द भास्कररावांच्या कानाला गोड लागत होते.

भास्कररावांनी स्वामींच्या स्नान आह्निकाची व्यवस्था केली. भिक्षेची व्यवस्था स्वतंत्रपणे केली. स्नान करून सोवळयात स्वैंपाक करविला. भिक्षेची जागा गायीच्या शेणाने सारवून घेतली. व्यवस्थेचा नीटनेटकेपणा पाहून स्वामी संतुष्ट झाले. भिक्षा झाली. विश्रांति झाली. ठरल्याप्रमाणे भास्करराव स्वामींना घेऊन बार्शीला आले.

बार्शी स्टेशनवर महाराज स्वामींच्या स्वागतासाठी हार घेऊन उपस्थित होते. बरोबर वैद्यमास्तर, प्रल्हादशास्त्री, अण्णासाहेब मुगुटकर वकील, नारायणराव पुरंदरे इ. ८।१० मंडळी होती. स्वामी येताच महाराजांनी हार घातला. पायावर डोके ठेवून नमस्कार केला. त्यांच्याप्रमाणे इतरांनीही नमस्कार केला. मोठ्या आनंदाने सर्वजण स्वामींना घेऊन बार्शीत आले.

स्वामींच्या दर्शनाला बार्शीकर श्रद्धाळू सज्जनांची रीघ लागली. हा सारा परिवार महाराजांचा होता. सर्वजण त्यांचे होते. आज बार्शीत "मास्तरांचे" गुरुदेव आले हा एकच विषय सर्वांच्या तोंडी होता. बार्शीमध्ये सर्वजण महाराजांना "मास्तर" म्हणून ओळखीत होते. त्यांचे गुरु आले. कुंडलिनी शक्ति जागृत करणारे महापुरुष आले. बंगाली स्वामी चिन्मयानंद सरस्वती महाराज आले. ते तरुण स्वामी पाहून सर्वांना कुतूहल वाटत होते.

स्वामींच्या दर्शनासाठी सोलापूरहून बापू कुबडे आले तर औंढीहून व्यंकटेश कुळकर्णी आले. बार्शीमधील उत्तरेश्वर क्लबातील डॉ. बाळासाहेब सहस्रबुद्धे, तात्यासाहेब टिळक, चिंगु अबा दिवटे वकील, बावडेकर बुवा, दामुअण्णा रायचुरकर इत्यादि अनेक मंडळी आली. या सर्वांनी स्वामींचे दर्शन घेतले. अनेक स्त्रिया आल्या, मुली आल्या, मुले आली, पुरुष आले. "वामन"चा हुशंगाबादेत जो पैद्ध दिसू शकला नाही तो आज स्वामीजी बार्शीत पहात होते. स्वामींना "ते" शब्द आठवत होते– "तुझ्या हातात हा दिव्य स्फुल्लिंग दिला आहे. त्याचा भारतभर प्रसार होणार आहे" त्याची ही चुणुक होती. स्वामीजी प्रसन्न मुद्रेने व शांतपणे पहात होते. नमस्कार

स्वीकारीत होते. आशीर्वाद देत होते. आज बार्शीत जणू दिवाळी साजरी होत होती. " मास्तरांच्या " मुळे बार्शीच्या सज्जनांचे भाग्य उदयास आले होते.

स्वामीजी महाराजांच्या घरात आले त्यावेळी उमाआईंनी व भगिनी गोदावरी यांनी त्यांना साष्टांग नमस्कार केला. आईंना हुशंगाबादेच्या आठवणी होत होत्या. गोदुअक्कांना मात्र स्वामींचे हे प्रथम दर्शन होते.

स्वामींचे बार्शीतील पहिले वास्तव्य सुमारे दोन अडीच महिने होते. त्या काळात त्यांच्या संबंधात आलेल्या व्यक्तींपैकीं दोघांचा परिचय आपणांस झाला म्हणजे स्वामींशी आलेल्या संबंधातील गोष्टींची उकल होण्यास मदत होणार आहे.

## स्वामींचे बार्शीतील वास्तव्य

वेदमूर्ति श्री प्रल्हादशास्त्री जोशी म्हणजे बार्शीचे त्याकाळचे भूषण होते. त्यांचे जीवन आदर्श जीवन होते. सरळ स्वभावाचे, विनोदी वृत्तीचे, मिळून मिसळून वागणारे असल्याने ते लोकप्रिय होते. वेदान्त, धर्मशास्त्र यासारख्या गूढ शास्त्रांचे जाणकार असल्याने त्यांच्या पांडित्याचा दबदबा असे. ते उत्तम कीर्तनकार व प्रवचनकार असल्याने त्यांच्या ज्ञानाची जाणीव बार्शीकर मंडळींना चांगली होती. बार्शीच्या हायस्कूलात उत्तम संस्कृत शिक्षक म्हणूनही त्यांनी नावलौकिक मिळविला होता. महाराज त्याच शाळेत चित्रकला शिक्षक होते. परंतु ' समानशीले ' न्यायाने धार्मिक प्रवृत्तीचा ' समानधर्म ' उभयतांचा असल्याने महाराजांचा आणि प्रल्हाद-शास्त्रींचा संबंध घरगुती स्वरूपाचा होता.

बार्शीतील आणखी एक महत्त्वाची उल्लेखनीय व्यक्ति म्हणजे वैद्यमास्तर. ते मुख्याध्यापक होते. पण शांत, विचारी स्वभावाचे असल्याने ते सर्वांचे सल्लागार व मार्गदर्शक होते. महाराजांच्या जीवनात वैद्य मास्तरांचे स्थान ज्येष्ठ बंधूंसारखे होते. अगदी घरगुती, खाजगी गोष्टींपासून नोकरी, अध्यात्मापर्यंत सर्व बाबतीत महाराज वैद्यमास्तरांशी विचारविनिमय करीत असत. त्यांची प्रवृत्ति अत्यंत निस्पृह होती. ते वारकरी संप्रदायाचे होते. पंढरीचा पांडुरंग हे त्यांचे दैवत होते. ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी ही त्यांची चिंतनिका होती. एका ज्ञानेश्वरीत वेदान्त, धर्म व अध्यात्म विषयातील साऱ्या सूत्रांचा अंतर्भाव आहे हे सप्रमाण सांगणाऱ्यांपैकी ते होते. त्यांना योगमार्गाची आवड होती म्हणून तर वामनरावांच्या पाठोपाठ पुष्कर व हुशंगाबादेस गेले होते.

त्यांचा स्वामींशी परिचय हुशंगाबादेस झाला होता. पण एकादशीच्या पंढरीच्या वारी-साठी त्यांना तेथून लवकर निघावे लागले होते.

वैद्यमास्तर, प्रल्हादशास्त्री आणि महाराज यांच्या बैठकीत बसू शकतील अशी अनेक मंडळी बार्शीत होती. त्यांचा 'उत्तरेश्वर क्लब' होता. त्या निमित्ताने ही मंडळी एकत्र जमत. चर्चा करीत. उपनिषदे, "जीवन्मुक्तिविवेक" यासारख्या ग्रंथांचे सार्थ वाचन करीत. हे सर्वजण संध्याकाळी फिरावयास जात. अलीकडे हुशंगाबादेहून आल्यापासून स्वामींचा विषय वारंवार निघे. त्यांचा कुंडलिनी जागृत करणारा शक्तिपात योग ऐकून सर्वांचे कुतूहल वाढले होते. महाराजांचे साधन नित्य-नियमित सुरू झाले होते. त्याचा परिणाम त्यांच्यासुद्धा इतरानांही जाणवत होता.

बार्शीची सर्व मंडळी महाराजांना फार मानीत होती. त्यांचे प्रशस्त जीवन धर्मशास्त्राच्या आधारावर उभे होते. सिद्धान्ताप्रमाणे त्यांचा आचार होता. गेली ५।६ वर्षे सर्वजण त्यांना सतत पहात आले होते. त्यांच्याकडे त्यांचे गुरु आले ही एकच गोष्ट सर्वांना भक्तिभावाने लववीत होती. सर्वांच्या मनात स्वामींच्याबद्दल आदर व श्रद्धा अनंत पटीने जागृत झाली होती. या पार्श्वभूमीवर स्वामींचे व्यक्तिमत्व श्रेष्ठपणे, भव्यतेने आणि उदात्ततेने उठून दिसत होते. त्यांची निःसंदिग्ध निस्पृह वृत्ती तर त्यांच्या सद्गुणांचा शिरपेंच होता. स्वामींच्यामुळे महाराजांचे जीवन-सुवर्ण सुगंधित झाले होते.

या मुक्कामात स्वामींना महाराजांच्या विशाल परिवाराचा परिचय झाला. ही सर्व मंडळी अत्यंत सरळ, साधी, श्रद्धाळू आणि आदरातिथ्यप्रिय होती. अशा सत्प्रवृत्तींच्या मंडळीमध्ये स्वामीजी रमून गेले होते. बार्शीच्या सज्जनांनी आपल्या सेवाभक्तीने स्वामींना अनुकंपित केले होते. स्वामींनीही अबालवृद्धांवर प्रेमाचा वर्षाव केला होता. सर्वांची चौकशी करीत करीत सर्वांना आपलेसे करून टाकले होते. दोन अडीच महिने हा सहवास घडल्याने परस्परांचे स्नेहसंबंध दृढ झाले होते.

महाराजांचे सारे लक्ष स्वामींची प्रसन्नता राखण्याकडे होते. त्यांची स्वामींच्या सहवासात भल्या पहाटे नित्य साधना होत होती. या सान्निध्याचा महाराजांना खूप लाभ झाला. साधनेनंतर थोडा वेळ विश्रांति होई. मग महाराज स्वामींना स्नानासाठी देशपांडे यांच्या आडावर घेऊन जात. स्वतः पाणी काढून देत. स्वामींना स्नान घालीत. भरपूर पाण्याने स्वामींना संतोष होई. स्नानानंतर स्वामींच्या छाट्या महाराज

धूत असत. गावातील लोक हे दृश्य पाहून थक्क होत असत. ही दुर्लभ गुरुसेवा विलोभनीय होती. अशी तन्मयतेने केलेली, भावपूर्ण सेवा पाहून पाहणारा, भक्ति-प्रेमाने भारावून जात असे.

येथे बार्शीत असताना महाराजांच्या भगिनी श्रीमती गोदावरी यांना दीक्षा झाली. स्वामींची भिक्षा होण्यापूर्वी महाराज त्यांची पूजा करीत असत. त्यांच्या मस्तकावर तुलसीपत्र ठेवीत. आचमनासाठी हातावर पाणी देत. नंतर स्वामींना भिक्षेची प्रार्थना करीत. याप्रमाणे यथासांग कर्म हुशंगाबादेत होत होते तसेंच बार्शीमध्ये होत असे. यथासांग कर्माचे समाधान परिपूर्णपणे महाराज नेहमी घेत असत.

बार्शीच्या या मुक्कामात एक खग्रास चंद्रग्रहण आले होते. त्यावेळी नवीन दीक्षित झालेल्या साधकांसहित सर्वजण देशपांडे यांच्या वाड्यात स्वामींच्या समोर सामुदायिक बैठकीस जमले. ग्रहण लागताच स्वामींसह सर्वांनी स्नान केले. आणि स्वामींना वंदन करून सर्वांची साधना सुरू झाली. त्यावेळी सर्वांचे साधन उत्तम झाले. नेहमीपेक्षा ग्रहणाच्या पर्वकालातील साधनेची गति विशेष असल्याचा अनुभव सर्वांना आला. यावेळी स्वामींनी सांगितले की प्रत्येक ग्रहणामध्ये साधकांनी आपले साधन जरूर केले पाहिजे. यावेळी शक्तिसंचाराचा उत्तम अनुभव येत असतो. अनेक विक्षेपांचा नाश होण्यास मदत होते. प्रतिबंध दूर होतात. साधनेची गति वाढते व साधक पुढे जातो.

शनिवार, रविवार या सुट्टीच्या दिवशी अनेक साधक मंडळी एकत्र येत असत. स्वामींच्या सहवासात विविध विषयांवर चर्चा चाले. शंकांचे निरसन होत असे. मधून मधून होणाऱ्या विनोदाने वातावरणात मनसोक्त हास्याचे फवारे उडत. एखाद्या गूढ, गंभीर प्रश्नांची चर्चा होत असे. अशा बैठकीत प्रल्हादशास्त्री, वैद्यमास्तर, नारायणराव पुरंदरे, मुगुटकर वकील आणि महाराज आदि मंडळी नेहमी असत. यामध्ये एक वेदान्ती, एक योगी, एक भागवत संप्रदायी, तर एक आधुनिक चिकित्सक असे. रुचि-वैचित्र्य असले तरी सर्व भगवत्भक्त होते. श्रद्धाळू होते. जिज्ञासू होते. ही चर्चा चित्ताकर्षक असे. स्वामींच्या मधुर भाषेत, स्पष्ट विचारात सर्वांना मानसिक समाधान होत असे.

एकदा अशीच चर्चा चालू असताना एकाने विचारले " स्वामीजी आपण संन्यास

केव्हा घेतला ?" या प्रश्नासंबंधी बोलतांना स्वामींनी स्वतःसंबंधी एकही अक्षर न सांगता श्रीमत् आद्यशंकराचार्यांची माहिती दिली. याच वेळी 'जविनमुक्तिविवेक' ग्रंथाचा आधार देऊन खूप माहिती दिली. मुमुक्षु या एकमेव ग्रंथाच्या अध्ययनाने, चिंतनाने व मननाने परम स्थिति प्राप्त करून घेऊ शकेल. ही परम स्थिति आपले शक्तिपात साधन तीव्र गतीने देऊ शकते. या दिवशीच्या चर्चेत स्वामींनी वेदान्तातील अनेक सूत्रे उधृत केली. स्वामींचा अभ्यास व विद्वत्ता पाहून प्रल्हादशास्त्रींना स्वामींचा अधिकार मोठा असल्याचे जाणवले. सर्वांनाच त्या दिवशीच्या चर्चेने स्वामींनी आपली चुणुक दाखवून आश्चर्याचा धक्का दिला.

बार्शीच्या इतिहासात स्वामींच्या मुक्कामाचे दिवस म्हणजे अभूतपूर्व योगायोग होता. अनेक सज्जनांनी या संधीचा फायदा घेऊन स्वामींना आपल्या घरी नेले. त्यांच्या पुण्यपावन चरणकमलांच्या स्पर्शाने आपले घर पवित्र केले. कोणी स्वामींना पूजनासाठी तर कोणी भिक्षेसाठी आपल्या घरी नेले.

स्वामींच्या पूजेचे दृश्य अतिशय विलोभनीय असे. पूजा पाहणारा आपली सारी प्राणशक्ति डोळ्यात एकवटून ती दुर्मिळ स्वामीपूजा पहात असे. स्वामींची अशी पूजा प्रथम महाराजांनी हुशंगाबादेस केली. त्यावेळी ती एकांतात झाली. आता मात्र स्वामींची पूजा भक्तवृंदात, समारंभपूर्वक होत होती.

एखाद्या प्रशस्त परंतु बंदिस्त जागेत मध्यभागी उच्चासनावर व्याघ्राजीन किंवा मृगाजीन घातलेले आहे. त्यावर स्वामीजी प्रसन्न पण गंभीर मुद्रेने बसले आहेत. समोर पूजासाहित्य ठेवलेले आहे. नारळ, हार, प्रसाद एका तबकात बाजूला आहे. नीरांजन प्रज्वलित असून उदबत्तीच्या सुगंधाने वातावरण प्रसन्न केले आहे. सश्रद्ध यजमान हात जोडून स्वामींच्या समोर बसले आहेत. जवळ बसलेले उपाध्याय मंद स्वरात मंत्र म्हणून विधिपूर्वक पूजा सांगत आहेत. हा पूजेचा समारंभ पाहण्यासाठी घरातील इतर मंडळी, आलेले साधक व भक्त, भक्तियुक्त अन्तःकरणाने, उत्सुकतेने पहात बसले आहेत. स्वामींच्या स्वरूपात प्रत्यक्ष देवताच उपस्थित असल्याने घराला मंदिराची शोभा आलेली आहे. श्रीचरणांवर पुरुषसूक्ताच्या मंत्रोच्चाराने षोडशोपचार पूजा सुरू झाली आहे. सुगंधित द्रव्यें, उत्तम अत्तर, अष्टगंध, चंदन, गुलाबाची व मोगऱ्याची टपोरी टवटवीत फुले, उत्तम मंजिऱ्या असलेली वैजयंती तुलसी इत्यादिंनी स्वामींचे दिव्य देहावर पूजा चढविली जात आहे.

निशिगंध, कुंद इत्यादि फुलांचा भरगच्च हार स्वामींच्या गळ्यात घातला आहे. सिद्धासनात स्थिर बसलेल्या स्वामींचे ते भव्य दर्शन भावपूर्ण अन्तःकरणे आपल्या हृदयात साठवून ठेवीत आहेत. स्वामींच्या मस्तकावर तुलसी मंजिरी व गुलाब पुष्प ठेवले आहे. विविध नैवेद्यांनी, फळांनी व पेढ्यांच्या प्रसादांनी भरलेली तबके स्वामींना समर्पण करण्यासाठी मंडलाकार ठेवलेली आहेत. नीरांजनादि दीप व धूप प्रज्वलित केले आहेत. श्रीफल, दक्षिणा आणि महावस्त्र स्वामींना अर्पण केले आहे. कापूर लावला आहे आणि "श्रीगुरुदेव दत्त" म्हणून आरतीसाठी सर्व-जण उभे राहिले आहेत. सर्वांच्या शरीरात चैतन्याचा संचार झाला आहे. श्रीगुरु-महाराजांची भावपूर्ण आरती होत आहे. हृदयातील भाव बंधमुक्त होऊन डोळ्यातून बाहेर पडत आहेत. सर्वांची शरीरे रोमांचित झालेली आहेत. आरतीनंतर मंत्र-पुष्पांजली होत आहे. सर्वजण आपापली पुष्पांजली स्वामींच्या चरणांवर अर्पण करून त्याच चरणांवर आपले मस्तक ठेवीत आहेत. कृतकृत्यतेच्या समाधानाने प्रसाद घेत आहेत. हा सारा समारंभ अविस्मरणीय होत आहे. अनंत जन्मींच्या पुण्याईची साकार चीति आहे. अशा पूजा बार्शीकरांनी केल्या आणि पाहिल्या.

स्वामीजी या प्रकाराकडे त्रयस्थाच्या भूमिकेतून पहात असत. साक्षीभाव ठेवून पहात असत. स्वामीजी अत्यंत निग्रही, संयमी आणि मौन प्रवृत्तीचे होते. या प्रसंगाचा उल्लेख कधीही त्यांच्याकडून होत नसे. पूजा करणारा किंवा पाहणारा मात्र अत्यानंदाचा क्षण आपापसात पुनःपुनः स्मरून ताजा करीत असे.

बार्शीच्या पहिल्या मुक्कामात स्वामींनी मुगुटकर वकील, नारायणराव पुरंदरे आणि श्रीमती गोदावरीताई (महाराजांच्या भगिनी) यांना दीक्षा दिली. वास्तविक श्री. प्रल्हादशास्त्री जोशी यांना यावेळी दीक्षा होईल असे सर्वांना वाटत होते. पण तसे घडले नाही. शास्त्रीबोवांनी दीक्षेसाठी प्रार्थनाही केली होती. परंतु स्वामींनी मला आतून प्रेरणा होत नसल्याचे सांगितले. सध्या नको पुढे पाहू असे सांगितले.

स्वामींना पंढरीच्या पांडुरंगाचे दर्शन घेण्याची इच्छा असल्याने तो कार्यक्रम योजला गेला.

## स्वामीजींचे पांडुरंग दर्शन

श्री. वैद्य मास्तरांचे जामात पंढरपूरचे रहिवासी. स्वामींची पंढरपुरातील व्यवस्था त्यांचेकडे केली होती. आधीच पत्रव्यवहार झाला होता. स्वामींच्याबरोबर वैद्यमास्तर आणि महाराज होते. २–४ दिवसांची सवड काढून ही मंडळी पंढरपुरास गेली होती. स्वामींना पांडुरंगाच्या विविध लीला सांगण्यात व पांडुरंगाच्या भक्तांच्या कथा सांगण्यात वैद्यमास्तर आणि महाराज यांचा वेळ कारणी लागत होता. स्वामींच्या वाचनात यासंबंधी थोडी माहिती येऊन गेली होती.

पंढरपुरात स्वामीजी आले. वैद्यमास्तरांच्या जामातांचेकडे मुक्काम केला. चंद्रभागेचे स्नान केले. मग ते भक्तशिरोमणि पुंडलिकाच्या मंदिरी गेले. तेथे त्यांना काशीच्या कुक्कुटमुनींचे स्मरण झाले. जीवनात परिवर्तन घडवून आणण्यासाठी सद्गुरूंची गरज असते हा विचार स्वामींनी येथे व्यक्त केला. नंतर रुक्मिणी व पांडुरंग यांच्या स्वतंत्र मंदिरात जाऊन स्वतंत्रपणे दर्शन घेतले. मंदिरात गर्दी नव्हती. दर्शन शांतपणे घेता आले. आचार्यांनी हे स्थान "महायोग पीठ" म्हटले आहे. येथे येणारा भक्त संचारित होऊन जातो. त्याच्या संवेदना संवेदित होतात. जाणीवेला जाण येते. अनुभूतीची चुणुक अनुभवता येते. हे स्पंदन येथे आल्यावर होते. येथून गेल्यावर संसाराच्या मायेत शिरताच ही जाणीव क्षीण होते. म्हणून तुकोबांनीं सांगितले की "पंढरीशी जा रे आल्यांनो संसारा"

स्वामीजींच्या वृत्तीत या जाणीवेने फरक पडला होता. त्यांची वृत्ती अंतर्मुख झालेली दिसत होती. त्यांनी चैतन्यप्रभूंची आठवण काढली. हे स्थान अत्यंत जागृत असल्याचा अनुभव सांगितला. सभामंडपात अखंड वीणा चालू होता. त्या वीणाधारी विठ्ठलभक्ताकडे स्वामी पहात होते. तो आपल्या आवाजात एक अभंग म्हणत होता. स्वामींनी अभंगाची एक ओळ ऐकली. "देह ही पंढरी। आत्मा पांडुरंग" स्वामींना अर्थ समजला. त्यांची मराठी भाषा नसून सुद्धा शब्द ओळखीचे वाटले. अर्थ अनुभवातला होता. संत तुकारामांच्या अभंगातील ही ओळ ऐकून त्यांना आनंद झाला. गाथा वाचण्याची इच्छा बोलून दाखविली. देवनागरी लिपी परिचयाची होती. शब्द अनुभवाचे होते. विचार वेदान्तातले होते. पंढरपूर ही संतांची बाजारपेठ. आत्मसुखाचा माल ते पांडुरंगाच्या साक्षीने लुटत होते. स्वामी या वातावरणाने संतुष्ट झाले.

महाराजांनी स्वामींना सभामंडपातून एका बाजूला नेले. एका काळ्या संगमरवरी मूर्तीकडे बोट दाखवून म्हटले "ही पहा एकमुखी दत्तात्रेयांची मूर्ति" स्वामींनी मूर्ति न्याहाळली. 'मालाकमण्डलु' 'डमरुत्रिशूले' आणि 'शंखचक्रे' ध्यान पाहून ते खूश झाले. असे ध्यान विशेष आढळत नाही. हा अभिप्राय दिला. मंदिराला प्रदक्षिणा घालत घालत स्वामी पुटपुटत होते "परब्रह्मलिंगं भजे पांडुरंगम्" या स्थानाला मोठी परंपरा आहे. आचार्यांनी या स्थानावर व देवतेवर स्तोत्र केले आहे. त्यापूर्वीपासून याचे आस्तित्व आहे. असे बोलत तिघेजण मुक्कामाकडे गेले.

दुपारी भोजन, विश्रांति व गप्पागोष्टी झाल्या. संध्याकाळी फिरणे झाले. संध्या व फलाहार झाला. थोडा वेळ सर्वजण घराच्या गच्चीवर जाऊन चांदण्याची शोभा पहात बसले. विषय पंढरपूर व शब्द पांडुरंग होता. गप्पा रंगात आल्या होत्या. इतक्यात कल्पना नसतांना महाराजांचे साधन सुरू झाले. क्रियांचा वेग आवरता येईना इतका वाढला. स्वामींनी ते पाहिले. आणि थोडा वेळ थांबून स्वामींनी महाराजांचा अंगठा हाताने दाबला. म्हणाले "डोळे उघडा. पुरे झाले" महाराजांनी डोळे उघडले. क्रिया शांत झाल्या. पण महाराज 'त्या' धूंदीत होते. गप्पा थांबल्या. सर्वजण झोपण्यास गेले. येथील २।३ दिवस मजेत गेले. स्वामींना नवा प्रदेश पाहण्यास मिळाला. महाराष्ट्राच्या कुलदैवताचे दर्शन झाले. संतांच्या माहेरी राहण्यास मिळाले. तिसऱ्या दिवशी सर्वजण बार्शीस परत आले. स्वामींची पांडुरंगाच्या दर्शनाची इच्छा पूर्ण झाली.

बार्शीमध्ये या पहिल्या मुक्कामात सोलापूरच्या बापूसाो कुबडे यांनी स्वामीं-जवळ दीक्षेची प्रार्थना केली. स्वामी म्हणाले, "तुम्ही अजून लहान आहात. दीक्षा होईल पण सध्या नाही" असे म्हणून महाराजांना सांगितले. "वामन तुम इनको देख लो" बापूसाहेब कुबडे यांना जरा बरे वाटले. आत्ता दीक्षा झाली नाही तरी आपल्यावर स्वामींची कृपादृष्टि आहे या भावनेने बापूसाहेबांनी समाधान व्यक्त केले.

या बार्शीच्या मुक्कामात कोल्हापूरहून वे. शा. सं. वामनशास्त्री गडहिंग्लजकर दीक्षा घेण्यासाठी आले होते. स्वामीजी त्यांचेबरोबर कोल्हापुरास २।४ दिवस व श्रीनृसिंहवाडीस एक दिवस जाऊन आले. वामनशास्त्रींना दीक्षा झाली.

## परमगुरुदेव श्रीनारायणतीर्थांचे स्वामींना पत्र

बार्शीच्या या मुक्कामात स्वामींना परमगुरुदेव श्रीनारायणतीर्थ देवांचे पत्र

आले. त्या पत्रावर जो पत्ता होता तोही मुद्दाम खाली लिहिला आहे. महाराजांचे नाव त्यांच्या कानावर पोहचल्याचा हा पुरावा. बंगाली भाषेतील पत्र व त्याचे भाषांतर खाली देत आहे.

**प्रथम मूळ बंगाली पत्र**

-ॐ-

स्वामीपूर डाका
बंगाल, दि. २०-६-२४

कल्याणनियाषू आशीर्वाद,
चिरंजीव प्रिय चिन्मय,

तोमार पत्र पाईया सुखी ठईलाम । जखन जेखानेई जेमाबे धाक ना लेन पत्रद्वारा जानाईथा सूखी ओ निश्चित करिबा । एखाने मंगलमतई आछी । तोमार मंगल लिखिया सूखी करीबा । इति

आशीर्वादक
**श्रीनारायण स्वामी**

पू—अे महत् उद्देशे बाहिर हईआछ भगवान तोमार मनकामना पूर्ण करूना ।

**वरील पत्राचा मराठी अनुवाद**

चिरंजीव प्रिय चिन्मय,
मंगल कल्याणपूर्वक आशीर्वाद

तुझे पत्र पोहोचल्याने संतोष झाला. जेव्हा जेथे ज्या स्थितीत असशील तेथून पत्र पाठवून समाचार कळवावा आणि आम्हास निष्काळजी करून संतुष्ट करावेस. इकडील सर्व काही उत्तम आहे. तुझी माहिती कळवून सुखी करावेस. इति.

आशीर्वादक
**श्रीनारायण स्वामी**

पुनश्च—

तू ज्या महान उद्देशाने बाहेर पडलास ती तुझी आंतरिक इच्छा परमेश्वर पूर्ण करो.

वरील पत्र स्वामी बार्शीस असताना खालीलप्रमाणे पत्ता लिहून आले आहे.

श्री चिन्मयानंद सरस्वती
वामन दत्तात्रेय दत्तात्रय गुळवणी, ड्रॉईंग मास्तर
बार्सि टाऊन, डिस्ट्रि-सोलापुर, प्रेसिडेन्सी-मंबई

## “लघुतासे प्रभुता मिले !”

### (महाराजांना दीक्षा गुरुत्वाचा अधिकार)

### उज्जैनी पुष्कर—केवलकुंभक

फाल्गुन वद्यपक्षात बार्शी सोडण्याचा निर्णय स्वामींनी जाहीर केला. स्वामी जाणार या कल्पनेने बार्शीच्या मंडळींना वियोगाचे दु:ख जाणवू लागले. भक्तिप्रेमाला वियोगाचे भरते आले. आपण येथून सरळ उज्जयिनीला जाणार हा मनोदय स्वामींनी सांगून टाकला. कोणाकडे जाणार ? कशासाठी जाणार ? असले प्रश्न त्यांना कोणी करू शकले नाही. निरोप देण्यासाठी व जातांना वंदन करण्यासाठी, ठरल्यावेळी भक्तमंडळी बार्शी स्टेशनवर, परस्पर आली. स्वामी हसतमुखाने निरोप देत होते. भक्तमंडळी जड मनाने त्याचा स्वीकार करीत होती. भक्तांचे प्रेम पाहून स्वामींना सर्वांच्याबद्दल अनुकंपा वाटत होती. गाडी निघाली. स्वामी हात वर करून निरोपाचा इशारा देत होते. गाडी दिसेपर्यंत सर्वजण त्यांच्या हाताकडे पाहात होते.

स्वामी उज्जयिनीस पोहोचले. तेथे हरसिद्धी तलावाच्या काठी असलेल्या श्रीदत्तमंदिरांत त्यांनी मुक्काम केला, याच मंदिरात प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामी महाराजांनी दंडग्रहण केला होता. त्यांचा पहिला चातुर्मासही येथेच झाला होता. त्यांचे गुरु स्वामी प. प. श्रीनारायणानंद सरस्वती स्वामी महाराज याच मंदिराचे क्षेत्रसंन्यासी होते. या गुरु स्वामींचे गुरुदेव श्री. प. प. श्रीअनिरुद्धानंद सरस्वती स्वामी महाराज हे वृद्ध संन्यासी सुद्धा याच दत्तमंदिराचे निवासी होते. त्या श्री दत्तमंदिरात स्वामी चिन्मयानंद सरस्वती आज येऊन राहिले. स्वामींचा मुक्काम आठ दहा दिवस येथे होता. त्यानंतर ते पुष्कर तीर्थास गेलें.

पुष्करला श्रीब्रह्मानंद स्वामींचा खूप मोठा आश्रम पुष्करतीर्थाला लागून आहे. हे ब्रह्मानंदजी मोठे योगाभ्यासी होते. हठयोग पद्धतीने आसन, षट्क्रियेपासून ते प्राणायामाच्या क्रमबद्ध मार्गाने ध्यानयोग समाधीपर्यंत ते मार्गदर्शन करीत असत. त्यांचा लौकिक चांगलाच पसरला होता. शिष्य परिवारही खूप वाढला होता. त्यांचे ग्रंथसाहित्य विपुल आहे. ब्रह्मानंदजी नेहमी डोक्याला फेटा गुंडाळून ठेवीत असत. याचे कारण सांगताना ते सांगत की त्यांच्या एका शिष्याने वेडाच्या भरात डोक्यात सोटा मारला होता. त्यामुळे डोक्याला मोठी जखम झाली होती. तेव्हा-

पासून सतत फेटा बांधून ठेवण्याचा परिपाठ ठेवला. याच ब्रह्मानंद स्वामींच्याकडे महाराज प्राणायामाच्या अभ्यासासाठी १९२२ मध्ये गेले होते. त्याच ठिकाणी सध्या स्वामीजी गेले होते.

पुष्करला आल्यावर स्वामीजींनी ब्रह्मानंदांची भेट घेतली. योगाभ्यासावर दोघांची भरपूर चर्चा झाली. ब्रह्मानंदजी हठयोगी असून या काळात खेचरीचा अभ्यास करीत होते. त्यांनी हठयोगातील प्रक्रियांची दिशा महाराजांना दाखविली होती. त्यांच्या पद्धतीने हठयोगाने बंधत्रयाचा अभ्यास करून प्राण व अपान वायूचा योग साधता येतो. यामुळे ध्यानयोगाची सिद्धि होते. स्वामीजींना हठयोगाची कल्पना होती. हठयोगाचा मार्ग किती कठीण आहे याची जाणीव होती. हठयोगा-तील प्रत्येक प्रक्रियेत ठिकठिकाणी धोके असतात व सारखे गुरूसाहचर्य लागत असते. गुरुही पुष्कळवेळा मार्गदर्शन करण्यास असमर्थ ठरण्याचा संभव असतो. अशा वेळी दुसऱ्या गुरूंकडे जाण्याची पाळी येते. या सर्व अडचणी योगसिद्धीपर्यंत पोहच-विण्यास अतिशय त्रासदायक असतात. ब्रह्मानंदजी स्वामी तर स्वतःला 'जीवनमुक्त' म्हणवून घेण्यात संतोष मानीत होते.

स्वामींनी ब्रह्मानंदांचे एकूण म्हणणे ऐकूण घेतले. मग आपले विचार सांगताना स्वामी म्हणाले.

इतके कठीन परिश्रम घेण्यापेक्षा केवली कुंभकाचा अभ्यास सुलभतेने योग-सिद्धीपर्यंत नेण्यास उपयुक्त ठरेल की नाही? केवल कुंभक वाढला तर त्याचा परिणाम काय होईल? स्वामींचे प्रश्न ऐकून ब्रह्मानंदांनी हे मान्य केले की केवल कुंभक वाढला की आपोआप बंधत्रय लागू लागतात. बंधत्रय लागले म्हणजे प्राणापान वायूंचा योग होऊन ध्यानयोगसिद्धी होते. स्वामींनी हे विचारून त्यांचेकडून अपेक्षित उत्तर घेतले. पण हा मार्ग शक्तिपात योगाचा आहे याचा उल्लेख मात्र केला नाही. श्वासोच्छ्वासाच्या तीव्र उपायाने भस्त्रिका, कपालभाती इत्यादि प्राणायामाच्या प्रक्रियांनी मूल, जालंधर व उड्डीयान हे बंध लागतात. तसेच अति मंद श्वासोच्छ्-वासाच्या गतीनेही हे बंधत्रय लागतात. पहिल्या प्रक्रियेत प्रयत्नांचा आटापिटा आहे तर दुसऱ्या प्रक्रियेत अत्यंतिक सुलभता आहे. ब्रह्मानंदांनी आपले म्हणणे मान्य केले यातच स्वामींना संतोष झाला. शक्तिपातयोगसाधन मार्गात साधक नित्य साधनेच्या मार्गाने जाता जाता, केवल कुंभक स्थितीला येऊन पोहचत असतो.

* "केवली कैवल्यदायिनी। पापक्षयार्थं मनोनैश्चल्यार्थं मुमुक्षोः
केवली कुंभकः कर्तव्यः न तु सहित कुंभकः॥"

केवली कुंभकाखेरीज प्राण जय आणि चित्तवृत्ति निरोध होऊच शकत नाही.

* ही केवल कुंभाची स्थितीच अत्यंत स्थिर, थंड असल्याने येथूनच ध्यानयोगाला प्रारंभ होत असतो. यात धोके नसतात. मार्गाची गती विहंगम असते. या गोष्टी स्पष्ट दिसतात. आपला मार्ग अत्यंत श्रेष्ठ असल्याचे पुन्हा एका जीवन्मुक्त म्हणवून घेणाऱ्या स्वामींकडून स्पष्ट झाले याचा आनंद स्वामींना झाला. ते ब्रह्मानंदांना एवढेच म्हणाले की हठयोगाचा मार्ग अत्यंत कठीण, दुर्गम व धोक्याचा आहे. ब्रह्मानंदांनी यावर काही उत्तर दिले नाही.

स्वामीजी पुष्करला दोन दिवसांपेक्षा अधिक दिवस राहिले नाहीत. त्यांच्या भिक्षेचीही नीट सोय लागली नाही. मनाला अनुकूल वातावरणाची जोड मिळाली नाही. म्हणून स्वामीजी उज्जैनीला परत आले.

पुन्हा उज्जैनीच्या त्याच दत्तमंदिरात मुक्काम केला. तेथील शांतता त्यांना पसंत पडली. स्वामींना एकांत फार आवडतो. बार्शीचा दोन अडीच महिन्यांचा काळ म्हणजे गर्दी गडबडीचा गेला. पुष्करचे वातावरण परवडले नाही. स्वामींची मौन प्रवृत्ति उज्जैनीमध्येच रमली. कुणाशी संबंध नाही का कुणाला त्रास नाही. या पवित्र व निवांत तीर्थक्षेत्रामध्ये चातुर्मास करण्याची त्यांना इच्छा झाली.

रोज क्षिप्रा नदीचे स्नान करावे. श्रीमहांकालेश्वराचे दर्शन घ्यावे. सुरम्य उज्जैनीनगरीच्या आसमंतातील परिसराचे निसर्ग-सौंदर्य न्याहाळावे. या सर्व वस्तुजातांशी मौन संभाषण करावे. स्वतःच्या अंकावर वाढविलेली झाडेझुडपे, लतावेली, व वृक्षवनराजी यांना नित्य स्वजलसिंचनाने स्पंदित करणारी, आसमंतातील भूप्रदेश आपल्या मंजुळ आवाजाने गुंजारित करणारी, अखंड प्रवाही, शिवसायुज्यता प्राप्त झालेली महाधन्या 'क्षिप्रा' स्वामींच्या अखंड चिन्मय चैतन्याचे प्रतीक असल्याने त्यांच्याशी 'सख्यं' करीत होती. स्वामींच्या निवास जवळ असलेल्या हरसिद्धि तलावाच्या-काठी दत्तमंदिरात होता. येथेही त्यांनी शांततेसाठी क्षिप्रेपासून थोडे अंतर ठेवले होते. बारा ज्योतिर्लिंगांपैकीं हे ठिकाण असल्याने यात्रेकरूंची जा ये सतत चालू

असे. उज्जैनी हे दाट वस्तीचे शहर. प्राचीन परंपरेने घरांची दाटी अद्यापही तशीच चालत आली आहे. म्हणून स्वामी गावात जाण्याच्या भानगडीत फारसे पडत नसत.

**योगस्य प्रथमं द्वारं वाङ्‌निरोधोऽपरिग्रहः।**
**निराशा च निरीहा च नित्यं एकांत-शीलता॥**

स्वामींचे लक्ष सतत अंतर्मुख असे. ते आपल्या शिष्यांना पत्राने मार्गदर्शन करीत असत.

## श्रीगुरुदेवांना दीक्षागुरुत्व

श्रीस्वामीजी सध्या उज्जैनीमध्ये चातुर्मासानिमित्त राहिले आहेत ही बातमी बार्शी आणि हुशंगाबादेच्या भक्तांना समजली होती. यामुळे पत्राने परस्परांचा संबंध वारंवार येऊ लागला होता. बार्शीहून श्रीमहाराज, श्रीप्रल्हाद शास्त्रीजी, श्रीमुगुटकर वकील इत्यादींची पत्रे नेहमी जात असत. स्वामीजी त्यांच्या पत्रांची उत्तरे तत्परतेने पाठवीत असत. स्वामींची पत्रे मोजक्या शब्दात, सुंदर हस्ताक्षरात लिहिलेली असत. बहुतेक पत्रे हिंदी भाषेमध्ये असत.

श्रीप्रल्हादशास्त्रीजींना बार्शीमध्ये स्वामी असताना दीक्षा झालेली नव्हती. त्यांच्या पत्नी सौ. गोपिकाबाई या अत्यंत सात्त्विक, श्रद्धाळू, पतिपरायण, शीलसंपन्न, धार्मिक प्रवृत्तीच्या होत्या. त्या व्रतवैकल्ये, नेमधर्म करणाऱ्या होत्या. स्वामींच्या कडून आपल्याला दीक्षा मिळावी असे त्यांना एकसारखे वाटू लागले. त्यांनी आपली ही इच्छा आपल्या पतिदेवांचे जवळ अनेक वेळा बोलून दाखविली. त्यांनी त्यांना असेही सुचविले की महाराजांच्या कानावर माझी ही प्रार्थना आपण घाला तर खरे, काय होईल ते पाहू. सौ. गोपिकाबाईंचा हा आग्रह महाराजांच्या ध्यानात आला. त्यांनाही त्यांच्याबद्दल मनात अनुकंपा निर्माण झाली. या सश्रद्ध मातेची आर्त वाणी महाराजांनी आपल्या पत्रातून स्वामींच्या चरणी सादर समर्पण केली.

सौ. गोपिकाबाईंच्या अंतरीचे भाव अंतर्यामी स्वामींनी जाणले आणि तात्काळ स्वामींनी महाराजांना पत्रोत्तर दिले. हेच ते पत्र ज्यामध्ये स्वामींनी श्रीगुरुदेवांना दीक्षागुरुत्वाचा अधिकार दिला. स्वामींचे हे मूळचे हिंदीतील पत्र महाराजांनी वाचले. त्यांचे शरीर रोमांचित झाले.

## स्वामींचे दीक्षा गुरुत्त्वाचे पत्र

नारायण उज्जैन

ता. २१।८।२४

नारायण स्मरणपूर्वक आशीर्वाद। विशेष समाचार। तोम्हारा पत्र मिला। समाचार अवगत हुआ। ....शास्त्रीजीको दीक्षा देने की मेरी इच्छा थी तथापि योग-शक्ति की शास्त्रीजी के प्रति प्रसन्नता न होनेसे मैं उनको दीक्षा दी नहीं। आगे जब मेरा शास्त्रीजी से साक्षात् होगा तभी जो उचित होगा सो करूंगा।

शास्त्रीजीकी अनुज्ञा लेकर उनकी स्त्रीको तोम दीक्षा देना। वामन! मैंने तुम्हे दीक्षागुरुत्व दीया है। तुम ही शुभ दिन सौ. गोपिकाबाईको दीक्षा दो। प्रातःकालमें स्नानादि नित्यकर्मके अनंतर इष्ट देवताको वंदन करके, माला-श्रीफल दक्षिणा समर्पण करके सौ. गोपिकाबाईको आसनपर बैठने को कहो। पासमें एक आसनपर तुम भी साधन के लिये बैठो। जो होगा सो लिखना। पत्रोत्तरमें तोम सबका कुशल लिखना। इतिशम्।

आशीर्वाद

चिन्मयानंद सरस्वती.

वास्तविक महाराजांची ही अपेक्षा नव्हती. दीक्षागुरुत्व आपल्याला प्राप्त व्हावे असे त्यांच्या ध्यानी, मनी, स्वप्नीही नव्हते. परंतु स्वामीजी महाराजांच्या विनम्र, लीन, शालीन गुणांवर सदा संतुष्ट असावयाचे. स्वामींच्या प्रसन्नतेने महाराजांना दीक्षागुरुत्वाचे उत्तराधिकारी बनविले. “प्रसादस्तु प्रसन्नता”! न मागता दीक्षागुरुत्व महाराजांना मिळाले. गुरुत्व दिले जाते ते, न मागता दिले जाते. मागून घेण्याची व मागितल्यावर देण्याची ही वस्तू नाही.

**लघुतासे प्रभुता मिले, प्रभुतासे प्रभु दूरी।**
**चींटी शक्कर लै चली, हाथी के सिर धूरी॥**

मुंगी साखर घेऊन जाते पण हत्तीच्या नशीबी मात्र धूळ असते.

स्वामींचे पत्र आल्याचे महाराजांनी प्रल्हादशास्त्रींना सांगितले. “आपल्या पत्नींना दीक्षा घेण्यास आपली संमती असेल तर दीक्षा होईल.” हे महाराजांचे वाक्य ऐकताच शास्त्रीबुवांनी आपल्या संमतीचा होकार दिला. नंतर पंचाग पाहून शुभ दिवस शोधून

काढला. तो दिवस सौ. गोपिकाबाईंच्या संमतीने नक्की केला. योग्य त्या सर्व सूचना दिल्या. त्या दिवसाची मार्गप्रतीक्षा अधीरतेने सौ. गोपिकाबाई करू लागल्या.

श्रीस्वामींच्या आज्ञेप्रमाणे दिनांक १२ सप्टेंबर १९२४ रोजी महाराजांच्याकडून सौ. गोपिकाबाईंना दीक्षा झाली. प्रातःकालचा समय होता. महाराजांनी स्नान-संध्यादि अनुष्ठान उरकले. सौ. गोपिकाबाईसुद्धा पहाटेच उठल्या. सडासंमार्जन केले. स्नान केले. तुलसीची पूजा करून प्रदक्षिणा घातल्या. पतिदेवांना नमस्कार केल्यावर स्वामींचे स्मरण करून देवाला हार घातला. हळदकुंकू वाहिले. नमस्कार केला. मग पूजासाहित्य घेऊन महाराजांच्या घरी आल्या. महाराज स्नान वगैरे उरकून वाटच पहात होते. सौ. गोपिकाबाईंनी देवापुढे श्रीफळ व दक्षिणा ठेवली. महाराजांना नमस्कार करताच सौ. गोपिकाबाईंच्या शरीरात जोराचा कंप सुरू झाला. महाराजांनी त्यांना आसनावर बसण्यास सांगितले. त्या कशातरी आसनावर बसल्या. कंप वाढतच होता. डोळे मिटून घेण्यास सांगितले आणि तेवढ्यातच महाराजांच्या क्रियांचा जोर वाढला. त्यांचा श्वासोच्छ्वास तीव्र गतीने सुरू झाला. उजवा बाहु स्फुरण पावू लागला. ते उभे होते तसेच पुढे झाले. स्फुरण पावणारा उजवा हात सौ. गोपिकाबाईंच्या मस्तकावर ठेवला. तीव्र होणारे उच्छ्वास त्यांच्या शरीरावर सोडले. आणि मग आपल्या आसनावर येऊन बसले. शक्तिसंक्रमण झाले. शारीरिक क्रियांच्या गतीला वेग आणि विविधता आली. सौ. गोपिकाबाईंना विविध अनुभव येऊ लागले. त्यांचा चेहरा व शरीर लालबुंद झाले. कंप इतका वाढला की सारे शरीर थडथडू लागले. संचाराचा जोर खूपच वाढला होता. महाराजांचे साधन मात्र स्थिरपणे चालू होते. त्या खोलीतील सारे वातावरण दिव्य शक्तीच्या संचाराने भारावून गेले होते. तासभर साधन चालले. दीक्षा झाल्याचा तो महाराजांचा पहिला अनुभव होता. शक्तिपात योगाची महाराजांनी ही पहिली दीक्षा दिली होती. या नवीन गुरूची ही पहिली शिष्या होती. हा प्रारंभ एका सौभाग्यशालिनी सुहासिनीपासून झाला.

त्याच दिवशी दुपारी महाराजांनी स्वामींना उजैनीच्या पत्त्यावर पत्र पाठविले. दीक्षेची सारी हकीगत कळविली. हे सारे आपल्या कृपेने झाले. मी निमित्तमात्र माध्यम म्हणून आपल्या आज्ञेने होतो. पत्रासोबत गुरुदक्षिणेचे रुपये दोन म. ऑ.ने पाठवून दिले. स्वामीजींनी उलट टपाली उत्तर दिले. "ती गुरुदक्षिणा तुमचीच आहे. इकडे पाठविण्याची आवश्यकता नव्हती. तुमच्याजवळ ठेवणे उचित होते.

आता पाठविलीच आहे तर ठेवून घेतो." याशिवाय आणखी एक वाक्य लिहिले होते. "कोणत्याही कार्याचा जोपर्यंत अभ्यास होत नाही तोपर्यंत त्या कार्याचे ज्ञातेपण येत नाही.

**'न किंचन् फलं धत्ते स्वाभ्यासेन विना क्रिया'**

देवापुढे ठेवलेली श्रीगुरुदक्षिणा आपल्या श्रीगुरुदेवांपर्यंत पोचती करण्यास श्रीगुरुमहाराजांची विनयशील, विनम्र वृत्ती स्पष्ट होते. हेंच सर्वोत्तम शिष्यत्व आहे. स्वामींनी दिलेले उत्तर हेही मोठ्या मनाचे उदाहरण आहे. हेच सर्वश्रेष्ठ गुरुत्व आहे. तत्त्वोपदेशामध्ये आचार्य म्हणतात :—

**भावाद्वैतं सदा कुर्यात् क्रियाद्वैतं न कर्हिचित् ।**
**अद्वैतं त्रिषु लोकेषु नाद्वैतं गुरुणासह ॥**

## काशी ते बार्शी

स्वामींचे श्रीगुरुमहाराज श्रीआत्मानंद प्रकाश ब्रह्मचारीजी सध्या श्रीक्षेत्रकाशी येथे वास्तव्य करून राहिले होते. उज्जैनीमध्ये श्रीआत्मानंदांची काशीहून पत्रे येत होती. त्यांतून काशीचे वृत्त स्वामींना समजत असे. स्वामींच्या पत्रातून इकडील वृत्त श्रीआत्मानंदांना समजत असे. यापूर्वीही उभयतांची पत्रे येत जात होती. आपल्या कार्याचा प्रसार उत्तम रीतीने होत असल्याचे ऐकून श्रीआत्मानंदांना समाधान वाटत होते. ते बंगालमध्ये विनौटियाच्या ज्ञानसाधनमठात परमगुरु श्रीनारायणतीर्थदेवांना हे वृत्त कळवीत असत. त्यांनाही इकडील माहिती वाचून संतोष होत असे. या काळात श्रीआत्मानंदजी पुन्हा एकदा उत्तराखंडाची यात्रा करून काशीस आले होते. मधून मधून ज्ञानसाधनमठात जाऊन परमगुरुदेवांचे दर्शन घेऊन येत होते.

स्वामी आता उज्जैनीत असताना श्रीआत्मानंदांचे स्वामींना जे पत्र आले होते त्यात उल्लेख होता की परमगुरुदेव श्रीनारायणतीर्थदेवस्वामींचा मुक्काम सध्या काशीत आहे. हे पत्र पाहाताच स्वामींनी उज्जैनी सोडली. स्वामीजी या पत्राची वाटच पहात होते. त्यांनी महाराजांना बार्शीस पाठविलेल्या पत्रात तसा उल्लेखही केला होता की काशीचे पत्र आले म्हणजे मला काशीस जाऊन यावयाचे आहे. त्याप्रमाणे पत्र आले आणि स्वामी काशीस गेले.

काशीचे पत्र चातुर्मास समाप्तीच्यावेळी आले. चातुर्माससमाप्तीनंतर स्थानांतर करावयाचेच होते. ही उत्तम संधि पाहून स्वामीजी काशीस गेले. त्याप्रमाणे काशीला जाण्याची पत्रे महाराष्ट्रात पाठविली.

श्रीक्षेत्रकाशीमध्ये श्री आत्मानंदजी हळूहळू आपले आसन स्थिर करीत होते. त्यांनाही तेथे अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत होते. पण अडचणी आणि संकटे यांची काळजी त्यांनी कधी केली नाही. परमेश्वरावर, श्रीगुरुवर आणि प्राप्त झालेल्या सर्वोत्तम साधन मार्गावर त्यांची दृढ श्रद्धा होती. या परमेश्वरी कार्याचा विकास होण्याबद्दल ते निःशंक होते. म्हणून त्यांनी कधीही कोणाकडे याचना केली नाही की आपल्या अडीअडचणींचा उल्लेखही कधी केला नाही. काशीमधील ज्या कोणाचे भाग्य उदयास आले आणि ते श्रीआत्मानंदांच्याकडे आले त्यांना दीक्षा देऊन त्यांनी कृतार्थ केले. श्रीआत्मानंदजी सरळ, भोळ्या शंकराच्या प्रवृत्तीप्रमाणे सतत आत्मानंदात आत्मरत असत. त्यांची साधना व साधनेतील अनुभव जबरदस्त होते. गुरुसेवेने प्राप्त झालेल्या सद्गुरुकृपेची पुण्याई त्यांना तशीच प्रचंड मिळत होती. आपल्या परमगुरुदेवांना काशीयात्रा आपण घडवावी म्हणून आग्रह करून ते विनौटियाहून त्यांना घेऊन आले होते. अशा सुमंगल पर्वणीमध्ये स्वामी काशीस गेले. स्वामीजी, श्रीआत्मानंदजी आणि परमगुरुदेव असा हा त्रिवेणी संगम येथे झाला. हा साधा योग नव्हता. कपिला-षष्ठीचा दुर्लभ योग होता!

आश्विन आणि कार्तिक हे दोन महिने स्वामी श्रीआत्मानंदांच्या व परम-गुरुदेवांच्या सान्निध्यात श्रीक्षेत्रकाशीमध्ये राहिले. आपली सर्व हकीगत, महाराष्ट्रातील प्रवास, भेटलेल्या सज्जनांचा परिचय, त्यांच्या दीक्षेचे अनुभव, इत्यादि सारे काही श्रीगुरुचरणी सादर केले. आपल्या कार्याचा विस्तार ऐकून दोघांना अतिशय समाधान वाटले. दोघांनी अत्यंत संतोषाने आपल्या शिष्याच्या कार्याचे कोडकौतुक केले. प्रसन्न चित्ताने पुनःपुनः कृपाशीर्वादाचा वर्षाव केला. स्वामींच्या स्वतंत्रप्रियतेची, दृढनिश्चयी वृत्तीची आणि प्रगाढ श्रद्धेची जाणीव श्रीनारायण-तीर्थ देवांना पूर्वीपासूनच होती. या विद्येचा प्रसार बंगालबाहेर दूरदूरच्या प्रांतातून होऊ लागल्याचे पाहून त्यांना तर कमालीचा आनंद झाला. त्यांना त्यांच्या सद्गुरु प. प. श्रीगंगाधरतीर्थांच्या आशीर्वादाची आठवण झाली. काशीमधील नव

अनुग्रहीत आणि उत्तर काशीमधील भेटलेले भक्त यांच्यामुळे कार्याचा सर्वतोपरी हळूहळू आपोआप विकास होत असल्याचे दिसून येत होते. परमगुरुदेवांच्या प्रसन्नतेने श्रीआत्मानंदजीसुद्धा प्रसन्न होते. उभयतांच्या प्रसन्नतेने स्वामींना धन्यता वाटत होती. जे काही झाले ते सर्व शक्तीने करून घेतले. कर्तृत्वाचा लेशमात्र संबंध आणू न देता सारे काही झाले होते. तरी स्वामींना धन्यता वाटत होती. कारण शक्तीने त्यांना निमित्त केले होते.

हे दिवाळीचे दिवस होते. लोक लौकिक पद्धतीने दिवाळी साजरी करीत होते. पण या ठिकाणी अलौकिक दिवाळी साजरी होत होती. या अलौकिक दिवाळीचा आनंदही अलौकिक होता. चैतन्याचा प्रकाश अज्ञान, अंधार नष्ट करून देहाच्या पणतीमधील आत्मज्योतीच्या ठिकाणी स्थिरावला होता. संत महात्म्यांची संगती हीच दिवाळी येथे साजरी होत होती.

**“ कबीर संगत साधुकी – ज्यों गंधीका बास।**
**जो कछु गंधी दे नहीं – तो भी बास सुबास ॥ ”**

अत्तरांच्या व्यापाऱ्याचा नुसता सहवास लाभला आणि देणे घेणे काही झाले नाही तरी केवळ सहवासाने जवळच्या सुगंधी सुगंधाचा दरवळणारा वास हा मिळाल्याशिवाय रहात नाही. तसे संतांचे असते.

आपापसातील बोलण्यातून स्वामींचे पूर्वाश्रमीचे स्नेही व गुरुबंधु ब्रह्मचारी श्रीक्षितीशचंद्र मुखर्जी हे अलीकडे गयेला येऊन राहिले आहेत असे स्वामींना समजले. त्यांना भेटून यावे अशी इच्छा स्वामींच्या मनात आली. श्रीगुरुमहाराजांनीही पुष्टी दिली. स्वामींचे गयेला जाण्याचे ठरले आणि ते ३ डिसेंबर १९२४ ला गयेला गुरुबंधूंकडे आले. स्वामींनी श्रीक्षितीशचंद्र मुखर्जींच्याकडे मुक्काम केला. १०।१५ दिवस राहणे झाले. खूप दिवसांनी ही भेट झाली होती. खूप गप्पागोष्टी झाल्या. काशीमधील सद्‌गुरूंची प्रसन्नता आणि कृपा स्वामींना सतत आनंद पुरवीत होती. तो आनंद त्यांनी पत्राने महाराजांना बार्शीला कळविला होता.

“ श्रीस्वामीमहाराज सध्या काशीमध्ये आहेत. ते माझ्यावर फार फार प्रसन्न आहेत. त्यांच्या प्रसन्नतेच्या कृपेने मी अतिशय आनंदात आहे. ”

दि. १७ डिसेंबर १९२४ ला स्वामी परत हुशंगाबादेस आले.

## हुशंगाबादेवरून पुन्हा बार्शीस

शुक्रवार दिनांक १९ डिसेंबर १९२४ रोजी स्वामीजी गयेहून हुशंगाबादेस आले. प्रवासाची धावपळ प्रकृतीला विश्रांतीची गरज भासवित होती. स्वामींनी येथे चार महिने मुक्काम केला. स्वामीजी आल्याचे समजताच हुशंगाबादेतील भक्त स्वामींच्या दर्शनास येऊ लागले. साधक साधनेला येऊ लागले. स्वामींनी सर्व परिचितांची विचारपूस केली. नाही नाही म्हणत मधून मधून एखादी दीक्षा होतं असे. स्वामीजी सहजासहजी दीक्षा देत नसत. जानेवारीमध्ये एका भक्ताला त्यांनी दीक्षा दिली पण त्यामुळे तीन आठवडे स्वामी आजारी पडले. ते दुखणे पथ्य-पाण्यावर निभावले.

स्वामीजी ठिकठिकाणच्या साधकांना पत्रे पाठवून त्यांची चौकशी करीत. पत्रातील आशयाप्रमाणे वैयक्तिक मार्गदर्शन करीत. पत्रोत्तर तत्परतेने दिले जात असे. "आपल्याला मिळालेले साधन फार मोठे आहे. रोज नियमितपणे साधना केली पाहिजे." हा विचार स्वामींनी पुनःपुन: मांडला आहे. पत्रातून साधकाचे साधन नियमित चालल्याचे वाचले की स्वामींना संतोष होत असे. साधक नित्यसाधन करणारा पाहिजे असा त्यांचा आग्रह असे. कुणाचे साधन नियमित होत नसेल तर स्वामी त्याला खडसावून बजावीत की "साधन रोज झाले पाहिजे" इतकेच नाही तर "आपल्या साधनेला वेळेची भूक आहे. म्हणून जेवढा वेळ साधनेला लागेल तेवढा तिला पाहिजे. साधनेला बसताना वेळेची टोचणी मनाला नसेल तरच साधन मोकळेपणाने होते. एकवेळ जेवण मागेपुढे झाले तरी हरकत नाही पण साधनेत कधीही टाळाटाळ होता कामा नये."

"प्रपंचातील अडचणींच्या मागे दडून साधनेकडे दुर्लक्ष करणे चांगले नाही. त्या अडचणी प्रत्येक प्रपंचवाईकाचे मागे लागलेल्या आहेतच. त्यातून सुटण्यासाठी तर हा मार्ग स्वीकारला आहे. आम्ही तुम्हाला संसार सोडायला सांगत नाही. तो आपोआप तुमच्याकडून सहजपणे कसा सुटेल हे पहात असतो. तुम्ही प्रपंच करा, संसार करा, शिका, पैसा मिळवा काय इच्छा होईल ते करा. पण घेतलेले दिव्य अपूर्व, महान् व दुर्मिळ साधन एकदाही चुकवू नका. एवढे केले की तुमच्यात काय फरक पडतो ते तुमचे तुम्ही ठरवा. तुम्ही फक्त साधनेला बसा. त्यापुढे साधन तुमच्याकडून योग्य ते सर्व काही करवून घेईल."

साधनेसंबंधी एका पत्रात स्वामींनी लिहिले आहे की–

"जास्त आसक्ति व आकांक्षांनी भरलेला प्रपंच आणि परमार्थ एकाच वेळी होणे फार कठीण आहे." "आधी प्रपंच करावा नेटका। मग साधावे परमार्थ विवेका" या सूत्राचे सार हेच आहे. नेटका प्रपंच म्हणजे आटोपशीर, थोडक्यात आटोक्यात येणारा, गरजेपुरता, जेवढा अटळ आहे तेवढा! यामुळे साधक संसार करूनही बराच मोकळा राहू शकतो, अलिप्त राहू शकतो. साधनेला हे मोकळेपण आणि ही अलिप्तता पाहिजे. भरपूर परिश्रम आणि रात्रीचे जागरण या मुळे साधनेचा अभ्यास चांगला चालत नाही. या जगातील सर्व विषय अनित्य असून एक मात्र परमपद हेंच एकमेत्र सत्य आहे. हे लक्षात ठेवून दृढनिश्चयाने साधनेचा अभ्यास करीत जावे."

स्वामीजी साधक शिष्याची चौकशी पत्रातून करताना त्याच्या त्याच्या पातळीप्रमाणे, अधिकाराप्रमाणे निःसंदिग्ध शब्दात करीत असत.

एक चांगला साधक नित्य साधना करीत असे. त्याचे साधनही उत्तम चालत होते. पण त्याच्या मनांत निराशेचा विचार येत असे. आपण इतके सामान्य प्रारब्धाचे जीव आहो की आपल्याला या साधनेचा लाभ मिळायला अनेक जन्म जायला पाहिजेत. या विचाराने त्या साधकाने पत्र लिहिले होते. स्वामींनी त्याला उत्तर दिले की :—

"साधनेत निराशेचे विचार येतात याबद्दल चिंता करू नये. साधन रोज करीत रहा. ही निराशा जाईल. ही साधना मिळालेला साधक तीन जन्मांच्या आत पूर्ण होऊन मुक्त होतो. साधनेला बसताना गुरु व इष्टदेवतेला नमस्कार करून, साधन निर्विघ्नपणे चालावे अशी प्रार्थना करून बसत जा. मला सवडीप्रमाणे मनातील विचार व साधनेतील अनुभव पत्राने कळवीत जा."

एका पत्रात साधकाने विचारले की साधन चांगले चालले आहे हे माझे मी कसे ठरवणार? चांगल्या चाललेल्या साधनेची कसोटी काय आहे? याला स्वामींनी उत्तर लिहिले.

"चित्त आणि प्राणवायु यांची स्थिरता होऊ लागल्याचा अनुभव येत राहिला म्हणजे साधन चांगले चालले आहे याची खात्री बाळगावी."

एका साधकाने स्वामींना विचारले, "आपल्या कृपेने साधन उत्तम चालले आहे परंतु आज्ञाचक्राचा भेद होण्यास विलंब का लागतो? स्वामींनी उत्तर लिहिले–" आज्ञाचक्राचा भेद होण्यास काही काळ लागत असतो. थोडा जास्त वेळ लागतो म्हणून निरुत्साही होऊन चालणार नाही. आणि––

**ऋतावृतौ स्वदारेषु संगति यो विधानतः ।**
**ब्रह्मचर्यं तदवोक्तं गृहस्थाश्रमवासिनाम् ॥**

या रितीने ब्रह्मचर्याचे पालन करावे. नाहीतर निर्वीर्य झाल्याने आज्ञाचक्राचा भेद होणार नाही.

स्वामींचे याप्रमाणे व्यक्तिगत मार्गदर्शन चालू होते. स्वामींच्या पत्राने साधक सावधचित्त होऊन साधनेत रमून जात असत.

स्वामींचा हुशंगाबादेतील काळ असा जात होता. एप्रिलमध्ये एके दिवशी स्वामींना एकाएकी मराठवाड्यातील हिंगोली तालुक्यातील, आजेगांवी जाण्याची प्रेरणा झाली. शंकरकाका, दत्तुकाका आणि बाबा महाजन ही मंडळी आजेगावची! येथे स्वामीजी अचानकपणे आल्याने सर्वांना आश्चर्च आणि आनंद वाटला. स्वामींचा मुक्काम येथे महिना दीड महिना होता.

आजेगावमध्ये श्रींकेशवराजाचे मोठे मंदिर आहे. प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराज पूर्वी येथे येऊन काही दिवस याच मंदिरात वास्तव्य करून गेले होते. या मंदिराच्या सभा मंडपात गाभाऱ्यात प्रवेश करण्याच्या दरवाजाच्या उजव्या व डाव्या बाजूला दोन प्रशस्त ओटे आहेत. या ओट्यांना कठडे आहेत यातील एक ओटा प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांचा म्हणून, ते येथे येऊन गेल्यापासून त्यांची आठवण म्हणून, सुरक्षित ठेवला आहे. दुसरा ओटा स्वामींचा म्हणून शिल्लक होता त्या ठिकाणी स्वामींचे वास्तव्य होते. गावातील हे मोठे व निवांत मंदिर आहे. केशवराज दैवत जागृत असून श्रीटेंबेस्वामी महाराजांनी केशवराजावर एक स्तोत्र रचले आहे. स्वामींचेही आकर्षण येथे व्हावे व येथे भरपूर निवास व्हावा यातच या स्थानाचे वैशिष्ट्य दिसून येते.

श्रीस्वामीजींच्या सहवासात साधनेसाठी श्रीदत्तुकाका, बाबा महाजन आदी साधक मंडळी या मंदिरात पहाटे येत असत. साधना होत असे. नंतर काही

मंडळी मिळून गावाजवळच्या बागेतील विहिरीवर स्नानासाठी स्वामीजींबरोबर जात असत. स्वामींच्या समवेत स्नान करून, भस्म लावून, संध्यादि आह्निक उरकून, खांद्यावर धुण्याचे पिळे टाकून हा शुचिर्भूत गुरुशिष्य साधकवृंद गावातून येताना आबालवृद्धांच्या नमस्कारांचा स्वीकार करीत येत असे. वास्तविक हे नमस्कार स्वामींना असत. पण स्वामीसंगतीने या नमस्काराचा भाग इतरांच्याही वाट्याला जाई. संध्याकाळची संध्याही, याच बागेतील विहिरीवर ही सर्व मंडळी, फिरून आल्यावर, येथे उरकून गावात जात. असा हा एकसंघ संच साधना आणि नित्यानुष्ठानात एकत्र वावरताना दिसे. ही ध्येयवादी माणसे संख्येने थोडी असली तरी प्रभावाने फार मोठी होती. स्वामींच्या वास्तव्याने या छोट्या गावात चैतन्याचे वारे खेळू लागले होते.

या काळात शंकरकाका देशमुखांची मुलगी कुमारी वत्सला ही ८।१० वर्षांची होती. उत्तम संस्कारात वाढलेली ही वत्सला केशवराजाचे मंदिर झाडून स्वच्छ करीत असे. सडासंमार्जन करून रांगोळी घालीत असे. नमस्कार करून स्वामींच्याजवळ बसून रहात असे. स्वामींना नमस्कार करणाऱ्यांना लांबून नमस्कार करण्यास सांगत. कोणालाही चरणस्पर्श करून देत नसत. स्वामीजी प्रातःस्नान आणि सायंसंध्या या दोन वेळेव्यतिरिक्त बहुधा आपल्या आसनावर सतत बसलेले असत. सकाळी स्नानानंतर ते जे सिद्धासन लावून बसायचे ते मध्याह्न कालापर्यंत, ताठ पाठ करून स्थिर स्थितीत बसलेले असायचे. मधून मधून डोळे बंद केलेले तर मधून मधून उघडे ठेवलेले असत. तरुण, तेजःपुंज संन्यासी म्हणून सर्वांच्या कुतूहलाचा विषय असे. भाषाभिन्नत्वाने स्वामींचे वेगळेपण जाणवत असे ते वेगळेच. गावातील सश्रद्ध, जिज्ञासू, धर्मप्रिय लोक सवडीने दर्शनास येऊन जात.

आजेगावात श्रीशंकरकाका, बाबा महाजन, दत्तोपंत ही प्रतिष्ठित मंडळी स्वामींची माहिती गावातील मंडळींना सांगत. लोकही स्वामींच्या सहवासाने तृप्त होत. स्वामी दुपारी १२ वाजता आजेगावकरांच्या वाड्यात भिक्षेला जात. दुपारी थोडी विश्रांति झाली की वेदांताचे वाचन करीत. कोणी काही विचारले तरच चार शब्द जास्तीचे बोलत. नाहीतर अधोमुख करून, नासिकाग्रावर दृष्टि ठेवून बसलेले असत. स्त्रियांकडे तर पहातही नसत. एकदा त्यांना कोणी विचारले "स्वामीजी! आमचे सीताराम महाराज पायावर डोके ठेवून नमस्कार करून देत होते. आपण चरणस्पर्श का देत नाही?"

"तुमचे सीतारामबहाराज 'लेकुरवाळे' होते. आम्हाला चरणस्पर्श चालत नाही."

श्रीदत्तोपंत आजेगावकरांना संतती टिकत नसे. त्यांनी त्यासाठी खूप उपाय केले पण काही उपयोग झाला नाही. स्वामीजी आजेगावी असताना त्यांनी दत्तोपंतांना एक मंत्र दिला. त्यापासून मात्र ही आपत्ती टळली. स्वामीजी कधी मंत्र वगैरे देत नसत. पण दत्तोपंतांचे भाग्य उदयाला आले आणि त्यांचा कार्यभाग साध्य झाला.

आजेगावाहून स्वामीजी यवतमाळला सबजज्ज श्री. परांडे यांचेकडे गेले. त्यावेळी सबसज्जसाहेब सरवुड्रॉफचे "सर्पंट पॉवर" या इंग्रजी पुस्तकाचे वाचन करीत होते. दादासाहेब परांडे चिकित्सक जिज्ञासू असल्याने विविध ग्रंथांचा शोध घेऊन, ती वाचून आपल्या या विषयासंबंधी काही विशेष, नवीन ज्ञान मिळाले तर गोळा करीत राहाणे हा त्यांचा नेहमीचा उद्योग असे. त्या 'सर्पंट पॉवर' ग्रंथातील षट्-चक्रांच्या आकृत्यामुळे तो ग्रंथ वाचकांना आकर्षून घेई. स्वामीजींनी ग्रंथ पाहिला. त्यावर ते एवढेच म्हणाले "ग्रंथ लिहिला आणि आकृत्या काढून दाखविल्या म्हणजे या विषयाचे ज्ञान झाले असे म्हणता येईल पण अनुभव येईलच असे मात्र म्हणता येणार नाही. अनुभूति हा स्वतंत्र भाग आहे. ज्यांना अनुभव येतो त्यांना असले लिहीत बसायला वेळ कुठे असतो?"

दादासाहेबांनी महाराजांना या ग्रंथाची प्रत बार्शीला पाठविली व त्यांतील चांगल्या आकृत्यांच्या नकला काढून घेण्यास सांगितले. स्वामीजी यवतमाळला असतांना त्यांचे श्रीगुरुदेव श्रीआत्मानंद ब्रह्मचारीजींच्या कडून पत्र आले. "घार हिंडते आकाशी। चित्त तिचे पिलापाशी" या न्यायाने या शिष्याची चौकशी करणारे व आशीर्वाद देणारे ते पत्र होते.

मूळ पत्र बंगाली आहे. खाली त्याचा मराठी अनुवाद केला आहे.

ॐ मदारीपूर

सोमवार, एकादशी तिथी

निरापत्सू,

पुत्रा, तुझे पत्र मिळाले. मी तुझ्या पत्राचे उत्तर यापूर्वीच पाठविले आहे. पत्र तुला न मिळण्याचे कारण काय असेल बरे?

आता पुन्हा तुझ्या प्रकृतीला काय झाले ? सतत सावधानपूर्वक राहिले पाहिजे. माझा तुला पूर्ण आशीर्वाद आहे. मी आणखी १०।१५ दिवसानंतर दुसऱ्या ठिकाणी जाणार आहे. जेव्हा जशी स्थिती असेल तेव्हा तशी ती मला कळवीत जावी. मला उत्तर, नं. ५२, हाडारबागेच्या पत्त्यावर पाठवावे. या पत्राचे उत्तर मात्र आत्ताच्या पत्त्यावर द्यावे. तुझ्या दादाबाबूंना आणि ठाकूरमातांना माझा आशीर्वाद कळवावा. मी खुशाल आहे.

S. M. Farande यांना माझा स्नेहाशीर्वाद कळवावा.

इति
आशीर्वादक
**स्वामी आत्मानंद**

दिनांक २३ मे १९२५ ला स्वामींना आपल्या श्रीगुरुदेवांचे पत्र यवतमाळला पोहोचले. श्रीगुरुदेवांच्या आशीर्वादानें स्वामींना आनंद झाला. पुढे लवकरच ते बार्शीकडे रवाना झाले.

## बार्शीत चातुर्मास

स्वामीजी बार्शीत येण्याच्या वार्ता पसरू लागल्या. या वार्तेबरोबर आपापसात त्यांच्या आठवणींच्या चर्चा सुरू झाल्या. महाराजांनी सोलापूरला बापूसाहेब कुबडे यांना, औंढीला व्यंकटरावांना, दौंडला भास्करराव भागवतांना पत्रे पाठविली. वातावरणात उत्साह भरू लागला. सोलापूरचे श्री. तात्यासाहेब सोहनी स्वामींच्या दर्शनाची वाट पहात होते. त्यांना स्वामींच्या येण्याचा दिवस कळविला. बार्शीतील प्रल्हादशास्त्रीजी, मुगुटकर वकील, नारायणराव पुरंदरे आदि मंडळींनी स्वामींना आपल्या घरी राहण्यास, भिक्षेस येण्यासंबंधी महाराजांशी बोलणी सुरू केली.

या वेळेस स्वामींनी प्रल्हादशास्त्रींच्या आग्रहाखातर त्यांचेकडे उतरण्यास आपली संमती दिली. महाराज शास्त्रीबोवांच्याकडे स्वामींसाठी ये, जा करू लागले. संपूर्ण चातुर्मास स्वामी येथे राहिले. संन्याशांचा चातुर्मास दोन महिन्यांचा असतो. व्यासपौर्णिमा ते भाद्रपद पौर्णिमा. बार्शीकरांनी हा पर्वणीमधला पर्वकाळ साधला. साधन

आणि श्रीगुरुसेवा याशिवाय त्यांना दुसरे काही सुचत नव्हते. जणूं जगातला सर्व आनंद बार्शीत भरला होता.

एकदा प्रल्हादशास्त्रींकडे काही अडचण आली म्हणून त्या दिवशी स्वामींचा मुक्काम ब्राह्मण आळीतील एका मोकळ्या वाड्यात झाला. अलीकडे बरेच दिवसापासून तो वाडा बंद होता. त्या वाड्यासंबंधी गावात जरा कुजबूज होती. म्हणे त्या वाड्यात माणूस टिकत नाही. रात्री तेथे किंचाळल्याचा आवाज येतो. दिवट्यांचा नाच दिसतो. या अफवांना तसा पुरावा नव्हता. म्हणून प्रल्हादशास्त्री वगैरे मंडळींना हे खरे वाटत नव्हते. तेव्हा स्वामी रात्री तेथे झोपले असताना त्यांना पिशाच्च्याच्या चेष्टा आढळून आल्या. रात्रभर पिशाच्चांचे चमत्कारिक आवाज चालले होते. वाड्याच्या मधल्या चौकात मोठमोठे दगड व लाकडाचे ओंडके फेकल्याचा धडाधड आवाज येत होता. स्वामींना रात्रभर झोप घेता आली नाही. एकूण प्रकार लक्षात घेऊन ते जे समाधी लाऊन बसले ते सकाळपर्यंत. दुसरे दिवशी सकाळी महाराज आणि प्रल्हादशास्त्री जेव्हा दर्शनास गेले तेव्हा स्वामींनी घडलेली हकीगत सांगितली, त्याच दिवशी स्वामींचे स्थानांतर करण्यात आले.

स्वामीजी पिशाच्चासंबंधी पुष्कळ अनुभव सांगत असत. दुसऱ्या कोणी पिशाच्च्याच्या गोष्टी काढल्या म्हणजे "मला पिशाच्च दाखवा म्हणजे करतो त्याला ठीक" यासंबंधी त्यांनी असे सांगून ठेवले की "योगमार्गातील लोकांना पिशाच्च विशिष्ट मर्यादेपलिकडे त्रास देऊ शकत नाही. श्रीगुरुचरित्राची पोथी किंवा त्या पोथीतील एखादे पान जरी संग्रही असेल तर पिशाच्च बाधा सहसा होत नाही." स्वामीजींना पिशाच्चावर बंधन प्रयोग करता येत होता. त्यांना पिशाच्च म्हणजे खेळणे वाटत असे.

स्वामींचा स्वभाव विनोदी असल्याचा अनुभव अधून मधून येत असे. बार्शीमध्ये एकदा भोजनाचा कार्यक्रम ठरविला. सर्व साधक, शिष्य, भक्त जवळच्या संबंधातले, अशांना निमंत्रण होते. विशेष म्हणजे स्वामी स्वतः पंगतीमध्ये हिंडून समाचार घेत होते. आग्रह करण्यात स्वामींची विनोदी वृत्ती उफाळून येत असे. त्यांचे आग्रह करण्याचे तंत्र मोठे अजब असे. पंगतीला चांगलाच रंग भरला होता. गप्पा, गोष्टी, विनोद, चुटके यांनी वातावरण मोकळे झाले होते. महाराज, प्रल्हादशास्त्री, नारायणराव पुरंदरे, वैद्य मास्तर अशी खाशी पंगत बसली होती.

पक्वान्न वाढणाऱ्याबरोबर स्वामी प्रत्येकाजवळ जात. आग्रह करून वाढण्यास सांगत, प्रसाद टाकू नका म्हणून बजावीत व पुढच्या पानाकडे जात. असे एकदा झाले, दोनदा झाले. लोकांना आता अन्नाचा एकही कण नको होता. पोट भरून जेवण झालेले असल्यामुळे प्रत्येकजण पानावर पालथा पडून नको नको म्हणू लागला. तरी तिसऱ्यांदा स्वामींनी आग्रहाचा एक एक लाडू वाढण्यास सांगितला. स्वामींचा वाढण्याचा आग्रह पण वाढणाऱ्यांना वाढणे जमेना! प्रत्येकाने नकाराची री ओढली. तेव्हा स्वामी पुढे झाले. आग्रह किती करावयाचा असतो हे ज्या श्लोकात आहे तो श्लोक सर्वांना म्हणून दाखविला.

**हा हा दद्यात्, हुँ हुँ दद्यात् ।**
**दद्यात् शिरसी कंपने ॥**
**हस्त संचालने दद्यात् ।**
**न दद्यात् व्याघ्र झंपने ॥१॥**

भोजन करणारा तोंडाने, नको, नको, ऊंहूं ऊंहूं म्हणू लागला तर त्याला जरूर आग्रह करून वाढावे. तोंडाने नको नको म्हणणे चालू असतांना मान जोरात हलवून नकार दाखविला तरी वाढण्यात कसूर करू नये. इतकेच नव्हे तर दोन्ही हात जोरजोराने हलवून 'नको' 'नको'चा आवाज वाढवला तरी निःशंकपणे वाढावे. इतके नकाराचे प्रकार केले तरी वाढण्यास काही हरकत नाही. ही वाढण्याची अखेरची मर्यादा! पण वाढणाऱ्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की भोजन करणारा जर का वाघासारखा रागावून, डोळे वटारून, नको नको म्हणून वाढणाऱ्याच्या अंगावर गुरकू लागला तर मात्र त्याला वाढू नये.

एकूण आग्रहाचे हे विनोदी काव्यशास्त्र ऐकून सर्वजण पोट धरधरून हसले. आता पुन्हा जेव्हा लाडू वाढायला घेतले तेव्हा सारे कसे सावध झाले आणि आपला नकार 'व्याघ्रझंपने'ने प्रकट केला. एकूण स्वामींच्या विनोदी बुद्धीवर सारे जण खूष झाले.

बार्शीच्या उत्तरेश्वर क्लबातील सारे सभासद स्वामींच्या शिष्यभक्तांपैकी होते. ही मंडळी रोज सायंकाळी उत्तरेश्वराच्या दर्शनास जात. नंतर तेथून पुढे तलावाच्या बंधाऱ्याकडे फिरावयास जात. तेथे हिंगण नावाच्या झाडावर यातील मंडळी चढून

हवा खात, गप्पागोष्टी करीत बसत. प्रत्येकाचे झाड, फांदी बसण्याचे ठिकाण ठरून गेले होते त्या त्या ठिकाणी ते बसत. या नित्यक्रमात यावेळी स्वामीपण सामील झाले.

स्वामी पहिल्यांदा संध्याकाळी जेव्हा फिरावयास गेले होते त्या दिवशीची घटना आहे. उत्तरेश्वराचे दर्शन घेऊन सर्वजण हिंगण झाडाकडे गेले. बोलता बोलता नेहमीच्या झाडावर बसून हवा खाण्याची गोष्ट निघाली. पण आज बरोबर स्वामी असल्याने कोणीच झाडावर चढले नाही. सर्वजण बंधाऱ्यावर झाडाखाली बसणार इतक्यात स्वामींनी छाटी आवरली आणि तरातरा झाडावर चढले. उंच जाऊन एक सुंदरशी फांदी पाहून तिच्या तिकाटण्यात पाय सोडून, टेकून बसले. स्वामी जेथे बसले ती जागा महाराजांच्या नेहमीच्या फांदीच्या वरच्या फांदीवर होती. स्वामी बसल्यावर महाराज त्यांच्या नेहमीच्या जागेवर म्हणजे स्वामींच्या चरणांपाशी जाऊन बसले. बाकीचे आपापल्या जागेवर जाऊन बसले. आज सगळ्यांना विशेष कुतूहल वाटत होते ते याचे की स्वामींना जागा माहीत नसताना बरोबर नेमक्या, योग्य जागेवर जाऊन बसले. झाडावर बसतानासुद्धा स्वामी गुरुस्थानी बसले होते. न सांगता योगायोगाने बसले होते.

एकदा असेच संध्याकाळी फिरावयास जाताना आसनांचा विषय निघाला होता. स्वामींना आसने वगैरे चांगली येत होती. तेव्हा मयुरासनाचे प्रात्यक्षिक दाखविण्याची त्यांना इच्छा झाली. शेतातून चालले होते. एकदम मध्येच थांबले, सर्वांना गोलाकार उभे करून, हाताने शेतजमीन साफ करून, शेतामध्येच उत्तम मयुरासन करून दाखविले. महाराज पहात होतेच. निर्दोष, समांतर स्थिर स्थितीतील ते स्वामींनी केलेले मयुरासन पाहून महाराजांना फार समाधान झाले. बाकी सर्वांना स्वामींच्या या विषयाची तयारी पाहून आनंद झाला.

बार्शीच्या निमित्ताने स्वामींना महाराष्ट्राचे अंतर्दर्शन जवळून होत होते. भारतातील विविध ठिकाणांचे धार्मिक आचाराचे कमी जास्त स्वरूप त्यांच्या ऐकण्यात होते. उत्तरेकडे धार्मिक आचार पाळण्याचे निर्बंध अगदी सैल आहेत तर दक्षिणेकडे आचारांचा कर्मठपणा अतिशयोक्तीच्या दुसऱ्या टोकाला गेलेला आढळतो. पण महाराष्ट्रात मात्र आचारांचा सुवर्णमध्य संभाळला जातो. समतोल राखला जातो. वर्तमान काळात धार्मिक प्रवृत्तींचा ऱ्हास सर्वत्र होत असल्याचे आपण पाहात आहोत. परंतु महाराष्ट्रात आजही तुलनेने पहाता धार्मिक प्रवृत्तींच्या लोकांकडून जसे आचार

पाळले जातात तसे अन्यत्र आढळत नाहीत. येथे आचारांचे फाजील स्तोम नाही किंवा अनुचित संकोच नाही. धर्मशास्त्राच्या कसोटीवर मोजून मापून वाटचाल करणारी महाराष्ट्रीय मंडळी आहेत. असे स्वामींच्या ध्यानांत आले होते. तसे त्यांनी अनेक वेळा बोलून दाखविले होते. त्यांच्या पत्रातूनही हा उल्लेख आढळतो.

महाराष्ट्रीय जनतेची ही धर्मशास्त्राकडे समर्पक दृष्टि असल्याने, स्वामींनी संन्यास घेतला पण दंड घेतला नाही ही उणीव महाराष्ट्रीय डोळ्यांना जाणवत होती. याचा स्वामींना अंदाज आला होता. दण्डधारी संन्याशाचा जो आदर महाराष्ट्रीय लोक करू शकतात तेवढा ते दंड नसलेल्या संन्याशाचा करतीलच याची खात्री नाही. याची जाणीव स्वामींना होत होती.

या काळात वे. शा. सं. प्रल्हादशास्त्रींचे सुपुत्र श्री. दादाशास्त्री यांनाही स्वामींच्या सेवेची खूप संधि मिळाली. त्यांच्या छाट्या धुणे, खोली स्वच्छ करणे, भिक्षेची तयारी करणे, भांडी घासणे इ. अनेक प्रकारची कामे दादाशास्त्रींनी केली आहेत. त्यांच्याच घरी स्वामींचा निवास असल्याने अनंत जन्मींचे पुण्यच उदयास आले होते.

एकदा त्यांचे घरी सामुदायिक बैठकीस सर्व साधक मंडळी येऊन बसली होती. स्वामीपण होते. त्यावेळी काही कामानिमित्त त्या साधनेच्या खोलीत जाण्याचा प्रसंग दादाशास्त्रींच्यावर आला. त्यावेळी ते वयाने लहान होते. साधनेसंबंधी त्यांना काही कल्पनाच नव्हती. परंतु घरातील सुसंस्कृत वातावरणामुळे त्यांनी हळूच दार उघडले व दाराच्या फटीतूनच आत शिरले व दार लावून घेतले. आत जाऊन आपले काम उरकले. कुठे पायाचा आवाज नाही की दाराचा आवाज नाही. इतक्या शांततेने काम करून ते बाहेर गेले. स्वामीजींनी दादाशास्त्रींची ही शांत व औचित्यपूर्ण हालचाल पाहिली. त्यांना फार बरे वाटले. दुसऱ्या दिवशी या छोट्या घटनेचा स्वामींनी मोठ्या प्रेमाने उल्लेख केला. म्हणाले "परमार्थाच्या साधन मार्गामध्ये परहितदक्षवृत्तीचे लोक लागतात. कालची शांततेला विचलित न करणारी दादाची हालचाल लक्षात रहाण्यासारखी होती." असे होता होता बार्शीचा चातुर्मास समाप्त झाला.

## दण्डग्रहणाने चिन्मयानंद–स्वामी लोकनाथतीर्थ झाले

स्वामींचा बार्शीमध्ये इ. स. १९२५ चा चातुर्मास झाला. स्थलांतराचे निमित्त करून त्यांनी बार्शी सोडली. ते मध्य प्रदेशातील सागर या ठिकाणी आले. तेथे त्यांचे एक भक्त, विनायक नारायण भट, हे राहात होते. त्यांचेकडे ते अचानकपणे १२ सप्टेंबर १९२५ च्या मध्यरात्रीला बारा वाजता दत्त म्हणून हजर झाले. त्यांना आनंदाश्चर्याचा धक्काच बसला. तशा रात्री त्यांनी स्वामींची सर्व व्यवस्था उत्तम रीतीने केली. शिष्यभाव जागृत असला म्हणजे काय उणे पडणार! त्यांचेकडे काही दिवस मुक्काम करून स्वामीजी त्याच गावात श्री. गंगाधर माधवराव परांडे यांचेकडे मुक्कामास गेले. हे परांडे म्हणजे सबजज्जांचे बंधू.

इकडे याच कालावधीत महाराजांनी स्वामींच्या सांगण्याप्रमाणे श्री. बापूसाहेब कुबडे व श्री. व्यंकटराव कुलकर्णी यांच्या गावी जाऊन दीक्षा दिली. ही दीक्षा झाल्याचे वृत्त महाराजांनी स्वामींना कळविल्यावर त्यांना फार आनंद झाला. स्वामींनी सागरला नारायणराव नावाच्या एका महाराष्ट्रीय सज्जनाला दीक्षा दिली. स्वामी जवळ जवळ एक महिनाभर सागरला राहिले. नंतर तेथून ते परत हुशंगाबादेस येऊन राहिले.

या खेपेस स्वामी हुशंगाबादेत वर्ष, सव्वा वर्ष राहिले. ऋषिकुलामध्ये त्यांचे वास्तव्य होते. तेव्हा भिक्षादिची चिंता नव्हती. गावात शिष्य, भक्त, ओळखीचे लोक बरेच झाले होते. स्वामींच्या अडीअडचणींकडे कोणाचे तरी लक्ष असायचे. तरी स्वामींचा निःस्पृह स्वभाव, त्यांना सर्वांपासून अलिप्त ठेवीत असे. त्यामुळें दैनंदिन जीवनात त्यांच्या अडीअडचणी चालू असत. तिकडे दुर्लक्ष करून, आनंदात व प्रसन्नतेत राहण्याची स्वामींची हातोटी काही निराळीच असे.

या कालावधीत मधून मधून स्वामींची प्रकृति सर्दीपडशाच्या विकाराने बरीच बिघडत होती. पुन्हा सुधारतही होती. खोकला मोठा तापदायक झाला होता. स्वतःच्या शारीरिक व्याधीवर ते आग्रहपूर्वक उपाय करीत नसत. बहुतेक वेळा लंघन करून ते व्याधींचा उपशम करीत असत. पण कधी कोणी शिष्याने वा हितचिंतकाने रोगनिवारणार्थ काही उपाय सुचवून औषध योजना केली तर त्याच्या मनाला संतोष वाटण्यासाठी स्वामी औषधी वगैरे सेवन करीत असत. तसा

त्यांचा आग्रही स्वभाव नव्हता. उलट स्वामी फार सरळ स्वभावाचे होते. कोणीही काहीही उपाय सांगितला तरी सरळ भोळया भावाने ते तसे करीत असत. त्यामध्ये त्यांच्या मनात विकल्प कधी येत नसे.

एकदा असे झाले की काही हितचिंतकांनी स्वामींना सर्दी पडसे आणि खोकला यांनी जर्जर झालेले पाहिले आणि त्यांना स्वामींच्या बद्दल फार कळकळ वाटली. बिचाऱ्यांच्या मनाला जे वाटले, ते त्यांनी स्वामींना सांगितले. अगदी मनापासून आवर्जून सांगितले. स्वामींना त्यांनी विड्या आणून दिल्या. पेटवून दिल्या. आणि केवळ सर्दीची व्याधि शमनासाठी ओढायला सांगितल्या. विशेष आश्चर्य की स्वामींनी त्याबर शंकाही उपस्थित न करता विड्या ओढल्या. हा धूम्रोपाय काही सतके चालू होता. त्यावेळी कोणी त्यांना या संबंधी खोचक प्रश्न विचारला त्यावर त्यांनी आचार्यांचे आत्मषटका मधील पुढील श्लोक म्हणून दाखविला—

**न पुण्यं, न पापं, न सौख्यं न दुःखम् ।**
**न मंत्रो, न तीर्थं, न वेदा, न यज्ञाः ॥**
**अहं भोजनं नैव भोज्यं न भोक्ता ।**
**चिदानंदरूपः शिवोऽहं शिवोऽहम् ॥ १ ॥**

स्वामींची नेहमीची प्रसन्नता कधीही, अगदी भयंकर दुखण्यातही, कमी होत नसे याचे मर्म या उत्तरादाखल दिलेल्या श्लोकात आहे.

स्वामींनी या काळात पाठविलेली काही पत्रे त्यांच्यासंबंधी थोडीफार माहिती देतात.

नारायण हुशंगाबाद
३१–१–२६

कल्याण भाजन वामन यास

नारायण स्मरणपूर्वक आशीर्वाद ।

....सध्या मीसुद्धा खूप दुःख भोगीत आहे. डिसेंबरपासून अद्यापपर्यंत जीर्णज्वर, कडकी, मलावरोध आणि मंदाग्नि या व्याधीमुळे फार त्रास होत आहे. कोणताही उपाय लागू पडत नाही. काही दिवस तरी हा भोग भोगल्याशिवाय यातून सुटका दिसत नाही. असल्या जोरदार प्रारब्धगतीमुळे मला स्थानांतर करून जाण्याचेंही

सामर्थ्य नाही. जे नशिबी आहे ते भोगलेच पाहिजे. **आपण दोघेही अपराधीच आहोत. जे होईल ते पाहू या. आपत्तीमध्ये धैर्य खचू न देणे हे बुद्धिमंतांचे कर्तव्य आहे. इति.**

आशीर्वादक

पुनश्च— चिन्मयानंदसरस्वती

**"साधनेमध्ये कानात प्रणवोच्चार होणे हे फार मोठे शुभलक्षण आहे"**

नारायण हुशंगाबाद

२०-९-२६

....नारायण स्मरणपूर्वक आशीर्वाद.

बरेच दिवस होऊन गेले. आपल्याकडून एकही पत्र आले नाही. यामुळे मी काळजीत आहे. आश्चर्याची गोष्ट आहे की मी विरक्त अंतःकरणाचा संन्यासी असूनही तुम्हाला विसरलो नाही. आपण मात्र एक व्यवहारी पुरुष असूनही मला विसरून गेलात!

असो. झाले ते झाले. त्याचे दुःख करू नका..... पत्रोत्तर देऊन माझी काळजी दूर करावी.

आशीर्वादक,
चिन्मयानंदसरस्वती

नारायण हुशंगाबाद

१४।१२।२६

....नारायण स्मरणपूर्वक आशीर्वाद.

....मी स्वामीमहाराजांच्या पत्राची वाट पहात येथे मुक्काम करून राहिलो आहे.

....कोणतेही काम स्वतःच्या इच्छेने करू देत नाही.

....सध्या केवळ काशीला जाण्याची एकसारखी प्रेरणा अन्तर्यामी करीत आहे. पुढे नारायण जेथे ठेवील ते आपल्याला अवश्य लिहीन. इति.

आशीर्वादक
चिन्मयानंद सरस्वती

पुढे पुढे स्वामींचे हे वर्ष फार खडतर गेले. माधुकरी मागून भिक्षा करणेही जड गेले. आजारात तर कधी कधी लोटाभर पाणी देण्यासाठीही कोणी जवळ नसे. लोकांचा विचित्र व्यवहार स्वामींना उसह्य होत असे. अशा वेळी त्यांचे रौद्रस्वरूप पाहून विश्वाचा प्रलयकाल येऊन ठेपल्याचा भास होत असे. मेघांचा गडगडाट आणि विजांचा कडकडाट यामध्ये गर्जना आणि आग प्रचंड असली तरी त्यात षड्रिपूंचा कामक्रोधादिंचा दुर्गंध नसतो. तसे रौद्रस्वरूप स्वामींचे असे. फक्त गडगडाट आणि कडकडाट ! तोही विजेप्रमाणेच क्वचित् केव्हा तरी !

## स्वामी दण्डधारी झाले !

## आता "चिन्मयानंद" "लोकनाथ" झाले ! !

स्वामींचे श्रीगुरु श्रीमदात्मानंदप्रकाश ब्रह्मचारीजी श्रीक्षेत्र काशीमध्ये येऊन राहिलेले होते. त्यांनी अद्याप संन्यास ग्रहण केलेला नव्हता. परमगुरुदेव श्रीनारायण-तीर्थदेव बंगालमध्ये मदारीपूर येथे ज्ञानसाधन मठात होते. त्यांनी या वेळेस श्रीमदात्मानंदांना संन्यास घेण्यास अनुज्ञा दिली. त्यांनी सांगितले :—

"आपण जगन्नाथपुरीच्या आचार्यपीठाचे 'तीर्थ' परंपरेचे संन्यासी आहोत. आमचा व आमचे श्रीगुरुमहाराज गंगाधरतीर्थस्वामींचा संन्यास याच गोवर्धन-पीठाधीश्वर श्रीमत्शंकराचार्यांचेकडून झालेला आहे. म्हणून तुम्हीसुद्धा त्याच पीठाकडून संन्यास घ्यावा.

हा इ. स. १९२६ चा काळ होता. श्रीजगन्नाथपुरीच्या आचार्यपीठावर श्रीश्रीस्वामीभारतीकृष्णतीर्थजी महाराज गादीवर विराजमान झाले होते. त्यांच्या भेटीसाठी श्रीमदात्मानंदप्रकाश ब्रह्मचारीजी जगन्नाथपुरीला गेले होते. त्यावेळी श्रीमत्शंकराचार्य कलकत्त्यास गेले हे समजल्यावर श्रीमदात्मानंदजीमहाराज त्यांना भेटण्यास कलकत्त्यास गेले. तेथे त्यांची भेट झाली. संन्यास होण्याची प्रार्थना केली. प्रश्नोत्तरे झाली. परमगुरुदेव श्रीनारायणतीर्थ स्वामींची अनुज्ञा असल्याचे सांगितले. एकूण माहिती ऐकूण श्रीमत्शंकराचार्यांची खात्री झाली. संन्यास ग्रहण करण्यास अधिकारी पुरुष आहे हे पटले. त्यांनी शिवरात्रीचा शुभदिवस संन्यास दीक्षेस सांगितला. त्यावेळी आचार्यांचा मुक्काम दिल्लीमध्ये असणार असल्याने तेथे दिल्लीला यमुनेच्या तीरावर हा विधि झाला. तेव्हा श्रीमदात्मानंद दण्डधारी संन्यासी झाले.

इ. स. १९२६ मध्ये श्रीमदात्मानंद ब्रह्मचारीजी याप्रमाणे संन्यास घेऊन योगपट "श्रीस्वामी शंकरपुरुषोत्तमतीर्थ महाराज" झाले. यानंतर ते आठ महिने पुरीच्या आचार्यांच्या मठात राहिले. स्वामी चिन्मयानंद सरस्वतींनी ढाक्क्याच्या सरस्वती-मठाधिपति स्वामी त्रिपुरलिंग सरस्वती महाराजांकडून इ. स. १९१४ मध्येच संन्यास घेतला होता. त्यावेळी त्यांना श्रीमदात्मानंदांनी सांगितले म्हणून संन्यास घेतला. त्याला आता बारा वर्षे पूर्ण झाली. स्वामींच्या गुरूंनी बारा वर्षांनंतर संन्यास घेतला. आपल्या गुरूंनी संन्यास घेतला. दण्ड घेतला. आता त्यांचे नाव स्वामी शंकर-पुरुषोत्तम तीर्थ महाराज झाले. या गोष्टी स्वामींच्या कानावर आल्या. त्यांनी पत्राने आपली इच्छा कळविली.

"मी संन्यास आश्रम स्वीकारला असला तरी दण्डग्रहण केल्याखेरीज तो आश्रम पूर्ण होऊ शकत नाही. मला महाराष्ट्रातील विद्वान हेच सांगत आहेत. दण्ड घेणे मला अनुकूल असेच आहे. व दंडग्रहण करण्याची माझीही इच्छा आहे. आपण दंडग्रहण केलेला असल्याने माझी अडचण दूर झालेली आहे. तेव्हा अनुकूल उत्तर यावे ही प्रार्थना."

या पत्राचे उत्तर त्यांना हवे होते. म्हणून स्वामी काशीहून गुरुमहाराजांच्या पत्राची वाट पहात होते. त्याप्रमाणे पत्र आले. स्वामी ७ जाने. १९२७ ला काशीला पोहोचले.

स्वामींनी आपल्या गुरूंना संन्यास वेषात प्रथमच पाहिले. त्यांचे ते दण्डधारी कौपिनवस्त्रधारी स्वरूप पाहून स्वामींना फार फार आनंद झाला. आपल्या दण्डधारी संन्यासी गुरूंना स्वामींनी साष्टांग नमस्कार केला. औपचारिक बोलणी झाली. वृत्तकथन झाले. नंतर स्वामींनी आपल्या दण्डग्रहणाच्या इच्छेचा उच्चार केला. श्रीगुरुदेव आपल्या शिष्यावर अतिसंतुष्ट झालेले होते. दण्ड देण्याचे त्यांनी मान्यही केले. फार विलंब न लावता थोड्याच दिवसात स्वामींचे दण्डग्रहण विधान झाले.

यासंबंधीचे स्वामींचे पत्र पुढीलप्रमाणे आले.

नारायण

८।२० वारागभीर स्ट्रीट
बनारस सिटी
२२–२–२७

नारायण स्मरण विशेष समाचार।

तुम्हा लोकांच्या मासगणनेप्रमाणे पौष कृ. १२ (वद्य द्वादशी) च्या दिवशी

विधिवत् दण्डग्रहण झाले. माझे पहिले नावही बदलले गेले आहे. माझा दण्ड ग्रहण-विधि माझे दीक्षागुरुमहाराजांचेकडूनच झाला आहे. माझ्या गुरुमहाराजांनी माझे नाव "लोकनाथतीर्थ" ठेवले आहे. आता या नावाने लिहावे. मी दण्डग्रहण केल्याची बातमी बार्शीला कळवावी. **इति**

शुभाकांक्षी
लोकनाथतीर्थ

याप्रमाणे स्वामींनी रविवार दिनांक ३० जानेवारी १९२७; पौष व॥ १२ शके १८४८, मूळ नक्षत्रावर दण्डग्रहण केला. त्यांचे दीक्षागुरु श्रीमदात्मानंद स्वामी-महाराज यांनीच दण्डीसंन्यास घेऊन श्रीशंकरपुरुषोत्तम तीर्थस्वामीमहाराज हे नवीन नामकरण झाल्यावर श्रीचिन्मयानंदसरस्वतीना दण्ड दिला आहे. यानंतर त्यांचे नाव 'श्रीलोकनाथतीर्थ' ठेवले. श्रीक्षेत्र गयेस हा समारंभ विधिपूर्वक झाला. यानंतर श्रीगुरुमहाराज श्रीशंकर पुरुषोत्तमतीर्थस्वामीमहाराज गयेस राहिले. स्वामी श्रीलोकनाथ-तीर्थस्वामीमहाराज काशीला गेले. त्यांनी आपला यावेळचा चातुर्मास काशीत श्रीगुरुसान्निध्यात घालविला.

चातुर्मास समाप्तीनंतर दि. १७-१०-२७ ला स्वामी लोकनाथतीर्थ मध्य प्रदेशा-तील दमोह गावी काही दिवस राहून सागरला श्री. परांडे यांचेकडे गेले. त्यानंतर स्वामी दंडग्रहण केल्यावर प्रथम पुण्यास श्रीगुरुमहाराजांकडे आले.

## स्वामी लोकनाथतीर्थ प्रथम पुण्यात !

स्वामींचा दक्षिणेकडे ऋणानुबंध संबंध असल्याचे स्पष्ट दिसते. यामुळे ते वारंवार महाराष्ट्र व मध्य प्रदेशात घरच्यासारखे आलेले दिसतात. उत्तरेकडे ते फार काळ थांबू शकत नसत. त्यांना दक्षिणेकडे जाण्याची वारंवार प्रेरणा होत असे. त्याप्रमाणे तेही निःशंक मनाने इकडे निघून येत असत. इ. स. १९२४ ते २६ या काळात ते बार्शीत दोनदा येऊन गेले. पण पुण्याला येण्याचा योग तसा आला नव्हता.

स्वामींचा आणि श्रीगुरुमहाराजांचा संबंध असा होता की स्वामीजी आपल्या या प्रिय शिष्याकडे वात्सल्याच्या ओढीने येत असत. महाराज बार्शीत होते तेव्हां स्वामी बार्शीला गेले. आता महाराज बार्शीची नोकरी सोडून पुण्यास आले तर स्वामीजी

इकडे पुण्यास आले. सद्गुरूंचे प्रेम मातेसारखे असते. माता पुत्राला सोडू शकत नाही. तसे यांचे होते. दण्डधारण केल्यावर फिरत फिरत स्वामीजी इ. स. १९२८ मध्ये प्रथम पुण्यास आले.

स्वामीजी पुण्याला येण्याची बातमी पत्राने महाराजांना समजली. ठरल्या-वेळेप्रमाणे त्यांना उतरवून घेण्यासाठी महाराज स्टेशनवर गेले. त्यांना टांग्यामधून घरी म्हणजे, नारायण पेठेतील गोवईकरांच्या चाळीत, आणले. स्वामीजी घरी येताच महाराजांनी, त्यांच्या आईने, त्यांच्या भगिनींने आणि एका तरुणाने स्वामींना नमस्कार केला. स्वामींना आसनावर बसविले.

'हा तरुण कोण आहे?' स्वामींनी विचारल्यावर माझे शेजारी आहेत, भुजंगराव भालेराव, म्हणून उत्तर दिले. या पहिल्याच भेटीत स्वामी म्हणाले, "ना, ना, हे शेजारी नाहीत तुमचे कुटुंबीय आहेत" तेथे याशिवाय आणखी कोणी नव्हते. सारे वातावरण शांत प्रशांत प्रसन्न होते. इकडच्या तिकडच्या वार्तेची बोलणी झाली आणि नित्यक्रम सुरू झाला.

भल्या पहाटे स्वामींच्यासह साधना सुरू झाली. महाराज नूतन मराठी विद्यालयात ड्रॉईंग मास्तर असल्याने त्यांना त्यांचे सर्व नित्यकर्म, भोजन इत्यादि उरकून ठीक ११ ला शाळेत जावे लागे. त्यामुळे स्वामींचे स्नान, आन्हिक व भिक्षा भोजन महाराजांचे बरोबर होत असे. दुपारी स्वामींची निवांत विश्रांति होत असे. ते प्रथमच पुण्यास आलेले होते. परिचय असा कोणाचाच नव्हता. त्यामुळे त्यांचा दुपारचा वेळ वाचन व सक्तीची विश्रांति यामध्ये जाई. स्वामींना एकांत प्रिय होता. त्यांची विश्रांति म्हणजे आसनावर आसन लावून डोळे मिटून तासन् तास 'त्या' धुंदीमध्ये बसून रहाणे ही होती. 'अरति जन संसदि' 'एकांतप्रियता' हा स्वामींचा स्वभाव असल्याने त्यांना दुपार कधीच कंटाळवाणी गेली नाही.

सायंकाळी महाराज शाळेतून आले की ते दोघे फिरावयास जात. पुष्कळ वेळा भुजंगराव बरोबर असत. सुरुवातीला स्वामी फारसे बोलत नसत. कारणापुरते, प्रश्नाच्या समर्पक उत्तरापुरते बोलत असत. त्यामुळे फिरण्याच्या वेळी गप्पागोष्टी फारशा होत नसत. पुण्याची माहिती सांगण्याचे काम या दोघांचे मधून मधून चालत असे. फिरण्याचा कार्यक्रम तासा दीड तासाचा, कुठेही विशेष न थांबता, शक्यतो रोज

बदलत्या मार्गांचा, असा होत असे. फिरून आल्यावर सायंसंध्या, आरती, साधना, थोडा फराळ हाही ठरलेला असे. ठरलेल्या नित्यक्रमात बदल क्वचित् होई. रात्री भोजन वर्ज्य होते. त्यामुळे बाकीचे नित्याचे कार्यक्रम शांत चित्ताने चालत असत. रात्री आठच्या आत संध्या, आरती, फराळ झाला की पुन्हा वातावरण निवांत होत असे.

नारायण पेठेत महाराज दोन खोल्यांच्या जागेत रहात असत. भव्य दरवाज्याच्या दिंडीमधून आत वाड्यात प्रवेश केला की भले मोठे आंगण लागते. त्या आंगणाच्या चारही बाजूंनी खोल्या काढलेल्या व त्या बिऱ्हाडांना भाड्याने दिलेल्या. सभोवारची ही इमारत दुमजली आहे. आंगणाच्या मध्यभागी आयताकृति बंदिस्त कुंपणातली बाग गोवईकरांच्या मालकीची आहे. नगरपालिकेच्या पाण्याच्या नळाची सोय, फक्त याच बिऱ्हाडकरूला स्वतंत्र आहे. याशिवाय उत्तम पाण्याच्या विहिरीवर पंप बसविलेली पाण्याची सोय, सर्व बिऱ्हाडकरूंना सार्वजनिक आहे. या चाळीत एकूण बिऱ्हाडे पन्नास आहेत. तेव्हा आंगणात येताच डाव्या बाजूला वळून समोरच्या खोलीत गेलो की तीच महाराजांची जागा. बाहेरच्या खोलीच्या मागे आतली दुसरी खोली. दरवाजासमोर एक खिडकी आणि दरवाज्याच्या जवळच्या खिडकीसमोर एक खिडकी अशा दोन खिडक्या या दोन खोल्यांच्या मधल्या भिंतीला आहेत. बाहेरच्या खोलीत गेलो की डाव्या बाजूला आतल्या खोलीत जाण्यासाठी दरवाजा आहे. त्या दरवाज्यामधून आत पाऊल टाकले की डाव्या बाजूला ४ ' × ६ ' ची उघडी मोरी आहे. उजव्या बाजूला वळून पुढे गेल्यावर आतली खोली लागते. तशी जागा लहान, कारण प्रत्येक खोली साधारणपणे ११ ' × ९ ' ची. त्यातच मोरी. असे असले तरी नळ, सोवळे, ओवळे, सुरक्षितता, अल्प भाडे या दृष्टीने जागा पसंत केली होती. याच जागेत महाराजांचा मुक्काम इ. स. १९२६ ते १९६४ एवढा प्रदीर्घ राहिलेला आहे. या जागेत स्वामी इ. स. १९२८ ते १९५१ पर्यंत अनेक वेळा येऊन महिनोन महिने राहून गेले आहेत. याच जागेत अनेक महापुरुष, संन्यासी, साधू , तपस्वी येऊन राहून गेले आहेत. महाराजांच्या आईसाहेब आणि श्रीगोदावरीभगिनींसारख्या महासाध्वी येथे बराच काळ राहिल्या आहेत. त्याहीपेक्षा विशेष हे की याच जागेत महाराज हे ड्रॉईंग मास्तरचे योगिराज, सद्गुरुमहाराज, दत्तप्रभु झालेले आहेत. या जागेत अनेक अनुष्ठाने झाली, पारायणे झाली, अन्नसंतर्पणे झाली, दीक्षा झाल्या, साधना झाल्या, दिव्य अनुभूतींचे चमत्कार झाले ! अशी ही जागा सिद्धभूमि झाली याचे मुख्य कारण

स्वामी श्री. लोकनाथतीर्थांच्या पदस्पर्शाने आणि वास्तव्याने या खोलीमध्ये आगळे चतन्य निर्माण झाले. ही जागाच शक्तिसंचारित झाली.

तेव्हां आतल्या खोलीतील दारासमोरच्या खिडकीमागच्या कोपऱ्यात, उत्तराभिमुख होऊन महाराज आपले नित्यानुष्ठान आणि साधना करीत असत. थोडे पुढे वाकले की खिडकीतून दारात कोणी आलेले दिसत असे. आणि ताठ बसले की आपोआप शरीर सर्वांच्या दृष्टीआड होत असे. बाहेरच्या दाराजवळच्या खिडकीपाशी स्वामींचा बाडबिस्तरा असे. तेथे त्यांचे आसन, कमण्डलू, दंड, वळकटी आवरून सावरून ठेवलेले असे. स्वामींना समोरच्या खिडकीतून आतल्या खोलीतील देवांचे दर्शन होत असे. थोडी उजवीकडे दृष्टी टाकली तर दुसऱ्या खिडकीतून महाराजांची दृष्टादृष्ट होत असे. स्वामींनी समोरच्या खिडकीतून थोडी डावीकडे दृष्टि वळवली की आतल्या खोलीत महाराजांच्या समोरच्या बाजूला बसलेल्या आई व भगिनी दिसत असत.

रात्रीचे नित्याचे कार्यक्रम उरकून स्वामीसहित सर्वजण रात्री आठ साडेआठला अगदी मोकळे होत असत. प्रत्येकाचे मनात कुठे नामजप, स्तोत्रपाठ असे चालू असे. खोलीतील वातावरण अतीव नीरव शांत असे. कुणी येत नसे कुणी जात नसे. अगदीच कुणी आले तर भुजंगराव भालेराव. बस्स. मग कुणी नाही. अशा शांत वेळी स्वामींना गाण्याची लहर येई. ते हळू हळू एकेक चरण घोळून घोळून, आपल्या मनाशीच म्हणू लागत. स्वामींचा आवाज गोड होता. आवाजाला भाव जागृत करणारी कंपने होती. स्वामी स्वतःच इतके भावुक होते की ते पदाच्या चरणांत आणि शब्दात तल्लीन होऊन जात असत. स्वामींचे गाणे सुरू झाले की त्या खोलीतील स्तब्ध चैतन्य विद्युत्संचारी होत असे. मग ते पद बंगाली असो की हिन्दी असो. त्या पद्य चरणाचा अर्थ ध्यानात येवो वा न येवो. त्या पदातील देवतांच्या नावामुळे, किंवा त्यातील एखाद्या संस्कृत शब्दामुळे अर्थाचे अनुमान लागत असे. हृदयातील भावभक्ति उंचबळून येण्यास तेवढे पुरे होई. स्वामींच्या भावपूर्ण स्वरलहरींनी तर भक्तिप्रेमाची तीव्रता फारच वाढत असे. मधून मधून ही गोड गाण्याची मेजवानी होत असे. ऐकणारे मात्र मर्यादित होते. स्वामी अशी पदे म्हणतांना चैतन्यप्रभूंसारखे रंगून जात असत. स्वामींचे पाठांतर चांगलेच होते. पदांचा साठा भरपूर असे. तास दीड तास कार्यक्रम चालत असे. हा कार्यक्रम म्हणजे भगवत्प्रेमाच्या आनंदाचा प्रत्यक्ष ब्रह्मानंदच अनुभवावयास मिळत असे.

तरुण दण्डी स्वामी ।



गयेस दण्डग्रहण झाले । 'चिन्मयानंद' दण्डी झाले ।
'लोकनाथ' नाव ठेविले । 'शंकर पुरुषोत्तम' गुरुराये ॥

छायाचित्र-श्रीं. भास्करराव भागवत, दौंड मुक्कामी (१९२८)



पुण्यातील श्रीगुरुमहाराजांचे १९२६ ते १९६४ पर्यंतचे निवासस्थान
'२० नारायण पेठ' येथे स्वामींचेही खूप वास्तव्य झाले.



२० नारायण पेठेतील, खिडकीजवळचे (वरच्या चित्रातील खिडकीची आंतील बाजू )
स्वामींचे विसाव्याच्या बैठकीचे स्थान

## " त्वया नियुक्तोस्मि तथा करोमि "

स्वामी इ. स. १९२८ च्या मार्च महिन्याच्या शेवटी शेवटी पुण्यास आले. १०।१५ दिवस २० नारायण पेठ, गोवईकरांच्या चाळीत महाराजांच्या निवासस्थानी मुक्काम झाला. या काळात श्री. नाना ऊर्फ भुजंगराव भालेराव यांना दीक्षा झाली. नानांचे परमभाग्य असे होते की ते पुण्यास आले काय, गोवईकरांच्या चाळीत जागा मिळाली काय, महाराजांचा सहवास मिळाला काय, स्वामींची दीक्षा झाली काय ! सारे कसे ईश्वरी लीलेच्या सूत्राने घडत होते. श्री. नानांचा स्वामींच्या जीवन चरित्रात खूप संबंध आला आहे. उभयतांचा सहवासही भरपूर घडला आहे. यासाठी नानांच्या जीवनाची थोडीशी माहिती आपल्याला असणे आवश्यक आहे.

महाराज १९२६ मध्ये पुण्यात आले. गोवईकरांच्या चाळीत बिऱ्हाड केले. तत्पूर्वी ४।२ महिने आधी मराठवाड्यातील, उस्मानाबाद जिल्ह्यामधील डोणजे गावाहून श्री. नाना भालेराव हे याच पुण्यात राहण्यास आले होते. दोघांच्या खोल्यामध्ये एक खोलीचे अंतर होते. वैद्य मास्तरांचेमुळे त्या परस्परांचा योगपूर्व परिचय होता. पण शेजारी म्हणून परिचय अधिकच झाला. अध्यात्माच्या समानशीलत्वामुळे स्नेह जडला आणि 'गुणी गुणं वेत्ति' या न्यायाने वाढत गेलेल्या प्रगाढ स्नेहाचे रुपांतर एका कुटुंबात झाले.

नानांचे वडील बळवंतराव भालेराव म्हणजे मराठवाड्यातील डोणजाचे एक सधन–संपन्न, मातब्बर कुळकर्णी वतनदार ! तेथे त्यांचा चौसोपी ऐसपैस वाडा, शेकडो एकराची बागायती व जिराइत जमीन ! गायी, म्हशी, बैल, घोडे, वासरे यांनी भरलेला प्रशस्त गोठा ! दारासमोर गाडी ! नोकरचाकर, पाहुणेराहुळे, शेतकरी यांनी गजबजलेले घर ! धान्याच्या राशी घरात लागलेल्या ! अशा संपन्नतेचे हे घराणे. वाडवडिलांच्या पुण्याईने चालत आलेली ही संपन्नता होती. घरामध्ये शास्त्रशुद्ध आचरण पाळले जात होते. दानधर्म केला जात होता. तप अनुष्ठान केले जात होते– म्हणून तर लक्ष्मीची कृपा असे.

घरामध्ये आई वडील, चार भाऊ, भावजया, पुतणे, एवढा परिवार होता. नानांच्या वडिलांनी म्हणजे बळवंतरावांनी आपल्या कर्तृत्वावर ही एवढी इस्टेट वाढविली होती. त्यांचे कष्ट, त्यांचा सालस स्वभाव, परोपकारी वृत्ती यामुळे आस-

पासची सारी मंडळी बळवंतरावांना देवाप्रमाणे पूज्य मानीत. अशीच पुण्याई नानांच्या आईची पण होती. त्यातर इतक्या सात्त्विक, धर्मपरायण साध्वी होत्या की त्या प्रत्यक्ष अन्नपूर्णामाताच होत्या. त्यांच्या हातचे अन्न खाल्ले नाही असा एकही माणूस अवघ्या पंचक्रोशीत नव्हता. त्यांनी मृत्यूपूर्वी प्रत्यक्ष स्वर्ग पाहिल्याचे स्वतःच सांगितले व नंतर प्राण सोडले !

नानांची पहिली पंचविशी डोणज्यात आपल्या घरी गेली. त्यांना व्यायामाची फार आवड असे. जोर, बैठका, जोडी, कुस्ती, पोहणे यामध्ये ते सर्वांत पुढे असत. त्यांनी उत्तम उत्तम कुस्त्या जिंकल्या आहेत. नदीच्या पुरात पोहणे हा तर त्यांचा आवडता छंद होता. नानांची उत्तम प्रकृति हा एकमेव पुरावा वरील गुणांना पुरे आहे. त्यांची गोरीपान, उंच, भव्य शरीरयष्टि कमावलेली आहे याची सर्व लक्षणे त्यांच्या उत्तर काळातही आज स्पष्ट दिसत आहेत. नानांचे तरुणपण उत्तम व्यक्तिमत्त्वाचे आणि सात्त्विक प्रसन्नतेचे बोलके उदाहरण होते. त्यांच्या या शारीरिक सौंदर्याचे मोल वाढविले ते त्यांच्या अनेक गुणांनी. ते उत्कृष्ट वेदाभ्यासी आहेत. त्यांच्या मंत्रोच्चाराची गोडी मधुर आहे. उच्चारही स्पष्ट व अचूक आहे. त्यांच्या मंत्रोच्चारातील स्वरमाधुर्य व लयबद्धता अजाणत्यांनासुद्धा मंत्रमुग्ध करून गुंग करून टाकते. याशिवाय नानांची तयारी ज्योतिष शास्त्रात आणि वैद्यक शास्त्रातही आहे. विषयाचा सखोल अभ्यास करण्याची वृत्ति असल्याने त्यांच्या ज्ञानाला खोली आहे. वेदान्त विषयाची माहिती सूत्रवत् मुखोद्गत आहे. संगीताची शास्त्रीय माहिती अशी आहे की कसलेली चीज कोणत्या रागदारीतील आहे हे सांगायला नानांना फार वेळ लागत नाही. इतके जरी असले तरी वर्तमान शिक्षण पद्धतीतून शिक्षण न झाल्याने त्यांची सारी विद्वत्ता झाकलेली आहे. प्रसंगाने तिची ओळख पटल्याशिवाय रहात नाही. त्यांचे हस्ताक्षर मोत्यासारखे सुंदर व मोहक आहे. मोडी लिपी तर त्यांच्या उत्तम अक्षराची देणगीच आहे. असे हे गुणसंपन्न व्यक्तिमत्त्व महाराजांच्या आणि स्वामींच्या सहवासाने तेजस्वी झाले.

नानांचा विवाह लौकर झालेला होता. ते नोकरीनिमित्त पुण्यास आले. शेतीवाडीची जबाबदारी, वाटण्या न होताच, थोरल्या बंधूंच्यावर सोपवली. पुण्यात हस्ताक्षराच्या जोरावर कोर्टात नक्कल कारकुनाचे काम नानांना मिळाले. मिळणाऱ्या त्या तुटपुंज्या मिळकतीवर प्रपंच भागविणे सुरू झाले. ठेविले अनंते म्हणून सुखासमाधानाने नित्यक्रम सुरू झाला.

नानांचे मानसिक चित्र काही वेगळेच होते. त्यांची सात्त्विक प्रवृत्ति सामान्य लौकिक व्यवहारात रमत नसे. स्नानसंध्या, जपजाप्य, पूजाअर्चा, अनुष्ठान आदींमध्ये त्यांना खरा आनंद व संतोष मिळत असे. अशी प्रवृत्ति हे मनाचे अंतरंग चित्र. पुण्यात येताच महाराजांचा सहवास लाभल्याने नाना पुण्यात अशाही स्थितीत स्थिर झाले. शेतीवाडी, घरदार, इस्टेट यापेक्षा नानांना महाराजांचा सहवास अधिक मोलाचा वाटला. त्यांच्या सत्प्रवृत्तीचा अणुरेणु येथे विकसित होऊ लागल्याचा अनुभव त्यांना आनंद देऊ लागला.

नानांच्या सरळ, विनम्र, सश्रद्ध, धर्मानुष्ठानी, सेवापरायण, निगर्वी स्वभावावर महाराज अगदी संतुष्ट झाले. म्हणून स्वामी पुण्यात आले की नानांना दीक्षा देण्याचा विषय आपणहून काढण्याचे महाराजांनी ठरविले. त्याप्रमाणे स्वामी आल्यावर योग्य वेळ पाहून नानांचा विषय काढला. स्वामींनाही रोज नानांचा सहवास मिळाल्याने त्यांच्याही मनात नानांच्याबद्दल स्नेहबुद्धि जागृत झाली. त्यांच्या गप्पागोष्टी खूप होऊ लागल्या. नानांच्यावर स्वामीजी अगदी प्रसन्न झाले. मार्च महिन्याच्या शेवटी शेवटी, एक चांगला दिवस पाहून स्वामींच्याकडून नानांना दीक्षा झाली.

सकाळी स्नानादि आह्निक उरकून नाना श्रीगुरुमहाराजांचे खोलीत आले. स्वामींना साष्टांग नमस्कार घातला. पुष्पमाला अर्पण केली. श्रीफल आणि दक्षिणा समर्पण केली. स्वामींनी समोरच्या जागेकडे बोट दाखवून आसनावर डोळे मिटून बसण्यास सांगितले. त्याप्रमाणे नाना आसनावर बसले. डोळे मिटून घेतले. स्वामींनी संकल्पपूर्वक त्यांच्या मस्तकार हात ठेवला. स्पर्श दीक्षा झाली, आणि तात्काळ नानांच्या शरीरात हळूवारपणे संवेदना सुरू झाल्या. मांडीचे आसन नीट झाले· पक्के झाले. पाठीचा कणा ताठ झाला. काही एक हालचाल न होता शरीराबरोबर मनाला स्थिरता आली. विचार उठण्याची प्रक्रिया थांबली. मन विचारशून्य झाले. किती वेळ झाला भान राहिले नाही. निर्विचार अवस्थेत वेळ प्रगाढ शांततेत गेला. एक तास अशी स्थिति राहिली होती. साधन संपताच डोळे आपोआप उघडले गेले. नानांनी स्वामींना साष्टांग नमस्कार केला.

स्वामींनी नारळाचा प्रसाद नानांना देत देत म्हणाले— "वामनच्या बरोबर बसत जा. सर्व काही उत्तम होईल."

नानांनी नम्रतेने होकार दिला.

"त्वया नियुक्तोस्मि तथा करोमि" हे भाव नानांच्या अंतःकरणात स्थिरावले होते.

## दण्डधारी स्वामी बार्शीला !

इ. स. १९२८ मधील एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात दण्डग्रहणानंतर स्वामीजी पुण्याहून बार्शीस प्रथमच आले. पहिले काही दिवस स्वामींचा मुक्काम शास्त्रीबुवांचेकडे होता. नंतर श्री. नारायणराव पुरंदरे यांनी खूप आग्रह केल्याने स्वामी काही दिवस त्यांचेकडे राहण्यास गेले. पण त्यांचेकडे काही घरगुती अडचण आल्याने स्वामी भगवंत मंदिरामध्ये मुक्कामास गेले. यामुळे बहुतेक बार्शीकर स्वामींना ओळखू लागले होते. स्वामी मात्र आपल्या साधक शिष्यांव्यतिरिक्त कोणालाही ओळखत नसत.

या वेळी स्वामींची दुपारची भिक्षा वेगवेगळ्या साधक शिष्यांकडे होत असे. रात्रीच्या वेळी श्री. मुगुटकर दूध आणून देत असत. श्री. प्रल्हादशास्त्री दूध तापवून देण्याचे काम करीत. शास्त्रीबुवा व नारायणराव पुरंदरे संत्री आणून देत. आणखीही कोणी फळे आणून देत असत. सायंकाळी फिरण्याचा कार्यक्रम झाला की संध्या, फराळ, चर्चा, वाचन इ. होत असे.

स्वामींच्या समोर साधकांचे साधन मधून मधून होत असे. पहाटे बहुतेक सामुदायिक साधन स्वामींच्या समोर होत असे. यामुळे सर्व साधक संतुष्ट असत. या खेपेस स्वामींनी आपल्या हातांनी नवा कमण्डलू तयार केला. बरेच दिवस त्यांचे हे काम चालू होते. या विशेष आकाराचे नारळ परदेशातून येतात. त्यांच्या कवचाचे हे कमण्डलू तयार करतात. नारळ काळजीपूर्वक उभा चिरावयाचा, त्याचे अंतरंग व बहिरंग हळुवारपणे स्वच्छ करावयाचे, त्यावर लाखेने आवरण चढवावयाचे अशी सर्व कामे मोठ्या कुशलतेने स्वामी करीत असत. त्यांचे काम पहात बसण्यातही कांहीना आनंद वाटत असे. कमण्डलूला वक्राकार कडी स्वामींनी बसवली. आता फक्त त्या कमण्डलूला गोमुखी तोटी बसविण्याचे बाकी होते. शास्त्रीबुवांनी स्वामींना म्हटले, जप करणारा एक चांगला तांबट गावात आहे. त्याचेकडून हे काम आपण करून घेऊ. स्वामींची मनापासून इच्छा नव्हती. पण शास्त्रीबुवांचे शब्दासाठी स्वामींनी होकार दिला. स्वामी शास्त्रीबुवांचेबरोबर त्या तांबटाकडे गेले. तो तांबट बहिरा होता. त्याला

हिंदी येत नव्हते. स्वामींना मराठी येत नव्हते. प्रल्हादशास्त्रीच काय ते दोघामधले दुभाषे. त्यांना जसे जमे तसे ते एकमेकांचे बोलणे समजावून सांगत. एकूण या प्रकारात जो विनोद होई तो शब्दी आणणे कठिण बरं! स्वामींच्या छोट्या छोट्या सूचना पुष्कळ! स्वामींचे सांगणे एक तर कामाचा प्रकार भलताच! पुन्हा ते काढून टाकून पहिल्यापासून सुरू व्हायचे. काम बिघडले की स्वामी बिघडलेच. केलेल्या सर्व कामावर पाणी! २।२, ३।३ तास या कामासाठी जाऊन कमण्डलूची गोमुखी काही नीट बसेना. स्वामींनी शेवटी शास्त्रीबुवांना सांगितले की मी व्यंकटेशाच्या मंदिरात थांबतो. तुम्ही त्या तांबटाकडून गोमुखीची तोटी बसवून आणा. शास्त्री-बुवांची इच्छा हीच होती पण स्वामींना सांगणे सोपे नव्हते. शेवटी शास्त्रीबुवांनी त्या बहिऱ्या तांबटाकडून स्वामींच्या इच्छेप्रमाणे कमण्डलूला गोमुखी बसवून आणली. एकूण बहिरा तांबट, स्वामीजी आणि शास्त्रीबुवा, या कमण्डलु प्रकाराने घडलेल्या, विनोदाने पोट धरून हसले.

बार्शीच्या या तिसऱ्या खेपेत आणखी २।४ दीक्षा झाल्या. श्री. चिंगु आबा दिवटे, वकील यांना दीक्षा झाली. स्वामींच्या सर्व नियमांप्रमाणे त्यांचेकडे स्वामींची भिक्षा झाली. या काळात स्वामींचे त्रिकाळ स्नान असे. दण्डधारण करून शास्त्राचाराचे योग्य पालन करून आदर्श जीवन व्यतित करीत असलेले स्वामीजी पाहून शास्त्रीबुवा, वैद्यमास्तर, नारायणराव पुरंदरे आदि मंडळींना स्वामींच्यासंबंधी अधिकच आदर वाटू लागला. स्वामींच्या व्यवस्थेत काहीही उणे पडू दिले नाही. तरी मध्यंतरी काही दिवस स्वामीजी सर्दी-पडशाने आजारी होते. पण लवकरच प्रकृति पूर्ववत् ठीक झाली.

या कालावधीत स्वामीजी महाराष्ट्राच्या अंतरंगात हिंडून आले. परळीवैजनाथ, आंबेजोगाई येथे जाऊन आले. त्यांचेबरोबर पंडीतराव राशीनकर होते. वैद्य-मास्तरांच्या शेलगांवीपण जाऊन आले प्रल्हादशास्त्रींच्याकडे एक वैष्णवाचार्य येणार आहेत असे स्वामींना समजले. तेव्हा त्यांनी या वैष्णवाचार्यांचे आचार पहा म्हणजे खूप गोष्टी समजतील असे सांगितले.

औंढीचे श्री. व्यंकटराव कुलकर्णी बार्शीला स्वामींच्या दर्शनास आले होते. २।४ दिवस मुक्काम केला. स्वामींच्यासमोर साधना केली. स्वामींनी व्यंकटरावांना चार मोलाचे शब्द सांगितले. "वामनरावजी तुझे गुरुजी आहेत. त्यांच्या सान्निध्यात

जितके राहता येईल तसे वरचेवर सुट्टीत वगैरे जाऊन राहाणे जरूर आहे. म्हणजे अभ्यास पूर्ण होईल."

२१ मे १९२८ ला स्वामीजी दौंडला श्री. भास्करराव भागवतांकडे आले. यावेळी भास्कररावांनी स्वामींचा दण्डधारण केलेला फोटो काढला. या फोटोची एक प्रत स्वामींनाही दिली. स्वामी हुशंगाबादेस गेले.

स्वामी हुशंगाबादेस गेल्यावर मे महिन्याच्या शेवटी श्री. नारायणराव पुरंदरे कैलासवासी झाल्याचे त्यांना पत्र गेले. त्या पत्राचे उत्तर देतांना स्वामींनी पुढीलप्रमाणे सांत्वन केले.

"........ वृद्धापकाळात आपल्या मुलाबाळांच्या समोर नारायणरावांना मृत्यु आला ही गोष्ट त्यांच्या दृष्टीने फार उत्तम झाली."

६–७ महिन्यांनी स्वामी दौंडला परत आले. ७–८ दिवस श्री. भास्करराव भागवतांकडे मुक्काम केला. नंतर तेथून परत बार्शीला गेले. तेथे प्रल्हादशास्त्रींच्याकडे ५–६ दिवस राहिले. तेथून दि. १०।२।१९२९ ला बार्शीहून उत्तर भारतात गेले. शास्त्रीबुवांनी पुढील हकीगत महाराजांना पुण्यास कळविली —

रविवारी सकाळी १० च्या गाडीने प. प. श्रीलोकनाथतीर्थस्वामी महाराज उत्तर भारतात हस्तिनापुराच्या पलीकडे गेले आहेत. तेथे कोणी मोठे उदासी साधू राहात आहेत. ते उदासी साधू षड्दर्शन शास्त्रामध्ये अत्यंत निष्णात आहेत. या साधूंचे राहाण्याचे ठिकाण अत्यंत गुप्त आहे. तेथे वातावरण एकांत व शांत आहे. जेमतेम दहा बारा जण तेथे राहातात. यापेक्षा कोणीही जास्त तेथे राहात नाही. गंगाभागिरथीच्या पवित्र तीरावर या उदासी साधूंचा मठनिवास आहे. त्या ठिकाणी स्वामींची व्यवस्था अगदी घरच्यासारखी होते. स्वामी मधून मधून तिकडे जातात.

इकडे बार्शीत स्वामींची व्यवस्था आमच्या मंडळींनी आणि चि. जनार्दन याने उत्तम प्रकारे ठेविली होती. काहीही कमी पडू दिले नाही. प्रातःकाली त्यांचे साधन, स्नानसंध्यादि आह्निक मनासारखे होत होते. रोजची भिक्षासुद्धा सकाळी १०॥ ला होत असे. संध्याकाळी स्नान, संध्या, दुग्धपान, केळी, मोसंबी, संत्रे, पेरू इत्यादि फळांचा फलाहार इत्यादीची व्यवस्था लक्षपूर्वक केली जात होती. स्वामी आनंदात होते.

स्वामींची भिक्षा वे. शा. सं. अबादेव अग्निहोत्री, श्री. चिंतामणी धर्माधिकारी, श्री. भगवानशास्त्री, आणि श्री. बापुसाहेब केसकर यांचेकडे एकेकदा झाली. सर्वांना फार आनंद झाला. स्वामींनी जाण्याची इच्छा प्रगट केली. आम्ही आग्रह करून आणखी ४।५ दिवस ठेवून घेतले. जाताना त्यांचे तिकिट काढून दिले. वरखर्चासाठी रुपये पंचवीस त्यांचेजवळ दिले. आम्ही सर्वजण त्यांचा निरोप घेण्यासाठी स्टेशनवर गेलो. सर्व वातावरण फारच प्रसन्न होते. स्वामींचा वियोग सर्वांना जाणवत होता. स्वामीही अत्यंत प्रसन्न होते.

आता त्यांचे पोट ठीक आहे. गेल्या २।४ दिवसापासून जेवण सुधारले आहे. पण कालपासून पुन्हा त्यांची 'पेट गरम हुआ' ही तक्रार सुरू झाली.

स्वामीजी जातांना गावातून अनेकांनी त्यांना मनुका, बेदाणा, काजू, खडीसाखर इत्यादि वस्तू भेट म्हणून दिल्या. स्वामींनी अत्यंत प्रसन्नतेने सर्वांना कृपाशीर्वाद दिला.

आपल्या मातोश्रींना सा० नमस्कार
श्री. भुजंगरावांना सा० नमस्कार.

आपला विनम्र,
प्रल्हाद शास्त्री.
१३-२-१९२९.

याप्रमाणे स्वामी हस्तिनापुरापलीकडे असलेल्या "भेरिया" गावी, उदासी साधूंच्या भेटीसाठी गेले. तेथे काही दिवस मुक्काम करून पुढे ते परत हुशंगाबादेस येऊन मे महिन्यात हरिद्वारला गेले.

## ध्यानं निर्विषयं मनः

दक्षिणेत हिंडता हिंडता स्वामीजी एकदम हरिद्वारकडे वळले. पुन्हा एकदा हिमालयाच्या कुशीत शिरले. लौकिक जगतापासून दूर गेले. विविध विषयांनी भरलेल्या संसारतापापासून दूर गेले. शांत, एकांत, निवांत वातावरणात गेले. निर्विषय स्थितीत स्वामी गेले. वास्तविक सांसारिक जगतातून हिंडतांना स्वामी कधी विषयांच्या तावडीत सापडले नाहीत. तेव्हा आता त्यांना विषयांची भीति कुठली ? विषयच

त्यांना भिऊन पळत सुटणार ! परंतु स्वामींना गिरिकंदाराचे आकर्षण अंतःकरणापासून होते त्याला ते तरी काय करणार ?

इ. स. १९२९ चा ज्येष्ठ महिना आलेला. स्वामीजी तर केदारनारायणाच्या हरिद्वारात येऊन राहिलेले. त्यांचा पाय काही येथून निघेना. त्यांना वाटले येथेच चातुर्मास करावा. गंगेचा किनारा आहे. पावन पुण्यस्थल आहे. त्यातही ठिकाण निवडले ते यात्रेच्या गर्दीपासून जरा दूरचे ! रामप्यारीकी बगीचा, भूपतवाला भीम गोडा ! या ठिकाणी निवांत वास्तव्य त्यांनी केले. नऊ वर्षानंतर स्वामीजी या भूमीवर परत आले होते.

हरिद्वार हे असे ठिकाण आहे की जेथून स्वर्धुनी भागिरथी गंगा जनजीवनात प्रवेश करते. जनता जनार्दनाच्या संपर्कामुळे येथूनच तिची चाल धीमेपणाने सुरू होते. भागिरथीला आपल्या गतीचा हा धीमेपणा आणताना फार सायास पडतात ते या हरिद्वारात. प्रारंभापासून, बालपणातील अल्लड अवखळपणा करीत करीत तर, नगाधिराजाच्या अंकावर बेदरकारपणे उड्या घेत घेत, येथवर आली. खरोखर रम्य ते बालपण ! पण हरिद्वार असे ठिकाण आहे की जेथे अवखळपणाचा आणि प्रौढ गांभीर्याचा अपूर्व संगम दिसतो. 'हरकी पौडी' वर साखळदंड धरल्याशिवाय प्रवाहात स्नान करणे अशक्य असा तुफान वेग तर कनखल तीर्थावर वेग खूपच मंदावलेला जाणवतो. गंगेच्या प्रवाहाची खरी मजा लुटावी ती हरिद्वारच्या हरकी पौडीवर !

स्वामीजी हा अपूर्व आनंद लुटण्यासाठी सायंकाळी या हरकी पौडीवर येऊन तासन् तास बसून रहात. थंडगार तुषारांचे स्वच्छंद सिंचन भागिरथीतीरवासियांना रोमांचित करीत असते. गतिमान प्रवाहाची तीव्रता येथे चांगलीच जाणवते. गंगेच्या तीरावर जेवढी म्हणून तीर्थक्षेत्रे आहेत त्या सर्वांमध्ये हरिद्वाराचे मनोहारी सौंदर्य अनुपम, आनंददायी आहे. तेथील वातावरणात स्वामी रंगले आणि साऱ्या विश्वजाताला विसरून गेले.

हरिद्वारला 'मायापुरी' म्हटले आहे. पण ही मायापुरी मात्र मोक्षदायिनी आहे. हरिद्वार फार मोठी तपोभूमि आहे. श्वेतकेतु राजाने येथे महान तप केले. त्यावर संतुष्ट होऊन समस्त देवतांसह ब्रह्मदेव येथे आले. त्यांनी गंगेचे स्वागत केले. त्यावेळेपासून या मायापुरीला 'ब्रह्मस्थान' असेही नाव प्राप्त झाले. अशा परम-पुण्यस्थली स्वामीजी चातुर्मासासाठी थांबले.

हरिद्वारच्या परिसरात पाच प्रमुख तीर्थक्षेत्रे आहेत. या पाच तीर्थांचे स्नान वा ध्यान करणाराही मुक्त होतो असे यांचे माहात्म्य आहे. १) हरिद्वार, २) कुशावर्त, ३) बिल्वकेश्वर, ४) नीलपर्वत आणि ५) कनखल. ही ती पाच तीर्थक्षेत्रे आहेत.

स्वामीजींचा मुक्काम भीमगोडामध्ये होता. हे भीमगोडा ठिकाण हरकी पौडीच्या उत्तर दिशेला, हृषिकेशच्या बाजूला आहे. साधारणपणे १ / १॥ मैलाचे अंतर आहे. येथे पर्वताच्या पायथ्याशी एक छोटे मंदिर आणि एक कुण्ड आहे. याच कुण्डाचे नाव आहे 'भीम कुण्ड' हे कुंड गंगाजलाने स्वच्छ भरलेले आहे. या कुंडातील जलाच्या स्नानाचे फार महत्व आहे. तशी सोयही आहे. यात्रेकरूंची गर्दी हरकी-पौडीवर विशेष असते. इकडे बिलकुल गर्दी नाही.

काशी, अयोध्या, मथुरा या ठिकाणी जशी भरपूर मंदिरे आढळतात तशी प्राचीन मंदिरांची विपुलता येथे नाही. हे विरक्त साधु संन्याशांचे स्थान आहे. भुक्तिमार्गाकडे जाणाऱ्यांचा प्रवेश येथून होतो. मायापुरीचा उंबरठा ओलांडला तरच पुढचा मार्ग मोकळा होणार ! येथे १।२ च प्राचीन मंदिरे आहेत. श्रीमनसादेवीचे मंदिर प्राचीन आहे. श्रीश्रवणनाथ महादेवाचे मंदिर फार प्राचीन नाही. अलीकडेच ते निर्माण झाले असले तरी मोठे वैभवसंपन्न आहे. हरकी पौडी घाटावरील श्रीगंगा-मातेचे व शंकराचे मंदिर हीच काय ती यात्रेकरूंच्या गर्दीने भरलेली प्रसिद्ध मंदिरे ! कोणताही यात्रेकरू हरिद्वारात आला की त्याला गंगामातेचे दर्शन आणि स्नान याशिवाय काही सुचत नाही. येथे येऊन जाणारे फार ! राहणारे कमी.

माया मोह सोडलेले व सुटत चाललेले हरीच्या द्वारात घुटमळणार. म्हणून तर येथे साधू, संन्यासी, तपस्वी फार. यातले काही पलीकडे नेण्यासाठी अलीकडे येऊन राहिलेले तर काही पलीकडे जाण्यासाठी नेणाऱ्याची वाट पाहात बसलेले. स्वामीजी हीच मजा पाहात निवांतपणे येथे राहिले होते. साक्षीभाव जागृत झाला की गडबड संपली, धावपळ संपली, येणे-जाणे संपले ! मजा पाहात राहाणे आणि फक्त आनंद लुटणे एवढे एकच काम शिल्लक राहते. स्वामी अशा निर्विषय आनंदात येथे होते.

चातुर्मासाचा प्रारंभ झाला. वर्षाऋतु सुरू झाला. वारा, पाऊस आणि भागि-रथीचा प्रवाह यांच्यात तुफान वेगाची स्पर्धा सुरू झाली. गंगेने आपले पात्र वाढविले.

वृक्षराजीने जमिनीचा कण न कण व्यापून टाकला. श्रावण ते आश्विनापर्यंत हरिद्वारचे परिसरांत डासांचा फार उपद्रव होतो. मलेरियाचा ताप हात धुऊन मागे लागतो. नव्या पाण्यामुळे पचन शक्ति मंदावते. लोकांना फार दुःख भोगावे लागते. स्वामी मलेरिया आणि मंदाग्निच्या दुष्ट चक्रात सापडले. बद्धकोष्ठतेने तापाला जोर चढतो. तर तापाने बद्धकोष्ठता वाढत जाते. स्वामी या दुधारी शस्त्राच्या कात्रीत सापडले चांगलेच हैराण झाले. तापाने त्यांना त्रास द्यायला सुरवात केली तर स्वामींनी उपोषणाला सुरवात केली. लंघन हा तापावरचा तोडगा स्वामींचा ठरलेला होता. लंघन सुरू झाले की ताप उतरत असे असा त्यांचा नेहमीचा अनुभव. पण यावेळी लंघन–उपवास करूनही ताप हटेना. स्वामीपण हट्टाला पेटले. त्यांनी १४ दिवस उपोषण केले. ताप हटला परंतु स्वामींची प्रकृति मात्र नाजुक व अशक्त झाली. पण आजार गेला हे काय कमी झाले ?

आजारात स्वामींनी बार्शीला पत्र लिहिले. स्वामींच्या आजारपणाची बातमी समजताच सारे बार्शीकर हळहळले. पण करणार काय ? कुठे हरिद्वार आणि कुठे बार्शी ? तरी काहींनी जाण्याचे ठरविले. तयारी केली. आता निघणार तेवढ्यात स्वामींचे पत्र आले. "....आजारी होतो.... आता ठीक आहे. काळजी करू नये, कुणी येऊ नये...."

स्वामींची प्रकृति ठीक आहे समजून सर्वांना बरे वाटले. पण प्रत्येकाला वाटू लागले आपण काही तरी केले पाहिजे. म्हणून इ. स. १९२९ मध्ये बार्शीच्या साधकांनी २५।३० रु. ची म. ऑर्डर स्वामींना केली. सुकामेवा पोस्टाने पाठविला. पुण्याहून एकट्या महाराजांनी आपला निम्मा पगार रु. १५/– स्वामींना पाठवून दिला स्वामींना पत्र लिहिले आणि चांगल्या डॉक्टर-वैद्याचे औषध घेण्याची विनंती केली. खरे प्रेम अन्तःकरणातून निघते म्हणून तर ते सर्वांच्या अन्तःकरणाला स्पर्श करू शकते. आपल्या शिष्यांची निःसीम भक्ति पाहून स्वामींना बरे वाटू लागले. त्यांनी महाराजांना कळविले —

"....मला अनेकांनी पैसे पाठविले आहेत. आता मला पैशाची बिलकुल गरज नाही. सध्या डॉक्टरांच्या चिकित्सेने ताप पूर्णपणे थांबला आहे. आता मी डॉक्टरी चिकित्सा थांबविली आहे. आपण माझी काळजी करू नये".

तुम्ही साधनेबद्दल जे लिहिले आहे ते विचार खरोखर मननीय आहेत.

"आपले साधन हे ध्यानयोगाचे साधन आहे. मूलाधारामधून मेरुदण्डामध्ये प्राणाचा प्रवेश हा साधनेचा प्रारंभ आहे. साधन करता करता प्राक्तन संस्कारांचा स्थूल स्वरूपात नाश होतो आणि साधन स्वतः सूक्ष्म अशा ध्यान योगामध्ये प्रवेश करते. ध्यान योगाचे साधन तीव्र भावातून सुरू होते. खरोखर हा विषय फार गहन, व गूढ असा आहे. पत्रातून विशिष्ट भावाने लिहिणे अशक्य आहे.

ध्यानयोग हेच एकमेव, योगमार्गाचे मुख्य, मूर्धन्य साधन आहे.

**अश्वमेध सहस्त्राणि बाजपेय शतानि च ।**
**एकस्य ध्यान योगस्य कलां नार्हन्ति षोडशीम् ॥**

ध्यान शब्दाचा अर्थ आहे—

**"ध्यानं निर्विषयं मनः ।"**
**बस्स ! खूप लिहिले इति शम्ः"**

आशीर्वादक
स्वामी लोकनाथ तीर्थ

हे आजारपणाच्या संबंधीचे पत्र होते. पण स्वामींचे चिंतन आत्मानुसंधी असल्याने या विचाराशिवाय त्यांना अन्य विषयांचे स्फुरण फारसे नसे.

हरिद्वारमध्ये चातुर्मास झाला. पुढे स्वामी हृषिकेशला गेले. तेथे शेठ चरण-दासांच्या धर्मशाळेत मुक्काम केला. आश्विनी पौर्णिमा ते फाल्गुनी पौर्णिमा हा पाच महिन्यांचा काळ त्यांनी तेथे काढला. प्रकृति उत्तम होती. हिमालयाची प्रकृति त्यांना सोडीत नव्हती. पण भक्तवत्सल, भक्तभिमानी हे व्रत स्वीकारले होते. एके दिवशी अंतर्यामीची प्रेरणा झाली. 'भक्ताला भेट' या प्रेरणेने प्रकृतीवर मात केली.

स्वामीजी फेब्रुवारी १९३० मध्ये हृषिकेशहून निघाले ते सरळ थेट पुण्यास आले. महाराजांचेकडे, २० नारायण पेठेत आले. केवळ त्यांना भेटण्यासाठी आले. भेटण्याची इच्छा झाली म्हणून आले. स्वसंवेद्य अन्तःकरणांचे आकर्षण वाढले म्हणून आले. स्वामी हृषिकेशहून सरळ पुण्यास अचानकपणे येतात ही घटनाच सहृदय वाचकांना हेलावून टाकण्यास समर्थ आहे.

**द्वैताद्वैतविनिर्मुक्तः स्वानुभूतिप्रकाशवान ।**
**अज्ञानान्धतमश्छेत्ता सर्वज्ञः परमोगुरुः ॥**

## गुरुर्निरुपमो यस्य

आपल्या परम प्रिय भक्तासाठी स्वामी हृषिकेशहून पुण्यास आले. न थांबता महाराजांना भेटण्यासाठी आले. एकाच संवेदनेचे स्पंदन दोघांच्या अन्त:करणात एकाच वेळी होत होते म्हणून स्वामी आले. आजाराची बातमी समजल्यापासून महाराजांना स्वामींची भेट घेण्याची सारखी इच्छा होत होती. इकडे हिमालयातील वातावरणात वावरताना स्वामींना 'वामन' ला भेटण्याची प्रेरणाच होत होती. स्वामी तेथे थांबू शकले नाहीत. १९३० च्या मार्च महिन्यात स्वामी पुण्यास आले.

स्वामी एवढ्यात येतील, याची एवढी सुद्धा शंका, महाराजांच्या मनात आली नव्हती. नव्हे इतक्या लांबून, इतक्या लवकर, ते कुठले यायला, अशीच खात्री त्यांना वाटत होती. मग स्वामी आज येतील याची कल्पना कशी शक्य आहे. स्वामी अचानक आले म्हणून स्टेशनवर कोणालाही जाता आले नाही. संवेदना जाणवल्या तरी व्यवहार व्यवहारासारखा ठेवावा लागतो. स्वामी स्टेशनवरून एकटे आले.

प्रात:कालच्या शुभवेळी कुण्डीदण्डधारी स्वामीजी दारात उभे पाहून महाराजांना आश्चर्यानंद झाला. तेथेच त्यांनी त्यांना साष्टांग नमस्कार केला आणि म्हणाले.

"स्वामीजी! आत्ताच आपली आठवण काढली आणि आपण आलात, स्मर्तृगामी आहात." स्वामींनी— 'नारायण' म्हणून आशीर्वाद दिला. स्वामी आलेले पाहाताच उमाआईंची आणि गोदूताईंची एकच धांदल उडाली. स्वामींना आसन घातले. वंदन केले. महाराजांनी त्यांचे सामान घरात घेतले. स्वामींनी आपल्या दण्डाला वंदन करून तो एका बाजूला ठेवून दिला.

स्वामीजींच्या आगमनाने वातावरण आनंदित झाले. दिव्य शक्तीचे चैतन्य भोवताली खेळू लागले. स्वामी आल्याची बातमी नानांना समजली. घाईघाईने ते आले. स्वामींना नमस्कार केला. पाठोपाठ त्यांच्या धर्मपत्नी 'काकू' आल्या. त्यांनी नमस्कार केला. छोटा भालचंद्र पळत पळत आला. नमस्कारासाठी खाली वाकला, तेवढ्यात स्वामींनी त्याला उचलून मांडीवर घेतले. बालसुलभ दंगामस्ती त्याचेशी केली. सारे वातावरण कसे गोड गोड होऊन गेले.

स्वामी फार लांबचा प्रवास करून आले म्हणून त्यांना जरा विश्रांति दिली.

थोड्या वेळाने स्नान संध्यादि आह्निक झाले. महाराजांचे भोजन आणि स्वामींची भिक्षा लवकरच झाली. महाराज नु. म. विद्यालयात गेले. प्रवासाने स्वामी खूप थकले होते. दोन दिवस गाडीत होते. अन्नाचा कण पोटात नव्हता. एकूण पुण्यास आल्याबरोबर सारे कसे प्रकृतीला प्रसन्न करणारे झाले. दुपारी स्वामींनी येथेच्छ विश्रांति घेतली. सायंकाळपर्यंत स्वामी अगदी ताजेतवाने व टवटवीत झाले.

सायंकाळी विद्यालयातून महाराज आले. कोर्टामधून नाना भालेराव आले. स्वामींची फिरायला जाण्याची इच्छा दिसली. मग तिघेजण फिरावयास, फर्ग्यूसनच्या बाजूला, हनुमान टेकडीकडे गेले. तासानी सर्वजण परत आले. सायंसंध्या, स्तोत्र, आरती नित्यक्रम झाला. महाराज आतल्या खोलीतील कोपऱ्यात, खिडकीजवळ नेहमीच्या जागी बसले होते. समोरच आतल्या खोलीत आई आणि ताई बसल्या होत्या. स्वामीजी बाहेरच्या खोलीत, खिडकीपाशी, ठरलेल्या जागी, आपले आसन टाकून बसले होते. स्वामी पूर्वाभिमुख बसले होते. महाराज उत्तराभिमुख बसले होते. खिडकीमधून परस्परांची दृष्टादृष्ट होत होती.

महाराज नित्याची स्तोत्रे म्हणत होते, पण आज आतून साधनेकडे त्यांचे मन जोरजोराने खेचले जात होते. स्तोत्रातील त्याच त्याच ओळी पुनः पुनः मुखातून येऊ लागल्या. डोळे आपोआप झाकले जाऊ लागले. पण स्तोत्रपाठ पुरा करण्याच्या हेतूने महाराज डोळे उघडे ठेवण्याचा व तोंडाने स्तोत्र म्हणण्याचा प्रयत्न हळुवारपणे करीत होते. स्वामींच्या ध्यानात ही गोष्ट आली. आपल्या आसनावरूनच स्वामीजी श्रीगुरुमहाराजांना म्हणाले—

"वामन, अब साधन पहले होने दे। आज वह नहीं रोका जायेगा।"

स्वामींचे एवढे वाक्य पुरे होण्याच्या आतच महाराजांनी डोळे मिटले आणि साधनेमध्ये ते एकरूप झाले. एक तासभर उत्तम साधन झाले. निश्चलतेचा व प्रगाढ शांततेचा अनुभव आला. तिकडे भगिनी गोदूताईसुद्धा साधनेला बसल्या. त्यांचेही उत्तम साधन झाले. साधन झाल्यावर डोळे उघडले तेव्हा कुठे महाराजांना शांत शांत वाटू लागले. आता त्यांना स्तोत्रपाठ पूर्ण करता आला. नंतर फलाहार झाला. थोडे बोलणे झाले आणि रात्री १० च्या आत सारे झोपी गेले.

सर्वांची पहाटे चारला झोप झाली. स्वामींच्या व आईच्या पायावर मस्तक

ठेवून महाराजांनी वंदन केले. ब्राह्म मुहूर्त म्हणतात तो हाच. पंच पंच उषःकाल या नंतर होणार. साधनेला ब्राह्म मुहूर्त उत्तम म्हणून शास्त्रात सांगितले आहे. शास्त्राप्रमाणे चालणे हाच तर सिद्धांचा आणि साधकांचा निर्धार, महाराजांचा आणि स्वामींचा निर्धार, महाराजांचा आणि स्वामींचा नित्यक्रम पहाटे चारपासून सुरू होतो. प्रातर्विधि, आचमन, अजपाजप संकल्प, प्रातःस्मरण आणि साधना या आखीव कार्यक्रमात कधी बदल नाही. त्या काळात महाराजांची आणि त्यांची साधनेची बैठक ३।४ तासांची असे. अशा प्रशस्त साधनेनंतर स्नानसंध्या, जप, पूजा, पोथी-वाचन इ. नित्य अनुष्ठान दोन तीन तासांचे असे. अन्य विषयाला जीवनात प्रवेश करायला कुठेही अवसर ठेवलेला नव्हता. महाराजांचे हे नित्याचे नैष्ठिकव्रत पाहून स्वामींचे अन्तःकरण प्रसन्नतेने भरून येत असे. आपल्या शिष्याबद्दलच्या प्रेमाबरोबर आदराच्या भावनाही स्वामींच्या वाढत होत्या. चांगला गुरु मिळणे हे जेवढ्या भाग्याचे लक्षण म्हणता येते तेवढेच चांगला शिष्य मिळण्यासाठी गुरूला भाग्य लागत असते.

**" गुरु मिलें लाख लाख, चेला मिले न एक ।**
**जो एकहु चेला मिले, राख गुरू की टेक ॥"**

स्वामींचा नित्यक्रमही असा पहाटेपासून सुरू होत असे. ब्राह्ममुहूर्तांचे साधन स्वामींनी कधीही चुकवलेले नव्हते. मग ते टिहरीच्या जंगलात असोत वा शिष्यांच्या समवेत बार्शी वा पुण्यात असोत. स्वामी पहाटे साधनेला बसतांना अंगावरची छाटी डोक्यावरून पांघरून घेत. रुंद, प्रशस्त सिद्धासन घातलेले, शरीर ताठ आणि हात ज्ञानमुद्राकरून मांडी घातलेल्या गुढघ्यावर सुलभतेने ठेवलेले. डोक्यावरून छाटी घेतल्यामुळे चेहरा दिसत नसला तरी एकूण ध्यानस्थ स्थितीतील स्वामींचे ते स्वरुप अतिशय तेजःपुंज दिसत असे. स्वामींच्या सान्निध्यात गेल्यावर त्यांच्यामधून शक्तीचे प्रक्षेपण होत असल्याचा अनुभव नित्याचा असला तरी ज्या वेळी ते साधनेला बसत त्यावेळी या शक्ति प्रक्षेपणाच्या अनुभवाची तीव्रता फारच असे.

शक्तिपात साधन हे असे साधन आहे की ते एकवेळ श्रीगुरुकृपेने सुरू झाले की अखंड, अष्टौप्रहर रात्रंदिवस तर चालू राहातेच पण संपूर्ण जीवनभर चालू राहाते. स्वामी सांगतात स्थूल देह आहे तोपर्यंतच साधन चालू राहते असे नाही तर जोपर्यंत अनुग्रहीत जीवाचा सूक्ष्म देह आहे तो संपूर्ण नाहिसा होऊन शिवस्वरूप

होईपर्यंत ही जागृत झालेली शक्ति क्रिया करीत राहाते. या क्रिया स्थूल, सूक्ष्म, तीव्र, वा मंद असू शकतात. क्रियांची तीव्र गति साधू, संत, सत्पुरुष, सिद्धभूमि, संतांची चरित्रे यामुळे होते. पण अत्यंत तीव्रतम गतीचा अनुभव श्रीगुरुसानिध्यात येत असतो.

पुण्यात स्वामींचा नित्यक्रम अगदी मनाला प्रसन्न ठेवणारा असे. त्यामुळें त्यांच्या चित्तवृत्ति प्रसन्नतेने मोकळ्या राहात असत. अशा मोकळ्या प्रसन्न वातावरणांत त्यांच्या गुणांचे पैलू असे काही चमकत की पहाणाऱ्यांनी मंत्रमुग्ध होऊन जावे. महाराजांचा सहवास भोवतालच्या सर्वांना प्रसन्न ठेवण्यात कधीच उणा पडत नाही. महाराजांची आर्जवी, मर्मज्ञ, शांतवृत्ति भोवतालच्या माणसाला बोलकी करते. स्वामींच्याबद्दल तर काय सांगावे. त्यांना महाराजांकडे आले म्हणजे घरी आल्यासारखे वाटे. अध्यात्माचे जे वातावरण स्वामींच्या मनात असे ते सारे महाराजांच्या घरात आचरणात दिसे.

रोजच्या दिनक्रमात अलीकडे एक नवा कार्यक्रम वाढला. रात्रीच्या वेळी सर्व उरकल्यावर झोपेच्या पूर्वी जो तास, दीडतास, कधी अर्धातास मिळे तेवढ्या वेळात या नव्या कार्यक्रमाची योजना असे. फराळपाणी उरकून वातावरण शांत झाले म्हणजे उमामातोश्री आतूनच स्वामींना म्हणत "स्वामीजी तुमचा गोड आवाज कानाला फार आवडतो..." आईंच्या अशा प्रेमळ सूचनेचा स्वीकार स्वामी तात्काळ करीत असत. मग स्वामींचे भजन सुरू होत असे. त्या भजनातील एक एक ओळ वातावरणात चैतन्याचा संचार करीत असे. त्यांच्या आवाजाला धार आणि कंपने होती. शब्दाला 'शक्तीचा' जोर होता. कुंडलिनी शक्तीचे वर्णन असलेले बंगाली पद तर असे काही होते की कितीही वेळा ऐका—पुन्हा नंतर ऐकले तरी शरीर कंपित झाल्याशिवाय, रोमांचित झाल्याशिवाय रहात नसे. स्वामींच्या भजनात देवतांची नावे आणि विशेषणे आली की बंगाली पदेसुद्धा मराठी श्रोत्यांना समजत असत. भावजागृति आणि ईश्वर–गुरुनिष्ठा ही पार्श्वभूमि एकच असल्याने अर्थाची अडचण विशेष नसे. स्वामींचे भजन सुरू झाले कीं जर तत्पूर्वी आले नसतील तर नाना भालेराव पटकन येऊन बसत असत. ही नानांची ओढ वाड्यात जरी ४०।५० बिऱ्हाडे होती तरी इतरत्र विशेष आढळली नाही. एकदा स्वामींनी स्वतः केलेले श्रीदत्तात्रेयांचे बंगाली पद म्हटले.

गुरु दत्तात्रेय तव करुणा अपार...... ॥ धृ ॥
अनसुयानंदन, त्रिजगत् वंदन
दुष्टभयभंजन, भक्तजन रंजन
भवसागर हय अति दुस्तर
भवबन्धमोचन... शील तुमार ... तव करुणा अपार ॥ १ ॥

अमी नैष्कृतिक पामर आलस
कृपा करे दया परबस
भव सागर हय अति दुस्तर
तारित रे केवल... चरण तुमार... तव करुणा अपार ॥ २ ॥

अमी होओ रे शरणागति
न मे भक्तः प्रणश्यति
दुस्तर नही भवसागर
श्रीगुरुदत्तात्रेय ... वचन तुमार ... तव करुणा अपार ॥ ३ ॥

भक्त वत्सल दीनानाथ
योगेश्वर – लोकनाथ
भवसागर कर पार
वंदित लोकनाथ ... चरण तुमार ... तव करुणा अपार ॥ ४ ॥

हे पद त्या दिवशी फारच रंगले. श्रीगुरुमहाराजांची दत्तोपासना घराण्याच्या परंपरेने चालत आली. प. पू. श्रीसद्गुरुवासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराजांनीं दत्तदेवतेची अनुष्ठाने, मंत्र, उपासना दिलेली, उपास्य देवतेबद्दलचे अत्यंतिक प्रेम उपासकामध्ये रोमरोमीं भरलेले! स्वामींनी पदाला सुरुवात केली. भावमधुर शब्द कानावर पडू लागले. श्रीगुरुमुखातून ते शब्द शक्तिसंचारित होऊन आसमंतात वलये निर्माण करू लागले. आणि.... बसल्या जागीच महाराजांचे साधन सुरू झाले. गोदूताईंनाही साधनेची कंपने होऊ लागली. बाहेरच्या खोलीत बसलेले नाना भालेराव उठले त्यांनी दार लोटून घेतले आणि बसले तर त्यांच्याही क्रिया सुरू झाल्या. स्वामी पहात होते, समजत होते. अनंत जन्माच्या पुण्याईचा उद्रेक असा असतो. ही ज्वालामुखी आहे. प्रचंड लाव्हा रसाच्या उसळत्या लाटा त्या ज्वालामुखीत साठविलेल्या आहेत. श्रीगुरुकृपेची एक ठिणगी या सुप्त, निद्रिस्थ ज्वालामुखीला भडकवून टाकण्यास पुरे आहे. या ज्वालामुखीच्या भडकत्या आणि धुमसत्या अग्नीत

काय शिल्लक राहील ? आजचे महाराजांचे साधन फार तीव्र होते. अनेक प्रतिबंधांची राखरांगोळी आजच्या साधनेने झाल्याची त्यांना जाणीव झाली. पद संपले. पण साधनेची स्पंदने शिल्लक होती. स्वामींनी थोडा वेळ जाऊ दिला. शक्तीचा आवेग कमी कमी होत आला. तेव्हा स्वामी म्हणाले " वामन आँखें खोलो। अब हम सोयेंगे। १० बजे होंगे।। "

सर्वांची अन्तःकरणे हेलावून गेली. एवढी प्रचंड हालचाल पाहून स्वामी त्यासंबंधी एक अक्षर न बोलता शांतपणे झोपण्याची सूचना देतात. काय प्रचंड आत्मविश्वास आहे या साधनेबद्दलचा आणि साधन करणाऱ्या साधकाबद्दलचा ! झाले हे उत्तम झाले त्याची ही पावती नाही का ? सर्वांनी झोपण्यापूर्वी स्वामींना साष्टांग नमस्कार केला. महाराजांनी आणि ताईंनी उमाआईला नमस्कार केला. नाना भालेराव स्वामींना नमस्कार करून आपल्या खोलीत निघून गेले.

स्वामी अंथरुणावर झोपल्यावर महाराज आपल्या अंथरुणावर आडवे झाले. आज झोपताना त्यांच्या मनांत एक श्लोक घोळत होता.

**गुरुर्निरुपमो यस्य शिष्य संस्पर्शमात्रतः ।**
**मायामयप्रपंचं तु परं ब्रह्मैव पश्यति ॥**

## रेवातीरे तपं कुर्यात्

पुण्यात स्वामीजी एप्रिल महिन्याच्या सुरुवातीपर्यंत राहिले. त्यांची प्रकृति सुधारली. यंदाचा चातुर्मास कुठे घालवावा हा विचार मनात येत होता. ठरविले असे कांहीच नव्हते. एकदा महाराजांच्या गप्पागोष्टींमधून गरुडेश्वर, व्यासक्षेत्र इत्यादि नर्मदेवरील तीर्थक्षेत्रांची माहिती मिळाली. तेंव्हा व्यासक्षेत्रामध्ये जाऊन राहाण्याची इच्छा स्वामींना झाली. त्याप्रमाणे १९३० च्या एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात स्वामींनी पुणे सोडले व ते व्यासक्षेत्राकडे निघाले.

नर्मदेच्या किनाऱ्यावर चांदोद म्हणून पवित्र स्थान आहे. हे ठिकाण बडोद्यापासून तीस मैल अंतरावर आहे. स्वामीजी मंगळवार दि. १५ एप्रिलला चांदोदला आले. येथे वैद्यस्वामींचा मठ प्रसिद्ध आहे. या मठाची व्यवस्था येथील राजवैद्य श्री. हर्डीकरशास्त्रीजी पहात होते. हे श्री. हर्डीकरशास्त्रीजी प. प. वासुदेवानंदसरस्वतींचे परम भक्त आहेत. या काळात गरुडेश्वरला जाण्याचा रस्ता चांदोदवरून

असे. येथून नर्मदा ओलांडून जाणे सोयीचे असे. म्हणून त्या काळी गरुडेश्वरचे यात्रेकरू जाता येता चांदोदला थांबत असत. येथे गरुडेश्वरच्या स्वामींचे भक्त राहतात. त्यांचेकडे सर्व यात्रेकरूंची सोय होते, ही गोष्ट संबंधितांमध्ये सर्वश्रुत होती. श्री. हर्डीकरशास्त्री या सर्व यात्रेकरूंची सेवा म्हणजे प्रत्यक्ष श्रीटेंबेस्वामीमहाराजांची सेवा आहे या दृढ श्रद्धेने यात्रेकरूंच्या सेवेत तत्पर असत. स्वतः श्रीटेंबेस्वामीमहाराज यांचे येथे मुक्कामाला राहिले होते. त्यांची भिक्षा येथे मठात झाली. शास्त्रींना उपदेश झाला. त्या उपदेशाप्रमाणे श्री. हर्डीकरशास्त्रींचे सर्व जीवन कृतार्थपणे कारणी लागले आहे. जीवनाच्या उत्तरार्धामध्ये त्यांनी संन्यासाश्रम स्वीकारला. त्यांचे सारे जीवनच अत्यंत निष्ठेने शास्त्र नियम पाळीत खर्च होत आले आहे.

प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामी महाराज चांदोदला आले ते वैद्य मठात उतरले. श्री. हर्डीकरशास्त्रींचा परिचय झाला. गरुडेश्वरच्या मार्गाची व व्यवस्थेची चौकशी झाली. त्याप्रमाणे सर्व सांगण्यांत आले. काही यात्रेकरूंच्या बरोबर स्वामी गरुडेश्वरला गेले. तेथे १/२ दिवस मुक्काम केला. गरुडेश्वरला महायोगविज्ञानचे लेखक श्री. योगानंदजी यापूर्वीच इ. स. १९१३ मध्यें प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज असतांना येऊन गेले होते. त्यांनी महाराजांचा चमत्कार डोळ्यांनी पाहिला होता. महाराजांनी कमंडलूमध्ये तीर्थ एकदा भरून घेतलेले होते. कमंडलूही लहान होता. लहान झारीच होती ती. त्या झारीतून श्रीटेंबेस्वामीमहाराज सर्व भक्तांना तीर्थ वाटीत होते. हजारों भक्तांना तीर्थ वाटून झारी रिकामी झाली नाही. पुन्हा झारी भरून घेतली नाही. हा सर्व प्रकार श्रीयोगानंद जवळून पहात होते. या घटनेचा उल्लेख श्रीयोगानंदांनी सविस्तरपणे पत्रात केलेला आहे. श्रीयोगानंदांना महाराजांनी तीन महिने थांबा म्हणजे तुमचे काम होईल असे सांगितले होते. श्रीयोगानंदांना थांबायला सवड नव्हती. पण आश्चर्य असे की याच तीन महिन्यात योगानंदांचा आणि प. प. श्रीनारायणतीर्थ देवांचा संबंध आला. श्रीयोगानंदांचे काम तीन महिन्यांत झाले. इ. स. १९१४ चा तो काळ होता. श्रीयोगानंदतीर्थ हे पंजाबातून गरुडेश्वरला गुजराथेत आले होते पण काम झाले ते बंगालमध्ये मदारीपूरला ! 'प्राप्तकाल घडीचा' हा पुरावा आहे. ऋणानुबंध असे असतात.

स्वामी श्रीलोकनाथ तीर्थांनी श्रीवासुदेवानंद सरस्वतींच्या खूप आख्या ऐकल्या. महाराजांनीही त्यांचे वर्णन केले होते. इरंगाबादेस श्री.शंकरकाका, श्री. गोविंदराव पंडित

आदि मंडळींच्या कडून श्रीटेंबेस्वामी महाराजांची माहिती स्वामींना मिळाली होती. तेव्हा अशा श्रद्धास्थानाची भेट घेण्यासाठी स्वामी गरुडेश्वरास आले. तेथे दोन दिवस मुक्काम केला. तेथून ते परत चांदोदला आले. चांदोदला ३।४ दिवस मुक्काम केला. पुढे ते कर्नाळी गावी गेले.

कर्नाळी हे नर्मदेवरील श्रेष्ठ तीर्थांपैकी एक तीर्थक्षेत्र आहे. येथे अनेक मंदिरे आहेत. सर्वात मोठे व भव्य मंदिर आहे ते 'गायत्री' चे ! ही भूमि महान तपोभूमि आहे. येथे नर्मदेवर अनेक उत्तमोत्तम घाट आहेत. नर्मदा प्रदक्षिणा करणाऱ्यांच्या सोयीसाठी ठिकठिकाणी मठ आहेत. तसे उत्तम मठ कर्नाळीमध्येही आहेत. स्वामीजी "दण्डीस्वामींच्या मठात" उतरले. त्या मठातील सर्व संन्याशांच्या भिक्षेची व्यवस्था मुंबईच्या धार्मिक वृत्तीच्या एका भाटियाने केलेली होती. यामुळें भिक्षेची व्यवस्था चांगली होती. स्वामींना स्वतंत्र खोली मिळाली होती. हवे तसे स्वातंत्र्य व हवी तशी सोय झाल्यामुळें काळजी राहिली नाही. येथील व्यवस्था चांगली असल्यासंबंधी पुण्याला पत्राने कळविले. महाराजांनी मनाशी जरा काही विचार केला. आपल्या मिळकतीचा व खर्चाचा हिशेब केला आणि ३० रु. मासिक प्राप्तीमधून ६ रु. दरमहा केवळ दुधासाठी स्वामींना पाठविले. उरलेल्या चोवीस रुपयामध्ये तिघांचा उदर-निर्वाह होई. स्वामींना रु. ६/– दुधासाठी म. ऑ. ने न चुकता दरमहा जात असत. अशी गुरुनिष्ठा महाराजांच्या जीवनातून प्रत्येक प्रसंगातून दिसते.

चांदोदमध्ये असताना कोणी श्री. उद्धवराव जोशी म्हणून स्वामींच्या परिचयाचे होते. त्यांची भेट ते घेऊन आले. इकडे कर्नाळीमध्ये स्वामींचा नित्यक्रम सुरळीत सुरू झाला. तेवढ्यात अन्नछत्र ज्या मुंबईच्या भाटियाने चालविले होते तो एकाएकी वारला. त्यामुळे कर्नाळीच्या अन्नछत्रात काम करणारे त्याचे काही नातेवाईक होते त्यांना अशौच (सुतक) आले. अशा घोटाळ्यामधील अन्नग्रहण करणे स्वामींना पसंत न पडल्याने ते तेथून जवळच असलेल्या श्रीक्षेत्रव्यास या ठिकाणी निघून आले. २ जुलै, आषाढ शु।। ७ च्या दिवशी स्वामी व्यासक्षेत्रात आले.

व्यासक्षेत्र हे स्थान अत्यंत रमणीय आहे. विशेषतः चातुर्मासामध्ये हे स्थान चारही बाजूंनी नर्मदेच्या पात्राने वेढले जाते. पाण्याचा वेग फार असतो. पुरामुळे चारही बाजूने पाणी असते म्हणून हे स्थान सुद्धा चातुर्मासात संन्यस्त असते. जगापासून अलिप्त असते. महर्षिव्यास म्हणजे 'गुरुणां गुरु' तर आहेतच परंतु

संन्याशांचेही ते परमगुरु आहेत. त्यांचे हे स्थान ! ! चातुर्मासात सन्यस्त न राहील तर नवल ! येथे या काळात टपाल सुद्धा येऊ शकत नाही इतके हे जगापासून अलिप्त राहाते. येथे महर्षि व्यासांनी तप केले म्हणून व्यासक्षेत्र. अनेक ऋषिमुनींनी, देवदेवतांनी तप केले म्हणून तपोभूमि ! अशा शांत तपोभूमीत स्वामी श्रीलोकनाथ-तीर्थ येऊन राहिले.

स्वामींनी संपूर्ण चातुर्मास येथे अनुष्ठानात, साधनेत व ईशचिंतनात घालविला. नर्मदेचे विशालकाय पात्र, त्या प्रवाहाची भीषण गति, आणि क्षेत्राच्या चारही बाजू प्रवाहाने व्यापल्यामुळे नर्मदेला आलेले ते सागराचे गंभीर स्वरूप जणू एका छोट्या बेटावर स्वामी मोठ्या आनंदाने नित्य न्याहळत होते ! व्यासक्षेत्रात मंदिरे होती. मठ होते. अन्नछत्रे होती. स्वामी अशा रम्य ठिकाणी रहात, पण काय करीत याची वाच्यता त्यांनी कधीही केलेली नाही. अशा स्थानातून अनुष्ठानादि संपवून स्वामीजी परत जगरहाटीत आले म्हणजे प्रखर तेज:पुंज दिसत असत.

'रेवातीरे तपं कुर्यात्' म्हणतात त्याची ही प्रचीति ! येथील तपाचरणाने तपीला तेज प्राप्त होते. अल्पशा काळात तपाला सामर्थ्याचे फळ लाभते म्हणून नर्मदेच्या तीराला तपोभूमि म्हटले आहे.

शनिवार दि. १२ सप्टेंबर १९३० ला चातुर्मास संपला. स्वामींनीं त्याच दिवशी स्थानांतर केले आणि मुंबई करून पुण्यास आले. पुण्यात दोन महिने राहिले आणि परत व्यासक्षेत्राला गेले. तेथे १५ दिवस मुक्काम केला. परत त्या निसर्गाची शांतता अनुभवली आणि पुण्यास परत आले. पुढे नाना भालेराव यांचे गावी स्वामी गेले.

## महाराष्ट्राच्या अंतरंगात संचार

इ. स. १९३१ च्या फेब्रुवारी मार्च महिन्यांचे ते दिवस होते. स्वामीजी नुकतेच व्यासक्षेत्राहून पुण्यात आलेले होते. स्वामी पुण्यात आले आहेत ही बातमी हळूहळू सर्वत्र पसरू लागली. जवळपासच्या गावी पत्रे जाऊ लागली. लोक स्वामींच्या दर्शनास येऊ लागले. स्वामींच्या कार्याचे स्वरूप सामाजिक असले तरी प्रत्येक व्यक्तीपुरते मर्यादित होते. प्रत्येकाचा वाटा, साधनेने आपली प्रगती करून घ्यावी, या मर्यादेने बंदिस्त होता. प्रचार व प्रसार झाला तरी त्यालाही चाकोरी होती, नियम

होते. एकसूत्रीपणाच्या सूत्राने या कार्याला सुसूत्र केलेले होते. ही स्थिति स्वामींच्याही पूर्वीपासून परंपरेने चालत आलेली होती. त्यामुळे वाढत्या पसाऱ्याचा पसारा कधी कुणाच्या दृष्टीस पडत नसे. याची जाणीव जाणत्यांना असते. स्वामींच्याकडे आता पुण्यातही एक एक म्हणता म्हणता अनेक जिज्ञासू-भक्त-साधक येऊ लागले.

नानांना वाटले आपल्या थोरल्या बंधूना– दादांना म्हणजे व्यंकटरावांना– पुण्यास बोलावून घ्यावे. काही लाभ स्वामींचा त्यांना झाला तर बरे म्हणून स्वामी पुण्यास आल्याचे पत्र नानांनी डोणज्याला पाठविले. त्याप्रमाणे दादा येथे पुण्यास आले. त्यांनी काही दिवस मुक्काम केला. स्वामींच्या नित्यसहवासात दादा बसत. त्यांनी स्वतः स्वामींजवळ दीक्षेचा विषय काढला. त्यावर स्वामी म्हणाले "सध्या नाही. पुढे पाहू. तुमच्या गावी येऊन दीक्षा देईन." दादांना पुढे काही बोलता येईना. शेवटी नाइलाजाने दादा परत डोणज्याला निघून गेले.

पुढे १०/१५ दिवसांनी स्वामींना काय इच्छा झाली कोणास ठाऊक. नानांना म्हणाले चला तुमचे गाव पाहून येऊ. मग सोयीचा दिवस पाहून डोणजाला जाण्याचे ठरविले. प्रथम रेल्वेने जेऊरला आले. तेथून कर्माळ्यापर्यंत मोटारने प्रवास झाला. नानांनी कर्माळ्याला घरची बैलगाडी बोलावून घेतली होती. तीमधून पुढचा प्रवास सुरू झाला. १० मैलांचे अंतर होते. ७/८ मैल प्रवास झाला. फक्त २।३ मैल डोणजे राहिले होते. घरची गाडी होती. बैल घराच्या ओढीने जोरात निघाले. रस्ता नेहमीच्या वळणातला होता. स्वामींना झाडपाल्याची, वनस्पतींची माहिती भरपूर होती. ते वेगवेगळे झाड पाहून त्याच्यावर नवनवीन माहिती सांगत. त्यांची हिंदी भाषा, बंगाली ढंगाची ! ऐकायला मोठी गोड लागायची ! पण त्यातले सगळे काही समजत नसे. मग अशा वेळी समजून सांगतांना खूप मजा व विनोद होत असत. अशा मजेत व विनोदात प्रवास चालला होता.

आणि इतक्यात, गाडी उलटली! गाडी कशी उलटली, काय झाले हे कुणाच्याही लक्षात आलेच नाही. खोल खड्ड्यात गाडी पडली. गाडीतले सगळे जण पडले. पण प्रत्येकाने स्वतःकडे दुर्लक्ष करून स्वामींच्याकडे लक्ष दिले. स्वामी पडले होते पण तेही पटकन स्वतःला सावरून उठले आणि बैलांच्या गळ्याला फास लागला तो काढण्याकडे धावले. गाडीवानाच्या हे लक्षात येताच तो पुढे झाला. त्याने प्रथम बैलांना धुरेपासून मोकळे केले. या प्रसंगी

कोणालाही इजा झाली नाही. पण स्वामींच्या डाव्या हाताला मात्र चांगलाच मार बसला. त्यांनीच कुठलासा झाडपाला आणवून घेतला. हाताला बांधला आणि छाटीने हात गुंडाळून ती छाटी गळ्यात अडकविली. स्वामींना हे हाताचे दुखणे पुढे बरेच दिवस पुरले. नंतर आवरसावर करून सर्वांसह स्वामी डोणजात आले. नानांच्या घरी त्यांचा मुक्काम झाला. नानांच्या बंधूंचा परिवार, घरदार, शेतीवाडी, गुरे, वासरे हे सर्व काही स्वामींनी प्रसन्न अंतःकरणाने पाहिले ! भालेराव कुटुंब मोठे मातब्बर आणि समृद्ध आहे याची स्वामींना जाणीव झाली. त्यावर स्वामींच्या कृपा दृष्टीची भर पडली.

स्वामींचा मुक्काम डोणजाला नानांच्याकडे एकूण ७/८ दिवस झाला. त्या अवधीत त्यांनी नानांचे थोरले बंधू दादासाहेब ( श्री. व्यंकटराव ) यांना शक्तिपात दीक्षा दिली. पुर्वपुण्याईने सद्‌गुरु घरी चालत येतात आणि कृपा करतात ही खरी देवाची कृपा असते. हे पूर्वपुण्याईचे फळ असते. त्याची ही साक्ष होती. स्वामींच्या कृपापूर्ण दृष्टीने डोणजाचा, विशेषतः भालेराव कुटुंबियांचा, सारा परिवार पवित्र झाला. स्वामी या कुटुंबात मिळूनमिसळून गेले.

डोणजाहून परतताना 'आलेश्वर' नावाच्या खेडेगावी श्री. कुलकर्णी यांचेकडे स्वामींची भिक्षा झाली. स्वामींनी जाता जाता आपल्या घरी यावे. भिक्षा करावी. अशी कुलकर्णी यांना तळमळ लागली होती. ती त्यांनी नानांना बोलून दाखविली. त्यांचा आणि नानांचा गावाकडचा परिचय होता. नानांनी स्वामींच्या कानावर ही गोष्ट घालून, संमती घेऊन ठेवली. श्री. कुलकर्णी यांना हे समजले तेव्हा ते फार खूष झाले. त्यांना ही फार मोठ्या भाग्याची गोष्ट वाटली. त्यांनी आणि त्यांच्या पत्नीनी अत्यंत श्रद्धेने भिक्षेची तयारी केली. सडा रांगोळ्यांपासून उत्तम अन्नपदार्थां-पर्यंत कसलीही उणीव ठेवली नाही. सारे शास्त्रशुद्ध, आचारशुद्ध असेच वातावरण होते. श्री. कुलकर्णी यांनी स्वामींच्या खाण्यातील काही विशेष आवडीचे पदार्थ नानांना विचारून ठेवले होते. त्याप्रमाणे त्यांनी शेवग्याच्या शेंगांची आमटी आणि कुरडया मुद्दाम केल्या होत्या. सर्व पदार्थांना उत्तम चव आली होती. स्वामीसुद्धा प्रसन्न होते. या भिक्षेची आठवण स्वामींना पुढे कित्येक दिवस येत होती.

नंतर कुठेही न थांबता स्वामी सरळ पुण्यास आले. स्वामी महाराजांच्या दारात उभे राहिले आणि त्यांनी जोरात हाक मारली "वामनराव आम्ही भुजंगरावांच्या

गावावरून आलो." महाराज पुढे झाले. स्वामींच्याकडे पाहातात तो उजव्या हातात दण्ड आहे आणि डाव्या हाताला छाटी गुंडाळून ती गळयात बांधलेली! महाराज आश्चर्यचकित झाले. त्यांनी स्वामींना नमस्कार केला. त्यांना आसनावर बसविले आणि आपली दैनंदिनी उघडून त्यातील एक स्वप्न स्वामींना वाचून दाखविले.

ज्या दिवशी स्वामींचा हात दुखावला त्या रात्रीचे हे स्वप्न होते. स्वप्न नव्हे तो दृष्टांत होता. हे आज स्वामींना पाहिल्यावर सिद्ध झाले. महाराजांच्या समोर स्वामी उभे आहेत. उजव्या हातात दंड आहे. आणि डाव्या हातात फडके गुंडाळून ते फडके गळ्याला बांधले आहे. स्वामींच्या हाताची ही स्थिति पाहाताच महाराजांनी स्वामींना विचारले "स्वामीजी! हे काय झाले आहे?" यावर स्वामी म्हणाले, "विशेष काही नाही. प्रारब्ध भोग आहे." स्वामी तेथेच अदृश्य झाले आणि महाराज जागे झाले. स्वामींना काही अपघात झाला या जाणीवेने चित्ताला अस्वस्थता आली. त्यांनी हे स्वप्न आपल्या दैनंदिनीमध्ये लिहून ठेवले. आपल्या आई व भगिनीजवळ या स्वप्नाचा उल्लेख केला. आज स्वामी पुण्यात आले तेव्हा सर्व उलगडा झाला.

स्वामींचा पुण्यात थोडे दिवस मुक्काम राहिला. हाताला रोज चोळून घेण्याचा उपाय सुरू झाला. थोडे फार औषधपाणी केले. हाताच्या दुखण्याला उतार पडला. प्रकृतीला आराम मिळाला. तेव्हा स्वामींनी पुणे सोडले. सोमवार दि. २ फेब्रुवारी १९३१ ला स्वामी हुशंगाबादेस पोहोचले.

हुशंगाबादेहून स्वामी पुढे सागरला श्री. रावसाहेब परांडे यांचेकडे गेले. तेथून ते परत दौंडला भास्करराव भागवतांचेकडे आले. दौंडवरून स्वामी कुर्डुवाडी, मिरज करून कुडुत्रिला आले. 'कुडुत्रि' हे महाराजांचे जन्मस्थान! तेथे महाराजांचे घर, शेतीवाडी सर्व काही होते. ते ठिकाण आपण पाहून यावे अशी स्वामींची इच्छा होती. कोणालाही न सांगता, स्वामी अचानकपणे कुडुत्रिला गेले. त्या वेळी तेथे महाराजांचे तिन्ही थोरले बंधू होते. सर्वात थोरले श्रीशंकरभट, (बाबा) यांनीच पुढे संन्यास घेतला, मधले श्री. नरहरीपंत, यांना तात्या म्हणत असत, धाकटे श्री. गोविंदराव (आप्पा) हे तिघे बंधू महाराजांपेक्षा मोठे होते. असे हे तिघेही बंधू घरी असताना, अचानकपणे स्वामी त्यांच्या घरी गेले. सर्वजण स्वामींना "बंगाली स्वामी" म्हणून ओळखीत होते.

चैत्र शु॥ ९, राममवमीचा दिवस, शनिवारी मध्याह्नाला, स्वामीजी अचानकपणे अभ्यागत अतिथी स्वरूपात श्री. शंकरभटजींचे दरवाजांत उभे राहिले. आणि त्यांनी " नारायण " या महामंत्राची घनगंभीर गर्जना केली.

मध्यान्हीं अतिथी रुपांत भगवान् श्रीदत्तात्रेय येत असतात या श्रद्धेचे हे कुटुंब आहे. त्यांनी " नारायण " शब्द आंतून ऐकताच मध्यान्हीं दाराशी यतिराज आले या जाणीवेने सर्वांना महदानंद झाला. श्री. गोविंदराव ( आप्पा ) तांतडीने बाहेर आले. त्यांनी स्वामींना तात्काळ ओळखले आणि ' या या ' म्हणत श्रीशंकरभटजींना म्हणाले " बंगालीस्वामी आले आहेत. " त्यावेळी श्रीशंकरभटजी भोजन करीत होते.

श्री. गोविंदरावांनी स्वामींची सर्व व्यवस्था केली स्नानासाठी पाणी दिले. स्वामींच्या आह्निक व भिक्षेची तयारी केली. स्वामींची भिक्षा झाली. मग दुपारी बोलणे चालणे झाले. त्यावेळी समजले की स्वामी कोल्हापूरहून मोटारने आले आहेत. आजच जाण्याची त्यांची इच्छा होती पण सर्वांनी आग्रह करून त्यांना ठेवून घेतले. ५ / ६ दिवस स्वामींचा मुक्काम झाला. पौर्णिमेनंतर दुसरे दिवशी ते येथून निघाले.

कुडुत्रिहून स्वामी तारळे आणि मुरगुड या गावी गेले. ही ठिकाणे महाराजांच्या नातेवाईकांची आहेत. तारळे येथे श्रीगुरुमहाराजांच्या थोरल्या भगिनी सौ. तानुआल्या बडकत्ते यांचे घर आहे आणि मुरगुड येथे सौ. रमाबाई जोशी या महाराजांच्या धाकट्या भगिनी रहात होत्या. या प्रवासात महाराजांच्या आतेभगिनी सौ. अनुताई यांना स्वामींनी दीक्षा दिली. यानंतर स्वामी कोल्हापुरास आले. कोल्हापुराहून हुशंगाबादेस गेले. तेथे ५।६ दिवस मुक्काम केला आणि स्वामी श्रीक्षेत्र वाराणशीस गेले.

## " गुणी गुणं वेत्ति "

इ. स. १९३१ च्या जुलैच्या पहिल्या आठवड्यात स्वामीजी ह्रुशंगाबादेहून श्रीक्षेत्र काशीस आले. या खेपेस स्वामीजींनी आपला मुक्काम अस्सी घाटावरील " अनंत विज्ञान मठा "मध्ये ठोकला. प्रत्येक वेळी स्वामींची लहर काही निराळीच असे. त्यांचे व्यक्तिगत स्वातंत्र्य जरा आगळे वेगळेच आहे. आत्मारामाच्या लहरीला स्वामींची इंद्रिये कधीच आकळू शकली नाहीत. बिचाऱ्या इंद्रियांना निमूटपणे आत्मारामाच्या लहरीप्रमाणे वागावे लागते. मग इतरांची काय कथा ? पण ही स्थिति ज्यांना आत्माराम भेटला आहे त्यांची असते.

राजाच्या मागेपुढे शिपाई असतात. त्याप्रमाणे कैद्याच्याही मागेपुढे शिपाई असतात. म्हणून काय राजा आणि कैदी एकाच योग्यतेचे असतात काय ? राजाच्या मागेपुढे असणाऱ्या शिपायांना राजाज्ञेने पाऊल टाकावे लागते तर कैद्याच्या मागे-पुढे असणारे शिपायी आपल्या इच्छेने कैद्याला ओढत, फरफटत, फटके मारीत नेत असतात. आणि बिचारा कैदी सारी छीः थू सहन करीत ते शिपायी नेतील तसा तो कैदी जात असतो. राजा तो राजा ! आणि बिचारा, कैदी तो कैदी !! एक मुक्त आहे तर दुसरा बद्ध आहे !

स्वामीजी राजाप्रमाणे सर्वतंत्र स्वतंत्र होते. राजाज्ञा म्हणजे देवाज्ञा ! यावर उपाय नाही ! स्वामींना कोणत्याही एका मर्यादेत, चाकोरीत, वा नियमात घालून पहाता येणार नाही. ते मर्यादेच्या बाहेरही सापडतील तसे आतही सापडतील. परंतु जेथे सापडतील तेथे राजाप्रमाणे अनिर्बंध, निर्भय व निश्चल आढळतील. स्वामींनी आपल्या आत्मारामाची कधीही उपेक्षा केली नाही. ते स्वभावाने इतके सरळ असत की अगदी लहान मुलाप्रमाणे निरागस, निष्पाप आणि साधे भोळे ! कितीही त्रास

पडला, कष्ट झाले तरी त्यांनी आपला सरळपणा सोडला नाही, ते वाकड्यात कधी शिरले नाही असे म्हणण्यापेक्षा त्यांच्या सरळ स्वभावात वाकडेपणाला प्रवेशही करता आला नाही. म्हणून ते जीवनभर मुक्तच होते.

अशा या आगळ्या लहरी स्वामींचा यावेळचा मुक्काम अस्सी घाटावर होता. म्हणजे काशीक्षेत्राच्या एका टोकावर होता. त्यामुळे काशीक्षेत्राच्या गर्दीचा संपर्क येथे फार कमी होता. गावाबाहेरचे शांत वातावरण येथे अनुभवता येत होते. मठामध्ये बसून गंगामातेचा मंद प्रवाह संथपणे पहाता येत होता. मंद प्रवाहावरील झुळझुळणाऱ्या असंख्य लाटा मनाला तरंगित करीत असत. हा गंगामातेच्या मनोहरतेचा दर्शनानंद, केव्हाही लुटता येण्याची सोय, अनंत विज्ञान मठात सहज, सुलभ, उपलब्ध होती.

स्वामींच्या नित्यक्रमात अनित्य वस्तूला क्रम च काय स्थानही नसे. जी वस्तू 'त्या' नित्यामध्ये बसेल तो त्यांचा नित्य-क्रम ! या सूत्रातील स्वामींचा नित्यक्रम, देह-बुध्दीच्या चर्मचक्षूंना, अजब नि विचित्र वाटला असेल कदचित्, परंतु स्वामींची नित्यानित्यवस्तुविवेकाची सावधता अत्यंत पराकोटीची असल्यामुळें, त्याही अनित्य चर्मचक्षूंकडे, त्यांनी नित्यविवेक दृष्टीने दुर्लक्षच केले. स्वामींच्या अनंत मठातील वास्तव्यात एका कार्यक्रमाची वाढ झाली. त्यांना सवड सापडेल किंवा लहर लागेल तेव्हा ते गंगा प्रवाहाकडे शांतपणे पहात रहात. श्री गंगेचे निर्विकार तरंग पहाता पहाता मन निर्विकार झाले, की सतत शिल्लक रहाते ती, गंगेची रम्य प्रसन्नता. ही प्रसन्नता पुरे असे कधी वाटतच नाही, म्हणून तर ते तासन् तास यामध्ये घालवीत असत.

श्रीगंगामातेच्या जललहरींच्या विविध तरंगांकडे पहात असताना स्वामींनी आपल्या मानसगंगेच्या भावलहरींचे विविध तरंग, आपल्या परम शिष्याकडे, महाराजांच्याकडे पत्रांच्या पात्रातून, प्रवाहित केले. राजा भगिरथाकडे वाहाणाऱ्या भागिरथीप्रमाणे ! आपण त्या रम्य तरंगांचे सौंदर्य न्याहाळूं या ! काशीतील विविध स्थानांतून आलेल्या— स्वामींच्या पत्रांचा मराठी अनुवाद —

अनंत विज्ञानमठ
अस्सी घाट, काशी
१५–७–३१

नारायण ....

मी दौंड, कुर्डुवाडी, मिरजेवरून कुडुत्रिला गेलो होतो. त्याच मार्गाने

हुशंगाबादेस परत आलो........ अशा काही अनिश्चित स्वरूपात धावत होतो माझी एवढी धावाधाव कशी केली ती त्या नारायणालाच ठाऊक .... बिनाकारण एवढा प्रवास खर्च करून, २।३ दिवस उपाशी राहून, भटकत रहाणारा असा माझ्या शिवाय दुसरा कोण मूर्ख असेल ? ....

.... येथे मी एका हॉलमध्ये पडून असतो. अजून तरी मठातून भिक्षा मिळते. पुढे कधी गैरसोय झालीच तर माधुकरी मागेन. गेल्या पाच दिवसापासून थंडी तापाने आजारी आहे. पूर्ण लंघन करीत आहे. आयुर्वेदिक औषधे घेतली पण त्यांचा काही गुण आला नाही. नशीबी असेल ते भोगले पाहिजे.

काशीमध्ये चातुर्मास होईल. इति.

शुभेच्छु
स्वामी लोकनाथ तीर्थ

स्वामींचा काशीमधील पत्ता बदलला. त्या पत्त्यावरून आलेले एक पत्र —

नारायणक्षेत्र, महल्लानागवा
पोस्ट-लंका; बनारस सिटी
२६–८–१९३१

नारायण....

.... पोस्ट पार्सल पोहचले. श्री दासबोध ग्रंथ आणि श्री समर्थ रामदासांचा फोटोही मिळाला.

....मी आनंदात आहे. इति
शुभेच्छु
स्वामी लोकनाथ तीर्थ

पुन्हा दोन महिन्यांत स्वामींचा काशीतील पत्ता बदलला. त्या पत्त्यावरून आलेले पत्र —

गणेशबारा, अस्सीघाट
बनारस
७–१०–१९३१

नारायण....

...काशीतील मठपति बाहेरच्या संन्याशांना बहुतेक आपल्या मठात राहाण्यास जागा देत नाहीत. दैवयोगाने जर कदाचित् एकाद्या मठपतीने जागा दिलीच तर ती

अत्यंत निकृष्ट जागाच देतात. सध्या मला जेथे जागा मिळाली आहे तेथे राहण्यासाठी एकही संन्यासी त्यांना न मिळाल्यामुळे मिळाली आहे.

मी येथून स्थानांतर करून उत्तर काशीला जावे म्हणून विचार करीत होतो परंतु 'ती' मला जाऊ देत नाही, खूप विचाराअंती आतून असे दिसते की माझे दोन्हीही हात शृंखलेने बांधलेले आहेत. मी सध्या काशीतच राहिले पाहिजे असे मला वारंवार सांगितले जाते. सध्या भिक्षेची जी स्थिति आहे ती पत्रामधून लिहिण्यास मी समर्थ नाही.

नृत्यगोपाल दरमहा जे ५ रुपये पाठवीत होता ते मी काही कारणास्तव घेणे बंद केले आहे. येथे गृहस्थाश्रमी लोक सुध्दा संन्याशांना राहाण्यासाठी जागा देत नाहीत. इति.

शुभेच्छु
स्वामी लोकनाथतीर्थ

ऑक्टोबर ते जानेवारी या दोन तीन महिन्यात स्वामींनी पुन्हा जागा बदललेली आहे. या नव्या जागेतून आलेले पत्र–

राणा महल घाट
महावीर मंदिर, बनारस
२४–१–१९३२

नारायण....

दिनांक ३ जानेवारीस मी नारायणक्षेत्र सोडून राणा महल घाटावर आलो आहे.

आपण पाठविलेले रु. १०/– मला काल मिळाले. मी सध्या येथे बंगाली ब्राह्मणाच्या घरी माधुकरी भिक्षा करून राहतो. कधी कोणी भिक्षेचे निमंत्रण दिलेच तर एकान्न भिक्षा सुद्धा करतो.

येथे भाडे दिल्याशिवाय रहाण्यासाठी जागा मिळणे अशक्य आहे असे मला दिसते. सध्या मी ज्या जागेत रहातो त्या ठिकाणी एक संन्यासी भाडे देऊन एका खोलीत रहात होते. ते संन्यासी दोन महिन्यांसाठी परठिकाणी गेले आहेत म्हणून मला ही खोली दोन महिन्यांपुरती मिळालेली आहे.

रहाण्याची जागा आणि भिक्षेचे वर्णन पत्रात लिहिणे अशक्य आहे. इति.

शुभेच्छु
स्वामी लोकनाथतीर्थ

स्वामींची मनोभूमि पत्रातील भाव तरंगातून स्पष्ट दिसते. ज्यावेळी जी व्यक्ति जशी दिसली तशी ती त्यांनी व्यक्त केली. त्यांना अनेक जागा बदलाव्या लागल्या म्हणून कधी तक्रार किंवा त्रास त्यांनी मानला नाही. जे खटकले तेही सरळ स्पष्ट शब्दात मांडून दाखविले. दोष दर्शन जितक्या मोकळेपणाने केले तितक्याच मोकळे-पणाने त्यांनी स्वत:बद्दलचेही विचार मांडले आहेत.

"उगाच एवढी धावाधाव करणारा माझ्याशिवाय दुसरा कोण मूर्ख आहे" स्वत:ला मूर्ख म्हणण्यात जर खोच असेल तर ती आनंद व्यक्त करणारी आहे दु:ख सांगणारी नाही.

"माझी एवढी धावपळ कशी झाली हे त्या नारायणालाच ठाऊक." ज्या प्ररणेने हिमालयातील स्वामी दक्षिणेकडे आले तीच प्रेरणा त्यांना सारखी फिरवीत आहे हे माहीत असूनही ते त्या नारायणालाच ठाऊक म्हणून गुह्य गोष्टीची गुप्तता सहज ठेवली आहे.

"दोन्ही हात शृंखलेने बद्ध आहेत." यातील एक संन्यासाश्रमाचे बंधन आहे आणि दुसरे बंधन आहे शक्तिपात योगसाधन दीक्षेचे. या शक्तिपात योग-साधनेचा पथिक, साधन घेताक्षणीच पूर्णपणे शक्तीच्या आधीन जाऊन परतंत्र होत असतो. त्यांच्या संपूर्ण जीवनावर या योग साधनेचे नियंत्रण येत असते. ही साधना जितकी तीव्र वेगाने चालते तितकीच जीवाची पारतंत्र्याची तीव्रता वाढते. साधक अक्षरश: यंत्रवत असतो. आलेल्या गतीप्रमाणे फिरत रहाणे एवढेच त्या यंत्राचे काम शिल्लक रहाते.

यासाठी प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांचे उदाहरण मोठे उद्बोधक आहे. हे स्वामीमहाराज दीक्षागुरु भगवान् श्रीदत्तात्रेयांच्या संपूर्ण आधीन होते. श्रीदत्तात्रेयांच्या आज्ञेशिवाय ते काहीही करू शकत नव्हते. या रस्त्याने जायचे नाही हे सुचविणाऱ्या लाल मुंग्यांची भावना त्यांच्याशिवाय इतर कोणाच्या लक्षात येणार? अशी ही परतंत्रता परम भाग्याची गोष्ट आहे. ही स्थिति साधनेने येते.

**"साधनेनहि सिद्ध्यन्ति कार्याणि न मनोरथैः"**

या पत्रातून आणखी एक विशेष गोष्ट लक्षात येते की, स्वामी अत्यंत गुण-ग्राही आहेत. वास्तविक गुणांची पारख ही अति कठिण व अवघड बाब आहे. अत्यंत

बुद्धिमान, गुणसंपन्न व्यक्तींच, गुणी जनांची पारख करू शकते. महाराष्ट्रात हिंडता हिंडता, येथील साधु संतांकडे स्वामींचे मार्मिक लक्ष असे. तुकारामाची गाथा त्यांच्या संग्रही, यापूर्वीच गेली होती. त्यातलि बरेच अभंग दृष्टांतासाठी स्वामी वापरतिही असत. आता त्यांचे लक्ष श्रीसमर्थांकडे वळले आहे. समर्थांचा स्पष्टपणा स्वामींना 'समानधर्म' म्हणून रुचणारा आहे. श्रीसमर्थांच्या दासबोधाचे अध्ययन स्वामींनी या काळापासून सुरू केले. दासबोधातील अनेक ओव्या त्यांच्या पत्रातून आलेल्या आढळतात. त्याचा प्रारंभ आतापासून आहे. समर्थ रामदासांच्या बद्दल स्वामींना फार मोठे आकर्षण होते. त्या आकर्षणामुळेच त्यांचे दासबोधाचे उत्तम अध्ययन झाले आहे.

**'गुणी गुणं वेत्ति' न वेत्ति निर्गुणः ॥**

## पुन्हा एकदा टेहरीकडे !

श्रीक्षेत्र काशीमध्ये असताना स्वामींना उत्तर काशीची राहून राहून आठवण येत होती. जणू भागिरथीच्या किनाऱ्याचा परिसर त्यांना बोलावीत होता. टेहरीची तपोभूमि स्वामींना हाक मारीत होती. स्वामी सुद्धा तिकडे जाण्याच्या तयारीत होते. मूक मनाने 'आलो, आलो' सुद्धा म्हणत होते. पण 'सध्या काशी न सोडण्याची' आज्ञा असल्यामुळे ते जाऊ शकत नव्हते. स्वामींना टेहरीकडे जाण्याची आंतरिक ओढ लागली होती. जन्मभूमि बंगालकडे जावेसे स्वामींना कधी वाटले नाही पण तपोभूमि टेहरीकडे जाण्याची तीव्रता मात्र त्यांच्या मनात वाढत होती.

दहा वर्षापूर्वीचे दिवस त्यांच्या डोळ्यापुढे उभे राहू लागले. स्वामींनी टेहरीच्या पुण्यपावन सिद्धभूमीमध्ये वास्तव्य केले होते. तिथल्या निसर्गामध्ये ते एकरुप झाले होते. स्वामी तो रम्य निसर्ग विसरू शकत नव्हते आणि तो नितांत रम्य निसर्ग या तरुण स्वामींना विसरू शकत नव्हता. ज्यांनी तप करता करता साऱ्या वनविथींना प्रेम लावले होते, ते एकांतप्रिय स्वामीजी आता गर्दीला कंटाळून गेले होते. आता पुन्हा ते 'स्वान्तसुखाय' हिमालयाच्या गिरिगव्हराचा आश्रय घेण्यास अधीर झाले होते. पण आजपर्यंत 'तिची आज्ञा' नसल्यामुळे काशी सोडता आली नाही. म्हणून इतके दिवस येईल त्या स्थितीला तोंड देत रहावे लागल. परंतु हिमालयाकडे जाण्याची आज्ञा मिळताच

स्वामींनी निघताना चंद्रग्रहणाचाही विचार केला नाही. "शुभस्य शीघ्रम्" या न्यायाने त्यांनी तात्काळ काशी सोडली.

सोमवार दि. २१ एप्रिल १९३२, फाल्गुन शु॥ १४ शके १८५३ च्या रात्री रेल्वेने स्वामी लखनऊ, हरिद्वार, डेहराडून या मार्गाने हिमालयाच्या कुशीत शिरले. डेहराडूनपासून सात मैल अंतरावर 'राजपूर' नावाच्या गावी मोटारने गेले. यापुढे त्यांचा प्रवास पायी झाला. त्याचे वर्णन त्यांनीच एका पत्रात पुढीलप्रमाणे केले आहे.

"राजपूरहून मी पायी निघालो. समुद्रसपाटीपासून सात हजार फूट उंचीचा पर्वत ओलांडला. त्यामुळे एकाहत्तर मैलांचे अंतरावर असलेल्या उत्तरकाशी या स्थानी येऊन पोहोचलो.

या पर्वतामध्ये एक छोटे, टुमदार शहर वसले आहे. पर्वतातील या शहरांत म्युनिसिपालिटी आणि कोर्ट इत्यादि सर्व काही आहे. हे ठिकाण अत्यंत थंड आहे. या छोट्या शहरात घराला भाडे द्यावे लागत नाही. पण मजा अशी आहे की महिन्याला चार आणेप्रमाणे संडासाचे भाडे मात्र द्यावे लागते.

आता उत्तर काशीमध्ये राहाण्यासाठी मला एक स्वतंत्र खोली मिळाली आहे. येथे भिक्षेसाठी तीन अन्नछत्रे आहेत. भूक निवारण करण्यास योग्य आणि हवे तेवढे अन्न येथे मिळते. नारायणावर सर्व हवाला ठेवला आहे. मी येथे आनंदात आहे."

स्वामींना उत्तर काशीमध्ये येण्याची जी सारखी इच्छा होत होती त्याला आणखी एक महत्त्वाचे कारण होते. स्वामींचे गुरु प. प. श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थ-स्वामीमहाराज यावेळी उत्तर काशीमध्ये आले होते. या गेल्या वर्षभरात श्रीशंकरपुरुषोमतीर्थस्वामीमहाराज यापूर्वी एकदा त्यांचे अनुग्रहीत दीक्षितस्वामी श्रीप्रकाशाश्रम संन्यासी यांचेकडे आले होते. त्यावेळी योगायोगाने आश्रमासाठी जागा मिळाली आणि पुढे त्या जागेवर दोन झोपड्याही उभ्या राहिल्या. या आश्रमाच्या सर्व घटना घडताना स्वामी श्रीलोकनाथतीर्थमहाराज आपल्या गुरूंच्याबरोबर उत्तर काशीत होते. स्वामींना यामुळे इकडे येण्याच्या प्रेरणेला जोर येत असे.

टिहरी गढवाल राज्याचा हा परिसर नव्या सरकारच्या नियमाने उत्तर प्रदेशात

सामील करून टाकला आहे. आता उत्तरकाशी हा जिल्हा बनविण्यात आला. उत्तरकाशी शहर अलीकडे खूप सुधारले आहे. पण पूर्वी हे शहर नसून छोटे गाव होते. हे डोंगरांनी वेढलेले ४।५ शे वस्तीचे डोंगरी गाव होते. येथे साधू महात्म्यांचे आश्रम असत, भागिरथीच्या किनाऱ्याला लागून हे गाव असल्याने तीर्थक्षेत्र म्हणून याला विशेष महत्व असे. सभोवताली उत्तुंग पर्वतराजी ! पर्वतांच्या मस्तकी हिऱ्यामोत्यांचे शिरपेंच लखलखत होते. पर्वतचरणांच्या आधाराने उभे असलेले प्राचीन वृक्ष आपल्या आश्रयदात्याच्या शिरपेंचाचे दर्शन घेण्यासाठी प्रतिवर्षी खूप उंच होत होत शतकेच्या शतके घालवीत आले आहेत. पण अद्याप तरी एकाही वृक्षाला त्या शिरपेंचाचे दर्शन घेता आले नाही. असे असले तरी शांतपणे 'उध्दरेदात्मनात्मानम्' सूत्राचा पाठ ते गिरवीत आहेत. भागिरथीचा खळखळाट साऱ्या वस्तुजाताला चैतन्याची स्पंदने देत आहे. एकूण वातावरण निसर्गसौंदर्याने, नीरव शांततेने, आणि भागिरथीच्या सान्निध्याने सिद्ध साधकांचे अत्यंत आकर्षक स्थान झाले आहे. अशा ठिकाणी शक्तिपात दीक्षेच्या महासाधनेचा आश्रम झाला ही ईश्वरी कृपाच आहे.

इ. स. १९३२ च्या वैशाख महिन्यात येथील आश्रमाची 'वास्तुशांत' झाली. या नव्या जागेत तयार झालेल्या दोन खोल्यांच्या वास्तूला "शंकर मठ" हे नाव दिले. स्वामी श्रीलोकनाथतीर्थमहाराज आणि स्वामी श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थ सद्गुरु महाराज या गुरुशिष्यांची जोडी जशी आजपर्यंत अनेक प्रसंगात एकत्र आली तशी 'शंकर मठ' स्थापनेच्या वेळीही उत्तरकाशीमध्ये एकत्र आलेली आहे. परस्परांच्या सहवासाने आनंदित वातावरणात पुन्हा बराच काळ एके ठिकाणी राहिलेली आहे.

या वर्षीचा स्वामींचा चातुर्मास येथेच झाला. श्रीगुरूंच्या सान्निध्यात हा चातुर्मास झाला. चातुर्मास समाप्तीनंतर स्वामी येथून हरिद्वार येथे गेले. हरिद्वारला गेल्यावर स्वामींची प्रकृति बिघडली. पित्त ज्वराच्या आजाराचे दुःख सहन करावे लागले. या आजारात स्वामींनी बारा दिवसांचे उपोषण केले. आजार आणि उपोषण या जोडगोळीने स्वामींचे शरीर अगदी दुबळे झाले. तरी तसेच सारे काही सहन करण्याचा त्यांचा नित्याचा परिपाठ असल्याने त्यातही त्यांनी काही कमी केले नाही.

संन्यासी जीवन किती कठिण आहे याची कल्पना स्वामींच्या जीवनावरून स्पष्ट होते. या जीवनाला 'अग्निदिव्य' 'कंटकाकीर्णपथ' यासारखी विशेषणे यथार्थ आहेत. संन्यासी जीवन स्वीकारले म्हणून काही सुखदुःखादि प्रारब्धभोग सुटत

नसतात. उलट हे जीवन ज्ञानमय असल्याने 'भोगात् एव क्षयः' या मनोभूमिकेने सारे प्रारब्धाचे चटके निमूटपणे व्यक्त न करता सहन करावे लागतात. सुखदु:खाचे आवेग सहन करणे हा असामान्य सद्‌गुण आहे. सत्पुरुषांचे श्रेष्ठत्व या प्रकारच्या सहनशीलतेत असते. प्रकृतीची प्रतिकूलता पाहून स्वामीजी हरिद्वारला फार थांबले नाहीत. ते लवकरच हृषिकेशला आले. मधून अधून आपले वृत्त ते पुण्यालाही पाठवीत पण तेही अति संक्षिप्त स्वरूपात असे. स्वामींची अशी प्रकृति ठीक नसलेली पत्रे आली की महाराज फार अस्वस्थ होत असत. इतक्या लांबून जे शक्य आहे ते ताबडतोब करीत. महाराजांनी दहा रुपये म. ऑ.ने पाठवून दिले. औषधपाणी, खाणेपिणे, इतर काहीही अडचण पैशाने त्वरीत दूर करता येते म्हणून हा उपाय केला. महाराजांनी १०।१२ दिवसांनी आणखी पाच रुपये पाठवून दिले. इ. स. १९३२ च्या आश्विन–कार्तिकामधले ते दिवस होते.

संकटे येऊ लागली म्हणजे टोळधाडीप्रमाणे प्रचंड संख्येने येतात. महाराजांचासुद्धा हा काळ फार मोठ्या संकटांचा होता. स्वामी आजारी हरिद्वारला तर आई उमाबाई आजारी गावी कुडुत्रिला. इकडे आड तिकडे विहीर अशी स्थिति होऊन बसली. आजार आला की पैशाची गरज वाढलीच. मिळकत जेमतेम ३०।३५ रु. मासिक. वाडीला गुरुद्वादशीचे दिवस आलेले. देवाला महापूजा नित्याप्रमाणे होणारच. आईची प्रकृति इतकी बिघडली तरी गुरु आणि ईश्वर यांच्या निष्ठेत तिळमात्र उणेपण नव्हते, तसे आईच्या सेवेतही काही कमी पडू दिले नाही. महाराज कुडुत्रिहून गुरु द्वादशीस वाडीला आले, महापूजा व प्रसाद केला, देवाचे तीर्थ आणि अंगारा घेऊन परत आईपाशी कुडुत्रिला गेले, ईश्वरी कार्यासाठी हजारो, लाखो रुपये खर्च करणारे दानशूर भेटतील परंतु स्वतःच्या जीवनाच्या सुखसोयींचा विचार न करता सर्वस्व अर्पण करण्याची बुद्धि ठेवून अनन्यतेने शक्य तेवढे सतत खर्च करणारा विरळा! स्वामींना महाराजांच्या या परिस्थितीच्या जाणीवेने फार करुणा आली, आणि धन्यताही वाटली.

महाराजांना दिवाळीची सुट्टी असल्याने आईच्या आजारासाठी रजेची वेगळी गरज भासली नाही. कुडुत्रिला आईच्या सेवेला सर्वजण हजर होते. एका महासाध्वी मातेच्या दर्शनासाठी सर्व नातेवाईक मंडळी जमली होती त्याप्रमाणे गावातीलही अनेक लोक आले होते. सर्वांचा शांतपणे निरोप घेतला आणि 'श्रीगुरुदेवदत्त'

नामस्मरण करीत उमाआईंनी जीवनयात्रा संपविली. कार्तिक शु॥ षष्ठीचा तो दिवस होता. श्रीगुरुमहाराजांनी स्वामींना हे वृत्त पत्राने कळविले. स्वामींनी हृषिकेशहून लगेच महाराजांना समाचाराचे पत्र लिहिले.

हृषिकेश

नारायण.... १०-१-३३

........आपल्या सर्व नातेवाईकांच्या समक्ष, अत्यंत शांतपणे आपल्या मातोश्रींचा देहांत झाला हे त्यांच्या दृष्टीने फार उत्तम झाले.....

शुभेच्छु

स्वामी लोकनाथतीर्थ

यानंतर महाराजांची प्रकृति बिघडली. त्यांनाही ताप सुरू झाला. एकूण सर्वच बाजूंनी प्रकृतीवर ताण पडलेला होता. महाराजांनी स्वामींना आपल्या आजाराचे वृत्त कळविले. ते पत्र पाहून स्वामींना चिंता वाटू लागली. स्वामींनी लिहिले.

हृषिकेश

"नारायण" २४-१-३३

"......आपल्या तापाची बातमी वाचून काळजी वाटू लागली आहे. मीसुद्धा आश्विनात तापाच्या आजाराने मृत्युशय्येवरच पडलो होतो. परंतु प्रारब्धाचा जोर मोठा असल्याने अजूनही शरीरात प्राण शिल्लक राहिले आहेत. आता माझी प्रकृति पूर्वीपेक्षा चांगली आहे. आपल्या कुशालीची माहिती लिहून मला निश्चित करावे....

शुभेच्छु,

— स्वामी लोकनाथतीर्थ.

स्वामींचा मुक्काम पुढे ४।५ महिने हृषिकेशलाच राहिला. त्यांनाही ते वातावरण सोडवत नव्हते. नंतर हृषिकेशहून ते परत एकदा उत्तरकाशीस गेले आणि नंतर तेथून ते १९ जून १९३३ ला निघाले. यानंतर ते कुरुक्षेत्रास आले.

# अनुपशहरातील अनुपम चातुर्मास

स्वामीजी इ. स. १९३३ च्या जूनच्या शेवटच्या आठवड्यात कुरुक्षेत्रामध्ये आले. तीर्थयात्रेच्या निमित्ताने स्वामींचा सतत प्रवास चाले. अनेक पुण्यस्थलांचे दर्शन होत असे. याशिवाय स्वामींच्या संबंधात आणखी अनेकजण येऊन कृतार्थही होऊन गेले असतील. परंतु तो खुलासा कधी झाला तरच समजू शकणार आहे. सध्यातरी उपलब्ध माहितीवर संतुष्ट राहिले पाहिजे. स्वामीजी कुरुक्षेत्रामध्ये आल्यानंतर स्टेशनपासून आतमध्ये ३।४ मैलावर स्थानेसर म्हणून तीर्थस्थान आहे तिकडे गेले.

कुरुक्षेत्र ही पुण्यपावन भूमि ७० मैल लांब आणि २० मैल रुंद अशा विस्ताराची आहे. कौरव-पांडवांच्या युद्धाची ही भूमि आहे. भारतातील महान, श्रेष्ठ महापुरुष या ठिकाणी युद्धानिमित्त एकत्र आले व अनेकांनी आपले देह समर्पित केलेले आहेत. भगवान् श्रीकृष्णांच्या पदस्पर्शाने ही जागा पवित्र झालेली आहे. त्यांच्या अमोघ वाणीने, जडजीवांचा उद्धार करणाऱ्या भगवत्गीतेच्या संजीवनी विद्येने हा परिसर शक्तिसंचारित झाला आहे. 'ते' विराटरूप दर्शन या कुरुक्षेत्रातील धर्मक्षेत्रामध्ये अर्जुनाला झाले जाहे. थानेसरच्या परिसरात गुरुदेव भीष्माचार्य शरशय्येवर पडले होते. त्यांना पाणी पाजण्यासाठी धनुर्धारी अर्जुनाने जमिनीत बाण मारला. त्या ठिकाणी एक जलधारा निर्माण झाली. त्या जलधारेच्या जलाने तृषार्थ भीष्माचार्य तृप्त झाले. या जलधारेचे ठिकाण म्हणजे सध्याचे सूर्यकुंड. स्वामीजी चालत चालत येथपर्यंत आले. सूर्यकुण्डामध्ये स्नान केले. थोडे पुढे गेल्यावर खूप मोठे सरोवर लागते. ते सरोवर कमळांनी भरलेले आहे. सरोवराच्या मध्यभागी सुरम्य शिवालय आहे. या शिवालयामध्ये स्वामींनी मुक्काम केला. जवळच दंडीस्वामींचा मठ आहे. तेथे भिक्षेची सोय झाली.

या ठिकाणी चातुर्मास करावा अशी स्वामींची फार इच्छा होती. पण तेथील दंडीस्वामींच्या मठाचे मठाधीशांनी स्वामींशी 'नितांत दुर्व्यवहार' केल्याने स्वामींना तेथे रहाणे पसंत पडले नाही. आपल्या अनुष्ठानात येथील मठाधीशाचा विक्षेप नको म्हणून चातुर्मासासाठी ते तेथे थांबलेच नाहीत. कुरुक्षेत्राच्या परिसरात गंगेच्या काठी अनुप शहर म्हणून एक गाव आहे तेथे स्वामी निघून गेले.

स्थानमहात्म्याबरोबर गंगेचा किनारा लाभल्याने या गावाचेही माहात्म्य वाढले.

अनुपशहर हे आपल्या नावाप्रमाणे अनुपम असेच आहे. हे शहर उत्तर प्रदेशात बुलंदशहर जिल्ह्यात आहे. या शहरात स्वामीजी माणिक चौकातील, श्रीरामभारती मोहल्ल्यात येऊन राहिले. त्यांची येथील जागाही अशी होती की बसल्या आसनावरून गंगामातेचे दर्शन होत असे. स्वामी निसर्गप्रेमी असल्याने त्यांना हे ठिकाण फारच रमणीय वाटले. भगवती भागिरथीच्या दर्शनात त्यांचा काळ जात असे. अनायास आत्मानुसंधान होत होते.

चातुर्मासासाठी स्वामींना यापेक्षाही एकांत हवा होता. म्हणून चातुर्मास प्रारंभाचे वेळी, जवळच असलेल्या, "रनौली" या गावी ते आले. तेथे अनुष्ठान करून चातुर्मास केला. चातुर्मास संपल्यावर स्थानांतर करून स्वामी परत अनुपशहरी आले. स्वामीजी मननशील महात्मा होते. स्वच्छंद वृत्तीचे आणि अबोल प्रवृत्तीचे होते. ते जीवनाचा उदात्त आनंद मुक्तपणे सदैव लुटीत असत. त्यांच्या चित्तात कधीही व्यामोह किंवा संभ्रम रहात नसे. स्वामी असे होते म्हणून निर्भयपणे सर्वत्र संचार करू शकत होते.

या रमणिय प्रदेशातील स्वामींच्या वास्तव्याचा विचार केला तर असे दिसून येते की—हिरव्यागार पानांनी भरलेले, फळांच्या संभाराने विनम्र होऊन वाकलेले वृक्ष ज्या प्रदेशात आहेत अशा ठिकाणी स्वामी येऊन राहिले. वृक्षांच्या घनदाट छायेने व्यापलेल्या आणि कूजन करीत इतस्ततः हिंडणाऱ्या पक्षांच्या थव्यांच्या या प्रदेशात स्वामी हिंडत होते, फिरत होते. कधी या वृक्षाकडे अवलोकन करावे तर कधी त्या वृक्षाकडे पहात बसावे. कधी पक्षांची मजा पहावी तर कधी जलप्रवाहाच्या बागडण्याचा आनंद लुटावा, असे हिंडत फिरत रहावे. जेव्हां निद्रेची वेळ येईल, तेव्हां सुखाने जमिनीवर आडवे अंग करावे. अशा प्रकारे सारा वेळ आनंदात घालवावा. स्वामींचे जीवन असे आनंदात जाण्याचे खरे मर्म हे होते की गुरुदीक्षा होऊन अज्ञान नष्ट झाले म्हणजे आत्मरुपात रमण्याची स्थिति प्राप्त होत असते. "मुनिर्न व्यामोहं भजति गुरुदीक्षाक्षततमाः" स्वामींचे असे होते. हे महात्मे अनासक्त असतात.

पुढे स्वामी शिवरात्रीपर्यंत येथे अनुपशहरी राहिले. त्यानंतर ते पायी उत्तर काशीला गेले. आणि परत येताना मन्सुरी, देहरादून, हरिद्वार, कनखल, इत्यादि ठिकाणी जाऊन ते परत रनौलीला आले. या प्रवासात त्यांचे ४ । ५ महिने खर्च झाले.

पुन्हा १९३४ च्या चातुर्मासाचे दिवस आले. हा दुसरा चातुर्मास गेल्या वर्षाप्रमाणे त्यांनी रनौलीला करण्याचे ठरविले. परंतु हा सारा प्रदेशच अति रमणीय असल्याने स्वामींनी रनौली जवळचे दुसरे उत्तम ठिकाण या वर्षीच्या चातुर्मासाला निवडले.

'शुकदेवजी' हे पवित्र तीर्थक्षेत्र १९३४ च्या चातुर्मासाला ठरविले. हे ठिकाण उत्तर प्रदेशात, मुजफरनगर जिल्ह्यात, भुखेरी गावाजवळ आहे. या ठिकाणी वैराग्य-सम्पन्न शुकाचार्य यांनी परीक्षित राजाला जीवनमुक्ति देणाऱ्या महाभागवताचा उपदेश केला आहे. येथे शुकदेवांचे मंदिर आहे. येथे स्वामींनी चातुर्मास केला. स्वामींनी पूर्ण एकांतात, केवळ ब्रह्मचिंतनामध्ये, हा काळ घालविला. महाराजांकडून दरमहा ठराविक म. ऑ. येत असे. गेल्या वर्षी स्वामी अनुपशहरी आले. त्यावेळे-पासून म. ऑ. दरमहा येत असे. त्यात कधी खंड पडला नाही. स्वामींची प्रकृति पण चांगली होती. ते अगदी आनंदात असत. शुकदेवजीला चातुर्मास समाप्ति झाल्यानंतर स्वामी परत अनुपशहरी आले. तेथे काही दिवस मुक्काम केला. नंतर पुढे अनुपशहरामधून ते मिरापूर या गावी गेले व तेथून पुढे १९३४ च्या नोव्हेंबरमध्ये स्वामी 'लखनौ' ला निघून गेले.

## धन्याऽस्ते !

प्रथम ज्यांनी विषयांना जिंकून घेतले आहे. नंतर मद, मोह, राग, द्वेषादि अन्तस्थ शत्रूंचे ज्यांनी निर्दलिन केले आहे, एवढे करून जे स्वानंदसाम्राज्य-सिंहासनावर स्थिर झाले आहेत, असे महात्मे ब्रह्मविद्यारूपी कान्तेचे सुख घेण्यासाठी, वनरूपी गृहामध्ये रहात असतात. हे महात्मे खरोखर धन्य होत. प. प. लोकनाथ-तीर्थस्वामीमहाराज अशा धन्य महात्म्यांपैकी एक आहेत. यांचे सारे जीवन वरील गुणांनी युक्त असून ते स्वानंदसाम्राज्यसम्राट तर होतेच पण त्यांचा बराच मोठा काळ वृक्षवेलींनी बहरलेल्या वनविथीमध्ये गेलेला आहे. मागील दोन वर्षे तर कुरुक्षेत्राच्या परिसरात, गंगाकिनारी आणि हिमालयाच्या कुशीत गेलेली आहेत. स्वामींचे हे भ्रमण असामान्य होते. यात पायीच प्रवास भरपूर झाला. खाण्यापिण्याची आबाळ झाली. शरीरस्वास्थ्य लाभले नाही. याचा परिणाम स्वामींच्या प्रकृतीवर झाला. ही जी शक्तिपातयोगसाधना आहे तिला शारीरिक परिश्रमांचे फार वावडे. शारीरिक कष्ट नकोत, शारीरिक आबाळ नको, आहार सात्त्विकच पाहिजे. असे सर्वकाही असल्याने ज्या ज्या वेळी स्वामींना हे जमत नसे तेव्हा तेव्हा त्यांची प्रकृति बिघडलेली दिसते.

अशा प्रकृती बिघडलेल्या स्थितीत स्वामी शुकदेवजीहून अनुपशहरी आले आणि तेथून लखनऊला आले.

लखनऊ शहरामध्ये स्वामी एका बंगाली डॉक्टरांचेकडे राहिले होते. त्या डॉक्टरांचे अडनाव चक्रवर्ती होते. नोव्हेंबर १९३४ मध्ये स्वामी येथे आले. तीन महिने येथे मुक्काम केला. याच डॉक्टरांनी स्वामींना औषधपाणी दिले. स्वामींना रोज ठराविक ताप येत होता. औषध, पथ्य पाणी इत्यादीमध्ये उणेपण नव्हते. स्वामींच्या इच्छेप्रमाणे आयुर्वेदिक औषध योजना चालू होती. तरी औषधांचा म्हणावा तसा उपयोग झाला नाही. या ठिकाणी स्वामींची व्यवस्था उत्तम असल्याने स्वामींची प्रकृति हळू हळू सुधारू लागली. डॉक्टर फार सज्जन होते. लखनऊचा पत्ता असा होता– डॉ. यु. के. चक्रवर्ती, इ. आय. रेल्वे हॉस्पिटल, चारबाग, लखनौ, यू. पी.

स्वामी लखनौवरून जानेवारी १९३५ मध्ये भेरिया गावी गेले. येथे उदासी बाबांचा मठ असून पूर्वी स्वामी तिकडे गेल्याचे आठवते. या वेळी सुध्दा स्वामी भेरियाला गेले म्हणजे उदासी बाबांच्या मठात गेले. भेरिया वरून स्वामी बिहारघाट या ठिकाणी आले. हे बिहारघाट स्थान उत्तर प्रदेशांत बुलंद जिल्ह्यात राजघाट पोस्टाचे जवळ आहे., महाराजांची नित्याची म. ऑ. याही पत्त्यावर आली. परंतु शिवरात्रीनिमित्त स्वामी शेजारच्या गावी गेले होते, त्यामुळे पोस्टमन येऊनही भेट होऊ शकली नाही. आलेली म. ऑर्डर परत गेली. पुढे एप्रिल महिन्यातील तिसऱ्या आठवड्यांत स्वामींनी बिहारघाट सोडले, अनेक ठिकाणांना भेट देत, फिरत फिरत स्वामी गुजराथेत व्यासक्षेत्रास आले.

पाच वर्षापूर्वी स्वामीजी या नर्मदातीरवासी व्यासक्षेत्रामध्ये आले होते. त्यावेळी येथे चातुर्मास केला होता, म्हणून तर या स्थानाचा एकांतपणा, रमणीयता स्वामी विसरू शकले नाहीत, या भूमीने स्वामींना पुन्हा आपल्याकडे खेंचून आणले. संन्याशांचे परिव्राजक जीवन असेच असते, सतत प्रवास करीत रहाणे हेच जीवन, संन्याशांची जीवनयात्रा आणि तीर्थयात्रा हातातहात घालून जोडीने चालत असतात. स्वामींची प्रकृति मध्यतंरी बिघडली होती. आता चांगली आहे, स्वामींची प्रकृति बिघडो वा चांगली असो ते आपले सतत आनंदी असत, ते म्हणत असत- "बिघडणे आणि सुधारणे हा प्रकृतीचा धर्म आहे, आनंदात रहाणे हा आपला धर्म आहे.

कोणालाही धर्म सोडता येत नाही, परधर्म भयावह असतो. " या वर्षी म्हणजे इ. स. १९३५ चा चातुर्मास व्यासक्षेत्री करण्याचे स्वामींनी ठरविले.

या चातुर्मासातील काही मननीय पत्रे—

नारायण

व्यासक्षेत्र.
२९।७।३५

नारायण....

....ता. २२।७।३५ चे आपले पत्र पोहोचले. आपण म. ऑ. ने पाठविलेले रुपये तीन मिळाले. आपले जोडकार्डही मिळाले. त्याचे उत्तर लिहून अन्नछत्रातील नोकराच्या हातात पोस्टात टाकण्यासाठी मी दिले. पण त्याच्या अनवधानाने आपणास पत्र मिळालेले दिसत नाही.

आषाढ महिन्यापासून आश्विन महिन्यापर्यंत व्यासक्षेत्राच्या चारही बाजूंनी नर्मदेचा प्रवाह अति वेगाने वहात असतो. म्हणून सध्या पोस्टमन वगैरे इकडे येत नाही. तो कोणी विश्वासू माणूस जाणारा असेल तर म. ऑर्डर व पत्रे त्याच्या बरोबर पाठवून देतो. त्या माणसाकडून आम्हाला ते मिळते. कांजी खेत्सी भाटियाच्या अन्नछत्रामध्ये भिक्षेची सोय आहे. कसे का होईना भूक निवारण होते आणि प्राणधारणा होते. आमच्या भिक्षेची आपण कसलीच काळजी करू नये. खरे ऑडिटरांचे आग्रहावरून चार लोकांना या विद्येचा उपदेश केला आहे. उत्तम आहे. **मला लोकसंग्रहाची रुचि नाही याची मला जाणीव आहे परंतु तरी सुद्धा बलवत्तर संस्कार भोगल्याशिवाय नष्ट होत नसतात.**

आपला अभ्यास आमचे पत्र पोहचताच पूर्वीप्रमाणे होऊ लागला असेल. खरे ऑडिटर अत्यंत भाऊक आणि प्रेमळ आहे. मी येथे व्यासक्षेत्रावर आहे ही बातमी बहुधा आपणच खरेंना सांगितली असेल. भाद्रपद पौर्णिमा होताच मला काशीला जावेच लागेल. एकदा काशीला जाऊन आल्याशिवाय गत्यन्तर नाही. बडोद्यामध्ये एका संन्याशाजवळ माझा बाडबिस्तरा ठेवून काशीला जाण्यासंबंधीचा दृष्टांत मला झाला आहे. मी सुद्धा काशीहून लवकरच परत येऊन बडोद्याला जाणार आहे. काशीला राहण्याची 'आज्ञा' नाही.

या प्रवासात जाण्यायेण्याचे मिळून ४०|- रु. गाडीभाडे लागेल. आणि वरखर्चासाठी २|४ रु. तरी लागतील. यावेळी मजजवळ फक्त १६ रुपये आहेत. आणि काशीला तर न जाऊन चालणार नाही. अशा स्थितीत आपल्याला जी काही आर्थिक मदत करता येईल ती भाद्रपद पौर्णिमेपर्यंत करावी. आपल्याला मी यापेक्षा अधिक काय लिहावे ? **काशीला छोटीगैबीमध्ये माझ्या श्रीगुरुमहाराजांचा सुंदर मठ तयार झाला आहे.** .... सर्वांना माझे नारायण स्मरण कळवावे. मी येथे आनंदात आहे. नारायण तुम्हा सर्वांचे कल्याण करो. इति शिवम् ।

शुभेच्छु
स्वामी लोकनाथतीर्थ

नारायण

व्यासक्षेत्र
ता. २८-८-३५

नारायण स्मरणपूर्वक विशेष समाचार.

.... आपली प्रकृती आता चांगली होईल काळजी करू नये.... देशामध्ये पुण्यकर्मांचा लोप होत चालला आहे. पापकर्माची वृद्धि दिवसेंदिवस होत चालली त्यामुळे पाऊसपाणी कमी झाले आहे.

नागपूरहून रावसाहेब पराण्डे यांचे पत्र आले. सध्या ते 'वर्णाश्रम स्वराज्य संघाचे' कार्य करीत आहेत. त्यांची अशी इच्छा आहे की मी सुद्धा त्या कार्यात भाग घेऊन ते कार्य करीत रहावे.

माझी प्रकृति ठीक आहे. मी आनंदात आहे. नारायण.

शुभेच्छु
स्वामी लोकनाथतीर्थ

नारायण

व्यासक्षेत्र
९-९-३५

नारायण स्मरण, विशेष समाचार

आपली २५ रुपयांची म. ऑर्डर व सोबतचे पत्र आजच मिळाले. आपली शरीर प्रकृति अशक्त आहे त्यासाठी आयुर्वेदाचे पौष्टिक औषध घेणे योग्य होईल.

कोणाजवळही 'मागणे' बरे नाही. परंतु काय करू? "**वामनरावांना पत्र लिही. तुला पैसे मिळतील.**" असे मला वारंवार सांगण्यात आले. इतकेच नव्हे तर आपल्याला जबरदस्तीने पत्र पाठविणे भाग पाडले.

मी भाद्रपद पौर्णिमेला सीमोल्लंघनासाठी व्यासक्षेत्र सोडीन ते परत न येता तसाच पुढे काशीस जाईन.

नारायण.

शुभेच्छु
स्वामी लोकनाथतीर्थ

स्वामींचा चातुर्मास व्यासक्षेत्रात झाला. येथे व्यासशिवमंदिर आहे. कार्तिकी पौर्णिमेला तीन दिवसांची मोठी यात्रा भरते. मंदिरासमोर 'रांजणफळांचा' डेरेदार वृक्ष आहे. या वृक्षाच्या तळाशी लांबरुंद वर्तुळाकार मोठा पार बांधलेला आहे. साधक, भक्त या वृक्षाच्या घनदाट छायेत पारावर थंडाव्यासाठी येऊन बसतात. जवळच सिद्धेश्वराचे मंदिर आहे. या मंदिराजवळ ग्रंथालय आणि अन्नछत्र आहे. साधू-संन्यासी याचा खूप उपयोग करून घेतात. जवळच योगानंदाश्रम आणि धर्मशाळा आहे. योगानंदाश्रमांत यात्रेकरूंना उतरण्याची, रहाण्याची व खाण्यापिण्याची सोय आहे. येथून जवळच शुकदेव मंदिर आहे. हे मंदिर दगडी आहे. बांधणी भक्कम आहे. मंदिराबाहेर चोहोबाजूंनी चार फूट उंचीची आणि दोन फूट रुंदीची भिंत आहे. या भिंतीच्या आंतील आवारात श्रीगणेश, राधाकृष्ण, मार्कण्डेय आणि रणछोडजींची मंदिरे आहेत. येथे शुकदेवांचे तपपीठ आहे. कोण्या दानशूर गुजराथी व्यापाऱ्याने एक लाख रुपये खर्च करून या मंदिराचा जीर्णोद्धार केला आहे. माघ मासात येथे मोठी यात्रा भरते.

स्वामीजींचा काळ आत्मानुसंधानामध्ये जात होता. जनसंपर्कापासून दूर ते रहात होते. विषयांना दूर ढकलून देऊन ते विरक्त वृत्तीत असत. असे हे परमहंस, अतिशुद्ध, समदर्शी महात्मे यांच्या जयजयकाराने दशदिशा निनादित रहात असतात. हे खरे मोक्षपदाचे अधिकारी होत. म्हणून स्वामी धन्य होत.

धन्याऽस्ते !!

शक्तिपातयोगसाधनेचे वर्तमानकाळातील पहिले केंद्र 'ज्ञानसाधनमठ' नावाने बंगालमधील मदारीपूर येथे प. प. श्रीनारायणतीर्थदेवांनी सुरू केले. त्यानंतर इ. स. १९३२ मध्ये प. प. श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थस्वामीमहाराजांनी हिमालयामध्ये उत्तरकाशी येथे 'शंकरमठ' नावाचे दुसरे केंद्र सुरू केले. उत्तर काशी हे ठिकाण सामान्य मनुष्याला जाण्यायेण्याच्या दृष्टीने गैरसोयीचे किंवा अवघड होते. आता तर ही शक्तिपात परंपरा दिवसेंदिवस अप्रतिहत गतीने वाढू लागलेली होती. प. प. श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थस्वामीमहाराजांचे नित्याचे वास्तव्य श्रीक्षेत्रकाशी येथे होते. तेथेही त्यांची शिष्य शाखा वाढत होती. अनेक साधकांना असे वाटू लागले की काशीमध्येही या परंपरेचा आश्रम व्हावा. यामुळे अनेकांना जाण्यायेण्याला सोयीचे होणार आहे. काशी येथील आश्रमाचे कामाला श्रीगुरुदेवांचा आशीर्वाद घेण्यासाठी इ. १९३४ मध्ये प. प. श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थस्वामीमहाराज बंगालमध्ये मदारीपूरच्या 'ज्ञानसाधन मठात' गेले. श्रीगुरुदेव श्री नारायणतीर्थ देवांचे दर्शन घेतले, शिष्य मंडळींचा काशीला आश्रम व्हावा ही इच्छा निवेदन केली. श्रीगुरुदेवांनी तात्काळ शुभाशीर्वाद दिला. विशेष हे की अवघ्या एक वर्षात काशीला, छोटी गैबीमध्ये जागा मिळून, आश्रम बांधून तयार झाला.

छोटी गैबीमध्ये कामारच्या देवीच्या मंदिराजवळ हे ठिकाण आहे. आश्रमाची एक मजली इमारत बांधली. विधिपूर्वक होमहवनादि होऊन, कालीपूजा होऊन मठप्रतिष्ठोत्सव समारंभ मोठ्या थाटामाटाने साजरा झाला. सर्व शिष्यमंडळी या प्रसंगी उपस्थित होती. अन्नदानही भरपूर झाले. संन्याशांचा सत्कार, भिक्षा इत्यादि होऊन आश्रमाची वास्तुशांति सर्वार्थाने उत्तम झाली. या आश्रमाचे नाव "सिद्धयोगाश्रम" ठेवण्यात आले. शक्तिपात परंपरेचे सर्व साधक या आश्रमाला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे ओळखत आहेत. "योगवाणी" या ग्रंथाचे हा आश्रम जन्मस्थान व प्राप्तिस्थान आहे.

भारतवर्षात गेल्या अनेक शतकात प्राचीन परंपरांच्या अनेक जलधारा खंडित झाल्या आहेत. या जलधारा खंडित वाटण्याचे कारण त्यांचे क्षीणत्व किंवा सुप्तत्व हे आहे. या अनंत कालाच्या ओघात परंपरांच्या या जलधारा अनेक वेळा व्यक्त आणि अनेक वेळा सुप्त झालेल्या आढळतात. याचाच अर्थ हा आहे की भारतीय परंपरेचा प्रवाह भारतीय जनमानसातून अंतस्थपणे अखंड वहात आला आहे. दिक् कालाच्या बंधनामुळे त्या प्रवाहाला व्यक्त वा अव्यक्तपणा आला असेल इतकेच काय ते !

परंपरेच्या या जलधारांमध्ये ही ‘ शक्तिपातयोग ’ धारा अमोघ जीवनदायिनी, सर्वश्रेष्ठ, त्रिपथगामिनी, चैतन्यामृत प्रसविणी, जीवनकृतार्थकर्त्री, ज्ञानसंभूत मोक्षदायिनी, सकल साधन शिरोमणि, अशी सर्वोपरी एकमेव धारा आहे. ही संप्रदायधारा स्थूल दृष्टीने अदृश्य वाटत होती. या शक्तिपात योगसाधनेसबंधी सारी भारतीय संस्कृति मुक्तकंठाने सोदाहरण स्तुति करीत आली आहे. हे वर्णन सुद्धा अलंकारांच्या ओझ्याने भारावलेल्या स्थितीत असल्याने मूळ प्रवाह आच्छादून गेला आहे. यामुळे ही साधन-परंपरा खंडित झाल्याचा किंवा लुप्तसुप्त असल्याचा भास होत आला आहे.

ईश्वरी इच्छेने सारे काही घडत असते ही भारतीय अन्तःकरणाची दृढ श्रद्धा आहे. या विश्वाची निर्मिती सुद्धा याच ईशेच्छेने झाली आहे असा आपला विश्वास आहे. “ एको ऽ हं बहुस्याम् ” हे त्याच्या इच्छेचे प्रमाण आहे असे आपण मानतो. याच श्रद्धासूत्राने शक्तिपात साधन परंपरेचे कार्य अनादि कालापासून चालत आले आहे आणि ते अखंडपणे अनंत कालपर्यंत चालत रहाणार आहे. आपल्या अत्यंत परमभाग्याने या परंपरेचे व्यक्तरूप आपल्या पुढे साकारले आहे. “ हातात बांधलेल्या या स्फुल्लिंगा’चा विस्तार वाढत आहे. हा विस्तार संपूर्ण भारतभर होणार असा श्रीगुरुदेव श्रीनारायणतीर्थांचे गुरु श्री. प. प. श्रीगंगाधरतीर्थ देवांचा आशीर्वाद आहे. त्याची प्रचीति घेतघेत आपण पुढे जात आहोत. काशीक्षेत्रामधील ‘सिद्धयोगाश्रम’ ही त्या इच्छेची सप्रमाण अनुभूति आहे.

होता होता या ‘ सिद्धयोगाश्रमाचा ’ही विकास होत चालला. एक मजल्याचे दोन मजले झाले. आश्रमात श्रीमदाद्य, श्रीपूज्यपाद, श्रीशंकराचार्यांची रेखीव मूर्ति स्थापण्यात आली. सुसंपन्न ग्रंथालय निर्माण झाले. या आश्रमाच्या आवारात छोटी गोशाळा तयार केली. साधकांच्या येण्याने आश्रम सदैव भरला राहू लागला.

स्वामी श्रीलोकनाथतीर्थ महाराज हे त्यांच्या गुरुंचे पहिले शिष्य! ब्रह्मचर्याश्रम घेण्यात पहिले ! शक्तिपातयोगदीक्षा घेण्यात पहिले. स्वामींनी संन्यास घेतला तो तर आपल्या गुरुंच्या आधी ! त्यानंतर त्यांच्या गुरुमहाराजांनी दिल्लीला यमुनेकाठी संन्यास घेतला. पण पुन्हा मजेदार योग असा की प. प. श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थ-स्वामीमहाराजांनी प्रथमदण्ड ग्रहण दीक्षा दिली ती सुद्धा आपल्या प्रिय शिष्यालाच ! तेव्हाच तर स्वामी चिन्मयानंद सरस्वती नामान्तर होऊन स्वामी श्रीलोकनाथतीर्थ झाले. अशा प्रकारे या गुरु-शिष्य जोडीचा ऋणानुबंध, लक्षात रहाण्यासारखा, निकटचा आहे.

आश्रम निर्माण होण्याच्या आधीपासूनच या आश्रमाच्या भावी योजनांचा विचारविनिमय श्रीगुरुमहाराज प. प. श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थ स्वामींच्या मनात चालत असे. त्यांना मनापासून असे वाटे की श्रीस्वामी लोकनाथतीर्थांनी उत्तराधिकारी व्हावे. त्यांनी ही इच्छा अनेक वेळा स्वामींच्या जवळ बोलून दाखविली होती. पण स्वामींनी या गोष्टीला आपली कधीच संमति दिली नाही आणि दाखविली पण नाही. स्वामी पहिल्यापासून स्वतंत्र वृत्तीचे असल्याने त्यांनी स्वतःला कुठेही अडकवून घेतले नाही. स्वामींच्या मनांत लोकेषणा किंवा द्रव्येषणा ही वृत्ति कधी निर्माण झाली नाही. दारेषणेला तर त्यांनी आश्रम घेऊन तिलांजलीच देऊन टाकली होती. बंधन म्हटले की स्वामींनी असंगशस्त्राचा वापर केलाच म्हणून समजावे, ईषणा म्हणजे आशाच ! मनोभूमीत आशावेलींचे रान इतके माजते की त्या जंजाळात मन, बुद्धि, अहंकार आणि चित्त सारे गुरफटून गळफास लागल्यासारखे आवळले जातात. असे असून त्या आशेची चलाखी अशी आहे की माणसाला धावायला लावून बेजार करीत असते. स्वामींनी मात्र सगळ्यातून 'मुक्त' होण्याचा निर्णय घेतला असल्यामुळे, ते शेवटपर्यंत कुठेही आणि कशातही अडकले नाहीत.

स्वामींच्या निर्धारी मनाला गुरुपदाचे महत्त्व ठाऊक होते. 'गुर्वाज्ञा' ही 'ह्यविचारणीया' आहे ही त्यांची श्रद्धा होती. आपल्या गुरुमहाराजांची इच्छा ध्यानात घेऊन स्वामी अनेक दिवस विचार करीत होते. त्यांच्या वाचण्यात असे आले होते की—"मानसन्मानाच्या प्राप्तीने योगसिद्धीमध्ये फार मोठे अडथळे उत्पन्न होतात. प्रत्यक्ष हानीच होते. परंतु याउलट लोकांच्याकडून अपमानित होत रहाण्याने योगी पूर्ण स्थितीला पोहोचतो. म्हणून महात्म्याने असे वागावे की ज्यामुळे तो लोकांच्याकडून अपमानित होत राहील. याचा अर्थ असा नव्हे की तो महात्मा धर्मविरुद्ध वर्तन करून आपली छी, थू करून घेईल. धर्माला दोष न लागता आपल्याला अपमान सहन करावा लागेल असे त्याने केले पाहिजे. निष्कलंकित मनुष्याचा अपमान होणे हे त्या निष्कलंकित मनुष्याच्या दृष्टीने अमृतपान आहे" स्वामींच्या मनावर या विचाराचा प्रभाव पडलेला अनेक प्रसंगी जाणवतो.

स्वामींना विचार करता करता असे जाणवले की "निरिच्छ होणे हाच मोक्ष । इच्छा होणे हेच बंधन" या पुढचा एक विचार तर ते सोडूच शकले नाहीत.

"यस्येच्छाननु संधानमात्रे दुःसाध्यता मते।
गुरुपदेश शास्त्रादि तस्य नूनं निरर्थकम् ॥

इच्छेपासून दूर रहाणे, संबंधरहित रहाणे, इतकी साधी गोष्ट ज्याच्या बुद्धीला कठीनतम वाटते, दुःसाध्य वाटते, त्याला प्राप्त झालेला गुरुपदेश किंवा शास्त्रज्ञान हे सर्वस्वी फुकट, व्यर्थ आहे. स्वामींचे असे विचारचक्र फिरत होते. त्यांना वाटे 'होकार' देणे ही इच्छाच आहे आणि 'नकार' देणे ही सुद्धा इच्छाच आहे. काय करावे याचा निर्णय कसा घ्यावा?

स्वामींनी आश्रमाचे चित्र डोळ्यापुढे उभे केले. आश्रम हा एक संसारच आहे. येथे अनेक प्रश्न, समस्या निर्माण होत राहणार! त्यामध्ये लक्ष घालून त्या अडी-अडचणी दूर कराव्या लागणार! नको ती उपाधि आपल्या मागे लागणार! आपणच आपल्याला परतंत्र करून टाकणार आहोत. बरं, आपल्या गुरुमहाराजांचा ओढा बंगालकडे, आपली नेमणूक दक्षिणेकडे! त्यांचे शिष्य बंगाली! आपले शिष्य दक्षिणी! कार्य ठीक आहे पण आश्रमामुळे नको ती नवी डोकेदुखी व्हायची!

स्वामींनी याबद्दल खूप विचार केला. त्यांच्या विरक्त स्वभावाला हे काही पटेना. एकूण हा व्याप पाहून त्यांचे वैराग्य दुप्पट दुणावले. वितृष्ण होऊन हे सन्मानाचे पद त्यांनी मनाने नाकारले. आता प्रश्न एवढाच राहिला की हा नकार श्रीगुरुमहाराजांना कसा योग्य शब्दात सांगावा!

काशीच्या आश्रमातलीच एक दिवशीची घटना आहे. गुरु-शिष्यांचा सुखसंवाद चालू होता. बोलता बोलता उत्तराधिकारीपदाचा विचार निघाला. श्रीगुरुमहाराज प. प. श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थस्वामी म्हणाले "मग काय ठरले ना जबाबदारी संभाळण्याचे." यावर स्वामी म्हणाले –

"गुरुदेव! आपला शब्द न मानणे योग्य होणार नाही, तो मोठा अपराध होईल, आपली आज्ञाच असेल किंवा आपली अत्यंत तीव्र इच्छाच असेल तर मी ते पद जरूर स्वीकारीन. नाही म्हणणार नाही, पण माझा विचार आपण विचारात घ्यावा आणि तो आपणांस योग्य वाटला तर कृपा करून मला आपल्या शब्दातून मोकळे करावे ही नम्र प्रार्थना आहे. आपण माझे गुरुदेव आहांत, तेव्हा मी आपणांस सोडू

शकत नाही तसेच आपणही मला सोडू शकत नाही, माझ्या वृत्तींचा आणि विचारांचा जरूर विचार करावा ही नम्र विनंती आहे."

श्रीगुरुदेव स्वामींच्या गंभीर विचाराने गंभीर झाले. आता हा आपणांस काय सांगणार आहे ते ऐकून तरी घेतले पाहिजे म्हणून स्वामी श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थ म्हणाले– "सांग, काय सांगायचंय ते !"

स्वामी अधिकच गंभीर झाले. धिम्या पण निश्चयी स्वरात बोलू लागले –

"गुरुदेव ! आपल्या आशीर्वादाने आजपर्यंत खूप मिळविले आहे, त्याच आधारावर सांगतो की मी आपल्या आधी हे शरीर सोडून जाणार आहे. तेव्हा आपण असताना, आपल्या देखत, आपल्या सिंहासनावर बसणे योग्य नाही. क्षमा असावी."

आपल्याला असे उत्तर मिळेल ही गुरुदेवांना कल्पना नव्हती. पण आपल्या शिष्याच्या स्पष्ट उत्तराने आणि प्रखर निस्पृहतेने श्रीगुरुमहाराज अत्यंत संतुष्ट झाले. त्यांना वाटले असे हे विरक्त तापसी हेच खरे या सिंहासनाचे खरे उत्तराधिकारी आहेत. जशी भगवतीची इच्छा असेल तसे होईल.

**परं विषय वैतृष्ण्यं समाधान मुदाहृतम् ।**
**आहृतं येन तन्नूनं तस्मै नृ ब्रह्मणे नमः ॥**

याप्रमाणे स्वामींची इच्छा नाही हे स्पष्ट झाल्यानंतर श्रीगुरुमहाराज प. प. श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थ स्वामींनी हा विषय आपल्याही मनातून काढून टाकला. स्वामींच्या या स्वतंत्र दृष्टिकोनामुळे त्यांनी या आश्रमाशी संबंध स्वतःपुरता मर्यादित ठेवला. लहर लागेल तेव्हा स्वामी या आश्रमात जात. आपल्या श्रीगुरुदेवांच्या सहवासात रहात व परत आपल्या इच्छेनुसार कुठेही निघून जात. काशीमध्ये सुद्धा स्वामी स्वतंत्र जागा घेऊन रहात.

छोटी गैबीमध्ये असताना स्वामींच्या वाचनात गोरखपूरच्या कल्याण मासिकाचा अंक आला. ही इ. स. १९३५ मधील घटना आहे. त्या अंकात कुण्डलिनी संबंधी व कुण्डलिनी जागृतीसंबंधी लिहिलेला एक लेख होता. या लेखाचे लेखक श्री. त्र्यं. भा. खरे, ऑडिटर होते. या लेखात स्वामींचे नावाचा उल्लेख होता पण चुकून स्वामींना दुसरे नाव दिले गेले होते. एकूण लेखातील अशुद्धता, माहितीचा

अपुरेपणा या गोष्टी वाचून स्वामींची प्रकृति चांगलीच खवळली. स्वामींना प्रसिद्धीचा पक्का तिटकारा होता. पण त्यांना दोन तीन गोष्टी खटकल्या. माहितीचा अपुरेपणा, विचारांची अशुद्धता आणि नावाचा गोंधळ! यासंबंधी स्वामींनी श्रीगुरुमहाराजांना पत्र पाठविले.

नारायण

सिद्ध योगाश्रम
छोटीगैबी, बनारस
२०।९।३५

नारायण स्मरण....

.... खरे ऑडिटरांनी 'कल्याण' मासिकामध्ये कुंडलिनीसंबंधी लेख लिहिला आहे. त्या लेखामध्ये माझे नाव 'नित्यानंद' लिहिले आहे.

माझे पहिले नाव चिन्मयानंद होते. आता दण्डग्रहण केल्यानंतर माझे नाव लोकनाथतीर्थ झाले आहे ही गोष्ट आपण खरे ऑडिटरांना कळवावी. खरे यांची इच्छा लेख शुद्ध करून घेण्याची असेल तर तसे होऊ शकेल.

मी श्रीगुरुमहाराजांचे बरोबर 'होग्री स्टेट' मध्ये गेलो होतो. तेथे माझे गुरुबंधु कोणीही नाही. नारायण इति शम्.

शुभेच्छु
स्वामी लोकनाथतीर्थ

स्वामींचा मुक्काम सप्टेंबर अखेरपर्यंत छोटी गैबीतील सिद्धयोगाश्रमात होता. त्यांनी चातुर्मासाचा काळ येथे काढला. चातुर्मास समाप्तीला स्वामींनी बनारस सोडले आणि ते बडोद्याकडे रवाना झाले.

# स्वामींचे पश्चिम भारतभ्रमण

दिनांक २ ऑक्टोबर इ. स. १९३५ ला स्वामीजी काशीहून बडोद्यास आले. ऋणमुक्तेश्वर महादेवाच्या मंदिरामध्ये मुक्काम होता. यावेळी बडोद्यामध्ये विशेष न थांबता स्वामी पुढे डाकोरला गेले. तेथे डाकोरजीचे दर्शन घेतले. हे अत्यंत समृद्ध मंदिर आहे. येथे देवाला विविध प्रकारचे 'भोज' चढविले जातात. स्वामीजी डाकोरहून पुढे पेटलाद वरून वढवाणला गेले.

डाकोरला स्वामींनी एक आठवडा मुक्काम केला. डाकोर हे ठिकाण गुजराथ राज्यात आनंद ते गोध्रा या रेल्वे मार्गावर आहे. येथे श्रीकृष्णाचे भव्य व सुप्रसिद्ध मंदिर आहे. श्रीकृष्णालाच 'डाकोरजी' म्हणतात. रामदास नावाच्या कोणी साधु पुरुषाने द्वारकेहून आणलेली श्रीकृष्णाची मूर्ति या मंदिरात आहे. मूर्ति अत्यंत विलोभनीय आहे. देवाचे सिंहासन सोन्याने मढविलेले, सुबक नक्षीचे आहे. ज्यावेळी ते तयार केले त्यावेळी त्याला सव्वालाख रुपये खर्च आला. दरवर्षी आश्विन आणि कार्तिक पौर्णिमेला येथे मोठी यात्रा भरते. डाकोरजींचा रोजचा राजभोग पहाण्यासारखा असतो. स्वामींनी तेथे राहून ही माहिती गोळा केली. स्वामींचे हिंडणे चौकस असे. आपला भारत आपण आपल्या डोळ्यांनी पहाताना आपल्याला अनेक गोष्टी ध्यानात घेता आल्या पाहिजेत असा स्वामींचा हेतु असे. तीर्थक्षेत्राचे दर्शन घेताना तेथील मंदिराची स्थिति ध्यानात घेण्याने त्या त्या श्रद्धास्थानांची समाजाने केलेली कदर लक्षात येते. ही मंदिरे समाजाच्या श्रद्धेची केंद्रस्थाने आहेत याचा पुरावा म्हणजेच मंदिरांची समृद्धता असते. स्वामींची दृष्टि यापेक्षा अधिक व्यावहारिक खोलात शिरत नसे.

स्वामी वढवाणला आले ते वागेश्वरी मातेच्या मंदिरात राहिले. वढवाण हे

काठेवाडातील एक समृद्ध संस्थान आहे. गावाची रचना सुंदर आहे. स्वामीजी येथून २४ डिसेंबरला (१९३५) प्रभासपट्टन येथे गेले.

प्रभासपट्टन अथवा प्रभासपाटन हे प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आहे. येथेच श्रीसोमनाथाचे प्रसिद्ध ज्योतिर्लिंग आहे. हे मंदिर त्रिवेणी संगमावर आहे. पूर्वीचे सोमनाथ मंदिर आणि नवीन सोमनाथ मंदिर यामध्ये एक फर्लांगाचे अंतर आहे. या मंदिरावर अतिभव्य भगवत् ध्वज फडकत आहे. मुख्य मंदिरासमोर श्रीगणेश, मंकेश्वर, शेषशायी भगवान् यांची छोटी मंदिरे आहेत.

सोमनाथच्या मंदिरातील गाभाऱ्यात तीस पायऱ्या उतरून जावे लागते. हे लिंग कृष्णवर्णी परंतु तेजस्वी आहे. दोन फूट व्यासाचे व तीन फूट उंचीचे हे भव्य लिंग आहे. शाळुंका चार फूट व्यासाची व आठ फूट लांबीची आहे. जवळ मोठमोठे दहा नंदादीप अहोरात्र मंद प्रकाश देत आहेत. शिवलिंगाचे समोर पांढऱ्या शुभ्र संगमरवराचा नंदी आहे. नंदीच्या पुढे लाडवांचा ढीग ठेवला आहे. मंदिरात दोन विहिरी आहेत. सोमनाथाची त्रिकाळ पूजा व आरती होत असते.

मंदिराची धर्मशाळा तीन मजली असून वरच्या मजल्यावरून प्रभासपट्टनचे मनोहर दृश्य दिसत असते. मंदिराचा परिसर फार विशाल आहे. हे प्राचीन मंदिर आता भग्न स्थितीत असून मन व्यथित करीत असते. या मंदिराचा जीर्णोद्धार स्वामीजी निघून आल्यानंतर कित्येक वर्षांनी झाला. येथे प्रभासपट्टणामध्ये श्रीमत्शंकराचार्यांचा " शारदा मठ " आहे. स्वामींचा मुक्काम याच मठात होता. सध्या स्वामींची प्रकृति ठीक नव्हती. यावेळेस शारीरिक क्लेश किती तीव्र होते हे एका पत्रातील पुढील उताऱ्यावरून लक्षात येईल.

"आज गेली कित्येक वर्षे माझे शरीर शिथिल होत आहे, परंतु ही बातमी ऐकून तुम्हा लोकांच्या मनात फार काळजी वाढेल म्हणून इतके दिवस ही बातमी तुम्हाला सांगितली नाही.

सध्या सुध्दा विस्तारपूर्वक लिहिण्यास मी असमर्थ आहे. लवकरच काही दिवसात या देहाचा अंत होईल, फार काळ हे शरीर राहणार नाही, मी मृत्यूला बिलकुल घाबरत नाही, केवळ तुमच्या माहितीसाठी ही बातमी या पत्रात लिहिली आहे. काही दिवस माझे पत्र आपणांस मिळाले नाही, तर माझा देहांत झाला आहे, असे समजून घ्यावे.

भुजंगरावादि सर्व मंडळींना माझे नारायण स्मरण कळविणे, लवकरच तुमच्या खुशालीचे पत्र लिहावे."

स्वामींनी हे पत्र शारदामठातून सात जानेवारी १९३६ ला लिहिले आहे.

या शारदामठात प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज राहिले होते. येथील मठाकडून त्यांना विचारणा झाली होती की आपण या पीठाधीशाची सूत्रे स्वीकारण्यास तयार आहात काय? परंतु श्रीमत् वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांनी ते शक्य नसल्याचे सांगितले. त्यांनी येथेच प्रभासपट्टणमध्ये द्विसाहस्त्री गुरुचरित्रावर टीका लिहिण्याचे कार्य केलेले आहे. येथे ९ अध्यायांची टीका लिहून झाली आणि १४ अध्यायांची टीका द्वारकेमध्ये लिहून झाली. अशा ठिकाणी स्वामी श्रीलोकनाथतीर्थ येऊन राहिले आहेत.

पुढील सर्व घटना स्वामींनी पत्रातून कळविलेली आहे. त्यांचेच शब्द घटनेच्या स्वरूपात ठेवल्याने त्याला चांगलीच गोडी आलेली आहे.

एकदा स्वामी येथे असताना किसनजी गोपाळजी नावाचा कोणी एक ब्राह्मण स्वामींच्याकडे आला. साष्टांग नमस्कार घालून प्रार्थना करू लागला "स्वामीजी, मी वेरावळचा रहिवासी आहे. माझे तेथे घरदार आहे. अडीच मैलावर आहे. माझी गाडी आहे. आपण माझ्याकडे आनंदाने एक महिना रहावे." असे त्या गृहस्थाचे आर्जवी भाषण ऐकून स्वामींनी विचार केला. आपली प्रकृति ठीक नाही. औषध घेऊनही उपयोग होत नाही. ब्राह्मण स्वतः बोलावून राहिला आहे. आपल्याला विश्रांति मिळेल. प्रकृतीला आराम पडेल. म्हणून स्वामीनी संमती दिली. किसनजी गोपाळजीच्या गाडीतून स्वामी वेरावळला गेले. वेरावळला त्रिवेणी संगम आहे. वेरावळ हे भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील एक बंदरही आहे. स्वामींना वातावरण पसंत पडले. वेरावळचा पत्ता :– किसनजी गोपाळजी, आरकोट कुम्हारबाग, महादेवी मंदिर, जुनागढ स्टेट, काठेवाड.

पण! सद् इच्छा आणि सदाचार यात फार मोठे अंतर आहे. किसनजीच्या मनात सदिच्छा होती परंतु आचारामध्ये धार्मिकतेचा पूर्ण अभाव होता. स्वामींची शास्त्रनिष्ठा तर प्रखर होती. शास्त्राप्रमाणे योग्य आचार ठेवण्याचा त्यांचा आग्रह असे. स्वामींची शास्त्रनिष्ठ आचाराची कट्टरता पाहून किसनजी गोपाळजी अस्वस्थच

झाले. स्वामीजीसुद्धा एका धनसंपन्न ब्राह्मणाच्या घरातील सावळागोंधळ पाहून अस्वस्थ झाले. अशा आगीत तेल पडले ते संपत्तीच्या अहंकाराचे! माणसात अहंकार कमीजास्त प्रमाणात असतो. परंतु धनसंपन्न लोकांच्या प्रवृत्तीत ही अहंवृत्ति जरा जास्तच असते. 'लक्ष्मी'च्या जोरावर सर्वच खरेदी करण्यात त्यांना भूषण वाटते. त्यातच त्यांचे मोठेपण असते. घरदार, घोडागाडी, नोकरचाकर हे सारे पैशाने मिळवून आपल्या ऐश्वर्याचे 'अलंकार' म्हणून मिरवीत रहायचे ही त्यांची वृत्ति असते. लक्ष्मीच्या जोरावर जग जिंकू पहाणारे हे धनाढ्य हव्या त्या किंमतीत माणसेसुद्धा विकत घेतात ही त्यांची प्रतिष्ठा!! या प्रतिष्ठेचा कळस म्हणजे अनेक श्रीमंतांनी साधू-संन्याशांनासुद्धा खरेदी केलेले आढळते! मग अशा खरेदी केलेल्या साधू-संन्याशाला "महाराज", "बाबाजी", "गुरुदेव" अशा पदव्यांनी आणि नटलेल्या शब्दांनी आपल्या परिवारात मिरवायचे! साधूसुद्धा त्यांची एक प्रतिष्ठेची वस्तु! असे हे प्रतिष्ठित!! बिचाऱ्या साधूंना हवे तसे वागायला लावीत. "बाबाजी आज असे करायचे. आज येथे जायचय." असे हे आपल्या हेतुपूर्तीसाठी आणि आपल्या अस्वच्छ जीवनावर पांघरूण घालण्यासाठी "गुरुदेव! महाराज! बाबाजी" इत्यादि विनम्र लाघवी शब्दांचा सतत वापर करीत राहणार!!

बिचारा तो साधू—संन्यासी मुकाटयाने आपल्या या धनाढ्य धन्याची इच्छापूर्ति हेच आपले सत्कर्म म्हणून स्वतःला धन्य मानीत राही. अनेक श्रीमंतांच्या घरात गुरूच्या नात्याने साधू—संन्यासी राहिलेले आढळतात, त्यात हीच प्रवृत्ति अधिक आढळते. असे केले तरच त्या श्रीमंताला आपल्या श्रीमंतीमध्ये स्वतःच्या सर्व इच्छा पूर्ण करून घेण्याची सोय होते.

एकूण किसनजी गोपाळजीच्या घरचे वातावरण स्वामींना बिलकुल पसंत पडले नाही. या प्रसंगाने स्वामींनी आपल्यावर एका श्रीमंताचे 'बाहुले' बनण्याचा कसा प्रसंग आला त्याचा खुलासा केला. स्वामींच्या स्वतंत्र वृत्तीत हे कसे शक्य व्हावे? स्वामींचा अपरिग्रह आणि मौन पाहून किसनजी मनातून खजील झाला. बाकीच्या वस्तू पैशाने घेता येतील पण आपण आपल्या गाडीतून आणलेली 'ही' वस्तु विकत घेता येणारी नाही याची खात्री झाली. अवघ्या चार दिवसात किसनजी गोपाळजीने पुन्हा त्याच गाडीतून स्वामींना परत प्रभासपट्टणला शारदा मठामध्ये परत पोहचते केले.

'शारदामठ' प्रभासपट्टणपासून मैल दीड मैल अंतरावर आहे. या मठाचे महंत शंकराचार्य होते. या वेळी ते आपल्या शिष्यगणांसहित धर्मप्रचारार्थ कुठे जवळपासच्या गावी गेले होते. मठाधिपति मठात नसताना मठाच्या नेहमीच्या व्यवस्थेत फार मोठे अंतर पडते. काही कमी नसते. पण 'व्यवस्था' फक्त मठवासियांची होत असते. इतरांना 'आचार्य येथे नाहीत' असे सांगून भागले तर ठीक नाहीतर अव्यवस्थेच्या मूक व्यवहाराने त्यांची व्यवस्था लावली जात असते.

स्वामींची सोय येथे तशी नीट होऊ शकली नाही. मठवासीयांच्या दुर्व्यवहाराने स्वामींनी मठात भिक्षा घेणे बंद केले. भिक्षेसाठी ते प्रभासपट्टण गावात, मैल दीड मैल, दुपारच्या वेळी जाऊन येऊ लागले. ते तीन घरी भिक्षा घेत. मग दुपारी मठात येत. भिक्षेची ही उन्हातील चाल आजारी स्वामींना जड जात असे. पण त्याचा कधी उल्लेख त्यांनी केला नाही. येथे स्वामींना बराच त्रास झाला. पण स्वामी पत्रात म्हणतात "**मी अनुकूल किंवा प्रतिकूल वातावरणात जाणे हे माझ्या इच्छेने होत नाही. हे सारे पहात रहाणे येवढेच माझे काम आहे.**"

इकडे पुण्यास या काळात महाराज फार आजारी पडले होते. पांथरीच्या पोटदुखीने त्यांना हैराण करून सोडले होते. महाराजांच्या पत्रातून स्वामींना या प्लीहेच्या दुखण्याची तीव्र वेदना जाणवत असे.

"या प्लीहेच्या दुखण्याची काळजी घ्यावी. चांगल्या डॉक्टरकडून तपासणी करून चांगले औषधपाणी करावे. पथ्याने रहावे, या रोगाच्या निवारणार्थ 'पश्चिमोत्तान' 'मयूर' आणि 'मत्स्येंद्र' या आसनांचा अभ्यास करावा." असे प्रत्येक पत्रातून स्वामी सुचवीत होते. एकदा संकटे येऊ लागली म्हणजे कशी हात धुवून मागे लागतात याची जाणीव सुध्दा पत्रातून देत होते. "छिद्रेष्वनर्था बहुली भवन्ति" असा हा काळ होता.

स्वामीजी मध्यंतरी गिरनार पर्वतावर जाऊन आले, गिरनारला 'प्रभास पर्वत' असे एक प्राचीन नाव आहे. या पर्वताला आणखीही प्राचीन नावे आहेत उदा. उर्ज्जयंत, रेवतक पर्वत, वस्त्रापथ क्षेत्र इ. हे स्थान अत्यंत महत्वाचे आहे. स्वामींचा व्यासंग व अभ्यास अत्यंत सखोल व व्यापक असल्याने तीर्थं क्षेत्राचे ठिकाणी ते जाणतेपणाने जातात असे दिसून येते. या स्थानाबद्दल बरीच माहिती श्री. भगवंतराव

उपाध्ये आदि शिष्यांना सांगितली. एखाद्या स्थानाची एवढी माहिती गोळा करणे हे असाधारणतेचे लक्षण आहे. त्यांनी सांगितलेल्या माहितीचा काही भाग आपण पाहू.

ब्रह्मादि देवांनी शंकराबद्दल तक्रार केली. शंकर कोणालाही वर देतात. त्यामध्ये पात्रापात्रतेचा विचार ते करीत नाहीत हे ठीक नाही. यावर शंकर म्हणाले मी "आशुतोष" आहे. "भक्ति प्रिय" आहे. तुम्हाला माझे वागणे पसंत नसेल तर मी कैलास सोडून जातो. असे म्हणून शंकर गिरनार पर्वतावर आले. बरेच दिवस झाले. शंकर परत येईनात तेव्हा जगन्माता पार्वती सर्व देवांसह येथे आली, येथे येऊनही शंकरांची भेट होईना. तेव्हा सर्वांनी खूप तपश्चर्या केली. मग मात्र शंकर प्रसन्न झाले. पार्वतीने त्यांना कैलासास चलण्याची विनंती केली. शंकराने एक अट घातली. सर्व देव येथे राहतील तर मी येईन. या ठिकाणी शंकर विवस्त्र स्थितीत, दिगंबर अवस्थेत, श्रीदत्तात्रेयांच्या भूमिकेत रहात होते. पार्वतीच्या प्रार्थनेप्रमाणे शंकर मूळ स्वरूपात तिकडे कैलासास गेले व या दिगंबर स्थितींत दत्तस्वरूपात, येथे राहिले. त्यांनी आपली वस्त्रे उतरवून ठेवली म्हणून याला 'वस्त्रापथ' म्हणतात.

श्रीकृष्णाच्या काळातील सुभद्राहरणाचा प्रसंग या पर्वतावरील आहे. येथे रैवतक महोत्सव होतो. त्या यात्रेच्या वेळी हा सुभद्राहरण प्रसंग घडला. या पर्वताला रैवतक पर्वत असे प्राचीन नाव आहे. या पर्वतावर २१ शिखरे आहेत. यापैकी १. अंबा, २. गोरख, ३. नेमिनाथ, ४. गुरु, ५ वे कालिका ही पाच शिखरे तीर्थ-यात्रेच्या दृष्टीने महत्त्वाची मानतात. येथे शिखराला 'टुक' म्हणतात. अर्ध्या चढावर 'अंबाटुक' आहे. हे मंदिर प्रशस्त आहे. येथे 'अंबा' राहावयास आली. हे शक्तिपीठ आहे. भारतात एकूण ५२ शक्तिपीठे आहेत त्यापैकी हे एक आहे.

गोरख शिखर सर्वात उंच आहे. ही गोरखनाथांची तपोभूमि आहे. येथे गोरखनाथांचा आणि भगवान दत्तात्रेयांचा संवाद झालेला आहे. त्यामध्ये भगवान दत्तात्रेय आणि शंकर एकच असल्याची त्यांना प्रचीति दिली आहे. या ठिकाणी गोरखनाथांची धुनीची जागा आहे. 'गुरुशिखर' ही दत्तात्रेयांची तपोभूमि आहे. येथे शिखरावरील अरुंद टोकावर श्रीदत्तात्रेयांच्या पादुका आहेत. स्वामी येथपर्यंत आले. दत्तात्रेयांचे दर्शन घेतले. गोरखनाथांच्या धुनींत जाऊन बसून आले. नेमि-नाथांचे स्थान जैनांच्या २२ व्या तीर्थंकरांचे म्हणून प्रसिद्ध आहे तर कालिका शिखर हे अघोरी संप्रदायाचे महत्त्वाचे स्थान मानले आहे. येथे अघोरी संप्रदायी

मंडळी राहतात. या भागात गोमुखी, हनुमानधारा, कमंडलु, दामोदर ही कुंडे महत्त्वाची समजली जातात. यापैकी दामोदर कुंडात अस्थि विरघळतात.

स्वामीजी गिरनार यात्रा करून आले. आणि प्रभासपट्टणला विशेष मुक्काम न करता ता. १३ फेब्रुवारी १९३६ गुरुवारी सायंकाळी रेल्वेने ते वढवाणकडे गेले. वढवाणला त्यांनी मुक्काम वागेश्वरीच्या मंदिरात केला. स्वामींना वढवाणला आल्यावर एका नव्या समस्येची जाणीव झाली. त्यांच्या डोळ्याची शक्ति कमी होत असल्याचे त्यांच्या ध्यानात आले. पत्रलेखन करताना किंवा ग्रंथादिचे वाचन करताना त्यांना कष्ट वाटू लागले. चश्म्याची गरज भासू लागली. त्या काळात साधारण बऱ्यापैकी चष्मा, काचा व फ्रेमसहित अंदाजे दहा रुपयात मिळत असे. स्वामींच्याजवळ पैसे कुठून असणार ? मनात विचारतरंग येऊन गेला इतकेच त्याचे महत्त्व. हा तरंग सामान्य पुरुषाचा नव्हता. महापुरुषांचे साधे तरंग निष्फळ होत नसतात. आधी त्यांच्या मनांत तरंग उठतच नाहीत. उठलेच तर ते अती क्षीण असतात. पण त्या क्षीण तरंगानाही शक्तीचे अधिष्ठान असते. महापुरुषांचा संकल्प व सिद्धी यामध्ये फार अंतर नसते. असो या तरंगाची मधुर शोभा पुढे पाहू.

## " त्यातले मला काही कळत नाही. "

गोरखपूरहून प्रसिद्ध होणाऱ्या ' कल्याण ' मासिकाच्या ' योगांक ' विशेष अंकामध्ये कुंडलिनी जागृती संबंधीचा लेख नुकताच आला होता. हा लेख ऑडिटर खरे यांनी लिहिलेला होता. या लेखासंबंधी स्वामी नाराज होते. प्रसिद्धीमुळे विनाकारण उपाधी वाढते ती स्वामींना नको होती. आणि शक्तिसंक्रमण विषयासंबंधी अर्धवट माहिती दिल्यामुळे विनाकारण गैरसमज वाढणार व त्याच्या दुरुस्तीची उपाधी येणार ! ती स्वामींना नको होती. प्रसिद्धीची उठाठेव म्हणजे उपाधींची डोकेदुखी ! प्रसिद्धी म्हणजे त्रिकतचे श्राद्ध ! स्वामींना तो लेख प्रसिद्ध केला हे बिलकूल आवडले नाही.

या लेख प्रकरणात लेखक ऑडिटर खरे यांनी असे पाहिले की ही माहिती वाचून लोक चौकशी करणार. एक वेळ आपल्याला लोकांच्या शंकांना उत्तरे देता आली तरी प्रत्यक्ष अनुभव कसा देता येणार ! हे काम आपले नाही. स्वामींच्याकडे लोकांना पाठवून द्यावे तर ते सतत फिरते असतात. त्यांचा पत्ता निश्चित नाही. याला उपाय

एकच आहे. महाराज पुण्याला नू. म. वि. मध्ये नोकरीस आहेत. त्यांचा पुण्याला पत्ता कायम आहे. जिज्ञासूला त्यांचेकडून स्वामींचा पत्ता मिळेल व तो स्वामींपर्यंत पोहोचेल. याप्रमाणे परस्पर कार्याची सोय लावून लेखक महाशय हात झाडून मोकळे झाले.

चिखलातूनही कमळ फुलते हे तसे झाले. कल्याण मासिकाच्या योगांकामध्ये लेख आल्याने या शक्तिपात विषयाला चांगलेच तोंड फुटले. आजपर्यंत स्वामीजी आणि महाराज जनसंपर्कापासून अलिप्त होते. त्यांचा नित्यक्रम अत्यंत शांततेने चालत होता. पण या लेखामुळे त्यांच्या नित्याचे शांतजीवन मधून मधून तरंगित होऊ लागले. या लेखामुळे या विषयाला प्रसिद्धी मिळाली. सर्व साधनांचा मुकुटमणि असलेले हे साधन, सर्व साधन मार्गांचा हा राजा—'पंथराज' सागरावरील लाटेप्रमाणे सर्व जगभर पसरून त्याची माहिती जिज्ञासूंना मिळाली. पत्रे पत्ता काढीत काढीत २० नारायण मध्ये येऊ लागली. "होणारे न चुके जरी ब्रह्मा तया आडवा" या न्यायाने या कार्याची वाढ अटळ होती. तिला हे निमित्त हवे होते. विश्वसूत्रधाराच्या हालचाली का कधी थांबल्या आहेत ?

या सुमारास असे घडले की, मध्यप्रदेशात मूळगंदगढ म्हणून एक स्थान आहे. तेथे छोटेलाल वर्मा नावाचे एक गृहस्थ रहात होते. हे छोटेलाल योग व अध्यात्म प्रेमी होते. त्यांच्या वाचनात कल्याण मासिकाचा योगविशेष अंक आला. वर्माने पुण्याच्या पत्त्यावर महाराजांना पत्र लिहिले. स्वतःची थोडक्यात माहिती सांगून, आपली योग व अधात्मातील आवड लिहून, त्या दिशेने आपण काय काय करतो, तेही लिहिले. महाराजांनी सुद्धा थोडक्यात उत्तर देऊन, "आपले चांगले चालले आहे, असेच चालू राहू द्या" म्हणून लिहिले. छोटेलालची यावर पुन्हा १।२ पत्रे आली. महाराजांची त्या पत्रांना उत्तरे गेली. या पत्रव्यवहारातून महाराजांना छोटेलाल बद्दल सहानुभूती वाटू लागली. त्यांना वाटले हा सज्जन आहे. याला स्वामींकडे पाठवून दिले तर चांगला लाभ होईल. असा एकूण विचार करून महाराजांनी छोटेलाल वर्माला स्वामींचा वढवाणचा पत्ता दिला. "तिकडे जाऊन भेट घेतली, तर मोठा लाभ होईल" असेही कळविले.

मूळगंदगढहून छोटेलालने स्वामींना अत्यंत नम्रभावनेने पत्र लिहिले. त्या पत्रातही आपली थोडक्यात माहिती दिली. आपल्याकडून योगासंबंधी मार्गदर्शन

व्हावे म्हणून प्रार्थना केली. आपला पत्ता पुण्याहून महाराजांकडून मिळाल्याचा उल्लेखही पत्रात केला. उत्तरासाठी तिकिटे पाठविली आणि मोठ्या आशेने उत्तराची वाट पहात राहिले.

जीवनामध्ये कधी कधी असा अनुभव येतो की करायला जावे एक आणि होते भलतेच. काही अनपेक्षित घडेल अशी कल्पनाही आधी येत नसते. छोटेलाल वर्मांना असा अनपेक्षित धक्का स्वामींच्या पत्रोत्तरातून मिळाला. वढवाणहून दिनांक ५ मार्च ३६ ला स्वामींनी छोटेलालला पत्र लिहिले. स्वामींचे पाकिट आलेले पाहून कुठे आनंद वाटतो न वाटतो तोंच ते फोडून वाचून पहाताच वर्माजी एकदम गंभीरच झाले. त्या पत्राने छोटेलालना क्षणभर काही सुचेनासेच झाले. त्यांनी स्वामींचे आलेले पत्र व आपले त्याबद्दलचे एक पत्र लिहून एका लखोट्यात घातले आणि तात्काळ पुण्यास महाराजांचेकडे पाठविले. पत्रातून छोटेलालनी महाराजांची क्षमा मागितली. स्वामींची क्षमा मागितली. काही चुकले असेल तर अज्ञानीपणाने चुकले म्हणून क्षमा मागितली. पुढे काही दिवसांनी महाराजांनी योग्य प्रसंग पाहून छोटेलाल वर्माला स्वामींचे दर्शन घडविले. द्यावयाचा तो लाभ देवविला. पण स्वामींचे हे पत्र मात्र स्वामींच्या स्वतंत्र, निर्भय, स्वच्छ, स्पष्ट, प्रवृत्तीचा उत्तम नमुना आहे. ज्याप्रमाणे धनाढ्याच्या जाळ्यात ते अडकत नसत त्याप्रमाणे शिष्यपरिवार वाढण्याच्या लोभामोहातही ते अडकत नसत. निस्पृह प्रवृत्तीला कोणाचा, कशाचा, कशाबद्दल लोभ असणार ? स्वामींचे छोटेलाल वर्माला लिहिलेले पत्र—

नारायण — वढवाण सिटी
५।३।३६

नारायण स्मरण । विशेष समाचार ।

आपका पत्र आज अपराह्ण चार बजे मुझे मिला । समाचार अवगत हुआ ।

योगाभ्यासमें मैं कुछभी जानता नहीं । किसीने मेरे नामपर कल्याण योगाङ्कमें झूठमूट कुछ प्रशंसा वाक्य लिख दिया है । उसपर आप कभी भी विश्वास न करें ।

मेरे रहनेका कोई निश्चित स्थान नहीं है । खूब संभव मैं शीघ्र ही यहाँसे स्थानांतर जाऊंगा । वृथा द्रव्यव्यय करके यहाँपर आना आपके लिये ठीक न होगा । इतिशम् ।

शुभेच्छु
स्वामी लोकनाथतीर्थ

स्वामीकृपा होणे ही मोठी अवघड गोष्ट असे. स्वामींची नजर अशी होती की कोणाची त्यांच्यासमोर मान वर करण्याची हिंमत नसे. त्याहीपेक्षा त्यांचे वागणे असे होते की त्यांच्या जवळपास कोणासही फिरकणे शक्य होत नसे. जशी सूर्याची प्रखरता त्याच्याजवळ जाणे अशक्य आणि असह्य करते त्याप्रमाणे स्वामींच्या आंतरिक वैराग्य सूर्याची प्रखरता अशीच तीव्रतम होती.

स्वामींना सर्व विद्या येत होत्या. त्यात ते पारंगत होते. मंत्र विद्या, तंत्र विद्या, योग विद्या, वीर विद्या, आकर्षण विद्या, दूरश्रवण, दूर दर्शन या सारख्या अनेक विद्यांचे त्यांनी अनेकांना पडताळे आणून दिले आहेत. विविध शास्त्रात त्यांची गती होती. कलेचे मर्मज्ञ होते. वेदान्तामध्ये प्रतिआचार्य होते. सिद्धींचे नायक होते. त्यांच्यावर देवता प्रसन्न असत. 'अध्यात्म विद्या विद्यानां' मध्ये तर स्वामी गुरु स्थानावर विराजमान झालेले होते पण कधी आत्मस्तुति ठाऊक नाही. 'नावडावे जन नावडावा मान' अशी त्यांची आंतरिक बैठक होती. त्यांना सर्व काही येत असून त्यांची मनोभावना अशी होती की मला त्यातले काही कळत नाही.

## आचारः प्रथमोधर्मः ॥

स्वामीजी वढवाण शहरात वागेश्वरीमातेच्या मंदिरात उतरले होते. महाराजांची मासिक गुरुदक्षिणा नित्यनियमित म. ऑ. ने येत होती. एकदा स्वामींनी न मागताच गुरुमहाराजांनी नेहमीपेक्षा अधिक दहा रुपये म. ऑर्डरने पाठविले आणि त्या म. ऑ. च्या कुपनामध्ये लिहिले "दहा रुपये चष्मा घेण्यासाठी पाठविले आहेत, एक उत्तम चष्मा खरेदी करावा." ती मनीऑर्डर आणि ते वाक्य वाचून स्वामींना फार संतोष वाटला. त्यांना वाटले की अनुसंधानदक्ष साधक ही अशी उत्तम सेवा सहज करू शकतो शिष्याच्या चित्तात गुरूच्या चित्तांतील संवेदना स्पंदित होत असतात. गुरूची सेवा कशी करावी हे त्याला चांगले कळते. तृप्त मनाने स्वामींनी आशीर्वाद दिला "तुम्हारा मंगल होगा।"

स्वामी डॉक्टरांच्याकडे गेले. डोळ्यांची तपासणी करून घेतली. निळसर काचांचा सोनेरी फ्रेमचा एक सुंदर चष्मा घेतला. त्याला नेमके दहाच रुपये पडले. ज्यासाठी जेवढे मिळाले त्यासाठी तेवढे खर्च केले.

या सुंदर चष्म्याने डोळ्यांची सोय झाली पण त्याचबरोबर स्वामींचा रुबाब

जरा वाढलाच. आधीच स्वामींचे व्यक्तिमत्त्व ठसठशीत त्यात स्थूल दृष्टीने का होईना पण सुंदर चष्म्याची भर, मग काय पहावे ? ज्या ज्या वेळी स्वामी चष्मा घालीत त्या त्या वेळी त्यांच्या चेहऱ्याची चमक झळकत असे. त्यांचे निरागस बाळकाप्रमाणे असलेले मोहक मुखमण्डल आता चष्म्यामुळे गाढगंभीर भासू लागले. प्रौढत्वालाही काही सौंदर्य असते याची जाणीव होऊ लागली. मनुष्यमात्राला निसर्गाची चंचलता जेवढी आकर्षून घेते त्याहीपेक्षा निसर्गाचे प्रगाढ गांभीर्य सुद्धा निश्चल आणि मंत्रमुग्ध करीत असते. स्वामींना ही "चाळीशी" वयाच्या चौवेचाळीसला लागली.

स्वामींचे इकडे छोटेलाल वर्माला पत्र आले होते की माझ्याकडे येऊ नकोस, आपला पैसा व वेळ खर्च करू नये, परंतु छोटेलाल आपल्याच तंद्रीत होता. त्याला वाटले हे स्वामी लोक असेच करतात, आपण त्यांच्या जवळ गेलो आणि जरा ढिला हात सोडून चार पैसे खर्च केले म्हणजे मग हे लोक सर्व काही सांगत असतात. खरे म्हणजे प्रत्येक वस्तूचे मोजमाप वेगवेगळया वजन काट्यांनी करावे लागते. एका प्रकारच्या तराजूच्या तागड्यातून सर्व वस्तू मोजता येत नाहीत. पैशाने साधु संन्यासी मोजता मापता आले तर ते साधू संन्यासी कसले ? पण छोटेलालला हा विचार त्यावेळी सुचला नाही. तो लौकिक प्रयत्नवादी होता. त्याने पुन्हा स्वामींच्या भेटीची धडपड सुरू केली. पुण्याला महाराजांना पत्रावर पत्रे पाठविली ! भाषा पण अशी गोड की बस्स ! उदाहरणार्थ –

" श्रीस्वामींचे उत्तर आल्यापासून चित्ताला शांतता नाही. संसारसागरात आता गटांगळ्या खात बसण्याची इच्छा नाही. आपल्याशिवाय मला कोणाचाही आधार नाही. आपणच माझा उद्धार करू शकाल. आपल्याशिवाय आमचे हे रडगाणे कोण ऐकून घेणार ? कोणाला दया येणार ? आपणच स्वामींना काही लिहिले तर थोडीफार आशा आहे. त्यांचा वढवाणचा पूर्ण पत्ता व आपला आशीर्वाद दिला तर मी प्रत्यक्षच वढवाणला जाऊन येतो—— " असे मोठे काव्यपूर्ण पत्र छोटेलालनी महाराजांना पाठविले.

महाराजांची प्रकृति नेहमीच शांत असे. काही असले तरी ते अप्रिय न बोलणारे तसेच त्यांना "बुडता हे जन न देखवे डोळा" म्हणून कळवळाही येत असे. त्यांनी छोटेलालला पत्र पाठविले. "....श्रीस्वामीजी शास्त्राचार कटाक्षाने पाळणारे आहेत. ते शास्त्रविरुद्ध वर्तन थोडेही खपून घेणार नाहीत. म्हणून संभाळून

रहावे लागेल. तुमच्या भोजनाची व निवासाची सोय तुम्हाला स्वतंत्रपणे वेगळी करावी लागेल. स्वामींच्या मनाला अनुकूल असे राहाणे फार कठिण आहे. त्यांच्या सहवासात अत्यंत सावधपणे, विचारपूर्वक जपून राहिले पाहिजे....."

छोटेलालने पत्र पाहिले आणि एक दिवस वढवाणला निघून गेले. काही दिवस तेथे मुक्काम केला. त्याने आपली सोय स्वतंत्र केली. सकाळ, दुपार, संध्याकाळ जमेल तसे छोटेलाल स्वामींकडे येऊन बसत. थोडे फार बोलण्याचा प्रयत्न करीत. पण त्याच्याबद्दल स्वामींच्या मनांत अनुकंपाच निर्माण होईना. छोटेलालसुद्धा स्वामींची एकूण सर्वच प्रखरता पाहून मनातून घाबरून गेला. त्याला स्वामींशी नीट बोलणे अशक्य होत होते. त्याने स्वामींच्या पुढे प्रसाद व मोठी दक्षिणा ठेवली. पण स्वामींनी सर्व दक्षिणा त्याला त्याच्या हाताने उचलून घेण्यास सांगितली. ती त्याने घेतल्यावर स्वामींनी प्रसाद वाटून, उरलेला त्याला परत केला. याच घटनेने तो चपापला. पुढे कधीही त्याने दक्षिणा आणि पैसा याचा विषय स्वामींच्या पुढे काढला नाही.

मनुष्याचे जीवन संस्काराने घडत जात असते. घडलेले जीवन वागणे आणि बोलणे यामधून स्पष्ट होत असते. जसे संस्कार तसे विचार, जसे विचार तशा क्रिया! छोटेलाल श्रीमंत घराण्यातील होता. त्याची इच्छा चांगली होती. पण इच्छेप्रमाणे त्याचे प्रयत्न काहीच नव्हते. धार्मिक आचारांचा लवलेश त्याला नव्हता. धर्म कसे वागावे ते सांगतो. या धार्मिक आचारांचे काय महत्त्व आहे या गोष्टीची त्याला कल्पनाही नव्हती. छोटेलालला भक्षाभक्ष, पेयापेय, विधिनिषेध हे माहीतच नव्हते. स्नान केले, गंध लावले म्हणजे झाला धर्म, ही त्याची समजूत! इतक्या सामान्य मनोधारणेने तो स्वामींपर्यंत पोहचला होता.

पण ज्याच्या अन्तःकरणात श्रद्धा आणि भक्ति आहे तोच यशस्वीपणे शेवटपर्यंत धार्मिक प्रवृत्तीच्या मार्गाने जाऊ शकतो. याच श्रद्धा-भक्तीच्या आधाराने प्रत्येक साधक आपला साधन पथ चालून साध्याच्या ठिकाणी येऊन पोहचतो. या दोन गुणांव्यतिरिक्त या मार्गाचा पथिक चिकित्सा, तर्क, पाठांतर, दर्शनशास्त्र इत्यादिमध्ये परिपूर्ण असून त्यांचा त्याला तसा फायदा होत नाही. भगवत्कृपा ही "होने-पाने की चीज है, लेने-देने की नही" असे स्वामी नेहमी सांगत असत.

जीवनातली सारी श्रेष्ठ वर्तणूक या श्रद्धा-भक्ती मधून जडत घडत असते. अश्रद्धावान जेवढा दुराग्रही असतो तेवढाच श्रद्धावान आग्रही असतो. दुराग्रहामधून दुष्प्रवृत्ती जोपासल्या जातात तर आग्रहामधून सत्प्रवृत्ती आणि सदाचार जोपासले जातात. भक्तीने या सद्‌गुणांना बाळसे येते. असा हा सदाचारसंपन्न, श्रद्धा, भक्ति, विनयसंपन्न मनुष्य भगवत्कृपेचा अधिकारी होतो. याशिवाय हा मार्ग मोकळा होत नाही. छोटेलालचा या गुणांशी संबंध असलाच तर फक्त शाब्दिक होता. चांगली इच्छा त्याचे मनात होती हे त्याचे भाग्य होते पण योग्यतेच्या मर्यादा वेगळ्याच असतात. "अधिकार तैसा करावा उपदेश। साहे ओझे त्यास तेचि द्यावे" कृपापात्र जीवावरच भगवंताची कृपा होत असते.

एक दिवशीची घटना आहे. स्वामीजी मंदिराच्या ओट्यावर येरझारा घालीत होते. त्यावेळी दुरून छोटेलाल येत असलेला स्वामींनी पाहिला. रस्त्यात पिंपळाचा मोठा वृक्ष होता. त्या वृक्षाभोवती चांगला पार होता. येता येता छोटेलाल त्या पिंपळाच्या पाराजवळ उभा राहिला आणि त्याने तेथे लघुशंका केली आणि पुढे निघून आला. स्वामींनी ते पाहून ठेवले. आधीच त्याच्या वर्तनाबद्दल स्वामीजी मनातून असंतुष्ट होते. त्याने इकडे येऊ नये म्हणून पत्र लिहिले, तरी खटपट करून तो आला. पत्रातील मजकुरातूनच स्वामीजींनी छोटेलालला ओळखले होते. व्यवहारी दृष्टीने त्यांचा जो ग्रह झाला होता तो आताच्या प्रसंगाने पक्का तर झालाच. पण स्वामींना छोटेलालचा रागच आला. अशा ढोंगी, श्रद्धाभक्तिविहीन, विनयरहित माणसाचे तोंड सुद्धा पाहाण्याची स्वामींची इच्छा नव्हती. स्वामींना सरळ अज्ञानी माणूस चालतो तो चुकला तर समजावून सांगतील. पण शहाणपणाचे पांघरुण घेतलेला आडवा माणूस त्यांना चालत नसे. इतक्यात छोटेलाल आला. आणि स्वामींना नमस्कार करू लागला. तेवढ्यात स्वामी गरजले— "अबसे मेरे यहाँ मत आवो। तुम्हे हमसे कुछ लाभ नहीं होगा। तुम्हारे गाँव चले जाओ।"

खरं म्हणजे स्वामी संतापले म्हणजे आकाश पाताळ एक करून टाकतात. डोळे विस्तवासारखे लालबुंद होतात, 'त्राही भगवान' करून सोडतात. परंतु आज एवढे मनाविरुद्ध होऊनही एवढा संताप होऊ दिला नाही. खूपच शांतपणे प्रकरण निभावून नेले. छोटेलाल निमूटपणे तेथून निघून गेला.

स्वामींनी यासंबंधी म्हटले आहे की, मनुष्याला ज्या रस्त्याने जाण्याची

इच्छा आहे त्या रस्त्याचे नियम समजून घेऊन ते पाळलेही पाहिजेत. केवळ आपल्या इच्छेने काम होत नसते. देवाची इच्छा झाली पाहिजे. त्यासाठी तर 'शास्त्राधारे वर्तावे लागते. इच्छा मोक्षाची! परमेश्वर प्राप्तीची!! पण वागणे मात्र सामान्य, चंचल, वासनापूरीत जड जीवासारखे! हे कसे चालेल? ज्ञान आणि अज्ञान यांचे रस्ते एक कसे असतील!

वढवाणमध्ये स्वामीजींनी चातुर्मास केला. येथे स्वामींचा मुक्काम १९३६ च्या फेब्रुवारी महिन्यापासून ऑक्टोबरपर्यंत आठनऊ महिने होता. येथे भिक्षादिची व्यवस्था उत्तम होती. येथील वातावरणही स्वामींना पसंत होते. स्वामींच्या एका पत्रात पुढील खुलासा आहे.

"....यहाँपर भिक्षाका कुछ अभाव नहीं। प्रचुर भिक्षा आयाचित भावसे यहांपर मिलता है। सांप्रत मैं अकेला हूँ। कोईभी शिष्यादिक मेरे पास नहीं है। और **शिष्य संग्रहकी इच्छा मेरे मनमें किञ्चित भी नहीं है**। यहांपर पर्जन्यवृष्टी कुछ भी न थी। परंतु ८।९।३६ से तीन दिवस प्रचुर पर्जन्यवृष्टी हुआ।...."

चातुर्मास समाप्तीनंतर स्वामी त्यांचे गुरुदेव प. प. श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थ-स्वामी महाराजांचेकडे गेले. त्या वेळी गुरुदेवांचा मुक्काम प्रयागराजतीर्थाजवळ झूसी म्हणून ठिकाण आहे तेथे गंगाश्रमामध्ये त्यांचे शिष्य रहात होते त्यांचेकडे होते. स्वामी त्याप्रमाणे झूसीला गेले.

## निस्तुला गुरुकृपा

लहान बालकाला खेळता खेळता मध्येच एकाएकी आईची आठवण येते आणि ते बालक सारा खेळ टाकून आईकडे धावत येते. तिच्याशी लगट करते, खाऊ मागते आणि मिळालेला खाऊ खात खात पुन्हा बाहेर निघून जाते. अगदी तसे स्वामींचे आपल्या गुरुमाऊलीबद्दल पुन्हा पुन्हा होत असे. त्यांना मधून मधून गुरुमाऊलीची आठवण झाली की भेटल्याशिवाय चैनच पडत नसे. एकदा गुरुमाऊलीची भेट झाली, संतोषाचा खाऊ मिळाला की स्वामी पटकन तेथून निघत. असे किती तरी वेळा झालेले आपण पाहिले आहे. याही वेळी स्वामी झूसीच्या 'गंगाश्रमात' गेले. गुरुमाऊलीचे दर्शन घेतले. संतोषाची देवाण घेवाण होईपर्यंत थांबले आणि लगेच तेथून परतले. ते मे १९३७ मध्ये बडोद्यास आले.

स्वामीजींनीं झूसी सोडली आणि गाडरवाड्यास आले. तेवढ्यात हरस्वरूप नावाचा एक गौड ब्राह्मण स्वामींचा पत्ता काढीत काढीत झूसीला गेला होता. स्वामी नुकतेच गाडरवाड्यास गेल्याचे त्याला तेथे कळले. तो तसाच गाडरवाड्यास आला. स्वामींचे दर्शन घेतले, तो सपत्निक आला होता. त्याने स्वामींना सांगितले की, "मी रामेश्वर यात्रेस जाऊन आलो, येताना वाटेत पुण्याला थांबलो. महाराजांचे दर्शन घेतले. त्यांनी आपण झूसीला असल्याचे सांगितले. मी झूसीहून येथे आलो आहे. मला महाराजांचेकडून अनुग्रह मिळाला आहे. मी आपल्या दर्शनासाठी आलो आहे. आपली कृपा असावी." हरस्वरुप अत्यंत श्रद्धावान होते. त्यानी स्वामींची मोठ्या भक्तीने पाद्यपूजा केली. सद्‌गदित अन्तःकरणाने पतिपत्नीने दर्शन घेतले आणि आपल्या गावी निघून गेले.

स्वामीजी एप्रिलमध्ये गाडरवाड्याहून 'भालोद' या गावी आले. तेथे काही दिवस मुक्काम केला आणि मे मध्ये बडोद्यास आले. गाडरवाड्यास कोठे होते, भालोदला कोठे होते, कोण कोण व्यक्ति संबंधात आल्या याचा अद्याप पत्ता लागला नाही. असे कितीतरी अज्ञात चरित्र शिल्लक आहे. ते आपल्याला प्रकट होण्याची त्यांची इच्छा नसावी. पाण्यातील बर्फाचा आठवा हिस्सा पृष्ठभागावर असतो तर सात भाग पाण्यात अदृश्य असतात. तसेच स्वामींच्या चरित्राचे किती तरी हिस्से आणि किस्से अदृश्य आहेत. त्यांच्या ज्ञात चरित्राची गोडी अनुभवली म्हणजे अज्ञात चरित्राची चुटपुट लागते, पण आहे त्यात समाधान मानण्याचे त्यांनीच शिकवल्यामुळे अज्ञाता-कडे दुर्लक्षही होते.

स्वामीजी बडोद्यात आले ते इन्फ्लुएंझाचा ताप घेऊन आले. तापाबरोबर लंघनही आले. पाच सहा दिवस स्वामींनी अन्नपथ्य केले. उपवास केला. शरीर प्राणाच्या आधारे टिकते तर प्राण अन्नाच्या आधारे टिकतो. स्वामींनी प्राणाचे अन्न तोडून त्याला थोड्या काळात नरम करून ताळ्यावर आणले. हा त्यांचा नेहमीचा अनुभव. त्यांच्या शरीराला ताळ्यावर आणण्याचा तो प्रभावी उपाय असे. स्वामींची प्रकृति पूर्ववत ठीक झाली. त्यांचा प्रथम मुक्काम "श्रीगौडवाडी, ब्रह्मेश्वर महादेव, चौखण्डी" बडोदा, या ठिकाणी होता. मार्च, एप्रिल हे दोन महिने येथे गेले. नंतर काही दिवस ते परत भालोदला गेले. तेथून हिण्डत फिरत २० मे १९३७ ला परत बडोद्यास आले. आता स्वामींनी आपला मुक्काम, घी काट्यावरील बालाजी मंदिरात केला.

येथे असताना महाराजांचे आणि त्यांचे बंधु श्री. गोविंदराव यांचे पत्र स्वामींना आले. सध्या गोविंदरावांच्यावर प्रपंचामधील अनेक संकटे कोसळत होती. आपत्तींमुळे ते अगदी गांजून गेले होते. गोविंदरावांची पत्नी दोन तीन वर्षे आजाराने अंथरुणावर पडून होती ती नुकतांच अर्धा संसार सोडून परलोकवासी झाली होती. थोरला मुलगा परागंदा झाला होता. धाकटा माधव शिक्षणासाठी परगांवी ठेवला होता तो फी भरू न शकल्याने परत आला होता. मुलगी उपवर झाली होती पण तिच्या लग्नाचा विचार आर्थिक परिस्थितीने लांबणीवर टाकण्याची पाळी आली होती. स्वतः गोविंदरावांची नोकरी सुटली होती व शेती करून संसार गाडा ढकलण्यासाठी गावी येऊन राहिले होते. सर्व बाजूंनी आभाळ अंधारून आल्यासारखे त्यांना झाले.

या आशयाच्या पत्राला स्वामींनी उत्तर दिले ते मार्मिक तर आहेच पण चिंतनीय आहे.

नारायण बरोदा

७–६–३७ ई.

नारायण स्मरण विशेष समाचार ।

तुम्हारा १।६।३७ पत्र मिला। गोविंदरावका भी पत्र अवगत हुआ । विपद का उपर विपद है । **छिद्रेष्वनर्था बहुली भवन्ति।**

**यह संसार इस प्रकार बहु दुखःपूर्ण है। इसी कारण भगवान उपदेश करते हैं — "अनित्यं असुखमिमं लोकं प्राप्य भजस्व मां"** भुजंगराव आदिक सर्व मंडलीको मेरा नारायण स्मरण कहना । मैं यहांपर कुशलपूर्वक हूँ ।

.......इतिशम् ।

शुभेच्छु

स्वामी लोकनाथतीर्थ

महापुरुषांची दृष्टि सारग्राही असल्याने लौकिक सुखदुःखाचे विचार त्यांना कचऱ्याप्रमाणे निरर्थक वाटतात. त्यामध्यें त्यांना दिसतो तो धान्याचा कण. म्हणून 'मां भजस्व' हा एकमेव जीवनाधार ते रात्रंदिवस घट्ट पकडून ठेवतात. स्वामींच्या

शब्दातून, कृतीतून नित्य जागृति ही अशी मिळत असते. " काय वानुं आता संतांचे उपकार । मज निरंतर जागविती ॥ " देणारा असला तरी घेणारा असला तर त्याचा उपयोग !

स्वामींचा या वर्षीचा चातुर्मास बडोद्यास झाला. या भागातील दोन भक्तांचा विशेष संबंध स्वामींशी आला त्यापैकी गुजराथेतील वडनगरचे रहिवासी श्री. अंबालाल मोहनलाल व्यास सन १९३७ मध्ये स्वामींच्या दर्शनासाठी बडोद्यास आले. ज्येष्ठ व॥ ५ रविवारचे दिवशी घीकाटा रस्त्याजवळच्या बोळात प. प. श्रीशांतानंद-सरस्वतीस्वामी ऊर्फ मगरस्वामींच्या आश्रमात आले. तेथे स्वामी होते. अंबालाल शेठजींना स्वामींचे पहिले दर्शन झाले. यावेळी विशेष हे की स्वामींचे मराठीतून संभाषण झाले. या शेठजींचा आणि श्री. भगवानराव उपाध्ये यांचा जुना स्नेह होता. हे श्री. भगवंतराव उपाध्ये म्हणजे शक्तिपात दीक्षेचे दिव्य अनुभव घेतलेले साधक आहेत. या दोन्ही साधकांचा या शक्तिपात मार्गाशी व स्वामींशी याच वर्षात संबंध आला. श्री. भगवंतराव उपाध्ये यांचा अनुभव विशेष आहे. त्यासाठी आपण भगवंतराव उपाध्ये यांचेकडे वळू या.

श्री. भगवंतराव हे बडोद्याजवळच्या थुरावासचे रहिवासी नोकरीसाठी मुंबईस आले. त्यांना श्री. अंबाशंकर नथुराम त्रिवेदी कंपनीत नोकरी मिळाली. नोकरीच्या कामानिमित्त त्यांना पुणे, सोलापूर या ठिकाणी जावे लागे. त्या त्या ठिकाणी काही दिवस मुक्कामही करावा लागे. भगवंतराव गुजरातमध्ये असताना अष्टांग योगाचा अभ्यास करीत होते. योगासनामध्ये त्यांची तयारी चांगलीच होती. षट्क्रियेमध्ये बस्ती, धौती, नेती, नौली इ. उत्तम तऱ्हेने साध्य झालेले होते. याहीपेक्षा काही विशेष मुद्रांचा अभ्यास त्यांनी वरच्या टप्प्यावर नेला होता. खेचरीमुद्रा तर सिद्ध होती. त्या मुद्रेतील क्रियांचे फोटोही काढलेले आहेत. पण वज्रोली मुद्रेमध्ये सुद्धा पाणी, दूध, मध, तूप हे द्रव पदार्थ खेचून घेण्यापर्यंत त्यांनी सफलता गाठली होती. अशी ही अष्टांग योगसाधना चालू असताना मुंबईस नोकरीनिमित्त त्यांचे जाणे झाले. योगसाधना निष्णात गुरूच्या मार्गदर्शनाखाली चालू होती. परंतु या साधनेत कुठेतरी दोष निर्माण झाला म्हणा किंवा योग्य शब्दात सांगावयाचे झालेच तर प्रारब्धकर्माच्या गतीप्रमाणे त्यांच्या पाठीच्या कण्यातील पाचव्या मणक्याजवळ गळू झाले. ( Carbuncles

कॉरबन्क्लस ). ही व्याधी दिवसेंदिवस वाढत चालली. अनेक उपायानंतर डॉक्टरी उपाय सुरू झाले. काही डॉक्टरांनी मिळून ऑपरेशनचा निर्णय घेतला. ते गळू कापून टाकले. आता नवी जखम भरून काढण्याचे उपाय सुरू झाले पण जखम काही भरून येईना. ती वाढत गेली आणि हाडाला भिडली. तो हाड्याव्रण झाला. काटयाचा नायटा व्हावा तशातला प्रकार झाला. सर्व डॉक्टरांनी हात टेकले.

डॉक्टरांना उपाय सुचेनात. त्यांचे सर्व उपाय झाले. ते म्हणाले हा व्रण आयुष्यभर राहाणार. त्यामधून दुर्गंधीयुक्त घाण पिवळा पू असाच वहात राहाणार. ड्रेसिंग करीत रहाणे एवढेच काम. तेसुद्धा स्वतः केले तर जमणार! नाही तर दरवेळी ड्रेसिंगला दवाखान्यात जाणे कठीण होणार. एकूण सारे ऐकून भगवंतराव अवाक् राहिले. आपले प्रारब्ध असे! त्याचा बोल इतरांना कसा लावणार ? दररोज पंधरा पंधरा तोळे पू निघत होता. प्रकृति अगदी अशक्त झाली. वेदना तर मरणान्तिक होत्या. अशा स्थितीत त्यांनी मुंबई सोडली आणि ते पुण्यास आले. पुण्यात २०९ कसबा पेठ हे घर अंबालाल शेठजींचे होते. तेथे भगवंतराव आले. दिवसभर अंथरुणावर पडून असत, पडल्या पडल्या काही वाचन करीत असत.

श्री. अंबालाल शेटजींच्याकडे गोरखपूरचे 'कल्याण' मासिक येत असे. त्या मासिकाचा "योगांक" विशेषांक १०, भगवंतरावांना वाचावयास मिळाला. त्यामध्ये श्री. त्र्यंबक भास्कर खरे शास्त्रींनी शक्तिपात विषयावर लिहिलेला लेख वाचण्यात आला. पुण्याचे ड्रॉईंग मास्तर श्री. गुळवणी अशी शक्तिपात दीक्षा देतात असाही उल्लेख आढळला. भगवंतरावांची जिज्ञासा वाढली. पुढे योगायोगाने सोलापूरला गेल्यानंतर श्री. बापूसाहेब कुबडे यांचेशी संबंध येताच महाराजांच्या भेटीचा योग आला.

भगवंतरावांनी महाराजांना आपली सर्व हकीगत सांगितली. दीक्षेचीही प्रार्थना केली. महाराज म्हणाले "सध्या तुमची प्रकृति ठीक नाही. पुण्यास आल्यावर पुढे पाहू", याप्रमाणे दीक्षेचा विषय जरी लांबणीवर पडला तरी भगवंतरावांचे महाराजांकडे येणे जाणे सुरू झाले.

पुढे पुणे येथे गेल्यावरही भगवंतरावांनीं महाराजांचेकडे जाणे ठेवले होते.

दीक्षेचा विषय सारखा टाळला जातो. लांबणीवर टाकला जातो असे भगवंतरावांच्या लक्षात आले. तेव्हा एके दिवशी निर्धार करून भगवंतराव सकाळचे वेळी, २० नारायण पेठेत, महाराजांच्याकडे आले. त्यांनी दर्शन घेतले आणि छोटीशी डबी महाराजांच्या पुढे ठेवली. महाराज स्नान करून संध्यादि आह्निक करीत होते. भगवंतराव जवळ बसले.

महाराजांनी विचारले "भगवंतराव हे काय ठेवले आहे ?" त्यावर भगवंतराव म्हणाले "दीक्षेसाठी गुरुदक्षिणा आणली आहे. ही पत्नीची नथ आहे. कृपया स्वीकार करावा."

हे ऐकताच महाराजांच्या चर्येत एकाएकी फरक पडला. ते म्हणाले— **"भगवंतराव ! तुमची अशी समजूत आहे काय की आमची दीक्षा पैशावर अवलंबून आहे ? फार मोठा गैरसमज आहे हा तुमचा. तुमची प्रकृति ठीक नाही, मोठ्या आजारात दीक्षा देणे योग्य नसते. स्वामींनी तसे सांगून ठेवले आहे. तुम्हाला दीक्षा होईल हे मी तुम्हाला आधीच सांगितले होते. पैशामुळे दीक्षा अडली हा तुमचा संदेह असेल तर उद्याच या दीक्षेला."** भगवंतरावांना गुरुवार दिनांक १७–६–३७ ला दीक्षा झाली. नंतर पुढे काही दिवस महाराजांच्यापुढे साधना झाली. आजारासंबंधी महाराज म्हणाले "साधन नियमीत केले तर वर्षभरात आजार नाहिसा होईल." त्याप्रमाणे भगवंतरावांनी मनापासून नित्य नियमित भरपूर साधन सुरू केले. रोगाने ज्या स्थितीपर्यंत मजल गाठली होती ती अद्याप तरी पक्की होती. साधना सुद्धा "मा फलेषु कदाचन" वृत्तीतून चालू होती.

भगवंतराव मुंबईस गेले. आषाढ शु. १ स श्रीमत् वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांच्या पुण्यतिथीच्या दिवशी श्रीलोकनाथतीर्थ स्वामी महाराज बडोद्यास गेले हे समजताच भगवंतराव मुंबईहून बडोद्यास गेले.

स्वामींचा या वर्षीचा चातुर्मास बालाजी मंदिरात झाल्यामुळे बडोद्यातील एका सिद्धसंन्यासी स्वामींचा सहवास स्वामींना घडला. हे सिद्धसंन्यासी स्वामी म्हणजे प. प. श्रीशांतानंद सरस्वती स्वामी महाराज होत. हे मगर स्वामी म्हणून तिकडे सर्व-परिचित आहेत. हे बंगाली होते. काशी क्षेत्रात जेव्हा ते होते तेव्हा त्यांचा आणि प. प. श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थ स्वामी महाराज यांचा कित्येक दिवस सहवास घडला. हे मोठे योगाभ्यासी व अधिकारसंपन्न सिद्ध स्वामी होते.

एकदा नर्मदेमध्ये स्नान करताना त्यांचा पाय मगरीने पकडला आणि त्यांना पाण्यात खाली ओढून नेले. तेवढ्यात सिद्ध स्वामींनी आपले प्राण वर मस्तकात नेऊन ठेवले. मगरीने एका कपारीमध्ये आपले "हे भक्ष्य" नेऊन ठेवले व सडल्यावर त्याचा समाचार घ्यायचा म्हणून निघून गेली. नदीवर जमलेल्या लोकांनी सिद्ध स्वामींना मगरीने ओढत नेतांना पाहिले होते. स्वामी आता जिवंत येणे शक्य नाही अशी सर्वांची खात्री झाली. ही वार्ता गावभर पसरली. त्यांच्या भक्तांना फार दुःख झाले. परंतु पुढे २/४ दिवसांनी स्वामी नदीच्या काठावर येऊन पडलेले लोकांनी पाहिले. हात व पाय मगरीच्या दातांनी छिन्न भिन्न, चाळणीसारखे केले होते. शरीर गलित गात्र झालेले आणि जोरजोराने कण्हत असलेले स्वामी पाहून ओळखीच्या लोकांनी त्यांना मठात नेले. वैद्यकीय उपचार करविले. पुढे सिद्ध स्वामींची प्रकृति सुधारल्यावर त्यांनी ही भयंकर घटना लोकांना सांगितली. त्या वेळेपासून त्यांना "मगर स्वामी" नाव पडले. अशा सिद्ध स्वामींच्या सहवासात स्वामी श्रीलोकनाथतीर्थ राहिले होते. कुणाचा सहवास करावयाचा आणि कुणाचा सहवास टाळावयाचा हे स्वामींना चांगलेच समजत होते. दोघांचे संभाषण बंगालीतून चाले.

पुण्याहून महाराजांनी श्रीभगवंतराव उपाध्ये यांच्यासंबंधी एक सविस्तर पत्र स्वामींना पाठविले होते. त्या पत्राप्रमाणे भगवंतराव स्वामींच्या सान्निध्यात राहून त्यांच्या देखरेखीखाली साधन करण्याच्या इच्छेने बडोद्यास आले होते. परंतु आवश्यक ती शांतता व एकांत मंदिरामध्ये नसल्याने स्वामी म्हणाले "भाद्रपद पौर्णिमेनंतर थुरावासला तुमच्या घरी जाऊ आणि तेथे एकांतामध्ये माझ्यासमोर तुमचे साधन होईल." स्वामींच्या इच्छेप्रमाणे भगवंतराव पौर्णिमेपर्यंत बडोद्यामध्ये राहिले. भगवंतरावांचा मुक्काम श्रीराम मंदिरात होता. ते रोज सकाळ, दुपार, संध्याकाळ स्वामींच्या दर्शनासाठी व सेवेसाठी बालाजी मंदिरात जात असत.

या काळात इंदोरचे श्रीभालचंद्रशास्त्री भारती हे स्वामींच्या दर्शनासाठी बालाजी मंदिरात आले होते. त्यांनी स्वामींना प्रार्थना केली की "आपल्यावर दीक्षानुग्रह व्हावा." त्यांनाही स्वामी म्हणाले "येथे एकांत नाही. इंदोरला तुमच्या घरी येऊन दीक्षा होईल" याप्रमाणे भाद्रपद पौर्णिमेनंतर चातुर्मास समाप्तीचे दिवशी स्थानांतर म्हणून स्वामी प्रथम इंदोरकडे गेले. बरोबर भगवंतराव उपाध्ये यांनाही घेतले.

श्रीभालचंद्रशास्त्री भारती इंदोरची प्रतिष्ठित व्यक्ति होती. त्यांनी नर्मदा

तीरावर, खेडीघाटावर, श्रीत्रिपुरा सुंदरीचे सुंदर मंदिर आणि टुमदार आश्रम बांधला होता. तेथील वातावरण मोठे रम्य, शांत, एकांत, चित्ताला प्रसन्न ठेवणारे असे होते. स्वामींचा तेथे मुक्काम झाला. भालचंद्रशास्त्री हे शास्त्रीपंडित असूनही त्यांना योगविषयाचे विशेष आकर्षण होते. त्यांची स्वामींच्यावर श्रद्धा नितांत होती. स्वामींची सर्व व्यवस्था ते आपल्या हातांनी करीत असत. जातीने सर्व लक्ष पुरवीत असत. होता होता एक सुदिन पाहून स्वामींनी त्यांना दीक्षा दिली. दीक्षेच्या अनुभवाने शास्त्रीजींना फार आनंद झाला. ज्ञान अनुभवगम्य झाले म्हणजे पुन्हा त्याचे वर्णन कसे करणार? शास्त्रीजी साधनेच्या अनुभूतीने दिवसभर विशेष तृप्तीने तृप्त राहू लागले. त्यांचे शक्ति जागृतीचे अनुभव उत्तम होते. तेथेच स्वामींनी भगवंतरावांना स्पर्श दीक्षा दिली आणि त्यांना एक षडाक्षरी मंत्राचा उपदेशही दिला.

भगवंतराव तर आनंदाने हरखून गेले. स्वामींची कृपा व्हावी म्हणून केवढी आंतरिक ओढ होती. तरी शक्य तेवढा संयम ठेवून दिवस मोजीत होते. तो सुवर्ण दिन आज अचानक त्यांच्यापुढे उभा राहिला. स्वामींच्या हस्त स्पर्शाचा जो विलक्षण अनुभव आला तो अपूर्व होता. आजच्या विशेष अनुभवाने त्यांची आशा पल्लवित झाली. शक्तिसंक्रमणाचा इतका तीव्र अनुभव येऊ शकतो या प्रत्यक्ष अनुभूतीने ते देहभानही विसरले. त्रिपुरसुंदरीच्या सुंदर मंदिराच्या एकांतामध्ये शास्त्रीजी आणि भगवंतराव हे दोघे साधक स्वामींच्या सहवासात साधनेचा आनंद लुटीत होते. ही दिव्य संपत्ति आणि अपूर्व आनंद रस यांचा आस्वाद ते घेत होते. दिवसच्या दिवस साधनेच्या धुंदीत जात होते. बोलणे एकदम कमी होत होते. बाकीचा सारा दिनक्रम सामान्य व्यवहारी जीवनाप्रमाणे साधा आणि सरळ होता. सकाळ संध्याकाळ साधना कटाक्षाने चालू होती. दुपारी स्वामींचे वाचन, पत्रलेखन चालत असे. मधून मधून बोलणे चालणे होत असे. सायंकाळी फिरणे होत असे. असा सुमारे एक महिना मोठ्या मजेत तेथे गेला.

एके दिवशी स्वामींना प्रेरणा आली. त्याप्रमाणे ते भगवंतरावांना म्हणाले "भगवंतराव, चला आता तुमच्या गावी जाऊ. मी तुमच्या गावी येण्याचे कबूल केले आहे. आता येथे राहायचे नाही असे सांगणे झाले आहे." त्याप्रमाणे आश्विन-पौर्णिमेनंतर स्वामी खेडीघाटाहून इंदोरला आले. नंतर रतलाम, बडोदा, अहमदाबाद, हिंमतनगर, येथपर्यंत रेल्वेने आले. पुढे २५ मैलांचा प्रवास मोटारने झाला. याप्रमाणे स्वामी भगवंतरावांच्या थुरावासला येऊन पोहोचले.

स्वामींना जशी शांतता आणि एकांत हवा होता तसा भगवंतरावांच्या घरी न मिळाल्याने स्वामींच्या निवासाची आणि साधनेची व्यवस्था जवळच्या एका उत्तम घरामध्ये केली. भिक्षा व स्नानासाठी भगवंतरावांचेकडे यावे व उरलेला काळ त्या निवांत स्थानात घालवावा लागे. थुरावासला स्वामी एका विशेष उद्देशाने आले होते. भगवंतरावांच्या व्याधीचा उपशम साधनेने व्हावा आणि त्यांची साधना आपल्यासमोर व्हावी हा उद्देश असल्याने स्वामींच्यासमोर भगवंतरावांची साधना अत्यंत एकाग्रतेने सुरू झाली.

हाड्यात्रणाची स्थिति अद्याप पूर्ववत् होती. वेदनांचा जोर होताच. थुरावासमधील विशेष साधना सुरू झाली आणि १।२ दिवसातच त्या व्रणातून स्रावाचे प्रमाण वाढले. वेदनांचा जोर कमी होऊ लागला. दिवसभर हा अनुभव येऊ लागला. साधनेची इच्छा वाढू लागली. सकाळ संध्याकाळ २।३ तासांचे साधन होत होतेच परंतु आता दुपारी आणि मध्यरात्रीही साधना करण्याची इच्छा भगवंतरावांना होऊ लागली. ते अपरात्री आपोआप जागे होत आणि साधनेला बसत. स्वामी या साऱ्या गोष्टीसंबंधी मौन ठेवीत होते. ज्यावेळी जे काही करण्याची इच्छा होत असे त्यावेळी स्वामी तसे करीत असत. संकल्प, दृष्टि, स्पर्श, शब्द इत्यादिंची मधून मधून पुनरावृत्ति होत होती. भगवंतरावांची अनेक जन्मजन्मांतरीची पुण्याई फळाला आली. स्वामींच्या वात्सल्याने साकार स्वरूप घेऊन ही पुण्याई आली होती. सारे कुटुंबीय स्वामींच्या सेवेमध्ये रंगून गेले होते. नकळत पद अग्निवरी पडे। न करी दाह असे कधीं न घडे। अजित नाम वदो भलत्या मिशे। सकल पातक भस्म करीतसे॥ तसे हे घडत होते.

थुरावासमध्ये स्वामींचा मुक्काम महिनाभर होता. स्वामींना हिंडण्याफिरण्याची मोठी हौस असे याची भगवंतरावांना चांगलीच जाणीव होती. जवळ एक मैलावर च्यवनाश्रम व भृगुक्षेत्र आहे. भृगुकुंड आहे. त्या तीर्थाचे माहात्म्य असे आहे की त्यामध्ये स्नान केल्याने अनेक रोग विशेषत: महारोगही बरे होतात. एकदा त्या बाजूला भगवंतरावांनी स्वामींना नेले. तेथील देवतांचे दर्शन आणि कुंडातील जलाचे स्पर्शपूर्वक वंदन केले. त्या कुंडातील जलामध्ये महारोगी स्नान करताना पाहिल्यावर स्वामी भगवंतरावांना म्हणाले—

"हे तीर्थक्षेत्र आहे. पवित्र स्थान आहे. पण येथे आल्यावर महारोग्यांचे दर्शन

होते. हे असे बरे नाही. कारण महापापी लोकांना असे भयंकर रोग होत असतात. **आपले शक्तिपात साधन असे श्रेष्ठ साधन आहे की ते आपले मन आणि शरीर अति पवित्र करीत जात असते. पाणी ज्याप्रमाणे उताराकडे वहात जाते त्याप्रमाणे आपल्या शक्तीचा प्रवाह सुद्धा खालच्या अवस्थेतील लोकांकडे वहात जातो. त्याचबरोबर अशुद्ध शक्तीचा काही अंश आपोआप खेचला जात असतो. ही स्थिति साधकाच्या साधनेत विक्षेप उत्पन्न करते. म्हणून साधकाने स्पर्शास्पर्श दोष कटाक्षाने पाळावेत. शक्यतो अशा स्थानी जाण्याचे टाळावे".**

थुरावासपासून १२ मैलावर गदाधर क्षेत्र आहे. ते स्थान गयेसारखे पवित्र आहे. तेथे कार्तिक शु० १५ ते आमावास्येपर्यंत यात्रा भरते. त्या ठिकाणी स्वामी १२ मैल पायी चालत गेले. त्यांच्या बरोबर भगवंतरावांचे सुपुत्र श्री. नारायणराव आणि शामलाल इत्यादि सज्जन होते. गदाधर क्षेत्रात स्वामींचा मुक्काम त्रिलोकीनाथ मंदिरात होता. भिक्षेची व्यवस्था उत्तम होती. मंदिरासमोर तुलसीवन विस्तीर्ण होते. तुलसीच्या मंदमधुर पवित्र सुगंधाने वातावरण प्रसन्न केले होते. स्वामी या सुगंधित वातावरणाचा आस्वाद घेत प्रसन्न चित्त असत. पण एकाएकी त्यांचे मन अप्रसन्न झाले. कुठल्याशा घटनेच्या दृश्याने त्यांना तेथे रहाणे नको झाले. त्यांनी नारायणरावांना सांगितले "माझी येथे राहण्याची इच्छा नाही. आपण ताबडतोब थुरावासला जाऊ."

स्वामींनी असे एकाएकी सांगितल्याने नारायणरावांना काही सुचेनासे झाले. ते नम्रतेने म्हणाले, स्वामी काही चुकले असेल तर क्षमा करावी. तेव्हा स्वामी म्हणाले, **"तुझे काही चुकले नाही, परंतु लोकांचा दुर्व्यवहार पाहिला म्हणजे तेथे राहू नये असे शास्त्र आहे. तुलसी, पिंपळ, औंदुबर अशा पवित्र वृक्षांच्या अगर मंदिरांच्या जवळ लघुशंका करणे महापाप आहे. जेथे असा भ्रष्टाचार होतो तेथे राहणे बरे नाही."** स्वामींची ही कट्टरता पाहून सामान्य माणसाला अयोग्य वाटेल परंतु ध्येयवादी आदर्श जीवन जगणाऱ्या पुरुषांच्या दृष्टीने असे वागणे केवळ योग्य नव्हे तर अर्थपूर्णही असते प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज संपूर्ण भारतात भ्रमण करून आले पण काश्मीर राज्यात हेतुपुरस्सर गेले नाहीत याला जो अर्थ आहे तसाच अर्थ स्वामी लोकनाथतीर्थांच्या वरील वाक्यांना आहे. नारायणरावांनी ताबडतोब हातबत्तीची व्यवस्था केली आणि रातोरात त्या बत्तीच्या प्रकाशात स्वामी थुरावासला परत निघून आले.

एके दिवशी स्वामींनी आपली जाण्याची इच्छा प्रकट केली. व्रणासंबंधी न

विचारताच म्हणाले "व्रण नियमीत साधन केले म्हणजे संपूर्ण नष्ट होईल. हा रोग नि:शेष बरा होईल." भगवंतराव म्हणाले "स्वामीजी! श्रीगुळवणीमहाराज म्हणाले होते, नियमीत साधन केले तर वर्षभरात रोग संपूर्ण बरा होईल" आपले "तोंडातूनही हेच शब्द बाहेर पडले आहेत. मी धन्य आहे. स्वामीजी! या गरीबावर असेच लक्ष असू द्यावे. आपल्या कृपेमुळे मी कृतार्थ झालो आहे. माझी गरीबाची मीठ भाकरी गोड करून घेतली हा आपला मोठेपणा आहे. स्वामी! कोट्यावधी अपराध पोटात घालण्यास आपणच समर्थ आहात. मला आपली काहीही सेवा करता आली नाही. आपणच निरपेक्ष मनाने माझे घरी आला. महिनाभर राहिला. केवढी कृपा आहे ही आपली!...." यापुढे भगवंतरावांच्या तोंडातून शब्दच बाहेर येईनात त्यांना आतून जो जोराचा हुंदका आला त्याबरोबर ते पुढे झाले. त्यांनी स्वामींचे दोन्ही चरण घट्ट धरले आणि आतून आलेल्या हुंदक्याला मोकळी वाट करून दिली. बराच वेळ भगवंतराव लहान मुलासारखे ओक्साबोक्शी रडले. त्यांची ती स्थिति पाहून घरातील सर्वांच्या डोळयातून अश्रूधारा वाहू लागल्या. भावनेने शरीरे रोमांचित झाली. स्वामीजी निर्विकार मनाने पहात होते. शक्तीच्या लीलेची एक चुणुक अनुभवीत होते. त्यांनी भगवंतरावांची पाठ थोपटली. त्यांना शांत केले. व म्हणाले. "वामनचे शब्द खरे होतील. निश्चिंत रहा."

या व्रणासंबंधी एक व्यावहारिक घटना अशी घडली की भगवंतराव पुण्याला श्रीगुरुमहाराजांकडे दीक्षेसाठी जेव्हा गेले होते तेव्हा पुण्यातील एक नामांकित डॉक्टर श्री. कडले, सोमवार पेठेत त्यांचा दवाखाना आहे, त्यांच्याकडे महाराज व श्री. बापूसाहेब कुबडे हे भगवंतरावांना घेऊन गेले होते. त्यावेळी तपासणी करून डॉक्टरांनी सांगितले हा रोग बरा होणे शक्य नाही. हा असाध्य रोग आहे. त्यानंतर स्वामीजी थुरावासहून गेल्यानंतर पुढे दत्तजयंतीच्या वेळी भगवंतराव पुण्यास गेले. त्यावेळी महाराज भगवंतरावांना घेऊन पुन्हा डॉ. कडले यांचेकडे गेले. त्यांनी पाहिले तर रोग पूर्ण बरा झालेला! डॉक्टरांना आश्चर्याचा धक्काच बसला. त्यांनी नीट तपासणी करून निर्णय दिला की रोग पूर्ण नाहिसा झाला आहे. रोग वर्षात बरा होईल हे शब्द अवघ्या ७/८ महिन्यातच रोग बरा होऊन खरे ठरले.

या घटनेला गुरुकृपेशिवाय आणखी कशाचे पाठबळ होते? केवळ गुरुकृपेचे हे फळ होते. साधनेमुळे झाले असे म्हणण्याचा बिनतोड युक्तिवाद आणि जबरदस्त

मोह झाला तरी साधनेपेक्षा साधनदाता गुरूच श्रेष्ठ असल्याने सारे श्रेय केवळ गुरुकृपेलाच जात आहे. गुरुकृपेची तुलना अन्य कशाशीही करता येत नाही. ती निस्तुला आहे. अतुलनीय आहे. कल्पवृक्षाचे तळवटी बसणारा जी इच्छा करील ती तृप्त करण्याचे सामर्थ्य त्या कल्पवृक्षात असेल तरी सद्गुरु निरपेक्षपणे अकल्पनीय वस्तु देण्याचे कार्य करीत असतात. कल्पनीय वस्तु कल्पवृक्ष देतो आणि कल्पनातीत वस्तु सद्गुरु देतात म्हणून त्यांची कोणाशी तुलना करता येणार आहे ?

स्वामींनी अशा अनेक जीवांचा उद्धार स्वसंकल्पित कृपेने केला आहे हे पाहणे व त्यांना वंदन करणे एवढेच आपले काम.

स्वामी येथून अहमदाबादेस गेले.

## स्वामींचे काही दृष्टिकोन

डिसेंबर १९३७ आणि जानेवारी १९३८ या दोन मासांमध्ये स्वामी अहमदाबादेत होते. त्यांचा निवास काशी विश्वनाथ महादेव, शाहूपूर दरवाजाचे बाहेर एका कुटीमध्ये होता. शीतऋतूत तेथेच रहाण्याचा आदेश आल्यामुळे बरेच दिवस स्वामींनी अहमदाबाद सोडले नाही. येथील ब्राह्मण अत्यंत श्रद्धावान असल्याने भिक्षादिची व्यवस्था ठीक होती.

येथे असताना सतन्याहून हरस्वरूप यांचे पत्र स्वामींना आले होते. त्यांनी स्वामींना आपल्या गावी मोठ्या आग्रहाने बोलावले होते. महाराजांची पत्रेही स्वामींना येत होती. नियमित म. ऑ. येत असे. स्वामींनी पुण्याला महाराजांना पुढील पत्र पाठविले :—

नारायण

अहमदाबाद
१४।१।३८

नारायण स्मरण विशेष ....

.... खरेशास्त्री पुत्र के दीक्षानिमित्त मेरे पास नही आया। सतनासे हरस्वरूपका पत्र मेरे पास भी आया है। मैं उसका उत्तर भी लिख भेजा है। हरस्वरूप प्रति पत्रमें लिखता है—मुझे दर्शन दीजिए किंतु भाडाका निमित्त कुछ भेजता नहीं। कैसे उसके पास जाऊ ? पत्र लिखता है किंतु रिप्लाईकार्ड भी भेजता नहीं। ऐसे मूर्ख

के साथ मैं किस प्रकार व्यवहार करू सो तुम मुझे कहो। क्या हरस्वरूप मेरे पास द्रव्य का संचय देख गया है ? उनसे तुम पूछो आने जाने का खर्चा न देवे तो हम कैसे आ सकते हैं। यह तुम विचार करो। भुजंगराव आदिक सब मंडलीको मेरा नारायण स्मरण कहना। मैं यहाँ आनंदमें हूँ। नारायण तुम सबका कुशल विधान करे। इति शिवम्।

शुभेच्छु

स्वामी लोकनाथतीर्थ

स्वामी सरळ व स्पष्ट होते. महापुरुष वरून तलवारीसारखे तिखट धारेचे असलेले दिसतात परंतु त्यांचे अन्तःकरण मात्र द्राक्षाप्रमाणे गोड दयार्द्र असलेले ते असतात. स्वामींचा बाह्य व्यवहार प्रखर असे पण मन अत्यंत दयाळू असे. संन्यासी जीवन असल्याने कशाचाच त्यांनी संग्रह केला नाही, म्हणून पत्रोत्तराला तरी पैसे कुठून असणार ? पत्रोत्तर पाहिजे असेल तर रिप्लाय कार्ड पाठविणे आवश्यक आहे हे सांगणे सरळ होते. स्वामींनी गावी यावे ही इच्छा करताना त्यांच्या जाण्यायेण्याच्या सोयीचा विचार आधी स्पष्ट झाला पाहिजे. स्वामींचा स्पष्टपणा, सरळपणा, पत्रातील शब्दातून स्पष्ट होतो. आणखी एका पत्रातून असाच काही दृष्टिकोन आढळतो तो पाहू या.

पुण्याहून महाराजांचेकडून दीक्षा घेतलेले एक साधक चुनिलाल म्हणून होते ते स्वामींच्या दर्शनास मुद्दाम अहमदाबादेस गेले. चुनिलाल आर्य समाजी होते. श्रद्धावान व गरीब होते. त्यांच्या संबंधी स्वामींनी एका पत्रातून महाराजांना कळविले की –

नारायण

अहमदाबाद

२१–१–१९३८

नारायण स्मरण। विशेष समाचार।

....चुनिलाल नामक एक व्यक्ति मेरे पास आकर कुछ दिन रहे। तुम्हारे पास गिया था। तुमसे उपदेश भी लिया। और तुमसे मेरा ठिकाना जानकर मेरे समीप भी आया था। वह आर्य समाजी था। और समाजके नियमानुसार श्रद्धावान भी था। वह चुनिलाल मुझसे उपदेशके लिए प्रार्थना भी किया था। एक रुपाया, कुछ फल तथा

नम्र स्वरुप प्रणाम रखा । मैं उसे कहा रुपाया का कोई प्रयोजन नहीं । वह रुपाया वापस ले लो । वह रुपाया वापस लिया नहीं । उसका आग्रहसे मैं रुपाया ग्रहण किया । और उसको मैं बोला —

**आर्यसमाजी की जो श्रद्धा है उस प्रकार की श्रद्धासे विद्या प्रसन्न नहीं होती।** चुनीलाल के आग्रहसे मैं उसे स्पर्श भी किया । कुछ अनुभव भी उसे प्राप्त हुआ । लेकिन वह अनुभव संतोष जनक नहीं था । वह घरको चलि गया है ।

भविष्यमें मेरा ठिकानाकावास्ते तुमको पत्र लिखे तो कभी मेरे ठिकाना नहीं देना । और दूसरा जोही आर्य समाजी हो उसको मेरा ठिकाना नहीं देना । और श्रद्धावान, भक्तिमान हो ऐसा मनुष्य को ही मेरा ठिकाना देना । मेरा ठिकाना दूसरेको देनेमें यह बातका विशेष विचार करना ।

...नारायण....

शुभेच्छु
स्वामी लोकनाथतीर्थ

आर्यसमाजी व्यक्तीसंबंधी स्वामींची एक निश्चित धारणा होती. असे असले तरी स्वामींचे कित्येक शिष्य आर्यसमाजी होते.

स्वामी यानंतर अचानकपणे पुण्यास जाऊन १०।१२ दिवस राहून आले.

## मला थोडेसे कळते !

स्वामीजी पुण्यात होते त्यावेळची ही एक घटना आहे. सोलापूरच्या वैद्य मास्तरांच्या संबंधितांपैकी लग्न ठरले होते. पुण्यामध्ये लग्न करण्याचे ठरल्यानंतर कार्यालय ठरवले आणि तिथीनिश्चय करून निमंत्रणपत्रिका काढून ठिकठिकाणी पाठवूनही दिल्या. या लग्नाला महाराजांना आणि श्री. नाना भालेराव यांनाही निमंत्रण होते. लग्नाची खरेदी झाली. बस्ते बांधले. सारी लग्नतयारी मोठ्या धावपळीने, थाटामाटाने झाली. लग्नाच्या आधी सोलापूरहून वैद्यमास्तर आले. वैद्यमास्तर कोणत्याही कामासाठी पुण्यास आले की २० नारायण पेठेत महाराजांकडे उतरत असत. त्याप्रमाणे यावेळेसही ते इकडेच आले. स्वामींचा येथे मुक्काम पाहून वैद्यमास्तरांना मोठा आनंद झाला. अचानकपणे वैद्यमास्तर आल्याने त्यांची भेट झाली म्हणून स्वामींनाही आनंद

झाला. एकूण का आलात वगैरेच्या चौकशीत लग्नासाठी आल्याचे स्वामींना समजले. वैद्यमास्तरांच्या येण्याने महाराजांनाही आनंद झाला. ते येणार ही कल्पना होती.

लग्न दुसरे दिवशी सकाळी ९-३० वाजताचे होते. सकाळी सर्व आह्निक उरकून जायचे असल्याने रात्री १० वाजता सर्वजण झोपी गेले. नित्याचीच वेळ होती ती. पण लक्ष ठेवून सर्व गोष्टी लवकर उरकल्या आणि सर्वजण झोपले. ठरल्याप्रमाणे पहाटे चारला सर्वजण उठले. नित्याप्रमाणे साधना सुरू झाली. स्वामींच्या सहवासाने वातावरणाला चैतन्य आले होते. उत्तम साधनेने प्रसन्नता आणि शांतता आसमंतात कोंदून भरली होती.

आज सर्वांनीच लवकर लवकर स्नान केले. स्वामी तेवढे स्नानाचे थांबले होते. इतरांना लग्नाला जायचे होते. सर्व आह्निक उरकले पाहिजे म्हणून महाराज, नाना, वैद्यमास्तर आपापल्या उद्योगाला लागले. स्वामींना गडबड नसल्याने ते आपल्या आसनावर ध्यानावस्थेत मग्न होते. बाकीच्यांची निस्तब्ध, मौन हालचाल चालू होती. महाराजांना तर लग्नाहून आल्यावर भोजन उरकून शाळेत जायचे होते. नानांना कोर्टात जायचे होते. स्वामीजी आणि वैद्यमास्तर दुपारी घरी राहणार होते.

ठरल्या वेळेत सर्वांचे आह्निक उरकले. घड्याळात साडे आठ वाजले होते. कपडे वगैरे करून नऊपर्यंत निघाले तरी १०।१५ मिनिटात कार्यालयात पोहचता येणार होते. लग्नापूर्वी १५।२० मिनिटें आधीच पोहचणार होते. त्यामुळें धावपळ नसली तरी वेळेवर सर्व काही चालले होते.

कपडे वगैरे करून ही मंडळी लग्नाला निघाली इतक्यात स्वामी म्हणाले, "एवढ्या गडबडीने लग्नाला निघाला काय? ते लग्न आज होणार नाही". स्वामीजी मधून अधून थट्टा करतात तशी थट्टा असेल असे वैद्य मास्तरांना वाटले. ते म्हणाले, "स्वामीजी, लग्नाचा मुहूर्त ठरला आहे. कार्यालय नक्की केले आहे. निमंत्रण पत्रिका छापल्या, वाटल्या, सर्व काही झाले आहे. आज लग्न होणार नाही असे होणार नाही. मला तर पत्रिका येऊन स्वतंत्र पत्रही आले आहे. मला या लग्नाची माहिती आहे. मी वर पक्षाचा असून माझ्या नात्यातील मुलाचे लग्न आहे."

स्वामींनी सर्व म्हणणे शांतपणे ऐकून घेतले. आणि म्हणाले, "लग्नाला जाण्याची एवढी तयारी केली आहे. आहेराच्या पिशव्यापण घेतल्या आहेत तर या जाऊन. लग्न

आज होणार नाही हे तर कळेल." वैद्य मास्तर, नाना भालेराव, महाराज आणि कोणीतरी एक सज्जन असे चौघे लग्नाला निघाले.

कार्यालय फार लांब नव्हते. दहा मिनिटे लागली. कार्यालयाच्या गल्लीत चौघे शिरले. कार्यालयाचा दरवाजा लांबून दिसला पण त्याला तोरण नव्हते. केळीचे खुंट नव्हते. जाणाऱ्या येणाऱ्यांची गडबड धावपळ नव्हती. सर्वांच्या मनात शंकेची पाल चुटपुटून गेली. जरा पुढे गेले. सर्वत्र शांतता आढळली. जरा आश्चर्यच वाटले. कार्यालयाच्या दारापाशी एक फलक लावलेला होता व त्यावर लिहिले होते– "काही अपरिहार्य कारणाने विवाह स्थगित झाला आहे. तसदीबद्दल क्षमस्व" सर्वांनी कार्यालयात डोकावून पाहिले एक चिटपाखरूंही तेथे नव्हते. मोठ्या आश्चर्याने सर्व जण तेथून परतले. सर्वांना विशेष आश्चर्य त्या फलकापेक्षा स्वामींच्या वाक्याचे वाटत होते. स्वामींच्या या विशेषज्ञत्वाची प्रशंसा करीत सर्व जण घरी आले.

स्वामीजी आपल्या ठरलेल्या खिडकीजवळ आसनावर बसले होते. तेथूनच ही मंडळी येताना दिसताच मोठ्यांदा म्हणाले "काय झाला का विवाह? इतक्या लवकर कसे परतला?"

यावर दाराशी आलेले वैद्यमास्तर म्हणाले "स्वामीजी आपलेच शब्द खरे झाले, पण आपण हे कसे ओळखले?" स्वामीजी मोठ्या प्रसन्नतेने हसत होते. सर्वजण आत आले. कपडे काढू लागले तेव्हा हलक्या आवाजात स्वामी म्हणाले "मलाही थोडेसे कळते."

स्वामींच्या प्रसन्नतेने आणि उत्तराने सर्वांच्या अन्तःकरणाला प्रसन्नता आली. सर्वजण आदर, भक्ति आणि श्रद्धा यांनी भारावले गेले. पुढे हा खुलासा झाला की वधूच्या तीव्र शारीरिक दोषाची कल्पना ऐनवेळी समजल्याने वर पक्षाला विवाह स्थगित करावा लागला.

## स्वामीसान्निध्य व साधनतीव्रता

वैद्यमास्तर एक दोन दिवसात सोलापूरला गेले. आता २० नारायणमध्ये फक्त स्वामीजी आणि महाराज हे दोघेच होते. गं. भा. तीर्थरुपा श्रीगोदावरीताई या सुद्धा गावाकडे गेल्या होत्या. अशा वेळी भोजन, स्नानादिची व्यवस्था नाना भालेराव यांच्या

सहधर्मचारिणी सौ. गोदावरीकाकू यांचेकडे असे. असा हा सेवेचा चंचूप्रवेश झाल्यापासून, उत्तरोत्तर वाढत गेला. नानांची सेवाही भरपूर चालू होती. नानांचा गृहस्थाश्रम अत्यंत उत्तम तऱ्हेने चालू होता. ब्रह्मचर्याश्रमाचा आणि संन्यासाश्रमाचा एकमेव आधार असलेला गृहस्थाश्रम, नाना काटेकोरपणे, विनम्रपणे आणि निरहंकारी भावनेने पालन करीत होते.

महाराज आणि नाना यांचा दिनक्रम सूर्यचंद्राप्रमाणे यथाक्रम, सतत, अखंड चालू होता. साधना, स्नान, संध्या, पूजापाठ, ब्रह्मकर्म, जपजाप्य, वैश्वदेव, भोजन, व्यवसाय, सायंसंध्या, आरती, कर्मसमर्पण इत्यादि सर्व नित्य कार्यक्रम यंत्रवत्, सुरळीत चालू असत.

स्वामी साक्षीभावाने हे पहात व मनाने अति संतुष्ट होत असत. महाराजांचा नित्यक्रम पाहून स्वामी प्रसन्नपणे चैतन्य शक्तीचा विलास पसरवीत असत, खोलीतील सारे वातावरण चैतन्याच्या चिन्मय धुंदीने भारावलेले असे.

आज सुट्टीचा दिवस होता. महाराज आणि नाना घरीच होते. दुपारी तासा अर्ध्या तासाची विश्रांति घेऊन स्वामी आसनावर उठून बसले. हात पाय तोंड धुतले. महाराष्ट्रीय संतांच्या पुस्तकांपैकी 'दासबोध' वाचीत बसले. त्यांनी सुंदर चष्मा घातला होता. त्याची सोनेरी फ्रेम प्रकाशात चमकत होती. स्वामी मान खाली करून ग्रंथ-पीठावर ठेवलेला दासबोध वाचीत होते. चष्मा थोडा खाली सरकल्यामुळे मान वर न करता ते चष्म्याच्या वरून, नजर चढवून, मधून मधून समोवार पहात होते. समोरच बसलेल्या महाराजांकडे स्वामींची विशेष नजर जात होती. महाराज आज निवांतपणे स्वामींच्या दर्शनाचा स्वानंद घेत त्यांच्या समोरच बसले होते. मधून मधून स्वामी एखादा शब्द अर्थासाठी विचारीत होते.

नाना भालेराव दारासमोर सतरंजीवर बसले होते. त्यांच्या हातात स्वच्छ पिंजलेल्या कापसाची लडी होती. डाव्या हातात सूत काढण्याची टकळी होती. ती टकळी पसरट, उथळ, अर्ध्या करवंटीत, टोकावर उभी होती. डाव्या हाताने टकळीला चुटकीने प्रचंड गती देऊन दिलेल्या त्या गतीला संभाळण्याचे काम तोच हात करीत होता. उजव्या हातातील कापसाला पीळ बसून हळूहळू त्याचे सूत्र बनत होते. जसजसे ते सूत्र वाढत जाई तसतसा उजवा हात वर जाई. वर गेलेला

हात, चकतीला सूत्र गुंडाळण्या साठी एकदम खाली येई – टकळीची गती थांबवून तयार झालेले सूत्र चकतीला गुंडाळले जाई व पुन्हा नव्या सूत्राचे सूत्र सुरू होई. या सर्व यंत्रवत हालचाली आपल्या साक्षीने पाहण्याचे काम नानांची एकाग्र दृष्टी करीत होती.

नानांचे हे सूत काढण्याचे काम सवड मिळेल तेव्हा तासन् तास चालत असे. अशा वेळी नाना बहुधा सिद्धासनामध्ये, पाठ ताठ ठेवून, अधोदृष्टी ठेवून बसत असत. खांदे ताणलेले व हात ढिले सोडलेले असत. जणू साधनेला बसावे तसे नाना बसत. बसल्या बसल्या सत्संग साधे. सच्छात्र श्रवण होई आणि काम निघालेच तर सेवेला तत्पर ! एकाच दगडात दोनच नव्हे अनेक पक्षी !

वरवर पाहणाऱ्याला वाटे कोणी खादीग्रामोद्योगाचा सेवक बसला आहे. नानांचे काम वर्षभर चालत असे. त्यांचे हे काम पाहून त्यांना अनेकजण गांधीवादी समजत होते. खादीभक्त समजत होते. देशभक्तही समजत होते. परंतु खरी स्थिति ही होती की शास्त्रशुद्ध यज्ञोपवित तयार करण्यासाठी मिळणाऱ्या वेळेचा हा सदुपयोग ते करीत होते. आपल्या परिवारातील सर्वांसाठी व महाराजांसाठी वर्षभर पुरणारी यज्ञोपवितें यातून तयार होत असत.

नाना आज हाच सूत काढण्याचा उद्योग घेऊन बसले होते. वातावरण नित्याचेच शांत असे. सत्संगतीच्या सुखद संवेदनांची अनुभूती नाना नित्य घेत होते. खरी शांतता चित्ताला प्रसन्नता देते तर चित्ताची खरी प्रसन्नता मनाला शांतता देते. येथे मात्र दोन्हींचा अनुभव एकाच वेळी येत असे. देवासमोर उदबत्ती जळत होती. सुगंधाने धुंदीत आणि प्रसन्नतेत भर पडत होती. त्या टकळीच्या गिरकीची मधुर स्वरधारा क्षीण असली तरी स्पष्ट ऐकू येत होती इतकी प्रगाढ शांतता तेथे होती.

नानांनी तिरक्या नजरेने महाराजांना पाहिले. हळूहळू त्यांची अंतर्मुखता वाढत जात होती. डोळ्यांचे आकर्षण वाढत जाऊन ते मिटले जात होते. या तिघांखेरीज तेथे आणखी कोणीही नव्हते.

इतक्यात महाराजांची 'ॐ' काराची प्रचंड मेघ गर्जना विद्युल्लतेच्या वेगाने आकाश विद्रावी झाली. नानांच्या शरीरावर रोमांच उभे राहिले. मान वर करून

पाहण्याची हिंमत झाली नाही. शक्य तेवढ्या सावधानपणे, खाली वाकविलेली मान न हालवता, नानांनी डोळ्यांच्या कोपऱ्यातून ॐ कार पाहण्याचा प्रयत्न केला. तशीच आपली नजर स्वामींकडे नेली आणि खालच्या नजरेने एकूण अंदाज घेतला.

महाराजांचे सिद्धासन पक्के झाले होते. डोळे मिटले होते. सारे शरीर लाकडा-प्रमाणे स्थिर झाले होते. चेहरा लालबुंद व तेजस्वी झाला होता. कानांची पाळी लाल झाली होती. साधनेचा जोर एकाएकी एवढा वाढला होता की ते स्वतःचे भान पार विसरून गेले. आपल्या भोवती कोणी आहे किंवा आपण शहरातल्या, भरल्या वस्तीच्या वाड्यात आहोत याचे भानही त्यांना राहिले नाही. महाराजांचा 'ॐ' काराचा स्वर, प्रखर, तीव्रतेने, एकदमच वाढलेला होता. त्याच तीव्रतेने 'ॐ' काराच्या स्वराची आवृत्ती होऊ लागली.

आजपर्यंत अनेक वेळा महाराजांची साधना नानांनी पाहिली होती. त्यांच्या साधनेतील प्रणवोच्चार ऐकला होता. परंतु आजचा आवाज अभूतपूर्व होता. असा ॐ कार नानांनी पूर्वी कधीच ऐकला नव्हता. नानांच्या हातांचे काम थांबले. टकळीची गती थांबली. स्वतःला सावरून ते तेथेच बसले. स्वामी सुद्धा ताठ पाठ व सिद्धासन घालून बसलेले होते. पुस्तक वाचण्यासाठी मान किंचित् वाकविलेली होती आणि चष्म्याच्या कोपऱ्यातून मधून मधून समोर पहात होते. यापेक्षा जणू त्यांचा काहीच संबंध, या चाललेल्या ॐ काराशी नाही, इतक्या त्रयस्थाच्या भूमिकेतून ते पहात होते. त्यांची गंभीरता व शांतता विलक्षण दिसत होती. जे चालले आहे ते जणू ठीकच आहे, योग्य आहे, उत्तम आहे अशा भावनेने स्वामी निःशंकपणे पहात होते.

ती वेळ संध्याकाळची होती. दिवस सुट्टीचा होता. वाडा मोठा होता. बिऱ्हाडे भरपूर होती. हे काय चालले आहे हे कळत नसले तरी जोरदार आवाजाने, वाड्या-तले लोक खोलीच्या दाराजवळ गोळा झाले. कुणी खिडकीतून डोकावतो तर कुणी दरवाजातून पहातो अशी स्थिती झाली. आत जाण्याची इच्छामात्र कोणालाच झाली नाही. आत काय चालले आहे कुणास ठाऊक, या शंकित मुद्रेने लोक बाहेरच उभे होते. बाहेर उभे राहून त्यांची कुजबूज सुरू झाली. अशा वेळी नाना तरी काय करणार? कोणाला समजावून सांगण्याचा तो विषय थोडाच होता? ते तसेच तेथे गप्प बसून सगळेच दृश्य पहात होते.

बाहेरची वाढत चाललेली गर्दी पाहून स्वामी आसनावरून उठले. महाराजांकडे गेले. त्यांचा खांदा जोरात हालवून म्हणाले " वामन ! आखें खोलो ! " तेव्हा महाराजांनी डोळे उघडले. सर्व वातावरण पूर्ववत् झाले. जमलेले लोक निघून गेले. थोड्या वेळाने सायंकाळी ६ वाजता तिघेजण फिरावयास निघून गेले. स्वामींच्या सान्निध्याने, सवड सापडली की, साधनेला तीव्रता येत असे. हा अनुभव अनेकांना अनेकदा आलेला आहे.

## दीक्षा मुख्य, मंत्र सहाय्यक

पुण्यातला छोटा मुक्काम आटोपून स्वामीजी परत अहमदाबादेस आले. पूर्वीच्या ठिकाणी मुक्काम केला. तेवढ्यात सतन्याहून हरस्वरुपचे पत्र आले. त्याचे पत्र स्वामींना तितकेसे पसंत पडले नाही की ती नापसंती ते महाराजांच्या पत्रात व्यक्त करीत आणि सोनाराकडून कान टोचले म्हणजे बरे, असे करीत. त्यांच्या एका पत्रात पुढील मजकूर आढळतो —

" मनस्यान्यत् वचस्यान्यत् ।<br>
कर्मण्यान्यत् दुरात्मनाम् ॥ "

"हे लक्षण हरस्वरुप सोडीत नाही. मोठ्या फळाची इच्छा मात्र करतो. अशा प्रकारे इच्छा कशी पूर्ण होणार ? कदाचित् हा कलीचा खेळ असू शकेल."

स्वामींचा मुक्काम अहमदाबादेस एप्रिल महिन्यापर्यंत होता. पुढे ते अनेक ठिकाणी जात जात काशीला आले. या वेळी ते राणामहल घाटामध्ये उतरले, घर नंबर २१/१८ मध्ये एक खोली नाइलाजाने भाड्याने घेतली. महिन्यातून ४/२ दिवस कोणाचे तरी भिक्षेचे निमंत्रण येई. बाकी दिवसांची भोजन व्यवस्था एक ब्राह्मण ठेवून त्याचेकडून कुकरमध्ये अन्न शिजवून घेऊन केली होती. जवळ द्रव्यसंग्रह बिलकूल नव्हता. इ. स. १९३१ मध्ये स्वामी काशीमध्ये असताना महाराजांनी त्यांना कबूल केले होते की, घरभाड्याची रक्कम मी आपणांस नियमित पाठवीन. या गोष्टीची आठवण स्वामींनी पत्रातून महाराजांना दिली. स्वामी आपली अडचण महाराजांना मुलासारखे समजून वडिलांच्या नात्याने कळवीत असत. त्या शब्दाप्रमाणे महाराजही घर भाड्यासाठी रु. ७/– दरमहा पाठवीत असत. पुढेपुढे ही रक्कम वाढतच गेली. याप्रमाणे १९५५ पर्यंत महाराजांनी आपला शब्द पाळला.

इ. स. १९३८ च्या एप्रिल पासून ऑगस्ट पर्यंत स्वामी काशीमध्ये राहिले. या काळात स्वामींचे आलेले एक पत्र पुढीलप्रमाणे आहे.

नारायण काशी

नारायण स्मरण, विशेष समाचार। १९।५।३८

....तुम्हारा पत्र तथा पाँच रुपायाका म. ऑर्डर मुझे मिला। नानास्थान भ्रमण करता हुआ मैं यहाँपर आया हूँ। यहाँपर वास करनेके निमित्त नारायणका प्रेरणा हुआ है। उस प्रेरणाके अनुसार एक खुली भाडा लेकर वास कर रहा हूँ। मेरे शरीर बहुत टूट गिया है। मेरे प्रति कोई तांत्रिक प्रयोग कर रहा है। उसी कारण मेरे शरीर दिन प्रतिदिन नष्ट हो रहा है। असह्य यातना भी अनुभव कर रहा हूँ। इस अवसरमें स्तंभन प्रयोग भी किया था। एक संन्यासी महात्माका उपदिष्ट मंत्रजप मैं किया। उस जपका प्रभावसे वह स्तंभन प्रयोग नष्ट हो गिया है। मारण तथा उच्चाटण प्रयोग किया है। यह मैं अनुभव कर रहा हूँ। दूसरा महात्मा लोग भी ऐसा अनुभव किया है। अनुमान करता हूँ कि यह गुरुस्वामीकी कृपा है।

काशीमें (बहुतमें ही) भिक्षा मिलना असंभव हो रहा है। कूकार मे अन्न तयार कर (प्रस्तुत) अन्न ग्रहण कर रहा हूँ। ........ साधक मण्डलीको मेरा नारायण स्मरण कहना। मैं यहांपर किसी प्रकार दिन व्यतीत कर रहा हूँ। ........ इति शिवम्.

शुभेच्छु
स्वामी लोकनाथतीर्थ

स्वामींची प्रकृती ठीक नसल्याचे वृत्त बार्शीकरांच्या कानावर गेले. त्यांनी रुपये वीसची म. ऑ. केली. त्याला उत्तर देतांना स्वामींनी काढलेले विशेष उद्‌गार पुढीलप्रमाणे आहेत :–

बनारस सिटी
३१।५।३८

नारायण स्मरण, विशेष समाचार।

२०, विश रुपायाका म. ऑ. मिला। कोई वर्ष हुआ मैं बार्शी गया नहीं तो

भी ये सब लोग हमको भूले नहीं और इस प्रकार मेरे प्रति श्रद्धा रखते हैं। इन लोगोंको धन्यवाद हैं।

शुभेच्छु
स्वामी लोकनाथतीर्थ

स्वामींचे बनारसहून आणखी एक सविस्तर पत्र पुण्याला महाराजांचेकडे आले. त्यातून खूप गोष्टी लक्षात येतात. त्या त्यांच्याच शब्दात पाहू :–

बनारस सिटी
२२।६।३८

नारायण स्मरण, विशेष समाचार।

....दुसरा मुकामपर जानेका विचार है। इसीलिए इतना दिन पत्र नहीं लिखा। इच्छा थी की दूसरा मुकामपर जाकर पत्र लिखुंगा।

आज हम दो संन्यासी मिलकर एक मकान भाडा लिया। ५।७ दिनमें वहाँ जाऊंगा। अब मुझे नीचे लिखे हुवे ठिकानापर पत्र लिखना। मेरे उपर दो अभिचार प्रयोग किया ऐसा समझनेमें आता है। उसमें एक स्तंभन प्रयोग है और दूसरा मारण प्रयोग है। स्तंभन प्रयोग तो मंत्रका जप करनेसे नष्ट हो गया है। परंतु दूसरा जो मारण प्रयोग है उसका प्रतिकार अबतक मुझे नहीं मिला। केवल नारायण की कृपासे ही मैं उसकी तितिक्षा कर रहा हूँ। प्रभास क्षेत्रमें रहते समय भी मेरे पर यह प्रयोग ही चलाया था लेकिन उस समय मैं समझ नहीं सका था। नारायण की कृपासे सबकुछ अच्छा होगा।

**अभ्यास का साथ अपना इष्टमंत्र का ही जप करना चाहिये। इस दीक्षाके साथ मंत्रदीक्षाका कोई प्रयोजन नहीं है। किसीको इच्छा हो तो इस दीक्षा का साथ मंत्रदीक्षा ग्रहण कर सकते हैं। पूर्वमें मंत्रदीक्षा लिया हो तो उसी मंत्रका ही जप करना चाहिए।**

जो लोग संन्यासी होकर अन्यथा आचरण करता है फिर कोई उस विषयमें कुछ विरुद्ध बोले तो रूष्ट होकर विरुद्ध बोलनेवालेके उपर अभिचार प्रयोग करते हैं।

मेरी शरीरप्रकृती अब भी दुर्बल है। औषधीप्रयोग मेरे शरीरपर चलता नहीं। औषधीप्रयोग करनेसे और भी अधिक से अधिक त्रास होता है। सिर्फ पथ्यका उपर निर्भर करके रहता हूँ। यह योगप्रतिबंध है।

अब काशी ले आया हैं। बोलते हैं यहाँपर बंगाली टोलेपर वास करो। अन्यत्र जानेको देता नहीं। महिनेको सात रुपये भेजनेका विचार है, सो भेजना। अधिक जरुरत हो तो लिखुंगा।

... सबमण्डलीको मेरा नारायण स्मरण कहना। नारायण तुम्हारा कुशल विधान करै। इतिशिवम्।

शुभेच्छु,
—स्वामी लोकनाथतीर्थ

राणामहल घाट
महावीर मंदिर,
बनारस.

वरील पत्रात शक्तिपात दीक्षा घेणाऱ्यांना मंत्रदीक्षेची गरज नसते हे स्पष्ट सांगितले आहे. तसेच अभिचार प्रयोग करणारे कोणत्या वृत्तीचे असतात तेही सांगितले आहे. ज्या प्रेरणेने आजपर्यंत ठिकठिकाणी हिंडविले आहे ती शक्तिप्रेरणा मला 'बंगाली टोल्यामध्ये रहा' असे बजावीत आहे. असे विषय आले आहेत.

पुढील एका पत्रातही काही विचार चिंतनीय आहेत तेवढे पाहू—

**"... जिज्ञासू जो कुछ पूजा आदि करता है वह सब जिज्ञासू के हितके लिये स्वीकार करना पडता है। हरिशंकर शास्त्रीको अभिमत दीक्षा प्राप्त हुआ है यह बहुत ही आनंदका समाचार है। जिज्ञासूके हित के लिये ही उपदेश (दीक्षा) किया जाता है। दृष्टि मात्रसे तुमको शक्ति संचार का अनुभव मिलेगा।**

.... अब मैं "राणी भवानी का काटूा में रहता हूँ।...."

या नवीन आलेल्या जागेतही स्वामी फार काळ राहिले नाहीत. ही जागा गैरसोयीची वाटली म्हणून ते "B $\frac{13}{15}$ सोनारपुरा" या जागेत आले.

स्वामीजी सोनारपुऱ्यातून अवघ्या पंधरा दिवसात दशाश्वमेध घाटावरील D ३०/४९ देवनाथपुरा या जागी राहण्यास आले. यासंबंधी त्यांच्या पत्रातील चार वाक्ये पुढीलप्रमाणे आहेत—

"ता. १२।८।३८ को यहाँ ३०/४९ नं. देवनाथ पुरा आया। आशा है इस स्थानपर दीर्घकाल वास कर सकेंगे। काशीमें रहनेको स्थान बहुतही कठीनतासे मिलता है। संपूर्ण मकान भाडा लेनेसे स्थान मिलता है। सो मैं मकान भाडा लेनेको असमर्थ हूँ। एक ब्राह्मण की सहाय्यतासे यहाँपर एक खुली भाडा मिला है। यहाँपर ही मैं रहूँगा। यह स्थान मुझे अनुकूल ही पडता है। दूसरा स्थानपर अब मैं जल्दि नहीं जाऊंगा। इस ठिकानापर ही मुझे पत्रादिक लिखना...."

स्वामी जागा वारंवार बदलत असत याला कारण असे. पण ते आंतरिक असे त्यामुळे इतरांना त्याचा खुलासा होत नसे. कोणत्याही क्षणी जागा सोडीत असत. कधी दुपारी १२ ला जागा सोडतील तर कधी मध्यरात्रीला जागा सोडतील त्यांची प्रेरणा हीच एकमेव कसोटी असे. कधी ते बाडबिस्तरा काखोटीत मारून निघून जात व मागून कोणाकडून तरी ते उरलेले सामान आणवून घेत. त्यांनी कधीही कोणाची पैही बुडविली नाही. पण अन्यायाचा बदला घेताना आकाशपाताळ एक करून टाकीत. अशा वेळी त्यांचा आवाज, त्यांची दृष्टीं, त्यांची ती उग्रमूर्ती पाहूनच जिकडे तिकडे शांतता निर्माण होत असे. त्यांची नीति ही कसोटी होती! अनीति हा अन्याय होता!

पुढे स्वामी सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात नागपूरला रावबहाद्दूर परांडे यांचेकेड त्यांच्या आग्रहावरून गेले.

## स्वामीजी आणि समर्थ

महाराष्ट्रीय संतांबद्दल स्वामींना नितांत आदर होता. महाराष्ट्रात स्वामी आल्यापासून त्यांच्या कानावर मधूनअधून संतवचने पडत होती. त्यामधून या संतांच्या वाङ्मयाचा अभ्यास करण्याची त्यांना इच्छा झाली. संतवाङ्मय वाचण्याचे आकर्षण वाढण्याचे कारण पंढरपूरला प्रत्यक्ष जाणे झाल्याने काही अनुभूती आलेली होती. भोवताली गोळा झालेले महाराष्ट्रीय साधक शिष्य या संतांच्या अनेक कथा-गोष्टी व वचने यांचे दृष्टांत देत असत. यामुळे स्वामींचा मराठी भाषेचा अभ्यास

नसतानाही त्यांनी प्रयत्नपूर्वक तुकारामांचा गाथा वाचला, समर्थांचा दासबोध वाचला, एकनाथाचे भागवत वाचले, ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी वाचली.

अशा प्रकारे संतवाङ्मयातून महाराष्ट्रीय संतांची संगत स्वामींना लाभली. या संतसंगतीमधून या संतांबद्दल नितांत आदर नि प्रेम निर्माण झाले. विशेषतः समर्थ रामदासांचेबद्दल तर त्यांना फारच आकर्षण वाटू लागले. रामदासांची कितीतरी वचने त्यांच्या पत्रामधून मूळ मराठी भाषेतून आलेली दिसतात हा या आकर्षणाचा भरभक्कम पुरावा आहे. तुकारामाचे अभंगही ते पाठ म्हणून दाखवीत. यामधून स्वामींच्या बुद्धिमत्तेचा येणारा प्रत्यय पहाण्यापेक्षा, संतांबद्दलचे सौहार्दच अधिक विलोभनीय आहे. ‘ साधूच साधूला ओळखू शकतो ’ याचे हे प्रत्यंतर आहे.

जेव्हा केव्हा, कोणी महाराष्ट्रीय, स्वामींच्याकडे मार्गदर्शन मागण्यास येत असे तेव्हा तेव्हा स्वामी म्हणत असत. “ **आपल्या महाराष्ट्रात किती तरी मोठमोठे संत होऊन गेले आहेत. त्या सर्व संतांनी सर्व रहस्ये अत्यंत सरळ, सोप्या शब्दात स्पष्ट करून सांगितली आहेत. त्यासाठी त्यांनी दिलेले दृष्टांत-दाखले सुद्धा समर्पक आणि पटण्यासारखे आहेत. यांचे ग्रंथ वाचले म्हणजे असे दिसते की, या संतांनी ‘ब्रह्मज्ञान’ लोण्याच्या गोळ्याप्रमाणे वेगळे काढून दिले आहे. या संतांचे ग्रंथ वाचा म्हणजे काय करावयाचे ते सर्व काही समजेल. त्यापेक्षा मी अधिक काय सांगणार? परंतु मनुष्याचा स्वभावच असा आहे की त्याला जवळच्या वस्तूची किंमत नसते. अतिपरिचयामुळे त्याला त्यांचे महत्त्वही समजत नाही. तसे तुम्हा महाराष्ट्रीयांचे झाले आहे.**”
“ दूरके ढोल सुहावने ! पास की शहनाई नहीं ! ”

सध्या स्वामी नागपूरला रावबहाद्दूर परांडे यांचेकडे आले होते. रावबहाद्दुरांनी स्वामींचे जीवन इ. स. १९२२ पासून जवळून पाहिलेले असल्यामुळे त्यांच्या चित्तावर स्वामींच्या प्रभावाचे अनेक ठसे उमटलेले होते. १६ वर्षांच्या या कालावधीत स्वामींचे अनेक गुण प्रसंगाप्रसंगातून रावबहाद्दुरांनी पाहिले असल्याने त्यांच्या मनात स्वामींच्या ठिकाणी नितांत आदर होता. तसा कुठे आढळला नाही असे महाराजांनीसुद्धा अनेकवेळा बोलून दाखविले आहे. या काळात रावबहाद्दुरांनी महाराजांना पाठविलेले एक पत्र या दृष्टीने मोठे बोलके आहे.

नागपूर
२७-९-३८

श्रीवामनरावजी गुळवणी यांसी,

साष्टांग नमस्कार, वि. वि.

....सध्या श्रीस्वामीमहाराज येथे आहेत. अहमदाबादेस जाण्यासाठी येथे आलेले आहेत. शक्य झाले तर मुंबईहून जाताना ते पुण्यास येतील.

**...श्रीस्वामीमहाराज श्रीसमर्थ रामदासस्वामींच्याप्रमाणे धर्मसंस्थापनेचे कार्य मोठ्या प्रमाणावर करू शकतील. वर्तमानकाळही त्याच प्राचीन काळाप्रमाणे धार्मिक अवनतीचा काळ आहे.**

**...श्रीस्वामी महाराज सदाचारसंपन्न, निस्पृह, निरलस आहेत. त्यांचे जवळ एक असामान्य, अतुलनीय, विद्याही आहे की जिच्या जोरावर ते सर्वत्र प्रभावी होऊन राहिले आहेत. ते जेथे जेथे जातात तेथे तेथे शक्यतो या असाधारण विद्येचा प्रसार ते करीत असतात.** परंतु मला असे वाटते की त्यांचेकडून धर्मजागृतीचे कार्य योजनाबद्ध झाले तर कार्याचे स्वरूप व्यापक होऊ शकेल.

....स्वामी पुण्यास आल्यावर आपण त्यांचेशी या विषयावर बोलावे. या कार्याचा प्रारंभ अहमदाबादेपासून झाला तर चांगले होईल.....

एकूण पत्राचा आशय पाहिला तर ही गोष्ट स्पष्ट होते की रावब्रहाद्दूर पराण्डे यांचेसारखे बुद्धिमान, जिल्हा न्यायाधीश, स्वामींच्या सहवासात १९२२ पासून राहिल्यानंतर निःसंकोचपणे आपले मत व्यक्त करतात की स्वामी समर्थ रामदासांच्या कर्तृत्वाचे आणि योग्यतेचे आहेत. रावबहाद्दूर वकीली, चिकित्सक, प्रवृत्तीचे न्यायाधीश होते यामध्येच माणसांची पारख अत्यंत अचूक करण्याची त्यांची कुवत स्पष्ट आहे.

रावब्रहाद्दूर पराण्डे यांचे हे विचार अंधश्रद्धेचे नव्हते. कारण त्यांची अत्यंतिक चिकित्सक प्रवृत्ती होती. त्यांना असे वाटत होते की स्वामींच्या कर्तृत्वाला आणि योग्यतेला योजनाबद्ध व सुसूत्र कार्याची आखणी करून दिली तर फार मोठे धर्मजागृतीचे कार्य होईल, त्यासाठी त्यांनी "अखिल भारतवर्षीय वर्णाश्रम स्वराज्य संघ,

नागपूर," अशी एक संस्था काढून तिच्या प्रचारार्थ स्वामींनी हिंडावे म्हणून अनेक वेळा सुचवून पाहिले.

परंतु स्वामी अशा प्रकारे स्वतःला कुठेच बांधून घेत नसत. त्यांना मर्यादांनी मर्यादित केलेले पसंत नसे. धर्मकार्य ईश्वरी योजनेने होते हा त्यांचा दृढ विश्वास नित्याच्या अनुभवातून निर्माण झाला होता. आजपर्यंतचा जगाचा अनुभवही हाच आहे की " धर्मसंस्थापनेचे नर ते ईश्वराचे अवतार " संस्था किंवा पंथ नव्हे, या आशयाचे स्वामींचे वाक्य प्रसिद्ध आहे. ते वारंवार म्हणत असत की **" मुझे दल बढाना नहीं है "** तेव्हा स्वामींचे संबंधी लिहिलेल्या चार वाक्यातून स्पष्ट होते ती स्वामींची तुलना समर्थांशी केली हेच चिंतनीय आहे. समर्थांचा जीवनक्रम आणि स्वामींचा जीवनक्रम कसा एकसारखा होता हे पहाण्यासारखे आहे.

१) समर्थ कसे चालत? "भराभर"

स्वामी सुद्धा अतिशय भराभर चालत असत. पुष्कळ वेळा बरोबरच्या लोकांना पळावे लागे.

२) समर्थ कसे बोलत? अतिथोडे "अनिर्वचनी"

स्वामी सुद्धा फार थोडे बोलत असत.

३) समर्थ कसे पहात–खाली पहात "स्वामी अखंड अधोदृष्टी अंतर्दृष्टी का असती । अरे अंतरी पहातसो श्रीराममूर्ती ।"

स्वामींची दृष्टी अशीच होती. ते नेहमी नासिकाग्र दृष्टी ठेवून असत. ध्यान-मग्न राहून अंतर्दृष्टी ठेवीत असत.

४) समर्थ कसे दिसत? ध्यानस्थ दिसत. "समर्थ दिसती बहुधा ध्यानस्थ मने"

स्वामी सतत ध्यानस्थ असत. नेहमीचा हा अनुभव की स्वामी आपल्या आसनावर ताठ बसून ध्यानमग्न असलेले दिसत.

५) समर्थ काय खात? "समर्थांसी अन्नभोजनी इच्छा नाही। वनफळ भोजनी इच्छा काही"

स्वामींचे "अन्नपथ्य" उपोषण प्रसिद्ध आहे. रात्रीचा फलाहारही प्रसिद्ध आहे. याव्यतिरिक्त खाणे नाही. निसर्ग सृष्टीत तर फलाहार आणि दूध एवढेच काय ते खाणे असे.

६) समर्थ केव्हा आणि कशावर निजत ?

"समर्थासी माध्यान्ही निद्रा काही। रात्री निद्रा क्वचित नाही। आम्ही निद्रेसी जातो म्हणोनी पाही। लोकांसी आज्ञापिती जावया॥ स्वामींना झोप अति कमी असे. रात्री सर्व झोपले म्हणजे आसनावर ध्यान लावून बसत रात्री दिवसा डोंगर दऱ्यातून हिंडण्याची हौस असे. घोंगडीचे व छाटीचे आसन आणि अंथरूण असे. अत्यंत अपरिग्रही वृत्तीचे असल्याने सामान आणि वळकटी अगदी आटोपशीर असे.

७) समर्थ कोठे रहात ? "समर्थासी गिरीकंधरी गुप्त राहाणे। लोकानुग्रहे प्रकट होणे। प्रकट होता जनी जनार्दने। वरुषाव करी पूजेचा॥ समर्थ एके ठिकाणी फार रहात नसत. स्वामींचे सतत फिरणे, काशीतही अनेक जागा बदलणे, पुन्हा पुन्हा हिमालयात जाणे, अनुग्रहाचे वेळी हिमालयातून निघून हुशंगाबादेपर्यंत येणे अशासारख्या सर्व घटना समर्थांशी साम्य करतात.

८) समर्थ आसन कोणते घालीत ? "महापुरुषाचे आसन सिद्धासन" याच शब्दांत समर्थांचे आणि स्वामींचे आसन सांगता येते.

९) समर्थ कसे वागत ? "उदास व निस्पृह" वृत्तीने वागत असत. स्वामी याच वृत्तीने वागत असत.

१०) भवसागरातून तरावे कसे ?

"मुख्य गुरु आज्ञे। गुरु कृपे तरावे। प्रपंची अथवा परमार्थी" समर्थांची ही दृष्टी स्वामींनी प्रत्यक्ष आचरून दाखविलेली आहे. "गुरु कृपे" ने तरणे होते हे तर स्वामींचे जीवन विशेष आपणास लाभले आहे. गुरुकृपा म्हणजे अनुग्रह, त्या आधाराव पार जाता येते.

११) समर्थांची स्थिती कोणती ? "आत्मस्थिती" आत्मस्वरूपाच्या ठिकाणी अखंड वस्ती समर्थांप्रमाणे स्वामींची होती. "सकळ धर्मामध्ये धर्म। **स्वरूपी** राहणे हा स्वधर्म".

१२) समर्थांची देह अवस्था कोणती होती ?

"कैवल्यदा उन्मनी अवस्था" होती असे हे वर्णन समर्थ आणि स्वामीजी सदैव मुक्त उन्मनी अवस्थेत असल्याने सारखेच लागू पडते.

समर्थांच्याबद्दल काही ओव्या पाहू :—

**समर्थांचे कोण हे ध्यान। यासी केवळ श्रीगुरुध्यान।**
**समर्थांचा कोण मंत्र कोण यंत्र।**
**तारक ब्रह्ममंत्र आत्मज्योति यंत्र॥**
**समर्थांचा कोण वो मठ।**
**अवघा ब्रह्माण्ड यांचा मठ॥**
**मूढजन म्हणती देहधारी।**
**सुबुद्धिमान म्हणती अवतारी॥**
**समर्थांची समर्थ जाणती थोरी॥**
**संतसज्जन यथार्थ॥**

स्वामींचे हे वर्णन समर्थांच्या शब्दातून स्पष्ट होते.

## स्वामींच्या जीवनगंगोत्रीचे प्रयागराज

स्वामी रावबहाद्दूर परांडे यांचेसह गुजराथेत जाण्यासाठी नागपूरहून निघाले. मुंबईस आल्यावर पुण्यास न जाता परस्पर गुजराथेत जाणे स्वामींच्या सरळ स्वभावाला परवडले नाही. तेवढ्यात थोडी सवड काढून आपल्या प्रियतम शिष्याकडे म्हणजे महाराजांच्याकडे स्वामी आले. वाकडी वाट करून स्वामी सरळ पुण्यास आले. स्वभावाचा सरळपणा व्यवहाराच्या वाकडेपणाला भीक घालत नसतो. स्वामी पुण्यात आल्यावर गुरुशिष्यांना जो परमानंद झाला त्याला शब्द अपुरे आहेत. या काळात स्वामींच्या दर्शनाला येणाऱ्यांची संख्या बरीच वाढली. ज्योतीने ज्योत लावावी व भरपूर प्रकाश पडत जावा त्याप्रमाणे व्यक्ती व्यक्तीच्या सहवासातून स्वामींच्या महासिद्धसाधनेचा प्रकाश अधिकाधिक फैलावत चालला.

स्वामींचा जनसंपर्क व्यापक होत चालला याला आणखी एक कारण आहे. स्वामींच्या शक्तिपात योगदीक्षा साधनाचे उत्तराधिकारी शिष्य स्वामींचा व्याप वाढविण्यास फार मोठे निमित्त कारण झाले आहेत. महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील लोकांशी संबंध महाराजांचा मोठ्या प्रमाणात आला. प्रत्येक व्यक्तीचा संबंध त्यांनी उत्तम रीतीने टिकविला. महाराजांच्या विनयशील, चारित्र्यसंपन्न, व्यवहारकुशल, लोकसंग्रहाच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाने हा संबंध टिकला! महाराजांचा लोकसंग्रह हा सामाजिक, राजकीय वा व्यावहारिक पातळीवरील नव्हता. तो अध्यात्माच्या

जिज्ञासूंचा लोकसंग्रह होता. स्वामी याच दृष्टीचे असल्यामुळे, त्यांनी आपल्या शिष्याची लोकसंग्रहाची ही लक्ष्मणरेषा, मौनाने मान्य केली होती.

खरे पाहिले तर स्वामीची जितके समाजापासून दूर दूर रहात त्यापेक्षा अधिक महाराज समाजात राहून, सामाजिक व्यवहार करून, समाजापासून अलिप्त रहात असत. पुण्यात राहून ते कधी कोणाच्याही पापपुण्याच्या वाटेलाही गेले नाहीत. अगदी पाण्यातील कमळाप्रमाणे ते अलिप्त रहात असत. दोघानांही प्रसिद्धी नको होती. लोकसंग्रह नको होता. कारण मुळातच लोकेषणा नव्हती! पण ईशेच्छा बलवत्तर होती म्हणून यांच्या अलिप्तपणाला विशेष संधी मिळू शकत नव्हती. नवनवीन व्यक्ति सहवासात येत होत्या. येथे आल्यावर रमत होत्या.

आता महाराजांकडे स्वामी आल्याचे परस्परांना कळू लागले. दर्शनाच्या निमित्ताने नवी मंडळी कोणातरी पूर्वपरिचिताचा हात धरून येऊ लागली. नमस्कार करून जवळपास, समोर, कोपऱ्यात, जागा मिळेल तेथे बसू लागली. स्वामी तासन् तास ताठ बसलेले आहेत. भक्तमंडळी पुढे बसलेली आहेत कोणी प्रश्न करीत नाही. स्वामी काही विचारीत नाहीत. सारे वातावरण कसे शांत शांत आहे पण सगळे प्रफुल्लित, प्रसन्न आहेत. तेथून उठावेसे कोणालाही वाटत नाही. शेजारी कोण आहे? नवीन कोण आले? याची उठाठेव करण्याची कल्पनाही कोणाच्या डोक्यात डोकवत नव्हती. जो तो आपल्या स्वतःच्या मस्त प्रसन्न वृत्तीत गुंगून रंगून गेला आहे. ईश्वराची माया सुद्धा किती अजब आहे. ही माया, गुणांच्या भोवती घुटमळत रहाते. निर्गुणाच्या वाऱ्याला ती उभी रहात नाही. मग तो गुणी पुरुष जादुगार असो नाहीतर किमयागार असो, तो मायेच्या पसाऱ्यात सापडल्याशिवाय राहणार नाही. संत, साधु, सत्पुरुषांच्या मायेचा पसारा म्हणजे त्यांच्या भक्तांचा पसारा!

महाराजांचे अध्यात्मिक जीवन जेवढे संपन्न होते तितकेच त्यांचे सामाजिक जीवन सुद्धा समृद्ध होते. परंतु ही संपन्नता वा समृद्धता त्यांनी कधी प्रकट केली नाही. महाराजांच्या सहवासात कोणीही व्यक्ति क्षणभर जरी येऊन गेली तरी ती सदैव त्यांचीच होऊन जात असे. येणाऱ्या व्यक्तीला त्यांचेकडे पुनः पुनः यावेसे वाटे. आपल्याला त्यांचे मार्गदर्शन मिळावे, मानसिक आधार मिळावा असे वाटू लागे. त्यांच्या सान्निध्याने आपले जीवनात शांतता व प्रसन्नता येते असा अनुभव येऊ लागे. जसे, गंगेच्या सान्निध्याची परम श्रेष्ठता सांगणारे आस्तिक,

नास्तिक, तार्किक, श्रद्धाळू, भोळे हे सगळे एकमताने सांगत असतात. आणि.... ती गंगामातासुद्धा या सर्वांचे ऐहिक जीवन तर समृद्ध करतेच पण पारलौकिक जीवनही समृद्ध करीत असतेच. तसेच महाराजांचे परममंगल जीवन गंगेप्रमाणे समृद्धतेने वहात होते.

स्वामींना आपल्या या शिष्याचे हे समृद्ध वैभव पाहण्यास मिळाले ते पुण्यातील २० नारायणमधील त्या इवल्याशा दोन खोल्यात!! मोत्याच्या मोलाच्या व्यक्ति या ठिकाणी आल्या आणि 'श्री' चरणांवर लीन झाल्या. हे सर्व पाहून स्वामी संतोषाने धन्य होत असत. महाराजांची श्रीगुरुनिष्ठा, श्रद्धा, त्याग, सातत्य, शुद्धतम चारित्र्य, अनुष्ठानप्रियता, आत्मरतता, संतोष, मौनप्रियता, उद्योगप्रियता, लौकिक व्यवहारामध्ये जागृत आणि तत्पर, परोपकारी, साधनचतुष्ट्य संपन्नता, अनपेक्षादि गुणसंपन्नता इत्यादि सर्व महाराजांच्या ठिकाणची दैवीगुणसंपदा स्वामीमहाराज उत्तम प्रकारे जाणत होते. त्यामुळे स्वामी या विशेष शिष्याला विशेष मानीत होते. स्वामींनी आपल्या या शिष्याची इत्थंभूत माहिती त्यांचे श्रीगुरुदेव प. प. श्रीशंकर-पुरुषोत्तमतीर्थस्वामीमहाराजांना मोठ्या आत्मविश्वासाने आणि संतोषाने सांगितली होती.

स्वामींचा निवास महाराजांच्या घरी होता तर सारी व्यवस्था नाना भालेराव आपल्या 'सहकुटुंब सहपरिवार । दास आम्ही हे घरदार । या भूमिकेतून पहात होते. नानांचा थोरला मुलगा भालचंद्र स्वामींच्या सेवेत रमलेला होता. स्वामींचा बिछाना घालणे, आसन घालणे, पाणी वगैरे आणून देणे, हातपाय रगडणे, स्वामींनी हाक मारताच हवे ते काम करण्यास तयार रहाणे, इत्यादि कामे भालचंद्र करीत असे. यावेळी भालचंद्राचे वय १०/१२ होते. त्याचा धाकटा भाऊ नारायण हा ५|६ वयाचा होता. तो सुद्धा आपल्या थोरल्या भावाच्या मागे मागे राहून सेवाव्रत शिकत होता. जमेल ती सेवा करीत होता. स्वामी या मुलांशी मोकळ्या मनाने गप्पा गोष्टी करीत, गाणी, भजन म्हणत असत.

नानांच्या पत्नी सौ. गोदुताई स्वामींच्या भिक्षेची व्यवस्था ठेवीत. त्यांच्या व्यवस्थेत कुठेही काही कमी पडत नसे. स्वामींना इच्छाभोजन देणाऱ्या जणू त्या अन्नपूर्णाच होत्या. स्वैपाकाची चव, वाढण्याचा मोकळेपणा, धार्मिक बंधनांची काटेकोर जपणूक, आग्रहाचे अगत्य यामुळे स्वामी या घरात मिळून मिसळून गेले. आपली

अन्नाची आवड आणि प्रकृतीची गरज स्वामी स्वतःहून मोकळेपणाने सांगत. त्या सूचना ध्यानी घेऊन सौ. गोदावरीकाकू तसे पदार्थ स्वामींच्या पानात वाढीत असत. शेवग्याच्या शेंगा, पापड, पापड्या, कुरड्या, चमचमीत मसाल्याच्या भाज्या, कौतुकाने स्वामी खात असत. त्यांचा आहार अगदी बेताचा असे. जेवणात तूप भरपूर लागे. भातावर बंगाली भक्ति असल्याने ते भाताचा समाचार अगत्याने घेत असत. सौ. काकूंनी हे सर्व समजून घेऊन स्वामींच्या मर्जीप्रमाणे त्यांना हवे ते पदार्थ पानात वाढून त्यांच्या चित्ताला परम संतोष दिला आहे. सौ. काकूंची ही सेवा इतक्या परम भाग्याची घडली आहे की ती इतरांना दुर्लभच होती. पुण्यात असे प्रसंग अनेक वेळेस घडले आहेत की महाराज पुण्यात नसतांना चार, चार, सहा, सहा, महिने स्वामी नाना भालेरावांच्या भरोशावर राहिले आहेत. कधीही स्वामींना अप्रसन्न होण्याचा क्षण या मंडळींनी येऊ दिला नाही.

या काळात म्हणजे इ. स. १९४०–४१ मध्ये श्री. नारायणराव देशपांडे आणि श्री. भालचंद्रपंत किर्लोस्कर यांचा स्वामींशी संबंध आला. हे दोघे नाना भालेराव यांचेबरोबर कोर्टात नोकरी करीत होते. तसेच श्री. शंकरराव मार्कंड या सज्जन सद्गृहस्थांचा स्वामींशी संबंध आला. शंकरराव मार्कंड यांचे आणि स्वामींचे संबंध पुढे पुढे अत्यंत निकटचे आले. स्वामींच्या सहवासात अत्यंत निकटवर्ती व भरपूर काळ राहिलेल्या उल्लेखनीय व्यक्ति फक्त चारच आहेत. त्यामध्ये श्री. शंकरराव मार्कंड यांचा समावेश होतो. या चार व्यक्ती म्हणजे १) श्री. गुरुमहाराज २) श्री. नाना भालेराव ३) श्री. शंकरराव मार्कंड व ४) श्री. जाम्बवंतसिंहजी, बनारस. यापैकी दोघांचा परिचय संक्षेपाने येऊन गेला आहे व दोघांचा यापुढे येणार आहे.

डॉ. वि. म. बेन्द्रे हे निष्णात डॉक्टर जर्मनीमध्ये राहून उच्च पदवी घेऊन आलेले आहेत. अशा या विद्याविभूषित, अध्यात्मप्रेमी डॉक्टरांचा संबंध श्रीस्वामींशी याच कालावधीत आलेला आहे. त्याचप्रमाणे महाराजांचे अनेक निकटवर्ती सुहृद सज्जन, संतप्रेमी, धार्मिक वृत्तीचे, भावभक्तीचे, श्रद्धेचे लोक या काळांत स्वामींच्या सहवासात अधून मधून येऊ लागले. पंडित आत्मारामशास्त्री जेरे, पंडित दत्तात्रेय-शास्त्री कवीश्वर यांसारखे सरस्वतीपुत्र महाराजांच्याकडे स्वामींचे दर्शन घेऊ लागले. त्या काळात आपण स्वामी श्रीलोकनाथतीर्थांना महाराजांचेकडे पाहिले असून त्यांचे दर्शन अद्यापही आपणास नित्य चैतन्याचे आणि अखंड साधनेच्या तपाचे स्मरण देत असते असे मोठ्या अभिमानाने ही मंडळी सांगतात.

प्रकांडपंडित, वेदविद्यासंपन्न, शतायुषी, पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर यांचा आणि महाराजांचा संबंध फार जुना होता. त्याही पूर्वी इ. स. १९२२ साली स्वामींनी हुशंगाबादेस पूर्णानंद या आर्यसमाजी व्यक्तीला दीक्षा दिली होती. त्याला विशेष अनुभव आले होते. हे पूर्णानंदांनी पुढे पंडीतजी सातवळेकर यांचे कानावर घातले होते. त्यावेळेपासून पंडीतजी दुरून स्वामींना ओळखू लागले होते. या शक्तिपातयोग मार्गाचा त्यांचाही अभ्यास यानंतर शक्य तसा होऊ लागला. पुढे त्यांचा व महाराजांचा संबंध आला. महाराजांचेकडून पंडितजी श्रीपाद दामोदर सातवळेकर यांना शक्तिपात योग साधनेची दीक्षा झाली. त्यांचा नियमीत अभ्यास सुरू झाला. आयुष्यभर पहाटेचे तास दोन तासाचे हे साधन पंडितजींनी चालू ठेवले होते. स्वामींचा व पंडितजींचा संबंध येऊन गेला पण त्याची विशेष माहिती उपलब्ध नाही. पंडितजींना दीक्षा जरी महाराजांनी दिली असली तरी महाराजांनी स्वामींची आज्ञा घेऊन मग दीक्षा झालेली आहे.

याप्रमाणे स्वामींच्या जीवन गंगोत्रीने टेहरीमधून प्रवास करीत व्यापक जन-संपर्काचे केंद्र झालेल्या पुण्यनगरीच्या तीर्थराज प्रयाग राजापर्यंत मजल गाठली. यापुढे त्यांचे जीवनपात्र व्यापक मर्यादेने रुंदावले असल्याने आपल्याला मंदगतीने त्यातून जावे लागणार आहे. त्यामुळे स्वामींच्या जीवनातील त्रिविध पैलू आपल्या स्थूल दृष्टीला दिसू शकतील.

रावबहादूर परांडे यांच्या निमित्ताने स्वामींना मुंबई, अहमदाबाद, बडोदा येथे जावे लागले. तेथे काही सामाजिक कार्य धार्मिक आधारावर करावे अशी राव-बहादुरांची इच्छा होती. म्हणून ते स्वामींना मुद्दाम आपले बरोबर वारंवार नेत होते. स्वामींचा परिचय लोकांना करून देत असत. पण हे स्वामींना बिलकूल पसंत नव्हते. परांडे यांच्या या नवकल्पित कार्यातही स्वामींनी कधी रस घेतला नाही. केवळ प्रारब्धाची गंमत पहाण्यासाठी रावबहादूर यांचेबरोबर जात होते एवढेच! इ. स. १९३८ च्या आक्टो. व नोव्हेंबर मध्ये ते स्वामींना घेऊन हिंडत होते. त्यावेळी ते गुजराथ, महाराष्ट्र व मध्यप्रदेश या भागात खूप हिंडले. स्वामी मात्र त्या कार्यासंबंधी नेहमी उदास राहिले.

स्वामी मुंबईस असतांना त्यांचे सेवेसाठी यज्ञेश्वर नावांचा कोणी एक साधक गेला होता. परंतु त्या साधकाकडून शिष्यभावाचे उल्लंघन झाले व त्याने स्वामींशी

अयोग्य वर्तन केले. ते स्वामींना पसंत न पडल्याने त्यांनी त्याला ताबडतोब त्याच्या नागपूर गावी पाठवून दिले.

स्वामी पुण्याहून मुंबईस गेले. तेथून ते १० नोव्हें. ३८ ला रात्रीच्या १०। च्या गाडीने बडोद्याकडे निघाले. सकाळी सातला बडोद्यास पोहचले. बडोद्यास त्यांचा पत्ता द्वारा/नारायण बळवंत जोशी, जोशी यांचा वाडा, रावपुरा, बडोदा हा होता. बडोद्याहून ते अहमदाबादेस गेले पण तेथे मुक्काम केला नाही. ते बडोद्याहून १६ नोव्हें. ३८ ला बनारसला आले.

## काशी – कटनी – खांडवा – पुणे !

स्वामीजी दिनांक १६ नोव्हेंबर १९३८ ला काशीत आले. स्वामीजी काशीत आल्यावर जागेची शोधाशोध नेहमीप्रमाणे सुरू झाली. यावेळी नवी जागा "बी १४/८५ मानसरोवर, छातुबाबुका शिवालय, बनारस" या पत्त्याची मिळाली. स्वामींनी तूर्त पसंती दिली व तेथे ते राहू लागले. भाडे मासिक चार रुपये ठरले.

स्वामींची प्रकृती १५।२० दिवस उत्तम होती. पण पुढे ती बिघडू लागली. पुण्याला महाराजांना आपली माहिती लिहिताना स्वामी लिहितात :—

"मन्दाग्नि, बहुमूत्र, तथा काशश्लेष्मा रोगसे बहुतही दुःख भोग रहा हूँ। क्या करूं यह बलवत् प्रारब्ध है। भोगे शिवाय छुटकारा नहीं। संपूर्ण शीत ऋतु ऐसाही दुःख भोगना पडेगा। औषधी सेवनसे कुछ भी फलोदय होता नही। प्रकृति खाराब होनेके कारण लिखने पढनेमें भी त्रास होता है।

....तुम्हारी प्लीहा शिघ्र ही आराम हो जावेगी। प्लीहा के निमित्त और कभी कुछभी दुःख तुमको नहीं होगा।"

स्वतःच्या प्रकृतीचे दुःख कथन करून स्वामींनी महाराजांच्या "पान्थरी" रोगासंबंधी आपला आशीर्वादही या पत्रात दिला आहे. या आशीर्वादाप्रमाणे महाराजांचा हा आजार बरा झाल्यानंतर पुन्हा कधीही पान्थरीचा आजार झाला नाही. या काळात पान्थरीच्या असह्य वेदना महाराजांना सहन कराव्या लागत होत्या. तरी स्वामींच्या प्रकृतीचे पत्र वाचून स्वतःच्या प्रकृतीपेक्षा स्वामींच्या प्रकृतीची

काळजी त्यांना वाटत होती. ही काळजी स्वामींनी एका पत्रातून दूर करण्याचा प्रयत्न केला.

"मेरी प्रकृति ठीक नहीं है इस वास्ते चिंता नहीं करना। कुछ दिन बाद अवश्यही प्रकृति अच्छी होगी। मधुकरी भिक्षा मिलता नहीं। ब्राह्मणद्वारा अन्न तैयार करा कर ग्रहण करता हूँ। ब्राह्मण को मासिक वेतन ४, चार रुपिया देता हूँ। घरभाडा भी मासिक चार रुपिया देता हूँ।"

स्वामींची प्रकृती ठीक नसल्याचे वृत्त सोलापूरमधील वैद्यराज दत्तात्रेय सीताराम पराडकर यांना समजले. त्यांनी शक्य तेवढी चौकशी करून काही विशेष औषधयोजना मनाशी करून स्वामींना औषधे पार्सल करून पाठविली. सोबत पत्रही पाठविले. अनुपान–प्रमाणादिंचा सर्व खुलासा केला. श्री. पराडकर स्वामींचे शिष्य आहेत. त्यांची स्वामींच्यावर नितांत भक्ती आहे. सेवा म्हणून ते औषधे वगैरे पाठवीत असत. त्यामुळे स्वामींशी संबंध जवळून येऊ लागला. आपल्या साधनेबद्दल, मनःस्थितीबद्दल श्री. पराडकर चार दोन वाक्ये लिहीत. अशा एका पत्राला स्वामींनी पुढील उत्तर पाठविले.

बनारस
२४।१२।३८

कल्याणभाजन दत्तात्रेय सीताराम पराडकर यास नारायण स्मरणपूर्वक आशीर्वाद ।

....आपले पत्र पोहोचले. मजकूर समजला. तुमचा अभ्यास, दिनक्रम व स्वधर्मानुष्ठान ठीक चालले आहे. तुमचा अभ्यास, दिनक्रम व स्वधर्मानुष्ठानाचे वर्णन वाचून माझ्या मनाला फार आनंद झाला. अशा प्रकारे अभ्यास करीत करीत तुमचा अभ्यास टिकाऊ व स्थिर होईल. याबद्दल पातंजल योगसूत्र आहे—

**"सच नैरतंर्य्य दीर्घकाल सत्कार सेवित दृढ भूमिका"**

नारायण तुमची इच्छा पूर्ण करील, स्वतः नारायणाने सांगितले आहे की—

**"ददामि बुद्धियोगं तं येन मां उपयन्ति ते ।"**

यापेक्षा अधिक काय लिहू ? नारायण स्वतः उपदेश करताना अर्जुनास म्हणतात की—

**"न हि कल्याणकृत कश्चित दुर्गतिं तात गच्छति ।"**

भगवंताचे वाक्य कधीही असत्य होणार नाहीं, त्यांनी आणखीही म्हटले आहे की –

**"मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां तरन्ति ते ।"**

भगवतीचे स्मरण करीत कर्तव्यपालन करीत रहावे. तुम्हाला केंव्हांही कशाचेही भय वाटणार नाही.

आमच्या खर्चासाठी वामनराव दरमहा सात रुपये देत असतात आणखी एक बङ्गाली भक्तसुद्धा दरमहा पाच रुपये देत असतो. यामधून दरमहा घरभाडे चार रुपये आणि स्वैपाक करणाऱ्याला चार रुपये देत असतो. उरलेली रक्कम भिक्षेसाठी खर्च होते. पुणे आणि मुंबईमध्ये जी दक्षिणा मिळाली त्यामधून खर्च चालू आहे. **कारणच पडले तर मी तुम्हालाही खर्चासाठी लिहू शकेन. तुम्ही सर्वजण माझेच आहात. कारण पडल्यावर तुम्हाला लिहिण्यात आम्हाला कसलाही संकोच वाटण्याचे कारण नाही. तुमच्या इच्छेप्रमाणे तुम्ही काहीही सेवा करू शकता. मी येथे आनंदात आहे.** सर्वांना नारायण स्मरण सांगणे.

आशीर्वाद
स्वामी लोकनाथतीर्थ

जानेवारीमध्ये मानसरोवराची जागा सोडल्यावर स्वामींचे पत्र आले त्यातून पुढील माहिती मिळते.

"....शिवालयात प्रापंचिक मंडळी रहात असल्याने फार त्रास होत होता. म्हणून नारद घाटावर गंगा किनारी एक स्वतंत्र घर पाच रुपये भाडे देऊन घेतले. हे ठिकाण एकान्तात असून मी एकटा त्या घरात राहतो. हे नवे घर शिवालयाजवळ आहे. सदाशिव माधव पराण्डे सध्या येथे आहेत. त्यांना पहिली जागा पसंत नव्हती. आत्ताची नवी जागा त्यांनाही फार आवडली. तुकाराम महाराजांचे वंशज माझेकडे येऊ इच्छितात तर त्यांना शिवालयाच्या पत्त्यावर पाठवून देणे. शिवालयाचा वृद्ध ब्राह्मण माझा अनुगत असून तो त्यांना माझेकडे आणून सोडील. खालील पत्त्यावर म. ऑ. करावी. नारायण

शुभेच्छु
स्वामीलोकनाथतीर्थ

पत्ता :—
C/o पूर्णचंद्र गंगोपाध्याय,
आर्यविद्यालय, D २८/१८१, पाण्डे हौली, बनारस.



स्वामीं श्रीलोकनाथ तीर्थ । सार्थ जीवन होई कृतार्थ ।
शक्तिपातपथ करती समर्थ । देव करती पुष्पवृष्टी ।।



शंकरराव मार्कंडाचा, डे. जि. वरील 'गुरुकृपा' बंगला! येथे स्वामी अनेक दिवस राहिले.



पत्राप्रमाणे तुकाराममहाराजांचे वंशज 'ज्ञानेश्वर देहूकर' काशीला जाऊन स्वामींना भेटून आले.

मार्च १९३९ मध्ये काशीला हिंदुमुसलमानांचा मोठा दंगा झाला. त्यामध्ये तीनशे लोक मारले गेले. यामध्ये २५० हिंदू होते. 'मॉर्शल लॉ' लावला होता. हरताळ पडला होता. दुकाने-व्यवहार बंद पडला होता. अशी एकूण सामाजिक परिस्थिती कठीण झाली होती. हळू हळू वातावरण निवळत चालले. तरीसुद्धा या दोन जातीमध्यें राग धुमसतच होता. मधून अधून किरकोळ गडबड होई.

नाराद घाटावरील B/ १४।६३ ही नवी जागा सोडली आणि त्याच घाटावरील D/ २७।५ नाथुशाओ ब्रह्मपुरी या जागेत स्वामी आले. त्यांची प्रकृती बिघडली आणि त्यांनी जागा बदलली. मार्च ३१ ला काशी सोडून स्वामी कटनीला 'नृत्यगोपाल' या बंगाली शिष्याकडे आले. तेथून पुण्याकडे येणार म्हणून पत्र होते पण दिवस नक्की नव्हता. दिवस ठरल्यावर स्वामींनी पुण्याला महाराजांना तार केली.

From :- Swami Loknathtirth
Katni, G. I. P.
Date :- 5-4-39
To :- Shri V. D. Gulvani, Poona
"Comming Poona Express To-morrow"

Loknath Tirth.

14/15 hrs. 15/35 hrs.

येताना स्वामी खांडव्यास उतरले. हरस्वरूपच्या आग्रहामुळे त्यांना त्याचेकडे थांबणे भाग पडले. तसे स्वामींनी पुण्यास पत्र पाठविले. खांडव्याहून हरस्वरूपचेही पत्र पुण्यास महाराजांना आले.

हरस्वरूपचे पत्र पुढीलप्रमाणे—

खांडवा
ॐ परमात्मने नमः । ७।४।३९

.... काल सहा तारखेस स्वामी येथे आले. त्यांचे दर्शनाने मी कृतार्थ झालो आहे. आपण जसे सांगितले निःसंशय स्वामीजी तसेच आहेत.

त्यांनी मला सांगितले की तुम्ही योगाभ्यास करता. **डोक्यावर हात ठेवला व म्हणाले तुमची कुंडलिनी जागृत आहे. परंतु आज आम्ही तुम्हाला 'और फोर्स' देत आहोत. त्यामुळे कुंडलिनी एकदम चांगल्या प्रकारे जागृत होईल. ते तुम्हाला समजेल व जाणवेल.**

असे म्हणून त्यांनी काल सायंकाळी व आज प्रातःकाळी असे दोन वेळा "फोर्स" दिला. आता मला चांगले समजते की शक्ति जागृत आहे. स्वामीजी आज रात्री मुंबईस येत आहेत.

आपला
हरस्वरूप

स्वामीजी मुंबईस न थांबता लगेच पुण्यास आले. स्वामी पुण्यास येताच ठिकठिकाणचे लोक स्वामींच्या दर्शनास येऊ लागले. अनेकांची पत्रे आली. सारे वातावरण चैतन्याच्या साम्राज्याने भारावले गेले. हैद्राबाद (दक्षिण) हून श्री. नाना भालेराव यांचे बंधू श्री. वासुदेवराव भालेराव केवळ स्वामींची सेवा करण्यासाठी ताबडतोब पुण्यास निघून आले. सोलापूरहून बापूसाहेब कुबडे, पराडकर वैद्य आदि मंडळी आली. नागपूरहून प्रकाण्डपण्डित श्री. अप्रबुद्ध हे स्वामींना भेटण्यासाठी मुद्दाम इतक्या लांब आले.

हैद्राबाद (दक्षिण) हून श्री. राधिका प्रसाद, बाबू शिवराजा, रामराय इत्यादि मंडळींची दीक्षेसाठी प्रार्थनापत्रे आली. मुंबईहून श्री. भगवंतराव उपाध्ये, अंबालाल शेठजी इत्यादी शिष्यमंडळी येऊन काही दिवस राहून गेली.

पुण्यातील भक्त, साधक शिष्यांच्या भाग्याला तर सीमा उरली नाही. स्वामींच्या दर्शनाचा लाभ काहीजण दररोज एकवेळ का होईना पण येऊन घेऊ लागले. कांहींनी सकाळ संध्याकाळ दोन वेळेस येऊन स्वामींच्या दर्शन लाभाचा नेम ठरवून टाकला. पण काही शिष्यांनी या संधीचा लाभ त्रिकाळ घेण्याचा सपाटा चालविला. सर्वांनी आपल्या सोयीने यावे. स्वामींचे दर्शन घ्यावे. सवड असेल तितका वेळ थांबावे. स्वामींचे चार शब्द कानावर पडतील तेवढे हृदयसंपुटात साठवावेत आणि वेळ झाल्यावर निघून जावे. ज्यांना जमेल, सुचेल व मान्य होईल त्यांनी स्वामींची सेवा करण्याचा प्रयत्न करावा असे चालले होते.

सोलापूरहून, बार्शीहूनसुद्धा अनेक मंडळी येऊन गेली. पुण्याचे अग्निहोत्री ब्राह्मण श्री. गोरेशास्त्रीजी, प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराजांचे सत्‌शिष्य व दत्तभक्त श्री. काका दामले ( प्रो. दामले व सराफ दामले यांचे वडील ) ही सात्त्विक सज्जन भक्तमंडळी स्वामींच्या सहवासात येऊ लागली. नागपूर, मुंबई, गुजराथमधील अनेक कुटुंबांत स्वामींचा निवास झाला, परिचय झाला, गुरुशिष्याचे नातेही निर्माण झाले.

इतके असले तरी स्वामींचा जीवनप्रवाह शांत जलाशयातील कमळाप्रमाणे जलापासून अलिप्त राहून संथपणे वहात होता. जनसंपर्कापासून ते अलिप्त असत. अखंड चिन्मय चैतन्याच्या आनंदात असत. त्यांची तीच ती नित्याची दिनचर्या आणि त्याच त्या मार्गावरून मार्गक्रमणा चालू होती.

दि. २६।४।३९ ला स्वामी पुन्हा बनारसला गेले. जाताना खांडव्याला उतरून सतन्याच्या हरस्वरूप मिश्राकडे एक दिवस मुक्काम केला होता.

# महद्भक्त मार्कण्ड !

नागपूरजवळच्या भण्डारा शहरात शंकरराव रामदास मार्कण्ड नावाचे गृहस्थ राहात होते. तेथे त्यांचे घर होते. शंकररावांचे वडील लहानपणीच निवर्तल्यामुळे प्रपंचाचा भार आणि शिक्षणाची ओढाताण या दुर्दैवाच्या कात्रीत ते सापडले. तशा स्थितीत माधुकरी मागून शंकररावानी बी. ए. पदवी प्राप्त करून घेतली. वकिलीच्या अभ्यासासाठी ते कलकत्त्याला गेले. तेथून ते एल्एल्. बी. झाले. त्या काळात कलकत्त्याला त्यांना साळवेकर नावाचे गृहस्थ भेटले. त्यांचा परिचय वाढला. साळवेकर महाराष्ट्रीय गृहस्थ पुण्यास राहात असत.

पुढे १९३९ च्या सुमारास भंडाऱ्याहून शंकरराव मार्कण्ड हे व्यवसायानिमित्त पुण्यास आले. ते एम्. ए., एल्एल्. बी. होऊन त्यांनी वकिली सुरू केली. पण त्यात विशेष यश न आल्याने त्यांनी वकिली सोडून दिली. त्यांनी पुणे म्युनिसिपालिटीच्या प्रेसिडेंटच्या सेक्रेटरीची नोकरी धरली. या नोकरीमुळे शंकररावांचा संबंध मोठमोठ्या धनसंपन्नांशी येऊ लागला. ही खाजगी नोकरीसुद्धा शंकररावांना पसंत नव्हती. आपण काहीतरी व्यवसाय उद्योग करून श्रीमंत व्हावे असे त्यांना सारखे वाटत असे.

शंकरराव स्वभावाने अत्यंत धार्मिक वृत्तीचे होते. ते दत्तोपासक होते. श्रीगुरुचरित्राची पारायणे आणि श्रीदत्तजयंतीचा मोठा उत्सव हे त्यांचे वैशिष्ट्याने चाललेले कार्यक्रम असत. नित्याची देवपूजासुद्धा मोठ्या थाटामाटाची असे. हे सर्व उरकून शंकरराव रोज दोन अडीचला एकदाच भोजन घेत असत. ते प्रथम बरेच दिवस पुरंदरे कॉलनीमध्ये जागा घेऊन राहात असत. पुण्यातील सुरवातीची छोटी स्थित्यंतरे याच जागेत झाली. व्यवसाय बदलला, नोकरी धरली. अनेक नवे स्नेही जोडले गेले. येणाऱ्या जाणाऱ्यांची वर्दळ वाढली. या काळात शंकररावांना

महाराजांची माहिती समजली. महाराज दत्तभक्त असल्याचे समजले. त्यामुळे त्यांचे-संबंधी अधिकच आकर्षण शंकररावांच्या मनात निर्माण झाले. ज्यांच्याकडून त्यांची माहिती मिळाली त्यांच्याकडूनच त्यांना त्यांचा २० नारायण पेठेचा पत्ता मिळाला. त्यांच्याकडे ते आले. मग येणे जाणे सुरू झाले. काशीचे बंगाली स्वामी प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामी महाराज येथे येतात हे त्यांना समजले. त्याप्रमाणे लक्ष ठेवून त्यांची भेट शंकररावांनी घेतली. स्वामींची तेजःपुंज मूर्ती पाहून शंकररावांची भक्ती त्यांचेवर बसली. हळू हळू भक्तीचा विकास चंद्रकलेप्रमाणे होऊ लागला. नंतर नंतर तर स्वामी पुण्यात आले की शंकरराव त्यांना आपल्या घरी मोठ्या आग्रहाने नेऊ लागले. शंकररावांची श्रद्धा पाहून स्वामीही त्यांचेकडे जाऊ लागले. स्वामी, शंकरराव मार्कंडाच्या घरी उतरलेले कळले म्हणजे स्वामींच्या दर्शनासाठी, सारेजण शंकररावांच्या घरी जात. महाराज, नाना भालेराव, नारायणराव देशपांडे, किर्लोस्कर, इ. अनेक जण पुरंदरे कॉलनीत स्वामींच्याकडे जात.

शंकरराव आपल्या नोकरीवर संतुष्ट नसल्याने ते नव्या उद्योगाच्या शोधात होते. आर्थिक स्थैर्य नसल्याने ते त्या काळजीतच होते. त्यांचा मित्र परिवार नगरा-ध्यक्षांच्या खाजगी कारभारीपणामुळे खूप वाढला होता. अशा आंदोलित मनःस्थितीत असतांना शंकररावांचे कलकत्त्याला परिचित झालेले श्री. साळवेकर यांची येथे पुण्यात भेट झाली. श्री. साळवेकर हे रेसेसमधील 'बुकी'चा व्यवसाय करीत होते. त्यांनी शंकररावांना सांगितले की माझ्याकडे कामास येत असाल तर दरमहा तीनशे रुपये देत जाईन. एकूण आर्थिक ओढाताण ध्यानात घेऊन शंकररावांनी ते काम पत्करले.

ही रेसमधील बुकीच्या हाताखालची नोकरी म्हणजे शंकररावांच्या जीवनातील एक नवाच अनुभव होता. या नोकरीत रेस शौकीनांची नवी सृष्टी त्यांच्या नजरे-समोर येऊ लागली. क्षणार्धात आर्थिक उत्कर्षापकर्षाची कारंजी उधळताना मानवी मनाची होणारी प्रचंड रस्सीखेंच ते जवळून पाहू लागले. शंकररावांच्या मनाला ती नोकरी पसंत पडत नव्हती. त्यांच्या मनात ही नोकरी सोडावी की काय हे आंदोलन चालू झाले. एकदा मनाचा निर्धार करून शंकररावांनी श्री. साळवेकर यांना तसे सांगितले सुद्धा! श्री. साळवेकरांच्या मनांत शंकररावांच्यासंबंधी मोठा आपलेपणा निर्माण झाला होता. त्यांनी शंकररावांना नोकरी न सोडण्याचा आग्रह

## महद्भक्त मार्कण्ड !

नागपूरजवळच्या भण्डारा शहरात शंकरराव रामदास मार्कण्ड नावाचे गृहस्थ राहात होते. तेथे त्यांचे घर होते. शंकररावांचे वडील लहानपणीच निवर्तल्यामुळे प्रपंचाचा भार आणि शिक्षणाची ओढाताण या दुर्दैवाच्या कात्रीत ते सापडले. तशा स्थितीत माधुकरी मागून शंकररावानी बी. ए. पदवी प्राप्त करून घेतली. वकिलीच्या अभ्यासासाठी ते कलकत्त्याला गेले. तेथून ते एल्एल्. बी. झाले. त्या काळात कलकत्त्याला त्यांना साळवेकर नावाचे गृहस्थ भेटले. त्यांचा परिचय वाढला. साळवेकर महाराष्ट्रीय गृहस्थ पुण्यास राहात असत.

पुढे १९३९ च्या सुमारास भंडाऱ्याहून शंकरराव मार्कण्ड हे व्यवसायानिमित्त पुण्यास आले. ते एम्. ए., एल्एल्. बी. होऊन त्यांनी वकिली सुरू केली. पण त्यात विशेष यश न आल्याने त्यांनी वकिली सोडून दिली. त्यांनी पुणे म्युनिसिपालिटीच्या प्रेसिडेंटच्या सेक्रेटरीची नोकरी धरली. या नोकरीमुळे शंकररावांचा संबंध मोठमोठ्या धनसंपन्नांशी येऊ लागला. ही खाजगी नोकरीसुद्धा शंकररावांना पसंत नव्हती. आपण काहीतरी व्यवसाय उद्योग करून श्रीमंत व्हावे असे त्यांना सारखे वाटत असे.

शंकरराव स्वभावाने अत्यंत धार्मिक वृत्तीचे होते. ते दत्तोपासक होते. श्रीगुरुचरित्राची पारायणे आणि श्रीदत्तजयंतीचा मोठा उत्सव हे त्यांचे वैशिष्ट्याने चाललेले कार्यक्रम असत. नित्याची देवपूजासुद्धा मोठ्या थाटामाटाची असे. हे सर्व उरकून शंकरराव रोज दोन अडीचला एकदाच भोजन घेत असत. ते प्रथम बरेच दिवस पुरंदरे कॉलनीमध्ये जागा घेऊन राहात असत. पुण्यातील सुरवातीची छोटी स्थित्यंतरे याच जागेत झाली. व्यवसाय बदलला, नोकरी धरली. अनेक नवे स्नेही जोडले गेले. येणाऱ्या जाणाऱ्यांची वर्दळ वाढली. या काळात शंकररावांना

महाराजांची माहिती समजली. महाराज दत्तभक्त असल्याचे समजले. त्यामुळे त्यांचे-संबंधी अधिकच आकर्षण शंकररावांच्या मनात निर्माण झाले. ज्यांच्याकडून त्यांची माहिती मिळाली त्यांच्याकडूनच त्यांना त्यांचा २० नारायण पेठेचा पत्ता मिळाला. त्यांच्याकडे ते आले. मग येणे जाणे सुरू झाले. काशीचे बंगाली स्वामी प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामी महाराज येथे येतात हे त्यांना समजले. त्याप्रमाणे लक्ष ठेवून त्यांची भेट शंकररावांनी घेतली. स्वामींची तेजःपुंज मूर्ती पाहून शंकररावांची भक्ती त्यांचेवर बसली. हळू हळू भक्तीचा विकास चंद्रकलेप्रमाणे होऊ लागला. नंतर नंतर तर स्वामी पुण्यात आले की शंकरराव त्यांना आपल्या घरी मोठ्या आग्रहाने नेऊ लागले. शंकररावांची श्रद्धा पाहून स्वामीही त्यांचेकडे जाऊ लागले. स्वामी, शंकरराव मार्कंडाच्या घरी उतरलेले कळले म्हणजे स्वामींच्या दर्शनासाठी, सारेजण शंकररावांच्या घरी जात. महाराज, नाना भालेराव, नारायणराव देशपांडे, किर्लोस्कर, इ. अनेक जण पुरंदरे कॉलनीत स्वामींच्याकडे जात.

शंकरराव आपल्या नोकरीवर संतुष्ट नसल्याने ते नव्या उद्योगाच्या शोधात होते. आर्थिक स्थैर्य नसल्याने ते त्या काळजीतच होते. त्यांचा मित्र परिवार नगराध्यक्षांच्या खाजगी कारभारीपणामुळे खूप वाढला होता. अशा आंदोलित मनःस्थितीत असतांना शंकररावांचे कलकत्त्याला परिचित झालेले श्री. साळवेकर यांची येथे पुण्यात भेट झाली. श्री. साळवेकर हे रेसेसमधील 'बुकी'चा व्यवसाय करीत होते. त्यांनी शंकररावांना सांगितले की माझ्याकडे कामास येत असाल तर दरमहा तीनशे रुपये देत जाईन. एकूण आर्थिक ओढाताण ध्यानात घेऊन शंकररावांनी ते काम पत्करले.

ही रेसमधील बुकीच्या हाताखालची नोकरी म्हणजे शंकररावांच्या जीवनातील एक नवाच अनुभव होता. या नोकरीत रेस शौकीनांची नवी सृष्टी त्यांच्या नजरे-समोर येऊ लागली. क्षणार्धात आर्थिक उत्कर्षापकर्षाची कारंजी उधळताना मानवी मनाची होणारी प्रचंड रस्सीखेंच ते जवळून पाहू लागले. शंकररावांच्या मनाला ती नोकरी पसंत पडत नव्हती. त्यांच्या मनात ही नोकरी सोडावी की काय हे आंदोलन चालू झाले. एकदा मनाचा निर्धार करून शंकररावांनी श्री. साळवेकर यांना तसे सांगितले सुद्धा! श्री. साळवेकरांच्या मनांत शंकररावांच्यासंबंधी मोठा आपलेपणा निर्माण झाला होता. त्यांनी शंकररावांना नोकरी न सोडण्याचा आग्रह

केला. पुढे १९४२ मध्ये शेवटी साळवकर म्हणाले "शंकरराव तुम्हाला नोकरीच नको असेल तर आपण माझ्या या बुकीच्या व्यवसायात भागीदार व्हा. मग काय हरकत आहे तुमची? या वाक्यावर शंकरराव गप्प झाले. त्यांना विचार करावयास लावणारे ते वाक्य होते. मनातील इच्छा सफल होण्यासाठी चालून आलेली ती संधी होती.

ही संधी येण्यापूर्वीच शंकररावांचा स्वामींशी संबंध आला आणि तो वाढत गेला. स्वामींना अग्रहक्काने ते आपल्या घरी नेत. ठेवून घेत. मनसोक्त स्वामीसेवा करीत. त्यांनी स्वामींची फार मोठी सेवा केली. शंकररावांनी स्वामींची सेवा करावी आणि ती पाहणाऱ्याचे डोळे भक्तिप्रेमाने भरून यावे अशी त्यांची स्वामीसेवा असे. स्वामींच्या पायावर पाणी घालताना जेवढी एकतानता शंकररावांची होत असे तेवढीच पाय पुसतानाही असे. गुरुपादुकांची ही पाद्यपूजा भक्तहृदय हेलावून सोडी. पण एवढ्याने पूजा संपत नसे. पाय पुसल्यावर शंकरराव स्वामींच्या चरणावर जेव्हा मस्तक ठेवीत तेव्हा ते हृद्य दृश्य पाहणाऱ्या भक्ताचे डोळे आनंदाश्रूंनी डबडबून भरत असत व तेथूनच तोही स्वामी चरणांवर नतमस्तक होई. शंकररावांच्या सेवेत स्वाभाविकपणा असे आणि अन्तःकरणाची ओढ असे. पूर्वपुण्याईचा जोर होता म्हणून अशी अमोल सेवा शंकररावांच्या वाट्याला आली होती.

स्वामींची सेवा मोठी कठीण असे. एकदा एके दिवशी सकाळी शंकरराव स्वामींच्या हातावर पाणी घालीत होते. स्वामी हात चोळून धूत होते. चोळताना स्वाभाविकपणे मागे पुढे होत होते. शंकररावांनी धरलेली पाण्याची धार मधून मधून हातावर न पडता खाली पडे. शंकरराव तेवढ्यात सावधपणे एकाग्र होऊन पाण्याची धार स्वामींच्या हातावर धरी असे एक दोनदां होते न होते तोंच स्वामी मोठ्या आवाजात म्हणाले

"अरे ओ शंकरराव! किसने तुम्हे एम्. ए., एल्एल्. बी. किया? मूर्ख, पानीकी धारा ठीक नहीं धर सकते?"

शंकररावांनी शांतपणे ऐकून घेतले. पुन्हा तशी चूक होऊ दिली नाही. स्वामींच्या रागावण्याने ते खिन्नही झाले नाहीत. आणखी तत्परता वाढविण्याचा निश्चय त्यांनी आपल्या मनाशी केला.

असा एक महान भक्त स्वामींना यावेळी मिळाला.

काहीही असले तरी स्वामींच्या सेवेत शंकररावांनी कधीही कसूर केली नाही. सेवा कशी करावी हे शंकररावांचेकडून शिकावे असे म्हटले तर अतिशयोक्ति होणार नाही. सर्व कामे जाणून समजून स्वामींची मर्जी संभाळित करणे म्हणजे कौशल्याची कसोटी असे. त्या कसोटीला शंकरराव १०० टक्के उतरलेले होते. छाट्या धुण्यापासून भिक्षा भोजनाच्या व्यवस्थेपर्यंत सारे काही जातीने पहाण्यात शंकरराव सतत अग्रेसर असत. पहाटेपासून रात्रीपर्यंत ते स्वामींना उणे पडू न देण्यात दक्ष रहात. स्वामी सुद्धा शंकररावांच्या भक्तीप्रेमामुळेच त्यांचेकडे आवर्जून जात व मुक्काम करीत. होता होता एक दिवशी शंकररावांनी आपल्या नोकरीसंबंधी स्वामींच्या जवळ गोष्ट काढली. साळवेकरांनी सुचविलेला मार्गही स्वामींना सांगितला. एक भरपूर पैसे मिळविण्याची संधी म्हणून शंकररावांनी स्वतःचा कल स्वामींना मोकळेपणाने सांगितला. तरी स्वामींच्या इच्छेसाठी त्यांनी प्रार्थना केली.

"आजपासून सहा वर्षे हा व्यवसाय कर" एवढा निर्णय स्वामींनी दिला. "तुला जे काही मिळवावयाचे आहे ते एवढ्यामध्ये मिळवता येईल. पुढे मात्र हा व्यवसाय स्वतःहून बंद कर. पहा काय मजा होते ती" असेही सांगून ठेवले.

शंकररावांना रेसच्या सीझनमध्ये पहिल्याच दिवशी एकदम एक हजार रुपये मिळाले. स्वामींच्या शब्दावर त्यांचा विश्वास बसला. स्वामींची सेवा आणि रेस एवढे दोनच उद्योग त्यावेळी शंकररावांना होते. हां हां म्हणता म्हणता शंकररावांच्या घरादारात पैसा खेळू लागला. हजारो रुपये त्यांच्या हातात येऊ लागले. रेससाठी ते मुंबईला जाऊ लागले. त्यांची प्राप्ती दृष्टी दिपवून टाकू लागली.

परिवारामध्ये श्रीमंतीचे ऐश्वर्य झळकू लागले. पैसा आला. खूप आला पण शंकररावांनी खर्चही तसाच दोन्ही हातांनी खूप केला. दत्तजयंतीचा महोत्सव दत्तदरबाराप्रमाणे भव्य स्वरूपात साजरा होऊ लागला. श्रीगुरुचरित्राची पारायणे, होऊ लागली आणि त्यांची पारणी सुद्धां त्याच थाटाने होऊ लागली. शंकररावांच्या दाराशी गाडी आली.

त्यांनी स्वामींना आपल्या गावी भंडाऱ्यास नेले. आपली जुनी वास्तु दाखवली. एक मोकळी रिकामी जागा आपलीच असल्याचे सांगून तेथे उत्तम औदुंबर वृक्ष

असल्याचे दाखवून स्वामींजवळ प्रार्थना केली "येथे आपल्या हातून श्रीदत्तमंदिर व्हावे अशी इच्छा आहे"

स्वामीजींनी तत्काळ उत्तर दिले. "होगा जल्दि होगा."

स्वामींच्या आशीर्वादाने शंकररावांना हुरुप आला. मनातील आशा पल्लवित झाली. आपणास हे काम करावयाचे अशा निश्चयाने त्यांनी तो विषय तेथेच थांबवला.

रेसमध्ये पैसा मिळू लागला म्हणजे रेसच्या एक एक सीझनला त्यांना २० हजार, ३० हजार कधी कधी ३९ / ४० हजार रुपयांचा फायदा होत असे. रेससाठी शंकरराव मद्रासला पण जात असत. या काळात त्यांनी पैसा खोऱ्यानी मिळवला म्हटलं तर अतिशयोक्ति होणार नाही. या बाबतीतसुद्धां रेसला जातांना स्वामींना नमस्कार करून गेले—किंवा त्यावेळी स्वामींचे पत्र आले की हमखास रेसमध्ये फायदा होत असे. याची जाणीव शंकररावांना चांगलीच असे. असे हे स्वामींचे नवीन महद्भक्त स्वामी संगतीचा लाभ घेऊ लागले.

## पत्रद्वारा–गंगाधारा !

१९३९ मध्ये स्वामी काही काळ बनारसमध्ये होते. तेथून त्यांची पत्रे येत. त्या पत्रांतून साधकांना त्यांनी खूप मार्गदर्शन केले. त्यातील काही पत्रांचा उल्लेख याठिकाणी केला जात आहे. स्वामींची पत्रे थोडक्यात लिहिलेली असत. त्यांन पाल्हाळ आवडत नसे. सूत्रामध्ये विचार मांडला म्हणजे झाले, असे त्यांना वाटे ज्याने त्याने स्वतः चिंतन करून त्या त्या सूत्राचा अर्थ समजून घेतला तरच खरा फायदा होत असतो. या पत्रामधून विचाररुपी गंगाधारा साधकाच्या मनोमालिन्याची जळमटे स्वच्छ करीत अखंड वहात आहे. आज आपण या पर्वणीचा लाभ घेण्याचे ठरविले आहे. काही पत्रांचा मराठी अनुवाद केला असून काही पत्रे मूळ हिंदी भाषेत आहेत.

कल्याणभाजन द. सी. पराडकर यास

.... नारायण स्मरणपूर्वक आशीर्वाद.

आपले पत्र पोहोचले. मजकूर समजला. **तुमच्या अभ्यासात चित्ताचा लय होतो म्हणून जे लिहिले आहे तो लय नसावा.**

**विक्षेप दोन प्रकारचे असतात. त्यापैकी एक वर्तमान वासनात्मक आहे व दुसरा अनेक जन्मांच्या शुभाशुभ कर्मसंस्काराने प्राप्त झालेला आहे. दोन्ही प्रकारच्या विक्षेपासाठी विवेकाचा अवलंब करून अभ्यास करीत राहिले पाहिजे. म्हणजे तो नष्ट होतो**

**स्वप्नामध्ये अनेक दृश्यें व दर्शने होतात. त्यामध्ये गुरूचे आणि इष्ट-व्यक्तीचे दर्शन होणे उत्तम.** स्वप्नामधील बुवाने दत्ताची जी उपासना करण्यास सांगितले त्याचा काही विचार न करता आपली चालत आलेली जगदंबेची उपासना करीत असावे.

मी आनंदात आहे.

शुभेच्छु
स्वामी लोकनाथतीर्थ

बनारस
६।६।३९

नारायण स्मरणपूर्वक आशीर्वाद

आपण पाठविलेली सात रुपयांची म. ऑ. मला आज मिळाली. नारायणराव जोशीचे माझ्या पत्त्यावर पाठविलेले पत्र मिळाले. मी याच जागेत चातुर्मास करणार आहे. घाईने दुसरे ठिकाण बदलण्याची माझी इच्छा नाही. कारण जागा बदलताना फार त्रास होतो. आपला अभ्यास चांगलाच होत राहणार. काळजीचे काहीच कारण नाही.

आज खापरखेड्याहून बारेलाल वर्माचे एक पत्र आले आहे. तो माझ्याकडे एका ब्राह्मणास पाठवू इच्छित आहे. माझ्याकडे जागेचा फार संकोच आहे. म्हणून त्याला माझ्या जागेत रहाणे शक्य नाही. जर त्याने आपल्या राहण्याची व जेवणाची स्वत: व्यवस्था केली तर माझ्याकडे केवळ अभ्यासाच्या निमित्ताने तो येऊ शकतो. या पेक्षा अधिक काहीही करण्यास मी समर्थ नाही. ही हकीगत बारेलाल वर्माला आपण पत्र पाठवून कळवावी. मी आनंदात आहे.

शुभेच्छु
स्वामी लोकनाथतीर्थ

बनारस
११।६।३९

कल्याणभाजन द. सी. पराडकर यास,

नारायण स्मरणपूर्वक आशीर्वाद. आपले पत्र मिळाले. मजकूर समजला तुम्ही **अभ्यासाला बसताना सर्व गुरुजनांना नमस्कार करून बसता हे फारच उत्तम आहे. शास्त्रामध्ये सुद्धा तशीच व्यवस्था केली आहे. तुमचा विचार योग्य आहे.**

**विषयामध्ये जे अनित्यत्व, दुःखप्रदत्व इत्यादि दोष आहेत त्याचाही विचार करावा. परदारा, परद्रव्य, परनिंदा सर्वस्वी वर्ज्य करावे. शास्त्रात म्हटले आहे की—**

**परदारा परद्रव्य परनिन्दा पराङ्मुखः ।**
**गंगा ब्रुते कदाऽऽयाति मामसौ पावयिष्यति ॥**

श्रीमत् भगवद्गीतेच्या अठराव्या अध्यायात सात्त्विक राजस, व तामस अशा तीन भेदांनी तीन प्रकारच्या सुखाचे वर्णन केले आहे. त्यामध्ये असे सांगितले आहे की तामस व राजस सुखाचा त्याग करून सात्त्विक सुखात राहण्याचा दृढ प्रयत्न करावा. त्याच अध्यायात सात्त्विक सुखात स्थिर राहण्याचे जे महान फळ मनुष्याचा लाभ करते त्याचे वर्णन केले आहे. तो श्लोकच लिहितो.

**सुखं त्विदानीं त्रिविधं शृणुमे भरतर्षभ ।**
**अभ्यासाद्रमते यत्र दुःखान्तंच निगच्छति** ॥ ३६/१८ ॥

संक्षेपाने किंचित् विचाराचा प्रकार तुमच्यासाठी सांगितला. असा विचार करीत योगाभ्यास करीत असावे. तसेच "**मैत्री, करुणा, मोदिता...**"**चा अभ्यास करावा.** शुभाशुभ, पुण्यापुण्य, कर्माचा विचार करावा. यामुळे चित्त प्रसन्न होऊन समाधीला अनुकूल होईल.

नारायण.

शुभेच्छु
स्वामी लोकनाथतीर्थ

बनारस
८।७।३९

नारायण स्मरणपूर्वक आशीर्वाद.

आपण पाठविलेले रु. १५/– मला काल मिळाले. गेले काही दिवस ज्वराने पीडित होतो. चार दिवस लंघन केले. काळजी नसावी.

भुजंगरावादि सर्वांना नारायण स्मरण सूचक आशीर्वाद

शुभेच्छु
स्वामी लोकनाथतीर्थ

बनारस
१७।७।३९

कल्याणभाजन द. सी. पराडकर

यास नारायण स्मरणपूर्वक आशीर्वाद.

आपले पत्र पोहोचले. मजकूर समजला.

**"मनुते इति मनुष्यः।" हिताहित विचारपूर्वक कार्य करणे हे मनुष्याचे लक्षण आहे. पशु इत्यादिंच्या मतात जी इच्छा होते तसेच कर्म त्यांचेकडून होते. कारण हिताहित विचारशक्ति पश्वादिकामध्ये नसते. जो मनुष्य असूनसुद्धा हिताहिताचा विचार न करता कर्म करतो तो नराकृति पशूच आहे. शास्त्रात म्हटले आहे की– "मनःपूतं समाचरेत्।" मनसा सद्सत्विवेक बुद्धया पूतं निरुप्य सम्यक् आचरेत्।**

श्रीभगवानसुद्धा श्रीमद्भगवद्गीतेमध्ये सांगतात:—

**तस्माच्छाशास्त्रंप्रमाणं ते कार्याकार्य व्यवस्थितौ।**
**ज्ञात्वाशास्त्रविधानोक्तं कर्मकर्तुमिहर्हसि॥**

आंधळा ज्याप्रमाणे हातात काठी घेऊन तिच्याद्वारे मार्ग आक्रमण अनुसंधानाने करीत जातो त्याप्रमाणे मनुष्याने केले पाहिजे. मनुष्याने शास्त्रात सांगितलेल्या सूत्रांच्या आधाराने या अविद्यारूपी अंधःकाराने भरलेल्या जगातून मार्ग आक्रमण केला पाहिजे. हाच 'श्रेय' प्राप्तीचा (कल्याणाचा) उपाय आहे.

....पायोरियाच्या औषधाची यादी मिळाली आहे. पुढील पानावर यादी देत आहे. मी आनंदात आहे.

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

## पायोरियावरील औषधी

१) गेरूमाती १० तो.
२) खडू १० तो.
३) जायफळ १ तो.
४) काळीमिरे (अग्नींत भाजून) २ तो.
५) सोहागा (भाजून चूर्ण करून) १॥ तो.
६) मोरचूद (भाजून शुद्ध करून) ·॥· तो.
७) कुचला (भाजून शुद्ध करून) ·॥· तो.
८) कापूर ·।· आणेभार
९) पेपरमिंट अर्क ·॥· तो.
१०) मायफळ १ तो.

कृति :— वरील सर्व औषधांचे वेगवेगळे चूर्ण करून, वस्त्रगाळ करून घेणे. नंतर सर्व औषधांची ही वस्त्रगाळ चूर्णे एकत्र मिसळणे. मोरचूद ·॥· तोळ्याहून जास्त घेऊ नये. रोज सकाळी या औषधाने दात घासणे. हे औषध दाताला लावून नंतर ब्रशाने दात स्वच्छ करावेत.

बनारस
१७।७।३९

नारायण स्मरण पूर्वक आशीर्वाद

आपले पत्र मिळाले. मजकूर समजला. माझा ताप आता बरा झाला आहे. अशक्तपणा मात्र आहे. आपली पान्थरी बरी झाली हे वाचून फार आनंद झाला. माझे सुद्धा आणखी बलवत्तर प्रारब्ध संस्कार भोगण्याचे शिल्लक आहेत. त्यानंतर माझी प्रकृती सुद्धा चांगली होईल, यात शंका नाही. भुजंगरावादिंनां नारायण स्मरण. मी आनंदात आहे.

शुभेच्छु
स्वामी लोकनाथतीर्थ

बनारस
५।८।३९

नारायण स्मरणपूर्वक आशीर्वाद.

आपण पाठविलेले रु. ७/– पोहोचले. यंदा येथे पाऊस फार कमी आहे. पावसाच्या अभावाने गंगेलाही पाणी फार कमी आहे. शेतीचे फार नुकसान आहे. अन्नाअभावी प्रजेचे अतिशय हाल होतील. भुजंगरावादिंना नारायण स्मरण.

मी आनंदात आहे.

शुभेच्छु
स्वामी लोकनाथतीर्थ.

बनारस
१४।८।३९

नारायण स्मरणपूर्वक आशीर्वाद.

....राणामहल वरील जागा अतिशय गैरसोयीची असल्याने गेल्या ७।८।३९ या दिवशी राणामहलची जागा सोडून "पांडे हौली" वर राहण्यास आलो आहे.....

मी आनंदात आहे.

डी २८।१६१ पाण्डे हौली हा पत्ता आहे.

शुभेच्छु
स्वामी लोकनाथतीर्थ.

बनारस
२२।८।३९

कल्याणभाजन द. सी. पराडकर यास

नारायण स्मरणपूर्वक आशीर्वाद. आपण पाठविलेली १० रु. ची म. ऑ. मिळाली. पत्रही मिळाले मजकूर समजला.

**साधनेमध्ये आपणास जे काही अनुभव येतात ते अत्यंत उत्तम असेच आहेत. धैर्य आणि विश्वास यांचा आधार घेऊन गुरूंनी दाखविलेल्या मार्गाने चालत रहा. हाच श्रेयप्राप्तीचा उपाय आहे.**

**भवानी शंकरौ वन्दे श्रद्धा विश्वासरूपिणौ ।**
**याभ्यां विना न पश्यन्ति सिद्धः स्वान्तस्थ ईश्वरम् ॥**

रङ्गनाथ तथा कुबडे यांना नारायणस्मरण सूचक आशीर्वाद कळवावा.

मी आनंदात आहे.

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

बनारस
१७।१०।३९

कल्याणभाजन द. सी. पराडकर यास

नारायण स्मरणपूर्वक आशीर्वाद.

....पत्र मिळाले. मजकूर समजला.

**"स च नैरन्तर्य दीर्घकाल सत्कार सेवितो दृढभूमिका"**

**या पातञ्जल योगसूत्राचा विचार करीत धैर्य धरून अभ्यास करीत असावे. शांतता प्राप्त होईल.**

शुभेच्छु
स्वामी लोकनाथतीर्थ

बनारस
१९।१०।३९

नारायण स्मरण.

....मी काल पाण्डे हौलीची जागा सोडली व B १३/१७७ या पत्त्यावर सोनारपुरामध्ये राहावयास आलो ....

शुभेच्छु
स्वामी लोकनाथतीर्थ

बनारस
१३।१२।३९

कल्याणभाजन द. सी. पराडकर यासी,

नारायण स्मरणपूर्वक आशीर्वाद.

आपण पाठविलेली रु. १०/– ची म. ऑ. पोहचली. तुमच्या डोक्याचा त्रास कमी होईल. तुमचा अभ्यास चांगला चालू आहे. **अभ्यासात जो शांततापूर्वक आनंदाचा अनुभव येतो तो रसास्वादन आहे. ही फारच चांगली स्थिती आहे. हीच स्थिती वृद्धिंगत होत राहू द्या.**

दिवाळीच्या सुट्टीत वामनराव तुमचे घरी गेले होते हे त्यांच्या पत्रावरून समजले. तुम्ही वेळेवर पत्रोत्तर देत असता. याबद्दल काहीही काळजी करू नये. पायोरियाचा रोग देवाची इच्छा झाली तर थोड्याच दिवसात बरा होईल. काळजी करू नये.

आपण आपले कर्तव्य करीत रहावे. भविष्याची काळजी करीत बसू नये. कारण की **फार काळजी करण्याने चित्ताची विचारशक्ति नष्ट होत जाते.** भगवंतानी गीतेत सांगितले आहे की—

**कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन**
**मा कर्मफल हेतुर्भु माते संगोऽस्तु अकर्मणि ॥**

कर्मफळाची चिंता सोडून कर्तव्यकर्माचे अनुष्ठान करीत रहावे. परमेश्वर स्वतःच्या भक्ताची कधीसुद्धा उपेक्षा करीत नाही. ईश्वराधनार्थ केलेले कर्म कधीही वाया जात नाही.

तुमच्या मनात जे विचार येतील ते मला लिहून कळवावे. यात माझ्या असंतोषाचे काहीच कारण नाही.

मी आनंदात आहे.

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

स्वामींचा या काळातील नित्यक्रम नित्याचाच होता. राणामहल भागात मुक्काम असतांना स्वामींनी केवळ गंगाविहार करण्यासाठी एक होडी विकत घेतली. ती वल्हविण्यासाठी एक नावाडी पण मासिक वेतन नेमून ठेवला. मग स्वामी सकाळी साधनादि संपल्यानंतर स्नानासाठी गंगेवर गेले की जरा होडीमधून हिंडून येत. रोज इच्छा होईल त्या घाटावर जाऊन स्नान करीत. मनमुराद गंगेत फिरत. सायंकाळीसुद्धा चारनंतर २।३ तास होडी घेऊन त्या भाग्यवान 'मल्लाहा' बरोबर गंगालहरीवर संतुष्ट होऊन येत असत. गंगेची लहर आणि स्वामींची लहर यात फार अंतर नसे. त्यामुळे प्रश्न पडायचा तो त्या नावाड्याचा ! होडी बिचारी सतत गंगेच्या आणि स्वामींच्या ताब्यात. तिला स्वतःचे अस्तित्व असले तरी सत्त्व मात्र काहीच उरले नव्हते. गंगेच्या लहरी जशा उसळतील तशा कलाटण्या तिने सतत घ्याव्यात. होडीचे सारे हेलकावे गंगेचे होते. होडीचे स्वामी, स्वामी होते म्हणून ती त्यांच्याशिवाय अन्य कोणाचा स्पर्श करून देत नव्हती. होडीचे हे पावित्र्य स्वामींच्या दराऱ्यामुळे बनारसवाल्यांनी निमूटपणे संभाळले होते.

बनारसी माणूस जितका गोड तितकाच तिखट ! गोडीने विरघळून टाकील तर तिखटाने नाकाडोळ्यातून पाणीच काढील ! स्वामी तर या बाबतीत शेरास सव्वाशेर होते. त्यांच्या जिभेला धार होती आणि डोळ्यात तेज होते. संन्याश्रम असा होता की जणू वैराग्याचा जागृत ज्वालामुखी ! त्यामुळे सारी काशी स्वामींना वचकून असे. स्वामींची होडी गंगेवर निराधार स्थितीत पडली तरी कोणाचीही वाकडी वा सरळ नजर तिच्यावर पडत नसे. पण या होडीने अत्यंत निष्ठेने स्वामींची सेवा केली. मध्यंतरी किती तरी दिवस स्वामींना बहिर्दिशेसाठी गंगेच्या पलीकडील तीरावर जाण्याची लहर आली. त्यासाठी पैलतीरावर पोहचविण्याचे काम या होडीने तक्रार न करता केले. बरेच दिवस स्वामींचा हा कार्यक्रम सांज सकाळ चालत असे. सर्वतंत्र स्वतंत्र अशी मस्त वृत्ती स्वामींची होती.

पुढे पुढे नावाड्याचा अनियमीतपणा स्वामींना पसंत पडेना. म्हणून नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे २।४ नावाडी बदलून थोडा पगार वाढवून पाहिले पण जमले नाही. कोणी नावाडी टिकलाच नाही. घाटावर कटकटीचे प्रसंग येऊन गेले. स्वामींनी पाहिले संन्याशाला कुठलाच संसार परवडणारा नाही. त्यांनी एकदा एका ब्राह्मणाला बोलावून घाटावर नेले व सर्वांसमक्ष ती होडी त्याला अर्पण केली. त्या ब्राह्मणाला आश्चर्याचा धक्काच बसला. स्वामींना ही मोकळे मोकळे वाटू लागले.

## भावुक भक्त जांबवंतसिंह !

स्वामी श्रीलोकनाथतीर्थ महाराजांचे एकूण चार महान भक्त त्यांच्या सहवासात बराच काळ राहिले. स्वामींची खूप सेवा करून, जीवनात स्वामींकडून त्यांनी खूप खूप मिळविले. स्वामींचे सारेच भक्त भाग्यवान होते. परंतु महाराज, नाना भालेराव, शंकरराव मार्कण्ड आणि बनारसचे जांबवंतसिंहजी या चौघांनी स्वामींना अनेक प्रसंगातून अगदी जवळून पाहिले आहे. स्वामींच्यावर आई—वडील समजून प्रेम केले आहे. यामुळे स्वामीसुद्धा चौघांकडे जात येत असत. अडीअडचण सांगत असत. यांच्यावर भरपूर प्रेम करीत असत. मधून अधून आईसारखे रागावत असत. श्रीगुरुदेव दत्तावतारी नरसिंहसरस्वती स्वामीमहाराजांचे चार शिष्य होते तसे या स्वामींचे पण हे चार शिष्य होते. यापैकीं आतापर्यंत तीन शिष्यांचा परिचय आपणास झाला आहे. आता चौथे व शेवटचे महान् शिष्य श्री. जांबवंतसिंहजी यांचा पूर्वपरिचय पाहू.

श्री. जांबवंतसिंहजीने आपला परिचय स्वतःच लिहून दिला आहे तो त्यांच्याच शब्दात वाचण्यात आपल्याला आनंद होणार आहे.

श्री जांबवंतसिंहजींना शक्तिपात दीक्षा महाराजांचेकडून मोठ्या वैशिष्ट्यपूर्ण अनुभवाने झालेली आहे. नंतर महाराजांनी सांगितल्यावर त्यांचा व स्वामींचा सहवास घडून आला आहे. नाना भालेराव यांनी महाराजांची जशी अत्यंत तन्मयतेने सेवा केली आहे अगदी तशीच तन्मयतेने सेवा श्री. जांबवंतसिंहजी यांनी काशीमध्ये स्वामी असतांना केलेली आहे.

श्री. जांबवंतसिंहजींच्या शब्दातून स्वामींचा व स्वतःचा परिचय :—

**बन्दौ गुरुपदकंज, कृपासिंधु नर रूप हरी ।**
**महामोह तमकुंज, जासुवचन रवी कर नीकर ॥**

—श्रीसंततुलसीदास

पूज्यपाद श्री १००८ स्वामी श्रीलोकनाथतीर्थ महाराज यांचे संबंधी काही लिहिण्यापूर्वी मला असे वाटते की त्यांच्या सहवासात येण्याचे सौभाग्य मला कसे प्राप्त झाले हे लिहावे.

मी माध्यमिक शाळेमधूनच अर्धवट शिक्षण सोडले. त्याच वेळी मला इंग्रजी शिकण्याची इच्छा झाली. तेव्हा आमच्या नातेवाईकांपैकी श्री. रघुनाथसिंह यांचेकडे जाऊन इंग्रजी शिकण्यास सुरुवात केली. श्री. रघुनाथसिंहजी हे दादुपुर स्टेशन, जिल्हा प्रतापगड, उ. प्रदेश या ठिकाणी स्टेशन मास्तर होते. यांना योगाभ्यास प्राणायामादिंची आवड होती. त्यांनी त्यांचे गुरु श्रीशमशेर शाह यांचेशी माझा परिचय करून दिला. श्रीशमशेर शहा हे हठयोगी होते. त्यांनी मलाही काही साधन आणि प्राणायाम सांगितला. हा अभ्यास मी जवळ जवळ दोन वर्षे करीत होतो. परंतु त्यामुळे माझे डोळे खराब झाले. माझे वडील बनारसला असत. ते जेव्हा गावी आले व त्यांनी माझे बिघडलेले डोळे पाहिले तेव्हा उपचारासाठी मला ते बनारसला घेऊन गेले. तेथे डोळ्यावर उपाय झाले.

श्री. शमशेरशहा यांनी सांगितलेला अभ्यास अद्याप चालू होताच. एके रात्री अभ्यास चालू असताना मला भयंकर भीति वाटू लागली. त्या वेळेपासून असे वाटू लागले की गुरूच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनाखेरीज अभ्यास होणे शक्य नाही. या विचारात असताना मी बनारस शहर व आसपासची ठिकाणे यामध्यें ज्या ज्या साधू महात्म्यांची माहिती मिळाली तेथे तेथे जाऊन आलो. त्या साधूंना प्रार्थना केली " आजपर्यंत जी काही शक्ति तुम्ही मिळविली असेल त्यातील थोडी मला द्या. मी यासाठी अपात्र असेन तर अशा महापुरुषाची भेट करून द्या की जो मला पुढे नेण्यास आधार होईल. " या प्रयत्नात सात वर्षे गेली.

एके दिवशी मी "घरहरा" या बनारस जिल्ह्यातील माझ्या गावाहून बनारसला येत होतो. तेवढ्यात कादीपूर रेल्वे स्टेशनवर श्री. शमशेरशाह यांचे गुरु श्री. शिवलाक शाह यांचे दर्शन झाले. ते आमच्याच डब्यात होते. मी माझा परिचय त्यांना करून दिला. बनारसपर्यंत त्याच डब्यात होतो. त्यांचे शरीर म्हणजे केवळ हाडांचा सापळा शिल्लक राहिला होता. बनारस स्टेशन आले.

बनारस स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर मी त्यांना उतरविले पण ते मला म्हणाले

तुझ्या खांद्यावर मला घे आणि राजघाटावर माझ्या पत्त्यावर नेऊन पोहचते कर. ते ठिकाण स्टेशनपासून १॥ मैल लांब जंगलामध्ये होते. मी त्या गुरूंना रिक्षा किंवा टांग्याने चलण्याचा खूप आग्रह केला परंतु त्यांनी मला तुझ्या खांद्यावरच घेऊन चल हा आग्रह धरला. शेवटी मी त्यांना माझ्या खांद्यावर घेऊन गेलो. ते माझे सद्भाग्य होते. त्यांचे काहीच वजन मला जाणवले नाही. त्यांच्या ठिकाणीं पोहचल्यावर मी त्यांना आपले शिष्य करून घेण्याची प्रार्थना केली

मी श्री. शमशेरशहा यानी मला सांगितलेल्या क्रियांचे वर्णन करून सांगितले. हे ऐकून ते गुरु हसले व म्हणाले. "गृहस्थाश्रमी लोकांसाठी हा मार्ग योग्य नाही. म्हणून मी तुला शिष्य करीत नाही. परंतु **तुला आशीर्वाद देतो की तुझ्या संस्काराप्रमाणे सहा महिन्यात दक्षिण दिशेला तुला गुरु भेटेल. तुला गुरु-प्राप्ती व्हावी याचसाठी तुझ्यावर संस्कार करण्याकरता, मी तुला तुझ्या खांद्यावरून**, मला येथपर्यंत आणण्यास सांगितले."

या सुमारास मी गणेशराम नंदलाल फर्म, चौखम्बा, बनारस या ठिकाणी नोकरीस होतो. ही फर्म बनारसी वस्त्र उत्पादनाची प्रमुख फर्म होती. (सध्या फर्म गणेशराम देवकिसन झँवर २५।४ चौकात आहे. आज ही उच्च दर्जाची फर्म म्हणून प्रसिद्ध आहे.) या फर्मच्या बाकी वसुलीसाठी मधून मधून मला बाहेरगावी जावे लागे. विशेषतः महाराष्ट्र आणि कर्नाटक या भागात जावे लागे. तेव्हा यावेळी मला महाराष्ट्रात जळगांवी जाणे भाग पडले. कारण जळगांवच्या एका पार्टीकडे फार मोठी रक्कम बरेच दिवसाची येणे राहिली होती. मी त्यासाठी जळगांवी गेलो. त्या व्यापाऱ्याला भेटलो. त्याने पंधरा दिवसांचा वायदा दिला. आता पंधरा दिवस काय करावे या विचारात मी होतो.

त्या रात्री मी भवानीच्या मंदिरात झोपलो असता मला एक स्वप्न पडले. स्वप्नात मला अशी सूचना मिळाली की "तू पुण्याला जा. तेथे तुला गुरुप्राप्ती होईल" स्वप्नाच्या संकेताप्रमाणे मी दुसरे दिवशी सरळ पुण्यास निघालो. पुण्यास पोहचल्यावर माझ्या सर्व मित्रांना व परिचित व्यक्तींना भेटलो. सर्वांना अशी माहिती विचारली की पुण्याला व पुण्याच्या आसपास कुठे कुठे साधु महात्मे आहेत? त्या माहितीच्या आधारे जेवढे शक्य झाले तेवढ्या ठिकाणी मी जाऊन आलो. पण कुठेच समाधान-कारक उत्तर मिळाले नाही.

एवढी धावपळ केल्यानंतर मनात सारखे येई की स्वप्नावर विश्वास ठेवून वेड्यासारखा पैसा व वेळ मी खर्च केला आणि व्यापाने मनस्तापही करून घेतला. मला उदास पाहून, पुण्यात ज्या शेटजींकडे मी उतरलो होतो, त्यांनी माझी मनापासून विचारपूस केली. ते शेटजी म्हणजे फर्म लादूराम रामकिसन, पुणे याचे मालक. शेटजींचे नाव मेघराज शेटजी. त्यांनी मला गोरखपूरचा कल्याण विशेषांक वाचण्यासाठी दिला.

मी त्या कल्याण मासिकाचे जे पान उघडले त्या पानावर "महाकुंडलिनी शक्तियोग प्रकरण" होते. तो लेख श्री. त्र्यंबक भास्कर खरे यांनी लिहिलेला होता. त्या लेखात या गोष्टीचा उल्लेख होता की पुण्याचे शिक्षक श्री गुळवणीजी साधकाची कुंडलिनी शक्ति केवळ स्पर्श, वाक्य किंवा नेत्रद्वारे जागृत करून देतात.

हा लेख वाचल्यानंतर मी पूजनीय गुळवणीजीसाहेबांची माहिती व पत्ता जाणण्याच्या उद्योगाला लागलो. पहिल्या दिवशी नीट पत्ता न मिळाल्याने वाया गेला. परंतु दुसरे दिवशी श्री. लक्ष्मीनारायणजी राठी यांचेकडून पूर्ण पत्ता समजला. त्याप्रमाणे आम्ही श्री. गुळवणीमहाराजांचे घरी गेलो. परंतु त्यावेळी ते शाळेच्या समारंभासाठी गेल्याचे समजले. नू. म. विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन होते तिकडे गेले होते. आम्ही त्याप्रमाणे शाळेत गेलो. पूजनीय गुळवणीमहाराजांना आम्ही कोणी आल्याची बातमी समजताच ते त्या समारंभातून स्वतः बाहेर आले. त्यांच्या प्रथम दर्शनातच माझ्या अन्तःकरणात विश्वास निर्माण झाला की ज्याच्या शोधार्थ तू हिंडतोस ते तुला आज प्राप्त झाले आहे.

मी आपला हेतु त्यांच्या कानावर घातला. मला आपल्याकडून 'काही मिळावे' ही प्रार्थना जिज्ञासेने केली. यावर पू. श्रीगुळवणी महाराज म्हणाले –

**"मला माझ्या सद्गुरुंच्याकडून जे काही प्राप्त झाले आहे ते निःसंकोचपणे देण्याचा मी प्रयत्न करीन. तुमच्या संस्काराप्रमाणे जेवढे ग्रहण करण्याची तुमची क्षमता असेल तेवढे तुम्ही प्राप्त करू शकाल."** हे स्पष्ट व निःसंदिग्ध सांगून ते पुढे म्हणाले, माझ्याकडे जागेचा संकोच आहे. तुम्हीच तुमच्या स्नेह्याकडे एखादी निवांत खोली पाहून ठेवा. तेथे मी येईन. याप्रमाणे खोलीची व्यवस्था असल्याचे सांगून जागेचा पत्ताही दिला. त्याप्रमाणे त्यांना तेथे नेण्याची मी व्यवस्थाही केली.

ती रात्र मला फार कठीण गेली. माझ्या आयुष्यातील एवढी मोठी आणि कठीण रात्र कधी झालीच नाही. ती रात्र संपण्याची चिन्हे, किती युगे लोटली तरी, दिसत नव्हती.

सकाळ होताच आम्ही मोटार घेऊन श्रीगुळवणीमहाराजांचेकडे गेलो व त्यांना घेऊन सेठ लादूराम रामकिसन जाखोटिया यांचे घरी घेऊन आलो.

पूजनीय श्रीगुळवणी महाराजांनी मला त्यांचे समोर बसविले. त्यांनी माझ्या नाभीला व मस्तकाला स्पर्श केला. हा स्पर्श होताच माझ्या चित्तवृत्ति अंतर्मुख झाल्या. मला बेंबीच्या खाली कुठलीशी वस्तु आपोआप उघडते व बंद होते असे भासू लागले. मला त्यावेळी असा प्रकाश दिसला की त्याच स्थितीत मी सव्वा तास स्तब्ध व निश्चल बसून राहिलो. श्रीगुरुमहाराजांनी माझ्या डोक्यावर हात ठेवला तेव्हा मला दिव्य चैतन्य प्राप्त झाल्याचे जाणवले. नंतर त्यांनी मला खाण्यापिण्यासंबंधी काही सूचना दिल्या. त्यांनी मला त्यांचेसमोर आणखी दोन वेळा अभ्यासासाठी बसवून घेतले.

नंतर मी माझ्या व्यापारानिमित्त दौरा आखला व पू. श्रीगुरुमहाराजांची आज्ञा घेतली त्यावेळी ते म्हणाले पत्राने सतत संबंध ठेवीत जा.

मी आखलेल्या दौऱ्याप्रमाणे साताऱ्याहून जयसिंगपूरला गेलो. प्रवासात मी सर्व नियम संभाळून अभ्यास करीत असे. जयसिंगपूरला असताना अभ्यासास बसलो तेव्हा नादानुसंधानाचा अनुभव आला. आणखीही अनेक क्रिया आपोआप होऊ लागल्या. पुणे सोडून तीनचारच दिवस झाले असतील. पण या अनुभवामुळे मला आनंद तर झालाच पण आश्चर्यही वाटले. मी जयसिंगपूरहून पुण्याला श्रीगुरुमहा-राजांना पत्र लिहिले. त्यांचे उत्तर आले. त्या दिवशीही क्रियांचा जोर खूप वाढला. पुढे हा अनुभव नित्याचा झाला की श्रीगुरुमहाराजांचे पत्र ज्या दिवशी येई त्या दिवशी बैठकीचा जोर अपूर्व असे.

एक महिन्याने व्यापारी दौरा संपवून बनारसला यावयास निघालो. परतताना श्रीगुरुमहाराजांच्या दर्शनाची इच्छा झाली. पुण्यास गेलो. श्रीगुरुमहाराजांचे दर्शन घेतले. बनारसला निघालो म्हणून सांगितले. त्यावेळी त्यांनी श्रीगुरुदेव स्वामी श्रीलोकनाथतीर्थ महाराजांची माहिती सांगितली. त्यांचा काशीचा पत्ता दिला आणि आज्ञा केली की "काशीत असतांना स्वामींचे नित्यदर्शन घेत जा."

मी बनारसला गेल्यानंतर प्रथम स्वामींचे दर्शन घेतले. त्यावेळी ते सोनापुऱ्यामध्ये रहात होते. तेथे गेल्यावर बरोबर नेलेली फळे स्वामींच्या समोर ठेवली. त्यांना साष्टांग नमस्कार केला. आपले मस्तक त्यांचे चरणावर ठेवले. त्यावेळी त्यांनी दोन्ही हात माझ्या मस्तकावर ठेवले. त्यामुळे मला अत्यंत सुखप्राप्तीचा अनुभव आला. मी त्या स्थितीत तसाच दहा मिनिटे होतो. मी सावध झाल्यावर स्वामींनी माझा परिचय विचारला. तो ऐकल्यावर स्वामी म्हणाले " नित्य येत जा. "

त्या दिवसापासून रोज एकदा स्वामींच्या दर्शनास मी जाऊ लागलो. त्यांच्यासमोर जाताच शक्ति अत्यंत तीव्रतेने क्रियाशील होत असल्याचा अनुभव तात्काळ जाणवत असे. हा अनुभव रोज येत असे. पण आणखी विशेष गोष्ट ही की तेथे पोहचताच शक्ति क्रियाशील झाली की स्वामी मोठ्या आवाजात म्हणत " **सावधपूर्वक लक्ष ठेवून बैठकीला बस** " हे त्यांचे वाक्य असे जोरात असे की ती धमकीच वाटे. मी चटकन बैठकीला बसत असे. त्यांचे वाक्य जोराचे व धाक उत्पन्न करणारे कानाला वाटले तरी मनाला मात्र फार गोड व संतोषकारक वाटत असे.

पूज्यपाद स्वामींच्याकडे कधी माझे जाणे झाले नाही तर पुन्हा गेल्यावर न येण्याचे कारण ते विचारीत. ही त्यांची माझेवर परम कृपाच होती. ते मला म्हणत **" दररोज अभ्यासास बसत जा. पण लक्षात ठेव माझी दृष्टी तुझ्या शरीरावर एकदा पडली तर सहा महिन्यांच्या अभ्यासाचे फळ तुला मिळणार आहे. गुरूच्या एका दृष्टीचे कार्य फार मोठे** असते. **म्हणून तुला सांगणे आहे की रोज येत जा व माझेसमोर साधन करीत** जा. "

एकदा असे झाले की माझ्या एका स्नेह्याला " योगवाणी " पुस्तक पाहिजे होते. म्हणून मी छोटी गैबीत जाऊन प. प. श्रीशंकर पुरुषोत्तमतीर्थ स्वामी-महाराजांनी लिहिलेले ते पुस्तक घेतले व तसाच स्वामींच्या दर्शनास गेलो. माझ्या हातात पुस्तक पाहून मला स्वामींनी कोणते पुस्तक आहे म्हणून विचारले. मी " योगवाणी " आहे म्हणून सांगितले. त्यावर ते हसत म्हणाले " आता पुस्तक वाचण्याची आवड निर्माण झाली काय ? या पुस्तकात जेवढ्या क्रिया सांगितल्या आहेत त्या सर्व मी तुझ्याकडून सहा महिन्यात करवून घेतल्या आहेत. " मी हे पुस्तक माझ्या एका मित्राने मागितले आहे म्हणून नेऊन देत आहे असे सांगितल्यावर स्वामी काही बोलले नाहीत.

स्वामीजी आपली राहण्याची जागा सारखी बदलत असत. एका जागेत फार काळ रहात नसत. याचे काय कारण असावे हे समजून घेण्याची मला जिज्ञासा झाली. त्याप्रमाणे मी स्वामींना एकदा प्रश्न केला.

"स्वामीजी आपण इतक्या लवकर जागा का सोडता? कधी कधी तर पंधरा दिवसही जागेत रहात नाहीत." स्वामींचा सहवास व त्यामुळे प्रेम वाढल्याने माझ्या या प्रश्नाचा आग्रह पाहून स्वामी म्हणाले "ए मूर्खा! (स्वामी या संबोधनाने पुष्कळ वेळा मला हांक मारीत. त्यांचा तो आवडता शब्द होता.) तुला याचे रहस्य समजत नाही. अरे बाबा, "**ती**" मला खाऊनही देत नाही आणि एके ठिकाणी राहूनही देत नाही. मला सारखी म्हणते 'जा पुण्याला' 'जा इकडे' 'जा तिकडे' अशी प्रेरणा करते. त्यावर मी म्हटले "स्वामी, कोण आहे ती?" स्वामी म्हणाले, "ए मुर्खा तुला नाही समजत गप्प बैस!".

स्वामींचा जागा बदण्याचा क्रम सतत चालू होता.

परमपूज्य स्वामींच्या संबंधाने लिहिण्याची माझी पात्रता नाही. केवळ श्रीगुरुमहाराजांची आज्ञा पाळण्यासाठी हे जसे जमेल तसे लिहून कळवीत आहे. स्वामींच्या संबंधी लिहिणे जसे अवघड आहे तसे त्यांचेशी बोलणेही सोपे नसे. त्यांचेकडे येणाऱ्या जाणाऱ्यांशी ते जे बोलत ते ऐकले की मनात काही भलतेच येते. या स्वामींना वेड तर लागले नाही. त्यापेक्षां स्वामींच्या या लहरीपणाचा अनुभव त्यांच्या सहवासात राहिल्यावर तर फारच येत असे. स्वामींची ही लहर जाणवते ती प्रत्येक व्यवहारात. बनारसमध्ये त्यांनी जागा इतक्या बदलल्या आहेत की दोन महिन्यांपेक्षा अधिक काळ ते कुठे राहिलेच नाहीत. अशा स्थितीतही माझ्या परम-भाग्याने श्रीगुरुमहाराजांच्या आशीर्वादाने आणि स्वामींच्या परमकृपेने मला त्यांचा उत्तम सहवास लाभला व स्वामींच्या अंतरंगाचे जवळून अनेक वेळा दर्शन झाले.

जांबवंत सिंहजींनी बनारसला गेल्यावर स्वामींचे दर्शन घेतले व त्यासंबंधी पुढील पत्र पुण्यास पाठविले.

बनारस
२-१-४०

प. पू. श्रीगुरुदेव वामनरावजी गुळवणी महाराज के
चरणकमलोंपर तुच्छ शिष्य जांबवंतसिंह का अनंतकोटी साष्टांग प्रणाम वि. वि.

....आपकी कृपासे श्रीस्वामीजी दयालु होकर आपके कृपाहस्त (दोनों) मेरे सिरपर रख दिया। आपकी कृपा का फल है।....

आपका चरणसेवक

जांबवंत

याप्रमाणे स्वामींना एका भावुक भक्ताचा लाभ झाला. स्वामीजी जांबवंतसिंहावर नितांत संतुष्ट होते.

## शक्तीचा सहस्त्रारात प्रवेश

इ. स. १९४० च्या जानेवारीच्या प्रारंभापासूनच स्वामींच्या आजारालाही प्रारंभ झाला. अंगात उष्णता वाढली आणि त्यांच्या ओठावर एक पुटकुळी आली. ती सुजत चालली. स्वामींचा ओठही सुजला. काहीही खाणे अशक्य होत चालले. काही उपाययोजना करावी, अशी जांबवंतसिंहांची फार इच्छा होती. रोज ते उपचार करण्यासंबंधी स्वामींना विनवीत होते आणि स्वामी चालढकल करीत होते. जांबवंतसिंहांचा फारच आग्रह पाहिल्यावर, आपल्या दुखण्यापेक्षां स्वामींना जांबवंतसिंहांचीच दया आली आणि औषधपाणी करून घेण्यास एकदाचे तयार झाले. पण स्वामी म्हणाले की होमिओपॅथिक डॉक्टराची औषधयोजना करायची. त्यांनी एका होमिओपॅथिक डॉक्टराकडे घेऊन जाण्यास सांगितले. जांबवंतसिंह स्वामींना घेऊन तिकडे गेले. ते डॉक्टरमहाशय दोन्ही डोळ्यांनी आंधळे होते. डॉक्टरांना आजाराचे वर्णन करून सांगितले. ओठावरच्या पुटकुळीचे स्वरूप विषद केले आणि औषध आणले.

औषधासाठी डॉक्टरांचेकडे जाताना स्वामींचा आणि जांबवंतसिंहांचा मोठा मार्मिक संवाद झाला. अलिकडे नित्याचा स्वामींचा सहवास आणि साधना यामुळे जांबवंतसिंहांचे मनात साधनेचे विचार अहोरात्र चालत असत आणि या गृहस्थाचे भाग्य असे की मनात प्रश्न आला की स्वामींना विचारून निःशंक होण्याची सतत सुवर्णसंधी! आज रस्त्याने जातांना जांबवंतसिंहाने स्वामींना विचारले "स्वामीजी, शक्ति सर्व चक्रांचे भेदन करून सहस्त्रारापर्यंत जाते हे खरे आहे असे कसे समजावे?".

पूज्यपाद स्वामी म्हणाले " याचे उत्तर उद्या तूच मला सांग."

तो दिवस उलटला. दुसरे दिवशी पहाटे जांबवंतसिंहजी आपल्या घरीच साधनेस बसले. साधना सुरू झाली, पण आजचे अनुभव काही वेगळेच असल्याची त्यांना जाणीव होऊ लागली. मूलाधारामध्ये जोरात हालचाल होऊ लागली. मग 'ती' वस्तू मूलाधारातून घुसळत वर उसळू लागली. मेरुदंडामधून ती वर चढत चढत डोक्यात आली. डोक्यात ती वस्तू जोरात धक्के मारू लागली. हे धक्के डोक्याला आतून बसत होते. त्यामुळे जांबवंतसिंहाना ते सहन होईना. त्यांनी आपल्या दोन्ही हातांनी डोके घट्ट धरले, आवळले. पण आतील धक्यांचा जोर सहन करणे अशक्य झाले. त्यांनी दोन्ही हाताच्या मुठी करून डोक्याला एकसारखे बडवायला सुरवात केली. तरी सहन होईना. नंतर डोके घट्ट धरून ते आडवे पडले. दहा मिनिटे पडले असतील तेवढ्यात त्यांना झोप लागली. थोड्या वेळात जाग आली आणि ते तसेच सकाळच्या वेळी स्वामींच्याकडे आले, स्वामींनी जांबवंतसिंहाला पहाताच ते मोठमोठ्यांदा हसत म्हणाले :"कालच्या तुझ्या प्रश्नाचे उत्तर मिळाले की नाही?"

होकार ऐकून स्वामी पुढे म्हणाले, "**जांबवंत ! आज तू जो काही अनुभव घेतला आहेस ती तुझी स्थिर स्थिती नाही. ही पक्की स्थिर स्थिती होण्यासाठी तुला स्वतःलाच नित्याच्या साधनेच्या अभ्यासाने ती प्राप्त करून घेतली पाहिजे.**"

याच संदर्भात जांबवंतासिंहांने स्वामींना विचारले, शक्तीने एकेका चक्राचा भेद केल्यावर त्या त्या चक्राच्या विविध शक्तीचे अनुभव येतात असे असून मला तसा एकही अनुभव येत नाही. यासंबंधी योगवाणी ग्रंथात बऱ्याच गोष्टी लिहिल्या आहेत. यावर स्वामी म्हणाले – 'योगवाणीच्या' लेखकांना हा प्रश्न विचारून पहा" एवढे बोलून या प्रश्नाचे उत्तर स्वामींनी दिले नाही.

स्वामींच्या ओठावरचा फोड कमी झाला पण दुसऱ्या अनेक तक्रारी वाढत होत्या. स्वामींच्या प्रकृतीसंबंधी जांबवंतसिंहाने पुण्याला श्रीगुरुमहाराजांना पुढील-प्रमाणे पत्र पाठविले–

## स्वामींच्या मोठ्या आजाराचे वर्ष

बनारस
१३।१।४०

पूज्यपाद श्रीगुरुमहाराज पुणे यांसी

बनारसहून चरणसेवक जांबवंतसिंहचा सेवापूर्ण सादर प्रणाम स्वीकार व्हावा.

....पू. स्वामींची प्रकृती जवळ जवळ गेला महिनाभर ठीक नाही. पूर्वी त्यांचे दोनदा दर्शन घेतले पण त्यावेळी प्रकृती ठीक नसूनही त्यांनी कोणालाही कळू दिले नाही. आज मात्र खालीलप्रमाणे त्यांच्या प्रकृतीची माहिती आहे.

....स्वामींची लिव्हर गेल्या चार महिन्यापासून कमजोर झालेली आहे. त्यावर त्यांनी काहीही औषधपाणी केलेले नाही. त्यामध्येच त्यांना जुलाब सुरू झाले. तरीही औषधी उपाय झाले नाहीत. असे होता होता खोकला सुरू झाला. तो अजूनही चालू आहे. मध्येच ताप सुरू झाला. आता जुलाब आणि ताप बंद झाला आहे. खोकला मात्र चालू आहे.

—अलिकडे स्वामींच्या तोंडावर खालच्या ओठावर लहान लहान पिवळे फोड आले आहेत. या फोडांचा त्यांना फार त्रास होत होता. आता कमी झाला आहे. सध्या स्वामींना होमिओपॅथिक डॉक्टरांचे औषध चालू आहे. या औषधाने त्रास खूपच कमी झाला आहे. लवकरच चांगले वाटू लागेल. हे फोड नाहिसे झाले म्हणजे स्वामींना एका चांगल्या अनुभविक आयुर्वेदिक वैद्याकडे नेऊन औषधोपचार करण्याचे ठरविले आहे. स्वामींचीही तशीच इच्छा आहे.

**आपण काळजी करू नये. शक्य होईल तितकी सेवा करीन. आजच स्वामींच्या दुधाची व्यवस्था केली आहे. आणखी जे जे करावे लागेल ते ते अवश्य करीन.**

**आपल्याला शरण आलेला**

आपला सेवक
**जांबवंतसिंह**

स्वतः स्वामींनी एक पत्र श्रीगुरुमहाराजांना पुण्यास पाठविले.

बनारस
१६।१।४०

नारायण स्मरणपूर्वक आशीर्वाद.

....सर्दी खोकला सुरू होऊन तापाला सुरुवात झाली. भूक बंद झाली. उपासावर उपास झाले. यकृत बिघडल्याने पातळ जुलाब सुरू झाले. अजूनही जुलाबाचा त्रास होत आहे. हात पाय आणि तोंड यावर सूज आली होती. औषधोपचार करण्याने सूज सध्या कमी आहे. याच काळात ओठाखाली ओष्ठव्रण झाला.

यामुळे पुन्हा ताप बराच वाढला. ओठाला फार मोठी सूज आली. दु:खणे वाढले. अन्न घेणे अवघड झाले. औषधाने सूज कमी तरी व्रणाचे दु:ख आहेच. जखम अद्याप भरून आली नाही.

यकृतदोषाने अग्नि मंद आहे. पूर्वी कधीही झाले नाही इतके आता शरीर दुर्बल झाले आहे. काय करणार? संन्यासी जीवन पडले! अशाही स्थितीत थोडेफार हिंडावे फिरावे लागतेच. औषध घेत आहे. उपयोग काही दिसत नाही. ओष्ठव्रणाचे दुखणे संपले म्हणजे वैद्याचे औषध घेईन.

जांबवंतसिंह रोज माझ्याकडे येत असतो. माझ्या भिक्षेसाठी पीठ, तांदूळ व डाळ इत्यादि घेऊन येत असतो. एका गवळ्याला दुधाचेही त्याने सांगून ठेवले आहे. ओठाचे दुखणे बरे झाले म्हणजे वैद्याचा उपाय सुरू करू म्हणूनही तो म्हणाला आहे. मी स्थानांतर करावे असे कितीतरी लोक सांगत आहेत. पण सध्या शरीर फारच दुबळे आहे. आणि हिवाळ्याच्या या थंडीत स्थानांतर शक्यही नाही. रस्त्यामध्ये गाडीतच काही गडबड झाली तर मोठ्या दु:खाची गोष्ट होईल. सूर्य कुंभराशीत आल्यानंतर मी स्थानांतर करण्यास समर्थ होईन.

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

पुण्याहून श्रीगुरुमहाराजांचे जांबवंतसिंहांना पत्र आले. त्याच पाकिटात स्वामींनाही पत्र होते. या पत्राला ५।६ दिवसात उत्तर पाठविताना स्वामींनी आपल्या काही गोष्टी मोकळेपणाने कळविल्या.

बनारस
२१।१।१९४०

नारायण स्मरणपूर्वक आशीर्वाद.

.... जांबवंतसिंहाच्या तर्फे आलेले तुमचे पत्र मिळाले, जांबवंतसिंह नियमीतपणे माझेकडे येत असतो. सर्व प्रकारची सेवा तत्परतेने करीत असतो.

.... मी नियमीत औषध घेत आहे पण त्याचा काही एक उपयोग होत नाही पहिल्यांदा हातापायावर सूज होती ती औषधाने कमी झाली पण पुन्हा काही दिवसांनी ती सूज पहिल्यापेक्षा जोरातच वाढली. येथील चिकित्सक आणि बुद्धिमान

लोक स्थान बदलण्यास सांगत आहेत. सर्वचजण असे म्हणतात की जागा बदलल्याशिवाय हे आजारपण हटणार नाही. विनाकारण औषध घेण्यात काही अर्थ नाही.

कुंभ संक्रांतीनंतर म्हणजे तारीख १३।२।४० नंतर पुण्याला तुमच्याकडे येण्याची प्रेरणा होत आहे. म्हणून १२।२।४० नंतर मी जरूर तुम्हाला पुण्यास येऊन भेटेन. हा प्रवासखर्च तुम्हाला करावा लागेल. दुसऱ्या ठिकाणी जाण्याची इच्छा केली तर अन्तर्यामी मला अन्य कोठेही जाऊ देत नाही. मला पुन्हा पुन्हा बजावून सांगतो की तुला पुण्याला वामनरावकडेच गेले पाहिजे. प्रत्यक्ष भेटीत सविस्तर खुलासा करीन.

भुजंगरावादिनां नारायण स्मरण सूचक आशीर्वाद. दीक्षेचे वृत्त ऐकून फार आनंद झाला. नारायण त्या जिज्ञासूची इच्छा पूर्ण करील. बाकी सर्व ठीक.

नारायण आपले कुशल करो.

शुभेच्छु
स्वामी लोकनाथतीर्थ

या पत्राप्रमाणे स्वामींना भाड्यासाठी, फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात, महाराजांनी रु. तीस म. ऑ. ने. पाठवून दिले. मासिक दक्षिणा रु. सात नित्याप्रमाणे गेलीच. सोलापूरहून श्री. पराडकर वैद्य यांनी औषधांचे रजिष्टर पार्सल, चिठ्ठी व रुपये पाच पाठवून दिले. सतन्याहून हरस्वरूपचे पत्र आले की पुण्याला जाताना त्याच्याकडे उतरावे. एका बाजूला असे आजारपण आणि दुसऱ्या बाजूला दगदगीचा कार्यक्रम. मोठेपणाच्या यातना कठीण असतात नि त्या मोठ्यांनाच समजतात. गुरु म्हणजे मोठा. गुरुत्वपदवीचा त्रास गुरुत्वाला समजणार. छोट्यांनी कळत नकळत सतत त्रास देत राहणे यातच छोट्यांचे लघुत्व! या प्रकारास यांचाही इलाज नाही त्यांचाही इलाज नाही. लघुगुरुची भेट झाली म्हणजे काय होते ते पहात रहाणे एवढे दोघांचे काम.

इतके सर्व ठरल्याप्रमाणे, प्रकृतीला कुठे थोडा आराम पडतो न पडतो तो दि. १४ फेब्रु. १९४० ला स्वामी बनारसहून मुंबई मेलने एकटेच निघाले. सतना स्टेशनला हरस्वरूप मिश्र आले होतेच. तेथे स्वामी उतरले आणि तेथून हरस्वरूपच्या लखा गावी गेले तेथे त्यांचा काही दिवस मुक्काम झाला. फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात स्वामी पुण्यास आले. पुण्याला २० नारायण पेठेत उतरले.

## अनाग्रही स्वामींची ऋजुता !

स्वामीजी हवापालट करण्यासाठी पुण्यात आले. महाराजांकडे निवास केला. स्वामींच्या प्रकृतीची बिमारी नित्याच्या येणाऱ्या साधकांना नाना भालेराव आणि महाराज यांचेकडून समजली होती. इतर येणाऱ्यांनाही आजाराची माहिती दिली जात होती. स्वामींच्या क्षीण प्रकृतीवरून व हालचालीवरून त्यांच्या अशक्तपणाची जाणीव लगेच होत होती. तरी नित्यक्रम तोच, पण, शरीराच्या स्वास्थ्याला सहन होईल या बेताने चालला होता. सायंकाळी थोडे फिरून येणे होई. पथ्यपाणी, विश्रांती, यामुळे प्रकृतीला थोडा आराम मिळाला.

पुण्यातील या काळातील नवे साधक श्री. नारायणरा देशपांडे, शिरवळकर यांना स्वामींच्या सहवासाचा योग भरपूर आला. नारायणराव देशपांडे हे नाना भालेरावांच्याप्रमाणेच कोर्टात कामास होते. उभयतांचा स्नेहही फार आपुलकीचा होता. नित्य सायंकाळी कोर्ट सुटले की दोघेजण बरोबर बाहेर पडत. नारायणराव देशपांडे यांचे घर बुधवार पेठेत, तपकीर गल्लीत आहे. हे जवळचे ठिकाण म्हणून नाना भालेराव आणि नारायणराव नव्या पुलावरून या ठिकाणी आधी येत. दिवसभर कोर्टाकचेरीच्या उद्योगात आणि बाहेरच्या पाण्याचे निषिद्धत्त्व म्हणून चहापाण्याला फुरसत नसे. सायंकाळी चारला घरी आले म्हणजे हात पाय धुवून चहापाणी करून तासादीड तासाची साधनेची बैठक करीत. मग तेथून हे दोघे जण २० नारायण पेठेत महाराजांचे दर्शनास, सायं आरतीस येत. नाना भालेराव यांचेकडे सायं आरतीचे काम असे. नारायणराव देशपांडे आरत्या चालीवर म्हणण्यामध्ये निष्णात होते. सध्या आश्रमात ज्या आरत्या म्हटल्या जातात त्यांच्या चाली बसवून त्या इतरांकडून घटवून घेण्याचे काम नारायणराव देशपांडे यांचे आहे. सायंकाळी ६/६॥ ला महाराजांचेकडे आले की त्यांच्याबरोबर बाहेर फिरायला जाण्याची संधी मिळाली तर एक तासात फिरून यायचे. मग आरती करून नारायणराव रात्री ८॥/९ च्या सुमारास घरी जात असत. सूर्य चंद्राच्या नियमीतपणामुळे साऱ्या विश्वाला जसा नियमीतपणा आला आहे तसा नियमीतपणा महाराज आणि स्वामी यांच्यामुळे अनेक शिष्य साधकामध्येही आलेला आढळतो. नारायणरावांचा सायंकाळचा ४/५ तासांचा कार्यक्रम व्यवहार आणि संसार यापासून अलग करून महाराज आणि अध्यात्म यासाठी बांधून दिलेला होता. ओघानेच नारायणरावांचा संबंध स्वामींशी पण भरपूर आला.

नारायणराव आणि त्यांच्या पत्नी या उभयतांनी महाराजांचेकडून अनुग्रह घेतलेला होता तेव्हा स्वामींच्या दर्शनास ही लक्ष्मीनारायणाची जोडी आली म्हणजे स्वामींनी आपल्यासमोर बसलेल्या सर्वांना मोठ्या कौतुकाने आणि अभिमानाने सांगावे "ये देखो ये दोनों वामनरावके शिष्य आये हैं। बैठो बैठो।" स्वामींचा मुक्काम पुण्यात असला की दर्शनाला सायंकाळी लवकर यायचा नारायणरायांचा परिपाठ असे. मग फिरून येणे, बैठक करणे वगैरे स्वामींच्या सहवासात जसे घडेल तसे. सायंकाळी स्वामींच्याबरोबर फिरून येण्यास ३ / ४ मंडळी असत. फिरण्याचा कार्यक्रम गप्पागोष्टींच्या विविधपणामुळें मनोरंजक होत असे.

या खेपेच्या मुक्कामात नारायणरावांना स्वामींना आपल्या घरी नेण्याची इच्छा फार झाली. स्वामींना घरीच आणावयाचे आहे तर भिक्षेला आणावे असे त्यांना वाटू लागले. पण स्वामींची कडक शिस्त त्यांना ठाऊक होती. त्याचबरोबर स्वामींची लहर असली तर 'होकार' देणार नि येणार आणि लहर नसली तर नाही येणार म्हणजे नाही येणार. ही अवघड कामगिरी त्यांनी नानांच्यावर सोपविली. नाना म्हणाले तुम्ही असताना तुमच्या समोरच विचारू, पाहू काय म्हणतात ते. पण आश्चर्य असे की स्वामींनी भिक्षेला येण्याचे ताबडतोब कबूल केले, स्वामींचा होकार मिळताच नारायणरावांना अत्यानंद झाला. त्यांनी आणखी १०।१२ मंडळी या निमित्ताने भोजनास सांगितली. नाना भालेराव, किर्लोस्कर, गोरे भटजी असे साधकही त्यामध्ये होते.

ठरल्या वेळी भोजनाची तयारी झाली. ब्राह्मण मंडळी आली. स्वामींना मुद्दाम टांग्यामधून आणवले. पाट, रांगोळ्या, उदबत्त्यांचा घमघमाट याने वातावरण प्रसन्न केले होते. स्वामी येणार म्हणून सकाळपासून जी धावपळ होती ती स्वामी आले हे समजताच चौपट झाली. नंतर सर्वत्र शांतता निर्माण झाली. लगबगीने नारायणराव वाड्याच्या दारात गेले. साष्टांग नमस्कार करून स्वामींना घरात आणले. आसनावर बसवून थोडी विश्रांती दिली. थोड्यावेळाने सर्व तयारी झाल्यावर त्यांची यथाविधी पूजा, संकल्प करून भिक्षेसाठी पाटावर बसण्यास नेले.

स्वामींची आवड निवड लक्षात घेऊन सारे पदार्थ तयार केले होते. संन्यासाश्रमाचे नियम जेवढे कळले, जे पूर्वीच ठाऊक होते किंवा ऐनवेळी जे कोणी सांगत होते त्याप्रमाणे सर्व तयारी केली होती. पण !! एक फार मोठी चूक चुकून राहून

गेली होती. ती कोणाच्याही लक्षात आली नाही. स्वामी पाटावर बसण्यास आले तेव्हा सर्वजण उभे राहिले. यावेळी कोणीही स्वामींना नमस्कार केला नाही. स्वामी पाटावर बसले आणि एकदा आपल्या दृष्टीने वाढलेले पान पाहू लागले. आणि दुसऱ्याच क्षणी ते चमकले! कारण मसाले भातातील वांगी चमकली! संन्याशाला वांगे निषिद्ध असते. स्वामींनी शेजारच्या व्यक्तीला ते काय आहे म्हणून विचारले. त्यांनेही ते वांगे आहे म्हणून सांगताच स्वामींनी आपली प्रश्नांकित मुद्रा अधिकच गंभीर केली. सर्वत्र कुजबूज सुरू झाली. नारायणरावांच्या कानावर ही गोष्ट गेली. आता काय होणार या कल्पनेने संशयाचे वातावरण निर्माण झाले. स्वामी पानावरून उठणार ही कल्पना प्रत्येकाच्या मनांत आली ती ठाण मांडून बसली. नारायणरावांना सुद्धा याच कल्पनेचा फार मोठा धक्का बसला.

ते घाईघाईने क्षमा मागण्यास स्वामींच्या जवळ आले. मोठ्या नम्रपणे क्षमा मागितली. "स्वामी, वाटल्यास पुन्हा नवीन पान वाढतो, काय वाटेल ते करतो· पण कृपा करून पानावरून उठू नये एवढी प्रार्थना आहे. प्रभू, अनावधानाने घडलेला अपराध पोटात घालावा...." हे शब्द बोलतांना नारायणरावांच्या दोन्ही डोळ्यांतून अश्रू धारा वहात होता. मोठ्या हळव्या मनाचे ते होते. भाविक होते. श्रद्धाळू होते. सर्वजण ते दृश्य अवाक् होऊन पहात होते. सर्वत्र स्तब्धता होती. स्वामींनी क्षणभर डोळे मिटले व म्हणाले, "चिंता नको. पात्र बदला. बस्स!" स्वत: हातपाय धुऊन आले आणि बसले.

स्वामींचा निर्णय ऐकून सर्वांना आश्चर्य वाटले. नारायणरावांना फार आनंद झाला. एकूण सर्वच कार्यक्रम आनंदात पार पडला.

हेच स्वामीजी काही दोष घडला तर पात्रावरून उठलेले आहेत. दिवसभर उपोषण केलेले आहे. जेवताना घासात केस आला तर लगेच 'नारायण' म्हणून आपोषण घेऊन पानावरून उठले आहेत. ही गोष्ट ज्यांना माहित होती त्यांना आजच्या प्रसंगाने खरोखर आश्चर्य वाटले. नाना भालेरावांना सुद्धा आश्चर्य वाटले. स्वामींच्या स्वभावाची ती अत्यंत ऋजुता होती.

## भोळी शैशव वृत्ती!

स्वामींचा मुक्काम २० नारायण पेठेत होता. प्रकृती साधारण होती. हवा-

पालट करण्यासाठी पुण्यास आले होते. तरी पुण्यास आल्यापासून प्रकृती सुधारू लागली होती. स्वामींच्या प्रकृतीमध्ये मुख्य दोष होता तो बद्धकोष्ठतेचा. सारे जीवन कष्टाचे असल्याने प्रकृतीच्या या दोषावर, कायमचा इलाज शक्य नव्हता. म्हणून ही तक्रार स्वामींची नेहमींची असे. त्यातून यावेळी ते नुकतेच आजारातून उठले असल्याने शौचाची तक्रार नेहमीपेक्षा जास्त होती. या मुक्कामात स्वामी पुण्यास होते पण महाराज पुण्यात नव्हते. तरी स्वामींचा मुक्काम मात्र महाराजांच्या नारायण पेठेतील खोलीतच होता.

नाना आणि काकू यांना स्वामीसेवेची संधी घर चालून आली. नानांचा स्वभाव शांत, विनोदी, वृत्ती सेवेची यामुळे स्वामींना नानांच्याकडे कधीच संकोच वाटत नसे. अगदी घरच्यासारखे राहात, मोकळेपणाने हसून खेळून असत. स्वामी नानांशी मनमोकळेपणे बोलत. आपल्या अडीअडचणी नि:संकोचपणे सांगत. त्यामुळे स्वामींचा पुण्याला मुक्काम म्हणजे भालेराव मंडळींना पर्वणीच असे. तेव्हा महाराज नसताना स्वामींनी आपली बद्धकोष्ठतेची तक्रार नानांच्याजवळ सांगितली. त्यावेळी नानांना स्वामींना त्यावर एक उपाय सांगण्याची इच्छा झाली. नाना स्वामींना म्हणाले "स्वामी एकदा एनिमा घेऊन पहाता का?" त्यावर स्वामी म्हणाले "मी आजपर्यंत कधीही एनिमा घेतला नाही. मला त्याची कल्पना नाही." यावर नाना म्हणाले "आपल्याला चांगला आराम वाटेल. एनिमाची सर्व व्यवस्था मी करतो. आपण बिलकूल काळजी करू नये."

स्वामी म्हणाले "आपली इच्छा असेल तर पहा एनिमा देऊन." मग नानांनी एनिमाची तयारी केली. महाराजांचे खोलीत स्वामींना एनिमा दिला. तेथून शौचकूप दिण्डी दरवाज्यापाशी आहेत. सुमारे १०० पावलांच्या अंतरावर! स्वामी घाईघाईने शौचाला गेले. एनिमाच घेतला होता त्यामुळे शौचाला अगदी साफ झाली. हा शौचानंद स्वामींना यापूर्वी कधीच मिळाला नव्हता. स्वामी शौच उरकून बाहेर आले आणि आणि तेथूनच आनंदाच्या भरात मोठयांदा ओरडून म्हणाले "अहो भुजंगराव! आज शौचाला अगदी साफ झाली. हलके वाटतय!"

गोवईकरांची ती ५०।६० कुटुंबांची मोठी चाळ. शंभर दीडशे लोक रहात असतील त्या चाळीत. अगदी लांबच्या नाही परंतु दिंडी दरवाजाच्या जवळपासच्या बिऱ्हाडकरूंना स्वामींचा आवाज ऐकू गेला. पुष्कळांनी बाहेर येऊन काय झाले ते

पाहिले. शहरी जीवनात इतका मोकळेपणा कुठला असणार ! चांगले वाईट काही असले तरी लपून छपून दृष्टीआड करून वागण्याची सवय झालेले हे शहरी लोक ! स्वामींचा मोकळेपणा त्यांना अगदी 'असंस्कृत' 'असभ्य' 'अडाणी' वाटला असेल. काहीजण तर तोंडाला पदर लावून हसले सुद्धा ! असल्या ढोंगी प्रवृत्तीची स्वामींना पर्वा थोडीच होती.

स्वामींचे शब्द ऐकताच नाना धावत स्वामींच्या जवळ गेले. नानांनाही हसू आवरेना. तरी स्वतःला सावरीत नाना स्वामींना म्हणाले, "स्वामी ! आता बरे वाटते ना ?" "हां हां" म्हणत स्वामींनी आपला आनंद पुन्हा एकदा नानांना स्पष्ट करून सांगितला. या गोष्टी वाड्याच्या चौकात उभे राहून झाल्या. स्वामींची सरळ भोळी शैशव वृत्ती पाहून सर्व ऐकणारे हसत होते. स्वामी आपला स्वाभाविक आनंद प्रकट करीत होते. या स्वाभाविक आनंदाला वयाचा प्रौढपणा अडवीत नव्हता. यावेळी त्यांचा बालभाव जागृत झाला होता. स्वामी आपल्याच आनंदात हसत होते.

स्वामींच्या या वृत्तीचा नानांना वेगळाच अनुभव येत होता. लहान वयातील मुलाकडून प्रौढ विचार ऐकताना त्या मुलाचे जसे असामान्यपण स्पष्ट दिसते तसेच प्रौढ व्यक्तीमध्ये बालकाचा भोळेपणा, निरागसता, सरळपणा, आनंद हे गुण दिसणे हे सुद्धा असामान्यत्वाचेच लक्षण आहे ही ऋजुता स्वामींच्यामध्ये नेहमी दिसत असे.

जरा अधिक विचार करून पहाता नानांना असेही वाटे की स्वामींची ही स्थिती आवरण रहित आहे. श्रीगुरुदेवदत्तात्रेय "बालोन्मत्त पिशाच्च वेषधारी" आहेत. तसेच स्वामी सुद्धा अनेक ठिकाणी बालभावात, उन्मत्त स्थितीत, आणि पिशाच्च वृत्तीतही आढळतात. या अवस्थेत त्यांचे स्वरूप प्रखरपणे झळकत असते. हा प्रसंग सामान्य पण स्वामींची वृत्ती असामान्य होती.

या काळात आणखी काही मंडळी स्वामींच्या सहवासात आली. त्यामध्ये काका दामले यांचे नाव उल्लेखनीय आहे. हे काका दामले मोठे दत्तभक्त होते. त्यांचा आणि महाराजांचा ऋणानुबंध जुना होता. यामुळे काका स्वामींच्या सहवासात आले. काकांचे चिरंजीव दिगंबर गणेश दामले हे सराफी व्यवसाय करीत. त्यांचाही स्वामींशी निकटचा संबंध आला. इतकेच नव्हे तर दिगंबरपंतांचे चिरंजीव दत्तात्रेय यांचाही स्वामींशी घनिष्ठ संबंध आला. थोडक्यात सारे दामले कुटुंब स्वामींच्या

कृपाप्रसादाने न्हाऊन निघाले. स्वामी अनेक वेळा काकांच्या घरी गेले. दिगंबरपंतांशी स्वामींनी पत्रव्यवहार केला आणि दत्तात्रेयाकडून स्वामींनी मनसोक्त सेवाही घेतली. स्वामीस्मरणाने त्या कुटुंबातील प्रत्येकाचे हृदय भरून येते. इतके अलोट प्रेम त्या कुटुंबातील प्रत्येकावर स्वामींनी केले आहे की स्वामींच्या स्मृतीने या सर्वांचे डोळे भरून येतात.

स्वामींचा २० नारायण पेठेतील मुक्काम सुमारे महिना दीड महिना एवढाच होता. शंकरराव मार्कंड नित्य स्वामींकडे येत, दर्शन घेत आणि स्वामींना आपल्या घरी राहण्यासाठी चलण्याचा आग्रह करीत. पण स्वामींनी येतो येतो म्हणून एवढा काळ काढला. मग मात्र ते पुरंदरे कॉलनीतील शंकरराव मार्कंडाचे घरी राहण्यास गेले.

स्वामी तिकडे गेले तसे सारे शिष्य स्वामींच्या दर्शनास तिकडे जाऊ लागले. सूर्यमालेतील ग्रह, उपग्रह, चांदण्या, तारे, नक्षत्रे सूर्याला सोडून कुठे जाणार? साऱ्यांचे आकर्षण–अंतर सूर्याशी ठरले आहे. स्वामी इकडे राहण्यास आले म्हणजे सायंकाळचे फिरणे बहुतेक पर्वतीवर असे. स्वामी यावेळी आजारी स्वरुपातच होते. त्यामुळे विशेष दगदग करीत नसत. पण रोज काही ना काही तरी विशेष चालू असे.

स्वामींनी एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात पुणे सोडण्याची भाषा सुरू केली. पुन्हा बनारसला जाण्याचे त्यांच्या मनाने घेतले. शंकरराव मार्कंड यांनी स्वामींना प्रार्थना केली. "स्वामी आपली प्रकृती ठीक नाही. एवढा लांबचा प्रवास झेपणार नाही. मी आपणाबरोबर येतो. प्रथम भंडाऱ्याला माझे घरी जाऊ. तेथे ८।१० दिवस हवापालट, विश्रांती घेऊ. नंतर आपण आपल्या सोयीने बनारसला जावे. त्याप्रमाणे पुढचीही सर्व व्यवस्था मी करून देतो." शंकररावांच्या आग्रहाप्रमाणे स्वामींनी जाण्याचे ठरविले.

५ मे १९४० ला स्वामी शंकररावांचे बरोबर प्रथम भंडाऱ्यास आले. तेथे ८।१० दिवस मुक्काम केला. आणि तेथून स्वामी १४ मे १९४० ला निघाले ते कटनी आणि सतना येथे थांबून १९ मेला बनारसला पोहचले.

भंडाऱ्यास उन्हाळ्याचा फार त्रास होऊ लागल्यामुळे फार काळ थांबले नाहीत. शंकररावांची रेस नुकतीच सुरू झाली होती. संपत्तीचा जोर वाढता होता.

## आजार ! आणि अद्‌भुत अनुभव ! !

पुण्याहून स्वामी काशीत B १३।१७७ सोनारपुरा या ठिकाणी आले. पुणे सोडल्यापासून स्वामींना उन्हाळ्याचा त्रास सुरू झाला. म्हणून ते भंडाऱ्यास फार थांबले नाहीत आणि कटनी, सतन्यासही फार थांबले नाहीत. काशीतही उन्हाळा फार असल्याचे पत्राने कळविले होते. अशा स्थितीत प्रकृती सांभाळणे माझ्या हातात नाही असेही त्यांनी महाराजांना पत्रातून सांगितले होते. या दिवसात जांबवंतसिंह वसुलीसाठी काशीचे बाहेर, महाराष्ट्रात गेले होते.

हैद्राबाद (दक्षिण) चे शालीबंडा मोहल्यात रहाणारे, एक मोठे विद्वान, भगवद्भक्त श्री शिवराजा हे सहकुटुंब स्वामींच्या दर्शनासाठी काशीस आले होते. एक आठवडा ते काशीत राहिले. त्यांनी स्वामींच्या पुढे रोज पहाटे साधना केली. होईल तेवढी स्वामींची सेवा केली. निघताना स्वामींची पूजा केली, प्रसाद, दक्षिणा ठेवली आणि मोठ्या संतोषाने घरी परतले.

जांबवंतसिंहाने श्रीगुरुपौर्णिमेच्या वेळी सोलापूरला जाऊन महाराजांच्या पूजनाचा अमृतसिद्धी योग या वर्षी साधला. तसेच काशीला स्वामींनाही ५ रु. गुरुदक्षिणा म. ऑ. ने पाठविली. वसुलीचे काम आटोपून जांबवंतजी काशीला परत आले. स्वामींची प्रकृती साधारण होती. ते अंथरुणावर पडून होते. नाइलाज तेव्हां अंथरुण सोडीत. स्वामींच्या आजाराचे वृत्त जांबवंतसिंहाने महाराजांना कळविले. स्वामींची, मुद्दाम लक्ष देऊन, चांगली व्यवस्था केली पाहिजे अशी इच्छा लिहून आणखी एक सल्ला पत्रातून दिला. सर्व काही शुद्ध अंतःकरणातून लिहिले होते.

अलिकडे एका मोठ्या लखपतीने महाराजांचेकडून शक्तिपात दीक्षा घेतली होती. ते सद्गृहस्थ सरकारी उच्च पदस्थाची पदवी धारण केलेले सन्माननीय होते. सर चुनिलाल मेहता हे ते गृहस्थ होत. त्यांचा उपयोग स्वामींच्या व्यवस्थेसाठी करून घ्यावा असा सल्ला जांबवंताने दिला होता. सर चुनिलाल यांना स्वामींच्याबद्दल नितांत आदर, श्रद्धा व भक्ति होती. महाराजांना हा सल्ला पसंत नव्हता. कुठेही व काहीही मागणे त्यांच्या मनाला रुचणारे नव्हते. पुन्हा व्यवहार अनेक गोष्टी सुचवीत असतो, त्याची कल्पना सर्वांना असू शकत नसते.

स्वामींचा हा चातुर्मास काशीतच झाला. चातुर्मास समाप्तीच्या वेळी स्वामींनी

मोठा भोजनभंडारा केला. अनेक साधू, संन्यासी, आपले सर्व साधक शिष्य, यांना निमंत्रण केले होते. हे सर्व आजारपणातच चालले होते.

दिनांक २५।९।४० ला जांबवंतसिंहाने सोलापूरच्या पत्त्यावर महाराजांना तार केली :—

"Swamiji seriously ill."

ही तार पाहाताच सर्वचजण गडबडून गेले. महाराजांनी भगवंतराव उपाध्ये यांना काशीला पाठवून देण्याची व्यवस्था केली. शंकरराव मार्कंडही त्यांचेबरोबर काशीस गेले. भगवंतराव उपाध्ये यांनी काशीमध्ये दोन महिने मुक्काम केला. त्यांनी स्वामींची न भूतो न भविष्यति अशी प्रगाढ सेवा केली. त्यांचे अनंत जन्मीचे पुण्य उदयास आले आणि ही स्वामीसेवेची संधी त्यांना प्राप्त झाली. नित्याची सेवा वेगळी असते आणि आजारातील सेवा वेगळी असते. आजारातील सेवा निःसंकोचपणे मनापासून घेतली जाते आणि केली जाते अशी ही अपूर्व संधी असते.

स्वामींचे हे आजारपण फार भयानक होते. जवळ बसलेले सर्व शिष्य घाबरून जात. या आजारातील एक घटना आहे. स्वामींचा आजार फार वाढला होता. जवळ बसलेले सर्वजण शेवटचे क्षण मोजीत होते. स्वामींचे सारे शरीर जमिनीपासून उंच उडत होते. ते झटके इतक्या जोराचे होते की डोक्यापासून पायापर्यंत सारे शरीर एकाच झटक्यात जमिनीपासून ८ ते १० इंच उंच उडत होते. सर्व साधक शिष्य स्वामींचे शरीर दाबून धरण्याचा प्रयत्न करीत पण त्याचा काही उपयोग न होता शरीर उंच उडतच होते. असा आजार कधी कोणी ऐकलाही नाही आणि पाहिलाही नाही.

त्या स्थितीत स्वामींचे ओठ काही बोलण्यासाठी हालत असलेले जांबवंतसिंहाने पाहिले. त्याने आपले कान त्यांच्या ओठाजवळ नेले. तेव्हा क्षीण आवाजातील पुढील वाक्य त्याच्या कानावर पडले.

"वह चला गया। अब चिंता नहीं। डरना नहीं।" या आजारात स्वामींना फारच अशक्तता आली. शंकरराव मार्कंड फार थांबले नाहीत. ते ४।५ दिवसातच

परतले. महाराजांना दिवाळीची सुट्टी लागताच ते प्रथम बनारसला आले होते. तो १९४० च्या ऑक्टोबरचा १ ला आठवडा होता. श्रीगुरुद्वादशीस अवकाश होता. स्वामींच्या प्रकृतीची काळजी विशेष होती. महाराज काशीत आले. त्यांनी स्वामींचे दर्शन घेतले. स्वामींना फार फार आनंद झाला. निम्मेअधिक दुखणे नाहिसे झाले. स्वामींची दुर्बल अवस्था पाहून महाराजांचे अंतःकरण कळवळले. अजूनही स्वामींना जुलाब होत होते. हातापायावर सूज होती. अस्वस्थता फार होती. सहन करणे कठीण होते. पण इलाज नव्हता.

महाराज काशीत काही दिवस राहिले. सर्व व्यवस्था उत्तम लावून दिली. प्रत्येक साधकाला आळीपाळीने दोन दोन तासांची सेवेची संधी दिली. रात्रीच्या वेळीही स्वामींच्याजवळ पाळीप्रमाणे साधक असतील अशी सोय लावून दिली. औषध पाण्याची सोय नीटनेटकी केली. यामुळे साधकांना विश्रांती मिळाल्याने सेवा तत्परतेने होऊ लागली. सेवेची संधी मिळाल्याने भरपूर साधक हाताशी कामाला उपलब्ध झाले. रात्रीसुद्धा जागे राहून सेवा केल्यामुळे स्वामींना फारच आराम मिळू लागला. आजाऱ्याची उत्तम शुश्रुषा हा मोठा उपचार असतो. तो उत्तम तऱ्हेने सुरू झाला. या तत्परतेने स्वामींचे कष्ट व मानसिक ताण वाचले.

श्री. भगवंतराव उपाध्ये काशीत स्वामीसेवेसाठी पाठविले होते. त्यांना महाराजांनी भरपूर मार्गदर्शन केले. खूप सूचना देऊन ठेवल्या. श्रीगुरुद्वादशी जशी जवळ आली तशी स्वामींच्याजवळ महाराज प्रार्थना करून म्हणाले, श्रीक्षेत्र नृसिंहवाडीला प्रतिवर्षाप्रमाणे जाऊन येण्याची अनुज्ञा असावी. वाडीहून महाराज परत काशीस येणार हे समजताच स्वामींनी अनुज्ञा दिली.

महाराज बनारसहून वाडीला आले. श्रीगुरुद्वादशीच्या महापर्वकाळी भल्या पहाटे उठून, काकड आरती करून, कृष्णेच्या पवित्र जलाने स्नान केले. सचैल अवस्थेत श्रीनृसिंहसरस्वती स्वामी महाराजांच्या मनोहर पादुकांवर गरम पाण्याने स्नान घातले व प्रदक्षिणा करून, वर सद्‌गुरु प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामी महाराजादि महापुरुषांना स्नान घालून, दर्शन घेऊन आपल्या निवासात आले. आपले आह्निक उरकले. दुपारी महाप्रसाद घेतला. आणि लगेच काशीकडे परतले. ध्येयवादी महापुरुषांच्या जीवनात दृढ व्रताचे माहात्म्य केवढे असते हे या प्रसंगातून स्पष्ट होते. पूर्वेकडे उगवणारा सूर्य कदाचित् पश्चिमेकडे उगवू शकेल; चिखलात

उमलणारे कमळ कदाचित् पर्वत शिखरावरील खडकावरही उमलू शकेल असे अशक्य वाटणारे शक्य होईल पण सत्पुरुषांची वाणी कदापीहि बदलणारी नसते. महाराज परत एक आठवड्यात काशीत येऊन पोहचले.

श्रीगुरुमहाराज काशीत आल्यानंतरची एक घटना आहे. स्वामींची स्मरण-शक्ती किती विलक्षण होती त्याचा हा उत्तम पुरावा आहे. स्वामी आजारी आहेत व त्यांचेसाठी महाराजही येथे आले आहेत अशी बातमी मिळताच एक तरूण स्वामींच्याकडे आला. जवळच महाराजही बसले होते. इतर अनेक शिष्यमंडळी बसली होती. त्या युवकाने येताच स्वामींना साष्टांग नमस्कार केला. बरोबर आणलेली फळे व दक्षिणा स्वामींच्या पुढे ठेवली. महाराजांना नमस्कार करून स्मितहास्य केले व तेथेच स्वामींच्यापुढे तो युवक क्षणभर उभा राहिला.

स्वामीजी अंथरुणावर पडले होते. त्यांनी त्या तरुणाकडे क्षणभर पाहिले नि लगेच म्हणाले "काय दिगंबर इकडे कशासाठी आला आहेस? शंकरकाका कसे काय आहेत?" महाराज या दिगंबरला चांगलेच ओळखत होते. त्यांना एवढेही ठाऊक होते की स्वामींचा आणि दिगंबरचा संबंध वीस वर्षांपूर्वी आला होता. स्वामी आजेगावला त्यांचे घरी गेले होते त्यावेळी दिगंबरचे वय दोन अडीच वर्षांचे होते. त्यानंतर त्याचा नि स्वामींचा संबंध कुठेच आला नाही. त्यानंतर आजची ही भेट! अडीच वर्षाचा मुलगा २२/२३ वयाचा तरूण होऊन पुढे उभा असतांना त्याला स्वामींनी ओळखले हे केवढे आश्चर्य आहे! अगदी घरगुती नावाने हाक मारली. संदर्भ स्पष्ट करण्यासाठी शंकरकाकांचीही चौकशी केली. याचे महाराजांनासुद्धा आश्चर्य वाटले.

हा दिगंबर म्हणजे श्रीशंकरकाका आजेगावकरांचा मुलगा एम्. एस्सी साठी बनारस हिंदु युनिव्हर्सिटीमध्ये येऊन राहिला होता. स्वामींच्या आजारपणाच्या बातमीने इकडे आला होता. स्वामींची ही असामान्य स्मरणशक्ती आजाराने जर्जर झालेल्या शारीरिक अवस्थेत आणि क्षीण झालेल्या मानसिक शक्तीच्या अवस्थेत अनुभवास आलेली आहे. स्वामी एकपाठी होते. त्यामुळे दासबोध, गाथा, ग्रंथ एका वाचनात त्यांच्या ध्यानांत राहिलेले होते. स्वामी संदर्भ देताना श्लोक, ओव्या सांगून देत असत. अशी त्यांची विलक्षण स्मरणशक्ती होती.

महाराज कार्तिक महिन्यापर्यंत काशीत स्वामींच्या जवळ राहिले. स्वामींच्या प्रकृतीला जसजसा आराम पडू लागला तसे त्यांनी तीर्थयात्रेचा आपला मनोदय स्वामींना सांगितला. स्वामींना जरा हुशारी वाटू लागली तेव्हा त्यांनी महाराजांना तीर्थयात्रेची परवानगी दिली. मग महाराज गयेवरून कलकत्त्याला गेले. तेथून दिल्लीकडे गेले.

स्वामींना स्थानांतराची इच्छा झाली. महाराजांनीही तसे सांगून ठेवले होते. मग स्वामी श्रीभगवंतराव उपाध्ये यांचेबरोबर पुण्यास निघून आले. श्रीदत्तजयंतीच्या महोत्सवास स्वामी पुण्यात होते. मोठ्या आनंदाने ते पुण्यात राहिले.

## श्री. भगवंतराव उपाध्ये यांचा अनुभव

स्वामींची प्रकृती ठीक नसल्याची तार महाराजांना मिळाली. त्यांनी ताबडतोब थुरावासला श्री. भगवंतराव उपाध्ये यांना तार करून काशीस जाण्यास सांगितले. त्यावेळची ही घटना आहे.

तार मिळताच भगवंतराव काशीला जाण्याच्या तयारीला लागले, तेवढ्यात कुठल्याशा खटल्यात त्यांना पोलीसांनी घेरले. पोलीस घरी आले व तुम्ही सरकारी नियमाप्रमाणे परगावी जाऊ शकत नाही. आम्ही तुमच्यावर समन्स बजावण्यास आलो आहोत इत्यादि सांगून असाही दम दिला की तुम्ही जर परगावी गेलात तर तुमच्यावर फरारी झाल्याचा आरोप आणखी लागेल.

भगवंतरावांनी पोलीसांना खूप समजाविण्याचा प्रयत्न केला. पत्र, तार सर्व काही दाखविले. पण पोलीस एकही शब्द ऐकण्यास तयार नव्हते. त्यावेळी भगवंतरावांना जो काही आवेश आला की त्या आवेशात ते पोलीसांना म्हणाले "तुमची जी इच्छा असेल ते करा. मी गुरुसेवेसाठी जाणारच. तुम्ही अजून तरी माझेवर समन्स बजावलेले नाही." असे सांगून ते सरळ गाडीत जाऊन बसले. काशीला आले. भरपूर गुरुसेवा केली. स्वामींना पुण्याला पोहचते केले. पुण्यात स्वामींच्या इच्छेप्रमाणे मुक्काम करून स्वामींना घेऊन नासिकला गेले– आणि नंतर थुरावासला गेले.

तोपर्यंत इकडे त्या खटल्याचा मागमूसही शिल्लक राहिला नव्हता. जणू

समर्थांनी आपल्या सेवकाचे अल्पधारिष्टय कृपाळूपणे पाहिले आणि समर्थांच्या सेवकाकडे वक्रदृष्टीने कोणीही पाहू शकत नाही हे सिद्ध करून दाखविले.

महाराजांनी स्वामींच्या सेवेसाठी तात्काळ भगवंतरावांची योजना केली ही घटनाही अपूर्व भाग्याची आहे. भगवंतराव टापटिपीचे, तत्परतेचे, श्रद्धाळू, पाकशास्त्रादि व्यवस्थेत निपुण, निरंहकारी, कष्टाळू साधक होते तसेच टाकलेला शब्द हृदयाच्या कुपीने झेलणारे आज्ञाधारक होते.

## "वामन ! शक्कर कम है।"

महाराज काशीत होते. स्वामींची प्रकृती सुधारत होती. स्वामींची सेवा महाराज मनोभावे करीत होते. काशीतील साधकांनाही वेळा ठरवून दिल्या होत्या. त्याप्रमाणे सर्व काही अचूक सुरू झाले होते. अशा परिस्थितीत स्वामींनी एकदा महाराजांना अर्धा शेर साखर विकत आणण्यास सांगितले. महाराज साखर आणण्यास बाहेर पडले. दुकानात गेले. अर्धा शेर साखर घेऊन, त्या दुकानदारास पैसे देऊन परत आले.

स्वामींनी तो साखरेचा पुडा हातात घेतला. हाताने तोलून पाहिला. त्यांना ती साखर कमी वाटली. ते म्हणाले "वामन ! शक्कर कम है। ये बेपारी बहूत झूठापन करते हैं। हम उनपर दया करेंगे तो वे हमें गँवार समजते हैं।" स्वामींना त्या दुकानदाराचा राग आला होता. पैसे भरपूर घेऊन मालातही खोटेपणा, वजनातही खोटेपणा करण्याची व्यापारी वृत्ती स्वामींना बिलकूल पसंत नसे. या व्यापाऱ्यांची नफाखोरी फार वाढली आहे. त्यांना सोडून देणे चांगले नाहीं. त्यांची फसवेगिरी उघड केली म्हणजे ते सुधारतील. असे स्वामींनी खूप सांगितले.

पण येवढ्याने स्वामींना समाधान होईना. त्यांनी साखरेचा पुडा घेतला आणि महाराजांना म्हणाले "वामन चलो मेरे साथ ! बताव दुकान।" महाराजांच्या शांत प्रवृत्तीत हे बसत नव्हते. भांडण म्हटले की त्यांच्या अंगावर काटा उभा राहतो. 'उपेक्षा आणि कीव करणे' या शस्त्रांनी नापसंती व्यक्त केली म्हणजे झाले. त्यासाठी आवाज वाढवून, चार लोकांच्यापुढे नाटक करून, शब्दाने शब्द वाढवून भांडण केले म्हणजेच अन्यायाची नापसंती स्पष्ट होते असे थोडेच आहे. पण व्यक्ति तितक्या प्रकृती असतातच. स्वामींच्या तिखट प्रकृतीला अन्याय म्हटला की असह्यच !!

त्याचा प्रतिकारही तसाच आकाशपाताळ एक करूनच ते करणार! हा त्यांच्या बंगाली प्रकृतीचा धर्म होता. स्वामी निघाले असे पहाताच महाराजही त्यांच्या बरोबर बाहेर पडले.

आता दुकानात काय होणार याची धाकधुक महाराजांच्या मनात होती. त्यांना एवढेच समाधान वाटत होते की हा प्रसंग काशीत घडत होता, पुण्यात नाही. महाराजांनी स्वामींना दुकान दाखविले. स्वामी पुढे झाले. महाराज त्यांच्या मागोमाग दुकानात शिरले.

"काय रे? पैसे घेऊन खोटेपणा करतोस? ही अर्धा शेर साखर आता माझ्या या माणसाने तुमच्या दुकानातून नेली. ही साखर अर्धा शेर नाही. पुन्हा वजन करून पहा आहे का ती अर्धा शेर?" स्वामींचे स्वरूप पाहूनच तो दुकानदार नरम आला होता. महाराजांच्याकडे पाहून या व्यक्तीने आत्ताच अर्धा शेर साखर नेल्याचे त्याच्या लक्षात आले. बाकीचे गिऱ्हाईक थांबवून त्याने तो साखरेचा पुडा तराजूच्या पारड्यात टाकला. अर्ध्या शेराचे वजन दुसऱ्या पारड्यात टाकले. आणि! साखर कमी होती हे सिद्ध झाले! स्वामींनी महाराजांचेकडे वळून म्हटले "देखा वामन! कैसा झूठापन ये करते हैं।"

महाराज एका वेगळ्याच तंद्रीत होते. या प्रसंगाप्रमाणे एक प्रसंग ते आठवीत होते. स्वामी श्रीवासुदेवानंदसरस्वती महाराज एका सेवेकऱ्याला सांगत होते. "अरे तू झाडताना ही मिरची उचलून घेतली नाहीस. केरात ढकलून दिलीस तर दुर्लक्ष तर होईलच पण येथील वस्तूंची व पैशांची किंमत ओळखली नाहीस असे होईल. उचल ती केरात चाललेली मिरची" गुरुसेवेची दक्षता व्यापक असावी लागते. व्यवहारातील पैसा, दानधर्म, सेवाभक्ती या सारख्या श्रेष्ठ भावनेने येथे येतो. तेव्हा त्याचे मोल अधिक वाढते. त्याची उधळपट्टी किंवा निष्काळजीपणे वाया घालवणे योग्य नाही.

दुकानदाराने पुडा उघडून कमी होती तेवढी साखर घातली. व्यवस्थित वजन केले. महाराजांनी तो पुडा घेतला व दोघे परत आले.

## नासिक–डोंबिवली मुक्काम

प्रकृतीसाठी हवापालट म्हणून स्वामींना पुण्यात आणले होते. पुण्यामध्ये

स्वामींची तब्येत बरीच ठीक होत चालली होती. आता स्वामींनी पुण्यात राहण्या-पेक्षा नासिकला जाणे ठरवले. ते भगवंतरावांना घेऊन नासिकला गेले. नासिकला स्वामींचा मुक्काम १५ डिसेंबर ते ३० डिसेंबरपर्यंत, फक्त पंधरा दिवस होता.

नासिकला स्वामी आणखी एक वर्षानंतरही आले. त्यावेळी ते थेट काशीहून नासिकलाच आले. यावेळी स्वामींचा नासिकमधील मुक्काम गोरे राममंदिरामध्ये होता. हे राममंदिर स्वर्गीय श्री. नानासाहेब मोठे यांनी बांधलेले आहे. या मंदिरात संन्या-शांच्या भिक्षेची सोयही केलेली आहे.

येथे नासिकमध्ये असताना डोंबिवलीचे श्री. गौरीशंकर जोशी आणि श्री. कृ. गो. जोशी या सज्जनांचा स्वामींशी संबंध आला. पुढे यांच्या आग्रहाने स्वामी अनेक-वेळा डोंबिवलीस गेले. स्वामी नासिकला दुसऱ्यांदा आले ते अगदी अचानकपणे आले. ते बनारसहून पुण्यास आले. पुढे पुण्याहून भंडाऱ्यावरून दि. ८ फेब्रु. १९४१ ला काशीस गेले. स्वामीजी भंडाऱ्यास असताना पुण्याहून महाराजांनी काशीला जांबवंत-सिंहाना पत्र टाकले. "स्वामी काशीकडे येण्यास येथून निघाले आहेत. वाटेत भंडारा येथे शंकरराव मार्कंड यांचेकडे काही दिवस राहणार आहेत. आपण त्यांना पत्र टाकून काशीस येण्यास सांगावे म्हणजे ते अन्य ठिकाणी न जाता काशीस येतील व त्यांना विश्रांती मिळेल".

जांबवंतसिंहाने पुढील पत्र स्वामींना लिहिले —

"पूज्यपाद १००८ श्रीस्वामीमहाराजके मंगल चरणकमलोंपर तुच्छ शिष्य जांबवंतसिंहका साष्टांग नमस्कार। .... आप भंडारामें आये सो समझा। अब काशी आयेंगे यह समझकर बडा आनंद हुआ। यहाँ मैं आपकी चाहे सो सेवा करनेको तयार हूँ।

आपका विनम्र सेवक
जांबवंत

जांबवंतसिंहाचे पत्र पाहून स्वामी काशीस गेले. पण काशीत पाय ठेवताच स्वामींची प्रकृती पुन्हा बिघडली. त्यांना जुलाब सुरू झाले. बद्धकोष्ठतेच्या प्रकृतीला विपरीत विकृती झाली. या आजारात जेमतेम पंधरा दिवस ते

काशीत राहिले. त्यांनी एके दिवशी जांबवंतसिंहाला सांगितले " मला नासिकला जायचंय नासिकचे तिकिट काढून आण. " जांबवंतसिंहाने तिकिट काढून आणले. स्वामींना गाडीत बसवून दिले आणि पुण्याला महाराजांना पत्र टाकले.

वर्षापूर्वी स्वामी नासिकला आले होते. त्यावेळीच त्यांनी तेथील हवा-पाण्याची पसंती केली होती. गेल्या वर्षी भगवंतराव उपाध्ये बरोबर होते. परंतु आता स्वामी एकटेच आले होते. असल्या आजारात, अशक्तपणात स्वामी लांबलांबचे प्रवास कोणत्या शक्तीने करीत असतील हे त्यांनाच ठाऊक !

स्वामी नासिकला आल्याचे समजताच पुण्याहून शंकरराव मार्कंड आणि इतर काही भक्तमंडळी स्वामींना भेटण्यास गेली होती. स्वामी नासिकहून पुण्यास येण्या-आधी डोंबिवलीस गेले. डोंबिवलीला श्री. गौरीशंकर गिरधारीलाल जोशी नावाचे महाराजांचे अनुग्रहीत शिष्य रहात होते. ते मोठे धनसंपन्न होते. धार्मिक वृत्तीचे होते. आणि विशेष म्हणजे गोभक्त होते. त्यांचा मोठा आजार स्वामींनी केवळ आपल्या दृष्टीकटाक्षाने नाहिसा केला होता. गौरीशंकर जोशीला स्वामीजी आपल्यासमोर साधनेस बसवून घेत असत. भाग्यवान बेटे ! डोंबिवलीचे दुसरे साधक म्हणजे श्री. कृ. गो. जोशी हे होत. हेही मोठे गुरुभक्त होते. स्वामीजी किंवा महाराज यांचे घरी आले म्हणजे राजासारखी त्यांची व्यवस्था ठेवीत असत. साक्षात् परमेश्वराप्रमाणे आदर करीत असत. सायंकाळी फलाहारामध्ये दूध देत. ते मसाल्याचे दूध इतके उत्तम असे की शब्दाने ते फिकेच होईल. त्यांत काजू-पिस्ते, बेदाणा-वेलदोडा, साखर-केशर, इत्यादि पदार्थ घातले जात. बेदाण्यातील प्रत्येक बेदाणा स्वच्छ करून दाण्याच्या देठाची काडी काढून मग तो मऊ बेदाणा दुधात घातला जाई. हा गोड मसाला घालण्याचे गोड काम जातीने कृष्णराव करीत असत. स्वामी असल्या सात्त्विक पेयावर संतुष्ट असत. मग त्या दुधाची स्तुती बराच वेळ चाले. स्वामी आणखी दोन पदार्थ सांगून त्या दुधाला अजूनही चांगले करण्याची शक्यता सुचवीत. दूध चांगलेच असे पण त्यातूनही स्वामींचा चोखंदळपणा दिसून येई.

सध्या डोंबिवलीचे श्री. स. कृ. जोशी साहित्यिक म्हणून मराठी वाचकांना परिचित आहेत ते याच कृष्णरावांचे सुपुत्र होत. हे स. कृ. ऊर्फ बापूसाहेब जोशी हेसुद्धा महाराजांचे शिष्य आहेत. संतवाङ्मयाचे प्रेमळ उपासक आहेत. त्यांनी मराठी

सारस्वताच्या दालनात संतश्रेष्ठांची रसाळ चरित्रे लिहून, आपली भक्ती बुद्धीसहित समर्पित करून, "शुद्धबीजापोटी फळे रसाळ गोमटी" हे संतवचन सप्रमाण चिरंतन केले आहे.

डोंबिवलीमध्ये स्वामींचा जो संबंध आला तो धनसंपन्न आणि प्रतिष्ठित व्यक्तींशी. सर्वसामान्यपणे व्यक्तीच्या बाह्य स्वरूपावरून समाज त्या व्यक्तीला छोटा मोठा ठरवितो. पण संतसत्पुरुष असल्या बाह्य स्वरूपावरून लहान मोठेपणाचा अंदाज करीत नसतात. व्यक्तीमधील सात्त्विक गुणांवर ही कसोटी लावीत असतात. नम्रता आणि शील हे असे दोन गुण आहेत की या दोन गुणांमुळे व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाची घागर पूर्ण भरत असते. इतर सारे सद्‌गुण असले पण चारित्र्य आणि निरहंकारित्व हे दोन गुण त्या व्यक्तीत आलेले नाहीत तोपर्यंत ते व्यक्तिमत्त्व अर्धवटच रहाते. म्हणून स्वामींची कसोटी फार कडक असे. ते इतर गुणांपेक्षा नम्रता आणि शील या दोनच गुणांचे मापन आधी करीत. डोंबिवलीला घडलेला या पार्श्वभूमीवरील एक प्रसंग उल्लेखनीय आहे.

मुंबईमधील एक मोठे शेठजी सर चुनिलाल मेहता K. C. I. हे धार्मिक प्रवृत्तीचे होते. त्यांचा आणि महाराजांचा संबंध आलेला होता. पुढे स्वामींची माहिती त्यांना समजली. स्वामींना भेटण्याची त्यांना इच्छा झाली. स्वामी डोंबिवलीस आले त्यावेळी महाराजांनी त्यांची भेट घडवून आणली. स्वामींच्या कडक स्वभावाची कल्पना महाराजांनी सर चुनिलाल मेहता यांना सौम्य शब्दात दिली होती. त्यामुळे शेठजी पुष्कळ संभाळून विचार करून आले होते. शेठजी आले तेव्हां जांबवंतसिंहजी तेथे होते. शेठजी लखनऊ झब्बा आणि गुजराथी धोतर नेसून टोपी न घालता आले. जरा रंगीन रसिकता पोषाखात होती. पण या पोषाखात मर्यादा ओलांडली जाण्यासारखे काही आहे याची कल्पना शेठजींच्या मनात नव्हती. शेठजी आले आणि नेत्यांच्या पद्धतीचा हात जोडून नमस्कार आणि चेहऱ्यावर कृत्रिम हास्य करीत त्यांनी स्वामींच्या खोलीत प्रवेश केला. स्वामींना हा एकूण प्रकार बिलकूल पसंत पडला नाही. केवळ स्थूल भावभक्तीने सगळे प्रश्न सुटत नसतात. त्या भावभक्तीचा आणि आचाराचा संबंध असावा लागतो. तेव्हां ती भावभक्ती सूक्ष्म होते. स्वामीजी महाराजांच्याकडे पहात सौम्य शब्दात म्हणाले—

"वामनराव किनको लाया आज ?"

स्वामींच्या प्रश्नांतील खोंच महाराजांच्या लक्षात आली. पण करणार काय? वर्तनाची उणीव शब्दाने थोडीच भरून येणार! त्यांनीही शांतपणे सांगितले.

"स्वामीजी! हे मुंबईचे मोठे शेठजी आहेत. सर चुनीलाल मेहता. यांना K C I ही बहुमानाची सरकारी पदवी आहे. कॉंग्रेसचे मोठे कार्यकर्ते आहेत. धार्मिक वृत्तीचे आहेत. आपल्या दर्शनाची त्यांना फार इच्छा होती. आज योग जमून आला!".

स्वामीजींनी शेठजीकडे पहात बोलण्यास सुरुवात केली, "काय चुनिलालजी आपण तर मोठे शेठजी आहात. सामाजिक कार्यकर्ते आहात. असे असून आमचेकडे येण्याची बुद्धि होते हे चांगले आहे. पण, चुनिलाल! तुम्ही कौन्सिलमध्ये जाताना हा पोषाख घालून जाता का! कोणा अधिकाऱ्याकडे जाताना अशा पोषाखात जाणे तुम्हाला योग्य वाटते का?".

स्वामींच्या सरळ प्रश्नांनी वातावरण गंभीर झाले. स्वामींचे शब्द म्हणजे "निस्पृहस्य तृणं जगत्" या तत्त्वाचा प्रत्यय होता.

हा इंग्रजी राजसत्तेचा काळ होता. इंग्रज अधिकाऱ्यांच्या पुढे जाण्याचा प्रसंग अशा मोठ्या लोकांना वारंवार येत असे. अशा वेळी ही माणसे इंग्रजापुढे जायचे म्हणून, सूटबूट घालून, अदबीने जात असत. ती सरकारी पद्धती होती. ते तसे न जाते तर इंग्रज अधिकारी त्यांना परत पाठवीत असत. सूटबुटाशिवाय अन्य कुठलाही पोषाख घालून इंग्रज अधिकाऱ्यापुढे जाणे म्हणजे तो इंग्रज अधिकाऱ्याचा अपमान समजला जाई. स्वामींच्या केवळ प्रश्नातून चुनिलाल सारे समजले. त्यांना शरमल्यासारखे वाटले. ते गप्प होते.

स्वामी पुढे म्हणाले—"असे विलासी, शौकीन कपडे घालून तुम्ही साधु-संन्याशासमोर जाता? आमच्या जीवनाला काही ध्येयवाद नाही अशी का तुमची समजूत आहे? कौन्सिलमध्ये सूटबूट घालून जाता त्यावेळी उकडत नाही तुम्हाला? दिवसभर तो पोषाख बुटासुद्धा घालून बसता तेथे! तिकडच्या काही पद्धती आहेत. तशा आमच्याकडच्या काही पद्धती असतात हे तुम्हाला माहीत नाही म्हणावे का तुमचा निष्काळजीपणा म्हणावा? त्या आचरणात आणता येत नसतील तर त्या मनातल्या श्रद्धेला कवडी इतकी तरी किंमत देता येईल का?

आज माझ्याकडे आलात तेवढे पुरे झाले. पुन्हा जर मर्यादेचे उल्लंघन होणार असेल तर न आलेले बरे. तुम्हाला माझे कडक शब्द तरी ऐकावे लागणार नाहीत."

स्वामींचे हे शब्द वाचतांना आपल्याला आजही घाम फुटतो! त्यावेळी स्वामींच्या तोंडून हे शब्द ऐकताना प्रत्यक्ष चुनिलालजींची काय स्थिती झाली असेल, याची कल्पना केलेली बरी. चुनिलालजींनी त्या दिवशी स्वामींचा असा धसका घेतला की पुन्हा कधीही ते फारवेळा स्वामींकडे गेले नाहीत. जेव्हां गेले तेव्हां महाराजांना बरोबर घेऊन आणि सर्व मर्यादा संभाळून गेले. त्यानंतर स्वामी त्यांचेशी फार मोकळेपणे बोलत पण चुनिलालमात्र संभाळून बोलत. चुनिलालजींना या विषयासंबंधी काही विचारावयाचे असेल तर ते महाराजांना विचारीत. महाराजांनी त्यांना शक्तिपात अनुग्रह दिला. चुनिलाल शेठजींना उत्तम अनुभवही आले आहेत. डोंबिवलीतील मुक्काम संपवून स्वामी नंतर पुण्यास आले.

## पुण्यातील काही प्रसंग व आठवणी

१) स्वामी पुण्यात आले ते शंकरराव मार्कंडांकडे पुरंदरे कॉलनीत उतरले. नंतर काही दिवसांनी तेथून त्यांनी अंबालाल शेठजी, २०९ कसबा पेठ या ठिकाणी काही दिवस मुक्काम केला. अंबालाल शेठजींचे काही अनुभव व स्वामींचा आणि त्यांचा संबंध पुढीलप्रमाणे आला :—

अंबालाल शेठजींच्या धाकट्या मुलाला "मंडलकुष्ठ" नावाचा आजार झाला. पुष्कळ उपाय करून काही उपयोग होईना तेव्हा काळजी वाटू लागली. शेठजीने स्वामींना प्रार्थना केली. त्यावर स्वामींनी पुढील औषधयोजना सुचविली :—

(१) कलौंजी जिरे, (२) गुलेबनपसा, (३) आवळकाठी, (४) हिरडा, (५) बेहडा समभाग घेऊन त्याचे चूर्ण करावे. ते चूर्ण सकाळी अर्धा तोळा मधातून सेवन करावे. अनुपान : लिंबुपाण्याचे सरबत. स्वामींनी स्वतः महिनाभर हे औषध मुलाला घ्यावयास लावले. प्रथम कितीतरी दिवस ते औषध करून त्याला देत असत. स्वामींच्या कृपेने मुलाचा आजार पूर्ण बरा झाला.

२) नासिकमध्ये अंबालाल शेठजीचे नातेवाईक पंचवटीत रहात होते. त्यांचे नांव सेठ करसनदास असून ते तेथील धर्मशाळेचे व्यवस्थापक होते. त्यांना दम्याचा

आजार होता. खूप उपाय करून ते दमले होते. पण योगायोग म्हणून त्यांची व स्वामींची गाठ पडली आणि स्वामींच्या कृपाशीर्वादाने व आसन, प्राणायामाच्या मार्गदर्शनाने तो आजार पूर्ण बरा झाला.

३) भगवंतराव उपाध्ये पुण्यात अंबालाल शेठजींच्या कसब्यातील घरी रहात असत. त्यांचा मुलगा नारायण मुंबईस नोकरीनिमित्त रहात होता. त्याची अचानक तार आली की त्याची धाकटी मुलगी मॅनेंजाईटीसने आजारी असून हॉस्पिटलमध्ये ठेविली आहे. तरी तार पाहून मुंबईस निघून यावे. ही तार आली तेव्हा स्वामी पुण्यात होते. ते लगेच म्हणाले " सर्व काही ठीक आहे. धोका नाही. मुलीला बरे वाटेल. काळजी करू नका. पण तुम्ही मुंबईला जाऊन या. "

भगवंतराव उपाध्ये त्याप्रमाणे मुंबईस जाऊन स्वामींच्या शब्दाचा प्रत्यय घेऊन परत आले. स्वामींच्या आशीर्वादाने एवढ्या आजारातून भगवंतरावांची नात बरी झाली.

४) अंबालाल शेठजींना महाराजांकडून अनुग्रह झालेला आहे. पुढे साधनेसाठी त्यांनी वानप्रस्थाश्रम पण स्वीकारला. त्यावेळच्या साधनेत त्यांना अनहद्ध्वनी ऐकू येऊ लागला. पुढे पुढे हा ध्वनी संपूर्ण दिवसचे दिवस त्यांना ऐकू येऊ लागला. ते त्या आनंदातच राहू लागले. त्यामुळे त्यांचे लौकिक सर्व व्यवहार विस्कळीत झाल्याने कुटुंबातील सर्वांना त्यांची काळजी वाटू लागली. पण स्वामींच्या केवळ दर्शनाने शक्तीसंचारावर नियंत्रण येऊन व्यवहाराची सुकरता आली. तेव्हां सर्वांना बरे वाटू लागले. स्वामींच्या निग्रहानुग्रह सामर्थ्याची ही छोटी प्रचीति आहे.

५) नारायणराव देशपांडे यांनी स्वामींची अंतर्ज्ञान शक्ती स्पष्ट करणारा एक विशेष अनुभव सांगितला तो प्रसंग पुढीलप्रमाणे आहे :—

स्वामींचा मुक्काम २० नारायण पेठेत होता. वेळ दुपारची होती. घरात महाराज, नाना व स्वामी असे तिघेजण होते. इतक्यात मध्यवयीन नऊवारी भरजारी शालू नेसलेली, अंगभर दागिने ल्यालेली, सुस्वरूप, भारदस्त शरीराची, गौरवर्णीय प्रौढ युवती घरात आली. केशसंभाराचा भलामोठा अंबाडा घालून त्यावर भरदार वेणी घातलेली होती. सौभाग्य अलंकार त्या युवतीच्या शालीनतेची वृत्ती प्रकट करण्यास

मदत करीत होते. त्या धनवान प्रौढ युवतीचे नावही शालिनीबाई असेच होते. ही भारदस्त स्त्री या तिघांपैकी कोणाच्याही ओळखीची नव्हती. स्वामींना तर काहीच माहिती नव्हती.

त्या स्त्रीचे धीटपणे येणे, नमस्कार करणे, जवळच आवरून सावरून बसणे, हे सर्व स्वामी कटाक्षाने पहात होते. बाह्य सोज्वळ स्वरूपातून अंतरंगाचा ठाव लागणे अशक्य होते. त्या बाई नमस्कार करून बसतात न बसतात तोंच स्वामी त्या बाईंना म्हणाले—

"आज आलात ते आला पुन्हा आमचेकडे यऊ नका." हे वाक्य ऐकताच त्या बाई ओशाळल्या. तरी धाष्टर्याने त्या स्वामींना म्हणाल्या– "आपण साधू संन्यासी! आपला अधिकार मोठा. आमच्या सारख्या पापी लोकांनी आपल्याकडे यावयाचे नाही तर कुठे जायचे?" बाईंचे असे शब्द ऐकताना ऐकणाऱ्याला स्वाभाविकपणे स्त्रीदाक्षिण्य आणि सहानुभूतीच वाटली असती. पण स्वामींनी त्या बाईचे पाणी केव्हाच जोखले होते. बाईचे सारे शब्द स्तुती आणि दंभ यांनी भरलेले आहेत याची स्वामींना खात्रीच असली पाहिजे. कारण यावर ते त्या बाईंना म्हणाले– "बाई खरं आहे तुमचं म्हणणं. पण आम्ही जे काही सांगू तसे वागण्याची तयारी असली तर काही सांगण्याचा उपयोग."

स्वामींचे पहिले सडेतोड शब्द आणि बाईने चार वाक्ये सांगितल्यानंतरचे सौम्य शब्द हा फरक पाहून बाईंना वाटले आपल्या बोलण्याचा योग्य तो परिणाम होत आहे. म्हणून त्या बाई म्हणाल्या "स्वामीमहाराजांनी सांगावे आणि आम्ही ते करू नये असे कसे होईल. आपल्याकडे येण्याची इच्छा झाली त्यावेळीच ही मनाची तयारी करून इकडे येणे केले."

स्वामीजी म्हणाले "वा छान! तर मग हे पहा नासिकला जा आणि तेथून केशवपन करून या म्हणजे योग्य ते सांगेन!"

स्वामींजे हे शब्द म्हणजे त्या बाईवर केलेला वज्राघात होता.

आपणास असे काही ऐकावयास मिळेल अशी शंका बाईंच्या मनाला शिवली नव्हती. पण स्वामींचे उत्तर ऐकून मात्र बाई सर्द झाली. पुढे ती बाई कधीही स्वामींच्याकडे किंवा महाराजांकडे आली नाही.

पुढे नानांच्याकडून नारायणराव देशपांड्यांना स्वामींच्याकडे अशी अशी बाई आली होती आणि स्वामींनी असे असे उत्तर दिले ही माहिती समजली. त्यावर नारायणराव देशपांडे म्हणाले, अहो ती बाई आमच्या आळीत राहते. ती बाई देखणी, सुंदर, धनाढ्य आहे पण साऱ्या आळीत त्या बाईचा " बोभाटा " आहे. लोकापवाद टाळण्यासाठी तिने मंगळसूत्र घातले आहे. मधून मधून मुद्दाम साधू, संन्याशी, सत्पुरुष यांचेकडे जाऊन येते. आपले उद्योग लपविण्यासाठी तिचे हे सारे ढोंग आहे.

स्वामींना या बाईचे वृत्त नारायणरावांनी ऐकविले. त्यावर स्वामी म्हणाले आता ती आपल्याकडे येणार नाही.

६) श्री. नारायणराव देशपांडे शिरवळकर यांनी स्वामींच्या पुढील छोट्या छोट्या आठवणी सांगितल्या आहेत.

स्वामीजींच्या बोलण्याचा वेग फार असे.. एकदा का त्यांच्या बोलण्याचा ओघ सुरू झाला की मधे कोणीही बोलू शकत नसत. त्यांचे ते मोहक, रसाळ बोलणे ऐकण्यात, जमलेले सारे तल्लीन होऊन जात. त्यांच्या बोलण्याची छाप पडे. एखाद्याने मधे बोलण्याचा प्रयत्न केलाच तर ते 'ना—ना —ना' असा शब्दोच्चार करीत व हाताने इशाराही करीत. दुसऱ्याला मधे बोलून देत नसत.

पुरंदरे कॉलनीत स्वामी होते. आम्ही ( देशपांडे व नाना भालेराव ) कोर्टातून परस्पर स्वामींच्याकडे जात असू. ते आमची वाटच पहात असत. कधी उशीर झाला तर म्हणत 'कितना देर हुआ' स्वामींची ही आमच्याबद्दलची आपुलकीची ओढ पाहून आम्हाला धन्यता वाटे. निघण्याची वेळ झाली की कोर्टात किंवा कुठेही काहीच सुचत नसे. कधी कधी तर मधीच जाण्याची तीव्र इच्छा होई व आम्ही तसे अवेळी स्वामींकडे गेलो तर काहीतरी प्रसंग किंवा स्वामींची इच्छा तशी होती हे आढळून येई. असे हे आंतरिक आकर्षण असे. अशा वेळी अतिशय आनंद होत असे.

चालण्याच्या बाबतीत स्वामींची चालण्याची गती आमच्या पळण्याच्या गतीबरोबरची असे "कितने धीरे धीरे चलते हो, मेरे साथ चलो" असे म्हणून ते एकदा चालू लागले म्हणजे त्यावेळी मी व श्री. नाना भालेरावही अक्षरशः पळत असू.

स्वामींनी मराठीचा अभ्यास केव्हा व कुठे केला हे सांगता येणे मला शक्य नाही. पण आम्ही असे पाहिले आहे की त्यांचा ज्ञानेश्वरी, दासबोध आणि गाथा या ग्रंथांचा अभ्यास असा होता की त्यातले संदर्भ ते ओवी किंवा अभंग पाठ म्हणून देत असत. तुकारामांच्या बद्दल ते म्हणत "बडा संत हो गया है" महाराष्ट्रीय संतांबद्दल त्यांना फार मोठा आदर व अभिमान असे. कोणी महाराष्ट्रीय त्यांच्याकडे काही मागणी करू लागला तर कधी कधी ते आपली ही भावना व्यक्त करताना म्हणत "खरे म्हणजे महाराष्ट्रीयन लोकांच्या समोर तुकाराम, रामदास, ज्ञानेश्वर, एकनाथ या संतमहंतानी अध्यात्म इतके स्पष्ट करून ठेवले आहे की या लोकांना अन्य कोणाकडून काहीही मागण्याची आवश्यकता नाही. इतके थोर हे संत आहेत."

स्वामींच्या बोलण्यातील विषय साधे व नेहमीचे असत. परंतु त्यात विविधता आणि खोली फार असे. सूक्ष्म निरीक्षण, चिकित्सक दृष्टी, माहितीची विपुलता, विषयाचा खोल अभ्यास भरपूर असे. म्हणून त्यांचे बोलणे ऐकत बसावेसे वाटे. वर्णन करण्याची हातोटी मोहक असे. बोलण्यात सर्व विषयांचे संदर्भ येत असल्याने ते ऐकताना त्यातून अनेक शंका सहजासहजी दूर होत असत व माहितीत भर पडे. एकदा तर ते कच्च्या केळ्याच्या भाजीच्या वर्णनात रंगून गेल्याचे पाहिले आहे. नासलेल्या दुधाच्या वड्या किंवा दूध नासवून वड्या कशा करतात हे सांगताना आम्ही ऐकणारे इतके रंगलो होतो की तोंडाला पाणीच सुटले होते.

स्वामींना औषधांची माहिती भरपूर होती. बेलाच्या पानाचा रस सहजासहजी निघत नाही. त्याला स्वामी तांत्रिक युक्ती सांगत की बेलाची पाने तीन रात्री तांदळामध्ये दडपून ठेवा नंतर रस निघतो.

डोळ्याच्या कोणत्याही विकारावर विशेषतः लाली, आग, खुपऱ्या यावर निवळीचे बी व पुनर्नवा पाण्यात उगाळून त्याचे अंजन करावे. सहन करण्याची शक्यता असेल तर त्यात सुरवर हिरडा पण उगाळून घालावा. हे औषध त्यांनी माझ्यासाठी व मुलासाठी सांगितले होते. त्याचा फार चांगला अनुभव आला होता.

स्वामींचा चेहरा नि डोळे यांच्यात विलक्षण सामर्थ्य होते. त्यांच्याकडे पहात बसावेसे वाटे पण त्यांच्या दृष्टीला दृष्टी भिडविणे सोपे नव्हते. स्वामींच्या प्रसन्न मुद्रेवरील राजऐश्वर्य त्यांनी क्षौर केलेल्या दिवशी विशेष झळकून दिसत असे. त्यांचा

लालसर प्रसन्न चेहरा पाहिल्यावर श्रीकृष्णाच्या सौंदर्यावर लुब्ध झालेल्या गोपींच्या अवस्थेप्रमाणे आमची स्थिती होई. क्षौर केलेल्या दिवशी स्वामींचे छाटी, भस्म रुद्राक्षमाळा धारण केल्यानंतरचे दर्शन विशेष विलोभनीय असे. त्या तेज:पुंज संतुष्ट मूर्तीचे दर्शन अजूनही स्मरण करताच होते इतका प्रभाव त्या दर्शनात होता.

स्वामी स्त्रियांकडे कधीही पहात नसत. स्त्रियांशी बोलतांना ते नेहमी नासिकाग्रावर दृष्टी ठेवून बोलत. ते बोलू लागले की श्रोते चित्रासारखे बसत.

या काळात डॉ. बेन्द्रे यांचा संबंध स्वामींशी आला. स्वामींचा मुक्काम जेथे असे तेथे डॉक्टर जात. स्वामींच्या सहवासात थोडा वेळ थांबत व नमस्कार करून परत जात. पुढे डॉक्टरांना दीक्षा झाली.

असे "हे इवलेसे रोप लावियेले द्वारी त्याचा वेलू गेला गगनावरी" याप्रमाणे होत चालले. स्वामींना आता यापुढे एकटे पहाणे अवघड होत राहणार. बहरलेल्या मोगऱ्याच्या फुलांमधून आणि आसमंतात दरवळलेल्या त्याच्या सुगंधावरून मूळच्या वृक्षवल्लीचा मागोवा घ्यावा लागणार. ही शक्तिपात योगमार्गाची महान परंपरा साधकांच्या अनुभवातून स्पष्टातिस्पष्ट होत रहाणार आहे. वृक्षवल्लीच्या मूळ, खोड, पानादिवरून त्याचे श्रेष्ठ कनिष्ठ स्थान ठरविण्याचे कार्य आयुर्वेदीय तज्ञ वा वनस्पति-शास्त्रज्ञ यांना जितके शक्य व सुलभ आहे तितके सर्वसामान्य व्यक्तीला अशक्य आहे. सामान्य व्यक्ति फल पुष्प सुगंधाच्या परिणामावरून झाडपाल्याचे लहानमोठेपण मान्य करू शकेल. त्याप्रमाणे शक्तिपात परंपरा महान म्हणताना सर्वसाधारण साधकांचे अनुभवच सामान्यत: परिणामी ठरलेले असतील. स्वामींनी यासाठी नाही नाही म्हणताना अनेक जिज्ञासूंना अनुग्रह देऊन समाजापुढे अध्यात्माच्या अनाकलनीय श्रेष्ठतम अनुभूतीचे भांडार खुले केले आहे. ब्रह्मविद्येचा सुकाळ केला आहे. मे १९४१ मध्ये स्वामी बनारसला गेले.

## स्वामीजी आणि नाना भालेराव

श्री. भुजंगराव उर्फ नाना भालेराव यांचा आणि स्वामींचा सहवास एकूण दोन तपे घडला. त्यापैकी १९२८ पासून १९४० पर्यंत एक तप पूर्ण झाले. या तपातील त्यांच्या संबंधीच्या काही घटना चरित्र ओघामध्ये आलेल्या आहेत. तरी नानांनी सांगितलेल्या आणखी काही घटना आपण पाहू. नानांच्या शब्दात काही आठवणी दिलेल्या आहेत.

१) "परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमत् लोकनाथतीर्थ स्वामी महाराजांचा परम मंगल सहवास मला आणि माझ्या संपूर्ण परिवारातील मंडळींना लाभला हे आम्हा सर्वांचे महद्भाग्य आहे. या परमभाग्याचे विधाते परब्रह्म श्रीसद्‌गुरुमहाराज आहेत. त्यांच्या परमकृपेचे हे फळ आहे. आमच्या मातीमोल जीवनाला सुवर्ण स्वरूप देऊन अलंकृत केले ते एकमेव श्रीगुरुमहाराजांनीच ! त्यांचे स्मरण करून स्वामींच्या आठवतील त्या आठवणी सांगतो. काळाच्या दृष्टीने त्या कदाचित् मागेपुढे झाल्याचे जाणवले तर संभाळून घ्यावे.

२) स्वामींचा १९४० चा आजार फार मोठा होता. त्या आजाराला "बेरी बेरी" चा आजार असे नाव होते. त्यात स्वामींना संग्रहणी पण होती. आजारात थोडा उतार पडल्यावर काशीहून स्वामींना भगवंतराव उपाध्ये यांनी पुण्यास आणले. त्यावेळी महाराज उत्तरेस तीर्थयात्रेस गेले होते. स्वामी पुण्यात शंकरराव मार्कंड यांचेकडे उतरले. पुरंदरे कॉलनीमध्ये शंकरराव रहात होते. मी रोज तिकडे जात असे. स्वामींची प्रकृती इतकी क्षीण झाली होती की डोळ्यांनी स्वामींची ती अवस्था पाहवत नव्हती. फक्त हाडे शिल्लक होती. पांघरूण घातले तर गादीवर कोणी झोपले आहे असे वाटतच नव्हते. सारे शरीर गादीच्या सपाटीमध्ये झाकून जाई. परंतु तशा स्थितीत स्वामींचा चेहरा अगदी लहान बाळसेदार मुलाप्रमाणे गुबगुबीत, टवटवीत आणि प्रसन्न असावयाचा. कधीही पहा चेहरा अत्यंत प्रफुल्लित. चेहऱ्याकडे पाहून ते आजारी असे वाटत नसत. पण त्यांनी हाक मारली किंवा काही मागितले की त्यांचा खोल गेलेला क्षीण बारीक आवाज अन्तःकरण हालवून टाकीत असे.

या आजाराच्या निमित्ताने त्यांनी थोडीशी सेवा हातून घेतली आहे. भगवंतराव उपाध्ये यांनी या आजारात स्वामींची फार मोठी सेवा केली आहे. मी दुपारी सायंकाळी जसा वेळ मिळेल त्याप्रमाणे चार दोन तास रोज शंकरराव मार्कंडाचे घरी जात असे. स्वामींच्या जवळ बसून असे. त्यांना संग्रहणीचा त्रास होता. तेव्हा मधून अधून ते म्हणत "भुजंगराव! शौच आयी!" मग त्यांना लहान मुलाप्रमाणे दोन्ही हातावर उचलून घ्यावे. शौचास नेऊन आणावे. त्यांची सर्व स्वच्छता करावी व हलक्या हाताने, हळुवारपणे पुन्हा त्यांना बिछान्यावर आणून झोपवावे. हे करतांना स्वामींचे दुखः पाहून फार फार वाईट वाटत असे.

३) हा नंतरचा एक प्रसंग आहे. स्वामींची प्रकृती त्यावेळी चांगली होती.

त्यावेळी महाराज पुण्यात नव्हते. हैद्राबादला गेले होते. स्वामींचा मुक्काम पुण्यात २० नारायण पेठेत होता. अशा वेळी नेहमीप्रमाणे देवाची व स्वामींची व्यवस्था आमच्याकडेच असे. तेव्हा एकदा स्वामींच्या मनात आले की पुण्यातील साधकांना एकत्र बोलावून भोजन द्यावे. त्याप्रमाणे कसबा पेठेतील श्री. गोरेभटजींच्याकडे ही भोजन व्यवस्था केली. हे गोरे भटजी कसबा पेठेत मुजुमदारांच्या बोळात राहात. यांच्याजवळच भगवंतराव उपाध्ये यांचे स्नेही व शेठजी श्री. अंबालाल शेठ हे २०९ कसब्यात रहात होते. या ठिकाणी स्वामींचा मुक्काम बराच झाला होता. स्वामींना हे ठिकाण सोयीचे होते.

भोजनाचा बेत स्वामींच्या आवडीचा होता. तीसपस्तीस पान होते. त्यामध्ये मी, नारायणराव देशपांडे, भालचंद्रपंत किर्लोस्कर, भगवंतराव उपाध्ये, दामले, अंबा-लालशेटजी, गोरेभटजी इत्यादि साधक होते. शेवग्याच्या शेंगांची आमटी, पुरणपोळी, पापड, पापड्या, कुरड्या, मसाले भात, इत्यादी मोठा खमंग स्वैपाक केला. तूपदुधाने पुरणपोळीला अमृताची चव आली. स्वतः स्वामींनी आग्रह करकरून वाढले. हसून खेळून जेवणाच्या पंगतीला रंग चढला. स्वामींनी दिलेल्या महाप्रसादाची आठवण झाली की सारे दृश्य डोळ्यापुढे उभे रहाते.

४) स्वामींच्याकडून दीक्षा सहजासहजी मिळत नसे. दीक्षा देण्यापूर्वी ते येणारा जिज्ञासू चांगला तपासून पाहात असत. आचारधर्म पाळणारा आहे की नाही हे प्रश्न विचारून ठरवीत. ब्राह्मण असेल तर स्नानसंध्या करणारा, शेंडी ठेवणारा आहे हे पाहून मग पुढचा विचार! त्यांचा शेंडीचा आग्रह फार असे. गायत्रीजपाच्या अनुष्ठानावर फार भर असे. लाख गायत्री जप झाल्यावर या म्हणजे दीक्षा होईल की नाही ते सांगू असे अनेकांना सांगत. विधवा स्त्रियांना, सोवळे होऊन येण्यास सांगत! खाण्यापिण्यामध्ये कांदा, लसूण नको, अपेयपान नको, अभक्ष भक्षण नको याचाही पाढा वाचल्याशिवाय राहात नसत. मातापित्यांच्या पायावर मस्तक ठेवून नमस्कार करण्यास कितीतरी लोकांना, विशेषतः तरुण मुलांना त्यांनी सांगताना मी ऐकले आहे. स्वामींना विजार, पाटलोण, केस वाढविलेले, किंवा स्त्रियांनी गोलपातळ नेसलेले आवडत नसे. माझ्या मुलांना भालचंद्र आणि नारायण यांना स्वामी शेंडी ठेवून वस्तऱ्याने हजामत करवून घेण्याचे बजावीत. दोघांनी कॉलेजमध्येही जाताना हजामत करून जावे इतकी त्यांची तयारी झाली.

५) स्वामींची काव्यप्रतिभा विलक्षण होती. नीति आणि उपदेशपर छोटे छोटे श्लोक स्वामी भराभर रचीत असत. भाषा सरळ सोपी असे. हिंदी, बंगाली आणि संस्कृत भाषेतून त्यांची ही काव्यरचना असे. संस्कृत श्लोकसुद्धा जोडाक्षर विरहित असत हे पाहून तर आश्चर्य वाटे. बोलता बोलता श्लोक तयार करीत. स्वामींचे श्लोक भावपूर्ण व अर्थवाही असत. पुष्कळ वेळा स्वामींनी श्लोक तयार करावेत व मी ते त्यांच्या वहीत लिहून ठेवावे असे होत असे. स्वामींनी स्वतःच लिहून ठेवलेल्या पुष्कळ वह्या होत्या. एका वहीत, एकापुढे एक, श्लोक, पद, भजन लिहिलेले असे. पण बंगाली, हिंदी, संस्कृत यापैकी कोणत्याही भाषेची वेगळी वही नसे. ज्या भाषेचे स्फुरण होई त्या भाषेचे पद, श्लोक, एकापुढे एक असे. मधून अधून संतांची वचने, श्लोक, अभंग त्यांच्या पसंतीप्रमाणे त्यातच लिहिलेले असे. अक्षर इतके सुंदर असे की जशा मोत्यांच्या माळा असत. अशा २।३ वह्या त्यांनी माझ्याजवळ दिल्या होत्या त्यांनी ते श्लोक वाचून पाहिले होते. भाषेचा गोडवा आणि शब्दांचा सोपेपणा, अर्थ सहजपणे स्पष्ट करीत होता. त्या वह्या जपून ठेवल्या होत्या. पण पुढे काय झाले कळले नाही पण त्या वह्या मात्र मिळाल्या नाहीत. कदाचित पानशेतच्या पुराच्या तडाख्यात सापडल्या असतील. मला त्या वह्या अजूनही डोळ्यापुढे दिसतात.

स्वामींना एकदा वेदान्तावर अगदी सोप्या भाषेत लिहिण्याची इच्छा झाली. त्यांनी सुरवातही केली होती. चांगले आठपंधरा दिवस हा लेखनउद्योग केला. मला ते स्वतः वाचून दाखविले. पण पुढे एके दिवशी त्यांना काय वाटले कुणास ठाऊक पण त्यांनी हे लिहिलेले कागद फाडून टाकीत मला म्हणाले, **"आचार्यांपेक्षा मी वेगळे काय लिहिणार आहे. जे आचार्यांनी लिहून ठेवले तेच मी माझ्या शब्दात लिहून उपाधी वाढवून घेणार दुसरे काय? लोकांना वेदांताची पुस्तके नकोत. वेदान्ताची अनुभूती पाहिजे. मग आपला उद्योग तर तोच चालू आहे..."** असे बरेच बोलत ते लिहिलेले कागद माझ्यासमोर फाडले. स्वामींनी वेदान्तावर जे काही लिहिले होते त्याची भाषा सोपी तर होतीच पण फार मधुर होती. स्वामींनी ग्रंथ अर्धा जरी लिहिला असता तरी अक्षरवाङ्मयात एका मोलाच्या ग्रंथाची भर पडली असती. पण स्वामींचे ग्रह लेखनाला अनुकूल नव्हते म्हणून स्थिती असून लेखन होऊ शकले नाही. नाहीतर आजचे लेखक! पात्रता नसताना लेखन करून ग्रंथकर्त्यांचा टेंभा मिरवितात!!

स्वामींच्या प्रतिभेतून अनेक पदरचना पण झाली. वानगी दाखल जी चार दोन पदे मिळाली ती या चरित्रात गोवली आहेत.

६) स्वामींच्या नारायण पेठेतील मुक्कामात थोरला मुलगा भालचंद्र याच्या स्वामी सेवेला चांगलेच स्वरूप आले होते. स्वामींचे हात पाय चेपून काढणे, पाठ रगडणे, डोक्याला व तळपायाला तूप लावून मालिश करणे हे सर्व काम तास दोन तास खपून भालचंद्र करीत असे. यावेळी मधला मुलगा नारायण त्याच्या बरोबर येत असे. पण स्वामी नारायणशी गप्पा गोष्टी करणे, खेळणे, मजा करणे, श्लोक, गाणी सांगून म्हणवून घेणे यात रमून जात असत. रात्री सर्व कार्यक्रम संपल्यानंतर स्वामी स्वतः महाराजांचे खोलीच्या दारातून हाक मारीत, "ए भालू ! आवो !" हाक मारण्याची पाळी तो येऊ देत नसे. पण प्रसंगी ते हाक मारीत असत. मग डोक्याला चोळण्याच्या वेळी स्वामी भालचंद्राच्या मांडीवर आपले डोके ठेवीत आणि त्याला चोळण्यास सांगत. आज ही आठवण सर्वांना आनंदित करणारी आहे. भालचंद्र हा हुषार होता. स्वामींनी त्याला सांगून ठेवले होते; नव्हे तसा आशीर्वादच दिलेला आहे की "तुम रोज १२०० गायत्री जप करो। दुनियामें चाहे सो मिलेगा।" त्याप्रमाणे भालचंद्राचा हा नियम बरेच वर्षे चालू आहे. जपाचा अनुभवही तसाच आहे.

७) स्वामींची सारी भव्यता त्यांच्या चेहऱ्यात होती. विशेषतः त्यांचे डोळे म्हणजे प्रत्यक्ष धाक होता. माझ्या निरीक्षणात असे आले की स्वामींचे डोळे मोठे होते. यापेक्षा त्या डोळ्यामधील काळी बुबुळे फारच मोठी होती असे माझ्या लक्षात आले. एकदा स्वामींशी दुपारी बोलत होतो. सहज मोकळेपणाने बोलणे चालले होते. बोलता बोलता मी प्रश्न केला की—

"स्वामीजी ! आपल्या डोळ्यातील बुबुळे प्रमाणापेक्षा मोठी दिसतात. हे खरे आहे का भास आहे ?" यावर स्वामीजी म्हणाले—

**"ते खरे आहे. भास नाही. त्याचे असे कारण आहे की आपल्या सामान्य डोळ्यांना देवतांचे दर्शन सहन होत नाही. ज्यांना देवतांचे दर्शन होते त्यांच्या डोळ्यात हा बदल जरूर होत असतो. देवतांचे दर्शन घेण्यासाठी डोळ्यातील काळी बुबुळे पांढऱ्या भागाच्या खालच्या व वरच्या भागास स्पर्श करण्याएवढी मोठी होतात आणि देवतांचे दर्शन घेण्याचे सामर्थ्य**

**डोळ्यामध्ये येते. सगुण साकार दर्शनासंबंधीचा खुलासा हा केलेला आहे. आमच्यावर कालीमातेची कृपा आहे म्हणून या लीला ती करते."**

स्वामी एवढा खुलासा करतील ही कल्पना नव्हती. आज अनायासे फारच उत्तम माहिती मिळाली.

८) स्वामींचा सर्वसाधारण दिनक्रम पुढीलप्रमाणे असे— प्रातःकाळी ते ४ च्या सुमारास उठून चूळ भरून अंथरुणावर साधनेला बसत. एवढ्या पहाटे त्यांची शौचादिची गडबड नसे. बद्धकोष्ठतेमुळे निवांतपणे उशीरा शौचादि कार्यक्रम होत असे. बैठकीला बसताना संपूर्ण शरीर झाकून जाईल अशी डोक्यावरून छाटी पांघरून घेतलेली असे. बैठक शांत, स्थिर व तासन् तास बसलेले असत. बहिर्दिशे-नंतर हातपाय धुण्यास मृत्तिकेचा कटाक्ष असे. मृत्तिकेशिवाय हातपाय शुद्ध होऊ शकत नाही हा शास्त्राधार घेत असत. मृत्तिकेशिवाय धुतलेल्या अमंगल हातांनी संध्या वंदन, पूजादि कर्म करण्याची पात्रता नसते असे ते सांगत. नंतर स्नान. स्वामींनी प्रातःकाळी लवकर स्नान केल्याचे आठवत नाही. अपरिहार्य प्रसंगी केले असेल तेवढेच.

संध्या व दंड वंदनाचा कार्यक्रम चार चौघात करण्याचा प्रसंग आला तर सारी कर्मे विस्तारपूर्वक चालत असत. परंतु असेही पाहाण्यात आले आहे की कोणाची वर्दळ नाही अशा वेळी त्यांची ही कर्मे अति संक्षिप्त असत. कर्माचा आग्रह असण्याची प्रवृत्ती सर्वत्र दिसते. पण कर्माचा आग्रह नसण्याची उदाहरणे क्वचित् आढळतात. अर्थात् समाजामध्ये कुठेही कर्माबद्दल अनास्था अनादर राहू नये याबद्दल ते फारच दक्ष असत. समाजातील श्रद्धा ही स्थानांवर व कर्मावर असते व त्यामधून समाजाची धारणाशक्ती पोसली जाते. तेव्हा समाजात नेतृत्त्व लाभलेल्यांच्यावर ही विशेष जबाबदारी असते की त्यांनी समाजाची श्रद्धास्थाने मोडू नयेत. शुद्ध, अद्वैत वेदान्ती फार कोरडा, परखड, स्पष्ट असल्याने त्या स्थितीला पोहचलेली व्यक्तीच कर्मसंक्षेप करू शकते किंबहुना अशाच व्यक्ती कर्म करूनही कर्माचा फोलपणा समजून असतील. संत तुकारामांनी म्हटले आहे— "देव नाही हे मनी ओळखावे। देव आहे हे जनी वदावे।" स्वामींचा कर्मसंक्षेप पहाताना माझ्या मनांत शुद्ध वेदान्त उभा रहात असे. भिक्षेपूर्वी त्यांचे स्नान-संध्या व दंड वंदन उरकलेले असे. म्हणजे स्वामींसाठी खोळंबून राहिल्याचा एकही प्रसंग नाही. भिक्षेला निमंत्रण गेले की लगेच हजर असत.

स्वामींचा अहार मध्यम होता. तरी सुद्धा शेवग्याच्या शेंगांची आमटी, भाजी किंवा स्वामींचा आवडता पदार्थ जेवणात आला की जरा सढळ हाताने त्या पदार्थाचा समाचार घेत. जेवणात तूप भरपूर घेण्याचा कटाक्ष असे. वाटी वाटी तूप ते खात असत. भाताची आवड अधीक असे. पण आहार सांगायचा झाला तर स्वामींसाठी भाताचे बुटकुले ठरलेले असे. त्यात जेमतेम अदपाव तांदळाचा भात होत असे. आमच्या मंडळींनी स्वामींची भोजन व्यवस्था त्यांच्या मनासारखी ठेवली होती. पदार्थांच्या चवीवर स्वामी संतुष्ट असत. ते स्वैंपाकातील किती तरी अनुभव रंगवून रंगवून सांगत असत. पदार्थ आवडला की त्याची भरपूर स्तुती करीत.

स्वामी दुपारी थोडी विश्रांती घेत. पण दुपारी दोननंतर त्यांचे आसनावर स्थिर व ताठ बसून वाचन, लेखन, भेटीगाठीस आलेल्यांशी बोलणे इ. निवांतपणे चालत असे. ते कधीही पाठीचा कणा ढिला ठेऊन बसत नसत. वाचताना आणि लिहिताना चष्मा घालीत. त्यांचा चष्मा सोनेरी काडीचा, नाजुक बांधणीचा, मोहक असा होता. वाचतांना किंवा लिहितांना मान खाली वाकलेली ठेवून फक्त डोळे वर करून चष्म्याच्या भिंगाच्यावरून पहातांना मोठे सुंदर दिसत असे. दोन शब्द येणाऱ्या व्यक्तीशी बोलले की पुन्हा दृष्टी खाली करून आपला उद्योग सुरू. स्वामींच्या शांत सान्निध्याचा एवढा प्रभाव असे की आलेली व्यक्ती शांतपणे बसून राही.

सायंकाळचे फिरणे हा स्वामींचा अटळ नित्यक्रम असे. या फिरण्यातही रस्ता व ठिकाण बदलण्याची हौस असे. फिरून आल्यानंतर संध्या, स्तोत्रपाठ, अल्पोपहार. नंतर भजन, गप्पागोष्टी होत असत. झोपी जाण्यास उशीर पसंत नसे. बस्स, इतकी साधी सुटसुटीत दिनचर्या स्वामींची असे. पण यामधूनच त्यानी जीवनाची कृतार्थता प्राप्त करून घेतली होती. इतरांचेही जीवन कृतार्थ करण्याचे कार्य नंदादीपाच्या शांत ज्योतीप्रमाणे चालू होते.

स्वामींचे विशेष असे होते की ते असेल त्या वातावरणाशी समरस होत असत. त्यामुळे वातावरणात मोकळेपणा दिसत असतो. विनोदामुळे वातावरणांत आनंद असतो. अगदी पूर्वी त्यांचे बोलणे कमी होते पण अलिकडे त्यांना खूप बोलावे लागत असे. लहान मुलांत फार रंगून जात. त्यांना गोष्टी गाणी सांगत.

थोडक्यात, स्वामी सागरासारखे अथांग होते तर पर्वतशिखरासारखे उत्तुंगही होते.

९) एकदा एका जिज्ञासूने धाडस करून स्वामींना दीक्षेबद्दल विचारले असता स्वामी म्हणाले– **“ दीक्षा क्या सस्ती चीज है जो मैं बाँटता रहूँ ? अरे छे छे महिने छाटी धोनेवालोंका नंबर लगा नही तो दूसरोंकी क्या बात ? जावो अपना धरमकरम करते रहो। समयपर सब होता है। दीक्षा लेने देने की बात नहीं है। पाने होने की बात है। ”** इतके परखडपणे स्वामी सांगत असत.

१०) स्वामींचा मुक्काम म्हणजे पर्वणी असे. त्यांनाही आमचे येथे रहाणे इतके आवडत असे की पुण्यात पुष्कळ ठिकाणी स्वामी राहिले पण आमचेकडे त्यांचा मोकळेपणा भरपूर असे. पुण्यात त्यांचा मुक्काम शेवटपर्यंत आमचेकडे मोठ्या प्रेमाने राहिला आहे. आमच्याबद्दल ते नेहमी म्हणत की “तुमने हमको फॅमिली मॅन बना दिया है।” खरोखर स्वामींना असे वाटावे की ते आमच्या कुटुंबियांपैकी आहेत. हे केवढे परमानंद वाटणारे भाग्य आहे. त्यांच्या कृपेने सारे घडून आले. त्यांनी आम्हाला मोठेपणा दिला कारण संत उदार असतात.

११) महाराजांनी स्वामींची केलेली सेवा अपूर्व होती. त्यांनी स्वामींचे हातपाय, डोके सारे शरीर नित्य रात्री रगडून काढावे. त्यांची कुठलीही अडचण लक्षात घेऊन दूर करावी. स्वामी कर्नाळीला असताना त्यांना नित्य दुधासाठी ठराविक रक्कम पाठवीत. महाराजांच्या म. ऑ.चे काम माझेकडे असल्याने मला या गोष्टीची जाणीव आहे.

१२) १९४० च्या स्वामींच्या आजारानंतरचा हा प्रसंग आहे. पहिल्यांदा ते दूध, फळे इत्यादि सायंकाळचा आहार घेत असत. परंतु आजारानंतर पचनशक्ती क्षीण झाल्याने दूधसुद्धा त्यांना पचत नसे. पण ही गोष्ट त्यांनी बरेच दिवस सहन केली. अशा संकोची स्वभावानेही त्यांना खूप त्रास सहन करावा लागे. पण एकदा त्यांनी आपली ही अडचण माझेपुढे मांडताना म्हणाले “संन्यास धर्माचे पालन करणे फार कठीण असते. म्हणून कलीयुगात संन्यास घेऊ नये म्हणून सांगितले आहे.” यावरून विषय काढीत काढीत ते म्हणाले “सध्या मला दूध पचत नाही आणि रात्री भूक तर असते. संन्यासधर्माप्रमाणे रात्रीची भिक्षा योग्य नाही.”

स्वामींना काय सांगावयाचे ते माझ्या लक्षात आले. तेव्हां मी स्वामींना म्हणालो "आजारीपणात औषधादि सेवन जसे शास्त्रसंमत असते तसे पथ्यपाणी संभाळणेही शास्त्रसंमत असते. आपणास रात्रीचा दुग्धाहार नको तर आपल्या पद्धती-प्रमाणे रात्रीचा स्वैपाक स्नान करून सोवळ्यामध्ये करण्याची व्यवस्था करू. आपण संकोच धरू नये."

वास्तविक स्वामींना हे मान्य करणे जड गेले. पण अनाग्रही वृत्तीमुळे त्यांनी संमती दिली. पुढे कांही दिवस त्यांनी रात्री आमचे येथे भिक्षा घेतली.

स्वामी तासन् तास आमच्यामध्ये हसले आमच्यामध्ये रमले. महिनोंन महिने मुक्काम केला. घरच्याप्रमाणे केव्हाही निःसंकोचपणे आले. स्वामींच्या सहवासाच्या आठवणी शब्दात आणणे कठीण आहे. आता त्यांच्या आठवणी आठवण्यातही मनाला संतोष होतो. अशा स्मरणाने भूतकाळातील घटना प्रसंगांचे मनःचक्षूंना प्रत्यक्ष दर्शनही घडत असते. स्वामींच्या आठवणी कुटुंबातील सर्वांना सारख्या येत असतात. सर्वात योगेश छोटा मुलगा पण आज त्यालाही स्वामींची आठवण होत असते.

## जाबवंतावरील खुनाचा आरोप

"जगाच्या कल्याणा संतांच्या विभुति". जगाचे कल्याण होण्यातच साधु-संतांना आनंद होत असतो. लोकांचे चांगले पाहून आनंद होणे हा सत्वगुण आहे. सर्वांमध्ये हा गुण आढळता तर सारे जग नंदनवनच बनले असते. तसे ते नाही. कारण लोकांचे वाईट झाले की आनंद होणारी काही मंडळी आपणास अवती भोवती आढळतात. नाजुक मनोहर फुलपांखरू पकडून मारण्यात आनंद मानणारी काही मुले आढळतातच ना! तसे मोठ्यांचेही असते.

अशा दुष्प्रवृत्तीच्या लोकांची जास्तीत जास्त झळ बसते व आघात होतात ते सत्प्रवृत्त लोकांच्यावर याची हजारो उदाहरणे देता येतील. आपल्यालाही ठाऊक असतील. जांबवंतसिंह हे व्यापारी खरे पण 'तसला' व्यापार करणारे ते नव्हेत! अगदी सरळ–केवळ योग्य तेवढे कमिशन घेऊन मालकाच्या मालाचा खप करणे, वसुलीसाठी देशभर हिंडून येणे आणि मालकाकडून ठराविक रक्कम पगाराची म्हणून घेणे. पुढे पुढे ते त्या व्यवसायात भागीदार झाले पण पगार घेऊन उरलेली कमिशनची

रक्कम वर्षाअखेरीस मालक देतील ती घेणे एवढाच त्यांचा व्यापार व्यवहाराशी संबंध. ते काशीपासून जवळच्या खेड्यावरील रहाणारे. तेथे त्यांचे घर–जमीन पण आहे. त्या गावातील गुंडांनी एकदा एक खून केला आणि खून करणाऱ्यांच्या यादीत अनेक नांवांबरोबर जांबवंतसिंहाचे पण नाव दिले. खोटाच आळ घेऊन काळिमा फासून देण्याचा आनंद त्यांना हवा होता. ते काम गावगुंडांनी केले.

वास्तविक त्यावेळी जांबवंत आपल्या खेडेगावी नव्हते. पुढे पोलीसांनी आपले उद्योग-रिपोर्ट जबाब सुरू केले. तेथे जांबवंतसिंह प्रत्यक्ष नसल्याने काय वाटेल ती बनवाबनवी केली. खोटे कागदपत्र तयार केले आणि जांबवंतावर पकड वॉरंट बजावण्यापर्यंत सर्व प्रकारचा व्यवहार तयार झाला. मग समन्स, आणि पोलीसांच्या चक्रा सुरू झाल्या. थेट काशीपर्यंत पोलीस पोहचले. चौकी चौकीवर हुकूम गेले. अशा स्थितीत काय करावे हे जांबवंतसिंहाला सुचेना. त्यांनी स्वामींचे दर्शन घेण्याची टाळाटाळ केली. व्यवहारी कारण बाहेर कसे पडावे तर मानसिक दडपण आपले काळे तोंड घेऊन स्वामींकडे कसे जावे ? खरे आणि खोटे स्पष्ट कसे होणार ? या चिंतेने स्वाभाविकपणे त्यांना काही सुचेनासे झाले.

त्यातून योगायोग असा की स्वामीजी त्यावेळी काशीत नव्हते. जांबवंतसिंहाने पुण्याला महाराजांना सविस्तर पत्र लिहिले व यातून निर्दोष सुटण्याची प्रार्थना केली. पत्राला उत्तर देण्यात पू. स्वामीजी जेवढे तत्पर तेवढेच महाराजही तत्पर. जांबवन्तांच्या पत्राला उत्तर गेले.

'चिन्तारहित रहा. काहीहि अनिष्ट होणार नाही' यावेळी पू. स्वामीजी पुण्यातच होते. त्यांनीच असे उत्तर लिहिण्यास सांगितले होते असे महाराजांनी सांगितले.

पण प्रकरण निकालात निघेपर्यंत जांबवंतांच्या मनाची धास्ती काही कमी होईना. उलट कोणत्या दिवशी काय घडेल आणि पोलीसांची धाड पडेल याची काळजी दिवसेंदिवस वाढत गेली.

थोड्याच दिवसात पू. स्वामीजी काशीत आले. जाम्बवंतसिंहजी २/४ दिवसांनी लपत छपत एकदा त्यांचे दर्शनास गेले असताना स्वामी म्हणाले.

'कारे मूर्ख, अलिकडे नियमीत दर्शनास येत नाही? जा, काही बिघडणार नाही तुझं! उद्या तुला पोलीस चौकीवर जावयाचे आहे....'

जांबवंतसिंह चांगलेच चपापले. बहुतेक उद्या पोलीस आपल्याला न्यायला येणार– आणि मग खटला चालून– थोडी फार वाईटांच्या संगतीमुळे २/४ दिवस बेअब्रू होणार नंतर नशिबानं आपण निर्दोष सुटणार! या विचारतंद्रीत असतानाच पू. स्वामीजी म्हणाले– "पोलीस तुझ्याविरुद्ध रिपोर्ट करू शकत नाहीत. तू स्वतः पोलीस चौकीवर जाऊन हजर रहा."

दुसरे दिवशी जांबवंतसिंह केवळ पू. स्वामींची आज्ञा म्हणून पोलीस चौकी-वर स्वतःहून हजर झाले आणि हवालदारास म्हणाले— 'मी.... प्रकरणातील आरोपी "जांबवंतसिंह."

त्या ठिकाणचा पोलीस अधिकारी म्हणाला– "जांबवंतसिंह मी दररोज तुमच्याविरुद्ध 'रिपोर्ट' करण्याचे ठरवतो पण सायंकाळी 'रिपोर्ट' लिहिण्यास सुरुवात केली की तुमच्याविरुद्ध एक अक्षर लिहिले जात नाही. असं कसं होतं ते काही कळत नाही." त्या पोलीस अधिकाऱ्याने पुढे असे सांगितले की "तुम्ही आज हजर रहाणार" असे मला काल रात्रीपासून उगीच वाटू लागले. आणि मी मनाशी असा निर्णय घेतला आहे की आरोपी स्वतः हजर झाला तर ताबडतोब निर्दोषी म्हणून त्याला सोडून द्यावयाचे असे मी ठरविले आणि योगायोग असा की तुम्ही आज हजर झालात. "जा तुम्ही निर्दोष आहात. तुमचे नाव त्या खटल्यातून काढून टाकले आहे."

पोलीस ठाणेदाराचे ते बोलणे ऐकून जांबवंतसिंहजी आश्चर्यचकित झाले पुण्याहून महाराजांचे आलेले पत्र, काशीत स्वामींनी काढलेले उद्गार जांबवंताच्या कानात पुनः पुनः घुमू लागले. आपल्या पाठीशी कवचासारखी केवढी प्रचंड शक्ति आहे या जाणीवेने त्यांचे अन्तःकरण भरून आले. पोलीस चौकीतून बाहेर पडलेले पाय घराकडे न वळता स्वामींच्याकडे वळले. कृतज्ञतेची पावती दिल्याशिवाय त्यांना संतोष होणार नव्हता. जांबवंतजी स्वामींच्याकडे आले. त्यांना साष्टांग नमस्कार घातला. अपराधाची क्षमा मागितली आणि थोडीफार सेवा करून घरी गेले. स्वामी आनंदात होते. जांबवंताना म्हणाले—"पुण्याला महाराजांना पत्र पाठवून हकीगत कळवून द्या. म्हणजे त्यांना संतोष होईल."

## स्वामींचे बनारसमधील वास्तव्य

स्वामीजी २ मे १९४१ ला काशीत आले त्यावेळी ते राणामहल घाटावरील महावीर मंदिरामध्ये त्यांचा मुक्काम होता. परंतु ते नव्या जागेच्या शोधात राहू लागले. त्यांनी दुसऱ्या संन्याशाच्या जागेत त्या संन्याशी स्वामींसह एकत्र काही दिवस काढले. पण थोड्याच दिवसात त्यांना एक स्वतंत्र घर ८ रु. मासिक भाड्याने मिळाले. B १३/२०० सोनारपुरा हा या नव्या जागेचा पत्ता स्वामींनी सर्वांना कळवून टाकला.

हे स्वतंत्र भाड्याचे घर तीन मजली होते. तळमजल्यावरील एक खोली शीतगृहाप्रमाणे थंड होती. दुपारच्या उन्हाच्या वेळी स्वामीजी या थंड खोलीत जाऊन बसत. बाहेरचे ऊन किंवा उन्हाच्या झळा याचा लवलेश तेथे जाणवत नसे. स्वामींनी स्वैंपाकासाठी एका वृद्ध ब्राह्मणीला ठेवले होते. त्या भाड्याच्या तीन मजली घरात एका वैष्णव ब्रह्मचाऱ्याला रहाण्याची परवानगी दिली होती.

स्वामीजी बनारसमध्ये आले म्हणजे त्यांच्या सहवासात जांबवंतसिंह सावली-सारखा नित्य असे. जांबवंतसिंहाची ही सेवा शेवटपर्यंत टिकली. नित्य स्वामींकडे जाण्याने जांबवंतानाही स्वामी कृपेचे अनेक अनुभव आलेले आहेत. त्यातील काही यापूर्वी पाहिले आहेत. स्वामी येथे आल्या आल्या खुनाच्या आरोपातून सुटण्याचा अनुभव ही स्वामींच्या कृपेचा दाखलाच आहे.

या वर्षीचा चातुर्मास स्वामींनी बनारसमध्ये केला. या काळात महाराष्ट्रातील श्री. पटवर्धन नावाचे साधक श्रीगुरुसेवेसाठी मुद्दाम काशीत आले होते. हे येण्या-पूर्वीच स्वामींनी महाराजांना पुण्यास पुढीलप्रमाणे पत्र पाठविले होते.

बनारस
१५–६–४१

नारायण स्मरण पूर्वक आशीर्वाद

....पटवर्धनका कोई पत्र यहाँपर नहीं आया। तुम स्वयम् पटवर्धनको एक पत्रद्वारा बता देना कि सम्यक विचार पूर्वक कार्य करना। **सहसा विदधीतन् क्रियाम् अविवेकः परमापदांपदम्।** यहाँ आकर पुनः मनस्ताप न हो।

**कार्य करनेके पहलेही विचार करना। कार्य करनेके बाद दुःख प्रकाश नही करना।** पटवर्धनको एक पत्र द्वारा तुम यह समाचार अवश्य लिखना।

इस वर्ष यहाँपर ११७ डीग्री उष्णता हुई थी। मेरे यह मकान उत्तम होनेके कारण मुझे कुछ भी त्रास नहीं हुआ। भुजंगरावादिक मंडलीको नारायण स्मरण। मैं आनंदपूर्वक हूँ।

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

स्वामींच्या पत्राप्रमाणे महाराजांनी सर्व सूचना पटवर्धनांना दिल्या. पुढे महाराज काही विशेष अनुष्ठानासाठी हुशंगाबादेस नर्मदेकाठी गेले. स्वामींनी त्यांना हुशंगाबादेस पत्र पाठविले त्यातील काही वाक्ये—

बनारस
२०।७।४१

“ ....पनबलकर बाईका दोन रुपया जो तुमने हमको भेजा वह रुपया मुझे मिला। तुम अब होशंगाबाद आया। यह स्थान नर्मदातीरपर एकान्त और रमणीय है। यहाँपर दृढसंकल्प होकर अनुष्ठान करते रहो। सोलापूरसे पराडकरने गुरुपौर्णिमाके निमित्त तीस रुपया भेजे हैं। चिंताका कोई कारण नहीं। मैं यहाँपर आनंदपूर्वक हूँ।

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ.

हा चातुर्मास, सप्टेंबर १९४१ पर्यंत, स्वामीजी या प्रशस्त तीन मजली घरात राहिले पण पुढे हे घर त्यांनी सोडून जवळचे एक घर भाड्याने घेतले. यासंबंधी सध्याच्या काशीतील हालचालीबद्दल एक पत्र हुशंगाबादेस महाराजांना पाठविले—ते मूळ-पत्र पाहू—

बनारस
१४।९।४१

नारायणस्मरण। विशेष समाचार।

....B १३/२०० नं. का मकान छोडकर मैं सांप्रत B 13/80 सोनार-

पूराको आया। यह नया मकान पहले मकानसे सात हात दूर है। पहला मकान बहूत पुराना होनेके कारण Damp था। वर्षा के कारण और अधिक Damp हुआ। शीत ऋतुमें और अधिक ठाण्ड होनेवाला है। और मुझे ठाण्ड सहन होता नहीं इस कारण मकान बदलना पडा। पित्तज्वरके कारण मेरी प्रकृति बिगडी थी अब अच्छी है।

बंशीधरको कन्या हुई अतः वृद्धि है। जाम्बवंतसिंह नौकरीमें है। मेरी सेवामें कौन रह सकते हैं। जाम्बवंतसिंह मौका मिलनेपर मुझे मिलने आता है। बंशीधर वृद्धिके ग्यारह दिवस बीतनेके बाद एक दिवस आया था।

औदुंबरका वृद्ध गृहस्थ गोगटेको मेरा नारायणस्मरण सूचक आशीर्वाद लिखना। मैं आनंदपूर्व हूँ।

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

स्वामींचे बनारसहून महाराजांना एक विस्तारपूर्वक पत्र आले ते पाहून मग स्वामींच्या पुण्याच्या वास्तव्याकडे वळू—

बनारस
२८।४।४२

नारायण स्मरण सूचक आशीर्वाद।

...आठ दिवस पहले जांबवंतसिंह मेरे पास आया था। बहुत खेदयुक्त होकर बोला कि मेरा अभ्यास बहुतही अच्छा चलता था। अब अभ्यास उस प्रकार होता नहीं। स्वप्नमें एक बोआ दिखने आया और वह बोला तोम्हाराही पापसे तोम्हारे अभ्यास में विघ्न हो रहा है। मैंने ऐसा कौनसा पाप किया है जिस कारण मेरे अभ्यास में ऐसा विघ्न आया है। मैं जांबवंतसिंहको कहा **श्रद्धा भक्ति से यह अभ्यास चलता है। तुम्हारी श्रद्धाभक्तिमें सांप्रत न्यूनता है। इस कारण तुम्हारा अभ्यास में विघ्न हो रहा है।** मैं यहाँपर एकान्त में रहता हूँ। तुम लोग मेरी खबर भी लेता नहीं। मैं जब ऐसा बोला तब कुछ विनययुक्त वाक्य बोलकर क्षमा माँगी। जाम्बवंतसिंह चौखण्डी रहता है।

मैं जब पूनासे आया तबसे नाना प्रकारके रोगसे बहुतही दुःख भोग रहा हूँ। विघ्न बहुतही प्रबल है। पत्र लिख रहा तो फाउण्टन पेन की स्याही भी ठीकसे निकलता नहीं। एक दिवस के लिये भी काशी छोडकर स्थानान्तर जाने नहीं देता। जब अभ्यासमें बैठता हूँ या जिस समय इस विषयपर विचार करता हूँ तब बताता है कि महाराष्ट्रके संस्कार अभी भी बाकी है। यहाँसे जब मुझे बाहर ले जावेगा तब सतना होकर महाराष्ट्रमेंही ले जावेगा। अन्यत्र कहाँ भी नहीं जाने देवे।...

नारायणही जब कभी करेंगे तबही मैं इस विपद्से मुक्त हो सकुंगा। मेरे पुरुषकारसे कुछ भी होता नहीं।...

...पूनासे शंकररावका पत्र आया उसमें लिखा है दाजीसाहब भ्रमिष्ट होकर नदीमें प्राणत्याग किया। अवैध आचरण का ऐसाही परिणाम होता है।

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

लवकरच ' चलेजाव ' चळवळीचे ४२ साल उजाडले. सर्वत्र युद्धासारखे गंभीर वातावरण पसलेले होते. यू. पी. मध्ये अलाहाबाद, कानपूर, लखनौ आणि बनारस ही लढ्याची प्रमुख केंद्रे म्हणून गंगेच्या तटवर्ती मोठ्या इमारतीमधून सरकारने लष्कर आणून ठेवले. परमेश्वरी इच्छेप्रमाणे जे होत आहे ते पाहिले पाहिजे.

या काळात स्वामींच्याकडे एक बंगाली ब्राह्मण दीक्षेसाठी आला होता. तो आय. ए. ही परीक्षा पास झालेला पंचवीस वर्षांचा तरुण होता. तो चारित्र्यवान तरुण होता. पण स्वामींनी त्याला सिद्धाश्रमात, छोटीगैवीमध्ये, मठस्थ ब्रह्मचारी आश्रमात आहेत तिकडे पाठवून दिले. अशी स्वामींची लहर दीक्षेबाबत मोठी स्वतंत्र असे. मध्यंतरी स्वामी पुण्यास जाऊन आले. त्यावेळेस पुन्हा प्रकृती बिघडली होती.

## बनारसहून पुण्यास जाताना

श्री. नृत्यगोपाल नावाचा स्वामींचा एक बंगाली शिष्य सतना रेल्वे स्टेशनवर नुकताच बदली होऊन आला होता. स्वामी पुण्यास जाणार समजताच त्याने स्वामींना आपलेकडे उतरण्याचा आग्रह केला. पत्राने सर्व काही ठरवूनही ठेवले. स्वामींचा आणि या नृत्यगोपालचा संबंध लहानपणापासून होता. स्वामींच्या पूर्वाश्रमीची व

नातेवाईकांची त्याला माहिती असली पाहिजे इतके स्वामींचे व त्याचे संबंध होते. तो इंग्रजीत आपले नाव N. G. Paul असे लिहीत असे. पुढे जबलपूर कटणीकडे त्याची बदली झाली. स्वामी पुण्यास जाता येता नेहमी नृत्यगोपालकडे उतरत असत. या वेळेससुद्धा स्वामी सतन्याहून मग पुण्यास आले.

काशीतच स्वामींची प्रकृती बरी नव्हती. त्याची कल्पना त्यांनी कोणाला दिलेली नव्हती. त्यांना ताप होता. देहात अशक्तता होती. अशा स्थितीत स्वामींनी बनारस सोडले आणि अलाहाबादला त्यांची गाडी आली. गाडीतच त्यांना फार तहान लागली होती. तापाने कंठशोष पडला म्हणून ते पाणी पिऊन यावे म्हणून जागेवरून उठले. हळू हळू डब्याच्या दाराशी आले. गजाला धरून पायरी उतरू लागले. तेवढ्यात त्यांना चक्कर आली. व ते बेशुद्ध होऊन प्लॅटफॉर्मवर पडले. पुढे काय झाले हे त्यांना समजले नाही. जवळ कोणी शिष्य नाही. कोणी ओळखीचे नाही. अलाहाबाद स्टेशन म्हणजे कोण गर्दीचे आणि धावपळीचे स्टेशन? तेथे सगळेच साधू! संन्याशाला तेथे कोण विचारणार? सारे पंडे ब्राह्मण यात्रेकरूंना लुटण्याच्या गडबडीत. त्यांना संन्याशाची दया कशी येणार? काय मिळणार संन्याशाकडून त्या पंड्यांना, तर दया यावी! स्वामी प्लॅटफॉर्मवर मूर्च्छित होऊन पडलेले आहेत. इतरांची आपल्या उद्योगासाठी धावपळ चालू आहे. अशा स्थितीत काही वेळ गेला. स्वामी सावध झाले. डोळे उघडून पाहू लागले. तेव्हा झाला प्रकार लक्षात आला. हळू हळू उठून बसण्याचा प्रयत्न करू लागले. पण तेवढाही त्राण शरीरात नव्हता. जवळ दोन हमाल उभे होते. त्यांनी स्वामींना उठवून बसविले. बाकावर नेऊन ठेवले. त्यांचे डब्यातील सामान आणून दिले. स्वामींनी त्या हमालांना सांगून जबलपूरच्या डब्यात जागा मिळविली. पाणी पिऊन डब्यात जाऊन बसले. असे हे संन्यासी जीवन असते! असे प्रसंग समाजापुढे येत नाहीत. कुणी सांगत नाहीत. अशा अनेक कठीण आपत्तीतून ध्येय-स्वरूप होऊन जीवन संपेपर्यंत टिकून रहावयाचे असते. असे हे समर्पित जीवन म्हणजे आत्मयज्ञ! म्हणून हे जीवन स्वीकारणारे महापुरुष साक्षात् परमेश्वर होत. त्यासाठी त्यांना सतत वंदन असते. सम्राटांनीही यांना साष्टांग नमस्कार घालावा आणि यांचा आशीर्वाद घेऊन कृतार्थ व्हावे अशा योग्यतेचे संन्यासी असतात.

स्वामी पुढे सतन्यास काही दिवस थांबले. जवळच्या लखा गावी हरस्वरूप

शिष्याचे गावी जाऊन काही दिवस राहिले. सतन्यामध्ये चातुर्मास केला. नृत्यगोपाल आणि हरस्वरूप या दोन्ही शिष्यांनी स्वामींची यशाशक्ति सेवा केली. स्वामींचे आशीर्वाद घेऊन दोघे कृतार्थ झाले. नंतर स्वामी पुण्यास आले.

पुण्यास स्टेशनवर भुजंगराव भालेराव, किर्लोस्कर, गोरेभटजी, नारायणराव देशपांडे ही शिष्यमंडळी पुष्पमाला घेऊन आली. स्वामी पुण्यास येताच त्यांना पुष्पहार घालून, नमस्कार करून स्वागत केले. आणि घोड्याची बग्गी करून त्यात स्वामींना बसवून त्यांच्या सान्निध्याचा व सहवासाचा आनंद उधळीत त्यांना घरी आणले.

नानांनी स्वामींना प्रथम महाराजांच्याकडे आणले. पहिले २/३ दिवस २० नारायणमध्ये स्वामींचा मुक्काम झाला. स्वामींच्या भेटीमुळे आणि त्यांच्या मधुर गप्पागोष्टींमुळे सर्वांना आनंद झाला. आपल्या परिवारातील सर्वांच्या भेटी झाल्याने स्वामीही संतुष्ट झाले. मग काही वेळाने स्वामींनी प्रवासातील घडलेले प्रसंग सांगून ओढवलेल्या आपत्तीची माहिती सांगितली. अलाहाबादची घटना ऐकून सर्वांना वाईट वाटले. पण त्यानंतर सतना-लखखाच्या मुक्कामाने स्वामींची प्रकृती सुधारली. त्यामुळे यावेळचे त्यांचे पुण्यात आगमन सर्वांच्या दृष्टीने उत्साहाचे होते. तिसऱ्या दिवशी स्वामी पुरंदरे कॉलनीत शंकरराव मार्कंडांकडे गेले.

## पुण्यनगरीच्या या वास्तव्यात

स्वामींनी श्रीक्षेत्रकाशी हे आपल्या जीवनाचे विश्रामधाम ठेवले होते. त्याचप्रमाणे पुण्यनगरी ही आपल्या नावाप्रमाणे पुण्याईची नगरी असल्याने स्वामी केवळ इच्छा म्हणून या पुण्यनगरीस वारंवार येत असत. महाशक्ती देणारी जीवनगंगा हिमालयातून गंगाधराच्या जटेतून निघून नारायणाच्या पादांगुष्ठातून स्वामींच्यासह टिहरीच्या जंगलातून प्रवास करीत करीत पुण्यक्षेत्र व काशी याशिवाय विशेष कुठे रमली नाही. स्वामींच्या या जीवनगंगेने भारतभर प्रवास केला. अनेकांच्या जीवनाला आपल्यामध्ये सामावून घेऊन प्रवाहित केले, गती दिली व पावन केले. पण तेथे कोठे न थांबता फक्त दोन ठिकाणी ती बराच काळ स्थिरावली. एक पुण्याला आणि दुसरी काशीला. आता पुन्हा स्वामी बनारसहून पुण्यास आले.

स्वामींचा मुक्काम पुरंदरे कॉलनीमध्ये शंकरराव मार्कंडांकडे होता. एकदा नेहमीप्रमाणे सायंकाळी काही साधक मंडळी दर्शनास आली. त्यामध्ये डॉ. बेंद्रेही

आले होते. डॉक्टर आले व स्वामींना नमस्कार करून जवळ बसले. नुकताच मागच्या मुक्कामात अनुग्रह झालेला होता. साधन नित्य चालू होते. स्वामींच्या दर्शनाने आणि सहवासाने साधकाच्या साधनेला तीव्रता येई. यावेळेस डॉक्टर बसले आणि एकाएकी त्यांचे साधन जोरात सुरू झाले. त्यांना स्वतःला ते नियंत्रित करणे अशक्य होऊन गेले. भोवताली लोक बसले होते तरी त्यांचा विचार न होता साधनेने प्रणवोच्चार सुरू केला. ॐ काराचा ध्वनी भराभर वाढू लागला. सारे वातावरण त्या आवाजाने क्षणार्धात भारावले गेले. शेजारी बसलेल्या लोकांच्या अंगावर रोमांच उभे राहिले. त्यांनाही शक्तीच्या संवेदना जाणवू लागल्या. त्यावेळी स्वामीजी उठले व ते डॉक्टरांच्या जवळ गेले. जरा न्याहाळून पाहिले. मग त्यांनी डॉक्टरांच्या डोक्यावर थापट्या मारल्या व "आखें खोल, डॉक्टर आँखे खोल" असे म्हणाले. तेंव्हां डॉक्टरांचे साधन शांत झाले.

या काळात स्वामींनी नारायणराव देशपांडे यांच्या 'दिगंबर' नावाच्या मुलाला दीक्षा दिली. दिगंबरची मुंज होऊन एक वर्ष झाले होते. प्रकृतीने अशक्त होता. पण स्वामींच्या कृपेचे भाग्य त्याला लहानपणीच लाभले. कार्तिक व॥ ११ ला दीक्षा झाली. दीक्षेच्या पूर्वी दिगंबरने स्वामींची पाद्यपूजा केली. हार घातला. मस्तकावर तुलसीपत्र ठेवले. पेढे नारळाचा प्रसाद ठेवला. दक्षिणा ठेवली. मग स्वामींनी त्याची पाठ थोपटली. आणि आपल्यासमोर बसवून घेतले. दिगंबरचे वय नऊ वर्षांचे होते. चांगली तासभर पहिली बैठक झाली. स्वामींचा प्रसाद घेऊन घरी गेला. योगायोग पहा की नारायणराव देशपांडे यांना महाराजांच्याकडून दीक्षा झाली तर चि. दिगंबर यास स्वामींच्याकडून दीक्षा झाली. नारायणरावांनी यासंबंधीचे श्रेय श्री. नाना भालेराव यांना दिलेले आहे. यासंबंधी बोलतांना ते म्हणाले "श्री. नाना भालेरावांच्या सत्संगतीमुळे माझ्यासारख्या सामान्य जीवन जगणाऱ्या व्यक्तीच्या जीवनात दोन महापुरुषांचा संबंध आला आणि सर्व जीवन आमूलाग्र बदलले. तीच मीठभाकरी खाल्ली पण जीवनाची सार्थकता कशात आहे याची जाणीव व अनुभूती घेऊन जीवन जगता आले. हे दोन महापुरुष म्हणजे सद्गुरुश्रीगुळवणीमहाराज आणि प. प. श्रीलोकनाथतीर्थस्वामीमहाराज !

स्वामी संध्याकाळी पर्वतीवर मागील बाजूने वर चढून ठराविक ठिकाणी थोडा वेळ थांबत नंतर घरी येत. बरोबर ठराविक २।४ साधक मंडळी असत. घरी

आल्यावर ही साधक मंडळी स्वामींना रगडून काढीत. ही 'ड्यूटी' झाली म्हणजे स्वामींच्या अनुज्ञेने आपापल्या घरी जात.

स्वामींच्या सहवासांत काका दामले व त्यांचा परिवार येऊ लागल्याचा उल्लेख ओझरता पूर्वी आलेला आहे. आता त्यांच्या काही आठवणी व थोडासा परिचय आपण पाहू.

काका दामले हे प. प. श्रीमद्वावासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराजांचे भक्तश्रेष्ठ दत्तोपासक. महाराजांचा व त्यांचा संबंध तब्बल चार तपांचा. त्यातूनच त्यांचा नि स्वामींचा संबंध आला. काका दामले अत्यंत विनम्र वृत्तीचे होते. अध्यात्म साधन संपत्तीचे ते एक श्रेष्ठ अधिकारी होते. काका दामले स्वामींच्याकडे आले आणि स्वामींना नमस्कार करू लागले म्हणजे स्वामी म्हणत "ना। ना! काका आप नमस्कार न करीए। आप स्वयं खूब बडे हैं।" महाराजसुद्धा काका दामले यांच्यासंबंधी म्हणत की "काका म्हणजे झाकलेले रत्न आहे." काकांच्या साऱ्या परिवाराचा स्वमींशी संबंध आला. वाढला. आणि अत्यंत जिव्हाळ्याने टिकला. दिगंबरपंत हे काकांचे पुत्र सराफीच्या व्यवसायात राहिले व प्रो. दामले या पुत्रद्वयांचा सहकुटुंब सपरिवार. स्वामींशी संबंध आला.

स्वामी पुरंदरे कॉलनीतील दिवेकरांच्या बंगल्यात राहणाऱ्या शंकरराव मार्कंडांकडे उतरत. त्या वेळेपासूनच या कुटुंबाला स्वामींचा सहवास मिळू लागला होता. एकदा श्री गणेशपंत दामले ( सराफ ) आपल्या रजनी नावाच्या कन्येला घेऊन स्वामींच्या दर्शनास आले होते. स्वामी या मुलीला "रजनीकांत" नावाने हाक मारीत असत. हे नांव बंगाली आहे असे ते म्हणत. ती त्या दिवशी आल्यावर स्वामी तिला म्हणाले "रजनीकांत आज भाजी फार छान झाली आहे. जा आत जाऊन खाऊन ये." स्वामींनी मोकळेपणाने, आत्मीयतेने सांगितले. तरी शंकररावांच्या घरात जाण्याचा संकोच होत होता. सराफ व रजनी तेथेच थांबले. स्वामींना त्यांचा संकोच जाणवला. ते उठले. रजनीचा हात धरला "चलो अंदर" म्हणत आत घेऊन गेले. वाटीत भाजी देण्यास सांगितले. "खा. खा." म्हणत "कशी आहे भाजी?" असे विचारून रजनीला भाजी खाऊ घातली. पाणी पिऊन बाहेर ये म्हणाले. व मग ते बाहेर येऊन वसले. असा प्रेमळ स्वभावाचा अनुभव अनेक वेळा येई. प्रसाद, पेढे, केळी हे नेहमीच मिळत असे, पण भाजीसारख्या, कल्पनाही येणार नाही अशा

पदार्थाचा आग्रह रजनी व सराफ दामले अजूनही मोठ्या अभिमानाने सांगत असतात. रजनी यावेळी लहान होती.

एकदा दुपारच्या वेळी स्वामी नारायणपेठेत होते. त्यावेळी स्वतः काका दामले स्वामींच्याकडे आले. इतक्या उन्हाच्या वेळी काका आलेले पाहून स्वामींनी त्यांची जरा अधिक चौकशी केली. तेव्हा जरा निःसंकोच होऊन काका दामले म्हणाले. "माझा नातू जमखिंडीला असून तो फार आजारी असल्याचे पत्र मला १।२ दिवसापूर्वी आलेले आहे. माझ्याही मनाला त्याची काळजी वाटत आहे. म्हणून आपणांकडे आलो आहे. काल सकाळी त्याची तब्येत जास्त असल्याची तार आल्यापासून मनाची अस्वस्थताही वाढली आहे."

स्वामींनी काकांचे बोलणे ऐकून घेतले आणि क्षणभर डोळे मिटले. व पुन्हा उघडून म्हणाले— "काका, काही काळजी करू नका. नातू बरा होईल आणि घरी जाताच पत्रही हातात पडेल. निश्चिंत असा."

स्वामींचे समाधान देणारे शब्द ऐकून काकांना धीर आला. ते शांत मनाने घरी गेले. आणि आश्चर्य असे की घरी येऊन पडलेले पत्र हातात घेतले. ते जमखिंडीचे पत्र असून त्यात लिहिले होते, की "प्रकृतीत फरक पडला असून बरे वाटू लागले आहे हे तारे नंतरचे पत्र आहे. काळजी करू नये." स्वामींच्या शब्दाचा हा पडताळा पहाताच काकांना घरी थांबवले नाही. ते तसेच पुन्हा उन्हात स्वामींच्याकडे ते पत्र घेऊन आले. स्वामींना पत्र वाचून दाखविले. स्वामींच्या अंतर्ज्ञानाच्या अनुभूतीच्या प्रचीतीची कृतज्ञता मूकमनाने पण प्रत्यक्ष उन्हात परत येऊन सांगून व्यक्त केली. स्वामींची अशी प्रचीती अनेक वेळा अनेकांना आलेली आहे. स्वामी सहज सांगत पण तशी स्थिती शंभर टक्के असावयाची.

स्वामींच्या सहवासातील श्री. भालचंद्र विष्णु किर्लोस्कर, शनिवार पेठ यांच्या काही आठवणी—

श्री. किर्लोस्करांना १।४।१९४१, चैत्र शु॥ प्रतिपदेस त्यांच्या वाढदिवसाच्या दिवशी दीक्षा झाली. यालाही श्री. नाना भालेराव यांच्या सहवासाचा लाभ झाला. स्वामींनी दीक्षेच्या वेळी भालचंद्रपंत किर्लोस्करांना आसनावर बसून डोळे मिटण्यास सांगितले. पण तेवढ्या वेळात किर्लोस्करांच्याकडे स्वामी टक लावून पहात असल्याचे

त्यांच्या लक्षात येताच क्षणभर नजरेला नजर लावून त्यांनी डोळे मिटले. स्वामींनी उठून मस्तकावर हात ठेवला. स्वामी नाना भालेरावांना म्हणाले की "किर्लोस्करांना दृष्टीने दीक्षा दिली. पण स्पर्श दीक्षा दिली नाही या कल्पनेने त्यांना बरे वाटणार नाहीं म्हणून स्पर्शही केला आहे."

श्री. भालचंद्रपंत किर्लोस्करांची आर्थिक परिस्थिती अगदी बेताची. इतकी की तोंडमिळवणी नेहमीच जड जात असे. त्यामुळे स्वामींच्या दर्शनाला जाताना दोन पैशांची फुले तुळसी नेणे सुद्धा त्यांना शक्य होत नसे. याबद्दल त्यांना फार वाईट वाटत असे. एकदा त्यांनी स्वामींना छोटासा हार आणि पावशेर दूध नेले होते. स्वामींनी ते पाहिल्यावर म्हणाले "किर्लोस्कर! विनाकारण हारासाठी पैसे खर्च केलेस! आणि पोराबाळांच्या तोंडचे दूध मला आणलेस. ही गैरशिस्त गोष्ट केलीस"

स्वामींचा पुण्यात मुक्काम असला म्हणजे रोज संध्याकाळी किर्लोस्कर नियमीतपणे त्यांचे दर्शनास जात असत. स्वामींच्या बरोबर फिरावयास जात. त्यांची सेवा करीत. एकदा किर्लोस्करांनी स्वामींना आपल्याकडे भिक्षेसही आग्रहाने बोलावले. स्वामींनी त्यांच्या भक्तिभावनेच्या समाधानासाठी निमंत्रण स्वीकारले. पुडीच्या वेळी केलेल्या व्यवस्थेवर खूप खूष झाले. स्वामींच्या कानावर त्यांनी आपल्या कृष्णाबाई या मुलीचा स्वभाव अर्धवट असल्याचे घातले. स्वामींनी आशीर्वाद दिला. तिला मधून मधून स्वामींच्या दर्शनास जाण्याचा लाभ वडिलांच्यामुळे मिळू लागला. स्वामींनी कृष्णाबाईला दीक्षाही दिली. त्या वेळेपासून तिच्या स्वभावात बदल झाला. पुढे तिचे लग्न होऊन ती आपल्या संसारासही लागली. स्वामींच्या कृपेने सर्व काही ठीक झाले.

पुढे किर्लोस्करांचे कुटुंब क्षयाने आजारी पडले. आधीच घरची गरीबी त्यातून पत्नीचे भयंकर आजारपण सुरू झाले. भालचंद्रपंतांना सर्व बाजूंनी संकटांनी आवळून टाकले. काय करावे हे त्यांना सुचेना. अशा मनस्थितीमध्ये निराशेने चारी दिशा अंधारून टाकल्या. त्यांच्या मनात आत्महत्येचे विचार येऊ लागले. आणि एके दिवशी संध्याकाळी आत्महत्येच्या तयारीने घर सोडले. घराबाहेर पडल्यावर ते खूप हिंडले. डोक्यात विचारांचे काहूर उठले होते. रात्री आठ वाजता मनात एक विचार आला की 'आपण स्वामींचे शेवटचे दर्शन घ्यावे' पुन्हा पुन्हा तो विचार

आग्रहाने येऊ लागला तेव्हा त्यांचे पाय आपोआप स्वामींच्या निवासाकडे निघाले. त्या उदास, निराश, शून्य मनस्थितीत भालचंद्रपंत किर्लोस्कर स्वामींच्याकडे आले. साष्टांग नमस्कार घातला. आणि एकाएकी त्यांना अतोनात रडू कोसळले. स्वामींनी त्यांना भरपूर रडू दिले. स्वतः शांत बसून राहिले. दुःखाचा आवेग रडण्याच्या वेगाने कमी झाला. तेव्हा स्वामीनी चौकशी केली. भालचंद्रपंतांनी आपली मनोव्यथा मोकळ्या मनाने स्वामींना सांगितली. आत्महत्येच्या निर्णयाने घराबाहेर पडलो हेहीं सांगितले. हे सारे रडत, फुंदत, नाक डोळे पुशीत भालचंद्रपंत सांगत होते. स्वामी शांतपणे ते ऐकून घेत होते. स्वतः बोलण्याची बिलकूल घाई करीत नव्हते. त्यांचे बोलणे संपले. मध्यंतरी बराच वेळ शांततेत गेला. तेव्हा संथपणे स्वामी बोलू लागले.

"अरे भालचंद्र ! हा संसार असाच क्लेशदायक आहे. प्रपंचात पैशाशिवाय काही करता येत नाही. पैशावाचून सर्वकाही अडते. पण हा पैसा सुद्धा पूर्वकर्माप्रमाणे मिळत असतो. म्हणून तर हे चटके भोगल्याशिवाय गत्यंतर नसते. प्रारब्ध भोगणे म्हणजे मुकाट्याने सहन करणे. सहन करणे हीच तर मोठी तपश्चर्या आहे. प्रत्येक जीव मरणारच आहे. आपण कशाला वेळीअवेळी खटपट करून आपल्या कर्मदोषात भर घालावी ? बाकी सर्व पातके आत्महत्येच्या महापातकापासून गौण आहेत. त्या सर्व पातकांना प्रायश्चित्त घेण्यासाठी जीव जिवंत असतो. आत्महत्त्येचे होणारे पातक क्षालन करण्यासाठी, प्रायश्चित्त घेण्यासाठी जीव जिवंत नसतो ही फार भयंकर दुर्दैवाची गोष्ट असते म्हणून आत्महत्त्या हे दारुण महापातक आहे. आधीच्या अनंत पातकांच्यामुळे संसारात भयंकर दुःखें भोगीत असतांना त्यामध्ये या महा-पातकाची भर घालणे हा केवढा अविचारीपणा आहे. तुम्ही येथे आला हे फार चांगले केले. देवाने तुम्हास सद्बुद्धि दिली तुम्ही शांत चित्ताने रहा." स्वामींनी असे म्हणत म्हणत ट्रंकेतून पन्नास रुपये काढले व भालचंद्रपंतांच्या पुढे करून म्हणाले, "तूर्त खर्चास हे घेऊन जा."

स्वामींचे ते शब्द ऐकताच भालचंद्रपंत म्हणाले "स्वामी! मी आपणांस तुळशीपत्रही देऊ शकत नाही. मागील जन्माचे भोग हे असे भोगत आहे आणि त्यामध्ये गुरूंचे हे ५० रुपये घेऊन पुढील जन्माचे संचित निर्माण करू की काय ? स्वामी मला हे पैसे नकोत ?"

त्यावर स्वामी म्हणाले, "मग तुला काय पाहिजे ?" भालचंद्रपंत म्हणाले

"डोंगराचा कडा जरी अंगावर कोसळला तरी मन विचलित न होता शांत राहील असे करावे" स्वामींनी आशीर्वाद दिला "तसे होईल." या आशीर्वादाप्रमाणे भालचंद्रपंतांना पुढे अनेकवेळा अनुभव आला. परंतु या वेळचा हा अनुभव विशेष होता. स्वामींच्या दर्शनाने चित्ताला शांतता आली. उपदेशाने विवेक जागृत झाला.

या काळापासून पुढे बराच काळपर्यंत दीक्षा झालेली ५।७ मंडळी रोज सायंकाळी एकत्र येऊन सामुदायिक बैठकीस बसत असत. अलिकडे ही बैठक गोवईकरांच्या चाळीत योगेशच्या खोलीत चालत असे. तत्पूर्वी ती गोरे भटजींच्या माडीवर चालत असे. त्यावेळी भालचंद्रपंतांना क्रिया फार होत असत. नाचणे, नमस्कार घालणे, या क्रिया होत असत. यामध्येच "ॐ श्रीगुरुदेव दत्त" हा जप सुरू झाला. या जपाचा वेग इतका वाढला की तो मोजता येईना. मोठ्यांदा होत असे म्हणून आळी गोळा होत असे. स्वामी अशा बैठकीमध्ये येऊन बसत. त्यामुळें क्रियांचा जोर फार वाढत असे.

## "नरसोबा ! नरसोबा ! बोलो ! !"

भालचंद्रपंत किर्लोस्करांच्या मुलीचा एक विशेष अनुभव आहे. ही मुलगी कृष्णाबाई ६।७ वर्षांची होती. बुद्धीने मंद तर होतीच पण तिला मधून मधून चमत्कारिक वागण्याची लहरही येत असे. केव्हां काय करील याचा नेम नसल्याने आई वडिलांना तिचा सारखा धाक होता. तिला मोकळे सोडण्याची सोय नव्हती. आपल्या समोर जरी ती असली तरी काय उद्योग करील याचा अंदाजच करता येत नसे. विशेषतः तिला विस्तव, दिवा, काडेपेटी, शेगडी या वस्तूंचे आकर्षण फार. तिला लहर आली की अंगातला फ्रॉक काढून ती शेगडीवर धरी. असे किती तरी कपडे तिने पेटवले होते. तेवढ्यात धावपळ करून तो कपडा तिच्या हातातून काढून घ्यावा. तिला शेगडीपासून ओढून घ्यावे तेव्हा कुठे त्या प्रसंगातून सुटका व्हायची !

भालचंद्रपंतांनी आपले हे मुलीचे दुःख स्वामींच्या कानावर घातले, काही तरी बाधा असावी अशी शंकाही त्यांनी बोलून दाखविली. स्वामींनी मुलीला घेऊन येण्यास सांगितले. दुसऱ्या दिवशी कृष्णाबाईला घेऊन भालचंद्रपंत किर्लोस्कर स्वामींच्या दर्शनास गेले. स्वामींनी त्या मुलीला आपल्या समोर बसवून घेतले व तिला म्हणाले "नरसोबा, नरसोबा बोलो!" कृष्णाबाई 'नरसोबा, नरसोबा' म्हणू

लागली. स्वामी तिच्या उच्चाराबरोबर मान हालवीत. ती मध्येच थांबली तर स्वामी म्हणत "बोलो, बोलो—नरसोबा! नरसोबा!" मग पुन्हा त्या मुलीचे नरसोबा, नरसोबा सुरू व्हायचे! बराच वेळ हा कार्यक्रम झाल्यावर स्वामी भालचंद्रपंतांना म्हणाले "कृष्णाबाईला रोज माझ्यासमोर बसवून हा जप म्हणून घेतला पाहिजे म्हणजे तिची ही बाधा जाईल. या तिच्या बाहेरच्या बाधेसाठी नरसिंहाची उपासना केली पाहिजे. ती मी या सोप्या जपाने माझ्या समोर करून घेईन. तुम्ही हिला रोज आणीत जा."

याप्रमाणे बरेच दिवस हा कार्यक्रम चालू होता. याचा परिणाम तिच्या वर्तनावर ताबडतोब दिसू लागला. कृष्णाबाई सुधारली. तिचा मंदपणा गेला. चमत्कारिक लहर गेली. अर्धवटपणा गेला. स्वामींचा किर्लोस्करांच्या घरावर लोभ होता. ते त्यांचेकडे अनेक वेळा जाऊन आले. भिक्षेला पण जाऊन आले.

## सिंहगडचा डाळढोकळा

एकदा स्वामींना सिंहगडला जाण्याची इच्छा झाली. स्वामींनी ही इच्छा नानांना बोलून दाखविली. नानांनी, भगवंतराव उपाध्ये त्यावेळी पुण्यात होते, त्यांना बोलून दाखविली. बातमी षट्कर्णी झाली की गुप्त राहात नाही. तसे झाले. महाराजांच्या कानावर सिंहगड सहलीची वार्ता गेली. स्वामींची इच्छा आहे म्हटल्याबरोबर महाराजांनी कार्यक्रम ठरवून टाकला. भगवंतराव उपाध्ये यांनी स्वैपाकाची जबाबदारी उचलली. सर्व साहित्य जमविले. सकाळी ५।६ मंडळी स्वामींच्यासह मोटारने सिंहगड पायथ्याशी गेली.

स्वामींना वर चढण्याचे कष्ट पडू नयेत म्हणून खुर्ची केली. सर्वजण बरोबरच वर पोहचले. तेथे धर्मशाळेत मुक्काम केला. देवटाक्याचे थंडगार उत्तम पाण्याने हातपाय धुतले. स्नाने उरकली. नित्यकर्माला सर्वजण लागले.

भगवंतरावांनी स्वैपाकाचा पसारा मांडला. उत्तम स्वैपाक करण्याचे ठरवून ते उद्योगाला लागले. आपल्या हातून स्वामींना अन्नपदार्थ मिळण्याची संधी मधून अधून मिळाली आहे पण महाराजांना आपल्या हातचा स्वैपाक आज प्रथम घालणार आहे या जाणीवेने भगवंतरावांना फार आनंद झाला होता. स्वामींना आणि महाराजांना

आपण इतके उत्तम पदार्थ करून घालू की त्यांना त्याचा आनंद झाला पाहिजे. आठवण राहिली पाहिजे. म्हणून पदार्थही नेहमीपेक्षा वेगळे करण्याचे भगवंतरावांनी ठरविले.

नाना भालेराव दोघांच्या आवडीनिवडी माहीत असलेले माहीतगार ! स्वामींना चमचमीत, मसालेदार पदार्थांची आवड तर महाराजांना साध्या, सौम्य पदार्थांची आवड ! यामुळे भगवंतरावांच्या समोर समस्या निर्माण झाली. तरी ते त्या विषयातील वाकबगार असल्याने त्यांनी पक्वान्न व मसालेदार पदार्थ या दोन्हींची योजना स्वैंपाकांत केली. दूध पाकाचे पक्वान्न केले तर डाळढोकळा हा मसालेदार, चमचमीत पदार्थ केला. जेवतांना अशी मजा आली की डाळ-ढोकळा महाराजांच्या तोंडात जातो न जातो तोंच ठसका आणि डोळ्यातून पाणी एकदम निघाले. मग दूध पाकाने त्या चमचमीत पदार्थाचे सांत्वन केले. स्वामींना डाळढोकळा फार आवडला पण दूधपाक फार गोड झाला म्हणून त्यांनीही आपले मत नोंदविले. एकूण हे वनभोजन हास्य विनोदात झाले. डाळढोकळा मात्र अद्यापही सर्वांच्या लक्षात राहिला आहे. त्या ठसक्याचा धसका अजूनही डाळढोकळ्याची आठवण झाली म्हणजे बसतो.

स्वैंपाक भरपूर केला होता. उरलेले सर्व तेथेच वाटून टाकले.

सर्वजण रात्री घरी परत आले.

## समर्थांची चौदा ब्रह्मे ! !

एकदा मिरजेचे डॉक्टर रा. द. प्राणी व स्वामींची दासबोधावर चर्चा चालू होती. डॉक्टर प्राणींचा दासबोधाचा व रामदास सांप्रदायाचा अभ्यास दांडगा होता. बंगाली भाषी स्वामी स्वप्रयत्नाने मराठी भाषा शिकून दासबोध ग्रंथ वाचतात व त्याचा अभ्यास करतात हे पाहून त्यांना आनंद वाटला. तेव्हा दासबोधावर चर्चा चालली असता स्वामी म्हणाले "डॉक्टर साहेब ! रामदासांनी चौदा ब्रह्मे कोणती सांगितली आहेत ?" डॉक्टरांना रामदासांनी चौदा ब्रह्मे सांगितली आहेत एवढे आठवत होते पण नेमकी ती कोणती आहेत हे पाठ म्हणून दाखविणे शक्य नव्हते किंवा नेमका हा उल्लेख कोठे आहे हेही आठवत नव्हते. तरी डॉक्टरांनी शोधण्या-आठवण्याचा थोडा प्रयत्न केला. स्वामी डॉक्टरांना म्हणाले "डॉक्टर मी सांगतो

त्यांची नावे. फक्त चुकले तर बरोबर करा. असे म्हणून स्वामींनी चौदा ब्रह्मे ज्या ओव्यामधून सांगितली आहेत त्या मूळ ओव्याच म्हणून दाखविल्या —

**पहिले ते शब्द ब्रह्म। दुजे ओमित्येकाक्षर ब्रह्म।**
**तिसरे खं ब्रह्म। बोलिली श्रुती॥**
**चौथे जाणा सर्व ब्रह्म। पांचवे चैतन्य ब्रह्म।**
**सहावे सत्ता ब्रह्म। साक्षी ब्रह्म सातवे॥**
**आठवे सगुण ब्रह्म। नववे निर्गुण ब्रह्म।**
**दहावे वाच्य ब्रह्म। जाणावे पैं॥**
**अनुभव ते आकावे। आनंद ब्रह्म ते बारावे।**
**तदाकार ते तेरावे। चौदावे अनिर्वाच्य॥**

स्वामींची धारणा शक्ती पाहून डॉक्टर थक्क झाले. सतत हिंडणाऱ्या, प्रकृती ठीक नसल्यावरही प्रवासातील दगदगीमधून दासबोध ग्रंथ किती बारकाईने वाचला व तो लक्षात ठेवला याचे डॉक्टरांना कौतुक वाटले.

स्वामीजी पुण्याहून बनारसला गेले. जातांना वाटेत नागपूरला रावबहाद्दूर पराण्डे यांचेकडे काही दिवस मुक्काम केला व तेथून पुढे ते काशीला गेले.

नागपूरला श्री. गोविंदराव पराण्डे, आयुर्वेदतीर्थ यांनी स्थापन केलेल्या आरोग्य मंदिराच्या कार्याला स्वामींचे लेखी आशीर्वाद मिळाले आहेत. ते यापुढे दिले आहेत.

॥ श्रीहरिः शरणम् ॥

श्रीगोविन्द गंगाधर पराण्डे आयुर्वेदतीर्थस्थापित आरोग्यमन्दिर मैं सुचारू रूपसे पर्यवेक्षण किया। यह आरोग्यमन्दिर स्त्री, पुरुषादिकके स्वास्थ्य रक्षणके अनुत्तम स्थान है। सर्व प्रकार पुरुषार्थ संपादन के मुख्य साधन शरीर है। स्वास्थ्य रक्षण होनेसे ही वह संभव है। श्री पराण्डेके आरोग्य मन्दिरमें आयुर्वेदोक्त शोधन पद्धति द्वारा तथा योगशास्त्रोक्त आसनमुद्रा षट्कर्मके अभ्यास द्वारा लोगोंके स्वास्थ्य रक्षणका प्रयत्न चल रहा है। ये सब उपायसे रोगीओंके रोग निवृत्ति तथा स्वस्थोंओंका स्वास्थ्यरक्षण उत्तम रूपसे होता है। वर्तमान समय प्रायशः मनुष्य हीनबल हो रहा है। मनोदौर्बल्य भी अधिक हो रहा है। इस सब कारणसे मनुष्य समाजके यत्परोनास्ति अवनति हो रहा है। जनताकी ऐसी हीन परिस्थितिके समय पराण्डे स्थापित आरोग्य मन्दिर जैसी संस्थाका विशेष

प्रयोजन है। इस समय यदि जनताके स्वास्थ्य रक्षणके लिये प्रयत्न नहीं किया जावेगा तो राष्ट्र तथा समाज का हानि अवश्य भावनीय है। सर्व प्रकार प्रयत्न द्रव्यसाध्य है। इस नीतिके अनुसार आरोग्य मन्दिरके कार्यनिर्वाह के लिये द्रव्यका प्रयोजन हो रहा है। अतः इस राष्ट्रहित कार्यके लिये लक्ष्मीके वरपुत्र तथा सरकार संस्थाको द्रव्य दान से साहाय्य करके महान पुण्य तथा यशको वृद्धित करेंगे ऐसी मेरी आशा है। परमेश्वर इस संस्थाको तथा संस्थाके स्थापकको सर्व प्रकार हित संपादन करके संरक्षण करे ऐसा मैं आशीर्वाद देता हूँ। इति शिवम्।

स्वामी लोकनाथतीर्थ

## काशीतील कथा

### या गुरुचरित्रातील वेदधर्मामुनी व संदीपक.

स्वामी काशीमध्ये राणामहल घाटावर रहात होते तेव्हांची ही कथा आहे. त्या भागात कॉलरा सुरू झाला होता. या साथीचा वेगाने सर्व राणामहल भागात प्रसार झाला. आसपासही ही साथ वाढत जाऊ लागली. सरकारी पातळीवरून उपाय-योजना सुरू झाल्या होत्या. स्वामी अशा भागात राहातात म्हणून मुद्दाम जांबवंतसिंह त्यांना भेटण्यास येत असत. होईल ती सेवा करीत असत. स्वामी मधून मधून फार रागवत असत. 'तू येऊ नकोस. सेवा करू नकोस. तुझ्यामुळे मला फार त्रास होतो' या वाक्यांचा अलिकडे ते फार उच्चार करीत असत. यामुळे जांबवंतसिंहाना मोठा संकोच वाटत असे पण ते निःसंकोचपणे येत. बोलणी ऐकून घेत आणि जमेल तेवढे काम करून जात.

कॉलऱ्याच्या साथीत येथे राहण्यापेक्षा जागा बदलावी म्हणून जांबवंतसिंहाने स्वामींना अनेकदा सुचवून पाहिले. पण स्वामींना ते पसंत पडले नाही. ते म्हणाले "अरे कॉलरा प्रारब्धात असेल तर कुठेही जाऊन पहा तो होणारच! आणि हे दुखणे प्रारब्धात नसेल तर येथे राहूनही होणार नाही. मग उगाच धावपळ कशाला? प्रारब्धात असेल तर लवकर संधी देऊन त्यांतून लवकर मोकळे तरी होता येईल. आपण पळत सुटलो म्हणून आपले प्रारब्धकर्माचे गाठोडे मागे रहात नाही. अरे बाबा, हे प्रारब्ध कर्मच पुढे जाते आणि आपल्याला निमूटपणे त्याचे मागून जावे

लागते. तुला मी कुठे येत जा म्हणून सांगतो आहे. माझे मी भोगण्यास समर्थ आहे. हे सर्व भोगूनच नाहिसे केले पाहिजे........ "

विशेष आश्चर्य असे की आदले दिवशी स्वामींनी हे सारे सांगितले आणि दुसरे दिवशी त्यांना जुलाब व उलट्या सुरू झाल्या. तासातासाने जोर वाढत गेला. जवळ कोणी नाही. सवडीप्रमाणे जांबवंतसिंह संध्याकाळी स्वामींच्याकडे गेले. तेथील परिस्थिती पाहून त्यांना धक्काच बसला. स्वामींना जांबवंत-सिंहाने प्रार्थना केली "डॉक्टरकडे जाऊन येऊ. प्रकृती दाखवून औषध आणू." स्वामीं पण बिलकूल तयार होईनात. खूप आग्रह केला पण काही उपयोग झाला नाही. वारंवार शौचाला जाऊन व उलट्या करून स्वामी हैराण झाले. क्षीण होऊन गळून गेले होते. जांबवंतसिंहाने तेथील सर्व स्वछता केली. स्वामींना हवे ते करून दिले. स्वामी रागावत होते. वाकडे तिकडे बोलत होते आणि जांबवंतसिंह न बोलता स्वामींना हवे ते काम करीत होते.

बरीच रात्र झाल्यानंतर जांबवंतसिंह नाईलाजाने आपल्या घरी गेले. दुसरे दिवशी सकाळी स्वामींकडे येण्यास निघाले तेवढ्यात समजले की स्वामी स्वतः एकटे दवाखान्यात गेले आहेत. जांबवंतसिंह तसेच तिकडे दवाखान्यात गेले. स्वामी बाका-वर बसले होते. त्यांनी जांबवंतसिंह आल्याचे पाहिले मात्र की सर्वांच्या देखत मोठे डोळे करून लाल चेहरा करून असे रागावले की त्यांचेकडे पाहण्याची हिंमत जांबवंतसिंहाची झाली नाही. खाली मान करून उभे राहिले. पायावर डोके ठेवून नमस्कार केला. हात जोडले. दवाखान्यातील सारेजण हे पहात होते. स्वामी रागाने ओरडून म्हणाले "चल चालता हो येथून! तुझ्यामुळे मी मरतो आहे समजलास! दुखणे तुझ्यामुळे मला आले आहे. जा, जा लवकर येथून! क्षणभर थांबू नकोस!"

स्वामींची परिस्थिती पाहून जांबवंतसिंहाचा तेथून पाय निघत नव्हता. स्वामींचे ते स्वरूप व रागाचे शब्द ऐकून तेथे क्षणभरही थांबणे शक्य नव्हते. मुकाट्याने जांबवंतसिंह दवाखान्यातून बाहेर पडले. जवळपास जरा आडोशाला रस्त्याच्या कडेला उभे राहिले. पुढे काय होते ते पहावे. आपली गरज लागली तर पुढे व्हावे असा विचार मनात घोळत होता. इतक्यात एक रिक्षा दवाखान्यासमोर आली. डॉक्टरांच्या मदतीने स्वामीजी रिक्षात बसले. रिक्षा सुरू झाली. स्वामी आत पडून राहिले होते. हालचाल करण्याचाही त्राण त्यांच्यात

नव्हता. अगदी निच्चेष्ट पडलेले स्वामीजी दुरून जांबवंतसिंह पहात होते. त्यांच्या अन्त:करणाची कालवाकालव झाली. पण पहाण्याशिवाय उपाय नव्हता. रिक्षामागून ते पळत जाऊ लागले. रस्त्यातून जाताना लोक पहात होते. रिक्षा पुढे चालली आहे व एक प्रतिष्ठित व्यापारी त्या रिक्षेमागून पळत जात आहे. कोणाला काहीच कल्पना करता येत नव्हती. जांबवंतसिंहाचे तिकडे लक्षच नव्हते. स्वामींना सुरक्षितपणे त्यांच्या निवासस्थानात पोहचविणे एवढेच काम त्यांनी मनाने घेतले होते. त्यासाठी हा पळण्याचा व्याप ते करीत होते.

राणामहल घाटावरील मोठ्या रस्त्यापर्यंत रिक्षा आली. पुढे अरुंद गल्लीतून रिक्षा जाईना म्हणून तेथेच ती थांबली. स्वामींनी रिक्षाचे पैसे दिले. व ते कसेबसे रिक्षातून खाली उतरले. रिक्षा निघून गेली. स्वामी तेथेच रस्त्याच्या कडेला एका दगडाला टेकून पडून राहिले. त्यांच्याने उभेही राहवेना व चालवेना. तेवढ्यात जांबवंतसिंह स्वामींपुढे येऊन हात जोडून उभे राहिले. तेव्हांमात्र स्वामी मनापासून हसले. म्हणाले " तू आलास. मला घरापर्यंत घेऊन चल. तुझ्या खांद्यावर घेऊन चल. मला चालवत नाही. स्वामींची ही प्रसन्नता व प्रेमळ शब्द ऐकून आनंदाने जांबवंत-सिंहाचे डोळे भरून आले. स्वामींना फुलाप्रमाणे अलगद उचलले व आपल्या पाठीवर घेतले. व हळू हळू ते घराकडे घेऊन गेले.

जांबवंतसिंहाला एक अशीच जुनी आठवण आली की आपण एका वृद्ध गुरुदेवांना आपल्या पाठीवरून नेले म्हणून या प्रकारचा मार्ग व मार्गदर्शक मिळाले. आता तर केवढे अहोभाग्य ! पण हे परमभाग्य मिळविण्यासाठी किती गोष्टी सहन कराव्या लागल्या. वेदधर्मामुनी प्रारब्ध क्षालनासाठी संदीपकाला घेऊन एकवीस वर्षेपर्यंत काशीला येऊन राहिले होते. अनेक रोगांनी जर्जर झालेले मुनी आपल्या शिष्याला हवे तसे बोलत पण तो निमूटपणे आनंदाने शंकराची सेवा समजून श्रीगुरुसेवा करीत होता. सेवेवर शंकर व विष्णू संतुष्ट होऊन प्रसन्न झाले व वर मागण्यास सांगून त्यास कृतार्थ केले. आजही स्वामींनी जांबवंतसिंहाला कृतार्थ केले. या गुरुचरित्रातील वेदधर्मामुनी आणि संदीपक धन्य धन्य झाले.

## काशीतील कथा—सर्वभूतीं परमेश्वर !

स्वामी काशीत राणामहलमध्ये असताना घडलेली ही कथा आहे. स्वामींचे निवासस्थान म्हणजे स्वतंत्र घरच होते. तीन मजली इमारत भाड्याने घेतली होती.

स्वामींच्या छाट्या धुवून वरच्या मजल्यावरील गॅलरीत वाळत टाकत असत. जांबवंतसिंह, लक्ष्मणशास्त्री वैद्य यांच्या सारखे साधक शिष्य ही सेवा करीत असत. नित्य नेमाने अशा छोट्या मोठ्या गोष्टी श्रद्धा भक्तीने ते करीत असत.

काशीत काही भागातून वानरांची वस्ती आहे. राणामहल भागात अशी वानरे भरपूर आहेत. या वानरांचे उद्योग म्हणजे घर उघडे दिसले की त्यामध्ये शिरून हाताशी लागेल ती वस्तू घेऊन पळून जायचे आणि त्या वस्तूंशी खेळत बसायचे. कधी खाद्य पदार्थ असतील तर त्यावर यथेच्छ ताव मारायचा. कपडे असतील तर ते फाडून चिंध्या करून पळून जायचे, माकड चेष्टाच या साऱ्या ! ! ही वानरसेना दुपारच्या वेळी स्वामींच्या निवासात हळूच येत असे. वरच्या मजल्यावरील गच्चीत जमत. तेथे वाळत टाकलेल्या लाल रंगाच्या छाट्या घेऊन फाडून टाकीत. कोणीतरी एक वानर प्रथम एक छाटी ओढी. तेव्हां दुसरे वानर त्याच्या हातातील छाटी घेण्याचा प्रयत्न करी त्यात ती फाटे. तिसरे वानर यामध्ये शिरले की त्या छाटीच्या चिंध्या व्हायला फारसा वेळ लागत नसे. त्यानंतर जे कोणी साधक स्वामींच्याकडे येत त्यांना हा वानर–प्रताप दिसत असे.

वानरांनी छाट्या फाडल्या ही तक्रार स्वामींकडे नेण्याऐवजी ही साधक मंडळी मध्येच एक व्यवहार करीत असत. काशीचे बहुतेक साधक, कापड व्यापारी ! ते अल्पावधीत स्वामींच्या छाटया पूर्ववत नवीन आणून ठेवीत. आला थोडा खर्च तर, तो ते आपापसात वाटून घेत. पण हा प्रकार रोज होऊ लागला. स्वामींना नव्या छाटया पाहून शंका आली. रोज नव्या छाटया कशा येतात ? काय भानगड आहे ? स्वामींनी ही शंका जांबवंतसिंहाला विचारली.

जांबवंतसिंहाने सारे वानरप्रताप सांगितले. स्वामींनी शांतपणे ऐकून घेतले. तुम्ही काय करता ? म्हणून विचारले, "रोज नवी छाटी धुवून आणून वाळत टाकतो" असे उत्तर दिले. स्वामी यावर विशेष काही बोलले नाही.

दुसरे दिवशी दुपारी स्वामी स्वतः वरच्या मजल्यावरील गच्चीच्या दारात हळूच गेले. पहातात तो ७।८ वानरे त्या छाट्या ओढून त्यातील आपला वाटा हिसकावून घेण्याच्या हट्टाला पेटलेले दिसले. स्वामींनी हे पाहिले व शांत मनाने त्या वानरांना दोन्ही हात जोडून नमस्कार केला व म्हणाले,

"हे रामदूतांनो, तुम्ही माझी प्रार्थना ऐकाल अशी मला खात्री आहे; म्हणून मी प्रार्थना करीत आहे. तुम्ही संन्याशाच्या छाट्या फाडता याबद्दल या संन्याशाला वाईट वाटत नाही. तर या छाट्या फाटलेल्या पाहून काही गृहस्थाश्रमी साधक त्या रोज नवीन विकत घेऊन आणून ठेवीत आहेत. त्यांना ही रोज शिक्षा होत आहे याचे वाईट वाटते. तरी आपण असे करू नये एवढी रामस्मरणपूर्वक प्रार्थना आहे."

स्वामींनी प्रार्थना केल्यावर त्यांना नमस्कार केला आणि त्याचक्षणी सारे वानर तेथून निघून गेले. पुन्हा कधी ते इकडे फिरकले सुद्धा नाहीत. छाट्या फाटेनाशा झाल्या हे पाहून साधकांना आश्चर्य वाटले. त्यांनी स्वामींच्या जवळ चौकशी केली तेव्हा ही हकीगत समजली. स्वामी सर्व प्राणीमात्रांचे ठिकाणी परमेश्वर पहात होते व प्राणीमात्रही त्यांच्या प्रार्थना समतेच्या संवेदनेने मानीत होते.

## इ. स. १९४३

स्वामींचा मुक्काम इ. स. ४३ च्या प्रारंभी काशीत होता. फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात 'लखा' हून हरस्वरुपचे पत्र आले की स्वामींनी त्यांचे गांवी काही दिवस येऊन रहावे. भक्ताचे हार्दिक भाव सद्‌गुरुंना कंपित केल्याशिवाय राहात नाहीत. स्वामींचे तसेच झाले. सध्या काशीमध्ये प्रकृती तितकीशी ठीक नव्हती. स्थानांतर केले म्हणजे ती सुधारते असा नेहमीचा अनुभव स्वामींचा होता. हे लौकिक निमित्तही वेळेवर मिळाले आणि स्वामी लवकरच लखाकडे रवाना झाले.

हरस्वरुपची गाठभेट झाली. स्वामींनी तेथे मुक्काम केला. नंतर तेथून ते सरळ पुण्यास आले. शंकरराव मार्कंडांच्या घरी माडीवर स्वतंत्र खोली घेऊन स्वामी राहिले. हा मुक्काम पुरंदरे कॉलनीत होता. नाना भालेराव व नारायणराव देशपांडे कोर्टातून परस्पर स्वामींकडे जात. त्यांच्याबरोबर फिरावयासही जात आणि रात्री ९ वाजता घरी येत. शंकरराव मार्कंडांचा नवा व्यवसाय यावर्षी या काळात सुरू झाला. नवा प्रारंभ चांगला झाला. रविवारी पौर्णिमेला तात्या न्हाव्याकडून स्वामींनी क्षौर करविले. नवीन खडावा विकत घेतल्या.

## "भक्त माझा, मी भक्ताचा"

इ. स. १९४३ मधील शिवरात्रीच्या पूर्वीचा तो काळ होता. नाना भालेराव

दरवर्षी महाशिवरात्रीला आपल्या डोणजे गावी जात असत. त्या गावाजवळ एक प्राचीन शिवालय आहे. सर्व गावकऱ्यांचे ते भक्तिस्थान आहे. खेडी ज्या वेळी लोकवस्तीने भरलेली असत त्यावेळी अशा देवस्थानाचे कार्यक्रम मोठ्या थाटामाटाने, भावभक्तीने होत असत. पण अलिकडच्या पन्नास वर्षात खेड्यातील माणूस शहराकडे वळू लागला, तसे खेड्यांचे वैभव संपले. पण परंपरेला जागणारे, सणासमारंभासाठी, गावाकडे जाऊन येत असत.

नानांचे जाणे अशा एका परंपरेला धरून होते. महाशिवरात्रीच्या पुण्यरात्री भोवतालच्या गावातील जाणते ब्राह्मण या शिवालयात येत. सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंत प्रत्येक यामाची पूजा–आणि संपूर्ण रात्रभर रुद्रावर्तने चालत. शिवमंदिर शांत वातावरणात गावापासून दूर होते. रात्रभर शिवावर संतत धार आणि मंजुळ स्वरात चाललेले रुद्रपाठ वेदकालाची आठवण करून देत असत. या कार्यक्रमाला नानांच्या घरची मंडळी २।३ दिवस आधीच गेली होती. नानाही जाणार होते पण स्वामीजी पुण्यास आले आहेत तर थांबू थोडे अशा हिशेबाने मागे राहिले होते. कारण स्वामींच्या सहवासाची संधी सुटू नये. आता उद्या गावी गेलेच पाहिजे तर आदले दिवशी नानांनी स्वामींच्याजवळ विषय काढला. ते एवढेच म्हणाले "उद्या मला माझ्या डोणजे गावी गेले पाहिजे. तेथे महाशिव-रात्रीला शिवालयात यामपूजा असते. आमच्या गावाजवळ आहे ते शिवालय. तेव्हा गेले हे पाहिजेच. दरवर्षी जातो."

नानांनी एवढी कल्पना दिली. लगेच स्वामी म्हणाले "मी तुमच्याबरोबर आलो तर चालेल का?" नानांनीनी तात्काळ सांगितले "हो, चला. का नाही चालणार? आमचे एवढे मोठे भाग्य आहे हे तर कळले. नानांच्या मनात हाच विचार दोन दिवस घोळत होता. पण पुण्यापासून मराठवाड्यातले गाव म्हणजे फार लांबचा प्रवास. त्यातून प्रवासाची साधने नीट नाहीत. स्वामींना हा एवढा त्रास कसा द्यावा? या संकोचामुळे त्यांनी स्वामींच्याजवळ 'येता का?' म्हणून विषय काढला नाही. पण आपल्या जाण्याचा विषय काढताच स्वामी म्हणतात, 'मी येऊ का?' केवढे हे भाग्य! वेळूच्या रानातील लक्ष्मीने असेच एका पोराला विचारले होते तेव्हा त्या पोराने म्हटले, 'ये' आणि ती लक्ष्मी त्याच्यापाशी आली की! तसेच झाले नानांचे! नाना म्हणाले, "चला ना स्वामी."

स्वामी आपल्या गावी येणार, घरी येणार या विचाराने नानांना फार आनंद झाला. इतक्या दूरच्या खेड्यावरल्या घरी स्वामी परत येतील ही कल्पनाही त्यांच्या मनात आली नाही. पुरुषाचे भाग्य आधी समजत नसते, ते असे. स्वामींची चरणधूळ आपल्या घराला परत लागणार या आनंदाच्या धुंदीत त्यांनी स्वामींना शक्य तितक्या सोयीच्या प्रवासाने नेण्याची व्यवस्था केली. प्रवासात स्वामींना काहीही कष्ट पडणार नाहीत याची पूर्ण दक्षता घेतली होती. पण स्वामींनी स्वतःच जाण्याचे ठरविल्यामुळे कष्ट वगैरेची कल्पनासुद्धा त्यांच्या मनाला शिवली नाही. ज्याला एकदा आपले म्हटले त्याच्यावर सतत प्रेमाचा वर्षाव करणे एवढेच आपले काम! स्वामींना नानांच्याबद्दल फार मोठी आत्मीयता होती. नानांचा स्वभाव 'सेवाधर्मरत' आहे याची स्वामींना चांगली जाणीव होती.

श्री. नानांच्याबरोबर स्वामी डोणज्याकडे निघाले. प्रथम रेल्वेचा प्रवास जेऊरपर्यंत झाला. तेथून पुढे कर्माळ्यापर्यंत मोटारने प्रवास झाला. नंतर पुढे बैलगाडीचा प्रवास सुरू झाला. बैलगाडीची व्यवस्था आधीच पत्राने करून ठेविली होती. त्यामुळे अडचण कसली भासली नाही. प्रवासात कितीही सोयी केल्या तरी प्रवासाचे कष्ट होतात ते होतातच. तरीपण एवढा मोठा वेगवेगळ्या वाहनांचा प्रवास करून स्वामी एकदाचे डोणज्यास सुखरुप पोहचले. येथून जवळ असलेल्या हिवरे गावी ते शिवमंदिर होते. तेथे शिवरात्रीच्या यामपूजेचा कार्यक्रम होणार होता. स्वामींना घेऊन नाना शिवमंदिरात आले. यामपूजेसाठी इतरही मंडळी आलेली होती. नाना आले व त्यांचेबरोबर कोणी संन्यासी महापुरुष आले आहेत हे पाहून सर्वांना खूप आनंद झाला. सर्वांचा उत्साह वाढला.

जमलेल्या मंडळीत भालेरावांच्या दोन्ही घराण्यातील म्हणणारी मंडळी, गावांतील कांही म्हणणारी मंडळी, नानांचे उपाध्याय श्री. दत्तात्रेय लक्ष्मण काळे अशी आठ दहा मंडळी रुद्रपाठासाठी जमली होती. रुद्र म्हणणारे ब्राह्मण खेड्यातून मिळणे अशक्य. असे असताना भोवतालच्या, गावातून एवढी मंडळी येथे आली होती. निसर्गातील निवांत वातावरणात असलेल्या गर्द वृक्षराजीच्या घनदाट छायेतील या रम्य शिवालयात शिवरात्रीच्या रात्रीची ही पूजेची परंपरा पाहून स्वामींना समाधान वाटले. सर्वांनी स्वामींना नमस्कार केला.

हे शिवमंदिर नागनाथाचे म्हणून प्रसिद्ध आहे. हेमाडपंथी बांधणीचे आहे. सभामंडप मोठा आहे. गाभाऱ्यात आठ दहा फूट खोल उतरून पोहचता येते.

गाभाराही १२'×१०' या आकाराचा आहे. मंदिर फार प्राचीन आहे. एका खांबावर जुन्या लिपीत या मंदिराच्या स्थापनेचा काळ रामराजाचा लिहिला आहे. हा रामराजा यादव घराण्यातील असावा. स्वामी मंदिराचे शिल्प न्याहाळीत मंदिरात शिरले. पायऱ्या उतरून गाभाऱ्यात आले. शिवलिंगाकडे एकटक दृष्टी लावून दर्शन घेतले. तेथेच बाजूला बसून सिद्धासन घातले. डोळे मिटले. त्यांची तंद्री लागली.

स्वामींनी मध्येच डोळे उघडून बघितले. शिवलिंगावर अभिषेकपात्रातून संतत धार चालू आहे. सभोवताली भस्मचर्चित ब्राह्मण नादमधुर स्वरात रुद्रावर्तन करीत आहेत. नंदादीप आणि निरांजन आपापल्या मंद पण स्थिर प्रकाशाने वातावरणाला प्रगाढ शांतता आणीत आहेत. उदबत्तीच्या धुपाने धुसरित आणि सुगंधित झालेले वातावरण शांततेला गांभीर्याची धुंदी आणीत आहे. स्वामींनी हे सारे पाहिले आणि त्यांची परत तंद्री चढली. शरीर पुन्हा ऊर्ध्व दिशेने ताणले गेले. अगदी ताठ! स्तब्ध! स्थिर! तासादोनतासानी दृष्टी अर्धोन्मिलित होऊन ती नासिकाग्रावर स्थिर झाली. पुन्हा पुढे दोन तीन तास त्याच स्थितीत. नंतर पुन्हा डोळे मिटून घेतले. बाकी किंचितही हालचाल नाही. स्वामींची ही समाधी पाहून सर्वांची खात्री झाली की हे असामान्य संन्यासी आहेत. स्वामींच्या सान्निध्याने आजच्या रुद्रावर्तनात सर्वांना चैतन्याचा अनुभव येत होता.

स्वामी नानांना म्हणाले "भुजंगराव, हे जागृत सिद्धस्थान आहे; याची उपासना शीघ्र फलदायी आहे."

रात्रभर स्वामींना जागरण नको म्हणून वर सभामंडपांत त्यांची झोपण्याची व्यवस्था करून ठेवली होती. पण स्वामी आत शिवालयात गेले ते त्या ध्यानावस्थेतून बाहेरच येईनात. त्यांचा भव्य तेजःपुंज चेहरा पाहून त्यांच्या इच्छेविरुद्ध झोपेबद्दल नाना सुद्धा काही विचारू शकले नाहीत. स्वामी स्वतःच प्रसन्नतेने ध्यान लावून बसले आहेत यातच सर्वांना प्रसन्नता होती. पूजा, मंत्रोच्चार, पाण्याच्या भांड्यांचा आवाज यापैकी काहीही स्वामींना विचलित करू शकत नव्हते. याउलट त्यांच्या सान्निध्याने सर्वांच्या कामाला, हालचालीला व उच्चाराला गांभीर्य येत होते.

संपूर्ण शिव-रात्र यामपूजेत गेली. चौथ्या यामपूजेनंतर – शिवाची पूजा

झाली. गंध, अक्षता, बेल, फुले वाहून नैवेद्य समर्पण केला. आणि वाद्यांच्या गजरात आरती सुरू झाली तेव्हा स्वामींचे व्युत्थान झाले. स्वामी आरतीला उभे राहिले. आरती झाली. सर्वांनी शिवाला आणि स्वामींना वंदन केले.

महाशिवरात्रीची यामपूजा झाली. शिवरात्रीचे पारणे तेथेच झाले. मग हिवरे गावाहून डोणजे गावी गाडीने स्वामी निघाले. रस्त्याने काटेरी फण्या निवडुंगाची भली मोठमोठाली झाडे लागली. त्या निवडुंगाला लाल भडक बोंडे आली होती. त्या बोंडावरही लुसलुशीत काट्यांचे पुंजके होते. बोंडाला हात लावला की ते काटे हातात शिरत नि सारा हात चुरचुरू लागे. स्वामींनी ती बोंडे पाहिल्यावर गाडीतून खाली उडी घेतली. दत्तात्रेय लक्ष्मण काळे वगैरे दोन तीन मंडळी बरोबर घेतली व बोंडाकडे निघाले.

बरोबरच्या मंडळींनी स्वामींना सांगितले ती बोंडे तोडताना हाताला त्रास होतो. त्यावर स्वामी म्हणाले चला तर तिकडे! मी पहा कशी युक्ती करतो ते! स्वामींनी काय युक्ती केली कोणास ठाऊक पण त्यांनी भराभर बोंडे तोडली व हातावर घासून त्याचे सर्व काटे काढून ती स्वच्छ केली. ही बोंडे खातात. त्याप्रमाणे सर्वांनी खाल्ली.

या प्रवासात स्वामींनी साधी नैसर्गिक शक्तिवर्धक औषधे सांगितली. त्यातले एक बाभळीचा कोवळा पाला चावून खावा आणि दुसरे हरळी चावून खावी. नंतर स्वामी डोणज्याला नानांच्या घरी राहून पुढे परत पुण्यास गेले.

एकदा आपला भक्त म्हटला म्हणजे स्वामी त्याच्यावर भरपूर प्रेम करीत.

श्री. शंकरराव मार्कंडांनी स्वामींना गोकर्ण महाबळेश्वरला आपल्या कुटुंबियां-सहित यावे म्हणून प्रार्थना केली. स्वामींनी काशीला जाऊन येण्याचे कारण दाखविले. शंकररावांनी जाण्यायेण्याचे भाडे देऊन वर खर्चालाही पैसे दिले आणि ताबडतोब पुण्यास परत येण्याची विनंतीही केली. स्वामींनी संमति दिली आणि ते बनारसला गेले.

देशात सर्वत्र युद्धाचे वातावरण पसरले होते. स्वामींच्या सेवेला कोणी येऊ शकत नव्हते. त्यामुळे त्यांची मोठी कुचंबणा होत होती. ती त्यांनी १२ एप्रिल ४३ च्या पत्रातून व्यक्त केली.

"लढाई की वार्ता भयंकर है। यहाँपर भी सब लोग भयसे चिंतातुर हैं। काशी क्षेत्र गुण्डाप्रधान है। यहाँपर मुझे वाक्य द्वारा भी साहाय्य करनेवाला कोई मनुष्य नहीं है। ग्रामांतर जानेका भी कोई उपाय नहीं है। इस देशमें कोई भी गाँवमें संन्यासी को रहने देता नहीं। गाँवसे बाहर एकान्तमें रहना पडता है। इस दुर्दिनमें गाँवके बाहर एकान्त स्थानपर रहनेसे गुण्डा लोगके हाथसे अवश्यही मृत्यू होगा। अतः मैं काशीक्षेत्रमें ही वास कर रहा हूँ। आगे नारायण की इच्छा।" असे ते वातावरण होते.

या वर्षातील घटनांपैकी श्री. कृष्ण सातवळेकर यांचा मृत्यू ही एक घटना आहे. स्वामींनी यांच्याबद्दल पुढील उद्‌गार काढले आहेत—

"....यह मृत्यू किसीको छोडता नहीं। नारायणपरायण पुरुष मृत्यूसे भी डरता नहीं। यद्यपि कालवश सबका देहान्त होता है। उस देहान्त समय भी नारायण–परायण पुरुष को कुछ भी दुःख होता नहीं।"

स्वामींना प्रवासात फार त्रास झाला. त्याबद्दल ते म्हणाले, "देव करो आणि पुन्हा गाडीत बसण्याची वेळ न येवो." नंतर प्रबल पित्तज्वराने प्रकृती बिघडली. कोणी एका बंगाली ब्राह्मणाने स्वामींची तीन दिवस निःस्वार्थ सेवा केली. जाबवंतसिंहाने एका वैद्याला स्वामींकडे नेले. नीट तपासणी करून औषध योजना केली त्यामुळे प्रकृती सुधारली.

काशीच्या आश्रमाच्या विचाराला याच काळात तोंड फुटले. यासंबंधी थोडी सविस्तर माहिती पाहू.

## काशीतील स्वामींच्या आश्रमाच्या वाटाघाटी

स्वामींच्या सहवासामुळे शंकरराव मार्कंडांच्या लौकिक जीवनाचा उत्कर्ष होऊ लागला. दिवसादिवसाला शंकररावांच्यावर लक्ष्मीने पैशाचा पाऊस पाडण्याला सुरवात केली तसतशी शंकररावांची स्वामींच्यावरील निष्ठा आणि श्रद्धा वाढू लागली. आपण स्वामींच्यासाठी काही तरी करावे असे त्यांना वाटू लागले. स्वामींचा मुक्काम काशीत बराच काळ असतो पण जागा ठीक मिळत नसल्याने त्यांना सारख्या जागा बदलाव्या लागतात. यातूनच शंकररावांना वाटले स्वामींची कायम रहाण्याची सोय

त्यांच्या इच्छेप्रमाणे काशीत करावी. त्यासाठी त्यांनी तसे बोलणे महाराजांशी, जांबवंतसिंहाशी आणि प्रत्यक्ष स्वामींशीही सुरू केले. स्वामींनी या कल्पनेला विरोध केला. पण शंकररावांची इच्छा आणि आग्रह पाहून पाहू काय काय होते असे मानून संमतीही दिली. प्रथम वाटले एखादे घर तयार मिळाले तर ते पहावे. तसा पत्रव्यवहार झाला. यासंबंधीच्या घटना पुढीलप्रमाणे घडत गेल्या.

शंकरराव हाडाचे धार्मिक प्रवृत्तीचे होते म्हणून त्यांनी रेसमध्ये मिळालेल्या पैशाचा जास्तीत जास्त उपयोग धार्मिक कार्यासाठी, तीर्थ यात्रेसाठी आणि श्रीगुरु सेवेसाठीच केलेला दिसून येतो. या पैशातून सुरवातीलाच दोन मोठी कार्ये करण्याचे शंकररावांनी योजिले होते. एक दत्त मंदिर बांधणे आणि दुसरे कार्य म्हणजे प. पू. स्वामीजींसाठी श्रीकाशी क्षेत्रात आश्रम बांधणे.

काशीतील आश्रमाला स्वामींचा मोठा विरोध होता. काय करावयाची आहे संन्याशाला उपाधी ! आमचा मुक्काम तरी एके ठिकाणी कुठे असतो ? आश्रम आला की भांडणे आली. मारामाऱ्या आल्या. इत्यादि अनेक प्रकारे आपला विरोध प्रकट केला.

शंकररावांनी स्वामी प्रखर विरोध करणार हे आधीच ओळखले होते. त्यासाठी महाराज मध्ये घातले. काशीची सारी हालचाल श्री. जांबवंतसिंहजीना करण्यास तयार केले. आश्रमासंबंधी कोणतेही बंधन स्वामींवर नाही. त्यांनी फक्त तेथे रहावे ही इच्छा. बाकी सर्व व्यवस्था साधक मंडळी पहातील ही तयारी ठेवली. घर विकत घ्यावयाची इच्छा असेल तर घर घ्यावे मनाजोगे मिळत नसेल तर जमीन घ्यावी आणि त्यावर स्वामीजींच्या इच्छेप्रमाणे बांधकाम करावे. आधी सर्वांनी विचारविनिमय केला. गुरुदक्षिणा म्हणून दिली तर स्वीकार होतो त्याच भावनेने आश्रम अर्पण करणार आहोत असे सांगण्याचे ठरवले.

स्वामीजी मधून मधून पुण्यास येत असत. १९४३ मधील चैत्र वैशाखात स्वामी पुण्यास होते. त्यावेळी शंकररावांचे घरी मुक्काम होता. योग्य वेळ पाहून स्वामींच्या जवळ काशीच्या आश्रमाचा विषय काढला आणि बराच वेळ चर्चा होऊन स्वामी म्हणाले –

" सध्या तेथे घ ांच्या किंमती काय आहेत ते तेथे गेल्यावर पाहू. खर्च किती येतो. तुमच्या अंदाजात तो खर्च बसतो का ते पहा आणि ठरवा. तुमच्यासाठीच तो आश्रम होणार आहे. माझे निमित्त हवे आहे तर हरकत नाही."

१९४३ च्या सप्टेंबरात पू. स्वामींनी शंकरराव मार्कंडांना पत्र लिहिले त्यात घरासंबंधी पुढील मजकूर होता.

"केदारमंदिरापासून थोड्या अंतरावर हरिश्चंद्ररोडजवळ तीन घरे पाहिली. १) पहिले घर तीन मजली आहे. प्रत्येक मजल्यावर दोन दोन खोल्या आहेत. नवीन घर आहे. पूर्वपश्चिम दारे खिडक्या आहेत. हवा खेळती रहाते. सर्वांना हे घर पसंत आहे. २) दुसरे घर याच्याच जवळ आहे. तेही दोन मजली आहे. पहिल्यापेक्षा जरा मोठे आहे. ३) तिसरे घर गंगेच्या काठावर आहे. घर सुरक्षित आहे. समोर गंगा आहे. पूर्वपश्चिम व दक्षिण बाजूंनी मोकळे आहे. घाट आहे. हे घर म्हणजे कोण्या दक्षिणी संन्याशाचा मठ होता. एका बंगाली ब्राह्मणाने विकत घेतला. त्याच्यात सुधारणा केली. काही नवीन बांधले. या घरामध्ये समाधीच्या अभ्यासासाठी एक सुंदर गुहा अगोदरपासूनच बांधलेली आहे. हे घर सर्व दृष्टीने संन्याशाला रहाण्यास योग्य असे आहे.

वर सांगितलेल्यापैकी १ ल्या घराची किंमत ७००० रु. परंतु ६५०० मध्ये मिळू शकेल. दुसऱ्याची ८००० रु. आणि तिसऱ्या घराची किंमत तो मालक किती मागेल हे सांगता येत नाही.

घर घेण्याची इच्छा असेल तर ताबडतोब काशीला निघून यावे. येथे घर विकत घ्यायचे झाले तर कमी जास्त किंमत करून घेता येते परंतु भाड्याने मात्र जागा कोणत्याही स्थितीत मिळू शकत नाही. जसे ठरेल तसे करावे"

याप्रमाणे आश्रमाच्या विषयाला चालना मिळाली. शंकरराव पत्र पाहून विचार करू लागले. ते पत्र त्यानी ताबडतोब श्रीगुरुमहाराजांना नेऊन दाखविले. आश्रम व्हावा हा संकल्प स्वामींच्या मनातून निर्माण झाल्याच्या एक एक खुणा दिसू लागल्या. शंकररावांनी सर्व खर्च स्वतः सोसावयाचा संकल्प आधीच बोलून दाखविला होता. योगायोगाने आश्रमाचा विषय येथेच थांबला.

शंकरराव अनेकवेळा काशीला जाऊन आले त्यांची इच्छा होती की प. पू. स्वामीजींना घेऊन तीर्थयात्रा करावी. त्याप्रमाणे १९४३ च्या २२ एप्रिलला बुधवारी आपल्या सर्व परिवारासह गोकर्ण महाबळेश्वरची यात्रा ठरवली. त्या यात्रेला पू. स्वामीजींना बरोबर घेतले. यात्रा मोठी छान झाली. सर्व व्यवस्था घरची. सोवळे ओवळे इ. सर्व व्यवस्थित. स्वामींच्या गोड सहवासाची त्यात भर पडली. २२ एप्रिल ते २९ एप्रिल एवढ्या सात दिवसांची ही यात्रा होती. चार दिवस गोकर्ण महाबळेश्वरमध्ये मुक्काम होता. पश्चिम सागरतीरावरील ही महान तपोभूमि. शिवमंदिर, गणेश मंदिर आणि श्रीदत्तात्रेय मंदिर ही विशेष मंदिरे हेच या स्थानाचे वैशिष्ट्य.

गोकर्णमहाबळेश्वराच्या यात्रेत स्वामीमहाराजांची स्वतंत्र डब्यात सोय केली होती. बेळगावचे श्री. त्रि. रा. गोगटे – आपले साधक काही कामानिमित्त सांगली बुधगावकडे गेले होते. बुधगावच्या स्टेशनवर स्वामीमहाराज पाहून त्यांना अतिशय आनंद झाला. धावतच डब्याकडे गेले. स्वामीमहाराजांच्या चरणावर मस्तक ठेवले. शंकररावांची भेट झाली. श्री. गोगटे यांचा आनंद शब्दातीत होता.

गोकर्णमहाबळेश्वर यात्रेमध्ये शंकररावांचे कुटुंब आणि मातोश्री होत्या. तीर्थविधी यथासांग केला. यात्रेहून पुण्यास परत आल्याबरोबर स्वामीजी काशीकडे रवाना झाले. स्वामींच्याबरोबर आणखी कोणी तीर्थयात्रेत सामील होऊ शकले नाहीत.

काशीमध्ये घरासाठी सहा हजार रुपये शंकररावांनी स्वामींच्याजवळ दिले होते. स्वामींनी त्या पैशाची व्यवस्था जांबवंतसिंहाना ठेवण्यास सांगितली.

एकूण घटनांचा विचार करता ही गोष्ट स्पष्ट होते की शंकररावांची उर्जितावस्था सुरू झाली ती स्वामींच्या कृपेने सुरू झाली. शंकररावांना याची जाणीव होती म्हणून त्यांनी स्वतःच्या घराच्या आधी स्वामींच्या आश्रमाचा विचार केला. धार्मिक कार्यात आणि स्वामींच्यासह तीर्थयात्रेस पैसा खर्च केला.

दि. १६ ऑक्टोबरला शंकरराव आश्रमासाठी काशीस जाऊन आले.

## 'मला आश्रमाची गरज नाही''

विरक्त अन्तःकरणाची बैठक अनपेक्ष असते. शंकरराव मार्कंड, महाराज, जांबवंतसिंह यांच्या आग्रहासाठी स्वामी आश्रम करण्यास तयार झाले. इतकेच नव्हे

तर स्वतः तीन जागा पाहून त्याबद्दलचे आपले मत, खुलासेवार माहिती आणि संभाव्य किंमती सुद्धा सविस्तर पत्राने त्यांना कळविल्या. शंकररावाना ताबडतोब निघून येण्यास सांगितले. इतके झाले तरी ही आश्रमाची उठाठेव संन्याशाला कशाला पाहिजे या विचार सूत्राचा तंतू स्वामींची हृदयवीणा छेडीत होता. या आतून निघणाऱ्या विरक्तीच्या सुरामध्ये स्वामी रमत होते. पण या भानगडीत आपण आधी लक्ष घालून बसलो. आता आपण आपल्या दुबळ्या प्रकृतीच्या माथी नकाराचं खापर फोडून नामानिराळे व्हावे असे त्यांना वाटू लागले. स्वामींनी एक स्पष्ट नि सरळ पत्र शंकरराव मार्कंड यांना पाठविले.

नारायण

श्रीक्षेत्रकाशी
१३।३।४४

कल्याणभाजन शंकर रामदास मार्कंड यास

नारायण स्मरण सूचक आशीर्वाद, विशेष समाचार, मध्यंतरी मी आपणास एक पत्र पाठविले होते. आज मी आपणास आणखी एक पत्र पाठवीत आहे. पत्राचे कारण असे की, अलिकडे मी दिवसेंदिवस, कोणत्या ना कोणत्या आजाराने दुर्बल होत चालली आहे. या अशक्ततेमुळे मला हिंडण्या फिरण्याचाही फार त्रास होतो. आता शरीर प्रकृती सुधारण्याची बिलकूल आशा नाही. असाच अशक्त होत होत, एक किंवा फार तर दोन वर्षात माझा देहान्त होईल अशी मला खात्री वाटते.

अशा स्थितीत जागा विकत घेऊन इमारत बांधण्याचा काही एक उपयोग नाही. माझ्या आयुष्याची काहीच खात्री नाही. मी माझ्यासाठी होणाऱ्या इमारतीचे कोणतेच प्रयत्न करू शकणार नाही. म्हणून आपणास पत्र पाठवीत आहे. आपली माझ्या या विचारांना संमती मिळाली की मी आपण पाठविलेल्या मॅनेजर साहेबांना निरोप देतो. जास्त काय लिहू? प्रकृती फारच अशक्त होत चालली आहे. माझ्याकडून कष्ट होऊ शकत नाहीत. पुढेही होणार नाहीत. आपले पत्र मला मिळाले म्हणजे आपले पैसे परत पाठविण्याच्या विचारात आहे. मी सर्व प्रकारचा विचार करूनच आपणांस अशा प्रकारे लिहिले आहे. या विचारांत कोणतीही शंका घेऊ नये. मी सरळपणाने सर्व गोष्टी आपणास लिहिल्या आहेत.

घरातील सर्व मंडळींना माझा नारायण स्मरणपूर्वक आशीर्वाद सांगणे. पत्रोत्तरात पैसे ताबडतोब पाठवावेत असे लिहावे. वेळ घालवू नये. नारायण आपले कल्याण करो. इति शम् ।

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ.

हे पत्र श्री. शंकरराव मार्कंड यांना मुंबईस एम्पायर हिन्दु हॉटेल या पत्त्यावर पाठविले. ते यावेळी रेस सीझनसाठी मुंबईस गेले होते. शंकररावांनी पाहिले, स्वामी फारच बदलले आहेत तेव्हां हा विषय पत्रांनी न हाताळता तोंडी व प्रत्यक्षच पाहिले पाहिजे. या विषयाचा विशेष उल्लेख न करता जरा विषयांतरच केले. शंकररावांनी नोव्हेंबर ४४ मध्ये रेससीझन मद्रासला असल्याने तिकडे स्वामींना बोलावून घ्यावे असे ठरवले.

शंकरराव उत्तर देत नाहीत असे पाहून स्वामींनी जांबवंतसिंहाकडून पत्र लिहविले. त्यांनी आपल्या पत्रांत लिहिले–

१९ मार्च ४४

"गेल्या ४/५ दिवसापासून स्वामींची प्रकृती बिघडली आहे. सहा हजारात घर मिळत नाही. प्रकृतीची खात्री नाही. जमीन किंवा घर घेणे योग्य नाही. आपले पैसे परत केले जातील. त्या पैशातून दत्त मंदिर बांधावे. ते स्वामींना पसंत पडेल. आता स्वामींना लवकर मोकळे करा. ताबडतोब इकडे कोणास तरी पाठवून द्यावे."

स्वामींच्या निर्णयातील तत्परता शंकररावांना चांगलीच जाणवली. ते महाराजांकडे आले. एकूण विचार केला. महाराजांनी स्वतः पुढे काशीस जावे. स्वामींचे म्हणणे ऐकून घ्यावे. आश्रमासाठी आपली इच्छा स्पष्ट सांगावी. असे शंकररावांनी सांगितले. महाराजांनी विचार केला निमित्त ठीक आहे. काशी होईल. स्वामींचे दर्शन होईल. जमले तर आश्रमाचे काम होईल. त्यांनी शंकररावांना होकार दिला. शंकरराव म्हणाले "वामनराव तुम्ही स्वामींची फार सेवा करता मी काहीच करीत नाही. एवढी आश्रमाची सेवा तरी आमच्या हातून घडली तर बरे होईल."

याप्रमाणे महाराज मार्चच्या शेवटच्या आठवड्यात काशीस गेले. त्या ठिकाणी महाराजांचा मुक्काम महिनाभर होता. स्वामींची प्रकृती ठीक होती. ज्या जागेसंबंधी वाटाघाट चालली होती ती जमण्याचे दिसेना. शंकररावांनी पैसे तर पाठवून ठेवलेले म्हणून स्वामींची धडपड मोकळे होण्याची चालली होती. मुक्ताला बंधन कसे परवडणार? महाराजांच्या इच्छेप्रमाणे काशीवास झाला. स्वामींचा सहवास लाभला. आणि आणखी एक अपूर्व लाभ घडला.

शक्तिपातयोग परंपरा स्वामींच्याकडून महाराजांच्याकडे येऊन जवळ जवळ दोन तपे होत आली तरी स्वामींच्या गुरूंची भेट किंवा दर्शनही अद्याप महाराजांना घडलेले नव्हते. महाराजांनी स्वामींना प. पू. स्वामीश्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थमहाराजांच्या दर्शनाचा विषय काढला होता पण स्वामी म्हणाले पुढे पाहू.

# गुळवणी आमचे प्रपौत्र शिष्य आहेत

श्रीगुरुमहाराजांचा मुक्काम काशीमध्ये होता. स्वामींची सेवा व नित्यसहवासाने त्यांचा काल आनंदात जात होता. एकदा स्वामीच त्यांना म्हणाले "तुम्हारे इस मुकाम में हम हमारे श्रीगुरुदेव श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थस्वामीमहाराज के दर्शन के लिये जायेंगे। कब जायेंगे यह मैं योग्य समयपर बताऊँगा।" श्रीगुरुमहाराजांची ही बरेच दिवसांची इच्छा होती. ते स्वतःच हा विषय स्वामींच्या जवळ काढणार होते पण त्यापूर्वीच स्वामींनी त्यांना सांगितले.

श्रीगुरुमहाराजांनी गुरुदेव श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थस्वामीमहाराजांनी लिहिलेला "योगवाणी" हा ग्रंथ वाचलेला होता. त्या ग्रंथाचे वाचन केल्यावर हा शक्तिपात मार्ग जर पसंत असेल, तसे आचरण ठेवण्याची तयारी असेल तरच नवीन आलेल्या जिज्ञासूंना दीक्षा देण्याची पद्धत त्यांनी ठेवली होती. यामुळे श्रीगुरुमहाराजांच्याकडे आलेले सारे दीक्षार्थी "साधकाश्रम, छोटीगैबी, बनारस" या पत्त्यावरून "योगवाणी" ग्रंथ मागवून घेत. तो संपूर्ण वाचीत. तसे श्रीगुरुमहाराजांना कळवीत. इतके झाले म्हणजे योग्य दिवस पाहून श्रीगुरुमहाराजांची त्यांना दीक्षा होत असे.

अशा प्रकारे "योगवाणी" ग्रंथाची मागणी महाराष्ट्रातून वाढत चालली. यामुळे स्वामी श्रीशंकर पुरुषोत्तमतीर्थांचे कुतुहल वाढले. आपल्या शिष्याच्या शिष्याने महाराष्ट्रात या कार्याचा प्रसार सुसूत्रपणे चालविलेला दिसतो. या विचाराने त्यांच्या मनांत या पुत्रपौत्रवत् शिष्यांच्याबद्दल प्रगाढ आत्मियता निर्माण झाली. सध्या सुद्धा श्रीगुरुमहाराज काशीत असताना दररोज एकदोन जिज्ञासू श्रीगुरुमहाराजांच्यातर्फे येऊन योगवाणी ग्रंथ नेत होते.

एकदा असेच कोणी ग्रंथ नेण्यास आलेले पाहून स्वामी श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थ महाराजांनी त्या व्यक्तीजवळ चौकशी केली. "कोणातर्फे आलात ?" त्या व्यक्तीने सांगितले "श्रीगुळवणी महाराजांच्याकडून आलो आहे." यावर स्वामी श्रीशंकर-पुरुषोत्तमतीर्थ महाराज म्हणाले "सध्या गुळवणीजी कुठे आहेत ?" त्या व्यक्ती-कडून सध्या श्रीगुरुमहाराज काशीत आहेत असे समजले. तेव्हा स्वामी श्रीशंकर-पुरुषोत्तमतीर्थ महाराजांनी आपल्या एका शिष्याजवळ निरोप दिला की "लोकनाथ को कहो कि तुम्हारे गुळवणीजी शिष्यको देखना है। तो उन्हे लेकर आश्रम में आना।"

आश्रमातला हा निरोप आला तेव्हा स्वामीजी आणि श्रीगुरुमहाराज दोघेही हजर होते. तो निरोप ऐकल्यावर स्वामींनी त्या गुरुबंधूबरोबर निरोप दिला "आज दोपहर हम दोनों जरूर आयेंगे।" नंतर स्वामी श्रीगुरुमहाराजांना म्हणाले "अपने गुरुको जब शिष्यका स्मरण होकर उसे मिलनेकी इच्छा निर्माण होती है उसी समय गुरुके दर्शनको जाना बहोत अच्छा होता है। ऐसे समय गुरु अपने शिष्यको देखकर बहोत प्रसन्न होते हैं। वामन ! इसी समयके लिये मैं तुझे रोका था। अब आज दोपहर हम जायेंगे। देखो वामन ! हमारे गुरुदेवके दर्शनको जाना है। गुरुपूजन अच्छा होना चाहिये। फल, हार मिठाईयाँ लेके आना। जो तैयारी करना है कर लो।"

आज आपल्याला स्वामींच्या गुरुदेवांचे दर्शन होणार याचा फार मोठा आनंद श्रीगुरुमहाराजांना झाला. मनातील भावभक्तीने भराभर साकार रूप धारण करायला प्रारंभ केला. ते गुरुपूजनाचे साहित्य घेण्यासाठी श्रीकाशीविश्वेश्वराजवळ गेले. एक उत्तम हार घेतला. श्रीफल घेतले. विविध प्रकारची उत्तमोत्तम भरपूर फळे घेतली. ती सर्व फळे रंगीत कागद घातलेल्या मोठ्या करंडीत ठेवली. भरपूर पेढे, शानदार शोभिवंत पेटीतून घेतले. उत्तम अत्तर व अष्टगंध घेतले. उत्कृष्ट सुगंधाचा उदबत्तीपुडा घेतला. एक उत्तम वस्त्र घेतले. हे सर्व घेताना पूजा साहित्यात काहीही उणे पडू नये म्हणून सर्व काही शबरीच्या बोराप्रमाणे चिकित्सक दृष्टीने तपाशीत होते. आपल्या मनाचे समाधान झाल्यावर सर्व साहित्य घेऊन ते निघाले. तेव्हा त्यांच्या लक्षात आले की स्वामींच्या आज्ञेप्रमाणे ही खरेदी ठीक झाली पण स्वामींच्या पूजनाचे काय ? तेव्हा त्यांनी आणखी एक उत्तम हार, श्रीफल, फळे, मिठाई इ. घेतले. आणि मग स्वामींच्याकडे आले.

स्वामींना ते गुरुपूजनाचे साहित्य पाहून फारच प्रसन्नता वाटली. सारे आयुष्य ज्यांनी संत-सत्पुरुषांच्या पूजनात घालविले त्यांच्या हातून काय उणे होणार? श्रीगुरुमहाराजांनी सारे सामान स्वामींच्याच समोर ठेवले आणि आपण कसे गुरुपूजन करणार हे सांगितले. तो मोकळेपणा पाहून स्वामींना फार आनंद झाला. ते म्हणाले, "आज हमारे गुरुदेवका पूजन बहोत बढिया होगा। बहोत अच्छा किया वामन।" सामान खरेदीला जरा वेळ लागला होता. आता जेवणाची वेळ झाली होती. तेव्हा तो कार्यक्रम आधी उरकला. जरा वामकुक्षी झाली. श्रीगुरुमहाराजांनी छोटी गैबीत जाण्यासाठी एक रिक्षा आणली. आता साहित्य घेऊन बाहेर पडणार तर श्रीगुरुमहाराजांनी स्वामींना दोन मिनिटे आसनावर बसण्याची प्रार्थना केली. स्वामींच्या कपाळी अष्टगंधाचा तिलक लावला. गळ्यात हार घातला. फळे, श्रीफल, पेढे आणि दक्षिणा स्वामीच्यापुढे ठेवली. साष्टांग नमस्कार केला व म्हणाले कीं, "स्वामीजी रिक्षा आया है" स्वामींनी आपली पूजा तेथेच काढून ठेवली. छाटी आवरली. दंड घेतला व निघाले.

आज श्रीगुरुमहाराज, स्वामींच्या बरोबर छोटी गैबीत, सिद्ध योगाश्रमात, गुरुदेव श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थ स्वामी महाराजांचे दर्शनास प्रथम जात होते. बरेच वर्षांनी हा प्रथम दर्शनाचा योग आला होता. स्वामींच्या तोंडून त्यांच्या गुरुदेवांची माहिती मधून मधून ऐकली होती. "योगवाणी" ग्रंथ वाचल्यानंतर गुरुदेवांच्या अधिकाराची जाणीव श्रीगुरुमहाराजांना झाली होती. त्या अधिकारसंपन्न गुरुदेवांच्या मूर्तीचे दर्शन आज श्रीगुरुमहाराजांना होणार होते. श्रीगुरुमहाराजांच्या चित्त चैतन्याला प्रसन्नतेचे पाझर फुटले होते. या धुंद मनस्थितीत महाराज मौनात होते. तेवढ्यातच रिक्षा आश्रमापाशी आली. सर्व साहित्य घेऊन गुरुशिष्य आश्रमात शिरले.

स्वामी पुढे झाले होते. मागून श्रीगुरुमहाराज जात होते. आत गेल्यावर स्वामींनी आपल्या गुरुदेवांना साष्टांग नमस्कार केला. पुढे जाऊन चरणावर मस्तक ठेवले. हे दुर्लभ दृश्य श्रीगुरुमहाराज प्रथमच पहात होते. तेही पुढे झाले. साहित्य ठेवून साष्टांग नमस्कार केला. चरण स्पर्शपूर्वक पुन्हा नमस्कार केला.

गुरुदेव श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थ स्वामी महाराज, समोरच्या व्यासपीठावर मोठे व्याघ्राजीन टाकले होते, त्यावर मखमलीची छोटी गादी होती, अशा ठिकाणी बसले होते. शक्तिपातयोग पीठाच्या श्रीक्षेत्रकाशीच्या गादीचे स्वामी तेथे बसले होते. स्थूल

शरीर, विशाल नेत्र, विस्तीर्ण भालप्रदेश, गौर वर्णाची अत्यंत प्रशांत मूर्ती पाहून श्रीगुरुमहाराजांना परम आनंद झाला. त्यांनी पूजेचे साहित्य जवळ घेतले.

श्रीगुरुदेवदत्त! म्हणून श्रीगुरुमहाराजांनी स्वामी श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थ महाराजांच्या कपाळी अष्टगंधाचा तिलक लावला. उत्तम पुष्पांचा आणलेला हार गळ्यात घातला. सर्वांगाला मनसोक्त अत्तर लावले. फळांची करंडी उघडून त्यातील सर्व फळे त्यांच्या समोर ठेवली. पेढ्यांची पेटी उघडून तीही समोर ठेवली. उदबत्त्या प्रज्वलित केल्या त्यांचा सुगंध सर्व आश्रमभर पसरला. चैतन्याला प्रसन्नता आली. प्रसन्नतेला सुगंध येऊ लागला. सुगंधाला प्रेमाची आर्द्रता आली. हे नयनमनोहर दृश्य त्या आश्रमातील साधक शिष्य नेत्रांनी पहाताच सर्वांची भात्र समाधी लागली. नंतर श्रीगुरुमहाराजांनी श्रीगुरुदेवांच्या समोर श्रीफल व या महापूजेला साजेशी गुरुदक्षिणा ठेवली. साष्टांग नमस्कार केला. प्रार्थना केली की "कृपा रखो श्रीगुरुदेव."

गुरुदेव श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थ स्वामी महाराज गुरुपूजेचे हे उपचार व श्रद्धा पाहून संतुष्ट झाले. ज्याला पाहण्यासाठी आज मुद्दाम बोलावले ती वामन मूर्ती पाहून व्यक्तिमत्त्वाची छापच अधिक पडली. नीटनेटकेपणा, शास्त्रशुद्ध सुसंगतपणा, अविचल शांतपणा, विनम्रशालीनता इत्यादि अनेक गुण तेवढ्या वेळात त्यांना चांगलेच जाणवले. स्वामी श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थ महाराजांनी आपली ही चित्ताची परम प्रसन्नता एका शब्दात प्रकट करून आशीर्वाद दिला.

"आज हमारे प्रपौत्र शिष्य आये हैं। नारायण कल्याण करेगा।"

समोर ठेवलेल्या प्रसादातील नारळ, पेढे, काही फळे श्रीगुरुमहाराजांना प्रसाद म्हणून परत दिला. त्यांना आपल्या जवळ बसवून घेतले. मनमोकळेपणाने खूप गप्पा गोष्टी झाल्या. सर्वत्र आनंदी आनंद झाला. बराच वेळ झाल्यावर स्वामी श्रीलोकनाथतीर्थ महाराज म्हणाले "हम आते हैं" नंतर नमस्कार करून स्वामी व श्रीगुरुमहाराज निघून आले.

श्रीगुरुमहाराजांनी आश्रम वगैरे पाहिला. तेथील गोशाळा व ग्रंथालय पाहून समाधान वाटले. ते स्वामींना म्हणाले आश्रम चांगला आहे. मधून मधून येत जाईन. पण स्वामींनी सांगितले "बार बार नही जाना! कभी कभी जाना."

असा हा अपूर्व भेटीचा योग घडून आला.

शंकरराव मार्कंड एप्रिलच्या तिसऱ्या आठवड्यात सहकुटुंब काशीस आले. बरोबर एक स्वैपाकीणबाई घेऊन आले. त्यांचा मुक्काम बळवंतराव पाठक यांच्याकडे होता. या मुक्कामात त्यांनी आश्रमाच्या जागेचे नक्की करावयाचे ठरविले होते. त्यांना काशीत राहून जागा पाहून ठरवून व्यवहार करण्यासाठी फारशी फुरसत नव्हती. अवघ्या चार दिवसात जागेचे नक्की करून जायचे होते. त्याप्रमाणे त्यांनी काशीत आल्या आल्या स्वामींचे दर्शन घेतले. विचारविनिमय केला. भंडाऱ्यास जे दत्तमंदिर बांधावयाचे होते त्याचे काम सुरू करण्याचे शंकररावांनी ठरविले होते. आश्रमासाठी दिलेले पैसे परत न घेता स्वतः जवळच्या पैशाने मंदिराचे काम होत आहे. आश्रम सुद्धा व्हावा ही इच्छा त्यांनी स्वामींना पुन्हा सांगितली.

महाराज, जांबवंतसिंह यांना घेऊन शंकरराव चार जागा पाहून आले. पैकी हरिश्चंद्र घाटावरील एक जागा ठरवून त्यासाठी १००० रु. अनामत रक्कम भरली. साठेखत केले. पण त्यात काहीतरी कमतरता राहून गेली. सुरवातीला हे ध्यानात आले नाही. जागा घेतल्याचे समाधान मात्र मिळून गेले. मग शंकररावांनी स्वामींना भंडाऱ्याच्या श्रीदत्तमंदिराच्या पायाभरणीसाठी येण्याची प्रार्थना केली. मंदिराचे काम सुरू झाले की लगेच आश्रमाचे कामही सुरू करू म्हणून त्यांनी स्वामींना सांगितले. शंकररावांच्या इच्छेप्रमाणे स्वामी व महाराज भंडाऱ्यास गेले.

भंडाऱ्यास गेल्यावर आवश्यक तेवढा धार्मिक विधी करून, श्रीदत्त मंदिराच्या पायाभरणीची प्रथम शीला स्वामींच्या हस्ते बसविली. मोठा भंडारा केला. तेथून स्वामी व महाराज पुण्यास आले. या वर्षीचा स्वामींचा चातुर्मास पुण्यात झाला.

चातुर्मास समाप्ती नंतर स्वामी परत काशीला आले. साठेखत झालेल्या जागेची माहिती घेतली. त्याप्रमाणे एक पत्र पुण्यास महाराजांना पाठविले. त्या पत्रात जागेसंबंधी स्वामींनी स्वतःचे मतही कळविले.

नारायण श्रीक्षेत्रकाशी

नारायण-स्मरण सूचक आशीर्वाद २५।११।४४

...स्वैपाकीणबाई मिळाली. मद्रासहून शंकररावांचे पत्र पोहचले. आनंदात आहे. नव्या जागेतील मनुष्य तेथेच रहातो. जागेच्या मालकाची व माझी भेट झाली होती. त्याचा नोकरही आपल्याकडे येऊन गेला. तो म्हणतो त्या मनुष्याला

तांबडतोब काढून टाकतो. अमुक करतो. तमुक करतो पण प्रत्यक्षात मात्र काही करत नाही. त्याचा सर्व व्यवहार कपटी वाटतो. शंकररावांचे हजार रुपये फुकट गेले. शंकरराव देश, काळ व व्यक्ति यांचा विचार न करता कार्य करतो. शंकररावाला असे वाटते की आपण जसे निष्कपटपणे दुसऱ्याशी व्यवहार करतो तसाच निष्कपट व्यवहार दुसराही आपल्याशी करील. शंकररावाशी कोणी विनम्रपणे बोलले की लगेच तो सारे विसरतो. हे कार्य येथे १०।१५ दिवस राहून गडबडीने होणारे नाही. देश, काल, व्यक्ति पाहून विचारपूर्वक कार्य केले तर लवकरही कार्य होऊ शकेल. जागेच्या मालकाची माझी भेट नाही. मला त्याचा व्यवहार कपटपूर्ण दिसला."

अशा मानसिक संघर्षामधून आश्रमाचा व्यवहार एक एक पावलाने पुढे सरकत होता. प्रत्येक क्षण अनिश्चित होता. क्षणाक्षणांची धावती रेषा अखंड वाटत होती.

इ. स. १९४४ साल अशा घडामोडीत संपले.

**काशी कथा—**

## खरंच ! मला देवी आल्या होत्या ! !

जांबवंतसिंहाचा एक अनुभव त्यांच्याच शब्दात वाचू या—

"माझ्या चेहऱ्याकडे पाहिल्यावर, मला देवी आल्या होत्या, हे सांगितले तर खरे वाटणार नाही. मी सांगितले तरी विश्वास बसणार नाही असा नितळ, गोरा नि मृदु माझा चेहरा आहे. माझ्या चेहऱ्यावरच काय पण शरीरावर कुठेही देवीची एकही खूण दिसणार नाही. तुम्हाला वाटेल मला बालपणी देवी आल्या असतील अगदी तुरळक नाचऱ्या देवी आल्या असतील पण तसे घडले नाही. तुम्ही म्हणाल की उत्तम वैद्यकीय उपाय केले असतील ! नव्हे, तसेही घडले नाही. आणि म्हणूनच या प्रसंगाला फार महत्त्व आले आहे. हा प्रसंगच ऐकण्यासारखा आहे.

स्वामींच्या सहवासात मी इ. स. १९४० ला आलो. त्यानंतर ३।४ वर्षानंतरची ही घटना आहे. माझे वय ४० च्या सुमाराचे होते. त्या वयात देवीसारखा महारोग मला झाला. मला बोराएवढाल्या घागऱ्या देवी आल्या होत्या. शरीरावर इंचभरसुद्धा जागा मोकळी नव्हती. सारे शरीर देवीच्या फोडांनी भरून गेले.

कापसाची गादीसुद्धा काटयासारखी टोचत असे. अन्न नाही. झोप नाही. घरातील सर्वांच्या कष्टाला आणि दु:खाला सीमा नाही. कोणते महापाप उसळून आले आणि हा महारोग उद्भवला काही कळेना.

मी त्या दुखण्याने अतिशय त्रासून गेलो. माझा चेहरा इतका विद्रुप झाला की माझी मलाच लाज वाटू लागली. स्वत:लाच स्वत:च्या चेहऱ्याचा व शरीराचा तिरस्कार वाटू लागला. महिनाभर अंथरुणात लोळत होतो. घराबाहेर पडण्याची लाज वाटत होती. हे महापाप स्वामींच्या कानावर तरी कसे घालावे म्हणून संकोच वाटत होता. सुदैवाने त्या महिन्यात स्वामी काशीत नव्हते म्हणून बरे, नाहीतर चौकशी केल्याशिवाय ते राहिले नसते. अशी चमत्कारिक मनस्थिती झाली होती. पण स्वामींच्या स्मरणाशिवाय क्षण जात नव्हता. आपले पाप आणि त्यांचे स्मरण या दोघांचा जोर एकाच वेळी मनात उसळला होता. स्वामींचे दर्शन होऊ शकत नव्हते म्हणून मन अतिशय अस्वस्थही होत होते.

माझी ही स्थिती माझ्या एका गुरुबंधूने पू. स्वामीजी काशीत आल्याचे समजताच त्यांच्या कानावर घातली. स्वामींनी त्याच गुरुबंधूजवळ मला निरोप दिला की—

"त्या मूर्खाला म्हणावे, सात दिवस नियमितपणे माझे दर्शन घेऊन जायला हवे. घरून निघून, दर्शन घेऊन, घरी पोहचेपर्यंत, तोंडातून एकही अक्षर काढावयाचे नाही. माझ्या येथे थांबावयाचे नाही. अगदी मौन धरून येऊन जायचे. ही अट पाळून हे सात दिवस करायचे."

गुरुबंधूने निरोप त्याच दिवशी मला दिला. दुसऱ्या दिवसापासून स्वामींच्या दर्शनाला जाण्याचा कार्यक्रम मी सुरू केला. सात दिवस ठरल्या वेळी, न बोलता जावे, स्वामींचे दर्शन घ्यावे आणि तेथे न थांबता घरी निघून यावे. स्वामींचे दर्शन घेण्यासाठी प्रथम जेव्हा गेलो तेव्हा स्वामींनी म्हटले "आते जावो." त्या क्षणी जाणवले की शरीरातील दाह कमी झाला. तेथून पुढे प्रत्येक क्षण असा गेला की दुखणे भराभर मावळतच चालले आहे. स्वामींचे नित्यदर्शन किती प्रभावी आहे याची जाणीव नित्याच्या व्यवहारात होत नव्हती ती त्यावेळी होऊ लागली. दृष्टीमध्ये इतकी प्रचंड शक्ति असते हे अनुभविणे काही वेगळे आहे. सामर्थ्य हा प्रचितीचा

विषय आहे हे प्रचीतीने समजते. शक्ति संक्रमण करण्याचे स्वामींचे सामर्थ्य अनेकदा पाहिल्यामुळे मला स्वामींच्या दर्शनाच्या लाभाची पुरेपूर जाणीव होती. अक्षरशः त्या सात दिवसात माझे शरीर स्वच्छ झाले. अंगकांती निर्मळ झाली. देवीचे डाग नाहिसे झाले. खुणा नाहिशा झाल्या. चेहऱ्याचा विद्रुपपणा नाहिसा झाला. शरीर पूर्ववत निर्मळ झाले. हा सारा फरक अक्षरशः सात दिवसात पडला होता. याचे मला आश्चर्य वाटले असेल यात आश्चर्य नाही. पण माझी माहिती असलेल्या प्रत्येकाला आश्चर्य वाटले आहे.

आठव्या दिवशी मी स्वामींची महापूजा केली. त्यांच्या चरणांवर सात दिवसांनी प्रथम मस्तक ठेवून नमस्कार केला. त्याच्यापुढे दक्षिणा व प्रसाद ठेवला व त्यांच्याजवळ बसलो. तोंडातून एकही शब्द बाहेर येत नव्हता. भावनांचे कढ डोळ्यांच्या कडातून बाहेर येत होते. मला स्वामींचे उतराई होणे शक्य नव्हते. मी त्यांची काहीच सेवा करू शकत नव्हतो. ते मात्र उदारपणे कृपेचा वर्षाव करीत होते. मला म्हणाले " अब मेरे सामने साधन करते जावो " स्वामींच्या या शब्दाबरोबर मी डोळे मिटले आणि माझे साधन त्यांनीच त्यांच्यासमोर सुरू करून दिले.

ही सारी स्वामीकृपा आहे. माझ्या शरीराकडे, चेहऱ्याकडे पाहिले तर देवीचा एकही डाग आढळणार नाही. देवी आल्या होत्या हे सांगितले तर खरेही वाटणार नाही. पण अगदी अलिकडे अनुभविलेली प्रत्यक्ष स्थिती मी आपल्यापुढे ठेवली आहे. या स्मरणात स्वामींसंबंधीचा" कृतज्ञताभाव आहे. त्यांच्यामुळे झाले हे स्पष्ट सांगताना मलाही संतोष होतो.

**काशी कथा—**

## हस्तस्पर्शाची किमया

स्वामी पुण्याहून आले ते काशीमध्ये आल्यावर जांबवंतसिंहाकडेच उतरले होते त्या काळातील ही घटना आहे. स्वामी काशीत येण्यापूर्वीपासून जांबवंतसिंहाचा उजवा हात दुःखू लागला होता. त्या हाताने त्यांना कोणतेही काम करता येईनासे झाले. त्यांनी त्या हातावर खूप उपाय केले पण उपाय चालेना. कारणही समजेना. त्यामुळे त्यांना सर्व कामे डाव्या हाताने करावी लागत. त्यांचा अगदी नाईलाज झाला होता.

अशा स्थितीत स्वामी काशीत आले आणि जांबवंतसिंहाकडेच उतरले. यावेळी जांबवंतसिंहाचे कापड दुकान 'सोरा कुवा विभागात' होते. पुढे त्यांची ती फर्म २५।४ चौकात गेली. स्वामींचा मुक्काम घरातच झाल्यामुळे जांबवंतसिंहाना आपल्या उजव्या हाताचे दुखणे लपवून ठेवणे मोठे अवघड होऊन बसले. आपल्याला उजव्या हाताने काम करता आले नाही व कामासाठी डावा हात पुढे गेला व ते स्वामींना दिसले म्हणजे सगळाच गोंधळ व्हायचा! जांबवंतसिंहाचे काम करणे बंद व्हायचे. असा विचार करून शक्य तेवढ्या सावधपणे ते वावरत होते. एक/दोन दिवस जेमतेम, हाताच्या दुखण्याची बातमी, स्वामींपर्यंत पोहचली नाही. पण....

एकदा सकाळचे वेळी स्वामींचे स्नान उरकले. ते संध्यादि आह्निकासाठी गेल्यावर जांबवंतसिंहाने त्यांच्या छाट्या धुण्यास सुरवात केली. आता स्वामी इकडे येणार नाहीत या खात्रीने त्यांनी डाव्या हाताने व्यवस्थितपणे धुणे सुरू केले. इतक्यात संध्येचे पाणी टाकण्यास ते बाहेर आले. पहातात तो जांबवंतसिंह डाव्या हाताने छाटी लंगोटी धूत आहे. त्यांनी त्याला विचारले "उजव्या हाताने का धूत नाहीस?" त्यावर हाताच्या दुखण्याची कहाणी जांबवंतसिंहाने त्यांना सांगितली.

स्वामींनीं तात्काळ जांबवंतसिंहाच्या दुखणाऱ्या उजव्या हातावरून आपला हात फिरविला व म्हणाले "उद्या बैठकीतून उठलास म्हणजे हात दुखणे बंद झाल्याचे आढळून येईल."

दुसरे दिवशी जांबवंतसिंह बैठकीतून उठले तो हात पूर्ण बरा झालेला होता. नेहमीप्रमाणे सर्व कामे उजव्या हाताने करता येऊ लागली. स्वामींच्या हस्तस्पर्शाची किमया पाहून जांबवंतसिंहाना आश्चर्यच वाटले. स्वामींची आपल्यावर कृपा आहे या अनुभवाने ते सद्गदित झाले. व हात आपल्या म्हणण्याप्रमाणे पूर्ण बरा झाला हे सांगण्यासाठी ते स्वामींकडे आले. साष्टांग नमस्कार करून कृतज्ञता विनम्र शब्दांनी प्रकट केली.

**काशी कथा**

## गोमाता आणि स्वामीजी

स्वामी सोनारपुऱ्यात रहात होते. त्यावेळची ही घटना आहे.

स्वामींचा दण्डग्रहण विधी पुरीच्या गोवर्धन आचार्य पीठाच्या परंपरेतून झाला होता. हे गोवर्धनपीठ गो–सेवाव्रतधारी पीठ म्हणून, विशेष ध्येयवादी व्रतधारी पीठ म्हणून प्रसिद्ध आहे. स्वामी स्वभावतःच गो–सेवाव्रतधारी होते. त्यातून आचार्य पीठाकडून या विशेष व्रताचे पालन करण्याचे आदेश झालेले. भारताचे दुर्दिन संपण्यासाठी भारतीय धर्माचे कट्टरतेने पालन हाच एकमेव प्रभावी, सुलभ व निश्चित उपाय आहे अशी स्वामींची पक्की धारणा होती. स्वामींना गोमातेबद्दल अन्तःकरणापासून आदर, श्रद्धा व भक्ती होती. त्यांच्या ठिकाणी जे गाईबद्दलचे प्रेम होते त्याचे हे बोलके उदाहरण आहे. जांबवंतसिंहाच्या देखत घडलेली घटना त्यांच्याच शब्दात वाचू या.

"सकाळची वेळ होती. त्यांच्याकडे बादली नसल्यामुळे पाणी भरण्याचे साधनच नव्हते. असाच असतो संन्याशाचा संसार. संन्याशालासुद्धा संसार असतो– पण नसण्याचा. पाण्याला भांडी नकोत. कटोरा आहे पुरे! अंगावर कपडे नकोत छाटी लंगोटी आहे पुरे! असे एक एक नसण्याचीच यादी संन्याशाच्या संसारात फार मोठी असते. मग स्वामींच्याकडे बादली नव्हती यात विशेष आश्चर्य नाही–ती असती तर आश्चर्य!

आज काय झालं कुणास ठाऊक, या संन्याशाला वासना निर्माण झाली. स्वामींना वाटले एक बादली बाजारातून विकत आणावी. जांबवंतला बरोबर घ्यावे म्हणजे करील तो सर्व व्यवहार व्यवस्थित. व्यापारीच आहे. असा विचार करीत होते तेवढ्यात जांबवंतसिंह आले. नमस्कार केला. तेवढ्यात स्वामी म्हणाले "आज आपल्याला बादली आणावयाची आहे. चल पाहू बाजारात. बादलीसाठी हे पैसे जवळ ठेव."

स्वामींनी दिलेले पैसे मी मोजून पाहतो तो पस्तीस रुपये. मला आश्चर्यच वाटले. मी म्हणालो,

"स्वामीजी, बादलीसाठी एवढे पैसे कशाला? आणखी काही खरेदी करावयाचे आहे का?"

"ए मूर्खा—दिले ते जवळ ठेव. पैसे का तुला टोचतात? उरलेले परत आणले तर बिघडले काय त्यात?" असे म्हणत आम्ही दोघे बाहेर पडलो.

रस्त्यात एका चौकात खूप गर्दी आढळली. त्या गर्दीमधून बसलेली एक गाय दिसली. वास्तविक आम्ही रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला होतो. पण एक दुबळी गाय पडलेली पाहून स्वामी अस्वस्थ झाले आणि पळतच त्या गर्दीकडे गेले. मीही त्यांच्या पाठोपाठ गेलो. अनेक लोक गाईला उठविण्याचा प्रयत्न करीत होते पण काही केल्या गाय उठूच शकत नव्हती.

गाईला रस्त्यात पडलेली पाहून स्वामी म्हणाले "आता भयंकर कलियुग आलेले आहे. गाईब्राह्मणांचे रक्षणसुद्धा होऊ शकत नाही. फार कठीण काळ येत चालला आहे."

मी स्वामींना म्हणालो "स्वामीजी अनेक लोक प्रयत्न करतात पण गाय उठत नाही. तिच्यापुढे भुस्सा वैरणसुद्धा ठेवलेली आहे, पाणी आहे — "

स्वामी म्हणाले— "गाईला उठवूनच बाजारात जाऊ." त्यावर मी म्हणालो, "स्वामीजी आपली प्रकृति ठीक नाही. जिथं एवढ्या लोकांना मिळून त्या गाईला उठवता येत नाही तिथं आपण दोघं काय करणार? — "

मी बोलत होतो. बोलता बोलता मी स्वामींकडे पाहिले तों—

स्वामीजी स्थिरपणे उभे राहून एक टक त्या गाईकडे पहात होते. या स्थितीत एक नाही दोन नाही अक्षरशः दहा मिनिटे स्वामी त्या गाईकडे टक लावून पहात होते. आणि आश्चर्य हे की ती गाय स्वतः उठून उभी राहिली. त्यावेळी सर्वांनाच आश्चर्य वाटले.

मला स्वामी म्हणाले, ती गाय घेऊन गोशाळेकडे जाऊ. त्याप्रमाणे आम्ही त्या गाईला घेऊन गोशाळेत गेलो. ती गाय गोशाळेच्या व्यवस्थापकाच्या हवाली केली आणि बादलीसाठी घेतलेले पस्तीस रुपये गाईच्या पोषणासाठी गोशाळेला देऊन टाकले. बादली न घेताच परत आलो. गाईचे प्रेम कृतीतून पाहिले. मन भारावून जाते, विनम्र होते.

परत येताना मी स्वामींना विचारले, आपण गाईकडे पाहून काय केले?

हसून उत्तर दिले "फोर्स पास किया"। स्वामींना बादली आणण्याची

आठवण करून दिली तेव्हा ते म्हणाले– "अरे, भगवानकी इच्छा नहीं है। छोड दे यह विचार। इसी गायके लिये घरसे बाहर निकाला। अब बालडी नहीं चाहिये।"

## कुलस्वामिनी कालीमातेची कृपा!!

स्वामींची कुलस्वामिनी म्हणजे कालीमाता ढाकेश्वरी! तिच्या इच्छेने सारे काही घडत होते. कालीमातेच्या उपासनेची चक्रवर्ती घराण्याची प्राचीन परंपरा होती! ढाकेश्वरीची पूजा अर्चा करणारे हे पुजारी सर्व काही तिच्यावर सोपवून निर्धास्तपणे जीवन जगत आले. त्या पुण्याईचा कृपाप्रसाद म्हणून तर ही योगशक्ति स्वामी श्रीलोकनाथ तीर्थांच्या स्वरूपात सध्या श्रीक्षेत्रकाशीमध्ये वावरत होती. कालीमातेच्या कृपेने स्वामींना दुर्मिळ गोष्टी मिळत गेल्या. ते स्वतःच शक्तिस्वरूप होऊन राहिले. त्यांचा जीवन स्फुलिंग वैराग्याच्या प्रखरतेने प्रज्वलित राहिला ही त्या कालीमातेची कृपा म्हटली पाहिजे. देवाच्या कृपेने गुरु मिळतो आणि गुरूच्या कृपेने देव समजतो. तसेच स्वामींचे होते. कालीमातेच्या कृपेने सद्गुरुंची भेट झाली आणि सद्गुरुकृपेने कालीमातेच्या स्वरूपाची ओळख त्यांना पटली.

महाराजांना स्वामींनी स्वतः सांगितले की त्यांना दोनदा कालीमातेचे स्पष्ट दर्शन झाले. ही गोष्ट महाराजांनी स्वमुखाने सांगितली आहे. कालीचे दर्शन कुठे व केव्हा झाले हे मात्र स्वामींनी महाराजांना सांगितले नाही. दर्शन ज्या स्वरूपात झाले ते स्वरूप फक्त सांगितले.

एकदा कालीमाता स्वामींच्यासमोर येऊन उभी राहिली ती विराट रूपामध्ये! ध्यान नेहमीचेच होते. कालीमातेची उंची इतकी प्रचंड होती की तिचे मस्तक आकाशात होते. मोकळ्या केसावरील मुकुट हिऱ्यामाणकांच्या रत्नांनी झळकत होता. कानातील कुंडले हत्तीएवढी असून लखलखत होती. रुंडमाळा गळ्यापासून कमरेपर्यंत होती. कटिमेखला चित्रविचित्र अलंकारांची चमकत होती. हातात रक्ताने माखलेले खड्ग होते. दुसऱ्या हातात नुकत्याच कापलेल्या दैत्याचे मुंडके केसाने धरून ठेवलेले होते. स्वामींच्या समोर या विराट स्वरूपात प्रत्यक्ष उभी असलेली भगवती कालीमाता अत्यंत प्रसन्न मुखाची होती. या विराट स्वरूपाच्या दर्शनाने स्वामींना भीति वाटली नाही. आश्चर्य व अचंबा मात्र वाटला. देवीचे ते स्वरूप स्वामींनी न्याहाळले. आणि मोठ्या भक्तिप्रेमाने तिच्या पायावर मस्तक ठेवण्यास पुढे गेले. तो तिचे गुडघे स्वामींच्या डोक्याच्यावर

हात वर करूनही हाताला लागत नव्हते इतके उंच होते. तरी स्वामींच्या डोक्यावर तिने आपला हात ठेवला. व स्वामी नमस्कार करून वर पहातात तो देवी अदृश्य झाली. मग मात्र स्वामी रोमांचित होऊन बराच वेळ सूंद होऊन पडून राहिले होते.

आणखी एकदा जे दर्शन झाले ते अत्यंत मोहक स्वरूपात झाले. स्वामी आपल्या साधनेस बसले होते. साधन चालू असताना मध्येच त्यांनी डोळे उघडले तेवढ्यात त्यांच्या समोरून डावीकडून उजवीकडे कालीमाता मंद गतीने जात होती. स्वामी निवांतपणे पहात होते. गळ्यात रुंडमाळा होती. बाकी सर्व शरीर उत्तम वस्त्रालंकारांनी आवृत होते. केस लांबसडक सुटलेले असून डोक्यावर उत्तम पूर्ण उभा शंकूच्या आकृतीचा सोन्याचा मुकुट होता. कालीमाता समोरून जाताना स्वामींकडे पहात होती व हाताने अभय वर देत होती. स्वामींचे हात जोडले गेले होते पण आसन सोडून ते उठले नव्हते. त्यांना वाटले माता आपल्यापुढे येईल. पण ती उजव्या बाजूच्या भिंतीजवळ गेली व तिथेच एकदम अदृश्य झाली. मग मात्र स्वामी आसनावरून उठले व सर्व खोली पाहून आले. सर्व बाजूंनी खोली पूर्ण बंद होती. दारालाही आतून कडी लावलेली होती. खिडक्याही बंद होत्या. देवीच्या दर्शनाने आनंद झाला होता तो वियोगाने नाहिसा होऊन विरहाच्या दुःखात रूपांतरित झाला होता. हे दोन्ही अनुभव सांगतांना व ऐकतांना सारे वातावरण रोमांचित झाले होते.

स्वामींनी महाराजांच्याजवळ सांगितलेले हे जसे अनुभव आपल्यापर्यंत पोहचले तसे आणखी दोन अनुभव (कालीमातेच्या कृपेचे) काशीमध्ये आलेले आहेत. देवता आपल्या भक्ताच्या सान्निध्यामध्ये सदैव राहून त्याचे रक्षण करीत असते, याची प्रचीती यामधून येते. स्वामींनी आपला शिष्यपरिवार जसा दक्षिणेकडे वाढविला त्या प्रमाणांत उत्तरेकडे वाढविला नाही. काशीमध्ये सुद्धा भरपूर वास्तव्य होऊन स्वामींची शिष्यसंख्या विशेष नव्हती. तरी जे काही थोडेफार शिष्य होते त्यामध्ये जांबवंतसिंहाप्रमाणे पंडीत लक्ष्मणशास्त्री वैद्य हे एक निकटवर्ती शिष्य होते. यांनीही स्वामींची फार मोठी सेवा केली आहे. वैद्यजी हे आचारसंपन्न असे होते.

पंडीत लक्ष्मणशास्त्रींचा आयुर्वेदाचा अभ्यासही उत्तम होता. स्वामींच्या प्रकृतीकडे त्यांचे नेहमी लक्ष असे. त्यांना नाडीपरीक्षा चांगली होती. मधून मधून स्वामींच्या इच्छेप्रमाणे लक्ष्मणशास्त्रीजी औषधपाणी देत असत. स्वामींचा मुक्कामही

पुष्कळ वेळा वैद्यजींच्या घरी होत असे. शास्त्रीबीवा स्वामींचे नित्य दर्शन घेणारे होते.

या वैद्यशास्त्रींच्या शेजारी एक कालीमातेची उपासना करणारा रहात होता. धार्मिक आचारांचे बडे प्रस्थ त्याचेकडे असे. देवीची तांत्रिक उपासना तो करीत असे. वैद्यशास्त्री धार्मिक वृत्तीचे होते; त्यामुळे या शेजाऱ्याशी बोलणे चालणे गप्पा-गोष्टी, चर्चा मधूनमधून होत असे. यामधून स्नेह निर्माण झाला. एकमेकांकडे जाणे येणे सुरू झाले. वैद्यजी त्या स्नेह्याची कालीमातेची उपासना पाहून स्वामींच्या संबंधी बोलू लागले. तो स्नेही सुद्धा स्वतःबद्दल सांगू लागला. आपली ही उपासना, रोजचे आन्हिक व अनुभव या संबंधी वर्णन स्नेही करू लागला. त्या स्नेह्याच्या बोलण्यात एक वाक्य वारंवार येत असे. तो स्नेही सांगे की त्याला कालिमाता सिद्ध झाली आहे. "कालीमातेची सिद्धी झाली आहे." हे वाक्य मधून मधून त्याच्या तोंडून बाहेर पडे. हे ऐकून वैद्यशास्त्रींना वाटे याची स्वामींची भेट झाली तर फार चांगले होईल. तसेच शेजारी स्नेह्याला सुद्धा स्वामींकडून पुष्कळ लाभ होईल.

वैद्यजींनी ही गोष्ट जांबवंतसिंहाच्या कानावर घातली. त्यांचा विचार घेतला. स्वामींच्याकडे या गृहस्थाला न्यावे किंवा नाही याबद्दल जांबवंतसिंहाचे मत घेतले. जांबवंतसिंह म्हणाले "आपण चांगल्या बुद्धीने घेऊन जाऊ आणि जे घडेल ते पाहू. कोण गृहस्थ कुठपर्यंत पोहचला आहे हे आपल्याला कसे ओळखता येणार? स्वामी बरोबर ओळखतील. आपण फक्त काय होते ते पाहू." जांबवंतसिंहाच्या विचाराप्रमाणे ठरवून एकदा वैद्यशास्त्रीजी दुपारचे वेळी त्या स्नेह्याला घेऊन स्वामींकडे गेले. त्यावेळी आधीच जांबवंतसिंह स्वामींच्याकडे जाऊन बसलेले होते.

स्वामींना नमस्कार करून लक्ष्मणशास्त्री व त्यांचे स्नेही स्वामींच्या समोर बसले. शास्त्रीबुवांनी आपल्या स्नेह्याची माहिती स्वामींना सांगताना कालीमातच्या उपासनेची माहिती सांगितली. यांना कालीमाता सिद्ध आहे असे हे सांगत असतात. इत्यादि थोडक्यात सांगितले. स्वामी निवांत ऐकून घेत होते. हे वृत्त सांगण्यास वैद्यजींना जेमतेम ३।४ मिनिटे लागली असतील तेवढ्यातच जांबवंतसिंहाचे लक्ष त्या गृहस्थाकडे गेले. त्याला चक्कर येत असून तो लवकरच जमिनीवर कोसळून पडणार अशी चिन्हे दिसू लागली. त्याच्या चेहऱ्यावर भीतीची छाया पसरली असून चेहरा घामाने डबडबलेला होता. हे सारे

जांबवंतसिंहाच्या लक्षात येताच स्वामींच्याकडे ते पाहू लागले. स्वामीजी बोलत होते "आमची कालीमाता श्यामवर्णाची आहे. तिच्या गळ्यात रुंडमाळा आहे. तिच्या सुळ्यासारख्या मोठ्या दातांमधून लांबलचक व लालभडक जीभ तिने बाहेर काढली आहे. ती आमची माता कोणालाही सिद्ध होत नाही. ती प्रसन्न होते आणि कृपा करते." स्वामींच्या या वाक्याबरोबरच ते गृहस्थ जमिनीवर कोसळून पडले.

तेवढ्यात स्वामींनी वैद्यजींना आज्ञा केली की "तुमच्या मित्राला सावध करा" वैद्यजींनी त्या मित्राला थोपटले व हाका मारीत उठवून बसविले. तो मित्र सावध होऊन डोळे उघडताच म्हणू लागला "लवकर बाहेर चला! बाहेर चला!" त्याला तेथे बसवेना असे लक्षात येताच लक्ष्मणशास्त्री त्याचेबरोबर बाहेर पडले. जांबवंतसिंहजी पण स्वामींना नमस्कार करून बाहेर आले. बाहेर येताना लक्ष्मणशास्त्रींनी स्वामींना नमस्कार केला पण त्यांच्या मित्राने नमस्कार केला नाही किंवा स्वामींकडे मान वर करून पाहिले पण नाही.

त्या मित्राला काहीतरी अनुभव आला म्हणून त्याची ही स्थिती झाली असे या दोघांच्या ध्यानात आले. पण नेमके काय झाले हे समजले नाही.

तिघेजण बाहेर पडले. वैद्यशास्त्रींनी मित्राच्या हाताला धरले होते. न बोलता तिघेजण रस्त्याने चालू लागले. बराच वेळ तिघेजण शांतपणे चालले होते. पण वैद्यजींनी मित्राला विचारले "क्या हुवा था?" यावर तो म्हणाला "मला स्वामींच्या मागे कालीमाता उभी असलेली दिसली. तिचा चेहरा भयंकर उग्र होता. तिचे दोन्ही हात स्वामींच्या मस्तकावर वरदहस्त म्हणून ठेवलेले होते. एवढे दृश्य दिसले आणि मला चक्कर आली. तेवढ्यात स्वामींचे शब्द कानावर पडत होते. "आमची कालीमाता कोणालाही सिद्ध होत नाही. ती फक्त प्रसन्न होते आणि कृपा करते" मला सावध केल्यावर आपले चुकले आहे येथे थांबणे योग्य नाही. हा विचार आणि भीति यामुळे बाहेर चलण्यास सांगितले. स्वामींकडे येण्याचे आपले धाडस नाही." त्या मित्राची स्थिती पूर्ण घाबरलेली दिसत होती. त्याच्या अंगाचा थरकाप होत होता. त्याला जास्त बोलवत नव्हते. इतर वेळी सारखा बोलत राहणारा तो मित्र आज अगदी अवाक् झाला होता.

तरीसुद्धा वैद्यशास्त्रींनी आपल्या मित्राला विचारले की "तुम्हाला काली

मातेची सिद्धी आहे मग स्वामींची भीति का वाटू लागली?" या प्रश्नाचे उत्तर त्याला देता आले नाही. त्याच्या न बोलण्यानेच या दोघांना उत्तर मिळाले होते. स्वामींच्या पुढे गेल्यावर त्याचे खरे पितळ उघडे पडले. त्यामुळे त्याला बोलता येईना. तेवढ्यात घर आले आणि तो मित्र न बोलताच मानेचा संकेत करून निघून गेला.

वैद्यशास्त्रींच्या घरी जांबवंतसिंहजी गेले. आज या दोघांना स्वामींच्या संबंधी एक अद्‌भुत माहिती मिळाली होती. ती ऐकून ते दोघेही आश्चर्याने अवाक्‌च झाले होते. आपले स्वामी एवढे समर्थ आहेत की त्यांचेवर कालीमातेची पूर्ण कृपा आहे व ती सतत त्यांचे रक्षण करते आहे हे ऐकून त्यांच्या श्रद्धाभक्तीचे भावकोष पुष्ट झाले. स्वामींच्याबद्दल वाटणाऱ्या भक्ती प्रेमाने त्यांचे हृदय भरून आले व कमल नयनावर स्वानंदाचे दोन दंवबिंदू तरळू लागले.

आता आणखी एक असाच अनुभव वाचून आपले चित्त तृप्त होणार आहे. प. प. श्रीमद्वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांचेवर श्रीगुरुदेवदत्तात्रेयांची जशी सतत कृपा सावली असावयाची त्याप्रमाणे स्वामी श्रीलोकनाथतीर्थ महाराजांचेवर श्रीकालीमातेच्या कृपेची सावली असे. हा अनुभव स्वामींनी जीवन समाप्तीनंतरही दिल्याचे आपण पाहणार आहोत. आता जी घटना आपण पहाणार आहोत ती एका महात्म्याचे अनुभवास आलेली आहे. त्यामुळे या घटनेचे अपूर्वत्व वाढलेले आहे.

इन्दोरमध्ये पंडित श्री. हरी गोविंदजी मोदी या नावाचे मोठे महात्मा होते. ते शक्तिसंपन्न योगी होते. विशेष म्हणजे ते प. प. श्रीमद्वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांचे शिष्य होते. काशीवास व्हावा म्हणून ते इंदोर सोडून आले. त्यांना काशीमध्ये एका मिलमध्ये नोकरी मिळाली. नोकरी अत्यंत सुखावह लाभली होती. फक्त सँपल पास करण्याचे काम होते. त्यामुळे अनुष्ठान साधनादिसाठी त्यांना भरपूर वेळ मिळे. मिलचे मालक हरीशास्त्रींना फार मानीत असत. ते एक उत्तम ज्योतिषी होते. केवळ व्यक्तीकडे पाहून ते अचूक कुंडली मांडीत व भविष्य वर्तवीत असत. व्यवसायाच्या निमित्ताने त्यांची व जांबवंतसिंहाची ओळख झाली. परस्परांच्या सत्त्वगुणांची ओळख वाढविण्याचे कार्य सुरू केले. हरीशास्त्री मधून मधून जांबवंतसिंहांच्या पेढीवर येऊन जात.

एके दिवशी सकाळी पंडित हरीशास्त्री मोदी जांबवंतसिंहाच्या दुकानी आले आणि त्यांना म्हणाले "जांबवंतसिंहजी, तुम्हाला आत्ता साक्षात्कार करवून देतो. सांगा, कोणत्या देवतेचे दर्शन पाहिजे ते!" जांबवंतसिंह म्हणाले "स्वामीजी, लक्ष्मीचे दर्शन करवावे" यावर मोदीशास्त्री म्हणाले "बस, तोंडावरून हात फिरव. डोळे चोळ आणि उघड डोळे" बस्स, जांबवंतसिंहानी तसे केले आणि त्यांना तात्काळ लक्ष्मीचे दर्शन झाले. अशा योग्यतेचे हरीशास्त्री मोदी होते. जांबवंतसिंहामुळे यांचा आणि पं. लक्ष्मणशास्त्री वैद्य यांचा परिचय झाला. वास्तविक एवढ्या मोठ्या योग्यतेच्या सत्पुरुषाने आपल्या पेढीवर येऊन भेटावे याचा जांबवंतसिंहांना संकोच वाटे पण पं. हरीशास्त्रींच्या या प्रेमामुळे त्यांना धन्यता वाटत असे. मधून मधून वेळ असेल त्या वेळी धर्म, वेदान्त, अध्यात्म, योग इत्यादी विषयांवर बोलणे होत असे. या बोलण्यामधून शास्त्रीबोवांचे अद्वैत वेदान्तावरील शुद्ध व स्पष्ट विचार आहेत हे समजून येत होते. त्यांनाही जांबवंतसिंहाकडून शक्तिपातयोग साधनेसंबंधी व स्वामी श्री. लोकनाथतीर्थांसंबंधी माहिती नव्यानेच मिळाली. हरीशास्त्री शुद्ध अद्वैत वेदान्ती असले तरी शक्तिपात योगसाधनेबद्दल त्यांचे मत प्रतिकूल होते. ते या साधनेबद्दल नेहमी खंडन करीत. इतकेच नव्हे तर या शक्तिपात साधनेचा परमपुरुषार्थाच्या दृष्टीने काहीएक उपयोग नाही असे आपले प्रामाणिक मत स्पष्टपणे ठासून सांगत. (शक्तिपातयोग साधना, कुंडलिनीशक्ति, इत्यादींबद्दल ते थट्टाही करीत.)

एवढ्या मोठ्या पंडितांना पटेल असे उत्तर देणे जांबवंतसिंहाच्या सामर्थ्याबाहेरचे होते. पं. लक्ष्मणशास्त्री वैद्यही मोदीशास्त्रींचे मत खोडून काढू शकले नाहीत.

अर्थात् वैद्यशास्त्री किंवा जांबवंतसिंहजी पंडित हरीशास्त्री मोदींची महत् योग्यता ओळखू शकत होते. त्याचप्रमाणे श्रीगुरुचरणाशी लीन झालेले विनम्र साधक होते. वाद घालून मताचा आग्रह प्रतिपादन करणारे ते नव्हते. श्रीगुरुचरित्रातील त्रिविक्रमभारतीकडे यवनराजातर्फे आलेल्या वादपटु ब्राह्मणांना ज्याप्रमाणे त्रिविक्रमभारतीने आपले श्रीसद्गुरु स्वामी श्रीनृसिंहसरस्वती महाराजांचेकडे नेले त्याचप्रमाणे वैद्यजी आणि जांबवंतसिंहजी यांनी पं. मोदीशास्त्री यांना स्वामी श्रीलोकनाथ तीर्थ महाराजांचेकडे नेण्याचे ठरविले. त्याप्रमाणे पं. हरीशास्त्रींना स्वामींची माहिती सांगितली व एकदा आपणही तिकडे आलात तर त्यांचेकडून आपले समाधान होऊ शकेल असे सांगून स्वामींच्याकडे जाण्याचा दिवस व वेळ ठरविला.

ठरल्याप्रमाणे पं. हरीशास्त्री मोदींना घेऊन जांबवंतसिंहजी आणि पं. लक्ष्मण-शास्त्री वैद्य निघाले. दुपारची वेळ होती. स्वामींची विश्रांती संपून ते आता निवांतपणे वाचीत बसले असतील असा विचार त्यांच्या मनात येऊन गेला. इकडच्या तिकडच्या गप्पा गोष्टी करीत ते तिघेजण स्वामींच्याकडे येऊन पोहचले त्यावेळी स्वामींच्याकडे एक बंगाली वकील आलेले होते. त्या वकीलांना स्वामीजी शक्तिपात-योगसाधना हाच विषय समजावून देत होते. तो विषय समजावून देण्यात ते अगदी तल्लीन झालेले होते. मधून मधून संस्कृत सूत्रे बोलण्यात येत होती. बाकी सर्व बोलणे बंगाली मधूनच चालले होते. आलेल्या तिघांना स्वामींनी खुणेनेच बसण्यास सांगितले. सर्वजण नमस्कार करून जवळच एका बाजूला बसले.

स्वामींचे भाषण पं. मोदीशास्त्री संस्कृत सूत्रांच्या अनुरोधाने समजून घेण्याचा प्रयत्न करीत होते. एकूण न्याय, तर्क आदि दर्शनशास्त्रांच्या आधारे चाललेले विवेचन ऐकून मोदीशास्त्री मंत्रमुग्धच झाले. बरेचसे विवेचन तर त्यांना अपरिचित विषयाप्रमाणे अगम्यच वाटले. जेमतेम दहा मिनिटे ते तेथे बसले. त्यापुढे त्यांना तेथे थांबवेनाच. त्यांनी इतर दोघांना हाताने खूण करून चलण्यास सांगितले. नमस्कार करून निघताना पं. हरीशास्त्री म्हणाले "हे खरे साधू आहेत. यांच्या साधुत्वाच्या खरेपणाबद्दल माझे मनांत लेशमात्र शंका राहिली नाही. पण मला येथे थांबवत नाही म्हणून चलण्यास सांगितले आहे."

हे तिघेजण रस्त्याने निघाल्यावर पं. हरीशास्त्री मोदी म्हणाले "इतके उत्तम विचार ऐकण्याची सुवर्ण संधी घेता आली नाही याचे खरे कारण असे की मी तेथे स्वामींच्या मागे कालीमाता उभी असलेले दृश्य पाहिले. ते सहन न झाल्याने लवकर निघावयास सांगितले."

याप्रमाणे कालीकृपेचे काही अनुभव आपण पाहिले. स्वामींच्या अनेक शिष्यांना या अनुभवांची कल्पना सुद्धा नव्हती. चरित्रसंकलनाच्या संकल्पाने या अद्भुत घटना आपल्या समोर आल्या हे आपणा सर्वांचे परमभाग्य आहे. शक्तिपात परंपरेतील सर्व साधक शिष्यांना आपल्या परम गुरुंचा महान अधिकार सात्त्विक स्वाभिमान निर्माण करणारा आहे. या जाणीवेने प्रत्येकाच्या चित्ताला परम आनंद होत आहे.

## स्वामींच्या दक्षिण यात्रा

### ( तिरुपती, पक्षीतीर्थ, रामेश्वर, श्रीरंगम्, मदुरा )

स्वामी मंगळवार दिनांक २ जानेवारी १९४५ या दिवशी बनारसहून मद्रासकडे निघाले. रेल्वेच्या दुसऱ्या वर्गातील डब्यामधून, बर्थ (झोपण्याची जागा) ची जागा संरक्षित करून स्वामींचा प्रवास सुरू झाला. ते कलकत्त्याजवळील हावरा स्टेशनवर आले. बंगाल देश सोडल्यापासून आज प्रथम या जन्मभूमीच्या भागात ते आले. इ. स. १९१७ ते ४५ या २८।२९ वर्षांनी स्वामी बंगालमध्ये आले. पण फक्त हावरा स्टेशनवर आले. स्टेशनच्या बाहेर आले नाहीत. प्लॅटफॉर्म सोडला नाही. येथून घर लांब नव्हते पण गेले नाहीत विशेष असे की ते प्लॅटफॉर्मवर उतरून पाणीही प्याले नाहीत. हावरा ते मद्रास, जागा संरक्षित होते का पाहिले. पण दुसऱ्या वर्गाची जागा शिल्लक नव्हती म्हणून १ ल्या वर्गाची जागा संरक्षित करून स्वामी लगेच त्याच दिवशी मद्रासकडे निघाले. गुरुवार दिनांक ६ जानेवारीस सकाळी नऊ वाजता स्वामी मद्रासमध्ये पोहोचले. मद्रास स्टेशनवर शंकरराव मार्कंड आले होते. ते स्वामींना आपल्या निवासस्थानी घेऊन गेले. १७७ चायना बाझार हा त्यांचा मद्रासचा पत्ता होता. घरी गेल्यावर स्नान, आह्निक झाल्यावर भिक्षेच्या वेळी पाणी प्याले.

बनारसहून निघण्यापूर्वी सोलापूरहून श्री. पराडकर वैद्य यांचेकडून स्वामींना औषधाचे पार्सल गेले होते. स्वामींच्यासाठी वैद्यराजांनी मकरध्वजगुटी पाठविली होती. रोज मधातून तीन वेळ औषध घेण्याचे सुचविले होते. परंतु मद्रासला आल्यानंतर हे औषध सुरू झाले. स्वामींच्या घशाला कोरड पडत होती. त्यातून प्रवासातील तीन दिवस उपोषण घडले. त्यामुळे तर या कुपथ्याने कोरड फार वाढली होती. आता मद्रासमध्ये विश्रांती आणि पथ्य काळजीपूर्वक करण्याचे त्यांनी ठरविले होते. पण अलिकडे स्वामी प्रकृतीच्या तक्रारींना कंटाळले होते. त्यांच्या पत्रातून हे वाक्य बहुधा असे की "माझे देह प्रारब्ध मोठे विचित्र आहे. याची समाप्ती कधी होईल हे त्या नारायणालाच ठाऊक." मद्रासला आल्यापासून स्वामींची प्रकृती सुधारू लागली.

जानेवारीचे थंडीचे दिवस होते. परंतु मद्रास हे शहर विषुववृत्ताजवळ असल्याने हिवाळा असूनही वातावरण मोठे आल्हाददायक वाटत होते. जणू वसंतऋतूची अनुभूती येत होती. मागे संक्रांतीच्या वेळी हिंगोलीस होते त्यावेळी भासलेली कडाक्याची थंडी येथे नव्हती.

शंकररावांनी भंडाऱ्यास श्रीदत्तमंदिराचे बांधकाम सुरू केले होते. सीमेंट वगैरे वेळेवर मिळाले तर काही महिन्यात ते मंदिर पूर्ण होणार आहे अशी खात्री शंकररावांनी बोलून दाखविली होती. मंदिरात दत्तमूर्तीच्या स्थापनेचे विचार सुरू झाले होते. यावेळी महाराजांचा मुक्काम श्री. शंकरकाका आजेगांवकर देशमुख यांचेकडे होता. तेथून सर्व पत्रव्यवहार चालत असे. सोलापूरहून श्री. वैद्यमास्तरही श्रीगुरुमहाराजांचेबरोबर आजेगावी होते.

शंकरराव आपल्या व्यवसायामुळे स्वामींच्याबरोबर बाहेर कुठे जाऊ शकत नव्हते. हैद्राबादेहून श्रीशिवराजा रामेश्वर यात्रेस येणार होते. परंतु तापामुळे येऊ शकले नाहीत. स्वामी एकटे कुठे जाऊ शकत नव्हते. तरी मधून मधून सवड काढून तीर्थस्थानांना जाऊन आले. जानेवारीच्या १ ल्या आठवड्यात तिरुपतीला व कालहस्तीला जाऊन आले. दुसऱ्या आठवड्यात पक्षीतीर्थ व महाबली-पुरमला जाऊन आले. मद्रास मध्यवर्ती असल्याने ही ठिकाणे सोयीने होत होती स्वामींच्या इच्छेप्रमाणे दर्शन, पहाणे इ. होत होते. त्यानंतर तिसऱ्या आठवड्यात श्रीरंगम्, जंबुकेश्वर, मदुरा व रामेश्वर ही स्थाने झाली. शास्त्रवत् तीर्थविधी झाले. रामेश्वर दर्शनाचा कार्यभाग संपताच स्वामींना काशीला जाण्याचे वेध लागले. वास्तविक मद्रासचे या काळातील हवामान स्वामींना अतिशय अनुकूल ठरले होते. प्रकृती सुधारली होती. परंतु आश्रमाच्या जागेचा अर्धवट झालेला व्यवहार पूर्ण करण्याची घाई होती. या व्यवहारात आता शंकरराव काशीला येऊन लक्ष घालू शकत नव्हते. त्यांना किमान २५ एप्रिलपर्यंत मद्रासमध्ये रहाणे भाग होते. म्हणून स्वामींच्या बरोबर त्र्यंबकरावांची योजना केली होती. या दक्षिण यात्रेत चिदंबरम्, कुंभकोणम् आणि तंजावर ही स्थाने सवड न मिळाल्याने राहून गेली.

स्वामींनी २६ मार्चला मद्रास सोडले. २७ ला ते भंडाऱ्यास आले. २/३ दिवस तेथे मुक्काम केला. तेथून त्र्यंबकरावांना बरोबर घेतले आणि १ एप्रिलला निघून जबलपूरला नृत्यगोपालकडे आले. तेथून ते ८ एप्रिलला काशीस गेले. पांडे घाटावरील जागेत मुक्काम केला. भिक्षा व नोकर याची व्यवस्था चांगली होती. स्वामी आनंदात होते.

## काशीच्या आश्रमाच्या जागेचे खरेदीखत झाले

स्वामी मद्रासहून निघून काशीत येऊन पोहचले. थोडा काळ लोटला तर आश्रमाच्या जागेच्या खरेदीच्या दृष्टीने शंकररावांची काहीच हालचाल दिसेना म्हणून स्वामी काळजीत होते. कोणतीही गोष्ट अर्धवट पडली की स्वस्थता राहात नाही. त्यातून हा व्यवहार आणखीनच काळजीचा व पैशाचा ! स्वामींनी महाराजांना पत्र पाठवून हे विचारले सुद्धा की " जागा खरेदी करण्याबाबत शंकररावांचे काय ठरले ते समजत नाही. येतो सांगून अजून पत्ता नाही. " शंकररावांनी महाराजांना कळविले की " काशीच्या जागेचा सोक्षमोक्ष लावला पाहिजे. मद्रासच्या धंद्यात एकूण १९ हजार रुपये निव्वळ नफा झाला आहे. " त्यामुळे पुन्हा या आश्रम विषयाला गती मिळाली.

जून १९४५ च्या दुसऱ्या आठवड्यात शंकरराव काशीस गेले. जागेचा ताबा घेण्यासाठी व व्यवहार पूर्ण करण्यासाठी पूर्ण खरेदीखत केले. रु. दहा हजारास जागा घेतली. रजिष्टर झाले. आता व्यवहार नीट व्यवस्थित झाला. स्वामींनाही बरे वाटले. शंकरराव पुण्याकडे निघून गेले.

गुरुपौर्णिमेचे दिवस आले. काशीतील स्वामींच्या साधक शिष्यांनी गुरुपौर्णिमेचा उत्सव केला. सर्वांनी श्रीस्वामीमहाराजांची पूजा केली. हार, नारळ, प्रसाद, दक्षिणा समर्पण केली. भोजन भंडारा झाला. स्वामींचे श्रीगुरुदेव प. प. श्रीशंकर पुरुषोत्तम तीर्थ स्वामी महाराज काशीमध्ये "सिद्ध योगाश्रम" छोटी गैबी मध्येच होते. श्रीगुरुपौर्णिमेच्या दिवशी म्हणजेच या व्यासपूजेच्या दिवशी स्वामी जांबवंतसिंह आदि चार सहा शिष्यांना घेऊन आपल्या गुरुदेवांच्या आश्रमात गेले. साष्टांग प्रणिपात करून गुरुदक्षिणा ठेवली. परस्परांचे बोलणे झाले. आणि मोठ्या आनंदात स्वामी तेथून निघून आले.

स्वामींच्या प्रकृतीच्या तक्रारी सुरू झाल्या म्हणजे स्थानांतराची सूचनाच समजावी असा नेहमीचा अनुभव झाला होता. आताही स्वामींनी सोलापूरहून श्री. पराडकर वैद्यांचे औषध व पत्र पोष्टाने आले होते ते नियमीत आठवडाभर घेतले पण त्याचा काही उपयोग झाला नाही याचा उल्लेख स्वामींनी पुढील वाक्यांनी केला आहे.

"औषधी ८ दिवस सेवन किया कुछ भी फलोदय नहीं हुआ। परंतु त्रास होने लगा। अतः मैं औषधी सेवन बंद किया। यह दोष औषधी के नहीं। परा भाग्यवशही ऐसा हुआ। और औषधी नहीं भेजना। मैं शीघ्र ही पूना जाऊंगा। वहाँसे श्रीशैल यात्रा करुंगा।

—प्रारब्धवश जैसी स्थिती प्राप्त है उसमें ही संतुष्ट रहने का प्रयत्न करता हूँ। तुकाराम महाराजने ऐसा कहा है कि—

**"ठेविले अनंते तैसेचि रहावे।**
**चित्ती असो द्यावे समाधान॥"**

## स्वामींची श्रीशैल्य हंपी, विरुपाक्ष, श्रृंगेरीची दक्षिण यात्रा

फेब्रुवारी १९४६ मधील ही यात्रा आहे. महाशिवरात्रीला पुण्यातून स्वामी श्रीशैल्याकडे निघाले. शंकरराव मार्कंडांनी यात्रेसाठी आपले कुटुंबीय बरोबर घेतले होते. महाराजांनीही या यात्रेत स्वामींच्याबरोबर यावे असा शंकररावांचा आग्रह होता. परंतु महाराज श्रीशैल्यास जाऊ शकले नाहीत तरी त्यापुढील हंपी, विरुपाक्ष, श्रृंगेरी या प्रवासात ते त्यांच्याबरोबर गेले होते. पुण्याहून स्वतंत्र डब्याची सोय केलेली असल्याने प्रवास अत्यंत सुखकारक झाला. या प्रवासात श्री. नारायणराव मोघे पुण्याहूनच स्वामींच्याबरोबर होते. रेल्वेचा स्वतंत्र डबा गुंटकलपर्यंत होता.

सोलापूरचे साधक स्वामींच्या दर्शनासाठी हार, नारळ घेऊन सोलापूर रेल्वे स्टेशनवर आले होते. बापुसाहेब कुबडे, वैद्यमास्तर यांनी हा निरोप व सत्कार घडवून आणला होता. स्वामी सोलापूरला कधीच गेले नव्हते. एकदा योग येऊ घातला होता. स्वामींनी आपल्या घरी यावे म्हणून वैद्यराज पराडकर यांनी स्वामींना विनंती केली होती. स्वामींनीही येण्याचे निश्चित ठरवून सोलापूरला येण्याचा दिवसही श्री. वैद्यराज पराडकर यांना कळविला होता. स्वामी त्यावेळी काशीमध्ये होते. स्वामींच्या येण्याच्या आनंदात काळ भराभर निघून गेला. स्वामी येण्याआधी ५/६ दिवस पराडकरांच्या घरात काही अडचण उत्पन्न झाली. त्यांना फार वाईट वाटले. त्यांनी स्वामींना पत्र टाकले "सध्या घरात अडचण आहे. कृपया आपण येऊ नये." निराशेत पत्र टाकले गेले हे कोणाही सोलापूरकराच्या कानी नव्हते. स्वामींची व्यवस्था घरच्या सारखी करणारे किती तरी साधक शिष्य सोलापुरात होते.

पुढे हे असे झाले ते सर्वांना समजले. सर्वांना खूप वाईट वाटले. स्वामींना अनेकांनी नंतर प्रार्थना केली पण स्वामींनी कधी होकार दिला नाही आणि स्वामींचा सोलापूरला जाण्याचा योग कधी आला नाही. परंतु श्रीशैल्याच्या यात्रेच्या निमित्ताने स्वामींचे चरण सोलापूरच्या भूमीला लागले हे काहीं कमी नाही. सोलापूर स्टेशनवर स्वामींचा अत्यंत श्रद्धेने सोलापूरकरांनी हार घालून, श्रीफल, प्रसाद, दक्षिणा इत्यादी समर्पण करून यथोचित सन्मान केला. स्टेशनवर अनेक भाग्यवान जीवात्मे हा हृद्य सोहळा पाहून घटकाभर हे मनोहर दृश्य पहाण्यासाठी तेथे थांबले. हा कोणी महापुरुष आहे याची जाणीव त्या बघणाऱ्यानांही झाली. त्यातील ज्यांचे पुण्य उफाळून वर आले त्यांनी पुढे जाऊन नमस्कारही केला. तेवढ्यात सत्संगतीच्या अपूर्व पुण्याईचे क्षण संपले. गाडीची वेळ झाली. शिट्टी वाजली व स्वामींना घेऊन गाडी श्रीशैल्याकडे निघाली.

स्वतंत्र डब्याची सोय असल्याने गुंटकलपर्यंत स्वामींचा प्रवास अत्यंत सुखाचा झाला. पण पुढेमात्र शिवरात्रीच्या महापर्वणी यात्रेची गर्दी अतोनात झाली. नंतर गुंटकल ते द्रोणाचलम् हा रेल्वेचा प्रवास शिल्लक होता. त्या प्रवासात स्वतंत्र डब्याची सोय होऊ शकली नाही. त्यातून गुंटकल स्टेशनवर गाडी बदलण्यास वेळही फार थोडा होता. स्वामींच्या बरोबर ११/१२ माणसे. त्यांचे सामान खूप, तशात हमाल मिळेना! एकच धांदल झाली त्यावेळी. तरी त्या स्थितीत शंकररावांनी स्वामींना पहिल्या वर्गाच्या डब्यात बसविले. त्यांच्याजवळ सामानही खूप ठेवून दिले बाकी सर्वजण जमेल त्याप्रमाणे गाडीत घुसले. नारायणराव मोघे गाडी चालू झाल्यावर स्वामींच्याच डब्यात शिरले. एवढया सामानाकडे व स्वामींच्या सोयीकडे पहाण्यासाठी कोणी तरी त्या डब्यात हवे होते. नारायणरावांनी ती संधी साधली. द्रोणाचलम स्टेशनवरसुद्धा ते चालत्या गाडीतून आधीच खाली उतरले. गाडी थांबल्यावर सामान उतरून घेतले. इतक्यात तिकिट कलेक्टर तेथे आला व तिकिटाची चौकशी करू लागला. त्याची भाषा कठोर व तीक्ष्ण होती. त्याने स्वामींनाच विचारले "किदर है तेरा टिकट?" त्याच्या वाक्यातील ही तुच्छता सर्वांनाच जाणवली पण सत्तेपुढे शहाणपणाचा काय उपयोग? तरी स्वामी शांतपणे म्हणाले "माझ्या मनुष्याजवळ तिकिटे आहेत. तो आल्यावर दाखवील येईलच आत्ता!" तेवढ्यातच शंकरराव आले. त्यांनी सर्वांची तिकिटे दाखविली. एक फर्स्ट क्लासचे व बाकीची थर्ड क्लासची होती. ही तिकिटे दाखवितांना शंकरराव त्या

कलेक्टरला दोन शब्द बोलले. त्यामुळे तो खवळला व स्वामींना परत तिकिट मागू लागला. पोलिसाच्या हवाली करण्याची आडवी तिडवी भाषा करू लागला. "मी तुमचा माणूस ओळखीत नाही. तुमचे तिकिट तुम्ही दाखवा, नाहीतर दंड भरा" यावर शंकरराव मार्कंड पुढे होऊन म्हणाले "मी स्वामीजींचा नोकर आहे. गुंटकल ते द्रोणाचलमचा १ ल्या वर्गाचा जादा आकार भरण्यास मी तयार आहे." पण तो कलेक्टर काही केल्या ऐकेना. त्याने स्वामींना बैरागीबुवा काय म्हटले. सर्वांना पोलिस कोठडीत टाकण्याची धमकी काय दिली. नाना तऱ्हेने तमाशा केला. इतके करून त्याने मोठ्यांदा "पोलीस, पोलीस" अशा हाका मारून २।४ पोलीस गोळा केले. स्वामी शांत होते. मूर्ख माणसाची समजूत पटविणे ब्रह्मदेवाला अवघड तेथे इतरांची काय कथा !

ही गर्दी व हा गोंधळ पाहून स्टेशन मास्तर तेथे आले. त्यांना बाजूला घेऊन शंकररावांनी आणि नारायणराव मोघे यांनी सर्व हकीगत सांगितली. ते स्टेशन मास्तर, पुढे झाले. कलेक्टरकडून तिकिटे काढून घेतली आणि शिट्टी देऊन, जाणाऱ्या गाडीतून त्यांची रवानगी केली. मग त्या स्टेशन मास्तरने स्वामींना पादस्पर्शपूर्वक नमस्कार केला व सर्वांची क्षमा मागून स्टेशन बाहेरील बसच्या स्टँडकडे रवाना केले. त्या स्टेशन मास्तरला ही बुद्धी ज्या शक्तीने दिली त्या शक्तीला मध्येच सत् असत् प्रवृत्तींचा खेळ दाखविण्याची इच्छा झाली असावी. या खेळाकडे खेळ म्हणून पहाण्याची वृत्ती महापुरुषांची असते असे या सामान्य घटनेतूनही आढळून आले. कलेक्टरने निंद्य शब्द वापरले म्हणून स्वामींच्या कपाळावर आठी वा नजरेत विषाद निर्माण झाला नाही किंवा स्टेशन मास्तरने 'क्षमा' मागितल्याने त्यांच्या चित्तात आनंदाची हुरळ आली नाही. तुल्यनिंदा स्तुतीमौनी संतुष्टो येन केनचित्" स्वामींच्या या स्थिरवृत्तीची जाणीव या संघर्षप्रसंगी सर्वांना दिसून आली. स्वामीजी त्या स्टेशन-मास्तरला म्हणालेही "तो तिकिट कलेक्टर आपल्या बुद्धीला अनुसरून वागला तिकडे मला लक्ष देण्याचे काहीच कारण नाही."

पुढे द्रोणाचलम ते नंद्याळ हा प्रवास बसने झाला. नंद्याळ येथे यात्रेची गर्दी फारच वाढलेली दिसली. रस्त्याच्या कडेने, झाडाखाली, मंदिरात कुठेही पाऊल ठेवायलासुद्धा जागा नव्हती. पण ही मंडळी जेथे उतरली व सामान उतरवून घेतले त्याच्याजवळच एक मुलींची शाळा होती. त्या शाळेला नाममात्र कुलुप होते. ते

काढून व्हरांड्यात सामान टाकले तोंच त्या शाळेचा शिपायी आला. पण शंकररावांनी त्याच्या हातावर मोठ्या चतुरतेने बक्षीसी ठेवली व त्याच पट्टेवाल्याकडून शाळेच्या मुख्याध्यापिकेची माहिती घेऊन, त्यांच्याकडे जाऊन, मुलींना खाऊसाठी भरपूर पैसे देऊन ती शाळा वापरण्याची राजरोस परवानगी आणली. "मृदंगो मुखलेपेन करोति मधुरध्वनीम् ॥" या सूत्राने येथील व्यवहार यशस्वी झाला. ही स्वतंत्र व सोयीची जागा मिळताच या मंडळींचे सर्व व्यवहार मोकळेपणाने सुरू झाले. प्रवासाची दगदग, नित्यक्रमाचा अनियमीतपणा, स्नान-भोजनाची आबाळ यामुळे शरीराला एक प्रकारचे मालिन्य आलेले असते. ते मालिन्य अशा टप्प्यांच्या ठिकाणातील छोट्या मुक्कामात पार नाहीसे होऊन जाते आणि यात्रेच्या पुण्यप्रद तपस्येचे समाधान अशा ठिकाणी मिळत जाते. याप्रमाणे स्वामींच्यासह सर्वांनी आपले नित्यक्रम समाधानाने उरकले. भोजनादिचा कार्यक्रम उरकला. प्रवासी विश्रांती घेतली. आणि पुढच्या योजनेला शंकरराव आणि नारायणराव बाहेर पडले.

नंद्याळ ते पेद्दाचरू हा प्रवास बैलगाडीने करावयाचा होता. तीन बैलगाड्यांची गरज होती. प्रवास रात्री करावयाचा होता. त्याप्रमाणे तीन गाड्या ठरवल्या व ठरल्याप्रमाणे रात्रीचा बैलगाडीचा प्रवास सुरू झाला. वापरलेली शाळा पूर्वीपेक्षा जास्त स्वच्छ करून प्रमुखांच्या हवाली केली. सायंसंध्यादि, रात्रीचे फराळादि उरकले. त्यामुळे विश्रांत शरीरे प्रफुल्लित मनाने पुढच्या प्रवासास निघाली. स्वामींच्या सहवासाने प्रवासाला आगळावेगळा भारदस्तपणा आला होता. स्वामींच्या सोयी पहाताना सर्वांच्या सोयी होत होत्या. स्वामींच्या सहवासाने प्रवासात यात्रेचे पावित्र्य होते.

प्रत्येक बैलगाडीत चार याप्रमाणे तीन बैलगाड्यातून सर्वजण बसले. स्वामीजी, शंकरराव मार्कंड, शंकररावांच्या पत्नी उमाबाई, आणि नारायणराव मोघे असे हे चौघे एका गाडीत बसले होते. स्वामींची लहर लागली की ते भरपूर बोलत असत. बोलण्यासारखे त्यांच्याजवळ खूप होते. भाषाही मोठी मोहक असे. ऐकणाऱ्याला कधी कंटाळा येतच नसे. उलट स्वामींनी बोलणे थांबवले म्हणजेच कसेतरी वाटत असे. हा बैलगाडीचा प्रवास रात्रीच्या शांत व थंड वातावरणातून सुरू झाल्यावर स्वामींनी एक गोष्ट सांगितली. त्यांनी ती गोष्ट खुलवून सांगितली. एकच गोष्ट तीन तास चालली होती. मधून मधून विनोद आणि हासणे यामुळे वेळ कसा गेला ते कळले पण नाही.

"मी पूर्वी एकदा असाच बैलगाडीतून प्रवास करीत होतो. त्यावेळी आमच्या गाडीत दोन सामाजिक कार्यकर्ते बसले होते. माझा संन्यासी वेष पाहून मला म्हणाले तुम्ही सर्व संन्यासी हे जग ब्रह्मस्वरूप मानता तर मग हिंदु मुस्लिम ऐक्य करण्यासाठी प्रयत्न का करीत नाही? आर्यसमाजी कोत्या बुद्धीचे आहेत तुम्ही आचार्यांच्या परंपरेतील उदार मतवादी आहात. तुम्ही संन्यासी, हिंदु धर्माचे गुरू आहात. तुम्ही सांगितले तर सर्व हिंदु तुमचे ऐकतील." एकूण आर्यसमाजाची निंदा व शंकराचार्यांची स्तुती केली म्हणजे हा संन्यासी खूष होईल असे त्या सामाजिक कार्याचा प्रपंच करणाऱ्यांचे धोरण दिसले. त्यावर मी म्हणालो अरे असा हिंदु मुस्लिम ऐक्याचा प्रयोग एकदा केला होता. ऐकण्यासारखा किस्सा आहे तो. ओघाने आलाच आहे तर सांगतो.

तुमच्यासारखा एक समतावादी हिंदु होता. मोठा धनसंपन्न होता तो. त्याला वाटले की हिंदु मुसलमानांचे ऐक्य होण्यासाठी आपण उदार मताने पुरोगामी विचाराचे एक अपूर्व कार्य करावे. म्हणून त्याने हजारो रुपये खर्च करून एक शिवालय बांधले. व ते मंदिर सर्व धर्मियांना खुले असल्याचे जाहीर केले. मोठा समारंभ केला. पण मुसलमानांना मूर्तीपूजा मान्य नसल्याने एकही मुसलमान त्या मंदिरांत येईना. त्या गृहस्थाला आपला हेतू पूर्ण झाला नाही म्हणून खूप वाईट वाटले, त्याने उलट दिशेने विचार करून पाहिले आणि ते मंदिर पाडून त्या ठिकाणी मशीद बांधली. त्यामुळे मुसलमानांना मोठा आनंद झाला. त्या ठिकाणी सामुदायिक प्रार्थनेसाठी सर्व हिंदूंनी आणि मुसलमानांनी यावे अशी दवंडी पिटली. पण अनुभव असा की मशीदीत हिंदू जाईनात. हे पाहून आता या दोघांच्या एकीसाठी काय करावे याची चिंता त्याच्या मनात उत्पन्न झाली. खूप विचारांती त्याला एक उपाय सुचला. त्या गृहस्थाने ती मशीद पाडली व तेथे उत्तम मुतारी व शौचकूप बांधून ठेवले. ही सार्वजनिक सोय आहे अशी पाटी त्यावर लावली. त्या वेळेपासून त्या ठिकाणी सर्व धर्मातील लोक न बोलावता येऊ लागले. अशी ही परिस्थिती आहे. या गोष्टीनंतर पुन्हा त्याने असला राजकीय वा सामाजिक प्रश्न काढला नाही. प्रवासातील ती एकादशीची रात्र या निमित्ताने जागून काढली.

पेद्दाचरू या खेडेगावी बैलगाड्या सकाळी ९।१० च्या सुमारास पोहचल्या. बैलगाडीच्या प्रवासाने सारे शरीर ठेचून निघाले होते यापेक्षा स्वामींना पायी

प्रवास फार आवडतो. पण सध्या स्वामी आपल्या शिष्य परिवारासमवेत होते. भक्तवत्सल भगवंताला भक्ताच्या कोडकौतुकासाठी निमूटपणे सारे सहन करण्यात आनंद असतो. पेद्दाचरूला गर्दीचे प्रमाण नंद्याळपेक्षा अधिक वाढलेले दिसले. सर्वांच्या उतरायची सोय अत्यंत आवश्यक होती. आज द्वादशी होती. कालची एकादशी उद्याची शिवरात्र अशा दोन उपवासाच्या दिवसामधला दिवस! येथून पुढे दहा मैलांचा पायी प्रवास होता. या दहा मैलामध्ये तीन डोंगर चढून दोन उतरायचे होते. बरोबर सामान खूप! शंकररावांनी आठ दिवस पुरेल एवढा पंधरा माणसांचा शिधा, व टिकेल असा भाजीपाला बरोबर घेतला होता. या सामानाचीच दोन पोती होती. बरं, बरोबरची माणसे पहावीत तर एक वृद्ध स्त्री, एक स्त्री हृद्रोगी, दोन पुरुष अगदी अशक्त, अशांच्याबरोबर डोंगरचढणीचा प्रवास! म्हणून पेद्दाचरूची जागा फार महत्त्वाची बाब होती. शैल्याला केव्हा पोहचणे होईल याचा काहीच अंदाज करता येत नव्हता.

स्वामीच्याबरोबर म्हटले म्हणजे धर्माचरणात तिळमात्र उणीव खपणार नसल्याची खात्री. त्या भागातील तेलगू भाषा कोणालाच येत नव्हती. ही जागा शोधण्याचा प्रयत्न चालू असताना एक स्वच्छ कपडे घातलेला सुशिक्षित मनुष्य स्वतःच पुढे येऊन म्हणाला उतरण्यासाठी सोयीची जागा एक दिवसापुरती मी देतो. त्या जागेत हव्या त्या सर्व सोयी होत्या. शंकर-रावांनी तात्काळ त्याच्या सूचना मान्य करून, आभार मानून ती जागा ठरवली. मग त्या तीनही बैलगाड्या त्या जागेकडे वळविल्या. माणसे उतरली. सामान उतरविले. स्वामींनी त्या भल्या माणसाची चौकशी केली. इतर कोणालाही न सुचलेली माहिती स्वामींनी काढली. तो गृहस्थ ख्रिश्चन होता. त्याची जागा वाप-रण्याचा प्रसंग आला. स्वामींनी आधी सामान आत नेऊ नका. ती जागा झाडून, सारवून घेण्यास सांगितले. मग आत प्रवेश केला. नंतर स्वयंपाकास सुरुवात झाली.

पुन्हा या मुक्कामात प्रवासातील नाविन्याचे सुख होतेच. सर्वांचे आपापली नित्यकर्मे उरकण्याचे उद्योग सुरू झाले. सारा स्वैपाक सोवळ्यात झाला. संध्याकाळी चार वाजता जेवणे झाली. प्रवासात सोवळ्यात जेवण घेताना वाटणारी शुचिता फार अपूर्व असते. स्वामींचा कटाक्ष होता म्हणून या आचारांना मुरड घालता येत नव्हती. स्वामींना जेव्हा ख्रिश्चन माणसाच्या घरात उतरण्याची पाळी आली असे समजले तेव्हा ते म्हणाले—

**"मरणाच्या भीतीनेही धर्म सोडू नये आणि यात्रेसारख्या पवित्रवेळी तर धर्म कसोशीने पाळावा. धर्माचे पालन आपल्या कल्याणासाठी असते याचा कधीही विसर पडू देऊ नये. "धर्मंन्नत्यजेज्जिवितस्यापि हेतोः" फार झाले तर आज जेवायला थोडा उशीर होईल! त्यापेक्षा फार काय घडणार आहे? त्यामुळे आपण मरणार तर नाही."** इतके स्पष्ट स्वामींनी बोलून दाखविले होते म्हणून पुढील कार्यक्रम एकदम शिस्तीत व पद्धतीत झाले. पण यामुळ सर्वांच्या चित्ताला परम शांतता मिळाली. गुरुत्त्वाच्या मार्गदर्शनाचे महत्त्व समजले.

यापुढचा प्रवास पायी सुरू झाला. सामानाची वहातुक करण्यासाठी इकडे गाढवांचा उपयोग करतात. वहातुकीचे भाडे ठरवून वहातुक करणाऱ्याच्या ताब्यांत सामान मोजूनदिले की तो ते गाढवावर लादून, देवळाजवळ तुम्ही उतराल तेथे, आणून पोहचते करतो. ही ओझ्याची गाढवे आल्यावर एकजण म्हणाला "या बिचाऱ्या गाढवांना यात्रेकरूंचे सामान वाहून नेण्याचे पुण्य मिळून पुढचा जन्म चांगला येवो!"

त्यावर स्वामी म्हणाले "**गाढवाचा जन्म येण्यासारखा आचार पूर्वजन्मी केला असेल म्हणून गाढव झाले. तसेच काही पुण्यकर्म घडले असेल म्हणून गाढव होऊन सुद्धा यात्रेकरूंच्या सेवेची संधी मिळत आहे. त्यातून तुमच्या-सारख्या साधू यात्रेकरूंचे आशीर्वाद न मागता त्या गाढवाला मिळत आहेत. असा हा ईश्वरी न्याय व दया अतर्क्य आहेत.**"

स्वामींची अनुज्ञा घेऊन श्री. दत्तोपंत आजेगावकर आणि श्री. नारायणराव मोघे पाय उचलून झपाट्याने पुढे निघाले. जागेची सोय करता आली तर पहाटे आणि स्नानादि करून पूर्वतयारी करावी हा हेतू होता. दहा मैल अंतरासाठी रात्रीचे नऊ वाजले होते. दीड, दोन लाखावर यात्रा जमलेली. इंचन् इंच जागा अडवून बसल्यामुळे आपल्या यात्रेकरूंना सहजासहजी जागा मिळाली नाही. पुढे सर्वजण शैल्याला आल्यावर ईशकृपेने झोपण्यापुरती जागा मिळाली. शिवरात्रीच्या पहाटे काहीजण पाताळगंगेस स्नानास निघाले. श्रीदत्तात्रयांचे तिसरे अवतारी प. प. श्रीनृसिंहसरस्वतीस्वामीमहाराज याच पाताळगंगेतून पुढे कर्दळी वनात गेल्याचा उल्लेख आहे. श्रीशैल्याहून पाताळगंगेस येण्यास पुन्हा खूप खाली उतरून यावे लागते. शंकररावांनी स्वामींच्यासाठी मुद्दाम डोलीची व्यवस्था केली होती. सकाळी ९।१० पर्यंत स्नानादि उरकल्यावर श्रीशैल्याचे म्हणजे मल्लिकार्जुन महादेवाचे दर्शन

घेण्यास स्वामी निघाले. अशा गर्दीत दर्शन अत्यंत कठीण होते पण प्रत्येक ठिकाणी जसा अपूर्व योग घडून आला त्याप्रमाणे येथेही योगायोगाने सारे काही घडून आले.

स्वामींनी चार पाच जणांना बरोबर घेतले आणि ते मंदिराच्या मोकळ्या दिसणाऱ्या दारातून सर्वांना घेऊन आत जाऊ लागले. तेथे एक पोलीस इन्स्पेक्टर उभा होता. त्याने अडवून "पास आहे का?" असे विचारले. स्वामी म्हणाले "आमचा पास श्रीशैल्याला विचार. हे संन्याशाचे स्थान आहे. तू हिंदू आहेस का? तर दाखव तुझी शेंडी! चारही वर्णांचा गुरू संन्यासी असतो हे जाणत नाहीस काय?" स्वामींचा चेहरा, डोळे, ऐटदार भाषा पाहून तो इन्स्पेक्टर गोंधळून गेला. तेवढ्यात स्वामी सर्वांना घेऊन दारातून आत निघून गेले. व्यवस्थित श्री मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेऊन त्याच दारातून बाहेर आले. स्वामी सर्वांसह दर्शन घेऊन बाहेर आलेले पहाताच त्या पोलीस इन्स्पेक्टरने स्वामींना लवून नमस्कार केला. इतरांनी जसे जमेल त्याप्रमाणे कमी अधिक वेळ खर्चून दर्शन घेतले. नारायणराव मोघे दर्शनासाठी मागे राहिले होते. त्यांनी या पोलीस इन्स्पेक्टरला सांगितले की मी स्वामींच्या सेवेसाठी त्यांच्या बरोबर आलो आहे. स्वामींचा उल्लेख ऐकताच त्याने नारायणरावांना आत सोडले. स्वामींचा प्रभाव त्याचेवर असा विलक्षण पडला होता. शिवरात्रीच्या महापर्वणीला श्री स्वामींच्यासह शैल्ययात्रा करणारे सारे पुण्यवान व भाग्यवान श्रीशैल्याचे दर्शन घेऊन परत पेद्दाचरू येथे आले.

आता पेद्दाचरूहून महानंदीमार्गे सर्वजण हंपी विरुपाक्षला जाणार होते. पुन्हा बैलगाड्या ठरवल्या व पुढचा प्रवास सुरू झाला. वाटेत एका हनुमान मंदिरामध्ये दुपारचा मुक्काम झाला. तेथे विहिरीला भरपूर व जवळ पाणी होते. नारायणरावांनी आणि दत्तोपंत आजेगावकरांनी स्वामींना ५०/६० बादल्या पाणी आंघोळीसाठी काढून दिल्या. त्यावेळी स्वामी म्हणाले "अब बस करो। आज जी भरके न्हाया."

संध्याकाळी महानंदी येथे स्वामी पोहचले. येथे शंकराचे रम्य स्थान आहे. येथील नंदीचे शिल्प प्रेक्षणीय आहे. शंकराच्या पिंडीखालून सुमारे फूटभर व्यासाच्या नळातून यावे असे पाणी वाहात येते व क्रमाने एकाखाली एक अशा तीन चार कुंडात वहात जाऊन शेवटी एका केळीच्या बागेतून पुढे जात असते. येथे अन्नछत्र होते. सार–भाताचे जेवण मद्रासी कडक सोवळ्यात तयार होते. स्वामींच्यामुळे येथे

उतरण्याची सोय बंदिस्त खोलीत झाली. अन्नछत्रातील मंडळींनी स्वामींची व इतर सर्वांची व्यवस्था योग्य आदर देऊन केली. रात्री सर्व उरकल्यावर पुन्हा बैलगाडीचा प्रवास सुरू झाला. सकाळी आठच्या सुमारास सर्वजण हंपीला पोचले.

## हंपी विरुपाक्ष पूजा

बेझवाडा रेल्वे स्टेशनपासून २।३ मैलावर हंपीचे इतिहासप्रसिद्ध शिवमंदिर आहे. विजयनगर राज्याची स्थापना विद्यारण्य स्वामींच्या प्रेरणेने आशीर्वादाने व साहाय्याने झाली. त्या विजयनगर साम्राज्याचे अवशिष्ट, विदीर्ण स्थान हंपीपासून दोन मैलावर आहे. प्राचीन किष्किंधा नगरीचे केवळ स्थान आणि वाल्मिकींच्या प्रतिभेने वर्णिलेले पंपासरोवरही येथून अगदी जवळ आहे.

महाराजांना श्रीशैल्याला येता येणार नसले तरी पुढे हंपीला स्वामींच्याबरोबर सामील होण्याचे कबूल केले होते. त्याप्रमाणे स्वामींनी हंपीला आल्याबरोबर "वामनराव आया का देख आवो" सांगून दोघा तिघांना त्या कामगिरीवर पाठविले होते. विरूपाक्षच्या प्रशस्त मंदिराच्या प्राकाराबाहेर एका घरात माडीवर त्यांचा मुक्काम होता. तेथे श्री. नारायणराव मोघे, दत्तोपंत आजेगांवकर यांनी जाऊन पाहिले. तो खोलीला कुलूप आढळले. पण खिडकीतून महाराजांची ट्रंक व परिचयाच्या वस्तू दिसल्या. तेवढ्याने ठरल्याप्रमाणे ते आल्याची खात्री पटली. वेळ सकाळची होती. महाराज फिरावयास गेले होते. थोड्याच वेळात परत आले. सर्वांना त्यांच्या भेटीने आनंद झाला. त्यांनाही स्वामींसह आप्तबंधु भेटल्याने आनंद झाला. महाराजांनी स्वामींना साष्टांग ममस्कार केला. औपचारिक बोलणी झाली.

विरुपाक्ष मंदिराच्या प्रशस्त ओऱ्यामध्ये स्वामींसह सर्वांनी मुक्काम ठेवला होता. मग सर्वांचे नित्यक्रम सुरू झाले. तुंगभद्रेत स्नाने झाली. हंपी विरुपाक्षाची पूजा करण्याची इच्छा स्वामींना झाली. व्यवस्थापकांची थोडी हरकत दिसली कारण स्वामीजी गौड देशीय होते. दक्षिणेकडे द्राविड ब्राह्मण श्रेष्ठ व गौड ब्राह्मण कनिष्ठ असा भेद मानला जातो. त्याची तीव्रता स्वामीजींना शृंगेरीला फार जाणवली. पण, हंपीला त्यांनी त्या व्यवस्थापकांना पटवून दिले की "**विरूपाक्षाची स्थापनाच मूळ, संन्याशाच्या सोयीसाठी झालेली आहे. स्वतःचा संन्यासाश्रम निर्वेध चालावा आणि इतर संन्याशांनाही त्यांच्या आश्रम धर्माप्रमाणे सुलभतेने आचार**

**पाळता यावेत या हेतूने हंपी येथील मठ व विरूपाक्षाचे देवस्थान विद्यारण्य स्वामींनी निर्माण केले. चतुर्थाश्रमाला प्रांतादिक बंधने नसतात. आद्य-शंकराचार्यांनी आसेतु हिमाचल प्रवास करून धर्मस्थापना केली ती प्रांतादिक भेदांचे निवारण करून सनातन धर्म, भारतभर एकच आहे, हे लोकांना पटविण्यासाठीच. स्वामींनी शेवटी व्यवस्थापक मंडळींना विचारले की संन्याशांच्या या स्थानांत तुम्ही गृहस्थाश्रमी राहाता ते कशाकरता? कोणी संन्याशी आले तर योग्य व्यवस्था करून देणे व मंदिरातील पूजा नैवेद्य आणि इतर देखभाल करणे, याच कामासाठी तुम्हास येथे ठेवले आहे. दंडी संन्यासी मंदिरात पूजा करू म्हणत असताना त्याला पूजा साहित्य आदराने पुरवून पूजेची व्यवस्था करून देण्याचे आपले कर्तव्य न करता पूजेला अडथळा आणणे हे अयोग्य आहे."**

अशी व्यवस्थेच्या कर्तव्यांची खरमरीत जाणीव दिल्यावर आणि स्वामींच्या बरोबर असलेल्या सर्वांचे आचरण व स्वामींच्याविषयींचा आदरभाव पाहिल्यावर व्यवस्थापक मंडळींनी पूजेची सर्व व्यवस्था उत्तम करून दिली. स्वामींनी अष्टोत्तरशत बिल्वपत्रांनी विरूपाक्षाची पूजा केली. तेथील तीन चार दिवसांच्या मुक्कामात पुन्हा कसलीही अडचण आली नाही. त्या छोट्या मुक्कामात सर्वांनी सकाळी लवकर उठून आसपासची प्रेक्षणीय स्थळे पाहावीत आणि परत आल्यावर आह्निक, भोजन वगैरे कार्यक्रम उरकावेत. कधी संध्याकाळीही जवळपास फिरून यावे. असा मोठ्या आनंदात तेथील मुक्काम झाला. येथे सर्वांनी पाहिलेल्या स्थानामध्ये, विद्यारण्यांनी गायत्री पुरश्चरणे केली ते स्थान, विजयनगरचे भग्नावशेष, किष्किंधेचे स्थान, तेथील कोदंडधारी रामाचे मंदिर, वालीपर्वत, पंपासरोवर, मारुतीचे जन्मस्थान अशा अनेक महत्त्वाच्या स्थानांचा समावेश आहे. किष्किंधेच्या दुर्गम गुहांचे अवशेषच नव्हे तर प्रत्यक्ष गुहाही थोड्या फार अद्यापही तेथे आहेत. पंपासरोवर म्हणून एक लहानसे कुंड दाखवतात. दोन युगांचा काल उलटून गेल्यावरही श्रीराम सान्निध्याने पुनीत झालेल्या या प्रचंड सरोवरातील पवित्र जल आजही त्या कुंडात आहे हे केवढे भाग्य! बैरागी संप्रदायातील एक बैरागी या ठिकाणी नेहमी असतो. तो दर्शनाला येणाऱ्याला हे स्थान दाखवतो. मारुतीचे जन्मस्थान, अंजनी-पर्वत चढून गेल्यावर, तेथून एका कड्याखाली उतरून एका खडकावर आडवे पडून, समोर दिसणाऱ्या गुहेत आहे, हे सांगायलाही तेथे एक बैरागीबुवा आहेत. ते तेथे आहेत म्हणून तर अशी अवघड स्थाने कळतात. या बैरागी संप्रदायाने त्रेता-

युगातील रामावतारानंतर हे कार्य सुरू केले ते अद्यापपर्यंत चालू आहे. असा हा हंपीचा एकूण कार्यक्रम उरकून स्वामींची यात्रा कुमारस्वामींच्या दर्शनाला आली. कुमार कार्तिकेयाचे स्थान सोंडूर संस्थानातील लोहाद्रि पर्वतावर आहे. लोहाद्रि हे पौराणिक नाव आहे. आजच्या विज्ञान युगातही याची चांगलीच प्रचीती येते.

या लोहाद्रि पर्वतावरून सभोवार खाली नजर टाकली की निरनिराळ्या रंगांच्या मातीचा गालिचा पसरलेला दिसतो. रंगात वापरल्या जाणाऱ्या मातीचे बहुतेक प्रकार येथे आढळतात. तांबडी, पिवळी, पांढरी व दुर्मिळ अशी हिरवी मातीही या भागात आढळते. येथून रंगीत मातीचा मोठ्या प्रमाणात पुरवठा होतो. या पर्वताच्या उतारावर एका सुवासिक गवताचा प्रकार आहे. त्यापासून रोशेन तेल काढण्याचा धंदाही या भागात हंगामामध्ये चालतो. सुगंधी द्रव्ये आणि काही औषधे यांत वापरण्यासाठी या तेलाला जगभर पुष्कळ मागणी असते. स्वामी आणि महाराज या दोघांच्या जिज्ञासुवृत्तीमधून अशी खूप माहिती ते प्रवासातून मिळवत होते. त्याची उद्बोधक चर्चा चालली म्हणजे ऐकणाऱ्याना या विज्ञानदृष्टीचे मोठे कुतुहल वाटत असे. परमार्थी माणूस हा निरस असतो, निवृत्तीवादी असल्याने जगातील सर्व काही मिथ्या समजून, त्याची उपेक्षा करणारा असतो किंबहुना या प्रवृत्तीमुळे परमार्थी माणसे विज्ञानात अज्ञानी असतात असा सर्वसाधारण समज असतो. पुष्कळ अंशाने ते खरे वाटत असले तरी खरे परमार्थी उत्तम विज्ञानी असतात असाच अनुभव आहे.

कार्तिकेयाची लोहाद्रीवरील मूर्ती पाच-सहा फूट उंचीची व रेखीव आकाराची आहे. येथील पूजाअर्चा कडक सोवळ्यात होते. पुजाऱ्याने मंदिरात स्नान करून तेथेच सोवळ्यात वाळत घातलेले वस्त्र नेसून गाभाऱ्यात प्रवेश करावयाचा आणि पूजा संपेपर्यंत गाभाऱ्याबाहेरही जावयाचे नाही असा तेथे नियम आहे. दर्शनार्थींना सोवळ्याने सुद्धा गाभाऱ्यात प्रवेश नाही. सभामंडपात ठराविक जागेत उभे राहूनच दर्शन घ्यावे लागते. येथील यात्रा संपवून सर्वजण यशवंतनगर या रेल्वे स्टेशनला आले. बरोबर घेतलेला सर्व शिधा येथे संपला होता. तो सहज विकत मिळेना. रेशनचे दिवस आणि भाषेची अडचण होती. त्यामुळे सर्व बाजार हिंडून उपयोग होईना ! तिथेही योगायोगाने एका हिंदी येणाऱ्या दुकानदाराची भेट झाली. त्याचेशी जरा जास्त बोलून — आम्ही यात्रेकरू आहोत, आमचेबरोबर संन्यासी आहेत

इत्यादि सांगून, भाव जास्त घेण्याचे आमिष दाखवून त्याला तयार केले व त्याचेकडून सर्व शिधा विकत घेतला त्या वैश्याने भाव मात्र अत्यंत रीतसर घेत म्हटले "तुम्ही यात्रेचे पुण्य मिळवता मी तुमच्याकडून जास्त नफा घेण्याचे पाप तरी करीत नाही एवढे तरी मला समाधान आहे" त्या दुकानदाराचे अन्तःकरणापासून आलेले ते वाक्य ऐकून त्याच्या सद्भावनेबद्दल सर्वांना फारच समाधान झाले. सत्संगतीचा फायदा यात्रेतून घेताना अनेकांच्या जीवनात वैचारिक परिवर्तन होईल यात नवल नाही परंतु संत, सत्पुरुषाच्या केवळ दर्शनाने सतत नफ्याचा विचार करणारा वैश्यही पूर्वपरिचय नसताना एवढी शुद्ध भूमिका घेऊ शकतो हे खरे नवल आहे. परमेश्वर 'धी प्रेरक' असल्याचे हे प्रमाण आहे.

येथे यशवंतनगरमध्ये असतानाच नारायणराव मोघे यांच्या पायांच्या भेगांचे दुखणे फार वाढले. हिंवाळी थंडी, धुळीने भरलेले रस्ते, यामुळे दुखण्याचे दुःख वाढले. या मुक्कामात हनुमान मंदिरामध्ये स्वामींचा निवास होता. जवळच विहीर होती. भोवतालचे लोक त्या विहिरीचे पाणी वापरीत. दुपारी विहिरीवरील गर्दी कमी झाल्यावर आपल्या लोकांना पाण्याच्या उद्योगाकडे जावे लागले. दुपारचे ऊन, फरशा तापलेल्या, तशा स्थितीत नारायणरावांनी पाणी काढून भरले. पायाला फोड आले. चालणेही कठीण झाले. तेव्हा त्यांनी महाराजांच्या कानावर हे सारे घातले. महाराजांनी स्वामींना सांगून नारायणरावांना घरी परत जाण्याचा सल्ला दिला.

नारायणराव परत जातांना स्वामींचे दर्शन घेऊन अनुज्ञा घेण्यासाठी गेले त्यावेळी स्वामींना म्हणाले "स्वामीजी सेवामें कोई गलतियाँ हुवी हो तो क्षमा कीजिए"। त्यावर स्वामी म्हणाले "सबही गलत है।" प्रथम या शब्दांचा नीट खुलासा झाला नाही असे त्यांच्या लक्षात आले तेव्हा ते म्हणाले **'चुका झाल्या असे वाटते हेच चूक आहे. मी, तू वाटणे चूक आहे. परमेश्वराला जशी वाटते तशी सेवा आपल्या हातून करून घेतली आहे. गुरु सेवा कशीही केली तरी तो फळ चांगलेच देतो"** स्वामींचा प्रसन्नपणे निरोप घेऊन नारायणराव मोघे परतले.

येथून पुढे स्वामीजी, महाराज, हैद्राबादचे किसनराव, विनायकराजे ही मंडळी आचार्यांच्या शृंगेरी मठाकडे गेली. आचार्यांचा तेथे मुक्काम नव्हता. धर्म प्रचाराच्या संचारासाठी ते बाहेरगावी गेले होते. मठाच्या व्यवस्थापकाने या मंडळींची चौकशी केली. स्वामी गौड ब्राह्मण शरीराचे आहेत हे त्याच्या ध्यानात

येताच त्याच्या वर्तनात फरक पडला. संन्याशांना आदर दाखविण्याइतपतही औदार्य त्या व्यवस्थापकांमध्ये आढळले नाही. स्वामींना हे जाणवले. त्यांची व्यवस्थापकाशी थोडी कुरबूरही झाली. पण आपले व आचार्य पीठाचे स्थान ओळखून स्वामींनी विद्यारण्याच्या विरूपाक्षमंदिरातील व्यवस्थापकांना जसे चार शब्द ऐकवले तसे येथे केले नाही. स्वामी मठात मुक्कामासाठी थांबले नाही. बाहेर मुक्काम केला. निस्पृहतेला अपेक्षा कसली असणार ? जगच कस्पट मानणारी ही मंडळी ! दुसऱ्याचा दबाव यांच्यावर कसा येणार ? स्वामींनी आपले नित्याचे आन्हिक उरकले. इतरांनी आपली स्नान पोथी उरकली. श्रीशारदांबेचे कुंकुम अर्चन केले. प्रसाद दक्षिणा समर्पण केली. प्रसाद घेतला. शृंगेरीचा मठ पाहिला. नंतर तेथून सर्व मंडळी शिमोग्यास आली. आणि मग पुण्यास आली. अशी ही मोठी यात्रा उत्तम तऱ्हेने झाली.

## स्वामी कृपादृष्टी-वृष्टी !

स्वामींच्या दृष्टीचे सामर्थ्य किती अपूर्व होते हे आज एका साध्या घटनेतून आपण पाहाणार आहोत.

स्वामी वीस नारायण पेठेत होते. एकदा त्यांना कुठे बाहेर जायचे होते म्हणून भालचंद्र यास टांगा घेऊन येण्यास सांगितले. टांगा आणण्यास तो बाहेर पडला. टांग्याचा खूप शोध केला पण त्याला टांगा काही आढळला नाही. त्या धावपळीत काय झाले ते समजले नाही पण कोपऱ्यावरच्या वृक्षाजवळ तो चक्कर येऊन पडला.

ती चक्कर साधी नव्हती. त्याचे हात पाय धुणे पिळावे तसे पिळले जात होते. जमिनीवर लोळत लोळत इकडून तिकडे जात येत होता. तोंडातून फेस फसफसून बाहेर पडत होता. मधून मधून डोळे उघडले जात तेव्हा ते विस्तवासारखे लालबुंद झालेले दिसत होते. आळीतल्या लोकांनी भालूला ओळखले. त्यांची धावपळ सुरू झाली. कुणी कांदा आणून हुंगायला दिला, कुणी पाणी आणले, चारपाचजण त्याला घट्ट धरून ठेवून शांत करण्याचा प्रयत्न करीत होते. कुणी गोवईकरांच्या चाळीत त्याच्या घरी सांगण्यास धावले होते. चाळीत बातमी समजताच ज्यांनी ऐकले ते पळत सुटले. ज्यांनी पळणाऱ्यांना पाहिले तेही त्यांच्या मागे पळू लागले. हां हां म्हणता ही गर्दी झाली.

भाल्लला ५।६ माणसांनी उचलले व चाळीतील त्याच्या खोलीत आणले. रस्त्यावरची गर्दी कमी झाली पण चाळीत काय थोडे लोक होते. त्याच्याभोवती गर्दी जमलेली होती. तेवढ्यात कुणीतरी घाईघाईने 'अमोनिया' ची बाटली आणली. ती उघडून भाल्लच्या नाकाजवळ धरली तरी शरीराच्या पिळल्या जाणाऱ्या हालचाली कमी होईनात. नाकाजवळ धरलेल्या बाटलीला भाल्लचाच एक धक्का बसला आणि त्यातील अमोनिया नाकावर सांडला. तो पुसून टाकला पण तेवढ्यात तेथे फोड आले. इतका अमोनियाचा वास आत जाऊनही उपयोग झाला नाही.

स्वामींच्या कानावर ही गोष्ट आधीच गेली होती. पण ते काय होत आहे हे पाहात बसले होते. बराच वेळ झाला, बरीच धावपळ चालली तरी 'चक्कर उतरली' असे कुणीच सांगायला आलेला नव्हता. तेव्हा स्वामी दिंडीदरवाज्याजवळच्या खोलीत बसले होते. तेथे महाराजही बसले होते. स्वामी एकदम उठले व भाल्लची प्रकृती पाहण्यासाठी निघाले. बरोबर महाराज निघाले. गर्दीमधून स्वामी भाल्लजवळ आले. त्याची ती बेहोष स्थिती पाहिली. त्यांनी त्याच्याकडे रोखून पाहिले. 'भाल्ल' म्हणून हाक मारली. कुणी म्हणाले "तो बेशुद्ध आहे." स्वामींनी फक्त उजवा हात वर करून बोलणाऱ्याला बोलू नकोस, मला माहीत आहे एवढा इशारा दिला. पुन्हा एकदा स्वामींनी 'भाल्ल' अशी हाक मारली.

दुसरी हाक त्याने ऐकली व डोळे उघडले. त्या लालबुंद डोळ्यांनी स्वामींना पाहिले. तसेच स्वतःला सावरीत तो उठला. स्वामींच्या पायावर डोके ठेवले. स्वामी त्याला म्हणाले "अंदर जाकर सो जावो।" त्याप्रमाणे त्याने केले. एवढी मोठी चक्कर, जिने अमोनियाला दाद दिली नाही ती स्वामींच्या दृष्टीने उतरावी याचे सर्वांना आश्चर्य वाटले. स्वामी परत पहिल्या खोलीत आले. बरोबर महाराज व नारायणराव मोघे होते. स्वामी खोलीत येऊन आसनावर बसल्यानंतर म्हणाले "मेरी तबीयत अच्छी होती तो उसे अभी हसाने लगाता." स्वामींची प्रसन्नता पाहून नारायणराव मोघे म्हणाले "स्वामी आपण तर जादू केली!" यावर स्वामी म्हणाले **हत्तीचा जीव आणि मुंगीचा जीव ज्याला दिसू शकतो तो त्या जीवावर नियंत्रण करू शकतो."**

थोड्या वेळाने स्वामींनी काही औषधी सांगितली आणि मग बाहेर गेले.

## काशीत आश्रम झाला !

इ. स. १९४५ मध्ये श्रीरामेश्वरची यात्रा, सर्व कुटंबीय घेऊन, स्वामींच्या सहवासात, शंकरराव मार्कंडांनी मोठ्या आनंदात पार पाडली. त्यानंतर लगेच काशीच्या आश्रमाच्या जागेचे खरेदीखत केले. स्वामींच्यामुळे आपली भरभराट होत आहे याची प्रचीती घेत घेत शंकरराव स्वामींची सेवा मोठ्या श्रद्धेने होईल तेवढी करीत होते. एवढा पैसा मिळू लागला म्हणून शंकररावांनी आधी आपल्या घराचा विचार न करता स्वामींचा आश्रम, श्रीदत्तमंदिर आणि स्वामींच्यासह सर्व कुटुंबाची तीर्थयात्रा यासाठी पैसा खर्च होत आहे हे पाहिले. यात्रेतील सारी व्यवस्था शंकरराव संस्थानिकांसारखी ठेवीत असत. या साऱ्या व्यवस्थेचे केंद्र होते स्वामींची प्रसन्नता ! अन्त:करणाच्या अत्यंतिक कृतज्ञतेतून शंकरराव स्वामींची सेवा करीत होते.

इ. स. १९४६ साल उजाडले. महाशिवरात्रीचा पर्वकाल साधला आणि शंकररावांनी श्रीशैल्याची यात्रा स्वामींसह पूर्ण केली. शैल्य यात्रेहून येतानाच शंकररावांच्या मनात केदार-नारायण यात्रेचे विचार येऊ लागले. हातात पैसा आहे, प्रकृती अनुकूल आहे त्याच काळात हिमालयातील अवघड यात्रा केल्या तर उपयोग ! नाही तर सर्वच अडचणी ! शंकररावांनी महाराजांचेजवळ विषय काढला. स्वामींच्याजवळ विषय काढून त्यांची संमती घेतली. सोलापूरला श्री. वैद्यमास्तरांना कळविले. पण कोणाचेच जमले नाही. श्री. वैद्यमास्तरांची प्रकृती ठीक नव्हती. महाराजही हिंगोलीस जाणार होते. डोंबिवलीचे श्री. कृ. गो. जोशी यांना तिकिटे रिझर्व्ह करण्यास सांगितले.

मध्यंतरी स्वामी काशीस गेले. चातुर्मास काशीत करण्याचे ठरविले. आश्रमाच्या बांधकामाला २१।२२ ऑगस्टला प्रारंभ झाला. त्या कामाला वेग आला. केदार नारायण यात्रेचे तूर्त स्थगित केले. फार धावपळ स्वामींना परवडणारी नव्हती. या काळात स्वामींची प्रकृती बिघडली. पाण्डे घाटावरील जागा सोडून ते B १३/१७७ सोनारपुरा या जागेत राहाण्यास आले. महाराजांची नित्याची म. ऑ. येत होती. पहिली जागा सोडण्याचे कारण स्वामींनी एका पत्रात सविस्तर लिहिले आहे.

नारायण

काशी
२४।८।४६

नारायण स्मरणसूचक आशीर्वाद ।

.... घरमालकाच्या मुलाच्या गैरवर्तनामुळे जागा सोडली. ती जागा सोडून

सोनारपुऱ्यात २०/– रु. द. म. भाड्याने जागा घेतली. दुसरा मंजला भाड्याने घेतला. तळ मजल्यावर मालकाची कन्या, जावई, दोन नातू आणि मुलीचा सासरा एवढेजण रहात होते. ते दररोज न चुकता मला पाण्यासाठी त्रास देत असत. मधून मधून अपशब्दही वापरीत. हा सर्व त्रास मी मुकाट्याने सहन केला. दुसरी जागाच मिळत नव्हती. म्हणून नाईलाजाने तेथे राहात होतो. एकदा त्या तळमजल्यावरील गृहस्थाचा नातू, सध्या सतरा वर्षाचा आहे, तो माझ्या खोलीच्या वरच्या मोकळ्या गच्चीत जाऊन उड्या मारणे, आदळ आपट करणे असले उद्योग करू लागला. त्या आवाजाने मला विक्षेप झाला तरी मी शांतपणे त्या मुलाला सांगितले की गच्चीवर नाचू नकोस. खाली जा. मी एवढे सांगतो न सांगतो तोंच तो मुलगा व त्याचे सर्व नातेवाईक माझेशी भांडायला लागले. मला काही हे योग्य वाटले नाही. मी सरळ ही जागा सोडली. योग असा की या संकटात मला एका ब्राह्मणाने आपल्या घरात जागा दिली.

ही सोनारपुऱ्यातील जागा सोडून स्वामी D ३४|२४ गणेश महल्ला, सातचक्र, या ठिकाणी आले. आश्रमाचे बांधकाम नोव्हेंबर मध्ये पुरे होईल असे दिसू लागले. स्वतंत्र, सोयीची, व आपल्या हक्काची जागा लवकरात लवकर स्वामींना दिली पाहिजे या विचारांनी शंकररावांनी बांधकामाला वेग दिला. स्वतः वारंवार काशीला जाऊन येऊ लागले. सप्टेंबर ४६ मध्ये इमारतीचे काम छताखेरीज पूर्ण झाले. सीमेंटची सोय झाली तर ऑक्टोबरमध्येही इमारत पूर्ण होईल असे दिसू लागले. स्वामी पत्रातून महाराजांना नव्या आश्रमवास्तूचे बांधकाम वृत्त कळवून म्हणाले **" काम पूर्ण होताच आश्रमात राहाणार आहे. जे काही सुख दुःख आहे ते भोगले पाहिजे. "**

डिसेंबर महिना उजाडला. महाराज बरेच दिवस पुण्याच्या बाहेर होते. सोलापुराहून हैद्राबाद आणि हैद्राबादहून आजेगावी ते गेले होते. तेथे महाराजांची षष्ठ्यब्दी साजरी केली. होमहवनादी शांतीकर्मे केली. परमेश्वराजवळ दीर्घआयुरारोग्य महाराजांना प्राप्त व्हावे म्हणून प्रार्थना केली. अन्नदान झाले. महाराजांनी स्वामींना अकरा रुपये श्रीगुरुदक्षिणा पाठविली. झाला कार्यक्रम कळविला. त्यांच्या आशीर्वादाची प्रार्थना केली. स्वामींनी मोठ्या आनंदाने आशीर्वाद दिला. आणि त्याच पत्रात आनंदाची बातमीही कळविली.

स्वामींच्यासाठी काशीमध्ये आश्रम तयार झाला. १२ डिसेंबरला वास्तुशांत करण्याचे ठरविले. ही वास्तुशांत श्रीमत्‌शंकराचार्यांचे हस्ते झाली. स्वामींना सभा-समारंभ आवडत नसत. गाजावाजा आवडत नसे. तयार झालेली वास्तू साधकांसाठी आहे. ते येतील राहतील, साधना करतील हाच त्या वास्तूचा खरा उपयोग. त्याच्यासाठी समारंभ कशाला. प्रसिद्धी कशाला. या विचाराने सर्व कार्यक्रम घरगुती केला. विशेष आश्चर्याची गोष्ट अशी की, श्री. शंकरराव मार्कंड, ज्यांनी या आश्रम-निर्मितीच्या कल्पनेपासून, बांधकाम पूर्ण होईपर्यंत, तनमनधनाने सर्वच जबाबदारी स्वीकारली व पूर्णपणे पार पाडली ते शंकरराव या आश्रमाच्या वास्तुशांतीला उपस्थित नव्हते. दुसऱ्या का तिसऱ्या दिवशी ते काशीत गेले होते. त्यांना स्वामींचे पत्र नागपुरात मिळाले लगेच ते निघाले तरी त्यांनाही वास्तुशांतीचा दिवस गाठता आला नाही. महाराजही जाऊ शकले नाहींत. प्रत्येक घटनेला समारंभाचे स्वरूप देण्याचा तो काळ नव्हता.

शके १८६८ मधील मार्गशीर्ष व॥ ४, गुरुवारी पुष्य नक्षत्रावर, गुरुपुष्या-मृतसिद्धीयोगावर, या आश्रमाची वास्तुशांत आचार्यांच्या हस्ते झाली. इंग्रजी दिनांक १२ डिसेंबर १९४६ हा होता.

स्वामी आश्रमात राहण्यास मात्र शुक्रवारी, व॥ ५ स, सिंहेला चंद्र गेल्यावर, मृत्यू योगावर गेल्याचे दिसते.

श्री. शंकररावांनी कृतज्ञतापूर्वक स्वामींना आश्रम बांधून दिला. स्वामींचे त्या वास्तूत वास्तव्य झाले. ही स्वामी सेवा परमोच्च आहे. शून्यातून वर आलेल्या शंकररावांनी मिळालेला सर्व पैसा सत्कार्यात घालविला ही त्यांची पुण्याई शब्दातीत आहे. पूर्वप्रारब्धानुसार कर्म घडत असताना क्रियमाण कर्माचा वाटा त्यांनी मोठा उचलला यात शंका नाही.

## बद्रीनारायणाची महायात्रा

१९४७ जानेवारीच्या सहा तारखेस स्वामींचे शंकररावांना पत्र आले. स्वामींनी पुण्याला येऊन डॉक्टर वि. म. बेन्द्रे यांचे औषध घेण्याची इच्छा व्यक्त केली. त्याप्रमाणे स्वामींना सोयीस्कर व्हावे म्हणून पुण्यात टिळक रोडवर, हिराबागे-शेजारी, मागोरा कंपनी समोर, 'पांडुरंग निवास' मध्ये स्वतंत्र जागा घेतली. स्वामींच्या

जागेची सोय होताच, स्वामी काशीहून मंगळवार दि. १३ जानेवारीस, मकर संक्रमणाचे आदले दिवशी पुण्यात आले. स्टेशनवर नाना भालेराव, शंकरराव इ. अनेक मंडळी गेली होती. स्वामी शंकररावांचेकडून 'पांडुरंग निवासात' गेले.

डॉ. बेंद्र यांनी स्वामींची प्रकृती तपासली. स्वामींचे लिव्हर बिघडले होते. खोकला होता, खूप अशक्तपणा होता. मग डॉक्टरांनी काळजीपूर्वक औषधयोजना केली. त्याप्रमाणे पथ्यपाण्यासहित औषधोपचार सुरू झाले. हळू हळू प्रकृती सुधारू लागली. स्वामींचे हिंडणे फिरणे सुरू झाले. नाना देशपांडे, अण्णा लोहोकरे, मोघे ही मंडळी स्वामींच्या दर्शनासाठी जात असत. काका दामले, त्यांचे चिरंजीव दिगंबरपंत दामले, ही मंडळी जात. दत्तात्रेय दामले हा काकांचा नातू स्वामींची खूप सेवा करीत असे. औषध आणून देणे, इतर कामे करणे याकडे तो लक्ष देत असे.

जागा आणि स्वामी यांचा संबंध मोठा विचित्र दिसतो याचा अनुभव या जागेतही आला. कोणत्याही जागेत स्वामी फार काळ राहूच शकत नव्हते. कारणे अनंत असतील पण सूत्र एकच होते. एका जागेत फार काळ न राहाणे. या पांडुरंग निवासात स्वामींना येऊन महिनाही पुरा झाला नव्हता इतक्यात त्यांच्या खोलीत दूषित उंदीर मरून पडला. स्वामींना तेथे ठेवणे योग्य नव्हे या विचाराने त्यांना २० नारायण पेठेत आणले. महाराज यावेळी आजेगावास होते. श्री. नाना भाले-रावांनी स्वामींची सर्व व्यवस्था घरच्याप्रमाणे ठेवली. प्रारब्ध ही अशी वस्तु आहे की जी टाळणे मर्यादापुरुषोत्तम प्रभुरामचंद्र किंवा नृपश्रेष्ठ नलराजा किंवा युधिष्ठीर धर्मराज यांनाही शक्य झाले नाही तेथे अन्य कोण त्याविरुद्ध दंड थोपटण्याचे धाडस करणार ? 'होणारे न चुके जरी ब्रह्मा तया आडवा' या सूत्रातून विश्वसूत्र-धाराचा न्याय स्पष्ट होत आहे. मानवी कर्तृत्वाचा हा मुद्दा नव्हे.

या काळात स्वामींचे दात दुखू लागले. स्वामींचे सर्व जीवन पहात पहात या ठिकाणी येऊन पोहचल्यावर दात दुखण्याला खरे कारण कोणते संभवते म्हणून विचारी मनाला प्रश्न केला तर उत्तर हेच की प्रारब्ध! वयाचे पंचावन्नावे वय चालू होते. दातांच्या व्याधीमुळे खाण्यावर मर्यादा पडत. पचनावर मर्यादा पडत. म्हणून रविवार पेठेतील, मोती चौकातील, सुप्रसिद्ध दंतवैद्य किनरे यांचेकडे स्वामींना नेले. कोणापुढेही दात न दाखविणाऱ्या स्वामींनी किनरे दंतवैद्यांना आपले दात दाखविले.

त्यांच्या शास्त्राप्रमाणे स्वामींनी सर्व दात काढून टाकावेत असा सल्ला दिला. सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडितः या न्यायाने स्वामींनी तूर्त दोनच दात काढून टाकले. त्यावरही औषधोपचार सुरू होते.

सत्तेचाळीसचा मार्च महिना चालू होता. स्वामींची आणि महाराजांची माहिती जाणकारांच्या कानावर जात होती. त्यातून जाणीव होणारे इकडे येत होते, व कृतार्थ होत होते. अध्यात्म विषयाकडे वळणारे फार अल्प प्रमाणात असतात असे असून हे घडत होते. सुगंध आणि वायु एकमेकापासून अलग करणे मोठे दुरापास्त असते तसे स्वामी आणि महाराज यांचा कीर्ति सुगंध एकरूप होऊन गेला होता. नाशिकला एक कुलकर्णी वकील, साप धरणारे म्हणून प्रख्यात होते. त्यांना एक अपूर्व योग लाभला. ते काशीला गेले होते. धर्म, अध्यात्म, योगाची आवड म्हणून यासंबंधी चौकस होते. काशीला त्यांचा स्वामींचे गुरु प. प. श्रीशंकर पुरुषोत्तम-तीर्थ महाराजांचा दर्शन योग आला. छोटी गैबीत कुलकर्णी वकील गेले. गुरुदेव श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थांची भेट झाली. वकिलांनी कृपेची मागणी केली. दयार्द्र स्वामींनी अक्षरशः त्यांचेवर कृपा केली. कल्पना नसतांना गुरुदेवांचेकडून कुलकर्णी वकिलांना शक्तिपात दीक्षा झाली. " यह लेने देने की बात नहीं । होने पाने की बात है " या सूत्राची प्रचीती आली. शक्ति जागृतीची जाणीव झाली आणि काशी-यात्रेहून कुलकर्णी वकील परत नाशिकला आले.

नाशिकला आल्यापासून साधनेत कसलीच क्रिया वा अनुभव येईना. चौकशी करता करता पुण्यातील महाराजांचा व स्वामींचा पत्ता लागला. श्री. कुलकर्णी वकील पुण्यास २० नारायणमध्ये आले. कुलकर्णी वकील मोठे भाग्यवान दिसतात. कारण काशीला गेले तर अकल्पितपणे श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थ स्वामीमहाराजांची भेट होऊन दीक्षाही मिळाली. पुण्यास महाराजांना भेटण्यास आले तर प्रत्यक्ष स्वामीं-चीच भेट झाली. स्वामींनी सर्व चौकशी केली. आपल्या श्रीगुरुदेवांचे कुशल विचारून घेतले. स्वामींनी श्री. कुलकर्णी वकील यांना आपल्या समोर बसवून घेतले. स्वामींच्या समोर बसताच साधनेला जी तीव्र गती मिळाली ती अविस्मरणीय ठरली. आजपर्यंत एकदाही ज्या तीव्रतेची जाणीव झाली नव्हती ती तीव्रता आज जाणवली.

प्राणशक्ती वर ढकलण्याची ताकद शिष्यात नसली तर गुरुत्वशक्ती त्या प्राण-

शक्तीला आपल्या स्पर्श, सान्निध्य वा संकल्पाने वर खेचित असते. प्राण सुषुम्नेतून वर ढकलण्यासाठी शिष्याचा आचार, आहार, विहार, पथ्य, संयम जितका उत्तम तेवढा आवश्यक आहे. या गोष्टी श्रद्धाभक्तीच्या तीव्रतम उत्कटतेने घडून येतात. असे संयमी जीवन जगणे जमले नाही म्हणजे साधनेला मंदपणा येतो. रस्ता मोकळा आहे, मार्ग खुला आहे पण त्या मार्गावरून स्वतःच्या श्रद्धाहीनत्वामुळे साधनेला गतीच येऊ शकत नाही

या साधनेचा अनुभव व आनंद अनुभवलेल्या साधकाचे साधन मंदावले की त्याला आतून टोचणी, रुखरुख सुरू होते. या टोचणीची पुनः पुनः प्रखरता वाढत जाऊन तो साधक शरणागतीचे टोक धरून परत सद्गुरूच्या चरणापाशी जातो. ती गुरुत्वशक्ती शरण आलेल्या लघुशक्तीला वर खेचून घेण्यास सुरुवात करते. चित्‌शक्तीचे हे चलनवलन सद्भावांच्या माध्यमाने सुरू होते.

श्री. कुलकर्णी यांची साधना अत्यंत जोरात झाली. सारे शरीर उसळून घुसळून निघाले. त्यांना फार मोकळे व हलके वाटले. स्वामींची यथाशक्ती पूजा करून, दक्षिणा, श्रीफल ठेवून, साष्टांग नमस्कार करून श्री. कुलकर्णी नाशिकला निघून गेले. या खेपेस पुण्यात नानांच्याकडून स्वामींनी श्रीगुरुचरित्राचा सप्ताह ऐकला. कसबापेठेत गोरेभटजींच्याकडे भोजन प्रसाद केला. ३५ जण त्यावेळी उपस्थित होते.

श्री. शंकरराव मार्कंडांनी फेब्रुवारीत एका उत्तम बांधकाम असलेल्या इमारतीचे साठेखत केले होते.

कोणताही व्यवहार करताना शंकररावांनी स्वामींना विचारले म्हणजे स्वामींना संतोष होत असे. हे शंकररावांनी हेरून ठेवले होते. म्हणून प्रत्येक व्यवहारात शक्य असेल तेव्हा शंकरराव स्वामींना विचारीत असत. तसेच आपल्या कार्याला स्वामींचा आशीर्वाद मिळाला म्हणजे शंकररावांना आनंद होत असे. त्याप्रमाणे हा साठे खताचा व्यवहार स्वामींच्या समोर झाला.

डेक्कन जिमखान्यावर, लकी जवळच्या कोपऱ्यावर ९॥ हजार स्के. फुटाची जागा, त्यात उत्तम बांधकाम केलेली तीन मजली इमारत, तळ मजला पूर्ण रिकामा, आणि वरच्या मजल्याचे दोनशे रुपये द. म. उत्पन्न अशा वर्णनाची जागा ऐंशी हजारात घेण्याचे ठरले. फेब्रुवारीत साठे खत झाले तर खरेदीखत होऊन चैत्र शु. १ स,

प्रतिपदच्या शुभ मुहूर्तावर मार्चच्या अखेरीस शंकरराव स्वामींना घेऊन नव्या बंगल्यात राहण्यासही गेले. त्याच दिवशी त्या बंगल्याचे नाव शंकररावांनी "गुरुकृपा" ठेवले. त्या नावात त्यांनी आपल्या सर्व भावना व्यक्त केल्या. आता मात्र त्यांच्या मनाने केदार नारायण यात्रेचे पक्के केले.

चैत्र व॥ १२, शुक्रवारी, दिनांक १८ एप्रिल १९४७ च्या दिवशी श्री. शंकरराव, त्यांच्या वृद्ध मातोश्री व पत्नी असा परिवार स्वामींच्यासह श्रीकेदारनारायणाच्या यात्रेस निघाला. १ ल्या वर्गाची तिकिटे रिझर्व्ह केली होती. यावेळी महाराज आजेगाव, हिंगोलीमध्ये श्री. शंकरकाका आजेगावकर, देशमुख यांचेकडे होते.

हृषिकेशहून खरी तीर्थयात्रा सुरू झाली. शंकररावांनी आपल्या वृद्धा मातोश्रीसाठी आणि स्वामींच्यासाठी अशा स्वतंत्र दोन दंड्या केल्या. दंडी म्हणजे मेणा पालखी. उत्तम सोय असलेल्या, गाद्यागिरद्या असलेल्या, उन्हात पावसात संरक्षण देऊ शकणाऱ्या पुष्पमालांनी सुशोभित अशा त्या दंड्या होत्या. मातेसाठी आणि सद्गुरूंसाठी पैसा खर्च करतांना शंकररावांचे हृदय उचंबळून येत असे. प्रवासात उत्तमातील उत्तम सोय करणे हा त्यांचा दंडक असे. ज्या हिमप्रदेशातून स्वामी पायी, अनवाणी, उपवास करीत, थंडीपावसाची उपेक्षा करीत, रानमोळ हिंडले, त्याच हिमालयाच्या राजमार्गावरून राजैश्वर्याने मिरवीत, स्वामी श्रीबद्रीनारायणाचे दर्शनास निघाले होते.

तापत्रयातीत विरक्ताला हृदयसिंहासनावर बसविले जात असते. महेशसुद्धा चिताभस्माला माथी लावून त्या दग्ध मातीला वंदन करीत असतो. ही स्थिती जाणते जाणतात. स्वामी मेण्यातून निघाले. सभोवतालच्या वृक्षलतांनी या स्वानंद सम्राटाल लवून नमस्कार केले. नारायणाची यात्रा फार रमणीय असते. देवप्रयाग, रुद्रप्रयाग, पीप्पलकोटी या ठिकाणी मुक्काम करून, तीर्थविधी करून ज्योतिर्मठाचे दर्शन घेऊन स्वामी सर्वांच्यासह श्रीबद्रीनारायणास आले. तेथेही शंकररावांनी उत्तम व्यवस्था केली. तीन रात्र मुक्काम केला. श्राद्धविधी, महापूजा, नैवेद्य केला. आणि तेथून सर्वजण केदारला जाण्यासाठी परत फिरले.

आता शंकररावांच्या वृद्ध मातोश्रींच्या पुण्याईने परमोच्च बिंदु गाठला. त्यांनी नारायणाचे दर्शन घेतले होते. आता केदारच्या दर्शनाची ओढ लागलेली होती.

मातोश्रींच्या चित्तात अन्य विषय नव्हता. केदारेश्वराचे दर्शन झाले म्हणजे झाले! रस्त्याने जाणारे येणारे यात्रेकरू 'जय केदारनाथजी की जय हो' ही ललकारी देत होते. त्यांना याच ललकारीने साथ ही माताही देत होती. पण एकाएकी रुद्रप्रयाग-जवळ मातोश्रींची प्रकृती बिघडली. सर्वजण जवळ गोळा झाले आणि शंकररावांच्या मातोश्रींनी पुण्यपावन हिमालयाच्या परिसरात गंगामातेच्या सान्निध्यात केदारस्वरुप स्वामींच्या समोर आपली जीवनज्योत विलीन केली. खऱ्या अर्थाने त्या कैलासवासी झाल्या. शंकररावांना खूप दुःख झाले. पण मातेची परमपुण्याई आठवून चित्त शांत केले. स्वामींची पुढे जाण्याची व्यवस्था केली. पण स्वामीसुद्धा केदारकडे न जाता लगेच काशीस निघून आले. मध्यंतरी टिमरनीला काही काळ त्यांनी काढला.

नवीन आश्रमात स्वामी आले. गौरीनाथ पाठक याची भेट घेतली. त्याचेकडून सामानही आणविले. आश्रमामध्ये एक वृद्ध सज्जन राहात होता. तो येथून निघून गेला. स्वामींनी त्याला ५ रु. दिले. काशी नगरपालिकेने सप्टेंबर ते जानेवारीच्या पाणीपट्टीच्या तीन नोटिसा पाठविल्या होत्या. ती रक्कम स्वामी स्वतः भरून आले. स्वामी पुण्यास असतांना बारामतीच्या जोशी नावाच्या साधकाला त्यांनी "गुरुतंत्र" नावाचा ग्रंथ दिला होता. तो पाठविण्याचे कळविल्यावर तो ग्रंथ स्वामींना पोष्टाने मिळाला.

आश्रमाची जागा बंगाली वस्तीत होती. त्या विभागाला हरिश्चंद्रघाट नाव होते. आश्रमाभोवतालचे लोक कुत्सित भावनेने आश्रमाची मत्सराने निंदा नालस्ती करू लागले. क्षेत्रातील लोकांच्या प्रवृत्ती अत्यंतिक स्वार्थी असल्याचा जो सर्वत्र अनुभव तो काशी क्षेत्रात अधिकच प्रखरपणे जाणवत होता. दुसऱ्याचे चांगले पाहण्याची क्षेत्रस्थांच्या डोळ्यांना सवय नसते. याची पावलोपावली स्वामींना जाणीव होत असल्याने आश्रमामध्ये काशीतील कोणी नोकर ठेवण्यास ते तयार नसत. नोकरांना पगार भरपूर तर द्यावाच लागे पण त्याव्यतिरिक्त सर्व प्रकारची बक्षिसी वारंवार त्यांना द्यावी लागे. इतके करूनही या नोकराकडून केव्हा धोका ओढवेल हे सांगता येत नसे.

आश्रमाची किरकोळ बारीक सारीक कामे अपुरी राहिली होती. ही कामे पूर्ण झाल्याखेरीज येथे राहणे गैरसोयीचे होत होते. बांधलेली इमारत ही तुटु फुटू लागली होती. स्वामी पुण्यास निघून आले.

## समाधी म्हणजे पोरखेळ आहे काय ?

स्वामींचा मुक्काम पुण्यात २० नारायण पेठेत होता. नेहमीप्रमाणे दुपार नंतर स्वामींच्याकडे जिज्ञासू येऊ लागले. येणाऱ्यांचे प्रमाण पूर्वीपेक्षा वाढले असले तरी त्याला गर्दीचे स्वरूप नसे. एकदा दुपारी एक जिज्ञासू आले. त्यांचा आणि श्रीगुरुमहाराजांचा आणि स्वामींचा पूर्व परिचय होता. त्या सज्जन जिज्ञासूने स्वामींना सरळ प्रश्न केला की " स्वामीजी, आम्ही असे ऐकतो की आपण कुंडलिनी जागृत करून देता. यामुळे समाधी लागते. आपण आपली समाधी लागते ते आम्हाला दाखवू शकाल का ? आमची लागेल का ? ........"

" बस्स ! बस्स ! समजलो मी तुमचे प्रश्न. सगळे प्रश्न एकदम विचारू नका. " असे म्हणून स्वामींनी त्यांना तेथेच थांबविले. स्वामींना असले प्रश्न आवडत नसत. या विषयाचा धड अभ्यास नसतो, माहिती नसते. कुठे काही अर्धवट ऐकले वाचले असते, तेवढ्या भांडवलावर असले अगडबंब प्रश्न विचारतात ही मंडळी. तरी सुद्धा आज मात्र स्वामींनी मौन मोडले. म्हणाले. " आम्ही कुंडलिनीशक्ति जागृत करतो. त्यानंतर तिचे कार्य सुरू होते. शक्ति जागृत होऊन तिचे कार्य सुरू झाले की ती प्रथम त्या साधकाचे अनंत जन्मींचे पाप जाळून टाकण्याच्या उद्योगाला लागते. ही शक्ति म्हणजे अग्नीचा स्फुलिंग आहे. तो सर्व पापराशी भस्मसात करीत जातो. हे कार्य अनेक दिवस, प्रसंगी काही जन्म, चालू असते. साधक निर्दोष होऊन साधनसंपन्न होता होता त्याच्या चित्तामध्ये स्थिरता येऊ लागते. चित्ताची स्थिरता याच साधनेने वाढत जाते आणि चित्ताला एकाग्रता येऊ लागते. यापुढे मग तो समाधीचा अनुभव घेऊ शकतो. समाधी हा शब्द जितका सोपा आहे तितकी समाधीची स्थिती सोपी नाही. या साधनमार्गातही अनेक अडथळे येतात. विक्षेप येतात. पण नियमीत केल्या जाणाऱ्या साधनेतूनच हे अडथळे व विक्षेप नाहिसे होत जातात.

हे पहा मी तुम्हाला काही काम सांगितले तर करू शकाल का ? उद्यापर्यंत केले तरी चालेल. सोपे काम आहे. आज सकाळी उठल्यापासून दोन तासपर्यंत जी जी कर्मे केली असतील ती सर्व लिहून उद्या मला दाखवायची. आता कर्मांचे वर्णन ऐका. कर्म तीन प्रकारची असतात. कायिक, वाचिक आणि मानसिक. तेव्हा या तीनही प्रकारच्या सर्व कर्मांची नोंद पूर्णपणे झालेली पाहिजे. एकही कर्म सोडायचे

नाही आणि एकाही सेकंदाचा वेळ सोडायचा नाही. याप्रमाणे फक्त दोन तासातील सर्व कर्मांची नोंद करावयाची आहे. आहे की नाही छोटे आणि सोपे काम."

स्वामींनी या कूट प्रश्नाने आपले बोलणे थांबविले पण त्या प्रश्नाने तो सज्जन जिज्ञासू निरुत्तर झाला होता. हा प्रश्न सोपा दिसतो पण याच्या उत्तराची कृती फार कठीण आहे या जाणीवेने जिज्ञासू निरुत्तर झाला होता. एकूण त्याची असहाय स्थिती पाहून स्वामी म्हणाले. "साध्या दोन तासातील त्रिविध कर्मांची आठवण आपल्याला राहू शकत नाही. तर अनंत जन्मांच्या कर्मांची काय आठवण आपणास असणार? जशी कर्मे तशी त्यांची फळे! कर्मांची गती मोठी गहन असते. तरी-सुद्धा या दिव्य साधनेने कर्मफळांचा नाश झपाट्याने होतो. या साधनेशिवाय अन्य कोणत्याही साधन मार्गाने इतक्या प्रचंड वेगाने कर्मफळांचे क्षालन होत नाही. कर्मफळांची स्थिती मोठी कठीण असते. शक्ति जागृतीने पूर्व कर्मांचे क्षालन प्रचंड वेगाने सुरू होते.

आपल्याला वामनरावजी माहीत आहेत. त्यांचा शुद्ध आचार तुम्ही पहात आहात. त्यांच्यासारखा कर्मनिष्ठ पुरुष माझ्या पहाण्यात आलेला नाही. तरी, ते सुद्धा या मार्गाचे पथिक आहेत. ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे की "जिये मार्गींचा कापडी। श्रीमहेश अजूनी" मग इतरांची काय कथा? आपण असे काय करीत आलेले आहात म्हणून हा प्रश्न आपणास अडला आहे? आपण या मार्गाचे काही करायला लागा म्हणजे कळेल. समाधीच्या आधी शेंकडो ठिकाणी निरुत्तर व्हाल. समाधी म्हणजे काय पोरखेळ वाटतो काय? आपला प्रश्न मात्र पोरकट आहे. साधे यम नियम जमतात का ते पहा."

स्वामींनी दिलेल्या स्पष्ट जाणीवेने त्या व्यक्तीचा खूप लाभ झाला. त्या व्यक्तीने स्वामींना विनम्रपणे नमस्कार केला व त्यांची क्षमा मागून निघून गेला.

## दामले यांच्या मृत्यूची जाणीव दिली

इ. स. १९४७ च्या आश्विन महिन्यातील ही घटना आहे. स्वामी पुण्यात होते. त्यावेळी सराफ दामले यांचे वडील काका दामले हे आजारी पडले. स्वामी आल्याचे समजल्यावर सराफ दामले यांच्या पत्नी स्वामींच्याकडे गेल्या. स्वामींना नमस्कार करून त्या उभ्या राहिल्या. स्वामींनी नेमकी काकांची चौकशी केली. ते

आजारी असल्याचे समजले, स्वामी काही बोलले नाहीत. दामले यांच्या पत्नी घरी पोहचल्या तोच त्यांच्या पाठोपाठ स्वामी आलेले त्यांनी पाहिले. स्वामी घरी आलेले पाहताच गडबडीने पाट मांडला. काकांना स्वामी आल्याचे सांगितले. स्वामी पाठोपाठ घरी येतील ही कल्पनाच नव्हती.

स्वामी आपल्या घरी आल्याचे समजताच काका अंथरुणातून ताडकन उठून अंथरुणाच्या खाली येऊन बसले. स्वामींना नमस्कार केला व म्हणाले " स्वामी इकडे येण्याची केवढी तसदी घेतली. आपल्याला फार त्रास पडला. " यावेळी काकांच्या अंगात ताप होता. खूप अशक्तपणा होता. पण स्वामींना पहाताच त्यांना खूप हुषारी आली होती. स्वामींना मांडलेल्या पाटावर बसविले. त्यांना 'तूपसाखर' दिली. पाणी दिले. थोडा वेळ बसून चौकशी करून स्वामी काकांना भेटून गेले. सर्वांना आश्चर्य वाटले.

त्यानंतर आठ दहा दिवसांनी स्वतः दिगंबरपंत स्वामींच्या दर्शनास गेले. स्वामींना नमस्कार केला. काकांची प्रकृती कशी आहे ते सांगितले. त्यावेळी सुद्धा स्वामींनी आपली छाटी आवरली व म्हणाले "चलो-हम जाएँगे" स्वामींनी घरी यावे अशी कल्पना सुद्धा दिगंबरपंतांच्या मनात नव्हती पण काकांच्या बद्दलचे स्वामींना प्रेमच असे होते की त्यामुळे ते पुन्हा त्यांना भेटण्यासाठी निघाले. या वेळेस काका अंथरुणावरून उठू शकले नाहीत. स्वामींचा पाट काकांच्या अंथरुणाजवळ मांडला. स्वामी पाटावर बसले. काका दुखण्याच्या वेदना असह्य झाल्या म्हणजे "आई! आई!!" म्हणून कण्हत होते. ते ऐकून स्वामी म्हणाले "काका, अबसे आई, आई नहीं कहना। दत्त, दत्त कहते जाना।" काकांना खूण पटली. तत्काळ ते दत्त, दत्त म्हणू लागले. पुढे शेवटपर्यंत "दत्त, दत्त" म्हणत होते.

स्वामींनी प्रकृतीची इतर चौकशी केली. घरातील इतर मंडळींनी त्याची उत्तरे दिली. काकांनी स्वामींना अंथरुणातूनच अश्रुपूर्ण डोळ्यांनी वंदन केले. स्वामींना या वेळेस मोरआवळा वाटीत दिला. तो खाऊन स्वामी निघाले. दिगंबरपंत स्वामींना पोहचते करण्यास निघाले. चालतांना स्वामींनीच विषय काढला. "दिगंबर! काका बस आठ दिनके साथी है।" स्वामींचे ते शब्द ऐकताच दिगंबरपंतांचे डोळे पाण्याने भरून आले. मनाला फार फार वाईट वाटले. त्यांच्या तोंडून शब्दही बाहेर येईना. ते पाहून स्वामी म्हणाले — "दिगंबर, बूरा लगता है क्या?" त्यावर

दिगंबरपंत 'होय' म्हणाले. मग स्वामींनी त्याना थोडक्यात सांगितले "वाईट वाटून घेऊ नये हेच तर शिकावयाचे आहे. आता होईल तेवढी त्यांची सेवा करा. वडिलांची सेवा म्हणजे परमेश्वराची सेवा असते." पुढे स्वामींच्या शब्दाप्रमाणे आठ दिवस झाले. आणि नवव्या दिवशी काकांची जीवनज्योत विझली.

स्वामींना असे अतींद्रिय ज्ञान होते याचे आणखी काही आधार आहेत. श्री. गोरेशास्त्रींच्या पत्नींचा मृत्यू स्वामींनी एक महिना आधी स्पष्टपणे सांगितला होता. श्री. किर्लोस्कर यांच्या पत्नीच्या मृत्यूची वार्ता अशी बरीच आधी सांगितली होती.

## रात्रभर समाधी !!

श्रीस्वामींचा मुक्काम पुण्यास असतांना यावेळी महाराज पुण्याबाहेर गेले होते. दत्तजयंती व श्रीटेंबे स्वामीमहाराजांचे पुण्यतिथीस त्यावेळी महाराज सोलापुरी किंवा हैद्राबादेस जात असत. असा हा दत्तजयंतीच्या सुमाराचा काळ होता. स्वामी पुण्यात आले होते आणि त्यांचा मुक्काम शंकरराव मार्कंडांचेकडे होता. साधक मंडळी स्वामींच्या दर्शनाला शंकररावांच्या 'गुरुकृपा' बंगल्यावर जात. त्यावेळची ही घटना आहे.

स्वामींच्या नित्य दैनंदिन कार्यक्रमात सायंकाळचे फिरणे हा कार्यक्रम अटळ असे. त्यांच्याबरोबर कोणी ना कोणी साधक बरोबर जात असत. नाना भालेराव, किर्लोस्कर, नारायणराव देशपांडे ही मंडळी बहुतेक बरोबर असत पण याहीपेक्षा कधी कमी जास्त मंडळी असत. त्यांना स्वामींचा मनमुराद सहवास मिळे. विविध विषयांवरील स्वामींचे विचार ऐकावयास मिळत. आपलीही शंका सहज निरसन करून घेता येत असे. शंकरराव मार्कंड स्वामींच्या बरोबर फिरावयास सवडीप्रमाणे मधून अधून जात असत. व्यवसायामुळे त्यांना कधी कधी उशीर होत असे. तरी, घरी आल्याबरोबर प्रथम स्वामींची चौकशी करतील. त्यांची सायंसंध्येची तयारी करून ठेवतील. फराळासाठी थांबून राहतील, कारण त्यांना स्वामींची आंतरिक ओढ फार असे. साधारणपणे स्वामींचे फिरून येणे म्हणजे सायंकाळी ५-५॥ ते ७-७॥ या ठराविक वेळात होत असे.

परंतु एके दिवशी सायंकाळी ४-४॥ लाच स्वामी एकटे बाहेर फिरावयास निघाले. पुण्याची माहिती थोडी फार झाली होती पण कितीही म्हटले तरी स्वामी

ठराविकच रस्ते ओळखणार! बाहेर जातांना शंकररावांच्या पत्नींना सांगून बाहेर पडले. शंकरराव दुपारी जेवण झाल्यावर काही कामासाठी बाहेर गेले. ते आज स्वामींच्या बरोबर फिरावयास जाण्यासाठी सायंकाळी ५ ला घरी परत आले. पण नेमके आज स्वामी तत्पूर्वी एकटे बाहेर फिरावयास निघून गेले होते. त्यांनी घरी आल्यावर घरात चौकशी केली. तेव्हा स्वामी एकटे ४–४॥ वाजता "फिरावयास जातो" सांगून गेल्याचे घरातून समजले.

शंकररावांनी विचार केला की एकटे जाण्याची लहर स्वामींना आली असेल म्हणून गेले असतील. स्वामींची अशी लहर असते याची कल्पना त्यांना होती. इतक्यात नाना भालेराव इ. मंडळी आली व स्वामींची चौकशी करू लागली. स्वामी कोणत्या बाजूने गेले असतील याचा अंदाज करणे कठीण होते. स्वामींना बाहेर जाऊनही बराच वेळ झाला होता. म्हणून सर्वजण तेथेच शंकररावांचे घरी थांबले. जरा गप्पागोष्टी केल्या. स्वामींची ७–७॥ पर्यंत वाट पाहिली स्वामी आज लवकर येत नाहीत असे समजून आलेले लोक आपापल्या घरी निघून गेले.

शंकररावांच्या मनात मात्र सारखी रुखरुख लागून राहिली होती. स्वामींच्या बरोबर फिरावयास जाण्यासाठी आज ते लवकर घरी आले तर त्याआधीच स्वामी गेले हे ऐकून ते जरा नाराज झाले होते. त्यांना वाटले आपल्या हातून काही तरी अपराध घडला असला पाहिजे. त्यांनी घरात परत नीट चौकशी केली. काही कमीजास्त बोलणे, वागणे तर झाले नाही ना याची खात्री करून घेतली. अगदी काहीच कारण नसता स्वामींनी असे का केले? एकटे गेले कुठे? परतण्याची वेळ उलटून गेली तरी आले नाहीत. सायंसंध्या नाही. फराळ नाही. सारे कसे विपरीत झाले? रस्ता चुकले म्हणावे तर हिंदुस्थानभर हिंडलेले स्वामी एवढासा पत्ता आसपास विचारून काढणार नाहीत हे कसे शक्य आहे? शंकर-रावांच्या चित्ताची चुटपुट वाढत चालली तशी वेळही वाढत चालली. ८ झाले ८॥ झाले ९ वाजले तरी स्वामींचा पत्ता नाही असे पाहून शंकररावांनी शर्ट टोपी घातली. पायात चपला अडकविल्या आणि बाहेर पडले. आसपासच्या साऱ्या रस्त्याने हिंडून आले. अशा निरर्थक हिंडण्याने शंकरराव अगदी थकून गेले. निराशेने घरी परतले तर रात्रीचे अकरा वाजले होते. स्वामींचा पत्ता अद्यापही लागला नव्हता. स्वामींच्या शोधात शंकररावांना चहापाणी सुचले नाही की संध्या सुचली नाही. घरची मंडळी

स्वैंपाक करून वाट पाहून पाहून झोपेने मरगळून गेली. अन्न गार होऊन गेले. कोणाचेही जेवण नाही की फराळ नाही.

शंकररावांना अज्ञात अपराधाची टोचणी असह्य होऊ लागली. घरी आल्यावर रात्री अकरा वाजता पत्नीला विचारले " आज दुपारी मी बाहेर गेल्यानंतर काय काय झाले? कोण कोण येऊन गेले ? स्वामी काय काय बोलले ? त्यांनी काही मागितले का? काही सांगितले का? बाहेर पडताना त्यांचा चेहरा कसा दिसत होता? स्वामींचे सामान कुठे आहे? त्यांचा दंड कमण्डलू कुठे आहे?" असे शेंकडो प्रश्न विचारले. सर्व प्रश्नांची उत्तरे पत्नीने दिली त्यावरून सारे काही ठीक होते. नेहमीसारखे होते. कुठेही काहीही बिघडले नव्हते. मग स्वामी कुठे गेले? हा प्रश्न शंकररावांना अधिकच जाणवला. अशा स्थितीत तर्क करण्यालाही मार्गच मिळेनासा झाला. पुन्हा अस्वस्थ चित्त शंकरराव घरातून बाहेर पडले.

ते २० नारायण पेठेत आले. महाराजांच्या घरापाशी येऊन नाना भालेरावांना हाक मारली. महाराज हैद्राबादला गेले होते म्हणून ही घटना नानांच्या कानावर घालण्यासाठी ते आले.

नाना नेहमीप्रमाणे दहा वाजता झोपी गेले होते. अचानक दरवाजावर थाप नि हाक ऐकू आली. "नाना! दार उघडा" एवढ्या आवाजावरून त्यांनी आवाज ओळखला. दार उघडले. शंकरराव तेथेच उभे राहून बोलू लागले पण नानांनी त्यांना घरात घेतले. शांतपणे बसविले आणि विचारले काय गडबड झाली? इतक्या रात्री का आला? स्वामींची प्रकृती बिघडली की काय? नानांच्या या प्रश्नापूर्वीच शंकरराव म्हणाले " नाना! स्वामीजी संध्याकाळी ४–४।। ला फिरण्यासाठी म्हणून जे गेले आहेत ते अद्याप घरी परत आले नाहीत. स्वामी इकडे तर आले नाहीत या शंकेने इकडे आलो." "स्वामी इकडे आले नाहीत." हे नानांचे उत्तर ऐकून शंकररावांनी एकूण सर्व वृत्तांत नानांना ऐकविला. नानांना ज्योतिष विषयाचे ज्ञान असल्याने त्यांनी हातात पंचांग घेतले. एकूण वेळ पाहून प्रश्नकुंडली तयार केली. नक्षत्राचा विचार केला. त्यांनाही सर्व काही ठीक असल्याचे आढळून आले. कोणताच अशुभ योग दिसत नव्हता. सर्व शुभ योग होते. प्रश्नकुंडलीवरून नानांनी एवढेही सांगितले की स्वामी सकाळी स्वतःहून घरी येतील. तुम्ही काळजी करू

नका. स्वामी परत आल्यानंतरच याचा खुलासा होईल. ते कुठे असतील हे सांगता येत नाही. पश्चिमेकडे आहेत. अत्यंत सुरक्षित व आनंदात आहेत. तुम्ही शांतपणे झोप घ्या."

नानांच्याकडून मनाला दिलासा घेऊन शंकरराव घरी आले. चटपट राहिलेले कार्यक्रम उरकले आणि रात्री १२॥–१ ला अंथरुणावर पडले. थकलेले शरीर आणि मन क्षणार्धात् विश्रांतीच्या आहारी गेले. शंकररावांना गाढ झोप लागली. इकडे शंकरराव गेल्यानंतर नानांना चुटपुट लागली की स्वामी कुठे गेले असावेत? या विचारतंद्रीत त्यांनाही बऱ्याच वेळाने झोप लागली.

पहाट झाली. नाना उठले. आपल्या नित्याच्या उद्योगाला लागले. इकडे शंकरराव चांगलेच थकले होते म्हणून त्यांना पहाटेची साखरझोप लागली होती. सूर्योदय झाला. शंकररावांचीही झोप झाली. ते प्रथम बाहेर आले. स्वामी आले का पहाण्यासाठी दरवाजा उघडला. स्वामी इकडेच येत असलेले त्यांना दिसले. शंकररावांना हायसे वाटले. पण स्वामी काय सांगतात हे ऐकण्यासाठी मुद्दाम शांत मुद्रेने तेथे उभे राहिले.

स्वामी मोठ्या प्रसन्न मुद्रेने येत होते. दरवाजात येतात त्यांनी शंकररावांचा हात धरला आणि म्हणाले "अरे शंकरराव बडा मजा आया, बडा मजा आया। अंदर चलो, सब बताता हूँ।" असे म्हणून मोठमोठ्यांदा हसत शंकररावांचा हात धरून ते घरात आले. स्वामी आता काय सांगतात हे ऐकण्याची आतुरता वाढली. स्वामी आल्याचे कळताच लगबगीने त्यांचे आसन टाकले. स्वामी त्या आसनापर्यंत शंकररावांचा हात धरून आले. स्वतः आसनावर बसले आणि शंकररावांनाही आपल्या समोर बसविले. शंकररावांनी स्वामींच्या हातातून हात सुटल्यावर त्यांना साष्टांग नमस्कार केला व आतुरतेने सारे प्राण कानात आणून ऐकू लागले.

"शंकरराव! अशी मजा नेहमी नाही बरं! मधूनच येते. काल मीं एकटा बाहेर फिरायला कसा गेलो कुणास ठाऊक, पण गेलो खरा. मनाला वाटले जावे तेव्हा लगेच निघालो. कसला विचारच केला नाही. नेहमीपेक्षा आधी निघालो. कुणी तरी आतून सांगत होते आणि मी करीत होतो. चालता चालता फर्ग्यूसनच्या मागच्या टेकडीवर न जाता कॉमर्स कॉलेजच्या बाजूला गेलो. दाट झाडी होती.

निर्मनुष्य वस्तीमुळे शांतता होती. त्या वृक्षराजीतून अवखळ झरा खळखळ वहात होता. झरा छोटाच होता पण असा सुंदर होता की रस्ता सोडून मी त्याच्या काठाकाठाने जाऊ लागलो.

संध्याकाळची वेळ होती. मावळत्या सूर्याची लाल किरणे झऱ्याच्या पाण्यावर पडल्यामुळे ते पाणी फारच मोहक दिसत होते. त्या झऱ्याचा झुळझुळ आवाज, त्याच्या छोट्या-छोट्या उड्या, बारीक गिरक्या पाहून मला काही सुचेनासे झाले. त्या अल्लड झऱ्याच्या आनंदात मी सामील झालो. मोठ्या उत्साहाने मी पुढे पुढे चालत राहिलो. सुंदर वृक्ष, वेली पाहून मला माझे विस्मरण झाले. लाल सूर्याच्या लालीमेने सारा प्रदेश गुलाल उधळल्याप्रमाणे लालीलाल करून टाकला होता. मी त्या वनप्रदेशाच्या जसजसा अंतरंगात शिरलो तसतसा अंतर्मुख होऊन मी माझ्यात शिरलो. माझे पाय चालत होते पण मला कळत नव्हते. त्या सुंदर वन प्रदेशात, त्या लाडक्या झऱ्याच्या काठी एका डेरेदार वृक्षाखाली मी बसलो. समोर पश्चिम क्षितिजावरील लाल वातावरणात लाल सूर्य दिसत होता. त्या लालीमध्ये तो सूर्य कधी लुप्त झाला हे मला कळलेच नाही. कारण त्याच वेळी मीही माझ्यात लुप्त झालो होतो.

मी थोड्या वेळाने डोळे उघडले तेव्हा—

तोच सूर्य त्या लाल सोनेरी वातावरणातून क्षितिजावर झळकू लागला होता. पण त्याचे स्थान बदलले होते. तो पश्चिम क्षितिजावर नसून पूर्व क्षितिजावरून येत होता. त्या उगवत्या सूर्यामधून तेजाचे किरण आसमंतात फेकले जात होते. मला आश्चर्य वाटले. झाला प्रकार लक्षात आला. सारी रात्र मी येथे बसून होतो हे मला सकाळी समजले. शंकरराव झोपलो नव्हतो बरका! चांगला जागा होतो पण आतल्या आत! तुम्हांला हा आनंद कळायला अवकाश आहे. फार मजा आली— शंकरराव फार मजा आली. मला हिमालयातील टिहरीची आज आठवण झाली. व्यवहारी जगात असे प्रसंग आणावे लागतात तर निसर्गाच्या सहवासात अशा आनंदाचे प्रसंग केवळ वातावरणाने वारंवार येत असतात. अहाहा ! फार आनंद होता."

शंकररावांची ऐकतांना अशी काही तंद्री लागली होती की बस्स! स्वामींची अध्यात्मातील एक उच्चतम स्थिती त्यांच्याच तोंडून ऐकण्याचे परमभाग्य शंकररावांना लाभले. स्वामींचे बोलणे संपले तरी शंकरराव ऐकतच राहिले होते. त्यांच्या कानावर

स्वामींचे ते शब्द पुन्हा पुन्हा पडताहेत असा त्यांना भास होत होता इतके ते तल्लीन झाले होते. थोडा वेळ स्तब्ध राहिल्यावर शंकररावांनी स्वामींना प्रश्न केला, "स्वामीजी रात्रभर थंडी वगैरे काही जाणवले नाही. एका छाटीवर सगळे भागले?"

स्वामी हसले. म्हणाले, "शरीराला थंडी वाजली असेल पण मला समजली नाही." या उत्तराने शंकररावांचे डोके थोडे गरगरले पण सध्या आपला हा विषय नसल्याने ते तेथेच थांबले.

स्वामींची सर्व व्यवस्था केली आणि शंकररावांनी नानांच्याकडे निरोप पाठविला.

नाना देवपूजा करीत होते त्यावेळी त्यांना निरोप मिळाला. "स्वामीजी सकाळी स्वतःहून तुमच्या म्हणण्याप्रमाणे घरी आले. अत्यंत आनंदात होते. ऐकण्यासारखा प्रसंग आहे. दुपारी लवकर या म्हणजे सविस्तर सांगता येईल." नानांची आतुरता वाढली. दुपारी जरा लवकरच स्वामींच्या दर्शनास गेले. साष्टांग नमस्कार करून स्वामींच्या जवळ बसले. नानांना पहाताच स्वामींनी पुन्हा एकदा तो सारा प्रसंग सविस्तरपणे सांगितला. स्वामींच्या तोंडून स्वतःचे अनुभव ऐकावयास मिळणे हा दुर्लभ योग आज नानांनाही लाभला.

**लाली मेरे लाल की जित देखो तितलाल।**
**लाली देखन मैं गयीं मैं भी हो गयी लाल ॥**

" संत कबीर "

स्वामींचे असे होत असल्याचे आपणास माहीत असल्याचे महाराजांनी पण सांगितले.

## १९४८ मधील भ्रमण—स्वामी काठमांडूस जाऊन आले

अठ्ठेचाळीसच्या जानेवारीच्या अखेरीस स्वामी पुण्यातून काशीला गेले. शंकररावांनी ३०० रुपयांचे इन्शुअर केलेले पाकीट स्वामींना पाठविले. ते पैसे मिळताच स्वामी एकटेच नेपाळमध्ये गेले. प. प. श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थ स्वामीमहाराज आणि स्वामी श्रीलोकनाथतीर्थ महाराज रात्रीच्या गाडीने बरोबर होते. स्वामी पाटण्यास उतरले आणि श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थ स्वामी महाराज कलकत्त्यास गेले.

नेपाळमध्ये काठमांडूस स्वामींचा मुक्काम प्रोफेसर, बाबुक्षितीचंद्र, रानीपोकराजमल या ठिकाणी होता. स्वामींना ज्या अनेक विद्या अवगत होत्या त्यांचे गुरु नेपाळमध्ये आले होते. पूर्वी स्वामी भेरिया येथील उदासी मठात गेले होते तेथे हे गुरु होते. अलिकडे हे उदासी बाबा नेपाळात जाऊन राहिल्याचे समजल्यावरून त्यांना भेटण्यासाठी स्वामी नेपाळात गेले.

स्वामींनी काठमांडूहून काशीच्या आपल्या आश्रमातील गरजेच्या वस्तू तेथे पोष्टाने मागवून घेतल्या होत्या त्या जांबवंतसिंहाने पाठवून दिल्या. या वस्तूत स्वामींचा चष्मा, फाऊण्टनपेन व फुल् स्वेटर यांचा समावेश होता. या काळात चंद्रग्रहण व सूर्यग्रहण एकाच महिन्यात आले होते. त्यावेळी स्वामी तिकडे होते. स्वामींची काशीच्या आश्रमातील स्वैंपाकीण 'बुडोमा' हिला स्वामींनी नेपाळहून म. ऑ. पाठविली. ती गुरुवारी चैत्र शु॥ ७ स मरण पावली.

स्वामी जूनमध्ये बनारसहून पुण्यास आले. पुण्यास मुक्काम काही दिवस २० नारायण पेठ, काही दिवस 'गुरुकृपा' डे. जिमखाना, आणि काही दिवस २०९ कसबा, अंबालालशेटजी यांचेकडे होता. या काळातील पुण्यातील घटना पुढीलप्रमाणे घडल्या. शंकरराव मार्कंड यांच्या नारायणचे लग्न यावर्षी झाले. लग्न अत्यंत थाटात, पाण्यासारखा पैसा खर्च करून झाले. संस्थानिकांना लाजविण्यासारखे हे लग्न झाले. या लग्नाचे वेळी संस्काराच्या अन्नाचा दोष टाळण्यासाठी काही दिवस स्वामी अंबालालच्या घरी गेले होते.

## "इनको हकाल दो । उसने गौ काटा है"

दुपारची वेळ होती. स्वामींचा मुक्काम 'गुरुकृपेत' होता. ऊन असले तरी स्वामींच्या दर्शनास एक एक साधक, भक्त, श्रद्धाळू, जिज्ञासू येत होता. स्वामींच्याकडे येणाऱ्यांची संख्या वाढली असली तरी गर्दीचे स्वरूप कधीच नसे. प्रत्येकाने यावे. नमस्कार करावा. दहा पाच मिनिटे बसावे. जास्तीत जास्त अर्धा तास बसावे आणि पुनः नमस्कार करून चालू लागावे. तेथे चर्चा होत असली तरी वादविवाद होत नसत. स्वामी तसे होऊ देत नसत. दिवसभरातून प्रत्येकजण आपल्याला जमेल त्या ठराविक वेळी येत असे. सकाळचे लोक दुपारी नसत. दुपारचे सायंकाळी नसत तर सायंकाळचे रात्री नसत.

यामुळे ठराविक वेळेला ठराविक चेहरे दिसले नाहीत की स्वामी लगेच त्याची विचारपूस करीत असत. चार दोन साधकच असे असत की जे स्वामींच्या सेवेसाठी दिवसातून जमेल तितक्या वेळा येत असत. या पद्धतीमुळे स्वामींच्या समोर गर्दी नसे. किंवा कोणीच नाही असेही फारसे होत नसे. श्री. आदमणे हे स्वामींच्याकडे दुपारी येत असत. श्री. आदमणे हे देवीचे उपासक होते. त्यांना ज्योतिष विशेष प्रकारे अवगत होते. आदमणे यांच्या ज्योतिष शास्त्रातील प्रगतीला देवीच्या उपासनेचा मोठा आधार होता. स्वामींच्याकडे जाऊन आपल्या साधनेतील आणि उपासनेतील अडीअडचणी प्रामाणिकपणे व सरळपणे विचारणाऱ्यांपैकी ते होते. स्वामींची सुद्धा आदमणे यांच्यावर विशेष मर्जी असे. तेव्हा ते नेहमीप्रमाणे दुपारी ३॥/४ वाजता स्वामींच्याकडे आले. नमस्कार करून बाजूला बसले. आणखी २/४ भक्त मंडळी आली. त्यांनीही नमस्कार केला. जेथे जागा होती तेथे बसले. विशेष चर्चा वगैरे काहीच चालू नव्हती.

जमलेल्या मंडळीत बापुसाहेब वाकडे होते. त्यांना हस्तसामुद्रिकाचा नाद होता. आदमणे यांनाही हस्तसामुद्रिक येत होते. स्वामींना संन्यास योग कशामुळे संभवला हे हाताच्या रेघांवरून ठरविण्यासाठी बापुसाहेब वाकडे आणि आदमणे स्वामींचा हात पहात होते. त्यांना नेमके सांगता येईना तेव्हा स्वामी म्हणाले " मला ज्योतिष कळत नाही पण संन्यास योगाचे चिन्ह मात्र सांगता येते. त्यासाठी मी पुष्कळ संन्याशी लोकांचे हात पाहिले. मला त्यात असे आढळले की धन रेषेच्या वरच्या बाजूला किंवा मधल्या बोटाच्या खाली त्रिशूळ हे चिन्ह बहुतेक संन्याशांचे हातावर होते. मी माझ्याही हातावर ते त्रिशूळ चिन्ह पाहिल्यावर खात्री केली. ही गोष्ट मला इतर कोणीही सांगितली नाही. "

इतक्यात एक अनोळखी प्रौढ व्यक्ती तेथे आली. त्या व्यक्तीच्या डोळ्यावर जाड काचांचा चष्मा लटकविलेला होता. केस पिकले होते. अंगात मळकट शर्ट व कोट व तसेच मळकट धोतर नेसलेल्या त्या व्यक्तीचा चेहराही भोळसट होता. कुणी वृद्ध पेन्शनर असावी ती व्यक्ती, असे दिसत होते. हळूहळू ती व्यक्ती दारातून पुढे आली. लटपटणाऱ्या पायांनी आणखी चार पावले पुढे टाकली. थरथरत्या हातांनी वाकून नमस्कार केला. आणि खाली बसणार इतक्यात स्वामींनी तोंड फिरविले. ते आदमणे यांचेकडे वळले. डोळे मोठे केले. चेहरा उग्र केला. मोठ्या आवाजात म्हणाले "इनको हकाल दो। उसने गौ को काटा है"

क्षणार्धात् सारे वातावरण बदलले. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आश्चर्याचे भाव उमटले. स्वामींच्या उग्रतेमुळे सर्वजण भयभीतही झाले. त्या वृद्ध व्यक्तीकडून असे काही घडले असेल असे बिलकूल वाटत नव्हते. स्वामींच्या या शब्दांमुळे ती व्यक्ती तशीच उभी राहिली. स्वामी अदमणे यांना पुन्हा म्हणाले " तुम उठो, उसे हकाल दो, उसके साथ जाकर पूछो।" आदमणे उठले. त्या व्यक्तीच्या जवळ आले. " स्वामी तुम्हाला येथे थांबू नको म्हणतात. तेव्हा आणखी अनर्थ ओढवून घेऊ नका. आपण बाहेर चला." या शब्दांनी त्यांना समज दिली. त्यांच्या बरोबर आदमणेही बाहेर पडले.

ते दोघे लकडीपुलाच्या दिशेने निघाले. थोडे पुढे आल्यावर आदमणे यांनी त्या व्यक्तीला स्वामी असे का म्हणाले याचा खुलासा विचारला. ती व्यक्ती डोळ्यात पाणी आणून म्हणाली. " स्वामींनी सांगितले ते बरोबर आहे. इ. स. १९४२ मध्ये मला नोकरी नव्हती. मी नोकरी शोधीत बांद्राच्या खाटीकखान्यात गेलो. तेथे मला तात्पुरती नोकरी मिळाली. तेथे नोकरीस असताना पंख्याचे बटन बंद करण्याऐवजी त्याच्या शेजारचे बटन दाबले आणि कटींग मशीन सुरू झाले. मी ते बंद करणार तेवढ्यात एक गाय कापली गेली. माझ्या हातून हे घडले हे तेथील थोड्या लोकांच्या खेरीज कोणालाच माहीत नसतांना स्वामींना कळले याचे खरे आश्चर्य आहे. आज त्यांचे दर्शन झाले हेच खूप झाले. झाल्याकर्माचे फळ भोगल्या-शिवाय सुटका नाही." त्या गृहस्थाची ही हकीगत कानी पडताच आदमणे परत स्वामींच्याकडे आले. स्वामींना ही सर्व हकीगत सांगितली. स्वामी यावर काही एक न बोलता म्हणाले " चलो ! शाम हुयी ! घुमने जायेंगे।"

पुढे एकदा श्री. बापुसाहेब वाकडे यांनी स्वामींना विचारले. आपण महाराष्ट्रात इतके कसे रमला ? स्वामी म्हणाले मी पूर्वजन्मात महाराष्ट्रीयच होतो म्हणून मी येथे रमतो. माझा येथे फार मोठा ऋणानुबंध आहे.

## गोमाता भक्तीची प्रेमाची दुसरी घटना

हा पुण्यातील प्रसंग आहे. स्वामी डे. जि. वरील शंकरराव मार्कंडांच्या 'गुरु कृपे' मध्ये होते. तेथे असतांना एकदा सकाळी स्वामी शंकररावांचे बरोबर बाहेर पडले. फर्ग्यूसन रस्त्याला लागले आणि डाव्या बाजूला वळून लकडीपुलाकडे

निघाले. लकडीपुलाचे अलिकडे उजव्या बाजूला प्रभातरोडच्या कोपऱ्यावर, एक गाय पडलेली स्वामींना दिसली. तिला काही तरी झाले आणि वळणावरील रस्त्यामध्ये ती पडली होती. उठण्याची धडपड करून ती उठू शकत नव्हती. त्या गाईची ती धडपड पाहून स्वामींच्या अन्तःकरणात गलबलल्यासारखे झाले. ते घाईघाईने गायी-जवळ आले. स्वामींची घाई शंकररावांच्यामध्ये नव्हती. ते स्वामींच्या मागून तेथे येऊन पोहोचले.

स्वामी रस्त्यामध्ये गायीच्या जवळ बसले. तिला हळुवार हाताने कुरवाळले. हलक्या हाताने थोपटले. तिच्या सर्व अंगावरून हात फिरवला. काही झाल्याचे काही दिसते कां म्हणून बारकाईने गाईचे निरीक्षण केले. तिच्या मानेखालची पोळी चोळीत तिच्याशी बोलू लागले. "माँ तुझे क्या हुआ ? तू बहुत बीमार दिखाई देती है"

शंकरराव जवळ उभे राहून हे अपूर्व दृश्य पहात होते. स्वामी शंकररावांना म्हणाले, "अरे शंकर ! ये गौ बहुत बीमार है। एक बैलगाडी लावो। इसे हम दवाखानेमें ले जायेंगे।" शंकररावांनी कधीही महाराजांचा शब्द मोडला नाही. ते जवळच्या गवताच्या गाडीतळावर गेले. एक बैलगाडी घेऊन आले. तोपर्यंत स्वामी गाईला थोपटीत, कुरवाळीत तेथे गाईजवळ बसून होते. जवळपास लोकांची गर्दी जमली होती. सर्वांना वाटले गाय त्या संन्यासी स्वामींचीच आहे.

बैलगाडी आल्यावर जमलेल्या लोकांच्या मदतीने गाय उचलून बैलगाडीत ठेवली. स्वामी त्या गाईजवळ गाडीत बसले. गाडी गायीला घेऊन दवाखान्याकडे निघाली. स्वामी गाईला थोपटीत होते. तिच्या तोंडाजवळ तोंड नेऊन बोलत होते. "माँ हम दवाखानेमें जायेंगे। दवापानी करेंगे। ठीक होगा सब। मैं हूँ तुम्हारे साथ। अब चिन्ता नहीं।" असे बोलत स्वामी तल्लीन झाले होते. स्वामी बाह्य जग विसरले होते. लकडीपुलावरून गाडी गावातल्या गुरांच्या दवाखान्याकडे चालली होती. ते दृश्य मोठ्या कुतुहलतेने रस्त्याने जाणारे येणारे पाहात होते. ज्याला जे वाटत होते तसे ते बोलत होते-- पण स्वामींचे लक्ष बाहेर नव्हते. ते त्या गोमातेशी जणू एकरूप झाले होते.

त्यावेळी जाधव नावाचे एक साधक आपल्या रिक्षेमधून प्रवासी भाडेकरू नेत

होते. त्या गाडीमध्ये गायीशी बोलण्यात रंगलेले स्वामी पाहून त्यांना आश्चर्यच वाटले. प्रथम त्यांचा त्यांच्या डोळ्यावर विश्वासच बसेना. म्हणून २।३ दा स्वामींना निरखून पाहिले. हे आपले स्वामी आहेत अशी जाधवांची खात्री झाली. त्यांनी जाता जाता दुरून स्वामींना नमस्कार केला. स्वामींचे लक्षच नव्हते. जाधवांनाही भाडे पोहचते करावयाचे असल्याने थांबण्यास वेळ नव्हता. ते दृश्य डोळ्यात साठवून जाधव पुढे निघून गेले. शंकरराव गाडीमागून जात होते. दवाखान्यात गाय नेली. हवे ते औषधपाणी करण्यास सांगून स्वामी व शंकरराव ज्या कामासाठी बाहेर पडले होते ते टाकून घरी परत गेले.

दुपारी जाधव स्वामींच्या दर्शनास गेले त्यावेळी यासंबंधी विषय निघाला व जाधवांना स्वामी म्हणाले "जाधव, गोसेवा महान सेवा है।"

## १९४९ शंकररावांकडे काळाची क्रूर दृष्टी !!

इ. स. १९४३ पासून चढत्या क्रमाने शंकररावांना पैसा मिळत गेला. या काळात त्यांना कधी तोटा हा शब्दच ठाऊक नव्हता. नशिबाच्या रेल्वे रुळावरून जाणारी शंकररावांच्या जीवनाची गाडी भरधाव निघाली होती. त्या भरधाव वेगात गार्डने दाखविलेला लाल दिवा केव्हा निघून गेला हे त्यांच्या ध्यानात आले नाही. सहा वर्षे हा धंदा कर. पुढे तेथेच थांब. असा इशारा स्वामींनी दिला होता. ती धोक्याची सूचना शंकरराव विसरले आणि इ. स. १९४९ साल उजाडले आणि पहिल्याच महिन्यात पुण्याच्या रेस सीझनमध्ये जो प्रचंड तोटा आला तोच त्यांना भयानक ठरला. शंकररावांचे आशावादी मन विचार करू लागले की हा तोटा भरून काढण्यास रेसशिवाय दुसरा उपाय नाही. नोकरीच्या पैशातून हा तोटा सावरता येणार नाही. स्वामींच्या शब्दांची जाणीव झाली; पण तोटाच एवढा होता की तेथें बुद्धी कामच करू शकत नव्हती. त्यांना वाटले फक्त एकदाच मुंबईच्या रेसच्या सीझनचा 'चान्स' घ्यावा. तोटा जरी भरून निघाला तरी पुरे. म्हणून शंकरराव मुंबईस गेले. परंतु दैवगती मोठी विचित्र ठरली. शंकररावांना पै चा फायदा तर झाला नाहीच उलट मुंबईच्या रेस सीझनमध्ये मूळच्या तोट्यात प्रचंड वाढ झाली. हा सर्व तोटा अनेक लाखांच्या आकड्यात गेला. काळ किती क्रूर असतो हे तो प्रतिकूल झाल्यावरच चांगले समजते. शंकररावांना क्षणाचा विलंब

न लावता जंगलीमहाराजांच्या मंदिराजवळचा मोठा प्लॉट, मोटार, सोनेनाणे, इतर अनेक गोष्टी विकाव्या लागल्या. तरी तोटा आटोक्यात येईना. सर्व चक्रे चमत्कारिक गतीने उलटीच फिरू लागली.

दुर्दैवाचे गुप्तचर जीवाच्या मागे हात धुवून लागल्यावर बिचारा जीव केविलवाणी धावपळ करीत असतो. त्या गांगरलेल्या स्थितीत प्रत्येक निर्णय, कृती किंवा हालचाल अत्यंत चुकीची होत जाते. समजत असून नाईलाज होतो. शंकररावांची ही दुरावस्था स्वामींच्या कानावर गेली. त्यांना फार वाईट वाटले. पण कर्मगतीला उपाय नसतो. आता जे होईल ते पहाण्याशिवाय काहीच उरले नव्हते. सांगायचे होते ते पूर्वीच सांगितले असल्यामुळे आता सांगण्याचेही काही शिल्लक नव्हते. अशी १९४९ च्या प्रारंभीची अवस्था शंकरराव मार्कंडांची झाली.

## १९४९ भिलोड चातुर्मास !

स्वामी नेपाळहून बनारसला व बनारसहून पुण्यास आले. त्यांना पुण्यात किंवा पुण्याबाहेर स्वतंत्र जागा हवी होती. कोणाच्याही घरी राहण्याने त्यांची कुचंबणा होत असे. भिक्षेपुरते कोणाकडे जाऊन येणे वेगळे असते. सतत चोवीस तास मुक्काम टाकणे म्हणजे सगळे ओझे त्या कुटुंबातील लोकांच्यावर पडते म्हणून स्वामी स्वतंत्र जागेची इच्छा करीत होते. शंकररावांना सुद्धा स्वामींना आपल्या घरी आता पहिल्यासारखे सुख समाधान देणे जमले नाही तर, या शंकेने दुःख होत होते. म्हणून त्यांनी आळंदी देवाची येथे स्वतंत्र जागा घेऊन स्वामींना आळंदीस नेले. भगवंतराव उपाध्ये यांनी आपली इच्छा आळंदीस स्वामीसेवेस जाण्याची व्यक्त केली. ते आळंदीस गेले परंतु तेथे स्वामींची व्यवस्था नीट लागलेली होती. स्वतंत्र जागा घेतली होती. भिक्षेची सोय एका ब्राह्मणाकडे केली होती. परंतु स्वामींना तेथील हवापाणी मानवेना म्हणून थोड्याच दिवसात स्वामी परत पुण्यास आले व लगेच ८।१५ दिवसात गुजराथेत गेले.

## अशी तयारी असेल तर वानप्रस्थाश्रम स्वीकारा

श्री. भगवंतराव उपाध्ये यांचे स्नेही श्री. पुरुषोत्तम जदूराम त्रिवेदी हे गुजराथ-मधील भिलोड्याचे रहिवासी. भिलोड्याला त्यांचे घरदार, शेतीवाडी आहे. भगवंतरावांचे-

कडून त्यांना स्वामींची माहिती मिळाल्यावर ते पुण्यास आले व स्वामींनी पुरुषोत्त-मांना दीक्षा दिली. आपल्याला दीक्षेचा जो आनंद झाला तो सांगण्यासाठी ते पुण्याहून मुंबईला भगवंतरावांकडे गेले. तेथून ते गुजराथमधील आपल्या गावी गेले.

त्रिवेदींचे साधन नियमीत सुरू झाले. साधनेचे अनुभव वरच्या पातळीचे येऊ लागले तेव्हां त्यांनी आपल्या शेतात छोटी झोपडी बांधली व तेथे शांत वातावरणात नित्य साधना करू लागले. या काळात त्यांना अनहद ध्वनी ऐकू येऊ लागला. त्या ध्वनीच्या नादाने त्यांचे सारे लक्ष एकाग्रपणे त्या ध्वनीमध्येच राहू लागले. बाह्य आवाज, बोलणे, ऐकणे इकडे त्यांचे लक्ष जात नसे. परंतु वस्तू वा व्यक्ति पाहूनसुद्धा त्यांची एकाग्रता मोडत नसे. ते २४।२४ तास त्या अनहद ध्वनीच्या नादात बेहोष होऊन राहू लागले. नित्य व्यवहार आवश्यक तेवढेच होऊ लागले. पुरुषोत्तमांची अशी स्थिती झाल्याने शेतीवाडीच्या व उद्योगधंद्याच्या व्यवहाराकडे दुर्लक्ष होऊ लागले. त्यामुळे ग्रहकलह सुरू झाले. या कलहाला तोंड देऊन कलह वाढविण्याऐवजी काही एक न बोलता सहन करण्याचा मार्ग त्यांनी पत्करला. या परिस्थितीला कंटाळून त्यांना संन्यास घेण्याची इच्छा झाली. म्हणून त्यांनी भगवंतरावांचा सल्ला मागितला.

भगवंतरावांनी सांगितले "स्वामींना मी आजारी असताना, आतुर संन्यास घ्यावा म्हणून माझी इच्छा बोलून दाखविली. त्यावर स्वामींनी स्पष्ट सांगितले की हा काळ संन्यास धर्माला अनुकूल नाही" आपले स्वतःचे उदाहरण सांगून भगवंतरावांनी स्वामींची परवानगी मिळणार नाही असे स्पष्ट सांगितले. यानंतर काही काळ गेला. त्रिवेदींना वाटू लागले संन्यासाश्रम स्वीकारता येत नाही तर वानप्रस्थाश्रम स्वीकार-ण्यास काय हरकत आहे. नाहीतरी ते शेतात एकांतात राहात होते. म्हणून हा प्रश्न त्यांनी पुनः भगवंतरावांना केला. भगवंतराव म्हणाले मला हरकत वाटत नसली तरी स्वामी काय म्हणतात हे त्यांनाच विचारून पाहिले पाहिजे. पुढे दत्तजयंतीच्या वेळी हे दोघे पुण्यास आले त्यावेळी स्वामी पुण्यात आलेले होते.

श्री. शंकरराव मार्कंडांकडे दत्तजयंतीचा उत्सव जोरात सुरू होता, श्रीगुरु-चरित्र पारायण, नामसप्ताह, आरती इत्यादि नित्य कार्यक्रम मोठ्या उत्साहाने चालू होते. स्वामींचा मुक्काम येथेच होता. स्वामींच्या वास्तव्याने वातावरण चैतन्याने

भरून गेले होते. यावेळी स्वामींनी मौन धरले होते. ते दत्तजयंती नंतर सुटले. दत्तजयंतीच्या पारण्याचा प्रसाद मोठ्या प्रमाणात झाला. महाराज पुण्यात नव्हते. मधून मधून स्वामी २० नारायण पेठेत शांततेसाठी जाऊन बसत. तिकडे त्रिवेदी व भगवंतराव गेले. त्रिवेदींनी आपली साधना, परिस्थिती, ग्रहकलह हे सर्व स्वामींना सांगितले. शेवटी वानप्रस्थाश्रम स्वीकारू का म्हणून विचारले. त्यावर स्वामींनी प्रथम संतश्रेष्ठ श्रीतुकाराममहाराजांचा पुढील अभंग पाठ म्हणून दाखविला.

**झाडा वरपोनि खाऊनिया पाला । आठवी विठ्ठला वेळोवेळा ॥१॥**
**वल्कले नेसूनि चिंधीया वेढूनी । सांडी जवळूनी देहभान ॥२॥**
**लोकमान वमना समान मानणे । एकांती राहणे विठोसाठी ॥३॥**
**सहसा करू नये प्रपंची सौजन्य । सेवावे अरण्य एकांतवास ॥४॥**
**ऐसा हा निर्धार करी जो मनाचा । तुका म्हणे त्याचा पांग फिटे ॥५॥**

हा अभंग शांतपणे, समजेल अशा स्वरात, म्हणून दाखविल्यावर स्वामी म्हणाले **"असं वागणे जमत असेल तर वानप्रस्थाश्रम स्वीकारावा. नाहीतर आपली फजिती करून घेऊ नये. पुण्य करायला म्हणून जायचे आणि हाताने पाप घडत गेले तर सारे व्यर्थ आहे. पण आता असे लक्षात ठेवा की आपला शक्तिपात साधन मार्ग असा आहे की तुम्हाला वेगळे काही करण्याची गरज नाही. सध्याचा हा कलियुगाचा काळ तुम्हाला धार्मिक आचरण सहजपणे आणि सरळपणे करून देणार नाही फार आटापिटा करून फक्त शीण वाट्याला येणार ! साधणार तर काहीच नाही. म्हणून आपली साधना भरपूर करा. संधी मिळेल, इच्छा होईल तेव्हाही साधन करीत जा. म्हणजे आतूनच तुमच्यामध्ये फरक पडल्याची जाणीव होत राहील आपल्याला वासना आणि विकार दुर्बल करण्यासाठी संसारात राहून त्यांच्याशी झगडत राहिले पाहिजे. त्या नुसत्या दाबून काही उपयोग नाही दाबून टाकलेल्या वासना कधी उफाळतील सांगता येत नाही. आपले साधन साधकाला आतून तयार करीत जाते. साधन करण्यासाठी शेतात झोपडी बांधली तर काहीच हरकत नाही. वानप्रस्थाश्रमाच्या कल्पनेच्या मागे धावाल तर साधनही धड होणार नाही आणि आश्रम व्यवहारही धड होणार नाहीत."**

स्वामींनी स्पष्ट सांगितल्याने त्रिवेदींचे मन निःशंक तर झालेच पण प्राप्त-परिस्थितीला सहनशक्तीने सामोरे जाण्यासही ते तयार झाले. जीवनातील पलायन प्रवृत्ती म्हणजे खरे अध्यात्म नाही. कमळाप्रमाणे पाण्यात राहून कोरडे राहण्याचा

अभ्यास हे खरे अध्यात्म आहे. असा सुंदर विचार त्रिवेदींच्या व भगवंतरावांच्या मनात आला. मग ते स्वामींना नमस्कार करून निघून गेले.

पुढे योगायोगाने असे घडून आले की स्वामींना त्रिवेदींची आणि भगवंतरावांची पत्रे गेली. त्यामधून स्वामींनी एक चातुर्मास भिलोड्यास करावा अशी प्रार्थना होती. त्याप्रमाणें स्वामींनी कबूल केले पण भगवंतरावांना कळविले की “ त्रिवेदी तुमचे स्नेही असल्याने या प्रवासांत तुम्ही आमचेबरोबर असावे. भगवंतराव त्याचीच अपेक्षा करीत होते. स्वामींच्या पत्राला उत्तर लिहिले. स्वामींना भिलोड्यास नेण्यासाठी हिंमतनगरला त्रिवेदींनी मोटार पाठविली. स्वामी त्याप्रमाणे भिलोड्यास गेले. तेथील पिपलिदाश्रमामध्यें स्वामींचा मुक्काम होता.

स्वामींची भिक्षा आश्रमात होत असे. पुढे आश्रमात असा प्रसंग निर्माण झाला की दहा दिवस तेथे अनपेक्षित कारणाने भिक्षा बंद झाली. मग त्रिवेदींचे गुरुंचे गुरुबंधू वासुदेव अग्निहोत्री यांचेकडे स्वामींच्या भिक्षेची व्यवस्था केली. या चातुर्मासात स्वामींनी एक कमंडलू तयार केला. भिलवड्याजवळ भुवनेश्वरी देवीच्या झाडीत ते गेले. कमंडलूस लागणाऱ्या लाकडाची फांदी स्वतः जाऊन आणली. सुताराकडून कमंडलुइतका भाग पोखरून घेतला. मधून मधून स्वतःही पोखरण्याचे काम केले.

स्वामी, प्रकृती ठीक असो वा नसो, सिद्धासन, पद्मासन किंवा स्वस्तिकासन याखेरीज कधीही बसत नसत, कधीही टेकून बसत नसत. भिंतीखेरीज आसन असे. गप्पा मारण्याची इच्छा नसे. बहुतेक ध्यानांत बसलेले असत. त्यांनी डोळे मिटलेले असतानाही कोणी हळूच, बिलकूल आवाज न करता नमस्कार केला, तरी डोळे न उघडता “ नारायण ” चा उच्चार करीत. जरुरीपुरते बोलत. पुन्हा गप्प बसत. त्यांच्या दंडाला ते फार जपत असत. दंडाला कोणाचा स्पर्श झालेला त्यांना पसंत नसे. त्यांना शिष्य करण्याची प्रवृत्ती नसे. योग्य शिष्य आहे अशी खात्री झाली व त्याला दीक्षा देण्याची इच्छा झाली तरच ते दीक्षा देत. हुशंगाबादेस ज्या दीक्षा दिल्या त्या शक्तिपातविद्येच्या अनुभवासाठी दीक्षा दिल्या असे स्वामी बोलून दाखवीत. स्वामी भाद्रपद पौर्णिमेच्या सुमारास आजारी झाले, तेव्हां ते हातात टेकण्यासाठी काठी घेत असत.

कर्ममार्गासंबंधी एकदा बोलत असता स्वामींनी सांगितले ‘ **यथासांग ते कर्म काही घडेना ! घडे कर्म परि पुण्य गाठी पडेना** ’ **अशी मनुष्यमात्राची स्थिती**

आहे. पुण्यप्रद सत्कर्म होऊ न देणे हे असुरी शक्तीचे कार्य असल्याने नेहमी त्यामध्ये विघ्ने उत्पन्न होतात. सध्याचा काळ तर विघ्नांचाच काळ असल्याने कर्म यथासांग घडणे अशक्य झालेले आहे. संन्याशाला आश्रम धर्माप्रमाणे राहणे शक्य नाही. इतर बंधने कशी तरी पाळता येतील पण भिक्षेसंबंधीचे नियम पाळणे कठीण झाले आहे. या कलीयुगात भिक्षा म्हणजे अन्न, पाणी आणि वायु हे सर्वच दूषित झालेले आहे. म्हणून आश्रम स्वीकारण्यास कलीयुगात वर्ज्य सांगितले आहे. या संदर्भात बोलतांना स्वामींनी श्रीमत् शंकराचार्य विरचित "शिवापराधक्षमापणस्तोत्रा" मधील ५ वा श्लोक सांगून त्याचा अर्थही सांगितला.

**" नो शक्यं स्मार्तकर्म प्रतिपदगहनप्रत्यवायाकुलाख्यं**
**श्रौते वार्ता कथं मे द्विजकुलविहिते ब्रह्ममार्गे सुसारे ॥**
**नास्था धर्मे विचारः श्रवणमननयोः किं निदिध्यासितव्यं**
**क्षन्तव्यो मेऽपराधः शिवशिवशिवभोः श्रीमहादेव शंभो ॥**

पावलोपावली आचरण्यास अत्यंत कठीण असलेली, चुकले की घ्या प्रायश्चित्त! अशी अनेक दोषांनी व्यापलेली कर्मे, की ज्या स्मार्तकर्मांची स्वरूपे मोठमोठ्या प्रायश्चित्तांमुळे मनाला व्याकूळ करतात ती स्मार्त कर्मे माझ्या हातून यथासांग घडत नाहीत तर श्रौत कर्मांची वार्ता काय सांगावी? अर्थात् अत्यंत सारस्वरुप असलेली ब्राह्मण कुळाला विहित असलेली, ब्रह्ममार्ग सुकर करणारी, ती अग्निहोत्रादि श्रौतकर्मे माझ्या हातून घडली नाहीत. ही स्थिती पाहिली की मला धर्माची आस्था नाही हेच दिसते. मी कधी श्रवण–मनन केले नाही. मग मी निदिध्यास कशाचा करणार? म्हणून हे शंभो, शंकरा! सदाशिवा! महादेवा! आपण माझ्या अपराधांची क्षमा करा.

नामजपाचे साधन जसे निर्दोष आहे तसे आपले शक्तिपात साधन निर्दोष आहे. असे असले तरी कर्माशिवाय शुद्धी होत नसते. म्हणून खरे बोलले पाहिजे. खोटे बोलणे टाळलेच पाहिजे. चोरी करू नये. दुसऱ्याचे अंतःकरण दुखवू नये. आईवडील व गुरु हे प्रत्यक्ष देव आहेत असे समजून वागावे इत्यादि कर्मे कटाक्षाने पाळल्याने शुद्धत्वाला गती येते. खाण्यापिण्याची बंधने सांभाळली तर मनाला सद्-विचार सुचतील. अर्थात् आपले साधन तुमच्या मनाला अशा सत्प्रेरणा देत राहील. लक्ष ठेवणे व जसे सांगितले तसे वागणे याची जबाबदारी आपल्यावर आहे.

भिलवड्याचा चातुर्मास संपल्यानंतर स्वामी वडनगरला गेले होते. तेथे अंबालाल शेटजींच्याकडे तीन आठवडे मुक्काम केला. त्यावेळी शेटजींचे स्नेही मोहनलाल पटेल यांच्या पाठीवर (अद्रष्ट रोग) चांदी पडून त्यातून पाणी झिरपत होते ते स्वामींना दाखविले. स्वामींनी त्याकडे फक्त दहा मिनिटे याप्रमाणे ३।४ दिवस पाहिले व मंत्रोपचारही केला. तेवढ्या उपायाने तो रोग बरा झाला.

या सुमारास वडनगर येथील श्रीरामकबीर पंथाच्या श्रीराम मंदिराचे त्या वेळचे उत्तराधिकारी, गादीपती, श्रीमहाराज १०८ श्रीमणिलालजी महाराज स्वामींच्या दर्शनासाठी अंबालाल शेटजींच्या घरी आले होते. दुसरे दिवशी त्यांनी स्वामींना आपल्या श्रीराममंदिरात भिक्षेस नेले होते. त्यांना स्वामींनी अंतरप्राणायामाची क्रिया दाखविली व त्यांना निष्णात केले.

स्वामी येथून मुंबईस गेले. तेथे काही दिवस मुक्काम केला आणि नंतर पुण्यास गेले.

## माधवबागेत अध्यक्षीय भाषण

इ. स. १९४९ मधील भिलोड्याचा चातुर्माम संपल्यावर स्वामींनी क्षौर केले आणि ते वडनगरला अंबालाल शेटजींच्याकडे गेले. तेथून ते मुंबईला आले. स्वामींचा जनसंपर्क हळू हळू वाढत होता. या काळात मुंबईचे सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते, धार्मिक सभेचे, श्री. गोयंका यांचा स्वामींशी संबंध आला. त्यांचे स्वामींकडे येणे जाणे सुरू झाले. त्यांना स्वामींच्या सहयोगाने काही धार्मिक प्रचारकार्य करण्याची इच्छा झाली.

स्वामी मुंबईला आले ते श्री. भगवंतराव उपाध्ये यांचे सुपुत्र श्री. नारायणराव यांचेकडे आले. तेथून श्री. गोयंका यांनी स्वामींना आपल्या बंगल्यावर नेले. तेथे त्यांनी स्वामींची उत्तम व्यवस्था ठेवली. माधवबागेत रोज सायंकाळी धार्मिक विषयावर प्रवचने होत असत. तिकडे स्वामींना मोटारीतून घेऊन जात. एकदा तर स्वामींच्या अध्यक्षतेखाली एक धार्मिक सभा भरविली. त्या सभेसाठी खूप प्रचारही केला होता. स्वामींनी प्रारब्ध भोगातली एक घटना समजून ते अध्यक्षपद नाकारले नाही. त्यांच्या आयुष्यातील एका विराट सभेपुढचे ते पहिले आणि शेवटचेच भाषण

होते. स्वामींचे वक्तृत्त्व अमोघ, खणखणीत, स्पष्ट, ध्येय सूत्राला घट्ट पकडून पुढे जाणारे असे होते. त्यांचे हे गुण नित्याच्या बोलण्यातून, चर्चेतून दिसत असत.

त्या सभेचा विषय होता "मानवाला धर्माची गरज आहे का?" ज्यांनी "गरज नाही" म्हणून भाषण केले त्यांच्या भाषणाच्या उच्चाराची येथेही गरज नाही. पण ज्यांनी गरज आहे म्हणून सांगितले त्यांच्या गरजेत अनिवार्यतेची, तळमळीची तीव्रता नव्हती. स्वामींनी केलेले भाषण मार्मिक तर होतेच पण त्यांच्या अप्रकट राहिलेल्या गुणांचा तो उद्रेक होता. सारी सभा मंत्राने मुग्ध करावी तशी स्वामींच्या भाषणाने भारावून टाकली. होती. तब्बल १॥ - २ तास स्वामींचे भाषण झाले. भाषणाचा शेवट इतका प्रभावी झाला की स्वामींचे भाषणातील शेवटचे वाक्य संपले व स्वामी तसेच स्तब्ध उभे राहिले. त्यावेळी सर्वांना भाषण संपल्याचे भानच राहिले नाही. स्वामी खाली बसताच टाळ्यांचा जो प्रचंड गजर झाला तेव्हा श्रोतृवर्गाची पावती मिळाली. गोयंकांनी आभार मानतांना खूप स्तुती केली.

भाषण करून स्वामी गोयंकांचे बंगल्यावर गेले आणि त्यांनी ताबडतोब नारायण भगवंत उपाध्ये यांना फोन केला. "तू मला तुझ्या खोलीवर ताबडतोब घेऊन जा." त्या फोनप्रमाणे नारायणने स्वामींना आपल्या घरी आणले. स्वामींनी आपली सामाजिक कार्याची नापसंती व्यक्त केली. या संदर्भात ते म्हणाले "सामाजिक कार्य म्हणजे दुधाच्या भांड्यावरचा फेस" नारायणने स्वामींसाठी स्वतंत्र खोली दिली. त्यांच्या सेवेसाठी ताबडतोब भगवंतरावांना बोलावून घेतले.

या काळात स्वामींच्या दर्शनासाठी नारायणची बायको मुलाला घेऊन स्वामींच्या पुढे गेली. तिने नमस्कार केला व मुलाला स्वामींच्या पुढे ठेवले. त्या मुलाला कावीळ झाली होती. स्वामी म्हणाले या मुलाला एवढी मोठी कावीळ झाली काही उपाय केले की नाही? यावर तिने केलेले उपाय सांगितले. त्यावर स्वामी म्हणाले आजपासून सर्व उपाय बंद ठेव व या मुलाला रोज माझ्यापुढे दहा मिनिटे आणून ठेवीत जा. याप्रमाणे तीनच दिवस केले तर कावीळ भराभर उतरू लागली. स्वामी त्या मुलाचे अंगावरून फक्त एकदा हात फिरवीत व बाकी मधून मधून त्याचेकडे बघत एवढ्याच उपायाने ही कावीळ बरी झाली. या मुलाचे नाव चंद्रशंकर आहे. स्वामींच्या जवळ अद्भुत शक्ति होती याचे वारंवार प्रत्यंतर येत असे.

स्वामी मुंबईहून गुरुद्वादशीस पुण्यास आले.

## विनोदवृत्तीचा एक मासला !

दुपारच्या वेळी साधकमंडळी येऊन बसली होती. स्वामींच्या गप्पा रंगात आल्या होत्या. इतक्यात जाधव आले. त्यांना पाहून स्वामी म्हणाले "अरे जाधव, काल रात्री मोठी मजा झाली. काल रात्री मी एकटाच जंगलीमहाराज रस्त्याने चाललो होतो. रात्रीचे १०/१०-३० वाजले असतील. संभाजी पार्कचे दरवाजे बंद होते. मी त्यावरून आत गेलो आणि एका बाजूला झाडाखाली जाऊन बसलो. रात्र चांदणी होती. मी छाटीचे घुंघट करून ती डोक्यावरून घेतली. थोड्या वेळाने बागेचा रखवालदार येत असल्याची चाहूल लागली. मी छाटीतून तो माझ्याकडे येत असल्याचे पाहात होतो. लांबूनच तो मला दटावून विचारू लागला "कोण बसले आहे ?" त्याला वाटले असेल कुणी भिकारी म्हणून जरा जोरातच बोलत होता.

मला त्याची गंमत करण्याची इच्छा झाली. मी त्याच्या प्रश्नाला काहीच उत्तर दिले नाही. अगदी हालचाल न करता ताठ बसलो होतो. माझे सर्व शरीर छाटीने पांघरलेले होते. त्यामुळे त्याला कोण बसले आहे याचा काहीच अंदाज आला नाही. त्या माझ्या आकृतीकडे पहात तो लांबच उभा राहिला. त्याला काहीतरी शंका आली म्हणून तो जवळ आलाच नाही. तो लांबूनच दरडावण्याचा आवाज काढून बोलत होता. "कौन बैठा है ?" "बाहर जावो" "यहाँ अब बैठना नही" त्याच्या एकूण बोलण्यात आणि लांब उभे राहण्यात तो मनाने भीत असावा हे माझ्या लक्षात आले. मी त्याची गंमत पहात शांत बसलो होतो. त्याच्या हातात काठी होती ती आपटीत तो म्हणाला "जाता है या नही" त्याने हळूच दोन दोन पावले पुढे टाकली व पुन्हा म्हणाला "कौन बैठा है ?"

मी मनात विचार करीत होतो 'हे रखवालदार ! इतके भेदरट ! कशाची राखण करणार हे ? यांचा नुसता वरचा रुबाब पाहून घ्या !' रात्रीची शांत वेळ होती. तो एक एक पाऊल मोठ्या धाडसाने पुढे पुढे टाकीत होता. काठी आपटीत होता. कौन बैठा ? प्रश्न विचारीत होता इतक्यात मी आतूनच एकदम मोठा आवाज काढून ओरडलो "तेरा बाप है." जाधव, तुम्हाला माझा आवाज माहीत आहे केवढा आहे. त्यापेक्षा मोठ्यांदा ओरडलो. मग काय विचारता ! तो रखवालदार असा घाबरला की त्याचे धाबेच दणाणले. तो मागच्या मागे धडपडत पळत सुटला. त्याला मागे वळून पाहण्याची हिंमत झाली नाही. त्याच्या पळण्याची मजा पहात मी

मोठ्यांदा हंसत होतो, आणि तो जीव खाऊन पळत होता. तो गेल्यानंतर तरी मी उठून निघून जावे ना ! पण मला वाटले पाहू पुढे काय होते ते ! असा विचार करून पुन्हा तसाच बसून राहिलो. मला त्या रखवालदाराची मजा पाहून सारखे हसू येत होते. मी ते हसू दाबून शांतपणे पहिल्यासारखा बसून राहिलो.

थोड्या वेळानंतर.... दोघेजण येताना पाहिले. यामध्ये मघाचा रखवालदार नव्हता. या दोघांपैकी एक पोलीस शिपाई होता व दुसरा साध्या पोषाखातील कुणी तरी होता. दोघांच्या हातात काठ्या होत्या. मी समजलो, मघाच्या बागेच्या शिपायाची इकडे येण्याची छाती झाली नाही म्हणून त्यानेच या दोघाना माझ्याकडे पाठविले. तो चांगलाच भ्यालेला दिसतो. आता हे दोघे बहादर शिपाई काय पराक्रम करतात हे पाहण्याची मी वाट पहात होतो. मी काही जागाही सोडली नाही आणि बैठकही सोडली नाही. अंगावरची छाटीपण काढून घेतली नाही.

ते दोघे आपापसात कुजबुजत, काही खाणाखुणा करत, हळू हळू माझ्या दिशेने येत होते. जसजसे ते जवळ येऊ लागले तसतसा त्यांचा आवाज लहान लहान होऊ लागला. त्यांनी मला लांबूनच पाहिले होते. त्यांचा आवाज लहान झाला तेव्हाच मी ओळखले हे सुद्धा भित्रेच आहेत. त्यांच्यावर माझ्या आकृतीचे आणि कल्पनेचे दडपण आले म्हणून त्यांचा आवाज लहान झाला हे मी ताडले. आता यांचीपण गंमत करण्याचे मी ठरवून टाकले. त्या दोघांपैकी पोलीसाने लांबूनच विचारले "कोण बसले आहे? रात्री बागेत बसणे गुन्हा आहे. मुकाट्याने बाहेर जातोस का चौकीवर यायचंय?" असे म्हणून त्याने काठी आपटून आवाज करीत करीत, तरातरा पावले आपटीत, माझ्याकडे येण्यास सुरवात केली. पोलीसाच्या एवढ्या प्रचंड साहसाला बरोबरच्या सहाय्यकाने तसेच अनुकरण करून सहाय्य केले. मी या सर्व हालचाली छाटीमधून डोळे किलकिले करून पहात होतो. कितीही केले तरी त्यांची निर्भयता ही लौकिक आशापाशांनी बद्ध असलेल्या पोटार्थी जीवांची निर्भयता होती! ते मृत्यूला खेळण्यासारखे खेळवणारे खेळकर नव्हते! असामान्य, अलौकिक, निःस्वार्थी व मुक्त जीवन जगणाऱ्या निर्भय पौरुषाची अपेक्षा त्यांचेकडून कशी करावी? ४/६ पावले पुढे टाकून ते थांबले. डोक्यावर साप धोपटण्यासारखी काठी उंच धरून ते पुन्हा मला दरडावू लागले. म्हणाले "आता धावत येऊन या काठ्या तुझ्या डोक्यात पडतील. बोल, तू कोण

आहेस" असे २।३ दा म्हटले तरी मी तसाच शांत बसून. तेव्हा मात्र ते मोठ्या वेगाने काठीने झोडपण्याच्या इच्छेने माझ्याकडे आले. माझ्यापासून ते आठदहा फुटावर असतील तेव्हा मी अचानकपणे मोठा आवाज काढून ओरडलो "हम तेरा बाप है" हे वाक्य बोलताना मी उठून उभा राहिलो. दोन्ही हातात छाटी धरली व हात वर केले. त्यांच्या दृष्टीने मी "महतो महीयान" झालो. बसलो होतो त्यापेक्षा उभा राहिलो आणि हात वर केले व त्यामध्ये छाटी धरल्यामुळे माझी उंची ८, १० फुटांची झाली. ती आकृती व तो आवाज पाहून व ऐकून त्यांची पाचावर धारण बसली. हा कुणी माणूस नाही. त्यापेक्षा काहीतरी ही वेगळी भानगड आहे या जाणीवेने त्यांची बोबडी वळली. हातातल्या काठ्या तेथेच टाकल्या. आणि मागच्यामागे पायात पाय घुटमळत पळत सुटले. मागे वळून पहाण्याची हिंमत झाली नाही. पळताना पायाच्या चपला टाकून दिल्या. त्यांची पळण्याची गडबड पाहून मला मोठी मजा वाटली. हसून हसून माझी पुरेवाट झाली. मी पुन्हा ओरडलो. "ठहरो, हम आते हैं" माझे वाक्य ऐकून ते गर्भगळितच झाले. त्या बंद दारावरून उड्या टाकून पसार झाले.

थोडा वेळ थांबून मी घरी निघून गेलो. रात्री अशी काही मजा होईल ही कल्पना नव्हती. **माणसाला खरी भीति कल्पनेची आहे कारण कल्पनेची बाधा तापदायक असते.**

## डॉ. वि. म. बेंद्रे आणि स्वामीजी

हे पुण्यातील ख्यातनाम डॉक्टर आहेत. डॉक्टर बेंद्रे यांना योग आणि अध्यात्म या विषयांचे आकर्षण फार जुने आहे. डॉक्टरांचे, स्वामींच्याकडे येण्यापूर्वी, अनेक योगीराज व सत्पुरुष यांचेकडे जाणे झाले आहे. पुण्यातील योगीराज श्री. गोपाळमहाराज कसबेकर म्हणजे योगाची ऐश्वर्य विभुती होती. यांचेकडे डॉक्टर बेंद्रे जात होते. भस्त्रिकादि प्राणायाम प्रक्रियेचा अभ्यास योगीराज श्री. गोपाळमहाराज कसबेकर यांचेसमोर डॉक्टर करीत होते. डॉक्टरांनी योगीराजांना शेवटपर्यंत अनेक प्रसंगातून, घटनांमधून फार जवळून पाहिले आहे. डॉक्टरांनी योगीराज श्री. कसबेकर महाराज यांचे जीवनावर थोडे फार लिहिले आहे. तसेच फलटणचे संत सत्पुरुष, ब्रह्मनिष्ठ श्री. उपळेकर महाराज यांचाही सहवास डॉक्टरांना बऱ्याच वर्षांपासून घडत आला आहे. या गोष्टींचा येथे हा उल्लेख यासाठी आहे की डॉक्टरांना संत,

सत्पुरुषांचा सहवास घडल्याने संत सत्पुरुष ही काय वस्तू आहे याची चांगली कल्पना आलेली आहे. तेव्हा या विषयातील जाणत्यांना जाणणारे डॉक्टर आहेत. त्यांना दिव्य विभूतिमत्त्वाची जेथे प्रचीती येते तेथेच त्यांचे हात जोडले जातात.

डॉक्टरांचा आणि स्वामींचा संबंध इ. स. १९४२ पासून आला. त्याच सुमारास त्यांना अनुग्रहही मिळाला. साधनेचा अखंड नियमितपणा त्या वेळेपासून डॉक्टरांचा चालू आहे. स्वामींच्या समोर बसल्यानंतर साधनेची तीव्रता वाढली म्हणून स्वामींना हात लावून ती शांत करावी लागली होती. डॉक्टरांनी स्वामींच्याबद्दल पुढील माहिती आणि आठवणी दिलेल्या आहेत.

१) स्वामींना सकाळ संध्याकाळ फिरावयास जाण्याची आवड फार होती. पुष्कळ वेळा हनुमान टेकडीवर जात असत. श्री. फणसळकर वैद्य यांची व स्वामींची टेकडीवर अनेक वेळा भेट होत असे.

२) स्वामी लहानपणी रिकेट्स्नी आजारी असावेत. त्यांची प्रकृती बऱ्याच वेळा हातपाय कृश व पोट मोठे अशी आढळली आहे. त्यांना बद्धकोष्ठता मोठ्या प्रमाणात होती. त्यांच्या पाठीत नैसर्गिक दोष असावा. स्वामींना १९४० मध्ये झालेला बेरी बेरी आजारही व्हिटॅमिन शरीरात कमी झाल्याने निर्माण होतो. हातापायाला सूज येते. त्यांना औषध योजना पुण्यात असताना डॉ. बेंद्रे यांचेकडे असे.

३) स्वामींना वैदिक परंपरेचा फार मोठा स्वाभिमान होता. या परंपरेचे आचार आग्रहाने पाळणारे व इतरांना पाळावयास लावणारे स्वामीजी होते. शिखा (शेंडी) जानवे, संध्या यावर कटाक्ष असे. स्वामी पक्के अद्वैती होते. समाजात वर्णाश्रम आचारपद्धती कल्याणकारक आहे असा त्यांचा दृढविश्वास होता. आचार चुकला तर गय करीत नसत.

४) स्वामी नेहमी सिद्धासनावर बसलेले असत. त्यांचा पाठीचा कणा सदैव ताठ असे. तरी मधून मधून ते म्हणत त्यांच्यात खूप अंतराय आहेत. आपले प्रारब्ध फार खडतर आहे अशी त्यांची धारणा झालेली होती.

५) स्वामी नामदीक्षा व वेधदीक्षा (शक्तिपातदीक्षा) देत असत. स्वामींनी शंकरराव मार्कंडांना नामदीक्षा दिलेली होती. वेधदीक्षा दिलेली नव्हती.

स्वामींच्यामध्ये दीक्षा देणे ही गोष्ट अलौकिक होती. साधकाला चटकन अनुभूती देणारी ही विद्या मंत्रमुग्ध करणारी आहे. स्वामींच्याकडून दीक्षा मिळणे फार कठीण होते.

६) स्वामी गावाला जाणार होते; त्यावेळी त्यांच्या गळ्यात पुष्पमाला घालण्यासाठी नेण्याची इच्छा होती पण जमले नाही, तेव्हा स्वामींच्यापुढे सव्वा रुपया ठेवला. त्यावेळी सर्वांनी हार आणले होते; पण डॉक्टरांचा हार नव्हता याची त्यांना फार चुटपुट लागून राहिली. स्वामींच्यापुढे ठेवलेली सव्वा रुपया दक्षिणा त्यांनी आशीर्वाद म्हणून परत केली. तो सव्वा रुपया डॉक्टरांनी पूजेत ठेवला आहे. स्वामींचा प्रसाद म्हणून ती आठवण आहे.

७) स्वामींना चमत्कार पसंत नसत. त्यांनी कधीच चमत्काराची तारीफ केली नाही.

८) स्वामी संतापलेले माझ्या पाहाण्यात नाहीत. **व्यवहारात कडक असणे म्हणजे संतापणे नव्हे.** पुष्कळांना स्वामींचा व्यावहारिक कडकपणा सहन होत नसे त्यांना स्वामी संतापलेले दिसत.

## श्री. बाबुराव दलाल मानवतकर (बाबा महाराज) आणि स्वामी

वंदनीय श्री. दलालमहाराज यांचा आणि हैद्राबादचे श्री. शिवराजा आणि श्री. रामाप्पा महाराज यांचा अतिशय घनिष्ट परिचय आला होता. परस्परांचा स्नेह-सुद्धा गाढ होता. शिवराजा स्वामींच्या दर्शनास काशीस गेले होते. तेथे त्यांचा ८/१० दिवस मुक्काम होता. स्वामींनी त्यावेळी त्यांना दिक्षा दिली. दीक्षेचा अनुभव सांगतांना शिवराजांनी सांगितले की, "आनंदविभोर अवस्थेत होतो, सारखे आतून हसू फुटत होते. त्या स्थितीचे यापेक्षा शब्दाने वर्णन शक्य होत नाही."

दुसरे श्री. रामाप्पा महाराज यांना त्यांच्या पहिल्या गुरूंनी अनुग्रह दिला त्यावेळी जितक्या तीव्रतेने अनुभव आले तितके तीव्र अनुभव स्वामींच्या दीक्षेने आले. पण दोघांच्या अनुभवातील जाणवणारा फरक हा की पहिल्या गुरुंच्या अनुग्रहाच्या दिवशी जी तीव्रता अनुभविली ती पुन्हा कधीही अनुभवता आली नाही.

पण स्वामींच्या दीक्षेच्या दिवशी जी अनुभवांची तीव्रता होती ती पुढे रोजच्या साधनेत अनुभवास येत होती. इतकेच नव्हे तर मधून मधून साधनेतील अनुभवांची तीव्र प्रखरता वाढलेली अनुभवली आहे. खूप विविध प्रकारच्या क्रिया नंतर होत होत्या. चित्ताची शांती वाढत चालली होती. हे रामप्पामहाराज मोठे अधिकारसंपन्न सत्पुरुष होते. त्यांचे आचरण कडक होते. श्री. बरूररामराव यांनीही स्वामींची दीक्षा घेतली होती.

श्री. दलालमहाराज शिवराजांच्याबरोबर इ. स. १९४९ मध्ये पुण्यास स्वामींच्या दर्शनास आले होते. श्री. दलालमहाराज हे श्री. प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराजांचे परंपरेतील आहेत. श्रीयोगानंदसरस्वती हे त्यांचे गुरु आहेत. महाराज हेही वासुदेवानंदसरस्वतींचे शिष्य असल्याने त्यांचेकडून श्री. दलालमहाराज यांनी शक्तिपातयोगविद्येची दीक्षा घेतलेली आहे. म्हणून स्वामींच्या दर्शनामध्ये त्यांना विशेष आकर्षण होते. ज्यावेळी ते स्वामींच्या दर्शनास आले होते तेव्हा महाराज व शिवराजा तेथे उपस्थित होते. शिवराजांचेकडून शक्तिपातविद्येची माहिती श्रीदलालमहाराजांना मिळालेली होती. त्यांचेतर्फेच महाराजांकडे येणे व दीक्षा घेण्यासंबंधी बोलणे झाले होते. स्वामींच्या भेटीत विशेष म्हणजे मंत्रविद्येचा, मंत्रशास्त्राचा स्वामींचा अभ्यास भरपूर असल्याचे जाणवले. मंत्रशास्त्राचा स्वामींनाही नाद होता. संन्यास घेतल्यानंतर स्वामींनीं शाक्त उपासना व साधना केली होती. त्यांना त्या विद्येचे अनुभव येऊ लागले तसतसे तिकडेच चित्ताची ओढ वाढू लागली व त्यामध्ये बराच काळ खर्च होऊ लागला हे संन्यासधर्माला योग्य नाही अशी जाणीव असल्याने ही उपासना मध्येच सोडून दिली.

शिवराजांच्या मनावर स्वामींचा फार मोठा प्रभाव पडल्याचे दिसत होते. स्वामींची आठवण ते सांगू लागले की ते भावविभोर होत असत.

## श्री. बाळासाहेब वाकडे आणि स्वामीजी

१) श्री. वसंत व्यंकटेश ऊर्फ बाळासाहेब वाकडे हे शास्त्रविषयाचे पदवीधर असून पुण्यामध्ये फर्ग्यूसन महाविद्यालयात त्या विषयाचे मार्गदर्शक म्हणून अनेक वर्षे काम करीत आहेत. यांचा स्वामींचा संबंध इ. स. १९४७ पासून आला. बाळासाहेब स्वतः फार बोलके आहेत पण त्याहीपेक्षा दुसऱ्यालाही बोलके करण्याचे त्यांचे

कौशल्य विशेष आहे. इ. स. १९४७ ते इ. स. १९५१ या पाच वर्षांत स्वामी बाळासाहेबांच्याशी जेवढे बोलले असतील तेवढे अन्य कुणाबरोबर बोलले असतील असे वाटत नाही. असे म्हणण्याचे कारण असे की विषय जरी अध्यात्म असला तरी त्याच्या अनंत सूक्ष्म छटा समजून घेण्याची बाळासाहेबांची धडपड असल्याने ते स्वामींना अनेक प्रश्न विचारीत असत. प्रश्न कसा व केव्हा विचारावा याबद्दल त्यांचा अंदाज बहुतेक चुकत नाही. प्रश्न सरळ आणि निर्भिड, स्पष्ट आणि मार्मिक असला की उत्तर देणाराही प्रसन्न चित्ताने उत्तर देई. स्वामींच्या प्रमाणें बाळासाहेब महाराजांशीही खूप खूप बोललेले आहेत.

बाळासाहेबांनी स्वामींच्याकडे अनेक जिज्ञासूंना नेलेले आहे. स्वतः अनेक घटनांमधून स्वामींना पाहिले आहे. त्यांनी स्वामींचया चरित्रामध्ये माहिती पुरविण्याचा मोठा वाटा उचलला आहे. स्वामी म्हणजे चैतन्याचे चालते बोलते स्वरूप होते. दिव्य व अलौकिक तेजाचा साकार पुतळा होता हे बाळासाहेबांनी अनेक घटनांमधून दाखवून दिल्याने स्वामींच्या जीवन चरित्राचा आकार स्पष्ट होण्यास मोठी मदत झाली. ज्यांनी ज्यांनी स्वामींना पाहिले आहे, त्यांना त्यांना स्वामींच्या जीवन चरित्रातून आत्मप्रत्यय आला पाहिजे यासाठी बाळासाहेबांनी आग्रह धरला.

बाळासाहेब ऐन पंचविशीत स्वामींच्याकडे आले. वास्तविक हा काळ सर्वसाधारणपणे अध्यात्माकडे किंवा योगमार्गाकडे वळण्याचा नाही. पण प्रारब्ध आणि संस्कार यांच्या प्रभावाने हे घडले. राष्ट्रीय वृत्तीचे मोठे कार्यकर्ते म्हणून बाळासाहेबांना सर्वत्र ओळखले जाते. पुण्यातील कसबापेठ विभाग हे त्यांचे अनेक वर्षांचे कार्यक्षेत्र. या विभागातील अनेकांना बाळासाहेबांनी स्वामींच्याकडे आणले.

२) श्री. नारायणराव ढेकणे यांना आधी दीक्षा होणार नाही असे म्हणून नंतर लगेच दुसऱ्या दिवशी दीक्षा दिली, याबद्दल त्यांना विचारल्यावर स्वामी म्हणाले "उनका (नारायणका) व मेरा ऋणानुबंध जबरदस्त है" तेव्हा बाळासाहेबांनी स्वामींना एक शंका विचारली की "स्वामीजी! यह ऋणानुबंध कैसे समझा?" यावर स्वामींनी उत्तर दिले "जब नारायण की दीक्षा अब नहीं होगी ऐसा कहा तबसे ऐसा अनुभव हुवा कि प्राण उपर नहीं चढ जाते। तब दीक्षा का संकल्प किया तब प्राण उपर चढ गये। यही ऋणानुबंधका अनुभव है।" असा हा मार्मिक प्रश्न विचारल्यामुळें उत्तरही नेमके मिळाले.

३) श्री. शंकरराव मार्कंडांनी स्वामींची सेवा अगदी मनापासून केली. रोज दुपारी भिक्षेपूर्वी ते स्वामींची पूजा करीत पण सायंकाळी सुद्धा शंकरराव स्वामींची पूजा व आरती करीत असत. पंचारती ओवाळून, थाटामाटाने, धूप दीप नैवेद्य दाखवून आरती करीत असत. नंतर स्वामींच्या पायांचे चरणतीर्थ घेत असत. या संबंधी स्वामी म्हणत – "शंकरराव मेरे चरणतीर्थ लेता है। चरणतीर्थ लेनेसे क्या होता है? लेने, देने की बात तो अलग है।"

४) श्री. रामकृष्ण परमहंसांबद्दल स्वामी आदराने चांगले उद्गार काढीत असत. योगी पुरुषाचे वर्णन करताना सांगत की स्थूल देहाची व्यक्ती योगी असणे हे योगशास्त्राच्या दृष्टीने असंभवनीय वाटते. योगी स्मित हास्य करतो.

५) आपला हा शक्तिपात दीक्षेचा मार्ग हा राजयोगाचा मार्ग नाही. आपला राजयोग नसून महायोग आहे. महायोग नावातच त्या मार्गाचे श्रेष्ठत्व स्पष्ट आहे. असे थोडक्यात सांगितले होते.

६) बाळासाहेब पुण्यातील वसंत टॉकीज जवळच्या जागेत राहात होते तेव्हा स्वामीजी घरी गेले होते. त्यावेळी त्यांच्या आईने स्वामींची यथासांग पाद्यपूजा केली होती. स्वामींनी आईला दत्तमंत्र दिला होता. स्वामी बाळासाहेबांचेकडे भिक्षेस मात्र गेले नव्हते.

७) स्वामी पुण्यात असताना मध्यंतरी मंडई जवळच्या मार्कण्डेयाच्या मंदिरात राहात व बॅ. खासगीवाले यांचेकडे भिक्षेस जात. पुढे तेथील मुक्काम हलविला आणि संभाजीपार्क समोरच्या श्री. भाऊराव अभ्यंकर यांच्याकडे स्वामी मुक्कामास गेले. स्वामींना भाऊराव अभ्यंकरांनी मोठ्या आग्रहाने आपल्या घरी नेले होते. स्वामी भाऊरावांचेकडे जेमतेम १।२ दिवस राहिले असतील. स्वामींना काहीही खटकले की ते क्षणभर तेथे थांबत नसत. सरळ उठून चालू लागत. मग ते आपल्या सामानाचीही पर्वा करीत नसत. स्वामींचे भाऊरावांचेकडे असेच काहीतरी झाले. ते घरातून उठले आणि समोरच्या संभाजी बागेत जाऊन बसले. तास झाला, दोन तास झाले. ते घरात येईनात. तेवढ्यात कुणीतरी त्यांच्या दर्शनासाठी म्हणून भाऊरावांचेकडे गेले. तेथे त्या गृहस्थाला समजले, स्वामी समोर संभाजी बागेत बसले आहेत. ते गृहस्थ तिकडे गेले. स्वामी निवांत बसलेले त्यांनी पाहिले. जवळ जाऊन नमस्कार केला व

म्हणाले "स्वामी कुछ सेवा की आज्ञा" त्यावर स्वामी म्हणाले "बालासाहब को ले आवो."

त्या निरोपाप्रमाणे बाळासाहेब संभाजी बागेत स्वामींच्याकडे गेले. स्वामींनी सांगितले. "मुझे यहाँ ठहरना नहीं है। भुजंगरावके यहाँ ठहरना है।" मग बाळासाहेब स्वामींना घेऊन भुजंगरावांना (नाना भालेराव) भेटण्यासाठी तेथून परस्पर कोर्टात गेले. नानांची भेट घेतली. स्वामींची सोय तुमच्याकडे व्हावी अशी स्वामींची इच्छा आहे हे सांगितले. नाना म्हणाले "हे विचारण्याचे कारणच नाही. पू. स्वामींनी वाटेल तितके दिवस निःसंकोचपणे राहावे. आमचेकडून होईल तेवढी सेवा करू. हे स्वामींचेच घर आहे." असे म्हणून नाना स्वामींच्या बरोबर घरी गेले. बाळासाहेबांना सामान घेऊन येण्यास सांगितले. स्वामींची सर्व व्यवस्था त्यांच्या इच्छेप्रमाणे केली.

पुढे बाळासाहेबांनी योग्य वेळ पाहून स्वामींना विचारले की "आपल्याला भाऊरावांचे घर इतक्या झटपट सोडण्याची का इच्छा झाली?" त्यावर स्वामी म्हणाले त्यांच्या शेजारच्या घरात मासे, मांस इ. पदार्थ शिजवतांना त्याची दुर्गंधी फार येत होती ती सहन झाली नाही.

८) बाळासाहेबांचा मुलगा चि. ज्ञानेश्वर हा मध्यंतरी सर्दीपडसे, खोकला या विकाराने आजारी होता. मधून मधून त्याला फणफणून तापही भरत असे. अशा आजाराच्या काळात थोडे बरे असेल तेव्हा त्याला स्वामींच्या दर्शनास नेले जात असे. त्यामुळे चि. ज्ञानेश्वरचे दुखणे स्वामींच्या कानावर होते. एकदा त्याला स्वामींच्याकडे नेले होते तेव्हा स्वामींना काय इच्छा झाली कुणास ठाऊक त्यांनी विचारले "ज्ञानेश्वरको क्या होता है? आओ ज्ञानेश्वर! दिखाओ तुम्हारी तबीयत।" ज्ञानेश्वर स्वामींच्याजवळ गेला. त्याला पाहाताक्षणीच स्वामींना खारकेसारख्या फुगलेल्या गळ्याच्या ग्रंथी (टॉन्सिलस) दिसल्या. स्वामी म्हणाले "सारी बिमारी इसीके कारण हुआी है।" असे म्हणत म्हणत त्यांनी ज्ञानेश्वराच्या त्या फुगलेल्या टॉन्सिल्सवरून हात फिरविला व म्हणाले "जाओ! अब अच्छा होगा।" हा आशीर्वाद दिला त्या क्षणापासून ते दुखणे झराझर उतरत गेले. ही गोष्ट बाळासाहेबांनी व त्यांच्या पत्नींनी प्रत्यक्ष अनुभविल्यामुळे त्यांना ती चांगलीच जाणवली.

९) स्वामी रात्रीचा फलाहार घेत असत. स्वामींच्या रात्रीच्या फलाहाराची व्यवस्था करण्याचे काम बाळासाहेब, नारायणराव आदी साधकांच्याकडे येत असे. स्वामींसाठी बाजारातून केळी, ऋतुमानाप्रमाणे फळे घेऊन यायची व स्वामींना स्वच्छ करून द्यायची. स्वामींना केळी विशेष आवडत असत. पण कृत्रीम पिकविलेली केळी त्यांना चालत नसत. ते कृत्रीम पिकवलेली केळी हुडकून काढीत, व बाजूला ठेवीत. बाळासाहेबांनी स्वामी कोणती केळी काढून ठेवतात याचे निरीक्षण केले. तेव्हा त्यांच्या असे लक्षात आले की ज्या केळ्याच्या पुढे टोकाला काळ्या कळीसारखे असते ते कृत्रीम केळे असते. तसेच झाडावर नैसर्गिक पिकलेले केळे अखंड एकाच रंगाचे राहाते. अशा झाडावर पिकलेल्या केळ्याचे पुढचे टोक काळ्या कळीसारखे नसते. ही माहिती २।४ दिवसातच स्वामींच्या निवडा निवडीतून लक्षात आली. त्याच बरोबर असेही लक्षात आले की अशी कृत्रीम पिकविलेली केळी बाजूला काढून ठेवली की स्वामींना केळे म्हणून खाण्यास मिळत नसे. सारेच व्यापारी कच्ची केळी पिकवून विकतात. मग नैसर्गिक पिकलेली केळी कशी मिळणार? यामुळे स्वामींना रात्रीचा उपवास पडू लागला.

इतके पाहिल्यानंतर बाळासाहेबांना असे वाटू लागले. की स्वामींना उपवास पडण्यापेक्षा बाहेरच्या बाहेर बाजारातून केळी आणतानाच पाहून तपासून आणावीत. काळी कळी काढून टाकून केळी स्वच्छ करावीत. थोडा फार दोष लागला तरी तो सद्गुरुंच्यासाठी सहन करावा. असे बाळासाहेबानी ठरविल्या दिवसापासून स्वामींना केळी त्यांच्या मनासारखी देता येऊ लागली. ती केळी स्वामीजी यथेष्ट खात असत. ते पाहून मनाला बरे वाटे.

स्वामींना औषधांची व झाडपाल्याची माहिती खूप होती. एकदा बाळासाहेब नेहमीप्रमाणे स्वामींच्या बरोबर फिरावयास गेले होते. शहराच्या बाहेर पडल्यावर स्वामींना एक लहर आली. ते बाळासाहेबांना म्हणाले " तांब्याचा पैसा आहे का खिशात, असला तर द्या मला. मी तुम्हाला तो चांदीचा करून देतो. " स्वामींचे हे शब्द ऐकून त्यांना गंमतच वाटली. त्यांनी खिसे चाचपून पाहिले. कर्मधर्मसंयोगाने एक तांब्याचा पैसा खिशातून निघाला. स्वामींनी तो घेतला बाळासाहेबांना तेथेच थांबण्यास सांगून जरा दूर गेले. खाली वाकून कुठलासा पाला तोडला. तो कुसकरला व त्याचा रस त्या पैशाला चोळत चोळत परत आले. तांब्याच्या पैशाला तो झाड-

पाल्याचा रस लागताच पैशाचा रंग बदलून पैसा चांदीच्या आठ आण्यासारखा दिसू लागला. तो चांदीचा पैसा दाखवीत स्वामींनी विचारले "क्या ? सीखना है यह विद्या ?" बाळासाहेबांनी नाही सांगितले. स्वामींच्या सहवासात बराच काळ राहिल्यावर स्वामींच्याकडून काय घेतले पाहिजे याची जाणीव झालेले साधक इतकी सामान्य गोष्ट मागू शकत नाहीत. प्रसंगी इच्छा असली तरी त्यावेळी जीभ रेटत नाही.

११) स्वामींनी ज्ञानेश्वरच्या खोकल्यासाठी सोपे व गुणकारी औषध सांगितले होते. मृगशृंग भस्म व तुरटीची लाही एकत्र करून मधात कालवून ते चाटण घेणे. या औषधाचा गुण चांगला आला.

१२) एकदा, गुरु करण्याची समाजात जी प्रवृत्ती आहे तिचा उथळपणा स्वामींनी सांगतांना सांगितले. गुरु करण्याची इच्छा चांगली असते पण त्यात भोळेपणाच फार आढळतो. गुरु कसा असावा याचे शास्त्रीय मूल्यमापन नसते. कमीत कमी आपल्यापेक्षा श्रेष्ठ वर्णाचा असावा किंवा आपल्याच वर्णाचा असावा हे सुद्धा पाहिले जात नाही. या संदर्भात स्वामींनी संतश्रेष्ठ तुकारामांचा एक अभंग पाठ म्हणून दाखविला तो पहा—

**डिवेना डसेना बुजेना निर्मळ । परि अमंगळ स्वीकारीना ॥ १ ॥**
**परंतु गर्दभ अपवित्र जाणा । पर्वकाळी दाना देऊ नये ॥ २ ॥**
**डिवी लात्री बुजे बहु नेदी दूध । मुखीं नाही शुद्ध विष्ठा खाय ॥ ३ ॥**
**परंतु ते गाय पवित्र हो जाणा । पर्वकाळी दाना देऊ जेते ॥ ४ ॥**
**ब्राह्मणे ब्राह्मणा सद्गुरु करावा । परि न करावा शूद्रादिका ॥ ५ ॥**
**तुका म्हणे देवे सांगितली सोय । म्हणोनि त्याचे पाय धरिले जीवे ॥ ६ ॥**

१३) स्वामी संन्यासाश्रम व ब्रह्मचर्याश्रम यामधील आचारासंबंधी बोलत असता म्हणाले स्त्रीचे मुख पाहू नये हे तर आहेच पण काष्ठाच्या पुतळीला जरी स्पर्श झाला तरी सचैल स्नान करावे. स्वामींच्या जीवनात जी निष्कलंकित स्थिती सापडते त्याचे मर्म या मनोभूमिकेत आहे.

१४) एकदा स्वामींना काय पाहिजे असा प्रश्न विचारल्यावर आत्मरत

स्वामीजी म्हणाले " हमें जल, जंगल, जिज्ञासू की आवश्यकता है। और कुछ नहीं चाहिये। इनके सीवा हमारा कुछ चलता नहीं।" जिज्ञासूसंबंधी असे स्पष्टीकरण केले की आम्ही समाजाला खूप देऊ इच्छितो पण योग्य जिज्ञासूलाच आम्ही देऊ शकतो. जिज्ञासा नसलेल्याला देणे म्हणजे दगडावरचे बी ठरते.

## जूठे दूध पिलाते हो ?

स्वामींच्या सेवेत जी काही भाग्यवान साधक मंडळी होती त्यामध्ये गोपाळराव खेर म्हणून एक होते. यांनीं स्वामींचे दर्शन फार पूर्वी म्हणजे इ. स. १९३५ च्या सुमारास आणि तेही सागरला घेतले आहे. त्यावेळी गोपाळराव लहानही होते आणि पुढे या स्वामींचा आपला एवढा मोठा सहवास येणार आहे याची कल्पना त्यावेळी आली नाही. पण अलिकडे स्वामींचे पुण्यातील वास्तव्य गोपाळरावांना स्वामी सेवेचा परमानंद देऊन राहिले होते.

सत्पुरुषाची सेवा ही अत्यंत दुर्मिळ असते त्याचप्रमाणे ते अत्यंत कठीण व नाजुक, सोपे व अवघड असे काम असते. या सेवेची अवघड गोष्ट अशी असते की ज्यावेळी ते सत्पुरुष स्वतःहून काम सांगत असतात त्यावेळी तंतोतंत त्या शब्दाप्रमाणे आणि त्यांच्या इच्छेप्रमाणे व्हावे लागते. ज्यावेळी साधक आपल्या इच्छेने जे दिसेल, जे वाटेल असे काम गुरूसेवा म्हणून करीत असतो त्यावेळी विशेष प्रश्न उत्पन्न होत नाही. स्वामींची सेवा यापेक्षा कठीण असे. शिष्य काम स्वतःच्या मनाने करू लागला तरी स्वामी त्यात लक्ष घालतील. त्यातील उणीवा व दोष दाखवून देतील. यामुळे शिष्याला वैचारिक उमज चांगलाच पडतो पण मनाला खूपच मार सहन करावा लागतो.

स्वामींचा मुक्काम २० नारायण पेठेत, श्रीगुरुमहाराजांचेकडे होता. श्रीगुरुमहाराज कुठे गावाला गेले होते. त्यामुळे नारायणराव ढेकणे, बाळासाहेब वाकडे, प्रभाकार सोवनी, गोपाळराव खेर या तरुण साधकांना गुरु सेवेची मेजवानी असे. प्रत्येकाने उचलता येईल ती ती सेवा आरंभिली. कुणी खोलीची स्वच्छता करतो तर कोणी स्वामींची भांडी साफ करतो तर कोणी स्वामींच्या छाट्या धुतो. याशिवायसुद्धा अनेक कामे असायचीच. स्वामींच्याकडे गेल्यावर काहीच काम मिळाले नाही असे बहुधा होत नसे. पण हे भाग्य मर्यादित साधकांपुरते असायचे.

या काळात गोपाळरावांचेकडे रोज सकाळी दूध गरम करून देण्याचे काम आले. आधी हे काम दुसऱ्या साधकाकडे होते. पण गोपाळरावांना आपण हे काम करावे असे वाटले. सेवेची अशी मजा पुष्कळ वेळा दिसते की दुसरा साधक जी सेवा करतो ती आपण करावी असे बहुतेक साधकांना वाटते. आपण खूप आणि चांगली सेवा करावी अशी सद्भावना यामध्ये असते. अशामधूनच अनेक गोष्टी शिकायला मिळतात. गोपाळरावांचे स्वामींना दूध गरम करून देण्याचे काम सुरू झाले.

रोज सकाळी स्वामींच्याकडे जावे. दूध घेऊन यावे. स्टोवर तापवावे आणि भांड्यातून त्यांना द्यावे. दूध पिऊन झाल्यावर ते भांडे धुवून टाकावे. इतका साधा, सुटसुटीत कार्यक्रम होता. पण हे काम या पद्धतीने झाले, स्वामींना बरे वाटले की गोपाळरावांना परमानंद होत असे. पण एकदा असे झाले की या कामात जरा गडबड झाली.

त्याचे असे झाले की गोपाळरावांनी दूध तापत ठेवले आणि त्या वेळात दुसऱ्या कुठल्याशा कामासाठी ते त्या स्टोजवळून दूर गेले. आणि काय? स्टोच तो! तेव्हढ्यात दूध भराभर वर येऊ लागले आणि ओतू जाणार तर गोपाळरावांना दूध तापत ठेवल्याची आठवण झाली. ते लगबगीने स्टोजवळ आले आणि दूध ओतू जाऊ नये म्हणून तोंडाने पटकन त्यावर फुंकर मारली. स्वामी समोर खिडकीजवळ आसनाजवळ बसलेले होते. त्यांना गोपाळरावांची धावपळ आणि दुधावर मारलेली फुंकर लक्षात आली. त्याबरोबर ते मोठ्याने गरजले। "जूठे दूध पिलाते हो? मुझे वह नहीं चाहिये।"

गोपाळरावांना शरमल्यासारखे वाटले. फार वाईटही वाटले. मन नाराज झाले. इलाज एवढाच होता की स्वामींना दुसरे दूध तापवून देणे. तेवढे त्यांनी केले. तेव्हा त्यांना बरे वाटले. पण दुधावर फुंकर मारली की ते उष्टे होते ही गोष्ट मात्र जन्मभर लक्षात राहिली. कोणताही अन्नपदार्थ देवाला समर्पण करताना, सद्गुरुंना देताना वा अन्य कोणाला देतांना उष्टा नसावा, शुद्ध असावा हा आचारधर्म या प्रसंगातून गोपाळराव शिकले. त्यांनी हा प्रसंग आपल्याला सांगितला म्हणून आपणही शिकलो. हे स्वामींचे लक्ष असे. शुद्धत्वाला लेशमात्र मालिन्य खपत नाही तेव्हाच ते पूर्ण शुद्ध होत असते. त्यात सवलत, चालढकल, टक्केवारी कशी खपविता येईल.

# स्वामीजी व प्रभाकर सोवनी

सध्या सरकारी तंत्रशाळेत प्रधानाचार्य म्हणून महाराष्ट्र राज्यात श्री. प्रभाकरपंत सोवनी नोकरीस आहेत. त्यांचा स्वामींशी संबंध इ. स. १९४७ पासून आला. त्यांचे स्नेही श्री. बाळासाहेब वाकडे आणि श्री. नारायणराव ढेकणे यांच्यामुळे स्वामींचा सहवास व सेवा मनमुराद करता आली. आयुष्यात सत्संगतीचे योगायोग यावे लागतात. ते योग ज्यांना येतात ते भाग्यवान ! प्रभाकर सोवनी अशा भाग्यवंतांचे-पैकी आहेत.

पुण्यात स्वामींचा मुक्काम असला की त्यांचे पडेल ते काम करावयाचे आणि बाकी वेळ त्यांच्या सहवासातील चैतन्याचा आनंद अनुभवीत बसायचे ! हा क्रम सोवनींनी कधी चुकविला नाही. स्वामींचा मुक्काम बॅ. खाजगीवाले यांचेकडे होता तेव्हा स्वामी फक्त भिक्षेपुरते त्यांचे घरी येत बाकी सारा दिवस रामेश्वर मंदिरा-जवळच्या श्रीमार्कंडेयाचे मंदिरात मुक्काम असे. दुपारी बारा वाजता भिक्षेच्या वेळी स्वामींना मंदिरातून बॅ. खासगीवाले यांच्या घरी आणावयाचे, भिक्षेची जागा गायीच्या शेणाने सारवून घ्यायची, भिक्षेची पूर्व तयारी करावयाची, नंतर त्यांची भिक्षा झाल्यावर त्यांना घेऊन परत मंदिरात घेऊन जायचे ही कामे प्रभाकर सोवनी करीत असत. याशिवाय छाट्या धुणे, भांडी घासणे ही सेवाही त्यांचे हातून बरीच झाली. स्वामींचा अनुग्रह त्यांना लाभला. स्वामींच्या बरोबर पुष्कळ वेळा फिरावयासही ते गेलेले आहेत.

एकदा त्यांनी स्वामींना विचारले " स्वामी ! सप्तलोक ही कल्पना आहे का खरी स्थिती आहे ? " त्यावर स्वामी म्हणाले " मी स्वतः हे सप्तलोक पाहिलेले आहेत. " कसे पाहिलेत या प्रश्नाचे उत्तर त्यांनी दिले की " सूक्ष्म देहाने पाहिले " त्यावर ते गंभीर होते. यापुढे ते म्हणाले " **आपली तयारी नसताना प्रश्न केला तर उत्तराचा काही उपयोग होत नाही पिशाच्च योनी सत्य असली तरी ज्याला त्यातले काही समजले व अनुभव आला आहे त्याला ती जितकी खरी वाटेल तितकी इतरांना वाटणार नाही. मला पिशाच्च चांगले दिसते. प्रत्येकाला ते दिसत नसते** "

स्वामींची आशीर्वादात्मक व मार्गदर्शनपर पत्रे येत असत.

## "बड़े ऋणानुबंधी" श्री. नारायणराव ढेकणे

स्वामींच्या सहवासात आलेल्या साधकांपैकीं श्री. नारायण यशवंत ढेकणे हे एक अमोल रत्न आहे. नारायणरावांना स्वामींचे दर्शन घडविले श्री. बाळासाहेब वाकडे यांनी. वीस एकवीस वयामध्ये, तारुण्याच्या उंबरठ्यावर पाय ठेवतांना स्वामींचे दर्शन घडले, दीक्षा झाली यामध्येच नारायणरावांच्या सुप्त अध्यात्मवृत्तीच्या वल्लरीला महान संरक्षण मिळाले. या प्रचंड संरक्षणामध्ये राहून नारायणरावांनी जीवनाचे आदर्श चित्र साकार करीत आणले आहे. त्यांच्या अंत:करणातील स्वामींचे भाव शब्दांतीत आहेत. खरोखर त्यांचा श्वासोच्छ्वास स्वामींच्या स्मरणाने चालू आहे, एवढे ते स्वामींशी एकरुप आहेत. स्वामींच्या ठिकाणी श्रीगुरुमहाराज आहेत ही त्यांची दृढश्रद्धा आहे. त्यांचेशी ज्यांचा संबंध आलेला आहे त्यांना याचा अनुभव येतो.

नारायणराव कॉलेजमध्ये असतांना स्वामींकडे आले देशभक्तीचे धडे घेत असताना अध्यात्मात शिरले. ते लहानपणापासून व्यायाम, आसने, योग या विषयात रमत असत. या तरुण वयात अध्यात्माचे गांभीर्य व त्याचा अर्थ याची जाण नव्हती तरी अन्त:करणाची खेच मात्र इकडेच होती. एकदा प्रारंभ झाल्यापासून स्वामींचे नित्य दर्शन चुकत नसे कारण आतून ओढ लागलेली असे. सकाळी कॉलेजमध्ये जाण्यासाठी घरून निघावे, मध्येच शंकरराव मार्कंडांच्या 'गृरुकृपेत' स्वामींना साष्टांग नमस्कार घालावा, अर्धापाऊण तास थांबावे आणि मग कॉलेजला जावे. पुष्कळ वेळा त्यांना असे वाटे की पुन्हा संध्याकाळी स्वामींच्याकडे जावे. ही आंतरिक ओढ एवढी जोरदार असे की अभ्यास, मित्रांच्या भेटी गाठी यांची व्यवस्था करून नारायणराव स्वामींच्याकडे जात असत.

नारायणरावांनी स्वत: करीत असलेली आसने स्वामींना करून दाखविली. पूर्ण मत्स्येंद्रासन करून दाखविताना महाराज तेथे होते. ते स्वामींना म्हणाले "आसने चांगली करतो." स्वामी पण म्हणाले "अच्छा है" स्वामींचे व्यक्तिमत्त्व इतके प्रभावी असे की केवळ त्यांचे दर्शन आणि सहवास कितीही घेतला तरी अपुरा वाटत असे. यातूनच श्रद्धा मूळ धरू लागली. स्वामीजी नारायणरावांची विचारपूस करू लागले. त्या काळात जाणीवेच्या मर्यादा संकुचित असल्याने बोलताना, वागताना, काम करताना चुका होत असत. मग स्वामी ओरडून सांगत "ऐसा नहीं करना" स्वामींना काहीही देताना डाव्या हाताने दिले की म्हणत "ना ! ना ! बांये हाथसे कुछ नहीं

देना।" एकदा अशीच काही चूक झाली त्यावेळी खूप बोलले. त्यातले एवढे वाक्य अजून चांगले आठवते "अरे! गुरु प्रत्यक्ष राजा है राजा! क्या हम राजासे ऐसा बर्ताव करते हैं? कल्पना नहीं गुरु यह क्या चीज है। अच्छा, अच्छा, अब ध्यानमें रखो।"

स्वामींच्याकडून नारायणरावांना एकदा मजेदार अनुभव आला. बोलता बोलता प्रकृतिसंबंधी नारायणराव म्हणाले त्यांना भूक नीट लागत नाही. यावेळी महाराज तेथे समोर बसले होते त्यांचेकडे पाहात स्वामी म्हणाले "देखो! अब पास करता हूँ।" असे म्हणत त्यांनी नारायणरावांना "बताव तुम्हारा पेट?' असे म्हटले. इतके बोलून त्यांनी पोटावर हात फिरवला. त्याक्षणापासून पचन आणि भूक याबद्दल गेल्या २२।२३ वर्षात तक्रार नाही. त्यानंतर स्वामी नारायणरावांच्या पोटाची व भुकेची चौकशी करीत असत. पण आता ठीक आहे. त्या दिवसापासून औषधे न वापरताही दुखणे न भूक ठीक आहे. स्वामींना ते उत्तर ऐकून समाधान वाटत असे.

नारायणरावांची दीक्षा—स्वामींची दीक्षा होणे सोपे नसे। दीक्षा मागितल्यावर उलट तपासणी सुरू झाली की विचारणाऱ्याला आपल्या अपात्रतेची जाणीव होऊ लागत असे. स्वामींना आणखी काही सांगावे असे धाडस पुन्हा होत नसे. स्वामी म्हणत दीक्षा "होने पानेकी चीज है। लेने देनेकी नहीं।" "मुझे अपना दल बढाना नहीं है।" "छः छः महिने छाटी लंगोटी धोनेवालोंको भी दीक्षा नहीं हुवी। तुमने तो क्या किया है?" "सवा लाख गायत्री करके आवो" अशा ठिकाणी दीक्षेची मागणी सोपी गोष्ट नसे. कधीं कधी तर स्वामी हेच विचार रागावून बोलताना नारायणरावांनी पाहिले होते म्हणून नारायणरावांनी स्वामींच्या जवळ दीक्षेचे विषय काढण्यापूर्वी बाळासाहेबांना विचारले. बाळासाहेब म्हणाले स्वामी काय सांगतील ते सांगणे कठीण आहे. पण तुमचा विषय तुम्हीच त्यांचेजवळ काढला पाहिजे. ताकाला जायचय मग भांडे लपविण्यात काय अर्थ? त्याप्रमाणे एकदा संधी दिसताच, नारायणरावांनी स्वामींना प्रार्थना केली. "स्वामी मला दीक्षा व्हावी." स्वामी एकदम म्हणाले "अब नहीं कॉलेज की पढाई चालू है, बादमें देखा जायेगा।" या उत्तराने नारायणराव नाराज झाले. प्राप्तकाल घडी आली नाही, असा विचार करून गप्प झाले. असे जरी झाले तरी त्यांचा नित्यक्रम चुकला नाही. स्वामींच्या सेवेत अंतर पडले नाही.

खरं म्हणजे गुरुवारचा दिवस पाहून स्वामींना त्यांनी विचारले होते. गुरूचा वार, काम होणार म्हणून तो दिवस योजला होता. शुक्रवार गेला, शनिवार चालला 'अब नहीं' चे दु:ख कमी झाले. जेव्हा स्वामींची इच्छा होईल तेव्हा तरी काम होणार आहे, हे काय कमी झाले. अशा तंद्रीत नारायणराव स्वामींच्याकडे गेले. शनिवारची संध्याकाळ ती होती. शनिवार म्हणजे न कर्त्याचा वार. पण तोच येथे फायद्याचा झाला. येथे काही करावयाचे नसते. जे होईल ते फक्त पाहात बसणे. नारायणरावांनी स्वामींना नमस्कार केला. त्यांच्याजवळ उभे राहिले तेवढ्यात स्वामी म्हणाले "कल सुबह स्नान करके, मातापिताको वंदन करके उनकी आज्ञा लेकर आवो। उनको यह सब बताओ। कल तुम्हारी दीक्षा होगी।" नारायणरावांना स्वामींच्याकडून निघण्यास रात्र झाली. दुकाने बंद होण्यापूर्वी हार, नारळ, पेढे घेतले. बाळासाहेब वाकडे हे जिवाभावाचे स्नेही असून, नारायणराव उशीर झाल्यामुळे, त्यांना ही बातमी सांगू शकले नाही.

नारायणरावांची दीक्षा इतक्या झटपट होईल असे कुणासही वाटले नव्हते. 'पुरुषस्य भाग्यम्' म्हणे देवालाही कळत नाही. रविवारचा दिवस उगवण्यापूर्वी नारायणराव स्नान संध्या उरकून मातापित्यांना वंदन करून त्यांची आज्ञा घेऊन स्वामींच्याकडे निघाले. आपला नारायण स्वामींच्याकडे जातो, हे आईवडिलांना ठाऊक होते. दीक्षेची गोष्ट तर शनिवारी रात्रीच घरी गेल्या गेल्या त्यांना सांगून नारायण-रावांनी परवानगी घेऊन ठेवली होती त्यांचे आई आणि वडिल अत्यंत प्रेमळ आहेत. नारायणचे लक्ष देवाधर्माकडे, जास्त प्रमाणात असल्याचे पाहून मातापित्यांच्या मनाला संतोष वाटत होता. बाळासाहेब वाकडे यांना नारायणची दीक्षा झाली हे पुढे दोन दिवसांनी समजले तेव्हा त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. त्यांनी स्वामींना विचारले "आपण आधी नाही म्हणून इतक्या लवकर दीक्षा कशी झाली?" त्यावर स्वामी म्हणाले "नारायण का और मेरा बडा ऋणानुबंध है, इस वास्ते ठहर न सका."

दीक्षा झाली त्यावेळी दीक्षादिनासंबंधी काही विचारपूस झाली नाही. नारायणरावांच्या लक्षात नंतर आले की त्यांचे कुलदैवत खंडोबा. त्याच्या षड्-रात्रीच्या उत्सवाच्या पहिल्या दिवशी म्हणजे मार्गशीर्ष शु० १ स दीक्षा झाली. नारायणरावांचे अनुभव बाह्य असे काहीच दिसले नाहीत. त्यांची बैठक म्हणजे एकदम स्थिर. एकदा आसन लागले आणि मेरुदंड ताठ झाला की निर्वात जागेतील

नंदादीपाची ज्योत जणू! त्यांना अनुभव फार आहेत. पण सांगण्याला बंधन स्वामींचेच आहे.

१) नारायणरावांनी स्वामींचा सहवास अल्पकाळात बराच घेतला आहे. स्वामी ज्यांच्यामध्ये रमून, रंगून जात अशापैकी नारायणराव आणि बाळासाहेब आहेत. स्वामींच्याबरोबर फिरायला जाण्याची मिळेल तेवढी संधी या दोघांनी घेतली आहे. फिरण्यातली मजा गप्पागोष्टीत असते. त्यातून स्वामींच्या गप्पागोष्टीत मजाच-मजा असते. विषयांची व्यापक विविधता असते तर ध्येयाचे सूत्र एकमेव व पक्के असते. स्वामींना न्याहळून पाहाण्यासाठी त्यांच्या सहवासाची एकही संधी या दोघांनी सोडली नाही. स्वामींना फिरण्याची, चालण्याची, व्यायामाची एवढी आवड की एकदा नारायणरावांना संध्याकाळी स्वामींच्याकडे जाण्यास उशीर झाला. ते स्वामींच्या दर्शनासाठी थांबून राहिले. स्वामी ३।४ तास बाहेर गेले होते. बाहेरून आले ते घामाने निथळत आले. अंगावरची छाटीसुद्धा ओलीचिंब झाली होती. स्वामींना एवढे ओलेचिंब झालेले पाहून नारायणरावांना व जमलेल्या मंडळींना आश्चर्य वाटले.

२) एकदा नारायणराव स्वामींच्या बरोबर फिरावयास गेले होते. नदीच्या काठाकाठाने चालले होते. पुणे शहर आणि नदीचा काठ, त्यातून वेळ सायंकाळची, स्वाभाविकपणे तरूण जोडपी त्या भागातून स्वैरपणे हिंडत होती. तेव्हा नारायणराव स्वामींना म्हणाले ही माणसे पहा कशी वागतात. त्यांना कशाचा धरबंद नाही. त्यावर स्वामी विनोदाने कसे म्हणतात—

"ते जीवन्मुक्त आहेत. त्यांच्यात स्त्रीपुरुष भेद नाही. आपण बद्ध आहोत ते नाहीत."

३) स्वामींच्या जवळ अनेक विद्या आणि सिद्धी होत्या, हे त्यांच्याच बोलण्यावरून व अनुभवांवरून लक्षात येते. 'दूरश्रवण' आणि 'दूरदर्शन' या विद्या त्यांना अवगत होत्या याची त्यांनी प्रचीती सुद्धा दिली. स्वामी शंकरराव मार्कंडाकडे होते. तिकडे नारायणराव दर्शनास गेले. तेथे थांबले. स्वामींचे अंग चेपू लागले. तेव्हा मध्येच स्वामी म्हणाले "अभी वाकडे अपने घरमें क्या करता है यह मैं इधरसे देख सकता हूँ।" यासंबंधी स्वामींनी नारायणरावांना विचारले होते

ही विद्या तुम्हाला हवी का? त्यावेळी सांगितले "स्वामी आपली कृपा हवी. या विद्या नकोत. त्यात गुरफटण्यापेक्षा नसलेल्या बऱ्या, आपल्या परम कृपेत सारे काही आले." स्वामींना या उत्तराने फार संतोष झाला. खरी दृढ श्रद्धा निर्माण होत चालली म्हणजे जीवनाचे लक्ष्य एकाच ठिकाणी केंद्रित होत जाते. आवांतर गोष्टी त्यामानाने गौण वाटू लागतात. मनाची ही उत्तम स्थिती स्वामींच्या सहवासाने, नित्याचे साधनाने त्यांचेमध्ये निर्माण झाली होती म्हणून तर इतके उत्तम व निर्मळ उत्तर त्यांच्या तोंडून निघाले. असाच दुसरा एक प्रसंग आहे. स्वामींनी नारायण-रावांना 'वीर विद्या' हवी का? असे विचारले तेव्हाही नारायणरावांनी हेच उत्तर दिले की "स्वामी फक्त कृपा हवी बाकी नको."

याच संदर्भात स्वामींनी एक अनुभव सांगितला. फक्त वीस दिवस कडक ब्रह्मचर्य पाळून एक विशिष्ट साधन केले तर 'वीरविद्या' प्राप्त होते. या वीर विद्येच्या प्राप्तीने जगातील कोणतीही वस्तू आकर्षून घेता येते. एकदा ही विद्या एकाला स्वामींनी दिली. त्याला या विद्येचे चांगले अनुभव येऊ लागले. पण पुढे पुढे त्याची बुद्धी फिरली. या उत्तम विद्येचा तो दुरुपयोग करू लागला. त्याने या विद्येच्या जोरावर स्त्रियांना आकर्षून घेण्यास सुरवात केली. तो मनात आणील ती स्त्री त्याच्याकडे येऊ लागली. त्याचे हे अधःपतन स्वामींच्या लक्षात आल्याबरोबर त्याला ते खूप बोलले. आणि त्या दिवसापासून त्याचे हे साधन काढून घेऊन कायमचे बंद करून टाकले. विद्या उत्तम असतात पण त्यांचा दुरुपयोग होतो म्हणून या काळात त्यांच्या मागे लागू नये.

स्वामींना औषधींची माहिती चांगली होती. ते म्हणत "मला आतून कुणी तरी औषध सांगते. मला काही माहीत नाही. तरी वेळ आली की कानावर शब्द पडतात व मी तसे सांगतो." स्वामीनी देवी रोगावर चंदनाचे तेल पोटात घेण्यास सांगितल्याचे नारायणरावांनी ऐकले आहे. शरीरातील उष्णविकारांच्या तीव्र उपाधीवर याचा उत्तम उपयोग होतो. पाच थेंब तेलाचे पाण्यातून अगर साखरेतून एकदा सकाळी घ्यावे. उपाधीचा उपशम होण्यास लागेल त्याप्रमाणे तेवढी सप्तके घ्यावीत.

स्वामींना विविध शास्त्रांची चांगलीच माहिती होती. विशेष म्हणजे ते नैष्ठिक ब्रह्मचारी आणि पुढे दंडी संन्यासी होते तरी त्यांचा कामशास्त्राचा अभ्यास

सुद्धा सखोल होता. सध्याचे सामाजिक अधःपतन, स्त्रियांचे विचित्र पोषाख, शरीराचे वेगवेगळे भाग उघडे टाकणे यामुळे पुरुष चंचल होतो आणि सामाजिक अधःपतन सुरू होते. याचा कामशास्त्रात असा उल्लेख आहे की शुक्ल पक्षात अमुक रंगामध्ये आणि शरीराचे अमुक ठिकाणी कामदेवाचे वास्तव्य असते तसेच कृष्णपक्षात अमुक ठिकाणी व रंगामध्ये वास्तव्य असते म्हणून त्या हेतूने वेश्यादि स्त्रियांनी तशा रंगाचा पोषाख करून व त्याप्रमाणे शरीराचे काही ठराविक भाग उघडे ठेवून फिरावे. सध्या समाजातील सर्व थरातील स्त्रिया जो पोषाख ज्या स्थितीत वापरतात त्यामध्ये आणि कामशास्त्रात वर्णन केलेल्या वेश्यामध्ये काहीही फरक नाही. स्वामींनी त्यातील वचने उधृत करून विवेचन केलेले होते.

साधक शिष्यांच्यावर स्वामींचे बारीक लक्ष असे. शास्त्रविरुद्ध वर्तन खपत नसे. एकदा नारायणराव स्वामींची भांडी घासघासून स्वच्छ करीत होते. ते स्वामींनी पाहिले व म्हणाले " बर्तन टूटेगा तो हमें कौन देगा ? " तसेच त्यांची वस्त्रे धुतांना जोरात आपटली तर म्हणाले ' संभालके धोना, छोटी लंगोटी फट जाये तो कौन देगा ? '

स्वामी पत्रव्यवहाराचे बाबतीत अत्यंत दक्ष असत. आपण पाठविलेल्या पत्राचे उत्तर उलट टपाली येत असे. आपण जोडकार्ड पाठविले नाही म्हणजे म्हणत " मला पोष्टात जाऊन कार्ड आणायला फुर्सत झाली नाही म्हणून उत्तरास वेळ लागला." इतकेच नव्हे तर एका साधकाने स्वामींना पाठविलेल्या पत्रात स्वामींची बिरुदावली "परमहंस परिव्राजकाचार्य श्रीसद्‌गुरु" अशी लिहिली नव्हती तर स्वामींनी त्या पत्राला उत्तर तर लिहिले नाहीच पण त्याचे साधनही बंद केले होते. ही माहिती सांगताना म्हणाले "आपल्या सद्‌गुरुंची बिरुदावली म्हणजे त्यांच्या प्रखर, तेजस्वी परंपरेचा गौरव आहे. ही शक्ती परंपरेमुळे संचारित होते. आमच्यामुळे नाही. तेव्हा बिरुदावली म्हणजे परंपरेचा गौरव. या बिरुदावलीचा अनुल्लेख म्हणजे परंपरेचा अपमान आहे."

स्वामींचा आवाज मधुर होता. त्यांनी म्हटलेली काही गाणी ऐकण्यास मिळाल्याने मन व कान तृप्त झाले आहेत. ते बंगाली गाणी म्हणत. हिंदी गाणी पण म्हणत. त्यांच्या गाण्यातला पुष्कळ वेळा अर्थही समजत नसे पण मनाला मात्र संतोष होत असे. गाणे म्हणताना स्वामींच्या तल्लीन झालेल्या चेहऱ्यावरचे भाव व डोळ्यातील आर्द्रता पाहूनच अर्थ कळल्याप्रमाणे वाटे. त्यांच्या एका हिंदी

गाण्यातील एक ओळ ते पुन्हा पुन्हा म्हणत ती अजून कानात ऐकू येते. " दो दिनका यौवन रे बाबा ! दो दिनका यौवन । " हे गाणे नारायणरावांना बऱ्याच वेळा ऐकण्याचा योग आला.

स्वामींना नारायणरावांनी आपल्या घरी भिक्षेस ( पुडीस ) मोठ्या प्रेमाने, आदराने व आग्रहाने नेले होते. घरातील सर्व भावंडे, आई व वडील सर्व उपस्थित होते. सर्वांना फार आनंद झाला. शक्य तेवढ्या काळजीने सर्व काही योजिले तसे करण्याचा प्रयत्नही केला. तरी " अज्ञानत्वात, अकल्पत्वात दोषा मम पदे, पदे " या न्यायाने ज्या काही उणीवा झाल्या असतील त्या स्वामींनी भिक्षेबरोबरच पोटात घातल्या व संतोषाचा ढेकर देऊन ढेकणे कुटुंबाला आनंद दिला.

स्वामींची प्रतिमा नारायणरावांच्या अन्तःकरणावर जी उमटली आहे त्याचे शब्द चित्र पुढीलप्रमाणे काढता येईल. स्वामीजी नेहमी ताठ बसत असत. वाचताना, लिहिताना सुद्धा ते पाठीच्या कण्यात बाक आणीत नसत. सारा मेरुदंड सरळ रेषेत मागेपुढे करीत. त्यांच्यापुढे वाचण्यासाठी पुस्तके ठेवण्याची घडीची बैठक असे. समोर पुस्तक उघडलेले, डोळ्यावर चष्मा चढवलेला. अशा स्थितीत स्वामींचे वाचन मान खाली घालून चालू असे. हाताने मधून मधून पाने उलटीत असत. एकदा का वाचनात रंगून गेले की कोण येतो, नमस्कार करतो, कोण जातो याचे भान त्यांना कित्येक वेळा नसे. त्यांच्या अस्तित्वाने वातावरण शांत नि चैतन्यपूर्ण असे. ते वाचीत असताना पुष्कळ वेळा नुसताच 'हम्ऽऽ हम्ऽऽ' असा दीर्घ मंद व शांत स्वर चालत असे. त्यावेळी पानांची व हातांची हालचाल बंद होई. असा पूर्ण स्तब्धतेचा बराच वेळ गेला की पुन्हा हातांची व पानांची हालचाल सुरू होई. समोर बसलेले लोक साधक असोत वा नवीन आलेले कुणी असोत सर्वजण चित्रासारखे स्तब्ध बसलेले असत. जणू सर्वांना मंत्राने भारावून टाकले आहे. अशा शांत बसण्याने सर्वांचे चित्त शांत होऊन प्रसन्न होऊ लागे. न बोलता केवळ स्वामींच्या सान्निध्यात बसल्याने या प्रसन्नतेच्या अनुभवाने मनातील अनेक प्रश्न विरून जात असत. यातूनच स्वामींच्या संबंधी नकळत आकर्षण उत्पन्न होई.

अशा या शांत, एकांत आणि चैतन्यपूर्ण सहवासाचा आनंद अवर्णनीय आहे. शब्दांच्या मर्यादेत आणणे अशक्य आहे. तेथून हलावेसे वाटत नसे. बाहेरच्या जगाची, आपल्या उद्योगाची, घरादाराची आठवण देखील येत नसे. असा अपूर्व

आनंदाने भरलेला स्वामींचा भरपूर सहवास नारायणरावांना मिळाला. त्यांच्या घरी प्रेमाने भिक्षेला जाऊन स्वामींनी त्या कुटुंबावरचे आपले निरतिशय प्रेम व्यक्त केले. सर्व कुटुंब कृपाश्रित केले हे त्या सर्वांचे महद्भाग्य !

एकदा एका भोजनप्रसंगी स्वामी स्वतः वाढीत होते. आग्रह होत होता. पंगतीतून हिंडता हिंडता स्वामी नारायणरावांचे जवळ आले व आग्रह करू लागले. पण नारायणरावांचे पोट भरलेले असल्यामुळे त्यांना काहीही नको होते. पण स्वामी तर आग्रह करून राहिले. तेव्हा नारायणराव पानावर आडवे पडून स्वामींकडे पाहून मोठ्याने "नको नको" म्हणत होते. त्यावेळी स्वामी म्हणाले "देखो कैसा सेर जैसा देखता है।" मग मात्र न वाढता पुढे गेले.

स्वामी काशीस गेल्यानंतर पत्रव्यवहारही झालेला आहे. त्यांच्या सान्निध्यात राहूनच शिक्षण झाले. त्यांच्या आशीर्वादाने बी.ई., बीएस्सी. या श्रेष्ठ पदव्या प्राप्त झाल्या. नोकरीही सरकारी, नद्याओढे यांच्या जलसंशोधन विभागात वर्ग एकचे अधिकारी म्हणून सध्या महाराष्ट्र शासनामध्ये आहेत. जीवनांत प्रपंच वाढविला नाही. आई वडिलांची तनमनधने करून सेवा चालू आहे. कठीण प्रसंगात सापडलेल्या सुहृदांचे भले करण्यासाठी सर्वकाही सहन केले. अत्यंत शांत, शिस्तीचे साधनसंपन्न जीवन ते आज घालवीत आहेत. सर्व अनुकूलता असून वैवाहिक जीवनाचा अंगिकार केला नाही. श्रीगुरुमहाराजांच्या जीवनाचा प्रभाव नारायणरावांच्या जीवनावर चांगलाच उमटलेला दिसतो. आजकाल अनेक अध्यात्म जिज्ञासू त्यांना मानतात अशी स्थिती आहे.

हे सर्व स्वामींचे देणे आहे म्हणून लिहिणे आहे.

## १९५० "कुठेही हिंडलो तरी शेवट काशीत हं !"

इ. स. १९५० मधली ही घटना आहे. स्वामी पुण्यात होते. स्वामी पुण्यात आल्याचे समजले की ताबडतोब दर्शनाला जाऊन यायचे असा सर्वांचा शिरस्ता होता. कारण पुष्कळ वेळा स्वामी पुण्यात आले असे समजले आणि उद्या त्यांच्या दर्शनाला जाऊन पहावे म्हटले तर स्वामी गावाला गेल्याचे समजे किंवा असेही पुष्कळवेळा होई, रोज त्यांच्या दर्शनाला जाणारा, एखादा दिवस गेला नाही आणि

तिसरे दिवशी गेला, तर स्वामी गावाला गेल्याचे त्याला समजे. म्हणून स्वामी आल्याची बातमी समजली की लवकरात लवकर दर्शन घेऊन यायचे असे बहुतेकांचे ठरलेले असे. स्वामी आले हा निरोप सुद्धा एकाने दुसऱ्याला, दुसऱ्याने तिसऱ्याला या पद्धतीने पण वायुवेगाने द्यावयाचा असाही एक संकेत असे. हे सारे स्वामींच्या बद्दल वाटणारी आत्मीयता व आकर्षण यामुळे घडत असे.

आता शिष्य परिवारही वाढलेला होता. स्वामी पुण्यामध्ये इ. स. १९२८ पासून येत होते. त्याला २२ वर्षे होत आली होती. जुन्या शिष्यांपासून नवीन संबंधितापर्यंत कोणाचे ना कोणाचे जाणे येणे होत असल्याने स्वामींची खोली मंडळींनी भरलेली असे. कोणी ना कोणी तरी स्वामींच्या जवळ असणारच.

एकदा नारायणराव देशपांडे (शिरवळकर) यांचा मुलगा दिगंबर हा आपल्या भाच्याला घेऊन स्वामींच्या दर्शनाला आला. त्या मुलाचे नाव विजय होते. वय ५।६ वर्षांचे होते. हा विजय नारायणरावांचा नातू. मुलीचा मुलगा. विजय लहानपणापासून मोठा गोड पोरगा होता. त्याला लहानपणापासून देवाचे वेड होते. स्वामींच्याकडे आल्याबरोबर दिगंबरने नमस्कार केला त्याच्या पाठोपाठ विजयने नमस्कार केला. विजयने नमस्कार करताच स्वामींनी त्याच्या पाठीवर सुंदर थाप मारली आणि त्याला आपल्याजवळ ओढून घेतले व स्वामी त्याचेशी बोलू लागले.

"विजय, यापूर्वी कुठे होतास हे आठवते का?" असे म्हणून स्वामी इतक्या जोरजोरात हसू लागले की त्या हसण्याने ते अक्षरशः लालबुंद झाले. नंतर थोड्या वेळाने पुन्हा विजयशी बोलू लागले. तसे कुणाला सांगता येते का? शक्य नाही. आपण कोठून आलो आणि कोठे जाणार आहोत हे कोणी सांगू शकत नाही. मी तुला ओळखतो तूच मला ओळखत नाहीस. मला हे चांगले समजते. तुला एक गंमत सांगू. मी कुठेही आणि कितीही हिंडत राहिलो तरी शेवटी काशीत जाणार. माझा शेवट काशीत आहे."

स्वामींचे उद्गार त्या ५।६ वर्षांच्या विजयला किती कळले असतील हे समजणे कठीण आहे. पण बाकीच्या ऐकणाऱ्यांना मात्र स्वामींचे ते शब्द समजले आणि लक्षात राहिले.

नारायणराव देशपांडे यांची आणखी एक छोटी आठवण येथेच पाहू. एकदा

नित्याप्रमाणे ते स्वामींच्या बरोबर फिरावयास जाण्यासाठी शंकरराव मार्कंडांच्या बंगल्यावर गेले. स्वामी वाट पहात होते. आणखी काही मंडळी फिरायला जाण्यासाठी आली होती. सर्वजण बंगल्याच्या बाहेर आले. स्वामी त्या बंगल्याकडे पहात उभे राहिले. बाकीचे सर्वजण त्यांच्या भोवती उभे राहून स्वामी जसे बंगल्याकडे पहात होते तसे पाहू लागले.

तेव्हा स्वामी नारायणराव देशपांडे यांचेकडे वळून म्हणाले "तुमको ऐसा बंगला नहीं चाहिये ? क्या शंकरराव का ऐश्वर्य है देखो।" स्वामींनी अचानकपणे चमत्कारिक प्रश्न केल्यामुळे नारायणराव एकदम बुचकळ्यात पडले. काय उत्तर द्यावे हे त्यांच्या गांगरलेल्या मनस्थितीला समजेना. म्हणून ते गप्पच राहिले. थोड्या वेळाने स्वामीजी कसे म्हणतात "जाने दो, इसमें क्या है ? ये दो दिन की माया है। यह अच्छा नहीं। अपने मार्ग में बाधा है बाधा।" असे म्हणून स्वामी चालू लागले. अशा प्रकारे स्वामी पुष्कळ वेळा स्वतःच प्रश्न निर्माण करीत व स्वतःच त्याचे समर्पक उत्तरही देत. अशावेळी प्रश्न निर्माण केला की तो खरा वाटे आणि उत्तर दिले म्हणजे प्रश्न खोटा ठरून उत्तर खरे वाटे. अशा छोट्या मोठ्या प्रश्नोत्तरांच्या चर्चेमधूनच "छिन्नसंशयः" होण्याची स्थिती निर्माण होत असते. पुढे घडणाऱ्या घटनांची सूचक जाणीव अशा बोलण्यातून स्वामी देत असत.

## स्वामींनी आश्रम विकला !

शंकरराव मार्कंडांच्या परिस्थितीत अतिवेगाने फरक पडू लागला होता. झालेला तोटा कर्जाच्या रुपाने त्यांच्या पुढे उभा राहिला होता. हजारो रुपये मालमत्ता विकून उभे केले आणि कर्जाचा काही भाग फेडला, तरी सुद्धा अनेक हजारांचे कर्ज विक्राळ मुख पसरून पुढे उभे होते ते होतेच. स्वामी हे पाहून काशीला गेले. तेथून शंकररावांना कळविले की–

"मला आश्रमाची बिलकूल गरज नाही. मी संन्यासी ! वृद्ध आणि आजारी ! माझा काहीच भरवसा नसतांना मला संन्याशाला घरदार कशाला ? हा आश्रम तुमची वास्तु आहे. तुम्ही यासाठी पैसा व कष्ट घेतले आहेत. मी तुमच्यासाठी मला पसंत नसतांना, आश्रम बांधण्यास, अनिच्छेने, संमती दिली. आता तुमची अडचण पाहून मला हा आश्रम ठेवावा असे वाटत नाही. थोडी रक्कम या

पैशातून भागली जाईल. तेवढीच काळजी कमी होईल. तरी माझ्या इच्छेसाठी या आश्रमाच्या विक्रीला आपण संमती द्यावी. मला लेखी उत्तराची अपेक्षा नाही. मी लवकरात लवकर आश्रम विकून येतील ते सर्व पैसे आपणाकडे पाठविण्याची व्यवस्था करतो. आश्रमाचे पैसे एकदम हातात पडल्यावर आश्चर्याचा धक्का बसू नये व मनाला खेद वाटू नये यासाठी मुद्दाम आधी कळवीत आहे.

याप्रमाणे सर्व काही सविस्तर, मोकळ्या व उदार मनाने लिहिले. स्वामींच्या या पत्राचे वाचन, शंकररावांनी नेत्रधारा वहात वहात केले. स्वामींच्या बद्दल वाटणाऱ्या श्रद्धा भक्तीच्या भावनांनी हृदय हेलावून गेले. काळाच्या क्रूर खेळामुळे दिङ्मूढ झालेल्या शंकररावांनी स्वामींना पत्र पाठवून शक्य तितके आपले हृदय मोकळे केले. अपराधाची पुनः पुनः क्षमायाचना केली. आश्रम विकू नये अशी इच्छा असूनही "स्वामींची इच्छा प्रमाण आहे" अशी मनोभूमिकाही पत्रातून व्यक्त केली.

आश्रम विक्री संबंधी स्वामींनी जांबवंतसिंह आदि मंडळीजवळ गोष्ट काढली. पहिले गिऱ्हाईक पंधरा हजार पाचशे रुपयांचे आले. जांबवंतसिंहाने या किंमतीत घर विकण्यास विरोध केला. स्वामींना थांबायला वेळ नव्हता. आणखी दोन वर्षे थांबलो तर दाम दुप्पट मिळेल म्हणून थांबता येण्यासारखे नव्हते. पैसा थोडा कमी मिळाला तरी सर्व व्यवहार रोखीने आणि ताबडतोबीने व्हावा अशी स्वामींची इच्छा होती. वेळेला यावेळी फार महत्त्व आले होते. तरी स्वामी "देश-चक्र प्रभावेण भगवान भूततां गतः" या न्यायाने गप्प बसले.

पुढे २/३ दिवसातच त्या घराला दुसरे गिऱ्हाईक आले. त्याने सोळा हजार रुपये किंमत सांगितली. स्वामींनी ती मान्य केली. सर्व रक्कम रोख ताब्यात घेतली आणि रीतसर पावती देऊन घराचा ताबा देऊन टाकला. हा आश्रमाचा ऋणानुबंध १६ ऑक्टोबर १९५० या दिवशी संपला. १३ डिसेंबर १९४६ पासून आश्रमात स्वामी राहण्यास आले. आणि अवघ्या साडेतीन/पावणेचार वर्षात आश्रमाचा प्रश्न कायमचा संपला. स्वामींनी हातात पैसे पडताच शंकररावांकडे ते पोहचते केले. दयार्द्रतेने स्वामींचे हृदय कळवळले आणि शंकररावांना पैसे देऊन टाकले.

## निःस्पृहस्य तृणं जगत्

मानवी शाश्वतमूल्ये सत्पुरुषांच्या स्वरुपाने साकार होत असतात. सत्पुरुषांचे

जीवन म्हणजे शाश्वत मूल्यांचा चालता बोलता ग्रंथसंग्रह असतो. सामान्य माणसाला ही शाश्वत मूल्ये कल्पनेत रम्य वाटत असली तरी आचरणाच्या भूमिकेने त्या मूल्यांचा विचार सुरू झाला की त्या सामान्य माणसाला चटके बसू लागतात. मग तो संतसत्पुरुषाकडे असामान्यत्वाच्या दृष्टीने पाहू लागतो. स्वामींच्याकडे पाहाताना त्यांच्यातील असामान्यत्व प्रखरपणे दिसते.

एके ठिकाणी जितेंद्रिय पुरुषाची लक्षणे सांगितली आहेत. स्वामींना ती सर्वच्या सर्व लागू पडतात.

**परद्रव्येषु योऽन्धश्च परस्त्रीषु नपुंसकः ।**
**परापवादे यो मूकः सर्वदा विजितेंद्रियः ॥**

स्वामींना कनक आणि कान्तेचा कधीही मोह झालेला नाही. जीवनाच्या धगधगत्या यज्ञकुंडातून आकाशाकडे झेप घेणाऱ्या वैराग्याच्या प्रदीप्त ज्वालांमुळे स्वामी बाह्य दोषांपासून सदैव सुरक्षित राहिले—अलिप्त राहिले. स्वामींच्या निष्कलंकित जीवनाचे रहस्य त्यांनी आमरण डोळ्यात तेल घालून जपलेले "वैराग्य" हे आहे. आज त्याचा व्यावहारिक अनुभव आपण अनुभवीत आहोत. स्वामींच्या निःस्पृहतेचे, वैराग्यवृत्तीचे, अनपेक्षपणाचे हे केवढे मोठे उदाहरण आहे. शिष्यांची संपत्ती उकळणारे गुरु सर्वत्र आढळतात परंतु शिष्याचा संताप म्हणजे त्रास नाहिसा करणारे गुरु क्वचितच आढळतात. शिष्यासाठीं आश्रम विकणारे सद्गुरु फक्त स्वामी श्रीलोकनाथतीर्थ हे एकटेच दिसतात. संतश्रेष्ठ कबीर म्हणतात की—

**"गाठी दाम न बांधहीं नहीं नारीसे नेह**
**कह कबीर वा साधूकी हम चरननं की खेह"**

जो कवडीसुद्धा कनवठीला बांधीत नाही आणि परस्त्रीशी स्नेहही ठेवीत नाही अशा साधूच्या चरणधुळीला आमचे अनंत साष्टांग नमस्कार आहेत.

## श्री. जाधव, पुणे यांच्या काही आठवणी

"माझा प्रथम संबंध आला तो श्रीसद्गुरु गुळवणी महाराजांशी आला. स्वामींना पहाण्याचा योग दीक्षा घेण्यापूर्वी आलाच नाही. श्रीगुरुमहाराजांचेकडे नित्य जाता जाता एकदा दीक्षेचा योग आला. दीक्षा घेतल्यानंतर दुसरेच दिवशी असे स्वप्न पडले की स्वामींचे प्रथम दर्शन स्वप्नात झाले. ते स्वप्न ऐकण्यासारखे आहे.

मी पुण्यात सदाशिव पेठेत, पुष्कर्णी हौदासमोर, देशमुखांच्या वाड्यात बरेच वर्षे रहातो. माझी एक खोली माडीवर व दुसरी खाली आहे. मी माडीवर झोपलो असताना एक संन्यासी स्वामी दंड कमंडलू घेऊन जिना चढून वर आले. भव्य आकृती होती. वर येऊन मला दरडावून म्हणू लागले– "उठो, उठो, अब भी सोते हो?" त्यांचा तो खणखणीत आवाज ऐकून मी चांगलाच चपापलो. पटकन उठून पाहिले तो समोर संन्यासी स्वामी उभे! मी चटकन बसल्या बसल्या त्यांच्या पायावर मस्तक ठेवून नमस्कार केला. पण काय बोलावे हे सुचतच नव्हते. मी हात जोडून अंथरुणावर बसून आहे तेवढ्यात पुन्हा ते जोरात म्हणाले "सीधे बैठो! पद्मासन लगावो" मला कल्पना असल्यामुळे मी लगेच पद्मासन घालून ताठ बसलो. स्वामींचा चेहरा उग्र होता. ते म्हणाले "अब प्राणायाम शुरू करो." मी होय म्हणून सुरुवात केली. "अब तीनो बंध लगावो" मला अक्षर बोलण्याची हिंमत होत नव्हती. त्यांनी पुनः जोरात सांगितले "लगावो"! स्वामींनी म्हणावे आणि ती कृती हातून घडावी असे होत होते. नंतर म्हणाले "खेचरी करो। जीभ उलट दो। उपर का द्वार बंद कर दो" आता मात्र मी हात जोडले व म्हटले "महाराज हे जमत नाही." असे म्हटल्याबरोबर स्वामींनी इतक्या मोठ्यांदा म्हटले "मैं यहाँ होते हुए, कैसा नहीं जमता? करो। जमेगा"

या वेळचा त्यांचा आवाज एवढा मोठा होता की त्या आवाजाने मी जागा झालो. ५॥/६ चा सुमार असेल. मी चूळ भरली आणि रिक्षा सुरू केली. २० नारायण मध्ये आलो. गुरुमहाराज बाहेर पडत होते. त्यांना मी नमस्कार करून स्वप्न सांगू लागलो. स्वप्नामध्ये जसा स्वामींचा आवाज, उच्चार, शब्द होते तसे महाराजांना सांगितले. हे सांगतांना नारायणराव मोघे व नाना भालेराव ऐकत होते. महाराज त्या दोघांकडे पाहून म्हणाले "स्वामींना न पहाता कसे हुबेहुब नाटक केले. स्वामींचे" माझ्याकडे पाहून म्हणाले "तुमची जबाबदारी त्यांनी घेतली. आम्ही निमित्ताला मधी आहोत. सारे काही त्यांचेच आहे. जाधव! स्वामींची कृपा तुमच्यावर आहे त्याचा हा अनुभव आहे. छान आहे."

२) श्री. जाधव यांनी दुसरी आठवण सांगितली. "स्वामींची सेवा पुष्कळांनी केली. पण त्यामध्ये शंकरराव मार्कंडांनी नंबर एकची सेवा केलेली मी पाहिली आहे. तशी सेवा अंबालाल शेटजींनी पण केलेली आहे. एकदा अंबालाल शेटजींच्या घरी

स्वामींचा मुक्काम होता. मी तिकडे दर्शनास गेलो होतो. स्वामींनी शेटजींना कॉफी करायला सांगितली. "ये बडे गुरुभक्त हैं, इनको कॉफी दो।" असे म्हणून मला कॉफी दिली. त्या दिवशी स्वामींचा डावा डोळा स्फुरण पावू लागला. ते म्हणाले "शेटजी, बाया नेत्र स्फुरता है, कुछ जरुर है"

त्यावर शेटजी म्हणाले "स्वामीजी! आपण संन्यासी, आपण पहिला संसार, पहिला देह, सारे काही सोडले. आता या शुभाशुभ गोष्टींचे काय?" स्वामी म्हणाले, "हां पहला संसार, आदि छोड दिया, यह सब ठीक है। परन्तु ये नया संसार मोल लिया उसका क्या करना? शंकरराव का संसार हमारा है। उसका सुख-दुःख हमारा सुख दुःख है। वैसे सारे शिष्योंका है।" स्वामी या विषयावरच खूप बोलले. त्यांच्या बोलण्यातला आशय असा होता की शिष्याचा आम्हाला अभिमान आहे. शिष्याचा तोटा म्हणजे आम्ही आमचा तोटा मानतो. शंकररावांना बजावले की हा धंदा वाईट आहे. पापी आहे. यामध्ये धोका आहे. सोडून दे. पण नाही!! इकडे पुण्यात स्वामी शंकरराव मार्कंडांबद्दल तळमळून बोलत होते त्याच वेळी ते मुंबईस रेस सीझनला गेले होते. त्या दिवशी त्यांना अनेक हजारांचे नुकसान झाले होते. दुसऱ्या दिवशी शंकरराव पुण्यास आले त्यावेळी स्वामींनी एकदम विचारले "नुकसान हुआ क्या।" त्यांनाही आश्चर्य वाटले. यापेक्षा जास्त बोलले नाहीत.

३) मला स्वामींचा सहवास फार लाभला. त्यांचे प्रेम मी अनुभवले आहे. स्वामींची लहर लागली म्हणजे इतके बोलत की तेथून उठावेसे वाटत नसे. मध्येच कुणी कुंडलिनीबद्दल विचारले की एकदम गंभीर होत. विषय टाळीत. आमच्याकडे टकमक पाहू लागले की त्यांची भीति वाटे. ते रागावले आहेत असे त्यांच्या मुद्रेवरून वाटे. एकदा त्यांच्या दर्शनास गेलो होतो तेव्हा न बोलता नुसते पहात बसले. मला काही सुचेना तेव्हा हात जोडून म्हटले "स्वामीजी गाडी लायी है" एवढे बोलल्याबरोबर ते खदखदून मोठ्यांदा हसू लागले व म्हणाले "वामन! ये जाधव सेवा करना चाहता है।" आणि पुन्हा हसले. नंतर मला म्हणाले "जायेंगे पर अब नहीं"

स्वामींचे बोलणे बहुढंगी असे. बंगाली, हिंदी, मराठी मधूनच इंग्रजी अशा भाषांचा एकदम वापर त्यांच्या बोलण्यातून होत असे. मराठीतील अभंग, ओव्या मध्येच त्यांच्या तोंडून ऐकावयास मिळाल्या म्हणजे आश्चर्य आणि आनंद वाटत असे.

४) एकदा स्वामींना काशीला जायचे होते. २।३ दिवस आधी ही बातमी माझ्या कानावर आली. त्याचवेळी मी त्यांना प्रार्थना केली की आपली रिक्षा आहे. वेळेवर येऊन स्टेशनवर पोहचते करीन. स्वामींनी संमती दिली. व म्हणाले ठीक ११॥ वाजता ये.

ठरल्या दिवशी स्वामी काशीला जाणार म्हणून अनेक साधक मंडळी निरोप देण्यासाठी 'गुरुकृपा' बंगल्यावर आली होती. स्वामीजी सुद्धा भिक्षा वगैरे उरकून तयार झाले. ११ वाजून गेले. श्रीगुरुमहाराज, शंकरराव मार्कंड, नाना भालेराव, बाळासाहेब वाकडे, आर्किटेक्ट डोंगरे इत्यादि मंडळी आली होती. बंगल्यासमोर दोन मोटारी उभ्या होत्या. एक श्री. डोंगरे यांची व दुसरी श्री. शंकररावांची.

सव्वा अकरा वाजले. स्वामींचे सामान खाली आणले. सर्वजण खाली येऊन उभे राहिले. मी गेलो नव्हतो. सर्वजण माझी वाट पहात होते. स्वामींनीच मी येणार म्हणून सांगितले होते. स्वामी सुद्धा दण्ड घेऊन खाली येऊन, फुटपाथवर, बंगल्यासमोर उभे राहिले. बाळासाहेब वगैरेंनी स्वामींना म्हटले "स्वामीजी मोटर तय्यार है। जाधव की रिक्षासे हम स्टेशन आयेंगे। आप मोटरमेंसे जाईये।" स्वामींनी ते ऐकले. म्हणाले "जाधव सेवा करना चाहता है, वह जरुर आयेगा।"

सर्वजण उन्हात उभे आहेत. वेळही बरोबर ११॥ ची झालेली आहे तरीही मी दिसेना तेव्हा सर्व मंडळी स्वामींना मोटारीत बसण्याचा आग्रह करू लागली. एकजण तर म्हणाला "जाधवला एखादे भाडे लागले असेल. आता तो येणार नाही." स्वामी शांतपणे रस्त्याकडे नजर लावून माझी वाट पहात होते. त्याचवेळी मी येत होतो. मला लांबून पहाताच स्वामी म्हणाले "वो देखो, जाधव आया।"

स्वामींनी दंड माझ्या हातात देत म्हणाले "जाधव तुम दंड लेना" स्वामी आत बसले. श्रीगुरुमहाराज शंकरराव मार्कंडांना म्हणाले "आपण स्वामींच्या शेजारी बसा" ते "नको नको" म्हणाले तेव्हा स्वामी म्हणाले "वामन तुमही आवो। शंकरराव गुरुके साथ नहीं बैठेगा।" मग तसे झाले. स्वामींचा दंड हातात घेण्यास मिळाला म्हणून जो आनंद झाला त्या आनंदात दंड घेऊन स्वामींना न दिसेल असा नाचलो. दंड पुढच्या बाजूने मागच्या सीटपर्यंत ठेवला. तेव्हा स्वामी म्हणाले "क्या रिक्षा भी सेवा करनी चाहती है?" मी म्हटले माझी रिक्षा आपलीच सेवा करणार.

आज दंड हातात मिळाल्यामुळे एवढा आनंद होण्याचे कारण पूर्वी स्वामी पुरंदरे कॉलनीत होते. तेव्हा माझा चुकून दण्डाला हात लागला तेव्हा ते रागावले. म्हणाले "क्षुद्र आदमी। शास्त्र समझता नहीं दंडको छुता है।" ती आठवण मनात होती. आज एकदम वेगळेच वातावरण. त्यावेळी मी नवीनच स्वामींकडे जाऊ लागलो होतो. मनाच्या शुद्ध भावाचा वाटा थोडा होता. खूप शंका मनात असत. पण आज भाव शुद्ध होते. सेवा व्हावी ही ओढ होती. त्याचा परिणाम असेल.

## साधू होऊनी साधूस ओळखावे

पुण्यामध्ये श्रीगुरुमहाराजांचा किंवा स्वामींचा मुक्काम नसला म्हणजे श्री. बाळासाहेब वाकडे पुण्यातील साधू, संत, सत्पुरुष यांचेकडे जात असत. त्यांचा हा छंद असे. यामधून प्रत्येकाची साधनपद्धती, आचारपद्धती समजत असे. त्या त्या सत्पुरुषाचे प्रभावी व्यक्तिमत्त्व कशात आहे हे समजण्यासाठी सत्संगाचा उपयोग होतो. चोखंदळ साधक हे करताना निःशंक असतात तसेच सश्रद्धही असतात. त्यांना आपल्या सद्‌गुरुंच्याकडून जे अमोल रत्न मिळालेले असते त्याचे मोल किती अमोल आहे हे अशामधून तर चांगले समजत असते. त्याचबरोबर चोखंदळ, तार्किक पण सात्त्विक मन आपल्या सद्‌गुरूंचे गुरुत्त्वही तपासत असते. ही उलाढाल त्यांच्या अंतर्मनात सदैव चालू असते. अशा सत्पुरुषांच्या गाठीभेटीतून खरोखर काही गाठी पडण्यासारखे असले म्हणजे मनाला मोठे समाधान लाभते. मग वाटते आपल्या सद्‌गुरूंना ते सांगावे किंवा जमले तर दाखवावे. श्री. बाळासाहेब वाकडे यांच्या संग्रही अशा माहितीचा फार मोठा साठा आहे. मग स्वामी पुण्यात आले की त्यांना सायंकाळी फिरावयास जाताना, क्वचित, कधी काळी, स्वामींची इच्छा असेल तर, अशा सत्पुरुषांची गाठ बाळासाहेब घालून देत. दोन महा-पुरुषांची ही हृद्य भेट आपल्या हृदयात साठवून ठेवायची हौस बाळासाहेबांना फार आहे. स्वामींना एका अघोरी साधूची गाठ घालून बाळासाहेबांनी दिलेली ही घटना आहे.

पुण्यात विजयानंद टॉकीजजवळ एक पानपट्टीचे दुकान आहे. त्याच्या मागील बाजूस एक खोली आहे. जवळच एक मुतारीपण आहे. अशा गलिच्छ वस्तीतील त्या पानपट्टीच्या दुकानामागच्या खोलीत एक सत्पुरुष रहात होते. त्यांचे नांव, गाव काही माहीत नव्हते. लोक त्यांना 'अश्वत्थामा' म्हणत. जवळपासचे

लोक त्यांना सत्पुरुष म्हणत. म्हणून जाणारे, येणारे, पहाणारे त्यांना सत्पुरुष म्हणत. बाकी याशिवाय त्यांचे वर्तन, कपडे, खोली काहीही पाहिले तरी सारे काही गलिच्छ, घाणेरडे होते. लोक मुतारीबाहेर लघवी करीत याबद्दल अज्ञान समजू शकते पण हे 'अश्वत्थामा' मात्र खोलीतच शुद्धीचे सर्व व्यवहार करीत. ते कशालाही बाहेर जात नसत. स्नान नाही, कपडे बदलणे नाही, स्वच्छता नाही; काही नाही. विशेष हे की ते विडी ओढीत असत. कोणाशी काही बोलत नसत. त्यांना कुणी जेवणाचे ताट आणून दिले तर ते तसेच ३/३ ४/४ दिवस तेथेच पडून राही. त्यातले पदार्थ नासले, कुजले म्हणजे त्यातला काही भाग खात. अशी किती तरी ताटे त्या खोलीत पडलेली असायची. डोक्याला टोपी सारखी असे. तोंडात विडी असे.

या सत्पुरुषाच्या डोक्यावर टाळूच्या ठिकाणी खोल खड्डा असून त्यामध्ये एक भोकही होते. तसेच विडी विझविताना ते जीभ बाहेर काढीत व त्यावर विडीचे जळते टोक ठेवून विझवीत असत. ही अपूर्व माहिती श्री. बाळासाहेब वाकडे यांचे स्नेही व स्वामींचा अनुग्रह घेतलेले साधक श्री. प्रभाकर सोवनी यांनी प्रत्यक्ष पाहिलेली होती. बाळासाहेबांनी या दोन गोष्टी पाहाण्याचा दोनदा प्रयत्न केला होता. पण त्या 'अश्वत्थामा' नावाने संबोधल्या जाणाऱ्या सत्पुरुषाने डोक्याची टोपीही काढली नाही आणि विडीही विझविली नाही. तरी सुद्धा आपली ही जिज्ञासा पूर्ण करण्याची इच्छा त्यांनी काही सोडली नाही.

त्या सुमारास महाराज पुण्यात नसतानाच स्वामी पुण्यात आले बाळासाहेब वाकडे यांनी श्री. प्रभाकर सोवनी यांचे कानावर स्वामी आले आहेत व त्यांना अश्वत्थाम्याकडे घेऊन जाऊया ही गोष्ट घातली. त्याप्रमाणे श्री. वाकडे व श्री. सोवनी हे स्वामींना घेऊन जाण्यापूर्वी ते अजून तेथे आहेत हे पहाण्यासाठी गेले. त्यावेळी ते गृहस्थ अक्षरशः उभ्याने लघवी करत होते. त्यांना त्याचा विधीनिषेध वाटत नव्हता. हे जरी खरे असले तरी या दोघांच्या असे लक्षात आले की जाणाऱ्या येणाऱ्याच्या मनांतही कुठली शंका येत नव्हती. अगदी निरागस बालकाच्या वृत्तीचा भास सर्वांना होत होता. या दोघांच्याही अन्तःकरणात किंचितही चलबिचल झाली नाही. सर्वात विशेष म्हणजे त्या खोलीत अनेक ठिकाणी लघवीची ओल होती पण किंचितही घाण वास येत नव्हता. (श्री. वाकडे शास्त्र विषयाचे पदवीधर असून प्रयोग शाळेत काम करीत असतात. सोवनी सुद्धा तंत्र विषयाचे पदवीधर आहेत) तेथे पडलेले अन्न दृष्टीला खराब दिसत होते तरी त्याची दुर्गंधी येत नव्हती.

हे दोघे आत गेल्यावर ते गृहस्थ विडी ओढू लागले व थोड्याच वेळात त्यांनी आपली जीभ काढून त्यावर ती विडी चर्रकन विझविली. त्या ठिकाणी त्यांच्या जिभेवर काळा डाग दिसला. ते काहीच बोलत नव्हते. हे दोघे सर्व काही निरीक्षण करण्याच्या दृष्टीने पहात होते. तेवढ्यात त्या गृहस्थाने डोके वाकवून टोपी काढून ठेवली. त्यावेळी टाळूवरचा खड्डा दिसला. याप्रमाणे वाकडे यांची इच्छा न बोलता पुरी झाली. यांनी बरोबर नेलेली तीन केळी त्यांच्यापुढे ठेवली— त्यातील एक केळे सोलून खाल्ले, दुसरे केळे सोलून खाल्ले. तिसरे तसेच ठेवून दिले. इतके झाल्यावर दोघांनी त्यांच्या पायावर मस्तक ठेवून नमस्कार केला व तेथून निघून आले.

ही प्रत्यक्ष अनुभवलेली हकीगत श्री. बाळासाहेब वाकडे यांनी स्वामींच्या कानावर घातली. स्वामींना तिकडे याल का म्हणून विचारल्यावर म्हणाले "जायेंगे!" त्याप्रमाणें श्री. वाकडे स्वामींना घेऊन अश्वत्थामा या सत्पुरुषाकडे गेले. स्वामी त्यांच्याजवळ जाऊन बसले. व त्यांना प्रश्न केला "कैसा है?" त्यावर कधीही न बोलणारे ते गृहस्थ म्हणाले "ठीक है?" बस्स एवढीच प्रश्नोत्तरे झाली. त्यावेळी त्याच्या डोक्याला टोपी नसल्याने टाळूचा खड्डा व त्यातील भोक स्पष्ट व चटकन दिसले. विडी ओढली नाही. एवढे झाल्यावर स्वामी लगेच उभे राहिले. "अच्छा" म्हणून बाहेर पडले तेवढ्यात ते गृहस्थही उभे राहिले व "अच्छा" म्हणून स्वामी खोलीबाहेर गेल्यावर ते बसले.

बाहेर आल्यावर श्री. बाळासाहेब वाकडे यांना स्वामींच्याकडून या सत्पुरुषा-बद्दल खूप ऐकायचे होते. त्यांनी स्वामींना विचारले "हा गृहस्थ कुठे आहे?" त्यावर स्वामी म्हणाले "बहुत आगे है।" नंतर हा मुद्दा सोडून अघोरी पंथाची खूप माहिती सांगितली. अघोरी पंथामध्ये सर्व उपाय अघोरी असतात. हे उपाय स्थिरपणे करीत रहाणे सोपे नसते. आपल्याला या साधन मार्गाशी काही कर्तव्य नाही. हा आटापिटा किंवा टोकावरच्या कसरतींची आपल्याला गरज नाही. आपला साधन-मार्ग सर्वश्रेष्ठ आहे. तो साधकाला असेल तेथून वर खेचित खेचित इच्छित ठिकाणी नेत असतो. ही सहजता इतर कोणत्याही मार्गांत नाही. त्या दिवशी बाळासाहेब वाकडे स्वामींच्या सहवासाने धुंद होऊन गेले होते. सारी अपूर्वाई ते अनुभवीत होते. त्या अश्वत्थाम्याला ओळखणारे स्वामीजी त्याच्या पुढे असल्याचे सिद्ध झाले होते.

अशी दुसरी एक अपूर्व भेट श्री. वाकडे यांनी घडवून आणली होती.

पुण्यामध्ये श्री. बाबा सहस्रबुद्धे म्हणून एक सत्पुरुष नुकतेच होऊन गेले. ते नारायण पेठेत, धुमाळ बिल्डिंगमध्ये काही दिवस रहात होते. त्यांचा अनेकांनी अनुभव घेतला आहे. बाबांचे व्यक्तिमत्त्व चांगले प्रभावी होते. वाकडे आपल्या मित्रमंडळीबरोबर त्यांचेकडे मधून मधून जात असत. त्यामुळे त्यांचा व बाबांचा परिचयही चांगला होता. तेव्हा एकदा स्वामींना बाबांच्याकडे नेण्याची इच्छा बाळासाहेबांना झाली. स्वामींनी त्यालाही लगेच संमत्ती दिली व बाळासाहेबांच्या बरोबर बाहेर पडले.

श्री. बाबा सहस्रबुद्धे नित्याप्रमाणे आपल्या स्थानावर बसलेले होते. बाळासाहेब पुढे व स्वामी मागून येताहेत हे पाहताच उठले व उभे राहिले. तेवढ्यात स्वामी तेथपर्यंत पोहोचले. स्वामींना नमस्कार करून मोठ्या आदराने त्यांना आपल्या गादीवर बसवून स्वतः खाली बसले व बाळासाहेबांचेकडे पहात म्हणाले, स्वामींना "माझ्याकडे आणणार आहेस एवढे म्हटले असते तरी मी तिकडे आलो असतो. तुला कळत नाही; लहान माणसाकडे मोठ्या व्यक्तींना आणावयाचे नसते. तुमची इच्छाच होती तर मी आलो असतो. आज मला फार संकोच करून टाकला." यावर स्वामी काही बोलले नाहीत. इतर काय कसे आहे अशा गोष्टी होऊन तेथून निघून आले. या घटनेतूनही हे स्पष्ट होते की, बाबामहाराज सहस्रबुद्धे, स्वामींचा पूर्वपरिचय नसताना आपल्या अनुभवावरून स्वामींना आपल्यापेक्षा मोठे मानीत होते, म्हणून हे उद्गार त्यांच्या मुखातून बाहेर पडले.

## मा. विनायकराव आपटे आणि स्वामीजी !

श्री. बाळासाहेब वाकडे ही अशी एक व्यक्ती स्वामींच्या सहवासात आली की जिने अनेक जीवांचे भाग्य उजळून टाकले. स्वामींच्याकडे त्यांनी श्री. प्रभाकर सोवनी, श्री. नारायणराव ढेकणे, मा. विनायकराव आपटे, मा. श्री. बाबाराव भिडे, अशा मातब्बर, धर्म आणि संस्कृतीचा सक्रिय अभिमान असलेले सज्जन आणले. या सर्वांना यथाक्रम शक्तिपात अनुग्रह झाला. यापैकी आता आपण मा. विनायकरावाचे संबंधाने माहिती पाहू.

स्वामींच्या संबंधाने बरीच माहिती बाळासाहेबांनी मा. विनायकरावांच्या कानावर घातली. मा. विनायकराव हे अत्यंत सात्त्विक अंतःकरणाचे, सखोल विचार करणारे, भक्ति, योग, ज्ञान या विषयाबद्दल हार्दिक आकर्षण असलेले, साधे सामान्य

स्वरूप घेऊन राहणारे सत्पुरुष होते. या वैचारिक बैठकीतून त्यांनी धार्मिक व सामाजिक कार्य राष्ट्रीय दृष्टीतून केले. मा. विनायकरावांना स्वामींची माहिती मिळाल्यापासून त्यांच्या भेटीचे आकर्षण निर्माण झाले. दासबोध, ज्ञानेश्वरी, गाथा, एकनाथी भागवत, रामायण, महाभारत, पातंजलयोगशास्त्र, दशोपनिषदे, योगवासिष्ठ या आणि यासारख्या तोलामोलाच्या ग्रंथांचे सखोल वाचन विनायकरावांचे होते हे त्यांच्या विचारांतून प्रत्येकवेळी जाणवलेले आहे. त्यामुळे त्यांच्या विचारामध्ये अशी पक्की समजूत होऊन राहिली होती की आत्मोद्धार हा स्वतःच करावयाचा असल्याने त्यामध्ये गुरूची आवश्यकता नाही.

पुढे स्वामी पुण्यात आल्यावर बाळासाहेबांनी विनायकरावांना सांगितले. विनायकरावांनी त्यांची भेट घेण्याची इच्छा व्यक्त केली. मग बाळासाहेब विनायकरावांना घेऊन स्वामींच्याकडे गेले. नमस्कार झाला. स्वामींना बाळासाहेबांनी विनायकरावांचा परिचय करून दिला. स्वामींनी विचारपूस केली. विनायकरावांनी प्रांजलपणे आपले मत सांगितले. गुरूची गरज ग्रंथांच्या वाचनाने नाहिशी होते. अध्यात्म शास्त्र आहे. ते त्या विषयाच्या शास्त्रीय ग्रंथातून सिद्ध करता येण्यासारखे आहे. कसे वागावे ग्रंथांनी सांगितले आहे. कसे रहावे, काय करावे, काय खावे, चांगले काय, वाईट काय, ग्राह्य कोणते, अग्राह्य कोणते या सर्वांची चर्चा ग्रंथांनी उत्तम केलेली आहे. योगमार्गातील अष्टांगचर्चा अत्यंत सूक्ष्म माहितीसह पातंजलींनी केली आहे. अशा आदर्श ग्रंथांच्या आधाराने जिज्ञासू जीव शेवटपर्यंत पोहचू शकण्यास अडचण वाटत नाही. वेदातील ज्ञान चर्चेने होते. सर्व गोष्टींचे "ज्ञान होणे" हाच शेवट सांगितला आहे. सर्व गोष्टी एक वस्तूची भिन्न स्वरुपे असल्याने वस्तूचे ज्ञान हेही स्पष्टपणे विस्तारपूर्वक वर्णिले आहे. म्हणून गुरूची वेगळी, स्वतंत्र आवश्यकता नाही. स्वतः भगवंतानेही सांगितले आहे की 'उद्धरेदात्मनात्मानं' मग गुरु कशासाठी ?

मा. विनायकरावांनी या विचारांच्या दिशेने स्वामींना आपले हृद्‌गत मोकळे करून दाखविले. सत्पुरुष, संत, सज्जन, नेते, पुढारी, ज्ञानी, त्यागी, संन्याशी यांच्यासारख्या थोर पुरुषांना योग्य तो मान द्यावा. त्यांचे सामाजिक ऋण मानावे. त्यांचा अधिकार ओळखून वागावे याबद्दल विनायकरावांच्या विचारात वा वागण्यात कधी उणीव नव्हती. पण प्रश्न फक्त गुरुत्वाचा किंवा मार्गदर्शकाचा असल्याने,

त्यातील उणेपणा, देशकालाचा मर्यादितपणा, त्यांना जाणवत होता. म्हणून आपली ही भूमिका मा. विनायकरावांनी आग्रहाने मांडली होती.

स्वामींनी सारे शांतपणे ऐकून घेतले. कधी कुणाचा शब्द ऐकून न घेणारे स्वामी शांतपणे ऐकत होते. विनायकरावांची श्रद्धा, तळमळ, प्रामाणिकपणा, स्वार्थत्यागाची भूमिका, मनाचा सरळपणा त्यांच्या बोलण्यातूनच स्वामींना जाणवला होता. त्याहीपेक्षा त्या जीवाची आंतरिक जाणीव झाल्याने निर्माण झालेल्या आत्मीयतेने स्वामींनी विनायकरावांचे विचार ऐकले. एका जाणकार जिज्ञासूला उत्तर द्यावयाचे होते, याची जाणीव स्वामींना आली होती.

स्वामींनी पण विनायकरावांची शंका दूर व्हावी या हेतूने दोन शब्द संथपणे ऐकविले. प्रथम पातञ्जल योगदर्शनाचा उल्लेख करून त्यातील एक सूत्र चर्चेला घेतले.

**“समाधि सिद्धिरीश्वर प्रणिधानात्”**

यातील ‘प्रणिधान’ शब्दाची फोड करून दाखविली. धा = धारण करणे. या ‘धा’ धातूच्या पूर्वी प्र + नि हे उपसर्ग लावून प्रकर्षाने, निश्चयपूर्वक धारण करणे असा अर्थ होतो. अशा प्रकारे ईश्वर प्रणिधानाने वृत्तींचा निरोध अत्यंत शीघ्रतेने होतो. ईश्वराचे प्रणिधान करणे आणि ईश्वराची आराधना करणे यात फरक आहे. प्रणिधानामध्ये आपल्या अन्तरात्म्यास जागृत करून हृदयामध्ये धारण करणे हा भाव आहे. तर आराधना हे दूरस्थ ईश्वराचीसुद्धा संभवते. गीतेत असे सांगितले आहे की :—

**योगीनामपि सर्वेषां मद्गतेनान्तरात्मना ।**
**श्रद्धावान् भजते यो मां, स मे युक्ततमो मतः ॥**

हृदयस्थ परमेश्वराच्या महिमेची अनुभूती होते तेव्हां जीव शोकरहित होतो, कारण ईश्वर हाच सद्गुरु आहे. सद्गुरु आणि ईश्वर यांचा महिमा एकच असल्याने त्यात अंतर नसते. तेव्हां समाधी स्थिती ही ईश्वरी कृपेशिवाय होत नाही. म्हणजेच सद्गुरु कृपेशिवाय होत नाही. यावरून सद्गुरुचे अनन्यसाधारण महत्त्वच सिद्ध होते.

आता आपण आचार्यांचेकडे वळू या. वेदान्तशास्त्र शिरोमणी असणारे श्रीमदाद्य शंकराचार्य म्हणतात—

**षडङ्गादिवेदो मुखे शास्त्र विद्या कवित्वादि गद्यं सुपद्यं करोति ।**
**मनश्चेन्न लग्नं गुरोरङ्घ्रिपद्मे ततः किं ततः किं ततः किं ततः किम् ॥**

वेदांचे सांगोपांग अध्ययन केले, सर्व शास्त्रे आणि विद्या मुखोद्गत केल्या, गद्य पद्य काव्यादि साहित्याची उत्तम रचना केली म्हणून सर्वांकडून प्रशंसा झाली; तरी सुद्धा सद्गुरुंच्या चरणकमलांच्या ठिकाणी ज्याचे चित्त रमत नाही त्याचा हा गुणसंभार काय कामाचा ?

आचार्यांचे हे 'गुर्वष्टकम्' अत्यंत रसाळ व मर्मस्पर्शी आहे. स्वामींच्याने जास्त बोलवेना. त्यांच्या चित्तवृत्ती एकदम सद्गुरु स्मरणाने आत ओढल्या गेल्या "ततः किं ततः किंः ततः किं ततः किं" ही ओळ म्हणत म्हणत त्यांनी डोळे मिटले. आणि ज्या समाधीचे वर्णन नुकतेच केले त्या समाधीमध्यें स्थिर झाले. स्वामी निश्चल, ताठ बसलेले पाहिल्यावर बाळासाहेबांनी विनायकरावांना खूण केली व दोघे स्वामींना नमस्कार करून निघून गेले.

मा. विनायकरावांच्या जीवनांत हा दिवस असा होता की ज्या दिवसाने त्यांच्या विचार चक्राला नव्या दिशेने गती दिली होती. स्वामींचे शब्द विनायकरावांच्या कानावर त्यांचे स्मरण होताच घंटेच्या निनादाप्रमाणे आदळू लागत. ते शब्द अचानकपणे त्यांच्या तोंडूनही बाहेर पडत "ततः किं ततः किं ततः किं ततः किं"

विनायकरावांचा वाचन व्यासंग प्रगाढ होता. स्वामींच्या भेटीनंतर त्यांना असे जाणवले की, ते जो ग्रंथ हाती घेत त्यामध्ये अनेक ठिकाणी गुरुमहिमा वर्णन केला आहे. त्यांना मनातून असे अनेक वेळा वाटे की, "गुरुशिवाय पूर्णता नाही." "गुरुशिवाय काही नाही." या मनस्थितीत काळ आपले काम करीत होता..

**जयासी मोक्ष व्हावा । तेणे सद्गुरुचि सेवावा ।**
**सद्गुरूवीण मोक्ष पावावा । हे कल्पांती न घडे ॥**

—"समर्थ"

होता होता एकदा नारायणराव ढेकणे हे सहज मा. विनायकराव यांना भेटण्यासाठी गेले. त्यावेळी स्वामींचा विषय आणि ही चर्चा निघाली. विनायकरावांना

" राजयोग प्रदीप " हा ग्रंथ हवा होता तो नारायणरावांचेकडे होता तो त्यांनी त्यांना दिला. त्या ग्रंथामध्ये तर गुरुमहिमेची प्रखर जाणीव, अनेक ठिकाणी सोदाहरण स्पष्ट केलेली, विनायकरावांना आढळली. त्यांच्या मनावर त्या ग्रंथाचा प्रभाव फार झाला. त्यांनी बाळासाहेब वाकडे यांना बोलावून घेतले आणि स्वामींची चौकशी केली. त्यावेळी स्वामी पुण्यात नव्हते. पुढे स्वामींच्या भेटीचा योगही आला नाही. पण गुरुप्राप्तीची ओढ मात्र विनायकरावांना स्वस्थ बसू देत नव्हती. त्यांनी पुन्हा वाकडे यांचेशी बोलणे करून श्रीगुरुमहाराजांचेकडून शक्तिपात दीक्षा घेतली.

विनायकरावांची साधना त्यांच्या सुप्रसिद्ध ७५१ सदाशिव पेठेतील जागेत असलेल्या ४′ × १०′ च्या साधनगृहात नियमीत झाली. या साधनेने प्राप्त झालेले अपूर्व धैर्य पुढे त्यांच्या अन्तकाळी सर्वांना आश्चर्याचा धक्का देऊन गेले. त्यांना त्यांचा मृत्यू जेव्हां निश्चितपणे समजला तेव्हां ते आपला सर्व पसारा आवरू लागले. अनेकांच्या भेटी-गाठी घेतल्या. महत्त्वाची, स्पष्ट सूचनांची, पत्रे लिहून ठेवली. मोठ्या निर्भयतेने मृत्यूला सामोरे गेले. भयंकर रोगाची साथ हेच मृत्यूचे निमंत्रण समजल्यावर ते गांगरले नाही, निराश झाले नाही किंवा शोकाकूलही झाले नाहीत. मृत्यूपूर्वी दीड महिना विनायकराव हार, नारळ, प्रसाद व दक्षिणा घेऊन श्रीगुरुमहाराजांचेकडे आले. श्रीगुरुमहाराजांना साश्रुनयनांनी अखेरचा पादस्पर्शपूर्वक साष्टांग नमस्कार घातला. सद्‌गुरुच्या गळ्यात भावपुष्पांसहित आणलेला हार घातला. प्रसाद, दक्षिणा त्यांचेपुढे ठेवून समर्पित केली. श्रीगुरुमहाराजांच्या जवळ बसले. शांतपणे जिभेला झालेल्या कर्क रोगाची जाणीव दिली. जीभ काढून व्रणही दाखविला. आता उपाय संपले. दिवस मोजणे एवढेच काम राहिले आहे. ईश्वर स्मरण सतत चालू आहे. आपल्या कृपेने हे धैर्य आले आहे. जगरहाटी आहे. वेगळे काही नाही. मुलाने सर्व जबाबदारी संभाळली आहे. सर्व काही उत्तम आहे. माझ्या सेवेत पत्नी सतत असते. तिच्या प्रारब्धाने ती मागे रहात असली तरी ही सेवा तिलाही उपयोगी पडणारी आहे. स्वामींची आठवण होते. त्यांनी ' गुरुमहिमा ' सांगितला तेव्हापासून तळमळ सुरू झाली. त्यांचा योग नव्हता. ते पुणे सोडून गेले ते आले नाहीत आपण कृपा केली म्हणून सर्व उत्तम झाले. अशीच कृपा माझ्यावर शेवटपर्यंत ठेवा. मला " अन्ते मतिः सा गतिः " हे सूत्र माहीत आहे. तसे माझे कल्याण होईल अशी ' अन्ते मति ' द्या. सर्वांवर लक्ष असू द्या. येतो मी. नमस्कार. "

विनायकरावांना खूप खूप बोलायचे होते. पण अशक्ततेमुळे जमले नाही. महाराजही म्हणाले "आपण फार बोललात. कष्ट झाले आपल्याला. पुरे. मला तुमच्या भावना समजल्या. परमेश्वर तुमच्याजवळ सतत आहे. काळजी करू नका " असा हा हृद्य संवाद झाला. विनायकरावांनी पुन्हा श्रीगुरुमहाराजांना नमस्कार केला आणि प्रसाद घेऊन निघून गेले. शक्तिपात साधनेने काय होते हे यामुळे समजण्यास मदत होईल म्हणून सांगितले.

## श्री. ब. ना. भिडे आणि स्वामीजी

मा. विनायकराव आपटे यांचा संबध जसा स्वामींशी आला त्याचप्रमाणे श्री. बाळासाहेब वाकडे यांच्याद्वारा मा. बाबाराव भिडे यांचाही संबंध आला. स्वामींची माहिती जशी समजत गेली तसतशी त्यांना भेटण्याची इच्छा मा. बाबानाही झाली. मा. बाबांचे जीवन व्यवहारी दृष्टीने नामांकित वकील म्हणून जसे प्रसिद्ध आहे त्याप्रमाणे सामाजिक दृष्टीने बाबा हे हिंदुधर्म संस्कृतीचे राष्ट्रीय दृष्टीकोनातून कार्य करणारे जबाबदार कार्यकर्ते असल्याची जाणीव महाराष्ट्राला तरी निश्चित आहे. हिंदुसंस्कृती संरक्षक मंडळासारख्या संस्थेचे कार्यही बाबांनी पदाधिकारी होऊन केलेले आहे. या ठिकाणी माननीय बाबाराव भिडे यांचा परिचय हा उद्देश नसल्याने त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या अनेक पैलूंचा उल्लेख उल्लेखनीय असला तरी स्वामींच्या चरित्राच्या दृष्टीने आवश्यक तेवढाच विचार करू.

मा. बाबा हे जात्याच अत्यंत बुद्धिवान व चिकित्सक आहेत. वास्तविक बाबांनी आंग्लविद्या विभूषित पदव्या घेतल्या आणि वकिलीचा व्यवसाय करीत असले तरी हिंदुधर्म व संस्कृतीची जोपासना, संरक्षण आणि वर्धन करण्याची भावना त्यांच्या ठिकाणी फार मोठी आहे. लौकिक जीवन व नित्याचा व्यवहार हा तर्काच्या धारदार शस्त्राने बुद्धीच्या प्रशस्त शिळेवर आणखी तीक्ष्ण करून, चिकित्सेच्या निर्दय शल्याने वस्तुस्थितीची शुद्ध शहानिशा करून केला जातो. ही भूमिका सामान्यांना पेलवणारी नसते. खरा वेदान्ती जितका परखड तितकेच बाबा व्यवहारात परखड दिसतात. या परखडपणामध्ये फसवाफसवी नसते, लपवालपवी नसते. बाबांच्या या तर्कनिष्ठ चिकित्सक वृत्तीची निर्मिती त्यांच्या बुद्धीची प्रखरता, वृत्तीची शुद्धता व शिक्षण आणि व्यवसाय, या सर्वांच्या परिपाकातून झालेली आहे. असे असले

तरी त्यांच्या या तर्ककठोर चिकित्सेने भारतीय संस्कृतीच्या कार्याला जीवनात प्राधान्य दिलेले पाहिले म्हणजे समाजातील सात्त्विक माणसाला दुहेरी समाधान होते.

त्यांच्या बुद्धिप्रधान जीवनात चिकित्सेची प्रखरता प्रकर्षाने असते. एखादे तत्त्व वा कार्य यांच्या चिकित्सेमध्ये शिरल्यावर ते त्या तत्त्वाची वा कार्याची इतकी चिरफाड करतात की ऐकणारा संतापण्याची पाळी येते. पण या दिव्य चिकित्सा शल्यातून पार पडल्यावर बाबांना ते कार्य पटले तर त्यासाठी ते आत्मीयतेने तयार झालेले दिसतात.

अगदी अशीच घटना बाबांची आणि स्वामींची भेट झाली तेव्हा घडली. बाबा हे कधी कोणा साधू, संन्याशी वा महाराजांच्यावर सहजासहजी विश्वास ठेवतील हे कालत्रयी शक्य नाही याची त्यांच्या सर्व परिचितांना खात्री आहे. ज्यांनी अनेकवेळा, समाजाच्या डोळ्यात धूळ टाकण्यासाठी स्वतःच्या अंगाला राख फासली आहे, आपल्या डोळ्यातील खुनाची लाली चटकन कोणाच्या लक्षात येऊ नये म्हणून अंगावर भडक भगव्या रंगाची कफनी घातली आहे, खुनाची शस्त्रास्त्रे लपविण्यासाठी काखेत बैरागी झोळी अडकविली आहे, अन्तःकरणातील कृष्णकार-स्थाने लपविण्यासाठी छातीवर रुद्राक्ष आणि स्फटिकाच्या माळा घातल्या आहेत अशा महाभयानक दरोडेखोर व खुनी लोकांची लक्तरें न्यायदेवतेसमोर उघडी झालेली पाहिली आहेत त्या बाबांचा विश्वास स्वामींच्यावर बसणे म्हणजे उंबराला फूल येण्यासारखे दुर्घट आहे. पण हे घडले हे सत्य आहे. त्रिवार सत्य आहे.

सुभाषितच आहे की "**शैले शैले न माणिक्यं। मौक्तिकं न गजे गजे॥ साधवो नहि सर्वत्र। चंदनं न वने वने॥** खरा साधु हा दुर्मिळ असतो. कल्चर्ड मोत्यांची का बाजारात उणीव सापडणार आहे. उणीव आहे ती खऱ्या मोत्यांची! खऱ्या साधूंची!! मोत्याप्रमाणे साधूंनाही आपल्या खरेपणाच्या कसोट्या द्याव्या लागतात. वस्तू खरेदी करणाऱ्याने कसोटी लावली तर तो ताप सुसह्य! पण अशी बरीच गिऱ्हाईके असतात की वस्तू न घेताच कसोटीची उठाठेव करतात. त्यांचाही ताप मुकाट्याने त्या वस्तूला सहन करावा लागतो. ही फुकट कसोटी न द्यावी तर फुकट खोटेपणा माथी पडायचा! पण असा विचार खरी वस्तू कधीच करीत नसते. अशा प्रखर कसोट्यामधून त्या प्रखर वस्तूच्या खरेपणाचे तेज वाढते. मूळच्या तेजाला प्रखरता येते.

एकदा वेळ ठरवून बाळासाहेब वाकडे यांच्याबरोबर बाबाराव भिडे स्वामींच्याकडे आले. स्वामींनी बाबांना आपादमस्तक न्याहाळले. बाबांनी स्वामींना शक्य तेवढे पाहिले. नमस्कार करून दोघे बसले. बाळासाहेबांनी परिचय करून दिला. विषय निघायला वेळ लागला नाहीं. बाबांनी अध्यात्माच्या कार्याला सामाजिक दृष्टी कोणती आहे ? असा सरळ प्रश्न केला. स्वामींनी सांगितले व्यक्तीची पूर्ण उन्नती एवढीच अध्यात्माची दृष्टी आहे. पण व्यक्ती हाच समाजाचा बिंदू असल्याने व्यक्तीची पूर्ण उन्नती हाच समाजाचा पूर्ण उत्कर्ष आहे.

बाबा :— व्यक्तीच्या पूर्ण उन्नतीची अध्यात्मिक मर्यादा कोणती ?

स्वामी :— व्यक्तीला स्वतःचे ज्ञान होणे व त्याचबरोबर ईशशक्तीचे ज्ञान होणे या दोन्हींची एकरूपता अनुभवास येणे ही उन्नतीची मर्यादा.

रोज ४।५ तास याप्रमाणे तीन दिवस ही चर्चा झाली. पुढे पुढे ही चर्चा कुंडलिनी जागृती, शक्तिपात, परंपरा अशा विविध थरांमधून झाली. ती सगळी उपलब्ध झाली नाही. स्वामींशी चर्चा झाल्यानंतर बाबांना नवीन विचारांची दिशा मिळाली. ते खूप अंतर्मुख झाले. पण स्वामींच्याकडून दीक्षा घेण्याचा योग नव्हता. स्वामींच्या दर्शनाने बाबांचे जीवन पुनित झाले. आज हजारो साधक असे तळमळतात की, आपण जाणते असून आपल्याला स्वामींचे साधे दर्शन होऊ शकले नाही. त्या दृष्टीने मा. बाबांना स्वामींचे दर्शन झाले, सहवास घडला, त्यांचे मौलिक विचार कानावर पडले हे केवढे परमभाग्याचे लक्षण आहे.

या दर्शनानंतर बराच काळ लोटला. जसे विनायकरांचे झाले तसे बाबांचेही झाले. स्वामी पुण्यातून निघून गेल्यावर त्यांच्याकडून दीक्षा घेण्याची इच्छा बाबांनाही झाली. तसे त्यांनी बाळासाहेब वाकडे यांना सांगितले. स्वामी पुण्यात नाहीत हे सांगून बाळासाहेब म्हणाले दीक्षा श्रीगुरुमहाराज देत असतात. त्याप्रमाणे बाबांनी श्रीगुरुमहाराजांकडे येण्याची इच्छा प्रदर्शित केली. बाळासाहेबांनी बाबांना श्रीगुरुमहाराजांकडे आणले. पूर्वपरिचय स्वामींच्या वेळी झालेला होता परंतु त्याची पुन्हा आठवण करून दिली. श्रीगुरुमहाराजांनी योग्य वेळ पाहून दीक्षा दिली. तरी त्यासाठी सहा महिने थांबावे लागले होते. मा. बाबांचेही हे नित्याचे साधन सर्व व्याप संभाळून शक्य तेवढे होत असते. त्यातूनही त्यांना या साधनेची अपूर्वाई

जाणवते. मधून मधून श्रीगुरुमहाराजांकडे येत असत तेव्हा आपली नित्य साधना होत नाही ही हार्दिक व्यथा व्यक्त करून जात असत. श्रीगुरुमहाराज त्यांना पुनः कृपाशीर्वादाने 'होईल' म्हणून संतोष देत असत.

## स्वामींना मृत्यू कळत होता !

स्वामींना काका दामले यांच्या मृत्यूची वेळ समजली होती म्हणून आधीच त्यांच्या मुलास सांगितली. पुढे होणाऱ्या दुखःचे सांत्वनही केले. असाच दुसरा प्रसंग आज आलेला आहे. कसबा पेठेतील गोरेभटजी स्वामींचे शिष्य झालेले होते. अंबालाल शेटजी त्यांच्या जवळ राहत असत. स्वामींचा मुक्काम अंबालाल शेटजींकडे असला म्हणजे भिक्षेची व्यवस्था गोरेभटजींच्याकडे असे. ते अग्निहोत्री होते. घरातील आचार उत्तम होता. दर पौर्णिमा व अमावास्येस अग्नीची विशेष पूजा असे. स्वामींना गोरेभटजींच्या अग्निहोत्र व्रताबद्दल आदर होता. स्वामींच्या वैराग्यसंपन्न वृत्तीबद्दल गोरेभटजी अवाक् होते.

एकदा गोरेभटजींना स्वामींची पाद्यपूजा करण्याची इच्छा झाली. त्याच वेळी योग असा आला की शंकराचार्यांचे आगमन पुण्यात झाले होते. गोरेभटजींनी श्रीमत् शंकराचार्यांचीही पाद्यपूजा स्वामींच्या बरोबर करण्याचे ठरविले. उभयतांना भेटून कार्यक्रम ठरविला. दोन महापुरुषांची, आचार्य स्थिती सिद्ध करणाऱ्या श्रेष्ठतम संन्याशांची, पाद्यपूजा महापूजेच्या थाटात करण्याचे गोरेभटजींनी ठरविले.

श्री. स्वामी व श्रीमत् शंकराचार्य यांच्या पाद्यपूजेचा दिवस उजाडला. गोरे-भटजींच्या कुटुंबातील सर्व मंडळींनी या अपूर्व मंगल समारंभाची जय्यत तयारी केली. सडासंमार्जन, रांगोळ्या, मंगल तोरण इत्यादि शुभ सूचक गोष्टी प्रातः-काळीच उरकल्या. यज्ञवेदी नित्यापेक्षा अधिकच नटविली. घरातील देवतांचे पूजन अग्नि पूजन, यज्ञहोमादि यथासांग पूर्ण केले. आचार्य व स्वामी यांच्या पूजेची तयारी केली. पुष्पमाला, तुलसी, बिल्वपत्र, उत्तम फुले, गंध, अत्तर, दक्षिणा, वस्त्र, प्रसादा-साठी विविध फळे तयार ठेवली. धूप व उदबत्ती, समई आणि निरंजन देवपूजेच्या वेळी प्रज्वलित केलेली असल्याने वातावरण सुगंधाने धुंद व मंत्रपूजेने पवित्र झाले होते.

दारासमोर सनई चौघडा ही वाजंत्री लावलेली होती. मंजुळ रागदारीने आज

गोरेभटजींच्याकडे मंगल कार्य असल्याची जाणीव जाणाऱ्या येणाऱ्याला होत होती. गोरेभटजी व त्यांचा मुलगा सोवळे नेसून स्वामींच्या व आचार्यांच्या स्वागतासाठी तयार होते. ही पाद्यपूजा वेदातील मंत्रघोषांनी व्हावी म्हणून आणखी १०।१२ ब्राह्मण मंडळींना पाचारण करण्यात आले होते. ही वैदिक मंडळी वेळेपूर्वीच आलेली होती. सर्वांनी कपडे काढून, हातपाय धुऊन, कुंकुम तिलक करून व्यासपीठाच्या दोन्ही बाजूस ती ब्राह्मण मंडळी शांतपणे बसली. वेळ सकाळची ९॥ ची होती.

इतक्यात ठरल्या वेळेप्रमाणे श्रीमच्छंकराचार्य आल्याची पीठाची ललकारी झाली. आचार्य आले, आचार्य आले म्हणत गोरेभटजी लगबगीने सामोरे गेले. श्रींना साष्टांग नमस्कार केला. पुष्पमाला अर्पण करून घरात घेतले. आचार्यांना व्यास-पीठावर बसवताक्षणीच स्वामी आल्याची बातमी गोरेभटजींच्या कानावर गेली. तेवढ्याच तत्परतेने ते दारात आले. स्वामींना साष्टांग नमस्कार घातला. पुष्पमाला समर्पण केली. "श्रीगुरुदेव दत्त" म्हणून गर्जना केली. व स्वामींना व्यासपीठावर आणून बसविले. चौघडेवाल्यांना वाजंत्री बंद करण्यास सांगितले.

वैदिक द्विजांनी वेदमंत्राला प्रारंभ केला. ते झाल्यावर शास्त्रोक्त पूजा झाली. सर्व वातावरण प्रसन्नतेने आणि चैतन्याच्या जाणीवेने शांत होते. समारंभीय धावपळ मुग्धपणे होत होती. पूजा झाली. हार समर्पण केले. प्रसाद दाखविला. वस्त्रदक्षिणा समर्पण केली. सर्वजण उभे राहिले आणि मोठ्या आवाजात उत्कृष्ठ आरती झाली. मंत्र-पुष्पांजली झाल्यावर प्रसाद घेऊन बाहेरची मंडळी निघून गेली. नंतर स्वामींच्या व आचार्यांच्या भिक्षेची तयारी झाली. दोघांची भिक्षा तेथे झाली. आलेल्या ब्राह्मणां-दिंचे भोजन झाले. थोडी विश्रांती घेऊन स्वामी व आचार्य सर्वांना प्रसन्नतेने शुभाशीर्वाद देऊन निघून गेले.

पुढे गोरेभटजींच्या अग्निहोत्राचा आदर स्वामींनी मोठ्या उदारतेने प्रकट केला. स्वामी काशीला असतांना त्यांना गुरुदक्षिणा म्हणून कोणी साधकाने 'सुवर्णदान' दिले. स्वामींनी ते सुवर्ण घेऊन त्यात आणखी भर टाकून गोरेभटजींना अग्निहोत्रानिमित्त दक्षिणेच्या रूपात 'सुवर्ण' पाठवून दिले. आपल्या धर्मशास्त्राचे पालन करणारे अग्निहोत्री दिवसेंदिवस दुर्मिळ होत असतांना गोरेभटजींनी ते टिकवून धरले याचा उल्लेख स्वामी करीत असत.

गोरेभटजींच्या पत्नी इ. स. १९५० मध्ये आजारी पडल्या. विशेष आजार नव्हता. वयही फार नव्हते. पण स्वामींनी एक महिना आधी त्यांच्या मृत्यूची वार्ता गोरेभटजींना सांगितली होती. प्रथम विश्वासच बसेना. पण स्वामींनी गोरेभटजींच्या-कडून त्यांच्या पत्नींच्या निधनापूर्वी सुवासिनींना हळदीकुंकू, खणानारळाने ओटी भरून घेणे इत्यादि धार्मिक कृत्ये करून घेतली. स्वामींना मृत्यू समजत असल्याने ते सांगू शकत असत.

## श्री. नारायणजी निर्भयराम पंडचा आणि स्वामीजी

हे पुण्यातील गुजराथी व्यापारी आहेत. रविवार पेठेत शितळा देवीच्या बोळात राहातात. त्यांना श्रीगुरुमहाराजांचे संबंधी माहिती मिळाल्यावरून इ. स. १९४८ चे पूर्ण वर्ष ते त्यांच्याकडे नियमीत जात असत. पण काहीच लाभ न झाल्याने ते जरा निराश झाले. पण तेथे गेल्यावर स्वामी श्रीलोकनाथतीर्थ महाराजांचे नाव समजले. तेव्हा श्री. बाळासाहेब वाकडे यांची गाठ घेऊन स्वामी पुण्यात आल्यावर त्यांची गाठ घालून देण्याची विनंती केली. पुढे श्री. शंकरराव मार्कंड यांचेकडे स्वामी आल्याचे समजल्यावरून श्री. वाकडे यांचे बरोबर डे. जिमखान्यातील 'गुरुकृपा' बंगल्यात गेले. प्रथम फक्त दर्शन झाले. अल्प परिचयही करून दिला.

पुढे रोज नारायणजी स्वामींच्या दर्शनास जाऊ लागले. तेथे तासन् तास स्वामींच्या जवळ बसून राहावे. स्वामींचे, येणाऱ्या व्यक्तींशी होणारे संभाषण ऐकावे. असा क्रम सुरू झाला. स्वामींच्या प्रसन्न व्यक्तिमत्त्वाची छाप पहिल्या भेटीत पडली म्हणून तर नारायणजींचे पुढे रोज येणे होऊ लागले. स्वामींची ही ओढ नित्याच्या सहवासाने वाढतच गेली हळू हळू नारायणजी स्वामींशी बोलू लागले. मोठ्या अदबीने आणि काळजीपूर्वक बोलण्याची दक्षता नारायणजींनी घेतली होती.

होता होता नारायणजींना एकदा अशी इच्छा झाली की स्वामींना आपल्या घरी भिक्षेला येण्याचे निमंत्रण द्यावे. ही इच्छा निर्माण झाल्यापासून मनात आंदोलनांना सुरवात झाली. आपले अपराध, दोष आठवू लागले. आपल्याकडे स्वामी येतील का म्हणून त्यांचे मन कळवळू लागले. स्वामींनी येऊन आपल्याला उपकृत करावे ही त्यांची इच्छा वाढत राहिली. स्वामींच्याकडे दर्शनाला येताना मनाचा

निर्धार केला. प्रार्थना करणे आपले काम ते आपण करू. पुढे जे व्हायचे असेल ते आपले नशीब. असा पक्का विचार मनाशी झाला आणि नारायणजींनी आल्या आल्या स्वामींना साष्टांग नमस्कार केला. नंतर हात जोडून नम्रतेने वाकून स्वामींना प्रार्थना केली "स्वामी महाराज! आपण आमच्याकडे भिक्षेला येण्याची विनंती आहे." स्वामींनी नारायणजींची प्रार्थना ऐकली. स्वामींच्या तोंडून उत्तर ऐकण्यासाठी नारायणजी त्याच स्थितीत स्वामींच्यापुढे हात जोडून उभे होते.

दहा मिनिटे झाली, पंधरा मिनिटे झाली पण स्वामी उत्तर देईनात. तरी नारायणजी तसेच उभे होते. त्यांनाही काय करावे हे सुचेना! हो किंवा नाही यातले एक तरी उत्तर घेतल्याशिवाय स्वामींच्या समोरून हलताही येईना. नारायणजींनी स्वामींना पुनः प्रार्थना केली. तेव्हा स्वामी म्हणाले—

"मैं स्वतंत्र नहीं हूँ। अब वह कुछ कहती नहीं। इसलिये मैं कुछ कह नही सकता। तुम बैठो।" त्यानंतर आणखी १५।२० मिनिटे झाली. आणि स्वामी म्हणाले "तुम्हारे यहाँ भिक्षा होगी।" "मैं आऊंगा" त्याप्रमाणे स्वामी त्यांच्या-कडे गेले. भिक्षा झाली. विशेष आश्चर्य असे की त्यानंतर स्वामी नारायणजीकडे अनेक वेळा गेले. ८।१० दिवस राहू लागले. पूर्व सुकृतामुळे स्वामींचा एवढा लाभ नारायणजींना झाला. पुढे स्वामींनी एकदा नारायणजींच्या घरी असताना "मैं स्वतंत्र नहीं हूँ।" याचा खुलासा करताना स्वामींनी आपल्या अंगावरील छाटी बाजूला करून हात बाहेर काढले व दंडावरील वळ दाखवीत म्हणाले "उनकी आज्ञाका उल्लंघन करनेका यह परिणाम है।" ते पाहून नारायणजी व तेथे असलेले लोक अवाक् झाले. प. प श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराजांना श्रीदत्तात्रयांचे-कडून शिक्षा भोगाव्या लागल्याची उदाहरणे आहेत. त्यांचे स्मरण अशा प्रसंगी झाल्याशिवाय राहात नाही.

एकदा स्वामींचा मुक्काम गुरुकृपेमध्ये होता. त्यावेळी नारायणजी काही कामानिमित्त मुंबईस गेले होते. मुंबईचे काम संपल्यावर सायंकाळी ५ च्या गाडीने पुण्यास येण्यास निघाले. रात्री ९। ला गाडी पुणे स्टेशनमध्ये शिरली. गाडीतून उतरताना पंड्याजी पडले व पायाला मार लागला. चक्कर आली. त्यांच्या स्नेह्याने त्यांना घरी आणून सोडले. पाय खूप सुजला. रात्री १० वाजता घराजवळचे डॉक्टर आपटे यांना बोलावून आणून उपचार केले. ही घटना त्यांचे स्नेही चिमणशेटजी,

डॉ. आपटे व घरातील मंडळी याशिवाय कोणास ठाऊक नव्हती. वेळही रात्रीची होती. नारायणजींना वेदनेमुळे झोप शांत आली नाही.

सकाळी ७ च्या सुमारास स्वामी अचानकपणे दारात दत्त म्हणून उभे. दारातूनच विचारतात कसे "कैसा मार लगा?" मग आत आले. त्यांचे अचानक येणे व बाहेरून अचूक प्रश्न करणे आश्चर्यकारक होते.

नारायणजींचा पाय तर चांगलाच सुजला होता पण सारे अंगही ठणकत होते. स्वामीजी आत आल्यावर नारायणजींनी अंथरुणातच डोके टेकून स्वामींना नमस्कार केला. स्वामी उभे होते. ते टक लावून त्यांच्याकडे पहात होते. नारायणजी काही बोलणार तेवढ्यात स्वामी म्हणाले "उठो ! खडे हो जाओ।"

"स्वामीजी शक्य नाही. क्षमा करा." नारायणजीने काकुळतीने सांगितले. तेव्हा स्वामी ओणवे झाले व त्यांच्या सुजलेल्या पायावर हळुवार हात फिरवला व एक फटका मारावा असे ४/५ वेळा केले. मग ते उभे राहिले व म्हणाले "अब ठीक हुआ, उठो।" नारायणजी कसेतरी उभे राहिले. स्वामीजी दारापाशी गेले व म्हणाले "अब यहाँ आवो" नारायणजींनी नापसंती दाखविली की ते आरडाओरड करीत. "जल्दि आवो, मत ठहरो" हे मोठ्या आवाजाने म्हणत. स्वामी उभे होते त्या ठिकाणी कसेतरी चालत गेले की स्वामी दुसऱ्या ठिकाणी जाऊन उभे रहात व तेथून मोठ्या आवाजात आज्ञा करून चालत येण्यास सांगत. याप्रमाणे सकाळी खूप कवायत करून घेतली. मग मात्र अंथरुणावर बसविले. स्वतः स्वतंत्र आसन टाकून त्यावर बसले.

स्वामी बोलू लागले. "वायू दिसत नाही पण अनुभव मात्र येतो. परमेश्वर तसाच आहे. तो पण दिसत नाही. त्याचा अनुभव घेतला पाहिजे. तुमचा एवढा पाय सुजला पण तुम्ही चालला, तुम्हाला दुःख होत होते पण त्याकडे तुम्ही दुर्लक्ष केले. तसे सुख दुःखाकडे दुर्लक्ष केले तर परमेश्वराचा अनुभव येईल. हेच दुःख धरून ठेवले तर ते अधिकच वाढेल. माझ्यावर भरोसा ठेवलात म्हणून चाललात. नाहीतर येवढे चालला नसता. म्हणून तर गुरुची जरूरी आहे आणि त्यांच्यावर विश्वासही पाहिजे. म्हणजे सर्व काही ठीक होते. बरे आहे, पायाला दुखणे झाले आहे. परंतु लवकर बरे वाटेल. चिंता करू नका." एवढे बोलून स्वामी निघून गेले.

नारायणजी स्वामींच्याकडे नेहमी जात असत. तेथे थांबत असत. स्वामींच्याकडे अनेक मंडळी येत असत, त्यांची सेवा करीत असत. त्यांचेशी चर्चा करून आपल्या शंका नाहिशा करून घेत असत. काही आर्त करुणा भाकत असत. अशा आर्त जिज्ञासूंच्या पात्रतेप्रमाणे स्वामी त्यांना मार्गदर्शन करीत असत. काहींनी स्वामींची दीक्षा घेतलेली सुद्धा नारायणजीने पाहिले. तेव्हा त्यांनी दीक्षा मिळावी म्हणून स्वामींना प्रार्थना केली.

त्यावर स्वामी म्हणाले "एक शर्त है। पूरी करो तब दीक्षा होगी। गायत्री जप सव्वा लाख पूरा करके आवो" ही अट सोपी दिसली तरी फार अवघड व चिकाटीने पुरी होणारी आहे. स्वामींनी त्यावेळी नारायणजी पंड्यांना आपला दण्ड-कमण्डलु घेतलेला उभा फोटो देत म्हणाले "मैं यह किसीको देता नहीं, पर आप साथ रखे।" स्वामींचा उभा फोटो नारायणजीकडे आहे. नारायणजी त्याची नित्य पूजा करीत असतात.

## एक अपूर्व चमत्कार

चमत्कारावर विश्वास ठेवणे भोळेपणाचे, अंधश्रद्धेचे लक्षण, सर्वसामान्य शहाणेसवरते लोक समजतात. चमत्कार म्हणजे जादू आणि जादू म्हणजे शुद्ध फसवेगिरी, असा त्यांचा तर्क असतो. व्यावहारिक चाणाक्ष म्हणतात, हे चमत्कार करून दाखविणारे, लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांना प्रभावित करतात व आपल्या नादी लावून फसवितात. यासाठी रस्त्यावर जादूचे प्रयोग करणाऱ्याचे, किंवा बंगाली जादुगारांचे उदाहरण, ते हरतऱ्हेने सांगत असतात. ही गोष्ट खोटी नाही, असा अनुभव सर्वांचा आहे. जग फसते म्हणून तर फसविणाऱ्यांचे फावत असते, यांत शंका नाही. पण यामुळे, चमत्काराला सत्याचे अधिष्ठान असू शकते, ही दुसरी बाजू, संपूर्णपणे उपेक्षून, एकांगी विधानाचा डांगोरा पिटत बसणे, सर्वथैव बरोबर ठरत नाही. स्वामींनी असा एक अपूर्व चमत्कार केला आहे की ज्याचे स्थान श्रीगुरुचरित्रातच शोभून दिसणारे आहे.

साठ वर्षाच्या वांझेला संतती होणे हा चमत्कार आहे. वंध्या म्हशीची धार काढता येणे हा चमत्कार आहे. एकाचवेळी अनेक शरीरे धारण करून दर्शन देणे हा चमत्कार आहे. थोड्या अन्नात चार हजार पान जेवणे हा चमत्कार आहे. असे अनंत

चमत्कारांचे प्रसंग श्रीगुरुचरित्रात पानोपानीं आढळतात. या साऱ्या चमत्कारांचा असा काही चमत्कार आहे की श्रीगुरुंचा शब्द किंवा संकल्प एवढाच क्षण या चमत्काराच्या प्रयोगाला पुरे असतो. तेथे प्रयोगाच्या पूर्वतयारीला तिष्ठत बसावे लागत नाही किंवा साधनसामग्रीच्या जुळवाजुळवीचा आटापिटा करावा लागत नाही. जादुगाराच्या प्रभावी अभिनयाचे वा स्वराघातासहित शब्दसंभाषणाचे वा नजरबंदीचे प्रयोग श्रीगुरुंच्या चमत्कारात नसतात. श्रीगुरुंच्या इच्छाशक्तीचे सामर्थ्य अनुभवणारे अहो भाग्यवान शिष्य त्यांना लाभले म्हणजे ती परमकृपा जगाला चमत्कार वाटते.

प. पू. श्रीलोकनाथतीर्थस्वामीमहाराजांच्याही अनेक लीला आहेत. चमत्कार आहेत पण त्याची फारशी माहिती उपलब्ध झालेली नाही. आज आपण जो प्रसंग पहाणार आहोत तो प्रसंग चमत्काराप्रमाणे चरित्रात देण्याचा योग योगायोगाने आला. स्वामींची कृपा म्हणून इतका अपूर्व प्रसंग प्रत्यक्ष त्याच व्यक्तीने साश्रुपूर्ण नयनांनी रोमांचित होऊन सांगितला. इ. स. १९५० मधील ही घटना आहे. स्वामींनी दीक्षा दिलेले श्री. नीलकंठ वत्सराज, मुंबई या सुविद्य साधकाला स्वामींनी चकित करून टाकले आहे.

हे नीलकंठ वत्सराज अत्यंत श्रद्धावान साधक, शिष्य आणि भक्त आहेत. त्यांचे घरी मुंबईस स्वामी अनेकवेळा गेले आहेत. महिना-पंधरा दिवस राहिले आहेत. स्वामींची त्यांना सुमारे पंचवीस पत्रे आली आहेत. स्वामींच्या जीवनातील शेवटचे उपलब्ध पत्र नीलकंठ वत्सराजांना आल्याचे दिसते. या नीलकंठ वत्सराजांचा संबंध कसकसा आला हे सर्वच मनोरंजक व उद्बोधक आहे. नीलकंठ वत्सराजांचा संबंध अद्यापपर्यंत कधीही महाराजांशी आलेला नाही. या चरित्र लेखनाच्या संदर्भात मात्र आपला त्यांचा संबंध आला. ते पुण्यास स्वामींची पत्रे घेऊन आले. स्वामींच्या ओळखीच्या हस्ताक्षरातलि पत्रे, त्या पत्रांचा ठराविक साचा इत्यादि पाहून श्रीगुरुमहाराजांना फार फार आनंद झाला. नीलकंठांच्या भेटीच्या-वेळी महाराजांच्या अंगात तीन ताप होता. पण स्वामींची पत्रे पाहून त्यांनी ती मस्तकी धरून नमस्कार केला. उठून बसले. चौकशी केली. नीलकंठ वत्सराजांनीही महाराजांना हार, श्रीफल, प्रसाद समर्पण करून साष्टांग नमस्कार केला. स्वामींचे आपणास अज्ञात असे कितीतरी शिष्य असू शकतील.

स्वामी पुण्यात आले म्हणजे अनेक नवनवीन जिज्ञासू, दर्शनास येऊन जात असत. अशा पैकी श्री. नारायणजी पंड्या म्हणून एक गुजराथी व्यापारी होते. त्यांनी स्वामींची माहिती मुंबईच्या आपल्या आप्ततुल्य स्नेह्याला म्हणजेच नीलकंठ वत्सराज यांना सांगितली. "पुण्याला प. प. श्रीलोकनाथतीर्थस्वामीमहाराज मधून मधून येत असतात. हे एक श्रेष्ठ संत सत्पुरुष आहेत. भारतात हाताच्या बोटावर मोजता येणाऱ्या महापुरुषात यांची योग्यता आहे. ते केवळ कृपाकटाक्षाने कुंडलिनी जागृत करतात."

इ. स. १९५० मध्ये स्वामी पुण्यास आल्याचे नारायणजी पंड्यांना समजताच ते स्वतः मुंबईस गेले व नीलकंठ वत्सराज यांना घेऊन आले. येतांना स्वामींच्याबद्दल सांगून ठेवले की ते फार कडक आहेत. कधी कुणाशी फारसे बोलत नसतात. डोक्याचे वाढवलेले केस पाहिले किंवा डोक्याला टोपी नसली, वा पँट, पायजमा पाहिला, कमरेला कातडी पट्टा पाहिला की ते त्यावर खरमरीत टीका करीत असतात. इतके सारे ऐकून नीलकंठ वत्सराजांनी आपल्या मनाची इतकी तयारी केली की अपमान झाला तरी आपण नम्रता सोडायची नाही. ते सांगतील ते करायचे. अशा तयारीने ते नारायणजी पंड्यांबरोबर स्वामींच्याकडे आले.

यावेळी स्वामींचा मुक्काम डे. जिमखान्यावरील 'गुरुकृपा' या शंकरराव मार्कंडांच्या बंगल्यावर होता. वेळ संध्याकाळची होती. हार नारळ पुढे ठेवून साष्टांग नमस्कार केला. त्यांनी ते बाजूला ठेवले. हे दोघे स्वामींच्या समोर बसले. नारायणजींनी या नवागत नीलकंठांची दोन वाक्यात माहिती दिली. स्वामीजी काय बोलतात हे ऐकण्यासाठी वत्सराजांची आतुरता वाढली होती आणि रागावतात की काय या शंकेने छातीचे ठोकेही वाढले होते. पण झाले ते उलटच! स्वामीजींनी मृदु हास्य केले व नीलकंठांची चौकशी सुरू केली. स्वामी काहीही बोलत नसतात हे ऐकले होते ते तर बाजूलाच राहिले. स्वामी भरपूर बोलतात याचाच अनुभव आला. नीलकंठ स्वामींचे बोलणे ऐकतच बसले. त्यांना वाटले आपल्याच नात्यातील व्यक्ती फारा दिवसांनी भेटली आहे इतका आपलेपणा त्यांच्या मनात निर्माण झाला. पहिल्या भेटीतील हे आकर्षण नीलकंठांना फार जाणवले.

बोलता बोलता स्वामींनी विचारले की, 'जानवे आहे का?' यावर नीलकंठ म्हणाले, "होते, पण सध्या नाही." स्वामी म्हणाले—"आयुष्यात धर्म व अध्यात्म

या मार्गात प्रगती करावयाची असेल तर हिंदु धर्माने सांगितलेल्या मार्गाने गेलेच पाहिजे. हे अगदी आवश्यक आहे. त्याला इलाज नाही" इतके म्हणून स्वामींनी नीलकंठांना विचारले "तू मुंजीला तयार आहेस का?"

नीलकंठ :– मुंडन न करता मुंज होत असेल तर तयार आहे.

स्वामीजी :– याला काय अर्थ आहे? शास्त्रात सांगितल्याप्रमाणे सर्व विधी झाले पाहिजेत. हे सर्व संस्कार विधी असतात. मुंडन केले पाहिजे, शेंडी ठेवली पाहिजे.

नीलकंठांच्या मनात विचारचक्राने गती वाढविली. स्वामींच्यापासून काही मिळवावयाचे असेल तर ते सांगतात ते सर्व केले पाहिजे. मनापासून, श्रद्धा ठेवून केले पाहिजे असा पक्का विचार तेथेच झाला आणि नीलकंठांनी स्वामींना लगेच 'हो' म्हटले. "आपली शास्त्रपद्धती प्रमाणे परत मुंज करण्याची तयारी आहे." हे शब्द ऐकताच स्वामी नारायणजी पंड्यांना म्हणाले चांगल्या विद्वान ब्राह्मणाकडून मुंज करून घ्या. कोणा एका ब्राह्मणाचे नाव व पत्ता पण सांगितला. हा मुंजीचा संस्कार विधी ॐकारेश्वर घाटावरील शंकराच्या मंदिरात झाला. नीलकंठ मुंडन करून यज्ञोपवीत धारण करून स्वामींच्या दर्शनास गेला. ही श्रद्धा व तत्परता पाहून स्वामी प्रसन्न झाले. नीलकंठांची दोनदा मुंज झाली. स्वामींनी मोठ्या प्रसन्नतेने त्यांना दीक्षा दिली. स्वामींसारख्या महापुरुषाने आपल्यावर कृपा करून अनुग्रह दिला याची अपूर्व धन्यता नीलकंठांना वाटली. काही दिवस पुण्यात मुक्काम केला आणि नंतर स्वामींची अनुज्ञा घेऊन ते मुंबईस सांताक्रूझला निघून गेले.

नीलकंठांचे मुंडन पाहून घरातील सर्व मंडळींना आश्चर्याचा धक्काच बसला. हा पुण्यास जातो काय आणि मुंडन करून येतो काय? याचा कोणालाही अर्थच कळेना! नीलकंठांनीसुद्धा हिमालयात जाण्याची ही पूर्वतयारी आहे असे सांगून सर्वांना चांगलेच बुचकळ्यात टाकले. पुण्याला परत मुंज केली. जानवे घातले. आता पुण्याहून आल्यापासून ध्यान धारणेलाही बसू लागल्याचे पाहून घरात आईला, बहिणीला मोठे चमत्कारिक वाटू लागले. या एकुलत्या एक पितृविहीन पोराने जर असे केले तर आपले कसे होणार याची चिंता आईच्या मनात उत्पन्न झाली. पण सर्वकाही समजावून सांगितले व नारायणजी पंड्या मुंबईस येऊन खुलासा करून गेले तेव्हा घरात जरा शांतता आली.

९ एप्रिल १९५० या दिवशी स्वामी मुंबईस नीलकंठ वत्सराज यांचे घरी निवासास गेले. त्यावर्षी नीलकंठ मुंबई विद्यापीठाच्या एम्. ए. च्या परीक्षेस बसणार होते. वर्षाच्या सुरवातीला मुदतीच्या ज्वराने त्यांचे काही दिवस आजारात गेले. नंतर पुणे, स्वामींची भेट, मुंज, दीक्षा इ. कार्यक्रम झाले. ऐन परीक्षेच्या काळात स्वामीच तेथे येऊन राहिले. अभ्यासाच्या धावपळीचे दिवस असूनही नीलकंठांनी स्वामिसेवेसाठी सर्व पुस्तके आवरून ठेवली. स्वामी सुद्धा त्या घरात इतके रमले की रोज रात्री ११॥, १२, कधी कधी तर एक वाजेपर्यंत गप्पा गोष्टी करीत बसत. गाणी म्हणत बसत. स्वामींचे बोलणे इतके गोड असे की, त्याचा कंटाळा कधीही वाटत नसे. ते सतत आनंदस्वरूप असत. त्यांच्या बोलण्यातून हवा हवासा वाटणारा उपदेश व माहिती असे. एकसारखे बोलत रहात. मधून मधून स्वतःच ऐकणाऱ्यांना 'क्या' 'क्या' प्रश्न करीत. उत्तर दिले नाही तर उत्तर येईपर्यंत 'क्या' 'क्या' हा त्यांचा प्रश्न चालूच रहात असे. स्वामींच्या बरोबर नीलकंठांना दिवसातून १०/१२ तास रहावे लागत असे. स्वामीजी सदैव उस्फूर्त व आनंदी असत. पहाटे ४, ४॥ पासून रात्री १२॥, १ पर्यंत संपूर्ण दिवस नीलकंठ स्वामी सेवेत तन्मय असत. अशा वातावरणात अभ्यास कसा काय होणार ? म्हणून त्यांनी पुस्तकेही गुंडाळून ठेवली. स्वामींजवळ एम्. ए. च्या परीक्षेची आठवण देखील काढली नाही. दिवसा दिवसाने परीक्षा जवळ येत होती. संस्कृत सारखा विषय घेतलेला की ज्या विषयाला सतत आवृत्तीची गरज. एकूण परिस्थिती पाहून नीलकंठांनी परीक्षेला न बसण्याचे मनाने ठरवून ठेवले.

जसजशी परीक्षा जवळ येऊ लागली तसतशी नीलकंठाच्या मनात उगीचच धडकी भरू लागली. आपण जरी परीक्षेला बसायचे नाही असे ठरविले आणि आई किंवा स्वामी यांनी परीक्षेला बसण्याचा आग्रह धरला तर आपले कसे होणार हीच धास्ती वाटू लागली. परीक्षेच्या आदले दिवशी रात्रीच्या गप्पागोष्टीत आईने सूतोवाच केले आणि स्वामींनी परीक्षेची चौकशी सुरू केली. नीलकंठांनी परोपरीने या वेळी तयारी नाही पुढे बसेन म्हणून सांगितले. परंतु स्वामींनी सुद्धा याच वेळी बसण्याचा आग्रह धरला. "मैं कहता हूँ, तुम बैठो" या वाक्याशिवाय दुसरे काही बोलतच नव्हते. नीलकंठांची अवस्था इकडे आड तिकडे विहिर अशी झाली.

शेवटी, काही केले तरी नापासच होणार हे निश्चित असल्याने स्वामींच्या

आज्ञेचे पालन करून त्यांच्या चित्ताला संतोष देण्याचे नीलकंठांनी ठरवले. सकाळी साडेदहाला पेपर होता. दादरच्या कॉलेजमध्ये नंबर आला होता. फक्त फॉऊण्टन पेन घेऊन, स्वामींना व आईला नमस्कार करून, घोर निराशेने, जड पावलाने नीलकंठ घराबाहेर पडला. मन मोठे विचित्र असते याचा अनुभव घराबाहेर पडल्यावर नीलकंठाला आला. काहीही कल्पना नसताना मनात विचार आला की आता संध्याकाळपर्यंत, पेपराची वेळ संपेपर्यंत बाहेर कुठे तरी भटकावे आणि मग वेळेवर घरी जावे. मनाच्या या कृष्ण कारस्थानाने क्षणभर नीलकंठाला बरे वाटले. चंचलतेने पावलेही कॉलेजच्या बाजूला न जाता पलिकडच्या बागेकडे वळली. बागेतील बाकावर नीलकंठ सुंध मनस्थितीत बसून राहिला. परीक्षेची सुरवात होण्यास फक्त पंधरा मिनिटे बाकी होती. पहिली घंटा झाली. विद्यार्थी लगबगीने कॉलेजच्या दिशेने जाऊ लागले. जाता जाता सुचेल तो प्रश्न व त्याचे उत्तर क्षणार्धात छोट्या पुस्तिकेत नजर टाकून पहात होते. त्या परीक्षेच्या वातावरणाला अधीरतेची गती आली होती. नीलकंठ मात्र सुन्नपणे, निर्विकार नजरेने, हे दृश्य संथपणे पहात होता. त्याचे एक दोन मित्र घाई घाईत त्याला "चल, चल" म्हणाले पण काही उपयोग झाला नाही. त्यांना क्षणाची फुरसत नव्हती म्हणून ते लगेच निघून गेले. नीलकंठ मात्र शांतपणे बसून होता.

इतक्यात, त्याच्या बाकामागून स्वामींचा आवाज आला "यहाँ मत बैठो, जाओ, परीक्षावर्गमें जाओ" नीलकंठाने मागे वळून पाहिले. तेथे कोणीच नव्हते. त्याला वाटले भास असेल म्हणून जरा दुर्लक्ष केले. पण पुन्हा तेच वाक्य, स्वामी खडसावण्याच्या आवाजात म्हणतात, असे ऐकू आले. यावेळी मनावर विश्वास नसला तरी कानावर होता. नीलकंठ चित्राप्रमाणे उभा राहिला. तर पुन्हा एकच शब्द "चलो" हा कानावर जोरात आदळला. नीलकंठाच्या मनाचे मनपण नाहीसे झाले. ते भराभर चालून आपल्या बाकावर येऊन बसले. आताची त्यांची मनस्थिती अत्यंत निर्विचार अवस्थेची होती. पुन्हा घंटा झाली. पेपर वाटले. आणि नीलकंठांच्या घोर निराशेने त्यांची दृष्टी पुन्हा अंधारून गेली. स्वामींची आठवण होऊन मनात म्हणाले "स्वामी, तयारी नसताना का एवढा त्रास देता!" प्रश्न पत्रिका वाचण्याचे सामर्थ्य दृष्टीमध्ये राहिले नव्हते. परीक्षेचा वर्गही आतल्या बाजूला असल्याने बाहेरून उजेड येण्याची शक्यता नव्हती. उत्तर पत्रिकेवर क्रमांक लिहिला. दिनांक लिहिला.

संस्कृतचा पेपर होता तो! विषयही मुखपृष्ठावर लिहून पान उलटले व आता काही तरी लिहिले पाहिजे या विचारात नीलकंठ आले.

लिहावे असे वाटले म्हणजे लिहिता थोडेच येते. त्यांनी पुन्हा अत्यंत काकुळतीने स्वामींचे स्मरण केले. आपल्या या फटफजितीला सीमा नाही या जाणीवेने त्यांचे डोळे भरून आले. पण तेवढ्यात अपूर्व चमत्कार घडला. कोणाचाही विश्वास बसणार नाही असा चमत्कार घडला. कोठूनही प्रकाश येण्याची शक्यता नसतांना नीलकंठांच्या उत्तर पत्रिकेवर प्रकाशपुंजाचा झोत पडला. तो प्रकाशपुंज पडताना पाण्याच्या कारंजाचा फवारा जसा सप्कन पडतो तसा आवाज त्यांना ऐकू आला व ते उत्तरपत्रिकेकडे आश्चर्याने पाहू लागले. त्या दिव्य तेजाच्या किरणशलाकेने त्यांचे सारे शरीर रोमांचित होऊन चैतन्यस्फूर्तीने भारावून गेले. त्यांना स्वतःचे भान राहिले नाही. त्यांनी प्रश्नपत्रिकेतील प्रश्न वाचावा आणि त्याचे उत्तर जणू त्यांच्यापुढे स्पष्ट दिसावे, अशी त्यांच्या मनाची शक्ति तीव्रतेने केंद्रित झाली. त्या अवस्थेत, त्यांनी तीव्रतम गतीने, उत्तरे लिहिण्यास सुरवात केली. तीन तास वेळ उत्तरे लिहिण्यास, अपुरा पडू लागला. पहिल्या प्रश्नपत्रिकेने आत्मविश्वास आणि श्रद्धा वाढविली. नैराश्य नाहिसे झाले. बुद्धीला प्रकाश देण्याचे कार्य ईश्वरी असते याची अनुभवपूर्ण जाणीव तीव्रतेने झाली. नीलकंठ पेपर संपल्यानंतर कोणाशीही अक्षर न बोलता स्वामींच्या नामस्मरणात घरी आले. स्वामींच्या कृपेला कृतज्ञतेशिवाय उतराई होण्याचा दुसरा उपाय नव्हता. कृतज्ञतेचे स्मरण एवढीच कृती सामान्य जीवाच्या हाती असते. ते स्वामींचे स्मरण करीत नीलकंठ घरी आले.

स्वामींना पहाताच नीलकंठांनी त्यांचे पाय घट्ट धरले. त्या श्रीगुरुचरणांवर आपले मस्तक घुसळून घेतले. नेत्रातील अश्रुधारांनी श्रींचे चरण धुवून काढले. अन्तःकरणातील भावनांचे कढ हुंदक्यांनी आणि दीर्घ श्वासांनी जोरात बाहेर टाकले. स्वामी मोठ्या हळुवारपणे आणि प्रेमाने नीलकंठांच्या डोक्यावरून हात फिरवीत होते. मधून मधून पाठही थोपटीत होते. बराच वेळ या स्वसंवेद्य व भावपूर्ण जाणीवेची देवाण घेवाण चालू होती. दोघांच्याही तोंडून शब्द बाहेर येत नव्हता. आई व घरातील इतर माणसे, हे देवदुर्लभ, भक्तिभाव व वात्सल्य यांनी ओसंडून वहाणारे दृश्य, चक्षुर्वैसत्यं अनुभवीत होते.

स्वामींनी नीलकंठाला विचारले "नीलकंठ, पेपर लिख तो दिया या नहीं?"

नीलकंठांनी मानेनेच होकार दिला. स्वामी म्हणाले "बस्स तो! इसी तरह रोज पेपर लिखके आना। अब चिंता नहीं करना। जो होगा सो होगा।" असे म्हणून स्वामींनी त्यांच्या हातावर फळे, प्रसाद म्हणून ठेवली व म्हणाले "खावो प्रसाद."

नीलकंठांची सर्व परीक्षा या पद्धतीने पार पडली. परीक्षेच्या पहिल्या दिवशीच स्वामींचे व नीलकंठांच्या आईचे बोलणे झाले त्यावेळी स्वामी म्हणाले त्याला द्वितीय श्रेणी पाहिजे होती पण ती मिळणार नाही. त्याच्या मनात शंका आली नसती तर तसे झाले असते. त्याने त्याच्या परीक्षेचे मला काहीसुद्धा सांगितले नाही. तरी सुद्धा तो पास होईल. त्याला पास होण्याचा अनुभवही काही कमी नाही. स्वामींचे हे बोलणे परीक्षा झाल्यावर आईने नीळकंठाला सांगितले. त्यावेळी त्याने परीक्षेमधील स्वामींचा अनुभव आईला सांगितला. तो ऐकून आईच्या अंगावर शहारे उभे राहिले.

नंतर स्वामींना तेथून जाण्याची इच्छा झाली ती त्यांनी बोलून दाखविली. तेव्हा आपल्या ऐपतीला शोभेल अशी स्वामींची पूजा आईने नीलकंठाकडून व त्याच्या बहिणीकडून करविली. त्यांच्या गळ्यात गुलाबांच्या फुलांचा मोठा हार घातला. मस्तकावर तुळशी व फुले ठेवली. कपाळी चंदन लावले. अंगाला उत्तम अत्तर लावले. भरपूर मोठी दक्षिणा, फळफळावळ, नारळ, पेढे, रेशमी वस्त्र समर्पण केले. धूप दीप निरांजन दाखवून भावपूर्ण आरती केली. सारे वातावरण चैतन्याच्या तेजाने भरून गेले होते. स्वामींनी सर्व प्रसाद तेथेच वाटून टाकला. ते रेशमी वस्त्र नीलकंठाला प्रसाद म्हणून परत दिले. दक्षिणाही परत करू लागले पण आईंनी फारच आग्रह केला म्हणून तेवढी ठेवून घेतली. प्रसन्न चित्ताने सर्वांना शुभाशीर्वाद दिले व स्वामी तेथून निघून गेले.

पुढे नीलकंठ वत्सराज एम्. ए. झाले. स्वामींच्या आशीर्वादाप्रमाणे सारे घडले. नंतर त्यांना मुंबईच्या 'बेस्ट' कंपनीत नोकरी लागली. स्वामींच्या कृपेने सारे काही ठीक आहे.

स्वामी त्यांचेकडे मधून मधून जात असत. त्यांच्या घरातील शुचिता व प्रसन्नता स्वामींना पसंत पडली होती.

## स्वामींचे एक दुर्मिळ दर्शन !



स्वामींचे चरित्र अपार । भरलेला चैतन्य सागर ।
उपसणारा किती उपसणार । त्या सागरी डुंबु या ।

नारायण पुना ४

(1) २२-२-५०ई

कल्याण भाजन नीलकण्ठ रावलको नारायण स्मरण सूचक आशीर्वाद विशेष समाचार. नीलकंठ! आज ही तुम्हारा पत्र मिला समाचार विदित हुआ तुम्हारी भक्ति भावसे मैं प्रसन्न हुं. प्रति दिन दोन्हो समय माताके चरण वन्दन करना. और माताके आज्ञानुसार सब कुछ कर्तव्य सम्पादन करना. यही मेरा अनुशासन है. यह कर्तव्यको पालन करोगे तो ही तुमने मेरी सब प्रकार सेवा किया ऐसा मैं समझुंगा. "मातृदेवो भव" इस श्रुतिवाक्यको सदा स्मरण रखना. पत्रमे तुम्हारा नाम पूर्ण रूपसे नही लिखा. मुझे जैसा स्मरण है उस प्रकार मै लिखा मैं यहापर आनन्दपूर्वक हुं. नारायण तुम्हारा कुशल विधान करें. इति. शम्.

आशीर्वादक

स्वामी लोकनाथ तीर्थ

## नीलकंठ वत्सराज, मुंबई यांनी सांगितलेल्या काही आठवणी—

स्वामी मुंबईत गेले म्हणजे नीलकंठ वत्सराज, सांताक्रुझ यांचेकडे अत्यंत आनंदात राहात असत. ते म्हणत "मला या गृहातील वातावरण प्रसन्न वाटते. या घरातील स्वच्छता, टापटीप, शांतता, आदरातिथ्य मला पसंत पडले म्हणून असा मुक्काम होत असतो." एकदा असे ते म्हणाले त्यावेळी आई म्हणाली "स्वामींनी इच्छा येईल तेवढे रहावे. त्यात आमचे परम भाग्यच आहे." या सुमारास ते ठरल्यापेक्षा दोन तीन दिवस जास्त राहिले. तर दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्या उठल्या म्हणू लागले "मी आज जाणार आहे. मला राहाता येणार नाही." घरातील सर्वांनाच आश्चर्य वाटले. सगळे त्यांचेकडे प्रश्नात्मक चेहरे करून पहात राहिले. आईने त्यांना विचारले "येथे राहाण्याचे ठरविले आणि एकाएकी निघाला! असे काय घडले ते सांगा."

स्वामी सांगू लागले. "मध्यंतरी मला मध्यप्रदेशातून एका शिष्याचे पत्र आले. तो मला बोलावून राहिला आहे. त्याला काही त्रास होत आहे. त्याच्या प्राणांच्या उर्ध्वगतीला अडथळा उत्पन्न झालेला दिसतो. त्याला मार्गदर्शन करण्यासाठी मला जायलाच पाहिजे. पण मी जाणे टाळले. तुमच्या येथे मुक्काम वाढविला. मी तिकडे गेलो नाही म्हणून काल रात्री मला शिक्षा मिळाली. ही पहा." असे सांगून त्यांनी छाटी काढून पाठ दाखविली. तेव्हा पाठीवर माराचे वळ सुजलेले दिसले ते पाहिल्यावर घरातील कोणीही त्यांना अडविले नाही आणि स्वामीही थांबले नाहीत.

वत्सराज यांचे घरी स्वामींचा मुक्काम असताना एकाने स्वामींना विचारले "स्वामीजी! मुक्काम किती आहे?" हा प्रश्न स्वामींना पसंत पडला नाही. ते त्या गृहस्थाला म्हणाले "आमचे येणे जाणे किंवा थांबणे हे आमच्या हातातील नसते. संत, संन्यासी यांना हे प्रश्न विचारू नयेत. आम्हाला आमच्या इच्छेने काही एक करता येत नसते."

एके दिवशी सायंकाळी स्वामी नीलकंठास घेऊन समुद्र किनाऱ्यावर फिरावयास गेले होते. वेळ सूर्यास्तमानाची होती. त्या अस्ताचली चाललेल्या सूर्याकडे

नीलकंठ पहात उभे राहिले. तेव्हा स्वामी म्हणाले मावळत्या सूर्याकडे टक लावून पाहात बसू नये. उगवत्या सूर्याकडे टक लावून पाहात बसावे.

स्वामींनी सांगितल्यावर नीलकंठांनी मावळत्या सूर्याकडे पाहाणे बंद केले. त्या जुहूच्या सागरतीरावर संध्याकाळच्या प्रसन्न वातावरणात उभे राहून स्वामींनी अथांग सागरपृष्ठाकडे एक टक दृष्टी लावली. मनात सागर देवतेची प्रार्थना केली की "मला तुझा प्रसाद दे. तुला रत्नाकर म्हणतात. मला एक छोटी वस्तु या वेळी दे. रत्नांची इच्छा नाही." अशा स्थितीत स्वामी उभे असताना सागरपृष्ठांवरील लाटेवर खेळत, उड्या मारीत एक शंख त्यांचेकडे येतांना दिसला. तो शंख अत्यंत सुंदर दिव्य असा होता. तो शंख येता येता स्वामींच्या पायाजवळ येऊन पडला. त्यांनी तो शंख हातात घेतला. निरखून पाहिला. रत्नाकराने प्रार्थना ऐकली व एक वस्तू आपणास दिली म्हणून स्वामींना फार आनंद झाला. नीलकंठ जवळ बसले होते. तेही सागराकडे पहात तल्लीन होऊन गेले होते. शंख घेऊन स्वामी म्हणाले "सागराने हा प्रसाद दिला आहे हा उजवा शंख आहे. पण हा तुझ्याजवळ ठेवू नकोस. माझ्या जवळ राहू दे!" त्याप्रमाणे तो शंख स्वामी घेऊन गेले. पुढे त्याचे काय केले ते कळले नाही. कोणाला तरी देऊन टाकला एवढे समजले.

सांताक्रूझ पूर्व या भागात एका व्यापाऱ्याने स्वामींसाठी एका चाळीत एक खोली राखून ठेवली होती. पुढे काही वेळा स्वामींचा तेथे मुक्काम झाला. तिकडे मुक्काम असताना नीलकंठाना स्वामी बोलावून घेत. आपल्याजवळ बसवून घेत. डोळे बंद करून बसून साधन करणारे आणखी काही लोक तिकडे येत होते. स्वामींच्यासमोर साधन अत्यंत उत्तम चाले. शरीर व मन धुंद होत असे. अर्ध्या तासानंतर घरी जाण्याची परवानगी देत. त्यावेळी घरी येताना त्यांना इतके हलके वाटे की आपण हवेच्या लाटेवरून चालत आहोत. चालण्याचे परिश्रम होत नव्हते. पुढे पुढे नीलकंठांना साधनेतून असा अनुभव येऊ लागला की दोन्ही हाताचे पंजे तेलाने ओले करावेत असे तेलकट होत. त्या तेलाला सुगंध येत असे. तो सुगंध दिवसभर टिकून असे ते तेलकट हात ज्या ज्या कपड्यांना पुसले जात त्या त्या कपड्यांना सुगंध येत असे. पुढे स्वामी तेथून निघून गेले. त्या व्यापारीभक्ताने स्वामींना कोठे नेले वगैरे काहीच समजले नाही. नंतर कधीही त्या व्यापाऱ्याची भेट झाली नाही. इतके दिवस त्याचेकडे जाऊन कधी त्याचे नावही विचारले नाही. पुढे साधनेचा अभ्यासही दुर्दैवाने बंद झाला.

स्वामीजींनी नीलकंठांचेवर फार प्रेम केले. महत्कृपेचा वर्षाव केला. जन्मोजन्मीं त्यांचे ऋणी राहण्याचे भाग्य नीलकंठांना लाभले. स्वामींच्यासारखे आत्मीय संत, प्राप्त होणे दुर्मिळ. त्यांच्या स्मरणाने अद्यापही धन्यतेचे कंप रोमांचित करतात. स्वामींची काही पदे नीलकंठांचेकडे होती ती चरित्रात सोयीचे ठिकाणी दिलेली आहेत. स्वामी स्वत: गोड आवाजात ती भजनपदे म्हणत असत. स्वामींच्या वास्तव्याने वास्तूला चैतन्य येत असे तर त्यांच्या भावपूर्ण मधुर गाण्याने चैतन्याला गतीचा संचार होत असे.

एकदा स्वामींची उत्तम पूजा व आरती या कुटुंबियांनी केली. ती त्यांना अविस्मरणीय ठरली आहे.

## १९५०-५१ : मी अनुभवलेले स्वामी

पुण्यात रविवार पेठेत श्री. हिरालाल लखमीचंद शहा नावाचे मोठे व्यापारी आहेत. त्यांचा नारायणदास पंड्या व चिमणशेटजींचा सहवास होता. नारायणदासांचेकडे स्वामी कधी भिक्षेला आल्याचे समजले की हिरालाल शेटजी स्वामींच्या दर्शनास जात असत. हे वयोवृद्ध नाणावलेले व्यापारी आहेत. त्यांनी स्वामींचे केलेले वर्णन त्यांच्याच शब्दात वाचनीय आहे.

"माझा व स्वामी श्रीलोकनाथतीर्थ महाराज यांचा संबंध फक्त वर्ष सहा महिने एवढाच आला आहे. नारायणदासांचे घरी स्वामी आल्याचे समजले की मी तिकडे जात असे. प. पू. स्वामींशी बोलणेही होत असे. वास्तविक मी जैन पण प. पू. लोकनाथतीर्थ स्वामी महाराज म्हणजे जणू पहिले शंकराचार्य. स्वामींचे कडकडीत वैराग्य व प्रखर तेजस्विता आम्ही स्वत: पाहिली आहे. त्यांच्यापुढे आम्ही कधी पैसे ठेवले तर त्यांनी त्याला स्पर्श केला नाही. उलट आम्हालाच ते म्हणायचे आम्हाला कशाला लागतात पैसे? तुम्हीच द्या गोरगरीबांना!"

खरोखर स्वामींचा अधिकार मोठा होता. त्यांच्याबद्दल मला फार फार आदर आहे. स्वामींचा रागही मी पाहिला आहे. त्यांचा राग म्हणजे प्रत्यक्ष रुद्रावतारच! ब्रह्माण्डाला लाथ मारायची त्यांची तयारी असे. ते कधी कशाचीही व कोणाचीही पर्वा करीत नसत. ते रागावले म्हणजे असे लाल होत असत की त्यावेळी त्यांच्याकडे

पाहाणे तर सोडाच पण जवळपास उभे राहाण्याची कोणाचीही हिंमत होत नसे. त्यांचा आवाजही फार चढत असे. शास्त्राज्ञा कटाक्षाने पाळण्याची त्यांची वृत्ती होती. त्यात काही बिघडले तर ते बिघडत असत.

त्यांच्या रागाप्रमाणे त्यांचा बालभाव सुद्धा आम्ही अनुभविला आहे. ते बालभावात रंगले की रंगले मग त्यांना कशाचीसुद्धा आठवण रहात नसे. त्यावेळी त्यांचे बोलणे मोकळे, हासणे मोकळे आत बाहेर काही नाही. एकदा गप्पा रंगल्या की आनंदाची कारंजी उधळत असत. त्यांच्या स्वभावाचे रहस्य त्यांच्या अत्यंत सरळ स्वभावात आहे. मनात वाकडे विचार कधी येणारच नाहीत.

पू. स्वामींशी बोलताना जाणवलेली आणखी एक गोष्ट अशी की त्यांचेजवळ आपण आपल्या कितीही खाजगी गोष्टी मोकळ्या मनाने सांगितल्या तर त्याचा उल्लेख इतरत्र कोठेही करीत नसत. तसेच दुसऱ्यांचे खाजगी विशेष त्यांच्याकडून कधीही ऐकावयास मिळत नसे. माझे त्यांचे खाजगी बोलणे खूप झाले आहे. त्यांनी योग्य मार्गदर्शनही केलेले आहे. ते ज्याच्या त्याच्या अधिकाराप्रमाणे बोलत असत. एकदा आमची योगावर चर्चा चालली होती. त्यावेळी ते म्हणाले "योग सोपा नाही. योगासाठी आहार शुद्ध पाहिजे. शुद्ध म्हणजे फक्त स्वच्छ नव्हे. योग्य त्या व्यक्तीकडून तो स्वैंपाक तयार झाला पाहिजे. स्वैंपाकातील पदार्थही योगाला पूरक असेच पाहिजेत. त्यांचे सेवनही योग्य प्रमाणात झाले पाहिजे. असे अनेक महत्त्वाचे मुद्दे योगाच्या आहारासंबंधी महत्त्वाचे आहेत. नंतर अनेक मुद्दे आहेत. वेळ, नियमीतपणा, संयमित विहार असे नंतरचे मुद्दे आहेतच. केवळ घी-शक्कर खाऊन योग साधत नसतो. आहारादिंची कल्पना स्पष्ट पाहिजे" असे स्वामी सांगत असत.

स्वामींसारखा विरक्त व प्रखर तेजस्वी मनुष्य माझ्या पाहण्यात नाही.

इ. स. १९५०–५१ मध्ये माझा स्वामींशी फारच थोडा संबंध आला. त्यामुळे मला त्यांचा लाभ घेता आला नाही. त्यांचे दर्शन व जो थोडा सहवास घडला ते काही कमी पुण्य नाही.

## स्वामीसेवेतील नारायण व योगेश भालेराव यांचा वाटा !

श्री. भुजंगराव उर्फ नाना भालेराव यांची स्वामीनिष्ठा ज्या ज्या वेळी आठवते

त्या त्या वेळी त्यांच्या तीनही पुत्रांचे भाग्य डोळ्यापुढे उभे राहाते. नानांचे थोरले चिरंजीव श्री. भालचंद्रपंत यांनी केलेल्या स्वामीसेवेचा उल्लेख यापूर्वी आलेला आहे. त्यानंतरच्या काळात श्री. नारायणराव आणि योगेश यांचा स्वामींशी संबंध आला त्यांच्याच शब्दात त्यांनी स्वामींच्या संबंधी जे सांगितले ते पाहू—

## श्री. नारायणराव भालेराव

"१९५० पासून श्रीस्वामीजींच्या सहवासातील घटना थोड्याफार प्रमाणात जाणवू लागल्या होत्या. त्यावेळी माझे वय १७।१८ होते. त्या वयाचा आता विचार केला म्हणजे विशेष कळण्याचे ते वय नव्हते असेच म्हणावे लागेल. तरी त्या काळात घडलेले काही प्रसंग सतत स्मरणात राहतील असेच आहेत. किंबहुना २०/२२ वर्षानंतरही त्या काळात घडलेल्या गोष्टी स्मृतीत ताज्या आहेत याचाच अर्थ त्या प्रभावी होत्या.

२० नारायण पेठेमधील मुक्कामात स्वामीजी आले की पू. श्रीगुरुमहाराजांच्या खोलीत मुक्काम करीत. ते फक्त भिक्षेला आमचेकडे येत असत. बाकी त्यांचे स्नान संध्यादि सर्व आह्निक, विश्रांती, बैठक, भेटीगाठी सारे काही त्याच खोलीत चाले. मग ज्यावेळी त्यांचे काम निघे त्यावेळी ते त्या खोलीतूनच क्वचित् दारात येऊन मोठ्यांदा हाक मारून आमच्यापैकी कोणालाही बोलावीत असत. काम सांगून करून घेत असत. मी किंवा भाऊ घरात असलो की स्वामींची हाक यायची. मला आजही समाधान वाटते की स्वामींनी आम्हाला स्वतः सांगून काम करवून घेतले. ते सुद्धा इतक्या आपुलकीने व आनंदाने की आम्हाला कधी वेगळे वाटलेच नाही. आईवडिलांनी जितक्या प्रेमाने व हक्काने कामे करून घ्यावीत अगदी तशी कामे स्वामींनी आमच्याकडून करून घेतली आहेत. या कामाला सेवा म्हणतात याची कल्पनाही त्यावेळी मनाला शिवली नव्हती. त्यामुळे सेवेचा अहंकारही कधी मनाला आला नाही.

आपल्यापैकी कुणालाही ठाऊक नसेल की स्वामी पुण्यात आमचे येथे तरी पिकदाणीचा वापर करीत होते. त्यांना तेव्हा कफ खोकल्याचा त्रास होता. स्वामींची ती पिकदाणी विसळणे, स्वच्छ करणे हे काम नित्यनेमाने मला सांगून करून घेत असत. खरोखर स्वामींचे माझ्यावर किती प्रेम असेल हे मी शब्दात कसे सांगू शकेन ?

स्वामी आमच्याकडून अंग रगडून घेत असत. पायाच्या बोटापासून डोक्यापर्यंत सर्व अंग आम्ही रगडत असू. ही आठवण आजसुद्धा आमच्या अंत:करणात आनंदाचे कल्लोळ निर्माण करते. एकदा या कामाला सुरुवात केली की आमच्या इच्छेने कधीच आम्ही काम थांबवीत नसू. अंग रगडताना कंटाळत नसू. स्वामींनी तेथूनच दुसऱ्या कामासाठी पाठविले तर जात असू. नाहीतर ४/४ तास अंग रगडत बसत असू. त्यांनी पुरे म्हटले म्हणजे आम्ही तेथून उठत होतो. या वेळात स्वामी इतके बोलत बसायचे की वेळ कसा निघून जाई ते कळत नसे. छोट्या गोष्टी, चुटके, विनोद, गाणी, गंमती सारे काही स्वामींच्याजवळ असे. आम्हाला स्वामी कधी गंभीर किंवा रागावलेले दिसलेच नाहीत. ते आमच्यावर नेहमी खूष असत. स्वामींच्या अंग रगडण्याचा विशेष अनुभव हा की नंतर हाताला सुगंध येई. हात धुतले तरी सुगंध जात नसे. दिवसभर टिकत असे. हा सुगंध घरात आईला, नानांना अनेक वेळा दाखविला आहे. माझ्या लहानपणापासून स्वामींचे आमचेकडे जाणे येणे असल्याने ते आम्हाला आमच्यापैकीच वाटत होते.

स्वामींच्या बरोबर फिरावयास मी अनेक वेळा गेलो आहे. पुष्कळ वेळा आम्ही दोघेच असू. फर्ग्यूसनच्या टेकडीवर जाऊन बसत होतो. तेथे स्वामी 'हात बघू' म्हणून माझा हात बराच वेळ पहात असत. एकेका रेषेची खूप माहिती सांगायचे. भविष्य सांगायचे. माझे भविष्य लक्षात राहिले नाही पण स्वामी माझे भविष्य पाहात होते. हा भूतकाळ मात्र माझ्या लक्षात चांगलाच राहिला आहे. दोन तीन तास फिरून येण्यास लागत असत. फिरायला स्वामी निघाले की स्वामी हाक मारीत "नारायण चलो घुमनेको" म्हणत. मी क्षणार्धात त्यांचेबरोबर निघत असे.

एकदा सकाळचे वेळी स्वामी स्नान करून काही आह्निक करीत होते. तेवढ्यात मी आमच्या खोलीतून पू. महाराजांच्या खोलीत सहज गेलो. माझे काही काम नव्हते. तिकडे कोणाचे काम असले तर पहावे याशिवाय काहीच मनात नव्हते. मी नेहमीप्रमाणे हसत हसत खोलीत गेलो. स्वामींनी विचारले 'का हसतोस?' मी उत्तर दिले "उगाच हसतो. कारण काहीच नाही" त्यावर एकदम स्वामी म्हणाले "ये बहुत अच्छा है, यह आनंद बाहरका नहीं है अंदरका है।"

मला प्लुरसीचा आजार झाला होता. प्रकृती अगदी क्षीण झाली होती. इ. स. १९५१ साल होते. स्वामी पुणे सोडून गेले होते. त्यांनी पत्राने मुद्दाम

कळविले होते की "ब्रह्मचर्यका अच्छा पालन करने से यह रोग का कुछ शेष न रहेगा।" आणखीही पुष्कळ सांगितले होते.

मला स्वामींच्याकडून मुंजीनंतर लवकरच दीक्षा झाली. त्यावेळी माझे वय जेमतेम नऊ वर्षाचे होते. मला साधनेतील उत्तम आनंदाचा अनुभव फार थोड्या वेळात मिळतो म्हणून माझे साधनही थोड्या वेळात होते.

पुण्याहून दरमहा स्वामींना म. ऑर्डर करण्याचे काम माझ्याकडे असे. मी ठरलेली तारीख चुकू देत नसे.

## योगेश भालेराव

मी तर लहानपणींच स्वामींच्या अंगाखांद्यावर खेळलो असे आई आणि नाना सांगतात. स्वामींना मी फार आवडत असे. ते मला जवळ ओढून घेत व माझ्याशी खेळत असत. मला जवळ बोलावून "बैठो! बैठो" म्हणत. स्वामी मलाही कामे सांगत असत. एकदा संध्याकाळी मला स्वामींनी दूध आणण्यास सांगितले होते. त्यावेळी त्यांच्यापुढे जाण्याची मला फार भीति वाटली. दिवे लावण्यास सांगितले. मी स्वामींच्यासमोर जाण्यास घाबरत असे. स्वामींना पँट आवडत नसे. पँट घालून पुढे जायची भीति वाटे. माझे केस वाढलेले पाहिले की लगेच न्हाव्याला बोलावून घेऊन 'चंपी' करायला लावीत. मला ते 'बाबू' हे बंगाली नाव म्हणून हाका मारीत.

एकदां एके संध्याकाळी स्वामी खिडकीपाशी त्यांचे जागेवर बसले होते. समोर ग्रंथपीठावर ग्रंथ उघडा ठेवून तो ते वाचीत होते. त्यांच्या डोळ्याला सोनेरी काडीचा निळ्या काचेचा नाजुक चष्मा होता. वातावरण शांत होते. त्यावेळी मी त्या खोलीत गेलो. स्वामींच्या चेहऱ्यावर मावळत्या सूर्याचे पिवळे कोवळे ऊन पडले होते. स्वामींनी चष्म्यामधून माझेकडे पाहिले. मी त्यांचेकडे पाहिले. या क्षणार्धात् काय झाले ते कळले नाही. पण हा प्रसंग आणि स्वामींची ती दृष्टी आजही ताजी आहे. स्वामींची आठवण झाली की हेच दृश्य दिसते.

स्वामींच्याबरोबर बऱ्याचवेळा फिरावयास गेलो. नारायण पेठेतील कॉजवेवरून जाताना काहीवेळा थोड्या पाण्यातून स्वामींच्याबरोबर जाताना मजा वाटत असे.

पाण्यातून जाणाऱ्या स्वामींची मूर्ती आजही डोळ्यासमोर उभी राहाते. पात्रसाळ्यात लकडी पुलावरून फिरावयास जात असत.

भिक्षेच्यावेळी स्वामींना बोलावून आणल्यावर नाना किंवा श्रीगुरुमहाराज स्वामींची पूजा करीत. त्यांच्या डोक्यावर तुलसीपत्र ठेवीत. फुले वहात. त्यांच्या भोजन पात्राखाली मंडळ करीत. आचमनासाठी हातावर पाणी घालीत. डाव्या हातावर पाणी घालून समंत्रक संकल्प सोडून मग भिक्षा सुरू होत असे. 'बसा' म्हणावे लागे. भिक्षेनंतर थोडावेळ उन्हात उभे राहात मग घरात जात.

## १९५० : श्री. दत्तात्रेय दिगंबर दामले, मुंबई आणि स्वामीजी

हे पुण्यातील सराफ, श्री. दिगंबर गणेश दामले यांचे चिरंजीव. पुण्यातच शिक्षण झाले. सध्या नोकरीनिमित्त मुंबईस आहेत यांना स्वामींचे प्रथम दर्शन काकांचे बरोबर इ. स. १९४३ मध्ये झाले. त्यावेळी स्वामी पुरंदरे कॉलनीत, दिवेकर बंगल्यात, श्री. शंकरराव मार्कंड यांचेकडे उतरले होते. नंतर स्वामींच्या दर्शनास वारंवार जाणे होई. इ. स. १९४४ मध्ये मॅट्रीक परीक्षेस ते बसले. त्यावेळी परीक्षेच्या आधी त्यांना स्वामींचे दर्शन स्वप्नात झाले. ते स्वप्न असे.

श्री. दामले हे भुसभुशीत मातीच्या डोंगरावर चढत आहेत. पण पाय सारखे आत जात आहेत. कसे तरी करून डोंगर चढले. डोंगरावरील मंदिरांत स्वामींचे नाव घेऊन शिरले तर मंदिरातच स्वामींचे दर्शन झाले. स्वामींना नमस्कार केला. त्यांनी अभय दिले.

त्यांना हे स्वप्न अद्यापही स्मरण होताच पूर्ण आठवते. ते त्यावर्षी स्वामींच्या कृपेने परीक्षा पास झाले.

एकदा हे दामले स्वामींच्या दर्शनास गेले असता स्वामींच्या चटईला चुकून पाय लागला त्यावेळी स्वामी म्हणाले "आसनाला पाय लावू नये" त्या वेळेपासून काळजीपूर्वक नमस्कार करण्याची बुद्धी तीव्रतेने काम करू लागली.

एकदा शंकरराव मार्कंड यांनी नवी मोटार गाडी घेतली होती. स्वामी त्या गाडीतून बाहेर निघाले तेव्हा दामले यांना त्यांनी बरोबर नेले. त्यावेळी विठ्ठलवाडीला नेऊन आणले.

स्वामी मध्यंतरी हिराबागेसमोरच्या मागोरा कंपनी जवळच्या बंगल्यात एका खोलीत रहात होते. त्यावेळी त्यांची प्रकृती ठीक नव्हती. श्री. दत्तात्रेय दामले हे स्वामींचे हातपाय दाबीत व डॉ. बेन्द्रे यांचेकडून औषध आणून देण्याचेही काम करीत असत.

एकदा स्वामींचा मुक्काम २०, नारायण पेठेमध्ये होता. त्यावेळी स्वामींच्या दर्शनास श्री दत्तात्रेय दामले हे सायंकाळी ४।५ वाजता गेले. स्वामी बाहेरच्या खोलीतील खिडकीजवळ नेहमीच्याच जागेवर आसनावर बसलेले होते. ते एकटेच होते. दामले आत गेल्याबरोबर स्वामी म्हणाले "आवो दत्तू ! बैठो मेरे सामने" स्वामींना नमस्कार करून स्वामींच्या समोर बसले. स्वामींच्या नजरेला नजर भिडविणे कठीण पण त्या दिवशी दामले यांनी स्वामींच्या नजरेला नजर भिडवून बराच वेळ स्वामींकडे पाहिले. तेव्हा त्यांच्या लक्षात असे आले की स्वामी त्यांचेकडे टक लावून पाहात आहेत. असे होता होता दामले यांनी डोळे मिटले व ते बराच वेळ निश्चलपणे बसून राहिले. सुमारे तास दीड तास झाल्यानंतर, डोळे उघडले तेव्हा स्वामी समोर बसले होते व त्यांचेकडे पहात होते. दामल्यांनी डोळे उघडताच स्वामी म्हणाले—

"वामन मेरे सामने इसी तरह बैठा था। मैंने उसकी तरफ देखा ही नहीं कि वह बेहोष होकर तनकर बैठ गया। उस समय उनकी बहेन गोदावरी अंदर आयी। वामनकी वह काष्ठवत् अवस्था देखकर घबरा गई। मैंने उसे कहा घबरो मत। वह मेरे सामने है चिंता क्यों करती। अच्छा फिर ऐसा नहीं होगा।"

स्वामींच्या वर्णनातून श्रीगुरुमहाराजांना निर्विकल्प समाधी लागल्याचे समजले. नंतर दामले यांनी स्वामींना नमस्कार केला. स्वामींनी त्यांच्या पाठीवरून हात फिरविला. मग ते घरी गेले.

पुढे १९४८ मध्ये मुंबईस नोकरी लागल्यावर दामले हे पुण्यात येऊन विषमज्वराने आजारी पडले. २१ दिवसांचा तो ताप होता. त्यावेळी स्वप्नात स्वामींचे दर्शन झाले. स्वामी उंच ठिकाणी आसनावर बसले होते. दामले यांनी स्वामीजींना खाली बसण्याची विनंती केली तेव्हां ते म्हणाले "खाली फार घाण आहे." या स्वप्नाच्या दुसऱ्या दिवशी श्रीगुरुमहाराज प्रकृतीच्या चौकशीसाठी आले होते. त्यांच्या पाठोपाठ श्री. बापू अनंत पुजारी हे श्रीक्षेत्रनृसिंहवाडीहून आले होते. त्यांनी

श्रींच्या पादुकांचे तीर्थ आणून दिले. ते घेतल्यानंतर ताप उतरू लागला. तेव्हां आजारपणांत स्वामी घरी येऊन गेले होते. या आजारातून पूर्ण बरे वाटल्यावर स्वामींचे दर्शनास गेले असता स्वामींनी 'सब ठीक होगा' हा आशीर्वाद दिला.

श्री. दामले यांना अगदी अलिकडे, स्वामींच्या समाधीकालानंतरचे दोन अनुभव आले आहेत. त्यांचा औचित्यपूर्ण उल्लेख आवश्यक आहेत. श्री. दामले हे मुंबईस रहात असल्याने स्वामींच्या १ ल्या पुण्यतिथीला उपस्थित राहाता आले नाही. याबद्दल त्यांना अतिशय वाईट वाटले. काय करावे हेही त्यांना समजेना. तेव्हा बरोबर वर्षश्राद्धाचे आदले दिवशीच्या रात्री स्वतः स्वामी स्वप्नात येऊन म्हणाले "तू माझ्या पुण्यतिथीच्या दिवशी ५ ब्राह्मणांना भोजनास बोलावीत जा. मी त्यांच्या रूपाने दर्शन देईन." त्यानंतर आलेल्या पुण्यतिथीच्या वेळी श्री. दामले यांनी दिवसभर उपवास केला. रात्री निवांत वेळ असल्याने ५ ब्राह्मणांच्या भोजनाचा कार्यक्रम केला. त्या वर्षापासून म्हणजे १९५७ पासून त्यांचा हा कार्यक्रम चालू आहे.

दुसरा अनुभव असा की १९६१ मध्ये पुण्यात पानशेतचे धरण फुटून शहरातील नदीकाठच्या घरांना पुराचा मोठा तडाखा बसला. या बातम्या दुसरे दिवशी वर्तमानपत्रात आल्या. पण पुराचे दिवशीचे रात्री श्री. दामले यांना स्वप्न पडले. स्वप्नात स्वामी येवून म्हणाले "अरे, दत्तू झोपलास काय? वामन कसा आहे? त्याचे फार नुकसान झालेले दिसते. बघ बघ काय झाले ते." दुसरे दिवशी वर्तमान-पत्रात पानशेत पुराची बातमी होती. श्री. दामले यांनी लगेच पुण्यास वडिलांना पत्र पाठवून स्वप्नाचा खुलासा केला आणि श्रीगुरुमहाराजांची चौकशी करून उलटटपाली कळविण्यास सांगितले. नंतर सवडीप्रमाणे पुण्यास येऊन श्रीगुरुमहा-राजांची श्रीसिद्धमाता मंदिरात जाऊन भेट घेतली.

श्री. दत्तात्रेय दिगंबर दामले हे एलूएल्. बी. असून मुंबईच्या हायकोर्टात अप्लाईड साईडचे सुपरिंटेण्डेंट आहेत. मुंबईत बी ४९/१९२ सिद्धार्थ नगर, गोरेगाव, मुंबई नं. ६२ येथे राहात आहेत.

श्री. दामले स्वामींच्याकडे जात असत तेव्हा त्यांना अनेक वेळा श्रीगुरु-महाराज स्वामींचे हात पाय चेपीत आहेत असे आढळून आले आहे. श्रीगुरुमहा-राजांनी स्वामींची शारीरिक सेवाही खूप केलेली आहे.

# स्वामीसेवा फार कठीण!

स्वामी अनन्यसाधारण महापुरुष होते. त्यांच्या जवळ खूप होते. पण ते नेहमी सर्व काही लपवून, झाकून ठेवीत. तरीसुद्धा कोणीही मनुष्य त्यांच्या सहवासात गेला की त्यांच्याकडे तो इतक्या जोरात खेचला जाई की त्याला इतर कशाचे भान रहात नसे. पाच मिनिटे दर्शनाला म्हणून घरून ठरवून तो निघाला तरी स्वामींच्या समोर गेल्यावर त्याचा तो निश्चय संपे त्यांच्या सहवासात रमून, गुंगून जात असे. हा अनुभव एकाचा नाही, जो कोणी जाईल त्याचा! त्या सर्वांचा! एक वेळचा नाही प्रत्येक वेळचा!!

स्वामी चमत्कार दाखवीत होते म्हणावे तर तो त्यांचा नावडता विषय! लोकांचे लौकिक प्रश्न सोडवीत म्हणावे तर त्यांनी अलौकिक विषयाशिवाय फालतु लौकिक प्रश्नांना कधी थाराच दिला नाही. कोणाला मंत्र नाही, जप नाही, कोणाला गंडा बांधला नाही तर कोणाला अंगारा दिला नाही. बरे, जाणारा वाटेल त्या इच्छेने किंवा तयारीने स्वामींच्या पुढे जाऊ द्या! त्यांच्यासमोर तो गेला की त्याची ती तयारी आणि इच्छा कुठे हरवायची पत्ता नाही. त्याच्या मनातले प्रश्न गायब व्हायचे. शंका पळून जायच्या. अडचणी विरघळून खलास व्हायच्या आणि त्यांच्यासमोर बसलेला आहे तोपर्यंत अपूर्व शांततेच्या गुंगीत धुंद व्हायचा! त्याची पक्की भारवलेली स्थिती व्हायची!

पण या अपूर्व स्थितीने त्याला आनंद किती होत असे? त्याच्या चेहऱ्यावर प्रसन्नतेचे हास्य लगेच निर्माण होत असे. त्याला वाटे आपण स्वामींच्याकडे आलो किती चांगले केले! आपण येथे रोज येत जाऊ! थांबत जाऊ! स्वामीच्या संगतीने

आपल्याला लाभ होईल. याप्रमाणे स्वामींच्याकडे येणाऱ्या प्रत्येकाचे होत असे. लोहचुंबकाकडे लोखंड जसे ओढले जाते तसे या प्रत्येक येणाऱ्याचे होत असे.

पण यापुढचा टप्पा फार कठीण आहे. अग्नीच्या ज्वाला लांबून कितीतरी मोहक वाटतात! पण अग्नीची जवळीक वाढत चालली की त्या अग्नीचा वाढत चाललेला तो दाह सहन करणे असह्य होत जाते. शेवटी तो दाह सहन करणेही अशक्य होते. तेथेच त्या जीवाला मर्यादा पडते. तेथून त्याला माघारी फिरले पाहिजे; नाहीतर त्या अग्नीपासून त्या अंतरावर दूर उभे राहिले पाहिजे. आणखी एक पाऊल पुढे टाकीन म्हटले तर जळून जाण्याचीच तयारी ठेवली पाहिजे. दिव्यत्त्व असे दाहक असते. स्वामींच्याजवळ ही दाहकता फार होती.

महापुरुषांची दाहकता वैराग्यात असते. वैराग्य वर्तनात असते. वर्तनात व्यवहार असतो. व्यवहारात कर्म येते. म्हणून महापुरुषांची कर्मे सामान्य जीवाला पेलवत नाहीत. त्यांची नक्कल ही शेवटी आत्मनाशाला कारणीभूत होत असते. त्यांच्या सहवासात गेले की त्यांच्या कृतींच्या अनुकरणाचा मोह होतो आणि हा मोहच नाशाचे मूळ ठरते. म्हणून महापुरुषांच्या वृत्तींचा अभ्यास आणि व्यासंग आधी खूप करावा लागतो. हेही कठीणच असते. पण आधी वृत्तींचा विचार होणे हिताचे असते. स्वामींच्या सेवेसाठी जवळ जाणे फार कठीण असे.

वैराग्याची दाहकता अनपेक्ष वृत्तीतून निर्माण होते. येणारा अपेक्षांची गाठोडी घेऊन येतो. इथे मात्र अनपेक्षतेचे भांडार भरलेले! येणारा हार, नारळ घेऊन येतो. हार देवाच्या फोटोला जातो तर नारळ आणणाऱ्यालाच दिला जातो. इथे घेतला जातो फक्त नमस्कार! बाकी काही नाही! समजून घेतली तर हीच दाहकता आहे. समज येईपर्यंत असेच चालणार! त्याला इलाज नाही. येत राहणे आणि वाटेल ते करीत राहाणे हाच समज यायला उपाय आहे! पण समज आली म्हणजे अंतर कळायला सुरवात होते. समज वाढेल तसे अंतरही वाढत जाते. याला मर्यादा नाही. दिवसा दिवसांच्या समजाने साधक आपले लघुत्व समजतो आणि स्वामींचे गुरुत्त्व अजमावीत बसतो! ही अंतरीची दाहकता कुणालाही सांगता येत नाही! गुरुत्त्वाच्या दाहकतेने लघुत्त्व जळून जाईपर्यंत हे चालते! स्वामीसेवा समजून करणाऱ्याला फार कठीण असते.

या वैराग्याच्या ज्वाला उपेक्षा आणि परखड बोलणे या दोन प्रक्रियांनी साधकाचा अहंकार व मानापमान जाळून टाकीत असतात. विरक्त पुरुषाच्या वाऱ्याला जरी उभे राहिले तरी त्याची धग लागल्याशिवाय रहात नाही. ही धगच मोक्षमार्गाची तग धरते. संतांचे चरणरज लागताच वासनांचे बीज होरपळून, जळून खाक होते. अशी ही दाहकता सहन करीत करीत सेवा करणे सोपे नसते.

स्वामी कधीही, कुणाचीही खुशामत करीत नसत. मिंधेपणा तर नाहीच नाही ! त्यांच्या मनाविरुद्ध झाले, शास्त्राविरुद्ध झाले की स्वामींनी नापसंती दर्शविलीच म्हणून समजावे. स्वामींची नापसंती कोणालाही पचवता आली नाही. अशावेळी त्यांच्या समोर जाण्याची कोणाची हिंमत होत नसे. त्यांना जगाची पर्वा कधीच वाटली नाही. जागा सोडून निघतांना ते इतके बेफिकीर असत की दुसरी जागा ठरलेली नसली तरी पहिली जागा सोडतांना ते व्यावहारिक सारासार विचार करीत नसत. त्यांच्या वागण्याला प्रमाण जग नव्हते तर त्यांचे सरळ प्रामाणिक मन होते.

स्वामींची अवस्था बाल-उन्मत्त किंवा पिशाच्चवत् आढळत असे. कधी इतके सरळ, इतके भोळे की निरागस बालकाची जाणीव व्हावी. कधी आपल्या धुंदीत असले की त्यांची स्थिती एकदम निष्काळजी असे. एखादेवेळी तर ते इतके विचित्र वागत की पहाणाऱ्याला भ्रम व्हावा. म्हणून स्वामीसेवा कठीण असे.

त्यांच्या स्वभावात स्वतःला झाकून टाकण्याचा फार मोठा गुण होता. पुष्कळवेळा असे चमत्कारिक वागत की लोकांनी आपल्याला तुच्छ मानावे, अपमानित करावे, आपल्याला बावळट, वेडे समजून दूर निघून जावे. यासंबंधीं तेच एकदा म्हणाले, " निंदा और अपमान का विष पचानेका यह अभ्यास है।" आपल्या अशा स्वभावाचा उल्लेख करतांना दुसरा मुद्दा त्यांनी सांगितला होता। " ऐसा विचित्र रूप लेनेसे लोग मुझसे भाग जाते। मैं अकेला रहता हूँ। झंझटमें पडता नहीं।" असाच स्वभावा संबंधी तिसरा मुद्दा त्यांच्याच बोलण्यातून व्यक्त झाला होता.

" गुरुको भी शिष्यका मोह पडता है। शिष्यके मोहमें पडनेसे अध्यात्मके सीवा भी बहुत बातें करनी पडती है। अंतिम कल्याणका विचार सबसे श्रेष्ठ मानकर किसीके मोहमें पडना अच्छा नहीं। इसीलिये मैं अपने साथ कभी भी शिष्य रखता नहीं।

शिष्य गुरु सेवाका विचार करे, मैं अपनी सुविधाको तो भगवान के हाथ सौंपा दी है। प्रारब्धके अनुसार जो होगा उसीमें मैं प्रसन्न हूँ।"

स्वामींच्या अशा काही वैराग्यप्रखरतेच्या बाजू होत्या. त्यामुळें त्यांची सेवा कठीण असे. त्याचबरोबर एवढी अनुकूलता असून त्यांनाही खूप कष्टाला आणि दुःखाला सतत तोंड द्यावे लागले.

स्वामींच्या जवळ शिष्य टिकतच नसे. एक प्रसंग यासंबंधी सांगण्यासारखा आहे. स्वामी एकदा नागपूरला रावबहाद्दूर परांडे यांचेकडे होते. रावबहाद्दुरांचे मन स्वामींच्या ठिकाणी श्रद्धेने जडलेले असे. त्यांना सारखे वाटे की स्वामींनी एखादा शिष्य तयार करावा. ही अपूर्व विद्यायुक्त आणि अपार कर्तृत्वसंपन्न व्यक्ती स्वामीच आहेत. त्यांच्या सहवासात राहून एखादा तरूण तयार झाला तर समाजाला फार फायदा होईल. असा विचार सतत रावबहाद्दुरांच्या मनांत असे. या वैचारिक दृष्टीतून त्यांनी एक उमदा तरूण हेरून ठेवला. त्या तरुणाशी त्यांनी बोलणे चालणे, भेटीगाठी, चर्चा सुरू केली. रावबहाद्दुरांची चोखंदळ दृष्टी संतुष्ट झाली. स्वामी-सेवेला योग्य असा हा तरूण आहे अशी त्यांची खात्री झाली. त्या तरुणालाही स्वामींची नीट कल्पना दिली. तारुण्यात झगझगीत ध्येयज्योतीवर पतंगाप्रमाणे तुटून पडण्याची जिद्द असते. ती जिद्द इतरेजनांनाही काही काळ मंत्रमुग्ध करीत असते. रावबहाद्दूर त्या रूपसंपन्न, सुदृढ, पीळदार शरीरयष्टी असलेल्या तरुणाच्या ध्येयवादावर खूष झाले.

त्याचे नाव होते ब्रह्मप्रकाश. जणू नावातही आकर्षणाची जादू होती. ब्रह्म-प्रकाशला योगासनांची उत्तम माहिती होती. सर्व पाश सोडण्याची त्याची तयारी होती. त्याच्या गोऱ्यापान, उमद्या, उंच्यापुऱ्या शरीराची छाप पहिल्याच भेटीत सर्वांवर पडत असे. त्याची भाषाही मधुर होती. तो इतका गोड व आर्जवी बोलत असे की चार माणसे आपल्या भोवती तो सहज खिळवून ठेवीत असे. तेव्हां, स्वामी नागपूरला आल्यावर रावबहादुरांनी ब्रह्मप्रकाशला स्वामींच्या दर्शनाला येण्यास सांगितले. तो स्वामींच्या दर्शनास आला.

रावबहादुरांनी स्वामींना त्याचा सर्व परिचय करून दिला. स्वामींनाही समाधान झाले. ब्रह्मप्रकाश स्वामींच्याकडे नित्य येऊ लागला. रावबहाद्दूर त्याला सेवा कशी

करावी म्हणून, स्वामींना नकळत, मार्गदर्शन करू लागले. हळू हळू ब्रह्मप्रकाश स्वामींची खूप सेवा करू लागला. होता होता दीक्षेचा विषय निघाला. स्वामी कबूल झाले. शुभ दिवस पाहून ब्रह्मप्रकाशला दीक्षाही झाली. शारीरिक व मानसिक अनुकूलता भरपूर होती. त्यातून स्वामींच्याकडून दीक्षा झाली. साधनेचे तीव्र अनुभव सुरू झाले. ब्रह्मप्रकाश या अनुभूतीच्या आनंदाने हरखून गेला. रावबहाद्दुरांच्या इच्छेप्रमाणे तो स्वामींच्याबरोबर राहण्यास तयार झाला. ही गोष्ट स्वामींच्या कानावर घातली. स्वामीही "ठीक आहे" म्हणाले. रावबहाद्दुरांना या आनंदाने आकाश ठेगणे झाले.

स्वामींचा नागपूर मुक्काम संपला. पुण्याला जाण्याचे त्यांचे ठरले. त्यांनीच ब्रह्मप्रकाशाला बरोबर चलण्याचे सांगितले. त्यालाही आनंद झाला. स्वामी ब्रह्मप्रकाशला घेऊन पुण्यास आले. वीस नारायण पेठेत श्रीगुरुमहाराजांचेकडे आले. एक नवा शिष्य आणला आहे म्हणून मोठ्या अभिमानाने सर्वांना सांगू लागले. तो प्रभावी शिष्य पाहून प्रत्येकाला आदर, भक्ती व आश्चर्य यांच्या प्रचंड ओझ्याने दडपल्यासारखे झाले. गुरुंच्यापेक्षा शिष्याचीच छाप विशेष होती. त्या नव्या शिष्याच्या सेवेपुढे इतरांना स्वामीसेवा करायचा संकोच होऊ लागला. पण ब्रह्मप्रकाश गोड वाणीचा होता. त्याने कुणालाही दुखावले नाही. उलट दुसरा कोणी सेवेला पुढे झाला तर स्वतः नम्रतेने मागे राही. हळू हळू ब्रह्मप्रकाश आपल्यासारखा स्वामींचा शिष्य आहे अशी सर्वांची भावना झाली.

पण एकदा असे काही झाले की एका क्षणात सारे चित्र पार बदलून गेले. ती संध्याकाळची वेळ होती. स्वामींनी ब्रह्मप्रकाशला हाक मारली पण तो कुठे बाहेर गेला होता हे कुणालाच माहीत नव्हते. स्वामी ब्रह्मप्रकाश आला का म्हणून दहा दहा मिनिटांनी विचारू लागले. त्या प्रत्येक वेळी 'नाही' 'नाही' असे सांगण्याची पाळी आली. स्वामी ऐकून घेत व विषयांतर करून बोलू लागत. होता होता रात्र झाली. आठ वाजले. साडेआठ झाले. नऊ झाले. साडेनऊ झाले तरी ब्रह्मप्रकाशचा पत्ता नाही. इतरांना वाटले पुण्याची माहिती नाही, चुकला असेल. स्वामींच्याजवळ तसे बोलूनही दाखविले. पण स्वामी त्यावरही काही बोलले नाहीत. शेवटी रात्री दहा वाजता ब्रह्मप्रकाश घरी आला. त्याचेही मन आतून चांगलेच घाबरले होते. आल्या आल्या त्याने स्वामींना नमस्कार केला.

तेव्हा स्वामींनी विचारले इतका वेळ काय करीत होतास? त्यावर तो म्हणाला "पुणे पाहण्यासाठी गेलो होतो. येता येता सावरकरांच्या व्याख्यानास थांबलो होतो." स्वामी यावर काही बोलले नाहीत. पण नंतर त्याला समजावून सांगितले "तुझे काही चुकले नाही. तुला दीक्षा दिलेली आहे. तुझे त्यामुळे कल्याणच होणार आहे. पण तुझा रजोगुण अजून बराच शिल्लक आहे. तो भोगत भोगत जेव्हा कमी होईल तेव्हा तुला खरी तळमळ लागेल. तळमळ लागणे हे या मार्गाचे रहस्य आहे. ती तळमळ नसताना तुला जर मी माझ्याबरोबर घेऊन हिंडलो तर तुला लोकेषणेची हाव सुटेल आणि खऱ्या अध्यात्मापासून आणखी दूर जाशील. तू करतोस ते चूक नाही. पण तुला या स्थितीची कल्पना येण्यास फार अवकाश आहे. असे आहे म्हणून माझ्या बरोबर तुला ठेवणे माझ्याही दृष्टीने बरोबर नाही. ते तुला कळणार नाही. सेवेची तळमळ किती प्रखर असावी लागते हे मला शब्दांनी सांगता येत नाही. माझा राग नाही पण ही ती वेळ नाही. तुला भाड्याचे हे पैसे घे आणि तू परत जा. तुझ्या आजच्या वर्तनाने मला बोलते केले एवढाच याचा अर्थ आहे. तुझी ही स्थिती मी आधीच ओळखली होती पण रावबहाद्दुरांसाठी आजपर्यंत सांगितले नाही. त्यांना माझा आशीर्वाद सांग."

अशी ही स्वामीसेवा कठीण होती.

## अखेरचे पुणे

सन १९५१ साल उजाडले. डिसेंबरपासूनच स्वामी पुण्यात होते. स्वामी पुण्यात आले त्यावेळेपासून श्रीगुरुमहाराज पुण्यात नव्हते ते अजूनही पुण्यात आलेले नव्हते. वाडीला गुरुद्वादशी झाली. श्रीगुरुमहाराजांच्या मातोश्रींचे श्राद्ध झाले. तेथून श्रीगुरुमहाराज हैद्राबाद, आजेगाव या ठिकाणी गेले. श्रीदत्तजयंतीचा उत्सव तिकडेच झाला. स्वामींचा मुक्काम सुरवातीला २० नारायण पेठेत होता. नंतर श्री. शंकरराव मार्कंड यांच्याकडे होता. शंकररावांची स्थिती बदलली होती. केवळ त्यांच्या मनाला वाईट वाटायला नको म्हणून स्वामी शंकररावांकडे गेले होते.

शंकररावांनी नोकरीचा शोध सुरू केला. आता पुण्यात राहाणे त्यांना जड वाटू लागले. पुण्याबाहेर काही व्यवसाय वा नोकरी मिळाली म्हणजे सर्वार्थाने पुणे सोडता येईल अशा खटपटीत ते होते. कर्जपाणी वारण्यासाठी जवळचे होते नव्हते

ते विकले होते. आता उरलासुरला ऐंशी हजारास घेतलेला बंगला विकणे राहिले होते. त्यासाठी पुण्याबाहेर जाण्याचा विचार होता. म्हणून शंकरराव नागपुरास गेले.

शंकरराव नागपुरास जाताना स्वामींना आपले येथेच रहा म्हणून आग्रहाने सांगून गेले. शंकररावांनी घरातही बजावून ठेवले होते की, "स्वामींना संतुष्ट ठेवा." शंकरराव नागपुरास उद्योग शोधण्यास गेल्यावर स्वामींनीही ते घर सोडले. मग स्वामी रामेश्वर मंदिराजवळच्या विष्णु मंदिरात राहाण्यास गेले. ते सरदार खासगीवाले यांच्याकडे भिक्षेस जाऊ लागले. त्यानंतर स्वामी अंबालाल शेटजींकडे राहण्यास गेले. तेथून भाऊराव अभ्यंकर यांच्या संभाजी पार्क समोरच्या घरी गेले. शेवटी परत बीस नारायण पेठेत आले. पुण्यातील ही परवड स्वामींना परवडली नाही. त्यांच्या मनाने पुणे सोडण्याचे घेतले. पुण्यात श्रीगुरुमहाराज नव्हते व शंकररावही नव्हते.

शिवरात्रीच्या वेळी श्री. नाना भालेराव हे दरवर्षीप्रमाणे डोणजे गावी निघाले. स्वामींना ही दगदग सहन होणार नाही म्हणून नानांनी त्यांना विचारले नाही. पण स्वामी म्हणाले, "पुण्यात कोणीच नाही. मी येतो तुमच्याबरोबर." मग नानांनी स्वामींना बरोबर घेतले. शिवरात्रीच्या याम पूजेस त्यांना आपल्याबरोबर नेले. डोणजे गावी नेऊन आणले. पुण्यास आल्यावर स्वामी मुंबईस जाऊन आले. जणू आता पुण्यास परत येणे नाही म्हणून शक्य तेवढ्यांच्या भेटी घेतल्या. शंकरराव मार्कंड पुण्यात नव्हते तरी 'गुरुकृपेत' स्वामी गेले. दोन दिवस मुक्काम केला. त्या घरातले सारे वातावरण बदलले होते. स्वामींना तेथेही राहवेना. तिसरे दिवशी पहाटे स्वामींनी बाडबिस्तरा बांधला आणि तडक बीस नारायणमध्ये आले. पहाटेची वेळ होती. श्रीगुरुमहाराजांची खोली बंद होती नानांच्या खोलीसमोर विहिरीच्या कट्टयावर स्वामी येऊन बसले.

सडासंमार्जन करण्यासाठी सौ. गोदावरीकाकू खोलीचे दार उघडून बाहेर आल्या. समोर पाहतात तो कट्टयावर बंगाली स्वामी बसलेले. पुढे होऊन स्वामींना नमस्कार केला. घरात बोलावले व लगबगीने घरात येऊन नानांना स्वामी आल्याचे सांगितले. स्वामींचा चेहरा उग्र होता. त्यांना श्रीगुरुमहाराजांची खोली उघडून दिली. तेथे ते गेले. दोन चार दिवस मुक्काम केला. आणि सर्वांचा निरोप घेऊन पुणे सोडले. सर्वजण स्टेशनवर गेले होते. स्वामी आता परत पुण्यास येणार नाहीत या

विचाराने सर्वांना खूप वाईट वाटत होते. सर्वांनी जड अन्तःकरणाने स्वामींचा निरोप घेतला.

स्वामी येथून नागपूरला रावबहाद्दूर परांडे यांचेकडे निघून गेले.

## १९५१ : पराण्डे परिवार आणि स्वामीजी

इ. स. १९२२/२३ मध्ये दादासाहेब पराण्डे यांच्या परिवाराचा आणि पू. स्वामींचा संबंध सर्वप्रथम हुशंगाबादेस आला. दादासाहेब त्यावेळी वर्षभर हुशंगाबादेस होते आणि स्वामींचाही मुक्काम तेथेच होता. दादासाहेबांना दीक्षा झाल्यानंतर तर स्वामीजींचा मुक्काम त्यांच्या घरीच होता. त्या काळात दादासाहेबांचे बंधू श्री. गंगाधरपंत व त्यांची वासुदेव, केशव व गोविंद ही मुले, दादासाहेबांची नारायण वगैरे मुले या सर्वांना स्वामींचे दर्शन हुशंगाबादेस झाले. त्यावेळी ही मुले लहान असल्याने दीक्षा वगैरे त्यांना झाल्या नाहीत. पुढे १९२५ मध्ये श्री. गंगाधरपंत सागरला असतांना स्वामींचा मुक्काम त्यांचेकडे १२ सप्टेंबर ते २५ ऑक्टोबर पर्यंत महिना सव्वा महिना होता. नंतर १९२८ मध्ये स्वामी पुन्हा सागरला ९ जानेवारी ते १४ मे पर्यंत चार महिने पराण्डे कुटुंबात राहिले होते. तसेच इ. स. १९३१ मध्ये सुद्धा दादासाहेब सागरला असतांना स्वामींचा काही काळ मुक्काम झालेला आहे.

श्री. दादासाहेब यवतमाळ, अमरावती इत्यादि ठिकाणी बदलीवर गेले तेव्हाही स्वामींचा त्यांचेकडे मधून मधून मुक्काम होत असे. हे परांडे कुटुंब मूळ नागपूरचे असल्याने नागपुरातही त्यांचे घर व कायम वास्तव्याचे स्थान होतेच. नोकरीतून निवृत्त झाल्यानंतर दादासाहेब नागपुरात येऊन राहिले. त्या काळात तर स्वामीजी अनेकवेळा त्यांच्याकडे गेले. परंतु मध्यंतरीच्या काळांतही स्वामी नागपूरला "पार्क एव्हेन्यू, धनतोली, नागपूर" या पत्त्यावर गेलेले आहेत. हा परांडे यांचा नागपूरचा कायमचा पत्ता आहे. इ. स. १९५१ मध्ये तर स्वामी जवळ जवळ वर्षभर नागपूरला श्री. परांडे यांचेकडे राहिलेले आहेत. या परिवारात श्री. दादासाहेब यांच्या एकाही मुलाने दीक्षा घेतलेली नसल्याचे समजते. श्री. गंगाधरपंत, यांच्या श्री. वासुदेवराव व श्री. गोविंदराव यांनी स्वामींच्याकडून दीक्षा घेतलेली आहे. पैकी श्री. गोविंदराव यांचेसंबंधी मिळालेली माहिती पाहू.

श्री. गोविंदराव यांना स्वामींचे दर्शन लहानपणीच झाले. पुढे ते आयुर्वेदाचार्य झाले. त्यांना योगासने, प्राणायाम या विषयाची आवड लहानपणापासून होती. गोविंदरावांचा या विषयामुळे व आयुर्वेदामुळे श्री. बाळासाहेब गुणे उर्फ स्वामी कुवलयानंद यांचा संबंध आला. आसने व योग यामुळे उभयतांचा सहवास खूप वाढला. स्वामी कुवलयानंद गोविंदरावांना आसने व प्राणायाम यांचे मार्गदर्शन करीत असत. पुढे इ. स. १९४५ मध्ये स्वामी नागपूरला आले असताना श्री. दादासाहेबांनी गोविंदरावांकडे बघण्यास स्वामींना सांगितले. त्याप्रमाणे गोविंदरावांनीही स्वामींना प्रार्थना केली. त्या प्रार्थनेचा उपयोग झाला व गोविंदरावांना स्वामींकडून दीक्षा झाली. त्यांना अनुभवही चांगले येऊ लागले. ही हकीगत श्री. गोविंदरावांनी स्वामी श्री. कुवलयानंद यांना पत्राने कळविली. स्वामी श्री. कुवलयानंद यांनी गोविंदराव यांना मोठ्या आत्मीयतेने लिहिले की आपण एकाच वेळी दोघांकडून मार्गदर्शन घेणे योग्य होणार नाही तरी सध्या जे चालू केले आहे तेच चालू ठेवावे.

पुढे योगायोगाने श्री. गोविंदराव यांचेकडून स्वामी श्रीलोकनाथतीर्थ महाराजांचेकडून मिळालेल्या शक्तिपात दीक्षेची साधना नियमित होऊ शकली नाही. त्याच काळात दुर्दैवाने गोविंदरावांच्या पत्नींना क्षय झाला. गोविंदरावांनी स्वतः आयुर्वेदाचार्य असल्याने जाणतेपणाने खूप प्रयत्न केले. पत्नीची सेवासुश्रुषाही भरपूर केली. पुढे प्रारब्धवशात् त्याच आजाराने पत्नीचे निधन झाले. याच सुमारास गोविंदरावांचे छातीत दुखू लागले. निदान केल्यावर त्यांच्याही एका फुफ्फुसावर क्षयाचे चिन्ह आढळून आले. मग मात्र त्यांना काळजी वाटू लागली. श्री. दादासाहेबांचे लक्षात आले की गोविंदरावांचे साधन बंद आहे. तरी दादासाहेबांनी त्यांना विचारून खात्री करून घेतली. बरेच दिवस साधन बंद होते. मग त्यांनी व श्री. गुरुमहाराजांनी स्वामींना विचारले. स्वामींनी साधन सुरू करावे म्हणजे ठीक होईल असे सांगितले. त्याप्रमाणे गोविंदरावांनी साधना सुरू केली व त्याचा उत्तम अनुभव त्यांना आला. प्रकृती सुधारली. दोष नाहीसा झाला. हा महत्त्वाचा अनुभव आहे.

श्री. गोविंदराव पराण्डे यांनी रविवार दिनांक २४ मार्च १९६८ च्या "तरुणभारत" वर्तमानपत्रात "कुंडलिनी जागृतीचा माझा अनुभव" हा उत्तम लेख लिहिला आहे. तो पुढे दिला आहे. तो लेख श्रीगुरुमहाराजांना वाचून दाख-

विल्यानंतर गोविंदरावांची वरील आठवण श्रीगुरुमहाराजांनी सांगितली. शक्तिपात साधनेचे महत्त्व लक्षात आणून देण्याचे दृष्टीने एक चांगला अनुभव म्हणून त्याचा उल्लेख केला.

या लेखात लेखकाने लेखाच्या पहिल्या परिच्छेदात जी माहिती दिली त्यासंबंधी श्रीगुरुमहाराजांनी पुढील खुलासा दिला आहे. "स्वामी श्रीलोकनाथतीर्थ-महाराजांनी श्रीगोविंदमहाराज पंडीत यांना कुंडलिनी जागृतीचा सोपा मार्ग सांगितला नाही. त्यांची परस्परांची भेटसुद्धा झाली नाही. स्वामींचा मुक्काम माझ्या घरी असताना मी प्राणायामाच्या प्रयत्नाने श्रीगोविंदमहाराज पंडीत यांच्या मार्ग-दर्शनाखाली कुंडलिनी जागृतीचा प्रयत्न करतो, हे पाहून मला स्वामी म्हणाले "इतका त्रास का घेता ? मी तुम्हाला सोपा उपाय सांगतो." मग मला पुढे तशी दीक्षा झाली. गोविंदराव त्यावेळी अगदी लहान होते. याप्रमाणे केलेला खुलासा लक्षात घेऊन लेख पाहिला तर त्या उत्तम लेखाचा वाचकांना अधिकच आनंद वाटेल.

श्री. गोविंदराव परांडे यांनी नागपूरमध्ये सुरू केलेल्या आरोग्य मंदिरामध्ये स्वामीजी गेले होते. त्याबद्दल त्यांनी आपले हृद्गतही लिपिबद्ध करून आरोग्य-मंदिरात ठेवले आहे त्याची नक्कल वाचकांसाठी या चरित्रातही दिली आहे.

## कुंडलिनी-जागृतीचा माझा अनुभव
## वीस वर्षे शरीर व मन निर्मळ राहिले

[ वैद्य श्री. गोविंदराव परांडे हे योगशास्त्रातील एक अधिकारी पुरुष आहेत. गेल्या कित्येक वर्षांपासून ते त्यांच्याकडे येणाऱ्यांना योगासनाद्वारे स्वास्थ्यविकास कसा करावा याचे मार्गदर्शन करीत असतात. ते नागपूरच्या महाल भागातील आरोग्यमंदीर या संस्थेचे चालक आहेत. ]

माझे चुलते कै. ती. रा. रा. दादासाहेब परांडे १९२१–२२ साली हुशंगाबाद येथें असतांना तेथे स्वामी श्रीलोकनाथतीर्थ आले. ते नर्मदाकाठी असलेल्या श्री. सीताराम महाराजांच्या मठात राहिले. त्यावेळी स्वामी वासुदेवानंद सरस्वती यांचे शिष्य श्री. गोविंदराव पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली काही मंडळी योगाचा अभ्यास करीत असत. श्री. गोविंदराव सर्व मंडळींना आसने शिकवीत व ती पुष्कळ वेळ करावयास सांगत. इतर क्रियाहि ते शिकवीत. तेव्हा श्रीलोकनाथतीर्थ त्यास म्हणाले की, तुम्ही

इतके कष्ट का करता, मी सांगतो त्या पद्धतीचा अभ्यास कराल तर कुंडलिनी जागृत होऊन तीच तुमच्याकडून सहज रीतीने सर्व अभ्यास करवून घेईल. त्यावेळी श्री. गुळवणी महाराजांनी स्वामीजींकडून दीक्षा घेतली. श्री. गुळवणी महाराजांवर त्यांची कृपा झाली. यावेळी आम्ही लहान होतो. त्याकाळी आम्ही काही शिकलो नाही. परंतु आम्हांस स्वामींच्या प्रथम दर्शनाचा लाभ झाला.

## एकाग्रता होते

स्वामी लोकनाथतीर्थ त्यानंतर मधून मधून आमच्याकडे येत असत. ते नागपूरला एकदा आले असतां माझ्या खोलीत येऊन राहिले. स्वामीजी दीक्षा देतात हे मला माहीत होते. एक दिवस मी त्यांना दीक्षा देण्याबद्दल प्रार्थना केली. तेव्हा त्यांनी मला सहजासनावर स्वस्थ बसावयास सांगितले व डोळे बंद करून कांहीं वेळ स्वस्थ बसलो तेव्हा त्यांनी माझ्या बेंबीला, भ्रूमध्यावर व कपाळाच्या वरच्या भागास स्पर्श केला. मी काही वेळ स्वस्थ बसूनच होतो. इतक्यात मूलाधाराच्या ठिकाणी सुप्त असलेली कुंडलिनी शक्ति भयंकर जोषाने जागृत झाली व सुशुम्ना मार्गाने वरच्या बाजूला शेवटपर्यंत गेली. सुशुम्नेत वायूची ओढ दोनचार दिवस होती व मनाची एकाग्रता होऊन ध्यानांत मन राही.

त्या दिवसात मला एकदा उमरावतीस जाण्याचा प्रसंग आला. उमरावतीस जाऊन त्याच दिवशी परत यावयाचे होते. बसचे हादरे शरीरास लागत होते. घरी आल्यावर सर्व शरीरातील मज्जातंतूवर त्याचा किती खोल परिणाम होतो याचा अनुभव आला. आसनाने शरीराची सामान्य शुद्धी होते. षट्कर्माने त्यापेक्षा जास्त शुद्धी होते. प्राणायामाने आणखी सूक्ष्म शुद्धी होते व वायू वमनाला अन्तर्मुखता येते. कुंडलिनी जागृत झाली म्हणजे त्याहिपेक्षा सूक्ष्म शुद्धी होते. आसन, शुद्धिक्रिया, प्राणायाम वगैरेचा माझा थोडाफार अभ्यास झाल्याने त्या दीक्षा पद्धतीचा माझ्यावर चांगला परिणाम झाला. या पद्धतीत आपल्याला कांही करावयाचे नसते. नुसते गुरुस्मरणपूर्वक आसनावर बसावयाचे म्हणजे जागृत झालेली शक्तीच आपले कार्य करते व त्याचा निरनिराळ्या लोकांवर निरनिराळ्या प्रकारचा परिणाम दिसून येतो. ज्याची जशी अवस्था असेल त्याप्रमाणे त्याच्या अभ्यासास मदत होते.

## नवचैतन्य येते

मी नित्य अभ्यास करीत असे. आसनावर बसले, गुरुस्मरण केले की आपोआप

जोराने कपालभाती सुरू व्हावयाची व कांहीं वेळ ती चाले व पुढे एकदम बंद होऊन केवळ कुंभक व्हावयाचा व त्याबरोबर मनाची स्थिरता व्हावयाची. या अभ्यास काळांत अभ्यासाच्या वेळी काही प्रकार व्हावयाचे व निजावयाचे वेळी किंवा सकाळी जागे व्हावयाचे त्या संधीकाळात मन शांत असताना मूल व उड्यान बंध जोराने चालावयाचे व हे बंध काही वेळ राहिले म्हणजे त्याचा शरीरावर अत्यंत चांगला परिणाम व्हावयाचा. शरीरांतील दोष जाऊन शरीरस्थ असलेल्या पंच वायूची कामे सुरळीत झाल्यासारखी व्हावयाची व मनांत नवचैतन्य आल्यासारखे व्हावयाचे.

## शरीर व मन निर्मळ होते

मधून मधून अभ्यासाच्या वेळी जालंधर बंध व्हावयाचा. गळा अगदी आवळून घट्ट बंद झाल्यासारखा व्हावयाचा व त्याचवेळी मूलबंध व उड्यान लागावयाचे. बंध मोकळे झाल्यावर त्याचा शरीरावर व मनावर परिणाम व्हावयाचा. त्यावेळी माझे मन व शरीर अत्यंत निर्मळ असल्याचा मला अनुभव येत असे.

दीक्षा घेतल्यानंतर एकदा मंदिरात गेलो त्यावेळी देवाची आरास चांगली झाली आहे ही भावना आल्याबरोबर मलबंध व उड्यान बंध जोराने लागले व सात्विक भाव उत्पन्न होण्यात परिणाम झाला.

या अभ्यासकाळांत एकदा मला खेचरी करावी अशी उत्कट इच्छा झाली. जोराने प्रयत्न सुरू झाले व जिव्हेच्या खालील बंधाचे छेदन न करताच माझ्या जिव्हेचा पडजीभेच्या मागून वरच्या भागात प्रवेश झाला.

पुढे अभ्यास वाढता वाढता बराच वेळ स्वस्थ बसण्याची स्थिती आली. मन निर्मळ, शांत स्थितीत राही.

अशा रीतीने मला जे अनुभव आले त्याचा माझ्या शरीरावर व मनावर अत्यंत चांगला परिणाम झाला आहे.

ही दीक्षा दुसऱ्यास देण्याची परवानगी मी गुरुजींकडून न घेतल्याने मी या पद्धतीची दीक्षा कोणास देत नाही. अलीकडे माझी श्री. गुळवणी महाराजांशी भेट झाली. तेव्हां याबाबत मी त्यांना प्रश्न केला तेव्हां ते म्हणाले की; दुसऱ्यास दीक्षा देण्याची शक्ति प्रत्येक साधकांत थोड्याफार प्रमाणात असतेच. श्री. गुळवणी महाराज

या प्रकारची दीक्षा देतात. पुण्यास त्यांच्या आश्रमांत साधक अभ्यास करतात तेव्हा निरनिराळ्या लोकांवर कशा तऱ्हेचे परिणाम होतात ते पहावयास मिळतात.

ज्या साधकाला जी क्रिया उपयोगी ती त्याच्याकडून जागृत झालेली शक्ति करवून घेते. मी १९४५ मध्ये दीक्षा घेतली. तिचा अजूनहि माझ्यावर परिणाम आहे. एकाच वेळी मन व शरीर निर्मळ करण्याचे कार्य या दीक्षेने होते इतकी या साधनपद्धतीची श्रेष्ठता आहे.

## नागपुरातून आलेली स्वामींची उत्तम पत्रे

नागपूर
२०-७-५१

नारायण—

.... **तुम्हारी श्रद्धा का फल तुमको अवश्यही मिलेगा !...**
मै आनंदपूर्वक हूँ । नारायण तुम्हारा कुशल करे ।

आशीर्वादक,
स्वामी लोकनाथतीर्थ

नागपूर
३-१०-५१

नारायण—

.... **कर्तव्य समोर असता आळस करणे बरे नाही.** खुब संभव नारायण प्रेरणेने मी लवकरच बनारसला जाईन. आता पुण्यास येणे शक्य नाही....

सदा **श्रीदत्त स्मरण करीत** असावे.

मी इथे आनंदात आहे.

नारायण कृपेने तुमचे सर्व कुशल असावे.

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

( स्वामींचे हे पत्र मराठीत आहे. )

नारायण नागपूर
१५।१०।५१

....नारायण।

तुम्हारा विजयादशमीका पत्र यथा समय मिला। समाचार विदित हुआ। तुम्हारा भेजा हुवा सुवर्णपत्र मिला।

**यथाशक्ति विवेक, विचार तथा भगवद्भक्ति और सत्संग, प्राप्तस्थितिमें संतोष, यह सब परम कल्याणका कारण है।**

**सद्ग्रंथका सदा पाठ करना। काव्य, नाटक, कादम्बरी आदिका पाठ नही करना। स्त्री जनको चर्चा, स्त्री जनोंसे भाषण यथा संभव नहीं करना।**

**मातापिता ज्येष्ठ बंधूके प्रति भक्तिश्रद्धा रखना। नित्य देवदर्शन करना। यह सब कल्याणका मार्ग है।**

भविष्यत्‌में मेरा रहना कहाँ होगा उसका कुछभी निश्चय नहीं नारायण मुझे जहाँ जैसी परिस्थितीमें रखेंगे वहाँ वैसेही रहना होगा। मैं आनंदपूर्वक हूँ। नारायण तुम्हारा कुशल करें।

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

नारायण नागपूर
१८-१०-५१

....नारायण।

पत्रमें चूकभूल कुछ नहीं था। इतना भूल था कि पत्रमें तुम्हारा पता नहीं लिखा था।

मैं तुम्हारे प्रति नाराज नहीं हूँ। पत्र के साथ रिप्लाईकार्ड आदिक कुछ होता तो पत्र मिलतेही तुरंत उत्तर लिख देता हूँ।

पत्रमें अगर भूलचूक हो भी तो तुम मेरे सामने बालक ही हो। **गुरू, माता पिता, बालकका अपराध सदा क्षमा करतेही रहते है। ऐसाही उनका स्वभाव रहता है।**

मैं यहाँपर आनंदपूर्वक हूँ। नारायण तुम्हारा कुशल करें।

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

नारायण                                                    नागपूर
२०-१०-५१

नारायण ........

...जग चांगले असो वा वाईट असो मोठेने सांगितलेल्या वाक्याला मान देऊन सांगितल्याप्रमाणे करायला पाहिजे.

... अभ्यासाला बसावयाच्यापूर्वी गुरु तथा इष्ट देवतेचे स्मरण करून नमस्कार करावा. प्रार्थना करावी की माझे अभ्यासाचे विघ्न नष्ट करावे. नारायणाच्या कृपेने तुमचे हे विघ्न नष्ट होईल.

इथे सर्व क्षेम आहे.

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

( मराठीतील पत्र )

नारायण                                                    नागपूर
१९।११।५१

नारायण ....

.... चिन्ता नहीं करना । परन्तु मेरेप्रति लक्ष्य रखना ।........

गुरूकी सेवा करना शिष्य का कर्तव्य है। गुरु और श्रीदत्त एक है। गुरुमें मनुष्यबुद्धि करना महापाप है। गुरु प्रत्यक्ष श्रीदत्त है। गुरु और श्रीदत्त सामने आनेपर पहिला श्रीगुरुका चरण वन्दन करके पिछे श्रीदत्तका चरण वन्दन करना पडता है। माता-पिता जन्म देते हैं। गुरु जो शक्तियुक्त मंत्र शिष्यको देते हैं इसीसे शिष्यको दूसरा जन्म होता है। अतः गुरु पिता हैं शिष्य पुत्र होता है। यदि शिष्य गुरुको छोडकर श्रीदत्तकी भक्ति करे तो भक्तिका फल तो कुछ भी होता नहीं। अधिकंतु शिष्य पापके भागी होता हैं। देखो श्रीवासुदेवानंद सरस्वती मर गये हैं तो भी उनके शिष्य लोग उनके निमित्त कितने श्रम उठा रहे हैं। और कितने द्रव्य व्यय कर रहे हैं। गुरुको जो कुछ अर्पण करते हैं वह प्रत्यक्ष श्रीदत्त को मिलता हैं। गुरुके स्थान श्रीक्षेत्र काशी है। गुरुके स्थानपर देहान्त होनेसे शिष्य को काशी प्राप्ति होती है। अतः श्रद्धा भक्तिमान समर्थ शिष्य गुरुके लिये आश्रम बनाते हैं। गुरु दुःखित होनेसे, अपमानित होनेसे श्रीदत्त दुःखित होते हैं। अपमानित होते हैं। श्रीगुरु

**उपवासी रहनेसे श्रीदत्त उपवासी रहते हैं। श्रीगुरुका दर्शनही श्रीदत्तका दर्शन है। यह समझकर जो कुछ उचित समझो वैसा ही करना।** पत्र लक्ष देकर पढना।

.... यह परमार्थ संबंध है। .... नारायण ....

आशीर्वादक

स्वामी लोकनाथतीर्थ

नारायण

नागपूर

६।१२।५१

नारायण....

...**परमेश्वरसे प्रार्थना करते हुवे अभ्यास करते रहो। परमेश्वरकी कृपासे तुम्हारा अभ्यास में प्रगति अवश्यही होगा। चिंता और उद्वेग छोडकर समचित्त होकर अभ्यास करते रहना। सदा समचित्त रहना इसकोही शास्त्रमें योग कहते हैं। दीर्घकाल निरंतन श्रद्धातिशयपूर्वक अभ्यास करना चाहिये। अनंत जन्म के शुभाशुभ संसारको भेद करनेको दृढ पुरुषकार का प्रयोजन है। यहाँ दो दिवस थोडा आसन में बैठकर निराश होना नहीं चाहिये।**

नारायण तुम्हारा कुशल करें।

आशीर्वादक

स्वामी लोकनाथतीर्थ

नारायण

नागपूर

२९।१।५२

नारायण ........

....पत्रोत्तरमें संकटके समय यदि तुम लोगोंको न लिखूं तो दूसरा किसको लिखूं? तुम लोगोंकी असमर्थता मैं जानता हूँ। तुम्हारे मनमें जो श्रद्धा और भक्ति-भाव है इससेही प्रसन्न होकर श्रीदत्त तुम्हारा कल्याण करेंगे। **अंतर्यामी अंतर का भाव जानते हैं। चिन्ताका कोई कारण नहीं।**

....मेरे लिये कुछभी चिन्ता नहीं करना। नारायण मेरा योगक्षेम निर्वाह अवश्यही करेंगे। नारायण तुम्हारा कुशल अवश्यही करेंगे।

आशीर्वादक

स्वामी लोकनाथतीर्थ

नारायण　　　　　　　　　　　　　　　　　　　　नागपूर
१।२।५२

नारायण ........

... "**उद्योगिनं पुरुषमुपैति लक्ष्मीः" यह वाक्य स्मरण रखना। उद्योगसे देवता (इंद्रादिक) स्वर्गलोक प्राप्त किये हैं। उद्योगसेही श्रीरामचंद्र रावणका वध किया है। उद्योगसेही योगी जन्म मृत्यूको जय करता है। उद्योगसेही पाश्चात्यलोग साइन्स का 'आविष्कार किया है।**

**अधिक क्या लिखू ? उद्योगसेही जगत् की स्थिती हो रही है। अतः तुम भी उद्योगपरायण होकर अपना अभीष्ट को प्राप्त करो।**

इतिशिवम्

आशीर्वादक

स्वामी लोकनाथतीर्थ

नारायण　　　　　　　　　　　　　　　　　　　　नागपूर

नारायण........　　　　　　　　　　　　　　　　३।२।५२

....तुम्हारे मनमें सद्भाव है। नारायण तुम्हारी इच्छा अवश्य पूर्ण करेंगे।....

**जहाँ सुमति तहाँ सम्पद नाना।**
**जहाँ कुमति तहाँ विपद निदाना॥**

इस संतवचनको सदा स्मरण रखना।

**कर्म प्रधान विश्व रचि राखा।**
**जो जिस करम करै तिस फल चाखा।**

....मैं आनंदमें हूँ। नारायण।

आशीर्वादक

स्वामी लोकनाथतीर्थ

नारायण　　　　　　　　　　　　　　　　　　　　नागपूर
२२-२-५२

नारायण ........

....सूर्यग्रहण समाप्त होनेपरही स्नान करके स्वयंपाक करना। भोजन भी

करना । बालक, वृद्ध तथा रोगीके लिये यह विधी लागू नहीं है । संपूर्ण दिवस बेध है । अतः दिनमें ग्रहण छुटनें के पहले पान, भोज हो नहीं सकता ।

ग्रहण के समय स्नान करके मंत्रका जप ग्रहण समाप्त होते पर्यंत करना चाहिये।

मै यहाँपर आनंदपूर्वक हूँ ।

.... नारायण तुम्हारा कुशल करै ।

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

नारायण

नागपूर
१४-३-५२

नारायण........

माताकी सेवाकी अच्छी व्यवस्था करना । वृद्धावस्थामें उनको कुछभी कष्ट नहीं होना चाहिये । **न मातुः पर दैवतम् । तुम तो भगवतीके भक्त हो । माता साक्षात् भगवती है । माताही गायत्री है । सावित्री है । माता प्रसन्न होनेसे सब प्रसन्न होते हैं । माता अप्रसन्न होनेसे सब देवता रुष्ट होती है ।** ......

मैं यहाँपर आनंदपूर्वक हूँ । नारायण तुम्हारा कल्याण करै ।

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

नारायण

नागपूर
१७-३-५२

नारामण ........

**...व्यवहार अवश्य करना परंतु व्यवहारमें अधिक लिप्त होना अच्छा नहीं ।**

**..कर्मसूत्रसे बंधा हुआ जीव स्वकर्मानुसार कहाँ रखता है, और क्या क्या सुख दुःख भोगता है, यह समझना बहुतही कठीन ।**

**... सदा श्रीदत्तस्मरण करते रहना । सन्मार्गमें सदा विचरण करना । कठीनाई आनेपर श्रीदत्तसे प्रार्थना करना । वहही सर्वावस्थामें जीव का रक्षक है ।**

....नारायण जैसा रखे हैं उसमेंही प्रसन्न हूँ। तुम सब सदा प्रसन्न रहो ऐसा नारायणसे प्रार्थना करता हूँ। इति शिवम्।

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

नारायण नागपूर
२१-३-५२

नारायण.......

...नारायणको प्रार्थना करता हूँ कि तुमको परीक्षामें उत्तीर्ण करें।

....मैं शीघ्रही यहाँसे श्रीक्षेत्र काशी जा रहा हूँ।

....सदा भगवत् स्मरण करते रहो।

**मूकं करोति वाचालं पङ्गुम् लंघयते गिरिम्।**
**यत्कृपा तमहं वंदे परमानंद माधवम्॥**

भगवत् कृपासे सबकुछ सहज साध्य होता है।

नारायण तुम्हारा कल्याण करे। इति शिवम्।

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

## "शंकर! तू गलत विचार करता है।"

स्वामीजी नागपूरला रावबहाद्दूर परांडे यांचेकडे होते. तेथे त्यांचा मुक्काम बराच काळ होता. त्याच कालावधीत शंकरराव मार्कंडही पुणे सोडून व्यवसाया-निमित्त नागपूरला गेले होते. आधी गरीबी आणि नंतर श्रीमंती येणे सर्व दृष्टीने चांगले असते. परंतु श्रीमंतीनंतर गरीबी येणे सर्वार्थाने अनर्थकारक असते. दुर्दैवाने शंकररावांचे वाट्याला ही अनर्थकारक परिस्थिती आली होती. तशाही स्थितीत शंकरराव धैर्य धरून राहिले होते. नागपूरला गेल्यावर त्यांना एका प्रेसच्या मॅनेजरची नोकरी मिळाली. धरमपेठेत अम्बाझरी रस्त्यावरील समनवार बंगल्यात दुसऱ्या मजल्यावर राहण्यासाठी जागा मिळाली.

शंकरराव नागपूरला गेल्यावर स्वामींच्या दर्शनासाठी सवडीप्रमाणे पराण्डे यांच्या घरी जात असत. ज्या स्वामींना आपल्या घरी वैभवात ठेवले होते त्यांच्या दर्शनाला जाताना शंकररावांच्या अंतःकरणाला वेदना होत होत्या. स्वामींची कृपा जेव्हा आपल्यावर होती तेव्हा लक्ष्मीने धनाचा पाऊस आपल्यावर पाडला होता. आता स्वामींची कृपा नष्ट झाल्याबरोबर लक्ष्मीचीही अवकृपा झाली. आवकही बंद झाली आणि जवळ होते नव्हते तेही विकण्याची पाळी आली. आपल्या हातून अक्षम्य अपराध झाला! याची जाणीव शंकररावांना क्षणाक्षणाला तीव्रतेने होऊ लागली. याच्या परिमार्जनासाठी एक उपाय त्यांच्या मनात आला.

शंकरराव स्वामींच्या दर्शनास गेल्यावर नमस्कार करून तेथे हात जोडून उभे राहिले. स्वामींनी विचारले "शंकर क्या है?" शंकरराव म्हणाले "आपण माझ्या घरी यावे अशी इच्छा आहे." स्वामी तात्काळ म्हणाले "चलो। अभी आता हूँ।" आपल्यावर स्वामींचे निरतीशय प्रेम आहे याचा हा अनुभव पाहून शंकरराव गद्‌गदीत झाले. टांगा आणवून स्वामींना आपल्या घरी घेऊन आले. आपल्या प्राप्त परिस्थितीप्रमाणे होईल तेवढी उत्तम व्यवस्था शंकररावांनी स्वामींची ठेवली. स्वामींचीही प्रसन्नता पाहून शंकरराव स्वामींशी बोलण्यासाठी जवळ येऊन बसले.

स्वामींनीही शंकररावांच्या चित्ताची अनुकूलता बघून मोकळेपणाने बोलण्याचे ठरवले. शंकरराव स्वामींना म्हणाले "स्वामीजी! आपली कृपा होती तेव्हा पाण्या-सारखा पैसा मिळाला. आपल्या शब्दाचे उल्लंघन झाल्याबरोबर आपली कृपा संपली. या अपराधाला 'क्षमा' नाही का स्वामीजी?" यावर स्वामींनी आपले हृद्‌गत मोकळे केले.

"शंकर! तू गलत विचार करता है।" या वाक्याने स्वामींनी सुरुवात केली. आपल्याला स्वामींनी एकेरी नावाने संबोधले म्हणून शंकररावांना फार बरे वाटले. त्यांनीही स्वामींचे विचार मनापासून ऐकण्यास सुरवात केली. स्वामींनी पुढे सांगितले "देनेवाला मै कौन? और लेना भी मेरे हाथ कैसा होगा? मेरी कृपा और शापसे यह होता है, यह मानना गलत है। एक बात अवश्य है की तुम्हारा अनुकूल और प्रतिकूल मै जानता था। तुझे अनुकूल मौका आया तब बोल दिया। तब तू समझा मेरी कृपा हो गयी। मौका समाप्त हो रहा तब भी पहले बोल दिया धंदा बंद करो। पर

जो होनेवाला था वह होगया। तू रुका नहीं। यहाँ मेरी कृपा और शाप का क्या संबंध है? बनाना बिगडना मेरे हाथ नहीं है। मैं कौन हूँ? यह तू गलत विचार करता है।"

स्वामी खूप वेळ समजावून सांगत होते. आयुष्यात घडणाऱ्या घटना अटळ असतात. समजूनसुद्धा बदलणे अशक्य असते. ऐनवेळी बुद्धी काम करील, परिस्थिती किती चमत्कारिक घटना घडवील हे सांगणे कठीण आहे. नाहीतर धनुर्धारी रामचंद्रावर आपत्तींचे डोंगर कोसळलेच नसते. स्वामींची प्रेरणा परिस्थितीची संभाव्यता आधी सांगत होती म्हणून त्यांनी शंकररावांना चांगल्या काळाचा अंदाज दिला होता. स्वामींचे शंकररावांचेवर अपार प्रेम असल्याने त्यांचे नुकसान हे स्वामींना स्वतःचेच नुकसान वाटत होते. म्हणून त्यांनी बांधून दिलेला आश्रम विकून जमले तेवढे सर्व पैसे स्वामींनी त्यांना तातडीने दिले होते. अशा व्यक्तीने करून घेतलेला गैरसमज स्वामींना नको होता. आज आलेल्या या संधीचा स्वामींना आपले हृद्गत मोकळे करण्यास चांगला उपयोग झाला.

शंकररावांच्या मनातील कृपा व अवकृपा संबंधीचे शल्य निघून गेले. ते आपल्या जीवनातील या परिवर्तनास आपण व आपले प्रारब्ध कारण आहे हे ते आवर्जून सांगत असत. या योग्य व अचूक विचारसरणीमुळे त्यांच्या मनाच्या वेदना खूप मर्यादित झाल्या.

## स्वामी काशीत आल्यावर

स्वामी पुण्याहून नागपूरला येऊन राहिले होते. नागपूरला त्यांनी उणेपुरे वर्ष काढले आणि नंतर ते काशीस आले. २९ मार्च १९५२ ला ते काशीत आले. काशीत त्यांना स्वतंत्र जागा नव्हती. प्रथम ते जांबवंतसिंहजींच्याकडे गेले. भिक्षेची व्यवस्था लक्ष्मणशास्त्री वैद्यजी यांचेकडे होती. नंतर स्वामी वैद्यजींच्याकडे ११ ते ५ थांबून रात्री भोसला मंदिरात मुक्काम करू लागले. प्रकृती ठीक होती. मध्यंतरी काही अडचण आली आणि अन्य कोणी भिक्षेला बोलावले तर स्वामी तिकडे जात असत. श्री. झारखंडी यांचेकडे स्वामी भिक्षेसाठी बरेच दिवस जात होते. जांबवंतसिंहजी स्वामींची भरपूर सेवा करतात असे लक्ष्मणशास्त्रीजींनी पुण्याला श्रीगुरुमहाराजांना मोठ्या आत्मीयतेने कळविले होते.

स्वामींची सेवा करणे कठीण आहे हे सांगताना लक्ष्मणशास्त्रींनी आपल्या अपराधांची क्षमा कळकळीने मागितली आहे.

**"जो लडिका कुछ अनुचित करहीं।**
**गुरु पिता मातु मोद मन भरहीं॥**
**करीय कृपा शिशु सेवक जानी।**
**तुम सम शील धीर मुनि ज्ञानी॥"**

स्वामींच्या मासिक व्यवस्थेसाठी आजपर्यंत जी रक्कम श्रीगुरुमहाराज नियमीत पाठवित होते त्यामध्ये त्यांनी या वेळेपासून वाढ केली. द. म. रुपये पन्नास श्रीगुरु-महाराज पाठवू लागले. ही बातमी रावबहाद्दूर परांडे यांना समजल्यावर त्यांनी श्रीगुरुमहाराजांच्या या स्वामीसेवेबद्दल प्रशंसोद्गार काढले की "आपण स्वामींना ५० रु. द. म. पाठविता हे उत्तम आहे. आपणासारख्यांना हे कठीण आहे याची मला जाणीव आहे." इतर काही साधक स्वामींना द. म. दक्षिणा पाठवीत होते. अशा स्थितीत ते स्वतंत्र जागेच्या शोधात होते. एक ठिकाणी वास्तव्य नसल्याने पत्र, म. ऑ., भेटीगाठी या बाबतींत घोटाळा, धांदल, गडबड होऊ लागली.

५२ सालातील जून महिना चालू होता. भोसला मंदिरातील एक खोली भाड्याने घेतली. अलिकडे बनारसमध्ये निराश्रित शरणार्थी मोठ्या संख्येत आले असल्याने जागांची भाडी भरमसाट वाढली होती. जागा मिळणेही मुष्किल झाले होते. अशा स्थितीत उन्हाळा इतका वाढला होता की गंगेचे पाणी खूपच कमी झाले होते. स्वामींनी यासंबंधी कळविले की "यहांपर सर्व द्रव्य दुर्मूल हो गया है। जीवनधारण कष्टकर हो रहा है। श्रीगंगाजीका जल भी अतिशय कम हो गया है। प्रवाहके स्थान में बालू बहूत पड गया है। सबका ही ऐसा कहना है कि कोई वर्षमें श्रीगंगाजीका प्रवाह सर्वथा बंद हो जावेगा। बनारस म्यूनिसिपालिटीके मुख्य अध्यक्षने सरकार को लिखा है कि श्रीगंगाजीका प्रवाह कम हो गया है अतः शहरमें जल का प्रबंध करना कठीन होगा।

मैं यहाँपर आनंदपूर्वक हूँ। ...."

स्वामींचा या वर्षीचा चातुर्मास येथे भोसला मंदिरात झाला. यानंतर स्वामी "ए–२।३३ त्रिलोचन" या ठिकाणी राहण्यास गेले. हे ठिकाण सोरा कुआं जवळ,

जांबवंतांच्या दुकानापासून उत्तरेकडे एक मैलावर आहे. तीन खोल्यांचे हे स्वतंत्र घर १५ रु. भाड्याने मिळाले. ही जागा आपल्याच साधक शिष्यांनी धुवून स्वच्छ करून दिली. सामान नेऊन ठेवले. हे घर अतिशय जुने असल्याने त्याचा जीर्णोद्धार करण्याची घरमालकाची इच्छा दिसते. नंतर भाडे वाढवून मागेल. बहुतेक २५ रुपयापर्यंत भाडे जाईल. एका शिष्याच्या नावाचा उल्लेख न करता स्वामी लिहितात "मेरे एक शिष्यने एक सिद्धयोगेश्वर महापुरुषका उपदेश प्राप्त किया है। वह (शिष्य) स्वयं भी पृथ्वी, जल व वायुतत्त्वको विजय करते हुवे योगमें सिद्ध भूमिका प्राप्त कर चुका है। फिर मेरे जैसे क्षुद्र मनुष्य के दर्शनार्थ कैसे आ सकते हैं। अफसोस की बात तो यह है की उस शिष्यके बहुत प्रयत्न करनेपर भी यहाँपर कोई भी उसको पूछता नहीं। मोदीजी के शिष्य होनेपर वह किसी अयोग्य बाईका हाथका सिद्ध अन्न खा रहा है। (क्या) यह भी सिद्धके एक लक्षण है ।...."

श्रीगुरुमहाराजांचे वडील बंधू की ज्यांनी संन्यास घेतला होता ते श्रीशंकरस्वामी वृद्धावस्थेमुळे अति दुर्बल झाले होते. त्यांची उत्तम सेवा करावी म्हणून स्वामींनी कळविले होते. श्रीगुरुमहाराजांच्या भगिनी ती. गोदावरीताई या स्वामी सेवेसाठी मुद्दाम वाडीस जाऊन राहिल्या होत्या. श्रीगुरुमहाराज गुरुद्वादशीसाठी वाडीस गेल्यावर काशीहून स्वामींनी त्यांना पत्रात लिहिले की —

"…. तुम सब यथाशक्ति स्वामीजी की सेवामें रहते हो यह पढकर मुझे बहुत आनंद हुआ। उनके लिये एकवार स्नान बहुत है। शरीरमें पीडा नहीं यह नारायणकी कृपा है। श्रीमद् भगवत् गीता और विष्णुसहस्रनामका पाठ सुनते हैं यह बहुत अच्छा है। मेरे विचारसे स्वामीजी और अधिक दिन जीवित रहेंगे ऐसा नहीं दीखते। यह समाचार स्वामीजीको नहीं कहना….

…. अब तो मेरा देहांतपर्यंत श्रीक्षेत्रकाशीवास होगा। महाक्षेत्रमें देहान्त होगा ऐसा ज्योतिषी लोग भी कहते हैं। मैं यहाँपर आनंदपूर्वक हूँ …."

स्वामींनी १५ नोव्हेंबर १९५२ ला घर बदलले व ते "श्री. कन्हैयालाल मेहेरोत्रा, वकील, K 4/75, गाय घाट" या ठिकाणी राहाण्यास आले. ही जागा स्वामींना फार आवडली. तीस रुपये भाडे होते पण अशी सोयीस्कर व उत्तम जागा पुण्याला सुद्धा शंभर रुपये भाडे देऊनही मिळणार नाही असे स्वामी अभिमानाने

सांगत. पहिल्या घर मालकाने घराची दुरुस्ती केल्यावर पंधरा रुपये भाड्याऐवजी चाळीस रुपये भाड्याची मागणी सुरू केली. नको ती कटकट म्हणून केलेल्या शोधाशोधीत ही नवी जागा मिळाली.

डिसेंबरच्या शेवटी श्रीगुरुमहाराजांचे बंधू श्रीशंकरस्वामी वाडीला ब्रह्मीभूत झाले. यावेळेस श्रीगुरुमहाराज त्यांचेजवळ उपस्थित नव्हते. त्यांच्या भगिनी ती. गोदावरीताईंनी स्वामींची सर्वतोपरी सेवा केली. पुढे परमेश्वरी योग असा की ती. गोदावरीताईंचे निधन दोन महिन्यातच झाले. याबद्दल स्वामींची दोन वाक्ये त्यांच्या शब्दात वाचण्यासारखी आहेत. "…. गोदावरीका देहांत तुम लोगोंके सामने हुआ यह बहुतही अच्छा हुआ। वह अनाथा तुम लोगोंके अनंतर देहान्त होता तो उसकी सेवा कौन करता।"

## काशीतून आलेली पत्रे

श्रीक्षेत्र काशी
१३-६-५२

नारायण….

….पत्र के उपरमें " ॐ लोकनाथाय नमः " ऐसा नहीं लिखना। " श्री गुरवेनमः " ऐसा लिखना। ॐ कार भी पत्रमें नहीं लिखना। गुरुके नाम लिखना या उच्चारण करना दोषनीय है।

**….लोभवश सत्य को नहीं छोडना। इस लोकमें स्त्री के लोभ और धन का लोभ छोडना बहुत कठीन है। ये दोनो जो छोडेगा वह महापुरुष है।**

मैं यहाँपर आनंदपूर्वक हूँ।

नारायण तुम्हारा कल्याण करे। इति शिवम्।

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

नारायण

श्रीक्षेत्रकाशी
२५-६-५२

नारायण….

…मनुष्यको भूल होता ही है। यह कुछ भी अपराध नहीं है।

**...भगवत् स्मरण करते हुए माता पिताकी सेवा करो। और माता पिता का आनंद वर्धन करो। सन्मार्ग में रहकर जीवनको धन्य करो। संसार में आदर्श बनो।**

....दुराचारी मनुष्यके जीवनसे पशुका जीवन भी अच्छा है। पशु अपने पापको भोगकर क्षय करता है। पशुके जीवनमें धर्माधर्म होता नहीं। दुराचारी मनुष्य पापकोही जीवनमें बढाता है। अंत में दारुण दुःख ही भोग करता है।

....नारायण

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

नारायण

श्रीक्षेत्रकाशी
२१-९-५२

नारायण....

**अभ्यास करते रहो विघ्न नष्ट होकर मन स्थिर होगा।**

मैं यहाँपर आनंदपूर्वक हूँ।

नारायण तुम्हारा कुशल करे। इति शिवम्

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

नारायण

श्रीक्षेत्रकाशी
२९-९-५२

नारायण....

....पवित्र स्थितीमें मंत्र का जप करना। अन्य अवस्थामें चलते बोलते समय और मेरे स्मरण होनेपर जब मंत्र का स्मरण होने लगता है उस समय मंत्रका जप बंद करना। उस समय गुरुमहाराज, गुरुदेव, किंवा श्री श्रीगुरवेनमः इस प्रकार जप करना। ओष्ठ, जिह्वा कंठका चालना न होकर मनही मन जप हो तो आसनस्थित न होनेसे भी कोई दोष नहीं। किसी भी व्यक्तिसे कठीन रोगसे ग्रस्त देखकर मनमें दया होती है और उस समय हे गुरुनाथ हे परमात्मन इस मनुष्य को रोग मुक्त करो। ऐसी इच्छा होना स्वाभाविक है। इसमें कुछ भी

दोष नहीं है। तुम्हारा कुछभी अपराध मैं दीखता नहीं। यदि कभी भूलसे कुछ अपराध हो तो गुरु, पिता, माता सदा क्षमाही करते हैं। नारायण....

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

नारायण

श्रीक्षेत्रकाशी
२४-१०-५२

नारायण....

....नवीन वर्ष के शुभाशीर्वाद।

**उपासनेला दृढ चालवावे। भूदेव संतांसी सदा लवावे।**
**सत्कर्म योगे वय घालवावे। सर्वां मुखी मंगल बोलवावे॥**
**मना सज्जना भक्तिपंथेची जावे। तरी श्रीहरी पाविजे तो स्वभावे।**
**जनी निंद्य ते सर्व सोडून द्यावे। जनी वंद्य ते सर्व भावे करावे॥**

जय जय रघुवीर समर्थ!!!!

....मैं यहाँपर आनंदपूर्वक हूँ। ....नारायण....

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

नारायण

श्रीक्षेत्र काशी
१४।१२।५२

नारायण....

....आनंदपूर्वक अभ्यास करते रहो। **मातापिताकी आज्ञानुवर्ती रहो। स्वजनोंके आनंदवर्धन करते रहो।**

**...सदाचारोंके सदा अनुष्ठान करते रहो। ब्रह्मचर्यका सदा रक्षण करना इंद्रिय संयमही करना सर्व कल्याणका कारण है।**

....मैं यहाँपर आनंदपूर्वक हूँ। ....नारायण....

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

नारायण श्रीक्षेत्र काशी

२६।५।५३

नारायण....

... **भाव ही देवको प्रगट करता है** । इस कारण मनमें सदा शुद्धभावकोही धारण करना चाहिये ।

**मंत्रे तीर्थे देवेद्विजे दैवज्ञे भेषजे गुरौ ।**
**यादृशी भावना यस्य सिद्धीर्भवति तादृशी ॥**

भोली भावना ईश्वरको बहुत प्रिय है । अतः भक्तलोग भावनाप्रधान होते हैं । समर्थ रामदासस्वामी, संत एकनाथ महाराज, संत नामदेव तथा संत तुकाराम आदिक का विचार करनेसे उनका भावनामय विचार तरंग कितना विशाल है, जो संपूर्ण भावुक जनोंका भावनामय मनोराज्यको अभी भी अपना प्रभावसे प्रभावित करते हुए अपनी विशालताका, पवित्रताका, शुद्धताका परिचय देते हुए भाऊक जनोंको प्रभावि कर रहे हैं । अस्तु ।

मैं यहाँपर आनंदपूर्वक हूँ । — नारायण

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

नारायण श्रीक्षेत्र काशी

१५-११-५३

नारायण —

— तुम्हारा नूतन वर्षारंभका पत्र मुझे मिला । —

**बोले तैसा चाले । त्याची वंदावी पाऊले ॥**

मेरा बहुतही सौभाग्य है जो बहुत दिनमें इस वृद्धको तुमने स्मरण किया । — नारायण —

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

# महाराजांच्या उत्तराखंड यात्रेला मार्गदर्शन

इ. स. १९५३ च्या मे मध्ये महाराजांना हिमालय यात्रेला जाण्याची उत्तम संधी चालून आली. उत्तम संधी म्हणण्याचें कारण असे की या यात्रेत त्यांचे सर्व धार्मिक नियम पाळण्याची शंभर टक्के अनुकूलता होती. महाराजांचे प्रगाढ परिचित, प. प. श्रीमत्‌शंकराचार्य श्रीजेरेस्वामी महाराज, सातारा हे आपल्या शिष्यगणासहित स्वतंत्र मोटारने हिमालयातील चारीधाम यात्रेला निघाले. तेव्हा त्यांनी श्रीगुरुमहाराजांना विचारले की आम्ही असे यात्रेला निघणार आहोत तर आपण येता का ? इतक्या सोयी एकत्रितपणे जमून येणे अशक्य आहे याचा विचार करून श्रीगुरुमहाराजांनी या सुवर्ण संधीचा 'ईश्वरेच्छा' न्यायाने स्वीकार केला. ठरलेल्या दिवशी हरिद्वारावर भेटण्याचे ठरवून श्रीगुरुमहाराज काशी दिल्ली करून हरिद्वारला गेले.

हिमालयाच्या चारीधाम यात्रेची वार्ता त्यांनी काशीमध्ये स्वामींना पत्र पाठवून कळविली, आणि त्यातच प्रार्थना केली की आपण हिमालयातील निवासी आहात. तेव्हा या चारीधाम यात्रेचे मार्गदर्शन व्हावे. त्याप्रमाणे स्वामींचे पुढील पत्र आले—

नारायण श्रीक्षेत्रकाशी

७–४–१९५३

कल्याणभाजन वामन दत्तात्रेय गुळवणीको

नारायण स्मरण सूचक आशीर्वाद। विशेष समाचार। तुम्हारा म. ऑ. रु. ५०/– मिला समाचार विदित हुआ। तुम उत्तराखंडकी यात्रा कर रहे हो यह बहुत उत्तम है। मेरे लिखे अनुसार यात्रा करना। कुछ भी त्रास नहीं होगा। तुम्हारे शरीर दुर्बल है अतः पैदल यात्रा नहीं करना। डण्डीके भाडा अत्यधिक है अतः तुम कण्डी भाडा करना। कण्डीमें बैठाकर एकही मनुष्य तुमको पीठपर रखकर अनायास ले जावेगा। खर्चा कम होगा। ब्राह्मण किंवा क्षत्रियकी कण्डी भाडा करना। उस तरफ ब्राह्मण क्षत्रियेतर जितने जाति है सब डोम (चाण्डाल) हैं।

शरीरमें पूरा सुयेटर रखना। उसके उपर मजबूत उनी कोट रखना। सीरपर उनी कानटुपी रखना। उसपर पगडी बांधना। पगडी ऐसा बांधना दोनों कान ढक जाना चाहिये। पैरमें full Stockings पहरना। केनव्हास के जूता रबर सोल पैरमें

पहरना। चामडाके जूता तीक्ष्ण पत्थर पर चलनेमें शीघ्र ही सोल कट जाता है। चमराका जूता रबर सोल होगा तो भी चलेगा। मक्खी काटता है उससे घाव होता है। पैरमें full Stockings पहरनेसे मक्खी काट नहीं सकेगी। मक्खीसे शरीरका रक्षण सदा करते रहना।

खर्चाके लिए सदा रुपया पास रखना। दुसरे के उपर भरोसा करके नहीं चलना। क्यों कि मार्ग बहुत कठीन है। रास्तामें जाहां गरम दूध मिले पी लेना। नहीं तो शरीर दुर्बल होगा। तापास करनेपर दही मिले तो पीना चाहिये। वहांपर दही पीनेसे प्रकृति अच्छी रहती है। रास्तापर ही सरे के फल कटेवाले छोटे झारपर मिलता है। येथेष्ट खाना। खानेसे प्रकृति अच्छी रहेगी। दुसरे तुम्हारे लिये कितनी भी व्यवस्था करें तो भी पास रुपया जरूर रखना।

मेरे लिखे हुये वाक्यका अवहेलना नहीं करना। लिखित नियमसे हिमालय भ्रमण करो कोई कष्ट नहीं होगा। नारायण तुम्हारा रक्षण करेंगे। तुम अनायास वापस आवोगे। मुंजगराव, देशपांडे, गोऱ्हेभट, वाकडे तथा लोहोकरे आदिक सब मंडलीको मेरा नारायण स्मरण सूचक आशीर्वाद। मैं यहांपर आनंदपूर्वक हूँ। नारायण तुम्हारा कुशल करें। इति शिवम्।

आशीर्वादक<br>
स्वामी लोकनाथतीर्थ

गुरूचे शिष्यावर कसे पुत्रवत् प्रेम असते याचा पडताळा वरच्या पत्रात येतो. श्रीगुरुमहाराजांनी स्वामींना ही हिमालयातील तीर्थक्षेत्रांची यात्रा चालू असतांना ठिकठिकाणाहून पत्रे पाठवून माहिती वेळोवेळी कळविली आहे. उत्तरकाशीनंतर प्रथम यमुनोत्रीची यात्रा करून ते गंगोत्रीला गेले. प्रकृती ठीक होती. सर्व ठिकाणी त्यांनी स्नाने केलेली आहेत इतकी प्रकृती ठीक होती. गंगोत्रीहून २० मे १९५३ रोजी श्रीगुरुमहाराजांनी स्वामींना पत्र लिहिले होते. सर्व यात्रा आनंदात चालली होती. नंतर श्रीबद्रीकेदार व श्रीबद्रीनारायण या महाक्षेत्रांची यात्रा करून श्रीगुरु-महाराज जूनच्या तिसऱ्या आठवड्यात पुण्यास पोहोचले. सर्व यात्रा उत्तम झाल्याचे समजून स्वामींना खूप आनंद झाला.

या तीर्थयात्रेच्या दगदगीने श्रीगुरुमहाराजांची प्रकृती बरीच बिघडली. स्वामींनी

याबद्दल एका पत्रात आपले मत लिहिले होते "....तुम उत्तराखंडकी यात्रामें शारीरिक शक्तिसे अधिक श्रम किया इस कारण तुमको दुर्बलताका अनुभव हो रहा है। वहांपर तुम्हारी शक्ति के अनुसार आठ माईलसे अधिक चलना अच्छा नहीं हुआ। तो भी नारायणकी कृपासे तुम्हारी प्रकृती शीघ्र ही सुधर जावेगी.... मैं आनंदपूर्वक हूँ...."

स्वामी पुण्याहून गेले तेव्हां त्यांची पुस्तके भरलेली सूटकेस शंकरराव मार्कंडांचेकडे राहिली होती. त्या पुस्तकांची स्वामींना अलिकडे बरीच जरुरी भासू लागली. म्हणून त्यांनी त्यांच्या पत्रांतून पुस्तकांची चौकशी सुरू केली. ती पुस्तकांची भरलेली सूटकेस लाकडी खोक्याचे पॅकिंग करून रेल्वे पार्सलने काशी स्टेशनवर पाठविण्यास सांगितले त्याप्रमाणे ती पुस्तके स्वामींच्या सूचनेप्रमाणे व्यवस्थित पॅकिंग करून, यादीवर जुनी पुस्तके लिहून, ती त्या खोक्यावर चिकटवून पाठवून दिली. यासाठी स्वामींना बराच पत्रव्यवहार करावा लागला.

५३ नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात श्री. भाऊसाहेब वाकडे, इंजिनीअर स्वामींच्या भेटीसाठी मुद्दाम काशीस गेले होते. त्यांनी स्वामींचे दर्शन घेतले. आपला मानस स्वामींना सांगून त्यांचा आशीर्वाद घेऊन ते परत आले. महापुरुषाचे जीवन वरवर पहाता किती सामान्य असते याची जाणीव भाऊसाहेबांना काशीत स्वामींच्या घरी गेल्यावर झाली. स्वामींच्या संग्रही काहीही नव्हते. उंदीरच इतके झाले होते की स्वामींचे अन्न ते पळवीत होते. ऐश्वर्य ही चीज भोगलेल्या व पाहिलेल्या व्यक्तीला शक्यता असून त्याचा मोह नसणे हा खरा मोठेपणा असतो.

## काळाची चाहूल लागली !

स्वतःचा मृत्यू आधी समजणे हे महापुरुषांचे लक्षण सांगितले आहे. स्वामींनी आजपर्यंत अनेकांच्या मृत्यूची कल्पना त्यांच्या मृत्यूपूर्वी दिली होती. ज्योतिषशास्त्राच्या आधारे नव्हे तर अंतर्जाणिवेच्या प्रेरणेने स्वामी हे सांगू शकत होते. त्यांनी पुण्यास असताना 'माझा शेवट काशीत हं!' ही गोष्ट ठामपणे सांगितली होती. आयुष्यभर भटकत राहाणारे स्वामीजी २९ मार्च १९५२ ला जे काशीत आले ते पुन्हा कधीही काशी सोडून बाहेरगावी गेले नाहीत. स्वामींना मृत्यूची चाहूल लागताच त्यांनी सर्वात प्रथम श्रीगुरुमहाराजांना पत्र पाठविले ते वाचनीय आहे.



स्वाच्मींया इच्छेने
एकाच जागेवर
व आसनावर काढलेले
फोटो



" वामन ! तुम मेरी
जगहपर वैठो ! "


नारायण    श्री क्षेत्र काशी
ता: २४-१०-५२
कल्याण भाजन नीलकंठ राय व कृष्ण राय
बलराय को नारायण स्मरण सूचक नवीन वर्ष के
शुभाशीर्वाद विशेष समाचार
उपासनेला दृढ चालवावे, भूदेव संतुष्ट सुखे लावावे।
सत्कर्म योगे वय घालवावे, सर्वांमुखी मंगल बोलवावे।।
मना सज्जना भक्ति पंथेचि जावे, तरी श्रीहरी पाविजे तो स्वभावे।
जनी निंद्य ते सर्व सोडून द्यावे, जनी वंद्य ते सर्व भावे करावे।।

जय! जय! रघुवीर समर्थ !!!

नवीन वर्षका शुभ समाचार ज्ञात हुआ सर्व मण्डलीको नवीन वर्षका नारायण स्मरण सूचक शुभाशीर्वाद कहना. मैं यहांपर आनंद पूर्वक हूं नारायण तुम्हारा कुशल करे. इति. शिवम्.

आशीर्वादक
स्वामी लोकनाथ तीर्थ
ए २/३३ त्रिलोचन. बनारस
उत्तर प्रदेश

या पत्रातून स्वामींचा "समर्थ संदेश"–मराठीचा अभ्यास साधनेचा आदेश–या गोष्टी दिसून येतात.

नारायण श्रीक्षेत्रकाशी
ता. ९-१२-५३

कल्याणभाजन वामन दत्तात्रेय गुळवणीको

नारायण स्मरण सूचक आशीर्वाद । विशेष समाचार ।

....मेरी प्रकृति प्रतिदिन क्षीण हो रही है। औषधोपचार भी हो रहा है परंतु विशेष फल कुछ भी हो नहीं रहा। मेरे जीवनका यह अंतिम समय है। मे महिना के शेषभागमें मेरा महाप्रयाण अवश्य होगा। यह सुनिश्चित है। नारायण.

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

स्वामींचे पत्र वाचून श्रीगुरुमहाराजांना बरे वाटले नाही. श्रीगुरुमहाराजांनी स्वामींना कळविले "ज्योतिष शास्त्र खरे असले तरी मृत्यूचा निर्णय ज्योतिषाने खरा होतो असे नाही. तरी ज्योतिषावर या बाबतीत विश्वास ठेवून चिंता करू नये." स्वामींनी हे पत्र पाहिले. आणि पुन्हा पत्राला स्पष्ट व निश्चित उत्तर दिले.

नारायण श्रीक्षेत्रकाशी
ता. २०-१२-५३

कल्याणभाजन वामन दत्तात्रेय गुळवणीको नारायण स्मरण सूचक आशीर्वाद। तुम्हारा ता. १६।१२।५३ का पत्र मिला। समाचार विदित हुआ। हमने प्रयाण-विषय ज्ञात होने के लिये ज्योतिष का आश्रय नहीं लिया।

काका दामले की मृत्यूकी बात जिस अनुभवसे मैंने बताया था, गोरे भट्ट की स्त्री की मृत्यूकी बात जिस अनुभवसे मैंने बताया था, वही अनुभवसे ही मैं अपने प्रयाण की बात तुमको लिखा।

भुजंगरावादि सब मण्डलीको नारायण स्मरण सूचक आशीर्वाद कहना। नारायण तुम्हारा कुशल करे। सूठकेस सहित पुस्तक मुझे मिल गया। शंकररावके चिरंजीवने अपनी बापकी संपत्ति समझकर "महाभारत, हरीवंश" निकाल लिया। अस्तु। अब पुस्तकसे मेरा प्रयोजनही क्या रहा.

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

या सुमारास स्वामी जिना उतरतांना पडले व त्यांचा उजवा हात दुखावला गेला. त्या हाताचे दुखणे तीन महिने पुरले. स्वामी या काळातील पत्रे दुसऱ्याकडून लिहून घेत होते. सर्वपरिचित शिष्यभक्तांना स्वामींनी आपल्या महानिर्याणाची पत्रे पाठविली. स्वामींचे असे पत्र पाहून सर्वजण हबकून गेले. कोणाला काही सुचेना. डिसेंबरमध्ये हे वृत्त कानी पडू लागले. मेच्या अखेरीस निर्याण काल कळविला होता. स्वामींना अनेकांनी भावपूर्ण पत्रे पाठविली. वियोगाचे दुःख आताच असह्य होते तर पुढे कसे होणार ? या पत्रांना स्वामींनी जी उत्तरे दिली ती चिंतनीय व प्रेरक आहेत.

नारायण

श्रीक्षेत्रकाशी
१५-२-१९५४

कल्याणभाजन वामन दत्तात्रय गुळवणी को

नारायण स्मरण सूचक आशीर्वाद । विशेष समाचार । तुम्हारा १२-२-५४ का पत्र मिला । समाचार विदीत हुआ । मेरे वास्ते चिंता नहीं करना । **मेरा प्रयाण होगा इसी कारण मुझको कुछ भी चिंता या दुःख होता नहीं। मुझे तो आनंद ही आनंद अनुभवमें आता है । संयोगा वियोगान्ताः कर्मानुसार देहसंबंध प्राप्त हुवा है। कर्मक्षय होनेपर प्रयाण भी अवश्यही होगा।** स्वयंपाकके लिये एक महाराष्ट्र देशस्थ यजुर्वेदी वृद्धा ब्राह्मणी रखा है । दिन व्यतीत हो रहा है । भुजंगराव आदिक सर्व मण्डलीको मेरा नारायणस्मरण सूचक आशीर्वाद कहना ।

**भविष्यत् जिसको अंधःकारमय (दुःखप्रद) दिखता है उसको मृत्यूसे बहुत भय होता है। मुझे भविष्यत् दुःखप्रद नहीं दिखता है। अतः मृत्यूसे कुछभी भय होता नहीं।** हाथका दुखना पूर्वापेक्षा अच्छा होता रहा है। नारायण तुम्हारा कुशल करें। इति शिवम्।

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

नारायण

श्रीक्षेत्रकाशी
ता. ६।३।५४

कल्याणभाजन वामन दत्तात्रेय गुळवणीको

नारायण स्मरणसूचक आशीर्वाद । विशेष समाचार। तुम्हारा म. ऑ. रु. ५०, पचास मिला। समाचार विदित हुआ। सांप्रत यहाँ आनेका कुछ भी जरुरत नहीं।

मे महिनामें अवश्य आना। उस समय तुम यहाँ उपस्थित रहनेका विशेष प्रयोजन है। शरीर प्रतिदिन क्षीण हो रहा है। ज्वरभी नियमीत रूपसे होता है। हृदय-यंत्रमें धडकन् होती है। दुखता भी है। परंतु इससे मनमें दुःख कुछ भी होता नहीं। **इसप्रकार उपद्रव होनेसे मनमें आनन्दही होता है। यह नारायणकी कृपा है। नारायण के शिवाय कोई भी मेरा सहाय्यक नहीं है।** भुजंगराव आदिक सब परिचित मंडलीको मेरा नारायणस्मरण सूचक आशीर्वाद कहना। नारायण तुम्हारा कुशल करें। इति शिवम्।

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

नारायण

श्रीक्षेत्रकाशी
ता. ९।३।५४

कल्याणभाजन चि. नारायण यशवंत ढेकणेको

नारायण स्मरणसूचक आशीर्वाद। विशेष समाचार। तुम्हारा म. ऑ. ३०, तीस रुपाया मुझे मिला। मेरे लिये वृथा चिंता नहीं करना। मेरी प्रकृति अब सुधारेगी नहीं।

**मृत्यू न म्हणे ऋषेश्वर। मृत्यू न म्हणे योगेश्वर।**
**मृत्यू न म्हणे हरी हर। मृत्यू न म्हणे हा अवतार। भगवंताचे ॥**

जो शरीर धारण किया उसको एक दिन वह शरीर छोडना ही पडेगा। वृथा चिन्ता करनेसे मृत्यू छोड न देवेगा। अवसंभावी भावके लिए बुद्धिमान चिंता नहीं करता है।

सब परिचित मण्डलीको नारायण स्मरणसूचक आशीर्वाद कहना। नारायण तुम्हारा कुशल करें। इति शिवम्।

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

नारायण

श्रीक्षेत्रकाशी
१७।३।५४

कल्याणभाजन वसंत व्यंकटेश वाकडे को

नारायण स्मरणसूचक आशीर्वाद। विशेष समाचार। तुम्हारा १५।३।५४ का

पत्र मिला। मेरी शरीर प्रकृति नितांत अस्वस्थ है। इतने बडे पत्र पढनेमें और उत्तर लिखनेमें मैं असमर्थ हूँ। नारायण तुम्हारा कुशल करै। इति शिवम्।

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

स्वामींचे आलेले पत्र घेऊन बाळासाहेब वाकडे श्रीगुरुमहाराजांचेकडे गेले. स्वामींचे पत्र पाहून त्यांना चिंता वाटली. श्रीगुरुमहाराजांनी स्वामींना "मी येऊ का" म्हणून पत्र पाठविले. स्वामींनी उलट टपाली कळविले "इस समय यहाँपर तुम्हारा आनेका कुछ जरुरत नहीं।" कारण हा मार्चचा दुसरा पंधरवडा होता. मे महिन्याला खूप अवकाश असल्याने आत्तापासूनच काशीस उगाच येऊन राहण्याची गरज नाही. वेळेपूर्वी असला म्हणजे पुरे. असे हे धैर्य दाखविणारे वाक्य होते. श्री. नारायणराव ढेकणे यांना पाठविलेले पुढील पत्र पहा.

नारायण

श्रीक्षेत्रकाशी
२७-३-५४

....नारायण स्मरणसूचक आशीर्वाद।

**...मेरा वियोग होगा, ऐसा समझकर, दुःखित हो रहे हो; ऐसा दुःख करना उचित नहीं। नित्य संबंध कभी होता नहीं। सयोगा वियोगान्ताः गुरु तो ब्रह्मरूप है। लौकिक दृष्टिसे वियोग होनेसे भी परमार्थतः कभी वियोग होता नहीं।**

स्मरण करनेसे सदाही साहाय्य मिलता है। चिन्ता का कुछ कारण नहीं। नारायण तुमको सर्वावस्थामें साहाय्य करेंगे। इति शिवम्।

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

पुढे एप्रिलपासून स्वामींची प्रकृती ठीक झाली. कोणताही आजार नाही, दुखणे नाही अशी स्थिती झाली. तरी स्वामींनी महानिर्वाणाचा निर्णय बदलला नाही. मेच्या शेवटी आमचे जीवन समाप्त करण्याची काळाची इच्छा आहे हे ते वारंवार सांगत होते. स्वामींचा नित्यक्रम सुरळीत सुरू होता. ते अत्यंत आनंदी होते. त्यांच्या हास्यविनोदाला खंड नव्हता, श्रीगुरुमहाराज ५ मे पर्यंत काशीस गेले. नंतर

सोलापूरहून श्री. अण्णासाहेब मोहोळकर हे सपत्निक काशीस गेले. श्री. मोहोळकर शास्त्री, श्री. कुदालशास्त्री ही मंडळीही स्वामींच्या दर्शनास श्रीक्षेत्रकाशीस गेली. स्वामींची प्रकृती ठीक पाहून सर्वांना समाधान वाटले. पण अशी पत्रे कशी पाठविली याचे आश्चर्यही वाटले. स्वामींना त्या पत्रासंबंधी विचारता म्हणाले "यादीला नाव पडले आहे हुकूमही सुटला आहे."

ती मे महिन्यातील अमावास्या होती. सकाळी स्वामींचे नित्याचे स्नानादि आह्निक झाले आणि त्यांना ताप भरला. जेवणखाण सुचले नाही. इतका तो ताप वाढू लागला. जोरात थंडी सुरू झाली. अंगावर पांघरूण घालूनही थडथडणारे शरीर थांबेना. संध्याकाळपर्यंत वातावरण गंभीर झाले. काशीतील परिचित लोक, शिष्य, साधक स्वामींची एकाएकी बिघडलेली प्रकृती पाहाण्यासाठी येऊ लागले. दर्शन घेऊन शांतपणे बाहेर थोडा वेळ थांबत व पुन्हा चक्कर मारून येत. जांबवंतसिंहजी, पं. लक्ष्मणशास्त्री वैद्य, विश्वनाथ झारखंडी, प्रो. अकूत अशी काशीची मंडळी तेथे स्वामींच्या जवळ बसून होती. श्रीगुरुमहाराज आणि महाराष्ट्रातून गेलेली मंडळी-सुद्धा स्वामींच्या जवळ बसून होती. सर्वजण शांतपणे देवाची प्रार्थना करीत होते. श्रीगुरुमहाराजांनी सुद्धा स्वामींचे आयुष्य वाढण्यासाठी डिसेंबरपासून मे पर्यंत काही जपानुष्ठाने केली. आताही ते जवळ बसून मानस जप करीत होते.

रात्रीचे १० वाजून गेले होते. मध्यंतरी सवड काढून श्रीगुरुमहाराज संध्यादि सायं आह्निक थोडक्यात उरकून आले. इतर साधकांनी आळीपाळीने आपापली नित्य सायंकर्मे उरकली. रात्रीची शांतता भयाण जाणवू लागली. स्वामींची सायं-संध्या अंथरुणाजवळ आसन टाकून, भस्मस्नान करून झाली. त्यांचा ताप खूप वाढला होता. बोलवत नव्हते. हाताला धरून कसेबसे उठून हे आह्निक उरकले होते. त्या हालचालीने अधिकच परिश्रम झाले व छातीत दुखू लागले. हृदयाची धडधड वाढली. स्वामींना एक अक्षरही बोलवेना. सारी चिह्नें चमत्कारिक तर्क करावयास लावीत होती. मनात चांगले विचार चांगल्या वातावरणात उत्पन्न होत नाहीत तर अशा भयाण वातावरणात मनातही नको ते भयानक विचार येत होते.

सर्वजण गंभीर होते. पण स्वामी प्रसन्नमुख होते. तोंडातून शब्द निघत होता तोपर्यंत ते 'नारायण' 'नारायण' म्हणत होते. पुढे ॐ काराचा केवळ स्वराने ते उच्चार करीत होते. इतक्यात स्वामींनी डोळे उघडले. मोठे केले. इतके मोठे केले

की सर्वजण चमकले. डोळ्यांचा मोठेपणा सर्वांना जाणवला. तेवढ्यात स्वामींनी डोळे घट्ट मिटले. श्रीगुरुमहाराज जवळ बसले होते. स्वामींनी त्यांचा हात घट्ट पकडला होता. स्वामींचे सर्व शरीर अति जोरात थरथरले. काय होत आहे याची कोणालाच कल्पना येईना. सर्वजण टक लावून पहात होते. स्वामी निच्चेष्ट झाले. सर्वांना धक्का बसला. पण तेवढ्यात स्वामींचे ओठ पुटपुटले "वामन!" श्रीगुरुमहाराजांनी आपले कान स्वामींच्या तोंडाजवळ नेले. स्वामी क्षीण स्वरात म्हणाले "वे चले गये।"

काळ आला होता पण वेळ आली नव्हती. इच्छामरणी महापुरुषांच्या मागे काळ असला तरी वेळ त्यांच्या इच्छेवर असते काळाच्या नव्हे! मृत्यूचे दूत आले होते. स्वामींना ते दृश्य दिसले तेव्हा त्यांनी आपली दृष्टी दूतावर रोखली व त्याला तेथेच रोखले. मृत्यूनेही पाहिले की या महापुरुषाच्या दर्शनाला असे महान संत-सत्पुरुष आलेले आहेत, आपणही येथूनच दर्शन घेणे बरे! असा सुविचार त्याला वेळीच सुचला म्हणून त्यांच्यावरील पुढील आपत्ती टळली. मृत्यूने नजर पुन्हा टाकून पाहिले तर त्याला स्वामींच्या ठिकाणी साक्षात् विश्वेश्वर दिसले. ज्या महादेवाच्या आज्ञेने आपण काम करतो त्याला नेण्यासाठी आलो ही चूक लक्षात येताच मृत्यूने स्वामींना वंदन केले. वंदन करता करता त्याला विश्वेश्वरांच्याजवळ श्रीदत्तप्रभु बसलेले दिसले. त्याने त्यांनाही वंदन केले व ताबडतोब निघून गेला.

स्वामींचे ओठ हालले आणि स्वामी श्रीगुरुमहाराजांचेजवळ काही बोलले एवढे पाहूनच जवळ बसलेल्या सर्व साधकांना समाधान वाटले. श्रीगुरुमहाराज सर्वांना म्हणाले "स्वामींना विश्रांती पाहिजे. सर्वांनी घरी जायला हरकत नाही. स्वामींची प्रकृती ठीक आहे. धोका टळलेला आहे." श्रीगुरुमहाराजांचे शब्द ऐकून सर्वांना आनंद झाला. डोळ्यासमोर घडलेली घटना पाहून सर्वांचे हृदय श्रद्धेने हेलावले. न बोलता नमस्कार करून प्रसन्नचित्ताने सर्वजण घरी गेले. स्वामीच्या-जवळ ३/४ जण थांबले. त्यांनी स्वामींचे अंग रगडून काढले. स्वामींना फळांचा रस दिला. औषधही दिले. रात्री एक नंतर स्वामींना शांत झोप लागली.

दुसरे दिवशी सकाळी स्वामींची प्रकृती ठीक आहे. मोठा धोका टळला या व्यवहारी भाषेत सर्वांना बातमी कळविली. ठिकठिकाणी या आशयाची पत्रे २/४ दिवसांनी स्वामींनी स्वतःच पाठविण्यास सुरवात केली. श्रीगुरुमहाराजांचा काशीमध्ये महिनाभर मुक्काम होता.

# १९५४ : शेवटचे वर्ष !

मे मध्ये मोठ्या प्रसंगातून स्वामी सुटले. एक भयंकर गंडांतर टळले. श्रीगुरुमहाराजांनी स्वामींना हवापालट करण्यासाठी पुण्यास आपले येथे येता का म्हणून विचारून पाहिले. पण स्वामींनी सांगितले हे गंडांतर टळले तरी आता काशी सोडून जाणे योग्य नाही. आता मी शेवटपर्यंत काशीतच राहणार. स्वामींचा तो निर्धार पाहिल्यावर श्रीगुरुमहाराजांचा नाईलाज झाला. त्यांनी स्वामींचा निरोप घेतला. श्रीचरणांवर मस्तक ठेवले. या खेपेस अकल्पितपणे नेत्र ओले झाले. स्वामीजी सुद्धा मस्तकावर हात ठेवला. पाठ थोपटली. म्हणाले "अब चिन्ता नहीं करना। भगवान सबका भलाही करेगा।"

यानंतर स्वामींना नित्यनियमीत गुरुदक्षिणा पाठविणे, पत्र पाठवून आपली खुशाली कळविणे, स्वामींच्या प्रकृतीची चौकशी करणे, परमेश्वराजवळ स्वामींना प्रकृतीचे स्वास्थ्य लाभून उदंड आयुष्य मिळण्याची प्रार्थना करणे – एवढी श्रीस्वामी सेवा श्रीगुरुमहाराज आणि महाराष्ट्रातील साधक यांचेकडून घडत होती. प्रश्न लांबच्या अंतराचा होता त्याला दुसरा उपाय नव्हता.

इ. स. १९५४ साल हे अेका अपूर्व घटनेने चिरंतन झालेले आहे. प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामी महाराजांनी श्रीदत्तात्रेयांचे परंपरेसंबंधी, वेदान्त-संबंधी, विविध दत्तलीलांसंबंधी, अनुष्ठानासंबंधी जे जे अभूतपूर्व अक्षरवाङ्मय लिहून ठेवले होते, जी अनेक भावपूर्ण, अर्थपूर्ण, मंत्रगर्भित, रसाळ पदे, स्तोत्रे, अभंग आदि दत्त काव्य निर्माण केले होते– ते सर्व श्रीदत्तवाङ्मय केवळ श्रीगुरुसेवा म्हणून श्रीगुरुमहाराजांनी छापून प्रकाशित करण्याचे अमोल कार्य, अनेकांचे सहाय्य घेऊन, पण स्वतः ती जबाबदारी स्वीकारून, श्रीगुरुकृपेने इ. स. १९५४ मध्ये पूर्ण केलेली आहे. विद्यावाचस्पती राष्ट्रीय पंडित श्री दत्तात्रेयशास्त्री कवीश्वरांचेही जीवित कार्य झाले. ब्रह्मश्री पंडित श्री आत्मारामशास्त्री जेरे यांच्या सह अनेक विद्वा-नांचा सहयोग या कार्याला लाभला आहे.

प. प. श्रीवासुदेवानन्दसरस्वती स्वामी महाराजांच्या, श्रावण शु० ५ या जन्मतिथीस शंभर वर्षे पूर्ण होत होती म्हणून या अपूर्व शुभ योगावर "शत-सांवत्सरिक जयंति महोत्सव समिती" तर्फे हैद्राबाद दक्षिण येथे मोठा समारंभ साजरा

केला. हा समारंभ एक सप्ताह चालू होता. अनेक अकल्पित घटना या सप्ताहात अनुभवास येत होत्या. श्रीगुरुकृपेच्या दिव्य वर्षावाने जमलेले सर्व भक्त आनंदातिशयाने न्हाऊन निघत होते. या सप्ताहात यज्ञ, स्वाहाकारादि अनुष्ठाने झाली, प. प. श्रीवासुदेवानंदांच्या सर्व प्रकाशित ग्रंथाचे पारायण झाले, श्रीगुरुचरित्राचे पारायण झाले. प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वतींच्या आठवणी सांगण्याचा भावपूर्ण हृद्य कार्यक्रम झाला, अपूर्व अन्नदान झाले. "श्रीवासुदेव ग्रंथ प्रकाशन" या संस्थेतर्फे छापून तयार झालेले १२ खंड प्रकाशित करण्याचा भव्य प्रकाशन समारंभ ब्रह्मश्री पं. आत्मारामशास्त्री जेरे यांच्या अध्यक्षतेखाली, श्रावण शु. ५ स संपन्न झाला.

या समारंभास स्वामींनी यावे म्हणून श्रीगुरुमहाराजांनी काशीस पत्र पाठविले. आशीर्वाद तरी यावेत अशी प्रार्थना केली. "प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराज शतसांवत्सरिक जयंति उत्सव समिती" तर्फे स्वामींना काशीला निमंत्रण गेले. स्वामी या कार्यक्रमास येऊ शकले नसले तरी त्यांनी या उत्सवासंबंधी पाठविलेली पत्रे अत्यंत उद्बोधक आहेत. स्वामींच्या उदारतेची म्हणजेच त्यांच्या गुरुत्त्वाची साक्ष देणारी ही पत्रे आहेत. गुरुत्त्व ही पदवी नसून स्थिती आहे हे समजून घेण्यासारखे आहे.

नारायण श्रीक्षेत्रकाशी
६–८–५४

कल्याणभाजन वामन दत्तात्रेय गुळवणीको नारायण स्मरणसूचक आशीर्वाद. विशेष समाचार। स्वामीजी महाराजके शतसांवत्सरीक जयंती महोत्सवका आमंत्रण पत्र भुजंगरावके तरफसे मुझे मिला था। तुम्हारे भेजा हुवा आमंत्रण पत्र भी आज मुझे मिला। समाचार पढकर बहुत आनंद हुआ। श्रीगुरुके पूजन करना बहुतही पुण्यकर्म हैं। यह अवसर कोई भाग्यवानकोही मिलता है। नारायण तुम लोगोंकी इच्छा पूर्ण करे। सब मण्डलीको मेरा नारायण स्मरण सूचक आशीर्वाद। नारायण तुम्हारा कल्याण करे। इति शिवम्।

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

या उत्सवाच्या निमित्ताने सर्वजण "सदाचार" बरकतपुरा, हैद्राबाद (दक्षिण)

या ठिकाणी होते. स्वामींचे पत्रोत्तरही त्याच पत्त्यावर जात असे. स्वामींचे या उत्सवाच्या समितीस आलेले पत्र —

नारायण                                                   श्रीक्षेत्रकाशी

ता. २९–९–५४

कल्याण आस्पद उत्सव मण्डलीको

नारायण स्मरण सूचक आशीर्वाद। विशेष समाचार। उत्सव समाप्ति पत्र मुझे मिला। श्री श्रीस्वामीमहाराजके शतसांवत्सरिक जयन्ती महोत्सव निर्विघ्नतया समाप्त हुआ जानकर मुझे बहुतही आनंद हुआ। ऐसाही सत्कार्यका अनुष्ठान करते हुवे आप लोगोंका जीवनकाल व्यतीत होवे ऐसा मैं नारायणसे प्रार्थना करता हूँ। श्री श्रीसद्‌गुरुके सेवा कार्यमें आप लोगोंका जीवनकाल व्यतीत हो रहा हैं। आप लोग धन्य हैं। नारायण आप लोगोंका कल्याण करे इति। शम्।

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ
बनारस

आता स्वामींची या वर्षातील काही पत्रे खाली दिलेली आहेत. स्वामींच्या संबंधी या पत्रामधून बराच खुलासा होतो. इ. स. १९५४ मधील ही पत्रे म्हणजे शेवटच्या वर्षातील व तीही या वर्षामधील दुसऱ्या सहामाहीमधील आहेत. ही पत्रे संक्षिप्त देत असलो तरी गाळलेला भाग हा अनावश्यक म्हणून गाळलेला आहे.

नारायण                                                   श्रीक्षेत्रकाशी

नारायण....                                                   १२।८।५४

....केवल औषधी सेवनसे रोग आराम नहीं होता। दुसरा भी उपाय करना पडता है।

**पूर्वजन्मकृतंपापं व्याधिरूपेण जायते।**
**तत् शान्तिरषौधैर्दानैर्जपहोमार्चनादिभिः॥**

मैं आनंद पूर्वक हूँ। नारायण....

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

नारायण २६।८।५४

नारायण

तुम्हारा दोनो पत्र यथासमय मिला था। उस पत्रको उत्तरभी यथासमय लिखा था। मैं ऐसा समझा कि पत्र टपालमें छोड दिया। लेकिन मेरा भ्रम हुआ। आज मुझे वह पत्र स्थानपरही मिला। बहुत अफसोस हुवा। क्या करूं इस भूलका और कोई प्रतिकार ही नहीं। तुम मनमें कुछ दुःख नहीं करना। सदा ही तुम्हारा स्मरण होता है। मेरी शरीर प्रकृती भी अच्छी नहीं। बहोत दुःख भोग रहा हूँ। नारायण तुम्हारा कुशल करे। इति।

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

नारायण ११।१०।५४

नारायण ....

नारायण कृपासे तुम लोग सदा सुखी रहो ऐसा ही मैं चाहता हूँ।....

...पत्रादिक मुझे लिखे अथवा न लिखे इसका मुझे कुछ भी अपेक्षा नहीं। नारायण की कृपासे सदा सुखी रहे यहीं मैं चाहता हूँ। मैं यहाँपर आनंदपूर्वक हूँ। नारायण

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

नारायण ११–१०–५४

नारायण ....

....तुम्हारा पता शुद्ध लिखना। जिला अवश्य लिखना चाहिये। सब डिविजन ईस्लामपूर ऐसा लिखनेसे तुमको पत्र नहीं मिलेगा। क्यों कि इस प्रांतमें ईस्लामपूर बहुत हैं। .... के पत्रसे माल्रुम हुआ कि ईस्लामपूर (सातारा) को तुम्हांरी बदली हुई हैं। अतः मैं तुमको पत्र लिख सका।

मैं आनंदपूर्वक हूँ।

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

नारायण ८-११-५४

नारायण

व्यवहारमें विक्षेप रहताही है। ए तो नौकरी है। इसमें परतंत्रता और विक्षेप दोन्हही रहता है। अवसर मिलनेपर अभ्यास करते रहना। जलदी जलदी स्थान बदलने पर कष्ट होता है। जो देह निमित्त भोग है वह भोगनाही पडता है। सदा गुरुस्मरण करते हुवे आनंदपूर्वक दिन व्यतीत करते रहो। नारायण तुम्हारा कुशल करे। इतिशिवम्

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

नारायण श्रीक्षेत्रकाशी
ता. १६-११-५४

कल्याण भाजन वामन दत्तात्रेय गुळवणीको

नारायण स्मरण सूचक आशीर्वाद।

... रोशोई तथा और सब काम के लिये २० विश वर्ष वयका एक युवक रखा है। उसका खर्चा मासिक ३० रुपाया पडता है। स्त्रिया काम नहीं करती है। अत: काम के लिये पुरुष ही रखना पडा। पुरुष सब प्रकार काम कर सकता है। मेरी शरीर प्रकृती बहुतही खाराब है। वायु, पित्त और कृमि के विकारके कारण शरीर अतिशय दुर्बल हो गया है। साधारण चलना फिरना भी कष्टकर हो रहा है। सदा एक मनुष्य साथ न रहनेसे काम नहीं चलता। कहाँ गीर पडू इस बातका भी डर रहता है। मे महिनेमें—जो कुछ तुम देख गया उससे इस समय की परिस्थिती खेदजनक है। सबकुछ प्रसन्न चित्तसे सहन कर रहा हूँ। सबको नारायण स्मरण सूचक आशीर्वाद। इति शिवम्।

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

नारायण २-१२-५४

नारायण....

....तुम्हारा अभ्यास अच्छा हो रहा है। अभ्यासमें जो कुछ विघ्न हो रहा हैं, नियमीत रूपसे अभ्यास करता रहो, नष्ट हो जावेगा।

मेरी शारीरिक परिस्थिती विशेष अच्छी नहीं है। कुछ रोग जनित कष्ट सदा होता रहता है। नारायण स्मरण करते हुवे सब सहन करता हूँ।...

चिन्ताका कोई विशेष कारण नहीं। नारायण तुम्हारा कुशल करे। इतिशिवम्

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

नारायण ८-१२-५४

नारायण....

तुम्हारा म. ऑ. ५०, पचास रुपाया मिला। मैं यहाँपर आनंदपूर्वक हूँ।

आशीर्वादक
नारायण
स्वामी लोकनाथतीर्थ

नारायण ११।१२।५४

नारायण...

....तुम्हारा म. ऑ. २० वीस रुपया मिला। मेरा शरीर प्रकृती विशेष अच्छी नहीं। अतः मैं स्वयं पत्र नहीं लिख सका। मेरे लिये विशेष चिन्ता न करना।

आशीर्वादक
नारायण
स्वामी लोकनाथतीर्थ

नारायण १५।१२।५४

नारायण....

तुम्हारा म. ऑ. दस रुपया मिला। मेरी प्रकृती अच्छी नहीं है। बहुत कष्टसे यह पत्र लिख रहा हूँ। नारायण तुम्हारा कुशल करें।

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

नारायण २८।१२।५४

नारायण....

....मेरी शरीर प्रकृती बहुत दिनसे अतिशय रुग्न है। चलना फिरना भी

असंभव सा हो रहा। कुछ भी कार्य करनेमें भूल ही भूल होता है। अतः पत्तोत्तर लिखना भी मैं भूल गया था। अधिक कुछ लिखनेमें मैं असमर्थ हूँ। नारायण....

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

## जांबवंत ! मला तुला काही सांगायचे !

(फेब्रुवारी) माघ महिन्यातील ती चांदणी रात्र होती. स्वामींच्याकडे रात्रीच्या वेळी जांबवंतसिंह आले होते. स्वामींची प्रकृती ठीक नसते म्हणून ते रोज दोन वेळा येत होते. खूप वेळ थांबत होते. स्वामींनी जा सांगितले म्हणजे जात होते. आज ते आले. स्वामींना साष्टांग नमस्कार केला. आता जवळ बसणार तर स्वामीजीच उठले व म्हणाले "जांबवंत ! आज मला तुझ्याशी खूप बोलायचे आहे. तुला काही सांगायचे आहे. चल आपण वर गच्चीत चांदण्यात जाऊन बसू." असे म्हणून स्वामी पुढे झाले. जांबवंत खोलीचे दार बंद करून त्यांच्या मागे चालू लागले. त्यांना मध्येच आठवण झाली, स्वामी चांदण्यात उघडे बसणार म्हणून पुन्हा खाली आले. त्यांचे बसण्याचे आसन घेतले. पांघरण्यास शाल घेतली. मग वर गेले.

जांबवंतांनी स्वामींना आसन घातले. त्यावर स्वामी बसले. त्यांना शाल पांघरण्यास दिली व स्वतः त्यांच्या समोर बसले.

"जांबवंत ! तुझ्यासाठी मला काहीच करता आले नाही. तुझी स्थिती पाहिली पण काय करू शकलो मी ? तुला माहीत नाही मला फार विद्या ठाऊक आहेत. पण मी संन्यासी आहे. आमच्यावर शास्त्राची बंधने आहेत. आम्हाला सर्व सोडून द्यायचे आहे याची सतत जाणीव ठेवावी लागते. या विद्या लौकिक लाभ देणाऱ्या असतात म्हणून त्या वर्ज्य आहेत. आम्हाला फक्त एकच विद्या ग्राह्य आहे. ती म्हणजे 'पराविद्या'! 'अध्यात्म विद्या विद्यानां' एवढ्या एकाच विद्येचा आम्हाला अधिकार आहे. आम्ही इतर विद्येच्या नादी लागलो तर लोकमोहात पडू आणि आत्मघाताबरोबर समाजाच्याही तात्त्विक घातास आम्ही जबाबदार राहू.

लोकांच्या मोहात पडणे चांगले नाही. म्हणून तर मी लोकांना फटकारतो. रागावतो. मोठ्यांदा बोलतो. लोक दूर राहातात. त्यांचा उपसर्ग न वाढेल असे पहात

आलो आहे. लोक असे स्वार्थी आहेत की त्यांना लौकिक स्वार्थाशिवाय काहीही परमार्थ नको आहे. या लोकांना जर एखादी विद्या दिली तर ती स्वार्थासाठी तर राबवतीलच पण त्यामुळे अध:पतित पण होतील. शरीर हलके करणे, भारी करणे, पाण्यावर तरंगणे इ. विद्या मला नेपाळमधले 'तिब्बतीबाबा' नावाच्या योगगुरुने शिकविल्या. मी या विद्या वामनरावांना देऊ इच्छितो पण त्यांची इच्छा नाही. ते म्हणतात "हा तुम्ही दिलेल्या एका विद्येचा एवढा व्याप झाला आणखी दुसऱ्या विद्यांनी काय होईल याची कल्पनाच करता येत नाही. आहे एवढी विद्या पुरे या विद्येत सर्व काही आले आहे. तुला एखादी विद्या देऊ का? म्हणून विचारले तर तूही नाही म्हणतोस!

पण जांबवंत खरं सांगू? तुम्ही नको म्हणता यातच तुमचे कल्याण आहे तुला खऱ्या अध्यात्माचे रहस्य सांगू? अरे फार कोरडे झाले पाहिजे कोरडे! आश्रम विकून टाकताना मला थांबायला वेळ नव्हता. पैसे मिळताच ताबडतोब शंकररावांना ते पाठवून दिले तेव्हां मला बरे वाटले. विषयसुखाचा मोह सोडल्याशिवाय कोरडे होता येत नाही."

"जांबवंत, और एक बात बताता हूँ" म्हणून स्वामी पुढे बोलू लागले.

"मला संन्यास दिल्यामुळे विद्यांचा वापर करता आला नाही म्हणून मी संन्यासाश्रमाला विरोध करतो असे नाही. मला इतक्या लहानपणी संन्यास दिला की मी तो स्वीकारला. तो आश्रम नीट संभाळण्यासाठी मला या देहाला खूप कष्ट द्यावे लागले. सध्याचा काळ इतका विपरीत आहे की शहाण्यानेसुद्धा संन्यास घेऊ नये असे आयुष्यभराच्या अनुभवाने वाटते.

पण मला यापेक्षाही महत्त्वाचा मुद्दा असा सांगावयाचा आहे की आपला हा शक्तिपात योगमार्ग इतका परिपूर्ण आहे की त्याला संन्यासाश्रमाच्या दिव्य अग्नि-कुंपणाची आवश्यकता नाही. शक्तिपात दीक्षा झाल्यावर त्या आश्रमाच्या नियमांच्या बंधनांची टांगती तलवार मस्तकावर ठेवून जीवनातील व्यवहार नेटाने करीत राहणे अनावश्यक आहे. धर्मशास्त्र असे आहे की कर्माचे फळ अटळ आहे. काळ असा आहे की कर्मांची शुद्धता अशक्य आहे. म्हणून परंपरेने चालत आलेला हा संन्यासाश्रम मी माझ्यापुढे थांबविला आहे. त्याचा आग्रह सोडला आहे. मी माझ्या

जीवनांत सद्‌गुरुकृपेने अत्यंत शुद्ध राहिलो ही समाधानाची गोष्ट आहे. शक्तिपात साधन असे आहे की ते प्राप्त झालेला जीव शुद्धच होत जाणार. या शुद्धतेच्या प्रक्रियेतून त्याची उर्ध्वगामिनी झालेली शक्ति शिवस्वरूपात विलिन होणार. शक्तिपात झालेल्या जीवाची ही गती अटळ आहे.

आज मला परम गुरुदेव श्रीनारायणतीर्थदेवांची आठवण होते. मी आणि माझे गुरुमहाराज आम्ही दोघे परमगुरुदेवांच्या आश्रमात होतो. चैतन्याच्या दिव्य शक्तीचा जो अनुभव सुरवातीला आम्ही अनुभविला त्याचे स्मरण आज पुन्हा होत आहे. त्या प्रारंभीच्या दिव्य आनंदाने आम्ही इतके धुंद आणि मस्त झालो होतो की आम्हाला त्या वेळी दुनियेचे भान राहिले नव्हते. बहोत आनंद होता तेव्हा त्या आनंदाच्या उसळत्या लहरीत आम्ही खूप हसलो, नाचलो, ओरडलो आणि रडलो सुद्धा! पण सारे त्या परम आनंदात! पण आमचे परमगुरुदेव मात्र अत्यंत स्थिर व शांत होते. आनंदसागराची प्रशांत गंभीर प्रतिकृती म्हणजे आमचे परमगुरुदेव नारायणतीर्थदेव होते.

ते गेले, तो प्रसंग सांगतो. तसे झाले पाहिजे तर खरी सार्थकता. आपला नश्वर पार्थिक देह सोडण्यापूर्वी त्यांनी एक बंगाली पद लिहून आपल्या उशाखाली तो कागद ठेवून दिला होता. त्या पदात त्यांनी सांगितले—

"आजपर्यंत ज्या शुभ दिवसाची मी वाट पहात आहे तो आज आला आहे. मी पचंमहाभूतांचा देह निर्माण करून त्यात वास्तव्य केले. आणि सुखाच्या शोधासाठी त्याला विनाकारण शिणवून क्षीण केले.

विषयसुख हे दुःखाचेच वेगळे नाव आहे. बुद्धिमान मनुष्य अशा सुखाचा आदर कधीही करणार नाही. वेडे लोक मात्र दुःखरूप असलेल्या या विषयसुखात रात्रंदिवस बुडून दुःखच दुःख मिळवीत रहातात.

आज मी अशा या देहाचे विसर्जन करून नित्य आनंद असलेल्या स्थानी जात आहे. तेथून कदापीहि या संसारचक्रात येण्याची पाळी येत नाही.

म्हणून मला आज फार फार आनंद होत आहे. लोक ज्याला मृत्यू समजून भितात तो मृत्यू नाही. ते अमृत आहे. त्या अ–मृत स्थितीत, त्या अमर अवस्थेत मी आता लीन होत आहे."

परम गुरुदेव परमधामास जाण्यापूर्वी आसनावर बसून होते. समोर शिष्य बसले होते. शिष्यांचे अत्यंतिक दुःख पाहून ते म्हणाले—

"आमच्या देहत्यागाने आपणापैकी कोणीही भीति किंवा दुःख मनातही आणता उपयोगी नाही. देहत्याग हा कधी न कधी सर्वांनाच करावा लागणार आहे मग या अटल विषयाची भीति किंवा दुःख का? मी सांगतो त्यावर विश्वास ठेवा की, मी सुंदर विदेही स्थितीमधून, या अनिर्बंध शक्तीच्या सहाय्याने, आपल्या इच्छेनुसार, गतिमान देह धारण करून, तुम्हा सर्वांच्या अधिक कल्याणासाठी, समर्थ ठरणार आहे. विदेही स्थिती हीच आपली परम अवस्था आणि आनंदमयी सत्ता आहे. म्हणून विदेही होण्यात परम आनंद आहे. या स्थितीमुळे आपले व माझे संबंध अधिक आंतरिक निकटवर्ति होणार आहेत. तेव्हा माझ्या या तद्रूपअवस्थेच्या प्राप्ती-साठी आपणही प्रार्थना केली पाहिजे. दुःख करून चालणार नाही.

मी आपणा सर्वांना आशीर्वाद देतो की ही तद्रूप अवस्था आपणा सर्वांना प्राप्त होवो.

इतके झाल्यावर त्यांनी 'सर्वं खल्विदं ब्रह्म' असे म्हणून शेवटचा श्वास "ॐ" या प्रणवाच्या उच्चाराने घेतला आणि परमपद गाठले.

"जांबवंत! सांगितले सारे काही. पुरे आता. रात्र बरीच झाली. तू घरी जा. मी झोपतो."

मग दोघे खाली आले. जांबवंताने स्वामींचा बिछाना घालून दिला. स्वामींचे पाय चेपले व नमस्कार करून निघून गेला.

## जाण्यापूर्वी निरवानिरव

स्वामींची प्रकृती गेले दोन महिने ठीक नव्हती तरी ते अंथरुणाला खिळून नव्हते. त्यांची प्रकृती ठीक नसल्याची तक्रार सतत असे आणि त्यांचा नित्य कार्यक्रम हाही सतत असे. जे व्रत त्यांनी स्वीकारले ते शेवटपर्यंत, अखंडपणे आणि पूर्ण यशस्वीपणे त्यांनी आचरले. "बनना बिघडना प्रकृतीका धर्म है। आनंदमें रहना अपना धर्म है।" स्वामींचे हे वाक्य त्यांनी जीवनभर आचरणात आणलेल्या व्रताचे रहस्य स्पष्ट करणारे आहे. आयुष्यभर त्यांना कधीही प्रकृतीचे स्वास्थ्य

मिळाले नाही. तरीसुद्धा त्यांच्या प्रत्येक पत्रात शेवटी "मैं आनंदमें हूँ।" वाक्य आढळते. इ. स. १९५५ साल उजाडले ते प्रकृतीचे अस्वास्थ्य घेऊनच !

जानेवारी महिना ताप, सर्दी, खोकला या दुखण्याच्या चढउतारात संपला. रोग शरीराला छळत असले तरी मनाने त्यात भाग घेतला नव्हता. स्वामींचे मन शरीराहून वेगळे होते. नित्य आनंदात ते असल्यामुळे या शरीराच्या विकल स्थितीला ते साक्षीभावाने पहात होते.

महात्मे हे मृत्युंजय असले तरी विश्वनियतीचे नियम मोडणे त्यांना पसंत नसते. सम्राटाने राज्य व्यवस्थेसाठी केलेले नियम हे सर्वांना बंधनकारक आहेत या जाणीवेने त्यालाही पाळावे लागतातच. स्वामींनी आयुष्यभर सुखदुःख सहन केले ते नियतीच्या नियमानुसार सहन केले. सम्राट कधी कधी एखादा नियम मोडतो पण त्याकडे कोणी नियमभंगाची दृष्टी लावीत नाही. त्याचा तो अधिकार आहे याचीच जाणीव इतरेजनाला होत असते. संत, सत्पुरुष, महात्म्यांनी कधी नियतीच्या नियमांचा भंग केला व आपले असामान्य प्रभुत्त्व नियतीवरही चालते असे दाखविले तर त्यांचा दोष ठरत नाही. त्यांच्या अधिकाराचा तो दाखला ठरत असतो. अशा चार दोन दाखल्यामुळे समाजाला महापुरुषांच्या महानतेची जाणीव लवकर होऊन त्यांच्या अनुकरणाकडे समाज वळत असतो. "जगाच्या कल्याणा संताच्या विभुती। देह कष्टविती उपकारे" हे त्यांचे जीवित कार्य सफल होण्यासाठी त्यांना असे विशेष दाखविण्याची इच्छा होते.

असे असले तरी नियतीचे नियम ते कटाक्षाने पाळीत असतात. स्वामींनी जानेवारीच्या शेवटी आपला निर्णय घेतला. तो त्यांनी जाहीर केला नाही. श्रीगुरुमहाराजांच्या पत्रात पुढील दोन वाक्ये लिहिली. "आशा है नारायण शीघ्र ही छुटकारा कर देंगे। सुखदुःख कुछ नित्य नहीं है। अतः इस दुःखका नाश किसी भी प्रकारसे आवश्यही होगा।" स्वामींनी स्वतःच्या हस्ताक्षरात लिहिलेले शेवटचे पत्र शनिवार दिनांक ५ फेब्रुवारी १९५५ चे उपलब्ध आहे.

नारायण श्रीक्षेत्रकाशी

शनिवार, ता. ५-२-५५

कल्याणभाजन श्री नीलकंठराय वत्सराजको नारायण स्मरणसूचक आशीर्वाद।

....सब भक्तमण्डलीलो मेरा आशीर्वाद कहना। मैं यहाँपर अति कठीन रोगसे शय्यागत हूँ। पत्र आदि लिखनेमें अमसर्थ हूँ।

नारायण तुम्हारा मंगल करें। इतिशम्।

आशीर्वादक

स्वामी लोकनाथतीर्थ

स्वामींनी आपल्या मनाशी सर्वकाही ठरविले होते. आता त्यांना पुढल्या व्यवस्थेचे वेध लागले होते. रविवार दिनांक ६ फेब्रुवारीस स्वामींनी श्री. जांबवंतसिंहजी आणि पंडित श्री. लक्ष्मणशास्त्री वैद्यजी या दोघांना एकांतात बोलावून घेतले. कागद पेन्सिल घेण्यास सांगितले. दोघांना एकूण भावी गांभीर्याची जाणीव झाली. स्वामींना त्यांचा गंभीरपणा जाणवला. मग एकदम त्या गांभीर्याला स्वामींनी कलाटणी दिली. स्वामी आधी खूप जोरात हसले व म्हणाले "आम्ही या शरीरातून निघून गेलो म्हणजे दोन्ही पायांना दोरी बांधा आणि काशीच्या रस्त्यावरून फरपटत ओढीत न्या. मग द्या फेकून गंगेत" एवढे सांगून स्वामी पुन्हा हसत बसले.

जांबवंतसिंहजी म्हणाले "स्वामीजी! आमच्या हातून हे होणार नाही. आजपर्यंत अनंत अपराध आम्ही केले आहेत आणखी हे कृत्य करून आम्हाला कोणती गती मिळेल?" यावर स्वामी म्हणाले "जांबवंत! संन्यास धर्मात देहाचा शेवट यापेक्षाही विशेष सांगितला आहे. संन्यासी जीवन हे सर्वस्वी जगाच्या कल्याणासाठी खर्च करण्याची आज्ञा आहे त्याप्रमाणे या शरीराचा देहपात झाल्यावर या देहाचे अवयव तोडून पश्वादिकांना व जलचरांना घालावे असे शास्त्र आहे. मग त्यापेक्षा तर मी तुम्हाला फार सोपे सांगितले आहे. असे पहा की जीवाला सर्व सोडून देणे एकवेळ सोपे आहे परंतु ज्या कुडीत जन्मभर वास्तव्य केले त्या कुडीचा आपलेपणा सुटणे कठीण आहे. म्हणून संन्यासी जीवाला ही शास्त्राची आज्ञा आहे.

स्वामींचा हा प्रखरपणा लक्ष्मणशास्त्रीजी किंवा जांबवंतसिंहजी यांना सहन झाला नाही. त्यांनी पुन्हा क्षमा मागितली व यापेक्षा दुसरा सोपा, सहन होणारा मार्ग दाखवा म्हणून प्रार्थना केली. स्वामींच्या इच्छेप्रमाणे सर्व काही ठीक होईल पण मनाला सोसवेल असे सांगावे हे पुनः पुनः विनवून सांगितले. मग स्वामींनी पुढीलप्रमाणे आपली नंतरची सर्व व्यवस्था व्हावी म्हणून सांगितले.

१) ३' × १' × ६' च्या आकाराची दगडाची पेटी "पत्थरकी नाद" तयार करून घ्या. त्यामध्ये हे शरीर ठेवून त्यावर गंगाजल घाला. ती पेटी बांधून गंगेच्या प्रवाहामध्ये सोडून द्या.

२) 'कपालक्रिया' करा. कपालक्रिया म्हणजे मस्तकावर ब्रह्मरंध्राचे ठिकाणी नारळ फोडा. कवटी फुटली पाहिजे. तेथून 'धनंजय वायू' बाहेर पडतो. तेव्हांच शरीराचा संबंध सुटतो.

३) पूर्वाश्रमी मी कालीची उपासना केलेली आहे. कालीमातेची माझेवर मोठी कृपा आहे. मी संन्यासी असल्याने कालीमातेचे काही करू शकलो नाही. पण माझ्यासाठी तुम्हाला करता येईल असे सांगतो.

५४ कुमारिकांना स्नान घालून, हळदकुंकू वेणी द्या. एकेक तांबडे पातळ व खण द्या. विडादक्षिणा द्या. सर्वांना भोजन घाला.

४) माझ्या सद्गुरुंच्या आश्रमात जाऊन छोटी गैबीमधील सिद्धयोगाश्रमातील सर्व गुरुबंधूना व मठवासियांना भोजन द्या.

५) १४ ब्राह्मण, १४ संन्यासी यांना भोजन घाला. प्रत्येक संन्याशाला छाटी, कमंडलू, आसन व १ रुपाया दक्षिणा द्या.

६) माझी सर्व उत्तरक्रिया महाराष्ट्रीय ब्राह्मणाकडून करा. कारण मी पूर्वजन्मी महाराष्ट्रीय ब्राह्मण होतो.

स्वामींनी सूचना लिहून घेण्यास सांगितल्या होत्या. ते बोलत असतानाच लिहून घेतल्या जात होत्या. सूचना सांगून झाल्यावर म्हणाले जे होईल ते पहात रहा. गडबडून जाऊ नका. आता विशेष धावपळही करू नका.

स्वामींनी आपले सांगणे थांबवले. इतका वेळ ते बसून होते, खूप बोलत होते. यामुळे बराच थकवा आला म्हणून अंथरुणावर अंग आडवे केले. ताप वाढला. खोकला वाढला. जांबवंतसिंहजी आणि लक्ष्मणशास्त्रीजी यांचे चित्त अस्वस्थ होऊ लागले. स्वामीसेवा होईल तेवढी करण्याची पराकाष्ठा चालविली.

हळू आवाजात लक्ष्मणशास्त्री वैद्यजी स्वामींना म्हणाले "स्वामीजी !

कुमारिकांना भोजन देताना काही अनुभूती होईल का?" स्वामी म्हणाले "उस समय देखो!"

या सर्व कार्यक्रमासाठी स्वामींच्या जवळ असलेले पैसे त्यांनी जांबवंतसिंहा-जवळ दिले व "उरलेले तुम्ही सर्वमिळून घाला" असे सांगितले.

स्वामींना मृत्यूची जाणीव स्पष्ट होती. ते इच्छामरणी होते. काळाची इच्छा त्यांनी टाळली होती. आता ते त्यांच्या इच्छेने या देहाचा त्याग करण्याच्या तयारीस लागले. या तयारीतील एक कार्यभाग स्वामींनी आज उरकला होता.

जांबवंतजी आणि लक्ष्मणशास्त्रीजी स्वामींच्या जवळ बसले. एकाने त्यांचे पाय रगडण्यास घेतले तर दुसऱ्याने त्यांचे हात रगडण्यास सुरुवात केली. खूप बोलून थकलेले स्वामी डोळे मिटून, शांत पडून होते. हळुवार हाताने स्वामींच्या शरीराची सेवा चालू असताना मधेच त्यांना झोप लागे आणि प्रगाढ झोपेतील घोरण्याचे सूर निघत, स्वामींना झोप लागली आता आपली सेवा थांबवावी असा विचार मनात येऊन या दोघांनी आपले काम थांबवावे तोंच स्वामींची थोडी फार हालचाल होई. मग पुन्हा त्याच तत्परतेने स्वामीसेवा सुरु होई. स्वामींच्या क्षीण शरीराला स्पर्श होताना दोघांच्या हृदयात कालवाकालव होई तर प्रसन्न, तेजःपुंज, भव्य चेहऱ्याकडे पाहाताच मन भारावून जाई. स्वामींनी दिलेल्या सूचनांमुळे दोघांचे मेंदू सुंद झाले होते. नियतीच्या हालचाली जणू स्वामींच्या मुखातून स्पष्ट झाल्या होत्या. म्हणून त्यांना काही सुचत नव्हते.

इतक्यात स्वामींनी डोळे उघडले. जांबवंतसिंहजी हात दाबीत होते. त्यांच्या-कडे नजर लावून स्वामी पुन्हा बोलू लागले—

"आमच्या परमगुरुदेवांच्या त्या पदाची आज एकसारखी आठवण होत आहे, जाम्बवंत! त्यांनी या जगाचा निरोप घेताना ते पद म्हटले होते. बंगाली भाषेतील ते पद मी आज म्हणून दाखवतो, आता गाता येणार नाही. जरा जवळ बसून ऐक. बंगाली असले तरी सोपे आहे.

**आज सेई शुभ दिन**
**जेई दिनेर आशे आमी छिलेम एते दिन**

भूतमय देह करि निर्मान
तार मध्ये आमी करि अवस्थान सुखेरी आशाय
ऐसे एधराय दुःखे दुःखे हालेम क्षीण
विषय सुख केवल दुखेर नामान्तर
प्राज्ञजने इहार करे न आदर
अज्ञजने ताहे मज्झि निरन्तर
केवल दुःख पाय निशिदिन
आज सेई देह करि विसर्जन
नित्यानन्द धामे करिव गमन
यथा होई ते आर पुनरागमन
होय न भावे कोन दिन
ताई एतो आनंद आज मम मने
लोके जारे मृत्यु बोले भय पाय मन
सेजे मृत्यु नवे अमृत होए
अमृते होए लीन

## वियोगापूर्वीच वियोगाची जाणीव

सोमवार दिनांक ७ फेब्रुवारीचा दिवस उजाडला. स्वामींचे दुखणे दिवसा-दिवसाने उग्र स्वरूप धारण करू लागले. ज्वर खोकल्यामध्ये अमांशाचा त्रास सुरू झाला. क्षीण शरीर गळून गेले. आवाज खोल गेला तरी स्नान संध्या झाली. औषध नको म्हणत असताही डॉ. बाळकृष्ण मिश्र यांचेकडून घरमालक श्री. मेहरोत्रा वकील यांनी औषध आणले. स्वतः वकील साहेबांनी स्वामींना विनंती करून औषध दिले तेव्हां ते त्यांनी घेतले. चि. मधुकर भावे यास स्वामींच्याजवळ ठेवले. सर्वांनी वेळा बांधून घेतल्या. स्वामींच्याजवळ सतत ४।५ साधक राहू लागले. आज जांबवंतसिंह स्वामींच्याजवळ सतत होते. त्यांचे चित्त गोंधळून गेले होते.

जांबवंतसिंहांच्या चित्ताची तळमळ वाढत होती. त्यांचे अंतर्मन भावी भीषण व्यथेच्या दाहाने करपत होते. कुशंकांचे धूलिधूसर दर्प बुद्धीला झाकाळत होते. आज त्यांच्या अंतर्बाह्य शरीरावर केवळ मनाचा प्रभाव होता. आणि त्यांच्या मनात सर्वत्र स्वामींची प्रतिमा होती. जांबवंतसिंहांच्या डोळ्यासमोर स्वामींची विविध रूपे साकार होत होती. गुरुपौर्णिमेच्या दिवशी गुरुपूजन करताना स्वामींची ती तेजःपुंज मूर्ती कृपादृष्टीने

न्याहाळत आहे हे चित्र डोळ्यापुढे उभे राहताच जांबवंतसिंहाने आपल्या नेत्रातील गंगाजलाने त्यांना मनसोक्त स्नान घातले. रिक्षाच्या मागे पळत जाताना स्वामींचे 'दूर हटो' शब्द कानावर पडताहेत तरी आपण मागे मागे जात आहोत. शेवटी स्वामी रिक्षातून उतरल्यावर बसून राहिले आहेत आणि आपण पोहचताच हसून म्हणाले "तू यहाँतक आया! मुझे पीठपर घर पहुँचा दो।" या स्मृतिचित्राच्या दर्शनाने जांबवंतसिंहाला आज कासावीस करून सोडले. अशा एक ना दोन शेंकडो स्मृतिचित्रांतील त्यांच्या चित्तातील बेचैनी शिगेला पोहचली.

आता स्वामींची सेवा अंतरणार ही असह्य कल्पना त्रिशुळाच्या स्वरूपाने हृदयाला स्मृतिरूप वेदनांनी रक्तबंबाळ करीत होती. कल्पनांची त्रिशूळफेक आणि आठवणींच्या भयंकर वेदना या कल्लोळात जांबवंतसिंहांना काहीही सुचत नव्हते. आज दिवसभर त्यांना भूक लागली नाही की तहान लागली नाही, आज दिवसभर ते काहीही बोलतच नव्हते. शरीर यंत्राप्रमाणे काही काही हालचाल करीत होते. त्यांचेही शरीर मनाच्या विकलतेमुळे गळून गेले होते.

स्वामींनी आपल्या अंतरंगाची बैठक, त्या चांदण्या रात्री, आपल्या एकट्याला सांगितली तो सारा प्रसंग जांबवंतसिंहाच्या डोळ्यापुढे उभा राहिला. खरे म्हणजे त्या रात्रीपासूनच जांबवंतसिंह स्वामींच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाच्या जाणीवेने एकदम गंभीर झाले. आयुष्यभर पाहिलेले स्वामी आणि त्या रात्री समजलेले स्वामी यात जमीन अस्मानाचे अंतर होते. अनंत जन्मांच्या पुण्याईने सुद्धा ज्या महापुरुषांचे दर्शन घडणे दुर्लभ असते त्या महापुरुषांचा प्रदीर्घ सहवास घडला याचे एकमेव कारण जांबवंतसिंहांचे सद्‌गुरु श्रीगुरुमहाराज यांची अपरिमित कृपाच होय. त्या सद्‌गुरुंच्या परम कृपेच्या वर्षावाने जांबवंतसिंहांची कृतज्ञताही गुदमरून कासावीस झाली होती. स्वामींच्याबद्दल तर ते निःशब्द झाले होते.

अशा मनःस्थितीत असताना स्वामींनी जांबवंतसिंहजी आणि लक्ष्मणशास्त्री वैद्यजी यांना एकांतात बोलावले. कागद पेन्सिल घेण्यास सांगितले आणि देहयात्रा संपल्यानंतरचा कार्यक्रम आखून दिला. कालच स्वामींनी हे सांगावे आणि आज प्रकृती जास्त बिघडावी हा योगायोग की योजना याचे उत्तर इतरांना कळणे कठीण असले तरी जांबवंतसिंहांच्या मनाला अचूक सापडले होते. काही प्रश्न असे

असतात की ज्यांची उत्तरें समजली तरी बोलून दाखविता येत नाहीत. त्यातले हे उत्तर होते.

मनाला जे बोलून दाखवता येत नाही ते दाबून ठेवणेही जड असते. ते मनाचे कढत कढ नेत्रातून पाझरू लागतात. आज दिवसभर मधून मधून एक-सारखे जांबवंतसिंहांचे डोळे भरून येत होते. त्यांना असे सारखे वाटत होते की आपल्याला स्वामींची काहीच सेवा करता आली नाही. आपल्याला स्वामी समजले त्यावरून तरी हे स्पष्ट झाले की आपण स्वामींची खरी सेवा करूच शकलो नाही. जन्मभर काशीत राहून जीवमात्रांना पावन करणाऱ्या गंगेची साधी पूजा हातून घडू नये तसे झाले. केवढी अवहेलना आपले हातून झाली. स्वामी! आपली जीवन गंगा काशीत आल्यापासून, नित्य दृष्टीसमोर होती तरी आपली सेवा जमली नाही. सारे आयुष्य मोकळे होते तेव्हा हातून घडले नाही आणि आता निर्धाराने सेवा करावी म्हणून मनात विचार आला तर दुर्दैव पुढे उभे राहिले.

गंगेच्या पाण्याचा एक थेंबही पोटात गेला तरी जीव उद्धरून जातो असे गंगेचे माहात्म्य आहे. तसेच सद्‌गुरुंच्या कृपेचा एक कटाक्षही अत्यंत पापी जीवालाही उद्धरून नेण्यास समर्थ आहे. असे आहे हे समजत असून काहीही सेवा झाली नाही ही जाणीव जीव नकोसा करते. अज्ञानाने वासना विकारांच्या फंदात पडलो आणि अमृताची उपेक्षा केली. स्वामी! आपण ज्या भूमिकेने जीवन जगलात ते पाहूनही मला माझ्यात परिवर्तन करता आले नाही याची मला लाज वाटते. मला आपले नित्य दर्शन घेणे जमले नाही. आपले स्मरण सतत घडले नाही. गुरुमाऊली तू तुझ्या शिष्यरूपी पुत्रांचे कल्याणच करणार आहेस म्हणून का मी कृतघ्नपणा करावा? आई! तू मला मांडीवर घेऊन दूध पाजताना मी तुला लाथा मारल्या तरी तू माझा राग केला नाहीस हे तुझ्या मोठेपणाला शोभते पण मुलगा म्हणून मी कसा वागलो याचे स्मरण असह्य होते! माझ्या या कृतघ्नतेला पाहून स्वामी! ही गंगामाता तरी मला पोटात घेईल का? स्वामी! आपण माझ्यावर पर्वताएवढे प्रेम केले आणि मला धूलिकणाएवढीही भक्ति जमू नये! केवढा भयंकर पापी मी आहे!

कोटी कोटी जन्म घेऊन ज्या ऋषिमुनींनी तुझी अखंड उपासना केली. त्यांच्याकडे वळूनही न पहाता आपण केवळ माझ्या सद्‌गुरुंच्या शब्दाने माझ्यावर अमृताचा पाऊस पाडलात! माझ्या अज्ञानाचा कळस हा आहे की आपण सांगूनही

मला समजत नाही. आपण पदोपदी मला धडे दिले पण माझ्या हातून ते अद्यापही वळत नाहीत. अशाही स्थितीत आपण मला संभाळून घेऊन सुधारण्याचा प्रयत्न करीतच आहात! पण आता यापुढे ही अवकाशाची पोकळी कशाने भरून निघेल? हे करुणासागरा! मी अज्ञानी व असमर्थ असल्याने माझ्याकडून पदोपदी दोष व अपराध होत आहेत. स्वामी! मी त्याला काय करू? माझा काही उपायच चालत नाही. मी आपल्या समोर काहीही झाकून ठेवीत नाही. अगदी स्पष्ट सांगतो की मी खरोखर दोषांची राशी आहे. माझ्या दोषांना गणितच नाही. पृथ्वीचे रज:कण किंवा पावसाचे थेंब जेवढे असतील तेवढे किंबहुना त्याहूनही अधिकच माझे दोष आहेत. म्हणून स्वामी महाराज आपल्याला आता एवढीच प्रार्थना आहे की मी सर्व पाप्यांमध्ये मुख्य आहे व आपण तर कृपा करणाऱ्यांमध्ये श्रेष्ठ आहात. माझ्याहून दया करण्यास योग्य असा दुसरा कोणीही आपणाला मिळणार नाही म्हणून माझ्यावर दया करावी. भूक लागलेली मुले कशीही असली तरी ती अखेर आपल्या आईचेच स्मरण करणार. तरी माझ्या दोषांकडे दुर्लक्ष करून दया करावी.

स्वामी! मला भक्ति काय आहे ते समजत नाही. तुमच्या पूजेची पद्धती मला माहीत नाही. कधी साधूंची संगती केली नाही. वृद्धांची सेवा केली नाही. शास्त्राज्ञा पाळली नाही. धर्म जाणूनही तो पाळला नाही. अधर्म जाणून त्यापासून दूर राहिलो नाही. अशा स्थितीत आपणच आपले ब्रीद राखावे व माझ्यावर कृपा ठेवावी. स्वामी! मी कुपुत्र असलो तरी आपण आई आहात येवढाच मला आधार आहे!

पण आता ही आई फार दिवस दिसणार नाही. तिने पुढच्या यात्रेचे प्रस्थान ठेवले आहे. या यात्रेत ती आपल्याला नेणार नाही. एकटी जाणार आहे. आपल्याला एकटे टाकून जाणार आहे! अशा प्रकारे जांबवंतांच्या चित्तावर अनंत लहरी एकसारख्या उठत होत्या! लहरींचा जोर वाढला की त्या डोळ्यातून बाहेर पडत होत्या. असा सारा दिवस आणि रात्र त्यांच्या चित्ताचे तरंग उठत होते!

## स्वामी श्रीलोकनाथतीर्थ चिन्मयानंदातविलीन झाले!

काल रात्रीपासून वेदनांमधील चित्तवृत्ती स्वामींनी नि:स्तब्ध केल्या. दुर्बलतेने आणि शारीरिक विकलतेने होणारी स्वामींची हालचाल भावी घटनेची जाणीव देऊ



पू. स्वामींचे अखेरचे वास्तव्य ज्या घाटावर होते तो–" गायघाट " श्रीक्षेत्र काशी



हा सिंदिया घाट ! येथे स्वामींची देहतुलसी–शिवनामाच्या गजरात–गंगार्पण झाली ! !



काशीतील स्वामींच्या वास्तव्याचा–राणामहल घाट !



काशी ' दशाश्वमेध घाट '–येथे स्वामींनी  निवास केला होता !

लागली. त्या स्थूल देहाकडे पाहून स्थूल दृष्टीला ते दृश्य असह्य होत होते. यामुळे स्वामींच्या खोलीत असलेली व येणारी जाणारी व्यक्ति गंभीर होत होती. एकामुळे दुसरी गंभीर होत होती. स्वामींचा चेहरा मात्र अत्यंत प्रफुल्लित होत चालला होता. विकल होत चाललेल्या गात्रांमधील प्राण शिरोभागात एकत्र होऊ लागले होते. स्वामींच्या प्रसन्न मुद्रेमुळे प्रत्येकाचा आशावाद दुणावला होता.

प्रकृतीमध्ये ज्वर खोकल्याचे प्रमाण कमी झाले पण अमांश कृमींचे प्रमाण वाढले. मंगळवार दिनांक आठ फेब्रुवारी रोजी स्वामींनी मोठ्या कष्टाने अटळ हालचाली केल्या. सकाळ, दुपार व रात्र या तीनही वेळेस अंथरुणावर तक्क्याला टेकून दोन दोन तास बसले. सोऽहं चा स्वरोच्चारित जपही थोडा थोडा वेळ केला. डोळे मिटून सिद्धासनात बसून राहिले. व शरीर थकल्यावर पुन्हा अंथरुणावर आडवे झाले. स्वामींनी पाच तारखेपासून अन्न वर्ज्य केले होते. त्यामुळे ताप कमी झाला. खोकलाही कमी झाला. बद्धकोष्ठतेची व्याधी कायमची असल्यामुळे अमांश कृमींनी पोटातील अस्वस्थता वाढविली होती. आज मंगळवारी डॉक्टर बाळकृष्ण मिश्र यांना स्वामींच्याकडे आणले. औषध दिले. शौच झाल्यामुळे जरा बरे वाटले. स्वामी गंगाजल प्राशन करून राहिले होते. अन्नाचा कणही घेण्याची इच्छा नव्हती व त्यांनी अन्न घेतलेही नाही.

इकडे श्रीगुरुमहाराजांना स्वामींची प्रकृती ठीक नसल्याची पत्रे आली. माझी येण्याची आवश्यकता आहे का म्हणून त्यांनी पत्रातून प्रो. अकूत व श्री. जांबवंतसिंह यांना विचारले. स्वामींच्या प्रकृतीला आराम पडावा म्हणून श्रीगुरुमहाराजांनी श्रीगुरुचरित्र सप्ताहाचे पारायण स्वतः सुरू केल्याचे काशीच्या पत्रातून कळविले. ते वाचून तेथील साधक मंडळींना मानसिक धीर आला. श्री. विश्वनाथराव झारखंडी या बनारसच्या साधकाने तेथील सर्व हकीगत वारंवार पत्रातून कळविली होती. दि. आठच्या पत्रात त्यांनी श्रीगुरुमहाराजांना लिहिले की "आपण सुरू केलेला श्रीगुरुचरित्र सप्ताह गुरुवारी संपेल त्यानंतर पत्र पाहून इकडे येण्याचे करावे." मंगळवारी आठ तारखेस लिहिलेल्या पत्रात घाई नव्हती. अस्वस्थता नव्हती. श्रीगुरुमहाराजांनी दि. ४ फेब्रुवारी शुक्रवारी सप्ताह पारायणास सुरुवात केली होती. १० फेब्रुवारी, गुरुवारी ते संपणार होते. पण इकडे आठ तारखेलाच मंगळवारी रात्री स्वामींची प्रकृती फारच बिघडली. जांबवंतसिंहांनी पुण्याला श्रीगुरुमहाराजांना तार केली "Swamiji's Condition

Hopeless" ही तार रात्रीच श्रीगुरुमहाराजांना मिळाली. त्यात येण्याचा उल्लेख नव्हता. पारायणही चालू होते. बुधवार आणि गुरुवार हे दोनच दिवस पारायण समाप्तीसाठी राहिले होते. मंगळवारची रात्र उलटली. बुधवारी सकाळी श्रीगुरुमहाराजांना प्रो. अकूत यांची दुसरी तार तशीच आली. स्वामींच्या प्रकृतीने गंभीरपणा घेतला आहे. उद्या पारायण लवकर समाप्त करून काशीला निघावे म्हणून श्रीगुरुमहाराजांनी मनाशी ठरविले. त्यांचा दिवस चिंतेत गेला. मन उदास झाले होते. अशुभ शंका मनात येत होत्या.

बुधवारी ९ फेब्रुवारीस स्वामींना स्वतःला काहीच हालचाल करण्याचा त्राण उरला नव्हता. क्षीण आवाजात गंगाजल मागितले. मुखमार्जन करण्यास सांगितले. स्नान घालण्यास सांगितले. बिछाना साफ करण्यास सांगितले. भस्मलेपन केले. संध्येसाठी आचमन घेतले. कसेतरी बसूनच अर्घ्यदान केले व तीनदा सोऽहं म्हणून झोपविण्यास सांगितले. मग मात्र ते शांत पडून राहिले. साधकांना स्वामींच्या प्रकृतीची माहिती समजली. एक एक जण येऊन, दर्शन घेऊन, थोडा वेळ थांबून, जाऊ लागला. अशा स्थितीत दुपार गेली सायंकाळ गेली. रात्री क्षीण आवाजात स्वामींनी विचारले "वामन आया ?" नाही सांगितले. असे ३।४ वेळा झाले. मग मात्र त्यांनी हा प्रश्न केला नाही.

रात्रीच्या वेळी स्वामींच्याजवळ श्री. जांबवंतसिंह, लक्ष्मणशास्त्री वैद्यजी, विश्वनाथ झारखंडी, प्रो. अकूत, मधू भावे, इ. ५।७ शिष्यमंडळी थांबली. घरमालक मेहरोत्रा वकील मधून मधून येऊन पाहून जात होते. रात्री ११॥ वाजता स्वामींनी उठवून बसविण्यास सांगितले. प्रो. अकूतांनी "स्वामी त्रास होईल" म्हणून आर्जवून सांगितले. स्वामींनी त्यांचेकडे असे पाहिले की मलाही समजते. पण आता वेळ संपत आली आहे. स्वामींनी जांबवंतसिंहाला पुन्हा मानेने खुणवून उठवून बसविण्यास सांगितले. मग २।३ जणांनी स्वामींना उठवून बसविले. सिद्धासनाप्रमाणे मांड्या वळविल्या. हात गुडघ्यावर ठेवले. मागे तक्या ठेवला. स्वामींनी पुन्हा गंगाजल मागितले. भस्म लावण्यास सांगितले. रुद्राक्षमाळा गळ्यात नव्हती. काढून ठेवली होती. ती घालण्यास सांगितले. या सर्व मूक सूचना होत्या. क्षीण आवाजात एक एक शब्द होता. सर्वांना बाहेर जाण्यास सांगितले. दार लोटून घेण्यास सांगितले. त्यावेळी पुन्हा स्वामींनी विचारले "वामन आया ?" पुन्हा नाही सांगितले.

स्वामींचे निग्रही जीवन डोळ्यासमोर असल्याने त्यांच्या शब्दाबाहेर कोणीच नव्हते. कदाचित् स्वामींना काही उपाय, प्रयोग करावयाचा असेल म्हणून सांगितले असेल या कल्पनेने बाहेर आले. रात्री बाराची वेळ होती. आतून "ॐ" प्रणवाचा उच्चार ऐकू आला. सर्वांना बरे वाटले. दुसऱ्यांदा प्रणवाचा उच्चार ऐकू आला पण तो पहिल्यापेक्षा क्षीण होता. तिसऱ्यांदा प्रणवाचा केलेला उच्चार बाहेर ऐकू आला नाही. येथेच स्वामी चिन्मय स्वरूपात विलीन झाले. पण अजून कोणालाही कळले नव्हते.

आर्धा तास झाला आवाज नाही. काही नाही. रात्रीचा एक वाजला. प्रो. आकूतांनी दाराच्या फटीतून पाहिले. स्वामींची मान उजव्या खांद्यावर लुळी होऊन पडलेली दिसली. त्यांनी जांबवंतांना हाक मारली. त्या हाकेतच सर्वांना धक्का बसला. दार उघडून आत गेले. तेथे स्वामी शांत झालेले दिसले. चैतन्य चक्रवर्तींचे शरीर चैतन्यशून्य झाले होते.

जांबवंतसिंहांना दुखा:चा जो हुंदका आला की त्या हुंदक्याच्या आवेशात त्यांनी स्वामींच्या देहाला कडकडून मिठी मारली ! आता पुन्हा स्वामींचे दर्शन नाही, स्पर्श नाही, शब्द कानावर पडणार नाहीत, या असह्य वस्तुस्थितीने त्यांनी स्वामींच्या गळ्यात हात घातले. त्यांच्या खांद्यावर आपली मान टाकली. आई गेलेल्या पोराप्रमाणे ओक्साबोक्शी रडू लागले. "स्वामीजी ! स्वामीजी ! यह क्या किया आपने ? अब मैं क्या करू ? कहाँ जाऊ ? मेरे गुरुमहाराज होकर भी मुझे आपकाही सहवास बहुत हुआ। स्वामीजी ! आवो फिर आवो ! ! आपकी इच्छा हो तो आप आ सकते हैं। आपकी इच्छा न हो तो हमारी इच्छाके लिये लौटो। दर्शन दो। मुझे फिर एक बार "ए मूर्ख ! कहो ! स्वामीजी आवो"

जांबवंतसिंहांचे दु:ख अनावर झालेले पाहून लक्ष्मणशास्त्रींनी त्यांना धरले. स्वामींना पुन्हा नीट बसविले. त्यांची मान सरळ केली. बाकीच्यांनाही आपले दु:ख आवरत नव्हते. मध्यरात्र असल्याने कोणी बाहेर पडले नाही. रात्रीची धावाधाव नको. आता उपाय संपले होते. व्यवस्था शिल्लक राहिली होती. ती व्यवस्था उद्या सकाळी करता येईल. म्हणून ही मंडळी तेथेच थांबली. अनेक आठवणींनी उरलेली रात्र सर्वांनी स्वामींच्यासमोर काढली. एका महापुरुषाचे महानिर्वाण श्रेष्ठ अवस्थेत झालेले या भाग्यवान मंडळींना पाहण्यास मिळाले. प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामी महाराज आपल्या इच्छेप्रमाणे श्रीकाशीक्षेत्रात चिन्मय आनंद अवस्थेत लीन झाले. त्यांच्या पार्थिव देहाला सर्व वस्तुजाताने कोटी कोटी प्रणाम केले.

## चिदानंदरुपः शिवोऽहं शिवोऽहम्

९ फेब्रु. १९५५, माघ वा। ३, बुधवारी, मध्यरात्री प. प. श्रीलोकनाथ-तीर्थ स्वामी महाराज शिवस्वरुपामध्ये विलीन झाले ही वार्ता गुरुवार पहाटेपासून पसरू लागली. अकल्पित वार्ता कानावर पडताच प्रत्येकाला धक्का बसू लागला. श्रीक्षेत्र काशीमध्ये स्वामींचे वास्तव्य भरपूर काळ व अनेक ठिकाणी झाल्यामुळे संपूर्ण काशी क्षेत्रभर ही वार्ता वाऱ्यासारखी पसरली. "स्वामी गेले ?" या प्रश्नांकित मुद्रेने हे साधक, श्री. कन्हैयालाल मेहेरोत्रा वकील साहेबांच्या घरासमोर आले. दारातच २।४ जणांचे दुःखी चेहरे पाहून आलेल्यांची खात्री झाली. स्वामींच्या पार्थिव देहाच्या दर्शनास ही मंडळी माडीवर जाऊन आली.

आता चांगलेच उजाडले होते. पूर्व क्षितिजावर आलेल्या रविराजाने या महान तपोनिष्ठाच्या पवित्र देहाचे आपल्या दूतांच्या समवेत प्रथम दर्शन घेतले. आज त्याच्याही तेजावर धूलिधूसर भस्माची छटा आली होती. स्वामींच्या दर्शनास आता गर्दी वाढणार त्यासाठी स्वामींना तळमजल्यावरील मोठ्या सभागृहात नेऊन ठेवण्याचे ठरले. त्या सभागृहात त्यांच्या बैठकीची व्यवस्था केली. आता अनेक निकटवर्ती साधक स्वामींच्या सेवेची अंतिम संधी म्हणून मोठ्या भावभक्तीने आले होते. सभागृहातील स्वामींची बैठक छोटे व्यासपीठ करून मांडण्यात आली होती. मग जांबवंतसिंहजी पुढे झाले आणि स्वामींना आपल्या पाठीवर घेतले. त्यावेळी त्यांना पुन्हा दुःखाचा आवेग आला. आपण स्वामींना असेच पाठीवर घेऊन त्यांच्या आश्रमात पोहचविले होते तो प्रसंग अन्तःकरणापुढे उभा राहिला. पण आजचा प्रसंग फार विचित्र होता. गत कालातील स्मृतींनी जांबवंतसिंहांचे दुःख पुनः पुनः तीव्र होत होते व ते विवेकाने ते दुःख आवरण्याचा प्रयत्न करीत होते. कधी विवेकाचा विजय होत होता तर कधी दुःखाच्या जोराने विवेकाला हार खावी लागत होती.

स्वामींना तळमजल्यावरील सभागृहातील व्यासपीठावरील आसनावर आणून बसविले. पुन्हा त्यांची मांडी घातली. हात नीट ठेवले. छाटी घालून त्यावर रुद्राक्ष-माळा घातली. भस्मलेपन केले. आता दर्शनास येणाऱ्या साधकांनी आणलेली पुष्पमाला स्वामींच्या गळ्यात रहात होती. पुढे ठेवलेला श्रीफलाचा प्रसाद तसाच पुढे रहात होता. ज्याचा कधी संग्रह केला नाही ती दक्षिणाही तशीच पुढे पडून रहात होती. त्यांच्या जवळ २ / ४ निकटवर्ती साधक गंभीर मुद्रेने उभे होते. येणाऱ्या साधकाची भाव-

भक्ती पाहून पाहणाऱ्याला पुन्हा भक्तिप्रेमाचा उमाळा येत होता. असा हा स्वामींच्या दर्शनाचा कार्यक्रम चालू झाला. तेव्हा जांबवंतसिंहजी पुढील व्यवस्थेसाठी बाहेर गेले.

लक्ष्मणशास्त्री वैद्यजी, प्रो. आकूतजी, भृगुनाथसिंहजी, विश्वनाथ झारखंडी, ऋषिपाठक, माधवराव बोकील, मधु भावे, शिवसिंहजी, बंशीधरजी, पं. गौरीकांत ओझा, घरमालक कन्हैयालाल महेरोत्रा इत्यादि अनेक स्वामीभक्त एकत्र आले. लक्ष्मणशास्त्रींनी 'तो' कागद आणला. स्वामींनी तीन दिवसापूर्वी दिलेल्या सूचनांचा तो कागद सर्वांना वाचून दाखविला. सर्वजण आश्चर्याने एकमेकांकडे पाहू लागले. काशीत अनेक संन्यासी आणि महापुरुष यांनी आपला देह ठेवला परंतु स्वामी श्रीलोकनाथतीर्थमहाराजांचे मोठेपण अपूर्व असल्याचे सर्वांना जाणवत होते. सारे काशीचे रहिवासी होते. या सूचनांनी सर्वांच्या श्रद्धा उंचावल्या. भक्तीने रोमांचित केले. आणि तात्काल त्या सूचना अंमलात आणण्याच्या दिशेने प्रयत्नास लागले..

हे चालू झाले. पण ठिकठिकाणी निरोप पाठविणे, विशेषतः पुण्याला श्रीगुरुमहाराजांना तार करणे महत्त्वाचे होते. त्याप्रमाणे निरोपाची व्यवस्था करून जांबवंतसिंहजी श्रीगुरुमहाराजांना तार करण्यास गेले. सकाळी प्रथम पुण्यास तार केली. "Swamiji Died 12 O'Clock Night" ही तार पुण्यास लगेच ९॥ वाजता श्रीगुरुमहाराजांना मिळाली. त्यावेळी ते श्रीगुरुचरित्राच्या पारायणाचे वाचन करीत होते. आजच समाप्तीचा दिवस होता. नुकताच शेवटचा अध्याय संपून अवतरणिकेला सुरुवात केली होती. सर्व श्रीगुरुचरित्राचे स्मरण अवतरणिकेतून होत होते. इतक्यात काशीची तार हातात पडली....आणि श्रीगुरुचरित्र संपल्याचे समजले. श्रीगुरुमहाराजांच्या तोंडातून "गुरुदेव दत्त" हे शब्द बाहेर पडले आणि तात्काळ त्यांनी भावनेच्या दरवाजाला विवेकाचे कुलुप लावून टाकले. "आता काशीला जाऊन काहीच उपयोग नाही! देवाची इच्छा!" एवढे वाक्य नानांच्या जवळ उच्चारले. श्रीगुरुचरित्राची अवतरणिका मानसपटावरून सचित्र, सरसर, सरकू लागली. ही अवतरणिका फार मोठी होती.

या श्रीगुरुचरित्राची सुरुवात इ. स. १९२२ मध्ये श्रीनर्मदामातेच्या तीरावर हुशंगाबादेस झाली. ज्याच्या साक्षीने हे गुरुचरित्र सुरू झाले तेच पहिल्या श्रीगुरुचरित्राचे साक्षीदार होते. पहिला श्रीगुरुचरित्र सप्ताह-समाप्ती इ. स. १९१४ मध्ये झाली. त्यावेळीही असेच झाले. श्रीगुरुमहाराजांचे सद्गुरु प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती

स्वामी महाराज नर्मदातीरी श्रीक्षेत्र गरुडेश्वर येथे इ. स. १९१४ मध्ये आषाढ शु० १ ला ब्रह्मलीन झाले, ही बातमी वर्तमान पत्रातून श्रीगुरुमहाराजांना त्यांच्या कुडुत्री गावी समजली. कुठे कोल्हापूर संस्थानातील ते कुडुत्री गाव आणि कुठे गुजराथेत बडोद्या जवळ, नर्मदाकाठी श्रीगरुडेश्वर ! स्वामींच्या अंत्यदर्शनाचा योग तेव्हां नव्हता तसा याही वेळेस नव्हता. पुणे आणि काशी प्रवासात दोन दिवस गेल्यावर वेळेवर कसे पोहचता येणार ? नंतर कशासाठी जायचे ? या मूलभूत प्रश्नांच्या निश्चित नकारात्मक उत्तरापुढे काय उपाय ? श्रीगुरुमहाराजांनी काशीला जाण्याचे टाळले. पण मनाचे तीव्र आवेगाचे चटके पचविण्याचे काम आंतले आत सुरू झाले होते.

काशीची तार आल्याबरोबर त्याच वेळी तार करून कळविले की, "मी येऊन पोहचू शकणार नाही. सर्व काही विधीवत् यथासांग करावे. सोबत स्वामींसाठी खर्च होऊ शकेल म्हणून ही अल्पशी गुरुदक्षिणा पाठवीत आहे. सर्व माहिती सविस्तर कळवावी. स्वामींची अशी बातमी मला ऐकण्याची पाळी येईल ही कल्पना नव्हती. स्वामींचे शेवटी दर्शन घेता आले नाही याचे फार वाईट वाटते. हा आघात सहन करण्यास आपणा सर्वांना मोठ्या धैर्याची गरज आहे. सद्गुरुश्रीस्वामी महाराजांना माझा शिरसाष्टांग नमस्कार !"

काशीमध्ये स्वामींच्या पार्थिव देहाच्या यात्रेची तयारी सुरू झाली. सकाळचे १०/१०॥ वाजले होते. छोटीगैबीत स्वामींची वार्ता गेली पण त्यांचे गुरुदेव प. प. श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थ स्वामीमहाराज महिन्यापूर्वीच काशीबाहेर गेलेले होते. तरी साधकाश्रमातलि गुरुबंधु ही वार्ता समजताच स्वामींच्या दर्शनास व यात्रेस निघून आले. या सर्वांनी स्वामींचे निःस्पृह, तेज पुंज जीवन जवळून पाहिले होते. स्वामींच्यासंबंधी वाटणाऱ्या अत्यंतिक आदर, श्रद्धेमुळे त्यांच्या हृदयात स्वामी गेल्याच्या वार्तेने कालवाकालव करून टाकली.

प्रत्येक येणारा साधक, भक्त, परिचित, स्वामींच्या दर्शनास येताना, उत्तम हार,, नारळ, घेऊन येत होता. आता या दर्शनास आलेल्यांना थोडा वेळ थांबण्यास सांगितले. सकाळचे १०/१०॥ झाले होते. पुढचा कार्यक्रम सुरू व्हावयाचा होता.

आता स्वामींची भव्य मिरवणूक निघणार होती. ज्या देहाने सहस्रावधी मोक्षाचे वाटेकरी केले होते त्या देहाची मिरवणूक होती ही. त्यासाठी मोठी, ऐसपैस,

हात असलेली उत्तम खुर्ची आणली. त्या खुर्चीला केळीचे डौलदार खुंट बांधले. उत्तम हारांनी ती सजविली उत्तम भगव्या वस्त्रांनी ती सुशोभित केली. चौघांच्या खांद्यावर घेण्यास सोईचे व्हावे म्हणून खुर्चीच्या पायांना पालखीचे बांबू बांधले. स्वामींचे नित्याचे आसन घातले. एक मोठे व्याघ्राजीन खुर्चीच्या पाठीपासून पाया-पर्यंत सोडले. नंतर उत्तम विधीज्ञ ब्राह्मणांना बोलावून सर्व ठीक आहे असे पाहून घेतले. माधवराव बोकील या महाराष्ट्रीय ब्राह्मणास पुढे बोलावून घेतले. त्यांचेकडून स्वामींच्या देहावर पंचोपचार पूजा केली. नवी वस्त्रे लेवविली. भस्म, रुद्राक्षमाळा, हार घालण्यात आले आणि "पार्वतीपते हरहर महादेव" या मंत्राच्या गगनभेदी गर्जनेने स्वामींचा देह उचलून पालखीत ठेवला.

भवानीशंकराच्या नामोच्चाराबरोबर वातावरणात दिव्य चैतन्याची अनुभूती आली. स्वामींनी आपल्याला जे दिले आहे ते इतके मोठे आहे की त्याची तुलना अशक्य आहे. अशा महापुरुषाच्या जीवनातील ही पहिली आणि शेवटची मिरवणूक आहे. आता यात आपण दुःख विसरून सहभागी झाले पाहिजे. त्यांच्या पवित्र देहाच्या सान्निध्यात "ॐ नमः शिवाय" मंत्र उच्चारून आपण कृतार्थ झाले पाहिजे. असे वाटून "ॐ नमः शिवाय" "ॐ नमः शिवाय" या मंत्राच्या जपाने मिरवणूक सुरू झाली. अनेकांच्या हातात घंटा होत्या, टोल होते, मधूनच काहीजण शंख फुंकून ॐकाराची दीर्घ ललकारी देत होते. मधून मधून 'पार्वती पते हरहर महादेव' 'शंभो! हरहर महादेव!' या ललकाऱ्या होत होत्या. "परमहंस परिव्राजकाचार्य स्वामी लोकनाथतीर्थ महाराज की जय" "जय जय गुरुमहाराज गुरु। जय जय परब्रह्म सद्गुरु" याप्रमाणेही जयजयकाराने आसमंत निनादत होते. या मिरवणुकीत चारशे साडेचारशे भक्त, साधक व संबंधी होते. काशीतील महत्त्वाच्या रस्त्यावरून 'सिंधिया' घाटावर स्वामींची मिरवणूक मिरवत आणली.

सिंधिया घाटावर स्वामींसाठी 'पत्थरकीनाद' आणून ठेवण्यात आली होती. तीन फूट रुंद, एक फूट उंच आणि सहा फूट लांबीचे दोन दगड आणलेले होते. ते दोनही दगड शरीर व्यवस्थित बसेल असे खोदून कोरून तयार ठेवले होते. ११॥/१२ ची वेळ होती. घाटावर मिरवणूक आल्यावर 'पत्थर की नाद' जवळ स्वामींची पालखी ठेवली. सर्वजण नमस्कार करून थोड्या अंतरावर उभे राहिले. पण सर्वांना स्वामींच्या जवळ उभे करून एक छायाचित्र घेतले. यानंतर त्यांचे छायाचित्र घेणे शक्य नव्हते

म्हणून या छायाचित्राला विशेष महत्त्व होते. नंतर शिष्य, भक्त जरा दूर उभे राहिले. माधवराव बोकील यांचेकडून सर्व क्रिया करविल्या.

आता स्वामींच्या पतितपावन, शुद्ध, ईश्वरीय देहावर षोडशोपचार पूजा सुरू झाली. गंगाजलाला गंगाकिनारी काही कमी नव्हते. पंचामृताने स्वामींच्या देहाला न्हाऊ घातले. पुन्हा शुद्ध गंगोदकाचे स्नान घातले. स्वामींच्यावर रुद्राभिषेक केला. काशीमध्ये रुद्र येणाऱ्या ब्राह्मणांची उणीव नव्हती. गंगाकिनारी शेकडो ब्राह्मणांनी रुद्राचे आवर्तन एका तालात व स्वरात सुरू केले. हे रुद्रावर्तन चालू झाल्यावर जमलेल्या सर्वांनी स्वामींना स्नान घातले. दर्शन घेऊन परत जो तो जरा दूर जाऊन स्वामींच्या अंतिम दर्शनाची प्रतिमा हृदय संपुटात साठवून ठेवू लागला. हात जोडून उभे राहिलेले लोक, रुद्राचे जोरदार आवर्तन, स्वामींचेवर होत असलेला अभिषेक हे सर्व स्वामींच्या अपूर्व पुण्याईची साक्ष देत होते. खरे म्हणजे जमलेल्या साधकांच्या अनंत जन्मांच्या पुण्याईने ते सारे अशा महापुरुषाच्या महानिर्वाणप्रसंगी तेथे उपस्थित राहून त्या अपूर्व समारंभात सहभागी झाले होते.

नंतर पूजेचे सर्व उपचार झाले. भस्मलेपन, अष्टगंध व केशर लेपन, स्वामींना भरपूर अत्तर लावण्यात आले. रुद्राक्षमाळा घालण्यात आल्या. उत्तम पुष्पहार व पुष्पांचे अलंकार घालण्यात आले. त्यांचा दंड मोडून त्याचेजवळ ठेवला. कमंडलू गंगाजल भरून ठेवले. तुलसीचे मोठमोठे हार घालण्यात आले. धूपदीप नैवेद्य समर्पण झाला. सर्वांनी स्वामींची आरती केली. पुन्हा एकदा "शंभो ! हरहर महा-देव ! हरहर महादेव शंभो ! काशीविश्वनाथ गंगे" "स्वामी लोकनाथतीर्थमहाजकी जय" या घनगंभीर गर्जना झाल्या. स्वामींना उचलून त्या 'पत्थर की नाद' नावाने ओळखल्या जाणाऱ्या दगडी पेटीजवळ आणले. त्या दगडाच्या पेटीत त्यांना झोप-विण्यापूर्वी 'कपालक्रिया' करण्यात आली. ही कपालक्रिया म्हणजे त्यांच्या मस्तकावर ब्रह्मरंध्राचे ठिकाणी नारळ जोरात फोडला. त्याबरोबर कवटी फुटली व त्यामधून पांढरा मेंदू बाहेर आला. यामुळे शरीरात राहणारा "धनंजय वायु" शरीराबाहेर पडतो व जीवाचा त्या देहाशी असलेला संबंध सुटतो. त्याप्रमाणे ही कपालक्रिया झाली. स्वामींची इच्छा होती तसे झाले. मग स्वामींना त्यापैकी एका दगडाच्या खोबणीत निजविले. त्यावर शक्य तेवढे हार व नारळ इ. सर्व त्यांचे देहावर ठेवण्यात आले. सर्वांनी अत्यंत गंभीरपणे स्वामींचे अंतिम दर्शन घेतले. आणि दुसरा खोबणीचा दगड त्यावर पालथा घातला. काथ्याच्या भक्कम दोऱ्यांनी ते दोनही दगड घट्ट बांधले.

ती दगडाची पेटी गंगेच्या पाण्याजवळ नेली. मोठी नाव आणली होती त्यामध्ये ही पेटी सर्व साधकांनी काळजीपूर्वक ठेवली. हे फार धोक्याचे असते. या प्रचंड दगडाच्या ओझ्याला नावेत घेणे व मध्यावर जाऊन गंगाप्रवाहात सोडणे फार धोक्याचे असते. नाव उलटण्याची भिती असते. अशावेळी प्राणहानीचीही पाळी येते. पण श्रीकृपेने काहीही धोका निर्माण झाला नाही. त्या मोठ्या नावेत १००/१५० साधक त्या नावेचा समतोल राखण्यासाठी बसले. आणखीही बऱ्याच नावामधून उरलेले साधक बसले. सर्वजण भजन करीत गंगेच्या प्रवाहाच्या मध्यावर गेले. पुन्हा काळजी घेऊन ती दगडाची पेटी श्रीगंगामातेच्या स्वाधीन केली. ती पेटी गंगेत सोडताना पुन्हा "पार्वतीपते हरहर महादेव" ही गर्जना झाली.

आतापर्यंत सर्वांच्या समोर कोणत्या ना कोणत्या रूपात स्वामी स्थूल शरीरात दिसत होते. इतक्यात गंगामातेने हे महान धन आपल्या पोटात घेऊन आपली कूस धन्य केली होती पण त्याच वेळी हजारोंना जग शून्यवत भासू लागले. फार मोठी पोकळी त्यांच्या अंतःकरणात निर्माण झाली. आता मात्र स्वामी आपल्यातून गेल्याची जाणीव प्रखरतेने जाणवू लागली.

स्वामी गेले ! लौकिक अर्थाने गेले एवढाच याचा अर्थ ! स्वामींच्या चेहऱ्या-वरील अंतिम प्रसन्नता अशी विलक्षण होती. असे दिसत होते की ते —

**"चिदानंदरुपः शिवोऽहं शिवोऽहम्"**

हे आचार्यांचे आत्मषटक् म्हणत असावेत.

जमलेल्या सर्व साधकांनी गंगास्नान केले. श्रीगुरुंचे स्वामींचे स्मरण करीत ते आपापल्या घरी गेले. जाताना त्यांच्या मनात येत होते—

**श्रीगुरो तुझी मानवी तनु । हंसरुपिणी सिद्ध आसनू**
**दण्डपात्र काषाय अंबर । अंतरी वसो दे निरंतर ॥**

## प्रचितीची दिव्य ज्योती ! !

स्वामींची जीवनज्योती विश्वात्मक चैतन्यात विलीन होऊन आज तेरा दिवस झाले. आज त्यांच्या जीवनसमाप्ती समारंभाची सांगता होती. सुखदुखाःचे सारे संस्कार समारंभाने करण्याची आपली प्रथा आहे. स्वामींच्या संबंधीचा आजचा

संस्कार समारंभ शेवटचा होता. म्हणून त्यांच्या ताज्या स्मृती, पुन्हा एकवार, साकार व्यक्तीमधून गोळा झाल्या. स्वामींनी दिलेल्या सूचना काही पहिल्या दिवशीच्या होत्या, काही आजच्यासाठी होत्या. त्या दिवशीचा सर्व विधी स्वामींच्या शब्दाप्रमाणे झाला. आता आजही तसेच व्हावे म्हणून सर्व साधक सावध होते.

छोटी गैबीतील सिद्ध योगाश्रमात आजच्या भोजन प्रसादाचे निमंत्रण गेले होते. त्या सर्वांच्या इच्छेप्रमाणे तेथे आश्रमातच ते भोजन प्रसाद घेणार होते. त्याप्रमाणे त्यांची भोजन दक्षिणा व भोजनखर्च दिला. बाकी त्यांचेपैकी जे संन्यासी होते त्यांना ठरलेल्या वस्तू दान केल्या. दानासाठी द्यावयाच्या वस्तूंची खरेदी झाली. लाल रंगाच्या साड्या ५५ व त्यावर उत्तम खण ५५ घेतले. यापैकी ५४ कुमारिकांना व एक देवीला अशी त्यांची विभागणी होती. संन्याशांच्या १४ छाव्या, १४ कमंडलु, १४ दर्भाची आसने खरेदी केली. हा सर्व कार्यक्रम १३ वा व १४ वा या दोन दिवसांत विभागला होता. १३ व्या दिवशी ब्राह्मण व संन्यासी यांचे भोजन होते आणि १४ व्या दिवशी ५४ कुमारिकांचे भोजन होते. पहिला कार्यक्रम मेहेरोत्रा वकीलसाहेबांच्या घरात जेथे स्वामी राहात होते तेथे होणार होता. एका देवीच्या देवळात १४ व्या दिवशीचा दुसरा कार्यक्रम होणार होता. भोजनसाहित्याची तयारी झाली. निरोप देऊन झाले.

स्वामींची राहती जागा आवरली. त्यांच्या सामानाची यादी केली. सर्व सामान घरमालकाच्या जवळ एका बाजूला सुरक्षित ठेवले. स्वामींच्या प्रपंचात काय होते म्हणाल तर एक पोतेभर पत्रे आणि पुस्तके होती आणि दुसऱ्या पोत्यात वळकटी, चार भांडी, दोन मडकी, केरसुणी, याशिवाय या संन्याशाच्या संसारात काही नव्हते. ही पोती या जागेतून हलवली. जागा मोकळी करून घेतली. स्वामींचा फोटो एका चौरंगावर ठेवला. त्यापुढे त्यांच्या खडावा ठेवल्या. त्यांचा एक कमंडलु ठेवला. स्वामींची एक जाड रुद्राक्षांची माळ उरली होती ती त्यांच्याच फोटोला घातली होती.

सकाळची वेळ होती. माधवराव बोकीलांनी स्वामींच्या फोटोची पूजा केली. हार घातला. उदबत्त्या पेटवून ठेवल्या. निरंजन तेवत ठेवले. स्वामींच्या खडावांना श्रीचरणपादुकांना गंधलेपन करून तुलसीपत्रे व पुष्पे अर्पण केली. स्वामींच्या कमंडलूची पण पूजा करून त्यालाही गंधपुष्प वाहिले. स्वामींच्या छायाचित्राने आणि त्यांच्या वस्तूंनी वातावरणात त्यांच्या अस्तित्वाचे चैतन्य जाणवू लागले. येणारा

प्रत्येक साधक समोरची स्वामींची पूजा पाहून गंभीर होत होता. त्या ठिकाणी स्वामी आहेत या जाणीवेने त्यांच्या जवळ जाऊन, फूल, तुलसीपत्र वाहून, साष्टांग नमस्कार करीत होता. स्वामींनी दिलेल्या अनुग्रहाच्या संवेदनांचे स्पंदन अनुभवीत होता. आज दु:खाची जागा गांभीर्याने घेतली होती. विकारावर विकारांचे अधिष्ठान आले होते. अदृश्य झालेले स्वामी प्रत्येकाच्या हृदयमंदिरात जाऊन वसले होते. याची खूण प्रत्येक साधक अनुभवीत होता.

प्रो. अकूत आले, जांबवंतसिंहजी आले, लक्ष्मणशास्त्री वैद्य आले, भृगुनाथ-सिंहजी आले, विश्वनाथ झारखंडी आले, शिवसिंहजी आले, पं. गौरीकान्त ओझा आले, बंशीधरजी आले, घरमालक कन्हैयालाल मेहरोत्रा यांनी आपले सर्व घर आजच्या कार्यक्रमासाठी आवरून मोकळे करून दिले असल्यामुळे सर्व व्यवस्थेला सोयीचे झाले होते. ठरल्या कार्यक्रमात काही उणे दिसत नव्हते. एक एक करता सारे आले. दुपारच्या वेळी धार्मिक विधी शास्त्रानुसार झाला. संन्याशांची पूजा झाली. दाने झाली. ब्राह्मणांना पाचारण केले. पार्वतीपते हरहर महादेव म्हणून भोजनास प्रारंभ झाला. आजच्या भंडाऱ्यात शांतता होती. गांभीर्य होते. यानंतर इतरांनी प्रसाद घेतला. यथासांग १३ वा दिवस पार पडला.

आता १४ व्याची गडबड सुरू झाली. साधक मंडळींनी आपापल्या कुटुंबा-तील स्त्रियांना व मुलींना कुमारींच्या व्यवस्थेसाठी देवीच्या मंदिरात आणले. या कार्यक्रमाला कुमारिकांचे पूजन असल्याने याचे वेगळेपण पहातांना जाणवत होते. । सर्व कुमारिकांची सचैल स्नाने झाली. नूतन लाल वस्त्रे त्यांना परिधान करण्यास दिली. वेण्या घालण्यास दिल्या. कुंकुमतिलक करण्यात आले. देवीला अभिषेकपूर्वक पूजा झाली. देवीला लाल वस्त्र, वेणी, अर्पण करून मूर्तीला लेवविली. साधक मंडळीपैकी प्रमुख प्रमुख ४/६ जण या कार्यक्रमात भाग घेतलेले होते. बाकीचे या अपूर्व दृश्याचे दर्शन घेऊन निघून गेले होते. भोजनाची वेळ झाली. सर्व कुमारिकांना पाटावर बसण्याची विनंती केली.

एका रंगाच्या पातळातील ५४ कुमारिका रांगेने पाटावर बसल्या. हे विलोभ-नीय दृश्य सतत लक्षात राहणारे होते. पानात सर्व पदार्थ वाढले. संकल्प सुटला. पार्वतीपते हरहर महादेवाची गर्जना झाली आणि कुमारिका भोजनास प्रारंभ करू लागल्या. इतक्यात अपूर्व लीला घडली. लक्ष्मणशास्त्री वैद्यजी एकदम चमकले. त्यांनी

जवळ उभे असलेल्या जांबवंतसिंहजींना मूकमनाने पण हात दाबून, डोळ्यांनी खुणवून, एका दृश्याकडे पाहाण्यास सांगितले. ते दृश्य "उस समय देखो" या स्वामींच्या त्या दिवशीच्या शब्दांची प्रचीती देणारे होते.

देवीच्या मूर्तीच्या नेत्रामधून एक ज्योती बाहेर पडली तेव्हांच लक्ष्मणशास्त्रींचे तिकडे लक्ष गेले व ते चमकले. तेथून पुढचे दृश्य जांबवंतसिंहजीनेही पाहिले ती निघालेली ज्योती वातावरणातून तरंगत पहिल्या कुमारिकेच्या नेत्रासमोरून सरकत दुसरीच्या नेत्रासमोर गेली व न थांबता, संथपणे पुढे सरकत चालली. याप्रमाणे ती ज्योती चौपन्न कुमारिकांच्या नेत्रासमोरून जात जात शेवटी परत त्या देवीच्या नेत्रात गेली. हा सारा प्रसंग पहातांना जांबवंतसिंहजी व लक्ष्मणशास्त्रीजी दोघेही हात जोडून उभे होते. त्या पुढे पुढे सरकत जाणाऱ्या दिव्य ज्योतीकडे टक लावून शेवटपर्यंत पहात होते. त्यांचे शरीर रोमांचित तर झाले होतेच पण शक्तिचालन झाल्याचे अनुभवही त्यांना तेवढ्यात आले. स्वामींनी या दिव्य ज्योतीच्या स्वरूपात आज दर्शन दिले होते. एकूण सर्व विधी यथासांग पार पडल्याची ती खूण होती. लक्ष्मणशास्त्रींच्या इच्छेला मान दिला होता याची ती प्रचीती होती. दिलेला शब्द पाळल्याची ती दिव्य अनुभूती होती.

स्वामींच्या या चैतन्यस्वरुप दिव्यज्योतीला सर्वांनी साष्टांग प्रणिपात केले. असा हा स्वामी, श्रीलोकनाथतीर्थ महाराजांच्या चैतन्याच्या चक्रवर्तीपणाची साक्ष देणारा, चेतनामय जीवन चित्रपट चैतन्याच्याच दिव्यत्त्वामध्यें विलीन झाला.

स्वामींच्या या दिव्य चैतन्य शक्तीला अनंत कोटि प्रणाम! दिव्य अक्षय शक्ती स्वरुपात आपण भक्तामध्ये आहोत याची साक्ष देणाऱ्या स्वामी श्रीलोकनाथतीर्थ महाराजांच्या पवित्र चरणांवर साष्टांग नमस्कार.

**अखंडानंद स्वरूपाय चिदानंदात्मरूपिणे**
**चिन्मयानंद स्वरूपाय श्रीलोकनाथाय नमोनमः ॥१॥**
**योगेश चंद्ररूपाय चिन्मयानंदरूपिणे**
**अर्धनारी नटेशाय श्रीलोकनाथाय नमोनमः ॥२॥**
**जय जय गुरुमहाराज गुरु जय जय परब्रह्मसद्गुरु ॥**

## अपूर्व स्पंदन !

श्रीसंतयोगेन्द्र विज्ञानी ऊर्फ परमवंदनीय श्रीयोगानंद श्रीगुरुमहाराज, हे प. प. श्रीस्वामीनारायणतीर्थमहाराज यांचे शिष्य आहेत. म्हणजे हे प. प. श्रीशंकर-पुरुषोत्तमतीर्थस्वामीमहाराज यांचे गुरुबंधू आहेत. श्रीगुरुमहाराजांच्या रौद्रशांती समारोहाचे अध्यक्ष म्हणून पुण्यनगरीस आलेल्या हृषिकेष निवासी, देवासच्या संन्यासाश्रम; 'नारायणकुटी' आश्रमाचे पीठाधीश्वर स्वामी प. प. श्रीविष्णुतीर्थ-महाराज यांचे गुरु हे श्रीसंतयोगानंदमहाराज आहेत. श्रीसंतयोगानंदांनी शक्तिपात योगावर "महायोगविज्ञान" हा विस्तृत ग्रंथ लिहिलेला आहे. असा यांचा अधिकार असून हृषिकेषला "स्वर्गाश्रम" नावाचा यांचा आश्रम इ. स. १९१७ पासून आहे. अशा महान् विभुतींचा आपले चरित्रनायक प. प. श्रीलोकनाथतीर्थस्वामी-महाराजांचा या शक्तिपातयोगाच्या एकच परंपरेमुळे इ. स. १९१७ पासून संबंध येऊन उभयतांचा भरपूर सहवास घडला. स्वामींच्यामुळे श्रीसंतयोगानंदांचा व श्रीगुळवणीमहाराजांही संबंध आला. या उभयतांचा पत्रव्यवहारही भरपूर झाला. त्या पत्रांपैकी स्वामीलोकनाथतीर्थमहाराजांच्या प्रकृती अस्वास्थ्याच्या निमित्ताने व स्वामींच्या निर्वाण निमित्ताने आलेली श्रीसंतयोगेन्द्र विज्ञानी यांची दोन पत्रे अत्यंत उद्बोधक आहेत. ती पुनः पुनः वाचावी अशी मननीयही आहेत. ती मूळ हिंदी भाषेत आहेत तशीच देत आहे.

योगेन्द्रविज्ञानी ॐ तत्सत् विज्ञानभवन

हृषिकेष

१५।१२।५४

सविनय नमस्कार, सहनिवेदनमिदम्।

आपका पत्र मिला। समाचार जाने। श्रीमत् लोकनाथतीर्थ स्वामीजी महाराज का स्वास्थ्य ठीक नहीं है यह जानकर चित्त दुःखित हुआ। हम आपसमें जितने गुरुभाई योगी गुरुके संतान ब्रह्मचारी तथा संन्यासी हैं उन सबमें श्रीलोकनाथतीर्थ स्वामीका जीवन तपोमय है।

जैसे हम कइओंने बहुतसे शिष्य किये और सांसारिक विषयभोग भोगे, एवं लोकप्रवृत्तिमें ही अधिक समय बिताया, परंतु उन्होंने ऐसा नहीं किया। वे सर्वदा

सर्वकाल त्यागही स्वीकारके रहे। उनका जीवन शुद्ध, सात्त्विक, तपोमय हैं। मैं उनको बहुत रोजसे जानता हूँ। एवं श्रद्धा करता हूँ वे बहुतही सरलचित्त साधुपुरुष हैं।

प्रायः देखा जाता है, विशेष करके उत्तरार्ध अवस्था, और वह भी अच्छे धार्मिक, ज्ञानी पुरुषोंको शारीरिक कष्ट होता है। जैसे रामकृष्णपरमहंस, विवेकानंद के गुरुदेवको बडा कष्ट भोगना पडा। अरविंद और रमणमहर्षि जो साधारण व्यवहारमें भी आत्यंतिक सात्त्विक हैं, धर्मभीरू हैं,। ऐसे व्यक्ति संसारी दुःख, अर्थोंमें और शरीरसे रोगी देखे जाते हैं।

योगशास्त्रमें योगसाधना बडा भारी फल लिखा है– शारीरिक सिद्धी। वे तो अति सामान्य बात है। परंतु परमार्थ संकल्प-सिद्धी की बडी बडी बाते लिखी हैं। लोग योगसाधना भी बडे प्रेमसे करते हैं। तथा इसमेंका थोडाबहुत कुछ भी होता हुवा देखनेको नहीं मिलता। यह आश्चर्यकी और अफसोसकी बात है। फिर भी लोग योग-साधन और योग के माहात्म्य को कम नहीं समझते।

अरविंदने एक स्थानमें रहकर चालीस साल योगसाधना की और शरीर को दिव्य बनानेका प्रयत्न किया और इस विषयमें ग्रंथ भी लिखे। परंतु इतना करनेपर भी मरनेके समयका ज्ञान उनको नहीं हुआ उलटा अन्त समयमें कालिकपेन (पोटदुखी) के कारण जो शरीर दिव्य बनाना था उसको छोडही देना पडा। जैसे साधारण बद्ध जीव छोडते हैं।

ऐसेही श्रीरमणमहर्षिने यावज्जीवन तपस्या की और अन्तमें कैन्सर के रोगसे पीडित होकर महाकष्टसे शरीर छोडा। ऐसे ही श्रीरामकृष्ण परमहंसको, जिनको सर्वदा भावसमाधि होती थी, और जो देवीसे बातचित करते थे उन्हें भी अन्तमें कैन्सर हुवा। इत्यादि।

अतएव ये सब घटनाएँ जो की हमारे सामने घटी है और भी वैसी कई घटनाएँ देखी जा रही है उनसे स्पष्ट होता है कि योगशक्ति के नियम अनिवार्य प्रारब्ध गतीको रोक नहीं सकते। आखिर प्रारब्ध "भोगादेवक्षयः" कहकर मौन रखना पडता है।

श्रीमत् शंकर पुरुषोत्तमतीर्थ स्वामीमहाराज का स्वास्थ्य भी ठीक नहीं है। उनको पेटकी बिमारी है, और कई रोग है। यह सब प्रारब्ध भोग हैं।

इति शम्।

विनित
योगेन्द्र विज्ञानी

ॐ

विज्ञानभवन
हृषिकेश
१।३।५५

सविनय नमस्कार, सहनिवेदनमिदम्

आपका पत्र कल मिला। श्रीमत् स्वामी लोकनाथतीर्थ महाराज के ब्रह्मधाम गमन करने के समाचार जानकर चित्त अतीव दुःखित हुआ।

सन १९१९ में मैं काशीमें था तब उनका मुझे समागम हुआ था। वहाँ दो मास तक हम नित्य मिलते थे। बादमें १९२० में वह स्वर्गाश्रम मेरे यहाँ आकर रहे थे। उस समयकी उनके साथकी सब स्मृति ज्यों कि त्यों आ रही हैं।

उनके त्याग और वैराग्य, तपस्या और सरलता, शुद्धता एवं निष्कपट साधुता के विचार में मेरा मन भावना कर रहा है। क्या कहूँ मन बडा दुखी हुआ है। परंतु खुशी इस बातकी है कि उन्होंनें अपने संन्यास आश्रम को यावजीव निष्कलंक निभाकर अन्तमें मुक्ति प्राप्त की।

वह धन्य है! कृतार्थ है!! उनके पूर्वाश्रमका मुझे पता नहीं है।

विनित
योगेंद्र विज्ञानी

# समाधिस्थ स्वामींना संस्कृतात श्रद्धांजली

श्रीः

सोलापूर
१५।२।५५

श्रीचरणेषु सप्रश्रये प्रणामाः सन्तु ।

श्री प. पू. प. प. स्वामिचरणाः परब्रह्मणि विलीना इति वृत्तपत्रात् भारताद-नुवाच्य सहसा सविस्मयं उद्विग्नाः स्मः। अतीते वैशाखे निर्वाणभूमौ वाराणस्यां श्रीचरणानां प्रत्यक्षं दर्शनमभूत् इति अहो भाग्यमस्माकम्। परं हन्त तदन्तिममेव सञ्जातम्।

तत्प्रसन्नं मुखं, सहजामधुरावाणी, सस्मिता कौशल्यापूर्णा भाषाशैली, तद्वैराग्यं, तदपूर्वं तेजः सर्वमपि तत्कथं विस्मृतिपथं उपेयात्। अचिन्त्या खलु सा शक्तिः प्रत्यक्षं परिदृश्यमाना कलौ दीनान् उद्धारयन्ती सांप्रतं उपाधिभूतं शरीरं परित्यज्य नूनं निराकारतां प्राप। तदधीनाः वयं। नियतमनुस्मरन्तः सततं संस्तुवन्तः पुनः पुनः प्रणमामः।

श्रीचरणविधेयः
शङ्करशर्मः मोहळकरः

# स्वामी लोकनाथतीर्थरचित पदे

## (१)

अब तो बिनति हमारी नाथ सुनिये
डूब रहा हूँ भवसागर के बीच ।
काम हमारा कीजिए ॥ धृ ॥

वासना ओघ नीर गंभीर
तृष्णा तरंगतामें खेल रहे ।
होकर नाविक भवसिंधुमें
अब तो दीनको तारिये ॥ १ ॥

आप है हमें नाथ स्मरणमें
छोडकर लोकलाज आपकी शरण ली
**लोकनाथ** को लोकनाथ अब
कृपादृष्टीसे अवलोकिये ॥ २ ॥

## (२)

( पिलु राग )

रघुवीर अब तो राखो मेरी लाज
मुझ सरीख गरीब नहीं । तुम सरीख गरीब नवाज ॥ धृ. ॥

सुग्रीव जब शरण आयो ।
दियो धनदार अरु राज ॥
बिभीषण जब शरण आयो ।
कियो लंकाके अधिराज ॥ ........ ॥ १ ॥

जब जब आपद आयो भक्तनपर ।
तब तब तुम भयो रखवार ॥
अब तो बेर मुझको संभालो ।
गरीब परवर महाराज ॥ ........ ॥ २ ॥

व्याध गीध गनिका तार्यो ।
तार्यो रीछ वानर अपार ॥
**लोकनाथको** अब तो तारो ।
समर्थ अबोध ( रामराज ) ॥ ........ ॥ ३ ॥

**नरेशकुमार**

# स्वामीरचित संस्कृत पद

## (३)

हैमवती भगवती चंडिके, प्रणत पालिके ।
जयतु महेशभामिनी, त्रिताप नाशिनी
भुक्ति मुक्ति दायिनी अंबिके, .... प्रणतपालिके ॥ १ ॥

चंडमुंड विनाशिनी, रक्तबीज विमर्दिनी
असुर सैन्य मार्दिनी, शुंभनिशुंभ घातिके .... प्रणत० ॥ २ ॥

असि चर्म शूल धारिणी, सतांसुख विवर्धिनी
विशुद्ध भक्ति दायिनी, जयतां जननी अंबालिके अंबिके .... प्रणत० ॥ ३ ॥

ब्रह्मादिक रक्षितासि भक्तिभ्यः सदाभयं ददासि
**लोकनाथ** शरणागतम, त्राहीमाम् अंबे, त्र्यंबके .... प्रणत० ॥ ४ ॥

# स्वामी महाराज रचित बंगाली पद

## (४)

शाखे शाखे शिखि डाके थाकि थाकि
काकालि कूकील कलकंठे गाय
ओ तोर अधरे मधुर हासि बड भालो बासि
हासिये हासिये बाजाए ये वेणू.... १

सारा निशि तोर ना हेरी चन्द्रवदन
व्याकूल होई छे मोहेर मन
हेरी वो मोहन मूरती, अंगे पीत द्युति
रक्तिम अधरे पूरित वेणू .... २

लिवा चाचर चिकूर माथाय प्रचूर
शिखिपुच्छ शोभे सुंदर श्यामल तनु
अरुण वरण चरणे नुपुर
बाजे रुणु झुणु रुणु झुणू .... ३

गलि वनमाल नयन विशाल
भुजद्वय सुंदर मनमोहन
वक्षसि शिवत्स कौस्तुभ
कंठे वैजयन्तीमाल शोभे अति भाल
काश्मीर चंदन चर्चित तनु
अनुपम तवरूप हेरि मुदित गोपीगोप
भुवन मोहन सुंदर कानू .... ४

वने वने दावी कत खेला कोरीबी
ओ भाई कौतुक कुशल कानू
लुटाये धराय नारवीय मथाय
**लोकनाथ** तोर चरण रेणू .... ५

## (५)

अनुपम तव रूप हेरिलाम अद्भुत
नीरखी समर माझे
चकित दनुज भूप
असिमुंड वराभय
करे शोभे अद्भुत
पदतले विराजित
महादेव शवरुप

(अपूर्ण प्राप्त)

# श्रीस्वामी लोकनाथतीर्थ दर्शन

कवि :– प. पू. **श्रीस्वामी नारायणदेवतीर्थमहाराज,**
नारायणकुटी, संन्यासाश्रम, देवास, म. प्र.

[ मूळ कवितेतील काही कडवी कवि स्वामींच्या अनुकंपेने सादर करीत आहे. ]

लोकनाथतीर्थ की लौकिक लीला वर्णन करना बड़ा कठिन
म्यान में छिपी हुई तलवारका मोल बताना है मुष्किल ॥

जो समर्थ होकर दरिद्र जैसा जीवन जीता था सानन्द
उस स्वेच्छया कष्ट-सहन प्रेमी की महानता का क्या हो वर्णन ॥

ये माँ भगवती को समर्पित थे, भविष्य की कभी चिन्ता नहीं की
निर्भय निश्चिंत घूमते रहते, कष्ट न अनुभव किया कभी ॥

गुरु और परमगुरु दोनों की इनके ऊपर खूब कृपा थी
शक्तिपुञ्ज थे, शक्ति चेतना इनमें पूर्ण लबालब थी ॥

घर छोडा तबसे फिर कभी घरको याद किया ही नहीं
वंगाल छोडा तो फिर कभी बंगालमें चरण दिया ही नहीं ॥

ऐसा संकल्प सिद्ध जीवन, साधन-शक्तिसे ढक रखा था
शक्तिपूर्ण होकर ही प्रकटे, इन्हें जनताने भी खूब परखा था ॥

ये प्रवास प्रेमी तो सदा से थे, खतरोंमें इन्हें आनंद मिलता
सीधे पहाड चढनेका शौक था, चढाईमें इनका मन खिलता ॥

वीर शिखर विजय करते हैं, कायर नीचे को गिरते
दृश्य जगत को पीठ देकर ये अदृश्यमें सीधेही घुसते ॥

ये शक्तिके आवेशमें सदा बिना तैयारीही चल देते
भूख-प्यास सर्दी-गर्मी की कभी न कोई चिंता करते ॥

अनेक अनुभव थे जीवनके समयपर सभी वस्तु मिल जाती
सदा शक्तिकी गोदमें रहते संकटसे भी वही बचाती ॥

सरल उदार तप-त्यागपूर्ण ऋषितुल्य जीवन है इनका
शक्तिपात सामर्थ्य भी अद्‌भुत शिष्योंमें रहता है चमका ॥

स्वामी लोकनाथकी कृपाकली गुलवणीके रूपमें फूलीफली
महाराष्ट्रका यह सिद्धयोगी है गुरुनिष्ठ और आत्मबली ॥

जितने भी जगके साधक हैं, सब कल्पनाकी परिधिमें आते
और इसीलिये वे कल्पनातीत ब्रह्मतत्त्वको जान नहीं पाते ॥

केवल शक्तिपात विद्या ही कल्पनातीत साधन करवाती
स्वतः सिद्ध साधन की क्रियाको कल्पना पकड नहीं पाती ॥

# श्रीस्वामी लोकनाथतीर्थ महाराजांची आरती

(चाल – जय जय श्रीमत् गुरुवर देवाधि देवा०)

कुंडलिनीमाता, शक्तीपातपथा, घेउनि फिरवी जगती श्रीलोकनाथा ॥
जयदेव जयदेव चिन्मय आनंदा, आरति ओवाळीतो दे आत्मानंदा ॥
जयदेव जयदेव ॥ धृ०॥

गंगाधर नारायण पुरुषोत्तम मूर्ते ।
योगेश चक्रवर्ती श्रीलोकनाथ तीर्थे ।
टिहरी सोडून आणिले दक्षिण देशाते ।
येती रेवातीरी साधन देण्याते ॥ जयदेव जयदेव चिन्मय आनंदा .... ॥१॥

कलियुगी समर्थ साधन दुर्मिळ हे होते ।
केवळ गुरुसंकल्पे शक्ति जागविते ।
शिष्या गुरुत्व देऊनि सुलभचि ते केले ।
चिन्मय आनंदे श्रीलोकनाथतीर्थे ॥ जयदेव जयदेव चिन्मय आनंदा.... ॥२॥

श्रीगुरु स्मरूनि लोचन बंद करा ।
जागृत शक्ति उसळे सोडून आधारा ।
मेरूदंडा घुसळुन गर्जे ॐ कारा ।
श्रीगुरु तोषती ऐशा पाहून शिष्यवरा ॥ जयदेव० .... ॥३॥

साधन शिरोमणी साधन हे दिधले ।
गुरुचरणी नत होता परब्रह्म सापडले ।
यशकीर्ति दुमदुमता विश्व सुगंधित झाले ।
श्रीगुरुस्वामी स्मरता कंप सुरू झाले ॥ जयदेव जयदेव चिन्मय ... ॥४॥

शिवाऽला भेटाया मार्ग खुला केला ।
उर्ध्वगति देऊनि उद्धाराचि केला ।
शक्तिपाते साधक कृतार्थचि झाला ।
जयजय सद्‌गुरु चरणी अच्युत ठेवियला ॥ जयदेव० .... ॥५॥

## स्वामी श्रीलोकनाथांची आरती

( चाल :– आरती ज्ञानराजा, महाकैवल्य तेजा. )

आरती लोकनाथा – स्वामी सद्‌गुरुनाथा – नमितो तुज दत्ता
देई दर्शन आता – आरती लोकनाथा ॥ धृ० ॥

व्यापिली चराचरी, सुप्तशक्ति ती करी, घेऊनि दान करी
तव कृपे संचरी – अनुभव हा आता – स्वामी सद्‌गुरु नाथा
आरती लोकनाथा ॥ १ ॥

दिधली गंगाधरे, नारायणा स्वहाते, कृतार्थ ते होती
उद्धरती जगाते, करूनी शक्तिपाता – स्वामी सद्‌गुरु नाथा
आरती लोकनाथा ॥ २ ॥

देती ती आत्मानंद, होती चिन्मयानंद, स्वामी श्रीलोकनाथ
आम्हा करीती कृतार्थ, काय वानु तुज आता – स्वामी सद्‌गुरु नाथा
आरती लोकनाथा ॥ ३ ॥

सद्‌गुरु महाराजा, महाकैवल्य तेजा, घेऊनी तुझी ध्वजा
विश्व दावी स्वतेजा, योगिराज समर्था, स्वामी सद्‌गुरु नाथा
आरती लोकनाथा ॥ ४ ॥

प्रवाह गंगेपरी, भिक्षा लघुत्वाची घेई, गुरुत्वाचे दान करी
दासा धरी अंतरी, अच्युता लोकनाथा, स्वामी सद्‌गुरु नाथा
आरती लोकनाथा ॥ ५ ॥

॥ इति ॥

देहलीके परमगुरुभक्त तथा अपने ज्येष्ठ अभ्यासक्त साधक बंधू श्रीमान् हरदत्त शर्मासे प्राप्त श्रीगुरुपरम्पराके "श्लोकत्रयम्" —

श्रीगङ्गाधरतीर्थमीश सदृशं नारायणं माधवं
तीर्थं शङ्कर पुरुषोत्तममहं साक्षाच्छिवं केशवम् ॥
सिद्धानां शरणं, परात्परतरं श्रीलोकनाथं हरं
दत्तात्रेय भवं त्रिदेववपुषं वन्दे गुरुं वामनम् ॥
जन्मजन्मान्तरात्सुप्ता कुण्डली ब्रह्मरुपिणी
स्पर्शेन बोधिता येन तस्मै श्रीगुरवेनमः ॥

## शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध शब्द | शुद्ध शब्द |
|---|---|---|---|
| १ | ४ | शुब्दबुद्धीने | शुद्धबुद्धीने |
| ४ | ९ | शत्र | शत्रू |
| ८ | २१ | इ, स. १९७१ | इ. स. १९५१ |
| ९ | २० | यांना त्यांनी | यांनी |
| ४१ | १३ | विश्वसूत्रकाराच्या | विश्वसूत्रधाराच्या |
| ४३ | २ | विटनिया | विनटिया |
| ५७ | २५ | निष्यक्रमाने | नित्यक्रमाने |
| ८६ | ७ | अभिमानाची | अभिनयाची |
| ९४ | २२ | योगविभूतीकडूनच | या विभूतीकडूनच |
| १६१ | ४ | आखिला | आथिला |
| १९८ | २२ | अंतदर्शन | अंतर्दर्शन |
| २५१ | २ | जीवनकृतार्थकत्री | जीवनकृतार्थकर्त्री |

# स्वामींचे भारत भ्रमण



# ॥ कुण्डलिनीयोग ॥

ले. अरुणोदय न. जानी
नियामक, प्राच्यविद्यामन्दिर व अध्यक्ष, संस्कृत विभाग,
म. स. विश्वविद्यालय, बडोदे

विद्युद्विलासवपुषः श्रियमावहन्तीं
यान्तीं स्ववासभवनाच्छिवराजधानीम् ।
सौषुम्णमार्गकमलानि विकासयन्तीं
देवीं भजामि परमामृतसिक्तगात्रीम् ॥

श्री परमकृपाळू परमात्म्याने जीवात्म्यास जो हा मनुष्यावतार दिला ती ह्या परमेशाची परमकृपा समजावयास हवी. ८४००००० योनींतून भटकणाऱ्या ह्या जीवात्म्यास त्याच्या काही पूर्वसुकृतोदयाने हा मनुष्यदेह प्राप्त होतो. तर मग ह्या मनुष्यदेहाची सार्थकता केव्हा होते ? जेव्हा हा मनुष्य त्याला प्राप्त झालेल्या ह्या नरदेहाचा उपयोग चौऱ्यांशी लक्ष योनींच्या भ्रमन्तीरूपी भवसागरातून तरून जाण्यासाठी करेल तेव्हाच त्याचा हा नरदेह सार्थक झाला असे म्हणता येईल.

श्रीमद्भागवतात श्रीभगवान ह्या संबंधात सांगतात—

नृदेहमाद्यं सुलभं सुदुर्लभं
प्लवं सुकल्पं गुरुकर्णधारम् ।
मयाऽनुकूलेन नभस्वतेरितं
पुमान् भवाब्धिं न तरेत् स आत्महा ॥
(श्रीमद्भागवत ११-२०-१७)

ह्या श्लोकात संसारास सागराचे रूपक दिले आहे. मानवदेहास सज्ज केलेली नौका कल्पिलेले आहे. गुरूस ह्या नौकेचे सुकाणू संभाळणारा कप्तान किंवा कर्णधार म्हटलेले आहे. भगवान स्वतःस ह्या नौकेस चांगल्या प्रकारे नेणारा वारा म्हणून सांगतात. अशा प्रकारे सर्व साधनांनी सज्ज, निष्णात कप्तान किंवा कर्णधार आणि अनुकूल वारा वगैरेंनी युक्त अशी नौका प्राप्त होऊनही जो मनुष्य हा संसाररूपी सागर तरून जात नाही तो खरोखरी आत्मघातकीच समजला पाहिजे.

ह्या आत्महत्यारूपी परमपातकातून मुक्त होण्यासाठी प्रयत्न करणे दरेक व्यक्तीचे आद्य व प्रधान कर्तव्य आहे.

आपल्या शास्त्रकारांनी हा भवसागर पार करून जाण्यासाठी मानवप्राण्यास अनेक मार्ग दाखविलेले आहेत. त्यापैकी मुख्य तीन आहेत.

१) ज्ञानमार्ग, २) भक्तिमार्ग व ३) कर्ममार्ग अथवा उपासनामार्ग.

हे मार्ग जीवात्म्याचे परमात्म्याबरोबर मीलन करवून देणारे असल्याने त्यांना युज = जोडणे ह्या धातूपासून झालेल्या 'योग' ह्या शब्दाने पण संबोधिले जातात. त्यामुळे ह्या मार्गांना ज्ञानयोग, भक्तियोग व कर्मयोग ह्या नावांनी पण ओळखतात. कर्मयोग अथवा उपासना मार्गांत विकास झाल्यावर त्यात अनेक प्रकारचे इतर मार्ग किंवा योग अस्तित्वात आले. उदा० मन्त्रयोग, लययोग, राजयोग, हठयोग वगैरे.

ह्यापैकी हठयोग – कुण्डलिनीयोग, सहजयोग, सिद्धयोग, गुरुकृपायोग, अनुग्रहयोग वगैरे नावांनी पण ओळखला जातो.

## कुण्डलिनीयोगाची प्राचीनता

कुण्डलिनीयोग अत्यन्त प्राचीन आहे. वैदिक काळातील ऋषिमुनींना ह्या योगाचे दर्शन झाले होते अशा प्रकारचे आधार पण वेदवाङ्मयातून आपल्याला मिळतात.

सर्वप्रथम अथर्ववेदाच्या दहाव्या काण्डाच्या दुसऱ्या सुक्तातील एकतिसाव्या मन्त्रात शरीरास अष्टचक्र व नवद्वारयुक्त अशी नगरी म्हणून संबोधिले आहे.

## मन्त्र

अष्टाचक्रा नवद्वारा देवानां पूरयोध्या ।

तस्यां हिरण्ययः कोशः स्वर्गो ज्योतिषावृतः ॥

— अथर्व. १०. २. ३१.

अशारीतीने शरीरचक्राचा सर्वप्रथम उल्लेख अथर्ववेदात आपणांस उपलब्ध होतो.

आरण्यक ग्रंथात तर कुण्डलिनीचे वर्णन स्पष्ट शब्दांत आपणांस पहावयास मिळते. ते असे —

तस्य मध्ये महानग्निर्विश्वार्चिर्विश्वतोमुखः ।
सोऽग्रभुग्विभजन्तिष्ठन्नाहारमजरः कविः ॥
संतापयति स्वं देहमापादतलमस्तकम् ।
तस्य मध्ये वन्हिशिखा अणीयोर्ध्वा व्यवस्थिता ॥
नीलतोयदमध्यस्था विद्युल्लेखेव भास्वरा ।
नीवारशूकवत्तन्वी पीता भास्वत्यणूपमा ॥
तस्याः शिखाया मध्ये परमात्मा व्यवस्थितः ।
स ब्रह्मा स शिवः सेन्द्रः सोऽक्षरः परमः स्वराट् ॥

तैत्तिरीयारण्यकम् १०–११–९–१२

श्वेताश्वतरोपनिषदासारख्या प्राचीन उपनिषदांमध्ये आणि योगकुण्डलि, ध्यानबिन्दुसारख्या उत्तरकालीन उपनिषदांत; शैव–शाक्त–वैष्णव तन्त्रांमध्ये; शार्ङ्गधरपद्धतिसारख्या आयुर्वेदीय ग्रंथांमध्ये; देवीभागवत, कालिकापुराणांसारख्या पुराणांमध्ये; योगवासिष्ट, षट्चक्रनिरूपण, हठयोगप्रदीपिका, आणि गोरक्षनाथांची सिद्धसाधनपद्धतीसारख्या योगमार्गांच्या ग्रंथामध्ये; गौडपादाचार्य रचित सुभगोदयस्तोत्र, श्रीशंकराचार्य विरचित सौन्दर्यलहरी तथा ललिता सहस्रनाम (ब्रह्माण्डपुराणान्तर्गत) सारख्या स्तोत्रग्रंथांमध्ये ह्या कुण्डलिनीयोगाचे विशद प्रतिपादन करण्यात आलेले आहे.

संस्कृतभाषेव्यतिरिक्त गुजराथी, मराठी, हिन्दी इत्यादी प्रान्तीय भाषेतून लिहिलेल्या धार्मिक आणि सन्तसाहित्यातूनही ह्या कुण्डलिनी योगाचे वर्णन आपल्या दृष्टोत्पत्तीस येते. त्यापैकी ज्ञानेश्वरमहाराजांची ज्ञानेश्वरी व गोरखवाणी वगैरे ग्रंथ येथे विशेष उल्लेखनीय होत. जिज्ञासूंनी ते मूळग्रंथच पहाणे योग्य होईल. कारण स्थळसंकोचास्तव विशेष विचार करणे येथे शक्य होणार नाही.

## कुंण्डलिनीयोग म्हणजे काय ?

पिण्डब्रह्माण्डन्यायाने यद् ब्रह्माण्डे तत् पिण्डे जे ब्रह्माण्डी ते पिण्डी ( = नरदेह ). अशारीतीने मानवाचे वैयक्तिक शरीर हे परमात्म्याच्या विराट् शरीराची एक लहानशी प्रतिकृति आहे. विराट किंवा हिरण्य गर्भाचा देह समष्टिदेह = Macrocosm आणि मानवव्यक्तिचा व्यष्टिदेह = Microcosm म्हणून ओळखला जातो. निराळ्या रीतीने सांगावयाचे म्हटल्यास परब्रह्माची जी चितिशक्ति आहे ती समस्तब्रह्माण्डात व्यापून राहिलेली आहे. ( चितिरूपेण या कृत्स्नमेतद् व्याप्य स्थिता जगत् — दुर्गा सप्तशती प. ३६ )

तीच चितिशक्ति चैतन्यरूपाने प्राणिमात्रांच्या शरीरांत पण सूक्ष्मरूपाने व्यापून राहिलेली आहे.

( या देवी सर्वभूतेषु चेतनेत्यभिधीयते । दुर्गासप्तशती ५.१५ )

समग्रमानवदेहांचे ठिकाणी सूक्ष्मरूपाने व्यापून राहिलेली जी ही चिती, चेतना किंवा चैतन्य नावाची शक्ती आहे तिलाच कुण्डलिनी शक्ती असे म्हणतात.

मनुष्यदेहाचा मुख्य आधारस्तंभ पाठीचा कणा असल्याने संस्कृतात त्यास मेरुदण्ड किंवा पृष्ठवंश असे म्हणतात. त्याचा वरील भाग मानेपासून सुरू होऊन खालचा भाग गुदद्वारापर्यंत आलेला आहे. लिङ्गमूळ आणि गुदद्वार यांमध्ये आलेल्या पाठीच्या कण्याच्या अणकुचीदार टोकास कंद असे संबोधण्यात येते. त्याचा आकार जवळजवळ शिवलिङ्गासारखाच असतो. ह्या शिवलिङ्गास साडेतीन वेटोळे घातलेली अशी एक अत्यंत सूक्ष्म चिबूडाच्या वेलीच्या पातळ तंतू सारखी नाडी आहे. तिचे मुख ह्या कंदाच्या टोकावर असल्याने कंद झाकलेला राहतो. ही नाडी कंदास साडेतीन वेटोळे घालून गोलाकार वेढलेली असल्याने तिला कुण्डलिनी असे नामाभिधान आहे आणि तिची सर्पिणीप्रमाणे कल्पना करण्यात आलेली आहे.

कित्येक विद्वान मोठ्या आतड्याच्या ठिकाणी कुण्डलिनीचे स्थान दाखवितात. तर कित्येक तिला शरीराच्या खालच्या भागात असलेल्या Vena cava नावाची नस ( नाडी ) असे मानतात. कित्येक ती DNA ( Deoxyribonucleic acid ) आहे असे म्हणतात.

डॉ. वी. जी. रेलेनी आपल्या The Mysterious Kundalini नामक ग्रंथात तिला Vagus नावाची नाडी स्वीकारलेली आहे. आधुनिक शरीरशास्त्र ( Physiology ) आणि Anatomy शास्त्राप्रमाणे ही Vagus नाडी फार महत्त्वाची आहे. ती निरनिराळ्या नाड्यांद्वारा डोळे, कान वगैरे इन्द्रियांचे नियमन आणि संचलनाचे अगत्याचे कार्य करीत असल्याने डॉ. रेले तिलाच कुण्डलिनी शक्ती असे म्हणतात. परंतु ऑर्थर एवेलोन ( अथवा जॉन वुडरोफ ) नावाच्या सुप्रसिद्ध युरोपियन तान्त्रिक विद्वानाने आपल्या The Serpent Power नामक ग्रंथात डॉ. रेले यांच्या मताचे खंडन करताना अगदी बरोबर असे विधान केले आहे की, ‘ कुण्डलिनी ही विराट शक्ती आहे. त्यामुळे माझ्या मते तिची कोणत्याही विकारां-( product ) शी अभिन्नता मानता येणार नाही. माझ्या मते कुण्डलिनी ही शक्तीचे स्थूल रूप आहे. मी तिला स्थूल म्हणण्याचे कारण असे की, परमेश्वराच्या आनंद वगैरे अनेक शक्ती आहेत. त्यामुळे माझ्या मते ती एखादी नाडी किंवा शारीरिक अवयव किंवा मानसिक शक्ती नसून ती त्या सर्वांचे एक मूलभूत तत्त्व आहे. प्रस्तावना. ‘ कुण्डलिनी खरोखर देहात असलेली विश्वशक्ति ( Cosmic Energy ) आहे. आणि ती सर्वांची कारणरूप आहे. ’ ( पृ. ८ )

ह्या कुण्डलिनीस शास्त्रकारांनी बिसतन्तुतनीयसी ( कमलतन्तूप्रमाणे बारीक किंवा सूक्ष्म ) आणि विद्युल्लतेप्रमाणे लखलखणारी व अत्यंत वेगयुक्त अशी वर्णिलेली आहे.

मानवी देहात सर्व मिळून एकंदर ७२००० नाड्या आहेत. ह्या नाड्यांद्वारा शरीरास रक्त व प्राणवायु प्राप्त होत असतो. ह्या नाड्या अत्यंत सूक्ष्म असतात आणि त्या एकमेकींबरोबर कोळ्याच्या जाळ्याच्या तन्तुंप्रमाणे गुंतलेल्या असतात. ह्या सर्व मेरुदण्डाच्या ठिकाणी राहिलेल्या असून तेथून त्या शरीराच्या वेगवेगळ्या भागांत पसरलेल्या असतात. त्यामुळे ह्यांची आपल्याला Electric Network बरोबर तुलना करता येईल. ह्या नाड्यांपैकी इडा, पिंगला व सुषुम्णा ह्या तीन मुख्य नाड्या आहेत. इडा मेरुदण्डाच्या डाव्या बाजूस व पिंगला उजव्या बाजूस

| चक्राचे नाव | स्थान | दल-संख्या | वर्ण | लोक | बीजाक्षर | तत्त्व | तत्त्वबीज | तत्त्वरंग | तत्त्वगुण | वाहन | अधिष्ठाता देव | अधिष्ठात्री योगिनी | यंत्राचा आकार | कर्मे-न्द्रिय | ज्ञानेन्द्रिय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मूलाधार | सीवनी | ४ | रक्त | भूः | वं, शं, षं, सं | पृथ्वी | लं | पीस | गन्ध | ऐरावत | ब्रह्मा किंवा गणेश | डाकिनी | चतुष्कोण | गुदा | नासिका |
| स्वाधि-ष्ठान | ऊपस्थ मूल | ६ | सिंदूर | भुवः | बं, भं, मं, यं, रं, लं | जल | वं | शुभ्र | रस | मकर | विष्णु | राकिनी | बीज चन्द्राकार | लिंग | जिह्वा |
| मणिपूर | नाभि | १० | नील | स्वः | डं, ढं, णं, तं, थं, दं, धं, नं, पं, फं | तेजस (अग्नि) | रं | रक्त | रूप | मेष | रुद्र ( वृद्ध ) | लाकिनी | त्रिकोण | पाद | चक्षु |
| अनाहत | हृदय | १२ | अरुण | महः | कं,खं,गं,घं, ङं, चं, छं, जं, झं, ञं, टं, ठं | वायु | यं | धूम्र | स्पर्श | मृग | रुद्र (ईशान) | काकिनी | षट्कोण | हस्त | त्वचा |
| विशुद्ध | कंठ | १६ | धूम्र | जनः | अं, आं, इं, ईं, उं, ऊं, ऋं,ॠं,लृं, ॡं,एं,ऐं,ओं औं,अं,अः | आकाश | हं | नील | शब्द | हस्ती | रुद्र (पंचवस्त्र) | शाकिनी | वर्तुल | वाक् | कर्ण |

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आज्ञाचक्र | भ्रूमध्य | २ | श्वेत | तपः | हं, क्षं | महत् | ॐ | — | संकल्प | नाद | शिव | हाकिनी | लिंग | — | — |
| सहस्रदल | मूर्धा | १००० | — | सत्यम् | अँपासून क्षँ पर्यंत | — | विसर्ग | — | — | बिंदु | परब्रह्म | महाशक्ति | वर्तुल | — | — |

असून ती सर्पाप्रमाणे वक्रगतीयुक्त अशी एकमेकींना भेटत भेटत मेरुदण्डाच्या टोकापर्यंत जाते. मेरुदण्डाच्या ठिकाणी असलेल्या एकंदर ३३ मणक्यांच्या आतील भागात एक सूक्ष्म छिद्र असून त्या सूक्ष्म छिद्रातून फुलातील दोऱ्याप्रमाणे सुषुम्णा नाडी पसार झालेली असते. ह्या सुषुम्णा नाडीचा खालील भाग सर्पाकार कुण्डलिनीच्या मुखाने झाकलेला राहत असतो. त्यामुळे शरीरातील प्राणाची गती त्या नाडीद्वारा न होता मात्र इडा आणि पिंगलाद्वाराच होते.

शरीरात पसरलेल्या ७२००० नाड्यांचे पुंज मेरूदण्डाच्या वेगवेगळ्या सहा स्थानांवर एकत्र येऊन मिळतात. त्या त्या दरेक स्थानाला 'चक्र' अशी संज्ञा देण्यात आलेली आहे. कारण त्या त्या ठिकाणी ह्या नाड्यांचे एक चक्र किंवा Circle किंवा पुञ्ज एकत्र गोठवलेल्या स्थितीत असतो. ह्या चक्रांचे स्थान मेरुदण्डावर निश्चितपणे दाखविणे शक्य नसल्याने मेरुदण्डाच्या समोर असणाऱ्या शरीरातील त्या त्या भागाद्वारे त्याचे स्थान दर्शविण्यात येते. अशारीतीने कुण्डलिच्या खालील टोकापासून ह्या चक्राची सुरुवात होत असल्याने त्याला मूलाधार चक्र असे म्हणतात. लिङ्गाच्या मुळाच्या अगदी समोरच्या भागात मेरुदण्डावर स्वाधिष्ठानचक्र आलेले आहे. नाभीच्या समोरच्या भागात असलेल्या चक्राला मणिपूरचक्र, हृदयाच्या समोरच्या बाजूला असलेल्या चक्राला अनाहतचक्र, कण्ठाचा समोरच्या भागात असलेल्या चक्राला विशुद्धिचक्र, भ्रूमध्यासमोरच्या भागात असलेल्या चक्राला आज्ञाचक्र असे संबोधण्यात येते.

ह्या सहा चक्रांशिवाय मस्तकाच्या वरील बाजूला देखील एका मोठ्या चक्राची कल्पना करण्यात येते. त्याचे नाव सहस्त्रार किंवा सहस्त्रदलचक्र असे ठेवण्यात आलेले आहे.

मेरुदण्डावर असलेल्या सहा चक्रांमध्ये देखील तीन स्थानांना विशेष महत्त्व देण्यात येते. त्यांना ग्रंथी असे म्हणतात. मूलाधाराच्या ठिकाणी असलेल्या नाड्यांच्या चक्राकार पुंजास ब्रह्मग्रंथी असे म्हणतात. मणिपूराजवळच्याला विष्णुग्रंथी व अज्ञाचक्राजवळच्या पुंजास रूद्रग्रंथी असे नाव देण्यात येते. ह्या तीन ग्रंथी अनुक्रमे रजस्, सत्त्व आणि तमोगुणांची केंद्रे आहेत.

चक्रांचे विस्तृत वर्णन करणाऱ्या षट्चक्रनिरूपणासारख्या ग्रंथात ह्या प्रत्येक चक्राचे स्थान, दल (पाकळी) ची संख्या, वर्ण, लोक, बीजाक्षरे, तत्त्व, तत्त्वबीज, तत्त्वाचा रंग, तत्त्वाचा गुण, वाहन, अधिष्ठात्री देवता, अधिष्ठात्री योगिनी, यन्त्र, कर्मेन्द्रिय आणि ज्ञानेन्द्रिय वगैरे दर्शविण्यात आलेले आहे. स्थलसंकोचास्तव त्यांचे स्वतंत्र वर्णन न देता इतरत्र कोष्टकात ते नमूद केलेले आहे.

(कोष्टक ६–७ पानांवर दिले आहे)

# कुण्डलिनीची जागृती आणि उत्थान

गुरुकृपेमुळे किंवा ईश्वरकृपेमुळे मेरुदण्डाच्या टोकाशी असलेली कुण्डलिनी शक्ती जेव्हा जागृत होते तेव्हा ती सर्पिणी स्वतःचे मुख वर करून साडेतीन वेटोळे उकलून किंवा काढून सुषुम्णेच्या खालील छिद्रात प्रवेश करते आणि एकामागून एक ग्रंथी व चक्राला भेदून अगदी वरील टोकास जाऊन तेथे सहस्रारचक्रात प्रवेश करून परब्रह्म किंवा परमशिवाला भेटते. ह्या मीलनाच्या प्रतीकरूपाने सहस्रार चक्रात दोन पादुकांची कल्पना करण्यात येते. शिवशक्तीच्या ह्या मीलनामुळे ब्रह्मरंध्रातून अमृताचा स्राव होऊ लागतो. अमृताच्या ह्या स्रावाने योग्याचे शरीर दिव्य होते. हा स्राव झाल्यानंतर कुण्डलिनी सहस्रारचक्रापासून स्वतःच्या मूळस्थानी परतून पहिल्याप्रमाणे सुप्त होते.

कुण्डलिनीची ऊर्ध्व गती आणि परत फिरण्याच्या ह्या प्रक्रियेचे चार टप्पे आहेत. त्यांना चार भूमिका म्हणतात ( १ ) षट्चक्रभेदनरूपा – सहा चक्रांना भेदून ऊर्ध्व जाणे ( २ ) परमशिवसंयोगरूपा – सहस्रारचक्रात परमशिवाशी मीलन होणे. ( ३ ) पुनरावृत्तिरूपा – सहस्रारचक्रापासून परत फिरणे आणि ( ४ ) स्वस्थानावस्थानरूपा – स्वतःचे स्थान मूलाधारात मिळून जाणे. ह्या चार भूमिका ( १ ) उन्नय (=वर जाणे ) ( २ ) लय (=मीलन ) (३) प्रत्थावृत्ती ( =परतणे ) आणि ( ४ ) विश्रांती ( =परत सुप्त होणे ) अशा संक्षिप्त संज्ञानी देखील ओळखण्यात येतात.

जगद्गुरू श्री शंकराचार्य महाराजांनी सौन्दर्यलहरींत दोन श्लोकांत ह्या चारी भूमिकांचे सुन्दर वर्णन केले आहे.

महीं मूलाधारे, कमपि मणिपूरे हुतवहं
स्थितं स्वाधिष्ठाने, हृदि मरुतमाकाशमुपरि ।
मनोऽपि भ्रूमध्ये सकलमपि भित्त्वा कुलपथं
सहस्रारे पद्मे सह रहसि पत्या विहरसि ॥

– सौन्दर्य...९

हे भवानी ! मूलाधारात पृथ्वीतत्त्वाचे, मणिपुरात जलतत्त्वाचे, स्वाधिष्ठानात अग्नितत्त्वाचे, ( सौंदर्यलहरींत स्वाधिष्ठान आणि मणिपूर ह्या दोन चक्रांचा क्रम बदलण्यात आला आहे. स्थलसंकोचास्तव त्या कारणांची मीमांसा येथे केली नाही.)

हृदयात वायुतत्त्वाचे, कण्ठात आकाशतत्त्वाचे, आज्ञाचक्रात मनस्तत्त्वाचे भेदन करतेस. अशारीतीने संपूर्ण कुलपथा ( सुषुम्णेचा मार्ग ) चे भेदन करून सहस्रार-चक्रात जाऊन तेथे तुझा पती परमशिव त्याच्याशी एकांतात तू रममाण होतेस.

अशारीतीने ह्या श्लोकांत प्रथम दोन भूमिकांचे आरोहक्रमाने वर्णन करून शेवटच्या दोन भूमिकांचे वर्णन आचार्य अवरोहक्रमाने पुढीलप्रमाणे करतात—

सुधाधारासारैश्चरणयुगलान्तर्विगलितै :
प्रपञ्चं सिञ्चन्ती पुनरपि रसाम्नायमहसा ।
अवाप्य स्वां भूमिं भुजगनिभमध्युष्टवलयं
स्वमात्मानं कृत्वा स्वपिषि कुलकुण्डे कुहरिणि ॥
— सौन्दर्य...१०

गुहेत रहाणाऱ्या हे कुण्डलिनी ! चरणकमलातून स्रवणाऱ्या अमृताच्या धारांनी शरीरास सिक्त किंवा सेचन करून तू स्वतःच्या मूलस्थानी परत येऊन स्वतःचे साडेतीन सर्पाकार वेटोळे करून कुलकुण्डा ( = मूलाधार ) मध्ये येऊन सुप्त होतेस.

प्रस्तुत लेखाच्या प्रारंभी असलेल्या मङ्गलश्लोकात देखील ह्या प्रक्रियेचे काव्यात्मक वर्णन आहे. कुण्डलिनीच्या प्रवासाला नायिकेच्या अभिसाराप्रमाणे वर्णन करीत असता कवी म्हणतो, विद्युल्लतेच्या लखलखाटाप्रमाणे शोभा धारण करणाऱ्या ( मूलाधाररूपी ) स्वतःच्या वासभवनातून शिवाच्या ( सहस्राररूपी ) राजधानीकडे अभिसार करणारी; सुषुम्णेच्या मार्गांत असलेल्या कमळांना विकसित करणारी आणि परम ( श्रेष्ठ ) अमृताने शरीराचे सिंचन करणाऱ्या देवीचे मी भजन करतो.

वर सांगितल्याप्रमाणे कुण्डलिनीद्वारा चक्रभेदन झाल्याने साधकाला निरनिराळ्या सिद्धी प्राप्त होतात. सिद्धिसोपान नावाच्या ग्रंथात त्याचे वर्णन खालीलप्रमाणे मिळते.

कुण्डलिन्या महीभेदे योगी त्यजति मेदिनीम् ।
सलिलस्थानयोगेन जले चरति योगवित् ॥
वन्हिभेदे जलमिव स्पृशत्यग्निं ज्वलच्छिखम् ।
मरुद्भेदे शीघ्रगतिर्याति क्रोशशतं क्षणात् ॥

व्योमभेदे खेचरति मनोभेदे मनोगतिः ।
यत्र कामयते तत्र याति लोकमयेऽपि च ॥
संयोजयन शिवपदे शिव एव प्रजायते ।
कर्ता हर्ता च सर्वत्र सुरासुरनमस्कृतः ॥

कुण्डलिनीद्वारा पृथ्वीतत्त्वा ( मूलाधारचक्र ) चा भेद होतो तेव्हा योगी पृथ्वीवरून अधांतरी उडू शकतो. जलतत्त्वा ( स्वाधिष्ठानचक्र ) चा भेद होताच पाण्यावरून चालू शकतो. अग्नी ( मणिपूरचक्र ) चा भेद होताच प्रज्वलित असणाऱ्या अग्नीला पाण्याप्रमाणे स्पर्श करू शकतो. वायु ( अनाहतचक्र ) चा भेद होताच एका क्षणात शंभर मैलांइतके जाण्याची शीघ्रगती प्राप्त होते. ( प. प. श्री वासुदेवानंदसरस्वती महाराजांच्या जीवनातील अनेक प्रसंगांतल्या सिद्धी दृष्टिगोचर होतात. ) व्योम ( विशुद्धचक्र ) चा भेद होताच योगी आकाशात गमन करू शकतो. आणि मन ( आज्ञाचक्र ) चा भेद होताच योगी मनाची गती प्राप्त करतो आणि तिन्ही लोकांत इच्छेनुसार हवे तिथे जाऊ शकतो. ( नारद वगैरे योग्यांमध्ये ही सिद्धी दिसून येते.) किंवा कामचारी होतो. जेव्हा योगी सहस्रारचक्रामध्ये शिवाबरोबर कुंण्डलिनीबरोबर असतो तेव्हा तो साक्षात् शिवरूप होऊन कर्ता हर्ता होतो आणि देवदानवांकडून नमस्कृत होतो.

## कुण्डलिनी जागृतीचे मार्ग

मानवदेहात सुषुप्तरीतीने राहिलेल्या कुण्डलिनी नावाच्या ह्या दैवी शक्तीस अनेक प्रकारे जागृत करता येते. हठयोगीलोक आसन, प्राणायाम वगैरे क्रियांद्वारा तिला जागृत करतात. लययोगाचे योगी प्रणवोपासनेद्वारा, मन्त्रयोगाचे योगी मन्त्रशक्तीद्वारा किंवा सोऽहंच्या जपद्वारा, तसेच भक्तियोगाचे अनुयायी भगवन्ताच्या स्मरणरूपी भक्तियोगद्वारा कुण्डलिनीला जागृत करतात. परंतु हे सर्व मार्ग श्रमसाध्य आहेत. जेव्हा योग्य गुरूद्वारा मिळणाऱ्या शक्तिपातदीक्षेद्वारे कुण्डलिनी सहजगत्या अगदी सुलभरीतीने जागृत करता येते म्हणून ह्या योगाला सहजयोग, सिद्धयोग, अनुग्रहयोग किंवा गुरुकृपायोग म्हणतात. ह्या योगात शक्तिसंपन्न गुरुच्याद्वारा शिष्याच्या ठिकाणी स्पर्शद्वारा, दृष्टिद्वारा, मन्त्रद्वारा किंवा संकल्पद्वारा स्वतःची शक्ती संक्रमण होते आणि ह्याला शक्तिपात असे म्हणतात. ह्या शक्तिपात प्रक्रियेद्वारा गुरू स्वतःची शक्ती शिष्याचे ठिकाणी संक्रांत करतात. ज्यामुळे शिष्याचा लवकर विकास होऊ शकतो.

परमशिवद्वारा परंपरेने प्राप्त झालेल्या शक्तिपाताचार्यांच्या शिष्यपरंपरेत श्री नारायणतीर्थमहाराज, श्री शंकर पुरुषोत्तमतीर्थमहाराज, श्री लोकनाथतीर्थस्वामी द्वारा प. पू योगीराज श्री गुळवणीमहाराज आणि सांप्रतचे तत्स्थानापन्न पं. दत्तात्रेय धुंडीराज कवीश्वरमहाराज विद्यमान आहेत.

आपले गुरू पू. गुळवणीमहाराजांचे गुरू श्री लोकनाथतीर्थ महाराजांचे पावन आणि साधारभूत चरित्र आमचे ज्येष्ठ गुरुबन्धु अच्युत सि. पोटभरे ह्यांनी बरेच परिश्रमपूर्वक तयार केले आहे त्याबद्दल त्यांना अनेक धन्यवाद.

प्रस्तुत चरित्रामध्ये कुण्डलिनीयोगाबद्दल प्रस्तुत लेख लिहिण्यासाठी प. पू. विद्यावाचस्पति श्री. द. धुं. कवीश्वर ह्यांनी ( दत्तामहाराजांनी ) आज्ञा करून सेवा करण्याची आणि गुरुऋण फेडण्याची संधी दिली त्याबद्दल त्यांचे अंतःकरणपूर्वक आभार.

प्रस्तुत लेखाचे भाषांतर करण्याबद्दल माझे मित्र पुरुषोत्तम हरि जोशी ( संशोधनाधिकारी, प्राच्यविद्यामन्दिर ) चा मी आभारी आहे.

माहेश्वरादधिगतः सुपरम्परां यः ।
श्रीशंकराख्यपुरुषोत्तमतीर्थ शिष्यः ।
भूयात् कृपार्द्रहृदयोमयि दीननाथः
सोऽयं हि वामनगुरुर्गुरुलोकनाथः ॥

• • •

* * *

**अखंडानंद स्वरूपाय निजानंदात्मरूपिणे**
**चिन्मयानन्द स्वरूपाय श्री लोकनाथाय नमो नमः ॥**

* * *

पूर्ण प्रतापी महात्मा !



"जेव्हा जेव्हा मज स्मराल । तेव्हा तेव्हा मज पहाल ।
सुख तंद्रीत डोलाल । आण माझी सांगतो ॥ "

— स्वामी श्रीलोकनाथतीर्थ

स्वामी मृत्युचा विचार कसा करतात हे त्यांच्याच शब्दात –

नारायण श्रीक्षेत्रकाशी
ता. ९-३-५४

कल्याण भाजन चि. नारायण यशवंत टेकणे
को नारायण स्मरणसूचक आशीर्वाद विशेष
समाचार. तुम्हारा मनिऑर्डर ३० तीस
रुपया मुझे मिला. मेरे लिये वृथा-
चिन्ता नहीं करना. मेरी प्रकृति अब
सुधारेगी नहीं. मृत्य न म्हणे ऋषेश्वर.
मृत्य न म्हणे योगेश्वर. मृत्य न म्हणे हरि-
हर. मृत्य न म्हणे हा अवतार भगवंताचे.
जो शरीर धारण किया उसको एकदिन
वह शरीर छोडना ही पडेगा. वृथा चिन्ता
करनेसे मृत्य छोड नहीं देवेगा.
अवश्यं भावी भावके लिये बुद्धिमान चिंता
नहीं करता है. सब परीचित मण्डलीको
नारायण स्मरण सूचक आशीर्वाद कहना.
नारायण तुम्हारा कुशल करें इति. शिवम्.

आशीर्वादक
स्वामी लोकनाथतीर्थ

स्वामींना मृत्युची चाहुल आली । भराभर पत्रे लिहिली ।
मृत्युंजया परी ती भासली । शिष्य जमले काशीत ॥

श्रीगुरुदेवदत्त

# प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामी महाराज चरित्र अवतरणिका

ॐकार रूप होय व्यक्त। श्रीगुरुदेव दत्त। श्रीवासुदेव लोकनाथ। महाराज गुरु वंदितो ॥ १ ॥ गणेश ब्रह्मा विष्णु शिव। लक्ष्मी सरस्वती कालीमाय। गंगाधर नारायण देव। आत्मानंदा वंदितो ॥ २ ॥ विष्णुतीर्थ शिवोम्तीर्थ। प्रेरणा तयांची समर्थ। भक्त सकल कृतार्थ। कृतज्ञतेने वंदितो ॥ ३ ॥ गुरुपीठ परंपरा अपार। चतुराननासम थोर। करितो सर्वांचा जयजयकार। ब्रह्मांड भेद करोनी ॥ ४ ॥ आता अवतरणिका पाहू। हृदयसंपुटी जपून ठेऊ। जेव्हा जेव्हा ती स्मरू। आत्मचैतन्या खुलवील ॥ ५ ॥ कालीमाता ढाकेश्वरी। चक्रवर्तीकुल सर्वेश्वरी। जगदोद्धारा कृपा करी। सुपुत्र योगेश देऊनी ॥ ६ ॥ ढाकेश्वरीचे हे पुजारी। निवास तिचिये मंदिरीं। योगेश रमे तिचे द्वारी। बाळलीला करीत ॥ ७ ॥ योगेश सदा आत्मरत। बसे कालीचे रूप बघत। हृदयसंपुटी असे साठवित। व्यापक शक्ति अंतरी ॥ ८ ॥ पितृछत्र लवकर मिटले। म्हणोनी शिक्षण थांबले। आपत्तीचे चटके बसले। योगेश झाला मोकळा ॥ ९ ॥ घर सोडून पडला बाहेर। आत्मानंद गुरु शंकर। सापडला अतिसत्वर। कालीकृपा म्हणोनी ॥ १० ॥ गुरु शिष्य दोघे निघाले। विनौटिया गावी आले। नारायण परमगुरूस वंदिले। ज्ञानसाधन मठामाजी ॥ ११ ॥ एक सद्‌गुरु भेटता। परब्रह्म येई हाता। येथ दोघेही दिसू लागता। योगेश नाचू लागला ॥ १२ ॥ गुरुदृष्टिचा दंशु जाहला। क्रियाशक्तिचा वेग वाढला। साधनेत अति जोर झाला। झंजावात महाप्रबल ॥ १३ ॥ शक्ति सोडी मूलाधारा। साधका फिरवी गरगरा। खाली वर येरझारा। घालू लागली ती माय ॥ १४ ॥ योगेशाचे भान हरपले। क्रियाकर्म यंत्रवत झाले। धुंद आनंदाने तो डोले। हासे रडे स्वतःशी ॥ १५ ॥ सर्व साधने साधका हाती। शक्तिपातयोगसाधना उलटी गती। साधकाची न चाले मती। साधना हाती साधक ॥ १६ ॥ कल्पनातीत वस्तूसाठी। कल्पित साधन के गोठी। तेथ हवी 'ज्ञानसाधन' भेटी। श्रीसद्‌गुरुकृपाप्रसादे ॥ १७ ॥ योगेश मठाची झाडलोट करी। भोजना होई आचारी। दोन्ही गुरूंची करी चाकरी। मनी जाणोनी परम लाभ ॥ १८ ॥ गुरु परमगुरु सेवा घडली। भवरोगावर शिळा पडली। निरंजन

नेत्र उघडली । झाला कृतार्थ योगेश ॥ १९ ॥ लाकडे फोडूनी, मागे भिक्षा । स्मरोनी घेतलेली दीक्षा । प्रारब्धाची नको शिक्षा । म्हणोनि केला सत्संग ॥ २० ॥ योगेशाचे वय लहान । घेतले व्रत महान । नारायण कृपा घेऊन । सद्‌गुरुसह परतला ॥ २१ ॥ गुरूची इच्छा म्हणोनी । घरची निरवानिरव करोनी । योगेश संन्यास घेऊनी । चिन्मयानंद सरस्वती ॥ २२ ॥ घेऊनि साधनेचा ध्यास । बावीसाव्या वर्षी संन्यास । काशी करूनि हृषिकेश । स्वामी आले टिहरीत ॥ २३ ॥ तेथ साधन फार झाले । क्रियावेग मंद झाले । नंदादीपासम शांत झाले । चिन्मयानंद सरस्वती ॥ २४ ॥ माता कुंडलिनीने आदेश दिला । स्वामी आता दक्षिणेस चला । येथील कार्यभाग संपला । जगदोद्धारा लागावे ॥ २५ ॥ हाचि मंत्र नित्य साधनेत । माँ कुंडलिनी सांगे कानात । सतत सारखा येई मनात । दक्षिणेस आता चलावे ॥ २६ ॥ आईचे शब्द प्रमाण मानोनी । स्वामी निघाले टिहरी सोडूनी । काही न येई ध्यानी मनी । कोठे जातो आपण ॥ २७ ॥ आई मनी हासत होती । तिला नेण्याची घाई होती । विश्वसूत्रधाराची गती । पळवितसे आईला ॥ २८ ॥ स्वामी विचारी आईला । कोठे चालविले या वेड्याला । सोडू नको मम हाताला । धरूनी नेई कोठेही ॥ २९ ॥ स्वामीस आणिले हुशंगाबादेस । येथून लागे दक्षिण देश । कर्मभूमी मुख्य वेस । प्रवेश-द्वार दक्षिणेचे ॥ ३० ॥ नर्मदामातेचे तीर गाठले । स्नान पान करूनि तुष्टले । मंगळवार घाटीं राहिले । पुढील जादू पहावया ॥ ३१ ॥ विश्वमंचकाचा सूत्रधार । आहे खरा जादुगार । सर्व हालचाली करणार । पडद्यामागे लपोनी ॥ ३२ ॥ असेच नवल दुसरे घडले । बार्शीहूनि महाराज आणिले । खर्रा घाटावरी उतरविले । दत्तमंदिराजवळी ॥ ३३ ॥ रावबहादूर परांडे यांना । माध्यम केले पहाना । करवी युक्त्या नाना । वामन-स्वामी भेटीच्या ॥ ३४ ॥ स्वामींनी पिशाच्च उद्धरिले । परांडे तेथे भेटीस आले । स्वामींना घरी भिक्षेस नेले । वेधदीक्षेचे विचारावया ॥ ३५ ॥ स्वामी प्रार्थना आहे एक । वेधदीक्षा देणारा ठाऊक । असेल तर पुरवावी भाक । मी आहे जिज्ञासू ॥ ३६ ॥ स्वामींची तार लागली । आतून आईची आज्ञा झाली । सांग संधी भली आली । वेधदीक्षा देतो म्हणूनी ॥ ३७ ॥ स्वामींनी निःसंकोच उच्चार केला । मीच देतो वेधदीक्षेला । जागृत करतो कुंडलिनीला । घ्या केव्हाही अनुभव ॥ ३८ ॥ रावबहादूर सर्द झाले । शब्द ऐकताच गरगरले । चाचपून स्वतःला पाहिले । हे स्वप्न तर नाही ना ॥ ३९ ॥ विश्वगतीला वेग आला । मुक्याला शब्द फुटू लागला । पांगळा चालू लागला । चिन्मयानंद वाणीने ॥ ४० ॥ स्वामी मुक्ता नगरीचे जवाहिरे । पसरून बसले मोती

हिरे । जाणारे येणारे घेणारे । पारखी कोणी आहेत का ॥४१॥ पुण्यसंपदा गाठी नाही । श्रद्धेच्या तर गावी नाही । जो तो या वेड्याला पाही । स्वतः शहाणा समजोनी ॥४२॥ स्वामींनी पाणी जोखले । काही मोती फुकट वाटले । कुबेराचे भांडार भरले । होते झोळीत स्वामींच्या ॥४३॥ परांडे आपण मागे राहिले । नारायण-प्रसादांना पुढे केले । त्यांचे उत्तम अनुभव पाहिले । महाराजा सांगाया ॥४४॥ अशाच काही दीक्षा झाल्या । सर्वांना क्रिया होऊ लागल्या । महाराजांनी स्वतः पाहिल्या । विश्वास पक्का कराया ॥४५॥ जाणे येणे सुरू झाले । काका बाबा वैद्य जमले । स्वामी संगतीत रमु लागले । चिन्मयानंद सरस्वतींच्या ॥४६॥ बाबा महाजन योगी भले । दीक्षेसाठी आर्त झाले । जाता जाता पावन केले । दीक्षा देऊनी स्वामींनी ॥४७॥ बाबांचे अनुभव पाहुनी । महाराज मनी पक्के करूनी । प्रार्थना करूनी स्वामी चरणी । घरीच आपुल्या आणिले ॥४८॥ लोक नेती हिरेमोती । हे मात्र स्वामीच आणिती । रत्नांची त्या काय क्षिती । रत्नभांडारी तो खरा ॥४९॥ मालमुलुक श्रीहरी देत । परि हरीजन हरीच देत । जबर फरक ध्यानी घेत । आणिले सद्‌गुरु स्वामींना ॥५०॥ दीक्षा घ्यावी असे वाटले । तसे त्यांनी स्वामींना म्हटले । परी प्राणायाम साधन कुठले । चालले होते महाराजांचे ॥५१॥ म्हणुनी स्वामी थोडे थांबले । पुढे पाहु म्हणोनी वदले । असेच चार दिवस गेले । प्राप्तघडी यावया ॥५२॥ महाराजांना स्वप्न पडले । स्वामींनी मस्तकी हात ठेविले । ज्ञानसाधन सुरू झाले । दीक्षा झाली स्वामींची ॥५३॥ जवळी प्रत्यक्ष सद्‌गुरु असता । स्वप्नाने का ही दीक्षा देता । खरे कसे मी मानु आता । मनीची असेल ती भ्रांत ॥५४॥ म्हणुनी ते गप्प राहिले । स्वामींना काही न वदले । स्वप्न मनीचे मनी ठेविले । काय होते ते पहावया ॥५५॥ असे हे शिष्य असे हे गुरु । पहाती परस्परांचा निर्धारु । एक एकाहुनी थोरु । लघुगुरुच्या धर्मात ॥५६॥ दुसरे दिवशी सायंकाळी । फिरावयास निघाली मंडळी । नव्हती नित्याची खेळीमेळी । स्वामी होते गंभीर ॥५७॥ कोठे थोडे चालू लागले । स्वामी मध्येच थबकले । त्यांची मागे वळली पाऊले । घरी जावे म्हणूनी ॥५८॥ ती केवळ स्वामींची इच्छा । कोणास वाटे ना तुच्छा । काही न करता पृच्छा । सर्व मागे परतले ॥५९॥ तिघेजण घरी आले । पलंगावर स्वामी बसले । महाराजांना म्हणाले । घे दीक्षा आत्ताची ॥६०॥ महाराज गडबडले । नमस्कार सुद्धा विसरले । होते तिथेच बसले । गुरुस्मरण करीत ॥६१॥ स्वामींनी छाटी सावरली । उभे राहिले करोनी साऊली । सहस्त्री ठेऊनी करकमली । सोडिले श्वास

जोरात ॥ ६२ ॥ कर्पास राशीस आग लागली । वामनमूर्ती उडू लागली । थड् थड् थड् कंप पावली । क्षणमात्र न लागता ॥ ६३ ॥ कुंडलिनिने मुलाधार सोडिले । मेरूदंड घुसळून काढले । नागिणीने फुत्कार सोडिले । भस्त्रिका म्हणती योगिराज ॥ ६४ ॥ नागीण भरभर फणा हाळवी । घूर्णा क्रिया तीच म्हणावी । मस्तक भूमीला टेकवी । योगमुद्रा ती होय ॥ ६५ ॥ झटपट आसने होऊ लागली । बंधमुद्रा मागे पडली । शक्ति आता उसळू लागली । फुटफुट उडे मेंढक ॥ ६६ ॥ क्रियांची कल्पना करवेना । काही करून आवरेना । खोली सारी पुरेना । गोंधळ घातला शक्तीने ॥ ६७ ॥ धुंदे कुंद चिन्मयानंद । पाहती पुत्रोत्सव आनंद । ऐसा एकचि पुत्र बेबंद । लोकनाथा आकळेना ॥ ६८ ॥ तासभरी साधन झाले । तेव्हा कुठे ते स्थिर झाले । नागिणीचे पिल्लु दडले । मुलाधारी जाऊन ॥ ६९ ॥ हळु हळु कंप सरला । लोचनी महापूर लोटला । कंठ सद्गदीत झाला । महाराज गुळवणींचा ॥ ७० ॥ जागेवरून ताड्कन उठले । स्वामीचरण घट्ट पकडिले । गरम श्वास त्यावरी सोडले । कृतज्ञता म्हणूनी ॥ ७१ ॥ नाही दक्षिणा नाही फल । गुरुकृपेचे कैसे फल । रिक्त हस्ता लाभेल । म्हणोनी क्षमा मागितली ॥ ७२ ॥ स्वामींनी पाठ थोपटली । आपुली दीक्षा आठवली । सद्गुरु कृपा साठवली । मोकळी केली तेधवा ॥ ७३ ॥ जात आमुची श्रीगुरुची । काही एक न घेण्याची । सदा देत राहण्याची । दत्त आमुचे गुरुदेव ॥ ७४ ॥ पुन्हा महाराज गद्गदित झाले । दत्त दत्त म्हणत राहिले । रोमांच बाष्प अंगी दाटले । फाटला पडदा मायेचा ॥ ७५ ॥ बोलावे काय कळेना । द्यावे काय ते कळेना । करावे काय कळेना । मुक्याने गुळ चाखला ॥ ७६ ॥ शांत शांत सारे झाले । संध्या फराळ उरकले । लवकरच झोपी गेले । गुरुशिष्य सगळे ॥ ७७ ॥ ब्राह्म मुहुर्ती जाग आली । गुरु शिष्य जोडी उठली । शिष्यासमोर बसली माऊली । पुन्हा प्रकार रात्रीचा ॥ ७८ ॥ तसेच जोरात साधन झाले । फार वेळ चालु राहिले । गुरु शिष्य दोन्ही रंगले । आप आपल्या मस्तीत ॥ ७९ ॥ शरद ऋतुचा काळ होता । नवरात्रोत्सव झाला होता । गुरुद्वादशीला न जाता । महाराज राहिले गुरुजवळी ॥ ८० ॥ वाडीची वारी कधी न चुकली । एकोणीशे सातात सुरू झाली । पंधरा वर्षांनी प्रथम राहिली । इच्छा केवळ श्रीगुरूची ॥ ८१ ॥ स्वामींना उलगडा झाला । आईचा शब्द खरा ठरला । असा दिव्य शिष्य भेटला । गुरूस आदर वाटावा ॥ ८२ ॥ मग स्वामी दक्षिणेत घुसले । महाराष्ट्राच्या अंतरी आले । महाराजांच्या येथे राहिले । बार्शी पुण्यास विशेष ॥ ८३ ॥ स्वामी जसे आत आले ।

शिष्यश्रेष्ठत्व कळो आले । सद्‌गुणांचे भांडार दिसले । महाराजांच्या अंतरी ॥ ८४ ॥ जो तो त्यांना मान देई । त्यांच्या शब्दाबाहेर नाही । सद्‌गुण सुगंधाच्या जाईजुई । भोवती महाराजांच्या ॥ ८५ ॥ विचार शुद्ध-आचार शुद्ध । क्रिया शुद्ध-वर्तन शुद्ध । आत बाहेर शुद्धच शुद्ध । स्फटिक कर्पूरा लाज वाटे ॥ ८६ ॥ स्वामींनी सर्व ताडले । हुडकुनी निमित्त काढिले । दीक्षा सर्वस्व देऊन टाकले । परम शिष्या वामना ॥ ८७ ॥ स्वामी होते उज्जयनीस । दीक्षा झाली बार्शीस । गोपिकाबाई सौभाग्यवतीस । भाग्यश्री महाराज हस्ते ॥ ८८ ॥ शक्तिपातयोग परंपरा । वाढू लागली झरझरा । पसरला तिचा पसारा । गंगाधरतीर्थ आशीर्वादे ॥ ८९ ॥ तिकडे काशीस असे घडले । स्वामींचे गुरु संन्यासी झाले । शंकर पुरुषोत्तम तीर्थ बनले । दण्डधारी यतिराज ॥ ९० ॥ स्वामींना ही वार्ता कळली । धावत जाऊन काशी गाठली । संन्यासी यतिवेष माऊली । वंदूनी केली प्रार्थना ॥ ९१ ॥ आपण आमचे गुरुमहाराज । आजपर्यंत राखिली लाज । दण्डधारी यतिराज । आम्हा करावे दण्डधारी ॥ ९२ ॥ भक्ता आधीन सद्‌गुरु । कसे तुला मी नाकारू । गयेचा आता पंथ धरू । तेथे होशील दण्डधारी ॥ ९३ ॥ गयेस दण्डग्रहण झाले । चिन्मयानंद दण्डी झाले । लोकनाथ नाव ठेविले । शंकर पुरुषोत्तम गुरुराये ॥ ९४ ॥ स्वामी श्रीलोकनाथ तीर्थ । नाव झाले जगप्रसिद्ध । शक्तिपात स्वामी सिद्ध । जयजयकार करू त्यांचा ॥ ९५ ॥ श्रीलोकनाथ पुण्यास आले । जिकडे महाराज तिकडे गेले । वीस नारायण मध्ये आले । नारायण नारायण म्हणत ॥ ९६ ॥ स्वामी चैतन्याचा पुतळा । उमा गोदा झाल्या गोळा । महाराज पाहती सोहळा । रोमांचित होऊनी ॥ ९७ ॥ त्या छोट्या खोलीत नेले । खिडकीपाशी आसन घातले । त्यावर स्वामींना बसविले । सर्वही घेती दर्शना ॥ ९८ ॥ दर्शना एक तरूण आला । गोरागोमटा होतकरू दिसला । हा कोण म्हणून प्रश्न केला । स्वामींनी महाराजांना ॥ ९९ ॥ यांचे नाव भुजंगराव । भालेराव असे आडनाव । सोडून आले डोणगेगाव । स्नेही आमुचे शेजारी ॥ १०० ॥ इकडची आवड आहे । सर्व लक्ष इकडे आहे । लक्ष देऊनी पाहात आहे । काय येथे चालले ॥ १०१ ॥ स्वामी आपण त्याकडे पहावे । आपले करून टाकावे । मला क्षणभरी न राहावे । म्हणून हा शब्द टाकला ॥ १०२ ॥ भुजंगरावांना दीक्षा झाली । स्वामींनी कृपा केली । पुण्यामधील ही पहिली । दीक्षा स्वामींची असे ॥ १०३ ॥ त्यांचे साधन शांत असे । बाह्य हालचाल दिसत नसे । सर्वत्र आरक्तता दिसतसे । ही खूण शक्ति जागृतीची ॥ १०४ ॥ स्वामींनी आशीर्वाद

दिला। महाराज आहेत संगतीला। हा लाभ दुर्लभ इंद्राला। आयुष्यभरी विसरू नको ॥ १०५॥ स्वामी शब्द धरला पकडून। घरदार इस्टेट दिली सोडून। मनीच्या सर्व वासना मारून। ठेविले ठाण चरण ठायीं ॥ १०६॥ भक्त नसतो विभक्त। शिष्य तेथे दत्त। महाराज आणि लोकनाथ। एकेच ठायीं सापडती ॥ १०७॥ भुजंगराव हे पाहात। हर्षनिर्भर होत। देवदुर्लभ ही मात। प्राणापलिकडे सेविती ॥ १०८॥ आता शिष्य वाढू लागले। अविद्या दिग्गज मागे सरले। ब्रह्मविद्येचे राज्य वाढले। स्वानंदसम्राट स्वामींचे ॥ १०९॥ संकल्प महापुरुषाचा। मार्ग हा शक्तिपाताचा। दिव्य स्फुलिंग चैतन्याचा। भारतभर पसरेल ॥ ११०॥ स्वामी फिरत काशीस आले। आपल्या गुरुमहाराजांना भेटले। नवल जे जे होते दाटले। कथिले स्वामींनी श्रीगुरूला ॥ १११॥ काशीत गुरूंचा आश्रम झाला। सिद्धयोगाश्रम नाव तयाला। त्या वास्तूच्या उद्‌घाटनाला। स्वामी छोटी गैबीत ॥ ११२॥ स्वामी गुजराथेत वळले। तेथे भगवंतराव भेटले। दुर्धर व्याधिने व्यापले। दीक्षित महाराजांचे ॥ ११३॥ कर्मकहाणी सर्व सांगितली। वामन गुरूने फुंकर घातली। परी स्वामी कृपा साऊली। करावी या दीनावर ॥ ११४॥ म्हणोनी स्वामी तिकडे गेले। थुरावासात महिना राहिले। त्यांचे साधन करून घेतले। स्वामींनी आपल्या समोर ॥ ११५॥ फार मोठे आश्चर्य घडले। न होणारे सहज झाले। दुर्धर व्रण सुकु लागले। दुष्काळातील जलापरी ॥ ११६॥ वर्षाची होती मर्यादा। गुरुमुखातून आल्या शब्दा। नियती थबकली कितीकदा। शब्द मर्यादा सांभाळीत ॥ ११७॥ स्वामी तुष्टले भगवंतरावावरी। घेई सेवा मासभरी। तेथोन मारली भरारी। परम कृपा करोनी ॥ ११८॥ स्वामी परत पुण्यास आले। शंकरराव मार्कंड भेटले। जीवाभावाचे भक्त जाहले। आयुष्यात स्वामींच्या ॥ ११९॥ एम्. ए., एल्‌एल्. बी. होते। तरी वकिली करीत नव्हते। रेस मध्ये 'बुकी' होते। स्वामी आज्ञेप्रमाणे ॥ १२०॥ स्वामींनी मर्यादा घातली। येथून सहा वर्षे भरली। म्हणजे बुकीची जागा खाली। काही केल्या करावी ॥ १२१॥ स्वामी आज्ञेने चालले। शंकरराव बुकी झाले। संपत्तीचा पाऊस चाले। मुसळधार हत्तीचा ॥ १२२॥ पहिले दिवशी हजार आले। दुसरे दिवशी पाच हजार झाले। हजारांचा पाढा चाले। लक्ष्मीचा रोज घरात ॥ १२३॥ एकदा तर वीस हजार आले। शंकरराव पाहातच राहिले। काही न करता पैसे आले। स्वामीकृपा अफाट ॥ १२४॥ मार्कंड होते दत्तभक्त। पारायणे, पारणे थाटात। समारंभ असे गर्जत। घरी शंकररावांच्या ॥ १२५॥ ऐंशी

हजारांचा बंगला घेतला । वाहन सौख्या तोटा कसला । गडी माणसांचा गल्बला । तोटा नसे परिवारा ॥१२६॥ याहून एक विशेष असे । स्वामीभक्तीत उणे नसे । होईल ते ते करीतसे । स्वामींसाठी उदार हस्ते ॥१२७॥ स्वामींच्या यात्रा केल्या । बद्रीनारायणा दंड्या केल्या । खास रेल्वे गाड्या झाल्या । ऐश्वर्याच्या ऐपतीने ॥१२८॥ काशीला एक आश्रम बांधला । दहा हजार रुपये खर्च केला । स्वामीचरणी दान केला । गुरुभक्तीचा कळस ॥१२९॥ असे हे भक्त मार्कंड । जणू प्रतापी भक्त मार्तंड । परि यासी झाला असे दंड । प्रारब्धाच्या गतीने ॥१३०॥ वर्षे लक्षात राहिली नाही । पैशाचा मोह थांबला नाही । काय झाले ते कळले नाही । फटका लाखाचा बसला ॥१३१॥ शंकरराव हादरले । घामाने शरीर दरदरले । काळीज टचकन फाटले । कंठशोष जाहला ॥१३२॥ या फटक्याला उपाय नाही । रेसशिवाय पैसा नाही । आता दुसरी धडगत नाही । करी तोटा दुप्पट ॥१३३॥ स्वामींना फार वाईट वाटले । होणारे ते कधी न चुकले । जाणीव देऊनी सावध केले । परी प्रारब्धगती आगळी ॥१३४॥ स्वामींनी आश्रम विकला । सोळा हजार किंमतीला । तो पैका पाठविला । मार्कंडांना सावरण्या ॥१३५॥ स्वामींची ही वृत्ती पाहून । शुक्राचार्य वदले लाजून । आज आमचेवरी ताण । लोकनाथांनी हो केली ॥१३६॥ भले भले संन्यासी झाले । डोंगर कपारी राहिले । विरक्तीचे टेंभे मिरविले । योजने दूर वासनेच्या ॥१३७॥ परी लोकनाथांचे आगळे । वासनेच्या ज्वाळी लोळे । लोभजळे घोळे मळे । पूर्ण कोरडा दगडापरी ॥१३८॥ विरक्तीला लाज वाटली । लोकनाथांची मी बटुकली । त्यांची मी तर साऊली । राहिली प्रसिद्धीपराङ्मुख ॥१३९॥ गंगा हिमालय काशी । स्वामी येथील निवासी । भक्तहृदयवासी । तिकडून आले काशीत ॥१४०॥ भेटले भक्त जांबवंत । भक्त शिरोमणी हनुमंत । महाराजांचा शिष्य म्हणत । करी सेवा स्वामींची ॥१४१॥ भाग्य जांबवंत सिंहाचे । परम गुरूच्या सेवेचे । शब्द वामन श्रीगुरूचे । स्वामी सेवा करावी ॥१४२॥ सेवा सिंहाची पाहून । संदीपकाची होते आठवण । स्वामी सेवा अति कठीण । पहा प्रसंग अनेक ॥१४३॥ स्वामी व्याधींनी पीडले । रोग अनेक उद्भवले । प्रारब्ध म्हणोनी भोगले । उपाय काही न करता ॥१४४॥ स्वामींचे दुःख पहावेना । जांबवंत उसंत घेईना । सेवा करीतसे नाना । धीटाईने स्वामींची ॥१४५॥ स्वामी सेवा घेत नसे । बोलत बसती हवे तसे । कफे गळा दाटतसे । डोळे वटारूनी पाहती ॥१४६॥ पुढे जाता हुसकुन देती । तुझी दुःखे मला येती । तुझ्यामुळे माझी ही गती ।

चालता हो येथून ॥ १४७॥ जांबवंताने ऐकावे। स्वतःला बहिरा समजावे। स्वामींपुढे पुन्हा जावे। सेवा काही करावया ॥ १४८॥ स्वामी औषध नको म्हणती। दिले तरी फेकून देती। तू नको माझ्या पुढती। फिरून का आलास ॥ १४९॥ असे स्वामी वेदधर्ममुनी। लावून बसले आपुली धुनी। जाळीत राहिले प्रारब्ध गहनी। या शिष्याच्या आधारे ॥ १५०॥ एकदा सकाळी जांबवंत आला। स्वामी दिसेना जागेला। हृदयात गल्बला झाला। स्वामी कोठे म्हणोनी ॥ १५१॥ त्यांचेच स्मरण करोनी। दवाखाना पाहावा म्हणोनी। पळत निघाला अनवाणी। ठिकाण ते गाठले ॥ १५२॥ तेथे स्वामी बसले होते। दुखण्याचे धक्के बसत होते। ओरडले पाहून जांबवंताते। यमा येथे आलास का ? ॥ १५३॥ खाली जाऊनी उभा राहिला। काय करावे या दैवाला। सेवा करू देई न मजला। प्राण देवा घे माझे ॥ १५४॥ जांबवंत झाडाआड थांबले। रिक्षातून स्वामी गेले। ते चोरून त्याने पाहिले। सुटला मागे धावत ॥ १५५॥ रिक्षा जाईना गल्लीत। जाता येईना घरात। स्वामी तेथेच खाली बसत। गोळामोळा होऊनी ॥ १५६॥ जांबवंत धावत आला। स्वामींनी बघितले त्याला। चेहरा त्यांचा प्रसन्न झाला। सेवेवर तुष्टले ॥ १५७॥ गुरुस्वामी खांद्यावरी घेतले। श्रावणबाळापरी चालले। काशीत काशीयात्रा चाले। धन्य धन्य जांबवंत ॥ १५८॥ स्वामींना मठीत आणले। आसनावरी बसविले। हात पाय चेपले। रेशमी हृदयाच्या हाताने ॥ १५९॥ असे हे जांबवंत। म्हणोनी म्हणावे हनुमंत। हेच होती खरे संत। चरणा त्यांच्या नमस्कार ॥ १६०॥ स्वामींचे चरित्र अपार। भरलेला चैतन्य सागर। उपसणारा किती उपसणार। त्या सागरी डुंबु या ॥ १६१ ॥ महाराजांना काशीस आणले। आपल्या गुरूकडे नेले। कौतुक नातवाचे केले। शिष्य आमुचा प्रपौत्र ॥ १६२॥ शक्ती खेळवी स्वामीला। स्वामी भुलवी शक्तीला। एक सोडीना दुसऱ्याला। शिवशक्तीचा खेळ असा ॥ १६३॥ भारतभर स्वामी हिंडले। जडजीव उद्धरिले। मोक्षमार्गीचे केले। अक्षय शक्ती देऊन ॥ १६४॥ शिष्य नीलकंठ वत्सराज। स्वामीकृपेचे तेज। पाहून वाटले चोज। एम्. ए. परीक्षा काळात ॥ १६५॥ रस्त्यात एक गाय पडली। कोणाला ती उठू न शकली। परी स्वामींनी ती उठविली। कृपाकटाक्षे पाहून ॥ १६६॥ माकडाने छाट्या फाडल्या। त्या शिष्यांनी नव्या आणल्या। स्वामींना या चेष्टा कळल्या। माकडे शांतविली शब्दाने ॥ १६७॥ मृत्यूचे दिवस सांगितले। दुष्ट डबडे उघडे केले। संकटात वाचविले। अगणित घटना स्वामींच्या ॥ १६८॥ चमत्काराशी वैर धरले।

वैर धरूनी चमत्कार केले। घटनेपासून दूर राहिले। म्हणोनी स्वामी संन्याशांचे ॥१६९॥ जो जो त्यांच्याजवळ गेला। लाल घोटीत बसून राहिला। त्यांच्या तंद्रीत रंगला। देहभान हरपोनी ॥१७०॥ नारायणराव देशपांडे। किर्लोस्कर मोघे आणि बेंद्रे। गुरुभक्तीचे नाचवी झेंडे। होती धुंद स्वामीसेवे ॥१७१॥ बाळासाहेब वाकडे। शब्द पडती तोकडे। स्वामीसेवेचे धडे। त्यांचेपासून गिरवावे ॥१७२॥ नारायणराव ढेकणे। निरंजनाचे देखणे। लेऊन बसले लेणे। परमकृपेने स्वामींच्या ॥१७३॥ खेर, जाधव, सोवनी। भालू, नारायण बंधूंनी। स्वामीसेवा करूनी। कृतार्थ केले आयुष्या ॥१७४॥ प्रल्हादशास्त्री बार्शीचे। नेतृत्व घेऊन सर्वांचे। दान दिले सेवेचे। संतोष झाला स्वामींना ॥१७५॥ पराडकर धन्वंतरी। औषधे पाठविली वरचेवरी। स्वामी असता काशीपुरी। स्वामीसेवा आगळी ॥१७६॥ व्यंकू, बापू आणि भास्कर। घेऊनी दीक्षा क्रमवार। सेविले स्वामी गुरुवर। लक्ष ठेऊनी अनेकदा ॥१७७॥ काशीचे शिष्य कितीतरी। स्वामीशिष्यांनी भरली नगरी। भारताच्या कडेकपारी। उल्लेख आहे ग्रंथात ॥१७८॥ भक्तनामांचा विस्तार। मी मंदमति किती करणार। जो काही केला येथवर। स्वामी इच्छा म्हणोनी ॥१७९॥ आणिक अनेक राहिले। ते स्वामी नावात आले। हे समजून ते भले। क्षमा करतील दासाला ॥१८०॥ स्वामींना मृत्यूची चाहुल आली। भराभर पत्रे लिहिली। मृत्युंजयापरी ती भासली॥ शिष्य जमले काशीत ॥१८१॥ 'तो' क्षण जवळी आला। ऊर्ध्व श्वास सुरू झाला। शिष्यांनी श्वास रोखला। स्वामींसाठी तेधवा ॥१८२॥ धाऊन आले विश्वनाथ। हा तर प्रत्यक्ष सिद्धनाथ। लोक म्हणती लोकनाथ। मृत्यूला भय याचे ॥१८३॥ शिवाची सत्ता मृत्यूवरी। त्यातून ही काशीपुरी। विश्वनाथाच्या आज्ञेवरी। मृत्यूचे काय चालते? ॥१८४॥ स्वामीसंकट संपले। शिष्य सर्व पांगले। स्वामी झाले चांगले। सांगती आपुल्या बंधूंना ॥१८५॥ भक्ताचा देव गुरु। गुरूचा देव भक्त थोरू। हा करून विचारू। घेतले दर्शन स्वामींनी ॥१८६॥ जाण्याचे जेव्हा ठरविले। त्याच्या तीन दिवस पहिले। जांबवंतास बोलाविले। स्वामींनी काही सांगण्या ॥१८७॥ लक्ष्मणशास्त्री आणि जांबवंत। स्वामी आज्ञेने आले धावत। घालून साष्टांग दंडवत। कर जोडोनी ठाकले ॥१८८॥ आत्ता आम्ही जातो। तुम्हास काही सांगतो। विश्वास तुमचा वाटतो। म्हणुनी तुम्हा बोलाविले ॥१८९॥ दगडाची पेटी करावी। त्यात ही

देहतुलसी ठेवावी । घट्ट बांधून गंगार्पण करावी । शिवनामाच्या गजरात ॥ १९० ॥ मी कालीभक्त पूर्वाश्रमीचा । छंद तिच्या पूजेचा । ही पुरवावी इच्छा । कुमारिका पूजोनी ॥ १९१ ॥ माझी उत्तरक्रिया अशी करा । महाराष्ट्रीय ब्राह्मणद्वारा । नारळ फोडुनी मस्तकी करा । ब्रह्मरंध्र मोकळे ॥ १९२ ॥ जाऊन सिद्ध योगाश्रमात । भंडारा घाला गावात । दान धर्म देऊन बहुत । तुष्ट करा संन्यासी ॥ १९३ ॥ मी नव्हे, जाते शरीर । आता झाले ते जर्जर । चैतन्य तेजाच्या बरोबर । राहतो तुमच्या हृदयात ॥ १९४ ॥ जेव्हा जेव्हा मज स्मराल । तेव्हा तेव्हा पहाल । सुख-तंद्रीत डोलाल । आण माझी सांगतो ॥ १९५ ॥ स्वामींनी हा निरोप घेतला । दोघांना तेव्हा चटका बसला । जांबवंताने तर धसका घेतला । स्वामींच्या या शब्दांनी ॥ १९६ ॥ जांबवंताला रडु आवरेना । बाहेर परी दिसू देईना । आवडणार नाही स्वामींना । झाला कष्टी गंभीर ॥ १९७ ॥ रविवारी हा प्रकार झाला । दिवस बुधवारचा उजाडला । स्वामी खिळले अंथरुणाला । नेत्र पलिकडे लावून ॥ १९८ ॥ माघ वद्य तृतीया होती । मध्यरात्र उलटली होती । चिन्मयस्वामी देह सोडती । ॐकाराच्या स्वरात ॥ १९९ ॥ देहसंबंध सुटला । बंधनाचा मार्ग खुटला । चिन्मयानंदात नटला । झाले स्वामी स्मर्तृगामी ॥ २०० ॥ स्वामी श्रीलोकनाथतीर्थ । सार्थ जीवन होई कृतार्थ । शक्तिपात पथ करती समर्थ । देव करती पुष्पवृष्टी ॥ २०१ ॥ शिष्यनिर्वाण वृत्त ऐकले । शंकर पुरुषोत्तम स्तब्ध झाले । मुखातून त्यांच्या शब्द आले । पूर्ण प्रतापी महात्मा ॥ २०२ ॥ गुरु योगानंद वदले । चार तपे लोकनाथ पाहिले । निष्कलंकित ते मी अनुभवले । पापविनाशी भागिरथी ॥ २०३ ॥ महाराज पुण्यात होते । गुरुचरित्र सप्ताह वाचीत होते । गुरुवारी करून समाप्ती ते । तार घेती हातात ॥ २०४ ॥ गुरुचरित्र समाप्ती झाली । त्याची ती तार वाचली । वामनमूर्ती मटकन बसली । अवतरणिका स्मरत ॥ २०५ ॥ श्रीलोकनाथ चरित्र अवतरणिका । श्रीगुरु लीला स्मरणिका । मुक्त करील कारणिका । बंधनातून मायेच्या ॥ २०६ ॥ साधनेतील सर्व विक्षेप । वाचता घालविल साक्षेप । आवर्तन करून करा बैठक । पहावा अनुभव घेवोनी ॥ २०७ ॥ विशेष अनुभव येतील । शक्ती वर वर चढेल । चित्तचांचल्य सरेल । अवतरणिकेच्या पठणाने ॥ २०८ ॥ आनंदसागरी बुडाल । तंद्रीची धुंदी चढेल । साधनेची भूक वाढेल । सारे मल खावया ॥ २०९ ॥ काही न मागता मिळेल । न ठरविता खूप होईल । सहजची साध्य साधाल । साधनभक्ती गुरु-कृपा ॥ २१० ॥ गुरुतत्त्वावर चित्त राहील । संक्षेप कर्मांचा होईल । स्वामींचा

दास शोभाल । चित्त वाणी कृतीने ॥२११॥ ग्रंथ पठणाने एवढे होईल । परि अधिकची इच्छा असेल । तीव्रता असेल प्रबल । तरी पुढील अनुष्ठान करावे ॥२१२॥ अवतरणिका सतत म्हणावी । झाली तर पाठ करावी । जाता येता वदावी । स्वामींचे शब्द म्हणोनी ॥२१३॥ नमूनी गुरुपीठ परंपरेला । प्रार्थना महाराज स्वामीला । शब्द खरा करा आपुला । भक्तवत्सल व्रतधारी ॥२१४॥ आपण जे करून घेतले । ते आपल्याच चरणी ठेविले । ठेव ठेवता चरण सापडले । माथा टेकवी अच्युत ॥२१५॥

**॥ इति श्रीगुरुदेव दत्तात्रेयार्पणमस्तु ॥**

स्वामी श्रीलोकनाथतीर्थ पुण्यतिथि २८–२–७५